00146653

14665

NOT TO BE ISSUED
OUT OF THE LIBRARY.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

THE
ASIATIC SOCIETY OF BOMBAY
TOWN HALL, BOMBAY-1.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

Digitized with financial assistance from
NSDL
Technology, Trust & Reach
on 16 November, 2018

NATIONAL ARCHIVES OF INDIA

NATIONAL ARCHIVES OF INDIA

A

HISTORY OF MODERN INDIA.

PART I.

MOHAMMADAN PERIOD.

BY

G. S. SARDESAI, B. A.,

Princes' School—BARODA.

PUBLISHERS

DAMODAR SAVLARAM & CO.

General Printers, Publishers, and Agents, Bombay.

THE 'INDU-PRAKASH' STEAM PRESS, BOMBAY.

1910.

Price Rs. 2-8-0.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

954.02
146653
11 SEP 1968

Registered under Act 25 of 1867
and all rights reserved.

11 SEP 1968

00146653

NATIONAL ARCHIVES OF INDIA

प्रस्तावना.

सुमारें पंधरा वर्षांपूर्वी मी इतिहासाचें काम हातीं घेतलें, तेव्हां त्याचा उपयोग कसा करतां होईल ह्याची मला कल्पना नव्हती. मराठी वाचकांच्या व विशेषत: शिक्षकांच्या उपयोगासाठीं थोडीबहुत माहिती देण्याचाच त्यावेळीं माझा उद्देश होता; आणि मुसलमानी रियासतीची द्वितीयावृत्ति काढण्याची इच्छा प्रकाशकांनीं जेव्हां मला कळविली, तेव्हां तें काम विशेष फेरफार केल्याशिवाय उरकून जाईल, असें मला वाटलें होतें. परंतु दोन वर्षांपूर्वी ब्रिटिश रियासतीचा पूर्वार्ध प्रसिद्ध झाला तेव्हांपासून, अनेक कारणांनीं माझ्या उद्योगाच्या स्वरूपांत पुष्कळच अंतर पडलें. गेल्या दोन वर्षांत पृथ्वीवरील मुसलमानी राष्ट्रांत जी चळवळ सुरू झाली आहे, तिच्या योगानें मुसलमानांचा धर्म, त्यांची राष्ट्रीय प्रगति व जगाच्या संस्कृतींत त्यांनीं केलेलें कार्य, ह्या प्रश्नाकडे माझें लक्ष लागलें, आणि त्यांच्या पूर्वेतिहासाविषयीं जिज्ञासा उत्पन्न झाली. आरब, तुर्क, मोगल, तसेंच सॅरसिन, मूर, सेल्जुक, ऑटोमन वगैरे विविध जातींनीं एक राष्ट्र बनून त्यांनीं भूतलावर जे प्रभाव गाजविले, त्यांचें सूक्ष्म निरीक्षण अवलोकन अत्यंत बोधप्रद आहे असें दिसून आलें. अशा व्यापक दृष्टीनें विचार करूं लागल्यावर पुस्तकाचें मूळस्वरूप अगदीं बदलून गेलें. मुसलमानांची संस्कृति व हिंदुस्थानांतील प्राचीन आर्यसंस्कृति यांची तुलना करून, मुसलमानांच्या विजयाची मीमांसा करणें मला इष्ट वाटलें. ह्या संबंधानें अधिकारी विद्वानांनीं लिहिलेलें वाङ्मय पुष्कळच आहे. ह्या पुस्तकाला आधारभूत ग्रंथांची यादी सोबत जोडिली आहे, तिजवरून माझ्या या उद्योगाची कल्पना थोडी-बहुत करतां येईल. मासिक पुस्तकांतून व स्वतंत्र ग्रंथांच्या रूपानें, पुष्कळ उद्योगी

NATIONAL ARCHIVES OF INDIA

958.02
11 SEP 1968
146653
11 SEP 1968

Registered under Act 25 of 1867
and all rights reserved.

11 SEP 1968
00146653
NATIONAL ARCHIVES OF INDIA

प्रस्तावना.

सुमारें पंधरा वर्षांपूर्वी मी इतिहासाचें काम हातीं घेतलें, तेव्हां त्याचा परिपोष कशा प्रकारचा होईल ह्याची मला कल्पना नव्हती. मराठी वाचकांच्या व विशेषतः शिक्षकांच्या उपयोगाची थोडीबहुत माहिती देण्याचाच तात्काळ माझा उद्देश होता; आणि मुसलमानी रियासतीची द्वितीयावृत्ति काढण्याची इच्छा प्रकाशकांनीं जेव्हां मला कळविली, तेव्हां तें काम विशेष फेरफार केल्याशिवाय उरकलें जाईल, असें मला वाटलें होतें. परंतु दोन वर्षांपूर्वी ब्रिटिश रियासतीचा पूर्वार्ध प्रसिद्ध झाला तेव्हांपासून, अनेक कारणांनीं माझ्या उद्योगाच्या स्वरूपांत पुष्कळच अंतर पडलें. गेल्या दोन वर्षांत पृथ्वीवरील मुसलमानी राष्ट्रांत जी चळवळ सुरू झाली आहे, तिच्या योगानें मुसलमानांचा धर्म, त्यांची राष्ट्रीय प्रगति व जगाच्या संस्कृतींत त्यांनीं केलेलें कार्य, ह्या प्रश्नाकडे माझें लक्ष लागलें, आणि त्यांच्या पूर्वेतिहासाविषयीं जिज्ञासा उत्पन्न झाली. आरब, तुर्क, मोगल, तसेंच सॅरसिन, मूर, सेल्जुक, ऑटोमन वगैरे विविध जातींनीं एक राष्ट्र बनून त्यांनीं भूतलावर जे प्रभाव गाजविले, त्यांचें सूक्ष्म निरीक्षण आपणास अत्यंत बोधप्रद आहे असें दिसून आलें. अशा व्यापक दृष्टीनें विचार करूं लागल्यावर पुस्तकाचें मूळस्वरूप अगदीं बदलून गेलें. मुसलमानांची संस्कृति व हिंदुस्थानांतील प्राचीन आर्यसंस्कृति यांची तुलना करून, मुसलमानांच्या विजयाची मीमांसा करणें मला इष्ट वाटलें. ह्या संबंधानें अधिकारी विद्वानांनीं लिहिलेलें वाङ्मय पुष्कळच आहे. ह्या पुस्तकाला आधारभूत ग्रंथांची यादी सोबत जोडिली आहे, तिजवरून माझ्या या उद्योगाची कल्पना थोडी-बहुत करतां येईल. मासिक पुस्तकांतून व स्वतंत्र ग्रंथांच्या रूपानें, पुष्कळ उद्योगी

NATIONAL ARCHIVES OF INDIA

शोधकांनीं व विचारवंत विद्वानांनीं गेल्या पंचवीस वर्षांत फारशी व इतर ग्रंथांतून माहिती घेऊन, नाना प्रकारच्या प्रश्नांवर मार्मिक लेख लिहून, या विषयाच्या ऐतिहासिक विवेचनांत पुष्कळच भर घातली आहे. तिचा समावेश या पुस्तकांत केल्याशिवाय विषयाची पूर्तता होईना. विजयनगरचा इतिहास, व चंगीझखान, तयमूरलंग इत्यादिकांविषयीं पुष्कळ नवीन मजकूर ह्या पुस्तकांत घातला आहे. मोगल बादशहासंबंधाचें पूर्वीचें विवेचन अगदींच बदलून गेलें आहे. प्रत्येक बादशहाविषयीं घरगुती व राजकीय तपशील, त्याची योग्यता ठरविण्यास लागणारी माहिती, आणि निरनिराळ्या ठिकाणीं प्रसिद्ध झालेली चर्चा, ह्या पुस्तकांत घेतली आहे. गेल्या पांचसात वर्षांत भूतलावर जी नवीन जागृति उत्पन्न झाली आहे, तिजमुळें, व माझें स्वतःचें वाचन, विचार, प्रवास, अनुभव, विद्वत्समागम व भाषा इत्यादि बाबतींनीं माझ्या मनावर झालेल्या परिणामामुळेंही, पुस्तकाचें पहिलें स्वरूप पालटल्याशिवाय राहिलें नाहीं. सारांश, हातीं घेतलेल्या विषयांत अगदीं प्रस्तुत कालापर्यंतची माहिती वाचकांस पुरविण्याचा मीं यथामति प्रयत्न केला आहे. तो कसा काय साधला आहे हें वाचकांनींच ठरविलें पाहिजे.

भूतलावरील राष्ट्रांची प्रगति आजकाल मोठ्या झपाट्यानें होत आहे. दळणवळणाचीं साधनें अधिकाधिक होत चालल्यामुळें एकमेकांची ओळख व ज्ञान वाढत आहे. जे प्रकार घडण्यास पूर्वी शतकेंच्या शतकें लागत, त्यांस आतां दशकही लागत नाहींत. अशा स्थितींत शेंकडों वर्षें निकट सहवास असलेल्या हिंदुमुसलमानांनीं एकमेकांचें हृद्गत समजून घेणें अवश्य झालें आहे. यास्तव हिंदुस्थानांतील मुसलमानी अमदानींत ज्या घडामोडी झाल्या, त्यांचें मार्मिक विस्तृत विवेचन ह्या पुस्तकांत केलें आहे. त्यावरून राष्ट्रीय दृष्ट्या मुसलमानांच्या ठिकाणीं पुष्कळ अनुकरणीय गुण असून, त्यांनीं जगाच्या इतिहासांत मोठी कामगिरी बजाविली आहे, असें इतिहासाचें अध्ययन करणारांस दिसून येईल.

वर सांगितलेल्या कारणांमुळें पुस्तकाचा आकारही अतिशय वाढला. पूर्वींच्या आवृत्तींत जाडया टाइपाचीं ७६८ पानें होतीं, त्यांऐवजीं आतां बारीक टाइपाचीं १०० पानें आणखी वाढलीं आहेत. त्यापेक्षां ज्यास्त पानांचा समावेश एका पुस्तकांत होणें शक्य नसल्यामुळें, व किंमतही पहिल्या आवृत्तीहून वाढवावयाची नाहीं असा संकल्प असल्यामुळें, औरंगजेबानंतरचा

NATIONAL ARCHIVES OF INDIA

म्हणजे अठराव्या शतकाचा भाग, अत्यंत महत्त्वाचा असूनही, त्याचें विवेचन पहिल्या आवृत्तीपेक्षां ज्यास्त तपशीलवार करण्यास अवकाश राहिला नाहीं. शिवाय अठराव्या शतकाशीं मराठ्यांचा निकट संबंध असल्या कारणानें, तें विवेचन मराठ्यांच्या भागांतच देणें प्रशस्त होय. मोगलबादशाहीचा इतिहास मात्र येथें होईल तितका कसोशीनें घेतला आहे. हल्लीं ह्या विषयाची जरूर कॉलेजांत सुद्धां असल्यामुळें, ह्या पुस्तकानें विद्यार्थ्यांचीही सोय होईल अशी आशा आहे.

पुस्तकांतील बराच भाग कोणत्या तरी सर्वमान्य ग्रंथांतून घेतला असून, एकंदर जुळवणी व व्यवस्था सर्वथैव माझी आहे. मूळग्रंथाचें नांव व संबंध बहुधा सर्वत्र दाखविला आहे. तसेंच वंशावळी व भरपूर सूची वगैरे देऊन, वाटेल तो मुद्दा हुडकून काढण्यास व नेहमींच्या वापरण्यास पुस्तक उपयोगी पडावें, अशी योजना केली आहे. प्रकरणाच्या आरंभीं क्रमवार कलमें दिलीं आहेत त्यांजवरून, विषयाची मांडणी कशी आहे व प्रकरणांत कोणकोणत्या बाबतींचा विचार केलेला आहे, हें समजून येईल. एकंदरींत प्रस्तुतच्या प्रगतीच्या मनूंत विद्यार्थ्यांस, शिक्षकांस, व सामान्य वाचकांस जी ऐतिहासिक माहिती अवश्य असली पाहिजे ती देण्यांत मीं कसूर केली नाहीं.

पूर्वीच्या आवृत्तींत पुष्कळ भाग नीरस व कंटाळवाणे झाले होते, ते सर्व दुरुस्त करून, नवीन माहिती, ऐतिहासिक चर्चा, विषयाचें वर्गीकरण व सोपी भाषा, ह्यांच्या योगानें सर्व पुस्तक होईल तितकें मनोरंजक व बोधप्रद करण्याची खबरदारी घेतली आहे. इतकें करूनही पुस्तकांत अनेक दोष आहेत हें मी जाणून आहें. परंतु महाराष्ट्रवाचकांच्या उपयोगाचें असलें दुसरें पुस्तक मराठींत नसल्यानें ह्याचा त्यास थोडाबहुत उपयोग झाल्याशिवाय राहणार नाहीं, अशी मला खात्री वाटते. ह्यांतील गुणदोष निर्भीडपणें कळविण्याविषयीं सर्व वाचकांस माझी आग्रहाची व सप्रेम विनंति आहे.

मेहेरबान डायरेक्टर ऑफ् पब्लिक इन्स्ट्रक्शन, मुंबई, यांनीं प्रथमावृत्तीचें परीक्षण करून, लायब्ररी व बक्षिसांसाठीं पुस्तक मंजूर करून त्यास आश्रय दिला, याजबद्दल ग्रंथकर्ता व प्रकाशक त्यांचे अत्यंत आभारी आहेत. तसेंच शाळाखात्यांतील व इतर अनेक गृहस्थांनीं पुस्तक वाचून पुष्कळ उपयुक्त सूचना केल्या, त्यांचाही ह्या आवृत्तींत साभार स्वीकार केला आहे.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

ज्या अनेक ग्रंथकारांच्या बहुमोल कृतींचा मीं ह्या पुस्तकास आधार घेतला आहे, त्यांचा मी सर्वथैव ऋणी आहें. तसेंच अनेक विद्वान् गृहस्थांनीं व मित्रांनीं, प्रत्यक्ष भेटीनें व पत्रद्वारा, आपला अमूल्य वेळ खर्चून मला साह्य केलें, ह्याबद्दल त्यांचे उपकार मानावे तितके थोडेच आहेत.

पाटणा येथील 'खुदाबक्ष लायब्ररी'तून व व्हिक्टोरिया मेमोरियलच्या ट्रस्टीं-कडून कित्येक अप्रसिद्ध व सुंदर चित्रें पैदा करून पुस्तकांत घातलीं आहेत. हीं चित्रें देणारांचे मोठे उपकार आहेत. अशा प्रकारचीं पुष्कळ चित्रें घालून व अन्य प्रकारांनीं पुस्तक मनोरम व सर्वांगसुंदर करावें, आणि पाश्चात्यांच्या सुंदर व स्पृहणीय पुस्तकांचा प्रकार आपणही वठवावा, अशी मोठी हौस मनांत येते. परंतु मराठी वाचकांची अल्पसंख्या आणि आपली एकंदर निर्धन स्थिति यांमुळें, मनांतले विचार मनांतच ठेवावे लागतात. पुस्तकांचा खप चांगला झाल्याशिवाय सुबक व सुंदर ग्रंथ स्वस्त किंमतींत देणें शक्य नाहीं. तथापि एवढया श्रमाचें व खर्चाचें हें पुस्तक अल्प किंमतीस वाचकांस देण्यांत प्रकाशकांनीं आपली अगदीं शिकस्त केली आहे, असें कोणासही वाटल्या शिवाय राहणार नाहीं.

अखेरीस ब्रिटिश रियासतीच्या प्रस्तावनेंत सांगितल्याप्रमाणें, विद्याप्रिय-भूपति **श्रीमंत महाराज सयाजीराव गायकवाड** ह्यांच्या संतोषकारक सेवेंत हा उद्योग करण्याचें मला सामर्थ्य प्राप्त झालें, आणि त्यांच्याच कृपा-प्रसादाचें हें फल होय, एवढें सांगून मी आपली ही कृति वाचकांपुढें ठेवितों.

बडोदें, राजपुत्र विद्यालय,
ता. १२ माहे नोव्हेंबर स. १९१०.

गोविंद सखाराम सरदेसाई.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

ह्या पुस्तकास आधारभूत ग्रंथांची यादी.

1 Amir-Ali's History of the Saracens.
2 Myer's History, Ancient and Modern.
3 Contributions to the History of Islamic Civilization, translated from German by S. Khudabux, Calcutta.
4 Sir R. Burton's Terminal Essey in Arabian Nights, Vol. 8.
5 Curtin's History of theMogals,President Roosevelt'sPreface.
6 Sewell's Forgotten Empire, History of Vijaynagar.
7 B. Surya Narain Row's History of Vijayanagar.
8 Imperial Gazetteer of India, Vol. 2, Historical.
9 Frazer's Literary History of India.
10 Abbe Dubois' Manners and Customs of the Hindus.
11 Alberuni's India (Trubners).
12 Stanley Lane-Poole's Medieval India, (Story of the Nations).
13 Meadows Taylor's Students' History of India.
14 Wheeler's History of India from the Earliest Times, Vols.1-5
15 Sir H. Elliot's History of India, Vols. 1—8.
16 Holden's Mogal Emperors.
17 Caldcotte's Life of Baber.
18 Talbot's Memoirs of Baber.
19 Erskine's History of Baber and Humayun.
20 Major Stewart's Life of Humayun by Jowhar.
21 Malleson's Akbar, (Rulers of India).
22 Beveridge's articles on Akbar, the Indian World, 1905-6.
23 Jarret and Blochmann's Ain-i-Akbari, Vols. 1—3.
24 Rodger's Tuzuk-i-Jahangiri.
25 Price's Jahangir.
26 Prof. Sarkar's articles on Aurangzeb, War in Bengal, Daily Life of the Mogal Emperors, a Modern Heroine, &c. (in Modern Review).
27 Sarkar's Revenue Regulations of & India under, Aurangzeb.
28 Lane-Poole's Aurangzeb (Rulers of India).
29 Vincent Smith's Oxford History of India.
30 Keene's Fall of the Mogal Empire.
31 Owen's India on the Eve of British Conquest.
32 Irevine's History of the Mogal Armies.
33 Jackson's History of India, Vol. 9, Account of Travellers.
34 Sir M. Durand's Nadirshah.
35 Prof. Modak's Histories of Bahamani Kingdoms in Marathi.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

36 Wilson's Religious sects of the Hindus.
37 Aitchison's Treaties, Engagements & Sanads,
38 लोकहितवादीकृत गुजराथचा इतिहास व इतर ग्रंथ.
39 श्रीयुत पारसनीसकृत बुंदेलखंड प्रकरण.
40 Lane-Poole's Indian Coins.
41 *Reviews.* The Hindusthan, Modern, East and West, Calcutta, Indian World, Journal of the Moslem Institute, Proceedings A. S. Bengal, &c.

कारणपरत्वें उपयोग केलेल्या ग्रंथांची यादी.

1 Thomas' Revenue Resources of the Mogal Emperors.
2 Muir's Life of Mohammad.
3 Hughe's Life of Mohammad.
4 Hughe's Dictonary of Islam.
5 Ball's Tavernier.
6 William Irevine's Later Mogals, (Journal of A. S. Bengal).
7 Buchanan's Journey through Mysore and Southern India, 4 Vols. edited by Hamilton.
8 Montgomery Martin's Eastern India from the papers of Dr. Buchanan, 3 Vols.
9 Constable's Bernier.
10 Manucci's Story of the Mogors, 4 Vols., by Irevine.
11 Howorth's History of the Mogals.
12 Elias and Ross's History of the Mogals.
13 Mrs. Beveridge's Akbar translated from German of Count Noer.
14 Keene's History of Hindustan.
15 Keene's Turks in India.
16 Todd's Rajasthan.
17 Havel's Indian Art.
18 Brigg's Ferista.
19 Wilkes' Mysore.
20 Price's Inscriptions of Mysore.
21 Vaidya's Epic India.
22 Stewart's History of Bengal.
23 Akbar, by Garbe.
24 Col. King's History of the Bahamani Kings.
25 Archaeological Survey Vols.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

अनुक्रमणिका.

प्रकरण. विषय. पृष्ठ.

१ प्रस्ताव,-विषयमर्यादा.... १

१ हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास.
२ मुसलमानी रियासत.
३ मराठी रियासत.
४ ब्रिटिश रियासत.
५ चार भाग.

२ इस्लामाची स्थापना. ... ६

१ मुसलमानांचे महत्त्व.
२ महंमद पैगंबर.
३ महंमदानें स्थापिलेला धर्म.
४ कुराण.
५ ताबुतांची उत्पत्ति, शिया व सुनी.

३ आरबी खिलाफत. ... १८

१ मदीनाची लोकसत्ताक खिलाफत.
२ जिझिया कर.
३ मुसलमानांचे अजब पराक्रम.
४ स्पेनचा पाडाव.
५ बगदादचे आब्बासी खलीफा.
६ फातिमईद वंश.
७ खिलाफतीचा ऱ्हास.
८ आरेबियन नाइट्सूचे नायक.
९ जगाच्या संस्कृतींत आरबांचेंकार्य

४ इस्लामांत नवीन भर.... ३५

१ मध्यआशिया,मानवजातीचें मूळ.
२ तुर्क लोक,-सेल्जुक व ऑटोमन.
३ मोगल लोक-उत्पत्ति, स्वभाव.
४ चंगीझखान व त्याचा वंश.
५ इस्लामाचे दोष व धार्मिक रहस्य.

५ गज्नवी महंमूद. ५८

१ महंमद कासीमची सिंधवर स्वारी
२ सामानी वंश.(स.८७४-९९९)
३ अलमगीन, (स. ९६७-९७६).
४ सबक्तगीन, (स. ९७७-९९७).
५ सुलतान महंमूद,त्याच्या स्वाऱ्या
६ सोमनाथची स्वारी,(स.१०२४)
७ महंमुदाची योग्यता.

६ गज्नवी-घोरी घराणीं.... ७७

१ सुलतान मस्-ऊद, (१०३०).
२ मौदूदपासून ३रा मस-ऊदपर्यंत.
३ सुलतान बहराम,(१११८-५२)
४ घोरींचा उदय, (स.११५७-९३)
५तत्कालीन देशस्थिति,रजपूतराज्ये.
६ भाट लोक व त्यांची कामगिरी.
७ पृथ्वीराज चव्हाण,(११५९-९३)
८ महंमद घोरीच्या स्वाऱ्या,कारकीर्द
९ ह्या कालाचें पर्यालोचन.

७ गुलाम वंश. ९५

१ कुत्बुद्दीन, (स.१२०६-१२१०)
२ बंगालचा पाडाव, (१२०२).
३ शम्सुद्दीन अल्तमश(१२१०-३५)
४ सुल्ताना रझिया वगैरे.
५ नासिरुद्दीन महंमूद, (१२४६)
६ बल्बन, (सन १२६६-८६).
७ तुघ्रलचें बंड,शहाजाद्याचा मृत्यु.
८ कैकुबाद, (स.१२८६-८८).
९ गुलामवंशाची कामगिरी.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

प्रकरण. विषय. पृष्ठ.

८ खिलजी घराणें. ११७

१ खिलजी वंश.
२ जलालुद्दीन खिलजी. (१२८९).
३ मुसलमानांचा दक्षिणेंत प्र.प्रवेश.
४ अलाउद्दीनचें राज्यारोहण.
५ अलाउद्दीनचे पराक्रमः—
(क) मोगल स्वाऱ्या.
(ख) चितोड.
(ग) गुजराथ.
(घ) रतनभोर.
(ङ) दक्षिणेची दुसरी स्वारी.
६ दक्षिण-हिंदुस्थानांतील राज्यें.
७ मलीक काफूरच्या स्वाऱ्या.
८ अलाउद्दीनचा मृत्यु, राज्यव्यवस्था.
९ अलाउद्दीनची करामत व योग्यता.
१० मुबारिक खिलजी, (१३१६).
११ खुस्रूचा विक्षिप्तपणा.

९ तुघ्लख घराणें.... ... १५०

१ ग्यास्-उद्दीन तुघ्लख. (१३२१).
२ आफ्रिकेंतील प्रवासी इब्न-भतूता.
३ महंमद तुघ्लख व अडचणी.
४ बंड व मृत्यु, (स. १३५१).
५ महंमद तुघ्लखची योग्यता.
६ फिरोज तुघ्लख व त्याचा वजीर.
७ जनहिताचीं कामें.
८ हिंदुधर्मावर वक्रदृष्टि.
९ मृत्यु व योग्यता, (स. १३८८).

प्रकरण. विषय. पृष्ठ.

१० तयमूरलंग, स्वारी.... १७२

१ फिरोजशहानंतरच्या घालमेली.
२ तयमूरचा पूर्ववृत्तान्त, (१३३५).
३ तयमूरची दिल्लीवर स्वारी
४ तयमूर-अवतारसमाप्ति, योग्यता.
५ सय्यदघराणें, (१४१६–५०).
६ लोदीघराणें, (१४५०-१५२६)
७ लोदी घराण्याची समाप्ति, (१५२६)

११ गुजराथ-इतिहास. ... १९४

१ पूर्व-वृत्तान्त, (इ.स.९४२पर्यंत).
२ चालुक्य–वंश, (९४२-१२१५).
३ वाघेल–वंश, (१२१५-१२९६).
४ अलाउद्दीन व राजा कर्ण, १२९७
५ दिल्लीच्या सुलतानांचा अंमल.
६ स्वतंत्र सुलतान, (स. १३९६).
७ गुजराथ, इतिहासाचें पर्यालोचन.

१२ बहामनी राज्य.... ... २१६

१ हिंदुमुसलमानांचे दक्षिणेंत कलह.
२ दक्षिणेंतील बंडाचें अंतस्थ कारण.
३ हसनगंगू ऊर्फ अला-उद्दीन.
४ महंमदशहा, (१३५८-१३७५).
५ महंमदशहानंतर झालेले सुलतान.
६ फिरोजशहा, (१३९७-१४२२).
७ अहंमदशहा वली, (१४२२).
८ अला-उद्दीनशहा, (स. १४३५).
९ हुमायूनशहा व निजामशहा.
१० महंमदशहा, २ रा, (१४६३).
११ वजीर महंमद गवान.
१२ महंमूदशहा, (१४८२-१५१८).
१३ बहामनी राज्याचें समालोचन.

प्रकरण विषय. पृष्ठ.

१३ निजामशाही वगैरे.... २४३

१ बेरीदशाही, (१४९२-१६५६).
२ इमादशाही, (१४८४-१५७२)
३ निजामशाही, (१४८९-१६३७)
४ चांदबिबी व मोगलांशीं युद्ध.
५ मलिकंबरचा कारभार, (१५४६)
६ निजामशाहीची अखेर (१६३२)
७ शहाजीची अखेरची धडपड.

१४ आदिलशाही. २६१

१ अबुल मुज्फर यूसुफ आदिलशहा.
२ इस्मईल आदिलशहा, (१५१०)
३ इब्राहीम आदिलशहा, (पहिला).
४ अली आदिलशहा, (१५५७)
५ इब्राहीम आदिलशहा, (दुसरा).
६ महंमद आदिलशहा, (१६२६).
७ अली आदिलशहा, (दुसरा).
८ शिकंदर आदिलशहा, (१६७२).
९ आदिलशाहीचें समालोचन.

१५ कुत्बशाही. २८१

१ कुत्बशाही, प्रस्ताव, (१५१२).
२ कुली कुत्बशहा, (१५१२).
३ जमशीद कुत्बशहा, (१५४३).
४ इब्राहीम कुत्बशहा, (१५५०).
५ महंमद कुली कुत्बशहा (१६११)
६ अब्दुल्ला हुसेन कुत्बशहा (१६११)
७ अबु-हसन कुत्बशहा (१६५८).

प्रकरण. विषय. पृष्ठ

१६ विजयनगरचा इतिहास. २९२

१ विजयनगरचें महत्त्व.
२ विजयनगरची उत्पत्ति (१३३६).
३ पहिला वंश (स. १३४८).
४ दुसरा वंश (स. १४९०).
५ तिसरा वंश, रामरायाचा उदय.
६ तालिकोटची लढाई (१५६५).
७ ह्या लढाईचे भयंकर परिणाम.
८ या हिंदु राज्याचें सिंहावलोकन.
(क) माधवाचार्यांची अपूर्वयोजना
(ख) नीतिमत्तेचा अभाव.
(ग) संपत्तीची विपुलता.
(घ) प्रवाश्यांच्या हकीकती.
९ दक्षिणेतिहासाचें समालोचन.

१७ मुसलमानी राज्यें. ... ३१३

१ काश्मीर, (इ. स. १३२६).
२ बंगाल, (१३४१-१५२३).
३ माळवा, (इ. स. १३८७).
४ खानदेश, (१३७०-१५९१).
५ जोनपूरचें शर्की घराणें (१३९४)
६ मुलतान, (१४४३-१५२४).
७ सिंध, (इ.स. १२१४-१५२३).

१८ रजपूत राज्यें.... ... ३३४

१ रजपुतांच्या इतिहासाचें स्वरूप.
२ मेवाड-राणासंगपर्यंत.
३ राणासंगपासून प्रतापसिंहपर्यंत.
४ प्रतापसिंहापासून आजतागाईत.
५ जयपूरचा इतिहास.
६ जोधपूरचा इतिहास.
७ रजपूत-इतिहासाचें समालोचन.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

अनुक्रमणिका.

प्रकरण. विषय. पृष्ठ.

१९ गतकालाचें पर्यालोचन ३६४

१ राज्यव्यवस्था व लोकस्थिति.
२ दोनधर्मांचे एकमेकांवर परिणाम.
३ रजपुतांच्या पाडावाची मीमांसा.
(१) उत्पत्तीचा संघशक्तीलाविरोध.
(२) रजपूत बाण्याची बाधकता.
(३) उपाध्यायांचा राष्ट्रद्रोह.
(४) आनुवंशिक वैरभाव.
(५) वेडगळ धर्मसमजुती.
(६) युद्धकलेचें अज्ञान.
(७) प्रतिकूल सृष्टस्थिति.
(८) बाटलेल्या हिंदूंचा उत्साह.
(९) मुसलमान परिस्थितीचा पेंच.
(१०) 'लेन्पूल'नें केलेलें निदान.
४ स्वत्वरूपी भावनेचा अभाव.
५ आल्बेरूनीचें हिंदूंविषयीं मत.
६ ग्रंथसंपत्ति, हिंदूंची बौद्धिक सरशी.
७ मध्यकालीन इमारतींचें बांधकाम.
८ आशियायूरोप, संस्कृतींची तुलना.

२० बाबर. ४०९

१ पूर्ववृत्त (ज. १४८३).
२ मध्यआशियांतील नशिबाचेखेळ.
३ पानपत लढाई, हिंदुस्थान काबीज.
४ सिक्री लढाई, राणासंगचा पाडाव.
५ इतर शत्रूंचा पाडाव व मृत्यु.
६ बाबराची योग्यता.
७ बाबराचें आत्मचरित्र.

प्रकरण. विषय. पृष्ठ.

२१ हुमायून. ४४५

१ राज्यारोहण व चुका (१५३०)
२ गुजराथची स्वारी (१५३४).
३ शेरखानाचें बंड, पदच्युति.
४ शेरशहा सूर, (१५४०).
५ पुढील सूरवंशी सुलतान (१५४५)
६ हुमायूनचा वनवास (१५४०).
७ मृत्यु व योग्यता (स. १५५६).

२२ अकबर. ४६९

१ पूर्वचरित्र व राज्यारोहण.
२ सूरवंशी शत्रूंचा बंदोबस्त.
३ स्वकीय सरदारांचे बखेडे.
(अ) बहरामखान (१५५९).
(आ) आदमखान वगैरे (१५६१).
(इ) खानजमान (१५६६).
(ई) महंमद हकीम मीर्झा १५६६
४ अकबरानें जिंकिलेले प्रदेश.
(अ) रजपूतराज्यें (१५६१).
(आ) गुजराथ (१५७२-७३).
(इ) बंगाल (१५७२-१५७६).
(ई) काबूल (१५७९).
(उ) काश्मीर (१५८७).
(ऊ) सिंधप्रांत (१५९२).
(ऋ) कंदाहार (१५९४).
(ॠ) महाराष्ट्र (१५९५-१६००).
५ सलीमचें दुर्वर्तन.
६ मृत्यु व बायकामुलें.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

अनुक्रमणिका.

प्रकरण. विषय. पृष्ठ.

२३ अकबराची योग्यता. ५०२

१ नवीन धर्मसंस्थापना.
२ शरीर, स्वभाव व करामत.
३ राज्यकारभाराचें धोरण.
४ जमाबंदीची व्यवस्था.
५ अवांतर सुधारणा.
६ आग्रा–सिक्रीचीं बांधकामें.
७ परिस्थिति व तुलना.
८ वॉन्हरिनचा अकबरावर अभिप्राय
९ अकबराचा नवरत्न दरबार.
(क) अबुल्फजल व फैजी.
(ख) राजा मानसिंग.
(ग) मुल्ला दोप्याजा.
(घ) राजा तोडरमल्ल.
(ङ) राजा बीरबल. (च) तानसेन.
(छ) हकीम हुमाम. (ज) बदाऊनी.

२४ जहांगीर. ५७१

१ राज्यारोहण.
२ जहांगीरचीं बायकामुलें, खुस्रू.
३ रजपुतांशीं युद्ध (स. १६०८).
४ नूर-जहान, इराणी वळण.
५ दक्षिणेंतील भानगडी.
६ जहांगीर बादशहा व इंग्रज लोक.
(अ) हॉकिन्स, (आ) सर टी रो.
७ अखेरच्या घालमेली (१६२३).
८ जहांगीरची योग्यता.
९ जहांगीरचा जीवनक्रम.
१० जहांगीरचीं धर्मसंबंधीं मतें.
११ जहांगीरची राज्यव्यवस्था.
१२ जहांगीरच्या स्वारीचा थाट.

प्रकरण. विषय. पृष्ठ.

२५ शहाजहान. ६२५

१ कारकिर्दीतील महत्त्वाच्या गोष्टी:—
(अ) राज्यारोहण.
(आ) खानजहान लोदी (१६२९)
(इ) निजामशाहीचा पाडाव.
(ई) रजपूत राजांशीं संबंध.
(उ) पोर्तुगीझांचा पाडाव १६३२
(ऊ) बल्खकंदाहारच्या स्वाऱ्या.
२ शहाजहानचीं बायकामुलें.
३ औरंगजेबाचा पूर्वायुःक्रम.
४ राजपुत्रांचा झगडा.
५ योग्यता व राज्यव्यवस्था.
६ शिल्पकलेचा उत्कर्ष, ताजमहाल इ.

२६ औरंगजेब. ६८५

१ राज्यारोहण व परिस्थिति.
२ मीर जुम्ला (मृ. १६६३)
३ बुंदेले राजांशीं युद्ध.
४ जनानखान्यांतील मसलती.
५ कारकिर्दीतील कांहीं युद्धप्रसंग.
६ हिंदूंचा छळ व रजपुतांशीं युद्ध.
७ दक्षिणची स्वारी व मृत्यु.
८ औरंगजेबाची योग्यता.
९ औरंगजेबाची राज्यव्यवस्था.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

प्रकरण. विषय. पृष्ठ.

२७ अंतरंग-परीक्षण. ... ७३८

१ बादशहांची दिनचर्या.
२ मोगलांचीं नाणीं.
३ फारशी इतिहास व हिंदुलोक.
४ राजघराण्याचें शिक्षण व विद्वत्ता.
५ राजाप्रजा, एकमेकांवर परिणाम.
(१) पेहराव.
(२) युद्धकला.
(३) बुद्धिप्रभाव.
(४) प्रवास.
(५) शिल्पकला.
(६) डांक.
(७) दळणवळण.
(८) कारागिरी.
६ गादीच्या वारसाविषयीं अनिश्चय
७ अनियंत्रित सत्तेचीं नियंत्रणें.
८ अधिकार विभागणी.
९ संतमंडळ व तत्कृत ग्रंथसंग्रह.

२८ प्रवाशांचे अभिप्राय. ७८९

१ पाश्चात्य प्रवासी, रे. टेरी.
२ पीट्रो डिला व्हेल.
३ जॉन ऑल्बर्ट ड मंडेल्स्लो.
४ जॉन बॅप्टिस्ट टॅव्हर्नियर.
५ डॉ. जॉन फ्रायर.
६ थिवेनॉट, कॅ. हॅमिल्टन.
७ कार्स्टन नीबर.

प्रकरण. विषय. पृष्ठ.

२९ बादशाहीचा ऱ्हास. ८१३

१ बहादूरशहा (स.१७०७-१२).
२ शीखलोकांचा उदय.
३ जहांदरशहा, (स. १७१२).
४ फर्रुखसियर, (स.१७१३-१९).
५ सय्यदबंधूंचीं कारस्थानें.
६ महंमदशहा, (स.१७१९-४८).
७ निजामशाहीचा उदय.
८ नादिरशहाची स्वारी (१७३८).
९ प्रां. अंमलदारांचें स्वातंत्र्यधारण.

३० अखेर.... ... ... ८४०

१ अहंमदशहा व रोहिल्यांचें बंड.
२ दुसरा आलमगीर व नजीबखान.
३ अहंमदशहा अब्दालीच्या स्वाऱ्या
४ अलीगोहर ऊ. शहाआलम.
५ नजीबखान, जाठ व मराठे.
६ शहाआलमची दिल्लीस स्थापना.
७ महादजी शिंद्याची मदत.
८ गुलामकादरचीं दुष्ट कृत्यें.
९ दिल्लीचा पाडाव, घराण्याचा शेवट.

चित्रें.

	पृष्ठ.
पृथ्वीराज चव्हाण.	८९
तयमूरचा जनानखाना.	१८१
तयमूरचे शिरांचे मनोरे.	१८२
तयमूरचा दरबार.	१८५
हुमायूनचा आजार.	४२७
बाबरचा मृत्यु.	४२७
अकबराचा नवरत्न दरबार.	५५४
शहाजहानचा जनानखाना.	६३५
शहाजहानचें लग्न.	६८१
बाबा कबीर.	६८१
शाएस्तेखान.	७०१

श्री.

हिंदुस्थानचा अर्वाचीन इतिहास

भाग पहिला

मुसलमानी रियासत.

प्रकरण पहिलें,

प्रस्ताव,—विषय-मर्यादा.

१ हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास. ३. मराठी रियासत.
२. मुसलमानी रियासत. ४. ब्रिटिश रियासत.
५. चार भाग.

१. हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास.—अखिल चराचर विश्वाच्या पूर्णानंदात्मक जगदात्म्यानें निर्माण केलेल्या ह्या भूतलावर जीं राष्ट्रें ऐतिहासिक कालावधींत विज्ञात आहेत, त्या सर्वांत हिंदु लोकांचें राष्ट्र अत्यंत वृद्ध होय. ह्यापेक्षां ज्यास्त पुरातन राष्ट्रें पृथ्वीवर हयात नाहींत; व ज्या कित्येक राष्ट्रांचा मागमूस केवळ नवीन उपलब्ध खाणाखुणांवरून आज आपणांस लागतो, तीं तरी हिंदु राष्ट्रापेक्षां जुनीं असलींच पाहिजेत असें म्हणण्यास आधार नाहीं. हिंदु लोकांचे जुने ग्रंथ आजतागाईत ह्या वृद्धावस्थेची साक्ष देत आहेत. वेद हा त्यांचा आद्यग्रंथ होय. हे सर्व वेद एकाच काळीं निर्माण झालेले नाहींत. ते निर्माण होऊं लागले त्यापूर्वी ही हिंदु राष्ट्र अस्तित्वांत होतें. वेदांचा काळ इसवीसनापूर्वी चारहजार वर्षांपलीकडचा म्हणजे आजमितीपासून सुमारें सहाहजार वर्षांवरचा आहे, हें आतां अनेक विद्वानांनीं सप्रमाण सिद्ध केलें आहे. वेदांनंतर रामायण,

महाभारत व पुढें स्मृति, पुराणें, वगैरे ग्रंथ होऊन आर्यधर्माची वृद्धि होत गेली. उत्पत्ति, अभिवृद्धि व लय ह्या स्थितित्रयीच्या नियमास अनुसरून आर्य लोक व आर्यधर्म यांचा कालांतरानें क्षय होऊं लागला. अखेरीस परकीय परधर्मीयांच्या म्हणजे मुसलमानांच्या आगमनानें हिंदु लोकांच्या स्वराज्याचा क्षय झाला. असा प्रकार घडण्यांत जो कालावधि गेला, त्याचा इतिहास हा हिंदुस्थान देशाच्या इतिहासाचा पहिला भाग होय. ह्यास प्राचीन भाग असें नांव देतां येईल. ह्या भागांत सुमारें पांच-हजार वर्षांचा समावेश होतो. इसवी सनाच्या सहाव्या शतकाचे अखेरीस आरबस्तानांत मुसलमानी धर्माची स्थापना होऊन, आठव्या शतकांत त्या लोकांचा हिंदुस्थान देशांत प्रथम प्रवेश झाला, आणि पुढें तीनशें वर्षांच्या कालावधींत त्यांनीं ह्या देशांत राज्यस्थापनेच्या कामांत बरेंच यश संपादिलें. इसवी सन १००० चे सुमारास पराक्रमी मुसलमानी सुलतान गजनवी महंमूद हिंदुस्थानावर स्वाऱ्या करूं लागला, तेव्हांपासून ह्या देशाच्या अर्वाचीन इतिहासाचा आरंभ गणण्यास हरकत नाहीं. म्हणून प्राचीन भागाच्या दोन मर्यादा, वेदकाल व क्रिस्तसन १००० ह्या होत.

युरोपियन इतिहासकार ह्या भूगोलाच्या एकंदर ऐतिहासिक कालाचे तीन भाग करितात, प्राचीन, मध्य, व अर्वाचीन. रोम शहरीं नांदणाऱ्या रोमन बादशाहीचा शेवट इ. स. ४१० ह्या वर्षी झाला, तेव्हांपासून प्राचीन भागाची समाप्ति होऊन, मध्ययुगास आरंभ होतो. ह्या मध्य-युगाचा शेवट इ. स. १४९२ त कोलंबसानें अमेरिका खंडाचा शोध लाविला, तेव्हां झाला असें समजतात. त्यापुढें अर्वाचीन काळास सुरुवात होते. म्हणजे ढोंकळ मानानें पंधराव्या शतकाच्या अखेरीस मध्ययुग संपून अर्वाचीन युरोपियन प्रगति सुरू झाली, असें समजण्याचा प्रघात आहे. ह्यावरून मध्ययुगाची कालमर्यादा इ. स. ४१०–१४९२ पर्यंत सुमारें अकराशें वर्षांची आहे. ह्या अकराशें वर्षांच्या मध्ययुगाचे, अंधकारकाल (Dark Ages) व प्रबोधकाल (Awakening) असे दोन पोटभाग आहेत. पहिल्याची सीमा इ. स. ४००–१००० पर्यंत सहाशें वर्षे, व दुसऱ्याची सीमा इ. स. १०००–१५०० पर्यंत पांचशें वर्षे. वस्तुतः हिंदुस्थानचा इतिहास युरोपियन इतिहासाहून पुष्कळ भिन्न आहे, तथापि ऐतिहासिक

विवेचनाच्या सोयीसाठीं हिंदुस्थानच्या इतिहासांतही असे विभाग पाडतां येतील. इ. स. १५२६ त बाबरानें पानपतच्या समरांगणावर विजयी होऊन, मोगल बादशाहीची स्थापना केली, तेव्हां हिंदुस्थानच्या मध्ययुगाची समाप्ति होऊन अर्वाचीन इतिहासास आरंभ झाला, असें मानण्यास हरकत नाहीं. मात्र ह्या मध्ययुगाच्या कल्पनेनें हिंदुस्थानच्या इतिहासाध्ययनास विशेष मदत होत नाहीं; कारण अशा कालमर्यादा ठरविण्याइतकें आपल्या इतिहासाचें प्राचीन व मध्य कालांचें स्वरूप अद्यापि विशद झालेलें नाहीं.

२. मुसलमानी रियासत.—ह्या रियासतीच्या प्रारंभास वर क्रिस्ती सन १००० धरला आहे, तरी सर्व देशावर मुसलमानी अंमल स्थापित होण्यास पुढें बराच काल लागला; व नंतरही आसेतुहिमाचलपर्यंतचा सर्व हिंदुस्थान देश मुसलमान बादशाहीच्या एकछत्री अंमलाखालीं फारच थोडे दिवस होता. सहाशें वर्षांच्या अवकाशांत सर्व देश मुसलमानांनीं व्यापून टाकिला खरा, पण त्यांची ती सत्ता शंभर दीडशें वर्षांपेक्षां ज्यास्त टिकली नाहीं. दक्षिण हिंदुस्थानांत महाराष्ट्र म्हणून जो भाग आहे त्यांतील स्वदेशाभिमानी लोकांस मुसलमान बादशाही मोडून टाकण्याचा नवीन हुरूप झाला. त्यांनीं अठराव्या शतकांत मुसलमान बादशाही पादाक्रांत करून स्वराज्य स्थापिलें. हे पराक्रमी लोक मराठे होत. एवंच क्रिस्ताच्या १००० वर्षांपासून पुढें सात साडेसातशें वर्षांचा जो काळ गेला, तो एकंदर इतिहासाचा दुसरा, किंवा ह्या अर्वाचीन इतिहासाचा पहिला भाग होय. ह्या कालांत ज्या निरनिराळ्या मुसलमानी वंशांनीं हिंदुस्थानावर आपला अंमल गाजविला, त्यांचें वर्णन द्यावयाचें आहे. मुसलमानांचें तरी सर्व हिंदुस्थानावर एकच राज्य होतें असें नाहीं. निरनिराळ्या ठिकाणीं भिन्न काळीं स्थापन झालेलीं भिन्न भिन्न राज्यें होतीं. हीं राज्यें कधीं, केव्हां व कशीं स्थापन झालीं, त्यांचा उत्कर्ष व लय कसा झाला, व त्यांचे एकंदर देशस्थितीवर काय परिणाम घडले, हें या भागांत सविस्तर सांगावयाचें आहे.

३. मराठी रियासत.—हिंदुस्थानामध्यें पाश्चात्य राष्ट्रांचा प्रवेश मुसलमानी रियासतींत व्यापारमिषानें झाला. मोगलबादशाहीचा अंत व ब्रिटिश राज्याची स्थापना यांमध्यें कालांचें अंतर फारसें नाहीं. ज्याप्रमाणें

NATIONAL ARCHIVES OF INDIA

प्राचीन काळीं आर्यांच्या सत्तेचा ऱ्हास होण्यास कित्येक शतकें लागलीं, त्याचप्रमाणें मुसलमानी सत्तेचा ऱ्हासही बरेच वर्षे घडून येत होता. एका सत्तेचा नाश व दुसरीचा उदय हे समकालीन असावयाचे खरें; तरी पण ते प्रकार घडतांना जर दुसऱ्या गोष्टी मध्यंतरीं घडल्या असतील, तर इतिहासकारास त्या लपवितां येणार नाहींत. मोगल बादशाहीवर मराठ्यांनीं मारक प्रहार केला, हें पुढें दाखविण्यांत येईलच. ह्या मराठ्यांची सत्ता जरी अल्पकालीन होती, तरी ती प्रत्येक महाराष्ट्रीयास मोठी अभिमानास्पद व वीर्यजनक अशी आहे. अल्प कालांत महाराष्ट्रीयांनीं ह्या विस्तृत भरतभूमीच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत जे प्रताप गाजविले, ते इतिहासांत चिरस्मरणीय आहेत. त्यांजविषयीं भरंवसेलायक माहिती अजून उपलब्ध होत आहे. म्हणून मोगल बादशाहीच्या ऱ्हासकालीं जीं शेंपन्नास वर्षे गेलीं, त्यांस स्वराष्ट्रेतिहासांत स्वतंत्र स्थळ मिळणें वाजवी आहे. ह्यासच मराठी रियासत असें नांव दिलें आहे.

४. ब्रिटिश रियासत.—ब्रिटिश लोक व त्यांजसारखे दुसरे युरोपियन लोक ह्यांची पूर्वस्थिति कशी होती, ते हिंदुस्थानांत केव्हां व कशाकरितां आले, व पुढें त्यांनीं ह्या देशांत आपलें राज्य कोणत्या उपायांनीं स्थापन केलें, वगैरे प्रश्नांचा विचार ब्रिटिश रियासतीच्या भागांत येतो. ब्रिटिश लोकांचे मोठमोठे झगडे त्यांच्या पूर्वगामी मराठ्यांबरोबर झालेले आहेत. म्हणून मराठी सत्तेचा लय म्हणजेच ब्रिटिश सत्तेचा आरंभ असें म्हणण्यास हरकत नाहीं. ही गोष्ट एकोणिसाव्या शतकाच्या आरंभीं घडून आली. तेव्हांपासून प्रस्तुत काळापर्यंतचा इतिहास ह्या ग्रंथाचा शेवटचा भाग होय. ह्यास ब्रिटिश रिसायत असें नांव दिलें आहे.

५. चार विभाग—येणेंप्रमाणें, वरील विवेचनपद्धतीस अनुसरून, हिंदुस्थानच्या इतिहासाचे कालक्रमानुसार भाग होतात, ते असेः—

भाग पहिला,—प्राचीन इतिहास, हिंदुस्थानांत आर्यशाखेचा उत्कर्ष व ऱ्हास, इ. स. पूर्वी ५०००—इ. स. नंतर १००० पर्यंत.

भाग दुसरा,—अर्वाचीन इतिहास, मुसलमानी रियासतः इसवी सन १०००—१७००, किंवा विशेषेंकरून १७५०पर्यंत. ह्यांपैकीं स.१०००—१५०० पर्यंतच्या काळास मध्ययुग असें नांव देतां येईल.

भाग तिसरा,—अर्वाचीन इतिहास, मराठी रियासत; इसवी सन १६६४–१८००, किंवा विशेषेंकरून १८०३ पर्यंत.

भाग चौथा,—अर्वाचीन इतिहास, ब्रिटिश रियासत; इसवी सन १८०३ पासून प्रस्तुत कालापर्यंत.

पहिला भाग खेरीजकरून बाकीच्या तीन भागांचें म्हणजे फक्त अर्वाचीन इतिहासाचें विवेचन ह्या ग्रंथांत करावयाचें आहे.

वरील भागावारीवरून हिंदुस्थानांत आजपर्यंत अनेक वेळां राज्यक्रान्ती घडून आल्या आहेत, हें उघड होतें. ह्या राज्यक्रान्ती घडून येण्यास कालावधिही भिन्न प्रमाणानें लागला. ... ज्ञानवृद्धीच्या योगानें जगांतील ... आपली शक्ति ... वाढविली, तसतसें वरील राज्यक्रान्ती घडविण्याचें काम ... सुलभ झालें. आर्य लोकांची हिंदुस्थानांत चिरस्था... हजारों वर्षें लागलीं. उत्तरहिंदुस्थानांतून दक्षिणहिंदुस्थानांत ...यासच त्यांस हजारों वर्षांचा काल लागला. परंतु मागील अनुभवानें ... आल्यामुळें, हिंदुस्थानांत प्रवेश करणें मुसलमानांस तितकें कठीण गेलें नाहीं. विंध्य, सातपुडा वगैरे पर्वत शेंकडों वर्षे आर्यांस दुर्गम झाले होते, ते अलाउद्दीनच्या फौजेनें तेव्हांच ओलांडिले. अगदीं अलीकडच्या काळाकडे पाहिलें, तर जो महासागर जगदुत्पत्तीपासून हिंदुस्थानची स्वभावसिद्ध दुर्गम मर्यादा होऊन बसला होता, तोच ह्या प्रतापी 'सागरपुत्रांस—' ब्रिटिश लोकांस—ह्या आर्यभूमींत प्रवेश करून देण्यास कारण झाला. ह्या ... ...नांच्या आगमनापर्यंत ही आर्यभूमि स्वभावसिद्ध मर्यादांनीं संरक्षित होती. उत्तर व अर्धी पश्चिम बाजू गगनचुंबित नगराजांनीं अडविलेली आहे. पश्चिमेचें द्वितीयार्ध व सर्व पूर्वभाग हे समुद्रवलयांकित असल्यामुळें, नौकानयनशास्त्राची प्रगति होण्यापूर्वीं, दुर्भेद्य होते. वायव्य कोंपऱ्यांत एकच जबरदस्त खिंड आहे. तिचा मार्ग बहुतेक बर्फाच्छादित असतो. ह्याच निरुंद वाटेनें प्राचीन काळापासून नानाविध लोकांच्या झुंडी हिंदुस्थानावर आल्या. परंतु हल्लीं पाश्चात्यांच्या ज्ञानप्रभावामुळें हा देश पृथ्वीवरील सर्व लोकांस सुगम झाला आहे.

वर सांगितलेल्या भागांच्या कालमर्यादा केवळ ठोकळ मानानें दिल्या आहेत. सांगितलेला काल सुरू होण्यापूर्वीं पुष्कळ वर्षेंपर्यंत, राज्यक्रांती घ-

वाढत आणण्याचे त्या त्या लोकांचे प्रयत्न चालले होते, म्हणून पुढील इतिहास समजण्याकरितां त्या लोकांच्या आद्येतिहासाकडे पाहणें जरूर पडेल. आपणांस मुसलमानांच्या हकीकतीस सुरुवात करावयाची आहे, त्याअर्थी हे मुसलमान कोण, त्यांचा उदय कसा झाला, इत्यादि आरंभाची हकीकत समजून घेणें अवश्य आहे.

प्रकरण दुसरें.

मुसलमानी धर्माची स्थापना.

इ. स. ६३२.

१. मुसलमानांचें महत्त्व. २. महंमद पैगंबर.
३. महंमदानें स्थापिलेला धर्म. ४. कुराण.
५. ताबुतांची उत्पत्ति, शिया व सुनी.

१. मुसलमानांचें महत्त्व.—इतिहास विषयाला शास्त्रीय स्वरूप अलीकडच्या विद्वान् युरोपियन पंडितांनीं दिलें आहे. यूरोप खंडाला प्रधानत्व देऊनच जगाच्या इतिहासाचा विचार ते करीत असतात. म्हणजे आज युरोपियन लोक भूतलावर प्रबल असल्यामुळें, एकंदर युरोपियन राष्ट्रांची प्रगति आजपावेतों कसकशी होत गेली, ह्या प्रश्नाच्या विचारांतच पृथ्वीवरील इतर राष्ट्रांच्या हालचाली इतिहासकार गोवून घेतात. अर्थात् यूरोपखंड केंद्र समजून त्या सभोंवतीं इतर राष्ट्रांना ते नाचवितात. शास्त्रीय दृष्टीनें हा प्रकार अपरिहार्य आहे. मात्र तो अनिष्ट आहे असें मानण्याचें कारण नाहीं. आजकाल ऐतिहासिक घडामोडींचें उच्चनीच स्वरूप ठरविण्याचें माप युरोपियन प्रगति आहे. ती प्रगति बाजूस ठेवून निराळ्याच दिशेनें ऐतिहासिक विवेचन करणें शक्य नाहीं. अशाच दृष्टीनें मुसलमानांच्या इतिहासाचें आपणांस अवलोकन करावयाचें आहे.

खिस्ताच्या पांचव्या शतकांत रोमची पुरातन व बलाढ्य बादशाही मोडून पडली, (स. ४१०). पुढें तिचीच दुसरी शाखा पूर्वरोमनबादशाही ह्या नांवानें पंधराव्या शतकापर्यंत कान्स्टांटिनोपल येथें हयात होती.

ह्या पूर्वरोमन बादशाहीचे लचके तोडून, अखेरीस तिचा पुरा विध्वंस मुसलमानांनीं केला. त्याप्रमाणें मुसलमानांनीं हिंदुस्थानांत येऊन हा देश काबीज केला, त्याचप्रमाणें आशिया खंडाचा सर्व पश्चिमभाग व यूरोप-आफ्रिकांचा बराच मोठा भाग त्यांनीं जिंकून तेथें मुसलमानी धर्माची व राज्याची स्थापना केली. एवढी मोठी शक्ति ह्या लोकांच्या अंगीं कशी आली हें कळण्याकरितां त्यांचा पूर्व इतिहास सांगितला पाहिजे.

जगाच्या उलाढालींत मुसलमानांस अनेक कारणांनीं आजकाल प्रमुखत्व प्राप्त झालें आहे, आणि भावी इतिहासावरही त्याचा परिणाम विशेष होण्याचा संभव आहे. तेव्हां जगाच्या सुधारणेंत व अर्वाचीन प्रगतींत मुसलमानांनीं कोणती भर घातली, आणि ती किती हितकारक किंवा अहितकारक होती, हें ठोकळ मानानें समजून घेणें अत्यंत अवश्य आहे. अशा व्यापक दृष्टीनें विचार करावा तेव्हांच हिंदुस्थानच्या स्थितीवर मुसलमानी अंमलाचे बरेवाईट परिणाम काय झाले हें आपणास मार्मिकपणें ठरवितां येईल; आणि आपल्या मुसलमान बंधूंसंबंधीं आपलें अनेक मिथ्याग्रह आहेत ते दूर होतील.

आज हिंदुस्थानची एकंदर लोकसंख्या सुमारें तीस कोटी असून, त्यांपैकीं पांच कोटी मुसलमान आहेत. नउशें वर्षांपूर्वी सिंधुनदीच्या अलीकडे एकही मुसलमान नव्हता, तेथें आज पांच कोटी आहेत. तुर्कस्तानचा सुलतान व इराणचा शहा ह्या दोघांच्या ताब्यांत आजसुद्धां अडीच कोटींहून ज्यास्त मुसलमान नाहींत. म्हणजे त्यांच्या दुप्पट मुसलमानांची वसती एड्वर्ड बादशहाच्या ताब्यांत आहे. पण हे सर्व मुसलमान हिंदुस्थानच्या बाहेरून येथें आले असें मात्र नाहीं. त्यांचा धर्म भिन्न असला तरी ते जवळ जवळ हिंदूंइतकेच एतद्देशीय आहेत. कारण आरंभीं आरंभीं मात्र परदेशांतून बरेच मुसलमान लोक इकडे आले. त्यांजबरोबर बायका तर फारशा आल्याच नाहींत. त्यांनीं येथील हिंदु स्त्रियांशीं लग्नें केलीं, तेव्हां त्यांची संख्या वाढत गेली. तसेंच केव्हां बळजबरीनें तर केव्हां आपखुषीनें पुष्कळ हिंदु लोक मुसलमान झाले. म्हणून आजकालचे येथील मुसलमान एतद्देशीयच म्हटले पाहिजेत.

आरब मुसलमान तर हिंदुस्थानांत फारसे आलेच नाहींत. आरबस्तानांतून ते चारही दिशांकडे भटकत गेले, पण हिंदुस्थानच्या पश्चिम-

NATIONAL ARCHIVES OF INDIA

कडील बर्फाळ डोंगर ओलांडण्याची त्यांस छाती झाली नाहीं. सृष्टीचा अडथळा आल्याबरोबर त्यांस थांबावें लागलें. हिंदुस्थानांत मुख्यत्वेंकरून तुर्क व मोगल फार आले. इराणी अखाताच्या कांठांवर राहणारे आरब मात्र पूर्वीपासून व्यापारनिमित्तानें हिंदुस्थानांत येत असत. धर्माच्या अस्सलपणासंबंधानें पाहिलें तर आरब सर्व मुसलमानांत श्रेष्ठ होत.

ह्यावरून हिंदुस्थानांतले मुसलमान भिन्नधर्मी असले, म्हणून ते हिंदुस्थानांत परके नाहींत. जसे एतद्देशीय क्रिस्ती येथें आहेत, तसेच हे मुसलमान होत. हिंदुस्थान ही आपली जन्मभूमि आहे, असें समजण्याचा त्यांस हिंदूंइतकाच हक्क आहे.

२. महंमद पैगंबर स. ५७०–६३२.—हिंदुस्थानच्या पश्चिमेस आरबी समुद्रापलीकडे आरबस्तान म्हणून देश आहे. त्याच्या उत्तरेस सिरिया व तुर्कस्तान हे देश आहेत. त्यांस पूर्वी 'शाम' अशी संज्ञा होती. युरोपांतील तुर्कस्तान हें रूम व आशियांतील तुर्कस्तान हें शाम, अशीं हीं दोनही एकाच सुलतानाच्या अंमलाखालीं असल्यामुळें, त्या सुलतानास रूमशामचा बादशहा म्हणण्याचा प्रघात असे. ह्या पश्चिम आशिया खंडांत प्राचीन काळीं अनेक राष्ट्रें उदयास येऊन लय पावलीं. त्यांस सेमेटिक राष्ट्रें असें म्हणतात. ह्या सेमेटिक राष्ट्रांतच आरबांचा समावेश होतो. उत्तरेस सिरिया वगैरे प्रांतांत फिनिशियन व हिब्रू हे लोक प्राचीन काळीं उदय पावले, तसेच दक्षिणेस आरबस्तानांत आरब लोक पुढें उदयास आले. आरबस्तानच्या वालुकामय ओसाड प्रदेशांत हे आरब धनगरी पेशानें राहत असत. युरोपांत त्यांस 'सारासिन्स्' म्हणजे 'ओसाड प्रदेशाची संतति' ह्या नांवानें ओळखितात. आफ्रिकेचा उत्तरभाग व स्पेनदेश त्यांनीं जिंकला, तेथें त्यांस 'मूर' हें नांव मिळालें. मूळ आरबस्तानांत हे लोक मूर्तिपूजक होते. त्यांचें मुख्य मंदिर काबा नांवाचें असून तें मक्का येथें होतें. तें फार पुरातन असून त्यांत तीनशें साठ मूर्ति होत्या. आरबस्तानच्या सर्व भागांतून लोक ह्या काबाच्या दर्शनास येत असत.

मूर्तिपूजकांशिवाय दुसऱ्या पंथांचेही पुष्कळ लोक आरबस्तानांत होते. हिब्रू उर्फ ज्यू लोक पूर्वी उत्तरेस सिरिया देशांत होते, तेथें रोमन लोकांनीं त्यांचा छळ केल्यामुळें ते दक्षिणेस आरबस्तानांत येऊन राहिले. देव एक आहे, ही कल्पना आरंभीं ह्या ज्यू लोकांनीं आरबांना शिक-

NATIONAL ARCHIVES OF INDIA

गली. पुष्कळ आरब क्रिस्ती झालेले होते, त्यांनीही क्रिस्ताची माहिती आपल्या देशबंधूंस दिली. ह्या कारणास्तव महंमदाचा धर्म म्हणजे क्रिस्त-धर्माची किंवा यहुदी धर्माची नवीन आवृत्ति असें म्हणतात. इतकें खरें कीं, महंमद नवीन धर्म शिकवूं लागला, तेव्हां आरब लोकांच्या धर्मवि-चारांत मोठी खळबळ उडून गेली होती, आणि मूर्तिपूजेचा प्राचीन प्रचार मुटून धर्माच्या नवीन उदात्त कल्पना लोकांच्या मनांत घोळूं लागल्या होत्या.

आरब लोकांत अनेक जाति होत्या. त्यांपैकीं खुरेश जातीच्या मंडळी-कडे काबाच्या मंदिराची देखरेख होती. ह्याच जातींत मक्का शहरीं इ. स. ५७० ह्या वर्षी मुसलमान धर्माचा संस्थापक **महंमद पैगंबर** जन्मला. त्याची आई लहानपणीं वारल्यामुळें त्याचें संगोपन चुलता अबू तालिब ह्यानें केलें. तो मेंढ्या राखीत असे. पण मोठा झाल्यावर उंटांची कारवाने घेऊन तो व्यापार करूं लागला. त्याचें मन लहानपणापासून ईश्वरभक्तींत निमग्न असे. तो ध्यान, भजन, उपवास वगैरे पुष्कळ करी. पंचवीस वर्षांचा असतां तो एका व्यापारी कारवानाबरोबर सिरिया प्रांतांत गेला, तेव्हां तेथें त्यास येशूक्रिस्ताविषयीं कांहीं माहिती मिळाली. क्रिस्तांच्या देवत्रयीचा महंम-दास अचंबा वाटून देव एकच आहे अशी त्याच्या मनाची प्रवृत्ति झाली. मक्केस परत आल्यावर त्यानें आपल्या वयाच्या २८ वे वर्षी खदीजा नामक एका विधवेशीं लग्न केलें. खदीजा त्याजपेक्षां पंधरा वर्षांनीं मोठी होती. त्याच्या डोक्यांत धर्मकल्पना एकसारख्या घोळत होत्या. त्यास पुढें एकदां साक्षात्कार झाला, कीं 'ईश्वराचा खरा धर्म लोकांत प्रसिद्ध करण्यासाठीं तुला नेमिलें आहे.' त्याप्रमाणें तो लोकांस उपदेश करूं लागला. बायको, चुलतभाऊ व जांवई हे महंमदाचे प्रथम शिष्य झाले. महंमदाचीं मतें मूर्तिपूजेच्या विरुद्ध होतीं. म्हणून काबाचे रक्षक जे खुरेश जातीचे लोक त्यांनीं महंमदाचा छळ सुरू केला. त्याच्या ५० वे वर्षी त्याची बायको खदीजा मरण पावली. तेव्हांपासून तर मक्केंत राहणें त्यास दुःसह झालें. म्हणून तो तें शहर सोडून उत्तरेस सुमारें अडीचशें मैलांवर मदीना नामक शहरीं जाऊन राहिला. जाण्यापूर्वीं कित्येक लोकांनीं त्यास ठार मारण्याचा बेत केला होता. मारेकऱ्यांस चुकवून तो एका डोंगराच्या गुहेंत लपून बसला. मारेकरी निघून गेल्यावर तो मदिनेस पळून गेला. ही गोष्ट इ.

सन ६२२ त घडली. ह्या काळास हिजरा म्हणजे पळ असें म्हणतात. ह्या पळावरूनच महंमदानें चालू केलेल्या शकास 'हिजरी सन' ही संज्ञा आहे, व ह्याच वेळेपासून तो मोजला जातो. पुढें मक्केंतील अबूबकर म्हणून एक इभ्रतीचा गृहस्थ महंमदाचा अनुयायी झाला होता, त्याच्या आयेषा नामक मुलीशीं महंमदानें लग्न लाविलें. हिच्याशिवाय आणखी पुष्कळ बायका महंमदास होत्या; पण आयेषा हीच त्याची अखेरपर्यंत आवडती बायको होती.

मदीना शहर ह्या वेळीं अगदीं रानटी स्थितींत होतें. सर्वत्र बेबंदशाही माजून राहिली होती. ती बंद करण्याकरितां महंमदानें नवीन कायदे ठरविले, आणि त्याप्रमाणें लोकांच्या हरएक तंट्यांचा तो निकाल करूं लागला. पुढें जी आरब बादशाही स्थापन झाली, तिचा हा उगम होय. महंमद मक्केस फक्त धर्मोपदेशाचें काम करीत होता, पण मदीना येथें त्यानें राजाचें काम सुरू केलें. हा जो फेरफार त्यानें मदीना येथें केला, तो ध्यानांत ठेविला म्हणजे मुसलमानांचे पुढील उद्योग स्पष्टपणें कळून येतात.

मदीनेस पळून गेला तेव्हां महंमदाचें वय ५३ वर्षांचें होतें. तेथें त्याचें काम मोठ्या झपाट्यानें चाललें. पुष्कळ लोक त्याचे अनुयायी झाले. महंमदानें मदीना येथें एक मोठी मशीद बांधिली, तीस 'मशिद-उलनबी' असें नांव आहे. ह्याच मशीदींत पुढें महंमदास पुरिलें.

महंमदाच्याच 'खुरेष' जातीच्या लोकांनीं त्याच्या धर्माचा अत्यंत छळ मांडिला, त्यामुळें त्याचे शिष्यांस त्रास पडूं लागला. म्हणून महंमदानें एक विलक्षण युक्ति योजिली. आजपर्यंत लोकांस उपदेश करण्याचें काम त्यानें शांतपणानें केलें होतें. धर्मस्थापनेच्या पलीकडे त्याची कांहींच इच्छा नव्हती. लोक छळ करूं लागले, त्यांचा प्रतीकार करण्यासाठीं त्यानें असा एक ईश्वराचा हुकूम प्रसिद्ध केला, कीं 'आजपर्यंत शांततेनें व नम्रतेनें धर्मोपदेश करण्यांत आला; पण लोक दुराग्रही फार, पूर्वीच्या पैगंबरांनीं धर्मोपदेश बहुत केला, तरी लोकांनीं त्यांचें ऐकिलें नाहीं. तर यापुढें मी सांगतों हा धर्म जे ऐकणार नाहींत, त्यांस तरवारीनें जिंकावें; लढाईंत यश आल्यास, शत्रूंची दौलत आपणांस मिळेल; व मृत्यु आल्यास,

मरणाच्या लागून स्वर्गाचा दरवाजा आपणांस खुला होईल*." ह्या उपदेशाच्या योगानें महंमदाच्या अनुयायांचा शांततेचा धार्मिक बाणा सुटून, त्यांच्यांत लष्करी बाणा येत चालला. त्याचें लष्कर जमलें. धर्मप्रसाराकरितां मोठमोठीं तुंबळ युद्धें होऊन महंमदास फत्ते मिळूं लागली. लढाईंत मिळालेली लूट सर्वांनीं सारखी वांटून घ्यावी, असा एक ईश्वरी हुकूम महंमदानें प्रसिद्ध केला. नंतर मदिनेंतून शेजारच्या प्रांतावर हल्ले करण्यास महंमद फौजा पाठवूं लागला. लुटीचा पैसा मिळून ह्या नवीन पंथाच्या लोकांत धर्मप्रसाराचें नवीन वारें शिरलें; आणि धर्माच्या नांवावर एक प्रकारचें नवीन राज्य स्थापन होऊन महंमद धर्मोपदेशक असतांही त्याचा अधिकार राजाप्रमाणें चालूं लागला. इराणचा बादशहा दुसरा खुस्रु, इस्तंबूल येथें राहणारा रूमचा बादशहा हिराक्लिटस व मिसर देशाचा राजा ह्या सर्वांकडे महंमदानें आपले वकील धर्म स्वीकारण्यासाठीं पत्रें देऊन रवाना केले. दोघांनीं त्याचे पत्राचा आदर केला, पण खुस्रूनें पत्र फाडून टाकिलें. तें महंमदास कळलें, तेव्हां तो म्हणाला, 'ह्या गर्विष्ठ बादशहानें जसे माझ्या पत्राचे तुकडे केले, तसेच आमचे धर्माभिमानी शूर अनुयायी त्याच्या राज्याचे फाडून तुकडे करतील.' नंतर एक मोठें लष्कर तयार करून त्यानें मक्का शहर काबीज केलें, व काबाच्या देवळांतील सर्व मूर्ती जमीनदोस्त करून तेथें नवीन धर्माची प्रार्थना सुरू केली. त्या वेळेपासून काबा हें मुसलमानांचें प्रार्थनामंदिर व सर्व जगांतील मुसलमान यात्रेकरूंचें पवित्र स्थान झालें.

मक्काचा पाडाव झाल्याबरोबर महंमदाचा जम चांगला बसला. सर्व जातींचे आरब त्यास भजूं लागले, आणि हा पैगंबर आहे असें कबूल करूं लागले. त्यास सभोंवारच्या सर्व प्रमुखांकडून करभार आला. अशा रीतीनें महंमदाच्या हाताखालीं आरबांचें एक राष्ट्र झालें. आणि पुढें अनेक पराक्रम करण्याची त्यांस शक्ति आली. अंदाधुंदीच्या विसकळीत लोकस्थितींत ऐक्याचा एवढा जोम इतक्या त्वरेनें उत्पन्न झाल्याचें दुसरें उदाहरण इतिहासांत आढळत नाहीं.

---

* याच मासल्याचें भगवद्गीतेंत वाक्य आहे,—"हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम्."

पुढें कांहीं दिवसांनीं आशिया खंडांतील रोमन बादशाहीच्या मुलखावर स्वाऱ्या करून त्यानें अनेक प्रांत काबीज केले. अशाच एका स्वारींत त्याची प्रकृति बिघडली व आपण मरणार असें त्यास वाटलें. त्या प्रसंगीं त्यानें सर्व मुसलमानांस जवळ बोलावून चांगला उपदेश केला, व पुढें तुम्ही मोठ्या पदास चढाल असें भविष्य सांगितलें. जवळचा सर्व खजिना त्यानें गोरगरीबांस वांटून दिला, व गुलामांस बंधमुक्त केलें. आरबस्थानांत एकही मूर्तिपूजक राहूं देऊं नये अशी शिष्यांस ताकीद देऊन, हा महंमद पैगंबर, मुसलमानांचा पहिला बादशहा, आयेषा बिबीच्या महालांत, तिच्या मांडीवर डोकें ठेवून, सन ६३२ त शुक्रवारीं मरण पावला. त्याचें प्रेत तीन दिवस लोकांस पाहण्यास ठेवून नंतर मदीना येथें पुरिलें. त्याची आवडती बायको आयेषा त्याच्या पाठीमागून ४७ वर्षे जिवंत होती. हा पुरुष महाबुद्धिमान्, शूर, बळकट, शांत, कधींही न डगमगणारा, व अत्यंत साधा असा होता. दागिने व रेशमी कपडे वापरण्यास त्याची सक्त मनाई असे. त्यास अनेक स्त्रिया होत्या, कोणी म्हणतात ९, कोणी म्हणतात १५. त्याची ईश्वरभक्ति निस्सीम होती. तो न्यायांत निष्ठुर होता, तरी उदार व दयाळू असे. धर्मस्थापना करितांना त्यास अनेक संकटें भोगावीं लागलीं.

३. **महंमदानें स्थापिलेला धर्म.**—महंमदाचा उपदेश सुरू होण्यापूर्वी रूमचे बादशहानें क्रिस्ती धर्म स्वीकारिला होता. तथापि त्या धर्मांतही अनेक पंथ निघून त्यांत व जुन्या यहुदी धर्मांत नानाप्रकारचा घोटाळा उत्पन्न झाला होता. (१) अशा प्रसंगीं हे तंटे मोडून त्यांस ऐक्याचें स्वरूप आणण्यास महंमदासारख्या पुरुषाची जरूर होती. (२) ईश्वराच्या कार्यांत जय मिळवावा, नाहीं तर त्याची थोरवी स्थापन करण्यांत प्राण खर्ची घालावे, ह्या उदात्त उपदेशानें महंमदाच्या अनुयायांस प्रोत्साहन मिळालें. (३) राज्यपद प्राप्तीची आशा, लुटीचा लोभ, कीर्तीची आकांक्षा, स्वर्गसुखाची अपेक्षा, ह्या गोष्टी वरील प्रोत्साहनरूपी अग्नीस घृतवत् झाल्या. (४)आसपासच्या लोकांची धार्मिक व राजकीय स्थिति असावी तशी नसल्यामुळें ह्या आरब वीरांस आपले मनोरथ सहज सिद्धीस नेतां आले. ह्या कारणांस्तव महंमदाचे प्रयत्न सफळ होत चालले. तो लोकांस म्हणे, कीं 'मी कांहीं नवीन धर्म तुम्हांस सांगत नाहीं. ईश्वराचा जो खरा धर्म मूळ-

मागून नाश आहे, त्यांत अनेकांनीं आपलीं मतें घुसडून तो बिघडविला आहे. तर इब्राहीम, इस्माईल, इझाक, याकूब, मुसा, व इसा (येशु)* यांनी ज्या खऱ्या धर्माची पूर्वी स्थापना केली, त्या धर्माचाच मी जीर्णोद्धार करीत आहे. हें काम मी ईश्वर प्रेरणेनें करितों. ईश्वरप्रणीत ग्रंथ त्याचे दूत मला आणून देतात, तो त्याच्या आज्ञेनें मी प्रसिद्ध करीत आहें.' ह्या प्रमाणें 'कुराण' नांवाचा ग्रंथ ईश्वरानें आपणास दिला असें सांगून तो त्यानें लोकांत प्रसिद्ध केला. मुसलमान धर्म स्वीकारितांना खालील मंत्राचा उपयोग करण्यांत येतो:—'लाइलाह इल्लाल्लाहू, महंमदुर्रसूलुल्लाह,' म्हणजे 'ईश्वर एकच आहे आणि त्याचा प्रेषित महंमद आहे.' मुसलमानी धर्माचीं मुख्य तत्त्वें अशीं आहेत:—

(१) मनुष्यास पुनर्जन्म नाहीं.

(२) ईश्वर एक आहे; त्यावांचून दुसरा देव नाहीं.

(३) पापपुण्याचें फळ ईश्वर सर्वांस देतो. माणसें मरतात त्या सर्वांचे जीव तूर्त पडून राहतात, व जगाची राहटी संपेल, तेव्हां ईश्वर एकदांच बसून सर्व मृताचा न्याय करून, त्यांच्या पाप पुण्यांप्रमाणें त्यांस नरक अगर स्वर्गवास देतो.

(४) ह्या धर्मानें नांव इस्लाम म्हणजे 'तारणमार्ग' असें आहे त्याच्या अनुयायांस मुसलमान असें म्हणतात.

गरिबांस भिक्षादान, न्यायाचें व उदारपणाचें वर्तन, सर्व लोकांना समान बंधुभाव, दुसऱ्याचें घेतलेलें कर्ज परत देणें, कपट न करणें, सत्य भाषण, सचोटीनें व्यापार करणें, गरिबांस उपद्रव न देणें, मद्यपाननिषेध, इत्यादि गोष्टींबद्दल कुराणांत सक्त ताकिदी आहेत. मूर्तिपूजेविषयीं निक्षून मनाई आहे. मक्केस यात्रा करण्याची पूर्वींची चाल कुराणांत कायम ठेविली आहे. हातपाय धुऊन जमिनीवर डोकें टेकून दररोज पांच वेळ परमेश्व

* हिंदु व मुसलमान यांजमध्यें जसा विरोध आहे, तसा क्रिस्ती व मुसलमान यांजमध्यें नाहीं. यहुदी लोकांत मानिलेले हे वरील पैगंबर मुसलमानांसहि कबूल आहेत. क्रिस्ती लोक महंमदास मात्र कबूल करीत नाहींत. क्रिस्ताच्या अनुयायांनीं क्रिस्तास ईश्वराचा पुत्र ठरविलें व तीन देव मानिले, ही गोष्ट मुसलमानांस संमत नाहीं. हा ह्या दोन धर्मांतील मुख्य विरोध आहे.

राची प्रार्थना करावी असें ठरविलेलें आहे. कुरणांतील अध्याय निरनिराळ्या वेळीं प्रसिद्ध झालेले अबूबकर ह्यानें एके ठिकाणीं केले. ह्या मुसलमानांच्या धर्मशास्त्रांत दोन प्रकरणें आहेत, एक इमाम व दुसरें दीन. पहिल्या प्रकरणांत सहा भाग आहेत, त्यांत वर दिलेल्या प्रकारचीं सहा धर्मतत्त्वें सांगितलीं आहेत. दुसऱ्यांत बहुतक आचारमार्ग म्हणजे मुसलमान लोकांनीं कोणकोणत्या गोष्टी कराव्या, हें सांगितलें आहे. ईश्वर लोकांस धर्मोपदेश करण्यास मनुष्याची योजना करितो, त्यास पैगंबर असें म्हणतात. ह्याशिवाय कित्येक फिरस्ते ईश्वरदूत आहेत. ह्या दूतांत मिकाईल हा युद्धांत मदत करितो; अजराईल हा यमासारखा लोकांस दंड करितो; व अजाजिल हा देवाच्या शापानें सैतान होऊन लोकांस पापबुद्धि शिकवितो. सुंता करण्याची चाल यहुदी लोकांतून मुसलमानांनीं घेतली. कुराणांत सहा पैगंबरांचीं नांवें आहेत, तीं हे:—आदम, नोहा, इब्राहीम, मूसा, ईसा, व महंमद. जंनत म्हणजे स्वर्ग व जहनम म्हणजे नरक हे मनुष्यांस कायमचे मिळतात, असें मुसलमान लोक मानितात. ह्या तत्त्वाविषयीं अनेक वादविवाद झालेले आहेत. तसेंच दैववादही त्यांस संमत आहे.

४. कुराण.—कुराणाचे सिपारे (भाग) ३० आहेत व ११४ सुरे (अध्याय) आहेत. हें पुस्तक उत्तम आरबी भाषेंत लिहिलेलं आहे. सुमारें ६००० श्लोक होतील इतकें तें मोठें आहे. त्यांत ७७६३९ शब्द व ३२३०१५ वर्ण आहेत. दारू, भांग, अफू वगैरे मादक पदार्थांचें सेवन व त्याचप्रमाणें जुगार व ज्योतिषावरून मुहूर्त व शकून पाहणें ह्या गोष्टी वर्ज्य म्हणून सांगितलेल्या आहेत. डुकर व मूर्तीस नैवेद्य दाखविलेलें अन्न हीं अभक्ष्य मानिलीं आहेत. महंमदाचे पूर्वीं मुली लहान असतां त्यांस जिवंत पुरून टाकण्याची वहिवाट होती. कारण बायकांचे योगानें खर्च वाढून कुटुंबाची अब्रू जाते असें लोक समजत. अशा प्रकारें मुलींस मारल्यामुळें बायकांची संख्या कमी होई. ह्याकरितां पुष्कळ बंधूंत मिळून एकच बायको समाईक असे. ह्या दोन वाईट चाली व व्यभिचार ह्यांची महंमदानें सक्त बंदी केली, आणि असें करितांना एका पुरुषास पुष्कळ बायका करण्याची मोकळीक ठेविली. तरी एकानें चार पेक्षां ज्यास्त बायका करूं नयेत असा त्यानें निर्बंध ठरविला होता. कुराणांत व्यभिचारिणीस देहान्ताची शिक्षा व

व्यभिचारी पुरुषास फटक्यांची शिक्षा ठरविलेली आहे. लढाई व लूट ह्यांविषयीं पुष्कळ नियम आहेत. मोहरम, रज्जब, जिल्काद, व जिल्हेज, हे चार पवित्र महिने गणिले आहेत. रमजान हा उपवासाचा महिना आहे. कुराणाचे अर्थाविषयीं वाद पडून त्याच्या चार शाखा, व मुसलमानांचे सुनी व शिया असे दोन पंथ झाले. आरबांचे राज्यांत ग्रंथकारांस मोठें उत्तेजन मिळत असे, म्हणून त्या काळीं मोठमोठे पंडित उदयास आले. मुसलमान धर्माच्या मुख्य आचार्यांस 'इमाम' असें म्हणतात, आणि पैगंबराच्या गादीवर जे पुरुष बसले त्यांस 'खलीफा' म्ह० अनुयायी असें म्हणतात. लष्करांतील मोठमोठे सरदारांस सरदार उल्मोमिनीन असें म्हणतात.

मुख्य कुराणाशिवाय महंमदाचीं भाषणें, त्याचीं कृत्यें, त्यानें ठरविलेले आचार व दिलेले निकाल, इत्यादि विषय महंमदाच्या मृत्यूनंतर शंभर वर्षांनीं एकत्र करण्यांत आले, त्यांस 'सुन्ना' असें म्हणतात. कुराणाइतकीच ह्या सुन्नांची योग्यता असून त्यांचा इस्लामास मोठा आधार आहे. महंमदाच्या पश्चात् प्रथम तीन खलीफा होऊन पुढें त्याचा जांवई अली हा चवथा खलीफा झाला. त्याच्या मृत्यूनंतर खिलाफतीविषयीं तंटे लागले.

५. ताबुतांची उत्पत्ति; शिया व सुनी.—सहावा खलीफा मुआविया फार पराक्रमी पुरुष होता. त्यानें अलीचे मुलगे हसन व हुसेन ह्यांचा व त्याच्या विस्तृत वंशाचा क्रूरपणें नाश केला. पैगंबराच्या वंशाची ही मोठी क्रूर कत्तल मुसलमान लोक अद्यापि ताबुतांत दाखवितात. ताबुतांचा प्रचार हिंदुस्थानांत सार्वत्रिक असल्यामुळें, तो कसा उत्पन्न झाला त्याची मूळ हकीकत देणें जरूर आहे.

मुआवियाचा मुलगा यजीद ह्यानें हसनास विषप्रयोग करून ठार मारिलें (सन ६६९); आणि तो हुसेन ह्यास आग्रह करूं लागला, कीं मी (यजीद) खलीफा आहें अशी शपथपूर्वक कबुली दे. ती शपथ हुसेन घेईना. म्हणून यजीदनें त्याजवर फौज पाठविली. सकाळीं लढाईस प्रारंभ झाला. एका मागून एक हुसेनाचे सर्व सोबती तीर लागून मरून पडले. त्यांत सतरा जण तर फातिमाच्या औरस वंशांतील होते. हुसेनाचीं लहान लहान मुलेंही तीरांच्या जखमांनीं मेलीं. शेवटीं हुसेनही चौतीस जखमा लागून पडला. त्याचे अंगावर एकंदर

तीस तीर होते. ह्या कत्तलींतून हुसेनाची बहीण झैनाब, व अली आणि उमर असे दोन मुलगे इतकीं मात्र वांचलीं. ह्या लढाईचा प्रकार ताबुतांत मुसलमान लोक दाखवितात. शिया म्हणून पुढें मुसलमानांचा एक पंथ निघाला. ह्या पंथाचे लोक ह्या पैगंबराच्या वंशास भजतात. ते म्हणतात, पैगंबरानंतर जे तीन खलीफा झाले ते बरोबर नाहींत, कारण त्यांचा पैगंबराशीं शरीरसंबंध पोंचत नाहीं. परंतु त्यांचे प्रतिपक्षी सुनी असें म्हणतात, कीं मदीना येथील धर्मसभेनें निवडले असल्यामुळें सर्व खलीफा योग्य आहेत. हेच कलह पुढें माजले. ह्याप्रमाणें जरी निराळे पंथ झाले, तरी ताबुतांची चाल आरबस्थानांत नाहीं. ती फक्त हिंदुस्थानांतच आहे. तिचें कारण असें झालें, कीं मोगल बादशहा बाबर शियापंथी असून त्याचा असा नियम असे, कीं इराणांत करबेला येथें हुसेनाची कत्तल झाली होती, त्या ठिकाणी दरसाल जाऊन हुसेनाच्या कबरीचें दर्शन घ्यावयाचें. पुढें हिंदुस्थानांत आल्यावर राज्यकारभार सोडून बाबरास इतक्या लांब जातां येईना, तेव्हां मौलवी लोकांनीं कुराणांतील वचन काढून त्या धोरणावर त्यास सांगितलें, कीं 'करबेला येथें जी हुसेनाची कबर आहे, तिची प्रतिमा करून तिचें दर्शन तुम्ही घेत जा. पैगंबरालाही मक्केंतून पळाल्यावर अशी प्रतिमा करावी लागली होती.' ती गोष्ट बाबरानें मान्य करून त्यानें दहा दिवस हुसेनाच्या मरणाचा समारंभ करण्याचें सुरू केलें. बादशहानें हा प्रघात घातल्यामुळें तो सर्व सरदारांनीं व देशभर पसरलेल्या इतर सर्व मुसलमानांनीं उचलिला, तोच हल्लीं चालू आहे. हा प्रकार कालांतरानें फारच वाढून अनेक हिंदु लोक सुद्धां ताबूत करूं लागले. ईश्वराची प्रतिमा करून तिची पूजा करणें हें मुसलमानधर्मांत मोठें पाप गणलें असल्यामुळें, कितीएक जाणते मुसलमान आहेत ते ताबूत करीत नाहींत. ताबुतांचा प्रचार इतका वाढला आहे, कीं ठिकठिकाणीं भजन, पूजन चालून हिंदु लोकांच्या अनुकरणानें, त्यांस देवस्थानांचें महत्त्व आलें आहे. कित्येक पीरांस तर हिंदूंच्या देवांचीं नांवेंही मिळालीं आहेत. नगरच्या पीरास विठोबा म्हणतात. अहंमदाबादेस मलेकसाहेब याच्या कबरेस नरसोबा म्हणतात. शिंदे, होळकर, गायकवाड, हे पीरांचे भक्त होते. बाबामलंग म्हणून कल्याणाजवळ मलंगगड किल्ल्यांत एक पीर आहे. त्याचे मुजावर म्हणजे झाडलोट करणारे कल्याणचे केतकर हे चित्तपावन

ब्राह्मण आहेत. अशा पीरांजवळ व इतर ठिकाणीं ज्या जत्रा भरतात, त्यास उरूस असें म्हणतात. अनेक हिंदु लोक मुसलमानांच्या पीरांस नवस करितात. मुसलमानांच्या कारकिर्दींत आपल्या अनेक जुन्या हिंदु शहरांचीं नांवें बदलून त्यांस मुसलमानी नांवें मिळालीं. उदाहरणार्थ;— *प्रयाग*—अलाहाबाद; भागानगर—हैद्राबाद; नाशीक—गुल्छनाबाद; रायगड—इस्लामगड; *अवंती*—अकबराबाद; धारानगरी—अहंमदाबाद; चंपावती—वन्हाणपूर; अनहिलपूर—अजिमाबाद (पट्टण); नागरकोट—फैजाबाद इ.

हिंदलोकांशीं निकट संबंध आल्यामुळें व अनेक मुसलमान मूळचे बाटलेले हिंदु असल्यामुळें, त्यांचा आरंभींचा कडवा धर्मद्वेष शिथिल पडला, व अनेक बाबतींत ते हिंदूंचें अनुकरण करूं लागले. महाराष्ट्र संतमंडळांत मुसलमान आहेत. कित्येक मुसलमान मांस खात नाहींत. सय्यदांचें वगैरे वंशांत कन्येचा पुनर्विवाह करीत नाहींत. शिवाय कित्येक ठिकाणीं त्यांमध्यें हिंदु लोकांसारख्याच जाति झाल्या आहेत. तांबोळी, नट, कुंजडे, महात, सारबान, नालबंद, तांबट, कागदीं, दर्जी इत्यादि अनेक जातिभेद मुसलमानांत उत्पन्न होऊन ते आपापल्या जातींत मात्र बेटीव्यवहार करितात. मुसलमान हे महारांचे पाणवठ्यावर पाणी भरीत नाहींत. कित्येक ठिकाणीं त्यांच्या बायका हिंदूंसारख्या लुगडीं चोळ्या नेसतात, व पुरुष धोतरें व पागोटीं वापरितात. ठिकठिकाणीं त्यांच्या फकिरांचे मोठमोठे जमाव आहेत, त्यांपैकीं कोणी भगवीं वस्त्रें नेसतात, व भस्म लावतात. कित्येक ठिकाणीं असे फकीर ब्रह्मचर्य पाळितात; तरी खरें म्हटलें असतां मुसलमानांत जातिभेद नाहीं. शिया व सुनी हे मूळचे दोन पंथ असून आरंभींचे हिंदुस्थानांत आलेले बहुतेक मुसलमान सुनी पंथाचे होते. सुफी म्हणून एक पंथ आहे, त्यांतील लोक साधुवृत्तीनें राहतात. वाहबी म्हणून नवीन पंथ निघाला असून त्यांतील लोक कडवे आहेत. असे पंथ पुष्कळ आहेत. शिवाय सय्यद, शेख, पठाण वगैरे निरनिराळे भेदही मुसलमानांत आहेत. पैगंबरांचे वंशापासून झालेल्या मुसलमानांस सय्यद असें म्हणतात. अफगाण व तुर्क ह्यांना पठाण म्हणतात. X

२–७३१–२०००

प्रकरण तिसरें.

आरबी खिलाफत.

इ. स. ६३२–१२५८.

१. मदीनाची लोकसत्ताक खिलाफत. २. जिझिया कर.
३. मुसलमानांचे अजब पराक्रम. ४. स्पेनचा पाडाव.
५. बगदादचे अब्बासी खलीफा. ६. फातिमईद वंश.
७. खिलाफतीचा र्‍हास. ८. आरेबियन नाइट्स्चे नायक.
९. जगाच्या संस्कृतींत आरबांचें कार्य.

१. मदीनाची लोकसत्ताक खिलाफत.—मुसलमानांचा धर्म एक आहे, तरी सर्वांची जात किंवा कुळी एक नाहीं. म्हणून महंमदाचे मृत्यूनंतर मुसलमानांचा फैलाव कसकसा होत गेला हें समजणें जरूर आहे. अल्प काळांतच त्यांनीं आपला धर्म व राज्य पूर्वेस सिंधुनदीपासून पश्चिमेस अटलांटिक महासागरापर्यंत वाढविलें, आणि नाना जातींचे लोक आपल्या धर्मांत आणिले. मुसलमानांच्या ह्या पराक्रमांनीं जगाच्या इतिहासाचा ओघ संपूर्णपणें बदलून गेला. त्यांचा हिंदुस्थानच्या इतिहासाशीं जरी फारसा संबंध नाहीं, तरी जगाच्या संस्कृतींत मुसलमानांनीं भर घातली कीं तिचें नुकसान केलें, ह्या मुद्याचा विचार केल्याशिवाय हिंदुस्थानांतील मुसलमानांच्या इतिहासाचें रहस्य आपणांस चांगलेंसें कळणार नाहीं. प्रस्तुत प्रसंगींही मुसलमानांच्या हालचालींकडे सर्वांचें लक्ष विशेष वेधलें असल्यामुळें, महंमद पैगंबराच्या पश्चात् मुसलमानांचा जोर कसा वाढत गेला, ह्या प्रश्नाचा सूक्ष्म विचार करणें अवश्य आहे. हा विचार करितांना मुसलमानांचे मोठमोठे राजवंश कोणते झाले; आणि मध्यआशियांतील रानटी व धनगरी पेशाचे लोक मुसलमानांच्या संघांत कसे सामील झाले, हेंही पाहवें लागेल. ह्या कामीं खालील मुख्य कालखंड हें प्रकरण समजण्यास उपयोगी पडतील:—

NATIONAL ARCHIVES OF INDIA

१. महंमद पैगंबर, इ. स. ५७०–६३२, राजधानी मक्का.
२. आरब रिपब्लिक, (लोकसत्ताक राज्य), स. ६३२–६६१, मदीना.
३. उमईद वंश, इ. स. ६६१–७५०, राजधानी डमास्कस.
४. आब्बासी वंश, इ. स. ७५०–१२५८, राजधानी बगदाद.
५. स्पेनचा उमईद वंश, इ. स. ७५६–१०३१, राजधानी कोर्डोव्हा.
६. फातिमईद वंश, इ. स. ९०९–११७१, महदीया आफ्रिका.
७. इजिप्टचा आब्बासी वंश, स. १२४२–१४७९, राजधानी कैरो.

ह्याशिवाय अवांतर वंश झाले, त्यांचा उल्लेख पुढें येईल. महंमदानें ठरविल्याप्रमाणें मदीना येथें खालील चार खलीफा एकामागून एक लोकांनीं निवडिले: खलीफ अबूबकर (स. ६३२–६३४); खलीफ उमर (६३४-६४४); खलीफ उस्मान (६४४–६५६); खलीफ अली (स. ६५६–६६१).

ह्या चार खलीफांच्या कार्किर्दीस आरबांचें लोकसत्ताक राज्य म्हणतात. त्यांच्या वेळेस मुसलमानी धर्माचा प्रसार फार जारीनें झाला. दुसऱ्या कोणत्याही धर्माचा प्रसार इतका जलद झाला नाहीं. महंमदासारखा आवेशी उपदेशक प्राप्त झाल्याबरोबर आरब लोकांचा अडाणीपणा व आळस नाहींसा होऊन, त्यांजमध्यें ऐक्य व उत्साह उत्पन्न झाला. म्हणूनच महंमदाची गणना थोर पुरुषांत होत आहे. आरबांच्या फौजा प्रथम सिरिया देशावर महापुराप्रमाणें लोटत आल्या. मातबर शहरें त्यांनीं लुटून फस्त केलीं, व असंख्य लोकांस गुलाम करून नेलें. त्यांजपुढें सिरियांतील कवाइती रोमन फौजांचा कांहीं इलाज चालला नाहीं. पर्शियन लोकांचीही धूळधाण उडाली. आरब लोकांस हे सुधारलेले परकी लोक रानटी समजत व महंमदास तुच्छ लेखीत. पण ह्याच रानटी लोकांनीं अखेरीस सुधारलेल्या राष्ट्रांचा पाडाव केला. अबुबकर, उमर, उस्मान व अली हे चार महंमदाचे सरदार होते. हे चार व महमद पैगंबर मिळून मुसलमानांचें पंचायतन झालें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. पहिले दोघे महंमदाचे सासरे व दुसरे दोघे जांवई होते. महंमद मरण पावल्यावर त्याच्या शिष्यांनीं मदीना येथें एक सभा भरविली व सर्वानुमतें सर्वांत वृद्ध अबूबकर ह्यास खलीफा नेमिलें. अबूबकर

हा दीलदार पुरुष होता. त्याचा शूर सरदार खालेद ह्यानें त्या वेळचें धनवान शहर डमास्कस हें काबीज केलें. अबूबकर पुष्कळ वृद्ध होता, व त्याचा कारभारही लवकर आटोपला.

आपले पश्चात् उमरास खिलाफत द्यावी, असें अबूबकरनें मरणसमयीं ठरविलें होतें. उमरही फार चतुर होता. त्यानें सन ६३४ त सिरिया देश जिंकून जरुसलेम शहर काबीज केलें. ह्या शहरीं येशू क्रिस्ताचा अस्सल क्रूस होता, तो जरुसलेमचा पाडाव झाल्यावर रोमन बादशहा हिराक्रियस ह्यानें मोठ्या दुःखानें कान्स्टांटिनोपल येथें नेऊन ठेविला. क्रिस्ताची पवित्र भूमि मुसलमानांच्या हातांत पडल्यामुळें (स. ६३४—६३७), ह्या दोन धर्मांच्या लोकांत पुढें पुष्कळ तंटे माजून तुंबळ रणकंदनें झालीं. अखेरीस जरुसलेमची मालकी मुसलमानांकडेच राहिली. उमरचे कारकिर्दींत इजिप्ट देश मुसलमानांनीं काबीज केला. सिरिया काबीज करणारा अमरू ह्यासच उमरनें इजिप्ट देश जिंकण्यास पाठविलें. तो देश पूर्वरोमन-बादशाहींत मोडत होता. पण तेथचे लोक रोमन अंमलास त्रासून गेले होते; अमरूनें त्यांस गोड गोड वचनें दिलीं, त्यावरोबर ते आरबांच्या बाजूस आले. इजिप्टची राजधानी अलेक्झांड्रिया येथें रोमन व आरब फौजांचा एक वर्ष संग्राम चालू होता. पुढें रोमन फौजा शहर सोडून चालत्या झाल्या. ही बातमी अमरूनें खलीफास कळवितांना लिहिलें, कीं 'येथें एक भव्य व पुरातन पुस्तकसंग्रह आहे त्याचें काय करावें?' उमरनें उत्तर पाठविलें, 'जर ते ग्रंथ कुराणाशीं मिळते असतील, तर त्यांची जरूरच नाहीं; आणि जर ते कुराणाच्या विरुद्ध असतील तर ते कायम ठेवणें इष्ट नाहीं; सबब तो ग्रंथसंग्रह जाळून टाकावा.' असें उत्तर आल्यावर अमरूनें तीं पुस्तकें आंघोळीचें पाणी तापविण्यासाठीं जाळून टाकिलीं. असें सांगतात, कीं अलेक्झांड्रियाच्या चारशें स्नानगृहांमध्यें सहा महिनेपर्यंत ह्या पुस्तकांवर पाणी तापत होतें, (इ. स. ६४०). गिबनच्या मतें ही गोष्ट खरी नाहीं. ती खरी असेल तर आरबांच्या योग्यतेस निःसंशय कमीपणा आणणारी आहे. इकडे आरब फौजा सिरिया देश जिंकीत असतांच दुसरी एक फौज इराणावर आली. इराणचें राज्य ऐषआरामांत दंग होतें, आणि रोमन बादशहांशीं लढून अगदीं खालावलें होतें. त्याचा अल्प काळांतच मुसलमानांनीं पाडाव

केला, (इ. स. ६३२–६४१). त्याचप्रमाणें इराण व सिरिया हेही देश त्यांनीं संपूर्णपणें आपल्या ताब्यांत आणिले, तेव्हां कॉकेससपर्यंत त्यांची राज्यमर्यादा पोंचली. इराणांतून आणिलेल्या एका गुलामाचा न्याय करीत असतां त्या गुलामानें उमरास भोंसकून ठार मारिलें. आपल्या पश्चात् खिलाफतीवर योग्य मनुष्याची नेमणूक करण्यासाठीं उमरनें एक सभा नेमून ठेविली होती, तिनें उस्मान ह्यास खलीफा नेमिलें.

उस्मानानें मुसलमानांचें प्रचंड आरमार तयार केलें. त्या योगानें त्यांची सत्ता सर्व भूमध्यसमुद्रांत पसरली. माल्टा, ऱ्होड्स, ग्रीस वगैरे देश मुसलमानांच्या ताब्यांत आले. आफ्रिकेचा उत्तरभाग जिंकण्याचें काम पुष्कळ वर्षें चाललें. तेथील एकामागून एक प्रांत जिंकून आरबांनीं आपल्या कबजांत आणिले, (स. ६४३–६८९). त्यांनीं पुरातन शहर कार्थेज जिंकून त्याचा विध्वंस केला. मुसलमानांनीं ह्या प्रदेशाचा पाडाव केल्यामुळें तेथील लोक पाश्चात्य सुधारणेस जे एकदांचे मुकले, त्यांतून अद्यापि त्यांचें डोकें वर निघालेलें नाहीं. उस्मानानें कुराणाची एक शुद्ध प्रत तयार करवून बाकीच्या सर्व जाळून टाकिल्या. हीच प्रत हल्लीं सर्वत्र चालू आहे. उस्मानाचे वेळेस मुसलमानांत द्वेष उत्पन्न झाले, व त्यांतच त्याचा खून झाला.

नंतर खिलाफतीवर अलीची नेमणूक झाली. अली हा महंमदाची मुलगी फातिमा हिचा नवरा. हसन व हुसेन हे दोन तिचे मुलगे. ह्या मुलांच्या वंशजांस सय्यद म्हणजे पैगंबराच्या पोटचे असें नांव आहे. हे बहुशः हिरवें पागोटें बांधीत असून सर्व मुसलमानांत श्रेष्ठ गणिले जातात. फातिमेच्या वंशजांस 'सय्यद' आणि अलीच्या इतर बायकांपासून झालेल्या संततीस 'अलवी' अशीं नांवें आहेत.

अलीच्या कार्किर्दींत मुसलमानांतील तंटे विकोपास गेले. आपसांतील वैरानें खिलाफत क्षीण झाली. अलीचा खून होऊन त्याचे मुलगे इराणांत पळून गेले. मुआविया नामक एका पाणीदार गृहस्थानें मदीना येथील खिलाफत बळकावून ती डमास्कस येथें नेली. तेथें जे खलीफा झाले, त्यांच्या वंशास 'उमईद वंश' म्हणतात.

२. जिझिया कर.—परराष्ट्रांस जिंकिल्यावर हे खलीफा व त्यांचे सरदार जिंकिलेल्या लोकांना आपला धर्म स्वीकारण्याचा नेहमींच जुलम

NATIONAL ARCHIVES OF INDIA

करीत असें नाहीं. अप्रत्यक्ष जुलूम मात्र फार होत असे. जिंकिलेल्या लोकांनीं मुसलमानी पेहराव करूं नये, शस्त्र धारण करून बाहेर फिरूं नये, घोड्यांवर खोगिरांचा उपयोग करूं नये, अशा प्रकारचे अनेक निर्बंध असत. परंतु सर्वांत जाचक प्रकार म्हणजे जिझिया कर होय. परधर्मी लोकांच्या संरक्षणार्थ त्यांजवर मुसलमानांनीं एक कायमचा कर बसविला, त्यास 'जिझिया' असें म्हणतात. दरसाल दर असामीस सोन्याचा एक दीनार द्यावा लागे. लेन्पूल म्हणतो, प्रत्येकाच्या दर्जाप्रमाणें, दरसाल, साठ, तीस व पंधरा रुपये कराची रकम बसे. ब्राह्मणांवर एक तृतीयांश आकारणी करीत. कित्येकांच्या मतें बायकामुलांस कराची माफी असे; आणि कित्येकांच्या मतें सर्वांसच सरसकट हा कर द्यावा लागे. साधु, निराश्रित व गुलाम अशा लोकांपासून हा कर घेऊं नये असा नियम होता. कराचे दोन प्रकार असत; एक स्वसंतोषाचा, व दुसरा जबरदस्तीचा. जबरदस्तीचा म्हणजे अलीकडील 'जादा पोलीस'च्या सारखा. स्वसंतोषाचा मतलब असा आहे. मुसलमानांच्या कर्तृत्वांत धर्म व राज्य ह्या दोनही गोष्टी एकवटलेल्या होत्या. ह्या दोनही गोष्टी अन्योन्य-पोषक होत्या. धर्माच्या सबबीवर राज्य वाढे, आणि राज्याच्या सबबीवर धर्मप्रसार होई. मुसलमानांनीं स्वारी करून इराणसारखा एखादा नवीन देश जिंकिल्याबरोबर, पुढील व्यवस्थेची त्यांस तजवीज करावी लागे. ते जिंकलेल्या लोकांस सांगत, 'बाबांनो, तुमचा आम्हीं पाडाव केला आहे, आतां तुम्ही आमचे ताबेदार आहां, तेव्हां तुम्हांस बंड वगैरे करूं न देतां, तुमचा सांभाळ करणें आमचें कर्तव्य आहे. हें कर्तव्य तडीस नेण्याचे दोन मार्ग आहेत, त्यांपैकीं कोणता तरी एक तुम्हीं पत्करिला पाहिजे. तुम्ही मुसलमानी धर्म स्वीकारा व आमच्यांमध्यें मिळून जा, म्हणजे आमचे सर्व अधिकार व हक्क तुम्हांस एकदम प्राप्त होतील. ही गोष्ट पत्करत नसेल, तर तुम्हीं प्रत्येकानें आम्हांस ठरीव कर दिला पाहिजे; म्हणजे ह्या कराच्या उत्पन्नावर तुमच्या संरक्षणाचें काम भागवितां येईल. मुसलमानी धर्म स्वीकारून एकंदर राज्याचे व ऐश्वर्याचे वाटेकरी व्हावें, नाहीं तर कर देऊन स्वस्थ बसावें; ह्यांपैकीं कोणता तरी एक पंथ तुम्हीं स्वीकारिला पाहिजे.' अशा रीतीनें विधर्मी लोकांवर मुसलमानांनीं जो कर बसविला, त्यास 'जिझिया' असें म्हणतात. सिरिया

NATIONAL ARCHIVES OF INDIA

वगैरे प्रांतांत किस्ती लोक राहत होते, त्यांनीं हा कर देण्याचें कबूल केल्यावर, त्यांच्या वाटेस मुसलमान गेले नाहींत. उलट किस्ती देवालयें व त्यांचीं उत्सवें मुसलमानांनीं पूर्वीप्रमाणें निर्वेध चालविलीं. पण इराणच्या लोकांनीं मुसलमानी धर्म स्वीकारिला, आणि जे स्वधर्माविषयीं विशेष अभिमान बाळगणारे होते, त्यांनीं देशत्याग केला. तेथून ते हिंदुस्थानच्या पश्चिमकिनाऱ्यावर संजन, नवसरी वगैरे ठिकाणीं येऊन राहिले, ते हे पारशी होत. सारांश, जिझिया कर परधर्मी लोकांस दुःसह वाटे खरा, पण जे कोणी दुसरे देश जिंकितात, त्यांस परिस्थित्यनुरूप अशा प्रकारच्या युक्तीचा अवलंब करून आपला शह बसवावा लागतो. ह्या कामीं महंमद घोरी, अलाउद्दीन खिलजी, औरंगजेब, वगैरे पुरुषांनीं लोकांवर जुलूम केले असतील, तथापि *जिझिया कराची मूळ कल्पना केवळ क्रूरपणामुळें निघाली होती असें नाहीं.* अकबरानें मात्र जिझिया कर काढून, हिंदुमुसलमानांचें ऐक्य करण्याचा प्रयत्न केला. मराठ्यांनींही हिंदुस्थानांत चौथाई व सरदेशमुखी ह्या करांच्या रूपानें आपला शह जिंकिलेल्या प्रांतावर बसविला होता. जिंकिलेल्या लोकांचीं हत्यारें काढून घेऊन त्यांस निःशस्त्र ठेवणें ही हल्लींची पद्धति सुद्धां शांतता राखण्याची एक युक्तिच आहे. जिझिया कर दिल्यानें परधर्मीयांचा बचाव मात्र होई; परंतु मुसलमानी धर्म स्वीकारिल्याबरोबर कोणाही इसमास, मग तो कोणत्याही रंगाचा किंवा जातीचा असला, तरी मुसलमानांच्या बरोबरीनें सर्व हक्क प्राप्त होऊन लुटीचा वांटा व लष्करांत मोठमोठ्या जागा मिळत.

केवळ धर्मभिन्न असल्यामुळें लोकांवर जिझिया कर बसविलेला नाहीं, हें वरील समर्थनांतील तत्त्व कायमचें टिकणें शक्य नाहीं. कोणताही देश प्रथम जिंकितांना असा कर बसविणें अपरिहार्य असतें. पण पुढें देशांत शांतता होऊन नवीन राजाचा अंमल लोकांनीं मान्य केला, आणि राजनिष्ठेनें त्याची नोकरी पत्करून त्याच्या जिवास जीव देण्यास ते तयार झाले, म्हणजे मग कराची आवश्यकता राहत नाहीं. हें तत्त्व ओळखून अकबरानें हा कर माफ केला. केवळ धर्मभेदामुळें कर बसविल्यानें तो लोकांस किती दुःसह वाटला हें औरंगजेबाच्या वेळेस निदर्शनास आलें.

आरब लोकांस यशप्राप्ति होण्याचें दुसरें एक कारण ग्रंथकारांनीं असें दिलें आहे कीं, महंमदानें जाग्रत केलेला धर्माचा आवेश त्यांच्या स्त्रियांनीं

द्विगुणित वाढविला. आरब स्त्रिया आपल्या पतींबरोबर युद्धास जात; त्यांच्या श्रमाचा वांटा घेत; आपल्या मधुर गायनानें त्यांस उत्साह आणीत; आणि अशा अर्धांगीकडून शाबासकी मिळविण्यास लोकांस ईर्षा वाटे.'

३. उमईद्वंश, मुसलमानांचे अजब पराक्रम.—महंमद मरण पावल्यावर शंभर वर्षे झालीं नाहींत, तोंच मुसलमानांनीं चहूंकडे विलक्षण दिग्विजय संपादिले. त्यांनीं इराणदेश जिंकिल्यामुळें पारशी लोकांचें व पारशी धर्माचें हजारों वर्षें चालत आलेलें ऐतिहासिक महत्त्व नष्ट झालें. आशियामायनर व सिरियादेश हे मुसलमानांच्या कबजांत गेल्याबरोबर ख्रिस्ताची चरित्रभूमि जरुसलेम शहर त्यांच्या ताब्यांत गेलें. आफ्रिकेचा उत्तर किनारा नुकताच कॉन्स्टांटिनोपलच्या बादशहांनीं व्हॅंडल्स् लोकांपासून जिंकून घेतला होता, तो सर्व इजिप्ट सुद्धां मुसलमानांच्या हातांत पडल्यानें त्याचा पुढील इतिहास अगदीं बदलून गेला. वास्तविक आफ्रिकेच्या ह्या भागाची पूर्वस्थिति अगदीं दक्षिणयुरोपासारखी होती, आणि मुसलमानांनीं तो भाग जिंकिला नसता, तर त्याची भावी सुधारणाही दक्षिणयुरोपासारखीच बनली असती. उत्तरआफ्रिका मुसलमानांनीं जिंकिल्यामुळेंच, तो भाग युरोपीय सुधारणेस मुकला, आणि अद्यापि निकृष्टावस्थेंत कुजत पडला आहे, असें इतिहासज्ञ समजतात.

आशियामायनर जिंकिल्याबरोबर आरबांनीं कॉन्स्टांटिनोपलला शह देऊन, युरोपांत शिरण्याचें पर्वनाचें जी बॉस्फोरस सामुद्रधुनी ती काबीज करण्याचा प्रयत्न चालविला, (स. ६७३–६७७). अनेक वेळां त्यांनीं निकराचे हल्ले केले, पण त्या वेळीं त्यांचा तो प्रयत्न सफल झाला नाहीं. पुनः चाळीस वर्षांनीं आरबांनीं आरमार व फौज ह्या दोहोंच्या साह्यानें कॉन्स्टांटिनोपलला वेढा घातला; परंतु तेथील बादशहा लिओ इसोरियन ह्याच्या शौर्यापुढें आरबांना यश मिळालें नाहीं, (इ. स. ७१७–१८). आरबांच्या ह्या अपयशामुळें यूरोपचा भावी इतिहास साफ बदलून गेला. उम्मईद वंशांतला खलीफा दुसरा उमर (स. ७०७–७२०) ह्यास आरबांचा 'मार्कस ऑरेलियस' असें म्हणतात. रोमन बादशहांमध्यें मार्कस ऑरेलियस हा एक विख्यात साधु स्वभावाचा पुरुष होऊन गेला.

× स. ६६१ पासून स. ७५० पर्यंत डमास्कस शहर उमईद खलिफांची राजधानी होतें. त्या अवधींत त्या शहराचें सौंदर्य अतिशय वाढलें. डमा-

स्कस त्या वेळीं सर्व पृथ्वीवर पहिल्या प्रतीचें शहर म्हणून वाखाणलें जात ते. मोठमोठे वाडे, बागा, कारंजीं, दुकानें, इत्यादिकांनीं त्यास अप्रतिम शोभा आली होती. इमारती बांधण्याच्या कामांत मुसलमानांचा हात धरणारे दुसरे कोणी झालेच नाहींत असें म्हणावें लागतें. केवळ राज्यकर्तेच मोठमोठ्या इमारती बांधीत असें नाहीं, तर त्यांचें उदाहरण पाहून सर्व मोठमोठे सरदार व श्रीमंत लोक हरएक ठिकाणीं उत्तमोत्तम इमारती बांधूं लागले. दूर अंतरावरून नानातऱ्हेचे रंगीबेरंगी व चित्रविचित्र दगड मुद्दाम आणवून ते त्या इमारतींस लावीत. मोठमोठे रस्ते बांधून त्यांच्या दोहों बाजूंस झाडें लावणें, व कालवे बांधून शहरांत पाण्याचा पुरवठा करणें, हीं मुसलमानांचीं त्या वेळचीं कामें, त्यांच्या प्रचंड उद्योगाची आजतागाईत साक्ष देत आहेत.

डमास्कस शहरांतील नळाच्या पाण्याची व्यवस्था पाहून आजकालही तज्ज्ञ लोक थक्क होऊन जातात. अगदीं यःकश्चित् भिकाऱ्याच्या घरांत सुद्धां डमास्कस येथें आज नळ व कारंजें आहे. हें पाणी सात मोठे कालवे बांधून शहरांत आणलेलें आहे. त्यांस आज बाराशें वर्षें होऊन गेलीं आहेत, तरी ते नुकतेच बांधलेले असावे असें दिसतें. डमास्कस येथील खलीफांच्या राहत्या वाड्याची खरी कल्पना वाचकांस शब्दांनीं देणें शक्य नाहीं. शहरांत येण्यास सहा मोठमोठे दरवाजे होते, त्यांचे उंच मनोरे लांबूनच प्रवाशास डमास्कस शहराचें वैभव सुचवून देत. मुसलमानी बांधणींत कमानी, घुमट, मनोरे व स्तंभ हे भाग विशेष आहेत, ते हिंदुस्थानांतील मुसलमानी बांधणींत आजही आपणास स्पष्ट दिसतात.

मोआविया व यजीद हे दोघेही खलीफा प्रबल झाले. मोआविया वीस वर्षें खिलाफतीचा उपभोग घेऊन सन ६७९ त मरण पावला. त्यानें विद्येस चांगलें उत्तेजन दिलें. आजपर्यंत खलीफा नेमण्याचें काम लोकांकडे असे, तें त्यानें बंद करून खिलाफत स्वतःच्या वंशांत परंपरेनें चालावी असें ठरविलें. ही गोष्ट मुसलमानी रियासतीस फार घातुक झाली. लोकनियुक्तता नाहींशी झाल्यामुळें खलीफांची सत्ता अनियंत्रित झाली, आणि ते आपल्या कर्तव्याविषयीं बेफिकीर होऊन चैनी बनले. लगेच 'यथा राजा तथा प्रजा' अशी स्थिति झाली. मोआवियानंतर यजीद, त्यानंतर दुसरा मोआविया, नंतर मरवान असे खलीफा झाले. सन ६८४ त

अब्दुल मलीक हा दहावा खलीफा झाला. त्याच्या तरीक नांवाच्या सरदारानें स्पेनच्या दक्षिणटोंकावर किल्ला बांधून त्यास आपलें नांव दिलें, तें जिब्रॉल्टर (जेबल् तरीक म्ह० तरीकनें बांधिलेला किल्ला) म्हणून आजतागाइत चालत आहे. ह्या वेळेसच मुसलमानांनीं कार्थेज जाळिलें. त्याचा सरदार अब्दुर्रहमान ह्यानें सन ७०५त स्पेनच्या क्रिस्ती राजा रॉड्रिक यास जिंकून उत्तरेस पिरिनीज पर्वतापावेतों अमल बसविला, आणि आफ्रिकेंत ट्यूनिसप्रांत घेऊन कैरो शहर बसविलें. बीजगणित (आरबी भाषेंत अल्जबर) हा विषय ह्या वेळेस आरब लोकांनीं स्पेन देशांत नेला. खलीफा अब्दुल मलीक सन ७०५त मरण पावला, आणि त्याचा मुलगा वलीद खलीफा झाला.

४. स्पेनचा पाडाव (स. ७११).—उमईद खलीफांचें मोठें कृत्य म्हणजे त्यांनीं स्पेनचा पाडाव केला हें होय. पूर्वेकडून त्यांचा युरोपांत अद्यापि कालपावेतों प्रवेश झाला नाहीं, तरी पश्चिमच्या बाजूनें जिब्रॉल्टरच्या सामुद्रधुनींतून स. ७११ त स्पेनदेश त्यांच्या हस्तगत झाला. अमीर किंवा सुलतान अशी पदवी धारण करून त्यांनीं तेथें आपला अंमल सुरू केला. सन ९२९त अब्दुर्रहमान तिसरा हा आपणास खलीफा म्हणवून घेऊं लागला. ह्यापुढें आठशें वर्षें पावेतों स्पेनचे उत्कृष्ट प्रांत मुसलमानांच्या ताब्यांत राहिल्यानें, त्यांत क्रिस्ती धर्माचा शिरकाव झाला नाहीं. आरबस्तान, सिरिया, उत्तरआफ्रिका वगैरे टिकाणांहून अनेक मुसलमान लोक स्पेन देशांत येऊन वस्ती करून राहिले. त्यांनीं तेथें मेहनत करून शेती व दुसऱ्या कला चांगल्या ऊर्जित दशेस आणिल्या. तेणेंकरून सेव्हिल, कोर्डोव्हा, टोलेडो, ग्रनाडा वगैरे मोठमोठे प्रांतांत आरबी पेहेराव, आरबी आचार, आरबी भाषा व धर्म ह्यांचा प्रसार झाला. स्पेनदेश हस्तगत झाल्यानंतर चार पांच वर्षांतच पिरिनीज पर्वत ओलांडून आरबांनीं फ्रान्स देशांत प्रवेश केला. त्याबरोबर सर्व क्रिस्ती राष्ट्रांची पांचांवर धारण बसली. मुसलमान लोक सर्व यूरोपखंड आक्रमिणार असा सुमार दिसूं लागला. बासफोरस सामुद्रधुनीपासून उत्तरआफ्रिकेच्या किनाऱ्यानें जिब्रॉल्टर पावेतों अर्धचंद्राकृति वर्तुळ अगोदरच बनलें होतें, त्याचा लवकरच संपूर्ण चंद्र बनणार असा सुमार दिसूं लागला होता, (Draper). नकाशा पाहिला असतां ही गोष्ट तत्काल लक्षांत येईल. ह्या अरिष्टाच्या

निकाल स. ७३२ ह्या वर्षी लागला. फ्रान्सच्या मध्यभागी पॉयटियर्स-नजीक टूर्स म्हणून एक गांव आहे, तेथें फ्रेंच सरदार चार्लस् मार्टेल ह्यानें मुसलमान फौजेचा संपूर्ण नाश केला, तेव्हां मुसलमान लोक पिरेनी-पर्वताच्या अलीकडे परत आले, ते पुनः त्यापलीकडे गेले नाहींत. जगाच्या प्रमुख क्रान्तिकारक लढायांत ह्या टूर्सच्या लढाईची गणना आहे. स्पेन-देश जिंकणारा मुसलमानांचा पराक्रमी पुरुष अब्दुर्रहमान ह्या टूर्सच्या लढाईत पडला. ह्याप्रमाणें पैगंबराच्या मरणानंतर शंभर वर्षांनीं युरोपच्या पूर्वेस व पश्चिमेस दोनही दिशांस मुसलमानांस पुढें सरण्यास अटकाव होऊन, क्रिस्त्यांच्या बालमुधारणेस वृद्धि पावण्यास अवकाश मिळाला.

५. बगदादचे आब्बासी खलीफा.— टूर्सच्या लढाईस अठरा वर्षें झालीं नव्हात, तोंच इकडे खिलाफतींत एक मोठा फेरफार घडून आला. मोआवियानें स. ६६१त डमास्कस येथें खिलाफत स्थापन केली, तिचा शेवट स. ७५०त झाला. मोआवियाच्या वंशाचें व अलीच्या वंशाचें वांकडें होतें. मोआवियानें अलीच्या वंशाचा पाडाव केला, तथापि अलीच्या वंशानें स. ७५०त पुनः आपलें डोकें वर काढिलें. ह्या वंशाच्या मंडळीनें तैग्रीस नदीच्या कांठीं बगदाद नांवाचें नवीन शहर स्थापून तेथें खलीफांची गादी नेली. ह्या ठिकाणीं ह्या वंशाच्या खलीफांनीं पांचशें वर्षें राज्य केलें, (स. ७५०–१२५८). पैगंबराचा एक चुलता आब्बास म्हणून होता, त्याच्या नांवावरून बगदादच्या ह्या वंशास 'आब्बासी' असें म्हणतात. पहिलीं दीडशें वर्षें ह्या वंशाची अतिशय भरभराट असून, त्या काळास मुसलमानांचें 'सुवर्णयुग' असें नांव आहे. अल्मसूद (स. ७५४–७७५), हारून-अल्-रशीद (स. ७८६–८०९), मामून (स. ८१३–८३३), वगैरे कित्येक थोर व कर्ते पुरुष ह्या काळांत निपजले. त्यांनीं अनेक गहन विषयांत आपलें नांव अजरामर करून ठेविलें आहे.

शास्त्र, तत्त्वज्ञान, वाङ्मय इत्यादि बाबतींत आरब विद्वानांनीं खलीफांच्या पदरीं राहून अलौकिक कीर्ति मिळविली, आणि मोठमोठे उद्योग केले; त्यांजपुढें तत्कालीन क्रिस्ती राष्ट्रें अत्यंत हीनावस्थ व रानटी दिसतात. गिबन म्हणतो, 'मुसलमानांच्या पहिल्या शंभर दोनशें वर्षांत ऐश्वर्यानें व सत्तेनें खलीफांची बरोबरी करणारे दुसरे राजे पृथ्वीवर नव्हते. सिंधु, अमूदर्या, व टेगस ह्या तीनही नद्यांच्या कांठीं खलीफांचा शब्द झेलला

जात असे.' परंतु पुढें लवकरच अंतःकलहामुळें खिलाफतीचे तुकडे झाले; आणि बगदाद, कैरो, व कोर्डोव्हा ह्या तीन ठिकाणांहून खली-फांचे हुकूम सुटूं लागले. ह्याप्रमाणें राज्याचे जरी विभाग झाले, तरी तीनही ठिकाणचे मुसलमान पैगंबरास व कुराणास सर्व प्रकारें मान देत, आणि सर्व असामी मक्केकडे तोंड करून प्रार्थना करीत. हल्लीं तुर्कस्तानच्या सुलतानास सर्व मुसलमान आपला खलीफा समजतात.

६. **आरेबियन नाइट्सचे नायक हारून व मामून.**—आब्बासी खलीफांचें राज्य बगदाद येथें पांचशें वर्षे मोठ्या भरभराटींत होतें. त्यांचा सर्वांत मोठा बादशहा हारून–अल्–रशीद हा होय. त्यानें स. ७८६ पासून स. ८०९ पावेतों राज्य केलें. तेव्हांपासून आरब मुसलमानांच्या अमलांतील अत्यंत भरभराटीच्या काळास सुरवात झाली. हारून–अल्–रशीद हा रात्रीं वेष पालटून, राज्यांतील खबर काढून गरिबांचा व दुःखितांचा परामर्ष घेण्याकरितां बगदाद शहरांत फिरत असे. 'आरेबियन नाइट्स्' नांवाच्या ज्या गोष्टी प्रचालित आहेत, त्यांतील काल्पनिक भाग सोडून दिला, तरी त्यांत तत्कालीन अंतःस्थितीचें जें चित्र काढलेलें आहे, तें वास्तविक व खरें आहे. भूतलावर जे महान् राज्यकर्ते होऊन गेले, त्यांत हारूनची गणना होत असते. तो मनाचा साधा होता तरी लोकांवर त्याची छाप चांगली होती. जसा शूर तसाच तो राज्यकारभारांतही कुशल होता. तो सदा सर्व राज्यांत फिरत असे. त्याच्या राज्यांत व्यापारी व प्रवासी लोक निर्भयपणें यथेच्छ संचार करीत असत. मशिदी, विद्यालयें, शाळा, दवाखाने, धर्मशाळा, रस्ते, पूल, कालवे, इत्यादि लोकोपयोगी कामें करून त्यानें रयतेची प्रीति संपादन केली. त्यानें विद्याकलांसही उत्तम आश्रय दिला.

हारूनचा दुसरा मुलगा अब्दुल्ला–अल्–मामून हा सन ८१३ त खलीफा झाला, आणि त्यानें वीस वर्षे राज्य केलें. त्याचा लौकिक बापापेक्षांही मोठा आहे. विशेषतः विद्येच्या कामांत ह्या वीस वर्षांत आरबांनीं उत्तम प्रावीण्य संपादिलें. गणितशास्त्र, भूगोल, खगोल, वैद्यक इत्यादि विषयांत त्या वेळच्या आरब विद्वानांचे उद्योग अद्यापपावेतों सर्वत्र मान्य होत आहेत. यूरोपच्या अर्वाचीन प्रगतीस ह्या आरब विद्वानांचे उद्योग बव्हंशीं कारण झाले आहेत. आपल्या लोकांनीं ज्ञान

संपादन करावें असें मामून ह्यास फार वाटे; ह्यासाठीं सर्व राज्यांत स्वतंत्र पाठशाळा स्थापून त्यांस त्यानें कायमच्या नेमणुका बांधून दिल्या; त्यांत सर्व प्रकारच्या लोकांसाठीं शिक्षणाची सोय केली होती. मामून ह्यास परधर्मांचा द्वेष वाटत नसे. सर्वांनीं आपापले धर्म पाळावे अशीच त्याची इच्छा होती. त्याच्या कारकिर्दीत ख्रिस्ती, पारशी व ज्यू ह्या लोकांचीं मंदिरें पुष्कळ वाढलीं. मोठमोठे कवी, निरनिराळ्या शास्त्रांचे अध्यापक, व तत्त्ववेत्ते नेहमीं या मामूनच्या दरबारीं येऊन राहत असत. ग्रीक, संस्कृत, ख्याल्डी वगैरे भाषांतून उत्तमोत्तम ग्रंथ मिळवून मामूननें आरबी भाषेंत त्यांचीं भाषांतरें करविलीं. ज्योतिषांत तर पुष्कळ नवीन शोध लावण्यांत आले. फारशी भाषेसही मामूननें चांगलें उत्तेजन दिलें. दर मंगळवारीं विद्वान् मंडळीची मोठी सभा भरवून तेथें अनेक गहन विषयांवर बादशाहा वादविवाद करवीत असे.

बगदाद शहरच्या ह्या वेळच्या भरभराटीचें वर्णन अनेकांनीं केलें आहे. तें विद्या, कला, संपत्ति, वैभव इत्यादिकांचें माहेरघर होतें. तेथील लोकसंख्या जवळ जवळ वीस लाख होती. खलीफांचा विस्तीर्ण वाडा एका मोठ्या बागांत बांधिलेला असून हल्लींच्याप्रमाणेंच त्या बागांत निरनिराळ्या प्रकारचीं जनावरें व झाडें ठेविलेलीं होतीं. शहरचे रस्ते चाळीस हात रुंदीचे होते. शहरांत मोठमोठे कालवे आणून घरोघरीं हौद बांधून पाणी उत्तम प्रकारें खेळविलेलें होतें. पाठशाळा, मशिदी, दवाखाने, शिपायांच्या बराकी, इत्यादिकांनीं शहरास अवर्णनीय शोभा आलेली होती.

वरील दोघां खलीफांच्या कारकिर्दी सन ७८६ पासून सन ८३३ पर्यंत चालल्या. त्यांच्या वेळेस आरब बादशाहीच्या भरभराटीचा कळस झाला. हेच खलीफा 'आरबी भाषेंतील सुरस गोष्टीं'चे नायक होत. युरोपांत त्यांचा समकालीन राजा पराक्रमी शार्लमेन होय, (स.७६८-८१४). ह्या खलीफांचा खर्च एवढा मोठा होता, कीं पहिल्या चारही खलिफांच्या सर्व उमरींतील खर्च ह्यांस एका दिवसास लागे. पूर्वींच्या कडक धर्मद्वेषाचा लोप होऊन ते परकीयांशीं स्नेहबुद्धीनें वागून त्यांच्या ग्रंथांतून ग्राह्य अंश स्वीकारूं लागले. शास्त्राभ्यासास त्यांनीं उत्तेजन दिलें. पुष्कळ विद्वान् ज्योतिषी, गणिती, तत्त्ववेत्ते व इतिहासकार त्यांच्या कारकीर्दींत निपजले. दरएक मशिदीला विद्यालय जोडलेलें असे,

आणि विद्यालय नाहीं असें एकही शहर नव्हतें. आरबी भाषा फार प्रौढ झाली. ह्याच भाषेचा अभ्यास शाळेंत चाले. ग्रीक वगैरे ग्रंथांचीं भाषांतरें फारशी भाषेत न होतां आरबींत होऊं लागलीं. हारूनची सत्ता पश्चिमेस भूमध्यसमुद्रापासून पूर्वेस सिंधुनदीपर्यंत, व उत्तरेस मध्यआशियांतील मैदानांपासून दक्षिणेस हिंदीमहासागरापर्यंत पसरली. रोमच्या निसिफोरस बादशहाचा त्यानें पराजय करून त्यास खंडणी देण्यास लाविलें. ख्रिस्ती राष्ट्रांत 'शाहणा ऐरन' असें त्याचें नांव प्रसिद्ध होतें.

७. **फातिमईद वंश (स. ९०९ ते ११७१).**—ह्या देशावर स. ६४१ पासून ८६८ पर्यंत आरब खलिफांचा ताबा होता. स. ८६८ ते स. ९०९ पर्यंत तेथील कारभारी स्वतंत्र होण्याची खटपट करीत होते. स. ९०९ त फातिमईद खलीफांनीं तेथें आपलें स्वतंत्र राज्य सुरू केलें. ह्या खलिफांच्या ताब्यांत उत्तरआफ्रिकेचा एकंदर प्रांत होता. त्यांची राजधानी ट्यूनिस नजीक महदीया म्हणून होती. ह्या खलिफांचा जवान नांवाचा एक सरदार होता त्यानें 'काहिरा' नांवाचा एक किल्ला बांधला; त्याचें पुढें कैरो शहर बनलें. स. ११७१त सलादिननें ही फातिमईद खिलाफत मोडिली. हा सलादिन सिरियाच्या राज्यांत एक मोटा सरदार होता. 'धर्मयुद्धांत' ह्याचें नांव युरोपियन इतिहासांत विशेष प्रमुख आहे. ह्यानेंच सन ११८७ त जरुसलेम काबीज केल्यामुळें पुढें तिसरें धर्मयुद्ध झालें. त्यांत इंग्लंडचा राजा पहिला रिचर्ड प्रमुख होता. सलादिन ११९३ त मरण पावला.

मध्यंतरीं म्हणजे ११७१ पासून १५१७ पर्यंत मामलुक सरदारांच्या ताब्यांत इजिप्ट देश होता. कान्स्टांटिनोपलच्या पहिल्या सलीमनें तो देश सन १५१७ त जिंकिला, तेव्हांपासून तेथील कारभार करण्यास एक पाशा पाठविला जात असे, आणि त्याच्या मदतीस मामलुकांचें मंडळ असे. सन १७९८ त नेपोलिअननें हा देश जिंकिला. नंतर सन १८०५ त महंमदअली नांवाच्या तुर्क सेनापतीनें तेथें आपलें राज्य स्थापिलें. महंमदअलीच्या चवथ्या वंशजानें तुर्कस्तानच्या ताब्याखालीं खेदीव ही पदवी धारण केली. १९१५ पासून [illegible]

८. **खिलाफतीचा ऱ्हास.**—अशी भरभराट चालू असतां त्याबरोबर उत्तरोत्तर ऐषआरामही वाढत होता. मुसलमानांची सत्ता जितक्या जोरानें

NATIONAL ARCHIVES OF INDIA

वाढली, तितक्याच वेगानें ती कमीही होत गेली. आरंभीची धर्मनिष्ठा नाहींशी होऊन ते चैनी बनले. उस्मान खलीफा तेलाचा खर्च वांचविण्यासाठीं आपला दिवा स्वतः काळजीत असे. उस्मानचे पश्चात् शंभर वर्षांचे आंतच अल्-महदी नामक खलिफा झाला, त्यास केवळ बर्फ वाहून नेण्याकरितां पांचशें उंट लागूं लागले. दूरदूरच्या प्रांतांचे सुभेदार बंड करीत. दरबारांत-ही नानाप्रकारचे घोंटाळे चालत. आज एखाद्यास दिवाणाचें पद मिळालें, तर उद्यां त्याला फांशीची शिक्षा भोगण्याचा प्रसंग येई. विशेषतः आरब लोकांकडूनच फार जुलूम होऊं लागले. कोणी तरी भोंदू इसम पैगंबर म्हणून पुढें येई. खुरासानांत आरबी पैगंबराविरुद्ध उघड बंड झालें; तेथें सन ८२०त याकूब नांवाच्या इसमानें खलीफांचा अंमल झुगारून देऊन स्वतंत्र राज्य स्थापिलें. सन ८६१ पासून पुढें हळूहळू खलीफांच्या सत्तेचा ऱ्हास होत चालला. निरनिराळ्या प्रांतांतील त्यांचे सुभेदार स्वतंत्र झाले, आणि तेच मोटमोटे राजे होऊन बसले. स्पेनमधील त्यांच्या सत्तेचा अंत सन १०३३त झाला. आल्फांझो ह्यानें पुनरपि ख्रिस्ती राज्याची तेथें स्थापना केली. पूर्वेकडील तुर्क मुसलमानांनीं मध्यआशियांत बुखारा वगैरेकडे एक स्वतंत्र राज्य उभारिलें. आफ्रिकेतील सुभेदार स्वतंत्र होऊन ते इजिप्टमध्यें राज्य करूं लागले. सिरियाप्रांतही स्वतंत्र झाला. युरोपांत मुसलमानी सत्तेचा अवशेष तुर्कस्तानचा बादशहा एवढा मात्र आजमितीस राहिला आहे, आणि त्याच्याच ताब्यांत आशियांतील तुर्कस्तान वगैरे देश आहेत. अशा प्रकारें राज्याची फाटाफूट झाली. स. ९४५च्या सुमारास बगदादची खिलाफत संपुष्टांत आली; त्यानंतर राज्य म्हणून फारसें नव्हतें, फक्त वाडा व दरबारचें अल्पस्वल्प वैभव स. १२५८ पर्यंत चालू होतें. बगदाद येथें नामधारी खलीफा गादीवर असे, आणि ठिकठिकाणच्या प्रांतांत स्वतंत्र झालेले मुसलमान राजे आपआपल्या गादीचीं वस्त्रें ह्या खलीफांकडून आणविण्यांत मोठें भूषण मानीत.

९. जगाच्या संस्कृतींत आरबांचें कार्य.—आशिया व आफ्रिका खंडांतील पुष्कळसे प्रदेश आणि स्पेन वगैरे दूरचे देश आरबांनीं जिंकिले, तथापि त्यांच्या स्वभावांतील मूळचा आकुंचितपणा नाहींसा झाला नाहीं. एवढ्या मोठ्या विस्तृत राज्याची नवीन जबाबदारी संभाळण्याचें धाडस त्यांस कधीं झालें नाहीं. नको नको म्हणत असतां हे विजय त्यांच्या

अंगावर येऊन कोसळले. त्यांच्या पहिल्या कडव्या स्वभावाबरोबरच त्यांचे जातिद्वेष व अंतर्वैमनस्यें कायमच राहिलीं. ते कितीही दूर लढत गेले असले तरी त्यांस वाटे, कीं आपण आरबस्तानच्या वाळवंटांतच झगडत आहों. हे जातिद्वेष त्यांचे त्यांनाच अतिशय भोवले. त्यांची भरभराट एकदम खुंटली. आरंभीं रोमन व जर्मन ह्या दोघां युरोपियन लोकांस त्यांनीं बहुतेक ग्रासून टाकिल्यामुळें त्या युरोपियन लोकांचा समूळ निःपात होऊन, सर्व युरोपखंड आरबांच्या हातांत जाण्याचा योग आला होता; पण आरब व तुर्क ह्यांच्या अंतःकलहांमुळें तो योग टळला; नाहीं तर जगाचा पुढील इतिहास अगदींच बदलून गेला असता. (Amir Ali's History of the Saracens). तुर्क व मोगल लोकांनीं पुढें जे विजय संपादिले, त्यांस आरबांनीं हातभार लाविला नाहीं, किंवा त्यांस आपली उच्च सुधारणा आरबांनीं दिली नाहीं, इतकेंच नव्हे, तर पुढें जरुसलेमविषयीं मुसलमान व क्रिस्ती या दोन धर्माच्या लोकांमध्यें तंटे उपस्थित होऊन प्रचंड युद्धें झालीं, ज्यांस 'धर्मयुद्धें' ही संज्ञा इतिहासकारांनीं दिली आहे, त्यांत सुद्धां आरबांनीं तुर्कांस साह्य केलें नाहीं. आरब व तुर्क हे सर्वथैव भिन्न होते. तुर्कांस ते आप्त समजत नसत.

जगाच्या संस्कृतींत आरबांनीं मोटीच भर घातली आहे. प्राचीन काळच्या प्राच्य सुधारणेंत जेवढें म्हणून चांगलें होतें, तेवढें सर्व ग्रहण करुन, आणि त्यांत स्वतःची पुष्कळ भर घालून, त्यांनीं तो भाग क्रिस्ती युरोपास दिला, (Myers' History). आशियामायनर व स्पेन ह्या दोन देशांत तर मुसलमानांनीं हरएक विषयांत जें प्रावीण्य संपादिलें, तसें पृथ्वीवर त्यापूर्वीं कोणींच संपादिलें नव्हतें. दरबारचा थाट, फौजेची रचना व राज्याची व्यवस्था ह्या बाबतींत आरबांनीं जुन्या इराणी लोकांचें व कान्स्टांटिनोपलच्या ग्रीक सुधारणेचें अनुकरण केलें. एका पुरुषाच्या हातांत अनियंत्रित राजसत्ता असावयाची, असाच आरबांचा प्रघात होता.

पण आरबांनीं स्वतः निर्माण केलेला विषय म्हणजे मुसलमानी कायदा होय. कायदेपंडित रोमन कायद्यास जो मान देतात त्याच्या खालोखाल तो मान ते आरबी कायद्यास देतात. आरब जेथें जेथें गेले, तेथें त्यांनीं

NATIONAL ARCHIVES OF INDIA

व्यापारास नवीन स्वरूप व उत्तेजन दिलें. फिनिशन लोकांनंतर व्यापारात महत्त्व पावलेले लोक आरब होत. 'आरेबियन नाईट्स्' ह्या पुस्तकांत आरबांच्या व्यापारी उद्योगाचें प्रतिबिंब पडलेलें आहे.

वाङ्मयांत आरबांनीं फार चांगलें काम केलें. कादंबरीचें रचनाचातुर्य त्यांनीं इराणी लोकांपासून घेतलें. 'आरेबियन नाईट्स्' मध्यें आरबांच्या राहणीचें व बगदादच्या दरबारचें उत्कृष्ट चित्र वठलेलें असून, त्या पुस्तकानें एकंदर पृथ्वीवरील अमोल व अजरामर ग्रंथांत मोठीच भर घातली आहे. आरबांच्या कवित्वशक्तीचाही चांगला विकास झाला होता.

आरब विद्वानांनीं सृष्टिशास्त्रांत सुद्धां पुष्कळ उद्योग केले. दूरदूरचे प्रदेश जिंकण्याच्या व व्यापार वाढविण्याच्या नादांत त्यांना भूगोलशास्त्राचा अभ्यास करावा लागला. खगोल, भूमिति, अंकगणित, बीजगणित, वैद्यक, वनस्पतिशास्त्र, प्राणिशास्त्र वगैरे अनेक विषयांत पुरातन आर्यांचे व ग्रीक लोकांचे शोध स्वतः शिकून, त्यांनीं आपल्या बुद्धिसामर्थ्यानें त्या त्या विषयांची नवीन रचना केली. तिजवरच अर्वाचीन युरोपियन सुधारणेचा पाया रचलेला आहे. वैद्यक विषयास शास्त्राचें स्वरूप आरबांनीं आणिलें. गणितांतील दशांशपद्धति मूळ आरबांनीं शोधून काढिली, त्यामुळें पुढील शास्त्रज्ञांनें काम फार सुकर झालें.

अशा प्रकारचे उद्योग करून मोठमोठ्या पाठशाळा व पुस्तकालयें आरबांनीं निर्माण केलीं. युरोपांतील क्रिस्ती राष्ट्रें निद्रावस्थेंत घोरत पडलीं असतां, बगदाद, कैरो व कोर्डोव्हा येथील विद्यालयें सर्व जातींच्या व सर्व धर्मांच्या लोकांस ज्ञानामृत पाजून ज्ञानवृद्धि करीत होतीं. कैरो येथील आरबांचें पुरातन विश्वविद्यालय अद्यापि हयात आहे.

इमारती बांधण्यांत तर मुसलमानांनीं आपलें नांव सर्वत्र चिरंतन करून ठेविलें आहे. आरबांनीं नवीन बांधणी प्रचारांत आणिली. कोर्डोव्हा व ग्रनाडा येथील आरबी इमारतींच्या बांधणीची नक्कल अद्यापि यूरोपचे मोठमोठे चतुर शिल्पशास्त्रज्ञ (एंजिनियर्स) करीत असतात.

शास्त्रीय ज्ञानाच्या वृद्धीनें आरबांनीं ह्या पांचशें वर्षांत अनेक मोठमोठे शोध लाविले. त्यांनीं होकायंत्राचा उपयोग प्रचारांत आणिला, आणि पृथ्वीवरील

३-७९१-२०००

बहुतेक भागांत समुद्रप्रवास करून दूरदूरच्या ठिकठिकाणीं आपल्या वसाहती व व्यापार वाढविला. जमिनीवरूनही व्यापाराचे मोठमोठे नवीन हमरस्ते त्यांनीं प्रचारांत आणिले. इतिहासासही ते विसरले नाहींत. तसेंच ज्योतिष, कविता, व लेखनकला ह्या विषयांस त्यांनीं उत्तम चलन दिलें.

हिंदुस्थानचे पुष्कळ लोक बगदाद येथें येऊन राहत असत. चरक व सुश्रुत ह्या दोन आर्यवैद्यक ग्रंथांचे तर्जुमे आरबी भाषेंत दोघां ब्राह्मणांनीं केलेले आहेत. आरबांनीं महत्प्रयास करून मिळविलेलें ज्ञानभांडार पुढें तुर्कांनीं धुळीस मिळविलें. तुर्कांनीं पुस्तकसंग्रह जाळिले, शास्त्रीय हत्यारें मोडून टाकिलीं आणि विद्वानांचा शिरच्छेद केला, त्यामुळें आरब सुधारणा लयास गेली.

मुसलमानांचीं व क्रिस्त्यांचीं दोनशें वर्षें जीं धर्मयुद्धें चाललीं, त्यामुळें अवशिष्ट आरब सुधारणेचा समूळ नाश झाला. धर्मसंरक्षणाकडे लक्ष लागल्यामुळें ज्ञानार्जनाचें काम बंद पडलें. तीं धर्मयुद्धें झालीं नसतीं तर प्राच्य सुधारणेचा पगडा युरोपियन सुधारणेवर बसला असता. ह्या युद्धांचें वर्णन ब्रिटिश रियासतींत आलें आहे.

दमास्कस व बगदाद ह्यांजप्रमाणें कैरो, कोर्डोव्हा व ग्रनाडा येथें कैक वर्षें आरबांच्या राजधान्या होत्या; तीं शहरेंही विद्या, कला व वैभव ह्यांसंबंधानें बगदादप्रमाणेंच नामांकित झालीं होतीं. कैरो व कोर्डोव्हा येथील नामांकित विद्यापीठांनीं मानवी प्रगतीस चांगलेंच उत्तेजन दिलें आहे. ग्रनाडा येथें तर मोठमोठ्या स्त्रियांनींही विद्येच्या कामांत लौकिक मिळविलेला आहे. स्पेनच्या बाजूनें युरोपास वरिष्ठ सुधारणा पोंचविण्याचें उच्च काम आरबांनीं केलें आहे. सभोंवार निबिड अज्ञानांधकार पसरला असतां, स्पेन देशांत आरबांनीं जी प्रचंड ज्ञानज्योत उजळिली, तीच यूरोपच्या भावी उदयास कारण झाली आहे. कैरोची भरभराटही अशाच प्रकारची होती. ४

४ सर रिचर्ड बर्टन नांवाचे प्रसिद्ध विद्वान् इंग्रज गृहस्थ निरनिराळ्या इस्लामी प्रदेशांत चाळीस पन्नास वर्षेंपर्यंत प्रवास करीत होते. सिंधुनदीपासून अटलांटिक महासागरापावेतों सर्व प्रदेशांत फिरून त्यांनीं मुसलमानांविषयीं हरएक प्रकारची माहिती मिळविली आहे. आरेबियन नाईट्सचें सुरस

NATIONAL ARCHIVES OF INDIA

भाषांतर ह्याच रसिक गृहस्थांनीं इंग्रजींत केलें. ह्या भाषांतराचे मोठाले दहा भाग त्यांनीं छापिले असून, शेवटीं 'Terminal Essay' नांवाचा तीनशें पानांचा एक निबंध लिहून त्यांत त्यांनीं तत्कालीन स्थितीचें विवेचन केलें आहे. त्याशिवाय त्यांनीं निरनिराळ्या मुसलमान देशांचीं प्रवास वर्णनेंही लिहिलीं आहेत. आरबांचा स्वभाव, मुसलमानी धर्माची योग्यता, बगदादच्या खलीफांचें वैभव, आणि तत्कालीन लोकांचे आचार-प्रचार इत्यादि अनेक विषयांवर बर्टन यांनीं उपयुक्त माहिती दिली आहे. मुसलमानांचें स्वभावरहस्य व पश्चिमआशियांतील राष्ट्रांची मुसलमानी अमदानींतील स्थिति समजून घेण्यास बर्टनचे लेख उपयोगी पडतील. ४

प्रकरण चवथें.

इस्लामांत नवीन भर.

इ. स. १००० नंतर.

१. मध्यआशिया-मानव जातीचें वारूळ. २. तुर्क लोक—सेल्जुक व ऑटोमन. ३. मोगल लोक—उत्पत्ति, स्वभाव वगैरे. ४. चंगीझखान व त्याचा वंश. ५. इस्लामाचे दोष व धार्मिक रहस्य.

१. मध्यआशिया—मानव जातीचें वारूळ.—मुसलमानी धर्माचा उदय झाल्यावर त्यांचीं अनेक राज्यें स्थापन झालीं. त्यांपैकीं मुख्य जी आरबांची खिलाफत तिचें व तिच्या शाखांचें वर्णन मागील प्रकरणांत आलें. नवव्या शतकापासून तुर्क, मोगल वगैरे मध्यआशियांतले दुसरे पुष्कळ लोक मुसलमानी गोटांत सामील झाले. त्यांचाही इतिहास मनोरंजक असून हिंदुस्थानच्या इतिहासाशीं त्याचा विशेष संबंध आहे. मुसलमानांत अनेक कुळांचें मिश्रण आहे; आणि प्रत्येकीचे स्वभावभेद पुढें त्यांच्या कर्तृत्वांत उतरलेले दिसतात. सर्व मुसलमानांत आरब श्रेष्ठ होत. तुर्क, मोगल, तार्तार वगैरे मध्यआशियांतले धनगरी पेशाचे लोक आरंभीं मुसलमान नव्हते. त्यांनीं पुढें मुसलमानी धर्म स्वीकारिला, आणि अनेक पराक्रम गाजविले. तथापि त्यांच्याकडून जगाच्या संस्कृतींत फारशी भर पडली नाहीं. त्यांचा स्वभाव

विध्वंसक होता. हे त्यांचे स्वभावभेद कळणें अत्यंत जरूर आहे. कारण पुढें हिंदुस्थानच्या इतिहासाशीं ह्या तुर्क-मोगलांचा विशेष संबंध आहे. सबब त्यांच्या मूळ कुळींची थोडीशी हकीगत दिली पाहिजे. मध्यआशियाखंड म्हणजे सर्व बाजूंनीं प्रचंड पर्वतांनीं वर उचलून धरिल्यासारखा मेजाच्या आकृतीचा एक विस्तृत प्रदेश आहे. मानवी उत्पत्तीचें मूळ ठिकाण येथेंच असावें असें म्हणतात. पृथ्वीवरील आजपर्यंतच्या प्रचंड घडामोडी ह्या प्रदेशांतील लोकांनींच केलेल्या आहेत. ह्या प्रदेशास मुंग्यांच्या वारुळाची उपमा शोभेल. वारुळाच्या अनेक बिळांतून बाहेर पडून मुंग्या जशा लांब पल्ल्यावर जातात, आणि तिकडेच आणखी नवीन वारुळें बांधितात, तशाच प्रकारची थोड्या बहुत फरकानें वरील प्रदेशांतील लोकांची स्थिति आहे. ह्या प्रदेशांतील लोकवस्तीची खरी माहिती आजच्या सुधारलेल्या काळांत जर बरोबर मिळत नाहीं, तर गेल्या हजार दोन हजार वर्षांचा कितीसा तपास लागणार! आर्य, सिथियन, हूण, यवन, शक, तुर्क, तार्तार, मोगल वगैरे अनेक जातींचे लोक येथून बाहेर पसरले; आणि त्यांनीं दक्षिणेस व पश्चिमेस अनेक भराऱ्या मारिल्या. इंग्रज सरकारानें हिंदुस्थानच्या वायव्य-सरहद्दीचा हल्लीं बंदोबस्त केला असल्यामुळें, आपणांस ह्या परकीय हल्ल्यांची आज भीति वाटत नाहीं. पण पूर्वींचा प्रकार भिन्न होता. आरंभीं ह्या वारुळांतून बाहेर पडलेले लोक मूळचे कोण हें समजण्यास हल्लीं मार्ग नाहीं. पण पुढें त्यांचे पराक्रम इतिहासकार वर्णूं लागले, तेव्हां त्यांस त्यांनीं निरनिराळीं नांवें दिलीं.

आशियाखंडांत फार प्राचीन काळापासून तीन चार जातींचे लोक राहत असत. ह्या जातींचीं नांवें कशीं पडलीं, व त्यांत भेद काय, ह्यांविषयीं खात्रीलायक माहिती सांगणें कठीण आहे. निरनिराळ्या ग्रंथकारांत ह्यासंबंधानें मतभेदही फार आहे. तुर्क, तार्तार, मोगल, मांचू ह्या सर्वांस सिथियन अशीही संज्ञा दिलेली आढळते. मांचू व मोगल हे बहुतेक एकच. बुखाऱ्याचे आसपास व पश्चिमेस जे राहत, ते बहुधा तुर्क होत. उत्तरभागीं सैबीरिया वगैरे प्रांतांत तार्तार राहत. पूर्वभागीं मोगल असत. ह्या सर्व लोकांची वहिवाट एक ठिकाणीं स्थायिक राहण्याची नव्हती. आपले गुरांचे कळप व तंबू बरोबर घेऊन ते मनास वाटेल तिकडे भटकत जात. मोगल हे विशेष शूर व धीट असत. मुसलमानी धर्म स्वीकारण्यापूर्वी ते बुद्धधर्मी असून तिबेट-

NATIONAL ARCHIVES OF INDIA

च्या लामाचे अनुयायी होते. तार्तार लोकांनाच पुढें तुर्क अशी संज्ञा मिळाली असें मिल्ल् म्हणतो. इराणच्या प्राचीन राजांस या भटक्या जातींच्या टोळधाडी नेहमी जर्जर करीत असत.

आरब, मोगल व तुर्क हे सर्व जरी आज मुसलमान खरे; तरी त्यांच्यांत विशेष साम्य नाहीं. मूळ अस्सल मुसलमान आरब होत. ह्यांस 'सॅरॉसिन' असेंही नांव आहे. त्यांची नीति व संस्कृति उच्च प्रतीची असून, त्यांजपासून जगाच्या संस्कृतींत कांहीं तरी भर पडली आहे. तसा प्रकार तुर्क व मोगल ह्यांचा नाहीं. ह्या दोघांचेंही मूळ ठिकाण मध्यआशिया होय. मनुष्य जातीच्या वर्गीकरणांत* ह्यांस तुराणी (तुरेनियन) असें नांव आहे. इराणांतले ते इराणी व तुराणांतले ते तुराणी. तुराण ह्मणजे इराणच्या उत्तरेकडील व सैबीरियाच्या दक्षिणेकडील प्रदेश,—ज्यास हल्लीं तुर्कस्थान म्हणतात तो. ह्या प्रदेशापैकीं पश्चिमेच्या बाजूचे ते तुर्क व पूर्वेच्या बाजूचे ते मोगल. पूर्वेची बाजू म्हणजे चीनच्या उत्तरेकडील मोंगोलिया प्रांत. मोगलांच्या वस्तीचें ठिकाण तें मोंगोलिया. स्वभावानें व संस्कृतीनें मोगल व तुर्क जवळ जवळ सारखेच. दोघेही मूळचे रानटी व धनगरी पेशाचे. जाळपोळ, लढाई वगैरे करीत देशोदेशीं भटकण्याचा दोघांचाही परिपाठ. मोगलांच्या शरीररचनेंत थोडें चिनी मिश्रण होतें. हें वास्तविक तुर्क व मोगल ह्यांचें त्या वेळचें स्वरूप होय; हल्लींचें नव्हे. अलीकडच्या धडामोडीनें त्यांचें मूळचें स्वरूप अगदीं बदलून गेलें आहे. राज्यव्यवस्था, इमारतींचें बांधकाम, रस्ते, कालवे इत्यादि सार्वजनिक कामें हिंदुस्थानांत व इतरत्र ह्या तुराणी मुसलमानांनीं केलीं, तीं त्यांनीं स्वयंस्फूर्तीनें केलेलीं नव्हत.

* पृथ्वीवरील एकंदर मानव जातीच्या मूळ कुळी व त्यांचे भेद ठोकळ मानानें समजणें प्रत्येकास जरूर असल्यामुळें, पुढील पानावर एक कोष्टक दिलें आहे. शरीर रचनेवरून एकंदर मानव जातीच्या तीन मूळ कुळी समजतात; त्यांचे पोटभेद भाषेवरून ठरविण्यांत आले आहेत. पुढील कोष्टकांत उजवीकडचे सर्व पोटभाग भाषांवरून ठरविण्यांत आले आहेत. हीब्रू, ख्रिस्ती, व मुसलमान हे तीनही एकेश्वरी धर्म सेमेटिक राष्ट्रांत उत्पन्न झाले हें ध्यानांत ठेवण्याजोगें आहे. मुसल्मान किती मिश्र आहेत हें ह्या कोष्टकावरून ध्यानांत येईल. हें कोष्टक प्रो. सायसच्या पुस्तकांतून घेतलें आहे.

त्यांचा मूळचा स्वभाव क्रूर, विध्वंसक, परहिताविषयीं निष्ठुर व मानवी संस्कृतीला विरोधी असा होता. चंगीजखान, तयमूरलंग, नादीरशहा, इत्यादिकांच्या ठिकाणीं हा स्वभाव स्पष्ट दिसून येतो. बाकी मोगलांच्या व तुर्क सुलतानांच्या अमदानींत हिंदुस्थानांत जीं कांहीं लोकहिताचीं कामें झालीं, तीं त्या त्या ठिकाणच्या संसर्गानें व परिस्थितीच्या प्रभावामुळें झालीं.[1]

२. तुर्क लोक—सेल्जुक व ऑटोमन.—त्या वेळच्या मुसल मानांविषयीं बोलतांना आपला बराच गैरसमज होतो. आरंभींचे खरे मुसलमान म्हणजे आरब. आरंभीं मुसलमानी धर्म व राज्य पृथ्वीवर चहूंकडे वाढविलें तें आरबांनीं वाढविलें. पण पहिल्या सिंध-

---

१ कृष्णवर्ण—(इथिओपियन अ० नीग्रो) ह्यांचें मूलस्थान आफ्रिकेचा मध्य व दक्षिण भाग.

२ पीतवर्ण—(मोंगोलियन अ० तुराणी)—(१) चिनी, जपानी, व पूर्वआशियांतले दुसरे कित्येक लोक; (२) मध्य व उत्तर-आशियांतले धनगरी पेशाचे कित्येक लोक (उ० मोगल, तुराणी वगैरे); (३) युरोपांत,—तुर्क, हंगेरियन मॅग्यार्स, फिन्स्, लॅप्स्, व बास्क्स् वगैरे.

३ गौरवर्ण (कॉकेशन)—
- हॅमिटस्.—१ इजिप्शन्स्. २ लिबियन्स्—उत्तर आफ्रिकेंतले हल्लींचे बर्बर्स.
- सेमिटस्.—१ बॅबिलोनियन्स्, २ आसीरियन्स्, ३ फिनिशियन्स्, ४ हीब्र्यूस्, ५ अरामियन्स्, ६ आरेबियन्स्.
- आर्य अगर इंडो-युरोपियन.—
  - आशियांतले.—१ हिंदू, २ मीडीज, ३ पर्शियन्स्.
  - युरोपांतले जुने.—१ ग्रीक. २ रोमन.
  - सेल्ट्स्.—१ गॉल्स्, २ ब्रिटन्स्, ३ स्कॉट्स्, ४ पिक्ट्स्.
  - टयूटन्स्.—१ जर्मन्स्, २ इंग्लिश, ३ स्कांडिनेव्हियन्स्.
  - स्लाव्हज्.—१ रशियन्स्, २ पोल्स्, इ.

प्रांताच्या स्वारीशिवाय आरब लोक हिंदुस्थानांत आलेच नाहींत. इकडे आले ते मुख्यत्वें तुर्क होत. सिथियन्स, यवन, हूण, तुर्क, मोगल वगैरे लोकांनीं मध्यआशियांतील डोंगरसपाटीचा प्रदेश गजबजलेला असल्यामुळें लोकसंख्या फाजील वाढली, कीं त्यांच्या झुंडी पूर्वीपासून इकडे हिंदुस्थानांत व तिकडे युरोपांत पसरत. हिंदुस्थानच्या धर्मांत, भाषांत व आचारविचारांत ह्या लोकांच्या चालीरीतींचें मिश्रण दिसून येतें. सिथियन, यवन, व हूण हे ज्या वायव्यमार्गानें हिंदुस्थानांत आले, त्याच मार्गानें तुर्क लोकांच्या झुंडी हिंदुस्थानावर आल्या, आणि शेवटीं त्यांनींच हा देश पादाक्रांत केला. बगदाद येथें आब्बासी वंशाचे खलीफा राज्य करीत असतां, त्यांच्या मूळच्या आरबी पेशांत इराणी व तुर्की रक्ताचा मिलाफ झाला. इराणी लोकांचें महत्त्व हळूहळू वाढत गेलें आणि त्यांनींच ऑक्ससनदीच्या आसमंतात् सामानी वंशाचें राज्य स्थापिलें.

इराणी व आरब लोकांचे नेहमीं तंटे होत असल्यामुळें, बगदाद येथील खलीफांनीं स्वसंरक्षणार्थ आपल्याजवळ तरुण तुर्कांचा पहारा नेमिला. ह्याप्रमाणें एकदां राज्यांत त्यांचा प्रवेश झाल्यावर, त्यांचें माहात्म्य वाढतां वाढतां, शेवटीं खलीफा मुद्धां त्यांच्या मुठींत आले; आणि लवकरच इजिप्तपासून समर्कंदपर्यंतच्या एकंदर टापूंतील राज्यकारभारांत व लष्करांत तुर्कांचाच विशेष भरणा झाला. पुढें मध्यआशियांतून तुर्कांचे आणखी आणखी लोक येऊन मुसलमान रियासतींत अमल गाजवूं लागले. समर्कंदच्या सामानी वंशाचा त्यांनीं पाडाव केला, आणि पुढें ते हिंदुस्थानांत शिरले. अलप्तगीन, सबक्तगीन, व महंमूद हे सर्व तुर्क होत.

अशा प्रकारें तुर्कांचें महत्त्व वाढलें. सामानी वंशांतील राजांनीं तुर्कांस आपल्या सत्तेखालीं आणून मुसलमान करून नोकरींत ठेविल्यावर, मुसलमानी धर्माचे ते कट्टे अभिमानी बनले. फौजेंत व खास रक्षणासाठीं सामानी सुलतान व बगदादचे खलीफा नोकरींत तुर्कांचा भरणा विशेष करीत. ह्यांनाच पुढें इजिप्तमध्यें मामलुक्स म्हणूं लागले. राज्याचीं कामें करूं लागतांच त्यांस आत्मप्रत्यय उत्पन्न झाला. लवकरच त्यांस आपलें महत्त्व कळून आलें. सामानी सुलतानांनीं खलीफांच्या पूर्वेकडील सत्तेचा नाश केला, त्याचप्रमाणें महत्त्वास चढलेल्या लष्करी बाण्याच्या ह्या तुर्क लोकांनीं

खलीफांचे पश्चिमेकडील प्रांत काबीज करून आपलें स्वतंत्र राज्य स्थापलें. आशियाखंडांत दोन तुर्कस्तान देश कां आहेत हें ह्या हकीकतीवरून समजणारें आहे. मध्यआशिया खंडांत मूळ तुर्कांची वस्ती होती, त्या देशास तुर्कस्तान हें नांव चालत आलें. पुढें खलीफांचें राज्य ह्यांनीं जिंकिलें, त्यासही तुर्कस्तान हें नांव मिळून, आज त्यास आशियाटिक टर्की म्हणतात. जरुसलेमच्या ' धर्मयुद्धांत ' ह्या तुर्क लोकांनींच आपलें नांव विशेष गाजविलें आहे. नामशेष झालेल्या खिलाफतीचा अंत सन १२५८त चंगीजखानाच्या वंशांतील मोगल लोकांकडून झाला.

तुर्कांच्या आरंभींच्या ह्या पराक्रमांशीं हिंदुस्थानचा संबंध नाहीं. पुढें जे मुसलमान योद्धे हिंदुस्थानांत आले, त्यांची मूळ हकीकत समजण्यास वरील हकीकत पुरे आहे. वर सांगितलेल्या जातींशिवाय अफगाण, बलुची, घोरी वगैरे अनेक जाती त्या त्या देशांच्या नांवावरून पुढें प्रसिद्धीस आल्या, त्यांची गणना तुर्कांतच करितात.

सेल्जुक तुर्क, (स. १०३७–१३००).—सेल्जुक तुर्कांचा प्रभाव मुसलमानांच्या इतिहासांत फार महत्त्वाचा आहे. त्यांचें प्रस्थ वाढलें, तेव्हां बगदादच्या खिलाफतीचा अस्तच झाला होता. शिया व सुन्नी यांचे तंटे विकोपास जाऊन सर्व मुसलमानांत दंगल उडून राहिली होती. अशा स्थितींत ताज्या दमाच्या रानटी तुर्क लोकांची भर इस्लामांत पडली. त्यांनीं मुसलमानी धर्म स्वीकारिला आणि दक्षिणेस व पश्चिमेस हल्ले सुरू केले. इराण, सिरिया, आशियामायनर इत्यादि ठिकाणीं जे निरनिराळे राजवंश अंमल करीत होते, त्यांचा त्यांनीं उच्छेद करून, अफगाणिस्तानपासून भूमध्यसमुद्रापर्यंतचे विसकळीत प्रदेश पुनरपि एका अंमलाखालीं आणिले. कान्स्टांटिनोपलचे रोमन बादशहा पुनरपि आपले प्रांत परत घेऊं लागले होते, त्यांजला ह्या सेल्जुक तुर्कांनीं परत हटवून जरुसलेमसाठीं झगडणाऱ्या क्रिस्त्यांची खोड मोडली. क्रिस्तीमुसलमानांच्या प्रचंड धर्मयुद्धांत मुसलमानांचें नांव गाजविणारे हे सेल्जुक तुर्क होत.

तुर्कस्तानांत 'सेल्जुक' नांवाचा एक खान होता, त्याचेंच नांव पुढें त्याच्या अनुयायांस मिळालें. सेल्जुकनेंच प्रथम बुखाऱ्यास जाऊन मुसलमानी धर्म स्वीकारिला. सामानी मुसलमानांच्या वतीनें गज्नवी महंमुदाशीं झगडणारे सेल्जुक तुर्कच होत. तुघ्रलबेग हा सेल्जुक तुर्क. त्यानें व त्याचा

भाऊ चागरबेग ह्यांनीं गज्नीच्या ताब्यांतील तुर्कस्तानचा प्रदेश जिंकून तेथें आपलें स्वतंत्र राज्य स्थापिलें. सन १०५५त तुघ्रलबेगनें बगदाद शहरांत प्रवेश करून तेथें आपण सुलतान झाला. पुढें दुसऱ्या अनेक तुर्क टोळ्या त्यास सामील झाल्या, आणि स. १०७७त विस्तृत सेल्जुक राज्याची स्थापना झाली. तुघ्रलबेग (स. १०३७–१०६३), नंतर आल्प्‌आर्स्लान (स.१०६३–१०७२), व मलीकशहा (स.१०७२–१०९२), हे तीन पराक्रमी सुलतान सेल्जुकांचे झाले. पुढें त्यांचें राज्य फुटून, त्याचे अनेक विभाग झाले. सुलतान संजर हा शेवटचा मोठा सेल्जुक सुलतान होय, (स. ११२७–११५७). सेल्जुक सुलतानांच्या पदरीं कित्येक सरदार प्रसिद्धीस आले, त्यांस 'आटाबेग' असें नांव होतें. 'आटाबेग' ह्याचा अर्थ 'अल्पवयस्क राजाचे संरक्षक' असा आहे. सेल्जुक सुलतानांच्या पदरीं मामलुक नांवाचे तुर्क गुलाम होते, हें वर सांगितलेंच आहे. हेच मामलुक पुढें बलवान झाले, आणि त्यांच्याशिवाय सुलतानांचें कांहींच चालेनासें झालें. हळू हळू तेच सुलतान बनले. ह्या सुलतानांस 'आटाबेग' ह्या नांवानें ओळखितात. बाराव्या शतकांत सर्व सेल्जुक बादशाहीचा प्रांत अशा अनेक आटाबेग सुलतानांच्या ताब्यांत होता.

सिरिया देश सेल्जुक तुर्कांच्या हातांत जाण्याबरोबर तेथील क्रिस्ती लोकांचा छळ होऊं लागला. आरब खलीफा क्रिस्ती लोकांस त्रास देत नसत. पण ह्या तुर्कांचें पाणी कांहीं निराळेंच होतें. मोगलांसारखेच ते क्रूर व जाळपोळ करणारे होते. त्यांनीं जरुसलेम काबीज करून तेथील क्रिस्ती मंदिरें जमीनदोस्त केलीं, तेव्हां युरोपच्या क्रिस्ती लोकांनीं एक होऊन मुसलमानांशीं धर्मयुद्धें सुरू केलीं, (ब्रिटिश रियासत प्र० २, क०२). ह्या युद्धांत तुर्कांस आरबांची मदत मिळाली नाहीं. आरबांत व तुर्कांत वैरभाव होता. नीतीनें व आचारानें ते जसे अगदीं भिन्न होते, तसेच ते धर्माच्या बाबतींतही होते. त्या दोघांची एकी झाली नाहीं, म्हणूनच दोनशें वर्षेंपर्यंत क्रिस्ती लोक ह्या सेल्जुक तुर्कांशीं मोठमोठीं युद्धें लढूं शकले. आरब व तुर्क एक झाले असते, तर त्यांनीं पहिल्याच प्रथम क्रिस्त्यांचा संपूर्ण नाश करून एकंदर युरोपखंड खाऊन टाकिलें असतें. सेल्जुक तुर्कांनीं जें राज्य स्थापिलें, त्याच्यांत लवकरच पुष्कळ अव्यवस्था सुरू झाली, व त्याचे अनेक तुकडे झाले. ही अव्यवस्था चालू असतांच

क्रिस्त्यांशीं त्यांचीं युद्धें चालू होतीं. ह्या दोन गोष्टींचा फायदा युरोपच्या क्रिस्त्यांस मिळून मुसलमानांपासून युरोपचा बचाव झाला. बाराव्या शतकांत सेल्जुक तुर्कांस बास्फोरस ओलांडून कॉन्स्टांटिनोपल हस्तगत करितां आलें नाहीं, हें क्रिस्ती युरोपाचें सुदैव होय, (Myers).

ऑटोमन तुर्क.—युरोपांत ज्या तुर्कांचें आज राज्य आहे, त्यांस ऑटोमन तुर्क (Ottoman Turks) असें म्हणतात. हे मूळ खुरासान प्रांतांतले राहणारे. मोगलांनीं खुरासान प्रांत काबीज केला, तेव्हां हे तुर्क तेथून निघून आशियामायनरांत सेल्जुक तुर्कांच्या पदरीं येऊन राहिले. तेराव्या शतकांत आर्तोग्रल नांवाचा त्यांचा एक सरदार, एक हजार अनुयायांनिशीं भटकत भटकत अंगोरा शहरानजीक आला. त्या वेळीं तेथील सेल्जुक सुलतान एका शत्रूशीं लढत होता, त्यास आर्तोग्रलनें मदत करून जय मिळवून दिला. हे आर्तोग्रलचे उपकार स्मरून सेल्जुक सुलतानानें त्यास आपल्या शहरांत राहण्यास जागा दिली. आर्तोग्रलचा मुलगा उस्मान हा पुढें फार पराक्रमी निघाला. त्यानें आशियामायनरांतील सेल्जुक सुलतानांचें राज्य काबीज केलें. ह्या उस्मानच्या नांवावरून त्याच्या अनुयायांस ‘ उस्मानी तुर्क ’ असें म्हणूं लागले. पुढें ‘ उस्मान ’ शब्दाचा (उस्मान—ओस्मान—ओथमान—ओथोमान—ऑटोमन, अशा परंपरेनें,) युरोपियन भाषांत अपभ्रंश झाला. उस्मान स. १२५८ त जन्मला; आणि त्यानें स० १२८८ पासून १३२६ पर्यंत राज्य केलें. उस्मानचा मुलगा ओर्खान ह्यानें त्यांत आणखी भर घातली. हे सुलतान नवीन प्रदेश जिंकीत, तेव्हां तेथील क्रिस्ती लोकांस गुलाम करून आपल्या नोकरीस लावीत. त्यांपैकीं तरुण व देखणे मुलगे निवडून त्यांची त्यांनीं एक नवीन पलटण बनविली, तीस त्यांनीं जॅनिझरी (Janizaries) (जान—निसारी=जीव संरक्षक,) असें नांव दिलें. पुढें लढाया बंद झाल्या, तरी जॅनिझरी पलटण कायम राहवी म्हणून दरसाल सर्व क्रिस्ती प्रांतांनीं मिळून दोन हजार तरुण क्रिस्ती मुलें सुलतानांचे नोकरीस द्यावीं, असा क्रिस्त्यांकडून ठराव करून घेतला. मुलें आठ वर्षांचीं असतांना निवडून घेत, आणि त्यांस उत्तम लष्करी शिक्षण देऊन तयार करीत. ही जॅनिझरी पलटण सुलतानाच्या खास शरीराचें व राज्याचें संरक्षण करण्यासाठीं

सदैव त्याच्या संनिध राहत असे. हा प्रघात तीनशें वर्षे चालला, आणि त्यामुळेंच आटोमन तुर्कांचें राज्य पुष्कळ दिवस टिकलें.

स. १३५८ त आटोमन तुर्कांनीं सुलतान मुरादचे हाताखालीं हेलेस्पांटची सामुद्रधुनी ओलांडून युरोपांत प्रवेश केला, तेव्हांपासून पुढील चाळीस वर्षांत सबंध बाल्कन-द्वीपकल्प त्यांचे ताब्यांत गेला. मुरादनें स. १३६० पासून स. १३८९ पर्यंत राज्य केलें. मुरादच्या नंतर बायजीद सुलतान झाला. त्यानें आणखी अनेक प्रांत काबीज करून बल्गेरिया प्रांतांत निकोपोलिस येथें क्रिस्त्यांच्या अति मोठ्या जमावाचा पराभव करून हजारों लोकांस कापून काढिलें, (स. १३९६). त्याबरोबर युरोपांतील सर्व क्रिस्ती राष्ट्रांची पांचांवर धारण बसली. रोम जिंकून तेथें आपली राजधानी करावी असा बायजीदचा विचार होता. पण त्या अगोदर कॉन्स्टांटिनोपल जिंकण्याचा उद्योग त्यानें हातीं घेतला. इतक्यांत पूर्वेकडून तयमूरलंगानें त्याच्या राज्यावर स्वारी केली, आणि अंगोरा येथें बायजीदचा पराभव केला. तेणेंकरून यूरोपखंड जिंकण्याचें तुर्कांचें काम कांहीं दिवस बंद पडून कॉन्स्टांटिनोपलचा थोडा वेळ बचाव झाला. पुढें सुलतान पहिला महंमद व दुसरा मुराद ह्यांनीं पुनरपि विजय संपादून युरोपांत आपली सत्ता बसविली. दुसरा महंमद (स. १४५१-८०,) ह्यानें कॉन्स्टांटिनोपल शहरास वेढा घालून तें काबीज केलें, त्या योगें, सेंटसोफाया मंदिरावर क्रिस्त्यांचा क्रूस एक हजार वर्षें फडकत होता, तेथें मुसलमानांचा चांद फडकूं लागला, तो अजून तसाच फडकत आहे. पुरातन रोमन बादशाहीच्या प्रचंड वैभवाचें हें प्रसिद्ध शहर मुसलमानांच्या हातांत पडल्यानें (स. १४५३) जगाचा भावी इतिहास बदलून गेला. (ब्रिटिश रियासत, पृ० ६१ पहा.) स. १४७५त क्रिमियाचा द्वीपकल्प तुर्कांचे हस्तगत झाला; आणि पुढें हळू हळू त्यांचा प्रवेश इटलींत सुद्धां झाला. सुलतान पहिला सलीम ह्यानें आठच वर्षे राज्य केलें, पण त्या आठ वर्षांत इराण, आरबस्तान, इजिप्ट वगैरे देश ऑटोमन तुर्कांच्या हस्तगत होऊन, पैगंबराच्या अस्थि व खिलाफतीचें पद सलीमास प्राप्त झालें, तें अद्यापि त्याच्या वंशांत चालू आहे. पुढें सुलतान सुलेमाननें आणखी विजय संपादिले, त्यांवरून त्यास 'धि ग्रेट' असें नांव मिळालें आहे, (सन १५२०-१५६५). स. १५२२त ऱ्होड्स् बेट व स. १५२६त

NATIONAL ARCHIVES OF INDIA

हंगेरी देश सुलेमानच्या हस्तगत झाले. हंगेरी देश पुढें दीडशें वर्षे तुर्कांच्या ताब्यांत होता. सुलेमानच्या वेळेस युरोपांत अनेक पराक्रमी राजे राज्य करीत होते, पण त्याजपुढें कोणाचाही निभाव लागला नाहीं. भूमध्य-समुद्रावरही त्यानें आपला ताबा बसविला. उत्तरेस हंगेरींत बुदापेस्त, दक्षिणेस नीलनदीवर आस्वान (Assuan), पश्चिमेस जिब्रॉल्टर, आणि पूर्वेस यूफ्रेटिसनदी एवढा टापू सुलेमानच्या ताब्यांत होता. त्या वेळीं सर्व यूरोपखंड पुनरपि इस्लाममय होण्याचा समय आला होता.

पण सुलेमानच्या पश्चात् तुर्कांच्या सत्तेस ओहोट लागली. सतराव्या शतकांत युरोपांतील बरेच प्रदेश त्यांच्या ताब्यांतून गेले. एकोणिसाव्या शतकांत ग्रीस, इजिप्ट, आल्जियर्स, ट्यूनिस हे प्रांत स्वतंत्र झाले. उत्तरेकडून रशियानें तुर्कांस खूब चेपलें, पण इतर राष्ट्रांनीं मध्यें पडून रशियाचा हात थांबविला. येणेंप्रमाणें गेल्या साडेचारशें वर्षांत तुर्कांचा उत्तरोत्तर ऱ्हास होऊन, आतां हें राज्य साफ बुडणार असा प्रसंग येऊन ठेपणार, इतक्यांत नुकतीच (स. १९०८ त) राज्यक्रांति होऊन, नवीन प्रजासत्ताक राज्यव्यवस्था सुरू झाली आहे. हा नवीन प्रयोग सर्व लोक मोठ्या उत्सुकतेनें पाहत आहेत. मक्केच्या आगगाडीनें मुसलमानांच्या एकीकरणास पुष्कळ मदत होणारी आहे.

२. मोगल लोक,–उत्पत्ति स्वभाव वगैरे.—हिंदुस्थानांत मोगल बादशाही पुढें स्थापन झाली, ती स्थापन करणारे कोण व त्यांच्या मूळ रीतिभाती काय हें समजणें जरूर आहे. हिंदुस्थानांत मोगल लोक नवीनच आले. मोगल बादशाही होण्यापूर्वी कित्येक शतकेंपर्यंत हिंदुस्थानांत मोगल लोक स्वाऱ्या करीत होते. पण राज्य असें तुर्क अफगाणांचें होतें. मोगलांमध्यें व या इतर जातींमध्यें पुष्कळ भेद होता. ह्या मोगल लोकांच्या संसर्गापासून हिंदुस्थान, पश्चिमआशियाखंड व यूरोपचा कांहीं भाग इत्यांवर नाना प्रकारचे चिरस्थायी परिणाम घडून आले आहेत. पूर्वी चंगेझखान व तयमूर वगैरे पराक्रमी पुरुष होऊन गेले, ते मूळचे मोगलच होत.

मोगल हे प्रथमतः मुसलमान नव्हते. आरंभीं ते मूर्तिपूजक असावेत. कोणी म्हणतात ते तिबेटच्या लामाचे भक्त होते. त्यांच्या धर्मनिष्ठेंत कडवेपणा नव्हता. धर्मसंबंधांत ते संशयी, ढिले व बेपर्वा असत. मुसलमानी धर्म हें पातळ आवरण पुढें त्यांनीं केवळ बाहेरून आपल्या अंगावर

धारण केलें होतें, तें फाडून आंतला खरा प्रकार अनेक प्रसंगीं उघड दिसे. आर्य, बौद्ध, क्रिस्ती वगैरे धर्मांचें मिश्रण त्यांच्या अंतर्यामीं दिसून येतें. म्हणून कट्टे मुसलमान व सौम्य हिंदु यांच्या दरम्यान मोगल एक-प्रकारें नवीन घुसले.

मोगलांच्या इतिहासाचे किंवा जीवनकालाचे तीन भाग आहेत. ते तीन क्रम म्हटले तरी चालतील. प्रथमतः हे तातार किंवा तुराणी वळणाचे होते. नंतर तुर्कांच्या सहवासाचें त्यांच्यांत मिश्रण झालें, आणि सरतेशेवटीं हे इराणी वळणावर गेले. तीनही अवस्थांत त्यांचा बाह्य आकार बदलला, पण अंतर्यामींचा स्वभाव कायम राहिला.

चीनच्या उत्तरेकडील मोंगोलिया प्रांत हें त्यांचें राहण्याचें मूळ *ठिकाण होय. तेथें त्यांचा आकार चिनी* धरतीचा होता. नंतर *चवदाव्या व पंधराव्या शतकांमध्यें ते मध्यआशिया खंडांत* येऊन राहिले, *व आपणास तुर्क म्हणवूं लागले. पुढें दक्षिणभागांतील* स्त्रियांबरोबर त्यांनीं लग्नें केलीं, तेव्हां त्यांच्या संततींत फरक पडला. पूर्वीचा पिंगट रंग, उंच कपोलास्थी, पसरट नाकें, अरुंद व लांबोळे डोळे, मोठीं तोंडें, इत्यादि जुन्या मोगलांचे विशिष्ट अवयव बदलून गेले. चेहऱ्यावर लाली येऊन दिल्लीच्या तुर्क मुसलमानांप्रमाणें तो सुंदर व फुगीर झाला. मुसल-मानांच्या मध्यवस्तींत राहिल्यामुळें ते मुसलमान झाले, किंवा आपण मुस-लमान आहों असें सांगणें त्यांस भाग पडलें.

अमीर खुस्रू नांवाचा एक कवि बल्बनचा मुलगा महंमद ह्याच्या पदरीं होता, त्यानें मोगलांचें वर्णन फार चांगलें केलें आहे. 'लोहमय शरीर, विस्तवासारखे चेहरे, आंखूड मान, सुरकुतलेले गाल, केंसाळ व रुंद नाकपुड्या, अजगर तोंडें, राठ कातडी, व त्यांच्या अंगाची भयंकर दुर्गंध ह्यांच्या योगानें कोण मनुष्य भिऊन गर्भगळीत होणार नाहीं! हीं भुतें पाहून लोक दूर पळून जात आणि म्हणत, देवानें हीं कशाचीं घडलीं कोण जाणे!'

स. १३९८त हिंदुस्थानावर स्वारी करणारा तयमूर हा मोगल होता. त्याच्या वेळेस सार्वजनिक समारंभांत पुरुषांबरोबर बायकाही मोठमोठ्या शामियान्यामध्यें उघड्या येऊन बसत. हिंदुस्थानांत मोगलांनीं आपला

अंमल स्थापन केल्यावर बायकांस पडद्यांत टेवण्याची चाल पूर्वीच्या तुर्क मुसलमानांतून किंवा रजपूत हिंदूंपासून मोगलांनीं उचलली असावी, असा व्हीलरचा तर्क आहे. हुमायून बादशहाच्या वेळेपासून इराणी पाणी मोगलांत शिरूं लागलें. त्याचा मुलगा अकबर तर ज्यास्तच इराणी होता. तथापि या दोघांमध्यें पूर्वीचा मोगली स्वभाव स्पष्ट दिसत होता.

मोगल लोक रानभर भटकणारे होते. अज्ञातकाळापासून त्यांच्या टोळ्या उत्तरआशियांतील सपाट प्रदेशांत भटकत असत. त्यांची वस्ती स्थायिक नसे. गाड्यांवर झोंपड्या बांधून त्यांत ते राहत. त्या झोंपड्या वाटेल तेथें त्यांना नेतां येत. उन्हाळ्यांत एक ठिकाणीं तर हिंवाळ्यांत दुसऱ्या ठिकाणीं; ह्याप्रमाणें खेपा घालण्यांत त्यांचा सर्व काळ निघून जाई. पिढ्यानुपिढ्या ते आहेत तसे असत. त्यांचा जीवनक्रम कधीं बदलत नसे. एखादे वेळेस ते अवाढव्य तुफानाप्रमाणें एखाद्या देशांत घुसून त्याची दाणादाण करून सोडीत; आणि सर्व जगतास हालवून सोडणाऱ्या झंझावातासारखा चोहोंकडे धुमाकूळ मांडीत. सर्वांवर वचक बसविणाऱ्या बुद्धिमान नायकांच्या हाताखालीं मोगल स्वारांचे जमाव देशभर हिंडत. ते सर्व प्रदेश लुटून फस्त करीत, तेव्हां हे निराळ्याच जगांतून नवीन राक्षसच आले आहेत कीं काय, असें लोकांस वाटे. किंचित् कालपर्यंत त्यांच्या नांवाच्या दराऱ्यानें सर्व लोकांस दहशत बसे. लगेच ते एकदम कोणीकडे गडप होत. विशाळ फौजा तयार करून ते राज्यें पादाक्रांत करीत. कांहीं काळपर्यंत सर्वांच्या अंगीं सारखा चेव जागृत राही. सर्व जग पादाक्रांत केल्याप्रमाणें त्यांचें वैभव क्षणांत शिखरास पोंचे. नंतर चैन व विलास करण्यांत त्यांच्या शक्तीचा क्षय होई. पुनः पाहवें तों कोठें कांहीं नाहीं. ज्वालामुखी पर्वताचा स्फोट आटपून गेल्यावर जसें लोकांस त्याजविषयीं कांहीं भय वाटेनासें होतें, तशीच ह्या मोगल लोकांची स्थिति होती. एका क्षणांत ते सर्व पृथ्वीस कांपवीत, दुसऱ्या क्षणांत नाहींसे होत. ह्या रानटी लोकांची टोळधाड नाशकारक असे. धर्मोपदेश करण्यास त्यांजपाशीं धर्म नव्हता; सुधारणेचें आरोपण करण्यास यांजपाशीं बीज नव्हतें. धर्मस्वीकार केला किंवा खंडणी दिली म्हणजे मुसलमान लोक जिंकलेल्या लोकांस सोडून देत. पण हे मोगल लोक जेथें जेथें जात, तेथील लोकांची कत्तल करून त्यांचें सर्वस्वापहरण केल्याशिवाय परतत नसत. सर्व मुलुखाची नासाडी

ही मात्र त्यांच्या आगमनाची निशाणी मागें राही. तातार लोक अंतःकरणाचे फारच कठोर; त्यांना दयामाया म्हणजे काय हें ठाऊक नव्हतें. सर्व तातार लोकांपैकीं मोगल लोकांत ज्यास्त कुवत होती. चंगीझखान हा त्यापैकीं वर सांगितलेल्या प्रकारचा एक तुफानी राक्षस होता. त्यानें व त्याच्या कित्येक अनुयायांनीं बादशाही पद भोगिलें. चंगीझ व त्याचे अनुयायी, कळप चारण्यासाठीं स्थलांतर करण्याचें काम सोडून देऊन, पूर्वेस चीनच्या समुद्रापासून पश्चिमेस काळ्या समुद्रापर्यंत, व उत्तरेस सैबीरियांतील सपाट प्रदेशापासून दक्षिणेस समर्कंद इस्पहानपर्यंत, देश जिंकीत गेले. त्यांच्या लष्करचे तळ म्हणजे मोठमोठीं शहरें होत. हे तळ देण्याची व त्यांत रस्ते वगैरे करून सर्व सोई करण्याची त्यांची शिस्त ठरलेली होती. आपला तंबु कोठें उभारावा व कोणचा तंबु कोठें सांपडेल, हें प्रत्येकास बरोबर ठाऊक असे. राजाचे तंबु म्हणजे मोठमोठे राजवाडेच असत. ते पुष्कळ द्रव्य खर्चून सुशोभित केलेले असत. त्यांजवर झाडांचीं व प्राण्यांचीं चित्रें काढिलेलीं असत. प्रत्येक खानास पुष्कळ बायका असत, व प्रत्येक बायकोचे तंबु व गाडे नेमिलेले असत.

मोगल हे मूळचे अज्ञानी पण स्वभावानें चौकस होते. ते उद्दाम व गर्विष्ठ असत. ते आपलीं कामें नोकरांकडून करवीत. हलकीं कामें करणें त्यांस आवडत नसे. त्यांचे नोकर म्हणजे लढाईंत पकडून गुलाम केलेले बायका व पुरुष. घरांतील सर्व व्यवस्था बायकांकडे सोंपललेली, व सर्व बाहेरचें काम नोकरांकडे सोंपलेलें असे. युद्ध किंवा शिकार हीं दोन कामें मात्र ते स्वतः करीत. खाण्यापिण्याची चैन म्हणजे त्यांच्या सुखाचा कळस. ते नाना प्रकारचीं मद्यें प्राशन करीत. नोकरांस सभोंवार नाचण्यास लावून बायकांशीं आपण खेळत बसत. ते स्वभावाचे मोकळे, परंतु संशयी व रागीट होते. त्यांच्या स्त्रिया व्यवस्थित व शुद्धाचरणी असत. त्यांच्यांत व्यभिचार हा अत्यंत भयंकर गुन्हा समजला जाई. त्या गुन्ह्यास चंगीझखानानें मरणाची शिक्षा ठरविली होती.

तेराव्या शतकांतील मोगलांचे धर्माचार हिंदूंच्या आचारांशीं बरेच मिळते होते. त्यांचा जो जुना धर्म होता, त्याचें आर्यधर्माशीं साम्य होतें. पंचमहाभूतांस ते आपल्या अन्नाचा अवशेष अर्पण करीत. प्रत्येक घरांत मूर्ति असे, तिची ते मनोभावानें पूजा करीत. आपल्या पेयाचा अंश ते

जमिनीवर व घोड्यांवर टाकीत. ब्राह्मणांसारखे त्यांच्यांत उपाध्याय होते, ते ज्योतिष पाहत, शकुन सांगत व ग्रहणें वर्तवीत. हिंदु योग्यांप्रमाणें त्यांच्यांतही अंगास राख फांसलेले साधु असत, ते आपल्या तपाच्या व पवित्राचरणाच्या बळावर पुष्कळ चमत्कार करून दाखवीत. ते अनेक देवांची पूजा करीत. क्षत्रियांप्रमाणें त्यांस मांस आवडे. पाहिजे त्या प्राण्याचें मांस ते खात, मग तो सहजगत्या मेलेला असला तरी हरकत नसे. त्यांचा लग्नविधि म्हणजे मुलगी पळवून नेणें होय. त्यांच्या बायकांस पडदा नसे. बायका सर्व समारंभांत उघडपणें बाहेर येत. विधवांनीं सती जाण्याची चाल त्यांच्यात नव्हती. मेलेल्या भावाच्या बायकोशीं दुसरा भाऊ लग्न करी.

मोगल लोक आपला मूळचा धर्म जरी विसरले नाहींत, तरी ते दुसरा पाहिजे तो धर्म स्वीकारीत. असें धर्मांतर करण्यांत त्यांची खरी निष्ठा कितपत असे तें समजत नाहीं. नांवानें तरी बहुतेक मोगल पुढें मुसलमान झाले होते; कित्येक क्रिस्ती झाले व कांहीं बुद्धधर्मी झाले. ज्यांनीं आपला धर्म बदलला नाहीं, ते येशू, महंमद, मोझेस, किंवा बुद्ध ह्यांपैकीं कोणा तरी एकाचे ते अनुयायी होत. चंगीझखानाचा कायदाच असा होता, कीं जो गुरु परमेश्वर एक आहे असें शिकवील त्यास सर्वांनीं भजलें पाहिजे. मोगलांच्या ह्या स्वभावाचें उदाहरण त्यांच्या पुढील इतिहासांत दरएक ठिकाणीं आढळतें. स. १२००–१३०० च्या दरम्यान त्यांनीं मुसलमानी धर्म स्वीकारिला. 'मोगल लोक हिंदूंप्रमाणें जुन्यासच चिकटून राहणारे नव्हते. दुसऱ्यांतलें चांगलें असेल तें घ्यावें व नवीन सुधारणा संपादन करावी अशी त्यांस हांव असे'.*

मोगल बादशहा धर्माच्या बाबतींत आग्रही नव्हते. लोकांस खूष ठेवण्याकरितां ते तसे वागत किंवा खरोखर ईश्वराविषयीं ते बेपर्वा होते, असें नाहीं. तर तो त्यांच्या अत्यंत लोभी स्वभावाचा परिणाम होय. जगामध्यें सर्वव्यापी लोक त्यांच्यासारखे दुसरे नाहींत. देशांतील लोक कोणत्याही धर्माचे असले तरी त्याची त्यांस पर्वा नसे. ते वाटेल त्या देवाची पूजा करीत व बिकट प्रसंगीं वाटेल त्या साधूचा अनुग्रह मागत.

* The Moguls are progressive and assimilative and not exclusive like the Hindus.—Lane Poole.

इहलोकचीं सर्व प्रकारचीं संसारसुखें मिळण्यासाठीं ते एक किंवा अनेक देवांस भजत.

ऐतिहासिक कालांत युरोपावर तीन मोठे घाले आले. पहिला घाला युरोपच्या उत्तरेकडून गॉथ वगैरे रानटी लोकांनीं घालून रोमन बादशाहीचा विध्वंस केला, (स. ४१०). ह्या घाल्यामुळें युरोपीय सुधारणेचें नुकसान न होतां, तिचा फायदाच झाला. रोमन बादशाहीच्या जीर्ण सुधारणेला, ह्या रानटी लोकांच्या ताज्या दमाची व प्रखर तेजाची नवीन पुष्टि मिळाली. दुसरा हल्ला आरब मुसलमानांनीं आठव्या शतकाच्या आरंभीं केला; त्यांत त्यांनीं पश्चिमेकडून स्पेन वगैरे प्रदेश जिंकिले. ह्या हल्ल्यामुळें युरोपीय सुधारणेचा कांहीं फायदा झाला व कांहीं नुकसान झालें. आरबांनीं बरेंच ज्ञान युरोपांत आणिलें, पण पुष्कळ गोष्टींचा नाशही केला. तिसरा हल्ला मध्यआशियांतील मोगल व तुर्क लोकांनीं केला. हा शेवटचा हल्ला सुमारें दोनशें वर्षे एकसारखा चालूच होता.

मोगलांच्या हल्ल्यानें यूरोपचें अतिशय नुकसान झालें. रशियावर स्वारी करून, तेथील बाल्यावस्थेंत असलेल्या सुधारणेचा चेंगीझखान व त्याच्या मागून आलेले मोगल सरदार ह्यांनीं उच्छेद केला. रशियांत अनेक लहान लहान राज्यें होतीं. त्या सर्वांस मोगलांनीं जिंकिलें, आणि अडीचशें वर्षेपर्यंत त्यांस आपल्या अंमलाखालीं ठेवून त्यांजपासून खोपून खंडणी घेतली. ह्या अडीचशें वर्षांच्या परचक्रांमुळें युरोपांत रशियन राष्ट्राचा भावी इतिहास बदलून गेला, आणि त्यास पुष्कळ वर्षे आपलें डोकें वर काढितां आलें नाहीं. अशीच स्थिति दक्षिणयुरोपांतील लोकांचीही झाली. ह्या कारणास्तव मोगलांच्या स्वारीचें एवढें महत्त्व आहे. मोगलांनंतर पुढें केव्हांही आशियाच्या लोकांनीं युरोपावर स्वारी करून तेथील लोकांवर आपला ताबा बसविलेला नाहीं.

आशियाखंडांत मोगल लोकांनीं भयंकर नुकसान केलें. मोठमोठ्या विस्तीर्ण प्रदेशांतील एकूणएक लोकसंख्या त्यांनीं नाहींशी केली, त्यामुळें ज्या अनेक राष्ट्रांचा निःपात झाला, त्यांच्या सुधारणेचा आज मागमूसही सांपडत नाहीं. आग्नेयीस यूरोपच्या तुर्कांचा प्रभाव व रशियांत मोगलांचा प्रभाव हे मात्र चिरकालीन राहिले.

परंतु वाइटापासून चांगलेंही निपत असतें. मोगलांच्या स्वाऱ्यांमुळें आशिया व यूरोप यांजमध्यें दळणवळणाचे मार्ग सुरू झाले. मोगलांनीं नवीन अफाट रस्ते बांधिले. सैबीरियन रेल्वे नुकतीच बांधण्यांत आली आहे; त्यापूर्वी हे मोगलांचेच मार्ग दळणवळणासाठीं चालू होते. दोन खंडांमधील व्यापारी तांडे, निरनिराळ्या राष्ट्रांचे वकील, व एकंदर लोकांचें जाणेंयेणें ह्याच मार्गांनीं होत असे. अशा तऱ्हेचे हमरस्ते बांधण्याचें श्रेय प्रथम मोगलांनीं घेतलें. म्हणून मार्को पोलो सारख्यांचे प्रवास शक्य झाले. ह्या हमरस्त्यांमुळें प्राच्य लोकांचें ज्ञानभांडार, त्यांची संस्कृति, त्यांचे उदात्त विचार व त्यांच्या थोर कल्पना ह्यांचा लाभ युरोपास झाला; तेणेंकरून युरोपियन राष्ट्रांच्या ठायीं नवीन प्रगति उत्पन्न होण्याची सोय झाली.

४. चंगीझखान व त्याचा वंश.—उत्तरहिंदुस्थानांत तुर्क मुसलमान आपलें राज्य स्थापण्यांत गुंतले असतां, तिकडे मध्यआशियाखंडांत प्रचंड अनर्थपात चालला होता. वर सांगितलेल्या मोगल लोकांमध्यें चंगीझखान नामक एक महापराक्रमी पुरुष सन ११६२ सालीं जन्मला. वस्तुतः मोगलांचा खरा इतिहास ह्या चंगीझखानापासूनच सुरू होतो. गोबीच्या मैदानाच्या उत्तरेस ते आरंभीं राहत असत. मोगल हा शब्द दहाव्या शतकापर्यंत कोणासही ठाऊक नव्हता. आरंभीं एखाद्या पुरुषाच्या नांवावरून त्याच्या कुळीस मोगल हें नांव मिळालें असावें. त्यापूर्वी चीनच्या राज्यांत त्यांचा अंतर्भाव होत असे. पहिल्यानें युझुगाई नांवाचा त्यांचा सरदार चीनपासून स्वतंत्र झाला. युझुगाई स. ११७५त मरण पावला. त्या वेळीं त्याचा मुलगा तेमुजिन हा तेरा वर्षांचा असून त्यानेंच पुढें पराक्रमी झाल्यावर सर्व सरदारांची एक मोठी सभा भरवून तींत चंगीझखान हें वडें नांव धारण केलें, (स. १२०६). तो मोगल लोकांच्या एका टोळीचा लहानसा सरदार होता. त्यानें प्रथम भिन्न भिन्न तातार टोळ्यांस जिंकिलें; व अशा रीतीनें एक प्रचंड फौज जमा केली. ह्या फौजेस त्यानें कवाईत शिकवून युद्धकलेंत तरबेज केलें. पुढें तो देश जिंकीत चालला. त्यानें जेवढा मुलूख काबीज केला, तेवढा विस्तृत प्रदेश एकाच राजाच्या ताब्यांत आजपर्यंत कधींही आलेला नाहीं. त्याची बुद्धि तीव्र होती. त्याच्या लष्करापुढें मोठें लष्कर पूर्वी कोणाजवळही नव्हतें: आणि नंतरही

NATIONAL ARCHIVES OF INDIA

अद्यापपर्यंत कोणीं तसें बाळगिलें नाहीं. ह्या लष्करांत बहुतेक भरणा तुर्क लोकांचा होता. अशा तयारीनिशी [illegible] आशियाखंड जिंकीत चालला. सन १२१० पर्यंत पूर्वेस पूर्वसमुद्र, पश्चिमेस कास्पियनसमुद्र व उत्तरेस व्होल्गानदी इतका प्रदेश सहज रीतीनें त्यानें जिंकून फस्त केला. नंतर त्याची दृष्टि दक्षिणेकडे वळली; आणि बुखारा, काबूल, कंदाहार, खुरासान वगैरे प्रांत त्यानें काबीज केले. पुढें त्यानें [illegible] हस्तगत केला. त्यावेळच्या त्याच्या राज्याचा विस्तार आजच्या हिंदुस्थानच्या चौपट होता. लढाया, वेढे, कत्तली आणि सर्वस्वाचा नाश ह्यांच्या हकीकतींनीं त्याचे पराक्रमांचा इतिहास भरलेला आहे. मोगल लोकांबरोबर टक्कर देण्यास समर्थ राष्ट्र ,कायतें एकटें चीनचेंच होतें. त्या उभ- यतांमध्यें घोर युद्धप्रसंग झाले. चीनचा दुर्घट व प्रचंड तट ओलांडून मोगल लोक चिनांत शिरले. पेकीन राजधानी काबीज करून चीनचा उत्तरभाग त्यांनीं आपल्या राज्यास जोडिला. युरोपखंडांत जर्मनीपर्यंत चंगीझची फौज गेली. अफगाणिस्तानांत खारिज़्म् प्रांतावर सेल्जुक सुलतान महंमद राज्य करीत होता. ह्या सुलतानचे ताब्यांत आरबस्तानापासून तुर्कस्तान, इराण वगैरे सर्व प्रदेश मोडत असे. आपल्या राज्यांत बरीच सुधारणा व व्यवस्था असल्यामुळें वरील रानटी लोकांच्या टोळधाडींचा प्रभाव आपल्यावर चालणार नाहीं, अशी ह्यास घमेंड होती. चंगीझखानाच्या कित्येक लोकांस महंमदानें दुखविल्यामुळें नुकसान भरून मागण्यासाठीं चंगीझनें त्याजकडे आपले वकील पाठविले. त्यांचा शिरच्छेद केल्यामुळें ह्या मुसलमानी राज्यावर चंगीझची वक्रदृष्टि झाली. चंगीझखानाशीं टक्कर देण्यासाठीं एक लाख फौज बरोबर घेऊन महंमद सिरदर्यानदी उतरून पलीकडे गेला. परंतु ह्या एक लाख फौजेशीं झुंजण्यास चंगीझ आपल्या मुलांसह सात लाख फौज घेऊन आला. पहिल्याच झगड्यांत दीड लाख मुसलमान चीत झाले. तेव्हां आपले राज्यांत मोगलांचा प्रवेश न व्हावा, म्हणून सरहद्दीवरील ठाणीं संभाळून महंमद आपली फौज घेऊन परत सरहद्दीवर आला. पण चंगीझची गति कुंठित करणें शक्य नव्हतें. तो बराच मुलुख काबीज करून परत गेला. स्वतःची इच्छा हेंच चंगीझचें परब्रह्म, परमेश्वराची भीति ह्मणजे काय हें तो जाणत नव्हता. त्यानें आपल्या शेवटच्या वीस वर्षांत एक कोटी चाळीस लक्ष

माणसांची कत्तल केली, असें सांगतात. स्वतः इतका अडाणी होता, कीं तो विद्येचा व धर्माचा उपहास करी. आशियाखंडाच्या अत्युत्तम पुस्तकालयांतील ग्रंथसंग्रहाचा उपयोग त्यानें आपल्या घोड्यांना मऊ पथाऱ्या करण्याकडे केला. एकदां बायबलाची त्यानें होळी केली; बुखाऱ्याच्या मशीदींत कुराणही त्यानें घोड्यांकडून तुडविलें. एक वेळ 'अग्निप्रळय पुरवला, पण ह्या चंगीझखानाची धाड नको,' असें लोकांस झालें होतें. त्यानें जिंकिलेल्या राज्याची लांबी साडेपांच हजार मैल असून रुंदी तीन हजार मैल होती. चंगीझखान कॅस्पियनसमुद्राच्या कांठीं सन १२२७त मरण पावला. मरणसमयीं त्याच्या राज्याची हद्द वायव्येस युरोपांत नीपर नदीपर्यंत, आग्नेयीस आशियांत सिंधुनदीपर्यंत व पूर्वेस पॅसिफिक महासागरापर्यंत पोंचली होती. म्हणजे त्याचें राज्य पिंवळ्या समुद्रापासून काळ्या समुद्रापर्यंत पसरलें होतें. तो मरण पावला तेव्हां चाळीस कुमारिका ठार मारण्यांत आल्या; कारण, चंगीझच्या आत्म्याच्या सेवेकरितां चाळीस कुमारिकांचे आत्मे पाहिजे होते. आजपर्यंत इतका दुष्ट व बलाढ्य पुरुष निपजल्याचें दुसरें उदाहरण इतिहासांत आढळत नाहीं. चंगीझची स्वारी हिंदुस्थानच्या इतिहासासंबंधानें केवळ पुढील अनर्थाची सूचक होती. प्रत्यक्ष हिंदुस्थानाकडे लक्ष देण्यास चंगीझ यास सवड झाली नाहीं.

चंगीझखानानें मरणसमयीं आपलें राज्य ओक्ताईखान, तुलुईखान, जूजीखान आणि झगताईखान ह्या चार मुलांस वांटून दिलें. त्याचा मुलगा ओक्ताईखान ह्यानें १२२७ पासून १२४१ पर्यंत राज्य केलें. हाही बापासारखाच पराक्रमी होता. त्यानें आपलें राज्य आणखी वाढविलें, व युरोपावर पुनः स्वारी केली. यूरोपच्या ह्या स्वारीचा मुख्य सरदार बातू म्हणून होता. हा बातू जूजीखानाचा मुलगा होय. त्यानें रशिया व हंगेरीदेश उद्ध्वस्त केले, आणि मास्को, कीव्ह, बुदापेस्त व दुसरीं पुष्कळ शहरें जाळून टाकिलीं, व तेथच्या सर्व लोकांची कत्तल केली. स. १२३८ पासून स. १२४१ पर्यंतच्या दोन तीन वर्षांत अर्धे यूरोपखंड जमीनदोस्त झालें; आणि राहिलेल्या अर्ध्या भागांतील लोक भीतीनें गर्भगळित झाले. त्या वेळीं युरोपीय राष्ट्रांत संघशक्ति नव्हती; आणि भूकंप वगैरे आघात होऊन मनुष्यसंहार होतो तशाच प्रकारचा हा मोगलांचा आघात होय, असें समजून त्यांस स्वस्थ बसणें भाग पडलें.

युरोपच्या सुदैवानें ओक्काईखान स. १२४१ त मरण पावला, आणि बातू युरोप सोडून परत गेला. ओक्काईनंतर तुलईखानाचा मुलगा कुब्लाइखान हा प्रसिद्धीस आला. त्यानें स. १२५७ पासून स. १२९४ पर्यंत राज्य करून कंबळू शहर आपली राजधानी केली. कंबळू म्हणजेच हल्लींचें पेकिन. पेकिनचें त्या वेळचें नांव खानबलीक (अपभ्रंश-कंब्लुक) असें होतें. कुब्लाईखानाच्या वंशास चीनच्या इतिहासांत 'युएनवंश' म्हणतात. ह्याचें वर्णन मार्को पोलोच्या वृत्तान्तांत आलें आहे. (त्रि. रियासत—मार्को पोलो पहा). कंबळू शहरीं कुब्लाईखानाकडे पृथ्वीवरील सर्व मोठमोठ्या राष्ट्रांचे वकील येत असत. व्हेनिसचा प्रसिद्ध प्रवासी मार्को पोलो ह्याच कुब्लाइखानाच्या पदरीं पुष्कळ वर्षें होता. स. १३६८त चीन देशावरील मोगल बादशाहीचा अंत झाला.

चंगीझखानाचा नातू व तुलईखानाचा मुलगा हुलाकूखान हाही भाऊ कुब्लाईखानाप्रमाणेंच पराक्रमी निपजला. त्याचें राज्य पश्चिम-आशियाखंडांत फार वाढलें, आणि पुढें शंभर वर्षें तें सारखें भर-भराटींत होतें. बातूचा भाऊ शयबान हाही मोठा पराक्रमी निघाला. बातूची राजधानी व्होल्गानदीवर मराई म्हणून होती. बातूच्या हाताखालीं मोगल थोडेच होते, तुर्कांचा भरणा विशेष होता.

बुखारा व खिवा येथें कांहीं थोडीं वर्षें ज्या खानांचा स्वतंत्र अंमल होता, त्यांची मूळ उत्पत्तिही चंगीझखानाचा नातू शयबान ह्याजपासून आहे. वरील दोन प्रांत अनुक्रमें स. १८६८ व १८७२त रशियानें जिंकिले. चंगीझचा धाकटा मुलगा झगताई ह्याच्या वंशानें कांहीं वर्षें बुखारा येथें राज्य केलें.

कुब्लाईखानाच्या मृत्यूनंतर त्याच्या राज्याचे अनेक तुकडे झाले. त्या तुकड्यांचा जोड पुढें तयमूरलंग ह्यानें केला. तार्तार मोगलांचा अंमल युरोपियन रशियावर स. १४७०पर्यंत होता. रशियाचा पहिला पराक्रमी बादशहा आयव्हन-धि-ग्रेट (स. १४६२-१५०५) ह्यानें तार्तार लोकांस रशियांतून हांकून दिलें, तेव्हांपासून रशियाच्या अर्वाचीन इतिहासास सुरुवात झाली.

५. इस्लामाचे दोष व धार्मिक रहस्य.—वर सांगितलेल्या मुसलमानी सुधारणेच्या माहात्म्यावरून वाचकांचा थोडासा गैरसमज होण्याचा

संभव आहे. ती सुधारणा कितीही उदात्त दिसली, तरी ती आर्यांच्या प्राच्य सुधारणेची व प्राचीन ग्रीक सुधारणेची केवळ नक्कल होय. सूर्य मावळत असतां, त्याजवर ढग येऊन, ते चकचकित दिसतात, पण ती चकाकी त्या ढगांची नव्हे, ती मूळ त्या सूर्याची होय. तोच प्रकार मुसलमानी सुधारणेचा आहे. प्राचीन आर्य व प्राचीन ग्रीक ह्यांजपासून उचललेलें सुधारणेचें भांडवल त्यांनीं कांहीं दिवस पोसून, तें अज्ञाननिद्रेंत घोरत पडलेल्या युरोपास आणून दिलें.

इस्लामाचीं कित्येक तत्त्वें व्यक्तीच्या व समाजाच्या प्रगतीस बाधक आहेत. बहुपत्नीत्वाचा प्रकार विकोपास गेल्यामुळें मुसलमानांत स्त्रिया अत्यंत हीनावस्थ राहिल्या. त्यांच्यांत संतति व कुळ शुद्ध राहिलें नाहीं. वाटेल त्याची विवाहित स्त्री पळवून आणावी; अनेक वेळां तिच्या नवऱ्यास व आप्तेष्टांस ठार मारून तिच्याशीं बळजबरीनें निका लावावा; असले दुराचार मुसलमानी अमदानींत पदोपदीं आढळतात. त्यांमुळें स्त्रीजातीची योग्यता पशुवत् झाली. हिंदु गृहस्थ व्यभिचारी असेल, पण बहुशः घराबाहेर जाऊन तो आपली वासना पूर्ण करील. एक विवाहित स्त्री घरांत असतां दुसऱ्या स्त्रियांस सहसा तो आपल्या घरांत आणणार नाहीं. ह्या कारणास्तव मुसलमानांत कुटुंबाची शुद्धता व पावित्र्य दुर्मीळ असे. मुसलमानांत बहुपत्नीत्व असल्यामुळें व एक पत्नी सोडून दुसरी करण्याची मुभा असल्यामुळें, कौटुंबिक जीवन पवित्र राहत नाहीं.

धर्मप्रसारासाठीं वाटेल त्या लोकांशीं युद्ध करून, त्यांजला गुलाम करण्याचा प्रघात मुसलमानांनीं घातल्यामुळें, त्यांचें राज्य जरी लवकर वाढत गेलें, तरी त्यामुळें गुलामगिरी स्थापित झाली. गुलामगिरीचें प्रस्थ मुसलमानी देशांत अद्यापि पुष्कळ आहे. धर्माच्या बाबतींत मुसलमान असहिष्णु होते, म्हणून परधर्मीयांस त्यांनीं आपल्या बरोबरीनें वागविलें नाहीं. तसेंच धर्म व राज्य ह्या दोहोंचे संपूर्ण अधिकार एकाच खलीफाच्या हातांत असल्यामुळें, लोकांच्या हातांत काडीइतकी सत्ता न राहतां राजे जुलमी बनले, आणि प्रजासत्ताक राजव्यवस्थेस थारा मिळाला नाहीं.

इस्लामी धर्माचें गुलामगिरीस पाठबळ आहे. हल्लीं सुद्धां गुलामगिरीचा अवशेष मुसलमानी देशांतच आहे, आणि पूर्वीं तरी मुसलमानांतूनच तो

क्रिस्ती लोकांत शिरला. मुसलमानी धर्मांत धर्मस्वातंत्र्य नसल्यामुळें त्यांच्या अंमलाखालीं विधर्मी लोक नेहमीं हीन स्थितींत असत.

आणखी एक मोठा दोष असा आहे, कीं मुसलमानांचे कायदे प्रगतिशील नाहींत. महंमद पैगंबर व त्याच्या नंतर झालेले चार खलीफा ह्यांनीं केलेले नियम व निकाल सदैव अबाधित चालले पाहिजेत असें मुसलमान समजतात. धर्माच्या व इतर बाबतींत कायद्यानेंच कायम निर्बंध घालून दिल्यामुळें, परिस्थित्यनुरूप त्यांत बदल होण्यास अवकाश नाहीं. मुसलमानांचा समाज कैक शतकें आहे तसा आहे. क्रिस्ती समाजाप्रमाणें त्याची प्रगति झाली नाहीं. क्रिस्ती लोकांस परिस्थित्यनुरूप बदलणारा रोमन कायदा प्राप्त झाला, त्यामुळें त्यांची प्रगति झपाट्यानें झाली. ह्या बाबतींत हिंदु लोकांच्या कायद्याचे काय परिणाम झाले आहेत, हें विद्वानांनीं विचार करण्यासारखें आहे.

मुसलमानांचीं धार्मिक बंधनें जरी कायमचीं ठरलेलीं आहेत, तरी आज निरनिराळ्या ठिकाणीं चालू असलेला त्यांचा आचार मूळ महंमदानें घालून दिलेल्या किंवा कांहीं दिवस आरबांनीं चालविलेल्या आचारांहून अगदींच भिन्न आहे. पहिल्या शें दोनशें वर्षांतील ह्या धर्माचें उदात्त स्वरूप हल्लीं कायम नाहीं.

अशा प्रकारचे अनेक दोष इस्लामांत असूनही त्याची भरभराट झाली, ह्यावरून त्या धर्माचा अत्यंत व्यावहारिक कल सहज ध्यानांत येईल. वाटेल तिकडे भटकावें, वाटेल तें खावें प्यावें, वाटेल त्यास आपल्या धर्मांत ओढून आणावें, परजातींच्या स्त्रियांचा स्वीकार करून स्वधर्मी लोकांची संख्या वाढवावी, इत्यादि व्यावहारिक उपयोगाचे अनेक प्रकार इस्लामांत आहेत. अशा इस्लामाचा पगडा जरठ व धार्मिक बंधनांनीं जखडलेल्या हिंदुस्थानावर कसा बसला ह्या प्रश्नाचा उलगडा पुढें हळू हळू होत जाईल.

ऐतिहासिक विवेचनांत मुसलमानांतील निरनिराळ्या जातींचा वर सांगितलेला स्वभावभेद नीट ध्यानांत ठेविला म्हणजे जगांतील ठळक ठळक ऐतिहासिक घडामोडी कळून येतील. आज हिंदुस्थानांत जे मुसलमान आहेत, ते बहुतेक मिश्र आहेत. सिंधप्रांताशिवाय इतर ठिकाणीं आरब तर मुळीं आलेच नाहींत. मलबार वगैरेकडे आरबांची थोडी वस्ती आहे. पंजाबांत बु

दिल्लीचे आसपास तुर्क व मोगल ह्यांची अल्पस्वल्प वस्ती आहे. पण आजची मुसलमानांची बहुतेक संख्या येथच्याच लोकांनीं धर्मांतर केल्यामुळें व बीजसंकरानें झालेली आहे. म्हणजे हिंदुस्थानांतील मुसलमानांची मुख्य संस्कृति आर्य तऱ्हेची आहे; तुराणी तऱ्हेची नाहीं. ह्यावरून मुसलमानांच्या धर्माचें सर्वव्यापकत्व, म्हणजे सर्व प्रकारच्या लोकांस आपल्या धर्मांत ओढून, धर्माच्या नांवाखालीं त्या सर्वांची एक जात बनविण्याचा गुण केवढा आहे हें कळून येईल. पूर्वी कितीही भिन्न असले, तथापि धर्मदीक्षा मिळाल्याबरोबर सर्व लोकांची एक जूट होते, सर्व लोक एकदिलानें नाना प्रकारचे पराक्रम गाजवून शेंकडों वर्षें मोठमोठ्या राज्यांचा उपभोग घेतात, आणि धर्मशक्तीच्या जोरावर, कसलींही संकटें आलीं तरी त्यांचा निरास करून आपलें नांव गाजावितात, हा प्रभाव त्या विशिष्ट धर्मपद्धतीचा होय. आरबांत सुद्धां प्रथम अनेक जाति होत्या, त्या महंमदानें मोडून आरबांचें एक राष्ट्र बनविलें. पुढें हे आरब धर्मप्रसाराकरितां स्वदेशाबाहेर हिंडूं लागले, तेव्हां जे जे भिन्नजातीय लोक त्यांस भेटले, त्या सर्वांस केव्हां जुलमानें, केव्हां लालुचीनें, व केव्हां युक्तीनें त्यांनीं ग्रासून आपल्या जुटींत आणिलें. इराणांतले इराणी, तुराणांतले तुराणी, मोंगोलियांतले मोगल, हिंदुस्थानांतले आर्य, आफ्रिकेंतील सीदी, वगैरे झाडून सारे ह्या नवीन धर्मांत शिरल्याबरोबर एक झाले. ते आपले मूळचे स्वभाव विसरले, आणि एक जुटीनें नवीन उद्योग करूं लागले. नुसता त्यांचा धर्म एक झाला इतकेंच नाहीं, तर कोणत्याही ठिकाणीं त्यांस उच्च संस्कृति दिसली कीं तींतील चांगलीं तत्त्वें त्यांनीं लगेच स्वीकारिलीं. आरब म्हणजे मूळचे नुसते मेंढ्या राखणारे धनगर, हजारों वर्षें आरबस्तानाच्या वालुकामय ओसाड प्रदेशांत वन्यावस्थेंत पडून होते. महंमदानें त्यांस नवीन स्फूर्ति आणिली, आणि महंमदानेंच त्यांच्या भावी उन्नतीची स्थापना केली. वास्तविक मुसलमानांनीं ह्या जगतीतलावर जो पराक्रम गाजविला, तो क्रिस्त्यांनाही साधला नाहीं. धर्मसंस्थापकाच्या अंगीं किती कुशलता पाहिजे व किती दूरदृष्टि व धोरण पाहिजे, आणि, उलट पक्षीं, राष्ट्राच्या विसकळीत स्थितींत महंमदासारखा एक कर्ता व अत्यंत व्यावहारिक पुरुष केवढें प्रचंड काम करूं शकतो, हें ह्या मुसलमानांच्या इतिहासावरून स्पष्ट निदर्शनास येतें.

राष्ट्रबंधनास धर्माची आवश्यकता किती आहे ह्याचा विचार करितांना इस्लामाचें उदाहरण विशेष ध्यानांत ठेवण्याजोगें आहे. भिन्न जातींच्या व भिन्न परंपरेच्या लोकांस इस्लामानें एक करून, त्यांजकरवीं मोठमोठे पराक्रम करविले. विद्युद्वेगानें तो धर्म चहूंकडे पसरला. ह्यावरून लोकांच्या अंगीं स्फुरण उत्पन्न करण्याची शक्ति त्यांत किती होती, हें दिसून येतें. इस्लामाचीं तत्त्वें व्यावहारिक सोयीचीं होतीं. सर्व लोकांस एकबंधुत्वाचें तत्त्व महंमदानें शिकविलें, आणि धर्माकरितां प्राणही खर्ची घालण्याकडे त्यानें लोकांची प्रवृत्ति केली. दरशुक्रवारीं प्रार्थना करण्यासाठीं सर्वांनीं मशीदींत एकत्र जमण्याचा प्रघात त्यानेंच पाडिला. हा सार्वजनिक प्रार्थनेचा प्रघात हिंदुधर्मांत नाहीं; बुद्धधर्मांत मात्र आहे. अशा प्रार्थनेंत हजारों लहान थोर मुसलमान लोक एक पोषाख करून, आपले सर्व भेदाभेद बाजूस ठेवून, एकत्र जमतात; प्रीतीनें व आदरानें एकमेकांस आलिंगन देतात; मक्केकडे तोंड करून एका गुरूचा उपदेश एकचित्तानें ऐकितात. पृथ्वीच्या कोणत्याही भागांत ते राहत असले, व कितीही भिन्न भाषा बोलत असले, तरी मक्केच्या यात्रेस जाण्यांत त्या सर्वांस पुरुषार्थ वाटतो. दिल्ली, आग्रा, लखनौ, लाहोर इत्यादि ठिकाणीं प्रार्थनेसाठीं मशीदींत जमलेल्या मुसलमानांचे प्रचंड जमाव पाहून, त्यांच्या संघशक्तीचें कौतुक वाटल्याशिवाय राहत नाहीं. मुसलमानी धर्मांत सर्व वर्णांचे व सर्व जातींतले लोक आहेत. स्वधर्माचा त्यांस विशेष अभिमान वाटतो. रानोमाळ भटकणाऱ्या रानटी धनगरांस इस्लामानें राज्यपदास चढविलें; हजारों वर्षांच्या अंधकारांतून त्यांस बाहेर उजेडांत आणिलें; आणि जगाच्या इतिहासांत कायमचें नांव करण्यास त्यांस सामर्थ्य दिलें. तत्कालीन वन्य लोकांची एवढी एकी कशानें झाली, त्यांच्यांत उत्साह कसा उत्पन्न झाला, आणि शास्त्रकलांत त्यांनीं एवढें प्रावीण्य कसें संपादन केलें, ह्याचा विचार करूं लागलें म्हणजे इस्लामाच्या करामतीचें आश्चर्य वाटल्याशिवाय राहत नाहीं. एक मुसलमान सात असामींस भारी झाला, असे अनेक युद्धप्रसंग इतिहासांत नमूद आहेत. नुसत्या तलवारीनेंच इस्लामाची वृद्धि झाली असें नाहीं, तर इस्लामाच्या शिकवणीनें मुसलमानांस तलवार गाजविण्याचें सामर्थ्य आलें; आणि त्यांची बुद्धि तीव्र झाली. अबुबकर, उमर, उस्मान

व अली एवढे पहिले चारच पुरुष निर्माण होऊन इस्लामाची वाढ खुंटली असती, तरी त्या धर्माची योग्यता आहे अशीच थोर वाटली असती, इतकी त्या चार पुरुषांची करामत अप्रतिम असून, तींत सर्व इस्लामाचें संपूर्ण रहस्य सांचलेलें आहे.

प्रकरण पांचवें.

गजनवी महंमूद.

(स. १०३० पावेतों).

१. महंमद कासीमची सिंधप्रांतावर स्वारी. २. सामानी वंश, (स. ८७४–९९९). ३. अलप्तगीन, (स. ९६७–९७६). ४. सबक्तगीन, (स. ९७७–९९७). ५. सुलतान महंमूद, व त्याच्या स्वाऱ्या. ६. सोमनाथची स्वारी, (स. १०२४). ७. महंमुदाची योग्यता.

मागील दोन प्रकरणांतील विवेचन सामान्य आहे. पुढील हकीकतींत त्याचा उपयोग वारंवार लागेल, म्हणून तें एकदम एक ठिकाणीं देणें जरूर वाटलें. आतां पुढें हिंदुस्थानांत मुसलमानांचा प्रवेश कसकसा होत गेला तें सांगण्यास आरंभ करूं.

१. महंमद कासीमची सिंधप्रांतावर स्वारी, (स. ७११).—सिंधप्रांतांत व हिंदुस्थानच्या इतर भागांत त्या वेळेस रजपूत राजे राज्य करीत होते. प्राचीन काळापासून हिंदुस्थानाशीं आरब लोकांचा व्यापार चालू होता. ह्या व्यापाराची हकीकत ब्रिटिश रियासतींत दिली आहे. इ. स. ६३७त खलीफ उमरच्या वेळेस आरबांची एक टोळी ठाणें येथें आली होती. पुढें समुद्रमार्गानें इसवी सन ६६४त महलब नामक मुसलमान सरदार कांहीं फौजेनिशीं मुलतानपावेतों येऊन परत गेला. तथापि पुढें कांहीं दिवसपर्यंत मुसलमानांची दृष्टि हिंदुस्थानाकडे वळली नाहीं.

वलीद खलीफा बगदाद येथें आरबी खिलाफतीवर असतां, सिंधप्रांतांतील कांहीं भागावर दाहिर नांवाचा रजपूत राजा राज्य करीत होता. बकूर किल्ल्या-

NATIONAL ARCHIVES OF INDIA

जवळ अरोड म्हणून शहर होतें, ती दाहिरची राजधानी. ह्या दाहिर राजाशीं प्रथम मुसलमानांचा तंटा लागला. सिंधदेशांत देवल नामक बंदरीं मुसलमानांचे एक हजार लोक रजपुतांनीं पकडून ठेविले. मुसलमानांनीं ते दाहिर राजापासून परत मागितले. परंतु देवलबंदर दाहिरच्या ताब्यांत नसल्यामुळें, ती मागणी त्यास कबूल करतां येईना. त्याची ती सबब न ऐकतां, त्याजवर बसरा प्रांतांतुन मुसलमानी फौज चालून आली. महंमद कासीम नामक एक तरुण शूर सरदार ह्या फौजेचा मुख्य होता. कासीमनें देवल येथील देवालयावर प्रथम हल्ला करून तेथील निशाण कबजांत घेतलें; तेव्हां लोक घाबरून गेले व देवालय कासीमचे हस्तगत झालें. देवालयांत पुष्कळ ब्राह्मण होते; त्यांनीं सुंता करवून मुसलमान व्हावें असें कासीमनें बोलणें लाविलें. तें ब्राह्मणांनीं नाकबूल केल्यावर कासीमनें सतरा वर्षांवरील सर्व ब्राह्मणांची कत्तल करून इतरांस गुलाम करून स्वदेशीं पाठविलें. देवलबंदर काबीज केल्यावर कासीमनें दाहिरवर स्वारी केली. उभयतांची लढाई होऊन दाहिर समरांगणीं पडला, व त्याचा मुलगा पळून गेला; तरी तेथच्या शूर राणीनें सर्व फौज जमा करून पुनः एकवार निकराची लढाई केली, पण तिचा इलाज न चालून तिचे लोक मारले गेले, आणि क्रमाक्रमानें दाहिरचें सर्व राज्य कासीमचे हातीं आलें. दाहिरच्या प्रधानासच आपला कारभारी नेमून कासीमनें लोकांजवळून खंडणी वसूल केली. खंडणी देणाऱ्या लोकांचा छळ करूं नये असा कासीम ह्यास खलीफाचा हुकूम होता, तो त्यानें पाळिला.

दाहिर राजाच्या दोन मुली होत्या, त्यांस बंदिवान करून कासीमनें खलीफ वलीद यास नजर पाठविल्या. त्यांनीं कासीमचा सूड घेण्याची एक विलक्षण युक्ति केली. वडील मुलीवर खलीफाची मर्जी बसली, तेव्हां एके प्रसंगीं दीनवाणीनें ती मुलगी खलीफास म्हणाली, ‘मजवर कासीमनें बलात्कार केला असल्यामुळें मी भ्रष्ट आहें.’ कासीमचें हें दुष्कृत्य ऐकतांच खलीफास अत्यंत संताप झाला, आणि त्यास ठार मारून आणण्याची त्यानें आज्ञा केली. त्याप्रमाणें त्यास ठार मारून त्याचें प्रेत डमास्कस येथें आणविलें, तेव्हां त्या मुलीस मोठा आनंद झाला; आणि ती म्हणाली, ‘माझ्या बापाचा घात करणाऱ्या दुष्टाचा चांगला सूड घ्यावा एवढ्याचसाठीं

मीं हा आरोप त्याजवर आणिला. मी भ्रष्ट नाहीं ! ' हें त्या मुलीचें भाषण ऐकून व तिचें खोटें वर्तन पाहून खलीफा क्रोधायमान झाला, आणि त्यानें तीस ठार मारिलें. खरा प्रकार सांगितल्यामुळें खलीफा आपणावर रागा-वेल आणि त्या रागाच्या आवेशांत देहान्तशासन करण्यास तो चुकणार नाहीं, हें त्या मुलीस ठाऊक होतें. परंतु पातिव्रत्यभंगापेक्षां मरण पत्करलें असल्या निर्धाराची ती होती, म्हणून कासीमचा सूड व सत्वसंरक्षण अशा दोनही गोष्टी तिनें साधिल्या. सिंधप्रांतावरची ही स्वारी सन ७११चे सुमारास झाली.

ह्या स्वारीनें मुसलमानांचा पाय हिंदुस्थानांत कायम झाला असें नाहीं. तीस वर्षांच्या आंत मुसलमानांस रजपुतांनीं हांकून लाविलें. सिंधप्रांतांत धर्माच्या बाबतींत हिंदु लोकांवर मुसलमानांनीं अतोनात जुलूम केले, ते हिंदूंस सहन झाले नाहींत. सिंधप्रांतावरील ह्या मुसलमानी स्वारी-संबंधानें लेन पूल म्हणतो, '*हिंदुस्थानच्या इतिहासावर ह्या स्वारीपासून* म्हणण्यासारखा परिणाम झाला नाहीं; आणि मुसलमानांसही कांहीं फायदा झाला नाहीं. सिंधप्रांत विस्तारानें इंग्लंडएवढा आहे, पण तो वालुकामय आहे. हिंदुस्थानांतील उच्च प्रतीच्या सुधारणेपुढें मुसलमानांच्या तीव्र वेगाचा उपाय हरला. ह्याचें कारण असें दिसतें, कीं एक तर ते भलत्याच ठिकाणीं हिंदुस्थानांत शिरले. दुसरें, रजपूत राजांची जमात त्या वेळीं जोरांत होती, आणि त्या सर्वांस जिंकिण्यास पुरेइतकी मुसलमानी फौज खलीफांनीं पाठविली नाहीं. महंमद कासीमचा पराभव झाल्यावरही त्याची आरब फौज इकडील दूरच्या प्रदेशांत संकटानें दिवस कंठीत होती. खलीफांस ह्या प्रांताचा विशेष उपयोग वाटला नाहीं. सिंधप्रांतांत आलेल्या आरबांनीं मुलतान व इतर ठिकाणीं आपल्या वसाहती स्थापिल्या. त्यांचा व हिंदूंचा लवकरच स्नेहभाव जुळला, आणि दोघेही एकमे-कांशीं गुण्यागोविंदानें नांदूं लागले. शें दोनशें वर्षेंपर्यंत सिंधप्रांतांत खाल-पासून वरपर्यंत पैगंबराच्या खुरेश जातीचे आरब निरनिराळ्या ठिकाणीं अमल गाजवीत होते. त्यांनीं हिंदूंचीं पुरातन बांधकामें तोडून त्यांचे दगड व सामान आपल्या नवीन इमारतींस लाविलें. हल्लींही आरबांनीं केलेला नाश ठिकठिकाणीं दृष्टोत्पत्तीस येतो.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

२. सामानी वंश.—(स.८७४–९९९).–इराणांत मुसलमानांचे अनेक राजवंश झाले, त्यांत नवव्या शतकांत सामानी नांवाचा एक वंश उदयास आला. इराणांत त्या वेळीं उत्तरेकडील अमूदर्यानदीपर्यंतच्या प्रदेशाचा समावेश होत असे. 'सामान' नांवाचा एक इराणी सरदार होता. त्याजकडे खुरासान प्रांताचा कारभार होता. त्याचा मूळधर्म फारशी असून, त्यानें मुसलमानी धर्म स्वीकारिला होता. सामानचा एक मुलगा होता, त्यास त्यानें मुसलमानी धर्माची दीक्षा देऊन त्याचें नांव आसद-ख्वान ठेविलें. आसदचे चार मुलगे मामून खलीफाच्या पदरीं उदयास आले, आणि त्यांस चार निरनिराळ्या प्रांतांचे कारभार मिळाले, (स. ८१९). त्यांपैकीं फरघाना प्रांताचा कारभार अहंमद यास मिळाला. हा अहंमद कांहीं दिवसांनीं स्वतंत्र झाला आणि इतर भावांचे प्रांत काबीज करून त्यानें आपलें राज्य वाढविलें. त्याची राजधानी बुखारा. त्याचा मुलगा इस्मईल ह्यानें आणखी पराक्रम करून आपलें राज्य सिंधुनदीपासून बगदादपर्यंत, व इराणच्या आखातापासून आरलसमुद्रापर्यंत वाढविलें. त्याच्या कारकिर्दींत बुखारा व समरकंद हीं शहरें प्रसिद्धीस आलीं; आणि बगदादच्या सारखीच त्यांची अनेक बाबतींत भरभराट झाली. ही भरभराट पन्नासएक वर्षें टिकली. पुढील राजे दुर्बळ निघाले; आणि त्यांचें राज्य मोडकळीस आलें. सामानी सुलतानांच्या पदरीं पुष्कळ तुर्क गुलाम मोठमोठ्या कामांवर होते, तेच पुढें बलवान झाले. त्या गुलामांत अलप्तगीन म्हणून एक तुर्क होता, त्यानें गज्नी येथें नवीन राज्य स्थापिलें. पुढें ह्या गज्नीच्या सुलतानांनींच स. ९९४त सामानी राज्य बुडवून त्याचे सर्व प्रांत गज्नीखालीं आणिले. सामानी वंशाचा शेवटचा सुलतान ९९९त मरण पावला. सामानी वंश स. ८००–१००० पावेतों सुमारें दोनशें वर्षे कसाबसा टिकला. सामानी सुलतानांची न्यायप्रियता, व विद्वत्ता फारसी ग्रंथकारांनीं फार वाखाणिली आहे. त्या वेळेपासून इराणांत फारशी भाषेचें पुनरुज्जीवन होऊन, आरबी भाषा मागें पडली, तिचा पुनः तेथें शिरकाव झाला नाहीं.

३. अलप्तगीन, (सन ९६७–९७६).—वर सामानी राज्याची हकीगत दिली. त्याच्या पडत्या काळांत तुर्क लोकांनीं आपलें महत्त्व पूर्वेकडे वाढविलें. त्या वंशाचा पांचवा सुलतान अब्दुल् मलीक ह्याजवळ अलप्तगीन नांवा–

च्या एक तुर्क गुलाम होता. त्याजवर राजाची मर्जी बसून त्यास सन ९६७त खुरासान प्रांताची सुभेदारी मिळाली. सन ९६७त अब्दुल मलीक मरण पावल्यानंतर, त्याचा मुलगा मनसूर ह्यास, बुखारा येथील गादी मिळूं नये अशी अलतगीननें खटपट चालविली. त्यावरून मनसूरनें अलतगीनास खुरासानचे सुभेदारीवरून दूर केलें, तेव्हां तो पळून काबुलाकडे गेला; आणि कांहीं फौज जमवून त्यानें गज्नी येथें एका स्वतंत्र राज्याची स्थापना केली. तेव्हां ह्या राज्याची पूर्वसरहद्द पंजाबप्रांतास मिळाली. पंजाबांत जयपाळ नामक रजपूत राजा राज्य करीत होता. सिंधुनदी ही ह्या दोन राज्यांची हद्द होती. लवकरच ह्या दोघांमध्यें कलह उत्पन्न झाले, तरी अलतगीनचे कार्किर्दींत युद्धप्रसंग घडला नाहीं. अलतगीन सन ९७६त मरण पावला.

४. सबक्तगीन, (सन ९७७–९९७).—*अलतगीनजवळ सबक्तगीन हाही एक तुर्क गुलाम असून पुढें त्याच्या मर्जीतला झाला होता.* अलतगीननें त्यास आपली मुलगी देऊन आपल्या पाठीमागें राज्याचा वारस नेमिलें. सबक्तगीनची अशी एक गोष्ट सांगतात, कीं पूर्वीं स्वाराची नोकरी करीत असतां त्यानें एक हरिणीचें पाडस पकडिलें. तें घेऊन जात असतां त्या बच्चाची आई हरिणी पाठीमागून धांवत येत आहे असें त्याच्या दृष्टीस पडलें. तेव्हां त्याच्या पोटांत दया येऊन त्या पाडसास त्यानें सोडून दिलें. रात्रीं त्यास स्वप्न पडलें, त्यांत महंमद पैगंबर स्वप्नांत येऊन बोलला, कीं 'आज जें तूं सत्कृत्य केलेंस, तें परमेश्वरापाशीं रुजू आहे, त्याजबद्दल तुला तो राज्यपद देईल.'

राज्यपद मिळाल्यावर सबक्तगीनास फार दिवस स्वस्थ बसतां आलें नाहीं. आरबांनीं सिंधप्रांतांत काय अनर्थ केले होते हें सर्व हिंदु लोक जाणत होते. शेजारीं मुसलमानी राज्य स्थापन झालें ही गोष्ट हिंदुस्थानांतील पश्चिमभागच्या रजपूत राजांस बरी वाटली नाहीं. पुढें आपल्यावर हल्ला येणार, त्याचा आपण अगोदरच प्रतिकार करावा ह्या उद्देशानें कित्येक रजपूत राजे एकत्र मिळाले. त्यांत लाहोरचा जयपाळ राजा प्रमुख होता. पुढें सिंधुनदी उतरून रजपूत फौज सबक्तगीनच्या मुलखांत शिरली. तेव्हां सबक्तगीन आपला मुलगा महंमूद ह्यास बरोबर घेऊन रजपुतांशीं टक्कर देण्यास आला. दोनही फौजा नजीक आल्यावर उघड

ठढाई जुंपणार, त्याच्या आदले दिवशीं जोराचा वारा सुटून तुफान झालें; यामुळें दोनही फौजांची दुर्दशा उडाली. मुसलमानांपेक्षां रजपूत लोक ज्यास्त भयभीत झाले. जयपाळ तह करून परत येण्याचे विचारांत होता, परंतु महंमुदाचे मनांत रजपुतांचा खरपूस समाचार घ्यावयाचा आहे असे ऐकून, सर्वस्वाचा नाश करून व मुलांबाळांस ठार मारून समरांगणीं लढून मरूं, असें जयपाळानें निकराचें उत्तर दिलें. तें ऐकिल्यावर सबक्तगीननें कांहीं हत्ती व द्रव्य जयपाळापासून घेतलें, आणि दरसाल खंडणी पाठवीत जाण्याचें त्याजकडून कबूल करवून, व ह्या शर्ती पाळण्याबद्दल कांहीं असामी ओलीस घेऊन, त्यानें रजपूत फौजेस परत जाऊं दिलें.

जयपाळास ह्या कृत्याची फार लाज वाटली. सबक्तगीनचे लोक खंडणी मागावयास आले, त्यांस त्यानें कैदेंत टाकिलें व खंडणी पाठविली नाहीं. तेव्हां सबक्तगीन चवताळून जयपाळावर आला. जयपाळ स्वस्थ बसला नव्हता. सबक्तगीन काय सूड घेईल ह्याची त्यास कल्पना होती. सबब बहुतेक रजपूत राजांचा त्यानें एकोपा केला. दिल्ली, अजमीर, कनोज, कलिंजर येथील व दुसरे रजपूत राजे त्यास येऊन मिळाले. एकंदर एक लाख फौजेनिशीं जयपाळ सबक्तगीनवर चालून गेला. परंतु लढाईत जयपाळास जय मिळाला नाहीं. सबक्तगीननें पांचपांचशें लोकांच्या टोळ्या करून हिंदूंस जेरीस आणिलें. तेव्हां रजपूत फौजेंत गोंधळ उडून सर्व लोक पळून गेले, आणि सबक्तगीनास पुष्कळ लूट प्राप्त झाली. पुढें सरहद्दीच्या बंदोबस्तास खैबर घांटाच्या तोंडावर दहा हजार फौज कायमची ठेवून, सबक्तगीन परत गेला.

सबक्तगीन सन ९९७ त मरण पावला. त्यानें मोठ्या शहाणपणानें व न्यायानें वीस वर्षें राज्य केलें. मरणसमयीं त्यानें आपला मुलगा इस्माईल यास आपला वारस नेमिलें. दुसरा मुलगा महंमूद हा पराक्रमी, पण दासीपुत्र होता. सबक्तगीन मरण पावल्यावर महंमुदानें इस्माईलास पकडून कैदेंत ठेविलें, आणि आपण राज्यपद बळकावून 'सुलतान' ही पदवी धारण केली, (सन ९९९). हा वेळपर्यंत कोणींही तुर्क राजानें सुलतान हें पद धारण केलें नव्हतें. हिंदुस्थानच्या सरहद्दीवर या तुर्क बादशाहीच्या स्थापनेमुळें मुसलमान व हिंदु या दोन धर्मांचा झगडा सुरू झाला.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

१. सुलतान महंमूद, व त्याच्या स्वाऱ्या.—महंमद तालीमबाज होता. त्याचें शरीर घटलेलें होतें. जसा शूर तसाच तो जबरदस्त महत्त्वाकांक्षीही होता. पहिल्या एकदोन वर्षांत त्यानें पश्चिमेकडे युद्धप्रसंग केले, आणि खुरासान वगैरे प्रांत घेऊन बुखाऱ्याच्या सामानी राजवंशास बुडविलें. पुढें महत्त्वाकांक्षेस दुसरीकडे जागा उरली नाहीं, तेव्हां त्याची दृष्टि हिंदुस्थानाकडे वळली. त्याचीं विशेष कारणें खालीं लिहिल्याप्रमाणें झालीं.

(१) पूर्वीच्या मुसलमानांनीं मोठमोठे पराक्रम करून धर्मवृद्धि केली आणि नांवलौकिक मिळविला; त्याप्रमाणें हिंदुस्थानावर स्वारी करून तेथें धर्मवृद्धि करण्याची त्यास जबरदस्त इच्छा उत्पन्न झाली. ह्या कामांत त्यास अपयश येण्याची भीति वाटली नाहीं. कारण, हिंदुस्थानांत लहान लहान अनेक राज्यें असून, त्यांमध्यें स्नेहभाव नव्हता, हें त्यास माहीत होतें.

(२) हिंदुस्थान हें केवळ संपत्तीचें घर आहे, असें त्यास ऐकून, व बापाबरोबरील स्वाऱ्यांत हजर असल्यामुळें प्रत्यक्ष पाहून ठाऊक होतें. तेव्हां अपार संपत्तीचा लाभ व साधल्यास आपल्या राज्याची वृद्धि हिंदुस्थानांत होईल असें त्यास वाटलें.

(३) त्याजपाशीं फौज पुष्कळ होती. तिला रिकामी ठेवून पगार देण्यापेक्षां लढाईंत उपयोग केल्यास लूट वगैरे मिळून ती खुष राहील असें त्यानें ताडिलें. फौजेला तो फार प्रिय होता, आणि स्वराज्यांत त्यानें सर्व प्रकारची स्वस्थता केली होती. तेव्हां हिंदुस्थानावर स्वाऱ्या करण्यास त्यास चांगलें फावलें.४

हे हेतु मनांत धरून त्यानें प्रथम इ. स. १००१ ह्या वर्षी हिंदुस्थानावर पहिली स्वारी केली; आणि हा क्रम एकदां सुरू झाल्यावर त्यानें हिंदुस्थानावर लहान मोठ्या सतरा स्वाऱ्या केल्या, त्यांतील खालील बारा विशेष प्रसिद्ध आहेत.

महंमुदाच्या स्वाऱ्या,—पहिली, (इसवी सन १००१).—नोव्हेंबर महिन्यांत दहा हजार स्वार घेऊन महंमुदानें गज्नी सोडून पेशावरच्या मैदानांत तळ दिला. तेव्हां लाहोरचा राजा जयपाळ सिंधुनदी उतरून त्याजवर गेला. त्याचें सैन्य अफाट होतें, पण त्यांत शिस्त नव्हती. ता० २७ नोव्हेंबर रोजीं दोनप्रहरपर्यंत निकराची लढाई होऊन जयपाळ

व त्याचे सरदार महंमुदाचे हातांत सांपडले. जयपाळाचें सर्व जडजवाहिरही महंमुदास मिळालें. पुढें मोठा दंड भरून जयपाळानें आपली सुटका करून घेतली, आणि दरसाल महंमदास खंडणी पाठविण्याचें कबूल केलें. महंमूद, लाहोरनजीक असलेलें भाटिंदा शहर लुटून, गज्नीस परत गेला. बंदींतून सुटून आल्यानंतर जयपाळ राजानें आपला मुलगा अनंगपाळ यास आपल्या गादीवर बसविलें, आणि एकामागून एक संकटें कोसळून अप्रतिष्ठा झाली ती त्याला सहन न होऊन, त्यानें अग्निप्रवेश केला.'

दुसरी स्वारी, (सन १००४).—बापानें महंमुदाशीं केलेल्या कराराप्रमाणें चालण्यास अनंगपाळ कबूल होता. पण त्याचा पोटहिस्सेदार भाट्याचा राजा विजयराय आपल्या वांटणीची खंडणी महंमुदास देईना, व महंमुदाशीं द्वेषभावानें वागूं लागला. तेव्हां महंमूद सिंधुनदी उतरून मुलतानच्या बाजूनें भाट्याच्या राज्यांत शिरला. रजपुतांनीं मोठ्या निकरानें त्याशीं युद्ध करून अनेक झगड्यांत त्यास हटविलें. तेव्हां महंमुदानें आपल्या फौजेसमोर मक्केकडे तोंड करून जमिनीवर गुडघे टेंकून परमेश्वराची आराधना केली, आणि उठून आपल्या फौजेस बोलला, ' गड्यांनो, परमेश्वरानें आज आपणांस फत्ते दिली आहे; भिऊं नका.' त्यासरशी त्याची फौज आवेशानें रजपुतांवर चालून गेली. तेव्हां विजयराय किल्ल्याचे आश्रयास गेला. पुढें मुसलमानांनीं तो किल्ला घेतल्यावर विजयरायानें सिंधुनदीच्या रानांत पळून जाऊन जीव दिला. या प्रसंगीं महंमुदास अपार लूट मिळाली. भाट्याचें राज्य त्यानें आपले राज्यास जोडिलें.

तिसरी स्वारी, (सन १००५).—अब्दुल फत्ते लोदी ह्या गृहस्थास महंमुदानें मुलतानचा सुभेदार नेमिलें होतें. तो अनंगपाळास सामील होऊन महंमुदास विचारीनासा झाला. तेव्हां महंमुदानें पुनः पेशावराकडून पंजाबप्रांतावर स्वारी केली. अनंगपाळ पराभव पावून काश्मिराकडे पळाला. मुलतान महंमुदानें घेतलें. अब्दुल फत्ते लोदी शरण आला. तिकडे अफगाणिस्तानांत इलीकखान नामक सरदारानें खुरासान प्रांतावर हल्ला केल्यामुळें, पंजाबचा कसाबसा बंदोबस्त करून महंमूद परत गेला. परत गेल्यावर इलीकखानाचा पराभव करून त्यास महंमुदानें हांकून लाविलें.

चौथी स्वारी, (सन १००५–६).—महंमूद परत जातांच इकडे अनंगपाळानें सर्व रजपूत लोकांशीं एकोपा करून महंमुदाशीं लढण्याची जंगी तयारी केली. धर्माचा पाडाव व देवालयांचा विध्वंस ह्यांचे योगानें सर्व रजपुतांस मुसलमानांविषयीं विशेष त्वेष चढला होता. इतकें अपार सैन्य समरांगणीं पूर्वी कधींही आलें नव्हतें. महंमुदास ही बातमी समजतांच तो दबत दबतच पुढें आला. ह्या प्रसंगीं हिंदु स्त्रियांनीं आपलें जवाहीर व दागिने विकून ह्या धर्मयुद्धाकरितां दूरदूरच्या देशांतून सामग्री पाठविली. डोंगराळ प्रदेशांतील गकर व दुसरे लढाऊ लोक हिंदूंच्या पक्षास मिळाले. आरंभीं हिंदूंची सरशी होती. महंमूद सोयकर संधीची वाट पाहत होता. पुढें अनंगपाळ निकरानें लढत असतां त्याचा हत्ती तीर व गोळे लागून घाबरून रणभूमीवरून पळत सुटला. त्याबरोबर आपला अधिपति पळाला असें वाटून हिंदु फौजेचा जोर खचला. ते युद्ध सोडून पळून गेले. महंमुदास विजय प्राप्त झाला, आणि द्रव्यलोभाची उत्कट इच्छा तृप्त करण्याची त्याला संधि मिळाली. हिमालयाच्या दक्षिणउतरणीवर नगरकोट येथें एक देवस्थान होतें. तेथें ज्वालामुखी पर्वत असल्यामुळें तें फार पवित्र मानिलें जात असे. आसपासच्या राजेरजवाड्यांनीं तेथील देवास विपुल देणग्या दिल्यामुळें, तेथें अपार संपत्ति जमली होती. समरांगणीं सर्व फौज आल्यामुळें देवालयाजवळ कांहींच बंदोबस्त नव्हता. ही संधि साधून महमुदानें एकाएकीं येऊन तेथची सर्व संपत्ति लुटून गज्नीस प्रयाण केलें. 'ह्या प्रसंगीं सात लक्ष सुवर्ण दिनार,* सातशें मण सोन्याचांदीचे दागिने, दोनशें मण सोन्याच्या लगडी, दोन हजार मण चांदी; मोत्यें, हिरे वगैरे वीस मण जवाहीर, इतकें द्रव्य महंमुदास मिळालें.' असें फेरिस्ता म्हणतो.

ह्या दिव्य विजयाच्या सन्मानार्थ महंमुदानें गज्नीस एक मोठा समारंभ केला. या समारंभामध्यें सोन्याचीं सिंहासनें व मेजें तयार करून त्यावर

* दिनार हें मुसलमानांचें सोन्याचें नाणें होतें. त्याच्या किंमतीचें प्रमाण सर्वत्र सारखें नाहीं. आरब दिनार वजनानें अर्ध्या गिनी एवढा होता; म्हणजे हल्लींच्या भावानें त्याचे जवळ जवळ आठ रुपये होतात. हिंदुस्थानचा मण ८० शेरांचा, इराणी मण ११ शेरांचा, व आरबी मण २ शेरांचा आहे. आरबी मण धरिला तरी वरील संपत्तीची किंमत पुष्कळ होते.

हिंदुस्थानांतील सर्व लूट व्यवस्थितपणें मांडून लोकांस दाखविली; तसेंच अनेक मेजवान्या देऊन, आणि गोरगरिबांस दानधर्म, व थोर पदवीच्या गृहस्थांस व साधूंस नजराणे करून, महंमुदानें सर्वांस संतुष्ट केलें.

महंमद सूरचा पराभव.—हिरातच्या पूर्वेस घोर म्हणून एक डोंगराळ प्रांत आहे. सन ७३३ च्या सुमारास हा प्रांत खलीफांच्या ताब्यांत जाऊन तेथील सूर जातीच्या अफगाण लोकांनीं मुसलमानी धर्म स्वीकारिला होता. सन १०१० मध्यें महंमुदानें तेथील शूर सरदार महंमद याचा पराजय करून तो प्रांत जिंकिला. ह्याच सूरवंशी सरदारांनीं गज्नी येथील महंमुदाच्या वंशाचा पुढें नाश केला.

पांचवी स्वारी, (सन १०१०).—महंमुदानें पंजाबांत येऊन मुलतान घेतलें, *आणि फत्ते लोदी यास कैद करून गज्नीस नेलें.*

*महंमुदानें **सहावी स्वारी** १०११त केली, आणि स्थानेश्वर येथील मातबर देवालय लुटलें; तेथील मूर्ती फोडिल्या आणि मुख्य देवाची मूर्ति गज्नीस* नेली. अनंगपाळानें महंमुदास अडविण्याचे प्रयत्न केले, पण ते सिद्धीस गेले नाहींत. सन १०१३ व १४ ह्या वर्षी महंमुदानें काश्मीरप्रांतावर **दोन स्वाऱ्या** केल्या, पण त्या फारशा महत्त्वाच्या नाहींत. पुढील दोन तीन वर्षांत त्यानें मध्यआशियांत मोहिमा करून, समर्कंद, बुखारा वगैरे प्रांत जिंकिले; आणि कास्पियनसमुद्रापर्यंत आपल्या राज्याची मर्यादा वाढविली.

नववी स्वारी, (सन १०१७).—ही स्वारी महत्वाची आहे. आजपर्यंत महंमुदानें पंजाबप्रांतापलीकडे आपला प्रवेश केला नव्हता; पण त्याला लुटीची चव लागून गंगानदीच्या कांठीं मोठमोठीं मातबर शहरें आहेत हें त्यास समजल्यामुळें, त्यानें फौजेचा वगैरे चांगला बंदोबस्त करून हिंदुस्थानावर स्वारी करण्याचा बेत केला. ह्या वेळीं त्याची फौज एक लाख स्वार व वीस हजार पायदळ इतकी होती. तो हिमालयाच्या लगत्यानें थोडथोड्या मजला करीत एकदम कनोजशहरावर आला. कनोजशहर आग्र्याचे पूर्वेस व कानपूरच्या वायव्येस गंगेपासून कांहीं मैलांच्या अंतरावर असून त्या वेळेस तें फार नामांकित व संपत्तिमान होतें. कनोजचा रजपूत राजा कुवरराय ह्यास महंमुदाच्या येण्याची कल्पना नव्हती, महंमुदापुढें आपला उपाय चालणार नाहीं हें जाणून, कुवरराय त्यास एकदम शरण गेला. कुवररायास उपद्रव न देतां महंमूद मथुरेस

गेला. तेथील कृष्णाचीं भव्य मंदिरें लुटून, मूर्ती वगैरे वितळवून, सांपडलेली संपत्ति बरोबर घेऊन तो स्वदेशीं निघून गेला. हिंदुस्थानांतील सुंदर इमारती पाहून गज्नी शहरांत महंमुदानें त्या मासल्याच्या पुष्कळ इमारती व एक भव्य मशीद बांधिली. त्याच्या दरबारच्या लोकांनींही त्याचें या बाबतीत चांगलें अनुकरण केलें.*

दहावी व अकरावी स्वारी, (सन १०२१–१०२३).–कनोजचा राजा महंमुदास शरण गेला, म्हणून त्याजविरुद्ध इतर रजपुतांनीं कट केला. बुंदेलखंडांतील कलिंजरच्या नंदराजानें कनोजवर स्वारी केली. कनोजचे राजानें महंमुदाची मदत मागितली. महंमूद धांवत आला. पण तो येऊन पोंचण्यापूर्वींच कनोजच्या राजास कलिंजरचे राजानें ठार मारिलें होतें. महंमुदानें कलिंजरवर हल्ला केला, पण तेथें विशेष फायदा न होतां त्यास परत जावें लागलें. लाहोरचा राजा अनंगपाळ व त्याचा मुलगा जयपाळ हे रजपुतांचे कटांत सामील झाले होते; म्हणून लाहोरप्रांत महंमुदानें जिंकून आपले राज्यास जोडिला, आणि त्याचे संरक्षणार्थ सिंधुनदाचे पूर्वेस कायमची फौज ठेवून दिली. हाच हिंदुस्थानांतील मुसलमानी राज्याचा पाया होय. अकराव्या स्वारींत महंमुदानें कलिंजरचा नंदराज व ग्वालेरचा राजा यांस जिंकिलें, आणि त्यांजपासून दंड घेऊन महंमुदानें त्यांचीं राज्यें त्यांस परत दिलीं.

५. सोमनाथची स्वारी, (सन १०२४).—ही स्वारी सर्वांत मोठी व महत्त्वाची आहे. स्वारी करावी तर सोमनाथच्या सारखी करावी असें मुसलमान लोक अद्यापि म्हणतात. काठेवाड द्वीपकल्पास पूर्वीं सौराष्ट्र असें नांव होतें. त्याचे दक्षिणटोंकाजवळ लहानशा द्वीपकल्पावर सोमनाथाचें एक पवित्र व प्रख्यात देवालय होतें. ' सौराष्ट्र सोमनाथ ' ह्या शब्दांचा अपभ्रंश होऊन ह्या देवालयास सोरटीसोमनाथ म्हणत. गज्नी येथून

---

* हिंदुस्थानांतील इमारतींविषयीं महंमुदानें खालील मजकुराचें पत्र गज्नी येथील आपल्या कारभाऱ्यास पाठविलें. ' या ठिकाणीं हजारों मजबूद इमारती आहेत; बहुतेक आरसपानाच्या आहेत. देवालयें तर असंख्य आहेत. ह्या कनोजशहरास प्रस्तुत वैभव प्राप्त होण्यास कोट्यवधि दिनारांचा खर्च लागला असेल यांत संशय नाहीं. दोनशें वर्षांच्या काळांत सुद्धां अशल्या इमारती बांधणें अशक्य आहे.

हें एक हजार मैल दूर आहे. दरसाल या क्षेत्रीं असंख्य यात्रा जमे. सोमनाथाइतकें विख्यात व श्रीमान देवस्थान सर्व हिंदुस्थानांत नव्हतें. सोमनाथाचे मूर्तीस समुद्रलाटा स्नान घालीत. त्याच्या पूजेस एक हजार ब्राह्मण नेमिलेले होते. सोमनाथाची इतर देवांवर वक्रदृष्टि झाल्यामुळें, महंमुदानें त्यांचीं देवळें जमीनदोस्त केलीं, पण सोमनाथ त्यास जिंकितां येणार नाहीं असा ह्या देवालयाविषयीं लोकांचा ग्रह होता. हा लोकांचा समज ऐकून महंमुदास त्वेष चढला. सोमनाथाचा विध्वंस केल्याची कीर्ति मिळविण्याची, आणि तेथची अपार संपत्ति हरण करण्याची त्यास जबर इच्छा उत्पन्न झाली. गज्नीहून सोमनाथाकडे येण्याचे दोन मार्ग आहेत. एक सिंधदेशांतून हल्लींच्या बोलन व खोजाक घाटांनीं, आणि दुसरा खैबर घाटानें पेशावर, मुलतान व अजमीर ह्या प्रांतांतून. सिंधप्रांतांतील मार्ग अवघड व वाळवंटातून असल्यामुळें महंमुदानें दुसरा मार्ग स्वीकारिला, आणि तीस हजार स्वार, आणि तीस हजार उंट, पाणी व धान्य यांनीं लादलेले बरोबर घेतले. स. १०२४ च्या ऑक्टोबर महिन्यांत तो मुलतानास पोंचला आणि तेथून सर्व तयारीनिशीं अजमिरावर आला. तेथें रजपूत राजांची कांहींच तयारी नव्हती. महंमूद येतांच अजमीरचा राजा पळून गेला. गुजराथेंत त्या वेळेस चालुक्य नांवाचे राजे अनहिलवाडा ऊर्फ अनहिलपट्टण येथें राज्य करीत होते. अजमिराहून महंमूद अनहिलवाड्यास आला. तेथचा राजाही पळून गेला होता. तेव्हां अनहिलपट्टण घेण्याचे नादास न पडतां महंमूद थेट सोमनाथावर आला.

देवालयाच्या सभोंवार भक्कम तट असून त्यावर मजबूद पहारा होता. ‘सोमनाथ तुम्हा सर्वांचा संहार करील.’ असें एका दूतानें येऊन महंमुदास कळविलें. दुसऱ्या दिवशीं शुक्रवार होता. सकाळींच महंमुदानें ‘अल्ला हो अकबर’, अशी आरोळी ठोकून किल्ल्यावर हल्ला सुरू केला. तीन दिवस निकराचें युद्ध झालें. इतक्या अवधींत आसपासचे रजपूत राजे व अनहिलवाड्याचा राजा हे देवालयाचे संरक्षणास धांवत आले. मुसलमानांचे प्रयत्न निष्फळ होऊं लागले. तेव्हां महंमुदानें गुडघे टेंकून प्रार्थना केली आणि ईश्वराचा कौल मिळाल्याप्रमाणें एकदम उठून तो रजपुतांवर उलटला. अशा अधिपतीपुढें पळून जाणें लांच्छन होय असें समजून त्याचे मागोमाग त्याची फौजही घुसली. हा निकराचा हल्ला सहन न

होऊन रजपूत लोक वाट फुटेल तिकडे पळाले. कित्येक तर होड्यांत बसून निघून गेले. तेव्हां महंमुदाचा देवालयांत प्रवेश झाला. ब्राह्मणांच्या गर्दीतून महंमूद कांहीं अनुयायांसह देवालयांत शिरला. देवालयांत एकच दिवा असून तें भयाण दिसत होतें. मंडपाच्या खांबावर नानातऱ्हेचीं चित्रें खोदलेलीं होतीं. सोन्याच्या सांखळ्यांनीं बांधिलेल्या अनेक घंटा लोंबत होत्या. महंमूद थेट गाभाऱ्यांत गेला. मूर्ति नऊ फूट उंच होती. ब्राह्मणांनीं नानातऱ्हेच्या विनवण्या करून सांगितलें, 'तुम्ही मूर्तीस हात न लावाल, तर सोन्याच्या राशी देण्यास आम्ही तयार आहों.' महंमूद बोलला, 'मूर्ति विकणारा (बुत्फरोश्) अशा कीर्तीपेक्षां, ती फोडल्याची (बुत्शिकन्) कीर्ति मला ज्यास्त प्रिय आहे.' नंतर आपला सोटा मारून त्यानें ती मूर्ति फोडिली. तत्क्षणीं हिरेमाणकांचे ढीग त्या मूर्तीतून खालीं पडले. हें द्रव्य ब्राह्मण देत होते त्यापेक्षां अनेकपट ज्यास्त होतें.

इराण, आरबस्तान वगैरे देशांतून अनेक प्रवासी हिंदुस्थानांत येत, त्यांजपासून प्रत्यक्ष माहिती मिळवून झकेरिया कझीनी नांवाच्या पर्शियन गृहस्थानें स. १२६३त लिहिलेली हकीगत उपलब्ध आहे; तींत सोमनाथाविषयीं खालील मजकूर आहे.

'सोमनाथाच्या मंदिरास छप्पन्न सागाचे खांब होते. मूर्तीच्या गाभाऱ्यांत गुडुप अंधार होता; पण तेथें रत्नखचित झुंबरांचा लखलखाट पडत असे. चंद्रग्रहणप्रसंगीं लाखों यात्रा दर्शनास जमे. भरतीच्या वेळेस मूर्तीला समुद्रस्नान होई. मंदिराच्या खर्चास दहा हजार गांवांचें उत्पन्न लावून दिलेलें होतें. शिवाय हजारों वर्षें भाविक लोकांनीं देवास अर्पिलेल्या नानाविध देणग्यांच्या योगानें मंदिरांत अपार संपत्तीचा संचय झाला होता. देवाच्या स्नानास दररोज काशीहून गंगोदकाची कावड येत असे. देवाच्या पूजेस एक हजार ब्राह्मणांची नेमणूक होती, आणि पांचशें कलावंतिणी होत्या. मुख्य मूर्तीशिवाय सभोंवार सोन्याचांदीच्या आणखी शेंकडों मूर्ती होत्या. देवाच्या पूजेस मौल्यवान उपकरणीं होतीं, त्यांची तर गणतीच नाहीं. ह्या सर्व संपत्तीचा अंदाज दोन कोटी पौंड म्हणजे आजच्या भावानें तीस कोटी रुपये होतो.

सोमनाथाची मूर्ति सामान्य मनुष्याच्या आकाराची होती. हातांच्या मुठी वळून त्या गुडघ्यांवर टेंकिलेल्या होत्या. मूर्तीचा वर्ण रक्तकृष्ण असून,

डोळ्यांत हिरे बसविलेले होते, ते नेहमीं चमकत असत. मूर्तीस खालीं किंवा वर आधार कांहीं एक नव्हता. ती अंतराळीं लटकत होती. गज्नवी महंमूद हा चमत्कार पाहून थक्क झाला खालीं वर कांहीं तरी अदृश्य आधार मूर्तीला असेल असें वाटून, भाल्यानें त्यानें सर्व बाजू तपासून पाहिल्या. पुढें विचार करितां एकानें कल्पना काढिली, कीं मूर्ति लोखंडाची असून डोक्यावरील छत्रास लोहचुंबक बसविलेला असावा, आणि त्याच्या आकर्षणानें मूर्ति अंतराळीं लटकत असावी. कांहींना ही कल्पना पटली; कांहींना ती खरी वाटेना. तेव्हां वरील छत्राचे एक दोन तुकडे काढून मूर्तीचा तोल बिघडतो कीं काय हें पाहण्यास महंमुदानें आज्ञा केली; त्याप्रमाणें वरचे दगड काढितांच मूर्ति डळमळूं लागली; आणखी ज्यास्त दगड काढिल्याबरोबर ती हळू हळू खालीं जमिनीवर बसली.'* (*काय हें कसब, काय ही संपत्ति, व काय तिचा विनियोग!!*)

सोमनाथ येथें थोडे दिवस राहून महंमूद परत निघाला. अनहिलवाड्याचा राजा भीमदेव गुंदाव किल्ल्याचा आश्रय करून राहिला होता. तो किल्ला घेऊन आणि तेथचें द्रव्य हरण करून महंमूद अनहिलवाड्यास गेला. तेथें त्यानें बराच मुक्काम केला. गुजराथेंतील बागबगीचे, हिरवीगार शेतें, व फलपुष्पांचे आल्हाददायक मळे पाहून तेथेंच राजधानी स्थापन करून राहवें असा त्याचा मनोदय होता. गुजराथेंत सोन्याच्या खाणी आहेत असेंही त्यास समजलें होतें. परंतु त्याचे सल्लागार हिंदुस्थानांत राहण्याच्या विचारास अनुकूल नव्हते. म्हणून तो बेत रहित करून गुजराथेंत एकंदर वर्षभर मुक्काम झाल्यावर तेथच्या राज्यावर एका इसमाची स्थापना करून तो स्वदेशीं निघाला. राजा भीमदेव व इतर रजपूत राजे त्याच्या अजमीरच्या वाटेवर त्यास अडविण्याकरितां टपून बसले होते. हें त्यास कळतांच सिंधच्या वाळवंटांतील नवीन मार्गानें तो गज्नीकडे जाऊं लागला. ह्या वाटेंत

---

* कित्येकांच्या मतें सोमनाथाची मूर्ति मुळींच नव्हती, फक्त एक लिंग होतें. सोमनाथाचें स्थान बारा ज्योतिर्लिंगांपैकीं एक आहे. महंमुदानं गज्नीस जीं छकलें नेलीं तीं ह्या लिंगाचीं असलीं पाहिजेत. मूर्तीची हकीगत फेरिस्त्यानें दिलेली झूट आहे असें लेन पूल म्हणतो. तथापि मूर्ति व लिंग हीं दोनही असण्याचाही संभव आहे.

उन्हाळ्या तापानें व नानातऱ्हेच्या रोगांनीं त्याच्या फौजेवर पुष्कळ अनर्थ गुदरले. वाटाड्यांनीं भलतेच रस्ते काढून त्यांस फसविलें; आणि सोमनाथावरील अरिष्टाचा थोडाबहुत सूड घेतला. सिंधुनदीस पायउतार नव्हता. महंमुदानें बरोबर होड्या ठेविल्या होत्या. त्यांत बसून सिंधप्रांतांतून लोकांशीं एकसारखे झगडे करीत, मोठ्या कष्टानें तो मुलतानास पोंचला व तेथून स्वदेशीं गेला. सोमनाथाच्या मूर्तीचीं छकलें व देवालयाचे दोन नकशी काम केलेले मोठे चंदनी दरवाजे त्यानें गज्नीस नेले. मूर्तीचें एक छकल त्यानें गज्नीच्या मशीदीस लाविलें, आणि दुसऱ्याचे दोन तुकडे करून ते मक्केस व मदिनेस पाठवून दिले. महंमुदाच्या मुलानें सोमनाथाचे दरवाजे बापाच्या कबरेस लाविले. आठशें वर्षांनीं म्हणजे सन १८४२त हे दरवाजे इंग्रजांनीं मोठ्या समारंभानें मिरवीत आग्र्यापर्यंत परत आणिले. तेथच्या किल्ल्यांतील एका कोंठडींत ते हल्लीं पडून आहेत, असें म्हणतात.*

ह्यापुढें महंमुदानें हिंदुस्थानावर स्वारी केली नाहीं. इराणावर त्यानें एक स्वारी करून तिकडील बराच प्रदेश जिंकिला. पुढें महंमुदास मधुमेहाचा विकार जडला, आणि त्याच योगानें तो आपल्या वयाच्या त्रेसष्टावे वर्षी सन १०३० ह्या सालीं ता. ३० एप्रिल रोजीं मरण पावला. हिंदुस्थानावर स्वाऱ्या करण्याचा जो त्यानें एकसारखा पंचवीस वर्षे उद्योग केला, त्यामुळें हिंदुस्थानांत येण्याची मुसलमानांची वाट चांगली मळून गेली, पंजाबप्रांत त्यांच्या हस्तगत झाल्यानें पुढील राज्यस्थापनेस त्याचा पायासारखा त्यांस उपयोग होऊं लागला, आणि आपणांस हिंदुस्थान जिंकितां येईल, अशी आत्मप्रतीति मुसलमानांच्या ठिकाणीं उत्पन्न झाली.

---

* सोमनाथाचे चंदनी दरवाजे इंग्रजांनीं स. १८४२ त परत आणिले ही गोष्ट सांगून, मेडोज टेलर म्हणतो, गज्नीहून आणिलेले दरवाजे सोमनाथाचेच कशावरून ? सोमनाथाचे नसल्यामुळेंच ते आग्र्यास पडून राहिले. सोमनाथ गायकवाडच्या ताब्यांत असल्यामुळें, त्यांनीं ते आपल्या ताब्यांत घ्यावे असें इंग्रजसरकारानें गायकवाड दरबारास कळविलें. त्याप्रमाणें गायकवाडांनीं ते आणिले नाहींत असें दिसतें. ते सोमनाथाचे नव्हत अशाबद्दलचा पुरावा टेलरनें दिलेला नाहीं.

६. **महंमुदाची योग्यता.**—गझनीच्या महंमुदाचें नांव आजतागाईत हिंदुस्थानांत प्रसिद्ध आहे. मुसलमान ग्रंथकार त्याची अतिशय तारीफ करितात. तो पैशाचा फार लोभी होता. मरणापूर्वी त्यानें आपली सर्व दौलत एके-ठिकाणीं आणवून तिची शेवटची भेट घेतली; तेव्हां आपण आतां तीस मुकणार असें मनांत येऊन, त्यास रडूं आलें. तरी तीपैकीं त्यानें कोणास कांहीं दिलें नाहीं. हा महान पराक्रमी, चंचल, साहसी व व्यवहारचतुर होता. निष्पक्षपातानें तो सर्वांस सारखा न्याय देई. राज्याच्या अंतर्व्य-वस्थेंत त्यानें फारसें लक्ष घातल्याचें दिसत नाहीं. त्यास विद्येची अभि-रुचि फार होती. त्यानें गझनी येथें एक मोठी पाठशाळा व पदार्थसंग्रहालय स्थापिलें हा कवींचा मोठा भोक्ता होता. अन्सारी, व फिर्दोसी हे प्रसिद्ध कवि त्याच्या पदरीं उदयास आले. त्यानें शिल्पकलेसही चांगलें उत्तेजन दिलें. हिंदुस्थानांतील कारागीर आणवून त्यानें गझनी शहरांत नानातुऱ्हेच्या इमारती वगैरे सुंदर कामें करविलीं. तो अंतःकरणाचा क्रूर नव्हता. धर्मप्रसा-राच्या कामांत किंवा त्यानें केलेल्या अनेक स्वाऱ्यांत, समजून उमजून त्यानें क्रौर्य किंवा जुलूम केलेला आढळत नाहीं. मुसलमानी धर्मावर त्याची पक्की निष्ठा होती. तरी त्या बाबतींत लोकांवर त्यानें जुलूम केला नाहीं, म्हणून कित्येक मुसलमान ग्रंथकार त्यास दोष देतात. त्याची लष्करी शिस्त फार सक्तीची असे. युद्धकौशल्य त्याचे अंगीं विशेष असावें असें दिसतें. शत्रूंनीं आपला रस्ता अडविला आहे, व त्यांची संख्या अगणित आहे, असें समजून आल्यावर आपल्या लहानशा फौजेची व्यवस्था चतुराईनें करून, भलत्याच मार्गानें जाऊन शत्रूंस फसवावें व हटकून जय मिळवावा, हें सामान्य कसब नव्हे. युद्धकलेच्या इतिहासांत त्याचें नांव चिरस्थायी होण्यास योग्य आहे. महंमूद जरी खर्चिक नव्हता, तरी दरबारचें वैभव व डामडौल कायम राखण्यांत तो आपला हात आखडीत नसे. गझनी शहर सुशोभित करण्यास त्यानें पुष्कळ खर्च व अत्यंत परिश्रम केले. त्याच्या अनेक स्वाऱ्यांत धरून आणिलेले लोक इतके ~~पुष्कळ~~ झाले होते, कीं दर एकास अडीच रुपये देऊनही त्यांस कोणी खरीद करीत नसे. महंमुदाची कायमची फौज पन्नास-साठ हजार होती. शिवाय लढाईच्या प्रसंगीं कांहीं हंगामी फौजही तो ठेवी.

हिंदुस्थानांत आपलें राज्य स्थापन करण्याची त्यास इच्छा होती असें दिसत नाहीं. गुजराथचें राज्य त्याच्या स्वाधीन झालें असूनही त्याजवर

त्यानें एक हिंदु राजा बसविला. पंजाबप्रांत मात्र त्यानें गज्नीच्या ताब्यांत आणिला. त्याजवर महंमूद आपल्या तर्फेचे सुभेदार नेमून पाठवी. तरी तेवढ्यावरून तो हिंदुस्थानचा राजा होता असें म्हणतां येत नाहीं. हिंदुस्थानांत निरनिराळीं हिंदु राज्यें होतीं, त्यांपैकीं कित्येक महंमुदानें जिंकिलीं; त्यांजवर आपल्या पसंतीचे राजे बसविले, आणि कित्येकांपासून फक्त खंडण्या घेतल्या. तथापि तो स्वदेशास गेल्यावर हे राजे तह मोडीत, त्यामुळें महंमुदास पुनः स्वाऱ्या करणें भाग पडे. महंमुदाचा उद्देश राज्यवृद्धीचा नव्हता. धर्मप्रसार करणें व लूट मिळविणें ह्यांपलीकडे त्याला कांहीं आवडत नव्हतें. महंमुदाचे मागून जे राजे गज्नीच्या तख्तावर बसले, त्यांपैकीं कित्येकांनीं हिंदुस्थानावर स्वाऱ्या केल्या. एकानें तर कांहीं दिवस लाहोर शहर आपली राजधानी केली होती. पण एकंदरींत महंमुदाच्या वंशानें हिंदुस्थानावर राज्य केलें असें म्हणतां येत नाहीं. राज्यस्थापना झाली नाहीं, त्याप्रमाणें मुसलमानी धर्माचा प्रसारही हिंदुस्थानांत झाला नाहीं. आरबस्तानांतील अस्सल मुसलमानांप्रमाणें जुलुमानें लोकांस बाटविणें किंवा त्यांच्या पाठीमागें जिझिया करावें शुक्लकाष्ठ लावणें, ह्या गोष्टी महंमुदानें केल्या नाहींत. ह्या सर्व प्रकारांवरून पाहतां महंमूद सज्जन होता असें दिसतें. त्याच्या वेळच्या इतर राजांशीं तुलना केली असतां महंमुदाची योग्यता फार मोठी दिसेल हें निर्विवाद आहे. वरचेवर स्वाऱ्या करून त्यानें मूर्ती फोडिल्या व देवालयें हस्तगत केलीं, त्यांत पैशाचा लोभच त्याचा मुख्य हेतु होता.

महंमुदानें आपल्या दरबारचा थाट पुष्कळ वाढविला. तो विद्येचा भोक्ता होता. मोठमोठ्या स्वाऱ्या संपवून परत आल्यावर तो आपल्या सभोंवतीं कवि व विद्वान् मंडळी जमवून त्यांच्या समागमांत कालक्रमणा करी. त्यानें निरनिराळ्या देशांतून कवि व कुशल कारागीर गज्नीस आणिले. सामानी राज्य बुडाल्यावर तेथें जे विद्वान् लोक होते, तेही गज्नीस येऊन राहिले. अल्बेरुनी नांवाचा प्रसिद्ध विद्वान् पुरुष मोठा ज्योतिषी असून तो संस्कृत शिकेला होता. तो हिंदुस्थानांत पुष्कळ फिरला. त्याचें प्रवासवृत्त आरबी भाषेंतून इंग्रजींत उतरलेलें प्रत्येकानें अवश्य वाचण्यालायक आहे. फराबी हा विद्वान् साधु होता; उत्बी म्हणून एक इतिहासकार होता, तोच महंमुदाचा सेक्रेटरी होय. बैहाकी नांवाचा दुसरा एक प्रसिद्ध इति-

हासकार महंमुदाजवळ होता. अन्सुरी, फर्रुखी, अस्जूडी, हे फारशींतले अव्वल कवि होत फिर्दौसी तर सर्वांहून श्रेष्ठ झाला; त्याचा 'शहानामा' ग्रंथ अजरामर झाला आहे. ह्या सर्व विद्वानांचा महंमुदानें परामर्ष घेतला; आणि उलट त्यांनीं सुलतानाची कीर्ति भूतलावर पसरिली.

विद्वानांचा परामर्ष घेण्यांत जरी महंमुदानें कसूर केली नाहीं, तरी द्रव्यलोभाचा आरोप त्याजवर आलेला आहेच. त्याजबद्दल अनेकांनीं अनेक आख्यायिका लिहून ठेविल्या आहेत. त्या खऱ्या असल्या, तरी सत्कार्याकडे द्रव्य खर्चण्यास त्यानें कमी केलें नाहीं. दरसाल विद्वान् मंडळीच्या उत्तेजनार्थ त्याचा खर्च तीस लाख रुपये नेमिलेला होता. त्यानें गज्नीस एक मोठी पाठशाळा स्थापून, तिच्यांत पुस्तकालय, पदार्थसंग्रहालय विद्वान् शिक्षक, व शिष्यवृत्ती वगैरेंची तर्तूद केली. त्याची स्वतःची मशीद आरसपानाची असून, सोन्याचांदीच्या दिव्यांनीं व उत्कृष्ट बिछाइतींनीं शृंगारिलेली होती. गज्नी शहरांत त्यानें कालवे आणून हौद व कारंजीं बांधिलीं त्याचा कित्ता त्याच्या सरदारांनीं उचलिला. गज्नी शहर म्हणजे यःकश्चित् मातीच्या झोंपड्यांचें खेडें होतें, तें त्यानें टोलेजंग इमारती उठवून शृंगारिलें. एवढ्या कर्तबगारीचा मनुष्य रानटी होता असें म्हणतां येणार नाहीं. राज्यावर आला तेव्हां गज्नीच्या आसपास थोडासा डोंगराळ प्रदेश त्याच्या ताब्यांत होता; पण मरणसमयीं उत्तरेस आरल व कास्पियन समुद्र, पश्चिमेस तैग्रिस नदी, पूर्वेस हिंदुस्थानचा वायव्यभाग, एवढ्या विस्तृत प्रदेशावर त्याचा ताबा होता. एवढें अफाट राज्य कमावणारा व वरच्या प्रमाणें अनेक लोकोपयोगी कामें करणारा पुरुष सामान्य नव्हे. शूर व धाडसी शिपाई खरा, तसेंच शारीरिक व मानसिक श्रमांतही असामान्य खरा, पण तो मुत्सद्दी नव्हता. आपलें राज्य चिरस्थायी करण्याचे उपाय त्यानें केले नाहींत. तो मरण पावल्याबरोबर त्याचें राज्य विसकळित झालें. न्यायी, उदार, विद्वद्भोक्ता व शिपाई या चार शब्दांत महंमुदाची सर्व कर्तबगारी येते.

महंमुदाच्या वेळची हिंदुस्थानची स्थिति मात्र शोचनीय दिसते. अनेक प्रसंगीं रजपूत राजे एकत्र होऊन महंमुदाशीं लढण्यास आले. त्यांच्या फौजेची संख्या अतोनात होती. असें असतां एकाही प्रसंगीं त्यांस यश मिळालें नाहीं. युद्धाची शिस्त आगाऊ ठरवून ठेवणें हें जें

युद्धकलेचें पहिलें महत्तत्व तें हिंदु लोकांनीं कधींही पाळिलें नाहीं. अनेक प्रसंगीं अगदीं जयप्राप्ति होण्याच्या ऐन गर्दींत, सेनापति पडला, अगर त्यास हत्ती घेऊन पळाला, किंवा निशाण दिसेनासें झालें, कीं हिंदु फौज भयभीत होऊन समर सोडून पळून जाई. महंमुदानें परमेश्वराची आराधना करावी म्हणजे जय ठेवलेला, असें त्यांचे लोकांस वाटे. पण शौर्यवीर्यादि गुणांमध्यें पुरातनकाळापासून नांवाजलेल्या रजपूत लोकांच्या हातून महंमुदाच्या यःकश्चित् फौजेचा मोड एकदांही होऊं नये हें मोटें नवल आहे. एकंदरींत हिंदु राज्यांचा वृद्धापकाळ झाला होता. लोकांचे शौर्याचे व पराक्रमाचे दिवस गेले होते. कोण आला व कोण गेला ह्याची त्यांस चाड राहिलेली नव्हती. अंगांतील सत्त्व निघून गेल्यामुळें जुलमास्तव हातपाय हालवावे, अशांतली त्यांची स्थिति झाली होती. ह्याच्या उलट महंमुदाची स्थिति होती. महंमुदाचे राज्यास नुकता आरंभ झालेला; मुसलमानी धर्माची भरज्वानी; परदेशीं गेल्याशिवाय स्वदेशीं राहून काम भागणारें नव्हतें. तेव्हां अर्थातच मुसलमानांचा तीव्र वेग वृद्ध हिंदूंस सहन झाला नाहीं.

महंमुदाच्या अनेक स्वाऱ्यांत त्याचे जे साथीदार होते, त्यांपैकीं कोणाच्याही मनांत हिंदुस्थानांत कायमची वस्ती करून राहण्याचें नव्हतें. हिंदुस्थानांत एक राज्य नव्हतें. अनेक लहान लहान राज्यें असून त्यांजमध्यें वैमनस्यें होतीं. ह्या कारणास्तव महंमुदास सुलभ विजय प्राप्त झाले. पण त्याच कारणामुळें हिंदुस्थानांत कायमचें राज्य स्थापणें त्यास अशक्य झालें. कारण एक राज्य जिंकावें, तों दुसरें लढण्यास तयार आहेच; असा प्रकार असल्यामुळें, हिंदुस्थान देश मुसलमानांच्या ताब्यांत एकदम येणें शक्य नव्हतें. शिवाय मध्यआशियांतील डोंगराळ मुलखांत राहण्याची संवय झालेले तुर्क हिंदुस्थानांत राहण्यास कबूल नव्हते. महंमुदानें उत्तरेस व पश्चिमेस आपल्या राज्याचा विस्तार पुष्कळ केला होता, आणि त्यांतच तुर्क लोक संतुष्ट होते.

अबुल् आब्बास व अहंमद मैमंदी म्हणून महंमुदाचे दोन प्रख्यात वजीर होते. त्यानें सोन्याचांदीचीं नाणीं पाडिलीं, त्यांपैकीं कांहींचा

संग्रह लंडनच्या ब्रिटिश म्यूझियममध्यें आहे. महंमुदाच्या मागून जे सुलतान गज्नीच्या तख्तावर बसले, त्यांचा हिंदुस्थानच्या इतिहासाशीं फारसा संबंध नाहीं; आणि पुढें त्या वंशांत पराक्रमी पुरुष फारसे झाले नाहींत. त्यांचें वर्णन पुढील प्रकरणीं येईल.

प्रकरण सहावें.

गज्नवी व घोरी घराणीं.

सन १०३०–१२०६.

१. सुलतान मस्-ऊद, (स. १०३०–४०). २. मौदूदपासून तिसरा मस्-ऊदपर्यंत. ३. सुलतान बहराम, (स. १११८–५२). ४. घोरींचा उदय, (स. ११५७-९३). ५. तत्कालीन देशस्थिति,–रजपूत राज्यें. ६. भाट लोक व त्यांची कामगिरी. ७. पृथ्वीराज चव्हाण, (स. ११५९–९३). ८. महंमद घोरीच्या स्वाऱ्या व कारकीर्द. ९. ह्या कालाचें प्रत्यालोचन.

महंमुदाचे पश्चात् जे सुलतान गज्नी येथें झाले, त्यांनीं हिंदुस्थानांत ज्यास्त प्रदेश जिंकिला नाहीं. उलट महंमुदाच्या वेळचा बराच प्रदेश त्याच्या हातांतून गेला. बहुतेक राजे दुर्बल होते. कित्येक तर गज्नीचें राज्य गेल्यावर लाहोर येथेंच येऊन राहिले.

१. सुलतान मस्-ऊद (सन १०३०–१०४०).–महंमुदास दोन जुळे मुलगे होते. एक महंमद व दुसरा मस्-ऊद. आपल्या पाठीमागें महंमदानें गादीवर बसावें असें महंमुदानें ठरविलें होतें. महंमुदाच्या मरणसमयीं दोघेही जवळ नव्हते. मस्-ऊद इस्पहान येथें कारभारावर होता. तेव्हां महंमद गादीवर बसला. 'इराणांतील मुलुख माझ्याकडे तोडून दिल्यास मी एकंदर राज्यावरचा हक्क सोडितों,' असें मस्-ऊदनें महंमदास कळविलें. तें न आवडून महंमद फौज घेऊन इराण प्रांत काबीज करण्याकरितां निघाला. लोकांची व विशेषतः फौजेची भक्ति मस्-ऊदवर ज्यास्त होती. तोही तिकडून महंमुदावर चाल करून आला. कित्येक दिवसपर्यंत दोघांमध्यें युद्धप्रसंग होऊन महंमद मस्-ऊदचे हातांत सांपडला. लगेच

मस्-ऊदनें महंमदाचे डोळे काढून त्यास कैदेंत टाकिलें, व गज्नीचें राज्य बळकाविलें. मस्-ऊद शरीरानें बळकट व शूर होता. आडदांड स्वभावामुळें तो बापास फारसा आवडत नसे. हिंदुस्थानच्या संबंधानें मस्-ऊदची कारकीर्द फारशी महत्त्वाची नाहीं; तरी त्यानें इकडे एक दोन स्वाऱ्या केल्या. सन १०३३त काश्मीरच्या डोंगरांतील सरस्वती किल्ला त्यानें सर केला. पुढील दोन वर्षांमध्यें त्यानें गज्नी येथें एक सुंदर वाडा बांधिला, आणि एक सुंदर रत्नजडित सिंहासन तयार केलें. सन १०३९त त्यानें हिंदुस्थानावर दुसरी स्वारी केली आणि शिवालिक पहाडांतील हंसी नामक बिकट किल्ला सर केला. हा किल्ला अवघड असल्यामुळें मुसलमानांस घेतां येणार नाहीं असा हिंदु लोकांचा समज होता. हंसी घेऊन मस्-ऊद सोनपतास आला. तेथून परत फिरून लाहोर येथें आपला मुलगा मौदूद यास ठेवून तो गज्नीस परत गेला.

गज्नवी राज्यावर हात मारण्यास ह्याच वेळेस सेल्जुक तुर्क पुढें सरसावले. महंमुदासारखेच हे मध्यआशियांतले तुर्क होत. महंमुदाचेंच अनुकरण त्यांनीं केलें. मध्यआशियांत अमूदर्या नदीच्या कांठीं मेंढ्या राखण्याचें काम सोडून देऊन, त्यांनीं दक्षिणेस चाल केली; आणि खुरासान प्रांत बळकाविला. त्यांचा सरदार तुघ्रलबेग स. १०३८ त खुरासान प्रांताचा स्वतंत्र कारभार करूं लागला. हा प्रांत परत घेण्याकरितां मस्-ऊदनें तुघ्रलच्या उत्तरेकडील प्रदेशावर स्वारी केली. तेव्हां तुघ्रल व मस्-ऊद ह्या दोघांची मर्व्हनजीक निकराची लढाई होऊन, मस्-ऊद पराभव पावला. तेथून परत गज्नीस आल्यावर तेथेंही बंडावा सुरू झाला, तेव्हां तो हिंदुस्थानांत आला. इकडेही त्याची फौज त्याजवर उठली. आंधळा महंमद बरोबर होताच. पुढें मस्-ऊदला पदच्युत करून महंमदाला लोकांनीं राज्यपद दिलें; आणि महंमदाचा मुलगा अहंमद कारभार पाहूं लागला. ह्या अहंमदानें मस्-ऊदला ठार मारिलें (स. १०४०).

ख्वाजा अहंमद हसन मैमंदी हा मस्-ऊदचा वजीर मोठा कर्तृत्ववान असून महंमुदाच्या तालमेंत कसलेला होता. त्यानें मस्-ऊदची बाजू चांगली संभाळिली. त्यास वजिरीचें पद देतांना सुलतानानें दरबार भरवून त्याचा मोठा सत्कार केला. त्या दिवशीं गज्नीस वजिराच्या पुढें नानाप्रकारच्या नजराण्यांचे व देणग्यांचे ढीग पडले. ते सर्व त्या राजनिष्ठ वजिरानें

आपल्या धन्यास अर्पण केलें. मैमंदी यास वजिरी देतांना, जुना वजीर हसनाक याचा सुलतानानें शिरच्छेद करविला, त्या वेळीं हसनाकची आई तेथें हजर होती, ती म्हणाली, 'महंमुदासारख्या थोर पुरुषानें माझ्या मुलास इहलोकची सत्ता दिली, तर त्याचा मुलगा मस्-ऊद ह्यानें त्यास परलोकची सत्ता दिली !'

मस्-ऊद भाग्यहीन होता असेंच म्हणावें लागतें ! तो पराक्रमानें कांहीं कमी नव्हता. औदार्यानें अलीची व शौर्यानें रुस्तमची त्यास उपमा देतात. त्याची शक्ति प्रचंड होती. तो हत्तीसही जेर करीत असे. त्यास विद्येचा व इमारतींचा विशेष शोक होता. त्यानें गज्नी येथें अनेक नवीन इमारती बांधिल्या. बैहाकी नांवाच्या मुसलमान गृहस्थानें मस्-ऊदची हकीकत स्वतः पाहिलेली लिहून ठेविली आहे. राज्यकारभाराच्या प्रत्येक बाबतींत मस्-ऊद स्वतः मन घालून काम करीत असे. पण भरंवशाचे म्हणून जे कामगार निरनिराळ्या प्रांतांवर तो नेमी, तेच स्वतंत्र होण्याच्या इच्छेनें त्याजवर उठत. पंजाबचे दोन अधिकारी त्यानें काढून टाकिले. शेवटीं 'तिलक' नांवाचा एक विद्वान् हिंदु गृहस्थ त्यानें पंजाबच्या कारभारावर नेमिला होता. पंजाब प्रांत महंमुदाच्या राज्यांत मोडत होता, म्हणून त्याच्या वंशानें बराच टिकाव धरिला. नाहीं तर, तुर्क लोकांनीं पश्चिमेकडचे बहुतेक डोंगराळ प्रदेश हिसकून घेतले असते.

मस्-ऊदच्या दरबारीं मद्यप्राशनाचा मोठा सपाटा चालत असे. मद्यप्राशनप्रसंगांचीं अनेक वर्णनें बैहाकीनें दिलीं आहेत. स्वतः अमीर, आणि दरबारची व लष्करांतली मंडळी मुद्दाम सुट्या घेऊन चैन करीत. गज्नीजवळ फिरोजबाग म्हणून एक आरामाची जागा होती, तेथें फौजेची परेड झाल्यावर मग मद्यप्राशनाचा समारंभ सुरू होई. गज्नवी महंमूदसुद्धां मद्यप्राशन करी, पण मस्-ऊदचा तडाखा फारच चाले.

२. **सुलतान मौदूद** (स. १०४१–१०४९).—अहंमदानें आपल्या बापाचा वध केला हें वर्तमान मौदूद यास बल्क प्रांतांत समजलें. लगेच तो उतावळीनें फौज घेऊन निघाला. अफगाणिस्तानांतील सर्व मुलुख त्याचे कबजांत आला. तेथून तो थेट लाहोरास गेला. लाहोर येथें आंधळा महंमद होता. दंतुर गांवीं उभयतांची लढाई होऊन मौदूदनें महंमदास पकडून ठार मारिलें, आणि आपण परत गेला. सन १०४३ त

मुसलमानांच्या विरुद्ध उत्तरहिंदुस्थानांतील रजपूत राजांनीं पुनः जमाव केला. हंसी, स्थानेश्वर, नगरकोट वगैरे किल्ले त्यांनीं परत घेतले, आणि लाहोरास वेढा घातला. तेथील मुसलमान लष्करानें जिवावर उदार होऊन आपला बचाव केला. शेवटीं निरुपाय होऊन उपासमार होऊं लागल्यामुळें मुसलमानांनीं वेढा घालणाऱ्या लोकांवर निकराचा हल्ला केला. त्यासरसे हिंदु लोक मागें हटले आणि मुसलमानांची सत्ता कायम राहिली. मौदूद सन १०४९ त मरण पावला.

सन १०४९पासून सन १०९८ पर्यंतच्या पन्नास वर्षांत राज्यांत पुष्कळ घालमेली झाल्या. राजघराण्यांत तंटे होऊन अनेक खून झाले. मौदूदनंतर त्याचा चार वर्षांचा मुलगा मस्-ऊद हा गादीवर आला, पण त्यास मौदूदचा भाऊ अबूल-हसन ह्यानें पदच्युत करून गादी बळकाविली. पंजाब व सिंधप्रांत गज्नवी सुलतानांच्या ताब्यांतून गेले होते, ते त्यानें परत मिळविले. सुलतान महंमुदाचा अबूल-रशीद म्हणून एक मुलगा होता, त्यानें अबूल-हसनापासून सन १०५१त गज्नीचें तख्त बळकाविलें. पण एकाच वर्षानें रसीद यासही मस्-ऊदचा मुलगा फर्रुखजाद यानें पदच्युत केलें. तो सहा वर्षें राज्य करून १०५८त मरण पावला. नंतर त्याचा भाऊ इब्राहीम गादीवर बसला. त्यानें सन १०९८ पर्यंत गज्नी येथें शांतपणें राज्य केलें. ह्याच्या कारकीर्दींत विशेष गोष्टी कांहीं घडल्या नाहींत. सन १०७९ त इब्राहीमनें पंजाबप्रांतावर स्वारी केली होती. इब्राहीम फार धार्मिक असे. त्यानें कुराणाचें भाषांतर केलें. त्यास चाळीस मुलगे व छत्तीस मुली होत्या. दुसरा मस्‌ऊद (१०८८-१११४)

हा बापापेक्षां ज्यास्त शूर व शहाणा होता. त्यानें सर्व कायद्यांचें एकीकरण केलें. तो स्वतः हिंदुस्थानांत आला नाहीं, तरी त्याच्या सरदारांनीं गंगानदीपर्यंत चाल करून पुष्कळ लूट आणिली. ह्याच्या कारकिर्दीत तुर्कांनीं गज्नीचा प्रदेश बहुतेक बळकाविला, तेव्हां गज्नीचे सुलतान पंजाबांत लाहोर येथें येऊन राहूं लागले. मस्-ऊदचा मुलगा अर्स्लान हा आपल्या भावांस कैदेंत टाकून गादीवर बसला, पण सेल्जुक तुर्कांशीं झगडण्याची शक्ति त्याच्यांत नव्हती; म्हणून त्यांचाच आश्रय स्वीकारून तो स्वसंरक्षण करूं लागला. सेल्जुक सुलतान संजर ह्याची बहीण मस्-ऊद ह्यास दिलेली होती, तिचाच मुलगा अर्स्लान. अर्स्लानचें

NATIONAL ARCHIVES OF INDIA

व त्याच्या भावाचें वांकडें आलें, तेव्हां त्या इतर भावांनीं आपला मामा सुलतान संजर ह्यास आपल्या कुमकेस बोलाविलें. तेव्हां संजर व अर्स्लान ह्यांचें तुंबळ युद्ध होऊन, अर्स्लान गज्नी सोडून पळाला. पुढे पुनः संजरशीं लढाईस उभा राहिला असतां पराभव पावून मारला गेला. संजरनें अर्स्लानचा भाऊ बह्राम ह्यास गादीवर बसविलें.

३. सुलतान बह्राम (स. १११८–११५२).—बह्रामनें पुष्कळ वर्षे राज्य केलें. पण त्याच्या कारकीर्दीत तंटे सुरू झाले; त्यांतच ह्या गज्नवी वंशाचा शेवट झाला. पंजाबच्या रजपुतांची व इराणच्या सेल्जुक तुर्कांची गज्नवी सुलतानांस नेहमींच मोठी दहशत वाटत असे. परंतु गज्नवी वंशाचा नाश अखेरीस तिसऱ्याच शत्रूकडून झाला. गज्नी व हिरात ह्यांजमधील डोंगराळ प्रदेशांत घोर म्हणून एक प्रांत आहे. हाच प्रांत *अफगाणांचें मूळ ठिकाण होय. आरबांनीं हा प्रांत जिंकून तेथील लोकांस मुसलमानी धर्माची दीक्षा दिली.* पुढें आरबांचा पाडाव करून घोरचे *अफगाण* स्वतंत्र झाले. त्या प्रांतांत फिरोज-कोह् (उदय-गिरि) नांवाचा किल्ला असून, तेथेंच त्यांनीं आपली राजधानी केली. हा किल्ला स. १०१०त महंमुदानें जिंकिला होता. त्यानें राज्याचा कायमचा नाश न करितां, तेथील लोकांस मात्र आपल्या नोकरींत घेतलें. पण महंमुदाच्या पश्चात् घोरचे अफगाण शिरजोर झाले आणि आपणांस स्वतंत्र समजूं लागले. घोरचा त्या वेळचा अंमलदार कुत् बुद्दीन सूर यास गज्नीच्या बह्रामची मुलगी दिलेली होती. परंतु त्या दोघांत स्नेहभाव बिलकुल नव्हता. उभयतांत कांहीं वैर उत्पन्न झालें, आणि बह्राम यानें आपला जांवई कुत्-बुद्दीन ह्यास पकडून ठार मारिलें. बह्रामची फार न्यायी व दयाशील अशी ख्याति आहे; अशा पुरुषानें प्रत्यक्ष जांवयाचा वध केला. त्याच्या घराण्याचा सर्वस्वी नाश व्हावयास येथूनच आरंभ झाला.

सैफ-उद्दीन व अला-उद्दीन असे कुत्-बुद्दीनचे दोघे भाऊ होते. त्यांनीं भावाचा सूड उगविण्याकरितां हातीं शस्त्र धरिलें. ते गज्नीवर चाल करून आले, तों इकडे बह्राम कर्मानचे डोंगरांत पळून गेला. सैफ-उद्दीन गज्नीस राहिला आणि त्यानें अला-उद्दिनास घोरची राजधानी फिरोज-कोह् येथें फौजेसह परत पाठविलें. बह्रामावर लोकांची विशेष भक्ति होती. हिंवाळ्यांत बर्फ पडून गज्नी व फिरोज-कोह् यांजमधील

दळणवळण बंद पडल्याबरोबर, त्यांनीं बहराम ह्यास परत आणिलें, आणि इकडे थाप देऊन सैफ-उद्दिनास बहरामाबरोबर लढण्याची भर दिली. लढाई सुरू होतांच सर्व लोक सैफ-उद्दिनास सोडून बहरामास जाऊन मिळाले. तरी कांहीं वेळपर्यंत सैफ-उद्दीन मोठ्या हिंमतीनें लढला. शेवटीं निरुपाय होऊन बहरामाच्या हातीं सैफ-उद्दीन सांपडला. ह्या वेळीं सैफ-उद्दिनास बहराम गौरवानें वागविता, तर कदाचित् तंटा मिटला असता; पण तसें त्यानें केलें नाहीं. सैफ-उद्दिनाची सर्व शहरभर धिंड काढून त्याची त्यानें नानाप्रकारें विटंबना केली, आणि शेवटीं हालहाल करून त्यास ठार मारिलें. ह्या योगानें अला-उद्दिनास त्वेष आला. या कृत्याचा पुरेपूर सूड घेण्याची त्यानें प्रतिज्ञा केली. बहरामास काय वाटलें असेल तें असो; त्यानें युद्धाच्या आधींच तहाचें बोलणें लाविलें. अला-उद्दीन तें कबूल करीना. तेव्हां मग अर्थात् लढाई जुंपली. बहरामाकडे लोक पुष्कळ असतांही कांहीं वेळ सुद्धां त्यानें टिकाव धरिला नाहीं. समरांगणांत उभें राहण्याइतकेंही त्याला धैर्य नव्हतें. तो लढाई सुरू होतांच पळत सुटला. अर्थात् अला-उद्दिनास जय मिळाला आणि मोठ्या विजयोत्सवानें तो गज्नींत शिरला. गज्नीचीं शंभर वर्षे भरलीं. तीन दिवसपर्यंत अला-उद्दीन यानें शहरभर तलवार व अग्नि यांचा प्रळय माजविला. सुलतानांचें वैभव, संपत्ति व सत्ता ह्यांचें दर्शक जेवढें म्हणून त्या विस्तीर्ण शहरांत होतें, त्या सर्वांचा त्या वेळीं संहार झाला. विद्वान् व निरुपद्रवी माणसांची सुद्धां कत्तल झाली. गज्नवी वंशांतील सुलतानांच्या कबरी देखील अला-उद्दीननें उकरून काढिल्या, आणि आंतील हाडें कुत्र्यांस खावयास दिलीं. फक्त महंमुदाची कबर व दोन उंच मनोरे त्यानें होते तसे राहूं दिले. एवढेंच कायतें त्या वेळच्या गज्नीचें स्मारक आजतागाईत हयात आहे. मनोऱ्यांवर महंमुदाच्या सर्व पदव्या कोरींव अक्षरांत लिहिलेल्या आहेत. ह्या आपत्तींतून त्या राजधानीनें आंपलें डोकें आजतागाईत वर काढिलें नाहीं. या कृत्यावरून अला-उद्दिनास ‘ जहान सोझ् ’ म्हणजे ‘जग जाळणारा ’ असें अन्वर्थक नांव मिळालें आहे. ह्या गोष्टींचा हिंदुस्थानचे इतिहासाशीं फारसा संबंध नाहीं, तरी घोरी घराण्याचे सुलतानांनीं हिंदुस्थान देशांतही पुढे असाच कहर मांडिला. आपल्याला कोठें आश्रय मिळतो की

कार हें पाहून बहराम हिंदुस्थानाकडे वळला, पण नानाप्रकारच्या संकटांनीं व दुःखानें रस्त्यांतच तो मरण पावला.

गज्नी शहर हातचें गेलें तेव्हां खुस्रूनें लाहोरास राजधानी केली. तेथील लोकांनींही त्यास आनंदानें आपला राजा कबूल केलें. सेल्जुक सुलतानाच्या मदतीनें गज्नी परत घेण्याची त्यानें पुष्कळ खटपट केली, पण ती सिद्धीस गेली नाहीं. गज्नी शहर धुळीस मिळून सर्व लोक घोर सुलतानास सामील झाले होते. तेव्हां खुस्रू हिंदुस्थानांतच राहिला, व सात वर्षे शांततेनें राज्य करून सन ११६० त मरण पावला. खुस्रूचा मुलगा खुस्रू मलीक हा सबक्तगीनच्या वंशाचा शेवटचा सुलतान होय; पुढें घोरच्या अफगाण सुलतानांनीं त्याचें राज्य घेतलें.

एकंदरींत गज्नवी सुलतानांनीं महंमुदाच्या पश्चात् दीडशें वर्षे राज्य केलें, तरी त्यांची भरभराट म्हणून झाली नाहीं. ह्या वंशांतील बहुतेक पुरुष धार्मिक व उदार होते. इब्राहीम व बहराम यांनीं अनुक्रमें चाळीस व पस्तीस वर्षे राज्य केलें, ह्यावरून त्यांचा राज्यकारभार व्यवस्थित असला पाहिजे असें दिसतें. इब्राहीमनें लोक कल्याणाच्या अनेक गोष्टी केल्या. हिंदुस्थानांत जीं मुसलमानी राज्यें पुढें स्थापन झालीं, त्यांनीं गज्नीच्या राज्याची नक्कल केलेली आहे. पुढील नकलांचें अस्सल स्वरूप समजण्यास गज्नीचा वृत्तान्त उपयोगी पडतो.

४. घोरींचा उदय (११५७–११९१).—गज्नी घेतल्यावर अला-उद्दीन फिरोज-कोह येथें परत गेला व ख्यालीखुशालींत निमग्न राहिला. इतक्यांत उत्तरेकडून सेल्जुक सुलतान संजर यानें गज्नी प्रांत जिंकून अला-उद्दिनास कैद केलें. पण पुढें लवकरच त्याची सुटका होऊन त्याचें राज्य त्यास मिळालें. तें त्यानें ११५६ पर्यंत उपभोगिलें. अला-उद्दिनास सैफ-उद्दीन म्हणून एक मुलगा आणि ग्यास्-उद्दीन व शहाबुद्दीन असे दोन पुतण्ये होते. सैफ-उद्दिनास राज्य मिळावें म्हणून अला-उद्दिनानें पुतण्यांस कैदेंत टाकिलें. सैफ-उद्दिनानें त्यांस कैदेंतून सोडविलें. पण सन ११५७त सैफ-उद्दिनाचा खून होऊन हे दोघे पुतणे राज्यकारभार चालवूं लागले. दोघां राजांनीं एकमतानें राज्यकारभार चालविल्याचें हें मुसलमानांच्या इतिहासांत एकच उदाहरण आहे. पश्चिमेकडील प्रांतांचा कारभार ग्यास-उद्दीन पाही. व पूर्वेकडील

NATIONAL ARCHIVES OF INDIA

प्रांतांचा शहाबुद्दीन पाही. त्यांत हिंदुस्थान जिंकिण्याकडे शहाबुद्दीनचें सर्वस्वी लक्ष होतें. शहाबुद्दीन यानेंच पुढें महंमद असें नांव धारण केलें. कित्येकांच्या मतें शहाबुद्दीन याने स्वतंत्र असें नांव धारण न करितां सुलतान [illegible] द्दीनच्या [illegible] म्हणून कारभार केला. ग्यास्-उद्दिनानें हिंदुस्थानचे [illegible] नाहीं. तो गज्नी, हिरात, फिरोज-कोह् इत्यादि ठिकाणी आळीपाळानें राहत असे. हिरात येथें त्यानें एक भव्य मशीद बांधिली, तिची तारीफ लोक अद्यापि करितात. ग्यास्-उद्दीन सन १२०२ त मरण पावला व शहाबुद्दीन ऊर्फ महंमद हाच सर्व राज्याचा मालक झाला.

पहिली स्वारी, ("स. ११७६).—गज्नवी महमुदानें [illegible] एकसारख्या तीस वर्षें हिंदुस्थानावर स्वाऱ्या केल्या, त्याचप्रमाणें घोरी महंमदानेंही तीस वर्षें हिंदुस्थानांत धुमाकूळ उडवून दिला, (सन ११७६–१२०६). महंमदानें प्रथम मुलतान हस्तगत करून पंचनद व सिंधुनद ह्यांचे संगमावर ऊचा म्हणून एक मजबूद किल्ला आहे तो सर केला. तेथील राणीनें नवऱ्यास ठार मारून आपल्या मुलीचें लग्न महंमदाशीं करून दिलें. ही आपली नवीन बायको घेऊन महंमद गज्नीस परत गेला. सन ११७८ सालीं त्यानें हिंदुस्थानावर दुसरी स्वारी केली, तींत सुलतान खुस्रू मलीक ह्याचा पाडाव करून त्याच्या मुलास बळजोरीनें ओलीस घेतलें, आणि महंमद स्वदेशीं निघून गेला. पुढच्या वर्षी म्हणजे सन ११७९त त्यानें सिंधप्रांतावर स्वारी करून तो प्रांत समुद्रकिनाऱ्यापर्यंत लुटला. परत येतांना त्यानें खुस्रू मलीक याजबरोबर पुनः लढाई केली. इकडे मलीकही शेजारच्या गकर लोकांशीं स्नेह संपादून महंमदाचा खरपूस समाचार घेण्याच्या तजविजींत होताच. हे गकर लोक पंजाबच्या पलीकडील हद्दीवर फार दिवसांपासून राहत असत. त्यांच्या मदतीनें मलीक मोठ्या जोरांत होता. त्यानें महंमदाचा एक किल्ला सुद्धां काबीज केला. अशा विकट प्रसंगीं कपट केल्याशिवाय निभाव लागत नाहीं असें पाहून, महंमदानें पश्चिमेकडून आपणावर शत्रु येत आहे व त्याजशीं सामना करण्यास आपणास मलीकशीं तह करून खुरासानांत जावयाचें आहे, असें कळविलें, व ह्या वचनाच्या प्रचीतीसाठीं, मलीकचा मुलगा ओलीस ठेविलेला होता

NATIONAL ARCHIVES OF INDIA

प्रांत तोडून दिले. हा सर्व प्रकार सत्य समजून मलीक बेसावधपणानें आपला मुलगा येत आहे असें समजून त्याचे भेटीस गेला. पण खरी बातमी फुटूं न देतां, शहाबुद्दीन आडवाटेनें लाहोरवर चालून गेला व रातोरात त्यानें मलीकच्या छावणीस वेढून मलीक ह्यास कैद करून कुटुंबसुद्धां ग्यासुद्दीनकडे पाठवून दिलें. तेथें कांहीं दिवस कैद भोगिल्यावर त्याचा शिरच्छेद झाला, (सन ११८६). इकडे महंमदानें गझनवी वंशाचें सर्व राज्य जिंकून घेतलें.

५. तत्कालीन देशस्थिति, रजपूत राज्यें.—हिंदुस्थानांत मुसलमानांचा प्रवेश वायव्येकडून झाला. दक्षिण हिंदुस्थानांत त्यांचा प्रवेश होण्यास पुष्कळ काळ लागला. आरंभीं त्यांच्या स्वाऱ्या उत्तर हिंदुस्थानांतच होत असत. उत्तर हिंदुस्थान व गुजराथ वगैरे प्रांत रजपुतांच्या ताब्यांत होते. म्हणून शहाबुद्दिनाच्या वेळेस हिंदुस्थान देश कशा स्थितींत होता हें समजण्याकरितां रजपुतांचें वर्णन दिलें पाहिजे.

रजपूत लोक हे हिंदुस्थानचे पुरातनचे क्षत्रिय होत. प्राचीन काळीं चंद्र व सूर्य ह्या दोन वंशांतील क्षत्रिय राजे हिंदुस्थानांत राज्य करीत होते. अयोध्येच्या रामचंद्राची उत्पत्ति सूर्यवंशांत असून हस्तिनापुरचे कौरव-पांडव आणि यदुवंशी कृष्ण व बलराम हे चंद्रवंशी होते. हिंदुस्थानचे अर्वाचीन रजपूत राजे वरील कोणत्या तरी वंशांतून आपली उत्पत्ति झाली आहे असें समजतात. राजांचे पुत्र ते रजपूत. जन्मतः रजपुतांचा बाणा शिपाईगिरीचा होता. त्यांचीं निरनिराळीं पथकें तोडलेलीं असून त्यांजवर वंशपरंपरेचे सरदार असत. देशाचे विभाग पाडून ते या सरदारांमध्यें वाटलेले असत. राजे व रयत यांजमध्यें विशेष प्रीतिभाव असून त्यांस आपल्या थोर कुलाचा अभिमान वाटे. ते जिवावर उदार होऊन आपल्या कुलपरंपरेच्या अधिकाराचें व हक्कांचें संरक्षण करीत. त्यांच्या अंगीं अप्रतिम शौर्यतेज वसत होतें. तत्कालीन पाश्चिमात्य सरदारांच्या ठायीं ज्याप्रमाणें स्त्रीवर्गाविषयीं पूज्यबुद्धि व औदार्य वसत असे, त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतील रजपूत सरदारांच्या अंगींही ते गुण वसत होते. रजपूत राजांचा दिलदारपणा, धीरोदात्त स्वभाव व कदर यांची बरोबरी होणें नाहीं. रजपुतांतील बहुतेक रणसंग्राम स्त्रियांची अब्रू बचावण्याकरितां घडून आलेले आहेत. रजपुतांच्या स्त्रियांकडे वांकड्या नज-

NATIONAL ARCHIVES OF INDIA

रैनें पाहण्याची कोणाची प्राज्ञा नव्हती. मध्यकालीन इतिहासांत अनेक रजपूत साध्वी पतिव्रतांचीं नांवें अजरामर झालेलीं आहेत. अनेकांनीं स्त्रियांची अब्रू बचाविण्याकरितां सर्वस्वाचा नाश करून घेतला आहे. समरांगणांतून अपयश घेऊन परत येणें ते अत्यंत निंद्य समजत. अपयश जोडून जिवंत राहिल्यानें सर्व कुलास नरकवास घडतो अशी त्यांची दृढ समजूत असल्यामुळें, पराजयाचें चिन्ह दिसतांच रजपूत लोक आपल्या बायकामुलांस स्वहस्तानें ठार मारून संग्रामांत घुसून वीरपुरुषास शोभणारा प्राणत्याग करून घेत. युद्ध करण्याचेही त्यांच्यांत निर्बंध ठरलेले असत. ते जो तोडील, त्याची अपकीर्ति होई. अशा शूर बाण्याचे लोक मुसलमानांच्या रस्त्याचें नाकें धरून बसले असतांही मुसलमानांचा प्रवेश हिंदुस्थानांत झाला, ही आश्चर्याची गोष्ट आहे. मात्र केवळ आश्चर्य मानून स्वस्थ न बसतां, त्यांच्या अधःपाताची योग्य मीमांसा करणें हेंच इतिहासाध्ययनाचें काम आहे. विशेषतः आपसांतील कलह या गोष्टीस कारण झाले हें खरें, तरी रजपुतांचा स्वभाव फार भोळा असे. कपटानें विश्वासघात करणें ते निंद्य समजत. जशास तसें वर्तन करून संकट निवारण करण्यांत जें एक प्रकारचें व्यवहारचातुर्य लागत असतें, तें त्यांच्यांत नव्हतें. ह्मणून त्यांच्यापेक्षां क्षुद्र लोकांचा कपटाच्या योगानें त्यांजवर पगडा सहज बसे.

भारत, रामायणादि ग्रंथ आमचे पुरातन इतिहास आहेत; त्याचप्रमाणें रजपुतांच्या आख्यायिका वर्णन करणारे अनेक काव्यग्रंथ त्या त्या भाषांत उपलब्ध आहेत. ह्या ग्रंथांची चाळणी करून त्यांतील ऐतिहासिक अंश निराळा काढिल्यानें तत्कालीन रजपुतांची स्थिति कळून येईल. 'पृथ्वीराज रासा' ह्या नांवाचा एक काव्यग्रंथ चंदवरदाई नामक भाटानें चारणी भाषेंत शहाबुद्दिनाच्या वेळेस लिहिलेला आहे. 'रासमाला' हा ग्रंथही त्याच मासल्याचा असून तत्कालीन इतिहास समजण्यास तो फार उपयोगी पडेल.

शहाबुद्दीन घोरी हिंदुस्थानावर स्वाऱ्या करूं लागला, त्या वेळेस मोठमोठीं रजपूत राज्यें येथें अनेक होतीं. अजमीर येथें चव्हाणवंशी सोमेश्वर, दिल्ली येथें तुवरवंशी अनंगपाळ, कनोज* येथें राठोडवंशी जयचंद, चितोडगडावर

* कनोज हें आग्र्याचे पूर्वेस गंगेपासून थोड्या मैलांच्या अंतरावर आहे.

मेवाडांत घेलोटवंशी समरसिंह, जसलमीर येथें भोजदेव, अबूगडावर जैत परमार व अन्हिलपूर (पट्टण) येथें चालुक्यवंशी गुर्जराधिपति भोळा भीम, असे राजे राज्य करीत होते. ह्यांशिवाय प्रत्येकाचे हाताखालीं अनेक लहान लहान मांडलीक राजे होते. बहुतेक मध्य व उत्तर-हिंदुस्थान ह्या राजांच्या ताब्यांत होतें. कनोजची हद्द उत्तरेस शुभ्र हिमाचलास व पूर्वेस काशीस लागली होती. 'मेवाड' ह्याचा मूळ अर्थ 'मध्यवाड' म्हणजे 'रजपुतान्याचा मध्यभाग,' असा असून, त्याची पूर्वीची राजधानी चितोडगड व हल्लीं उदेपूर आहे. ह्या सर्व रजपूत राजांमध्यें कांहींना कांहीं युद्धप्रसंग हमेश चालू असत. चव्हाण आणि घेलोट मित्रभावानें वागत. परंतु राठोड आणि तुवर ह्यांजमध्यें कायमचें वैर होतें. ह्या दोघांमध्यें कालिंदी म्हणजे यमुनानदीची हद्द होती. तिचें काळें पाणी ते आपल्या रक्तपातांनीं अनेक वेळां लाल करीत. तथापि दोनही घराण्यांत शरीरसंबंध घडल्यानें हें वैर पुष्कळ वेळां तात्पुरतें मिटत असे. एखादा मुसाफर जर त्या वेळच्या युरोपांतील सर्व दरबारांत फिरून, तुर्क लोकांनीं व तयमूरलंगानें ज्या मार्गानें पुढें स्वाऱ्या केल्या, त्या मार्गानें येऊन गज्नी व हिंदुस्थानांतील वरील रजपूत राज्यें ह्यांचें अवलोकन करिता, तर कलाकौशल्य, विद्या, कला, ऐश्वर्य वगैरे अनेक बाबतींत रजपूत राजांची थोरवी त्यास अपूर्व वाटली असती, ह्यांत संशय नाहीं. त्या काळीं यूरोप व आशिया ह्या दोनही खंडांत जमीनदारांच्या मार्फत राज्याचा बंदोबस्त राहत असे. ह्या जमीनदारी पद्धतीचे दोहोंकडे भिन्न परिणाम झाले. युरोपांत जमीनदारांचें वजन कमी होऊन सामान्य लोकांचें हळू हळू वाढलें. परंतु हिंदुस्थानांत खालचा वर्ग नेहमीं खालींच राहिला. जमीनदारांचे तंटे संपले नाहींत आणि त्यांतच सर्व राज्यांचा अंत होऊन गेला. घोरप्रांताचा राजा शहाबुद्दीन ह्यानें सन ११९३त दिल्ली व कनोज ह्या राज्यांचा पाडाव केला, तेव्हांपासून मुसलमानांची सत्ता वाढत गेली.

त्या वेळच्या रजपुतांच्या इतिहासावरून असें समजतें, कीं त्यांजमध्यें त्या वेळेस भोळेपणा व अज्ञान फार माजलें होतें. शैव व शाक्तपंथ जोरांत असून सती जाण्याचा संप्रदाय प्रचलित होता. जैनधर्माचा प्रसारही विशेष होता. कित्येक राजे उन्मत्त, अविचारी व विलासमग्न असत.

मुसलमानांविषयीं ते गैरमाहीत व बेफिकीर होते. मुसलमानांचे शौर्य, निश्चय, कडवेपणा व विजय पाहून रजपुतांस चमत्कार वाटे. त्यांजवर ईश्वरी कृपा आहे असें समजून ते स्वस्थ बसत. पराजित लोकांस विजयी लोकांविषयीं अशी भावना होणें साहजिक आहे. इंग्रजांविषयींही अशाच कल्पना आपल्या इकडेही चालू होत्या व आहेत. मीरासाहेब व ख्वाजा पीरसाहेब ह्या दोघां मुसलमानांनीं दैविक चमत्कार दाखवून अजमिराम आपलें ठाणें दिलें. त्यांचा मान इतका वाढला कीं, अजून हिंदु लोक त्यांच्या कबरेस भजतात व उरूस होतात तेव्हां त्यांस नवस करितात.

६. **भाट लोक, व त्यांची कामगिरी.**—भाटांविषयीं थोडी माहिती येथें सांगणें जरूर आहे. अलीकडच्या चालीप्रमाणें इतिहास लिहून ठेवण्याची वहिवाट पूर्वी नव्हती; तरी राजवंशांच्या हकीकती व त्यांचे पराक्रम कविताबद्ध करून ते राजांस श्रवण करवावे असा प्रघात असे. भाट लोक हीं कवनें दरबारांत म्हणून दाखवीत. भाट याचा शब्दशः अर्थ बंदी. बंदीजनांनीं राजचरित्रें गावीं असा त्यांचा धंदा वर्णिलेला आहे. गुजराथ, काठेवाड, रजपुताना, माळवा वगैरे ठिकाणीं भाटांच्या पुष्कळ जाति आहेत. क्षत्रियवंशांचा पडता काळ आला तशी भाटांची दुर्दशा होत गेली. भाटांस विश्वासु व प्रामाणिक असें समजत. त्यांस राज्यांतून मोठमोठ्या देणग्या व मानमरातब मिळत. कर्जाच्या फेडीसाठीं अगर वचन पाळण्यासाठीं भाट लोक जामीन राहत. त्यांची जामीनगिरी सर्व लोक कबूल करीत. मुली व स्त्रिया यांजबरोबर पाठविण्यास योग्य व विश्वासु मनुष्य म्हणजे भाटच. ते राजांचे संनिध सदैव राहून सत्कर्म, औदार्य, शौर्य इत्यादि गुणांकडे राजांची प्रवृत्ति व्हावी, म्हणून पूर्वजांच्या पराक्रमांचीं व कीर्तीचीं रसभरित कवनें गाऊन हे भाट लोक हरप्रसंगीं राजांस व वीरांस प्रोत्साहन देत. राजवंशाची कीर्ति किंवा अपकीर्ति प्रसिद्ध करणें बऱ्याच अंशीं ह्या भाटांच्या हातीं असे. म्हणून त्यांस दुखविण्यास कोणी धजत नसत. पूर्वी मोठमोठ्या युद्धांतून भाट हे राजांबरोबर हजर राहून अनेक प्रसंगीं दोन दरबारांमधील वकिलीचें काम करीत. यांस कोणत्याही दरबारीं जाण्यास अटकाव नसे, आणि लढाइंतसुद्धां त्यांच्या जिवास धोका नसे. हल्लीं भाटांची एक जातच झालेली आहे; व त्यांतही पुष्कळ पोटभेद आहेत. कौरव-पांडवांच्या वेळेपासून

दिल्लीपति पृथ्वीराज चव्हाण, पृ० ८९.

कलकत्ता, व्हिक्टोरिया मेमोरियल हॉलच्या ट्रस्टींच्या परवानगीनें.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

NATIONAL ARCHIVES OF INDIA

अनेक नामांकित भाटांचीं नांवें प्रसिद्ध आहेत. कित्येकांचीं कवनें फारच रसभरित व चित्तवेधक आहेत. भाटांस मोठमोठीं उत्पन्नें तोडून दिलेलीं असत. अजमीरचा राजा पृथ्वीराज चव्हाण याजपाशीं चंदभाट, अकबर बादशहाजवळ गंगभाट, शिवाजीजवळ भूषणभाट, असे भाट होते. पृथ्वीराजाचा भाट चंदवरदाई ह्यानें 'पृथ्वीराजरासा' म्हणजे पृथ्वीराजाचा इतिहास म्हणून जो कविताबद्ध ग्रंथ लिहिला आहे, तो एकलक्ष श्लोक होतील इतका मोठा असून, त्याचीं ६९ पर्वें आहेत. यांत अतिशयोक्त व निव्वळ स्तुतिपर वर्णनें पुष्कळ आहेत; तरी ऐतिहासिक अंशही कांहीं थोडा नाहीं. गुजराथ व रजपुताना ह्यांचे इंग्रजी इतिहास अशाच ग्रंथांच्या आधारानें लिहिलेले आहेत. गुजराथेंतील हल्लींचे बारोट लोक हे पूर्वीचे तेथचे भाट होत.

७. *पृथ्वीराज चव्हाण, (स. ११५९–९२).*—मुसलमानांचा प्रवेश प्रथम हिंदुस्थानांत झाल्यापासून हा देश त्यांच्या ताब्यांत जाणार अशीं चिन्हें जिकडे तिकडे दिसूं लागलीं होतीं. रजपुतांचे आपसांतले तंटे चालूच होते. गुजराथचा राजा भोळा भीमदेव हा फार पराक्रमी होता. त्याचे ताब्यांत पुष्कळ किल्ले असून अनेक विद्वान पंडितांचा तो आश्रयदाता होता. प्रसिद्ध 'अमरकोशा'चा कर्ता जैनपंडित अमरसिंह हा त्याचेच दरबारीं असे. त्याचा समकालीन अबू येथें जैत परमार राजा राज्य करीत होता. ह्या परमारास इच्छनीकुमारी नांवाची एक लावण्यवती मुलगी होती. 'आपली मुलगी आम्हांस द्यावी, नाहीं तर युद्धास सिद्ध व्हावें,' असा निरोप अमरसिंहाबरोबर भीमदेवानें परमारास पाठविला. परमारानें भीमाची मागणी कबूल न करितां युद्धाची तयारी केली, आणि पृथ्वीराजापाशीं मदत मागितली. पृथ्वीराजाचा बाप सोमेश्वर यास भीमदेवानें पूर्वी लढाईत पकडून ठार मारिलें होतें, तें वैर साधण्यास्तव परमाराची मागणी त्यानें मोठ्या हौसेनें कबूल केली. युद्धाची सिद्धता झाल्यावर साबरमतीच्या कांठीं लढाई होऊन भीमदेवाचा पुरा मोड झाला. पुढें इच्छनीकुमारीचें पाणिग्रहण करून पृथ्वीराज दिल्लीस गेला. नंतर पृथ्वीराजानें अनेक युद्धें केलीं व त्याची दिवसेंदिवस भरभराट होत गेली. पुढें कनोजचा राजा जयचंद ह्यानें राजसूययज्ञ करण्याचें मनांत आणिलें. त्या प्रसंगीं बहुतेक राजे जमा झाले, पण पृथ्वीराजानें यज्ञास

हरकत केली. संयुक्ता नांवाची जयचंदाची एक रूपवती मुलगी होती. तिचा मानस पृथ्वीराजास वरण्याचा असल्यामुळें जयचंदानें तीस बंदींत ठेविलें. इकडे पृथ्वीराजाचे हातून राज्यकारभारांत ह्या वेळेस अनेक चुका झाल्या. चामुंडराय नांवाच्या पराक्रमी सरदारास त्यानें अपराध नसतां कैदेंत टाकिलें; तसेंच कयमाष नांवाचा त्याचा शहाणा राजहितदक्ष प्रधान होता, त्यास अविचारानें ठार मारिलें. पुढें कनोज येथें गुप्त रूपानें जाऊन पृथ्वीराजानें संयुक्तेचें हरण केलें. त्यामुळें उभय राजांमध्यें अनेक युद्धप्रसंग होऊन शेवटीं निरुपायास्तव जयचंदानें मुलीचें लग्न पृथ्वीराजाबरोबर लाविलें. संयुक्तेशीं लग्न लाविल्यापासून पृथ्वीराज सदा ऐषआरामांत दंग राहून राज्यकारभाराकडे अगदीं दुर्लक्ष करूं लागला. ह्या योगानें पृथ्वीराजाविषयीं अनेक सरदारांस संताप उत्पन्न झाला. शहाबुद्दीन घोरी दिल्लीवर स्वारी करण्याची संधि पाहत बसलाच होता. पृथ्वीराजाचे कांहीं सरदार फितुरी करून गज्नीस शहाबुद्दीनकडे गेले आणि त्यांनीं त्यास दिल्लीस बोलाविलें. ह्या बातम्या पृथ्वीराजास पोंचल्या नाहींत. तो आपल्या विलासांत दंग होता.

८. महंमद घोरीच्या स्वाऱ्या व कारकीर्द, (सन ११९१–१२०६).

चवथी स्वारी.—मुसलमान शत्रूंचा पाडाव केल्यावर महंमद हिंदूंकडे वळला. गज्नवी वंशाचे सुलतान सत्त्वहीन झाल्यामुळें हिंदूंशीं असलेलें त्यांचें पहिलें वैर नाहींसें होऊन, गेल्या पांचपन्नास वर्षांत हिंदुमुसलमानांचें ऐक्य होत चाललें होतें. मुसलमानांची सर्व भिस्त हिंदूंवरच होती. पण घोरी महंमदानें कडवा मुसलमानी बाणा पुनरपि सुरू केला. त्याच्या फौजेंत मुख्यतः अफगाणांची भरती असून कांहीं तुर्कही होते. ‘ ह्या काफमुखी हिंदूंस नरकयातना भोगण्यास लावूं’, अशा प्रतिज्ञेनें महंमद घोरीचे लोक हिंदुस्थानांत घुसले. तुवरवंशीय विक्रमादित्यानें दिल्लीचें राज्य घेतल्यावर तें त्या वंशाकडे एकुणीस पिढ्यांपर्यंत चाललें. एकुणिसावा राजा अनंगपाळ ह्यास दोन मुली होत्या. पहिली कमलादेवी ही अजमीरच्या सोमेश्वर राजास दिली होती; आणि दुसरी कनोजचा राजा विजयपाळ ह्यास दिलेली होती. ह्या दोघींचे मुलगे अनुक्रमें पृथ्वीराज चव्हाण व जयचंद राठोड असे होते. अनंगपाळानें वृद्धापकाळ झाल्यामुळें आपलें राज्य पृथ्वीराजाचे स्वाधीन करून आपण वानप्रस्थाश्रम पत्करिला. पृथ्वीराजाचा जन्म

सन ११५९त झाला. वरील व्यवस्थेनें अजमीर व दिल्ली हीं दोनही राज्यें एका पृथ्वीराजाकडे गेलीं. ह्याबद्दल कनोजच्या जयचंद राजास वैषम्य वाटलें. आपणही नातू असतां अनंगपाळानें एकट्या पृथ्वीराजास सर्व राज्य दिलें यामुळें त्यास फार दुःख झालें. येणेंप्रमाणें राठोड व चव्हाण यांजमध्यें कलहाग्नि माजून त्यांत रजपुतांच्या स्वातंत्र्याची आहुति पडली. कनोज व पट्टण येथील राजांनीं चव्हाण राजास नष्टप्रभ करण्याकरितां शहाबुद्दीन घोरी यास वकील पाठवून मदतीस बोलाविलें. आपसांतील भांडणाचा सूड उगविण्यासाठीं परक्या शत्रूस घरांत घेण्यानें केवढें नुकसान होतें हें आमच्या लोकांस कळलें नाहीं. अशा मार्गाचें अवलंबन केल्यानें दोघांचा घात आणि तिसऱ्याचा फायदा ह्या सिद्धांताची आवृत्ति हिंदुस्थानच्या इतिहासांत वारंवार झालेली आहे. पण प्रसंग जाणून पृथ्वीराजानें आपला मेहुणा चितोडचा राजा समरसिंह रावळ ह्याच्या मदतीनें शहाबुद्दिनाचे फौजेचा संपूर्ण पराजय करून त्यास कैद केलें, व त्याजपासून आठ हजार घोडे खंडणी घेऊन त्यास सोडून दिलें.* ह्या प्रसंगीं रजपुतांचें खरें क्षात्रतेज व युद्धकौशल्य मुसलमानांस कळून आलें. पराजयामुळें शहाबुद्दिनास अत्यंत दुःख होऊन तो त्वरेनें सिंधुनदी उतरून गज्नीस गेला. तेथें बाह्यात्कारीं ख्यालीखुशालींत राहून हिंदुस्थानाबद्दल आपण पर्वा करीत नाहीं असें तो दाखवूं लागला. पण अंतर्यामीं तो अत्यंत जळफळत असे. त्यानें एकदां आपल्या प्रधानास सांगितलें, कीं मला 'स्वस्थ निद्रा कधींही येत नाहीं. निजलों किंवा जागा असलों तरी काळजी व दुःख यांचा माझ्या सभोंवती गराडा असतो.' वर सांगितलेली पृथ्वीराजाची व घोरीची लढाई पानिपत येथें झाली. त्या ठिकाणीं आपल्या फौजेच्या लहान लहान टोळ्या करून शत्रूस जेरीस आणण्याचा नेहमींचा मुसलमानांचा कावा, हिंदूंनीं एकदम हल्ला केल्यामुळें, साधला नाहीं. ह्या लढाईस पानिपतची पहिली लढाई म्हणतात. ही सन ११९१ त पानपतच्या जवळ कर्नालच्या उत्तरेस दहा मैलां-

* ह्या प्रसंगीं शहाबुद्दीन घोरी यास पृथ्वीराजानें पकडल्याचें मुसलमान इतिहासकार कबूल करीत नाहींत. वरील हकीकत 'लोकहितवादी' च्या पुस्तकांत आहे.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

वर, नारायणगांवीं झाली. मुसलमानांचा हिंदूंनीं पराभव केला असा हा पहिलाच प्रसंग होय. रासाग्रंथांत ह्या लढाईस तलवारीची लढाई म्हणतात. ह्या लढाईनें पृथ्वीराजाचें वर्चस्व वाढलें तें जयचंदास सहन झालें नाहीं. पृथ्वीराजाचा नाश कसा होईल ह्या उद्योगास तो लागला. हातांत सांपडलेल्या शत्रूस जीवदान दिल्याचे उपकार घोरीनें पुढें कसे फेडिले तें लवकरच कळेल.

पांचवी स्वारी, (सन ११९३).—पराभव होऊन स्वदेशीं गेल्यावर शहाबुद्दीन स्वस्थ बसला नाहीं. वरील पराजयाचा सूड घेण्याकरितां ह्या खेपेस विशेष तयारी करून तो हिंदुस्थानांत आला. जयचंद राठोड वगैरेशीं त्यानें आंतून संधान बांधिलें. त्याजबरोबर सामना करण्यासाठीं समरसिंह रावळ वगैरे एकंदर दीडशें रजपुत राजे एकत्र झाले. *गंगोदक हातांत घेऊन त्यांनीं शपथा घेतल्या होत्या कीं शत्रूंस जिंकूं नाहीं तर स्वधर्मरक्षणार्थ देहत्याग करूं.* स्थानेश्वर येथें उभय सैन्यांचा तळ पडला. इकडे पृथ्वीराजानें मात्र मुसलमानांच्या हालचालींची बिलकुल बातमी राखिली नाहीं. शत्रूंच्या हालचालींवर नजर न ठेवणें हा एक राष्ट्रीय दोषच हिंदुस्थानांत अनेक प्रसंगीं दिसून आलेला आहे. ह्या युद्धांत हिंदूंची संख्या अफाट असून त्याजवर एकदम चालून जाण्याची शहाबुद्दीनची छाती नव्हती. लढाई सुरू झाल्यावर शहाबुद्दीनचा मोड होऊन हिंदु फौज त्याच्या पाठीस लागली. इतक्यांत ते निर्धास्तपणें फांकले आहेत असें पाहून एकदम शहाबुद्दीन त्यांजवर परत फिरला. त्याबरोबर रजपूत सेनेची वाताहत झाली. दिल्लीचा सेनापति चामुंडराय, हमीर हाडा व दुसरे पुष्कळ रजपूत राजे समरंगणीं पडले. पृथ्वीराज शत्रूंचे हातीं सांपडला, त्यास त्यांनीं ठार मारिलें. ह्या लढाईत रजपुतांचा जेवढा जमाव झाला होता, तेवढा पूर्वीं कधींही झाला नसून, मुसलमानांस मागें हटविण्याचा रजपुतांनीं केलेला शेवटचा जोराचा प्रयत्न हाच होय. आजपर्यंत मुसलमानांचा शिरकाव हिंदुस्थानांत होतो कीं नाहीं याची शंका होती. पण त्या शंकेचें निरसन ह्या स्थानेश्वरच्या लढाईनें झालें.

पृथ्वीराजाच्या मृत्यूविषयीं एक चमत्कारिक गोष्ट चंदभाटानें आपल्या ग्रंथांत लिहिली आहे. पृथ्वीराजास पकडल्यावर त्याचे डोळे काढून घोरीनें

त्यास गज्नीस नेऊन कैदेंत टाकिलें. त्याचा बालपणापासूनचा सोबती चंदभाट आपला ग्रंथ लिहून पृथ्वीराजाचे शोधास गज्नीस गेला. त्या ठिकाणीं मोठ्या कुशलतेनें त्यानें प्रत्यक्ष शहाबुद्दीनचा खून पृथ्वीराजाकडून करविला. पृथ्वीराज केवळ शब्दवेधानें निशाण मारणारा होता. त्याचें कौशल्य पाहवें असें चंदभाटानें शहाबुद्दिनास सांगितलें. पुढें शहाबुद्दीनच्या समोर खेळ चालला असतां तो 'शाबास शाबास' असे शब्द मोठ्यानें बोलला. त्या शब्दांच्या संधानावर पृथ्वीराजानें एकदम बाण मारून दरबारांतच शहाबुद्दिनास ठार केलें. चंदभाट तेथें होताच. तो व पृथ्वीराज ह्यांनीं पुढें एकमेकांस मारून घेतलें. ह्या गोष्टींत विसंगतपणा बराच आहे. चंदभाट स्थानेश्वरची लढाई होण्यापूर्वी एकांतस्थळीं जाऊन आपला रासाग्रंथ लिहीत होता. तेथून बाहेर आल्यावर त्यास लढाईचा परिणाम कळला. तेव्हां आपल्या धन्याच्या हातानें शत्रूचा सूड घेण्याची युक्ति मनांत ठरवून तो गज्नीस गेला असावा. तेथें पूर्वी ठरवून ठेविल्याप्रमाणें त्यानें पुढील सर्व बेत सिद्धीस नेला असेल. चंदभाटास देवी प्रसन्न होती, आणि तिच्या प्रसादानेंच त्यास पुढील गोष्टी कळत. शिवाजीच्याही अशाच गोष्टी वर्णिलेल्या आहेत. तेव्हां ह्या हकीकतींतील तथ्य शोधीत बसण्यांत फारसा अर्थ नाहीं.

महंमद घोरीनें लगेच अजमीर घेऊन तेथील निरपराधी लोकांची कत्तल केली; आणि अजमीरच्या गादीवर आपल्या पसंतीच्या एका इसमास बसविलें. तसेंच हिंदूंचीं देवळें फोडून तेथें मुसलमानांच्या मशिदी बांधिल्या. ऐबक नांवाचा एक हुशार गुलाम त्याजपाशीं फार दिवस लष्करांत नोकरी करीत होता, त्यास त्यानें हिंदुस्थानांत आपला सुभेदार नेमून स्वतः गज्नीस कूच केलें. इकडे ऐबकनें दिल्ली, चितोड वगैरे ठिकाणें घेतलीं.

सहावी स्वारी, (सन ११९४).—ह्या स्वारींत कुत्ब्-उद्दीन ऐबक ह्यास घेऊन महंमदानें कनोजच्या जयचंद राजाचा पाडाव केला; आणि पुरातन काळचें धनाढ्य शहर कनोज लुटून फस्त केलें. पुढें चाल करून घोरी काशीवर आला. त्या ठिकाणच्या देवळांतील सर्व मूर्ती नाहींशा करून अपरंपार लूट जमा केली. येणेंप्रमाणें मुसलमानांची मजल बहार प्रांतांत जाऊन पोंचली. कनोज शहर मुसलमानांचे हातीं गेल्यावर तेथील कित्येक राठोडवंशी रजपूत लोक मारवाडांत येऊन

NATIONAL ARCHIVES OF INDIA

राहिले; आणि जोधपूर येथें त्यांनीं नवीन राज्यस्थापना केली. तेंच हल्लींचें जोधपूरचें राज्य होय. ऐबकनें गुजराथ प्रांतावर स्वारी करून राजा भीमदेवाचा पराजय केला. तें राज्य खालसा करण्याचा त्याचा विचार होता, परंतु तो तडीस नेण्यापूर्वींच त्यास दिल्लीस परत यावें लागलें.

महंमदानें हिंदुस्थानांतील सर्व काम ऐबक याजकडे सोपविलें व आपण परत गेला. ऐबकनें त्वरा करून ग्वालेरचा मजबूत किल्ला सर केला. लगेच गुजराथचा व दुसरे कित्येक राजे अजमीरावर येत होते, त्यांजशीं सामना करण्याकरितां ऐबक गेला. त्याची व रजपुतांची निकराची लढाई झाली. हिंदूंचे पंनास हजार लोक समरांगणीं पडले, वीस हजार कैद झाले, आणि अगणित लूट मुसलमानांस मिळाली. येणेंप्रमाणें रजपुतांचा पराभव करून अन्हिलपूर राजधानी व दुसरे मुलूख काबीज करून ऐबक दिल्लीस गेला. पुढच्या वर्षी बुंदेलखंडांतील काल्पी व कलिंजर हे किल्ले त्यानें घेतले. इकडे बखत्यार खिलजी नांवाच्या दुसऱ्या सरदारानें उत्तरबहार, अयोध्या व बंगाल हे प्रांत जिंकिले, आणि बंगालची तत्कालीन राजधानी गौड उर्फ लखनौती काबीज केली.

गज्नी येथें ग्यासुद्दीन मरण पावल्यावर, शहाबुद्दीन हा महंमद हें नांव धारण करून गज्नीच्या तख्तावर बसला. पुढें खारिज्म् म्हणजे खिवाच्या शहाशीं तक्रारी होऊन त्याशीं लढाई जुंपली, तींत महंमदाचा पराजय होऊन जिवावर प्रसंग आला. त्यांतून तो दंड भरून मोठ्या संकटानें सुटला. महंमदाचे शेवटचे दिवस एकंदरींत फारसे सुखाचे गेले नाहींत. गकर म्हणून जे पंजाबच्या पलीकडे रानटी लोक होते, त्यांनीं पंजाबप्रांतावर स्वारी करून धुमाकूळ मांडिला आणि लाहोर शहर घेतलें. त्यांचा बंदोबस्त करण्याकरितां महंमद पंजाबप्रांतांत आला, आणि गकर लोकांचा बंदोबस्त करून त्यांस त्यानें मुसलमानी धर्मांत आणिलें. नंतर पुढें जाण्याच्या इरादानें सिंधुनदाचे कांठीं रोहतक गांवीं छावणी देऊन उतरला असतां, हवा येण्याकरितां त्यानें आपले सर्व तंबू उघडे केले. हें पाहून त्याचा सूड घेण्याकरितां टपून बसलेल्या कांहीं गकर लोकांनीं नदींतून पोहून येऊन पाहरेकऱ्यांस कापून सुलतानाचा प्राण घेतला. त्याचें शव गज्नीस नेऊन पुरण्यांत आलें. महंमद घोरीस मूलबाळ नव्हतें. त्याचे पश्चात् ग्यासुद्दीनचा मुलगा महंमद हा गज्नी येथें तख्तनशीन झाला.

शहाबुद्दीन ऊर्फ महंमद घोरी हा शूर शिपाई होता, पण सुल्तान महंमुदासारखें शहाणपण अगर चतुरस्रपणा त्याजमध्यें नव्हता. महंमूद विद्वान् व विद्येचा भोक्ता होता, म्हणून त्याचें नांव गाजत आहे. पण शहाबुद्दीन ह्यानें लढाई व धामधूम ह्यांपलीकडे कांहींच केलें नाहीं; किंवा त्याच्या पदरीं कवि किंवा इतिहासकार निपजले नाहींत. त्याची कीर्ति पाठीमागें फार दिवस राहिली नाहीं. तथापि हिंदुस्थानचे संबंधानें पाहिलें, तर शहाबुद्दीन ह्यानें या देशांत मुसलमानी राज्याचा पाया घातला असें म्हणण्यास हरकत नाहीं. सुल्तान महंमुदाचें लक्ष विशेषतः लुटीकडे होतें. मुसलमान आपलीं राज्यें हिसकून घेतात, अशी भीति महंमुदाच्या वेळेस रजपूत राजांस पडली नव्हती. म्हणून सुल्तान महंमुदास त्यांजकडून फारसा अडथळा झाला नाहीं. पण महंमद घोरीच्या वेळेस रजपूत राजांनीं आपलें स्वातंत्र्य कायम राखण्यासाटीं हरप्रयत्न केले. आपसांतील तंटे थोडे बहुत कायम होते, तरी तिऱ्हाईत शत्रूशीं सामना करण्यास सर्व एक दिलानें झटले. त्यांस जिंकून नुसती लूट मिळवून शहाबुद्दीन परत गेला नाहीं; तर जिंकिलेले प्रदेश ताब्यांत घेऊन, त्यांजवर आपले कामगार नेमून त्यानें राज्याची व्यवस्था केली. हा ज्यास्त दिवस वांचता तर स्वतःच हिंदुस्थानचा पहिला बादशहा झाला असता. पण तसा योग घडून आला नाहीं. शहाबुद्दीनचे मरणकाळीं माळवा व त्याजवळचे कांहीं प्रांत खेरीजकरून, सर्व उत्तरहिंदुस्थान थोडें बहुत मुसलमानांचे ताब्यांत होतें. सिंध व बंगाल हे प्रांत पुरेपूर त्याच्या अमलाखालीं आले होते. गुजराथेंत राजधानी मात्र त्याचे हातांत आली होती. ह्या सर्व प्रांतांवर घोरीनें आपले स्वतःचे अंमलदार नेमिले. बाकीच्या प्रांतांतील राजेरजवाडे त्यास खंडण्या देत, किंवा अन्य तऱ्हेनें त्याचा ताबा कबूल करीत. त्याचे सरदार न जिंकिलेले प्रांत त्वरेनें जिंकीत चालले होते. सारांश महंमद घोरीच्या वेळेपासून स. १८५७च्या बंडापर्यंत दिल्लीच्या तख्तावर मुसलमान शहाचें वास्तव्य होतें.

महंमदाचा पुतण्या महंमूद मरण पावल्यावर ख्वारिज़्मच्या शहांनीं गज्नीचें राज्य घेतलें. फिरोज कोह् हें शहरही त्यांनीं अगोदरच काबीज केलें होतें. हिंदुस्थानांतील मुसलमानांचें राज्य महंमदाचा गुलाम कुत्ब्-उद्दीन ऐबक ह्याजकडे राहिलें, त्याची हकिकत पुढील प्रकरणीं येईल. घोरवंशाची

समाप्ति हिंदुस्थानांत सन १२०६त व गज्नी येथें सन १२१५त झाली. (वंशावळ परिशिष्टांत दिली आहे.)

९. ह्या कालाचें प्रत्यालोचन.—ह्या काळीं आमच्या रजपूत क्षत्रियांची कशी दुर्दशा झाली होती, हें समजण्यास तत्कालीन रासाग्रंथ फार उपयोगी पडतील. विशेषत: चंदभाटाचा ग्रंथ विस्तृत व वाचनीय आहे. निरनिराळ्या राजघराण्यांतील परस्पर वैमनस्यें, पैशाच्या लोभानें मुसलमान शत्रूंस बातमी पोंचविणाऱ्या राष्ट्रद्रोही लोकांचा सुळसुळाट, रजपूत फौजांची अव्यवस्थित रचना, शत्रूंकडील बातमी मिळविण्याविषयीं आमच्या वीरपुरुषांनीं केलेली हयगय,[१] जातिभेदाच्या व्यवस्थेमुळें एकट्या क्षत्रियांवरच पडलेला युद्धाचा सर्व बोजा, आणि इतर वर्गांच्या ठिकाणीं असलेली स्वदेशसंरक्षणाविषयीं अनास्था इत्यादि कारणांमुळेंच इतक्या दूर अंतरावरून मुसलमानांचा रिघाव हिंदुस्थानांत कसकसा झाला त्याची उमज ह्या रासाग्रंथावरून पडणारी आहे. येथील शेतकरी व कामकरी वर्ग इतक्या निकृष्टावस्थेंत पडला होता, कीं ब्राह्मणांस व क्षत्रियांस ते शत्रुसमान समजत, आणि त्यांच्या जाचणुकींतून सुटका होईल तर बरी असें त्यांस होऊन गेलें होतें. अशा स्थितींत मुसलमानांशीं लढण्याची सर्व भिस्त केवळ एका वर्गावर पडली, आणि ब्राह्मण, वैश्य व शूद्र हे अगदीं अलिप्त राहिले. त्यांस युद्धशिक्षण व शस्त्रास्त्रांचा उपयोगही ठाऊक नव्हता. 'देशाचें कांहीं कां होईना, कसा तरी आपला बचाव झाला म्हणजे बस,' एवढीच भावना ब्राह्मणांच्या ठिकाणीं राहिली होती; वैश्यांनीं द्रव्यर्जनाच्या नादीं राहून, आपला धनसंचय राष्ट्रकार्यास दिला नाहीं. शूद्रांस तर परशत्रूच्या आगमनानें आनंदच वाटला. सारांश, मुसलमानांच्या स्वाऱ्यांची भरपूर हकीकत रासाग्रंथांत आहे.

आपसांतील वैमनस्याचा सूड घेण्याकरितां जयचंद राठोड वगैरे कित्येक राजांचें पाठबळ मुसलमानांस होतें. कनोजच्या फौजेंत मुसलमानांचा भरणा होता. पृथ्वीराजाच्या हालचालींची खडानखडा बातमी महंमद घोरीस जयचंदाकडून समजत होती.

पृथ्वीराजरासा हा ग्रंथ महाभारतासारखा मोठा आहे. त्यांत एक लाख कविता आहे. हें पुस्तक अजून छापलेलें नाहीं. किंवा त्याचें भाषांतरही झालेलें नाहीं.

प्रकरण सातवें.

गुलाम वंश.

सन १२०६–१२८८.

१. कुत्बुद्दीन, (स.१२०६–१२१०). २. बंगालचा पाडाव, (१२०२).
३. शम्सुद्दीन अल्तमश,(स.१२१०–३५) ४. सुलताना रझिया वगैरे.
५. नासिरुद्दीन महंमूद,(स.१२४६–६६) ६. बल्बन,(स.१२६६–८६).
७. तुघ्रलचें बंड व शहाजाद्याचा मृत्यु. ८. कैकुबाद, (स. १२८६–८८).
९. गुलाम वंशाची कामगिरी.

१. **ऐबक ऊर्फ कुत्बू-उद्दीन, (स. १२०६–१२१०).**—ऐ[illegible] लहान असतां त्यास कोणी एकानें पळवून खुरासानची राजधानी निशापूर येथें आणिलें. तेथें एका श्रीमान गृहस्थानें त्यास विकत घेऊन विद्या शिकविली. तो गृहस्थ मरण पावल्यावर एका व्यापाऱ्यानें त्यास विकत घेऊन शहाबुद्दीन घोरीस नजर केलें. त्याजवर शहाबुद्दीनची मर्जी इतकी बसली, कीं तो त्याजबरोबर संपूर्ण विश्वासानें व स्नेहानें वागूं लागला. प्रामाणिकपणा व युद्धचातुर्य या गुणांनीं शहाबुद्दीनच्या सर्व सरदारांमध्यें तो अत्यंत श्रेष्ठता पावला. अखेरीस त्यास शहाबुद्दीननें हिंदुस्थानांत आपला प्रतिनिधि नेमिलें. त्यानें दिल्ली शहर आपलें मुख्य ठाणें केलें; तें साडे सहाशें वर्षें पावेतों येथील मुसलमान बादशहांची राजधानी होऊन उत्तरोत्तर भरभराटीस चढलें. गज्नीस महंमद घोरी मरण पावल्यावर कुत्बू-उद्दीन दिल्ली येथें आपणास स्वतंत्र सुलतान म्हणवूं लागला. त्यानें आपल्या नांवानें खुत्बा वाचविला आणि नाणीं पाडिलीं. महंमद घोरीचे दुसरे मुसलमान सरदार होते, त्यांजबरोबर त्यानें शरीरसंबंध जोडिले. त्याच्याच बरोबरीचा गज्नीचा सुभेदार एल्डोझ याच्या मुलीशीं त्यानें स्वतः लग्न केलें. नासिरुद्दीन कुबाचा म्हणून सिंध प्रांताचा सुभेदार होता, त्यास त्यानें आपली बहीण दिली. अल्तमश म्हणून एक दुसरा हुशार सरदार होता, त्यास त्यानें आपली मुलगी दिली. मीरत, दिल्ली, बनारस, कलिंजर, काल्पी, बिंना, ग्वालेर वगैरे ठिकाणें

...द्दीननें काबीज केलीं. महंमद घोरी मेल्यावर कुत्ब्-उद्दीनकडून हिंदुस्थानचा कारभार घेण्याकरितां गज्नीचा सुभेदार एल्डोझ यानें त्याजवर स्वारी केली. तेव्हां कुत्ब्नें एल्डोझचा पराभव करून गज्नीपर्यंतचा प्रदेश काबीज केला. गज्नी येथें कुत्ब्-उद्दीन स्वस्थ आहे असें समजतांच एल्डोझनें पुन: त्याजवर चाल केली, तेव्हां कुत्बचा पराभव होऊन तो हिंदुस्थानांत आला. नंतर त्यानें गज्नीकडे पुनः लक्ष दिलें नाहीं. हिंदुस्थानांतही त्यानें नवीन मुलुख जिंकिला नाहीं. जिंकिलेल्या मुलखाचा बंदोबस्त करून न्यायानें व सौम्यतेनें त्यानें राज्य केलें. कुत्ब्-उद्दीन सन १२१०त घोड्यांवरून पडून मरण पावला. मुसलमान इतिहासकार त्याच्या औदार्याची व सौजन्याची फार तारीफ करितात. हसन निजामी नांवाचा गृहस्थ कुत्बुद्दीनजवळ दिल्लीस होता, त्यानें कुत्बुद्दीनची हकीकत लिहून ठेविली आहे. तो म्हणतो, कुत्बुद्दीन मोठा न्यायी होता; आणि त्याच्या राज्यांत लोक सुख पावले. त्याच्या अप्रतिम औदार्यावरून त्यास 'लखबक्ष' म्हणजे 'लक्ष दान देणारा' असें नांव मिळालें होतें. दिल्लीची जुम्मामशीद प्रथम त्यानें बांधिली; तसेंच दिल्लीजवळ त्यानें एक प्रचंड विजयस्तंभ बांधिला, त्यास कुत्बमिनार म्हणतात. तो लाल दगडांचा प्रचंड मनोरा अद्यापि नुकताच बांधिल्यासारखा नवीन दिसतो. त्याची उंची अडीचशें फूट असून पृथ्वीवर इतका उंच दगडी मनोरा दुसरा नाहीं. त्याच्या पहिल्या दोन मजल्यांवर सभोंवार कुराणांतलीं वाक्यें आरबी भाषेंत लिहिलेलीं आहेत. प्रत्येकानें हा मनोरा एकवार अवश्य पाहण्याजोगा आहे. मशिदींना जे दगड लाविलेले आहेत, ते हिंदु देवळें पाडून त्यांतले आणलेले आहेत.

२. **बंगालचा पाडाव, (सन १२०२).**—महंमद घोरी स्वतः ग्वालेर व बनारसच्या पुढें गेला नाहीं. पण त्याचा सरदार महंमद बख्त्यार खिलजी ह्यानें बंगाल व बहार हे प्रांत जिंकिले, म्हणून मागें सांगितलें आहे. त्याची गोष्ट जरा चमत्कारिक आहे. बखत्यार हा शूर व धाडसी होता, पण तो अत्यंत कुरूप म्हणून त्याजला महंमद घोरीनें थोरपदास चढविलें नाहीं. तेव्हां तो स्वपराक्रमानें दूरदूरचे प्रदेश जिंकण्याच्या उद्योगास लागला. प्रथमतः लुटालुटीचा धंदा आरंभून त्यानें कांहीं लोक जवळ जमविले. बहार प्रांतांत ब्राह्मणांचें एक प्रसिद्ध विद्यापीठ होतें, तें त्यानें धुळीस मिळविलें आणि ब्राह्मणांची कत्तल केली.

ात सौदागरांची सोंगें घेतलेल्या अठरा लोकांनिशीं तो बंगालची तत्कालीन राजधानी नदिया येथें गेला. बंगाल्यांत त्या वेळीं लक्ष्मणसेन नावाचा ऐंशीं वर्षांचा वृद्ध पालवंशी राजा राज्य करीत होता. त्या चोरट्यांस कोणीही अटकाव केला नाहीं. सांपडेल त्यास ठार मारीत ते थेट राजवाड्यांत गेले. मागून त्याची फौज शहरांत जमूं लागली. राजा भोजनास बसला असतां त्यानें चौकांत कांहीं गडबड ऐकिली, [illegible] गानें तो घाबरून मागच्या दरवाज्यानें नदीवर गेला. तेथून नायकामुलांची पर्वा न करितां लक्ष्मणसेन गलबतांत बसून जगन्नाथास गेला. तेथें देवसेवेंत त्यानें आपलें राहिलेलें आयुष्य घालविलें. इकडे मुसलमानांनीं त्याचा सर्व मुलूख काबीज केला, आणि गौड ऊर्फ लखनौती ही त्यांनीं आपली राजधानी केली, (स. १२०२).

ह्या विजयामुळें उत्तरहिंदुस्थानांत समकालीन दोन मुसलमानी राज्यें अस्तित्वांत आलीं; एक दिल्लीचें व दुसरें गौडबंगालचें. अलाहबादच्या पश्चिमेकडील मुलुख दिल्लीखालीं मोडत होता; आणि तेथून पूर्वेस ब्रह्मपुत्रा नदीपर्यंतचा सर्व प्रदेश गौडखालीं मोडत होता. हीं दोनही राज्यें नेहमीं निराळींच असत असें नाहीं. दिल्लीचा राजा पराक्रमी झाल्यास तो गौडचे अंमलदारास आपला अंकित समजे. अर्थात् गौडचे सुभेदारास दिल्लीच्या अधिपतीचें स्वामित्व केव्हां केव्हां कबूल करावें लागे. तथापि गौडचे राज्याची व्यवस्था अकबराचे वेळेपर्यंत स्वतंत्रच होती असें म्हणण्यास हरकत नाहीं. एकदां तर शीरखान नामक गौडच्या सुभेदारानें मोगल बादशहा हुमायून यास पदच्युत करून दिल्ली, पंजाब वगैरे सर्व प्रांतांचें राज्य एकट्यानें बळकाविलें. इतक्या दूरचें राज्य दिल्लीचे राजांस सांभाळितां येत नसे आणि तिकडे काय अंधार चाले तें त्यांस कळत नसे. म्हणून ' गौडबंगाल ' म्हणजे कोडें असा शब्द प्रचारांत आला आहे. बंगाल व बहार हे प्रांत सहज हस्तगत झाल्यामुळें, बखत्यार खिलजीस आणखी देश जिंकिण्याची इच्छा उत्पन्न झाली. आसाम देशास त्या वेळेस कामरूप अशी संज्ञा होती. तो देश व उत्तरेकडील तिबेट देश जिंकण्यासाठीं बखत्यार निघाला. दहा हजार स्वारांनिशीं तो ब्रह्मपुत्रेच्या थडींतून वर गेला. एका ठिकाणीं नदीवर वीस कमानींचा दगडी पूल होता; त्यावरून नदी उतरून त्यानें पुढें पंधरा दिवसांची मजल केली.

ह्या टिकाणीं कामरूपचे राजानें त्याजवर हल्ला केला. कामरूपचे फौजे-जवळ लांब भाले व धनुष्यबाण असून बांबूच्या कामट्या रेशमाच्या धाग्यांत गुंतवून त्यांच्या ढाली केल्या होत्या. उभय फौजांची निकराची लढाई झाली. बखत्यारचे बहुतेक लोक पडले; आणि दुसरी मोठी फौज आपणावर येत आहे असें त्यास कळलें,, म्हणून तो परत फिरला. परत येतांना त्याचे नानातऱ्हेचे हाल झाले. शत्रूच्या लोकांनीं सर्व दाणा-वैरण जाळून टाकिली. कामरूपच्या राजानें पुलाच्या दोन कमानी पाडून सर्व होड्या नाहींशा केल्या होत्या. म्हणून बखत्यारचा कांहीं उपाय चालेना. तेव्हां आपला घोडा तसाच पाण्यांत घालून पोहत तो अलीकडे आला. त्याजबरोबरच्या लोकांपैकीं फक्त शंभर असामी बचावून अलीकडे आले. ह्या अपयशामुळें उद्विग्न होऊन बखत्यार पुढें लवकरच मरण पावला. त्याच्या मागून जे गौडचे कारभारी झाले, त्यांची हकीकत विशेष महत्त्वाची नाहीं. वेळ येईल त्याप्रमाणें कधीं ते स्वतंत्र होत आणि कधीं दिल्लीचे ताब्यांत जात. बखत्यार ज्या पुलावरून उतरून गेला, तो मोडका पूल गौहट्टीपासून वीस मैलांवर अद्यापि दिसतो. नदीचा प्रवाह हल्लीं तेथून वीस मैल दूर गेला आहे. ब्रह्मपुत्रानदीवर इतका जुना पूल दुसरा नाहीं.

कुत्ब्-उद्दीन हा हिंदुस्थानांतला पहिला मुसलमान सुलतान होय. हा तुर्क जातीचा गुलाम होता. त्याचे बरेच अनुयायी त्याच्यासारखेच मूळ गुलाम असून स्वपराक्रमानें मोठ्या योग्यतेस चढले. ह्या कारणास्तव कुत्ब्-उद्दीनचे वंशास गुलामवंश म्हणण्याचा प्रघात आहे. या घराण्यांतील पुरुषांनीं हिंदुस्थानांत ऐशीं वर्षांवर राज्य केलें. ह्या वंशाची हकीकत मुसलमान इतिहासकारांनीं भरपूर दिली आहे. या वेळेस नानाप्रकारचे दंगेधोपे व बंडें चालू होतीं, आणि मुलखांत फारसें स्वास्थ्य नव्हतें.

३. **शम्स्-उद्दीन अल्तमश, (सन १२१०–१२३५).**–कुत्ब्-उद्दीन यास आरम म्हणून एक मुलगा होता; तो बापाच्या पाठीमागून तख्तनशीन झाला. परंतु प्रबळ सुभेदारांच्या हाताखालीं असलेलें एवढें अफाट राज्य चालविण्याची त्यास शक्ति नव्हती. नासिर-उद्दीन कुबाचा हा सिंध व मुलतान हे प्रांत बळकावून स्वतंत्रतेनें कारभार करूं लागला. महंमद बखत्यार खिलजी बंगाल व बहार प्रांत बळकावून बसला होताच.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

एल्डोज हा गज्नीकडून लाहोर जिंकण्याच्या बेतांत होता. अशा स्थितींत दिल्लीच्या प्रमुख दरबारी मंडळींनीं कुत्बूचा जांवई अल्तमश, बदाऊन प्रांताचा अंमलदार, ह्यास दिल्लीस येऊन राज्यकारभार हातीं घेण्याविषयीं विनंति केली. त्याप्रमाणें त्यानें येऊन दिल्लीनजीक आरमचा मोड करून तख्त बळकाविलें. अल्तमश यासही चोहोंकडून शत्रु होते, पण त्या सर्वांचा त्यानें हळूहळू बंदोबस्त केला. गज्नीचा सुलतान ताज्-उद्दीन एल्डोझ ह्यानें दिल्लीचे प्रांत घेण्याकरितां स्वारी केली, पण कुरुक्षेत्रावर त्याचाच पराजय होऊन मरेपर्यंत त्यास कारागृहवास पत्करावा लागला. अल्तमश हा थोर कुळांतला होता, तरी भावानें द्वेषबुद्धीनें त्यास विकून टाकिल्यामुळें, कुत्बूप्रमाणेंच तोही एक तुर्की गुलाम झाला. स्वरूपानें देखणा असल्यामुळें त्याच्या धन्यानें त्यास चांगलें शिक्षण दिलें, आणि पुष्कळ किंमत घेऊन कुत्ब्-उद्दीनला विकिलें. त्यानें त्यास प्रथम शिकारखान्यांत नेमिलें; आणि सन ११९६त त्यास ग्वालेरचा कारभार सांगितला. उत्तरोत्तर त्याजवर कुत्बूची मर्जी बसली. पुढें आपली मुलगी त्यास देऊन कुत्बू त्यास मुलाप्रमाणें वागवूं लागला. राज्यपदारूढ झाल्यावर त्याला फारशी स्वस्थता मिळाली नाहीं. नासिर-उद्दीन कुबाचा यास आपल्या ताब्यांत आणण्यासाठीं त्यानें १२१७त सिंध व मुलतान प्रांतांवर स्वारी केली; पण तींत त्यास यश आलें नाहीं. सन १२२४ त अल्तमशानें सिंधप्रांतावर पुनः स्वारी करून नासिर-उद्दीनचा समूळ नाश केला. पुढें उत्तरेकडील मुलतान वगैरे प्रांत अल्तमशाच्या स्वाधीन करून दक्षिण भागांत जलमार्गानें पळून येत असतां, नासिरुद्दीन आपल्या सर्व कुटुंबासह तुफानांत सांपडून बुडून मरण पावला, (सन १२३०). नासिर-उद्दीननें सुमारें बावीस वर्षे स्वतंत्रतेनें कारभार केला होता. त्याचा सर्व मुलूख अल्तमश ह्यानें दिल्लीचे राज्याखालीं आणिला. ही गोष्ट सिंधचे केवळ उत्तरभागास लागू आहे. दक्षिणभाग सुमेर नांवाच्या रजपुत लोकांच्या ताब्यांत होता. ह्याच सुमेर रजपुतांनीं महंमद कासीमनें सिंधप्रांतांत स्थापिलेल्या मुसलमानी अंमलाचा शेवट करून हिंदु राज्य स्थापिलें. उत्तरभाग घोरच्या महंमदानें जिंकून नासिर-उद्दीनचे ताब्यांत दिला होता. सर्व सिंधप्रांत मुसलमानी अंमलाखालीं येण्यास पुष्कळ काळ लागला.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

स. १२२६त अल्तमश ह्यानें माळवाप्रांतावर हल्ला करून मांडवगडचा प्रसिद्ध मजबूत किल्ला घेतला. ग्वालेरचा किल्ला पुनः हिंदु लोकांनीं परत घेतला होता, तो स. १२३१त ह्यानें लढून परत मिळविला. ह्याच समयीं पुरातन काळचें मातबर शहर विक्रमादित्याची राजधानी उज्जनी अल्तमशनें घेऊन तेथील सर्व देवालयांचा विध्वंस केला. पुढें बंगालप्रांताचाही कांहीं भाग त्यास मिळाला. सारांश, मरणसमयीं सिंधूपासून भागीरथीपर्यंत बहुतेक उत्तरहिंदुस्थान अल्तमश ह्यानें मुसलमानी अमलाखालीं आणिलं. हिंदु लोकांची अवशिष्ट सत्ता दरएक ठिकाणीं नष्ट होत गेली. खंडणी भरून राहणारे रजपूत राजे आतां थोडेच शिल्लक राहिले. अल्तमशनें स्वपराक्रमानें आपली योग्यता वाढवून राज्यपद मिळविलें. त्याच्या कार्किर्दींत मोगल लोकांचा हिंदुस्थानांत प्रथम शिरकाव झाला. खारिज्मचा सुलतान महंमद चंगीझखानापासून पराभव पावून कास्पियन समुद्रांतील एका बेटावर हालअपेष्टेंत मरण पावला. त्याचा मुलगा जलालुद्दीन हा कांहीं दिवस चंगीझशीं झगडून टिकाव न लागल्यामुळें, जीव बचावण्यासाटीं सिंधुनदींतून पोहून अलीकडे आला, (सन १२२१). त्याच्या पूर्वीं गज्नीचा सुलतान एल्डोज हाही मोगलांस भिऊन हिंदुस्थानांत आला होता, त्यास अल्तमशनें कैदेंत ठेविलें. तेथेंच तो मरण पावला. मोगल लोक जलालुद्दीनच्या पाठीवर होतेच. तेव्हां जलाल-ऊद्दीननें दिल्लीस जाऊन अल्तमशजवळ आश्रय मागितला. पण चंगीझशीं टक्कर देण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें अल्तमशनें ती मदत कबूल केली नाहीं. तेव्हां जलाल-उद्दीन सिंध प्रांतांत जाऊन नासिर-उद्दीन कुबाचा यास जाऊन मिळाला. तेथें कांहीं दिवस मोगलांचा व त्यांचा झगडा होऊन जलाल-उद्दीन हिंदुस्थान सोडून इराणकडे गेला. तेव्हां मोगलांच्या टोळधाडीपासून हिंदुस्थानचा तूर्त बचाव झाला. जलालुद्दीनच्या वनवासाची हकीकत अत्यंत हृदयद्रावक, कल्पित कादंबरीलाही मागें टाकील अशी आहे. या मोगलांचे हल्ले पुढें वेळोवेळीं होऊन अखेरीस त्यांच्याच ताब्यांत हिंदुस्थानचें स्वामित्व गेलें, ती हकीकत पुढें यावयाची आहे.

अल्तमशनें दिल्ली शहर आपली राजधानी केली. मुसलमान लोक राज्यें कमावीत कोठेंही गेले, तरी मूळ इस्लामाचेच आपण अंश आहों

असें दाखविण्यास ते फार उत्सुक असत. म्हणून अल्तमशनें बगदा-दच्या खलीफाकडून स्वतःसाठीं बादशाही वस्त्रें आणविलीं. स. १२२९त खलीफाचे वकील पोषाख घेऊन दिल्लीस आले; आणि त्यांनीं खलीफाच्या हुकमानें अल्तमश ह्यास हिंदुस्थानचा स्वतंत्र सुलतान नेमिलें. त्यावरून अल्तमशनें अनेक नवीन किताब आपल्या नांवाला जोडिले, आणि नवीन नाणीं पाडून त्यांजवर आरबी भाषेंत ते किताब खोदविले. स. १२३६त अल्तमश मरण पावला.

४. सुलताना रझिया, (स. १२३६–१२४०).—अल्तमशच्या मृत्यूनंतर दहा वर्षें राज्यांत पुष्कळ अंदाधुंदी माजली. रुक्न्-उद्दीन म्हणून अल्तमशचा वडील मुलगा होता, तो बापाच्यामागें फिरोजशहा हें नांव धारण करून तख्तनशीन झाला. परंतु तो अत्यंत दुर्वृत्त व विलासी निघाला. त्याच्या आईच्या हातीं सगळा कारभार असे. तीही दुष्ट होती. दरबारच्या लोकांस त्या दोघांचा इतका कंटाळा आला, कीं अल्तमशाची वडील मुलगी रझिया हिलाच त्यांनीं सर्व राज्यकारभार देऊन तिजकडून रुक्न उद्दीन् यास कैदेंत ठेवविलें. तिनें 'रझियातुद्दीन' म्हणजे 'धर्मभक्त' असा किताब घेतला. रझिया बापाची लाडकी व पराक्रमी होती. बाप दूर असतां ती दिल्लीस राहून सर्व कारभार पाहत असे. राजाला अवश्य लागणारे गुण तिच्या अंगीं होते. ती मोठी बुद्धिवान व धीट होती. बायको असूनही पुरुषाच्या अंगचे अनेक गुण तिच्यांत होते. ती स्वरूपानें सुंदर होती. आपल्या पश्चात् हिनेंच राज्य करावें अशी बापाची इच्छा होती. तिची कर्तृत्वशक्ति, न्यायचातुर्य व उद्योग अचाट होते. ती मर्दानी पोषाख करून दररोज सिंहासनावर बेऊन बसे. प्रत्येक काम स्वतः पाहून त्याचा निकाल करी. पूर्वींच्या वाईट चाली तिनें बंद केल्या. कायद्यांची दुरुस्ती केली आणि उमराव लोकांस तिनें संतुष्ट राखिलें. ती इतकी व्यवहारदक्ष असतांही एका गोष्टींत फसली. एका हबसी गुलामावर तिचें मन बसलें, आणि सगळा कारभार तिनें त्याच्या हातीं दिला. हें पाहून दरबारच्या लोकांनीं बंड केलें. तेव्हां पुढें झगडा होऊन त्यांत तो हबसी मारला गेला. पुढें तिला लोकांनीं आल्टूनिया नामक सरदाराच्या बंदोबस्तांत ठेविलें. लोकांचा रोष शमविण्याकरितां तिनें ह्या आल्टूनियाशींच लग्न लाविलें. पुढें ह्या दोघां नवराबायकोंच्या व इतर

NATIONAL ARCHIVES OF INDIA

सरदारांच्या दोन निकराच्या लढाया होऊन ती पकडली गेली; आणि लोकांनीं तिला व तिच्या नवऱ्यास ठार मारिलें. वास्तविक राज्यकारभार चालविण्यास ती समर्थ होती. पण बायकोनें राज्य करावें, ही कल्पनाच तुर्की लोकांस खपली नाहीं. त्यामुळें तिचा नाश झाला. आजपर्यंत मुसलमानी अमदानींत तीन बायकांनीं राज्यपद भोगिलें आहे. एक ही रझिया, दुसरी शजारुद्दर ही स. १२५० त इजिप्टची राणी होती. हिनें धर्मयुद्धांत फ्रान्सचा नववा लुई (सेंट लुई) ह्याचा पराभव केला. तिसरी आबिश (Abish) ही इराणांत तेराव्या शतकांत राज्य करीत होती. वरील युद्धांत रझियाचा भाऊ शहाजादा बह्‌राम तिजविरुद्ध लढत होता. त्यासच लोकांनीं राज्यपद दिलें. दिल्लीच्या तख्तावर बसलेली पहिली राणी रझिया आणि दुसरी महाराणी व्हिक्टोरिया होय.

मोइझ्-उद्दीन-बह्‌राम, (स. १२३९–१२४१).—बह्‌राम राज्य करण्यास लायक नव्हता. ज्यांनीं त्यास राज्यपद मिळवून दिलें, तेच त्याच्यावर उठले. तेव्हां कित्येकांस त्यानें कपटानें ठार मारिलें, म्हणून त्याजविरुद्ध दरबारी लोकांचे कट होऊं लागले. सन १२४१ त गज्नीहून मोगल लोक लाहोरावर आले, आणि त्यांनीं सभोंवारच्या मुलखांत अनर्थ मांडिला. पंजाबचा मुसलमान सुभेदार पळून गेला. बह्‌राम ह्यानें यख्त्यार-उद्दीन नामक दिवाणास फौज देऊन लाहोरास पाठविलें. त्यानें मोगलांस घालवून देऊन परत दिल्लीस येऊन, सुलतानास कैद करून ठार मारिलें.

अलाउद्दीन-मसूऊद, (स. १२४२–१२४६).—हा रुक्नुद्दीनचा मुलगा. ह्याची कारकीर्दही वरच्यासारखीच घालमेलींत गेली. हा क्रूर व विलासी असून राज्यकारभारांत मन घालीत नसे. दरबारच्या लोकांनीं ह्यास पदच्युत करून त्याचा चुलता नासिरुद्दीन यास बोलावून राज्यपद दिलें. मसूऊद मरेपर्यंत कैदेंत होता. त्याच्या कारकिर्दींत मोगल लोकांचे दोन हल्ले हिंदुस्थानावर आले, एक तिबेटच्या बाजूनें बंगालप्रांतावर व दुसरा पश्चिमेकडून पंजाबावर. दोनही ठिकाणीं तेथच्या सुभेदारांनीं त्यांस परतून लाविलें.

५. नासिरुद्दीन महंमूद, (स. १२४६–१२६६).—नासिरुद्दीन महंमूद हा अल्तमशाचा मुलगा. त्याची कारकीर्द बरीच सुखावह झाली. लहान

असतांच बापानें त्यास बंगालच्या कारभारावर नेमिलें होतें. परंतु त्यास त्याच्या सावत्र आईनें बंदींत ठेविलें. पुढें मसूऊदनें त्यास सोडून बंगालच्या सुभेदारीवर नेमिलें. तें काम त्यानें फार चांगल्या रीतीनें केलें. त्याची राहणी अगदीं साधी असे. बंदींत असतां तो कुराणाच्या नकला करून त्या विकून आपला निर्वाह करी. हा धंदा त्यानें अखेरपर्यंत चालविला. त्या वेळीं अनेक बायका करण्याचा प्रघात असतांही त्यानें एकपत्नीव्रत पाळिलें. त्याची बायको घरचीं सर्व कामें स्वतः करी. एके दिवशीं भाकर करितांना तिचीं बोटें भाजलीं, तेव्हां स्वयंपाकासाठीं एक बाई ठेविण्याबद्दल तिनें नवऱ्यास विनंती केली. महंमुदानें ती विनंती ऐकिली नाहीं. तो बोलला, 'मी राज्याचा केवळ संरक्षक आहें, मालक नव्हें. मी आपल्या स्वतःच्या खर्चांचा भार राज्यावर लादणें ठीक नाहीं. तूं शांत मनानें आपलें काम करीत जा, म्हणजे ईश्वर तुला चांगलें बक्षीस देईल.' त्याचें भोजन वनवासी साधूच्यासारखें असे. स्वतःच्या श्रमानें मिळेल तेवढ्यावर तो आपला निर्वाह करी. आरंभापासूनच त्याच्या हातांत राज्यकारभार असता, तर कदाचित् त्यानें आपला छांदिष्टपणा अशा थगास नेला नसता. तथापि एकंदरींत त्याचे कारकिर्दींत प्रजेचें कल्याण झालें. हरएक बाबतींत त्याची वागणूक तारीफ करण्याजोगी होती. कित्येक बंडखोर जुने सरदार होते, त्यांस कामांवरून काढून त्यानें चांगलीं लायक माणसें नेमिलीं. वायव्यदिशेकडे मोगलांच्या रस्त्यावर लष्कराचा चांगला बंदोबस्त ठेविला. यमुनानदीच्या आसपास कित्येक लहान राज्यें स्वतंत्र होतीं, तीं त्यानें जिंकून आपल्या राज्यास जोडिलीं. माळवा प्रांत पूर्णपणें ताब्यांत आणिला. बुंदेलखंडांत नरवारचा राजा मोठी फौज घेऊन नासिरुद्दीनशीं लढण्यास आला, त्याचा त्यानें पराभव करून सर्व प्रदेश दिल्लीचे ताब्यांत आणिला. शीरखान नामक त्याच्या पंजाबच्या सुभेदारानें सन १२५० सालीं मोगलांस मागें हटवून गझ्नी शहरही काबीज केलें. सन १२५८त मेवाडी व इतर रजपुतांनीं राज्यांत पुष्कळ निकराचीं बंडें केलीं, तीं रक्तपात होऊन मोडलीं. ग्यास्-उद्दीन बल्बन म्हणून त्याचा हुशार वजीर होता. त्याजवर राज्याचा सर्व कारभार त्यानें सोंपविला होता. इराणांत चंगीझखानाचा नातू हुलाकू राज्य करीत होता, त्याजकडून एक वकील दिल्लीस आला. त्याना

सत्कार सुलतानानें उत्तम केला. कित्येक दिवसपर्यंत त्याच्या सन्मानार्थ समारंभ चालले होते. त्यासाठीं सुलतानानें दिल्लीस दरबार भरविला, त्यास हिंदुस्थानचे पुष्कळ मांडलिक राजे हजर होते. त्याचप्रमाणें चंगीझखानाच्या त्रासास कंटाळून दिल्लीस येऊन राहिलेले असे मध्यआशियांतील सुमारें पंचवीस राजे दिल्लीच्या दरबारीं होते. वीस वर्षें राज्यकारभार पाहून सुलतान नासिरुद्दीन अंगीं खिळलेल्या फार दिवसांच्या आजारानें स. १२६६ त मरण पावला. तो स्वभावाचा शांत व एकलकोंडा असल्यामुळें सामान्य गृहस्थ या दृष्टीनें पाहिलें तर योग्य होता. पण राज्यकारभार पाहणाऱ्याला इतका स्वार्थत्याग हितावह होत नसतो, असें इतिहासकार लिहितात.

६. बल्बन, (स. १२६६–१२८६).—नासिरुद्दीन महंमूद यास मूल नसल्यामुळें त्याचा फार दिवस काम केलेला वजीर बल्बन यास अनायासें तें राज्य प्राप्त झालें. बल्बन हा एका तुर्क सरदाराचा मुलगा असून, लहानपणींच मोगल लोकांनीं त्यास पळवून आणून एका व्यापाऱ्यास विकिलें होतें. त्या व्यापाऱ्यानें त्यास बगदाद येथें आणिलें असतां, बसऱ्याच्या एका गृहस्थानें त्याला विकत घेतलें. अल्तमश दिल्लीस राज्य करीत होता, त्याची व बल्बनची उत्पत्ति एकाच घराण्यांत झालेली आहे, असें त्या गृहस्थास समजल्यावरून, त्यानें त्यास दिल्लीस अल्तमशकडे आणिलें. त्या वेळची अशी आख्यायिका सांगतात, कीं बल्बन ठेंगू व कुरूप होता, म्हणून अल्तमश त्यास विकत घेईना. हें पाहून बल्बन अल्तमश ह्यास म्हणाला, 'महाराज, हे सर्व लोक आपण कशासाठीं विकत घेतले?' बादशहा म्हणाला, 'ते माझ्या उपयोगी पडतील म्हणून.' 'तर मग मलाही घ्या, मीही आपल्या उपयोगी पडल्याशिवाय राहणार नाहीं.' हे शब्द ऐकून बादशहा खुष झाला, आणि त्यानें त्यास विकत घेतलें. पुढें लवकरच हिंदूंचीं बंडें मोडण्यांत तो प्रसिद्धीस आला. रुक्न्-उद्दीनच्या वेळेस तो पंजाबच्या कामगिरीवर होता. सुलतान रझियाच्या विरुद्ध कट झाला, त्यांत हा सामील असल्यामुळें कैदेंत पडला. कांहीं दिवसांनीं सुटका झाल्यावर बह्‌रामच्या कारकीर्दींत हंसी व रेवारी या दोन प्रांतांचा कारभार त्याजकडे होता. त्या वेळेस त्यानें मीरतच्या आसपास उद्‌भवलेलीं बंडें मोडण्यामध्यें चांगलें नांव मिळविलें. अलाउद्दीन मसूदच्या कार्कि-

दींत अमीर हज्ञीबचें काम त्याजकडे होतें, आणि नासिरुद्दीनच्या वेळेस, नांवानें प्राधनकीचें, पण वस्तुतः राजाचें काम तोच पाहत होता. त्यानें आरंभीं दहशत बसण्याकरितां कांहीं कडकपणा गाजविला, पण पुढें न्याय व शहाणपणा यांजबद्दल त्याची ख्याति झाली. अपराधास कडक शिक्षा व चांगल्या कामगिरीस बक्षीस देण्यास तो तत्पर असे. तथापि स्वजातीकडे त्याचें लक्ष विशेष होतें. भरंवशाच्या किंवा अधिकारांच्या जागेवर कोणाही हिंदूची नेमणूक करूं नये, असा त्यानें सक्त नियम केला होता. त्याजकडून मुसलमानी विद्येस चांगलें उत्तेजन मिळत असल्यामुळें, मोठमोठे विद्वान् पंडित त्याच्या दरबारीं असत. त्याचा दरबार अत्यंत शिस्तीचा व भपकेदार होता. त्याचाच कित्ता इतर दरबारी लोकांनीं उचलिला. दिल्ली शहरांत निरनिराळ्या तऱ्हेच्या संस्था स्थापन झाल्या, त्यांत सुलतानाच्या विद्याभिरुचीबरोबर त्याच्या डामडौली स्वभावाचेंही त्यांनीं अनुकरण केलें. ह्या दरबारच्या भपक्यानें व शिस्तीचें वर्णन फेरिस्त्यानें केलें आहे. राजदर्शनास कोणास जाणें असल्यास त्यास अशी कांहीं कवाईत करावी लागे, कीं त्यामुळें त्याच्या मनांत आश्चर्य व दहशत उत्पन्न होई. बल्बनची स्वारी मोठी थाटाची निघे. त्याचे स्वारीचे हत्ती एकजात सुवर्णमय कपड्यांनीं मढविलेले असत. त्याचा खाजगी लवाजमा हजार तार्तार स्वारांचा होता. त्यांचीं शस्त्रास्त्रें मोठीं लखलखीत व मौल्यवान असत. इराण व आरबस्तान येथून मुद्दाम घोडे आणून तो स्वारांना देई. स्वारीपुढें पांचशें हलकारे नागव्या तलवारींनिशीं चालत असत. इतर सरदार लोक आपापल्या मिसलीप्रमाणें स्वारीबरोबर जात. मद्यपान कोणास न करूं देण्याबद्दल त्याचें विशेष लक्ष होतें. जवळच्या एका मोठ्या सरदाराच्या मुलानें मद्यपानाच्या निशेंत आपल्या एका नोकरास ठार मारल्याची फिर्याद, मयताच्या बायकोनें सुलतानाकडे नेली. तेव्हां त्यानें त्या गृहस्थास तावडतोब बोलावून त्याजवर काम चालविलें, आणि देहान्त शिक्षा देऊन ती लगेच भरदरबारांत अमलांत आणिली. त्याचप्रमाणें अयोध्येचा सुभेदार अशाच गुन्ह्यास पात्र झाला असतां, सर्वांच्या देखत पांचशें फटके मारून, गुलाम म्हणून त्यास मयताच्या बायकोच्या स्वाधीन केलें. अशीं उदाहरणें हरहंमेश घडत. मद्यपान करणारांना त्यानें अत्यंत कडक शिक्षा ठरवून दिल्या होत्या. त्यास डामडौल प्रिय असे, तरी अनेक वेळां

राज्याचा खर्च कमी करण्याकरितां अगदीं लहान गोष्टींत सुद्धां तो मन घालीत असे. इ.स. १२७० मध्यें पंजाबप्रांताचा सुभेदार मरण पावला, तेव्हां तिकडील प्रांत उघडे पडून मोगल लोकांपासून जबरदस्त उपद्रव होऊं लागला; आणि त्यांत खालचे अधिकारी मोगलांस मिळून आहेत असेंही त्यास दिसून आलें. तेव्हां बल्बननें आपला पराक्रमी पुत्र महंमूद ह्यास मोगलांच्या बंदोबस्तास पंजाबांत पाठविलें; आणि त्यानेंच आपल्या पाठीमागून गादीवर बसावें असेंही त्याच वेळीं ठरवून ठेविलें.

७. बंगाल्यांत तुघ्रलखानाचें बंड, (स. १२७८-१२८३).–सुलतान बल्बन यानें अतिदूरची स्वारी केली, ती बंगालची होय. बंगालप्रांत दूर असल्यामुळें तेथचे अधिकारी व लोक दिल्लीच्या सुलतानास मोजीत नसत. बल्बनच्या कारकिर्दीचा वृत्तान्त 'बराणी' ह्यानें लिहिला आहे. त्यानें बंगाली लोकांस पुळपुळित म्हटलें आहे. तथापि बल्बनचा अधिकार त्यांनीं निमूटपणें सहन केला नाहीं. महंमद घोरीचा सरदार बख्तयार खिलजी ह्यानें बंगालप्रांत जिंकिल्यापासून बल्बनपावेतों पंधरा कारभारी बंगाल्यांत झाले. बल्बननें तुघ्रलखान नामक आपल्या मर्जीतला एक इसम बंगालच्या कारभारावर नेमिला होता. तो गोड स्वभावाचा व उदार असल्यामुळें बंगालच्या लोकांस फार प्रिय झाला. प्रजाजन व फौज त्याच्या अगदीं भजनीं लागली.

तुघ्रलखानाची ही लोकप्रियता सुलतानास आवडली नाहीं. शिवाय सुलतान वृद्ध झाला आहे अशी संधि पाहून, तो स्वतंत्र होण्याच्या नादीं होता, इतक्यांत स.१२७९मध्यें बल्बन आजारी पडून मरण पावला अशी एक बातमी उठली. ही बातमी तुघ्रलखानास समजतांच तो बंगाल्यांत स्वतंत्र कारभार करूं लागला. तेव्हां तुघ्रलखानास जिंकण्यासासाठीं बल्बननें अयोध्येचा सुभेदार अलतगीन ह्यास 'अमीरखान' असा किताब देऊन पाठविलें, आणि त्याच्या मदतीस दुसरी मोठी फौज रवाना केली. अलतगीन व तुघ्रलखान यांचें गोग्रा नदीच्या पलीकडे युद्ध होऊन त्यांत बल्बनचे फौजेचा संपूर्ण पराभव झाला. अलतगीन हात हलवीत परत आलेला पाहून त्यास बल्बननें अयोध्येच्या वेशीवर फांशीं दिलें. त्यानंतर बादशहानें बंगाल्यावर दुसरी फौज पाठविली. तिचाही तुघ्रलखानानें पराभव केला. तेव्हां बल्बन मोठी फौज गोळा करून स्वतः उतावळीनें भर पावसाळ्यांत बंगाल्यांत

गेला. बादशहा आला असें पाहून तुघ्रलखान दूर कोठें पळाला, तो समोरासमोर येईना, आणि बादशहास त्याचा पत्ताही लागेना. अशा रीतीनें पुष्कळ दिवस गेले. अखेरीस कोल प्रांताचा सुभेदार मलिक-मुकदम हा लहानशी टोळी घेऊन तुघ्रलखानाच्या शोधार्थ निघाला. जवळच त्यास खानाची छावणी दिसली. चाळीस लोक बरोबर घेऊन तो थेट त्याच्या तंबूवर गेला. तुघ्रलच्या लोकांस हा परकी आहे असें वाटलें नाहीं. जवळ जाऊन मलीक मोठ्यानें ओरडला. त्याबरोबर एकदम उडी मारून जवळच एक बिनखोगिराचा घोडा होता, त्याजवर चढून तुघ्रलखान नदीकडे पळाला. मलीक त्याच्या पाठीस लागला. नदींतून पोहून जात असतां मलीकचा बाण तुघ्रलास लागून तो घायाळ झाला. मलीकनें तशीच लगट करून तुघ्रलचें शिर कापून घेतलें, आणि धड तसेंच नदींत वहात जाऊं दिलें. *ह्या साहसाच्या कृत्यावरून मलीक ह्यास 'तुघ्रलकुश' म्हणजे 'तुघ्रल ह्यास मारणारा' असें टोपण नांव मिळालें.* दुसऱ्या दिवशीं बल्बन ह्यानें तुघ्रलच्या सर्व मुलांबाळांस ठार मारिलें. तसेंच अनेक वधस्तंभ ओळीनें उभे करून त्यांजवर हजारों लोकांस फांशीं दिलें. बराणी म्हणतो, गौड येथें बल्बननें जसा क्रूरपणा दाखविला, तसा हिंदुस्थानांत पूर्वी कोणीं पाहिला नव्हता. त्यानें आपला मुलगा बोग्राखान ह्यास बंगाल प्रांताचा सर्व कारभार सांगितला. ह्या स्वारीस एकंदर तीन वर्षे लागलीं, (स. १२८०–१२८३). बोग्राखानास त्यानें सांगितलें, कीं "'सर्व बंगालप्रांत काबीज करून त्याजवर अंमल करीन,' अशी शपथ घे, समजलास." त्याजवर बोग्राखान कांहींच बोलेना. बापानें पुनः विचारिलें, 'समजलास ?' तरी तो बोलेना. त्यावर तो वृद्ध सुलतान म्हणाला, 'आज बाजारांत लोकांस कशा शिक्षा दिल्या, त्या तूं पाहिल्याच आहेत. जर वाईट लोकांच्या नादीं लागून इकडेच स्वतंत्र होण्याचा विचार मनांत आणशील, तर तुझी काय दशा होईल, ध्यानांत ठेव. सिंध, माळवा, गुजराथ, लखनौती, सोनारगांव, इत्यादि ठिकाणीं जर कोणी दिल्लीच्या सुलतानाशीं पुनरपि बेइमान करून शस्त्र उचलील, तर त्यांची व त्यांच्या बायकामुलांची दशा तुघ्रलखानासारखी होईल.' येथचे एकेक प्रांत जिंकून मुसलमानी राज्याखालीं आणण्यास ह्या तुर्कांनीं केवढे अकटोविकट प्रयत्न केले, हें ह्यावरून दिसून येतें.

शहाजादा महंमूद याचा मृत्यु, (स. १२८५).—एकंदरींत बल्बनचें सर्व आयुष्य धामधुमींत व युद्धप्रसंगांत खर्च झालें. नासिरुद्दीनच्या कार्किर्दींत वजीर म्हणून वीस वर्षें व स्वतः वीस वर्षें मिळून त्यानें चाळीस वर्षें राज्यकारभार केला. पहिल्या वीस वर्षांत हिंदूंस पादाक्रान्त करून मोगलांचा बंदोबस्त करणें हीं दोन मुख्य कामें त्यास करावीं लागलीं. पहिलें तडीस गेलें, पण दुसरें मात्र गेलें नाहीं. त्यानें सरहद्दीच्या बंदोबस्तासाठीं अनेक योजना केल्या, पण त्यांचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. राज्यावर आल्यावरही त्यानें आपला पूर्वीचा कडक व कठोर बाणा तसाच चालू ठेविला. दिल्लीच्या आसपास नेहमींच बंडावे होत असत, ते मोडण्यांत त्यानें एक लाख लोक ठार मारिले, तेव्हां शांतता झाली. मुसलमान इतिहासकार अशा शांततेचे गोडवे गातात. *मुसलमानांस येथें आपलें कायमचें राज्य स्थापन करावयाचें होतें, तेव्हां अशा क्रूरपणाची त्यांनीं तारीफ करावी हें योग्यच आहे.* पण ‘ जिकडे तिकडे रक्ताच्या नद्या वाहूं लागल्या, प्रत्येक गांवाजवळ प्रेतांचे प्रचंड ढीग जमा झाले, आणि त्यांच्या दुर्गंधीनें सर्व देश व्यापून गेला, ’ अशीं वर्णनें वाचलीं म्हणजे बल्बनची तारीफ करणें अशक्य वाटूं लागतें. तुर्क लोक बंड करीत, तेव्हां त्यांचाही त्यानें अशाच क्रूरपणानें बंदोबस्त केला.

बंगालच्या स्वारींतून परत आल्यावर, मुलतानवर मोगलांनीं हल्ला केला होता, त्यांचा बंदोबस्त करण्याकरितां आपला आवडता मुलगा महंमूद यास मुलतानांत रवाना केलें, त्या वेळीं बल्बनचें वय ऐंशीं वर्षांचे झालें होतें, म्हणून आपला आतां भरंवसा नाहीं असें वाटून त्यानें मुलास सदाचरणाचा चांगला बोध केला, तो प्रत्येकानें ध्यानांत ठेवण्याजोगा आहे, सबब तो फेरिस्त्यानें लिहिल्याप्रमाणेंच शब्दशः येथें देतों.

‘ माझें सर्व आयुष्य राज्यकारभार करण्यामध्यें गेलें; आतां मला लौकरच मरण येणार. करितां मला जो अनुभव प्राप्त झाला आहे, तो तुझ्या उपयोगी पडेल, म्हणून तुला सांगतों.

‘ तख्तनशीन झालास म्हणजे मी ईश्वराचा प्रतिनिधि आहें असें समजून वागत जा. आपणांवर केवढी जबाबदारी आहे हें अगोदर चांगलें ओळखून ठेव. हलकट वर्तनानें आपल्या थोरपदास कालिमा लागूं देऊं नको, इतकेंच नव्हे, तर हलकट व लोभी माणसांवर तूं मोहबत धरूं

नको आणि त्यांचा राज्यकारभारांत कदापि शिरकाव होऊं देऊं नको, हें पक्कें ध्यानांत असूं दे.

'आपल्या मनोविकारांस विवेकाच्या लगामीं ठेव; क्रोधाच्या तावडींत सांपडावयाचें नाहीं अशी खबरदारी बाळग. क्रोध हा मनुष्यमात्राचा दुष्मन तर खराच, पण त्यांतूनही राजांच्या घाताचें तो मुख्य कारण होय.

'सारासार विचार करून व सत्कृत्य करण्यामध्यें दक्ष राहून सद्बुद्धि ठेवून वाग; आणि शहाणपणानें काटकसर करून सढळ औदार्याच्या कामीं, तूं आपल्या द्रव्याचा व्यय करीत जा.

'आपल्या आचरणानें ईश्वरभक्तीचा ठसा लोकांच्या मनावर उठीव. दुर्वर्तन व नास्तिकपणा यांचें योग्य शासन केल्याशिवाय राहूं नको.

'दरबारच्या कामांत चांगलें लक्ष घालीत जा. म्हणजे खटपटी व ढोंगी कारभाऱ्यांचे हातून तूं फसणार नाहींस.

'तुला आपला राज्यकारभार कामदारांमार्फत चालविला पाहिजे, म्हणून यत्किंचितूही हयगय किंवा कसूर न होतां हुकुमाची तामिली बजाविली जाते किंवा नाहीं, हें तूं मोठ्या काळजीनें पाहत जा.

'सद्गुणी व लायक असे न्यायाधीश निवडून त्यांजकरवीं न्यायाचा प्रकाश सर्व राज्यांत निरंतर पाडीत रहा.

'राजपुरुषाच्या नांवाला हीनत्व आणणारें कोणतेंही खासगी किंवा दरबारी कृत्य तुझ्या हातून घडणार नाहीं अशी खबरदारी ठेव. तुझी सर्व व्यवस्था इतकी चोख व नियमित असूं दे, कीं तेणेंकरून प्रजेमध्यें तुजसंबंधानें पूज्यबुद्धि व दरारा आपोआप उत्पन्न व्हावा. तुझ्यासंबंधानें प्रजेच्या ठिकाणीं पुज्यबुद्धि व दरारा असेल, तरच तुझी थोरवी वाढून तुझ्या हुकुमाची तारीफ व अंमलबजावणी होत जाईल.

'बुद्धि, विद्वत्ता व धैर्य यांहीं युक्त अशीं माणसें शोधून काढण्याच्या कामीं तूं बिलकुल कसूर करूं नको. हलक्या माणसाला एकदम थोरपदाला चढवूं नको, कारण हलकट मनुष्य थोरपणास चढला, म्हणजे तो स्वतःला विसरतो, आणि खऱ्या योग्यतेच्या माणसांच्या डोळ्यांत नेहमीं सलत राहतो.'

'अगदीं अडलेंच असें झाल्याशिवाय कोणत्याही कामाला हात घालूं नको. त्याचप्रमाणें आपले हातून अखेरपर्यंत मजल मारवेल अशाच

कामाला हात घाल. अमुक एक काम हातीं घ्यावयाचें असें ठरलें, म्हणजे मग तो निश्चय बिलकूल ढळूं देऊं नको, किंवा त्यांतून मन काढून घेऊं नको. राजानें दुराग्रह दाखविणें पतकरेल, पण धरसोड किंवा नेभळेपणा अगदीं कामाचा नाहीं. आग्रही वर्तन एखादे वेळेस तरी बरोबर असण्याचा संभव असतो, पण धरसोडींत चुकण्याचीच खात्री आहे. धरसोडीच्या वर्तनानें राजाच्या मनाचें दौर्बल्य जितकें बाहेर व्यक्त होतें, तितकें दुसरें कशानेंही होत नाहीं.'

असा उपदेश करून शहाजाद्यास सुलतानानें मोगलांच्या बंदोबस्ताकरितां पाठविलें.

चंगीझखानाचा नातू हुलाकू यानें इराण देश जिंकिला, म्हणून मागें सांगितलें आहे. ह्या हुलाकूचा मुलगा अर्घूनखान हा बल्बनच्या वेळेस इराणांत राज्य करीत होता. चंगीझखानाचा तयमूरशहा नांवाचा दुसरा एक वंशज खुरासानपासून सिंधुनदीपर्यंतच्या प्रदेशावर राज्य करीत होता. सन १२८३मध्यें तयमूरशहानें बल्बनचे मुलखावर हल्ला केला. तेव्हां वृद्धापकाळामध्यें आपल्या आवडत्या मुलास लढाईवर पाठविणें बल्बनच्या जिवावर आलें. तरी त्यानें महंमुदास पाठविलें. त्यानें जाऊन मोगलांचा पूर्ण मोड करून आपला गेलेला सर्व मुलूख परत घेतला. सन १२८५त दीपलपूर येथें मोठ्या निकराची लढाई झाली. शहाजादा महंमूद यास जय मिळाला; पण मागून पाटलाग करीत असतां, तो दूर आला असें पाहून, मोगल एकदम परत फिरून त्याजवर उलटले. त्या झटापटींत हा शूर व उदार राजपुत्र मारला गेला. त्याचे सर्व शिपाई विजयोत्साहांत निमग्न असतां त्यांस एकाएकीं ही आकाशाची कुऱ्हाड पडल्यासारखें वाटलें. ह्या आघातानें सर्व लहानथोरांच्या डोळ्यांत अश्रू आले. दिल्लीस सुलतानास ही हकीकत समजल्यावर जो आकांत उडाला त्याचें वर्णन करणें अशक्य आहे. पुत्राच्या मरणाची बातमी ऐकिल्यावर रोजच्याप्रमाणें दरबारचें वगैरे काम करून त्यानें दिवस कसाबसा लोटला; पण सायंकाळीं त्यानें आकांत करून डोक्यांत धूळ फेंकून घेतली. त्याच्च धक्क्यानें आजारी पडून पुढें तो लवकरच मरण पावला, (स. १२८७). हिंदुस्थानांत राज्य राखणें झाल्यास तें कसें राखावें हें त्याच्या इतकें दुसऱ्या कोणास समजत नव्हतें. भपकेबाज दरबार भरवून व थाट

करून तो लोकांवर छाप बसवी. त्याची स्वारी पाहण्यास दूरदूरचे लोक येत. त्याचे खासगी नोकर सुद्धां त्याजवळ मोठ्या थाटानें व अदबीनें वागत. त्याजसमोर हंसणें, खेळणें, थट्टा करणें, वगैरे सर्व प्रकार मना असत. लहानपणीं त्यास मद्यप्राशनाचा नाद होता, पण राज्यकारभार हातीं येतांच त्यानें आपले सर्व छंद टाकून दिले. चाळीस वर्षांत त्यानें अयोग्य माणसाशीं सलगी केली नाहीं, कीं हलकट माणसांस जवळ थारा दिला नाहीं. तो गुलामगिरींतून वाढला होता. प्रथम [redacted], मग शिकारी, मग सेनापति व मुत्सद्दी, आणि सरशेवटीं सुलतान अशा रीतीनें तो चढत गेला. दिल्लीच्या प्रमुख सुलतानांत त्याची गणना आहे.

एकंदरींत त्या वेळच्या मानानें बल्बनची कारकीर्द फार नांवाजण्यासारखी झाली. दिल्लीच्या आसपास बंडखोर व लुटारू लोकांचा उपद्रव फार होत असे, तो त्यानें बंद करून, जंगलें वगैरे तोडून, शेतीची व वसाहतीची सोय केली. शहाजादा महंमूद जगता, तर तो फार चांगला झाला असता, असें म्हणतात. अनेक देशाचे थोर थोर विद्वान् गृहस्थ बल्बनच्या दरबारीं येऊन राहिले होते. शेखसादी कवीच्या मनांत दिल्लीस जाऊन त्याला भेटावें असें होतें, पण तें घडलें नाहीं. अमीर खुस्रु म्हणून दुसरा एक विद्वान् कवि महंमुदाजवळ नेहमीं असे. मोगल लोकांस बल्बनचा फार वचक असून त्यांनीं त्याचा स्नेह संपादिला होता.

८. कैकुबाद, (स. १२८६–१२८८).—बल्बन याम बोगराखान म्हणून दुसरा मुलगा होता. तुघ्रलखानास मारल्यावर हा बंगालच्या कारभारावर होता. त्यानें मरणसमयीं बापाजवळ येऊन राहण्याची पर्वा केली नाहीं, म्हणून महंमुदाच्या मुलास आपल्या पाठीमागें राज्यावर बसवावें, असें बल्बननें मरणसमयीं ठरवून ठेविलें होतें. परंतु बल्बन मरण पावल्यावर उमरावांनीं बोगराखानाचा मुलगा कैकुबाद यासच दिल्लीचे तख्तावर कायम केलें. कैकुबाद देखणा व सौम्य होता. सतरा वर्षे आजानें त्यास कडक बंदोबस्तांत ठेवून हरएक प्रकारचें शिक्षण दिलें होतें. त्या अवधींत दारूची बाटली अगर सुंदर स्त्री कशी ती त्याच्या दृष्टीस सुद्धां पडली नव्हती. अशा मुलाच्या हातांत एकदम सर्व राज्याची दौलत व हुकमत आल्याबरोबर मग काय विचारावयाचें ? तो नानाप्रकारच्या विलासांत निमग्न राहूं लागला. यमुना नदीच्या कांठीं एक विलासमंदिर

८-७९१-२०००

NATIONAL ARCHIVES OF INDIA

बांधून तेथें. तो सदासर्वकाळ चैन करीत असे. निजाम-उद्दीन म्हणून कैकुबादचा मुख्य कारभारी होता, त्याचे हातांत सर्व सत्ता होती. कैकुबादास काढून आपण राज्य बळकवावें असा ह्या निजाम-उद्दीनचा घाट होता. पंजाबप्रांतांत कैखुस्रू होता, तोही मोगलांच्या साह्यानें दिल्लीचें राज्य घेण्यास पाहत होता; पण ह्या कामांत त्यास यश न येऊन, तो दिल्लीस आला असतां, निजाम-उद्दीननें त्यास ठार मारविलें. नंतर बल्बनच्या वेळच्या सर्व हुशार कामगारांस निजामानें हळू हळू काढून लाविलें. मोगल लोकांस वश करून त्यांचा उपयोग करून घेतल्यास, त्यांचा उपद्रव बंद होईल, अशा समजुतीनें बल्बनानें पुष्कळ मोगल लोक आपल्या फौजेंत नोकरीस ठेविले होते. परंतु निजामानें ह्या मोगल लोकांविषयीं कैकुबादचे मनांत वांकडेपणा भरवून सर्वांस ठार मारिलें. तथापि कैकुबादचा बाप बोगराखान जिवंत होता. त्यानें आपल्या मुलास उपदेशपर पत्रें पाठवून, राज्यावर संकटें काय काय आलीं आहेत तें स्पष्ट कळविलें. पण निजामाच्या खटपटीनें कैकुबादपाशीं तीं पत्रें पोंचलीं नाहींत. शेवटीं बोगराखान मोठ्या प्रयासानें दिल्लीस येऊन आपल्या पुत्रास भेटला. तेव्हां पितापुत्रांच्या प्रेमानें भेटी होऊन निजामाचें सर्व कपट बाहेर पडलें. तेव्हां आतां आपल्यावर बेततें असें पाहून त्यानें विष घेऊन आत्महत्या केली.

नंतर कांहीं वेळपर्यंत कैकुबाद शुद्धीवर होता. पण एकवार लागलेली वाईट संवय जाणार कशी ? लवकरच जिकडे तिकडे पुनः अंदाधुंदी सुरू झाली. व्यसनांनीं कैकुबादची प्रकृति बिघडून त्यास अर्धांगवायु झाला. तेव्हां दरबारामध्यें खिलजी व मोगल असे दोन पक्ष झाले. खिलजीच्या पक्षांत मलीक जलालुद्दीन फिरोज हा मुख्य होता. दुसऱ्या पक्षाकडे मोगल लोक कैकुबादच्या लहान मुलास राज्यपद देण्याविषयीं झटत होते. ह्या दोन पक्षांचीं भांडणें विकोपास जाऊन शेवटीं जलालुद्दीन ह्यानें, कैकुबाद विलासमंदिरांत मरणोन्मुख पडला असतां त्यास ठार मारून, त्याच्या अवयवांची कपड्यांत मोट बांधून ती खालीं यमुनानदींत फेंकून दिली, आणि त्याच्या मुलासही मारून दिल्लीचें राज्य आपण बळकाविलें. येणेंप्रमाणें गुलामवंशाचा शेवट झाला, (इसवी सन १२८८). ह्या वंशास 'घोरच्या सुलतानांचे गुलाम' अशी संज्ञा मुसलमान इतिहासकार देतात.

९. **गुलामवंशाची कामगिरी.**—सबक्तगीन व महंमूद ह्यांनीं हिंदुस्थानांत प्रवेश केल्यास तीनशें वर्षें होऊन गेलीं. एवढ्या कालांत देश जिंकण्यापलीकडे विशेष गोष्ट त्यांच्या हातून घडली नाहीं. गुलामवंशी सुल्तानांनींच हिंदूंचीं पराक्रमी राज्यें पादाक्रांत केलीं. मुसलमान राजे मूर्ति फोडणें व मशीदी बांधणें वगैरे कामें झपाट्यानें करीत चालले. हिंदूंची मदत घेतल्याशिवाय मुसलमानांनीं स्वतःच्या बळावर हिंदूंस पादाक्रांत केलें. दक्षिणहिंदुस्थानांतील लोक व राजे, उत्तरेस काय होत आहे हें पहात स्वस्थ बसले होते. आपण उत्तरेच्या लोकांस मदत द्यावी व मुसलमानांस पुढें येऊं देऊं नये, असें त्यांच्या मनांत आलें नाहीं. ह्या वेळची एकंदर लोकस्थिति कशी होती हें समजण्यास मार्ग नाहीं. मुसलमान इतिहासकार युद्धें व झगडे ह्यांपलीकडे फारसें वर्णन देत नाहींत. तथापि नर्मदेच्या उत्तरेकडील सर्व देश पाडाव करण्याचें मोठें काम गुलामवंशानें केलें आहे.

'*गुलाम*' ह्या शब्दांत हल्लीं तिरस्करणीय अर्थ आहे. गुलाम म्हणजे धन्याचा बंदा नोकर; त्यास स्वतंत्रता नाहीं व धन्याच्या मर्जीपलीकडे स्वतःचें जीवन नाहीं. धन्याच्या जंगम मिळकतीचाच तो एक भाग होय. अर्थात् मनुष्यपणाचे जे नैसर्गिक हक्क आहेत, ते त्यास मिळावयाचे नाहींत. अशा अर्थानें गुलामरूपी संस्थेचा उदय फार प्राचीन काळीं झाला. तथापि पूर्वेकडील राष्ट्रांपेक्षां पाश्चात्य राष्ट्रांतच गुलामगिरीचें हिडिस स्वरूप परमावधीस पोंचलें. ग्रीक व रोमन लोकांमध्यें गुलाम होते. बहुधा लढाईंत पाडाव करून आणिलेल्या लोकांचा भरणा ह्या गुलामांत होत असे. मुसलमानांच्या वेळेस ह्यागुलामगिरीचें प्रस्थ फार वाढलें, आणि मध्यकालीन क्रिस्ती राजांनीं तर ह्या कामीं अमानुषपणाची कमाल केली. एखाद्या ठिकाणच्या लोकांस जबरीनें पकडून त्यांस दुसऱ्या देशांत नेऊन कामास लावणें, किंवा त्यांचा क्रयविक्रय करणें हे निंद्य प्रकार युरोपियनांनीं सुरू केले, (ब्रि. रियासत पृ. २१३ पहा.) पण मुसलमानांचा प्रकार ह्याहून भिन्न होता. मुसलमानांचा संचार जेव्हां पॅसिफिक महासागरापासून अटलांटिक महासागरापर्यंत होऊं लागला, तेव्हां मार्गांतील अनेक लोकांचा पाडाव होऊन, त्यांच्या झुंडीच्या झुंडी मुसलमान सरदारांच्या पदरीं जमत चालल्या; आणि त्यांस मुसलमानी धर्माची दीक्षा मिळाली. अशा पाडाव

झालेल्या लोकांनी दंगा [illegible] करूं नये म्हणून पुष्कळदां त्यांची एकजात कत्तल करण्यांत येई, आणि कित्येकदां तयमूरलंगसारखे धाडसी व क्रूर पुरुष, पाडाव केलेल्या लोकांचा शिरच्छेद करून त्यांच्या शिरांचे मनोरे बांधीत, आणि अशा रीतीनें लोकांवर आपली दहशत बसवीत.

पण मुसलमानी धर्म व राज्य ह्यांचा विस्तार करण्यास ह्या गुलामांचाच उपयोग विशेष झाला आहे. तुर्क अफगाणांच्या अमदानींत तर गुलामांची ही संस्था म्हणजे नांवलौकिक व पराक्रम गाजविण्याची एक उपयुक्त शाळाच बनली. एखाद्या सरदाराच्या लगामीं राहून आणि त्याचें अनुकरण करून नशिबाची परीक्षा पाहणें हा एक धंदाच झाला. सेल्जुक तुर्कांच्या राज्यांत गुलामांचा उदय झपाट्यानें झाला. सेल्जुक सुलतान मलीकशहा ह्याच्या लष्करांतून अनेक पुरुष पुढें निरनिराळ्या प्रांतांच्या कारभारावर राहून भरभराटीस चढले. त्यांस मलीकशहाचा गुलाम म्हणवून घेण्यांत मोठी धन्यता वाटे. जन्मानें मनुष्य कितीही हलका असला, तरी त्यास इतरांच्या बरोबरीनें नांव काढण्याची सारखी संधि ह्या गुलामगिरींत मिळत असे. कित्येक सुलतानांची भक्ति प्रत्यक्ष मुलांपेक्षां गुलामांवर ज्यास्त असे. एकवार गुलामगिरींतून वर जाऊन उदय झाल्यावर, दरएक पुरुष पुनः आपल्याजवळ नवीन गुलामांचा भरणा करी; आणि अशा योगानें ही गुलामांची संस्था नेहमीं वाढत जाऊन तीं मुसलमानी राज्यास फारच उपयोगाची झाली. तेराव्या शतकांत ईजिप्ट देश जिंकणारे मामेलूक नांवाचे तुर्क सुलतान आरंभीं अशा गुलामांतूनच वाढलेले होते. महंमद घोरी व कुत्ब्-उद्दीन ह्यांना गुलामांचें महत्त्व विशेष वाटत असे. एकदां महंमद घोरी आपल्या एका सोबत्याशीं गोष्टी करीत बसला असतां, तो सोबती म्हणाला, 'काय हो, आपणांस मूल नाहीं ही केवढी दुःखाची गोष्ट. मूल असतें तर आपल्या वंशाचें नांव तरी पाठीमागें राहिलें असतें.' त्यावर घोरी सुलतानानें उत्तर दिलें, 'काय मला मूल नाहीं म्हणतां? माझीं मुलें हजारों आहेत. हे तुर्की गुलाम माझ्या पदरीं जमले आहेत, हे माझीं मुलें नाहींत तर कोण? हे माझ्याहूनही ज्यास्त पराक्रम करून माझें राज्य व कीर्ति वाढविणार नाहींत काय?' ही गोष्ट खरी ठरली. जी गोष्ट मुलांस साध्य होणें शक्य नव्हतें, तीं ह्या गुलामांनीं सिद्धीस नेली. मुलगा झाला तरी बापासारखा शहाणा व पराक्रमी

NATIONAL ARCHIVES OF INDIA

निपतोच असें नाहीं. पुष्कळदां बापाचे पराक्रमामुळें घरांत श्रीमंती व ऐषआराम वाढून मुलें ऐदी व निःसत्त्वच बनतात. तीं मुलें वाईट निपजलीं तरी त्यांसच पुढें राज्यावर बसवावें लागतें. त्यांस दूर सारण्याचें साधन राहत नाहीं. बाप सुद्धां आपल्या एखाद्या पराक्रमी सरदारास राज्य न देतां, आपल्या ऐदी मुलानें आपल्या मागें राज्यावर बसावें, ह्यासाठीं हपापलेला असतो. पण गुलामगिरी म्हणजे पराक्रमाची शाळा. त्या शाळें‑तून निभावून बाहेर येण्यास अंगची योग्यताच पाहिजे. योग्यता नसल्यास तो नाहींसा व्हावयाचा. अशा प्रकारें नशिबाच्या चाळणींतून गाळून निघाल्यावर जो निभावला (survival of the fittest) तो गुलाम. मुसल‑मानांच्या वृद्धीस ही संस्था आशियाखंडांत फारच उपयोगी पडली; आणि अफगाण सुल्तानांस तर तिजपासून चांगलाच फायदा झाला. महंमदघोरीचे चार मुख्य सरदार ह्या गुलामांतून पुढें आले: अफगा‑णिस्तानांत एलडोझ, सिंधप्रांतांत कुबाचा, बंगाल्यांत बखत्यार खिलजी, आणि दिल्लीस कुत्बुद्दीन. आरंभीं गुलामांतून वर आले, म्हणून त्यांचें कुळ नेहमींच हीन असें नाहीं. सारांश, गुलामगिरीच्या पेशाला, पाश्चात्य लोकांत जो निंद्य अर्थ आहे, तो पूर्वेकडच्या ह्या मुसलमानी अमदानींत नव्हता, हें ध्यानांत ठेविलें पाहिजे.

प्रकरण आठवें.

खिलजी घराणें.

स. १२८९–१३२०.

१. खिलजी लोकांची कुळी. २. जलालुद्दीन खिलजी, (स. १२८९-९५.)
३. मुसलमानांचा दक्षिणेंत प्रथम प्रवेश. ४. अलाउद्दीनचें राज्यारोहण.
५. अलाउद्दीनचे पराक्रमः— (क) मोगलांच्या स्वाऱ्या.
(ख) चितोड. (ग) गुजराथ. (घ) रतनभोर.
(ङ) दक्षिणची दुसरी स्वारी. ६. दक्षिणहिंदुस्थानांतील राज्यें.
७. मलीक काफूरच्या स्वाऱ्या. ८. अलाउद्दीनचा मृत्यु व राज्यव्यवस्था.
९. अलाउद्दीनची करामत व योग्यता. १०. मुबारिक खिलजी, (स. १३१६-२०.)
११. खुस्रूचा विक्षिप्तपणा.

१. खिलजी लोकांची कुळी.—गुलामवंशाच्या अंमलांत राज्यांतील सर्व मोठमोठ्या जागा तुर्क लोकांनीं पटकाविल्या होत्या. तरी तुर्कांशिवाय दुसरेही कित्येक लोक इकडे आलेले होते. ते साधारणतः अफगाण किंवा पठाण ह्या नांवाखालीं मोडतात. पुढें जसे मोगल प्रसिद्धीस आले, तसेच हे पठाणही ह्या वेळीं प्रसिद्धीस आले. वायव्येकडील डोंगराळ प्रदेशांतून आलेले गौरवर्ण लोक, इतकाच वास्तविक पठाण शब्दाचा अर्थ आहे. खिलजी हे पठाणच होत. अफगाणिस्तानांत खल्ज् नांवाचें एक ठिकाण आहे, तेथचे हे मूळचे राहणारे म्हणून त्यांस खिलजी हें नांव प्राप्त झालें. हे बहुतकरून लुटालूट करीत फिरत, अथवा कोणी चाकरीस ठेविल्यास त्याजवळ राहत. ह्या जातीचे पुष्कळ लोक बल्बनच्या फौजेंत नोकर होते. पूर्वी हे तुर्कस्तानांत राहणारे असून अलीकडे ते हिंदुस्थानच्या सरहद्दीवर येऊन राहिले. त्यांपैकीं कित्येक लोक गज्नीच्या सुलतानाचे नोकरींत असत. मलीक म्हणून एक खिलजी सरदार स्वपराक्रमानें बल्बनच्या नोकरींत मोठ्या प्रसिद्धीस आला. त्यास समाराप्रांताची सुभेदारी मिळाली. त्याचा मुलगा जलालुद्दीन फिरोज. त्यांचें व तुर्कांचें हाडवैर असे. खिलजींनींच प्रथम बंगालप्रांत जिंकून तेथील कारभार केला. जलालुद्दीन फिरोज नांवाचा त्यांचा एक सरदार होता, त्याच्या हाताखालीं ते गुलामवंशाचे अखेरीस शिरजोर झाले. कैकुबादचा वजीर निजामुद्दीन हा तुर्क होता, आणि तुर्कांच्या जाचास लोक त्रासले होते, म्हणून जलालुद्दीन ह्यासच त्यांनीं मदत केली. कैकुबाद आजारी असतां ह्या जबरदस्त उमरावानें आपलें प्रस्थ अतोनात वाढविलें, तें इतकें कीं सन १२८९त त्यानें दिल्लीची बादशाही सुद्धां बळकाविली. त्या वेळीं त्याचें वय सत्तर वर्षांचें होतें. खिलजी वंशाकडे हें जें दिल्लीचें तख्त गेलें तें तीस वर्षे त्याजकडे चाललें. ह्या तीस वर्षांत लहानमोठे सहा राजे झाले, पण त्यांत एकाचें नांव विशेष प्रमुख आहे. तो अला-उद्दीन होय. त्यानें वीस वर्षें कारभार करून बहुतेक सर्व देश आपल्या ताब्यांत आणिला.

२. जलालुद्दीन खिलजी, (स. १२८९–१२९५).—जलालुद्दीननें रक्तपात करून तख्त मिळविलें होतें, तरी लागलीच सात्त्विक वृत्ति धारण केली. एवढ्या मोठ्या अधिकारास आपण लायक नाहीं असें तो दाखवी. तख्तावर बसण्याचें सोडून दरबारांतील आपल्या जागीं तो उभा राही.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

त्मेंच तो लोकांवर दया व परोपकार करूं लागला. पूर्वीच्या दोस्तांशी तो फार ममतेनें व निष्कपटपणानें वागे. चतुर, धैर्यवान व शहाणे अशा लोकांवर तो विशेष मेहेरबानी ठेवी. मोठमोठीं कडक शासनें त्यानें कधीं कोणास केलीं नाहींत. तेव्हां बंडखोर व लुटारू लोकांचें चांगलें फावलें. अशा लोकांस फार,तर तो हद्दपार करी, पण तेवढ्यानें भागत नसे. खिलजी लोकांस त्याचा हा अतिसौम्य स्वभाव आवडत नसे. त्याची सौम्य वृत्ति पाहून बंडखोर लोकांस चांगलें फावलें. फारशी ग्रंथकार जलालुद्दीनच्या शांत वृत्तीचें फार वर्णन करितात. आशियाखंडांतील पुष्कळ विद्वान् लोकांस, कवींस व गवयांस त्यानें चांगला आश्रय दिला. सिद्दीमौला नामक दरवेशानें सुलतानास मारण्याचा बेत केल्यावरून त्यास त्यानें फाशी दिलें. त्या वेळीं दरवेशानें मरतांना त्या सुलतानास शाप दिले, ते त्यास बरेच लागले. सन १२९१त सर्व देशभर मोठा दुष्काळ पडला, त्यांत हजारों लोक प्राणांस मुकले. त्याच वर्षी जलालुद्दीनचा मुलागा खानखानान हा मरण पावला. त्यानंतर बंडखोरांचा बंदोबस्त करण्याचें त्यानें कांहींसें मनावर घेतलें. माळव्यांत बंड झालें तें मोडण्यास तो स्वतः गेला, आणि दोन स्वाऱ्या करून माळवा प्रांतांत त्यानें स्वस्थता केली. सन १२९२त एक लाख मोगल स्वारांनीं पंजाबावर स्वारी केली. जलालुद्दीन स्वतः त्यांजबरोबर लढण्यास गेला. पांच दिवस दोनही फौजांचा तळ समोरासमोर होता. सहाव्वे दिवशीं तुंबळ युद्ध होऊन मोगलांचा पराजय झाला. तरी उभयतांमध्यें लवकरच स्नेहभाव जुळून आला. नजरनजराणे देऊन त्यांना स्वस्थपणें परत जाण्याची जलालुद्दीननें परवानगी दिली. ह्या वेळीं उल्लायखान नामक चंगीझखानाच्या एका नातवानें जलालुद्दीनच्या मुलीशीं लग्न करून आपल्या तीनहजार लोकांस दिल्लीस ठेवून दिलें. त्यांस राहण्याकरितां दिल्ली शहरच्या वेशीजवळ जलालुद्दीननें एक जागा नेमून दिली, ती मोगलपुरा म्हणून अद्यापि प्रसिद्ध आहे. हे तीन हजार लोक लवकरच मुसलमान झाले. सर्व मोगलांनीं मुसलमान धर्म हा वेळपर्यंत स्वीकारिला नव्हता, पण मुसलमानांच्या सहवासानें त्यांनीं हळू हळू तो धर्म स्वीकारिला.

पूर्वी जलालुद्दिन फिरोज राज्यावर बसतांच त्यानें आपल्याजवळ आपला भाऊ शहाबुद्दीन मस्-उद ह्याचे दोन मुलगे जवळ बाळगिले होते. एकाचें नांव अला-उद्दीन व दुसऱ्याचें नांव आल्मसबेग. अलाउद्दीननें

मोगलांस हटविलें, म्हणून त्यास सुलतानानें गंगा व यमुना या नद्यांमधील अंतर्वेदी प्रांतांत कुरा म्हणून सुभा आहे त्याजवर सुभेदार नेमिलें. कुरा हें शहर अलाहाबादच्या वायव्येस चाळीस मैलांवर असून हल्लीं अगदीं मोडकळीस आलें आहे. सन १२९३त अलाउद्दीननें माळव्याच्या स्वारींत चांगला पराक्रम केला. भिलसा वगैरे कित्येक ठिकाणचे हिंदु लोकांस त्यानें जिंकिलें, म्हणून जलालुद्दीननें अयोध्येचा सुभाही त्यास दिला. येणेंप्रमाणें अला-उद्दीनचें वजन दरबारीं फार वाढत चाललें. अला-उद्दीन हा फार हुशार व खटपटी होता. तो मनांत आलेली गोष्ट केल्याशिवाय राहत नसे. माळव्यांत त्यानें पुष्कळ किल्ले व लूट मिळविली, म्हणून त्याला मोठी फौज बाळगितां आली.

३. **मुसलमानांचा दक्षिणेंत प्रथम प्रवेश.**—मुसलमान लोक हिंदुस्थानांत येऊन तीनशें वर्षें झालीं. एवढ्या अवधींत त्यांनीं उत्तरहिंदुस्थान काबीज केलें. दक्षिणहिंदुस्थानकडे त्यांची दृष्टि ह्या वेळपर्यंत गेली नाहीं. जलालुद्दीनच्या कारकिर्दींत मुसलमान लोकांनीं दक्षिणेंत प्रथम प्रवेश केला. ही गोष्ट चांगली लक्षांत ठेवण्याजोगी आहे. ह्या स्वारीची हकीकत महाराष्ट्रदेशाच्या प्राचीन इतिहासांतही येणारी आहे. भिलसा येथें असतांना अला-उद्दीन ह्यास दक्षिणेंत देवगड किंवा देवगिरी नामक एका धनाढ्य शहराची खबर कळून त्याच्या तोंडास पाणी सुटलें, आणि चुलत्याजवळ दक्षिणेंत जाण्याची त्यानें परवानगी मागितली. हें काम मोठें दुर्घट होतें. महाराष्ट्रदेश नर्मदेच्या दक्षिणेस. कुरा शहराहून देवगड ७०० मैल दूर; दिल्लीहूनही तितकेंच लांब; देवगडास जाण्याचा रस्ता बिकट जंगलांतून व अपरिचित मुलखांतून होता. नानाप्रकारच्या भयंकर लोकांची रस्त्यांत वस्ती होती. ते अला-उद्दिनास दाणावैरण मिळूं द्यावयाचे नाहींत; त्याच्या फौजेवर छापा घालून एकदम कापून काढणार; अशा प्रसंगीं सुटून जाण्यास मार्ग नाहीं. पण हिंदु लोकांची अला-उद्दिनास चांगली माहिती होती. ते सात्त्विक आहेत; धर्मयुद्धाचे नियम मोडीत नाहींत; वर्दी दिल्याशिवाय संग्राम करीत नाहींत; त्यांच्या वाटेस न जाणाऱ्यांस विनाकारण ते त्रास देत नाहींत. म्हणून स्वारांचा निकट जमाव करून व कांहीं तरी खोटी बात झोंकून देऊन, ह्या लोकांस चुकवितां येईल, अशी अला-उद्दीनची खात्री होती. त्यानें आपला खरा

घेत चुलत्यास किंवा दुसऱ्या कोणासही कळविलें नाहीं. आठ हजार स्वार घेऊन तो सन १२९३त कुराहून निघाला; आणि बुंदेलखंडाच्या जंगलांतून थेट दक्षिणेस चालला. सहा महिनेपर्यंत त्याचा मागमूस पाठीमागें कोणासही कळला नाहीं. 'मी दिल्लीचा सुलतान जलालुद्दीन ह्याचा पुतण्या आहें. चुलत्याबरोबर भांडून मी नोकरी पत्करण्याकरितां तेलंगणच्या राजाकडे राजमहेंद्रीस चाललों आहें,' असें सांगत तो चालला. त्यास कोणींच कोठें अडथळा केला नाहीं; किंवा तो सांगतो तें खरें कीं खोटें ह्याची काडीभर सुद्धां कोणीं चौकशी केली नाहीं. विंध्याद्रि उतरून अला-उद्दीन नर्मदा पार झाला, आणि देवगडच्या तटाखालीं एकदम येऊन उतरला.

देवगडासच पुढें दौलताबाद हें नांव मिळालें. हिंदुस्थानच्या इतिहासांत हें ठिकाण मोठ्या महत्त्वाचें आहे. त्याचें कारण पुढें हळू हळू समजेल. रामदेवराव जाधव नांवाचा मराठा राजा देवगड येथें राज्य करीत होता. रामदेवरावाचें विशेष वर्णन मराठ्यांचे इतिहासांत आलें आहे तें पहावें. अला-उद्दीन येत आहे ह्याची त्याला वार्ता सुद्धां कळली नव्हती. शहराबाहेर देवदर्शनास गेला असतां त्यास अला-उद्दीन आल्याची बातमी लागली, तेव्हां तो एकदम मोठ्या काळजींत पडला. त्याची लढाईची तयारी नव्हती, फौज दुसरीकडे गेली होती, म्हणून शहरवासी लोकांतून व नोकरचाकरां-तून कांहीं माणसें जमवून तो अला-उद्दीनवर चालून गेला. बराच वेळ त्याच्या लोकांनीं टिकाव धरिला. तथापि शेवटीं पराभव पावून तो किल्ल्याचे आश्रयास गेला. हल्लीं दौलताबादच्या किल्ल्यास मोठा खंदक आहे तो तेव्हां नव्हता. अला-उद्दीननें किल्ल्यास वेढा दिला आणि इकडे शहरांत शिरून लुटालूट आरंभिली. लोकांनीं आपल्या गुप्त ठेवी दाखवाव्या, म्हणून त्यांवर नानातऱ्हेचा त्यानें जुलूम केला, तरी किल्ला हस्तगत होईना. तेव्हां अला-उद्दीननें असें कळविलें, कीं 'मी फक्त लहानशी फौज घेऊन पुढें आलों आहे. बादशहाची मोठी फौज मागाहून येत आहे.' हें ऐकून रामदेवरावाची पांचावर धारण बसली. किल्ल्यांत सामुग्री भरितांना धान्याच्या ऐवजीं मिठाचीं पोतीं भरलीं गेलीं होतीं. धान्य संपलें, तेव्हां त्यानें घाबरून एकदम पुष्कळ द्रव्य देऊन अला-उद्दीनशीं तह केला. त्यास तरी हेंच पाहिजे होतें. कारण रामदेव-

रावांची मुख्य फौज परत आल्यावर तिजपुढें त्याचा टिकाव लागला नसता. तह होऊन अला-उद्दीन परत निघणार, इतक्यांत रामदेवरावाचा मुलगा शंकरदेव मोटी फौज जमवून बाहेरून आला. रामदेवरावानें त्यास निरोप पाठविला, कीं 'अला-उद्दीनशीं तह झाला आहे; तर तुम्ही लढाई करूं नये.' हें शंकरदेवानें मानिलें नाहीं. त्यानें अल्ला-उद्दिनास पत्र पाठवून कळविलें, कीं 'तुम्हाला जिवाची आशा असेल व सुखानें परत जाणें पाहिजे असेल, तर माझ्या राज्यांतून जें काय हरण केलें आहे, तें सर्व परत द्या, व जीव बचावला म्हणून संतोष मानीत परत जा.' या पत्रानें मुसलमानांचें पित्त खवळलें. त्यांनीं पत्र आणणाऱ्या जासुदाचे तोंडास काजळ फांसून हुसकून दिलें.

अल्ला-उद्दीन लगेच लढाईच्या तोंडावर गेला. एकहजार स्वार देऊन त्यानें मलीक नुसत ह्यास वेढा घालण्यास पाठविलें. त्या प्रसंगीं शंकरदेवानें विलक्षण पराक्रम दाखविला. मुसलमानांचा समूळ नाश होण्याची वेळ आली, इतक्यांत किल्ल्याचे रक्षणास ठेविलेला रामदेवाचा सरदार आपले थोडे लोक बरोबर घेऊन जरूर नसतां लढाईस आला. त्यांच्या पायांनीं उडालेली धूळ दुरून पाहून हिंदु लोकांस वाटलें, कीं दिल्लीहून अला-उद्दीनचे मदतीस जी मोठी फौज येणार होती ती हीच होय. आतां आपला निभाव नाहीं. या खोट्या भीतीनें भेदरल्यामुळें ते रणांगण सोडून सैरावैरां पळूं लागले. त्याबरोबर मुसलमानांस जय मिळाला. विजय संपादून अला-उद्दीन किल्ल्याकडे गेला. तेथें धान्याऐवजीं मिठाचीं पोतीं किल्ल्यांत गेलीं हें त्यास समजलें. तेव्हां देवगिरीकर रामदेवास दुसरा कांहींच उपाय न राहून इलिचपुर व आसपासचे प्रांत आणि अपरंपार द्रव्य अला-उद्दिनास देऊन, त्यानें कसाबसा आपला बचाव करून घेतला. अशा प्रकारें विजय संपादून अला-उद्दीन कुरा येथें परत आला. युद्धांत विजय किंवा पराजय होणें केवळ यदृच्छाधीन आहे, असें जे अनेक युद्धविशारद सांगतात, त्याचा प्रत्यय वरील देवगडच्या लढाईनें चांगला येतो. हिंदुस्थानच्या इतिहासांत ह्या प्रकाराची पुनरावृत्ति वारंवार झालेली दिसून येते.

४. अला-उद्दीनचें राज्यारोहण.—जलालुद्दीनच्या पुळपुळीत कारभारानें कोणाचेंच समाधान झालें नाहीं. आपल्यावर कोणी राजा आहे

असें पदोपदीं लोकांस वाटलें नाहीं, तर तो राजा काय कामाचा, असें त्यांस होऊन जातें. तत्त्वज्ञानाच्या गहन विचारांत निमग्न असलेल्या राजास फारसे कोणी अनुयायी मिळत नाहींत. तीच स्थिति जलालुद्दीनची झाली. लोकांचें लक्ष अला-उद्दीनकडे लागलें होतें. त्यास जलालुद्दीनची मुलगी दिलेली होती. अला-उद्दीन दक्षिणेंत गेल्यापासून त्याचें तिकडे काय झालें हें न समजल्यामुळें, मागें चुलत्यास फार काळजी लागली होती. पण अपार द्रव्य व कीर्ति मिळवून तो परत येत आहे असें जेव्हां त्यास समजलें, तेव्हां त्याचा आनंद गगनांत मावेना. कित्येक दूरदर्शी लोकांस अलाउद्दीनचा कावा ठाऊक होता. त्यांनीं व जलालची बायको मलीकी-जहान इनें त्यास पुष्कळ सांगितलें, कीं अलाउद्दीनचा हेतु शुद्ध *नाहीं; तो कोणच्या वेळेस काय नुकसान किंवा घात करील याचा नेम नाहीं; तर आपण सावध असावें. पण जलालुद्दीन ह्यास ती गोष्ट खरी* वाटेना. इतक्यांत अला-उद्दीनचें त्यास एक दक्षिणेंतून पत्र गेलें. तें अत्यंत नम्रतेच्या व शुद्ध हेतूच्या शब्दांनीं भरलेलें होतें. तें पत्र दाखवून जलालुद्दीननें सर्व लोकांच्या संशयाचें निवारण केलें. भोळ्या जलालुद्दिनास ह्या कपटपटु अला-उद्दीनचा उद्देश कसा समजणार? इ० सन १२९५त आपल्या पुतण्यास भेटण्यासाठीं बादशहा थोड्या फौजेनिशीं कुरा येथें गेला. पुढें अला-उद्दीनची व त्याची भेट झाली, तेव्हां अला-उद्दीन चुलत्याच्या पायां पडला. त्या समयीं तो सात्विक व वृद्ध जलालुद्दीन प्रेमानें त्याच्या गालांवरून हात फिरवीत आहे, आणि 'मीं तुला लहान-पणापासून वाढवून आपल्या मुलांपेक्षां तुजवर विशेष प्रीति ठेविली, असें असून तूं माझा विश्वास धरिला नाहींस?' असा त्यास रागें भरत आहे, इतक्यांत लपवून ठेविलेल्या मारेकऱ्यांस अलाउद्दीनची खूण होतांच, त्यांनीं तत्क्षणीं पुढें येऊन सुलतानाच्या पोटांत तलवारी खुपसून त्याचीं आंतडीं बाहेर काढिलीं. त्या वेळीं 'अरे दुष्टा अलाउद्दिना'! असें म्हणून जलालुद्दीननें प्राण सोडिला. त्याचें शीर भाल्यावर टोंचून अलाउद्दीननें लष्करांत व सर्व शहरांत फिरविलें. ज्या दुष्ट मारेकऱ्यानें हें काम केलें तो पुढें वेड लागून मृत्यु पावला. ह्या घातकी कृत्यांत ज्यांनीं अला-उद्दिनास साहाय्य केलें होतें, त्यांची त्यानें कशी दुर्दशा केली, त्याचें वर्णन फेरिस्ता मोठ्या कौतुकानें करितो. तथापि आमच

झालेलें पाहून समाधान वाटणें साहाजिक आहे; पण प्रत्यक्ष विश्वासघात करून चुलत्याचा वध करविणारा जो अला-उद्दीन त्याची मरेपर्यंत अखंड भरभराटच होत गेली, हें पाहून इहलोकच्या न्यायन्यायाबद्दल मन बुचकळ्यांत पडतें ह्यांत संशय नाहीं.

जलालुद्दीन मरण पावल्याची बातमी दिल्लीस पोंचतांच, त्याच्या राणीनें आपला अल्पवयी मुलगा रुक्नुद्दीन ह्यास इब्राहिम नांवानें तख्तावर स्थापन करून त्याच्या नर्फेनें राज्य चालविलें. जलालुद्दीनचा मोठा मुलगा अर्कलीखान राज्याचे लायक असून मुलतानचे सुभ्यावर नेमिलेला होता. राज्यावर खरा हक्क त्याचा होता; पण संकटावह राज्यकारभाराच्या भानगडींत पडणें त्यास न आवडून तो स्वस्थ राहिला. जला-लुद्दिनास मारतेवेळीं दिल्लीचें राज्य आपणास मिळेल अशी अल्लाउद्दीनची खात्री नसल्यामुळें, एक स्वतंत्रच राज्य स्थापण्याचा त्याचा विचार होता; पण दिल्लीची बातमी ऐकतांच त्यास ज्यास्त हुरूप आली. पावसाळा असतांही तो एकदम कूच करून राजधानीकडे गेला. रस्त्यांत दर-मुक्कामीं त्यानें मोहरा उकळण्याचा सपाटा चालविला. सरदार व फौजेंतले अंमलदार कांकूं करीत होते, त्यांस त्यानें पैसे भरून वश केलें. येणेप्रमाणें छपन्न हजार स्वार व साठ हजार पायदळ एवढी फौज त्याजजवळ जमली. देवगडच्या लुटींत मिळविलेल्या द्रव्याचा ह्या राज्यप्राप्तीच्या कामीं अलाउद्दिनास फारच उपयोग झाला. अला-उद्दीन येत आहे हें ऐकतांच राणी मुलास घेऊन मुलतानास पळून गेली. पुढें सन १२९६ च्या अखेरीस अला-उद्दिनास दिल्लीचें तख्त बिनहरकत प्राप्त झालें. लोकांचीं मनें संतुष्ट करण्याकरितां त्यानें मोठमोठे समारंभ करून लोकांस मेजवान्या दिल्या. तसेंच लहानथोरांस इनामें व बक्षिसें देऊन राज्यापहरणाचें पाप लोकांच्या मनांतून नाहींसें करण्याची त्यानें खटपट केली. फौजेस सहा महिन्यांचा पगार एकदम आगाऊ दिला. अशा प्रकारें स्थीरस्थावर केल्यावर तो राज्याच्या इतर हक्कदारांस दूर करण्याच्या विचारास लागला. आल्फखान म्हणून अला-उद्दीनचा एक दूधभाऊ होता, त्यास त्यानें जलालुद्दीनच्या मुलास पकडण्यासाठीं मुलतानास पाठविलें. मुलतानच्या लोकांनीं स्वत:वरचें संकट टाळण्याकरितां दोघां राजपुत्रांस आलफखानाचे स्वाधीन केलें. आणि त्यांच्या जिवास अपाय करणार नाहीं असें त्यांजपासून

चन घेतलें. हें वचन आलफखानानें कितपत पाळिलें असेल हें सांगणें कठीण. आलफखान परत जात असतां त्यास बादशहाचा हुकूम आला, कीं त्या राजपुत्रांचे डोळे काढावे. त्याप्रमाणें त्यांस अंध करून त्यानें हंसीच्या किल्ल्यांत बंदींत ठेविलें. तेथें त्या दुर्दैवी राजपुत्रांचा लवकरच अंत झाला.

राजहत्या व राज्यापहरण ह्या गोष्टी हिंदुस्थानच्या इतिहासांत अनेक वेळां केवळ नेहमींच्या इतर व्यवहारांप्रमाणें घडून आल्या आहेत. प्रत्यक्ष राजदरबारच्या मंडळीशिवाय इतरांचें तिकडे लक्ष जात नसे, ही मोठ्या आश्चर्याची गोष्ट होय. स. १७८९ त फ्रान्सदेशांत जी मोठी राज्यक्रान्ति घडून आली, तींत सर्व नागरिकांचा संबंध असून तिनें सर्व देश हलून गेला. हिंदुस्थानांत अनेक राज्यक्रान्ती घडल्यानें येथपावेतों वर्णन आलें असून पुढेंही येईल. परंतु लोकांस त्यांजबद्दल मुळींच पर्वा वाटली नाहीं. राजवाड्यांतील बारीकसारीक गोष्टी व घोटाळे यांबद्दल लोक घरोघर कुजबुजतात, आणि पाहिजे त्या आफवांवर त्यांचा भरंवसा बसतो. एखादा पराभूत झालेला हक्कदार राज्य परत मिळविण्यास आला असतां, बक्षिसाच्या आशेनें त्यास कित्येक लोक मिळतात. पण तशी लालूच नसली म्हणजे कोण आला व कोण गेला याची कोणी पर्वाच करीत नाहीं. नवीन राजानें मेजवान्या वगैरे दिल्या, म्हणजे तो कसाही दुष्ट, कपटी व अनाचारी असला, तरी त्याजवर लोक खुष होतात. नवीन राजाच्या मतलबी व वरपांगी थाटास भुलून परकी असतांही त्याजबद्दल त्यांस अभिमान वाटूं लागतो. त्याच्या वर्तणुकीचा किंवा दुष्ट कृत्यांचा कांहीं एक विचार न करितां त्याची कड घेऊन ते त्याचे धन्यवाद गातात. ईश्वराच्या इच्छेनुरूप सर्व गोष्टी घडावयाच्या अशी त्यांची समजूत होते. सारांश, स्वराज्याचा अभिमान एकदां नष्ट झाला म्हणजे असे प्रकार व्हावयाचेच. राजा, राज्य, स्वातंत्र्य इत्यादि कशाचीच त्यांना पर्वा वाटेनाशी होणें साहजिक आहे.

५. अल्लाउद्दीनचे पराक्रम.—राज्यावर येतांच अला-उद्दीननें प्रथम लांचखाऊ अंमलदारांची पुरी खोड मोडिली. ज्यांस त्यानें पैसे भरून वश केलें होतें, त्यांच्या कृतघ्नपणाबद्दल त्यांस त्यानें चांगलें शासन केलें. कित्यकांस ठार मारिलें; व कित्येकांचे डोळे काढून बंदींत टाकिलें. त्यांची सर्व संपत्ति घरेंदारें व वतन हरण करून सरकारांत घेतलीं; आणि त्यांचीं पथकें मोडून त्यांतील लोकांस निर-

निराळ्या ठिकाणीं नोकऱ्या दिल्या. फक्त तीनच अंमलदार असे होते, कीं त्यांनीं अला-उद्दीनच्या लांचास न जुमानून आपल्या धन्यास (जलालुद्दीन ह्यास) सोडिलें नव्हतें. त्यांस मात्र अला-उद्दीननें कांहीं एक त्रास दिला नाहीं.

आरंभींच्या मुसलमान सुलतानांत अल्लाउद्दीन खिलजी हा फार नामांकित व पराक्रमी असा मानिला जातो. ह्याची कारकीर्द हिंदुस्थानच्या इतिहासांत अनेक कारणांनीं विशेष स्मरणीय आहे. त्यास लिहितां वाचतां येत नव्हतें, तरी फौजेची व्यवस्था नीट ठेवून विजय कसे मिळवावे हें त्यास चांगलें कळत होतें. त्यानें मुसलमानांचा अंमल ह्या देशांत फार विस्तृत व चिरस्थायी केला. कुलीन हिंदु राजस्त्रियांना त्यानें मुसलमानी गोषांत ओढून आणिलें. तसेंच दक्षिणेंतील हिंदु राज्यांचा विध्वंस करून दक्षिणेस रामेश्वरापर्यंत मुसलमानी चांदास मिरवीत नेलें. ती हकीगत पुढें येईल. झियाउद्दीन बराणी नांवाचा एक गृहस्थ अला-उद्दीनच्या पदरीं होता. त्याचा बाप व चुलता सुलतानांच्या नोकरींत होते. बराणीनें ह्या कार्किर्दीचा इतिहास लिहिलेला आहे, तो जरी सर्वथैव भरंवसे लायक नसला, तरी त्याजवरून अला-उद्दीनच्या कार्किर्दीवर चांगला प्रकाश पडतो.

(क) मोगलांच्या स्वाऱ्या.—मध्यंतरीं ह्या देशावर मोगलांच्या स्वाऱ्या वारंवार होऊं लागल्या. विशेषतः स. १२९५ पासून १३०५ पर्यंत त्यांच्या टोळधाडी एकसारख्या येत होत्या. सन १२९६त मध्यतुर्कस्तानचा बादशाहा, चंगीझखानाचा वंशज, अमीर दाऊद ह्यानें एक-लाख लोकांनिशीं सिंध व पंजाब प्रांतांवर स्वारी केली. त्याजवर अला-उद्दीननें आलफखानास पाठविलें. तेव्हां लाहोरनजीक युद्ध होऊन मोगलांचा मोड झाला. मोगलांचीं पुष्कळ बायकामुलें आलफच्या हातांत सांपडलीं, त्या सर्वांचा त्यानें शिरच्छेद केला.

पुनः दोन वर्षांनीं दाऊदचा मुलगा कुत्लघखान ह्यानें दोन लाख मोगल स्वार घेऊन हिंदुस्थानांत प्रवेश केला. त्या वेळीं सर्व हिंदुस्थान देश जिकण्याचा त्याचा विचार होता. मोगल फौज थेट दिल्लीनजीक येऊन यमुनेच्या कांठीं तळ देऊन राहिली. त्या प्रांतांतील अला-उद्दीनचा सुभेदार जाफरखान म्हणून होता. नुसतें सैन्य पाहूनच तो मागें हटन

चालला. मोगलांच्या त्रासास भिऊन बाहेरचे सर्व रयतलोक दिल्ली शहरांत घुसले. सर्व रस्ते लोकांनीं इतके गच्च भरून गेले, कीं दिल्लींत बाहेरच्या दाणादुणा येण्याचें बंद झाल्यामुळें धान्याची अत्यंत महर्गता झाली. सर्व लोकांची पांचांवर धारण बसली. दरबारचे लोकही भिऊन जाऊन ते लढाई करण्याची अल्लाउद्दिनास सल्ला देईनात. अशा आणीबाणीच्या प्रसंगीं आपण हातपाय गाळिले तर आपली पत काय राहणार व राज्य कसें टिकणार असा विचार करून नशिबावर हवाला देऊन स्वतः अला-उद्दीन आपली तीन लाख फौज घेऊन मोगलांवर गेला. अलीकडच्या बऱ्याच दिवसांत एवढीं दोन सैन्यें समरांगणीं सज्ज झालीं नव्हती. जाफरखान व आलफखान हे दोन अला-उद्दिनचे सरदार होते. त्यांस दोन बाजूंस ठेवून मध्यभागीं स्वतः अल्लाउद्दीन आपला वजीर नुस्रतखान ह्यास घेऊन लढाईस उभा राहिला. सर्वांच्या पुढें निवडक हत्तींची रांग लाविली होती. सुरवातीसच जाफरखानानें निकराचा हल्ला करून मोगलांस मागें हटविलें, आणि एकटाच त्यांचा पाठलाग करीत दूरपर्यंत गेला. लगेच सुलतानानें आलफखानास त्याचे मदतीस जाण्याचा हुकूम केला. पण ह्या दोघां सरदारांमध्यें मत्सरभाव असल्यामुळें आलफखान जाफरखानाचे मदतीस गेला नाहीं. इकडे मोगलांनीं जाफरखानास वेढून सर्वांची कत्तल केली. त्यास जिवंत पकडण्याची मोगलांची इच्छा होती, पण तो शूर सरदार त्यांच्या स्वाधीन होण्याचें नाकबूल करून समरांगणीं लढून पतन पावला. तथापि अला-उद्दीनची बाकीची फौज तयारींत होतीच. तिजपुढें आपलें कांहीं चालत नाहींसें पाहून मोगल लोक जीव घेऊन हिंदुस्थान सोडून पळून गेले.

सन १२०३ सालीं अला-उद्दीन चितोड घेण्यामध्यें गुंतला असतां, मोगलसरदार तुर्घायखान यानें पुनरपि हिंदुस्थानावर स्वारी केली. ह्या प्रसंगीं अलाउद्दीनची फौज जवळ नसल्यामुळें दिल्ली शहर मोगलांचे अगदीं ताब्यांत जाण्याचा योग आला होता. पण कांहीं दैविक चमत्कार होऊन मोगलांची गाळण उडाली, आणि पहिल्याप्रमाणेंच ते एकाएकीं हिंदुस्थान सोडून निघून गेले.

दिल्लीस मुसलमानांचें राज्य कायमचें स्थापन झाल्यापासून, मध्य-आशियांतून अनेक परकी लोकांच्या झुंडीच्या झुंडी येऊन दिल्लीस राहूं

NATIONAL ARCHIVES OF INDIA

लागल्या. अशा लोकांकरितां मोगलपुरा नांवाचा एक नवीन भाग तेथें वसला, हें मागें सांगितलेंच आहे. त्यांत नुसते मोगलच होते असें नाहीं. दिल्लीस आल्यावर हे परके लोक दरबारचें अनुकरण करण्यासाठीं मुसलमानी धर्म स्वीकारीत. तेव्हां त्यांस 'नवे मुसलमान,' असें नांव मिळत गेलें. तथापि धर्मांतरामुळें त्यांची स्थिति सुधारली असें नाहीं. एकदां त्यांच्यांत फितवा झाल्याचें उघडकीस आल्याबरोबर अलाउद्दीननें एका दिवसांत तीस चाळीस हजारांची कत्तल केली, आणि त्यांच्या बायकापोरांस देशोधडीस पाठविलें. बायकामुलांशीं असलें क्रूर वर्तन पाहण्याचा हिंदुस्थानांतील लोकांस हा पहिलाच प्रसंग.

सन १३०५त ऐबकखान नामक सरदाराच्या हाताखालीं मोगली फौज पुनरपि हिंदुस्थानांत उतरली. मुलतान उद्ध्वस्त करून ते शिवालिक पहाडावर आले. गाजीबेग तुघ्लख नामक सरदार अलाउद्दीननें दिल्लीच्या पश्चिमेस बंदोबस्तास ठेविला होता. त्यानें दुसऱ्याच रस्त्यानें मोगलांच्या पाठीवर एकदम हल्ला करून पुष्कळांची कत्तल केली. बाकीचे वाळवंटांत पळून गेले. भर उन्हाळा असल्यामुळें तिकडेही त्या बिचाऱ्यांचा संहारच झाला. पुष्कळ लोकांस पकडून दिल्लीस नेऊन हत्तीच्या पायांखालीं तुडविलें; आणि त्यांच्या शिराचा एक मोठा मनोरा बुदाऊन गेटाच्या बाहेर उभारिला. पुनः एकवार ह्या कारकीर्दींत मोगलांची अशीच दशा झाल्यामुळें त्यांचा धीर इतका खचला, कीं पुढें पुष्कळ दिवसपर्यंत ते हिंदुस्थानांत पाय ठेवण्यास धजले नाहींत. आणि दिल्लीच्या लोकांची मोगलांची दहशत पार नाहींशी झाली. इकडे गाजीबेग तुघ्लखनें हिंदुस्थानचे बाहेर त्यांच्या मुलखांवर स्वाऱ्या करून काबूल, गज्नी, कंदाहार वगैरे प्रांतांत सुद्धां त्यांस चैन पडूं दिलें नाहीं.

एखादा व्यवसाय हातीं घेतला म्हणजे त्याचा पिच्छा पुरविण्याची मुसलमानांची शिकस्त आहे. मोगल लोक एकसारखे हिंदुस्थानावर हल्ले करीत होते. अडीचशें वर्षेंपर्यंत त्यांच्या प्रयत्नांस यश आलें नाहीं. तरी त्याच मोगल लोकांनीं पुढें परमैश्वर्ययुक्त व टोलेजंग बादशाही हिंदुस्थानांत स्थापन केली. महंमद कासीम, व सुलतान महंमूद ह्यांच्यासारख्या वीरांनीं हा देश जिंकण्याचे प्रयत्न सुरू केले, आणि शहाबुद्दीन घोरी व अलाउद्दीन खिल्जी अशा पुरुषांनीं तें काम पुढें नेटानें चालविलें, तेव्हांच हिंदुस्थानचें

राज्य मुसलमानांच्या हस्तगत झालें. यूरोपची पूर्वरोमन बादशाही जिंकण्यांतही मुसलमानांनींच तीनशें वर्षें सतत प्रयत्न केला. ह्यावरून एकंदर मुसलमानांचा व विशेषतः मोगल लोकांचा चिकटपणा चांगला व्यक्त होतो.

(ख) चितोडगडची स्वारी, (स. १३०३-०४).—हल्लीं रजपुतान्यांत पुष्कळ रजपूत संस्थानें आहेत. त्यांत उदेपूर, जोधपूर व जयपूर हीं तीन आजमितीस प्रमुख आहेत. बिकानेर, किसनगड, जसलमीर, कोटा, बुंदी, शिरोही वगैरे आणखी पुष्कळ लहान राज्यें आहेत. ह्या सर्वांत उदेपूरचें घराणें मानानें श्रेष्ठ मानिलें जातें. जोधपूर व जयपूर येथील राजांनीं पुढें मोगल बादशहांशीं शरीरसंबंध केले, तसे उदेपूरच्या राजांनीं केले नाहींत, याजबद्दल त्या राजांस फार त्रास सोसावा लागला. उदेपूरचें राज्य ह्या तिहींत लहान असून त्यास मेवाडचें राज्य असें म्हणतात. त्याचा प्रदेश सर्व रजपुतान्यांत अत्यंत सुपीक आहे. ह्या राज्याचे पश्चिमेस आरवलीं पर्वताची रांग आहे. ह्या पर्वताचे पश्चिमेस जोधपूरचें राज्य आहे, त्यास मारवाडचें राज्य म्हणतात. ह्याचा बराच प्रदेश वालुकामय मैदानांचा आहे. मेवाडच्या उत्तरेस जयपूरचें राज्य असून तें उत्तरेस दिल्लीपर्यंत व दक्षिणेस मेवाडला लागलेलें होतें. मेवाडची पहिली राजधानी चितोडगड होती. सन १५६७ त ही राजधानी अकबर बादशहानें काबीज केल्यावर तेथील राजा उदयसिंग ह्यानें पश्चिमेस आरवली पर्वताचे पायथ्यास उदेपूर शहराची स्थापना केली. आपल्या घराण्याची उत्पत्ति सूर्यवंशापासून झाली आहे असें उदेपूरचे राणे मानितात. अद्यापिही उदेपूरचे राणे सुवर्णमय सूर्याचें राजचिन्ह धारण करितात. सूर्यवंशी राजे पूर्वी अयोध्येस राज्य करीत होते. कालांतरानें अयोध्याप्रांत त्यांजकडून जाऊन त्यांचें राज्य अजमिरास आलें. अखेरीस पृथ्वीराजाचे वेळेस दिल्ली व अजमीर हीं राज्यें एक होऊन तीं शहाबुद्दीन घोरीनें जिंकिलीं. तेव्हां त्यांच्या वंशजांनीं मेवाडांत चितोडगडास येऊन नवीन राज्यस्थापना केली. चितोडच्या राण्यांचें आडनांव घेलोट असें आहे.

शहाबुद्दीन घोरी निघून गेल्यावर सुमारें शंभरसवाशें वर्षेंपर्यंत चितोडच्या राण्यांस बरीच विश्रांति मिळाली. गुलामवंशी सुलतानांनीं त्यांस उपद्रव दिला नाहीं. पण अलाउद्दीनची सर्वव्यापी दृष्टी त्यांस फार दिवस

चुकवितां आली नाहीं. राणा लक्ष्मणसिंग चितोड येथें राज्य करीत होता. त्याचा चुलता भीमसिंग ह्यानें सिंहलद्वीपच्या रावाची रूपवती कन्या पद्मिनी आपली बायको केली होती. अलाउद्दीननें ह्या पद्मिनीच्या लोभानें चितोडगडावर स्वारी केली,¹ आणि 'पद्मिनी माझ्या स्वाधीन करा' असा भीमसिंगास निरोप पाठवून त्यानें चितोडगडाला वेढा घातला. शहर हस्तगत होईना, तेव्हां 'एकवार पद्मिनीस पाहून मी परत जातों,' असें त्यानें बोलणें लाविलें. 'प्रत्यक्ष दर्शन तर नाहींच, परंतु आरसा ठेवून त्यांत तिचें प्रतिबिंब तुम्हांस दाखवूं,' असा त्यास भीमसिंगानें जबाब दिला. नंतर थोडया लोकांनिशीं अला-उद्दीन चितोडचे वाडयांत गेला. तेथें पद्मिनीचें रूप पाहून तो परत जात असतां भीमसिंग त्यास वाड्यांतून थोडासा बाहेर पोंचविण्यास गेला. ही संधि साधून अला-उद्दीननें त्यास कैद करून आपल्या छावणींत नेलें. पुढें 'पद्मिनी स्वाधीन केल्याशिवाय तुला सोडणार नाहीं,' असें अला-उद्दीननें भीमसिंगास सांगितलें. हें अनर्थाचें वर्तमान चितोड येथें समजल्यावर स्वतः पद्मिनीनें अला-उद्दिनास फसविण्याची एक चमत्कारिक युक्ति केली. 'मोठया लवाजम्यानिशीं आपणांस भेटण्यास मी येतें,' असें पद्मिनीनें अला-उद्दिनास सांगून पाठविलें. अला-उद्दीननें ती गोष्ट कबूल केल्यावर नेमल्या दिवशीं सातशें बुरख्याच्या पालख्या अला-उद्दीनचे गोटांत दाखल झाल्या. स्वतः पद्मिनी त्यांत नव्हतीच. दरएक पालखींत कोणास न कळत एक एक शूर शिपाई बसविलेला होता, आणि दरपालखीस सहा सहा शिपाई हत्यारें छपवून भोयांच्या वेषानें पालखी उचलावयास लाविलेले होते. पद्मिनी आली असें समजून अला-उद्दीननें तिला नवऱ्याच्या भेटीसाठीं अर्धा तास दिला. भीमसिंगास सोडूं नये असा अलाउद्दीनचा विचार होता. पण भीमसिंग एका रिकाम्या पालखींत बसून इतर दासींबरोबर किल्ल्यांत परत गेला. पुढें अलाउद्दीननें पद्मिनीच्या भेटीची घाई करितांच पालख्यांचे सर्व शिपाई एकदम बाहेर पडले आणि कापाकापी करूं लागले. अलाउद्दीन कांहीं बेफाम नव्हता. त्यानें त्या सर्वांची कत्तल केली. पुढें कांहीं दिवस निकराचें युद्ध होऊन अलाउद्दीनचें पुष्कळ नुकसान झालें. पुढें तिकडे दिल्लीवर मोगलांनीं हल्ला केला आहे असें ऐकतांच अलाउद्दीन वेढा उठवून परत गेला.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

लगेच दुसऱ्या वर्षी म्हणजे सन १३०४त त्यानें चितोडावर पुनः स्वारी केली. ह्या प्रसंगीं रजपूत लोकांनीं लढण्याची कमाल केली. शेवटीं इलाज चालत नाहीं असें पाहून, आपल्या नेहमीच्या चालीप्रमाणें बायकांमुलांची अग्नींत आहुति देऊन, स्वतः समरांगणीं लढून त्यांनीं मरण पत्करिलें. कांहींनीं पळून जाऊन आरवलीच्या डोंगरांत अरण्यवास स्वीकारिला. तेव्हां अलाउद्दीननें चितोडगड काबीज केला, आणि तेथें मुसलमानी लष्कर जापत्यास ठेवून व झालोरच्या घराण्यांतील मालदेव नामक एका राजास चितोडचे गादीवर स्थापून, अलाउद्दीन दिलीस परत गेला.

आरवली पर्वतांत पळून गेलेल्या मंडळींत हमीर नांवाचा एक शूर राजपुत्र अलाउद्दीनचा सूड घेण्यासाठीं टपून बसला होता. तेथें पुष्कळ रजपूत लोक त्यास जाऊन मिळाले. मालदेवाची त्यानें गाळण उडवून दिली. तेव्हां हमीराशीं सख्य करण्याची मालदेवानें एक युक्ति योजिली. मालदेवास एक मुलगी होती. तिच्याशीं हमीरानें येऊन लग्न लावावें असा मालदेवानें त्यास निरोप पाठविला. त्याप्रमाणें लग्न झालें. नंतर आपल्या बायकोच्या मदतीनें हमिरानें चितोडगडचें राज्य मालदेवापासून परत मिळविलें, (सन १३०४). तेव्हांपासून पुढें दोनअडीचशें वर्षे हमीरच्या वंशानें दिल्लीचे बादशहास दाद न देतां मेवाडच्या राज्याची चांगली भरभराट केली.

(ग) गुजराथच्या पाडाव, (सन १२९७).—अलाउद्दीननें गादीवर बसल्याबरोबर आलफखान व वझीर नुस्रतखान ह्यांस गुजराथप्रांत जिंकण्यास पाठविलें. गुजराथेंत अन्हिलवाडा येथें राजा कर्णराय राज्य करीत होता. मुसलमान फौज आल्याबरोबर तो पळून देवगडास राजा रामदेव याजकडे आश्रय मागण्यासाठीं गेला. मागें त्याचें राज्य व बायकामुलें मुसलमानांनीं काबीज केलीं. खंबायतप्रांत त्या वेळेस व्यापारामुळें फार सधन होता. तो नुस्रतखानानें येऊन लुटला. ह्या स्वारींत सोमनाथाचें देवालय मुसलमानांनीं पुनरपि लुटलें. महंमूद गज्नवीच्या स्वारीनंतर तेथें नवीन मूर्ति स्थापिली होती ती फोडून, तिचे तुकडे त्यांनीं दिल्लीस नेऊन मशिदींच्या पायऱ्यांस लाविले. नंतर आलफखान व नुस्रतखान परत जात असतां त्यांचे व लष्करांत नोकरीस असलेल्या मोगल लोकांचें

कडाख्याचें भांडण झालें. त्यांत मोगलांनीं हाच आलफखान असें समजून त्याचे पुतण्यास ठार मारिलें. पुढें हे दोघे सरदार दिल्लीस गेल्यावर बादशहानें बंडखोर मोगल लोकांची एकजात कत्तल उडविली. कर्णरायाची लावण्यवती स्त्री कमलादेवी मुसलमान सरदारांनीं पकडून दिल्लीस नेली. तिला बादशहानें आपली पट्टराणी केली, आणि तिजवर त्याची फारच मर्जी बसली.

(घ) **रतनभोरचा पाडाव.**—अलाउद्दीन सुलतानास जसजसें यश येत गेलें, तसतशी त्याची महत्त्वाकांक्षा अनावर झाली. महंमद पैगंबराप्रमाणें आपणही नवीन धर्म स्थापन करावा, किंवा सिकंदर बादशहाप्रमाणें सर्व पृथ्वी काबीज करावी, अशी त्यास जबरदस्त इच्छा उत्पन्न झाली. दुसरा सिकंदर असें नांव धारण करून त्यानें आपल्या नांवाचें नाणें सुद्धां पाडिलें. रतनभोर नांवाचा एक मजबूत किल्ला जयपूरचे हद्दींत आहे, तो घेण्यासाठीं अलाउद्दीननें आलफखान व नुस्रतखान यांस सन १२९९त पाठविलें. तेथील राजा हंबीरदेव मोठी फौज घेऊन लढण्यास आला, आणि त्यानें मुसलमानांस मागें हटविलें. तेव्हां अलाउद्दीन स्वतः तो किल्ला घेण्यास आला. ह्या प्रसंगीं अलाउद्दीनचा पुतण्या रुक्नखान ह्यानें चुलत्यास एकटा गांठून त्याजवर बाण सोडिले, आणि तो मेला असें समजून गोटांत परत येऊन राज्यपद स्वीकारिलें. इतक्यांत अलाउद्दीन सावध होऊन परत आला, आणि त्यानें रुक्नखान ह्यास तेव्हांच देहान्त शासन दिलें. नंतर त्यानें रतनभोरास वेढा घातला. हंबीरदेवानें स्वसंरक्षणाचे होते तेवढे प्रयत्न केले; परंतु त्याचा प्रधान विश्वासघात करून मुसलमानांस मिळाला; त्यायोगें रजपुतांचा घात होऊन राजा सुद्धां सर्व लोक शत्रूंनीं कापून काढिले, आणि किल्ला घेतला. अलाउद्दीननें त्या विश्वासघातकी प्रधानास 'ज्या त्वां आपल्या मूळच्या धन्यास सोडिलें, तो तूं दुसऱ्या धन्याचा घात करणार नाहींस कशावरून?' असें सांगून ठार मारिलें.

(ङ) **दक्षिणची दुसरी स्वारी, (स. १३०६).**—देवगडचा राजा रामदेवराव दिल्लीस खंडणी पाठविनासा झाला होता. त्याचें पारिपत्य करण्याकरितां सुलतानानें एक मोठें सैन्य तयार करून तें मलीक काफूर नामक सरदाराच्या हाताखालीं रवाना केलें. काफूर हा पूर्वी खंबायतेस एका सावकाराजवळ गुलाम होता. गुजराथप्रांत जिंकिल्यावर अलाउद्दीननें त्याच्या

घन्यापासून त्याला जुलमानें आणिलें. पुढें त्याजवर सुलतानाची मर्जी बसून त्यास मोठमोठीं कामें मिळत गेलीं. हलक्या जातीचा असून तो एकदम थोर पदास चढल्यामुळें उमराव लोकांस फार वैषम्य वाटलें. सन १३०३ सालीं काफूर यास बंगाल्यांतून पूर्वेकडील मार्गानें अलाउद्दीननें वरंगूळचें राज्य काबीज करण्याकरितां पाठविलें होतें. पण मोगल लोकांनीं स्वारी केल्यामुळें हें सैन्य परत बोलवावें लागलें. पुढें सन १३०६त पुनः ह्या गृहस्थास बादशहानें दक्षिणेंत पाठविलें. तो माळव्यांतून खानदेशच्या वाटेनें सुलतानपुरावरून देवगडास आला; आणि सर्व महाराष्ट्रदेशांत त्यानें लुटालूट आरंभिली. अशा सरदाराशीं टक्कर देण्यास आपण असमर्थ आहों, असें समजून राजा रामदेव त्याजबरोबर दिल्लीस गेला. तेथें सुलतानानें *त्याचा चांगला सन्मान करून त्यास एक छत्र, राजाधिराज हा किताब व एक लाख रुपये बक्षीस दिले, आणि त्यास प्रतिष्ठेनें स्वदेशीं जाऊं दिलें.* त्या वेळेपासून रामदेवानें मुसलमानांशीं वैर केलें नाहीं. ह्या स्वारींत काफूरच्या मदतीस त्वरेनें जाण्यास गुजराथेंतील सरदार आलफखान यास सुलतानानें हुकूम पाठविला. कमलादेवी व कर्णराय यांची देवलदेवी म्हणून एक मुलगी होती. कमलादेवी दिल्लीस रवाना झाल्यावर देवलदेवी बापाबरोबर अरण्यवासांत होती. रामदेवाचा मुलगा शंकरदेव यास ती देण्याचा कर्णरायाचा विचार होता. पुढें सन १३०६ सालीं आलफखान गुजराथेंतून दक्षिणेंत येऊं लागला, तेव्हां कमलादेवीच्या आग्रहावरून सुलतानानें त्यास असाही हुकूम पाठविला, कीं देवलदेवीचा शोध लावून तिला दिल्लीस पाठवावी. आलफखानानें कर्णरायास गांठून त्याच्या टोळीचा पराभव केला, पण देवलदेवीची अगोदरच देवगडास रवानगी झाली होती, म्हणून ती त्यास सांपडली नाहीं. पुढें आलफखान देवगडापासून एका मजलेवर वेरूळच्या लेण्यांजवळ उतरला असतां, अकस्मात् त्याच्या लोकांस देवलदेवी सांपडली. तिला घेऊन तो एकदम दिल्लीस गेला. तेथें बादशहाचा वडील मुलगा खिजरखान ह्यानें तिची प्रीति संपादन करून तिच्याशीं लग्न लाविलें. ह्या उभयतांच्या क्रीडेविषयीं अमीर खुस्रू कवीनें फारशी भाषेंत एक सुरेख कवन रचिलें आहे. अलाउद्दीन मरण पावल्यावर त्याचा मुलगा मुबारिक ह्यानें तिच्या नवऱ्याचे डोळे काढून तिला आपल्याकडे घेतलें. पण लवकरच मुबारिकचा आवडता

NATIONAL ARCHIVES OF INDIA

सरदार खुस्रु ह्यानें त्याचा प्राण घेतल्यावर, ह्या दुरभागी बाईस त्यानें स्वतःच्या जनानखान्यांत नेलें. सन १३२१त तुघ्लखवंशाचा पहिला सुलतान ग्यासुद्दीन ह्यानें खुस्रूस मारिल्यावर देवलदेवीचा उत्तम बंदोबस्त करून दिला, आणि जन्माच्या दुःखदायक धिंडवड्यांतून तिची एकदांची सुटका केली.

दक्षिणेंत बरेंच यश येत गेल्यावर तिकडे ज्यास्त मुलुख काबीज करण्याचा सुलतानास हुरूप आला. आग्नेयीस तैलंगणांत वरंगूळचें राज्य मोठें असून नरपति आडनांवाचे राजे तेथें राज्य करीत होते. पूर्वी एकवार वरंगूळची मोहीम फसली, म्हणून पुनः सन १३०९त मलीक काफूर यास बादशहानें दक्षिणेंत पाठविलें. काफूर ह्यानें त्वेषानें मुलुख उद्ध्वस्त करीत थेट वरंगूळवर येऊन किल्ल्यास वेढा घातला. त्या वेळीं राजाचा पाडाव झाला, आणि पुष्कळ द्रव्य देऊन व पुढें निरंतर खंडणी पाठविण्याचें कबूल करून, नरपतिरायानें त्या मुसलमान सरदाराची मर्जी सुप्रसन्न करून घेतली. ह्या स्वारींत रामदेवरावानें मलीक काफूर ह्यास चांगली मदत केली.

६. **दक्षिणहिंदुस्थानांतील राज्यें.**—दक्षिणहिंदुस्थानावर ह्या वेळेपासून मुसलमानांच्या बारंवार स्वाऱ्या होऊं लागल्या, आणि पुढें हळू हळू सर्व प्रदेशांत मुसलमानी सत्ता प्रबळ झाली. म्हणून ह्या वेळचा इतिहास समजण्याकरितां दक्षिण देशांत त्या वेळीं कोणकोणतीं राज्यें होतीं हें सांगितलें पाहिजे.

महाराष्ट्रांत यादवांचें राज्य होतें हें वर सांगितलेंच आहे, आणि ह्या राज्याची हकीकत दुसऱ्या एका भागांत येणार आहे. महाराष्ट्राचे खालीं थेट दक्षिणेपर्यंत पुरातन काळापासून नानाविध राज्यें नांदत आलीं होतीं. त्यांची त्या वेळेस भरभराट असून तत्कालीन सुधारलेल्या राष्ट्रांत त्यांची गणना होती. त्या राज्यांचे इतिहास उपलब्ध नसल्यामुळें, त्यांची कांहींच माहिती देतां येत नाहीं, हें इतिहासकारांचें दुर्भाग्य होय. दक्षिणेंत मुख्यतः पांच भाषा चालतातः महाराष्ट्रांत मराठी, द्रविडदेशांत तामीळ, कर्नाटकांत कानडी, तैलंगणांत तेलगू, पश्चिमभागीं चेर आणि केरल देशांत मलयाळी. या भाषांच्या व्याप्तीस अनुसरून निरनिराळीं राज्यें होतीं. अगदीं दक्षिण टोंकास द्रविड किंवा तामीळ देश म्हणत. त्याच्या उत्तरेस कर्नाटक. बेदर व कोल्हापर यांजमध्यें एक सरळ रेषा काढिली असतां

ती कर्नाटकची ठोकळ मानानें उत्तरमर्यादा होईल. कर्नाटकच्या पूर्वेस पूर्वकिनाऱ्यास लागून तैलंगण देश आहे, त्याचा विस्तार उत्तरेस महानदीपर्यंत व पश्चिमेस महाराष्ट्रास लागून आहे. महानदीच्या पलीकडे बंगालपर्यंत ओढ्या देश पसरला आहे. महाराष्ट्र व ओढ्या देश ह्यांजमध्यें जो जंगली प्रदेश आहे, त्यास गोंडवण म्हणजे गोंड लोकांचें वन अशी संज्ञा आहे. पश्चिमकिनाऱ्यावर मलबार किंवा केरल देश आहे. द्रविड देशांत पूर्वी पांड्य नांवाचे राजे राज्य करीत होते. क्रिस्तशकारंभीं ह्या वंशांतील राजानें एकदां रोमचा बादशहा ऑगस्टस सीझर ह्याजकडे आपले वकील पाठविले होते. मदुरा शहर ह्या राज्याची राजधानी होती. पांड्य राजांच्याच शेजारीं चोल नामक राजांचें स्वतंत्र राज्य होतें. कांहीं दिवस हीं दोनही राज्यें एका अंमलखालीं होतीं. पांड्य राज्याचा अवशिष्ट भाग सन १७३६ च्या सुमारास अर्काटच्या नबाबानें जिंकिला. चोल राज्याचा अवशिष्ट भाग शिवाजीचा भाऊ व्यंकोजी भोंसले ह्यानें जिंकिला. कांचीनगर हें चोलांची राजधानी होय.

उत्तरमलबारास केरलदेश, व त्रावणकोरसह दक्षिणमलबारास चेरदेश अशा संज्ञा होत्या. केरलदेशच्या राजानें नवव्या शतकाचे सुमारास मुसलमानी धर्म स्वीकारिला. तेव्हां लोकांनीं त्याच्याविरुद्ध बंड केलें. त्यांत अनेक झगडे होऊन लहान लहान स्वतंत्र राज्यें स्थापन झालीं. पुढें मलबारच्या पेरुमाळ राजानें मुसलमानी धर्म स्वीकारिला. पोर्तुगीझ सरदार वास्को ड गामा हिंदुस्थानांत आला, तेव्हां कालिकोट येथें झामोरीन नामक राजा राज्य करीत होता. यानेंच वास्को ड गामा यास हिंदुस्थानांत प्रथम आश्रय दिला, ही हकीगत ब्रिटिश रियासतींत आहे.

कर्नाटकची प्राचीन माहिती चांगलीशी मिळत नाहीं. दहाव्या शतकांत यादव घराण्यापैकींच एकानें ह्या देशांत स्वतंत्र राज्य उभारून बल्लाळ वंशाची स्थापना केली. कांहीं दिवस कर्नाटकावर चालुक्यवंशी राजांचाही अंमल होता. नंतर देवगिरीच्या यादवांनीं कर्नाटकप्रांत जिंकिला, आणि पुढें सन १३१० त मलीक काफूर ह्यानें हा प्रांत मुसलमानांचे ताब्यांत आणिला.

तैलंगणांतच कलिंग व आंध्र देश मोडत. कलिंग देशावर कांहीं दिवस चालुक्यांचा अंमल होता. आंध्रांची राजधानी वरंगुळ शहर हैदराबादचे

ईशान्येस चाळीस कोसांवर आहे. मगध देशांतील आंध्रराजे व हे एकच असावेत. आंध्रांनंतर चोल आणि त्यांच्या पाठीमागून यवनवंशी राजे ह्या प्रांतावर अंमल करीत होते. अकराव्या शतकांत नरपति नामक राजे तैलंगणावर राज्य करूं लागले. त्या वंशांत काकती नामक एक महापराक्रमी राजा निपजला. सन १३०९त मलीक काफूर ह्यानें येथील राजांस मुसलमानांचे ताबेदार केलें. सन १३२३त पुनः दिल्लीहून मुसलमानांची फौज ह्या राज्यावर आली, तेव्हांच तेथील राजांची बहुतेक सत्ता नष्ट झाली. अखेरीस गोवळकोंड्याच्या मुसलमान राजांनीं तेलंगण देश कायमचा जिंकिला.

ओढ्या देशावर सुद्धां निरनिराळ्या वंशाचे अनेक पराक्रमी राजे राज्य करीत होते. कौरवपांडवांच्या वेळेपासून ह्या देशाचें नाव गाजत आहे. तेरा, चवदा, व पंधरा ह्या तीन शतकांत ओढ्या देशावर गांगवंशी राजांची सत्ता फार प्रबळ होती. बहामनी सुलतानांशीं ह्या राजांचे झगडे हमेश चालू असत. सन १५७८त अकबर बादशहानें हा प्रदेश दिल्लीचे अमलाखालीं आणिला.

ह्या सर्व राजांचे आपसांत कलह चालू असून त्यांच्या राज्यांच्या मर्यादा वरचेवर कमीज्यास्त होत. हजारों वर्षे स्वातंत्र्याचा उपभोग घेत असल्यामुळें परकीयांचे हल्ले आले, तरी आपसांत ऐकमत्य करून परशत्रूंचें निवारण करण्याची बुद्धि त्यांस झाली नाहीं. वेरूळ व इतर ठिकाणचीं लेणीं आणि दुसरीं अनेक कृत्यें ह्या मध्यकालीन दाक्षिणात्य राजांच्या वैभवाची साक्ष देतात. कित्येक ग्रंथकार ह्या लेण्यांची तुलना इजिप्ट देशांतील पिरमिदीशीं करितात. तरी पण लेणीं तयार करण्याच्या कामास पिरमिदांपेक्षां ज्यास्त कल्पकत्व व ज्यास्त साहस लागलें असेल असें पुष्कळांचें म्हणणें आहे. शिलालेख व ताम्रपट यांचे योगानें ह्या राज्यांचा प्राचीन इतिहास अलीकडे कांहीं अंशीं उपलब्ध होत आहे. पण तो प्राचीन इतिहासाच्या भागांत येणारा असल्यामुळें प्रस्तुत गोष्टींच्या संदर्भास जरूर आहे त्यापेक्षां ज्यास्त हकीकत येथें देतां येत नाहीं.

७. मलीक काफूरच्या स्वाऱ्या, दुसरी स्वारी (स. १३१०).—कर्नाटकच्या बल्लाळ राजास जिंकण्याकरितां सुलतानानें काफूरची रवानगी केली. काफूर हा देवगड, व पैठण या शहरांवरून द्वारसमुद्र नामक राजधानीवर

चालून आला. हें शहर कर्नाटकच्या मध्यभागीं श्रीरंगपट्टणच्या वायव्येस सुमारें शंभर कोसांवर होतें. ही राजधानी घेऊन काफूरनें बल्लाळवंशाचें राज्य बुडविलें. नंतर काफूर थेट दक्षिणेकडे गेला. त्यास कोणीं विशेष अडविलें नाहीं. श्रीक्षेत्र रामेश्वर* येथें त्यानें एक मशीद बांधिली. येणेंप्रमाणें मुसलमानांची धाड हिंदुस्थानावर लोटली, ती शेवटीं हिंदुस्थानच्या दक्षिणटोंकाशीं जाऊन थडकली. या स्वारींतून अला-उद्दीनच्या सेनापतींनीं ६१२ हत्ती, वीसहजार घोडे, ९६ हजार मण सोनें, (मणाच्या लहानमोठ्या प्रमाणानुसार चोवीसलक्ष शेर, किंवा १,५६,७२,००० शेर) व शिवाय जडजवाहीर, एवढी संपत्ति दिल्लीस आणिली. ह्या संपत्तीची किंमत सहज करितां येईल.†

तिसरी स्वारी, (स. १३१२).—काफूर देवगडास आला, त्या वेळीं रामदेवराव मरण पावला होता. त्याचा मुलगा खंडणी वेळेवर देईना, म्हणून काफुरास त्याच्याविषयीं अंदेशा येऊं लागला. तेव्हां सुलतानाच्या परवानगीनें काफूर महाराष्ट्रावर चालून आला. रामदेवाच्या मुलास त्यानें ठार मारिलें आणि देवगड राजधानी घेतली. महाराष्ट्रदेश पूर्णपणें मुसलमानांचे ताब्यांत आणून व अपार संपत्ति घेऊन काफूर दिल्लीस गेला, तो पुनः दक्षिणेंत आला नाहीं.

८. **अला-उद्दीनचा मृत्यु व राज्यव्यवस्था.**—सुलतान अलाउद्दीन स्वभावानें फार तापट होता. राज्यांत कांहीं असंतुष्ट लोक हे नेहमीं असावयाचेच. त्यांजकडून अनेक वेळां बादशहास ठार मारण्यासाठीं बंडें उद्भवत. अशा प्रसंगीं बादशहा ज्यास्तच चवताळे. काफूरची शेवटची स्वारी झाली, त्यानंतर अलाउद्दीनची सत्ता अगदीं कळसास पोंचली. तो स्वभावतः क्रूर असूनही मोठा नशीबवान होता. थोडया अवकाशांत त्याच्या राज्याची मर्यादा अतोनात वाढली. अव्यवस्थित राहण्यानें त्याची तब्यत दिवसेंदिवस बिघडत चालली होती. मलीक काफूरवर त्याची बहाल मर्जी असे. त्या दुष्टानें ह्या कृपेचा फारच दुरुपयोग केला. त्याच्याशिवाय बादशहाजवळ दुसऱ्या कोणाचें कांहीं चालत नसे. प्रत्यक्ष राणी व मुलगे यांच्याशीं सुद्धां सुलतानाचें वैमनस्य काफूरनें पाडून त्यांस

* कित्येकांच्या मतें काफूरची मशीद पूर्वकिनाऱ्यावर रामेश्वर येथें नसून पश्चिमकिनाऱ्यावर आहे. † Sewell's Forgotten Empire, P. 402.

अटकेंत ठेविले. ते सर्व आळशी व दुर्व्यसनी निघाले. दरबारांतही घोटाळे उत्पन्न झाले, उमरावलोक त्रासले. गुजराथेंत बंड झालें. चितोडगड हातचा गेला. दक्षिणेंत रामदेवरावाचा जांवई हरपाळदेव ह्यानें मोठा उठावा करून मुसलमान किल्लेदार हांकून लाविले आणि स्वत: स्वतंत्रतेनें राज्य करूं लागला. हीं वर्तमानें ऐकून बादशहास क्रोधाच्या लहरी येऊं लागल्या. त्याचें दुखणें जडावलें; आणि थोडयाच दिवसांनीं त्याचा काळ झाला, (सन १३१६). त्यानें वीस वर्षे राज्य केलें. कोणी म्हणतात, कीं काफूरनेंच त्याला विषप्रयोग केला.

हा सुलतान स्वभावानें छांदिष्ट, निर्दय व जुलमी होता. त्याचे कायदे अविचाराचे असत, तेणेंकरून लोकांस इजा पोंचे. तथापि त्याची जरब विशेष असल्यामुळें कारभार एकंदरींत बराच सुरळीत चालला. सर्व प्रांतांत स्वस्थता होऊन भीति नाहींशी झाली. संपत्ति वाढली. मोठमोठ्या हवेल्या उठून सुधारणेचें पाऊल थोडेंसें पुढें पडत चाललें. आरंभीं सुलतानास लिहितां वाचतां कांहीं येत नव्हतें. त्याजबद्दल त्यास लांच्छन वाटून प्रौढपणीं तो विद्या शिकला, आणि तेणेंकरून तो वहिवाटलेल्या कामगार लोकांसही भारी झाला.

अलाउद्दीनची राज्यनीति चमत्कारिक होती. राज्यांत वरचेवर फंदफितुर होतात ह्याचें कारण काय, ह्याबद्दल प्रधानमंडळांत विचार करून त्यानें असें ठरविलें, कीं ख्यालीखुशालीच्या मेजवान्या करून लोक त्या ठिकाणीं गुप्त बेत करितात; मोठमोठे उमराव लोक एकमेकांशीं शरीरसंबंध करून स्नेही झाल्यानें ते बादशहास भारी होतात; तसेंच कामगार लोक पुष्कळ पैसा मिळवून ते यजमानास जुमानीत नाहींत. ह्या गोष्टी मना करण्याकरितां त्यानें विलक्षण सक्तीचे उपाय केले. दारू पिण्याची मनाई केली. कोणाच्याही घरीं खासगी सभा भरूं नये असें ठरविलें. दरबारप्रकरणीं कोणीं वादविवाद करूं नये, सरकारच्या परवानगीशिवाय मेजवान्या किंवा लग्नकार्य वगैरे करूं नये, असे त्यानें अनेक त्रासदायक कायदे केले. शेतकरी लोकांनीं अमुकच जमीन व गुरें व नोकर ठेवावे असें ठरविलें. सरकारी वसूल सक्तीनें होऊं लागला. त्यानें जमीनधारा वाढविला. नोकरांचे पगार कमी केले. शिवाय रयतेच्या कमाईचा त्यास फार लोभ सुटल्यामुळें लोक हवालदील झाले. तसेंच लष्करी लोकांचा

खर्च कमी करण्याकरितां त्यानें सर्व जिनसांचे दर कायमचे ठरवून टाकिले; आणि त्याच दरांनीं माल विकण्याची त्यानें लोकांस फरज पाडिली. तो व्यापारासाठीं सरकारी पैसा लोकांस कर्जाऊ देई. राज्यांतून बाहेर माल नेण्याची त्यानें बंदी केली. बाजार उघडण्याच्या व बंद करण्याच्या वेळा त्यानें ठरवून दिल्या. चहूंकडे हेर ठेवून सर्व प्रकारची गुप्त बातमी आपणास कळण्याची तजवीज केली. अशा कायद्यांनीं त्यानें राज्यांत बंदोबस्त ठेविला; पण त्यामुळें लोकांस सौख्य झालें नाहीं. दुष्काळ पडला, तेव्हां वरील पुष्कळ कायदे चालेनातसे झाले. धर्मसंबंधांत अलाउद्दीननें जुलमी वर्तन केलें नाहीं. राजनीतीसंबंधीं त्याचें म्हणणें असें पडे, कीं 'वारंवार बदलणाऱ्या लोकमतापेक्षां एकट्या शहाण्या राजाची इच्छा अधिक चांगली'. मोटेपणाचा बडेजाव करून महंमद किंवा सिकंदर यांजप्रमाणें महत्कृत्य करण्याचा जेव्हां अलाउद्दीन विचार करूं लागला, तेव्हां अलाउल्मुल्क् नांवाच्या त्याच्या एका काजीनें 'अतितृष्णा न कर्तव्या,' ह्या नियमाचा त्यास चांगला उपदेश केला. तेव्हांपासून त्या उपदेशाप्रमाणें सुलतान वागूं लागला.

अलाउद्दीनच्या कडक कायद्यांनीं जिकडे तिकडे असा वचक बसला, कीं वाटसरू रस्त्यावर सुरक्षित निजत. बंगाल्याहून काबुलास व तैलंगणांतून काश्मिरपर्यंत व्यापारी लोक निर्धास्तपणें आपल्या मालाची नेआण करीत. वसुलाच्या बाबतींत लोकांवर जुलूम झाल्यास चौकशी करण्यासाठीं योग्य कामगार अलाउद्दीननें नेमिले होते.

सुलतान अलाउद्दीन अत्यंत निष्ठुर व निर्धारी असे. क्षुल्लक कारणावरून सहज दुसऱ्याचा प्राण घेई. त्याच्या आश्रयास राहून नवीन मुसलमान झालेल्या मोगल लोकांची त्यानें अनेक वेळां कत्तल केली. मलीक काफूर हा तृतीयप्रकृति मनुष्य होता. त्याच्या संगतीस लागून बादशहानें आपलें नुकसान करून घेतलें. त्याच्या पायीं त्याची प्रत्यक्ष बायको मलीकाजहान त्याला मोजीनाशी झाली. सर्व प्रकारच्या सौख्योत्पादक साधनांमध्यें लोळत असूनही त्यास अंतीं सुखाचा लवलेश मिळेना. खिजरखान व शादीखान हे त्याचे दोघे मुलगे कैदेंत होते. काफूरच्या सांगीवरून बादशहानें भाऊ आलफखान यास ठार मारिलें. हिंदु स्त्रियेशीं लग्न करणारा असा हा पहिलाच मुसलमान बादशहा होय. ऐश्वर्यमदानें धुंद होऊन

हातीं आलेल्या अधिकाराचा दुरुपयोग केल्यानें अंतीं दुःख कसें होतें व राज्य कसें लयास जातें, ही गोष्ट अलाउद्दीनच्या चरित्रापासून शिकण्याजोगी आहे.'

९. अला-उद्दीनची करामत व योग्यता.—अला-उद्दीनचें सर्व कसब राज्याची सांपत्तिक स्थिति उत्तम राखण्यांत दिसून आलें. हरप्रयत्न करून त्यानें अगणित संपत्ति जमा केली, आणि राज्यांत आबादानी पसरिली. बराणी सांगतो, कीं 'प्रथम तीन वर्षें त्याला विशेष श्रम पडले. पुढें आपण वाटेल तशी चैन केली तरी राज्याची व्यवस्था कायम राहवी, असा बंदोबस्त त्यानें केला. दूरदूरच्या प्रांतांत त्याच्या फौजांस जय येत गेले. चहूंकडे विजय प्राप्त झाल्याच्या बातम्या त्यास हरहंमेश येऊं लागल्या. दरसाल दोन तीन मुलगे त्यास होऊं लागले. तिजोरींत पैसा विपुल राहूं लागला. हिरेरत्नांच्या पेट्यांच्या पेट्या नित्य दृष्टीस पडूं लागल्या. हजारों हत्ती त्याच्या पदरीं झुलत होते. दिल्ली शहरच्या सरकारी तबेल्यांत सत्तर हजार घोड्यांचा संग्रह झाला. ह्या अपार संपत्तीनें त्यास ऐश्वर्यमद चढून त्याच्या डोक्यांत भलभलते विचार घोळूं लागले. गर्वानें व अज्ञानानें फुगून जाऊन त्याचें डोकें बहकून गेलें. त्यामुळें भलभलत्याच वल्गना तो करूं लागला. विद्येचा तर त्यास गंध नव्हता आणि विद्वानांची संगतीही त्यास आवडत नव्हती. त्यास पत्र सुद्धां लिहितां येत नव्हतें. तो स्वभावानें तुसट, हट्टी व निष्ठुर होता, तरी सर्व लोक त्याजशीं हंसतमुख असत. नशीबाची त्याजवर कृपादृष्टि होती, आणि हातीं घेतलेल्या कामांत भराभर यश येत गेल्यामुळें, तो अत्यंत बेपरवा व उर्मट झाला. आपण नवीन धर्म स्थापन करावा, त्याचा आपण पैगंबर व्हावें, आणि दिल्लीच्या कारभारावर आपला एक प्रतिनिधि नेमून सिकंदराप्रमाणें भूतल जिंकीत संचार करावा, असे उद्गार तो वारंवार काढूं लागला. शिक्यांत व लेखांत आणि शुक्रवारच्या नमाजांत दुसरा सिकंदर असें नांव सुद्धां त्यानें धारण केलें. पण अला-उद्दीनजवळ कांहीं शहाणीं माणसें होतीं. बराणीच्या चुलत्यानें एके दिवशीं सुलतानाची बरीच कानउघाडणी केली. तो म्हणाला, 'धर्माचें काम करण्यास पैगंबर पुष्कळ मिळतील. पण अगोदर हिंदुस्थान देश तर जिंकून होऊं दे. रतनभोर, चितोड, चंदेरी, माळवा, धार, उज्जनी वगैरे

मोठमोठीं शहरें हिंदूंच्या हातांत आहेत, मोगल लोक वायव्येकडून त्रास देतच आहेत. तर मद्यप्राशनासारखे धंदे सोडून देऊन अगोदर हीं कामें कर.' हा उपदेश सुलतानास चांगला पटला. त्यानें बराणीच्या मुलास मोठें बक्षीस देऊन लगेच त्यानें वरील कामें हातीं घेतलीं, आणि तीं लवकरच तडीस गेलीं. कामें हातीं घेतांच तीं किती कठीण आहेत हें त्यास दिसून आलें. नुसत्या एकट्या रतनभोरच्या वेढ्यानेंच तो जेरीस आला. तेव्हां सिकंदराच्या सारख्या पराक्रमाच्या वल्गना आपोआप जागीं बसल्या. प्रत्यक्ष त्याच्या पुतण्यानें बंड करून त्यास ठार मारण्याचा प्रसंग आणिला होता; पण सुदैवानें बंड उघडकीस येऊन अलाउद्दीननें पुतण्याची व त्याच्या साथीदारांची पुरी खोड मोडिली. अशा प्रकारचीं बंडें वारंवार होत असत.

अशीं बंडें कां होतात आणि त्यांच्या मुळाशीं काय आहे याचा शोध सुलतान करूं लागला. त्यानें आपले अधिकारी जमविले आणि त्यांजबरो- बर रात्रंदिवस वाटाघाट चालविली. त्यांत असें निष्पन्न झालें, कीं लोकांच्या वर्तनावर सरकारचा दाब हवा तितका ठेवण्यांत आलेला नाहीं. लग्नकार्यांच्या व सणावारांच्या प्रसंगीं पुष्कळ लोक एकत्र जमून मद्यप्राशन वगैरे करून भलभलती चर्चा करीत असतात. मोठमोठे सरदार व वजनदार लोक उघड उघड राज्याच्या विरुद्ध मसलती करीत असतात. तसेंच पुष्कळ लोकांजवळ पैसा फार झाल्यामुळें त्यांना बंडाची सामुग्री आयतीच तयार करितां येते.

बंडाची ही मीमांसा सुलतानाच्या काउन्सिलांत निष्पन्न झाली असो, किंवा बराणीच्या डोक्यांतून निघालेली असो, तिचा बंदोबस्त मात्र सुलतानानें लगेच सुरू केला. (१) लोकांजवळ संपत्ति फार वाढली असें पाहून लगेच तिचा बंदोबस्त त्यानें मोठ्या उल्हासानें केला. लोकांस गांव किंवा जमिनी इनाम दिलेल्या होत्या, त्या त्यानें एकदम खालसा केल्या. कांहींना कांहीं सबबीवर त्यानें सर्व लोकांस पिळून त्यांजपासून पैसा उकळिला. सामान्य लोकांजवळ एक पै सुद्धां राहिली नाहीं, तेव्हां उदरनिर्वाहाच्या कामांत गुंतून गेल्यामुळें त्यांस बंडांची वार्ता कोठून सुचणार ? (२) सुलतानानें गुप्त हेरांची नवीन व्यवस्था सुरू केली. लोकांच्या यत्किंचित् हालचालींची वर्दी त्यास ताबडतोब मिळूं लागली. सरदार,

उमराव, अम्मलदार वगैरेंच्या घरीं जे कांहीं प्रकार होत ते सर्व सुलतानास कळूं लागले. गुप्त बातम्या काढून लोकांची त्यानें अशी जाचणूक सुरू केली, कीं त्यांना तोंड उघडण्याची सोय राहिली नाहीं. बाजारांतले किंवा रस्त्यांतले सामान्य व्यवहार सुद्धां सुलतानाच्या कानावर जाऊं लागले. एवढ्यानेंच काम भागलें नाहीं. दारूच्या नादांत लोक वाटेल तसे बरळतात, यास्तव मद्याची विक्री व मद्यप्राशन त्यानें साफ मना केलें त्याचप्रमाणें इतर अमली पदार्थही त्यानें बंद केले. दारू गाळणारांस व जुगारी लोकांस त्यानें शहरांतून हुसकून दिलें. त्यानें आपल्याजवळील मद्यप्राशनाचीं कांचेचीं वगैरे सर्व भांडीं फोडून बदाऊन दरवाज्ासमोर त्यांचा ढीग घातला. तसेंच दारूचे भरलेले घडे व पिंपें रस्त्यावर ओतून दिल्यानें त्याचा पावसाळ्यांतल्यासारखा चिखल झाला. स्वतः सुलतानानें मद्यप्राशन सोडून दिलें आणि अनेकांना त्याबद्दल देहांत शिक्षा केली. त्या योगानें मद्यप्राशन जरी समूळ नाहींसें झालें नाहीं, तरी सार्वजनिक गुत्ते मात्र सर्व बंद पडले. (४) लोकांचे गुप्त बेत बंद पाडण्यासाठीं सुलतानानें असें फर्मान सोडिलें, कीं सरदार व उमराव लोकांनीं एकमेकांच्या घरीं भेटीस जाऊं नये, मेजवान्या करूं नयेत व चारचौघांनीं मिळून एकत्र विचार करीत बसूं नये. लग्न वगैरे ठरविण्यापूर्वी किंवा इतर मनुष्यांना आपल्या घरीं उतरूं देण्यापूर्वी त्यांनीं सरकारची परवानगी घेतली पाहिजे. ह्या फरमानामुळें मेजवान्या बंद पडल्या; कोणासही दुसऱ्याच्या घरीं जाण्याची सोय राहिली नाहीं. सरकारी हेरांच्या धाकानें त्यांनीं सर्व समारंभ व भेटी बंद केल्या. बंडखोर किंवा अराजनिष्ठ मनुष्यास दुसऱ्याच्या घरीं जाण्याची बंदी झाली. राजवाड्यांत उमराव लोक जमत, तेव्हां सुद्धां एकमेकांशीं त्यांस कानगोष्टी करण्याची सोय राहिली नाहीं. (५) हिंदु प्रजेविषयीं तर याहून ज्यास्त कडक नियम केले. हिंदूला बसावयाला घोडा मिळूं नये, त्यानें हत्यार बाळगूं नये, उंची पोशाख करूं नये, किंवा छानछोकीनें राहूं नये असा बंदोबस्त अलाउद्दीननें केला. हिंदूनें आपल्या जमीनीचें अर्धें उत्पन्न सरकारांत भरावें आणि गाईम्हशींचा सुद्धां कर द्यावा, इत्यादि नवीन नियम सक्तीनें अमलांत आणिले. कोणाही हिंदूच्या घरांत सोनें, चांदी किंवा सुपारी देखील राहिली नाहीं. हिंदु अमलदारांच्या बायकांना मुस-

[मुसल]मानांच्या घरीं नोकरी करावी लागे. सरकारी अंमलदार आला, [त]रीं लोक त्यास दुरून नमस्कार करीत. राज्यांत हिंदु लोकांस नोकऱ्या मिळेनातशा झाल्या; आणि यदाकदाचित् एखाद्यानें नोकरी धरिली, तर त्यास दुसरे लोक आपल्या मुली देत नसत. कारण अशा मुलींस लग्न झाल्यावर मुसलमानांच्या जनानखान्यांत नोकरीस जावें लागे.

हे कायदे सुलतानानें स्वमतानें सुरू केले. त्यांत त्यानें कोणा कायदे-पंडिताचा विचार घेतला नव्हता. राज्यकारभाराच्या कामांत आपण करतों हें कायद्यानें योग्य आहे कीं नाहीं, ह्याचा विचार अलाउद्दीन करीत नसे. एके दिवशीं बियाणाचा काजी त्याच्या भेटीस आला असतां सुलतानानें त्यास विचारिलें, कीं 'मला कांहीं प्रश्न विचारावयाचे आहेत, त्यांचे तुम्ही खरे खरे जबाब द्याल काय?' काजी मोठा विद्वान् होता, तो घाबरून बोलला, 'मला वाटतें माझें दुर्दैव ओढवलें, म्हणून आपणांस असे प्रश्न सुचले.' सुलतान बोलला, भिऊं नका व माझ्या प्रश्नांचे जबाब खरे खरे द्या.' अला-उद्दीननें विचारिलें; 'आपल्या धर्मग्रंथान्वयें हिंदूंचें वर्तन कसें असावें?' काजी बोलला, "हिंदूचें काम कर देण्याचें आहे. सरकारच्या अधिकाऱ्यांनीं चांदी मागितली असतां हिंदूंनीं मोठ्या अदबीनें तक्रार न करितां सोनें द्यावें. अधिकारी बोलला, मी तुमच्या तोंडांत थुंकणार, तर लगेच त्यांनीं कांकूं केल्याशिवाय तोंडाचा 'आ' करावा. असें वर्तन करतील तरच ते शरण आले असें समजावें. अशा प्रकारें इस्लामाचा बोज राखणें हें आपलें कर्तव्य आहे. 'परधर्मी लोकांस नीच व निंद्य समज,' असें धर्म आपणांस शिकवितो."!!!

सुलतान बोलला, 'कर्तव्य वगैरे मी कांहीं ओळखीत नाहीं, पण हिंदूंची रग मीं पुरी जिरविली आहे. मी हुकूम करण्याचा अवकाश, कीं ते उंदरांसारखे बिळांत शिरतील. काजीसाहेब, आपण विद्वान् आहां खरे, पण जगाचा अनुभव आपणांस नाहीं. मी कांहीं शिकलेला नाहीं, पण प्रत्यक्ष अनुभव मात्र रगड मिळविला आहे. त्यावरून माझी अशी खात्री झाली आहे, कीं हिंदूंजवळ जोंपर्यंत पैसा आहे, तोंपर्यंत त्यांचे कितीही हाल केले, तरी ते शरण येणार नाहींत. म्हणून मीं असें ठरविलें आहे, कीं दहीं, दूध व धान्य फार तर एक वर्ष पुरेल इतकें

हिंदूंपाशीं राहूं द्यावें, त्याहून ज्यास्त द्रव्यसंचय त्यांस करूं देऊं नये.' असो, ह्या बाबतींत काजी व सुलतान ह्यांचा फारसा मतभेद झाला नाहीं. मतभेदाचा प्रसंग पुढें आला. 'युद्धांत कमावलेली लूट व सरकारी खजिना ह्यांजवर माझी मालकी आहे कीं नाहीं,' असा प्रश्न पुढें सुलतानानें काजीस विचारिला. त्यावर काजी बोलला, 'आतां मात्र माझा मृत्यु जवळ आला खरा. जर मीं खरा जबाब दिला, तर तुम्ही मला फांशीं द्याल; जर खोटा दिला, तर परमेश्वर मला फांशीं देईल.' तरी काजीनें खरा जबाब होता तो दिला. 'इस्लामाच्या फौजेनें मिळविलेली लूट सरकारी समजावी, खासगी नव्हे. जितका हिस्सा इतर शिपायांस मिळतो, तितकाच तुम्हीं आपल्याकरितां ठेवावा. ज्यास्त घेण्याचा तुम्हांस अधिकार नाहीं. मोठमोठ्या खलीफांचें आचरण असेंच आहे.' ह्या उत्तरानें सुलतानास राग येऊन तो बोलला, 'काय, तुम्हांस माझ्या तलवारीचें भय नाहीं वाटत; जनानखान्यासंबंधीं मी जो एवढा खर्च करितों, तो सर्व बेकायदेशीर आहे, असें तुम्ही मला सांगतां काय?' काजी बोलला, 'मला आपल्या तलवारीची भीति वाटते, नाहीं असें नाहीं; पण माझी मरण्याची तयारी आहे. आपण मला धर्मग्रंथांतला प्रश्न विचारिला, आणि धर्मग्रंथान्वयें मीं त्याचें उत्तर दिलें. पण धर्मग्रंथ बाजूस ठेवून व्यवहाराची बाजू विचाराल, तर लोकांवर दाब ठेवण्याकरितां राजानें भपका दाखविला पाहिजे, आणि जनानखाना वाढविल्यानें भपका वाढतो ह्यांत संशय नाहीं.' पुढें आपण कसा कडक बंदोबस्त ठेवितों, ह्याचें वर्णन करून सुलतान बोलला, 'हें माझें वर्तन गैरकायदा आहे काय?' त्यावर काजी जमिनीवर नाक घांसून बोलला, 'महाराज, आपण मला बंदींत टाका, किंवा तुकडे करून ठार मारा, पण मी खरें तेंच सांगणार. आपल्या वर्तनास धर्मग्रंथांत बिलकुल आधार नाहीं.' त्यावर सुलतान उठून मुकाट्यानें जनानखान्यांत गेला. काजी घरीं जाऊन बायकामुलांची शेवटची रजा घेऊन परत आला, आणि सुलतानास भेटला. पण सुलतानानें त्याजवर राग न करितां, उलट त्यास एक हजार टांक म्हणजे रुपये बक्षीस दिले; आणि म्हणाला, 'मी कांहीं धर्मग्रंथ पढलों नाहीं. तरी पण मी अस्सल मुसलमान आहें. बंडावा मोडण्याकरितां मला नानाप्रकारचे निष्ठुर उपाय करावे लागतात. त्यांत राज्याचें

कल्याण व्हावें हाच माझा हेतु असतो. लोक सरकारचे हुकूम खुशीनें पाळीत नाहीत, तेव्हां त्यांजवर जबरदस्ती करावी लागते. लोकांना बरें आहे असें मला वाटतें तें मी फर्मावितों, मग त्यास धर्मग्रंथाचा आधार असो वा नसो.'

बराणीच्या लेखांतून हे उतारे विस्तारानें दिले आहेत, त्यांवरून मुसलमानी राज्यकारभाराचें सामान्य धोरण कसें होतें, हें व्यक्त होईल. कदाचित् वरील भेटीची हकीगत थोडीबहुत काल्पनिक असण्याचाही संभव आहे. तरी पण बराणी हा नेहमीं दरबारांत वागणारा असून, त्याचे सगेवाले सर्व सुलतानाच्या नोकरींत होते; त्यावरून सामान्यतः त्या वेळीं प्रचलित असलेल्या कल्पना जरी ह्या वृत्तान्तांत गोंवलेल्या असल्या, तरी त्यांची किंमत बरीच मोठी आहे.

राज्यकारभाराचे कामीं सुलतानाची भिस्त नुसत्या क्रूर वर्तनावर नव्हती. स. १३०३ तील मोगलांच्या स्वारीनें तो पुष्कळ नवीन गोष्टी शिकला. दिल्ली येथें मजबूद किल्ला बांधून तेथें त्यानें आपल्या राजधानीच्या बचावाचा चांगला बंदोबस्त केला; नवीन तोफा ओतल्या, आणि हत्यारें तयार केलीं. राजधानीच्या प्रवेशद्वारावर चांगली मजबुदी करून, मोगलांच्या बंदोबस्तासाठीं नवीन व वाकब कामगार नेमिले. फौजेची तयारी नेहमीं जय्यत असावी अशी योजना करून, सर्व गोष्टींची व्यवस्था ठरवून दिली. प्रत्येक स्वाराचा सालाचा तनखा २३४ टंक (म्ह. २६० रुपये), व दोन घोडे ठेविल्यास आणखी १०० रुपये ज्यास्त, देण्याचें ठरविलें. ह्या तनख्यांत शिपायाची गुजराण चांगली होऊन त्यास हत्यारें वगैरे नीट ठेवितां यावीं, ह्यासाठीं धान्याच्या खरेदीविक्रीचे नवीन नियम ठरवून दिले. धान्यविक्रीचे भाव खालीलप्रमाणें ठरविलेले होते. गहूं, अठ्ठावीस शेरांच्या मणास ३ आणे, तांदूळ २ आणे, डाळ २ आणे, मसूर १ आणा. अलाउद्दीनच्या हयातीपर्यंत हे भाव बरोबर चालले. वास्तविक त्या वेळचे हे बाजारदरच होते. कित्येक वेळां धान्याची महर्गता होऊन भाव चढत, ते चढूं नयेत म्हणून अलाउद्दीननें वरील ठराव केला होता. दिल्लींत धान्याचा तोटा पडूं नये म्हणून दुआब वगैरे कित्येक प्रांतांतील सरकारी वसूल धान्यांतच घ्यावा, आणि महर्गता झाली तर ठरीव भावानें तें धान्य लोकांना विकावें अशी तजवीज अलाउद्दीननें केली होती. धान्याची

नेशाण करणारे इसम ठरवून दिलेले होते. कोणी ठरीव भावापेक्षां ज्यास्त किंमत घेतल्यास त्यास कडक शिक्षा होत असत. कोणी वजनांत लबाडी केल्यास, लबाडीच्या वजनाइतकें त्याच्या अंगाचें मांस काढून घेत असत. भाज्या, फळें, साखर, तेल, टोप्या, जोडे, कंगवे, सुया, घोडे, गुलाम, नोकर, मोलकरणी, वेश्या इत्यादि सर्वांची किंमत ठरवून दिलेली होती. मोलकरणीस पांचपासून बारा रुपये, वेश्येस वीसपासून चाळीस रुपये, गुलामास १० पासून १५ रुपये, सुरूप नोकरास २० पासून ३० रुपये, असे भाव ठरविले होते. या बाबतींचा त्या वेळच्या मानानें विचार केला पाहिजे. सुलतान छांदिष्ट किंवा मन मानेल तसें वागणारा होता असें ह्यावरून होत नाहीं. सुलतानानें केलेले नियम त्या वेळच्या स्थितीस योग्य होते, आणि त्यांचा परिणामही इच्छिल्याप्रमाणें हितावहच झाला. बंडें बंद झालीं, मोगलांचे हल्ले थांबले. राज्यांत शांतता आणि आबादानी झाली. अशी स्वस्थता केल्यावर हिंदुस्थानांतील इतर भाग जिंकून आपल्या राज्याखालीं आणण्यास, सुलतानास विलंब लागला नाहीं. पंजाबांत वायव्य हद्दीवर गाजी मलीक तुघ्लख यास ठेवून दिलें, आणि दक्षिणदेश जिंकण्यास मलीक काफूर यास पाठविलें. दोघांच्याही नेमणुका अगदीं यथायोग्य होत्या. दोघांनींही आपलीं कामें उत्कृष्ट बजाविलीं. देवगिरि व वरंगूळ येथील राज्यें हस्तगत होऊन अलोट संपत्ति सुलतानास मिळाली. दक्षिणदेश ह्या वेळी मुसलमानांच्या ताब्यांत गेला, तो बहुतेक शिवाजीच्या वेळेपर्यंत तसाच परकी अमलाखालीं होता.

एवढी सगळी करामत पाहिली म्हणजे अलाउद्दीन मोठा कर्तृत्ववान् होता, असें दिसून येतें. बाजारभाव ठरले गेल्यामुळें लोकांच्या मनाची चळवळ नाहींशी झाली, आणि शेती सुधारून चोऱ्यामाऱ्या कमी झाल्या. सारांश, क्रूरपणाबद्दल अलाउद्दिनास दोष देतांना त्याच्या राज्यकारभाराची प्रशंसा करणें योग्य आहे.

१०. मुबारिक खिलजी, (स. १३१६–१३२०).—अलाउद्दीनच्या मरणाचे दुसरे दिवशीं मलीक काफूर ह्यानें मयत बादशहाचा एक खोटाच मृत्युलेख पुढें आणिला, कीं पांच वर्षांचा शहाजादा उमरखान यास तख्तावर स्थापून काफूरनें राज्यकारभार पाहवा. त्याप्रमाणें त्या मुलाच्या वडील भावांचे डोळे काढून व त्यांच्या आईस बंदींत टेवून, काफूर हा

आपण कारभार पाहूं लागला. दिल्लीच्या लोकांस ह्या दुष्ट मनुष्याचा अंमल सोसवेना. त्याच्याच तैनातीस असलेल्या पहारेकऱ्यांनीं त्यास एके रात्रीं ठार मारिलें, आणि मुबारिक नांवाचा चवथा एक मुलगा काफूरच्या तडाख्यांतून शाबूद राहिला होता, तो राज्यकारभार पाहूं लागला. दोन महिनेपर्यंत धाकट्या मुलाच्या नांवानें कारभार केल्यावर, त्याचे डोळे काढून व इतर सर्वांचा शिरच्छेद करून, मुबारिक स्वतःच सुलतान झाला. खिजरखान मेल्यावर त्याची बायको देवलदेवी इला मुबारिकनें आपली पट्टराणी केली.

मुबारिक हा अत्यंत दुर्व्यसनी व हलकट निघाला. तो नेहमीं खाण्यापिण्यांत निमग्न राही. नटव्यासारखा सजून कसबिणींबरोबर थोर लोकांच्या घरीं नाचावयास जाई. तो मोठमोठ्या लोकांची दरबारांत बेअदबी करूं लागला. आपल्या गुलामांतून पुष्कळांस त्यानें मोठ्या पदव्या व हुद्दे दिले. त्यांत हसन म्हणून एक जातिभ्रष्ट गुजराथी होता. त्यास चढवितां चढवितां त्यानें आपला वजीर केलें. ह्या दुष्ट इसमानें मलीक खुस्रू अशी पदवी आपल्यास घेतली. त्या वेळीं दरबारचे सर्व शहाणे व योग्य मनुष्य कित्येक घरीं बसले, आणि कित्येक अब्रू बचावण्याकरितां दूरदेशीं निघून गेले. खुस्रूनें गुजराथेंतील आपल्या जातीचे वीस हजार लोक आणवून त्यांजकडे मोठमोठे अधिकार दिले. मुबारिक याचे हातून कित्येक चांगलीं कृत्येंही झालीं, नाहीं असें नाहीं. अलाउद्दीनचे सतरा हजार बंदीवान होते ते त्यानें सोडून दिले. अलाउद्दीननें जप्त केलेल्या जमिनी सोडून दिल्या; सक्तीचे कर बंद केले; व्यापार व जिंदगी ह्यांविषयीं अलाउद्दीननें ठरविलेल्या निष्कारण हरकती त्यानें दूर केल्या. तथापि आळशी व व्यसनाधीन असल्यामुळें त्याचें कांहीं चाललें नाहीं. धान्याचे दर महाग झाले, मजुरी वाढली, राज्यांत लांच खाऊन पैसे उपटण्याचा सपाटा सुरू झाला.

सन १३१८त त्यानें ऐनुल्मुल्क नामक सरदारास गुजराथप्रांत सर करण्याकरितां पाठविलें, आणि आपण स्वतः दक्षिणदेशांत फौज घेऊन गेला. रामदेवराव जाधवाचा जांवई हरपाळदेव देवगड येथें स्वतंत्रपणें राज्य करूं लागला होता, त्यास त्यानें जिवंत सोलून हाल करून ठार मारिलें, आणि त्या प्रांताचा चांगला बंदोबस्त करून आपण दिल्लीस परत आला.

याद[illegible] [illegible]ांतील स्वतंत्र मराठशाहीचा हा शेवटचा [illegible] झाल्यानें दक्षिण देशांत मुसलमानी अंमल कायमचा बसला.

दिल्लीस परत आल्यावर जिकडे तिकडे बंडें होऊं लागलीं. एक बंड मोडावें तों लगेच दुसरें उभें राही. त्यांत निरपराध्यांसही नुसत्या वहिमावरून जबरदस्त शिक्षा होत. येणेंकरून जिकडे तिकडे जुलूम व अंदाधुंदी ह्यांचा प्रळय झाला. बादशहाबरोबर मलीक खुस्रू दक्षिणेंत गेला असतां त्यास त्यानें मलबारदेश जिंकण्यास पाठविलें. त्यानें तो प्रांत एका वर्षांत सर करून अपार संपत्ति दिल्लीस आणिली. तेव्हां सन १३१९ त बादशहानें संतुष्ट होऊन सर्व कारभार खुस्रूचे हातीं सोंपविला. ह्यामुळे सुलतानाचें अनुकरण इतर लोक करूं लागले. लाजलज्जा सर्व सुटली, वेश्यांच्या किंमती शेंकडोंपट वाढल्या, सुलतानानें प्रार्थनेसाठीं मशिदींत जाणें सोडिलें, रमजानचा उपास कोणी पाळीना. पुढें खुस्रूनें मन मानेल तसें आचरण करून प्रत्यक्ष बादशाही तख्त मिळविण्याची खटपट चालविली. अलाउद्दीन व मलीक काफूर, आणि मुबारिक व खुस्रू, ह्या दुकली एकाच प्रकारच्या असून मुसलमान इतिहासकार त्यांजबद्दल अत्यंत तिरस्कार व्यक्त करितात. आपल्या हलकट दोस्तांस बरोबर घेऊन खुस्रूनें सुल्तानाचा एके रात्रीं खून केला, आणि आपण दिल्लीचें तख्त बळकाविलें.

११. खुस्रूचा विक्षिप्तपणा.—खुस्रूचें एकंदर आचरण चमत्कारिक आहे. धर्मांतर केलेल्या ह्या माणसाच्या हातून परस्परासंबद्ध अशीं कृत्यें पुष्कळ घडलीं. प्रथमतः त्यानें तिजोरी खुली करून फौजेस मुबलक द्रव्य देऊन तिला वश केलें. नंतर नासिर-उद्दीन असें नांव धारण करून तो सुलतान झाला. त्यानें आपल्या नांवानें खुत्बा वाचविला आणि नाणीं पाडिलीं. नंतर त्यानें खिलजी घराण्यांत जेवढे पुरुष होते, त्या सर्वांची कत्तल केली; आणि पुढें हरएक कामांत स्वतःस हिंदु समजून तो मुसलमानांविरुद्ध वर्तन करूं लागला. त्यानें देवलदेवीशीं लग्न केलें. त्याच्या हिंदु अनुयायांनीं दिल्ली येथें सर्व मशिदींत मूर्ति स्थापिल्या. ते कुराणांवर बसूं लागले. जनानखान्यांत त्यांनीं अंगावर शहारे येणारीं कृत्यें केलीं. राजघराण्यांतील व सरदार लोकांच्या स्त्रिया खुस्रूनें आपल्या परिया अनुयायांच्या हवालीं केल्या. पांच महिनेपर्यंत हिंदु बंडखोरांच्या ताब्यांत दिल्ली

NATIONAL ARCHIVES OF INDIA

शहर होतें. शेवटीं मुसलमानांनीं आपला सूड घेतला. पंजाबचा सुभेदार गाजीबेग तुघलख हा फौजबंद होऊन दिल्लीवर आला. खुस्रूखानास पकडून त्यानें ठार मारिलें, आणि ग्यासुद्दीन नांव धारण करून तो दिल्लीचा सुलतान झाला, (स. १३२१).

खुस्रूच्या हातीं कारभार असतां, सर्व देशांत इतकी अंदाधुंदी व अव्यवस्था होती, कीं हिंदुराजांनीं यत्किंचित् प्रयत्न केला असता, तर दिल्लीचें तख्त त्यांस सहज मिळालें असतें. चितोड, व रतनभोर येथील राज्यें कायमचीं जिंकलीं गेलीं नव्हतीं, त्यांनीं सुद्धां स्वतंत्र होण्याचा प्रयत्न केला नाहीं, आणि योग्य संधि वायां घालविली.

खुस्रूखान मूळचा परिया म्हणजे अंत्यज होता. मुसलमान झाल्याशिवाय आपला मोठेपणा वाढविण्याचें त्यास साधन नव्हतें. *दिल्लीचें तख्त बळकाविल्यावर तेथें हिंदुपदपादशाही व हिंदुधर्म स्थापन करण्याची त्यांची फार इच्छा होती.* ह्याबद्दलची सर्व हकीकत मुसलमान ग्रंथकारांनीं दिलेली असल्यामुळें ती निःसंशय एकतर्फी आहे. अलीमहंमदखानानें गुजराथचा इतिहास लिहिला आहे, त्यांत तो खुस्रूखान हा मूळचा रजपूत होता असें सांगतो. ह्या वेळचीं हिंदूंनीं लिहिलेली माहिती सांपडेल तर वरील बंडाचा चांगला उलगडा होईल. कदाचित् ह्या सर्व प्रकरणांत देवलदेवीचें अंग असेल. मुबारिक तिला आवडत नव्हता. तिनें खुस्रूखानाकडून त्याचा खून करविला असेल. त्या वेळेचें हें बंड दोन जातींच्या लोकांमध्यें चाललें होतें. सन १८५७ सालच्या बंडाशीं ह्याचें पुष्कळ साम्य आहे. दोहोंतही पांच महिने दिल्ली बंडवाल्यांचे ताब्यांत राहून अखेरीस पंजाबच्या* अंमलदाराच्या साह्यानें ती प्राचीन राजधानी पूर्ववत् परकीय अमलाखालीं गेली. दिल्ली शहरांत मुसलमानांचाच बहुतेक भरणा असून, हिंदूंचें बंड सिद्धीस जाणें फारसें शक्य नव्हतें. मलीक काफूर व खुस्रू हे मूळचे हिंदु असून त्यांजकडूनच मुसलमानांच्या ह्यावेळच्या राज्यवृद्धीस विशेष मदत झाली हें ध्यानांत ठेवण्याजोगें आहे.

---

* १८५७ सालच्या बंडांत दिल्ली परत घेण्याचें काम पंजाबचा अधिकारी सर जॉन लारेन्स याजकडून झालें, ह्या गोष्टीशीं येथें संबंध आहे.

प्रकरण नववें.

तुघ्लख घराणें.

सन १३२१–१३८८.

१. ग्यास्-उद्दीन तुघ्लख, (१३२१–२६). २. आफ्रिकेंतील प्रवासी इब्न भतूता. ३. महंमद तुघ्लख व त्याच्या अडचणी. ४. बंडें व मृत्यु, (स. १३५१). ५. महंमद तुघ्लखाची योग्यता. ६. फिरोज तुघ्लख व त्याचा वजीर. ७. जनहिताचीं कामें. ८. हिंदुधर्मावर वक्रदृष्टि. ९. मृत्यु व योग्यता, (स. १३८८).

१. ग्यास्-उद्दीन तुघलख, (स.१३२१–१३२६).—तुघलख घराणें हें तुर्क—अफगाण जातीचें तिसरें घराणें होय. गुलाम सुलतान बल्बन याचे जवळ ग्यासुद्दीन हा पूर्वी गुलाम होता. तो लाहोरच्या आसपासच्या शेतकरी लोकांपैकी असावा. स्वतःच्याच चांगल्या वर्तणुकीनें तो मोठ्या पदास चढला. त्यानें अलाउद्दीनच्या वेळेपासून अनेक वेळां मोगल वगैरे लोकांशीं लढून सरहद्दीचें संरक्षण उत्तम प्रकारें केलें होतें. म्हणून त्यास गाजी-मलीक असें नांव मिळालें. खिलजी घराण्यांत कोणी वारस असेल, तर त्यास तख्तावर बसविण्यास आपण तयार आहों, असें त्यानें प्रथम जाहीर केलें, पण तसा कोणी वारस न मिळाल्यामुळें तो तख्तावर बसला. दिल्लीच्या लोकांनीं त्यास सांगितलें, 'तुम्हीं इतके दिवस सरहद्दीचा बंदोबस्त ठेविला, हिंदूंच्या व परियाच्या जाचांतून मुसलमानांचा बचाव केला, तर राज्य करण्यास तुमच्याशिवाय दुसरा कोण योग्य आहे?' त्या भानगडीच्या काळीं मुसलमानी राज्य संभाळण्यास तोच समर्थ होता. दुष्कर्म करून प्रतिष्ठा मिळविण्याचा त्यानें यत्न केला नाहीं. तो एकवचनी व नीतिमान असून लोभिष्ट नव्हता. त्यानें फक्त पांच वर्षे राज्य केलें. पण तेवढ्या अवधींत प्रजेपासून चांगली शाबासकी मिळविली. राज्यकारभाराचे त्यानें नियम बांधिले. त्यानें किल्ले व वाडे नीट केले, आणि कित्येक नवे बांधिले. व्यापार वाढविला. मोठमोठे विद्वान लोक बोलावून त्यांजकरवीं कुराणाचे आधारानें व दिल्लींतील मूळच्या चालीस अनु-

NATIONAL ARCHIVES OF INDIA

सरून, कायद्यांचें एक नवीन एकीकरण त्यानें केलें. राज्यावरचे कर त्यानें पुष्कळ कमी केले, तरी मुसलमानांपेक्षां हिंदूंवर कर ज्यास्त बसविला. मोगलां-पासून उपद्रव न व्हावा म्हणून त्यानें सरहद्दीचा बंदोबस्त चांगला केला. दक्षिणें-तील दंगा मोडण्याकरितां त्यानें आपला मुलगा जोना ऊर्फ उलुघखान यास तिकडे पाठविलें. पण त्या स्वारींत पराजय होऊन जोनास परत यावें लागलें. सन १३२३त पुनरपि उलुघखान दक्षिणेंत आला, आणि त्यानें तैलंगणाची राजधानी वरंगूळ जिंकून, तेथील राजास कैद करून दिल्लीस नेलें. पुढें सुलतानानें कांहीं दिवसांनीं त्यास बंधमुक्त करून त्याचें राज्य त्यास परत दिलें. इकडे बंगालप्रांत बल्बनच्या मृत्यूनंतर बहुतेक स्वतंत्रच होता. तो जिंकण्याकरितां सुलतान तिकडे गेला, तेव्हां बल्बनचा मुलगा बोगरा-खान याचा नातू नासिरुद्दीन लखनौती येथें कारभार करीत होता, तो सुलतानास शरण आला; तेव्हां त्याचा सत्कार करून, दुसरीं कित्येक बंडें मोडिलीं, आणि तिरहुत म्हणजे प्राचीन मिथिला देश जिंकून ग्यासु-द्दीन परत दिल्लीस येत होता, तेव्हां त्याचा मुलगा उलुघखान हा मोठ्या समारंभानें शहराबाहेर वापास भेटण्याकरितां गेला. सुलतानाचा सत्कार करण्याकरितां एक लांकडी डेरा मुद्दाम तयार केलेला होता. तेथें मेज-वानीचा वगैरे मोठा समारंभ झाला. त्या प्रसंगीं लांकडी मंडप एका-एकीं पडून त्याखालीं ग्यासुद्दीन व दुसरे पांच असामी चिरडून मेले. त्यांत उलुघखान सांपडला नाहीं; परंतु ग्यासुद्दीनचा दुसरा आवडता मुलगा होता तो सांपडला; यावरून हें सर्व उलुघखानाचेंच कपटकृत्य असावें असा संशय नाहीं.

दिल्लीस अनेक राज्यक्रांती घडून आल्यामुळें ती जागा तुघ्लख सुलतानास अपयशाची वाटली. ग्यासुद्दीननें दिल्लीस लागून तुघ्लखाबाद नामक एक लहानसा गढीवजा किल्ला बांधिला, त्यावरून तुघ्लख वंशाचें नांव दिल्लीस कायमचें राहिलें आहे. म्हणून ग्यासुद्दीन व त्याचा मुलगा हे नेहमीं तुघ्लखाबादेसच राहत असत. हल्लीं हा किल्ला मोडक्या स्थितींत आहे, तरी त्याचें प्रत्यक्ष स्वरूप पाहिल्यानें त्या वेळची बरीच कल्पना होते. तटाच्या भिंती भव्य व मजबूद आहेत. आंत जाण्याचे दरवाजे वगैरे सर्व खालीं भुयारांत आहेत. किल्ल्यांत बसून बाहेरचें बंड सहज मोडतां यावें अशी व्यवस्था केलेली आहे. तेथून पाहिजे त्या ठिकाणीं लष्कर

NATIONAL ARCHIVES OF INDIA

पाठविण्याची सोय होती. रस्ते, बाजार, वाडे, बागा ह्यांच्या खाणाखुणा अद्यापि दिसतात. नेथून शहरांत येण्याचा रस्ता भुयारांतून आहे. हल्लीं तेथें लोकवस्ती नाहीं.

२. इब्न भतूता.—आफ्रिकाखंडांतील तांजर्स येथें राहणारा इब्नभतूता नामक एक विद्वान् गृहस्थ आशियाखंडांत फिरत फिरत सन १३४०त दिल्लीस आला होता. त्यानें महंमद तुघ्लखच्या दरबारची बरीच हकीकत दिली आहे. तो म्हणतो, ' दिल्ली शहर विस्तीर्ण होतें. एका टोंकापासून दुसऱ्या टोंकाचें अंतर दहा मैल होतें. शहराचे निरनिराळे अनेक भाग निरनिराळ्या राज्यकर्त्यांनीं वसविलेले होते ते असेः—अगदीं जुना भाग कुत्बुद्दीनच्या वेळेस वसलेला, नंतर ' शिरी ' म्हणून अला-उद्दीननें वसविलेला, ग्यासुद्दीननें वसविलेला तुघ्लखाबाद, आणि महंमद तुघ्लखानें वसविलेला ' जहांपन्हा ' (जगदाश्रय) नांवाचा भाग. जुन्या भागाचा तट फारच मजबूद असून त्यास अठ्ठावीस दरवाजे होते. निरनिराळ्या भागांतले राजवाडे, मशीदी, तट व कुत्बमिनार इत्यादिकांचें भतूतास मोठें कौतुक वाटलें. अशीं कामें, तो म्हणतो, पृथ्वीवर दुसरे कोठें नाहींत. तरी दिल्लींतील लोक दक्षिणेंत निघून गेल्यामुळें सर्व शहर ओसाड दिसत आहे. महंमदाच्या राज्यामध्यें प्रकाश व अंधार, न्याय व अन्याय, यांचें चमत्कारिक मिश्रण झालेलें आहे. दंग्याधोप्यांमुळें प्रवास करण्याचें काम मोठें जोखमीचें झालें आहे. तरी राजधानीपासून अगदीं सरहद्दीच्या प्रांतापर्यंत उत्कृष्ट घोडेस्वारांची व पायांनीं चालणाऱ्या कासीद लोकांची बादशहानें टपाल ठेविली आहे.' इब्नभतूता दिल्लीस पोंचला, त्या वेळेस सुलतान तेथें नव्हता. सुलतानाच्या आईनें ह्या परदेशी पाहुण्याचें स्वागत अत्युत्तम केलें. सुलतान आल्यावर त्यानें त्याच्या खर्चाचा बंदोबस्त चांगला करून दिला. इब्नभतूताची मुलगी दिल्लींत वारली, तेव्हां सुलतानानें तिचा उत्तरविधि मोठ्या समारंभानें करविला. त्या समारंभांत सुलतानाचे वतीनें त्याचा वजीर हजर होता. भतूता ह्यास महंमदानें न्यायाधीशाचें काम सांगितलें आणि त्याबद्दल मोठें वेतन करून दिलें. भतूताचें पंचावन हजार दिनाराचें कर्ज सुलतानानें वारिलें. पुढें कांहीं दिवसांनीं दिल्लींत राहणें न आवडून चीनच्या वकिलातीबरोबर भतूता निघून गेला. तेथून स्वदेशीं परत गेल्यावर त्यानें आपलें प्रवासवृत्त लिहिलें.

३. महंमद तुघलख व त्याच्या अडचणी.—पुढें ग्यासुद्दीनचा मुलगा जोना ऊर्फ उलुघबेग महंमद नांव धारण करून तख्तावर बसला. तुघलख घराण्यास काफीखानानें 'करौना' म्हणजे मिश्रजाती (half-breeds) अशी संज्ञा दिली आहे. म्हणजे ह्या वंशांतले पुरुष हिंदु स्त्रियांच्या पोटीं तातार बीजापासून उत्पन्न झाले होते. गुलाम घराण्यांत जसा बल्बन, अगर खिलजी घराण्यांत अल्लाउद्दीन, त्याचप्रमाणें तुघलख घराण्यांत महंमद तुघलख विशेष स्मरणीय आहे. कृतीवांचून कल्पनेंतच कांहीं अचाटपणा असेल तर त्यास 'अचाट कल्पनांचा पुरुष' हें नांव शोभेल. त्याच्या कल्पना अगदींच टाकाऊ होत्या असें नाहीं, पण त्या तत्कालीन परिस्थितीस योग्य नव्हत्या. अल्लाउद्दीन अगदींच निरक्षर होता, पण महंमद तुघलख चांगला शिकलेला होता. तत्कालीन शास्त्रकला त्यास चांगल्या अवगत होत्या. फारशी कविता त्यास फारच आवडत असे. तो उत्तम लेखक व उत्तम वक्ता होता. गणितांत त्याची गति उत्कृष्ट होती. वैद्यक, तर्क व न्यायशास्त्रें त्यास चांगलीं येत असून, त्या वेळचे मोठमोठे विद्वान सुद्धां त्याजबरोबर वादविवाद करण्यास कचरत असत. त्याचें हस्ताक्षर उत्कृष्ट असून, नाण्यांवर खोदिलेलीं अक्षरें सुद्धां सुबक असावीत अशी दक्षता त्यानें ठेविली होती. आरबी भाषाही त्यास येत असे. त्याची बुद्धि अचाट असून अगदीं आणीबाणीच्या प्रसंगीं एखादी अजब युक्ति काढून तो लोकांस थक्क करी. तख्तावर येतांच विद्वान व दोस्त मंडळीस देणग्या व नेमणुका करून देऊन त्यानें जें औदार्य प्रगट केलें, तसें आजपर्यंत कोणत्याही बादशहानें केलेलें नाहीं. त्याचें आचरण धर्मनिष्ठ असे. दारूला तो शिवत नसे. तसेंच नियमितपणा व शौर्य हेही गुण त्याजमध्यें कांहीं कमी नव्हते. त्याची स्मरणशक्ति तर फारच तीव्र होती. त्या वेळचे ग्रंथकार हा कोणी अद्भुत पुरुष होता असें वर्णन करितात. इतकें त्याच्या चांगुलपणाचें वर्णन झालें. पण त्याच्या दुराचाराचीही ख्याति अशाच मासल्याची आहे. तो अत्यंत स्वेच्छाचारी व उतावळा होता. दुष्ट मनोरथांच्या सिद्ध्यर्थ त्यानें भलतेच उपाय योजिले, त्यामुळें त्याच्या राज्याची व रयतेची अत्यंत दैना उडाली. तो खुनशी व क्रूर होता. एखादे वेळेस त्याचा राग इतका अनावर होई, कीं त्यामुळें हा सर्व मनुष्यजातीचें पृथ्वी-

मूळापासून निर्मूलन करून टाकतो की काय असें वाटे. व्यावहारिक दूरदृष्टि व परिस्थिति ओळखण्याचें चातुर्य अंगीं नसल्यामुळें, उत्कृष्ट बुद्धीची व विद्वत्तेची हानि कशी होते हें ह्या कारकिर्दीवरून चांगलें कळून येईल. ह्याच्या कारकीर्दीचा इतिहास म्हणजे केवळ त्याच्या चुकांचें वर्णन होय.

अचाट कल्पनांचा विपरीत परिणाम.—त्याच्या कारकिर्दीची सुरुवात चांगली झाली. त्या वेळीं बापाचा लौकिक मोठा असून, त्याचाही बोज लोकांस चांगला होता. हिंदुस्थानांत शांतता होती. बंगाल व महाराष्ट्र हे दूरचे प्रांत राज्यांत मोडत होते. सारांश, त्याला अपयश आलें तें केवळ स्वतःच्या कृतीनें आलें, असें म्हणावें लागतें.

दक्षिणदेश जिंकिल्यामुळें राज्याची मर्यादा व जबाबदारी अतोनात वाढली; पण त्यामानानें प्राप्ति कांहींच झाली नाहीं. सर्व प्रांत लुटीनें फस्त झाल्यामुळें लोकांत त्राण राहिलें नव्हतें, म्हणून ते जीव बचावण्यासाठीं निकरानें राजाविरुद्ध उठले. ही बंडें मोडण्याकरितां महंमदानें आपली फौज रवाना केली. अशा संधीस तुर्मशिरीनखान नामक एका पराक्रमी सरदाराच्या हाताखालीं मोगलांनीं उत्तरेकडून पंजाबावर हल्ला केला. महंमदाची लढण्याची तयारी नसल्यामुळें त्यानें मोगलांस पुष्कळ द्रव्य देऊन वाटेस लाविलें. ह्या लालुचीनें ते पुनः लवकर इकडे आले नाहींत, हें ह्या सुलतानाचें भाग्य होय. बाकी अशा लालुचीचा परिणाम नेहमीं घातुक होतो. दक्षिणेंतील राजांशीं सलोख्यानें वागून त्यांस त्यानें खुष ठेविलें असतें, तर त्याचा बचाव बऱ्या रीतीनें झाला असता. पैसा नाहींसा झाला, म्हणून त्यानें लोकांवर जबरदस्त कर बसविले. त्या योगानें गरीब होते ते धुळीस मिळाले, आणि श्रीमंत होते ते बंडखोर झाले. लोकांनीं शेती सोडून दिली. धान्य महाग झालें. इतक्यांत मेघराजाची अवकृपा होऊन अवर्षण पडलें, तेव्हां सर्व प्रदेश दुष्काळानें व्यापिला. त्यांत बहुतेक उत्तरहिंदुस्थान भिकेस लागलें; गांवेंच्या गांवें बसलीं; कुटुंबें नाहींशीं झालीं; हजारों लोक मृत्युमुखीं पडले. अर्थात् राजसत्ता व राजवैभव ह्यांचा अस्तसमय प्राप्त झाला.

त्यांतच सुलतानाच्या क्रूर स्वभावाची भर पडली. ह्या क्रूर कृत्यांचें इब्नबतूतानें दिलेलें वर्णन वाचून अंगावर कांटा उभा राहतो. हीं कृत्यें त्यानें स्वतः पाहिलेलीं आहेत. मनुष्यवध करण्यासाठीं हत्ती

शिकवून तयार केलेले होते. ते बंडखोरांस पायांखालीं चिरडून मारीत, अगर दांतांस बांधलेल्या तलवारींनीं त्यांचे तुकडे करून त्यांस वर हवेंत फेंकून देत. प्रत्यक्ष त्यानें आपल्या भावास व पुतण्यास अशा रीतीनें ठार मारिलें. पुतण्यास तर जिवंत सोलून त्याचें मांस शिजवून तें त्याच्या कुटुंबाकडे पाठवून दिलें.

दुष्काळ वगैरे कारणांनीं झालेली दुर्दशा भरून काढण्याकरितां दिल्ली शहर सोडून दक्षिणेंत राजधानी करण्याचा सुलतानानें विचार ठरविला. दिल्लीहून दक्षिणचा बंदोबस्त नीट राहत नसे. दक्षिणेंत सुबत्ता होती, पण तेथील खजिना दिल्लीस सुरक्षित आणण्याची मोठीच अडचण पडूं लागली. तेव्हां दिल्ली सोडण्याचा विचार वावगा नव्हता. पण दिल्लीच्या सर्व लोकांनीं शहर सोडून जाण्याचें कारण नव्हतें. थोडेसे आसलकीय लोक नेऊन दक्षिणेंत जाऊन त्यास राहतां आलें असतें. तें न करितां, देवगड शहरास दौलताबाद असें नांव देऊन ती आपली राजधानी करण्याचा विचार ठरविला. ह्या योगानें दुष्काळांतून सुटून शिवाय दक्षिणचाही बंदोबस्त होईल, असा त्याचा समज होता. पण ह्या योजनेचे परिणाम विपरीत झाले. दिल्ली शहर आज दोनशें वर्षें राजधानीचें स्थान होतें. तेथून देवगड सातशें मैल दूर असून तेथें जाण्याचा रस्ता भयंकर अरण्यांतून होता. बादशहानें सर्व लोकांस दिल्ली शहर सोडून दक्षिणेंत जाण्याचा हुकूम केला. त्यानें रस्त्यावर गरिबांचे पोटाची वगैरे तजवीज केली. पण दिल्ली शहर ओस पडलें. त्यांत घुबडें व हिंस्र पशु वास करूं लागले. पुष्कळ दिवसांच्या सहवासानें दिल्लीस त्यांच्या सर्व सोयी लागलेल्या होत्या. सातशें मैलांच्या व चाळीस दिवसांच्या ह्या प्रवासांत त्यांस कितीसें सामान बरोबर घेतां येणार ! मुलेंबाळें व नोकरचाकर घेतांनाच त्यांस जड झालें. इकडे देवगडास एकदम सर्वांची सोय लागणें शक्य नव्हतें. प्रवासाच्या त्रासानें असंख्य लोक प्राणांस मुकले. देवगडास पोंचल्यावर अनेक लोकांचा संहार झाला. ह्या कृत्यांत इतका कहर उडाला, कीं अखेरीस सुलतानानें सर्व लोकांस दिल्लीस परत बोलाविलें. पण एकवार मोडलेला मेळ पुनः कसा बसावा ? पुनः परत येण्यामध्यें आणखी पुष्कळ लोकांचा फडशा उडाला. हे सर्व लोक मुसलमान होते. दिल्लीपासून दौलताबादचा रस्ता उत्कृष्ट होता

NATIONAL ARCHIVES OF INDIA

म्हणून बरें. रस्त्याच्या दोनही बाजूंस झाडें लावलेलीं असून, आपण एखाद्या बागांतूनच चाललों आहें असें प्रवाशास वाटे.

अशा कचाट्यांत सांपडला असतां पैशांची अडचण भरून काढण्यासाठीं महंमदानें तांब्याचीं नाणीं सोन्याच्या नाण्यां-ऐवजीं चालविण्याचा हुकूम केला. चीनदेशांत एक प्रकारचें कागदाचें नाणें चालवितात, म्हणून त्यानें ऐकिलें होतें. त्या कागदांवर बादशहाचा मुखवटा छापिलेला असून हल्लींच्या कागदी नोटांप्रमाणें सरकारी तिजोरींत कागद दिला, म्हणजे त्याचे पैसे मिळत. ह्या कागदाच्या ऐवजीं महंमद तुघ्लखानें तांब्यांचे तुकडे तयार केले, आणि त्या तुकड्यांवर दाखल केलेल्या आंकड्यांस अनुसरून सोन्याच्या नाण्यांसारखी देवघेव व्हावी असें फर्माविलें. शिक्षेच्या भीतीनें लोक तें नवीन नाणें मानूं लागले; आणि जर कपट करण्यास लोकांस जागा मिळाली नसती, तर ह्या क्लृप्तीचे इतके वाईट परिणाम झाले नसते. बनावट नाणीं साफ बंद झाल्याशिवाय असले उपाय सिद्धीस जाणें शक्य नाहीं. परंतु ह्या सरकारी नाण्यांच्या हुबेहूब नाणीं लोकांनीं तयार केलीं. सरकारांत भरावयाचा पैसा सोन्याच्या नाण्यांत न भरतां ह्या तांब्याच्या तुकड्यांनीं ते भरूं लागले. तसेंच तांब्याचीं नाणीं स्वस्त झाल्यामुळें लोक घोडे, हत्यारें, मौल्यवान जिन्नस भराभर खरेदी करूं लागले. हिंदुस्थानांत तयार झालेले जिन्नस तांब्याच्या नाण्यांत विकत घेऊन व्यापारी लोक ते परदेशांत सोन्याच्या किंमतीस विकूं लागले. ह्यामुळें लोकांचा फायदा झाला, पण सरकारचें सर्वस्वी नुकसान झालें. परदेशांतून हिंदुस्थानांत माल येण्याचें बंद झालें. त्यामुळें व्यापार बसला. तांब्याच्या नाण्यास कोणीं विचारीनासें झालें. राज्यक्रांतीच्या व धामधुमीच्या अशा त्या काळांत ह्या हलक्या व खोट्या नाण्यांवर लोकांचा विश्वास बसेना ह्यांत नवल नाहीं. सोन्याची किंमत चौपट वाढली. हे परिणाम पाहून सुलतान क्रोधानें वेडा होऊन गेला. काय करावें हें त्यास सुचेना. तेव्हां रागारागानें त्यानें नाण्यांचा कायदा रद्द केला आणि सर्वांना नाण्यांची किंमत सोन्यांत देण्यास आपण तयार आहों असें त्यानें जाहीर केलें. पण तांब्याचीं नाणीं भराभर नवीन होऊं लागल्यामुळें त्यास आपलें वचन पाळितां येईना. तुघ्लखाबाद येथें तांब्याच्या नाण्यांचे पर्वतप्राय ढीग

NATIONAL ARCHIVES OF INDIA

जमले. तिजोरींतील सोनें खलास झालें. तेव्हां अर्थात् तिजोरी बंद करावी लागली. येणेंप्रमाणें ह्या अनर्थमूलक प्रयोगाचा शेवट झाला.

तथापि हे सर्व भयंकर परिणाम एकदम घडून आले नाहींत. सर्व फौजेचा पगार सुलतान ह्या नवीन नाण्यांत देई. लष्करी लोक तें नवीन नाणें नेहमीं वापरीत. म्हणून आपली युक्ति सिद्धीस गेली असें वाटून सुलतान आरंभीं अगदीं चढून गेला होता. पुढें चीनदेश जिंकण्यासाठीं त्यानें आपला पुतण्या खुस्रूमलीक यास हिमालयाच्या पहाडांतून एक-लाख फौजेसह रवाना केलें. मोठ्या कष्टानें नेपाळच्या रानांतून वाट काढीत स. १३३७ त खुस्रूमलीक चीनच्या हद्दीवर येऊन पोंचला. तेथें चिनी फौजेशीं संग्राम होऊन खुस्रूस परत फिरावें लागलें. त्याच सुमारास पर्जन्यानें सर्व प्रदेश जलमय झाला. त्यांत व थंडीवाऱ्यांत उपासमार होऊन सर्व फौजेचा संहार झाला. एक लाखापैकीं फक्त दहा असामी मात्र ह्या अनर्थाची बातमी सांगण्यास परत आले. नंतर दुसरी एक मोठी फौज तुर्कस्तान व इराण हे देश जिंकण्याकरितां त्यानें तयार केली. तीस एक वर्षपर्यंत रिकामी बसवून पगार द्यावा लागला. इतक्यांत तिजोरी रिकामी झाल्यामुळें त्या फौजेस रजा द्यावी लागली. तींतील लोक मोकळे झाल्यावर सर्व देश उद्ध्वस्त करीत फिरूं लागले. देशभर दरवडेखोरांनीं आकांत करून सोडिला.

४. बंड व मृत्यु, (स.१३५१).—महंमद तुघ्लखाचे हातून कोणत्याही कामाची तड लागली नाहीं. जसजशा ज्यास्त अडचणी येत चालल्या, तसतसा त्याचा स्वभाव क्रूर बनला. कर्शास्प नामक त्याच्या पुतण्यानें बंड केलें, तेव्हां त्यास पकडून सुलतानानें दिल्लीस नेलें. तेथें जिवंत सोलून व नानाप्रकारचे हालहाल करून त्यानें त्याचा जीव घेतला, (स. १३३८). पारधीकरितां राखून ठेविलेल्या रानांत कोणीं हुकुमाशिवाय शिकार केल्यास, तो त्यास भयंकर शिक्षा करी. शिवाय मनुष्याची पारध करण्याची त्यानें अशी एक दुष्ट युक्ति काढिली होती, कीं तिच्यासारखें मानवी क्रौर्याचें उदाहरण इतिहासांत सांपडणें कठीण आहे. तो एखाद्या मोठ्या प्रदेशाला सैन्याचा वेढा घाली. नंतर तो घेरा संकोचित करीत जाऊन आंत जे कोणी सांपडतील, त्यांची रानांतील श्वापदांप्रमाणें शिकार व कत्तल करी. त्यांत बहुधा निरुपद्रवी शेतकरी

लोक सांपडत. अशी मनुष्यांची शिकार त्यानें अनेक वेळां केली. एके प्रसंगीं तर कनोज शहरांतील सर्व मनुष्यांची त्यानें कत्तल उडविली. तेव्हां देशांत दुष्काळ पडून लोक भिकेस लागले.

जमाबंदीची व्यवस्था देशांत सुरू करणारा हाच पहिला मुसलमान शहा होय. गंगा व यमुना यांजमधील प्रदेशांत त्यानें जमिनीचा सारा दसपट व कांहीं ठिकाणीं तर वीसपटही वाढविला. त्याचे कामगार वसूल करावयास गेले असतां, सर्व लोक गांवें सोडून पळून जात व दरवडे घालीत. येणेंकरून शेतीच्या जमिनींत जंगलें वाढलीं. दहशत बसविण्याकरितां हजारों लोक मारून त्यांचीं शिरें त्यानें दिल्लीच्या तटावर रोंविलीं. ह्या सर्व कृत्यांचा परिणाम असा झाला, कीं जिकडे तिकडे झोटिंगशाही माजली. बंगाल, मलबार व दक्षिण ह्या प्रांतांत निरनिराळ्या लोकांनीं उचल खाऊन स्वातंत्र्याचा झेंडा उभारिला. सुलतान दिवसेंदिवस ज्यास्तच चवताळत चालला. स्वत:च्याच प्रजेशीं तो लढूं लागला, आणि तलवार व अग्नि ह्यांचा त्यांजवर त्यानें भडिमार चालू केला. तेव्हां लोक शेतांभातांस आग लावून, गुरें रानोमाळ सोडून, वाट फुटेल तिकडे पळूं लागले. नेहेमींच्या उदरंभरणाच्या जिनसांवर त्यानें असे जबरदस्त कर बसविले, कीं आपल्या श्रमाचें फळ मिळण्याची आशा नाहींशी होऊन, लोकांनीं आपलीं कामें सोडून दिलीं. अर्थात् कोणांतही त्राण राहिलें नाहीं.

सरते शेवटीं दक्षिणेंतील बंड विकोपास गेलें. मुसलमानांस कायमचें हांकून देण्यास ही संधि बरी आहे, असें पाहून मोठमोठ्या हिंदु राजांनीं कट केला. होयसळराजा बल्लाळदेव, वरंगूळच्या रुद्रदेवाचा पराक्रमी मुलगा कृष्णनाईक व अनागोंदीचा बुक्कराय वगैरे झाडून साऱ्या लहान मोठ्या राजांनीं हिंदूंचा मोठा कट केला; आणि ते मुसलमानांस मागें हटवीत इतके पुढें आले, कीं दौलताबादेशिवाय दुसरें एकही स्थळ दिल्लीच्या सुलतानाकडे राहिलें नाहीं. ह्याच धामधुमींत कलबुर्गा येथें बहामनी राज्याची व विजयनगर येथें हिंदु राज्याची स्थापना झाली, त्यांच्या हकीगती पुढें येतील. शेवटीं महंमद तुघलख स्वत: सेनापत्य स्वीकारून दक्षिणेंत आला. दौलताबादचा बंदोबस्त करितो आहे, इतक्यांत गुजराथेंत बंड उठल्याची वार्ता त्यास कळली, तेव्हां तो गुजराथेंत गेला. तेथें असतां सिंधचे बंडखोर राजाची खोड मोडण्यासाठीं त्यानें सिंधुनदींत ठठ्ठा

येथें पुष्कळ होड्या जमविल्या. तेथें त्यास ज्वर येऊं लागला, आणि चांगला बरा होण्यापूर्वीच उतावळ करून पुनरपि बाहेर पडल्यामुळें दुखणें उलटून, हा विक्षिप्त सुलतान, सत्तावीस वर्षें राज्योपभोग घेऊन, ठठ्ठा येथें स्वर्गवासी झाला.

ह्या कारकिर्दीत पुष्कळ मोगल लोक मुसलमानी धर्म स्वीकारून हिंदुस्थानांत येऊन राहिले. तसेंच हिंदुस्थानच्या निरनिराळ्या प्रांतांतील अंमलदार स्वतंत्रतेनें कारभार पाहूं लागले. बंगाल व कर्नाटक हे प्रांत तर मुसलमानांच्या हातांतून गेले. अफगाण व गकर लोकांनीं वायव्येकडच्या सरहद्दीवरील प्रांत बळकाविले. महाराष्ट्रांत सुलतानाचा जांवई इमाद-उल्मुल्क यास हसन गंगूनें ठार मारून बहामनी नांवाचें स्वतंत्र राज्य स्थापिलें. येणेंप्रमाणें स्वतंत्र झालेल्या राज्यांचे इतिहास पुढें निराळ्या प्रकरणांत देण्यांत येतील.

५. महंमदाची योग्यता.—महंमदाचे वेळेस दक्षिणदेशाचा वसूल १,१६,६०,००० रुपये होता. ह्याचे कारकिर्दीचे आरंभीं राज्यविस्तार होता, तेवढा येथें ह्यापूर्वी कोणत्याही मुसलमान सुलतानाचे ताब्यांत नव्हता. उद्योगानें व विद्येनें नरदेहास शोभा आणून दुष्कृत्यांनीं त्यास डाग लाविल्याची त्याची सुकीर्ति व दुष्कीर्ति महंमदाचे पाठीमागें राहिली आहे. दौलताबादचा प्रचंड किल्ला ह्या सुलतानानें बांधिला. त्याचा तट तिहेरी असून तो १८० फूट उंचीचा गुळगुळीत असा दगडांत कापून काढिलेला आहे. सभोंवार तिहेरी खोल खंदक असून किल्ल्यांत जाण्याचा रस्ता फार वांकडा तिकडा आहे. हें प्रचंड कृत्य पाहिलें म्हणजे सुलतानाच्या अकलेची तारीफ केल्यावांचून राहवत नाहीं.

महंमदाच्या कल्पना अचाट असत हें वर सांगितलेंच आहे. तीव्र बुद्धि, जबरदस्त स्मरणशक्ति व कधीं हार न खाणारी इच्छा ह्या गुणांमुळेंच त्याचा अखेरीस बोजवारा झाला. राजधानी बदलणें व नवीन नाणें सुरू करणें ह्या दोनही कल्पना चांगल्या होत्या, पण त्या घाईनें व आग्रहानें तडीस जाणाऱ्या नव्हत्या. लोकांस चालू असलेली पद्धत आवडते; त्यांत बदल झाला, कीं त्यांचीं मनें चलबिचल होतात. तेव्हां राज्यकारभारांतील कोणत्याही नवीन सुधारणा हळूहळूच तडीस जावयाच्या.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

त्या लोकांस एकदम पसंत पडल्या नाहींत, तर त्याजबद्दल त्यांस जबरदस्त शिक्षा करण्याचें प्रयोजन नव्हतें. पण महंमदास वाटे, जी गोष्ट चांगली आहे, ती एकदम अंमलांत आली पाहिजे. त्यांत विलंब लागल्यास तो लगेच चवताळून जाई. सारांश, व्यवहारशून्यतेमुळें तो शेवटीं फसला. बंडें मोडण्यासाठीं त्यास कडकपणा धारण करावा लागला, तेव्हां लोकांचें बरें करीत असतांही, ते त्याचा द्वेष करूं लागले; आणि सव्वीस वर्षें राज्य करून शेवटीं परिणाम काय, तर राज्याचे तुकडे झाले; लोकांत सर्वत्र बंडें सुरू झालीं, आणि सरकार व लोक सर्वथैव निर्धन बनले.

महंमद तुघ्लख आपल्या कामांत सहसा कोणाची सल्ला घेत नसे. एके दिवशीं इतिहासकार बराणीस त्यानें भेटीस बोलाविलें. 'माझ्या राज्यास कीड लागलेली दिसते, त्यास उपाय काय करावा, सांगा! वैद्य औषध देऊन एक रोग बरा करितो, तों दुखणें दुसरीकडेच उमटतें. तशी माझ्या राज्याची स्थिति झाली आहे.' बराणी म्हणाला, 'अशा स्थितींत तुम्ही राज्य सोडा, अगर चार शहाण्या माणसांकडे सर्व कारभार सोंपवून तुम्ही बाजूस रहा'. ही कल्पना सुलतानास पटली पण रुचली नाहीं. तो म्हणाला, 'हल्लीं लोक मजवर चिडले आहेत, आणि मलाहि त्यांचा राग आला आहे. मी त्यांच्या बऱ्याकरितां झटतों हें ते ओळखतात, आणि मलाहि त्यांच्या दुर्दशेची दया आल्याशिवाय राहत नाहीं. पण माझा कोणताच उपाय सिद्धीस जात नाहीं. माझा उपाय तलवार. पण तलवारीनें काम भागत नाहीं.' अशा प्रकारें नाना तऱ्हेचे विचार सुलतानाच्या डोक्यांत घोळत खरे, पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. वास्तविक त्याची चूक अशी झाली, कीं कोणताही बरा वाईट प्रकार दृष्टीस पडल्याबरोबर लगेच उतावळीनें त्याचा उपाय केल्यास, तो तडीस जात नाहीं. तो प्रकार कांहीं दिवस तसाच चालूं द्यावा. त्याबद्दल एकदम संतापून अगर उतावळेपणा करून राज्यकारभार कधीं चालावयाचा नाहीं. इब्न भतूतानें सुलतानाच्या स्वभावाचें वर्णन येणेंप्रमाणें केलें आहे. 'लोकांवर उपकार करणें व त्यांस तलवारीच्या धारेखालीं धरणें ह्या दोनही गोष्टी एकदम करणारा मनुष्य सुलतानाशिवाय दुसरा कोणी सांपडणार नाहीं. सुलतानाच्या हातून द्रव्य मिळवून दुःख निवारण झालेला भिकारी, आणि त्याच्याच हातून शिक्षा झालेल्या इसमाचें प्रेत, अशांची

जोडी त्याच्या वाड्याच्या दारांत सदैव दिसून येत असे ! त्याच्या औदार्याच्या व क्रूरतेच्या दोनही गोष्टी लोकांस चांगल्या अवगत आहेत. न्याय व खरेपणा ह्यांत सुलतानाचा हात धरणारा कोणी सांपडणार नाहीं. तो अत्यंत धर्मनिष्ठ आहे. परंतु सर्वांत त्याचा मोठा गुण म्हणजे परोपकार होय.' ह्या त्याच्या परोपकारानेंच त्याच्या सर्व अडचणी उत्पन्न झाल्या. पैसा पुष्कळ असला तरी उधळेपणाला तो कितीसा पुरणार! त्याचा दरबारचा खर्चही अतोनात होता. विशेषतः परकी लोकांवर त्याची बहाल मर्जी असे. भतूतावर त्यानें अतोनात उपकार केले. दिल्लीस कोणीही परदेशांतला इसम आला, कीं त्याची संभावना सुलतानाकडून चांगली होत असे. अनेकांस तो जहागिरी व उत्पन्नें तोडून देई; कित्येकांचा खर्च सरकारांतून चालवी. सर्व प्रकारच्या विद्वानांस त्याचा नेहमीं मोठा आश्रय असे. त्याच्याकडे येऊन कोणी विन्मुख गेला असें होत नसे. त्याच्या बापानें पुष्कळ संपत्ति मिळवून ठेविली होती, ती सर्व वरप्रमाणें लोकांस वांटण्यांत आणि इराण व चीन देश जिंकण्यांत त्यानें खर्चून टाकिली. त्यामुळेंच तो पैशाच्या पेंचांत आला. लोक वसूल बरोबर देत नाहींत, असें वाटून त्यानें हिंदु शेतकऱ्यांवर शस्त्र धरिलें, आणि फौजेच्या गराड्यांत त्यांस कोंडून हिंस्र पशूंमारखी त्यांची शिकार चालविली. अशा रीतीनें दुआब, कनोज इत्यादि समृद्ध प्रांत ओस झाले.

उनावळेपणानें अशीं क्रूर कृत्यें सुलतान करी, तथापि एकदां आपली चूक झाली असें कळल्यावर, ती दुरुस्त करण्यास तो विलंब करीत नसे. दिल्ली शहरच्या लोकांची दक्षिणेंत झालेली दुर्दशा पाहून, त्यांचें दुःख परिहार करण्याचे त्यानें अनेक प्रयत्न केले. त्यानें लोकांवरचे कर कमी केले; सहा महिनेपर्यंत दिल्लींतील लोकांस फुकट शिधा वांटला; आणि शेतकऱ्यांस कर्जाऊ रकमा देण्याची व्यवस्था केली.

नवीन फेरफारांनीं लोकांत असंतोष पसरून जीं बंडें सुरू झालीं, त्यांस दुसरीं अंतस्थ कारणेंही बरींच होतीं. पूर्वीं खिलजीच्या वेळचे प्रांतिक कामगार अस्सल तुर्क होते. ते आपल्या धन्याबरोबर इकडे येऊन स्थायिक झाले होते. पण तुघ्लख हे अस्सल तुर्क नव्हते, म्हणून त्यांजबद्दल तुर्क सरदारांस आदर वाटत नव्हता. तसेंच तुघ्लखांनीं पूर्वींचे तुर्क अंमलदार कारभारावरून काढून टाकिले; आणि त्यांच्या जागीं अफगाण, मोगल

वगैरे अनेक परदेशी लोक केवळ पैशाच्या लालचीनें इकडे आलेले होते, त्यास निरनिराळ्या प्रांतांतील कारभारावर [illegible]. त्यांची दृष्टि केवळ स्वतःच्या तुंबड्या भरण्याकडे असून, मुख्य राज्याविषयीं त्यांस बिलकूल अभिमान नव्हता. ह्या नवीन लोकांस 'परदेशी अमीर' असें टोपणनांव मिळालें होतें. आरंभींच्या मुसलमानांचा [illegible] हळू हळू थंडावत चालला होता.

राज्यरोहणाच्या वेळीं महंमद तुघ्लखाच्या टंकसाळी उत्तरेस दिल्ली, आग्रा, व तिर्हूत, दक्षिणेस दौलताबाद, वरंगूळ (नवीन नांव सुलतानपूर), बंगाल्यांत लखनौती, सातगांव, सोनारगांव, इत्यादि दूरदूरच्या ठिकाणीं पसरलेल्या होत्या. त्याच्या राज्याचे तेवीस सुभे होते. सगळ्या मुसलमानी अमलांत, त्याच्याइतका राज्यविस्तार फक्त औरंगजेबाचा होता. परंतु महंमद तुघ्लखाच्या हयातींतच राज्यास ओहोट लागली. निरनिराळ्या ठिकाणीं बंडें होऊन एकामागून एक परगणे स्वतंत्र होऊं लागले.

सुलतानानें आपलें राज्य राखण्यासाठीं नाहीं नाहीं ते उपाय करून पाहिले. कैरोच्या खलीफाकडून आपल्याला नवीन वस्त्रें आणविलीं; आणि त्याजकडून सुलतान हें पद मिळवून तें प्रांतोप्रांतीं जाहीर केलें, (सन १३४३). बगदादच्या खलीफाचा एक वंशज रानोमाळ भटकत होता, त्यास मोठ्या इतमामानें दिल्लीस आणून त्याचा सत्कार करण्यांत अतोनात खर्च केला, आणि त्याचा पवित्र पाय आपल्या शिरावर धारण केला. कोणीकडून तरी मुसलमानांत पुनरपि जागृति होऊन त्यांनीं आपणांस साह्य करावें अशी सुलतानाची खटपट होती. पण ह्या युक्त्यांनीं लोकांच्या मनांत राजनिष्ठेचा लवलेश उत्पन्न झाला नाहीं. चलचित्त सुलतानावर कोणाचाच भरंवसा बसला नाहीं. अशा संकटांनीं, अडचणींनीं, व दुःखानें गांजून जाऊन, आणि क्रोधानें व निराशेनें वेड लागल्यासारखा होऊन, ह्या सुसंस्कृत सुलतानाचा असा शोकपर्यवसायी शेवट झाला.

वरील हकीकतींत लोकांना बक्षिसें देणें, त्यांची मनधरणी करणें इत्यादि उल्लेख आले आहेत, ते बहुधा मुसलमानांविषयींचे असून, हिंदूंच्या वांट्यास शिक्षांचा व क्रूरपणाचाच भाग बहुशः आलेला होता, हें ध्यानांत ठेवण्याजोगें आहे.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

राज्यांत बंडें झालीं; जिकडे तिकडे धामधूम चालू होती; निरनिराळे प्रांत स्वतंत्र होत होते; अशा स्थितींत हिंदु राजांनीं स्वतंत्र होण्याचा प्रयत्न केल्याचें दिसत नाहीं. नाहीं म्हणण्यास विजयनगरचा मात्र एक प्रयत्न झाला. लहान लहान मुसलमान सरदार जर स्वतंत्र होऊं शकले, तर मूळपासूनच ज्यांचा जम बसलेला होता, अशा हिंदु राजांस स्वतंत्र होण्यास फारसा प्रयास पडला नसता. ह्या वेळच्या स्थितीची हिंदूंच्या तर्फेची हकीकत उपलब्ध नसल्यामुळें, वरील मजेदार प्रश्नाची चर्चा करितां येत नाहीं. ह्या वेळची सर्व माहिती मुसलमानी ग्रंथांतच कायती आहे.

६. **फिरोज तुघ्लख व त्याचा वजीर.**—महंमद तुघ्लख मरण पावल्यावर हिंदुस्थानास कांहीं दिवस शांतता प्राप्त झाली. एखादा आजार येऊन गेल्यावर त्यांतून मनुष्य हळूहळू बरा होऊं लागतो, अथवा वादळ निघून गेल्यावर जिकडे तिकडे शांतता होते, तशांतला प्रकार राज्यांत झाला. लोकक्षोभाचें मूळ नाहींसें होऊन त्यांच्या वाटेस कोणी गेलें नाहीं म्हणजे ते शांत असतात, ही गोष्ट निदर्शनास आली. मरणसमयीं महंमदानें आपला चुलतभाऊ फिरोज यास आपल्या पाठीमागें तख्तावर बसविण्याचें ठरविलें होतें. त्याअन्वयें थोडी गडबड होऊन फिरोज तुघ्लख तख्तनशीन झाला. फिरोजनें सदतीस वर्षें राज्य केलें. ह्या अवधींत एकही बंड झालें नाहीं. राज्यावर आला, तेव्हां फिरोजचें वय ४९ वर्षांचें होतें. त्याची आई ही दीपलपूरच्या रजपूत राजाची कन्या. दीपलपूरच्या राजा मलभट्टी यानें आपली मुलगी फिरोजच्या बापास दिली नाहीं, म्हणून त्यानें दीपलपूरवर स्वारी करून राज्यांत धुमाकूळ आरंभिला. तेव्हां आपल्या लोकांचा जाच बंद करण्याकरितां तिनें आपखुशीनें तुर्क सरदाराशीं लग्न लाविलें. तिचा मुलगा फिरोज. प्रथम ग्यासुद्दीननें त्यास लहानाचा मोठा केलें, आणि पुढें महंमद तुघ्लखनेंही त्यास चांगलें शिक्षण दिलें. त्यानें महंमदाच्या चुका प्रत्यक्ष पाहिलेल्या असल्यामुळें, त्यांचें इंगित ध्यानांत ठेवून तदनुसार आपली राज्यपद्धति ठरविली.

बंगालप्रांत स्वतंत्र झाला होता, त्यावर फिरोजनें लढाईच्या निमित्तानें दोन स्वाऱ्या केल्या, एक स. १३५३ त व दुसरी स. १३५९ त. पहिलींत अठरा हजार बंगाली मारले गेले. पण पर्जन्यामुळें त्यास परतावें लागलें. पुढें ज्यास्त मुलूख जिंकण्याचे नादास लागणें श्रेयस्कर नाहीं, असें फिरोज-

शहास वाढून, त्यानें बंगाल प्रांत परत मिळविण्याचा यत्न सोडून दिला, आणि दक्षिणच्या सुलतानाचें स्वातंत्र्य त्यानें कबूल केलें, (स. १३५४). दक्षिणचे सुलतान कांहीं दिवस दिल्लीच्या सुलतानास खंडणी देत असत. त्याच वर्षी फिरोजशहानें दिल्लीनजीक एक नवीन शहर स्थापून त्यास स्वतःच्या नांवावरून फिरोजाबाद असें नांव दिलें. त्यानें शांततेनें राज्य केलें. लढाया करणें त्यास आवडत नसे. देशांतील व कोनाकोपऱ्यांतील दूरदूरचे प्रांत जिंकण्यांत व्यर्थ श्रम व पैसा खर्च करणें हें आपलें कर्तव्य आहे असें फिरोज समजत नसे. राज्य लहान कां होईना, पण त्याची व्यवस्था उत्कृष्ट ठेवणें ह्यांतच तो भूषण मानी. ह्या त्याच्या शहाणपणामुळें त्यानें मुसलमानी इतिहासांत आपलें नांव चिरस्मरणीय करून ठेविलें आहे.

फिरोजनें बंगाल्यावर स्वाऱ्या करण्याचे दोन तीन प्रयत्न करून पाहिले, पण ते साधले नाहींत. स. १३५९त पुनरपि बंगाल्यावर स्वारी केली, तींत त्याचा हेतु न साधून बंगालच्या राजाशीं त्यानें तह केला. पुढें कांहीं दिवसांनीं त्यानें ठठ्ठावर स्वारी केली. ही स्वारी त्यानें सिंधुनदींतून केली. पांच हजार बोटींतून कांहीं फौज नदींतून खालीं आली आणि कांहीं जमिनीवरून आली. मुसलमानांस अनेक संकटें सहन करावीं लागलीं. शेवटीं सिंधप्रांत जिंकून त्यानें तेथील राजास दिल्लीस आणिलें आणि त्यास इतमामानें वागविलें. ह्या स्वारींत फिरोजचीं अडीच वर्षे खर्च झालीं.

वजीर मक्बुलखान.—फिरोजशहाच्या यशस्वी कारभाराचें बरेंचसें श्रेय त्याचा वजीर मक्बुलखान ह्यास आहे. हा गृहस्थ मूळचा तैलंगणांतल्या एका उच्च कुळांतला हिंदु असून, त्यानें मुसलमानी धर्म स्वीकारिला होता. महंमद तुघ्लखच्या वेळेस त्यानें बरींच वर्षे चांगलें काम केलें असून, फिरोज तर केवळ त्याच्या मुठींत होता. फिरोज म्हणे, 'माझा खान्-इ-जहानच खरा सुलतान आहे.' खानिजहान (जगत्प्रभु) हा प्रत्येक वजिराचा किताब असे. त्याजवर फिरोजची बहाल मर्जी होती. ह्या वजिराच्या प्रत्येक मुलामुलीस दरसाल एक हजारांचें वेतन फिरोजशहानें करून दिलें होतें. वजिराच्या जनानखान्यांत दोन हजार स्त्रिया असून, त्यांत पश्चिमेकडील ग्रीस देशापासून, पूर्वेकडील चीन देशापर्यंतच्या टापूंतील हरएक वर्णाच्या स्त्रिया होत्या. एवढ्यांचा खर्च किती असेल ह्याची कल्पनाच केली पाहिजे. पण एवढ्या मोठ्या वेतनाचा मो-

बदला वजिराच्या नोकरीने सुलतानास पुरेपूर मिळाला. फिरोज जेव्हां बाहेर स्वाऱ्यांत किंवा प्रांतांत फिरत असे, तेव्हां हा वजीर सर्व कारभाराचा बंदोबस्त उत्कृष्ट ठेवी, आणि सुलतानास कोणतीही तसदीफ पडूं देत नसे. ह्यामुळेंच राज्यांत प्रजाहिताचीं वगैरे कामें करण्यास सुलतानास फुरसत मिळाली. फिरोजचा जन्म हिंदु आईपासून, आणि त्याचा वजीर मूळचा हिंदु. ह्या कारणांमुळेंच तुर्क लोकांसारखे क्रूरपणाचे अत्याचार ह्या कार्किर्दीत घडले नाहींत. विशेषतः शेतकरी लोकांची काळजी विशेष घेण्यांत येई. मागील कार्किर्दीतल्या तगाईच्या बाक्या लोकांकडे येणें होत्या, त्या ह्या सुलतानानें माफ करून, कर्जरोख्यांचे सर्व कागद फाडून टाकिले.

७. *जनहिताचीं कामें.*—*फिरोज तुघ्लखनें प्रजेच्या हितासाठीं पुष्कळ* पैसा खर्च करून अनेक कामें केलीं. त्यांची संख्या मुसलमानी इतिहासांत खालीं लिहिल्याप्रमाणे दिलेली आहे:—४० मशीदी, ५० धरणें, ३० पाठशाला, १०० धर्मशाळा, २०० शहरें, ५ प्रार्थनामंदिरें, १०० सार्वजनिक स्नानगृहें, २० राजवाडे, १०० रोगचिकित्सागृहें, १० मनोरे, १० मोठाल्या विहिरी, ३० मोठे तलाव, व १५० पूल. ह्यांशिवाय त्यानें अनेक मोठमोठे कालवे बांधिले ; त्यांतून तीन विशेष सुप्रसिद्ध आहेत. यमुनानदींतून एक कालवा त्यानें कर्नूळजवळ फोडून, तो पानिपतच्या समरभूमीच्या बाजूनें बिकानेरच्या वाळवंटांतून थेट हंसी व हिसारपर्यंत नेला, (स. १३५५). हिसार हें नवीन शहर दिल्लीनजीक स्थापून तेथेंच स्वतः सुलतान राहत असे. ह्या कालव्यानें त्याच्या ह्या राहत्या शहरास पाण्याचा पुरवठा झाला. तो कालवा अद्यापि चालू असून इंग्रज सरकारानें दुरुस्त ठेविला आहे. त्याच्या दुसऱ्या कालव्यानें सतलज व घोगरा ह्या नद्या यमुनेशीं जोडल्या गेल्या. तिसरा एक मोठा कालवा त्यानें सरस्वतीनदीपासून कुगरनदीपर्यंत आणिला. त्यांत वर्षानुवर्ष जिवंत पाणी राहून सरहिंद व मनसूरपूर येथील लोकांची मोठी सोय झाली. ह्या कालव्यावर पन्नास हजार मनुष्यें पुष्कळ दिवस काम करीत होतीं. हा कालवा हल्लीं चालू नाहीं. पण त्यासंबंधीं एक गोष्ट लक्षांत ठेवण्याजोगी अशी आहे, कीं हा कालवा खोदीत असतां अवाढव्य आकाराच्या मानवी प्राण्यांचीं हाडें जमिनींत सांपडलीं. त्यांत कांहीं हाडें हत्तीचींही होतीं. त्यांत माणसांचें

हाड तीन गज म्हणजे पांच फूट दोन इंच भरलें, असें लिहिलेलें आहे. हीं माणसें कधींचीं असतील तीं असोत.

फिरोज तुघ्लखाचे पूर्वीं शेतीच्या सुधारणेसाठीं कालवे बांधण्याचें काम उत्तरहिंदुस्थानांत कोणीं केलेलें नव्हतें. तैलंगणांत पूर्वींपासून कालवे असून त्यांचा उपयोग फिरोज यास स्वतः कळून आला होता. त्यावरून त्यानें ती युक्ति उत्तरहिंदुस्थानांत चालू केली. तसेंच पडित जमिनी लागवडींत आणून, राज्याचा वसूल वाढविण्याच्या अनेक तजविजी सुलतानानें केल्या. वरील कालव्यांमुळें पुष्कळ जमिनी दुपिकी झाल्या. फिरोजशहाच्या कामांत नवीन रस्ता बांधल्याचें एकही उदाहरण नाहीं हें आश्चर्य आहे.

फिरोज नेहमीं एके ठिकाणीं राहत नसे. रयतेची दाद घेण्यासाठीं दरवर्षीं तो आपल्या राज्यांत फिरे. अनेक ठिकाणीं नवीन गांवें वसवून त्यानें शेती वाढविली, आणि लोकांवरील नानाप्रकारचे जुलमी कर बंद केले. येणेंकरून लोक धनवान व आबाद झाले. प्रत्येक इसम धान्य व घोडे बाळगून असे; प्रत्येक स्त्रीपाशीं दागदागिना राही; चिरगुट-पांघरूण व सामानसुमान नाहीं असें घर नव्हतें. रयतेच्या सुखासाठीं ज्या अनेक गोष्टी त्यानें केल्या, त्यांचें त्यानें स्वतः लिहून ठेविलेलें थोडेंसें वर्णन येथें देणें अप्रासंगिक होणार नाहीं.

'आजपर्यंत असा प्रघात चालत आला आहे, कीं क्षुल्लक प्रसंगीं मुसलमानांचा रक्तपात करावा, यःकश्चित् अपराधाबद्दल त्यांस छिन्नविछिन्न करून हाल करावे, त्यांचे हातपाय तोडावे, नाककान कापावे, गुन्हेगारांचे डोळे काढून त्यांचीं हाडें चुरावीं, व त्यांस अग्नींत फेंकून, जिवंत सोलून, फांस घालून, तलवारीनें तोडून किंवा सुळावर देऊन मारून टाकावें. ज्या सर्वशक्तिमान परमेश्वरानें मला हा राज्याधिकार दिला, त्यानेंच अत्यंत कृपाळु होऊन असले दुष्ट प्रचार बंद करण्याची मला बुद्धि दिली आहे. तदनुसार वर्तन करण्याचा माझा निर्धार असून आणखी मी असें फर्मावितों, कीं आजपर्यंत ज्या सत्ताधीशांनीं दिल्लीचे अधिपति असतां असलीं निष्ठुर कृत्यें करविलीं, त्यांच्यावरचा ईश्वराचा कोप शमविण्यासाठीं सर्वांनीं आपल्या दैनिक आराधनेंत ईश्वराची प्रार्थना करावी. तसेंच लहान लहान व्यापाऱ्यांपासून ज्या

देणग्या, नजराणे किंवा त्रासदायक व क्षुल्लक कर सरकारचे कामगार घेत असतात, ते त्यांनीं इतःपर घेऊं नयेत. सरकारच्या पडित जमिनीवर गोवारी लोकांपासून घेण्याची गुराचराई; फुलें, मासे वगैरे विकणें, कापूस पिंजारणें, किंवा स्वयंपाक करणें ह्या गोष्टींबद्दल हल्लीं सरकारांत येत असलेला वसूल, दुकानदार व दारूवाले ह्यांजला परवाने घेण्यास लागणारा खर्च, हे सर्व राज्यांत माफ करण्यांत आले आहेत. कारण अशा प्रकारें सरकारचा वसूल करण्यास नेमिलेले अधिकारी आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करून रयतेस जो त्रास देतात, त्यापेक्षां ह्या बाबतींवरील सरकारचा वसूल मुळींच कमी झाला तरी फार चांगला. इतःपर प्रसिद्ध झालेल्या नियमांबाहेर कोणताही नवीन कर रयतेवर बसविला जाऊं नये. युद्धांमध्यें लुटीपासून वगैरे जो ऐवज जमा होतो, त्याचे पांच हिस्से करून चार सरकारांत घेण्याची व एक हिस्सा लष्करास वांटून देण्याची हल्लीं वहिवाट आहे. इतःपर चार हिस्से लष्करास देऊन फक्त एकच हिस्सा सरकारानें घ्यावा. नास्तिक मत धारण करणें, दुर्व्यसनाच्या संस्था चालविणें, लांचरुष्वत स्वीकारणें, आणि सरकारी अधिकाऱ्यांनी आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करणें, या अपराधांबद्दल गुन्हेगारांस हद्दपार केलें जाईल. लोकांनीं माझें अनुकरण करावें म्हणून मीं उंची वस्त्रें, व भारी किंमतीचे दागिने अंगावर घालण्याचें सोडून दिलें आहे. माझ्या पूर्वींच्या सत्ताधीशांनीं धर्मशाळा वगैरे जीं लोकोपयोगी कामें केलीं, त्या सर्वांची डागडुगी करून तसलीं आणखी कामें करण्यांत व चालू ठेवण्यांत पैशाचा व्यय करणें मी आपलें कर्तव्य समजतों. महंमद तुघ्लखाच्या रागाच्या तावडींत जे जे सांपडले, त्यांच्या नातेवाइकांचा तपास करून त्यांस नेमणुका वगैरे करून दिल्या आहेत, आणि विद्वान् व धर्मनिष्ठ माणसांच्या देखत त्यांजकडून त्या सुलतानाच्या अपराधांची माफी लिहून घेऊन, त्या कागदांवर सन्मान्य गृहस्थांच्या सह्या व मोर्तब करून, ते पेटींत बंद करून ती त्या सुलतानाच्या कबरेंत पुरिली आहे. विद्वान् व सन्मान्य गृहस्थांकडून मी नेहमीं सुबोध ऐकत असतों, आणि त्याप्रमाणें चालण्याचा प्रयत्न करितों. लष्करांतील एखादा नोकर जखमा लागून किंवा वयानें नोकरी करण्यास नालायक झाल्यास, त्याचा भरपूर पगार त्यास जन्मभर चालू ठेवण्याचा मीं हुकूम

NATIONAL ARCHIVES OF INDIA

दिला आहे. मजवर दोन प्रसंगीं विषप्रयोग करण्यांत आला, परंतु दोनही वेळां तो प्रयत्न फसला.'

फिरोजनें आपला सर्व वेळ सत्कृत्यें करण्यांत घालविला. पूर्वी पुष्कळ अपराधांस मरणाची शिक्षा ठरविलेली असे. पण मरणाच्या शिक्षेचे अपराध त्यानें फार कमी केले. शेतकऱ्यांचें सरकारदेणें कायमचें ठरवून दिलें, आणि तें जमा करणाऱ्या अधिकाऱ्यांस लोकांस त्रास देण्याची सवलत अगदीं कमी केली. फिरोजची सत्कीर्ति इजिप्टदेशांत कैरो येथें खलिफाकडे पोंचली; आणि खलीफानें सुलतानास एक मानपत्र व पोषाख पाठवून दिला, (सन १३५६).

८ हिंदुधर्मावर वक्रदृष्टि.—*हा सुलतान मुसलमान धर्माचा कट्टा अभिमानी होता. स्वभावाचा चांगला असल्यामुळें त्यानें हिंदु लोकांवर जुलूम केला नाहीं. त्याची हकीकत फक्त एकतर्फी सांपडते. तरी मुसलमानी ग्रंथांवरूनच हिंदु धर्माविषयीं त्याची बुद्धि कशी होती याजविषयीं अटकळ करितां येते.* मूर्ती असलेलीं देवालयें तो नाहींशीं करी. अशा देवालयांत असलेला ग्रंथसंग्रह, पात्रें व मूर्ती ह्यांचा त्यानें विध्वंस केला. ब्राह्मणांशीं तर तो फारच निष्ठुरपणानें वागे. पूर्वीच्या सुलतानांनीं जिझिया कर ब्राह्मणांस माफ केला होता, तो फिरोजनें पुनरपि बसविला. तो असें सांगे, कीं ब्राह्मण हे मूर्तिपूजेच्या खोलीची किल्ली होत. त्यांस जिझिया कर माफ करणें ही चूक आहे. ब्राह्मणांनीं नानातऱ्हेच्या तक्रारी केल्या. त्यांनीं राजवाड्यासमोर उपास काढून व अग्निप्रवेश करून आत्महत्या करण्याचा उद्योग केला. पण सुलतानानें त्यांजकडे कांहींच लक्ष दिलें नाहीं. पुष्कळ ब्राह्मण त्रागा करून मृत्युमुखीं पडले. सरते शेवटीं इतर जातीच्या लोकांनीं ब्राह्मणांबद्दल कर दिला, तेव्हां ते स्वस्थ बसले.

परंतु एका ब्राह्मणाची गोष्ट विशेष चमत्कारिक असून तिजपासून त्या वेळच्या धर्मस्थितीचा बराच बोध होतो, म्हणून ती येथें देणें अवश्य आहे. 'दिल्ली शहरांत एक वृद्ध ब्राह्मण राहत होता. मुसलमानी राज्यांत प्रसिद्धपणें मूर्तींची पूजाअर्चा करण्यास हिंदूंस सक्त मनाई होती. या हुकमाविरुद्ध तो ब्राह्मण आपल्या घरीं सर्व लोकांस बोलावून मूर्तीची पूजा मोठ्या थाटानें करी. ह्या ब्राह्मणाचा देव पुष्कळांस पावत असल्या-

मुळें त्याच्या घरीं पुष्कळ मुसलमान व नानाजातींचे हिंदुलोक दर्शनास येत. एका लांकडी फळीवर रंगीत चित्रें काढून त्यांची तो पूजा करी. कित्येक नेमलेल्या दिवशीं तर त्याचे घरीं सरकारी अंमलदारांच्या नकळत मोठीच यात्रा जमे. असें होतां होतां मुसलमान बायकापुरुषांची ह्या ब्राह्मणावर निस्सीम भक्ति बसली. कांहीं दिवसांनीं सुलतानास बातमी कळली, कीं हा ब्राह्मण मुसलमान बायकामुलांस धर्मभ्रष्ट करीत आहे; आणि अनेक मुसलमान स्वधर्म सोडून ह्या मूर्तिपूजकाच्या नादीं लागले आहेत. असें ऐकून सुलतानानें त्या ब्राह्मणास मूर्तीसुद्धां आपल्यासमोर आणविलें. नंतर त्यानें सर्व उलमा* जमविला. आणि विद्वान् गृहस्थांची सभा जमल्यावर त्यांस त्यानें प्रश्न केला, कीं *'ह्या ब्राह्मणास शिक्षा काय द्यावी?'* सर्वांनीं मिळून जबाब दिला, कीं *'या बाबतींत कायद्याचा आधार स्पष्ट आहे. ह्या ब्राह्मणानें मुसल्मानी धर्म स्वीकारावा. हें त्यानें नाकबूल केल्यास त्यास जिवंत जाळून टाकावें.'* ब्राह्मणास तो हुकूम कळतांच त्यानें मरण पत्करिलें. दरबारच्या समोर एक मोठा लांकडांचा ढीग करून ब्राह्मणाचे हातपाय बांधून त्यास वर ठेविलें, आणि सर्वांच्या वर त्याची ती चित्रयुक्त फळी ठेवून त्यास आग लावून दिली. क्षणार्धांत ज्वालांनीं त्या धर्मनिष्ठ ब्राह्मणाचा स्वाहा केला.

ह्या गोष्टीवरून असें दिसतें, कीं फिरोजशहा परधर्मांचा पक्का द्वेष्टा होता. ह्या त्याच्या जाचामुळें हिंदु प्रजेस तो फारसा प्रिय झाला नसेल. त्याची आई जरी रजपुतांची कन्या होती, तरी मुलावर तिच्या धर्मांचा परिणाम झाल्याचें दिसून येत नाहीं.

९. मृत्यु व योग्यता, (१३८८).—स. १३७१ त वजीर मक्बुलखान मरण पावला, तेव्हां त्याच्या मुलास फिरोजशहानें वजिरी दिली. त्यासही खानिजहान हा किताब मिळाला. पुढें फिरोज वयोवृद्ध व अशक्त झाला, तेव्हां ह्या खानिजहान वजिराचे हवालीं त्यानें बहुतेक राज्यकारभार केला. महंमद म्हणून शहाचा एक आवडता पुत्र होता. त्याचें व या

---

* उलमा म्हणजे मुसलमानी शास्त्र पढलेले गृहस्थ. एखादा धर्माचा प्रश्न आला असतां सर्व उलमांस एकत्र जमवून, त्याचा निकाल करण्याची वहिवाट मुसलमानी अमलांत चालू होती.

वजिराचें वांकडें असल्यामुळें वजिरानें सुलतानाच्या मनांत असें भरविलें, कीं 'हा मुलगा तुमचा प्राण घेण्यास टपला आहे.' महंमदास हा सुगावा लागतांच त्यानें युक्तीनें बापाची गांठ घेऊन त्याची संशयनिवृत्ति केली. त्यावर फिरोजनें आपल्या वजिरास त्या पुत्राचे ताब्यांत दिलें, आणि सर्व कारभारही त्या पुत्रावरच सोंपविला. महंमदानें स. १३८७ त वजिरास ठार मारिलें. पण महंमद विषयी होता. त्याच्यानें राज्याची जोखीम निभेना. राज्यांत बंडें होऊन राजधानीच्या शहरीं ह्या राजपुत्राच्या सैन्याची व त्याचे प्रतिपक्षी दोन भाचे होते त्यांची लढाई जुंपली. तेव्हां वृद्ध बादशहानें येऊन ती आग विझविली, आणि स्वतःचे हातीं पुनरपि राज्यकारभार घेतला. महंमदास लोकांनीं दिल्लींतून घालवून दिलें होतें. तेव्हां आपल्यामागें आपला दुसरा पुत्र फत्तेखान ह्याचा मुलगा ग्यासुद्दीन यास राज्याचा वारस नेमून, हा नव्वद वर्षांचा वृद्ध सुलतान फिरोजशहा सन १३८८त मरण पावला.

फिरोजच्या कार्कीर्दीचे वृत्तांत पुष्कळांनीं लिहिलेले असून कित्येकांचे इंग्रजींत तरजुमेही झालेले आहेत. त्यांत आफीफ नांवाचा एक ग्रंथकार म्हणतो, 'रयत सुखी झाली. तिजपाशीं पैसा सांचला. त्यांच्या घरांत धान्य, सामान, घोडे वगैरे वस्तूंची समृद्धि झाली. घरांत सोन्याचांदीचा संचय झाला. प्रत्येक बाईच्या अंगावर दागदागिने दिसूं लागले. पलंग वगैरे सामानानें घरें सुशोभित झालीं.'

निरनिराळ्या तऱ्हेच्या बांधकामाचा सुलतानास मोठा शोक होता. नवीन शहरें स्थापन करून त्यांस टुमदार नांवें देण्याची त्यास मोठी हौस वाटे. राज्य मिळाल्यावर प्रथमच दिल्लीस जात असतां रस्त्यांत त्यास एक मुलगा झाला. त्याचें नांव त्यानें फत्तेखान ठेविलें, आणि त्याचा जन्म झाला त्या ठिकाणीं नवीन शहर स्थापन करून त्याचें नांव फत्याबाद ठेविलें. अशीं आणखी पुष्कळ नांवें निरनिराळ्या प्रांतांतील शहरांस दिलीं. बंगल्यांतून परत येत असतां त्यानें अयोध्याप्रांतांत नवीन शहर स्थापून त्यास महंमद तुघ्लखाच्या पहिल्या 'जोना' ह्या लाडक्या नांवावरून जोनपूर असें नांव दिलें. हें शहर पुढें फार प्रसिद्धीस आलें. दिल्लीनजीकच यमुनेच्या कांठीं फिरोजाबाद नांवाचें नवीन शहर स्थापून तेथेंच सुलतान बहुतेक सर्व वेळ राहत असे. अशोकाचे दोन स्तंभ

त्यानें ह्या ठिकाणीं आणून ठेविले. अब्दुल हक्क व मलीक गाझी सहाना नांवाचे दोन उत्कृष्ट कारागीर त्याजपाशीं होते. त्यांच्या देखरेखीखालीं त्याचीं हीं सर्व कामें चालत.

देवस्थानांच्या खर्चास व विद्वानांच्या बिदागीसाठीं फिरोजशहानें सालाची छत्तीस लाख रुपयांची नेमणूक ठरविली होती; तसेंच सालिना एक कोट रुपये गरीब लोकांच्या निर्वाहासाठीं खर्च होत असत. सुलतानास बागबगीच्यांचा शोक फार होता. दिल्लींत व इतर ठिकाणीं त्यानें एकंदर बाराशें बाग तयार केले. ह्या बागांपासून दरसाल एक लाखाचें उत्पन्न खजिन्यांत येत असे. एकंदरीनें आपल्या नवीन व्यवस्थेनें त्यानें सव्वाकोट रुपयांचें उत्पन्न वाढविलें. त्याच्या राज्याचा एकंदर वसूल दहा कोटि होता, म्हणजे अकबराच्या वसुलाचा एकतृतीयांश होय.

सरकारी नोकरांस स्वतंत्र पगार न ठरवितां त्यांस महालानिहाय उत्पन्नें तोडून दिलेलीं होतीं. ही व्यवस्था मोडून टाकण्याचा अला-उद्दीननें प्रथम प्रयत्न केला. पण फिरोजशहानें तो पुढें चालविला नाहीं, म्हणूनच त्याच्या पश्चात् राज्याचे तुकडे झाले, असें अनेक लेखकांचें मत आहे.

फिरोजशहाचा दरबार मोठ्या थाटाचा व व्यवस्थित असे. त्यास मद्यप्राशनाचा नाद बराच होता. हा नाद सोडून देण्याबद्दल पुष्कळांनीं त्यास सांगितलें. पण वजिरावर सर्व कारभार सोंपविलेला असल्यामुळें, शिकार व मद्यप्राशन ह्या गोष्टी करण्यास त्यास अवकाश सांपडे.

लोकांची भक्ति फिरोजशहावर अतोनात होती. ते त्यास बापाप्रमाणें भजत. गरिबांस तर तो आपला अन्नदाताच वाटे. गरीब मुसलमानांच्या लग्नास तो पैसे देई, आणि रोग्यांच्या औषधपाण्याची चांगली तजवीज ठेवी. हिंदुधर्माविषयीं त्याच्या मनांत द्वेष असल्यामुळें, त्यांची मूर्तिपूजा मात्र तो बिलकुल चालूं देत नसे. त्याची वागणूक सर्वथैव मुसलमानी धर्मास अनुसरून होती. कुराणाचा आधार पाहिल्याशिवाय तो कांहीं एक काम हातीं घेत नसे. त्यानें स्वतः आपल्या कारभाराची थोडीशी हक़ीकत लिहून ठेविली आहे, तिजवरून त्याचें राज्यकारभाराचें धोरण चांगलें व्यक्त होतें.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

लोकसंग्रहाची योजना.—भरंवशाचे व राज्याचें हित पाहणारे लोक आपल्या संग्रहीं जमविण्याची एक चमत्कारिक योजना फिरोजशहानें केली, ती ध्यानांत ठेवण्याजोगी आहे. राज्यांतील मोठमोठे प्रांतिक कामदार वेळोवेळीं सुलतानाच्या भेटीस येत, तेव्हां सुलतानाकरितां नानाप्रकारचे नजराणे ते बरोबर आणीत. घोडे, हत्ती, उंट, खेचरें, हत्यारें, सोन्याचांदीचीं भांडीं वगैरे जिन्नस ते आपल्याबरोबर आणीत; त्यांतच प्रत्येकजण दहापासून शंभरपर्यंत चांगले देखणे व धष्टपुष्ट गुलाम सुलतानाकरितां आणीत. हे गुलाम आणिल्याबद्दल त्या कामदारांस त्यांच्या वसुलाच्या रकमेंत कांहीं रक्कम सुलतानाकडून माफ होत असे. जो असले गुलाम पुष्कळ आणी, त्याचा बोज चांगला राहत असे. ह्या गुलामांस निरनिराळ्या प्रकारचें शिक्षण देत; आणि सरकारवाड्यांत, फौजेंत व इतर जोखमेच्या ठिकाणीं त्यांच्या नेमणुका करीत. सरकारवाड्यांतील खास पहाऱ्यावर चाळीस हजार लोक व दिल्ली येथें बारा हजार कारागीर ह्या गुलामांतून तयार झालेले होते. फिरोजशहाजवळ अशा प्रकारचे एकंदर एक लक्ष ऐशीं हजार गुलाम होते. त्यांच्या व्यवस्थेचें एक स्वतंत्र खातेंच होतें. सुलतानाची स्वारी बाहेर निघाली, म्हणजे त्याजबरोबर शस्त्रें धारण करणाऱ्या हजारों गुलामांचा तांडा असे. ते तुर्कस्तानांतील जानिझरीसारखे एक प्रकारचे खास बॉडीगार्ड्सच होते.

प्रकरण दहावें.

तयमूरलंगाची स्वारी.

स. १३९८.

१. फिरोजशहानंतरच्या धामधुमी. २. तयमूरचा पूर्ववृत्तांत, (स. १३३५.)
३. तयमूरची दिल्लीवर स्वारी. ४. तयमूरची अवतारसमाप्ति व योग्यता.
५. सय्यद घराणें, (१४१६–१४५०) ६. लोदी घराणें, (१४५०–१५२६.)
७. लोदी घराण्याची समाप्ति, (स. १५२६.)

१. फिरोजशहानंतरच्या धामधुमी.—फिरोजशहाच्या पुष्कळ दिवसांच्या कार्किर्दीत लोकांना सुख व शांतता झाली खरी, पण त्यामुळें

सुलतानाच्या अंमलाचा जोर कायम राहिला नाहीं. फिरोजवर लोकांचें प्रेम होतें, पण त्याजबद्दल लोकांस भीति वाटत नव्हती. बल्बन, अल्लाउद्दीन, महंमद तुघ्लख ह्यांच्यासारख्या कठोर सुलतानांचा दरारा ओळखणारे लोक नाहींसे झाले. नवीन पिढीस त्यांची ओळख राहिली नाहीं. फिरोजच्या पश्चात् तशीच शांतता राज्यांत राहील असा नेम नव्हता. उलट पक्षीं, सुलतानाच्या पश्चात् लवकरच दंगेधोपे सुरू होणार अशीं चिन्हें दिसत होतीं.

सुलतानाच्या खास तैनातीस गुलाम ठेवण्याची योजना वर सांगितली आहे. त्या योजनेचे परिणाम चांगले झाले नाहींत. त्यांतले बहुतेक गुलाम मूळचे हिंदु असून बाटून मुसलमान झालेले होते. फिरोजशहाशीं ते इमानानें वागले, तसे पुढील सुलतानांशीं वागण्यास त्यांस कारण नव्हतें. *फिरोजच्या कारकिर्दींत हिंदूंच्या मानेवरचें जूं ढिलें झाल्यामुळें, ते लोक फिरून वर डोकें काढूं लागले होते; त्यांस ह्या गुलामांची थोडीबहुत मदत झाली.* राजघराण्यांतील व सरदार मंडळी हिंदु स्त्रियांशीं लग्नें करीत, पण त्यामुळें हिंदुमुसलमानांची एकी अशी कधींच झाली नाहीं. हिंदु रयत व राजेरजवाडे मुसलमानांस इलाज नाहीं म्हणून करभार देत, आणि संधि सांपडतांच स्वतंत्र होण्याचा प्रयत्न करीत. फिरोजशहाच्या मृत्यूनंतर हिंदूंच्या पुढाऱ्यांनीं उचल खाली; त्यांस बाटलेल्या गुलामांनीं मदत केली. तेव्हां एकीकडे प्रांतिक कामदार स्वतंत्र होत असतां, इकडे आंतून हिंदु लोकही वर डोकें उचलूं लागले. अशा दुहेरी पेंचांत तुघ्लखांचें राज्य सांपडलें.

ग्यासुद्दीन सुलतानानें सारें पांच महिने राज्य केलें. त्याचा भाऊ व चुलतभाऊ यांनीं त्यास ठार मारिलें. पुढें अबूबक्र म्हणून दुसरा एक फिरोजशहाचा नातू होता, त्यानें तख्त बळकाविलें. परंतु तोही अयोग्य वाटल्यावरून दरबारच्या मंडळींनीं फिरोजचा मुलगा महंमद दिल्ली सोडून गेला होता, त्यास परत बोलावून राज्यावर बसविलें. महंमदशहानें स. १३९० पासून स. १३९४पर्यंत चार वर्षें राज्य केलें. मेवाडी रजपूत लोकांनीं *दिल्लीवर केलेला हल्ला* त्यानें स्वतः मागें हटविला. महंमदशहा स. १३९४त ज्वर येऊन मरण पावला. पुढें त्याचा मुलगा हुमायून, सिकंदर हें भपकेबाज नांव धारण करून तख्तावर बसला. पण तोही एकाएकीं मरण

पावल्यावर, महंमदशहाचा दुसरा मुलगा महंमूद म्हणून होता, त्याच्या हातीं राज्यकारभार आला. एकंदरींत राज्यकारभार चालविण्यास लायक मनुष्य अलीकडे कोणी न मिळाल्यामुळें चोहोंकडे दंगे होऊन, दिल्लीचें राज्य विसकळीत झालें. खाजा जहान म्हणून एक गृहस्थ वजिरीचें काम पाहत असे, त्यानें बंगालप्रांत काबीज करून जोनपूर येथें स्वातंत्र्य धारण केलें. सारंगखान नांवाच्या दुसऱ्या एका सरदारानें गकर लोकांस मागें हटवून लाहोर व पंजाब येथें स्वतंत्र राज्य स्थापिलें. गुजराथ, माळवा व खानदेश ह्या प्रांतांची स्थितिही सदरप्रमाणेंच झाली. प्रत्यक्ष दिल्लींत अनेक पक्षांचे युद्धप्रसंग सतत चालूं लागले. नुसतखान म्हणून फिरोजशहाचा एक नातू महंमूदशहाशीं राज्याकरितां भांडत होता. त्यास महंमूदशहाच्या तर्फेनें इक्बालखान नामक सरदारानें घालवून देऊन, दिल्ली शहरांत थोडेंबहुत स्वास्थ्य केलें. इतक्यांत दिल्लींतील ह्या भानगडी ऐकून मध्य-आशियांतील मोगल लोकांचा प्रबल बादशहा तयमूरलंग आपल्या अगणित फौजेनिशीं दिल्लीवर चालून आला. ह्या तयमूरलंगाच्या हकीकतीकडे प्रस्तुत आपणांस वळलें पाहिजे.

२. **तयमूरचा पूर्ववृत्तान्त.**—तयमूरलंगाची माहिती गिबनच्या पुस्तकांत चांगली दिलेली आहे. त्याचा वृत्तान्त मूळ त्याच्या चिटणिसांनीं लिहिलेला शरीफुद्दीन नांवाच्या गृहस्थास सांपडला. त्यानें तयमूरजवळ काम केलेल्या अनेक लोकांजवळून प्रत्यक्ष माहिती मिळवून, तयमूरचा इतिहास फारशी भाषेंत तयार केला. त्याचें भाषांतर फ्रेंच भाषेंत स. १७२२त झालें. म्हणून हा ग्रंथ चांगला खात्रीलायक आहे. वास्तविक तयमूरनेंच स्वतः आपला हा वृत्तान्त तयार केला. 'राजनीति' नांवाचा दुसरा एक ग्रंथ तयमूरनें रचिलेला आहे, त्यांत नाना देशांतील माहिती गोळा करण्याविषयीं तयमूर किती दक्ष होता हें दिसून येतें. तयमूरचे हे ग्रंथ बाहेर आले, त्यापूर्वी त्याच्या नांवाची सर्व जगभर अतिशय नालस्ती झालेली होती. ज्या राष्ट्रांस त्यानें पादाक्रान्त केलें, त्यांनींच ही त्याची नालस्ती सुरू केली. पण कालांतरानें तयमूरच्या बाजूचा पुरावा गिबनसारख्यांच्या श्रमानें बाहेर आला, आणि तयमूरच्या कर्तबगारीचा खरा अंदाज करण्याची लोकांस सोय झाली.

तयमूरलंग हा जातीनें तुर्क होता, मोगल नव्हता. त्याचा पांचवा पूर्वज, चंगीझखानाच्या मुलगा झगताइखान ह्याजपाशीं मध्य आशियांत वजीर होता. समर्कंदच्या दक्षिणेस चाळीस मैलांवर स. १३३५ ह्या वर्षी तयमूरचा जन्म झाला. त्याचा बाप दहा हजार स्वारांचा मनसबदार असून त्याजकडे काश प्रांताचा कारभार होता. त्या अंदाधुंदीच्या काळांत साहसी व शूर पुरुषांस नांव काढण्यास पुष्कळ जागा होती. लहानपणापासूनच त्याच्या अंगीं तीव्रबुद्धि व जबरदस्त धाडस वास करीत होतें. बाराव्या वर्षापासून त्यानें लढाईची सुरुवात केली. पंचविसाव्या वर्षी मध्यआशियांतील तुर्कस्थानचा तो स्वतंत्र मालक झाला. तेव्हां त्याच्या जातीचे लोक त्यास भजूं लागले, आणि त्याच्याकरितां प्राण देण्यास तयार झाले. पुढें लवकरच त्याजवर संकटें कोसळलीं. त्यांत दहापांच सुद्धां लोक त्याजपाशीं राहिले नाहींत. तो रानावनांत भटकूं लागला. अंधारकोठडीची कैद सुद्धां त्यानें भोगिली. एकदां अमूदर्या नदींतून पोहून जाऊन त्यानें आपला जीव बचाविला. संकटसमयीं धैर्य खचूं न देतां हातीं घेतलेलें काम निश्चयानें तडीस न्यावयाचें, हा त्याच्या अंगचा सर्वांत मोठा गुण होय, आणि ह्या गुणानेंच तो ऐश्वर्यास चढला. लवकरच त्यानें शत्रूंचा पाडाव करून झगताईच्या मोगल वंशाची समाप्ति केली, आणि समर्कंदचें राज्य मिळविलें, (स. १३६९). त्याला चंगीझखानाबद्दल मोठी पूज्यबुद्धि वाटे, आणि चंगीझसारखीच सर्व जग जिंकण्याची त्याला हांव होती. त्यानें एकंदर सत्तावीस मुकुट काबीज केले. त्यांत झगताईचा मुकुट होता. निरनिराळ्या ठिकाणीं त्यानें एकंदर पस्तीस स्वाऱ्या केल्या, आणि पश्चिमेकडे इराण, व आशियामायनरवरून मास्कोपर्यंत, दक्षिणेस हिंदुस्थान व पूर्वेस चीनच्या हद्दीपर्यंतचा प्रदेश त्यानें काबीज केला.

३. हिंदुस्थानावर स्वारी, (स. १३९८).—अफगाणिस्तान जिंकल्याबरोबर हिंदुस्थानच्या संपत्तीची वार्ता तयमूरच्या कानावर गेली. निरनिराळे देश जिंकण्याची त्याची हांव मूळपासूनच अनावर होती. मोगल लोक शेंकडों वर्षे हिंदुस्थान जिंकण्यासाठीं धडपडत होते. तेव्हां तें काम हातीं घेण्याचें मनांत आणून त्यानें आपला बेत मसलतगार मंडळीपुढें ठेविला. तेथें पुष्कळ भवति न भवति झाली. 'आजपर्यंत शेंकडों गृहस्थांनीं हिंदुस्थानावर स्वाऱ्या करून यश मिळविलें, मग

आपणांस त्यांत यश कां येणार नाहीं?' 'पण अनेक नद्या, मोठमोठीं निबिड अरण्यें, त्यांतील अवघड ठिकाणीं किल्ल्यांच्या आश्रयानें आपणास अडविणारे शेंकडों शूर सरदार, आणि त्यांच्या मदतीस हत्यारबंद हत्तींचा तांडा, इतक्यांच्या पुढें आपला निभाव कसा लागणार'! असें विरुद्ध पक्षाचें म्हणणें पडलें. त्यावर तयमूर बोलला,' गझनवी महंमुदाच्या लहानशा फौजेला जर ह्या अडचणी बाधल्या नाहींत, तर आमच्या प्रचंड सेनेपुढें त्यांचें काय चालणार?' तयमूरचे मुलगे बोलले, 'हिंदुस्थानची अपार संपत्ति आपणांस मिळेल, आणखी काय पाहिजे?' धर्माभिमानी लोक म्हणाले, ' एवढ्या मोठ्या देशांत इस्लामाचा प्रसार करण्याची आपणास संधि मिळते, हा काय लहान फायदा!' तथापि उलटपक्षाचा विरोध मिटला नाहीं. ते म्हणाले, ' हिंदुस्थान देश आपण जिंकिला, तरी आपले लोक त्या उष्ण व रोगट हवेंत लवकरच निःसत्त्व बनतील. असा प्रकार थोडाबहुत झालेला आज आपण पाहतोंच.' पण अशा हरकतींना भीक घालणारा तयमूर नव्हता. त्याच्या आत्मचरित्रांत खालील मजकूर आहेः—

"हिंदुस्थानच्या काफर लोकांवर स्वारी करून त्यांस इस्लामी धर्मांत आणावें, त्यांचीं मंदिरें व मूर्ती नाहींशा कराव्या, आणि 'गाजी' हें सन्मान्य नांव मिळवावें, अशी माझी फार इच्छा आहे." झालें. तयमूरची बलवत् इच्छा कोण मोडणार! हिंदुस्थानावर स्वारी करण्याचा बेत नक्की झाला.

तयमूरचा नातू पीरमहंमद जहांगीर काबूलच्या कारभारावर होता, त्यानें स. १३९७ त होड्यांचा पूल करून सिंधुनदी उतरून उच्च शहरास वेढा दिला. मुलतानचा सुभेदार सारंगखान त्याजबरोबर टक्कर देण्यास आला. उभयतांचें युद्ध झाल्यावर सारंगखानाचा मोड होऊन तो मुलतानच्या किल्ल्यांत शिरला. त्या किल्ल्यास पीरमहंमद सहा महिने वेढा घालून बसला. पुढें अन्नसामुग्री संपली. शेवटीं निरुपाय होऊन सारंगखानानें किल्ला पीरमहंमदाचे स्वाधीन केला. पण ह्या संधीस त्याचे घोडे वगैरे पुष्कळ मरून त्यास पुढें जातां येईना.

'हिंदुस्थानांत अंदाधुंदी चालली आहे, आपण प्रयत्न केला तर देश सहज हस्तगत होईल', असें पीरमहंमदानें आजास कळविलें; आणि

आपणांसही मदत मागितली. तेव्हां सन १३९८ च्या मार्च महिन्यांत तयमूर समर्कंद सोडून निघाला, तो बर्फाळ डोंगर ओलांडून अटक-जवळ आला. तेथें सिंधुनदी उतरून अलीकडे आला. चिनाब व रावी ह्यांच्या संगमावरील तुलुंब शहरांत शिरून त्यानें सर्व लोकांस कापून काढिलें. तेथून शहानवाज़ शहरीं जाऊन तेथील धान्य स्वतःस पाहिजे तेवढें घेऊन बाकीचें त्यानें जाळून टाकिलें. पुढें लवकरच आपला नातू संकटांत आहे असें ऐकून तयमूर त्यास जाऊन मिळाला. भाटनीरचा राजा पीरमहंमदाशीं लढत होता. सबब ते दोघे त्या शहरावर आले. त्या ठिकाणीं असंख्य निरपराधी लोकांचे तयमूरनें प्राण घेतले. पुढें चाल करून सुरस्वती, फत्तेबाद, राजपूर वगैरे अनेक ठिकाणीं असेच घोर अनर्थ करून, स. १३९८च्या डिसेंबरांत ही टोळधाड पानिपतावरून दिल्लीकडे येऊं लागली. त्या वेळीं सर्व लोक भयभीत होऊन जंगलांत पळून गेले. पानपतावर मोगलांस कोणीं अडविलें नाहीं. तेव्हां ते तसेच पुढें थेट दिल्लीवर आले. तयमूर थोड्या लोकांनिशीं दिल्लीची तटबंदी पाहण्यास पुढें आला असतां, नामधारी सुल-तान महंमूदशहा व त्याचा वजीर मल्लू इक्बालखान ह्यांनीं त्याचे लोक थोडे पाहून त्याजवर हल्ला केला, त्यांत तयमूरनें धाडसानें बादशहास मागें हटविलें. तयमूरच्या फौजेस दिल्लीच्या हत्तींची भीति अतिशय वाटत होती, त्यांस तयमूरनें चांगला धीर देऊन, कदाचित् पराभव झाला असतां, पुढील सर्व तजवीज नीट लावून ठेविली. बायका, गुरें, सामुग्री व विद्वान् मंडळी ह्यांस फौजेच्या मागें बंदोबस्तानें ठेवून, त्यांच्या सभोंवार मोठमोठी झाडें, व काटेरी झुडपें लावून कुंपणासारखा बंदोबस्त केला. ह्या वेळीं तयमूरचे ताब्यांत लाखों लोक गुलाम करून आणिलेले होते. दिल्लीचे बादशहानें तयमुरास अडचणींत गांठलें हें पाहून त्या गुलामांनीं आनंद प्रदर्शित केला. ही गोष्ट पुढें तयमूर यास कळतांच त्यानें एकदम हुकूम सोडून पंधरावर्षांवरच्या सर्व लोकांची एकजात कत्तल करविली. त्यांत हिंदु व मुसलमान दोनही जातींचे लोक होते. पुढें तयमूरनें आपल्या फौजेचा फिरोजाबादचे मैदानांत तळ दिला; आणि दोन दिवसांनीं दिल्लीचे फौजेशीं टक्कर देण्याकरितां आपली फौज उभी केली. महंमूदशहा व इक्बालखान यांची तयारी कांहीं कमी नव्हती. ते

१२-७९१-२०००

आपली तयारी करून लढण्यास आले. नेहमींप्रमाणें लढाईस सुरवात झाली. तयमूरनें सर्व व्यवस्था पुनः तपासून पाहिली. आणि गुढगे टेंकून प्रार्थना केल्यावर, अल्लानें आपली विनंति मान्य केलीसें दाखवून तो वर उठला; आणि रणवाद्यें वाजवून त्यानें लढाईस सुरुवात केली. तेव्हां कांहीं वेळ निकराचें लढणें होऊन तयमूरच्या फौजेस जय मिळाला. इक्बालखानानें लढण्याची शिकस्त केली. तयमूर म्हणतो, 'दिल्लीची फौज कांहीं कमी शूर नव्हती. पण त्यांचे अंमलदार योग्य नव्हते.' इक्बालखान पळून गेला. त्याचीं बायकामुलें मागें राहिलीं. आपणास जय दिल्याबद्दल तयमूरनें मोठ्या गहिंवरानें ईश्वराचे आभार मानिले. ह्या लढाईंत महंमूद तुघ्लखाचा पराजय झाला, (ता. १७ डिसेंबर), आणि रातोरात तो गुजराथेकडे पळून गेला. तेव्हां झगडा सोडून देऊन सर्व लोक तयमुरास शरण गेले. तयमूरनें दिल्लीचें बादशाही पद स्वीकारून स्वतःच्या नांवानें खुत्बा वाचविला. नंतर त्यानें दिल्ली शहरांतून मोठी खंडणी वसूल करण्याचा हुकूम दिला. त्यावरून त्याचे कांहीं लोक शहरांत शिरून लुटालूट करूं लागले. ही लूट पांच दिवस चालू असून तिची वार्ता तयमूर यास कळली नव्हती. तो शहराबाहेर राहून विजयोत्सव करीत होता. इकडे शहरवासी लोकांस लुटीचा उपद्रव सहन न होऊन ते बायकामुलांस ठार मारून व घरादारांस बत्ती लावून, शस्त्रास्त्रांनिशीं परकीयांबरोबर लढण्यास आले, (ता. २६ डिसेंबर). तेव्हां तर तयमूरच्या लोकांनीं एकसारखा शहरांत रक्तपात चालविला. रस्त्यांतून जाण्यास मार्ग नाहीं इतक्या प्रेतांच्या राशी सर्व शहरभर पसरल्या. हिरे, माणकें, मोत्यें, सोनें चांदी वगैरे लूट किती जमा झाली ह्याची तर गणतीच नाहीं. तयमूर ह्यास ही हकीगत समजली, तेव्हां तिजबद्दल त्यास कांहींच वाटलें नाहीं. तो म्हणतो, 'लोकांस दुखवूं नये अशी माझी मनापासून इच्छा होती, पण माझी फौज माझ्या कह्यांत राहिली नाहीं.' पकड, लूट, व मारहाण ह्यांशिवाय कोणास कांहीं सुचेना. प्रत्यकानें निदान पंचवीस तीस गुलाम पकडून आणिले. सर्व दिल्लीशहर ओस पडलें. फक्त सय्यदांचा व उलमांचा भाग तेवढा बचावला. पंधरा दिवसपर्यंत दिल्लींत राहून नंतर त्यानें स्वदेशीं गमन केलें, (ता. १ जानेवारी, १३९९). स्वतःचे वांटणीस आलेला लुटीचा हिस्सा त्यानें बरोबर घेतला. हिंदुस्थानांतील कलाकौशल्यानें चकित होऊन त्यानें इकडचे पक-

डलेले बहुतेक लोक व कुशल कारागीर स्वदेशीं नेले. परत जातांना रस्त्यांत त्यानें मिरत शहरावर कांहीं फौज पाठविली. तेथच्या फौजेनें तयमूरच्या लोकांची थट्टा केलेली त्याच्या कानीं येतांच तो स्वतः तेथें गेला. शिड्या लावून त्याचे लोक किल्ल्यांत शिरले. येथेंही दिल्लीचाच प्रकार घडून आला. विस्तव व तलवार ह्यांचा प्रळय त्यानें सर्व देशावर परत जातांनाही चालविला. पुढें तयमूर हरद्वारवर गेला. तेथें गोमुखांतून गंगा पडते ही आख्यायिका ऐकून त्याचें पित्त खवळलें, आणि ह्या त्यांच्या समजुतीबद्दल हरद्वारच्या लोकांस चांगलीच अद्दल घडली. लाखों लोकांस त्यानें यमसदनास पाठविलें. इस्लामाच्या एकनिष्ठ सेवकांनीं ओझींच्या ओझीं लूट पैदा केली. तयमूरनें मोठ्या समारंभानें परमेश्वराची आभारपूर्वक प्रार्थना केली, आणि गुढघे टेंकून आनंदाश्रूंच्या भरांत बोलला, *'देवा! हिंदुस्थानांतली माझी कामगिरी त्वां सिद्धीस नेली. दोन गोष्टींसाठीं मी येथें आलों. एक काफर लोकांशीं लढून परलोकसाधन करावें, आणि दुसरी, संपत्ति लुटून इहलोक साधावा.* धर्माकरितां लूट करणें हें मुसलमानांचें बाळकडू आहे.' पुढें मसूरीखालच्या शिवालिकपहाडांतून नगरकोट व जम्मू शहरें लुटून, आणि लाहोर कावीज करण्यास फौज पाठवून, तयमूर हिमालयाच्या बर्फाळ खिंडींतून आला तसाच हां हां म्हणतां स. १३९९च्या मार्च महिन्यांत, नाहींसा झाला. त्यानें पुनः हिंदुस्थानांत आपली फौज पाठविली नाहीं. जातांना मुलतान, लाहोर व दीपलपूर ह्या प्रांतांवर खिजरखान सय्यद नामक सरदारास नेमून काबूलच्या वाटेनें तो समर्केदास पोंचला.

४. तयमूरची अवतारसमाप्ति व योग्यता.—तयमूरलंग पुनः हिंदुस्थानांत आला नाहीं. आशियाखंडाचे पश्चिमेस त्याच्या राज्यांत दंगे उद्भवलेले ऐकून तो घाईनें परत गेला. त्या वेळीं त्याचें वय त्रेसष्ट वर्षांचें असतां तो मोठ्या लगबगीनें समर्कंद सोडून पश्चिमेस गेला. ऑटोमन सुलतान बायजीद युरोपखंड जिंकण्याच्या तयारींत होता, आणि तयमूरनें त्याला साह्य केलें असतें, तर दोघांनीं सर्व युरोपाचा फन्ना उडविला असता. पण बायजीद व तयमूर यांनीं पत्रोपत्रीं एकमेकांचा इतका अपमान केला, कीं तयमूरनें बायजीदवर स्वारी करून अंगोरा' येथील घनघोर संग्रामांत त्याचा पुरा नाश करून त्यास ठार मारिलें; आणि त्याचें राज्य

काब्रीज केलें. तसेंच आलेप्पो, डमास्कस, बगदाद, बूर्स, इस्पहान, आस्त्राखान इत्यादि शहरें धुळीस मिळवून असंख्य लोकांची कत्तल केली. कसबी व कारागीर लोक मिळत, तेवढे मात्र त्यानें समर्कंदास पाठवून दिले. बगदाद येथें नव्वद हजार मुंडक्यांचा त्यानें एक मनोरा उभारला. युरोपखंड धुळीस मिळविण्याचा त्याचा बेत होता, पण तो सिद्धीस गेला नाहीं. चंगीझचा मुलगा कुब्लाईखान हा पराक्रमी बादशाहा पेकिन येथें राज्य करीत असे. दीडशें वर्षेपर्यंत ह्या मोगल वंशाचा अंमल चीन देशावर होता, पुढें चिनी लोकांनीं आपलें राज्य त्याजपासून परत मिळविलें. तरी पण ह्या दीडशें वर्षांत चिनी व मोगल ह्या जातींचें मिश्रण पुष्कळ झालें. त्याच वेळेस मध्यआशियांतील भागांत स्वतंत्र राज्यें स्थापन होऊन तेथच्या मोगलांनीं मुसलमानी धर्म स्वीकारिला. तेव्हांपासून पूर्वेकडील अस्सल मोगलांशीं त्यांचा संबंध तुटला. चिनी लोकांनीं स्वतंत्र राज्य स्थापिलें, हा प्रकार तयमूरलंग यास सहन न होऊन सर्व चीन इस्लाममय करण्याचे इराद्यानें चीनवर स्वारी करीत असतां, राजधानीपासून ३०० मैलांवर उत्रार येथें सन १४०५त ज्वर येऊन तयमूर मरण पावला. त्यामुळें चीन देशावरचें मोठें अरिष्ट टळलें. मरणसमयीं त्याचे मुलगे व नातू मिळून छत्तीस असामी जिवंत होते. तयमूरच्या जन्मापूर्वीच त्याच्या वाडवडिलांनीं मुसलमानी धर्म स्वीकारिला होता. एका संग्रामांत जखम लागून त्याचा हात व पाय लंगडा झाल्यामुळें त्यास ‘ लंग ’ हें टोपण नांव पडलें. तेंच ग्रंथकारांनीं वापरिलें आहे.

मनुष्यजातीचे शत्रु अशा नांवानें जे महान पुरुष इतिहासामध्यें नांवाजले आहेत, त्यांच्यामध्यें तयमूरची गणना केली जाते. ह्याच्या निरनिराळ्या हकीकती पुष्कळ उपलब्ध आहेत. क्लाव्हिगो नांवाचा एक स्पेन देशच्या राजाचा वकील तयमूरकडे समर्कंदास आला होता. त्यानें आपल्या प्रवासाची व तयमूरची मनोरंजक हकीकत लिहून ठेविली आहे.

तयमराचा वकील स्पेन देशांत गेला होता, तो परत येत असतां त्याबरोबर क्लॉव्हिगो सन १४०३ च्या मे महिन्यांत स्पेनदेश सोडून निघाला, तो १४०४ च्या ऑगस्ट महिन्यांत समर्कंद येथें पोंचला. कॉन्स्टांटिनोपलच्या बादशहास भेटून त्रिबिझोंड, अझेरूम, तेहेरान व मर्व्ह ह्या शहरांवरून

NATIONAL ARCHIVES OF INDIA

तय्मूरची राणी समर्कंद् येथें जनानखान्यांत बायांची भेट घेते. मध्य आशियांतील तुर्की पेहराव. पृ. १८१.

'खुदाबक्ष लायब्ररी'च्या मालकांच्या मेहेरबानीनें.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

त्यानें प्रवास केला. त्रिबिझोंड येथें तयमूरच्या राज्याची हद्द लागली. तयमूरच्या वकील बरोबर असल्यामुळें क्लोव्हिगो यास कोणत्याही गोष्टीची प्रवासांत अडचण पडली नाहीं. त्याजला जाण्यास बादशहानें टप्याचे घोडे ठेविले होते. रस्त्यावर सर्व ठिकाणीं त्याचा उत्तम प्रकारें पाहुणचार करण्यांत आला. इराणांतून त्यास भर उन्हाळ्यांत प्रवास करावा लागला. वाटेंत उन्हानें,. तहानेनें व प्रवासाच्या उतावळीनें पुष्कळ लोक मरण पावले. रात्रंदिवस चालून दोन दिवसांत सव्वाशें मैल जाण्यांत व दोन घोडे मेले तरी हरकत नाहीं, पण त्याच प्रवासास तीन दिवस लागलेले तयमूरास खपत नसत. सर्व रस्त्यावर मैलांचे खांब रोवलेले असत. राज्यांतील सर्व लष्करी कामगारांस प्रवासाच्या वेळीं दररोज निदान ६० मैल तरी चालण्याची सक्त ताकीद असे. तयमूरच्या कामगारांची उत्तम बरदास्त ठेवण्याविषयीं सर्व ठिकाणच्या लोकांस विलक्षण दहशत बसलेली असे. सरकारच्या पाहुण्यांचें स्वागत करण्यांत यत्किंचित् चूक झाली तर अपराध्याचें डोकेंच उडे. एवढ्या अफाट राज्यांत तयमूरच्या इतकी दहशत कोणीं कधींच बसविली नसेल. तहान, भूक, थंडी, उष्णता इत्यादि संकटें सोसण्यास तयमूरच्या लष्कराइतकें कटक लष्कर दुसऱ्या कोणाचें नव्हतें.

समर्कंदास पोंचल्यावर आठ दिवसांनीं तयमूरनें क्लोव्हिगोची भरदरबारांत भेट घेतली. नंतर पुष्कळ मेजवान्या झाल्या; त्यांमध्यें बादशहाच्या बायका उघडपणें बाहेर आल्या होत्या. मेजवानीकरितां सोन्याचीं मेजें व हिरेमाणकांनीं जडलेलीं ताटें व पेले मांडलेले होते. त्या प्रसंगीं तयमूरच्या सहा नातवांचा लग्नसमारंभ चालू होता. तन्निमित्त नानाप्रकारचे शोभिवंत रेशमी तंबू उभारलेले पाहून, आणि अनेक खोल्यांनीं युक्त अशी किल्ल्यासारखी त्या तंबूंची रचना व एकंदर समारंभाचें अवाढव्य स्वरूप अवलोकन करून, आलेल्या पाश्चात्य पाहुण्यांचे डोळे दिपून अंतःकरणें थक्क झालीं. तयमूरची पट्टराणी आपल्या ऐश्वर्यसंपन्न पेहेरावानिशीं सर्व समारंभावर दक्षता ठेवीत होती. तिचा पाठीमागें लोळणारा झगा उचलून धरण्यास पंधरा दासी व डोक्यावरील मुकुट सांवरण्यास तीन दासी लागत. तिच्या डोक्यावरील रत्नजडित मुकुट अत्यंत मौल्यवान होता. तिचे काळे कुळकुळीत केश खांद्यांवरून खालीं लोळत होते.

स्त्रियांबरोबर तीनशें दासी सेवा करण्यास हजर असत. दुसऱ्या राण्यांचा इतमाम कमी होता असें नाहीं. स्वयंपाकाच्या लांकडांकरितां मोठमोठीं अरण्यें तोडून आणिलेलीं होतीं. मांसाचे व अन्नाचे पर्वत पडले होते, आणि दारूचीं टांकीं भरून वाहत होतीं. समारंभासाठीं दूरदूरचे हजारों पाहुणे आले होते, त्यांतच यूरोपच्या राजांचे वकील होते. वधूवरांच्या मस्तकावर हिरेमाणकांचा वर्षाव चालू होता. दोन महिने हा समारंभ चालला, तेवढ्या अवधींत नेहमींची शिस्त बंद ठेवून लोकांना मनमुराद चैन करण्याचा हुकूम होता. एकदां हत्ती, घोडे यांच्या खेळाचा एक समारंभ झाला, त्याकरितां चौदा पंधरा हजार तंबू लाविले होते. अत्यंत थाटमाटाच्या पाहुणचारांत बरेच दिवस घालविल्यावर हा स्पेनदेशचा वकील सन १४०६च्या मार्च महिन्यांत स्पेन देशास परत आला.

ह्या वकिलाच्या वर्णनावरून एक-दोन गोष्टी विशेष ध्यानांत ठेवण्याजोग्या दिसतात. तयमूरच्या दरबारी मंडळीपेक्षां हे स्पेनचे लोक ज्यास्त हुशार किंवा बुद्धिमान नव्हते. सुधारणेच्या संबंधानें त्या वेळचें तयमूरचें दरबार स्पेनच्या दरबाराहून कमी नव्हतें. दरबारची टापटीप, व्यवस्था व काम करण्याची शैली ह्यांत तयमुरास नांवें ठेवण्यास जागा नव्हती. एवढें लक्षांत ठेविलें पाहिजे, कीं त्या वेळीं स्पेनचें राष्ट्र सर्व यूरोपखंडांत अत्यंत सधन व सुधारलेलें होतें. पंधराव्या शतकाच्या आरंभीं आशियाखंडांतील लोक युरोपापेक्षां कमी सुधारलेले नव्हते, आणि तयमूर कितीही दुष्ट असला तरी रानटी नव्हता, हें वर सांगितलेल्या पाश्चात्यांच्या स्वतःच्या पुराव्यावरून उघड होतें.

तयमूरलंग एखाद्या नवीन शहरीं आला म्हणजे तेथील लोकांपासून सर्व संपत्तीची दरडावून मागणी करी. नंतर ती लुटून आणण्यास आपली फौज पाठवी. सर्व लोकांस तो पकडून एके ठिकाणीं जमा करी. अशा लोकांतून कारागीर व विद्वान् असे जे कोणी असतील त्यांस वेगळे काढून राज्यांतील एखाद्या ओसाड प्रदेशांत वसाहत करण्यास पाठवी. इतरांचा जीव घेऊन त्यांच्या शिरांचा एक मोठा ढीग शहराबाहेर रचण्यांत येई. बगदाद शहर घेतलें त्या वेळेस अशा शिरांचे मनोरे एकशेंवीस झाले होते. केव्हां केव्हां जिवंत माणसांस चुन्यानें व विटांनी चिणून त्यांचा तट बांधण्याचें काम तयमूरचे कुशल कारागीर करीत.

तयमूर विटाचुनांनीं शिरांचे मनोरे बांधितो, पृ॰ १८२.

'खुदाबक्ष लायब्ररी'च्या मालकांच्या मेहेरबानीनें.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

बाबराचा मृत्यु. हुमायून खालीं प्रार्थना करतो, पृ० १८२

'खुदाबक्ष लायब्ररी'च्या मालकांच्या मेहेरबानीनें.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

NATIONAL ARCHIVES OF INDIA

' मोगल लोक येत, नासधूस करीत, जाळीत, कत्तल करीत, लुटीत व निघून जात.' या एका वाक्यांत तयमूरच्या सर्व स्वाऱ्यांची हकीकत येते. हिंदुस्थानांत मोगल पादशाहीची सुरुवात तयमूरनें केली असें म्हणण्यास हरकत नाहीं. तो जिवंत असेपर्यंत त्याच्याच नांवानें हिंदुस्थानांत खुत्बा वाचण्यांत येत असे. त्याची स्वारी म्हणजे एक ईश्वरी क्षोभ असेंच हिंदुस्थानांत सर्व लोक समजत. तयमूरनें आपले लेख नेस्टोरियन नामक ख्रिस्तीपाद्र्यांनीं काढिलेल्या लिपींत लिहिले. त्यास आरबी भाषा येत नव्हती. तुर्की व फारसी भाषा येत होत्या. पुढें तुर्की भाषेची एक नवीन लिपी बाबर बादशहानें सुरू केली. तयमुरास बुद्धिबळें खेळण्याचा नाद विशेष होता.

तयमूर जन्मापासून संकटांत कसलेला होता. संकटांशीं झगडण्याच्या प्रसंगांमुळें पुरुषास जें शिक्षण मिळतें त्याची किंमत पुस्तकी विद्येच्या *शेंकडोंपट ज्यास्त* आहे, हें *तयमूर,* अकबर, *शिवाजी* वगैरे अनेक पुरुषांच्या चरित्रांवरून व्यक्त होतें. तयमूरचा बाप तुर्घायखान हा मरण पावल्यावर तो अगदीं निकृष्ट स्थितीस येऊन पोंचला होता. कित्येक प्रसंगीं तर त्याच्याजवळ स्वतःचे असे एक दोनच मनुष्य होते. पुढें त्यास एकनिष्ठ, कुलीन, व धाडसी असे अनुयायी मिळत गेले, आणि हळू हळू त्याची भरभराट झाली.

त्याचा बांधा सुरेख, रंग गोरा, चेहरा उग्र पण उदार व निष्कपट, व आवाज कर्कश होता. त्याची खरी तसबीर उपलब्ध नाहीं असें जहांगीर बादशहानें म्हटलें आहे. पण तयमूरचें जें चित्र रेब्रांट चितान्यानें काढून ठेविलें आहे, त्या तसबिरीवरून धाडस, सोशिकता, कावेबाजपणा हे गुण त्याच्यांत व्यक्त होतात. त्यास लिहितां वाचतां येत नव्हतें, म्हणून त्यानें लिहून ठेविलेल्या हकीकती आहेत, त्या केवळ त्यानें दुसऱ्यांकडून लिहविलेल्या व स्वतः ऐकून दुरुस्त केलेल्या आहेत. त्याचा भाग्योदय कसा झाला, याविषयीं एका मुंगीची एक चमत्कारिक गोष्ट *त्यानें लिहून* ठेविली आहे. 'एके दिवशीं शत्रूपासून पराभव पावून मी एका पडक्या घरांत गेलों आणि लपून बसलों. अंतःकरणांतील दुःख विरसण्याकरितां जवळून एक मुंगी चालली होती तिच्याकडे मीं दृष्टि लावेली. ती मुंगी एक गव्हाचा दाणा तोंडांत धरून भिंतीवर चढत

होती. दाणा जड असल्यामुळें भिंतीच्या शिखरावर पोंचण्यापूर्वी ती मुंगी एकूणसत्तर वेळां खालीं पडली. सत्तरावे खेपेस तिचा प्रयत्न सिद्धीस गेला. हें मुंगीचें कृत्य पाहून तत्क्षणीं मला नवीन जोर प्राप्त झाला, आणि मी पुढील उद्योगास लागलों. त्या मुंगीचें उदाहरण मी कधींही विसरलों नाहीं.' सन १३५६ मध्यें अमीर सय्यद बेरेका नामक पैगंबराच्या वंशांतील एका विद्वान् गृहस्थास तयमूरनें आपला गुरु केलें. ह्या दोघांमध्यें अकृत्रिम स्नेह होता. तयमूर शियापंथी असून पुढें त्याच्या वंशजांनीं सुनी पंथ स्वीकारिला.

तयमूरचें राज्यकारभाराचें मुख्य तत्त्व असें होतें, कीं काय वाटेल तें होवो, पण एकदां राजाच्या तोंडून शब्द गेला, कीं तो परत घेऊं नये किंवा फुकट जाऊं देऊं नये. तो अंमलांत आलाच पाहिजे.

राज्यकारभार चालविण्याचीं बारा सूत्रें तयमूरनें आपल्या राजनीति ग्रंथांत लिहून ठेविलीं आहेत, तीं सर्व येथें देण्याचें प्रयोजन नाहीं. पण त्यांवरून तयमूर हा विलक्षण बुद्धिमान व अतिधोरणी राजा झाला असें म्हणावें लागतें. 'निष्पक्षपातानें न्याय करून गरिबांवर मीं जुलूम होऊं दिला नाहीं. चांगल्या कृत्याबद्दल बक्षीस व वाइटाबद्दल शासन दिल्याशिवाय राहिलों नाहीं. लोकांवर दया व शत्रूंसही मी क्षमा करीत असें.' अशा प्रकारें त्यानें आपली स्तुति केली आहे. हें वर्णन व त्याची प्रत्यक्ष कृति यांजमध्यें निर्विवाद महदंतर दिसतें. वाईट मनुष्यास सुद्धां स्वतःच्या दुष्कृत्यांचा अभिमान वाटत नसून लोकांनीं आपणांस चांगलें म्हणावें अशी बळकट इच्छा असते. त्यानें स्वतःबद्दल लिहिलेलें चांगलें वर्णन अशा इच्छेचाच परिणाम होय. तथापि तयमूरलंगाची तुलना तत्कालीन परिस्थितीच्या संबंधानेंच केली पाहिजे. बगदाद व डमास्कस येथील विद्यापीठांचा त्यानें विध्वंस केला; तरी त्यांच्याच तोडीचीं नवीन विद्यापीठें त्यानें समर्कंद येथें निर्माण केलीं.

चंगीझखानानें जे नियम व कायदे अमलांत आणिले होते, तेच तयमूरनेंही चालू ठेविले. राज्यरूपी इमारत बांधण्याची त्याची कल्पना महंमद पैगंबराच्या कुराणांतील तत्त्वांवर त्यानें रचिली नाहीं. 'मुसलमान तेवढे एकमेकांचे भाऊ होत,' हें कुराणांतील तत्त्व राज्यकारभारांत त्यानें पाळिलें नाहीं. लष्करी जोरावर राज्य स्थापून त्याचीं सर्व सूत्रें राजाच्या

तयमूराचा दरबार, पृ० १८५.

'खुदाबक्ष लायब्ररी'च्या मालकांच्या मेहेरबानीनें.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

NATIONAL ARCHIVES OF INDIA

ताब्यांत असावी ही चंगीझखानाची कल्पना तयमूरनें प्रत्यक्ष अमलांत आणिली. तयमूरनें पुष्कळ मशीदी बांधिल्या, आणि धर्माधिकाऱ्यांस वेतनें करून दिलीं, इतक्यापुरता तो मुसलमानी धर्माचा भक्त होता, पण धर्माचा संबंध त्यानें राज्यकारभारांत येऊं दिला नाहीं. शिक्षेच्या भीतीनें व लुटीच्या आशेनें लोक त्यास भजत. त्याच्या धर्माची त्यास परवा वाटत नसे. तयमूरनें आपल्या लेखांत खोडसाळपणा केला आहे असें मानण्याचें कारण नाहीं. तत्कालीन स्थितीच्या मानानें तो चांगला राज्यकर्ता झाला हें निर्विवाद आहे. त्यानें केलेले नियम, इराणी, तुर्क वगैरे लोकांतील विद्वानांकडून त्यानें जमविले. ते तरी सर्व राज्यभर चालू झाले होते असें नाहीं. तरी पण त्याच्या वंशजांस त्यानें केलेल्या कायद्यांचा निःसंशय पुष्कळ उपयोग झाला असावा. हिंदुस्थानांतील मोगल बादशहांनीं सुद्धां त्याचेंच अनुकरण पुष्कळ अंशीं करून कीर्ति मिळविली. अकबरानें तर ते नियम आपल्या राज्यास अक्षरशः लागू केले. तयमूरचें वर्तन कडक होतें तरी अंतःकरण कोमल होतें. त्याची कुटुंबांतील माणसांवर फारच प्रीति असे. तरी मुलांवर त्याची शिक्षा फार कडक होती. अनेक प्रसंगीं यःकश्चित् गुलामांप्रमाणें तो त्यांस वागवी. फारशी कवि हाफीज हा तयमूरलंगाचा समकालीन होता. निस्पृह भाषणानें तयमूरलंगासारख्या गागीट माणसाकडूनही त्यानें बक्षीस मिळविलें. तसेंच कर्माणी नांवाचा दुसरा एक कवि तयमूरजवळ होता. आंघोळ करून वस्त्रानें अंग पुसीत असतां तयमूरानें कर्माणीस पुसलें, 'मला विकलें तर माझी किंमत काय येईल?' कवीनें उत्तर दिलें, 'येईल सुमारें २५ अस्पर्स.' 'कां बरें, तितकी तर माझ्या अंगावरील ह्या वस्त्राचीच किंमत होईल,' असें तयमूर म्हणाला. त्यावर कवि बोलला, 'मीं तरी त्या वस्त्राचीच किंमत सांगितली; तुमची एकट्याची किंमत कवडीइतकीही नाहीं!'

राज्यांतल्या शिस्तीपेक्षां त्याच्या लष्कराची शिस्त फारच कडक असे. युद्धसामुग्री, व लढाईची टापटीप या बाबतींवर तो स्वतः देखरेख ठेवीत असे. त्याच्याजवळ दोन लाख फौज नेहमीं लढाईच्या तयारीनें असे. त्यानें मोठमोठ्या चाळीस स्वाऱ्या केल्या, आणि तत्कालीन सर्व मोठमोठीं राज्यें पादाक्रांत केलीं. त्यावरून एकंदरींत तो मानवजातीचा उपकारकर्ता नसून संहारकर्ता होय, असें इतिहासकार समजतात.

तथापि अचाट बुद्धिमत्तेनें त्यानें विजय संपादिले, याजबद्दल त्यास 'महान' हें पद देणें योग्य आहे.

५. सय्यद घराणें, (स. १४१६–१४५०).—तयमूरच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा शहारुखमीर्झा, त्याच्या विस्तृत राज्याचा मालक झाला. पण तें राज्य इतक्या उतावळीनें जिंकलें गेलें होतें, कीं त्यास व्यवस्थित रूप येण्यास अवकाश मिळाला नाहीं. तयमूरच्या राज्यकारभाराचे बरेवाईट परिणाम त्याजबरोबरच लयास गेले. एखादा वणवा पेटून वाऱ्याच्या जोरानें वाढत जातो, त्यांत झाडेंझुडपें जळून खाक होतात, तथापि आग विझल्यावर जमीन लवकरच हिरवीगार दिसूं लागते, त्यांतलाच प्रकार तयमूरच्या राज्याचा झाला. समर्कंद येथें सुद्धां तयमूरचा वंश शंभर वर्षांवर टिकला नाहीं. पूर्वीच्या वणव्यांतील राहिलेले निखारे कांहीं दिवस धुमसत होते, पण त्यांस तैयमूरसारख्या बलवान उद्दीपकाची मदत न मिळाल्यानें ते हळू हळू विझून गेले. तयमूरचा फक्त एक दुर्बल अवशेष कांहीं दिवस अफगाणिस्थानांत धुगधुगी धरून होता; त्यालाच पुढें नवीन जीवन प्राप्त होऊन त्याची पुढें हिंदुस्थानांत जोराची वृद्धि झाली. तो अवशेष बाबर होय.

तयमूर गेल्यानंतर दोन महिनेपर्यंत दिल्ली शहरांत सर्व अंदाधुंदी चालली होती. दुष्काळ व रोगांच्या सांथी ह्यांचाही त्या वेळेस सुकाळच होता. दिल्लीचें वैभव जें ह्या वेळेस लयास गेलें, तें पुढें दोनशें वर्षांनीं मोगलबादशहांच्या वेळेस पुनः चमकूं लागलें. पुष्कळसा रक्तपात झाल्यावर पूर्वीचा वजीर मल्लू इक्बालखान ह्यानें अंदाधुंदी मोडून बरीच व्यवस्था केली. तेव्हां शहरांत शांतता होऊन पुष्कळ लोक परत आले. शहराशिवाय दुआब प्रांतही इक्बालखानानें आपल्या हाताखालीं घेतला. वास्तविक रीत्या दिल्लीच्या अफाट राज्याचा एवढाच भाग काय तो आतां शिल्लक राहिला होता. बाकीचे सर्व प्रदेश निरनिराळे अंमलदार व अनेक हिंदु राजे बळकावून बसले. गुजराथेंत मुजफरखान; अयोध्या वगैरे पूर्वेकडील प्रांतांत ख्वाजाजहान; काल्पी, महोबा वगैरे ठिकाणीं महंमदखान; पंजाबाकडे खिजरखान सय्यद वगैरे अंमलदार स्वतंत्रपणें कारभार करूं लागले. इक्बालखानानें ही संधि साधून स्वतः बादशाही पद बळकाविण्याचा यत्न केला. प्रथमतः त्यानें सुलतान महंमूद

तुघ्लख गुजराथेंतून माळव्याकडे गेला होता, त्यास परत बोलाविलें. महंमूद बिचारा आला. पण इक्बालखानानें सर्व सत्ता स्वतःचे हातीं ठेविल्यामुळें त्यास बरें न वाटून कनोज प्रांताची सुभेदारी घेऊन तो तेथें जाऊन स्वस्थ बसला. पुढें ह्या उभयतांचा कनोज येथें युद्धप्रसंग झाला. पण कोणासही कांहीं फलनिष्पत्ति झाली नाहीं. पुढें इक्बालखानानें मुलतानचा सुभेदार खिजरखान ह्याजबरोबर झगडा चालविला. पण १४०५ त इक्बाल पराभव पावून मारला गेला.

तेव्हां दिल्लींतील कामगार दौलतखान लोदी ह्यानें महंमूद तुघ्लखास परत बोलावून तख्तनशीन केलें, (सन १४०५). परंतु महंमुदाचा अंमल पुनः नीट बसला नाहीं. त्याच्या व खिजरखान ह्याच्या एकसारख्या लढाया चालू होत्या. शेवटीं अनेक संकटांनीं घेरल्यामुळें तापानें आजारी पडून हा दुर्दैवी महंमूद तुघ्लख दिल्लीचा शेवटचा तुर्क सुलतान मरण पावला, (सन १४१२); आणि त्याजबरोबरच हिंदुस्थानावर राज्य करणाऱ्या तुघ्लख व तुर्क घराण्यांचा शेवट झाला. महंमुदानें एकंदर वीस वर्षें राज्यकारभार केला; पण तेवढ्या वेळांत बिचाऱ्यास सुखाचा लवलेश मिळाला नाहीं. महंमूद तुघ्लखानंतर दौलत लोदीनें दिल्लीचें तख्त स्वीकारिलें. पण तयमूरलंगाच्या वतीनें खिजरखान त्याजबरोबर झगडूं लागला. शेवटीं सन १४१४ त त्यास पदच्युत करून खिजरखानानें बादशाही पद बळकाविलें, आणि सय्यद घराण्याची स्थापना केली.

खिजरखानानें तयमूरलंगाची मर्जी संपादन केल्यामुळें त्याचा राज्यकारभारांत प्रवेश झाला. दौलतखान लोदीपासून राज्य बळकाविल्यावरही त्यानें स्वतः राजचिन्हें धारण केलीं नाहींत. त्यानें तयमूरच्या नांवानेंच नाणीं पाडवून खुत्बा वाचविला. तयमूर मरण पावल्यावर त्याचा मुलगा शहारुख मिर्झा समर्कंदच्या तख्तावर आला, त्यास खिजरखान कधीं कधीं खंडणी पाठवी. त्याच्या राज्याचा अगदींच संकोच झाला होता, आणि त्यांतला सुद्धां वसूल दरसाल स्वारी केल्याशिवाय होत नसे. सात वर्षें शांततेनें कारभार करून खिजरखान सन १४२१ त मरण पावला. नीति, औदार्य, व परहितेच्छा या गुणांमुळें लोक त्यास फार चाहत असत. आपला पुत्र मुबारिक यास त्यानें आपला वारस नेमिलें होतें.

मुबारिक हा सज्जन असून राज्यकारभाराच्या कामीं लायक होता. पण त्याचा शांतताप्रिय स्वभाव त्या घालमेलीच्या काळास साजणारा नसल्यामुळें त्यास मिळावें तसें यश मिळालें नाहीं. चारही बाजूंचे अंमलदार त्यास एकसारखा त्रास देत, म्हणून त्यांजबरोबर झगडण्यांत त्याचा पुष्कळ काळ गेला. न्यायी व दयाळु असल्यामुळें प्रजेची त्याजवर फार भक्ति होती. सरूर-उल्मुल्क ह्या नांवाचा त्याचा वजीर होता, त्याजवर कांहीं कारणामुळें शहाची इतराजी झाली. त्यास हा अपमान सहन न होऊन एके दिवशीं मुबारिक मशिदींत प्रार्थना करीत असतां, त्यास त्या दुष्टबुद्धि प्रधानानें कपटानें मारेकरी घालून ठार केलें, (सन १४३५). त्या प्रसंगीं सर्व रयतेस फार दुःख झालें.

मग त्या वजिरानें मुबारिकचा महंमद म्हणून एक मुलगा होता, त्यास सिंहासनावर स्थापन करून स्वतःचे हातीं सर्व कारभार ठेविला. कांहीं दिवस त्या दोघांचें सख्य होतें. पण ह्या वजिरानें लवकरच स्वतःचीं माणसें कारभारावर नेमून पूर्वींच्यांस घालवून दिलें. तेव्हां राज्यांत सुलतान व वजीर ह्या दोघांसही मारण्याचे कट होऊन उघड लढाई जुंपली. अशा प्रसंगीं ह्या दुष्टबुद्धि वजिरास सोडून देऊन लोकांचे पक्षास मिळणें महंमदास भाग पडलें. अर्थात् हे उभयतां शत्रु बनून एकमेकांचा जीव घेण्याच्या उद्योगास लागले. शेवटीं सुलतानाचा बेत तडीस जाऊन सरूर-उल्मुल्क् मारला गेला. पुढें कांहीं दिवस महंमदास शांतता मिळाली. पण तो स्वभावतः विषयासक्त असल्यामुळें त्याच्या हातून राज्याचा बंदोबस्त होईना. सरहिंद येथें बुह्लोल लोदी म्हणून एक अफगाण होता. तो पंजाब प्रांत बळकावून बसला. तो इतका बलवान झाला, कीं सुलतान महंमदास त्याची मदत मागावी लागली. एक दोन प्रसंगीं त्यानें चांगली मदत केली. पण पुढें त्या उभयतांत कलह लागला. बुह्लोल हा दिल्लीपद बळकाविण्यास टपला होता. इतक्यांत महंमद सय्यद आजारी पडून मरण पावला, (सन १४४५).

महंमदाचा मुलगा अला-उद्दीन सय्यद तख्तनशीन झाला. पण बुह्लोल यानें आपला प्रयत्न सोडून दिला नव्हता. अला-उद्दीन बापापेक्षांही दुर्बळ निघाल्यामुळें दिल्लीपतीची सत्ता राजधानीच्या शहराबाहेर फारशी उरली नाहीं. तयमूरलंग गेल्यावर पुष्कळ सुभेदार स्वतंत्र झाले, तरी राजधानीचे

लभोंवार बराच मुलुख राहिला होता. पण तोही आतां गेला. तशांत बुह्लोलसारखा कावेबाज मनुष्य अनुकूल प्रसंगाची वाट पाहत होता. बदाऊन म्हणून अलाउद्दीननें स्वतः वसविलेलें व त्याच्या आवडीचें एक शहर होतें. तेथील हवा त्यास ज्यास्त पथ्यकर वाटली, म्हणून दिल्ली सोडून तो तेथें जाऊन राहिला. अशी गोष्ट करूं नये म्हणून हमीद नामक त्याच्या वजिरानें त्यास पुष्कळ सांगितलें, पण त्यास तें रुचलें नाहीं. अखेरीस वजिराचें व त्याचें वांकडें आलें. त्या वजिरानें बुह्लोल लोदी ह्यास आपल्या मदतीस बोलाविलें. बुह्लोल कांहीं कमी नव्हता. त्यानें अलाउद्दिनास कळविलें, कीं मी वजिराचें पारिपत्य करण्यास दिल्लीस जात आहें. त्या वेळीं अलाउद्दिनास स्वस्थता इतकी प्रिय वाटली, कीं त्यानें स्वतःच खुशीनें सर्व राज्य बुह्लोलच्या स्वाधीन करून आपण बदाऊन येथें राहण्याचें कबूल केलें. त्याप्रमाणें तो बदाऊन येथें स्वस्थ राहिला. तेथें सन १४७८त त्याचा अंत झाला.

सय्यद घराण्याचा अंमल स. १४१६ पासून १४५० पर्यंत चालला. एकंदरींत ह्या घराण्याचे राजे दुर्बळ व सत्ताहीन झाले. अलाउद्दीन खिलजीनें वाढविलेल्या मुसलमान बादशाहीचे तुकडे होऊन दिल्लीच्या सुलतानाचे हातीं कांहींच प्रदेश राहिला नाहीं. सर्वत्र दंगेधोपे व अस्वस्थता चालू होती. त्यांतून हे नामधारी सुलतान कशी तरी वेळ मारून नेत होते. हिंदु राजे तरी प्रत्यक्ष स्वारी अंगावर आली म्हणजे सुलतानास शरण जात, खंडणी देण्याचें कबूल करीत, आणि किल्ले किंवा शहरें खालीं करून देत. पण सुलतानाची फौज परत गेल्याबरोबर लगेच पुनः तीं ठिकाणें परत घेऊन स्वतंत्रपणें वागूं लागत. ह्यावरून मध्यवर्ती सुलतानांची सत्ता किती दुर्बल झाली होती हें दिसून येतें. हिंदूंस बळजबरीनें भराभर मुसलमान् बनविण्याचा जो सपाटा चालला, त्या योगानें मुसलमान समाजाचें पूर्वींचें प्रखर पाणी कायम राहिलें नाहीं. म्हणून हिंदुस्थानच्या बाहेरून ताज्या दमाची नवीन भर आल्याशिवाय येथच्या येथें त्यांचें राज्य कायमचें टिकणें अशक्य झालें. मुसलमानांच्या अडचणींचें थोडेसें वर्णन वर कलम १ ह्यांत आलें आहे.

६. **लोदी घराणें, (स. १४५०–१५२६).**—लोदी हे अफगाणच होते. त्यांचा पूर्वापर धंदा व्यापाराचा होता. इराण व हिंदुस्थान ह्या

देशांशीं व्यापार करून ते श्रीमंत झाले होते. फिरोज तुघ्लखनें ह्यांस चांगला आश्रय दिला होता. बुह्लोलचा आजा मुलतानचा सुभेदार होता. सय्यदांच्या कारकिर्दीत त्याचा बाप व चुलते लष्करांत सरदार होते. सय्यद महंमदानें ह्या लोकांचा फार छळ केला. शेवटीं बुह्लोल यानें सरहिंद घेऊन सर्व पंजाब प्रांत हाताखालीं घातला. सन १४५० त राज्यपद मिळाल्यावर त्यानें सय्यदांचा वजीर हमीर ह्यास घरीं बसविलें. पंजाब प्रांत त्याच्या ताब्यांत असल्यामुळें त्याच्या राज्याची मर्यादा बरीच वाढली. तो स्वतः चांगला शूर व उदार होता, म्हणून लोकांची भक्ति त्याजवर विशेष होती. जोनपूरच्या शर्की राजांशीं त्यास एकसारखें झगडावें लागलें. शेवटीं तें स्वतंत्र झालेलें राज्य जिंकून त्यानें दिल्लीस मिळविलें, (सन १४७८). अव्याहत परिश्रम करून त्यानें पंजाबपासून बंगालपर्यंत उत्तरहिंदुस्थानचा बहुतेक भाग आपल्या राज्यांत सामील केला. ह्याप्रमाणें एकंदर अडतीस वर्षें पराक्रमानें व सुखानें राज्य करून बुह्लोल लोदी सन १४८८त मरण पावला. बुह्लोलखान ह्यास नऊ मुलगे होते. त्याचा वृद्धापकाळ होत चालला, तसतशी त्यानें आपल्या मुलांच्या हातांत पुष्कळ राज्यसत्ता दिली. ह्याचा परिणाम चांगला झाला नाहीं. श्रम करून जोडलेल्या राज्याचे पुनः विभाग पडले. एका सोनाराच्या सुंदर मुलीशीं बुह्लोल ह्यानें लग्न केलें होतें. तिजवर त्याची प्रीति विशेष असल्यामुळें तिच्या पोटचा मुलगा निजामखान ह्यानें आपल्यामागें राज्यारोहण करावें असें मरणसमयीं बुह्लोल ह्यानें ठरवून ठेविलें. परंतु त्याच्या वडील नातवाचा राज्यावर ज्यास्त हक्क होता. कांहीं काळ तक्रारी चालून निजामखानानें राज्य बळकाविलें, आणि तो आपणास सिकंदरशहा असें म्हणवूं लागला. बुंदेलखंड व उत्तर माळवा वगैरे प्रांतांतील हिंदु राज्यें जिंकण्यांत त्यानें कित्येक मोहिमी केल्या. तसेंच बहार प्रांत जिंकण्याचें बापानें अर्धें टाकिलेलें काम सिकंदरनें तडीस नेलें. तसेंच धोलपूर, चंदेरी, ग्वालेर, इत्यादि हिंदु राज्यें जिंकिल्यामुळें, दिल्लीच्या राज्याचा विस्तार पुनरपि बहुतेक हिंदुस्थानभर झाला. पुढें त्याचे कारकिर्दीत एकंदरीनें निर्वेध शांतता होती. त्यानें आपला सर्व वेळ दक्षतेनें राज्यकारभार करण्यांत घालविला. तो स्वभावाचा दयाळु व परोपकारी होता. लोकांच्या संरक्षणार्थ त्यानें

पोलीस खात्याची व्यवस्था केली; घोड्यांची टपाल ठेविली आणि रस्ते वगैरे दळणवळणाचीं पुष्कळ नवीन साधनें तयार केलीं. तो स्वतः विद्वान्, कवित्वगुणसंपन्न व कायदेपंडित असल्यामुळें, लोकांस न्याय वेळच्या वेळेस मिळून सौख्य झालें.

तरी धर्माच्या बाबतींत त्याचें मन फार कोतें होतें. हिंदुधर्मांचा तर तो विशेष द्वेष करी. हिंदुस्थानांतील कडव्या धर्माभिमानी राजपुरुषांमध्यें त्याची गणना आहे. आपल्या राज्यांतील हिंदूंचीं देवालयें त्यानें मोडून टाकिलीं; आणि त्यांच्या यात्रा बंद केल्या. पर्वणीच्या दिवशीं नदीतीर्थांच्या पवित्र ठिकाणीं स्नानें करण्याची त्यानें मनाई केली. पुष्कळ मुसलमान साधूंनींही ह्या दुष्ट कृत्यांबद्दल त्याचा निषेध केला, पण कांहीं उपयोग झाला नाहीं.

सन १४९९ च्या सुमारास लखनौ जवळच्या एका गांवीं बुद्ध म्हणून एक ब्राह्मण होता. 'कोणताही धर्म मनापासून आचरिला असतां ईश्वरास सारखाच मान्य आहे,' असें त्यानें प्रतिपादिलें, म्हणून मुसलमानांनीं त्यास फार त्रास दिला. त्यानें आपला पक्ष इतका स्पष्ट करून दाखविला, कीं त्याजपुढें लखनौच्या काजीनेंही हात टेकिले. शेवटीं अधिकाऱ्यांनीं तो कज्जा संबळ येथें सुलतानाकडे पाठविला. तेथें एक मोठा दरबार भरवून सिकंदरखानानें नऊ विद्वान् मौलवींकडून त्याच्याशीं पुष्कळ वाद करविला, तरी शेवटीं तो आपलें म्हणणें सोडीना, तेव्हां 'मुसलमान हो, नाहींतर शिरच्छेद होईल,' अशी त्याला धमकी मिळाली. तीही ब्राह्मणानें जुमानिली नाहीं. अखेरीस शहानें त्याचा शिरच्छेद करविला. अशा प्रकारचीं शहाण्या पण आग्रही राज्यकर्त्यांचीं उदाहरणें इतिहासांत वारंवार सांपडतात.

सिकंदर न्याय करण्यांत विशेष कुशल होता. न्याय करण्याच्या चातुर्याविषयीं त्याच्या अनेक गोष्टी लोकांत प्रसिद्ध आहेत. त्याच्या कारकिर्दीत सन १५०५ जुलई ता० ५ रोजीं आग्रा येथें एक मोठा धरणीकंप झाला, तेणेंकरून पुष्कळ पर्वत चलन पावले, गांवें व देवळें मोडलीं, आणि पुष्कळ लोकांचा संहार झाला. सिकंदर सन १५१७ त मरण पावला, आणि त्याचा मुलगा इब्राहीमखान तख्तावर आला. त्या वेळीं कोठें कांहीं गडबड झाली नाहीं.

लोदींच्या वेळेस राज्यविस्तार जरी बराच वाढला, तरी राज्यांत बंधन म्हणून राहिलें नव्हतें. निरनिराळ्या प्रांतांतील कामदार, जमीनदार व लहानलहान अंमलदार सुद्धां, दिल्लीच्या सुलतानाची परवा न ठेवितां मनास वाटेल तसा स्वतंत्र कारभार करीत. रयतेस देखील मुख्य सुलतानाची परवा वाटत नसे. प्रत्यक्ष जवळ मानेवर येऊन बसलेला जो इसम असे, त्याजपुरती रयत लोक काळजी ठेवीत. सारांश, सर्व राज्य कायद्यानें चालत नव्हतें, व्यक्तीकडे पाहून चालत होतें. अफगाण लोक शिरजोर होते, त्यांजला पूर्ण मुभा दिल्याशिवाय लोदींचें चालणारें नव्हतें. तेव्हां सर्व राज्यांत अफगाणांचा भरणा होऊन ते वाटेल तसा कारभार करूं लागले. अशा शिरजोर अंमलदारांस दाबांत ठेवणें कठीण असतें. सबब त्यांच्या समजुतीकरितां त्यांस अनेक सवलती दिलेल्या होत्या, त्या इब्राहीमनें सर्व बंद केल्या. तसेंच दरबारांत इतर मंडळींना सुद्धां अफगाणांसारखाच मान मिळावा असें फर्माविलें. दरबारांत सर्व लोक उभे असतां आफगाणांस मात्र खालीं बसण्याची मुभा असे. इब्राहीमखानानें हा प्रचार बंद करून अफगाणांचा शिरजोरपणा कमी करण्याचा प्रयत्न केला. तेव्हां सर्व अफगाण सरदार त्याजवर संतापून उठले, आणि जलालखान म्हणून इब्राहीमचा एक भाऊ होता, त्यास जाऊन मिळाले. जलालखानानें जोनपूर येथें स्वतंत्र राज्यपद धारण केलें. परंतु जलालखानाकडूनही त्यांची इच्छा तृप्त न होऊन ते पुनः इब्राहिमास मिळाले. इब्राहीमनें जलालखानाशीं युद्ध करून त्यास व पुष्कळ अफगाणांस ठार मारिलें. येणेंप्रमाणें एका बंडाची समाप्ति झाली.

कुरा प्रांताचा सुभेदार इस्मईलखान म्हणून होता. त्याचें जलालखानाशीं सख्य असल्यामुळें जलालच्या मृत्यूचा सूड घेण्याच्या विचारानें त्यानें बंड उभारिलें. त्याचा बंदोबस्त इब्राहीमखानाच्या हातून होईना. उभयतांनीं फौजेची चांगली जमवाजमव केली. शेख राजू बुखारी म्हणून त्या वेळेस एक प्रसिद्ध साधु होता. त्याच्या मध्यस्थीनें कांहीं दिवस तहाचें बोलणें चाललें. पण इब्राहीम नुसती फौज येण्याची वाट पाहत होता. ती आल्यावर तो आपल्या शत्रूंवर चालून गेला. तेव्हां बराच युद्धप्रसंग होऊन बंडवाले पळून गेले.

७. लोदी घराण्याची समाप्ति.—(स. १५२६). कांहीं दिवस इब्राहीम यास जिकडे तिकडे निर्धास्त वाटलें. पण अशी स्थिति फार दिवस टिकली नाहीं. बहारचा सुभेदार मरण पावल्यावर त्याचा मुलगा बहादूरखान आपणास स्वतंत्र म्हणवूं लागला. त्याजला पुष्कळ जोडीदार मिळाले. एक लाख स्वार त्याजपाशीं जमले. त्यानें अनेक प्रसंगीं दिल्लीच्या फौजेचा पराभव केला. लाहोरास दौलतखान लोदी म्हणून सुभेदार होता. आरंभीं तो इब्राहीमचा दोस्त होता. परंतु कांहीं निमित्तानें दोघांत वैमनस्य पडल्यामुळें दौलतखानास आपलें जीवित सुरक्षित वाटेना. त्या वेळीं बाबर नांवाचा एक मोगलवंशी पुरुष काबूलचें राज्य करीत होता. त्याजबरोबर दौलतखानानें पत्रव्यवहार चालवून त्यास आपल्या मदतीस बोलाविलें. बाबरचाही डोळा पुष्कळ दिवस हिंदुस्थानावर होताच. दौलतलोदीचें आमंत्रण त्याच्या चांगलें पथ्यावर पडलें. इब्राहीमचा भाऊ अला-उद्दीन भावाशीं नाराज होऊन बाबरजवळ राहत होता. त्याच्या मार्फतीनें हिंदुस्थानच्या खऱ्या स्थितीची बाबरनें चांगली माहिती करून घेतली. प्रथमतः बाबरनें अला-उद्दीन यास हिंदुस्थानांत पाठविलें. त्यास दौलतखान व दुसरे पुष्कळ सरदार मिळाले. चाळीस हजार फौजेनिशीं ते दिल्लीवर चाल करून आले. इब्राहीमखानाची व त्यांची लढाई झाली. अला-उद्दीन यास प्रथमतः जय मिळून त्याचे लोक लुटीच्या पाठीस लागले. इतक्यांत इब्राहीमनें संधि साधून त्यांजवर हल्ला करितांच ते अस्ताव्यस्त होऊन पळाले. पुष्कळांची कत्तल उडाली. अला-उद्दीन जीव घेऊन परत पंजाबांत पळून गेला; आणि इब्राहीमनें विजयोत्साहानें दिल्लींत प्रवेश केला. पण त्याचा तो आनंद फार वेळ टिकला नाहीं. अला-उद्दीनच्या पराभवाचें वर्तमान ऐकून बाबर त्वरेनें सिंधुनदी उतरून अलीकडे आला. त्याची व इब्राहीमखान लोदी याची गांठ तारीख २१ एप्रिल, सन १५२६ रोजीं पानिपतच्या समरभूमीवर पडली. त्या वेळीं तुंबळ रणकंदन होऊन इब्राहीम मारला गेला, आणि दिल्लीचें पद बाबरास मिळालें. ह्याप्रमाणें लोदी वंशाची समाप्ति होऊन हिंदुस्थानांत प्रबळ मोगल सत्तेची स्थापना झाली. इब्राहीमबरोबरच अफगाण व पठाणवंशी सुलतानांचा शेवट झाला.

१३-७९१-२०००

इब्राहीम लोदी राज्यकारभार चालविण्यास लायक नव्हता. त्यानें पुष्कळांशीं निष्ठुर वर्तन केल्यामुळें ते त्याजवर उठून शत्रूंस मिळाले. स्वतःच्या पदरच्या लोकांची त्यानें नानातऱ्हेनें मानहानि केली. तो शूर होता म्हणून त्यानें इतके दिवस तरी टिकाव धरिला.

मोगल वंशाचे इतिहासास सुरुवात करण्यापूर्वी आजपर्यंत मुसलमानी अंमलाची व एकंदर देशाची त्या काळीं स्थिति कशी होती हें समजणें जरूर आहे. पण त्यापूर्वी हिंदुस्थानांत ठिकठिकाणीं जीं अनेक स्वतंत्र मुसलमानी व हिंदु राज्यें स्थापन झालीं होतीं, त्यांचा त्रोटक इतिहास समजल्याशिवाय तत्कालीन देशस्थितीचें पर्यालोचन करणें योग्य नाहीं. सन ७११त, मुसलमान लोकांचा ह्या देशांत प्रवेश झाल्यापासून सन ११९३त शहाबुद्दीन महंमद घोरीनें दिल्लीपद काबीज केलें, तेथपर्यंत सुमारें पांचशें वर्षें ह्या देशावर आपला अंमल बसविण्यास मुसलमान लोक पाहत होते. शहाबुद्दीन घोरीच्या वेळेपासून त्यांचें कायमचें राज्य ह्या देशांत सुरू झालें. पुढें शंभर वर्षांनीं अला-उद्दीन खिलजीनें बहुतेक सर्व देशावर बादशाही अंमल स्थापिला. पण त्याचेमागून आलेले राज्यकर्ते दुर्बळ निघाल्यामुळें सन १५२६ त बाबर येईपर्यंत मुसलमानी राज्यांच्या अनेक शाखा स्वतंत्रपणें नांदत होत्या. त्यांच्या हकीकतीस आतां सुरुवात करूं.

प्रकरण अकरावें.

गुजराथचा इतिहास.

सन ९४२—१५७२.

१. पूर्व-वृत्तान्त, (इ.स. ९४२ पर्यंत). २. चालुक्य-वंश, (स. ९४२–१२१५). ३. वाघेल-वंश, (स.१२१५–१२९६). ४. अला-उद्दीन व राजाकर्ण, (स.१२९७). ५. दिल्लीच्या सुलतानांचा अंमल. ६. स्वतंत्र सुलतान, (स.१३९६–१५७२). ७. गुजराथच्या इतिहासाचें पर्यालोचन.

१. पूर्ववृत्तान्त.—गुजराथ प्रांताचा प्राचीन इतिहास देण्याचें हें स्थल नव्हे. हल्लींच्या भावनगराजवळच वल्लभीपूर म्हणून एक प्राचीन

काळीं नांवाजलेलें शहर होतें. त्या शहरीं अशोकवंशी बुद्धधर्मी राजे राज्य करीत होते. ह्या राजवंशाची समाप्ति इसवी सनाच्या नवव्या शतकाच्या प्रथमार्धांत झाली. तदनंतर सुमारें चारशें वर्षेपर्यंत पंचासर नांवाचे ठिकाणीं ' चावडा ' कुळांतील पुरुषांचें राज्य चाललें. कल्याणच्या चालुक्यवंशी राजांनीं इ. स. ७४६च्या सुमारास चावडा वंशाचा पाडाव केला. तेव्हां त्या चावडावंशी पुरुषांनीं अन्हिलवाडा हें शहर स्थापन करून तेथें कांहीं दिवस राज्य केलें. इ. स. ९४२त चालुक्य किंवा सोळंखी वंशांतला प्रथम पुरुष मूळराज हा अन्हिलवाडचा राजा झाला. त्यानें अनेक युद्धें करून सभोंवतालच्या राजांस जिंकून त्यांस आपले मांडलिक केलें. त्यानेंच महाराष्ट्र देशावर स्वारी करून कल्याणचें राज्यही आपल्या ताब्यांत घेतलें. मूळराज इ. स. ९९७ त परलोकवासी झाला.

२. चालुक्य-वंश, (९४२–१२१५). चामुंड, (९९७–१०२६).—मूळराजानंतर त्याचा पुत्र चामुंड हा राज्यासनावर बसला. त्यानें आपलें राज्य मोठ्या शहाणपणानें व नीतीनें चालविलें; आणि राज्यसंपत्ति, व कीर्ति वाढवून मूळराज यानें दिलेल्या राज्याचें चांगल्या प्रकारें रक्षण केलें. ह्याच्याच कारकिर्दींत गज्नवी महंमुदानें सोमनाथपट्टणावर स्वारी केली. चामुंड रायाची त्याजबरोबर लढण्याची तयारी नसल्यामुळें तो राजधानी सोडून पळून गेला. महंमूद सोमनाथास गेल्यावर चामुंडाचा वडील पुत्र वल्लभसेन व नातू भीमदेव हे मोठ्या फौजेनिशीं त्याजबरोबर लढण्यास आले. त्या लढाईंत भीमदेवाचा पराजय झाला, तरी त्यानें तीन हजार मुसलमान लोक कापून काढिले. हा राग मनांत धरून सोमनाथाचें देवालय काबीज केल्यावर महंमूद अन्हिलवाड्यास गेला. महंमुदानें चामुंडाचें राज्य काबीज करून त्याजवर त्याचा दुसरा मुलगा दुर्लभसेन यास स्थापिलें, आणि आपण स्वदेशीं निघून गेला. महंमुदाच्या ह्या स्वारीविषयीं हिंदु इतिहासलेखांत बरेंच भिन्न वर्णन आढळतें. अन्हिलवाड्याचे गादीवर त्या वेळेस भीमदेव होता असें हिंदु इतिहासकार लिहितात, आणि चामुंड होता असें मुसलमान इतिहासकार लिहितात.

दुर्लभसेनानें राज्य चांगल्या प्रकारें चालविलें. तो केवळ साधुवृत्तीनें राहत असे. ह्या वेळचे बहुतेक राजे वृद्धापकाल झाला म्हणजे

पुत्रास सिंहासनीं स्थापून, राहिलेलें आयुष्य तीर्थयात्रेंत घालवीत. तसेंच [illegible] स्वयंवराचा प्रघात होता.

भीमदेव,[1] (स. १०२६–१०७२).–भीमदेव फार पराक्रमी राजा झाला. त्यानें सभोंवारच्या पुष्कळ राजांवर आपला वचक बसविला. त्यांचा समकालीन परमारवंशी प्रसिद्ध भोजराजा माळव्यांत धारा नगरीस राज्य करीत होता. भोजराजा दानशूर व भीमदेव रणशूर अशी त्या वेळेस सर्वत्र प्रसिद्धि होती. आबूच्या पहाडावरील अनेक प्रख्यात जैनमंदिरें, तसेंच पालिठाणा व चंद्रावती येथील सुंदर देवालयें भीमदेवानें बांधिलीं. पंजाबांत गज्नवी महंमुदानें अंमल स्थापिला, तो उठविण्यासाठीं अजमीरचा चव्हाण राजा वीसलदेव ह्यानें भीमदेवाचें साह्य मागितलें. अन्हिलवाडा व अजमीर येथील राजांमध्यें सदा वैर असे. वरील प्रसंगीं भीमदेवानें वीसलदेवास मदत केली नाहीं, तेणेंकरून मुसलमानांचा अंमल हिंदुस्थानांत चिरस्थायी होत गेला. या उभय राजाचें वैर न मिटतां, वीसलदेवानें गुजराथेवर स्वारी केली. तींत वीसलदेवास जय मिळून त्यानें वीसलनगर म्हणजे वीसनगर शहर स्थापिलें; आणि भीमदेवाकडून खंडणी घेऊन परत गेला. भीमदेवानें पुष्कळ वर्षें शांततेनें राज्य केलें. त्याच्या ठायीं प्रजावात्सल्य विशेष होतें. उदयामती राणीच्या पोटीं झालेल्या कर्ण नामक मुलास गादीवर स्थापून भीमदेव तीर्थयात्रेस निघून गेला.

कर्णराज, (स. १०७२–१०९४).—कर्णराजानें बावीस वर्षें शांततेनें राज्य केलें. त्याला लढाई वगैरे करण्याचा प्रसंग आला नाहीं. लोकोपयोगी अनेक कृत्यें करून त्यानें रयतेची प्रीति संपादिली. कर्णसागर नांवाचा एक अतिविस्तृत तलाव ह्यानें बांधिला. वऱ्हाडांतील चंद्रपूर ऊर्फ चांदा शहरचा राजा जयकेशी ह्याची कन्या मैनलदेवी इच्याशीं कर्णराजानें लग्न लाविलें. तिच्या पोटीं त्यास पुत्र झाला, त्याचें नांव सिद्धराज जयसिंग असें ठेवण्यांत आलें. हा मुलगा अल्पवयी असतांच कर्णराज मरण पावला.

सिद्धराज जयसिंग, (सन १०९४–११४३).—सिद्धराज लहान असल्यामुळें त्याची आई मैनलदेवी राज्यकारभार पाहत असे. जयसिंग मोटा झाल्यावर तो फार हुशारीनें राज्य चालवूं लागला. त्यानें अनेक

NATIONAL ARCHIVES OF INDIA

तलाव बांधिले आणि प्रजेचें सुख वाढविण्याचे पुष्कळ प्रयत्न केले. माळव्याचे राजांबरोबर त्याचे वारंवार युद्धप्रसंग झाले. त्याचप्रमाणें सौराष्ट्र देशही त्यानें जिंकिला. हेमचंद्र नांवाचा एक विद्वान् जैनधर्मी साधु त्याचे दरबारीं होता. ह्याशिवाय आणखीही पुष्कळ विद्वानांस त्याचा आश्रय होता. त्याच्या वेळेस जैनधर्माचा प्रभाव विशेष होता. मुसलमान लोक जयसिंगाच्या वेळेस गुजराथेंत आले नाहींत.

सर्वगुणसंपन्न असतांही जयसिंगाच्या अंगीं स्त्रीलंपटपणा हा एक दुर्गुण होता. त्याजबद्दल कविजनांनीं त्याची पुष्कळ निंदा केली आहे. फोर्बस् आपल्या 'रासमाला' नामक ग्रंथांत लिहितो, कीं '*जयसिंगांत पाहिजे तसे दुर्गुण होते, तरी तो हिंदु लोकांत एक श्रेष्ठ राजा होऊन गेला. तो शूर व बलवान असून मोठमोठीं चांगलीं कामें करण्यास सदा आतुर असे. भाट लोक त्यास 'गुजराथ देशाचें भूषण' आणि 'चालुक्य वंशाचा कुलदीप' असें म्हणतात, तें वाजवी आहे.*' त्याच्या राज्याचा विस्तार मोठा होता.

कुमारपाल सोळंखी, (सन ११४३—११७४).—सिद्धराज जयसिंग ह्यास पुत्रसंतति नसल्याकारणानें त्याच्या गादीवर, प्रधान कान्हादेवाच्या मदतीनें, क्षेमराजाचा नातू कुमारपाल हा बसला. अनेक जैनधर्मी लोकांचें त्यास विशेष साहाय्य झालें असल्यामुळें, त्यानें त्या धर्मास पुढें चांगलें उत्तेजन दिलें. आसपासच्या राजांशीं त्यानें पुष्कळ युद्धप्रसंग केले. कोंकण प्रांतावरही त्यानें स्वारी केली होती. विद्वान् साधु हेमचंद्र ह्यास कुमारपाल उत्तम प्रकारें भजत असे. कुमारपालानें पुष्कळ देवळें व इमारती बांधिल्या. साधु हेमचंद्र सूरी व राजा कुमारपाल हे उभयतां थोड्याच दिवसांच्या अंतरानें मरण पावले. कुमारपालानें विद्वान् लोकांस चांगला आश्रय दिला, आणि पुस्तकालयें स्थापिलीं, त्या पुस्तकांचा संग्रह अद्याप पाटण येथें आहे. सिद्धराजासारखाच हा पराक्रमी होता. पुतण्या अजयपाल ह्यानें कुमारपालास विष घालून ठार मारिलें.

अजयपाल, (सन ११७४—११७९).—अजयपाल हा महीपालाचा पुत्र. हा शैवपंथी असून जैनधर्माचा द्वेष करी. लोकांवर त्यानें नानातऱ्हेचे जुलूम केले, त्यांस त्रासून त्यांनीं संधि साधून राजाचा खून

केला. त्याचे पश्चात् अजयपालाचा पुत्र मूळराज हा पाटणचे गादीवर बसला. मूळराज अल्पवयस्क असल्यामुळें त्याची आई नैकीदेवी ही सर्व कारभार पाहत असे. तिचा भाऊ भीमदेव हा सेनापति होता. हा मोठा शूर असे. दोन वर्षांच्या आंतच बाळराजा मूळराज मरण पावला.

भीमदेव भोळा, (सन ११७९–१२१५). भोळ्या भीमदेवाची हकीकत विशेषतः चंदभाटाच्या रासाग्रंथांत आढळते. दिल्लीचा राजा पृथ्वीराज चव्हाण हा त्याचा समकालीन होता. त्या वेळेस भीमराजा महाबल्लाढ्य म्हणून गणला जात असे.* त्याचें सैन्य फार मोठें असून सिंध देशापर्यंत त्याचीं जहाजें वावरत असत. जैनधर्मी प्रसिद्ध विद्वान् गृहस्थ अमरकोशाचा कर्ता अमरसिंह त्याच्याच दरबारीं होता.

हिंदुस्थानच्या दुर्दैवानें गुजराथचा राजा भीमदेव व दिल्लीचा राजा पृथ्वीराज यांजमध्यें हाडवैर माजलें. ह्या वैरामुळेंच परदेशीय मुसलमानांस हा देश हस्तगत करितां आला. भीमदेव व पृथ्वीराज ह्या वीर्यशाली पुरुषांचें उग्र क्षात्रतेज एकमेकांशीं लढण्यांतच खर्ची पडलें. तेंच जर मुसलमानांचा प्रतीकार करण्यांत खर्च झालें असतें, तर हिंदुस्थान देशाचें स्वातंत्र्य आणखी कांहीं दिवस कायम राहण्याची आशा होती. ह्या उभयतांचें वैर जडण्याचें कारण पाहूं गेल्यास अगदीं क्षुल्लक आहे. आबूगडचा राजा जैत परमार यास इच्छनीकुमारी नामक एक रूपवती मुलगी होती. तिची भीमदेवानें मागणी केली. पण तिचा भाऊ सलख याचा सारा ओढा पृथ्वीराजाकडे होता. भीमदेवाविषयीं पृथ्वीराजाचें मन त्यानें बिघडविलें, आणि 'तूं स्वतः जाऊन इच्छनीकुमारीस वर,' असें सलखनें पृथ्वीराजास सांगितलें. त्यामुळें सर्व रजपुतान्यांत कलहाग्नि पेटला. उभयतांनीं युद्धाची सिद्धता केली. आपसांत वैर माजवूं नये, म्हणून या दोनही राजांस आसपासच्या स्नेही मंडळीनें नानातऱ्हेचा बोध केला. पण दुर्दैवानें तो बोध कोणींच ऐकिला नाहीं. शहाबुद्दीन घोरी गृहकलह पेटण्याची संधिच पाहून होता. ह्या युद्धांत पृथ्वीराजानें भीमदेवास ठार मारिलें, असें कित्येक ग्रंथांत लिहिलें आहे, पण तें खरें असेलसें संभवत नाहीं. पृथ्वीराजास जय मिळाला ही गोष्ट खरी आहे. भीमराजाचा पराजय केल्यावर लवकरच मुसलमानांची गदा दिल्लीवर आली. शहाबुद्दीन घोरीनें दिल्ली व कनोज येथील राजांचा पाडाव केला. सन ११९४ त

शहाबुद्दीनचा प्रसिद्ध सरदार कुत्ब्-उद्दीन गुजराथ प्रांत जिंकण्याकरितां मोठी फौज घेऊन अन्हिलपट्टणास आला. लढाई होऊन भीमदेव पळाला. इतक्यांत गुजराथ जिंकण्याचें काम तसेंच सोडून कुत्ब्-उद्दीन पुनरपि गुजराथेंत आला, आणि ह्या प्रसंगीं सर्व रजपूत राजांचा पराभव करून तो दिल्लीस परत गेला. महंमद घोरी व कुत्ब्-उद्दीन हे लवकरच मरण पावल्यामुळें, गुजराथेंतून मुसलमानांचें ठाणें रजपूत राजांनीं लवकरच उठवून दिलें. भीमदेव सन १२१५ त मरण पावला. भीमदेवाबरोबरच सोळंखी वंशाचा अंत झाला. ह्यास इतिहासांत भोळा भीम असें नांव आहे.

३. वाघेल वंश, (सन १२१५–१२९६).—सोळंखी राजा कुमारपाल ह्याचा अरुणराज ऊर्फ आनाक म्हणून एक मावसभाऊ होता. कुमारपालानें त्यास वाघेल वगैरे कित्येक गांवांची जहागीर देऊन आपल्या दरबारीं सामंत करून ठेविलें होतें. अरुणराजास एक मुलगा झाला, त्याचें नांव लवणप्रसाद. स्वपराक्रमावर वाढतां वाढतां हा भीमदेवाच्या कार्कि-र्दीत प्रधानाचे पदापर्यंत येऊन पोंचला. वाघेल व धोलका हे परगणे त्याच्या ताब्यांत होते. लवणप्रसाद व त्याचा पुत्र वीरधवल ह्या दोघांनीं गुजराथ व सौराष्ट्र ह्या प्रांतांत लुटालूट व युद्धसंग्राम करून आपली योग्यता वाढविली. त्यांत वीरधवल तर फारच शूर व धाडसी होता. महाराष्ट्र देशांतील देवगिरीचे यादवराजे व उत्तरेकडील रजपूत राजे यांनीं या दोघां वाघेल योद्ध्यांवर एकदम हल्ले केले; पण त्यांनीं युक्तीनें आपला बचाव करून सर्व शत्रूंस मागें हटविलें. ह्याप्रमाणें पट्टणचें राज्य वीरधवल ह्यास मिळालें. वस्तुपाल नामक एक चतुर मंत्री वीरधवलापाशीं होता. त्यानें दिल्लीच्या मुसलमान सुलतानांस जाग्यावर बसवून गुजराथेंत येऊं दिलें नाहीं.

वीरधवलानें आपलें स्वतःचें राज्य फारच न्यायानें व कर्तबगारीनें चालवून रयतेस सुख दिलें. तो दयाळु, सत्यप्रतिज्ञ व धर्मनिष्ठ होता. तो मरण पावला तेव्हां त्याच्याबरोबर १८० सेवकांनीं आपल्याला त्याच्या चितेवर जाळून घेतलें. वस्तुपाल व तेजपाल हे दोघे भाऊ वीरधवलाचे मंत्री होते. ते जैनधर्मी वाणी होते. त्यांनीं अनेक देवळें व वाडे बांधिले. वस्तुपाल विद्वान् व कल्पक होता, आणि तेजपाल विशेष शूर होता.

गिरनार पर्वतावर त्यानें अनेक देवालयें बांधिलीं आणि विहिरी खोदिल्या, त्या अद्यापि आहेत.

वीरधवलाचे पश्चात् त्याचा मुलगा वीसलदेव वाघेलचा राज्याधिकारी झाला. त्याच्या कार्कीर्दींत सिंधप्रांतांत दुष्काळ पडल्यामुळें तेथील सोडा नांवाचे रजपूत हे प्रथम सौराष्ट्रांत येऊन राहिले. वीसलदेवाचा वीरम म्हणून एक भाऊ होता. त्यानें वीरमगांव शहराची स्थापना केली. वीसलदेवाच्या मागून अर्जुनदेव वाघेल हा राजा झाला. तो शिवभक्त असून अन्हिलवाड येथें राज्य करीत होता. अर्जुनामागून लवणराजा व सारंगदेव असे अनुक्रमानें राजे झाले.

सारंगदेवाचे पश्चात् कर्ण वाघेल नांवाचा राजा अन्हिलवाडचे गादीवर बसला. सन १२९६त या कर्णाचें राज्य दिल्लीचा पराक्रमी सुलतान अला-उद्दीन खिलजी यानें हिरावून घेतलें. याप्रमाणें गुजराथेंतील हिंदु-राज्याची समाप्ति झाली.

४. अला-उद्दीन व राजा कर्ण, (सन १२९६-१३१६).— अला-उद्दीन खिलजीनें हिंदुस्थानांतील अनेक राज्यांचा पाडाव करून अपरंपार द्रव्य कमाविलें, ही हकीकत मागें येऊन गेलीच आहे. स. १२९७ त त्यानें आपला भाऊ आलफ्खान व वजीर नुसतखान यांस गुजराथ काबीज करण्याकरितां पाठविलें. त्यांच्या अवाढव्य फौजेनें गुजराथ देशाची अतिशय पायमल्ली केली. अन्हिलवाडचा किल्ला घेऊन तेथें मुसलमानांनीं आपलें ठाणें बसविलें. तेथील राजा कर्ण वाघेल दक्षिणेंत रामदेवराव यादव याचे आश्रयास जाऊन राहिला.

मुसलमानांच्या टोळधाडीपुढें एका मागून एक सर्व हिंदु राज्यें हात-टेंकीस येऊन आटपलीं, ह्याचें कारण मुसलमानांचा कडवेपणा हें तर एक आहेच, पण त्याजबरोबरच हिंदु राजांची नीतिमत्ता बिघडलेली होती, हें आपल्यास मोठ्या दुःखानें कबूल करावें लागतें. गुजराथच्या कर्ण राजाची गोष्ट अशीच आहे. भाट लोकांनीं कर्णाच्या अनाचाराचें पुष्कळ वर्णन केलें आहे. माधव नांवाचा एक नागरब्राह्मण कर्णाचा मुख्य प्रधान होता. तो कोठें बाहेर गेला असतां, त्याच्या रूपवती पत्नीस कर्णानें बलात्कार करून आपल्या वाड्यांत नेलें. तिला सोडविण्याचा

प्रयत्न माधवाचा भाऊ केशव ह्यानें केला, पण त्यांत तो मारला गेला. परत आल्यावर माधवास ही हकीगत कळली. पण त्याला या दुष्कृत्याचा सूड स्वतः घेतां येईना, तेव्हां तो तसाच दिल्लीचा सुलतान अला-उद्दीन याजकडे गेला. तेथें कर्ण राजाच्या जुलमाची कच्ची हकीगत अला-उद्दिनास सांगून, गुजराथदेशावर स्वारी करण्याविषयीं माधवानें सुलतानाचें मन वळविलें. कर्णाच्या ठिकाणीं कांहींच पराक्रम नसल्यामुळें लढाईची तजवीज करण्याचें सोडून त्यानें बायकांप्रमाणें शहरचे सर्व दरवाजे बंद करून स्वतःस व नगरवासी लोकांस आंत कोंडून घेतलें. माधवाच्या माथींही स्वामिद्रोहाचा दोष येतो. त्यानें मुसलमानांस देशांत आणिल्यामुळें *गुजराथदेशाचा नाश होऊन लोक देशोधडीस लागले; सर्वत्र अशांति, असुख व अस्वास्थ्य माजलें; आणि स्वराज्य व स्वसत्ता ह्यांचें सर्वांशीं निर्मूलन होऊन सर्वांच्याच* वांट्यास हीन पारतंत्र्य आलें.

कर्णानें बायकामुलें व संपत्ति ह्यांचा लोभ सोडून केवळ क्षणभंगुर जिवाकरितां पलायन केलें. पाठीमागें त्याचें राज्य व घरदार मुसलमानांचे स्वाधीन झालें. त्यांत कर्णाची रूपवती स्त्री कमलादेवी हीही त्यांचे हातीं सांपडली. तिची रवानगी अला-उद्दीनकडे झाली. तिच्याशीं लग्न लावून त्यानें तिला आपल्या जनानखान्यांत ठेविलें. अन्हिलपट्टण घेतल्यावर, आलफखान व नुसतखान हे खंबायतेवर गेले. खंबायत हें त्या वेळीं विशेष भरभराटीचें व मातबर शहर होतें. ह्या ठिकाणीं नुसतखानास एक गुलाम मिळाला, तो त्यानें बादशहास नजर केला. तोच गुलाम पुढें मलीक काफूर म्हणून अला-उद्दीनचा कलिजा होऊन बसला. खंबायत लुटल्यावर मुसलमानांची धाड सोमनाथावर गेली. तेथील देवळांची त्यांनीं महंमूद गज्नवीप्रमाणें फिरून धूळधाण केली. सन १३०४त अला-उद्दीननें आलफखानाच गुजराथचा सुभेदार नेमिलें. आलफखानानें पट्टणास एक भव्य मशीद बांधिली, ती अद्यापि आहे.

मलीक काफूर यास अला-उद्दीननें दक्षिण देश जिंकण्यास पाठविलें, तेव्हां गुजराथची फौज घेऊन त्याच्या मदतीस जाण्याविषयीं आलफखानासही हुकूम झाला. कमलादेवीची मुलगी देवलदेवी हिचा शोध लावून तीस दिल्लीस पाठवावी, असाही मलीक यास हुकूम होता. कर्ण राजा देवलदेवीसह बागलाणांत राहत होता. कर्ण आपल्या मुलीस खुषीनें

मलीकचे स्वाधीन करीना. तेव्हां दोघांचा संग्राम सुरू झाला. दोन महिनेपर्यंत कर्णानें मुसलमानांस दाद दिली नाहीं. इतक्यांत देवगडच्या राजाचा मुलगा शंकरदेव ह्यानें देवलदेवीची कर्णराजाकडे मागणी केली. मराठ्यांचें कुळ आपल्याहून हलकें असें समजून ही मागणी कबूल करण्याचा कर्णाचा विचार नव्हता. पण प्रस्तुतच्या बिकट प्रसंगाकडे नजर देऊन त्यानें शंकरदेवाचें म्हणणें कबूल केलें. देवलदेवीची रवानगी देवगडास होत आहे, हें ऐकून त्या दोघां मुसलमान सरदारांस धास्ती पडली, कीं देवलदेवी हातची गेल्यामुळें बादशहाची आपणांवर इतराजी होईल. म्हणून ते दोघेही पाळतीवर राहून कर्णाच्या पाठोपाठ देवगडास जाऊं लागले. बराच पल्ला काढिला, तरी देवलदेवीचा पत्ता लागेना. तिजविषयीं मुसलमानांची अगदीं निराशा झाली. एके दिवशीं दोनतीनशें लोकांची एक टोळी वेरूळचीं लेणीं पाहून परत येत असतां वाटेंत शंकरदेवाचे कांहीं स्वार भेटले. त्यांजपाशीं देवगडचें निशाण होतें. हे लोक देवलदेवीस घेऊन जात असतील असें वाटून मुसलमानांनीं त्यांस अडविलें. पुढें युद्धप्रसंग होऊन देवलदेवी मुसलमानांस सांपडली. आलफखानानें तिला दिल्लीस रवाना केलें. तिला पाहून कमलादेवी व अला-उद्दीन यांस परमानंद झाला. देवलदेवीचें लग्न शहाजादा खिजरखान याजबरोबर झालें. इकडे राजा कर्ण दुर्धर यातना व दुःखें ह्यांनीं पीडिलेला असा लवकरच अज्ञातवासांत मरण पावला.

ज्या अन्हिलवाड शहरांत स्वराज्य असल्यामुळें स्वतंत्रता व लक्ष्मी मूर्तिमंत नांदत होत्या, त्या शहराची ह्या वेळीं जी दुर्दशा झाली, तिचें वर्णन करणें अशक्य आहे. पूर्वी सुखांत व चैनींत असलेल्या लोकांचें वैभव व ऐश्वर्य नष्ट होऊन ते भिकेस लागले. मुसलमानांच्या लुटीनें व बळजबरीनें सर्व शहर कंगाल व उजाड होऊन गेलें. अन्हिलपट्टणांत जीं मोठमोठीं सुंदर देवालयें व राजमंदिरें होतीं तीं दरोबस्त मोडून पडलीं. त्यांचे जागीं मशिदी व रोजे उभे झाले.

अला-उद्दीननें अपल्या राज्याचा विस्तार पुष्कळ केला, पण गुजराथ प्रांत त्याचे हातांत फार दिवस टिकला नाहीं. त्याच्या सुभेदारांनींच तो बळकाविण्याचा अनेक वेळां प्रयत्न केला, आणि वास्तविक रीत्या ह्या काळीं तेच ह्या प्रांताचा स्वतंत्र उपभोग घेत होते.

५. दिल्लीच्या सुलतानांचा अंमल, (सन १३१६-१३९१).— मुसलमानांनीं गुजराथेंत बराच मुलूख काबीज केला, तरी पुष्कळ भाग रजपुतांचे अमलाखालींच होता. साबरमतीच्या पश्चिमचा विस्तृत प्रदेश वाघेल राजांकडे असून उत्तरेकडील डोंगरी प्रदेश परमार व राठोड यांचे ताब्यांत होता. कच्छचें रण व खंबायतचें अखात ह्या भागांत झाला लोकांचें राज्य होतें. पावनगड व त्याचे पूर्वेकडील प्रांत, त्याचप्रमाणें गिरनार, जुनागड वगैरे ठिकाणें खेंगार वंशांतील राजांचे ताब्यांत होतीं.

दिल्लीचें पद अला-उद्दीनचा मुलगा मुबारिक ह्याच्या ताब्यांत आल्यावर, त्यानें कमालुद्दीनखान व ऐनुल्मुल्क् मुलतानी यांस फौज देऊन गुजराथच्या बंदोबस्तास पाठविलें. त्यांपैकीं कमालुद्दीनखान मारला जाऊन मुलतानी हा एकटाच सरदार गुजराथेंत राहिला. तो थोडा बहुत बंदोबस्त करीत आहे, इतक्यांत दिल्लीहून मुबारिक खिलजीनें आपला सासरा मलीक दिनार यास जाफरखान असें नांव देऊन गुजराथच्या सुभ्यावर पाठविलें. परंतु थोडेच दिवसांत जाफरखानास सुलतानानें परत बोलावून ठार मारलें. नंतर दिल्लीचा कारभारी खुस्रूखान याचा भाऊ हिसामुद्दीन यास गुजराथची सुभेदारी मिळाली. हिसामुद्दीन हा मूळचा हिंदु होता. त्यानें मोठ्या युक्तीनें मुसलमानांचा गुजराथेंतून उठाव करण्याचा गुप्त प्रयत्न चालविला. ही बातमी दिल्लीस कळतांच मलीक वजेउद्दीन खुरेशी याची गुजराथच्या सुभ्यावर नेमणूक झाली. हा मोठा चलाख व शूर होता. त्यानें आपलें वजन गुजराथेवर चांगलें बसविलें. पण त्यालाही लवकरच परत जावें लागलें.

पुढें दिल्लीस राज्यक्रान्ति होऊन सुलतानी तख्त तुघ्लख वंशाकडे गेलें. ग्यासुद्दीन तुघ्लखनें ताजुल्मुल्क नांवाचा कोणी एक सरदार गुजराथचे सुभ्यावर पाठविला. पुढें सन १३२५ त महंमद तुघ्लख तख्तावर येऊन त्यानें महंमद अमाझ नांवाच्या एका गृहस्थास गुजराथची सुभेदारी दिली. नंतर ह्या प्रांतांत बंड झाल्यामुळें सुलतान स्वतः मोठ्या फौजेनिशीं त्यावर आला; आणि सुरत व खंबायत हीं शहरें लुटून व पाटण येथें कांहीं दिवस मुक्काम करून परत गेला. तरी पुनः इकडे एकसारखे बंडावे सुरू होते, ते मोडीत तो सिंधप्रांतांत गेला असतां ठट्टा शहरीं मरण

पावला. महंमदानें आपल्या कित्येक भरंवशाच्या मुसलमान सरदारांस गुजराथेंत जमिनी देऊन ठेविलें.

फिरोज तुघ्लखच्या कारकिर्दीत गुजराथचा बंदोबस्त विशेष चांगला झाला नाहीं. सन १३७६ मध्यें सुलतानास असें आढळलें, कीं गुजराथचा वसूल कमी कमी होत चालला आहे, तेव्हां त्यानें पूर्वीचा सुभेदार जाफरखान यास परत बोलावून शम्सुद्दीन दमघानी नांवाच्या सरदारास गुजराथच्या सुभ्यावर पाठविलें. पण त्याच्या हातूनही कांहीं विशेष चांगला बंदोबस्त होईना. गुजराथेंत एकसारखीं बंडें चालू होतीं. अखेरीस फऱ्हतुल्मुल्क रास्तीखान हा गुजराथचा अंमलदार झाला. दिल्लीस वरचेवर भानगडी झाल्यामुळें गुजराथेंत ह्या सरदारास चांगलें फावलें. त्यानें हिंदु जमीनदारांच्या मदतीनें गुजराथ प्रांत स्वतंत्र करण्याचा विचार चालविला. ह्या हकीकती दिल्लीस कळल्यावर सुलतानानें सन १३९१त मूळचा हिंदु असून मुसलमान झालेला असा एक शूर गृहस्थ पाहून त्यास मुज्फरखान हा किताब व हिंदु रीतीचीं छत्रचामरादि राजचिन्हें देऊन गुजराथेंत पाठविलें. त्याची व रास्तीखानाची सिद्धपूर नजीक लढाई झाली. तींत रास्तीखान पराभव पावून मारला गेला, आणि मुज्फरखान हा विजयी होऊन कायमचा सुभेदार झाला, (सन १३९१).

ह्या काळीं एक सुभेदार काढून दुसरा नेमण्याची मोठी पंचाईत होती. लढाई झाल्याशिवाय पहिला सुभेदार आपला अधिकार सोडीत नसे, आणि अशा घालमेलीचा परिणाम सर्वदा रयतेस भोगावा लागे. उभय सुभेदारांच्या फौजांस दाणावैरण पुरविण्याकडे हजारों लोक खपत. गांवच्या लोकांस उपाशीं राहून फौजांकडे धान्य वगैरेचा पुरवठा करावा लागे. पाहिजे त्या इसमांस बेगारीस व वेठीस धरून नेत. जिकडे तिकडे दंगेधोपे चालत. तशांत मुसलमान फौज अत्यंत निर्दय व बेकैद असे.

६. गुजराथचे स्वतंत्र सुलतान, (१३९६–१५७२). मुज्फरशहा.— मुज्फरखान ह्यानें लवकरच आसपासच्या सर्व राजांस जिंकिलें. हिंदुधर्माची त्यानें विशेष पायमल्ली केली. ईडरचा राजा रणमल्लजी याजबरोबर सन १३९३त युद्ध करून त्यानें मोठा जय मिळविला.

त्याचप्रमाणें खानदेश व माळवा येथील सुलतानांकडूनही त्यानें करभार मिळविला. मुज्फरखान हिंदु धर्माचा पक्का द्वेष्टा होता. हिंदूंच्या देवालयांचा विध्वंस करणें वगैरे अनेक दुष्ट कृत्यें त्यानें केलीं. सोमनाथच्या देवळाचे दगड काढून त्यानें ते मशिदीला लाविले. सन १३९६ पासून 'मुज्फरशहा' असें नांव घेऊन तो गुजराथेंत स्वतंत्रपणें राज्य करूं लागला. उत्तरहिंदुस्थानांत त्या वेळेस विशेष धामधूम चालली होती. तयमूरलंगानें दिल्लीचें तख्त बळकाविलें होतें. ही संधि मुज्फरशहाचे पथ्यावर पडली. त्यानें आपल्या नांवाचें नाणें पाडून व आपली द्वाही फिरवून मशिदींतून आपल्या नांवानें खुत्बा वाचविला. तातारखान म्हणून त्याचा एक पराक्रमी पुत्र होता. त्यानेंही राज्यवृद्धि करण्याच्या कामीं बापास पुष्कळ कुमक केली. एकदां तर ह्या बापलेकांचें पटेनासें होऊन तातारखानानें बापास कैद करून स्वतः राज्य बळकाविलें. पण दुर्दैवानें तो लवकरच मरण पावला, आणि मुज्फरशहा पुनः कारभार करूं लागला. त्याचा नातू म्हणजे तातारखानाचा मुलगा अहंमदखान हाही मोठा पराक्रमी निघाला. बापाप्रमाणेंच त्यानें आजोबास कैद करून विषाचा पेला पिण्यास पाठवून दिला. असल्या दुष्ट नातवाचें सुद्धां अभीष्ट चिंतून व त्याचें 'ईश्वरा कल्याण कर' असें मागणें मागून मुज्फरखान तें विष प्याला, आणि लगेच मरण पावला, (इ. स. १४११).

सुलतान अहंमदशहा, (१४११-१४४३).—अहंमदशहा आपल्या वयाच्या एकविसावे वर्षी गुजराथच्या राज्यावर बसला. फिरोजखान नामक त्याच्या चुलतभावानें आरंभींच आपल्यास राज्य मिळण्याविषयीं भंडोच येथें बंड केलें. उभयतांचें युद्ध होऊन फिरोजखानाचा पराभव झाला. त्या स्वारीहून पट्टणास परत येत असतां रस्त्यावर एक नवीन शहर बसवून त्यास त्यानें आपलें नांव दिलें, (सन १४१२), तें अहंमदाबाद या नांवानें अद्यापि प्रसिद्ध आहे. पट्टण येथून आपलें तख्त उठवून अहंमदशहानें तें अहंमदाबादेस आणिलें. तेव्हांपासून अहंमदाबाद शहर गुजराथची राजधानी झालें. हें शहर ज्याच्या मसलतीनें वसलें, त्याचें नांव शेख महंमद खतु गंजबक्ष असें होतें. पूर्वी त्या ठिकाणीं जीं शहरें होतीं त्यांचीं नांवें कर्णावती व श्रीनगर अशीं होतीं. अहंमदाबाद शहर साबरमतीच्या पूर्वकांठीं आहे. साबरमतीचें पौराणिक नांव 'साभ्रमती' असें

होतें. 'पद्मपुराणांत' ह्या नदीचें माहात्म्य पुष्कळ वर्णिलें आहे. पूर्वी अहंमदाबाद शहराची वस्ती वीस लाख होती असें सांगतात. हल्लीं शहराबाहेर पडित भाग पुष्कळ दिसतात, त्यावरून वीस लाख वस्तीचें जरी हें शहर नसलें, तरी हल्लींच्या पेक्षां पुष्कळ मोठें असावें असें दिसतें. मुसलमानी रियासतींत हें शहर भरभराटींत होतें. मराठ्यांच्या अमलांत तेथील वस्ती बरीच खालावली. अलीकडे त्याची पुनः वृद्धि होऊं लागली आहे. मुसलमानी राज्यकर्त्यांचें हें राजधानीचें शहर असल्यामुळें, त्या वेळच्या वैभवाचीं व संपत्तीचीं दर्शक अशीं पुष्कळ स्थळें अद्यापि ह्या शहरांत आहेत. मोठमोठ्या इमारती, मशिदी वगैरे प्रेक्षणीय आहेत. सभोंवार सात मैल घेराचा विस्तीर्ण कोट असून भद्र ऊर्फ भद्दर नांवाचा एक अंतरकोट आहे. मोगल बादशहांचे सुभेदार अहंमदाबादेसच राहत.

अहंमदशहा पराक्रमी होता. त्यानें माळवा, सौराष्ट्र वगैरे सभोंवारच्या प्रांतांवर आपली खंडणी बसविली. तरी हिंदु धर्माचा पाडाव करण्याकरितां विशेष इलाज घेऊन त्या कामीं त्यानें आपलें नांव अजरामर करून ठेविलें आहे. गुजराथ देश मूळचा निव्वळ हिंदूंचा होता. ह्यापूर्वी राज्यकर्त्यांस त्या धर्माचा उच्छेद करण्यास सवड मिळाली नाहीं. अहंमदशहानें सन १४१४ त ताजुल्मुल्क नामक एक मोठा धर्माभिमानी गृहस्थ मुसलमानी धर्मवृद्धीच्या स्वतंत्र खात्यावर मुख्य नेमून, त्यास हिंदूंच्या देवालयांचा व मूर्तींचा दरोबस्त नाश करण्याची सक्त ताकीद दिली. ताजुल्मुल्कानें हे हुकूम मोठ्या बहाद्दरीनें अमलांत आणिले. त्या वेळीं सर्व देशभर देवळें पाडण्याची जी धामधूम उडाली तिचें वर्णन करणें अशक्य आहे. जिकडे पाहवें तिकडे देवळें पडत आहेत आणि त्या ठिकाणीं मशिदी उठत आहेत. त्याचप्रमाणें राज्यें खालसा करण्याचा सपाटाही कमी चालला नव्हता. अनेक लहान लहान जमीनदारांस व गिरासिये लोकांस त्यानें आपल्या अमलाखालीं आणिलें. सन १४२० पासून बरींच वर्षें स्वस्थ बसून अहंमदानें विश्रांति घेतली. कारकीर्दीचे अखेरीस महाराष्ट्रांतील बहामनी सुलतानांबरोबर उत्तरकोंकण प्रांतीं ह्याचे युद्धप्रसंग चालले. तींत बहुशः अहंमदशहासच जयप्राप्ति झाली. सन १४४३त जुलईच्या ४ थ्या तारखेस अहंमदशहा अहंमदाबाद येथें मरण पावला.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

अहंमदशहा हा मोठा न्यायी होता अशी त्याची कीर्ति आहे. त्यानें [र]जपुतांशीं शरीरसंबंध केले. त्याचे पश्चात् त्याचा पुत्र महंमदशहा गुजराथच्या तख्तावर बसला.

महंमदशहा, (सन १४४३–१४५१).—आरंभींच ईडरचे राजाचा व ह्याचा तंटा लागला. कांहीं दिवस युद्धप्रसंग चालून ईडरचे राजानें आपली मुलगी सुलतानास दिली आणि त्याचें समाधान केलें. स. १४४९ त चांपानेरचा रावळ गंगादास ह्याचा त्यानें पराजय केला. इतक्यांत गंगादासच्या वतीनें माळव्याचा सुलतान महंमद खिलजी ह्यानें अहंमदाबादेवर स्वारी करण्याची तयारी चालविली. महंमदशहा आपल्या लोकांस प्रिय नव्हता. दरबारच्या कांहीं मंडळीनें गुप्त बेत करून त्यास विषप्रयोगानें ठार मारिलें, (सन १४५१).

कुत्बशहा, (सन १४५१–१४५८).—महंमदशहा मरण पावल्यावर त्याचा मुलगा कुत्बशहा तख्तनशीन झाला. माळव्याचा सुलतान महंमद खिलजी यानें कुत्बशहावर स्वारी करून त्याचा पराभव केला. पुढें उभयतांनीं तह करून दोघांनीं मिळून मुसलमानी धर्म वाढविण्याची खटपट करण्याचें ठरविलें. परंतु हा ठराव अमलांत आला नाहीं. मेवाडचा कुंभराणा त्या वेळीं हिंदु राजांत अत्यंत प्रबळ व चतुर होता. त्यानें रजपुतान्यांत अनेक किल्ले बांधिले. हा स्वतः उत्तम कवि असून त्याची प्रियभार्या मीराबाई ही तर आपल्या कवनशक्तीनें साधुवर्गांत प्रसिद्ध होऊन गेली आहे. मीराबाईचा मठ द्वारकेस प्रसिद्ध आहे. कुंभराण्याच्या प्रतापापुढें आसपासच्या मुसलमानी राज्यकर्त्यांचें कांहीं चाललें नाहीं. तथापि कुंभराण्यास बुडविण्यास सर्व मुसलमान टपून बसले होते. नागोर येथें कुत्बशहानें कुंभराण्याचा स. १४५८ त पराभव केला. नंतर कुत्बशहाही त्याच वर्षीं मरण पावला.

महंमूद बेगडा, (सन १४५८–१५११).—कुत्बशहाचे मागून त्याचा चुलता दाऊदखान राज्यकारभार पाहूं लागला. पण एक महिन्यांतच तो नालायक ठरून त्याचा सावत्र भाऊ महंमूद हा तख्तनशीन झाला. त्यानें त्रेपन्न वर्षें राज्यकारभार करून गुजराथच्या इतिहासांत मोठा नांवलौकिक संपादन केला. ह्यास मुसलमानी इतिहासकार महंमूद बेगडा असें म्हणतात. त्याची आख्यायिका अशी आहे, कीं जुनागड व पावागड

हे दोन गड त्यानें काबीज केले, तेव्हांपासून 'बेगडा' असें त्याचें नांव पडलें. सन १४६१ त माळव्यावर फौज पाठवून त्यानें तेथच्या राजापासून बहामनी राज्याचें संरक्षण केलें. सन १४६८त कडेकोट तयारीनिशीं त्यानें सौराष्ट्रदेशावर स्वारी केली, आणि पुष्कळ प्रांत काबीज करून गिरनारच्या किल्ला घेऊन तो अहंमदाबादेस परत आला. पुनः एकवार हिंदु धर्म बाटविण्याच्या इराद्यानें त्यानें सौराष्ट्रावर स्वारी केली. गिरनारच्या राजानें आपल्या प्रजेस उपद्रव न होऊं देण्याबद्दल होते तेवढे प्रयत्न केले, पण महंमूद बेगडा कांहीं केल्या ऐकेना. शेवटीं त्यानें त्या राजास बाटवून मुसलमान केलें. तेव्हांपासून जुनागड येथें बादशहा स्वतः पुष्कळ दिवस राहूं लागला. म्हणून अहंमदाबादेप्रमाणेंच त्या शहरास नवीन वैभव प्राप्त झालें. जुनागडाहून कच्छ, सिंध, बलुचिस्तान येथपर्यंत महंमूदशहानें स्वाऱ्या करून विजय संपादन केले. राणपूरच्या जमेदार राणजी गोहेल ह्याची बायको व महंमूदशहाची बायको ह्या सख्या बहिणी होत्या. राणजीच्या बायकोस बाटवून मुसलमान करण्याचा महंमूदशहानें घाट घालून राणपूरवर चाल केली. राणजीनें रजपुतास योग्य अशा बाण्यानें पुष्कळ दिवसपर्यंत आपला बचाव केला. पण अखेरीस त्याचा पराभव होऊन तो धारातीर्थी पतन पावला. त्याच्या पतिनिष्ठ भार्येनें त्याजबरोबर सहगमन केलें. अशा प्रकारें ह्या मुसलमानांचा जाच हिंदूंस सोसावा लागे. आणखी अनेक जमेदारांस महंमूदशहानें जबरदस्तीनें मुसलमानी धर्मांत ओढिलें. द्वारका, खंबायत, सुरत वगैरे ठिकाणीं चांचे लोकांचा विशेष उपद्रव असे. महंमूदशहानें चांचे लोकांचा राजा भीमदेव यास पकडून, हाल करून अहंमदाबाद शहरांत ठार मारिलें, (सन १४८२). तेणेंकरून चांचे लोकांचा चांगला बंदोबस्त झाला.

सन १४८३ मध्यें सुलतानानें चांपानेर शहरास वेढा घातला. चांपानेरास त्या वेळेस रजपूत रावळ पटाई जयसिंह हा राज्य करीत होता. रजपूत लोक जिवावर उदार होऊन लढले. अखेरीस किल्ला व शहर मुसलमानांच्या हस्तगत झालें. जयसिंग रावळ यास अहंमदाबादेस नेऊन तो मुसलमान होत असतांही, त्याचें म्हणणें कबूल न करितां सुलतानानें त्यास ठार मारिलें. चांपानेर हें पुरातन काळचें विख्यात शहर पावनगडच्या पायथ्याशीं होतें. त्याचा मुसलमानांनीं विध्वंस केला, तेव्हां

तेथचे सर्व लोक व कारागीर गुजराथ प्रांताच्या इतर शहरांत पसरले. हल्लीं ह्या शहराचा पडका भाग पावागडच्या पायथ्याशीं दिसून येतो, आणि गडावर कालिकामातेची यात्रा भरत असते.

पोर्तुगीझ लोकांनीं पंधराव्या शतकाच्या अखेरीस हिंदुस्थानांत प्रवेश केला. सन १५०७ त गुजराथच्या किनाऱ्यावर ते आले. महंमूदशहानें आपलें आरमार त्यांजवर पाठविलें. एक दोन लढाया झाल्या; पण सुलतानाच्या हातून ह्या पाश्चात्यांचा बंदोबस्त न होतां, दमण, दीव, माहीम वगैरे ठिकाणें त्यांनीं काबीज केलीं. ह्या प्रसंगीं तुर्कस्तानचा बादशहा बायझीद याजकडून अहंमदाबादच्या सुलतानास पोर्तुगीझ लोकांशीं लढण्यासाठीं मदत आली होती.

गुजराथ प्रांत उत्तरेकडील वालुकामय मैदानांनीं व इतर बाजूस डोंगराळ रांगांनीं तुटलेला असल्यामुळें, तो आरंभीं एकाएकीं मुसलमानांच्या हस्तगत झाला नाहीं. समुद्रमार्गानें मात्र तो सुगम आहे; आणि ह्या सोयीमुळेंच त्याचें महत्त्व वाढलें आहे. सुपीक जमीन व माफक हवा ह्यांच्या योगानें व्यापारदृष्ट्या गुजराथ प्रांताचें महत्त्व प्राचीन काळापासून अतोनात होतें. खंबायत, दीव, सुरत व भडोच हीं बंदरें प्राचीन काळीं सुद्धां व्यापाराकरितां नांवाजलेलीं होतीं. हिंदुस्थानचा परदेशाशीं व्यापार ह्या गुजराथ प्रांतांतूनच विशेषतः चालत होता. ह्या व्यापाराच्या निमित्तानें आरब व पोर्तुगीझ ह्यांचे झगडे किती निकराचे झाले, आणि त्यांचा संपर्क युरोपीय राष्ट्रांस कसा पोंचला, त्याचें वर्णन, तसेंच अहंमदाबादच्या सुलतानांचे व पोर्तुगीझांचे जे व्यवहार घडले त्यांचें वर्णन, ब्रिटिश रियासतींत आलें आहे.

सन १५१०त सुलतानानें पाटणवर स्वारी केली. तेथून परत आल्यावर तो लवकरच मरण पावला. ह्या सुलतानाची कीर्ति गुजराथेंत विशेष प्रसिद्ध आहे. रजपुतांमध्यें जसा सिद्धराज जयसिंग तसाच मुसलमानांत महंमूद बेगडा पराक्रमी होता असें इतिहासकार लिहितात. पराक्रम, शक्ति, न्यायाचरण, जनहितेच्छा, धर्माभिमान यांजविषयीं महंमूद चांगला स्तुतीस पात्र आहे. परंतु तापट व चपल स्वभावाचा असल्यामुळें, मुसलमानेतर लोकांस त्याजपासून पुष्कळ त्रास झाला. गुजराथेंत ज्या कांहीं प्रसिद्ध प्रसिद्ध इमारती आज विद्यमान आहेत, त्या बहुतेक महंमुदाच्या

हातच्या आहेत. अहंमदाबादेनजीक महंमुदाबाद म्हणून जें शहर आहे तें ह्या सुलतानानें स्थापिलें. त्या ठिकाणीं तो वारंवार जाऊन राहत असे.

दुसरा मुज्फरशहा, (सन १५११–१५२६).—महंमूद बेगडा ह्याचा मुलगा खलील हा आपणास मुज्फरशहा असें नांव घेऊन त्याचे पश्चात् तख्तनशीन झाला. आरंभींच त्यास माळव्याच्या सुलतानाच्या मदतीस जावें लागलें. मागें ईडरच्या रजपूत राजानें बंड करून मुसलमानांचा अंमल झुगारून देण्याचा प्रयत्न केला. पण त्यांत रजपुतांचा पराजय होऊन मुज्फरशहानें ईडर शहराचा विध्वंस केला. पुढें ह्या शहरांत भारमल्ल व रायमल्ल ह्या दोघां हक्कदारांमध्यें तंटा उपस्थित होऊन मुज्फरशहानें भारमल्लास मदत दिली. रायमल्लास मेवाडच्या संगराण्याची मदत असून तो संगराण्याचा जांवई होता. हे युद्धप्रसंग पुष्कळ दिवस चालून अखेरीस भारमल्लास ईडरचें राज्य प्राप्त झालें.

अहंमदाबादेस मुज्फरशहा राज्य करीत असतां, मेवाडांत चितोडगडावर प्रसिद्ध शूर पुरुष राणासंग राज्य करीत होता. त्यास चिडविण्याकरितां म्हणून ईडरच्या मुसलमान ठाणेदारानें आपल्या दारांत एक कुत्रा बांधून त्याचें नांव संगराणा असें ठेविलें. त्या नांवानें तो त्या कुत्र्यास हांक मारी. दुसऱ्याही अनेक प्रकारांनीं संगराण्यास मुसलमानांनीं चिडविलें होतें. त्याचा सूड घेण्याच्या उद्देशानें संगराण्यानें मोठ्या फौजेनिशीं ईडरवर चाल केली. ह्या प्रसंगीं त्या शूर राण्यानें मुसलमानांचा अनेक ठिकाणीं खरपूस समाचार घेतला, आणि आजपर्यंत हिंदूंस दिलेल्या नाहक त्रासाचा सूड उगविला. त्या वेळीं परमेश्वर आपणांस सोडविण्यास आला असें सर्व हिंदूंस वाटलें. हिंदु लोकांस ह्या स्वारीनें बिलकुल त्रास झाला नाहीं, किंवा त्यांच्या वित्ताचें हरण कोणीं केलें नाहीं. मुसलमानांवर विजय संपादून आपला यशोदुंदुभी वाजवीत व कीर्तिध्वज फडकावीत, संगराणा मोठ्या थाटानें चितोडगडास परत गेला, (सन १५१९).

परंतु ईडरप्रांत रजपुतांच्या ताब्यांत फार दिवस राहिला नाहीं. संगराणा परत जातांच मुज्फरशहानें फौज पाठवून तो परत घेतला. पुढें लवकरच संगराणा व मुज्फरशहा यांचा तह ठरला. त्यामुळें गुजराथेंत कांहीं दिवस युद्धसंग्राम झाला नाहीं. इराणच्या शहाचा ह्या सुलता-

नाशीं विशेष स्नेहभाव होता, आणि त्याजकडून ह्यास पुष्कळ नजराणेही आले होते. सन १५२४ त मुज्फरशहाचा थोरला मुलगा बहादूरशहा हा बापावर रुसून दिल्लीस जाऊन राहिला. त्यामुळें उदासीनता प्राप्त होऊन मुज्फरशहा सन १५२६त मरण पावला.

बहादूरशहा, (सन १५२६—१५३६).—मुज्फरशहानंतर त्याचा दुसरा मुलगा सिकंदरशहा तख्तारूढ झाला; पण लवकरच त्याचा खून झाल्यामुळें राज्याचा खरा वारस बहादूरशहा हा दिल्लीहून येऊन अहंमदाबादचा सुलतान झाला. तो मोठ्या उदार स्वभावाचा व दयाळु होता. गुजराथेंत मोठा दुष्काळ पडला असतां, सुलतानानें जिकडे तिकडे अन्नसत्रें व सदावर्तें घातलीं. दीव, जुनागड, खंबायत वगैरे ठिकाणीं फिरून त्यानें आपला अंमल कायम केला. सन १५२९त त्यानें निजामशाहीची राजधानी अहंमदनगर शहर लुटिलें, आणि तसाच माळव्यांत जाऊन तेथचा सुलतान महंमद खिलजी व त्याचे सहा मुलगे ह्यांस पकडून अहंमदाबादेस आणिलें. त्याचप्रमाणें उज्जनीचा राजा शिलादित्य यालाही स्वारी करून बहादूरशहानें पकडिलें. पण शिलादित्याचा भाऊ लक्ष्मणसिंह हा रायसेनच्या किल्ल्यावर होता. त्यास घेऊन येतों असें शिलादित्यानें वचन देऊन तो निघून भावाकडे गेला. पुढें ह्या दोघां भावांस चितोडच्या राण्याची मदत आली, आणि तिच्या योगानें ते चितोडगडास सुखरूप पोंचले. इकडे रायसेन किल्ला व दुसरीं पुष्कळ ठिकाणें बहादूरशहानें सर केलीं. पुढें चितोडगडावर फौज पाठवून तेथच्या राण्याचाही त्यानें पाडाव केला. याप्रमाणें बहादूरशहा दिवसेंदिवस प्रबळ होत चालला. आणखीही तो प्रबळ झाला असता, पण तितक्यांत दिल्लीचा मोंगल बादशहा हुमायून यानें गुजराथेवर स्वारी केली. खुरासानच्या सुलतानाचा नातू महंमद जमान मीर्झा हा कांहीं दिवस हुमायूनजवळ येऊन राहिला होता, तो पुढें हुमायुनास सोडून अहंमदाबादेस बहादूरशहाचा आश्रय करून राहिला. त्यास हुमायूनकडे परत पाठविण्याचें बहादूरशहानें नाकबूल केल्यामुळें, हुमायूननें गुजराथवर स्वारी केली. तसेंच चितोडगड काबीज करणारा रुचीखान नामक गुजराथचा पराक्रमी सरदार धन्यावर रुसून हुमायूनकडे जाऊन राहिला होता, त्याच्या माहितीनें हुमायूननें

गुजराथप्रांत सर केला. तेव्हां बहादूरशहा प्रथम मांडवगडास व तेथून चांपानेरास पळून गेला. पण दोनही ठिकाणीं निभाव न लागल्यामुळें तो दीव बंदराकडे निघून गेला. हुमायूननें सर्व प्रांत घेऊन अहंमदाबादेस आपला भाऊ हिंदाल यास ठेविलें, आणि पाटण व चांपानेर येथें दुसरे दोन सुभेदार नेमून, दिल्लीकडे शेरखान नामक सरदारानें बंडावा केल्याची वार्ता आल्यामुळें, गुजराथचा बंदोबस्त अर्धवट टाकून, हुमायून उतावळीनें दिल्लीस परत गेला, (इ. स. १५३६).

पुढें बहादूरशहानें फौजेची जमवाजमव करून दिल्लीच्या फौजेशीं सामना केला, आणि तिचा पराजय करून नऊ महिन्यांचे आंत आपलें सर्व राज्य परत मिळविलें.

इकडे दीव बंदरीं पोर्तुगीझ लोकांनीं फारच पुंडाई माजविली. ते लोक कोंकणपट्टींतील मुलूख भराभर काबीज करीत चालले. बहादूरशहानें आपली फौज त्यांजवर पाठविली. बरेच दिवस युद्धप्रसंग होऊन कांहींच निष्पन्न झालें नाहीं. अखेरीस उभयतांचा तह झाला. तेव्हां बहादूरशहास फिरंग्यांनीं आपल्या गलबतांवर भेटीस बोलाविलें; सुलतान भेटीस आल्यास आपणही परतभेटीस येण्याचें त्यांनीं कबूल केलें. ते येतील तेव्हां आपण त्यांचा नाश करूं असा बहादूरशहाचा विचार होता. पण बहादूरशहा प्रथम त्यांजकडे गेला असतां, त्यांनीं कपट लढवून त्यास व त्याच्या लोकांस समुद्रांत लोटून ठार मारिलें. येणेंप्रमाणें बहादूरशहाचा अंत झाला, (सन १५३६).

दुसरा महंमूदशहा, (स. १५३६–१५५४).–बहादूरशहाचा पुतण्या महंमूदशहा हा अकरा वर्षांचा असतां तख्तनशीन झाला. नऊ दहा वर्षेंपर्यंत दरबारांत दोघां सरदारांचे तंटे चालू होते. अखेरीस दोघांचाही बंदोबस्त करून महंमूदशहानें सन १५४५त राज्यकारभार आपल्या हातीं घेतला, आणि मोठमोठ्या कामांवर लायक माणसांची नेमणूक केली. लवकरच हाताखालच्या जहागीरदार लोकांचीं उत्पन्नें ह्यानें भराभर खालसा केलीं. त्यांत रजपूत व दुसरे हिंदु यांचें नुकसान झाल्यामुळें त्यांनीं बंडें केलीं. तेव्हां त्यांजवर सुलतानानें एकसारखें शस्त्र चालविलें; म्हणून सर्व हिंदूंत दारिद्य, दुर्मुखता व कंगालपणा शिरला,

आणि राजा व प्रजा यांजमध्यें बेबनाव होऊन ते एकमेकांचे शत्रु बनले. सरदार व कामदार लोकांतील तंटे एकसारखे चालूच होते. शेवटीं विश्वासू वजीर बुऱ्हाण-उल्मुल्क् बाबी ह्यानें एके दिवशीं रात्रीं बादशहाचा खून केला, आणि स्वतः सुलतानपद बळकाविलें. पण तें त्यास फार दिवस पचलें नाहीं. शेरखान नामक दुसऱ्या एका अमिरानें बुऱ्हाण यास ठार मारिलें.

दुसरा अहंमदशहा, (सन १५५४–१५६१).—पुढें राजघराण्यांतील अहंमदखान नांवाच्या एका पुरुषास तख्तावर बसवून सय्यद मुबारिक या सरदारानें आपणाकडे वजिरी घेतली. तरी सुलतान अल्पवयी असल्यामुळें दरबारचे तंटे मुळींच मिटले नाहींत, उलट ते ज्यास्तच वाढले. इतक्यांत खानदेशाच्या सुलतानानें गुजराथेवर स्वारी केली. पण गुजराथच्या फौजेनें त्यास मागें हटविलें. सन १५६१त उमराव लोकांकडून सुलतानाचा खून झाला.

तिसरा मुज्फरशहा, (सन १५६१–१५७२).—उमरावांनीं राजघराण्यांतील कोणा एका मुलास मुज्फरशहा असें नांव देऊन अहंमदाबादच्या तख्तावर बसविलें. वास्तविक पाहिलें, तर या वेळीं गुजराथेंत सर्व झोटिंगशाही माजली होती. सुलतानाच्या हातांत काडी इतकी सुद्धां सत्ता उरली नव्हती. सर्व राज्याचे तुकडे होऊन ते निरनिराळे सरदार बळकावून बसले होते. हिंदु प्रजेस तर कोणीच विचारीनासें झालें. दुकानदारी व मजुरी ह्यांशिवाय दुसरा धंदा त्यांस राहिला नव्हता. दरोबस्त फौज मुसलमानांनीं भरलेली होती. हिंदूंनीं गंध लाविलेलें सुद्धां मुसलमानांस खपत नसे. मुसलमान वस्तींत जाण्याची व घोड्यावर बसण्याची देखील हिंदु लोकांस बंदी होती. सारांश, गुजराथची बादशाही उलथून पडण्याची वेळ येऊन ठेपली. सर्व त्रासांतून रयतेस सोडविणारा कोणी पराक्रमी पुरुष आतां पाहिजे होता.

तयमूरलंगाचा वंशज सुलतान हुसेन मीर्झा ह्याचे तिघे मुलगे दिल्लींत अकबर बादशहाशीं भांडून गुजराथेंत येऊन राहिले. अशा संधीस इतिमादखान नामक एका उमरावानें अकबर बादशहास गुजराथेवर येण्याविषयीं पाचारण केलें. सन १५७२त अकबर बादशहा मोठ्या

फौजेनिशीं डीसा येथें येऊन उतरला, आणि तेथून एकदम अहंमदाबादेस गेला. मुज्फरशहा पळून गेला होता, त्यास त्यानें बंदोबस्तानें पकडून आणिलें. पुढें सर्व बंडखोर सरदार अकबरास शरण आले. आपण विजयी झालों आणि आतां आपली अंमलदारी व बादशाही सर्व लोकांस समजली पाहिजे, ह्या हेतूनें त्यानें हत्तीवर बसून अहंमदाबाद शहरांत मोठ्या थाटाची स्वारी काढिली. अहंमदाबादच्या रियासतींतील सर्व सरदारांस त्या स्वारींत त्यानें आपणाबरोबर घेतलें. नंतर मोठा दरबार भरवून आपल्या नांवचें नाणें पाडण्याचा ठराव केला. इत:पर दिल्लीच्या बादशहाचे अंमलाखालीं शांततेनें नांदण्याविषयीं त्यानें सर्व सरदारांस ताकीद दिली. कित्येक दंगेखोर होते त्यांचे जामीन घेतले; आणि तंटेबखेडे केल्यानें सर्व देशाची धूळदाण कशी होते हें सर्वांस समजावून सांगितलें. ह्याप्रमाणें सन १५७२, नोवेंबर ता. १८ रोजीं अहंमदाबादचें राज्य अकबराकडे गेलें, आणि त्यानें सर्व प्रकारचा बंदोबस्त केला. ह्यापुढचा गुजराथचा इतिहास मोगल बादशहांचे कार्किर्दींत येईल.

७. **गुजराथच्या इतिहासाचें पर्यालोचन.**—अर्वाचीन काळच्या इतिहासाची सुरुवात अकराव्या शतकापासून धरिली आहे. त्या अनुरोधानें इसवी सन ९४२ त चालुक्य वंशाच्या स्थापनेशीं सुरुवात करून सन १५७२ त अकबर बादशहानें गुजराथ प्रांत जिंकिला, तेथपर्यंत त्या प्रांताचा इतिहास थोडक्यांत वर दिला आहे. अन्हिलपट्टण येथें चालुक्य म्हणजे सोळंखी वंशाची सत्ता इ. स. ९४२ पासून १२१५ पर्यंत होती. सन १२१५ पासून १२९५ पर्यंत वाघेलवंशी राजांनीं गुजराथेंत राज्य केलें. सन १२९६ त दिल्लीचा सुलतान अला-उद्दीन खिलजी ह्यानें गुजराथ देश जिंकून दिल्लीच्या अमलाखालीं आणिला. सुमारें शंभर वर्षे हा प्रांत दिल्लीच्या सुलतानांकडे होता. सन १३९६ त मुज्फरखान नामक दिल्लीच्या सुभेदारानें गुजराथप्रांतांत स्वतंत्र राज्याची स्थापना केली, तेव्हांपासून सन १५७२ पर्यंत मुसलमानांचें स्वतंत्र राज्य ह्या प्रांतावर होतें. पुढें हा प्रांत मोगल बादशाहींत सामील झाला.

अर्वाचीन काळचा हिंदुस्थानांतल्या कोणत्याही भागाचा इतिहास घेतला, तरी लढाया, हल्ले, खून, जुलूम ह्यांपलीकडे इतिहासकारास ज्यास्त कांहीं नमूद करितां येत नाहीं ही मोठ्या दिलगिरीची गोष्ट

NATIONAL ARCHIVES OF INDIA

होय.* ह्या काळांत सामाजिक, राजकीय व इतर बाबतींत हिंदुस्थानचा ऱ्हास तीव्र वेगानें होत चालला होता, आणि ह्या काळाची भरंवसेलायक माहिती उपलब्ध नाहीं. हिंदूंवर मुसलमान राज्यकर्त्यांनीं धर्माच्या बाबतींत जुलूम केल्यास त्याजबद्दल मुसलमान इतिहासकार त्यांची तारीफच करितात. उलट राज्यकर्त्यानें अशा बाबतींत निष्पक्षपात दाखविल्यास ते त्यास दूषणें देतात. तथापि सारासार मानानें विचार करितां असें दिसतें, कीं गुजराथेंतील लोकांत जी एक प्रकारची विशिष्ट निःसत्त्वता व निर्वीर्यता आजकाल दिसून येते, तिचें मूळ कारण हा दोनतीनशें वर्षांचा मुसलमानी अंमल होय. गुजराथच्या लोकांवर मुसलमानी राज्यकर्त्यांनीं कसकसे जुलूम केले, त्यांचें वर्णन जागजागीं आलेंच आहे. ह्या प्रांताच्या आसपासही मुसलमानी राज्येंच ह्या काळांत होतीं. महाराष्ट्रांत बहामनी राज्य होतें. सिंध व माळवा ह्या प्रांतांवरही मुसलमानांचीच सत्ता होती. या राज्यकर्त्यांचे वारंवार झगडे चालत. त्यांत गुजराथ देश विशेष सुसंपन्न असल्यामुळें त्याजवर सर्वांची धाड येई. तीनशें वर्षांच्या काळांत लढाई व धामधूम झाल्याशिवाय दहा वर्षेंसुद्धां सुखानें गेलीं नाहींत; किंवा लोकांस आपल्या शेतांतील पिकें शांततेनें घरीं आणितां आलीं नाहींत. कित्येक सुलतान फार नामांकित व पराक्रमी झाले खरे, तरी पण त्यांचा सर्व लौकिक हिंदु लोकांचा व हिंदु धर्माचा पाडाव करण्यांतच दिसून आला. अकबर बादशहाप्रमाणें सर्व लोकांच्या ठिकाणीं समान दृष्टि ठेवून एखादें कृत्य केल्याचें उदाहरण गुजराथच्या इतिहासांत सांपडत नाहीं. हिंदु लोकांच्या मुलींशीं कित्येकांनीं लग्नें लाविलीं, पण तसें करण्यांत पुढें अकबर बादशहानें धारण केलेला सद्धेतु त्यांच्या मनांत नव्हता. केवळ हिंदूंचा अपमान करण्याकरितांच त्यांनीं तशी गोष्ट केली. गुजराथ प्रांत आरंभापासून हिंदु व जैन ह्या धर्मांच्या पुष्टीस अत्यंत योग्य असा होता. गुजराथेंत अनेक मंदिरें, देवस्थानें व तीर्थें होतीं. असें असतां त्या सर्वांचा लय होऊन प्रत्येक ठिकाणीं मुसलमानी धर्म गाजूं लागला. प्राचीन काळापासून आख्या पावलेली गुजराथची शिल्पकला व गृहरचनासौंदर्य यांस एक प्रकारचें विशिष्ट मुसलमानी स्वरूप प्राप्त झालें. सर्वांहून अतिशय जें राष्ट्राचें नुकसान झालें तें असें, कीं तीनशें वर्षांच्या ह्या अवधींत

पराक्रम गाजविण्याचे प्रसंग लोकांस प्राप्त न झाल्यामुळें ते सदैव दास्य-स्थितींत राहिले! मात्र असे प्रसंग बुद्ध्या आणावे लागतात, तसे ते आणण्याचा प्रयत्न हिंदूंनीं केलेला दिसत नाहीं. मुसलमानांच्या फौजेंत एकाही हिंदूचा शिरकाव होत नसे. लोक अज्ञानस्थितींत राहिले आणि चोरीचपाटीशिवाय त्यांस दुसरा धंदा उरला नाहीं. मुसलमानांत तरी ऐक्य होतें असें नाहीं. दरबारांतील सर्व कामदारांत दुष्मनगिरी मूर्तिमंत वसत होती. त्यामुळें परस्थांचें मात्र चांगलें फावलें. पोर्तुगीझ लोकांनीं हिंदुस्थानांत प्रवेश करून गुजराथचा किनारा व कोंकणपट्टी व्यापिली. त्यांचा प्रतिकार मुसलमानांच्यानें करवला नाहीं. युद्धकलेंत हिंदूंपेक्षां मुसलमान श्रेष्ठ, आणि मुसलमानांपेक्षां युरोपियन श्रेष्ठ असा प्रकार दिसून येतो.[१]

प्रकरण बारावें.

बहामनी राज्य.*

१. हिंदु-मुसलमानांचे दक्षिणेंतील कलह. २. दक्षिणेंतील बंडाचें अंतस्थ कारण. ३. हसनगंगू ऊर्फ अला-उद्दीन, (१३४७). ४. महंमदशहा, (१३५८–१३७५). ५. महंमदशहानंतर झालेले सुलतान. ६. फिरोजशहा, (१३९७–१४२२). ७. अहंमदशहा वली, (१४२२-१४३५). ८. अला-उद्दीनशहा, (१४३५–५७). ९. हुमायूनशहा व निजामशहा, (१४५७). १०. महंमदशहा, २रा, (१४६३-१४८२). ११. वजीर महंमद गवान, (१४०३–८१). १२. महंमूदशहा, (१४८२–१५१८). १३. बहामनी राज्याचें समालोचन.

१. हिंदु व मुसलमान यांचे दक्षिणेंतील कलह.—दक्षिणहिंदुस्थानांत मुसलमानी सत्तेची स्थापना झाली, तिची हकीकत वाचली

---

* वास्तविक बहामनी राज्याचा इतिहास हा महाराष्ट्राच्या इतिहासाचा भाग आहे. तथापि हें राज्य मुसलमानी असल्यामुळें त्याचा वृत्तान्त मुसलमानी रियासतींत देणें इष्ट आहे. बहामनी राज्य स्थापन होण्यापूर्वींचा महाराष्ट्राचा इतिहास मराठी रियासतींत दिला आहे.

म्हणजे हिंदु व मुसलमान यांजमधील विरोध स्पष्ट कळून येतो. मुसलमानांची सत्ता पंजाब व दिल्ली या प्रांतांच्या पुढें पसरली नव्हती, तोंपर्यंत त्यांच्यांत निश्चयी व कडव्या मुसलमानांची मध्यआशियाखंडांतून भरती होऊन, त्यांच्या अंगचें प्रखर तेज जागृत राहत होतें. हिंदुधर्माशीं त्यांचा संबंध फारसा आला नव्हता. दिल्लीच्या दरबारीं हिंदूंचें वजन नसून हिंदु स्त्रियांशीं लग्न करणें मुसलमानांस प्रशस्त वाटत नव्हतें. परंतु दक्षिणेंत त्यांचा प्रवेश होऊं लागला, तेव्हांपासून त्यांच्या धर्माचें व राज्यकारभाराचें स्वरूप बदलत चाललें. अपरिचित देश व भिन्न भाषा यांत त्यांचें दळणवळण सुरू झाल्यामुळें, उत्तरेकडील मुसलमानांचें व त्यांचें मूळचें नातें तुटत चाललें. हिंदूंचे आचारविचार त्यांस ग्राह्य करावे लागले. हिंदु स्त्रियांशीं त्यांनीं लग्नें लाविलीं. अर्थात् हिंदूंच्या संस्थांचा परिणाम त्यांजवर होऊं लागला. यामुळें दिल्लीच्या सुलतानांच्या ताब्यांत राहणें त्यांस दुःसह वाटून त्यांतून आपली मुक्तता करून घेण्यास ते उत्सुक झाले. ही वस्तुस्थिति दिल्लीदरबारानें समजून घेतली नाहीं. दक्षिणेंतील ह्या भेदबुद्धीचा संपर्क दिल्लीसही पोंचला, पण तेथील करड्या मुसलमानी फौजेपुढें त्या संपर्काचें वजन पडलें नाहीं. जी आग दिल्लींत मुरली, ती दक्षिणेंत उमटली. तेणेंकरून दिल्लीचे सुलतान दक्षिणदेशास मुकले.

ह्या बंडाची हकीकत राज्यकारभार चालविणारांस फार उपयोगाची आहे. मुसलमानी धर्माचा औत्तरीय प्रवाह हिंदुधर्मरूपी दक्षिणमहासागरांत घुसला. त्या सागराकडून त्यास अडथळा झाल्यामुळें संगमाच्या ठिकाणीं ह्या नवीन प्रवाहांतील गाळ सांचून मूळ जमिनीपासून हा भाग अलग झाला. ह्या गोष्टीबद्दल आगाऊ इशारा मिळाला नव्हता असें नाहीं. सन १३२० सालीं खुस्रूच्या वेळेस दिल्ली शहरांत जें बंड झालें तें ह्या भावी परिणामाचें सूचक होतें. तथापि हा इशारा त्या राज्यकर्त्यांनीं जुमानिला नाहीं. महंमद तुघ्लखचा जुलूम व दररोज सुटणारे त्याचे नवीन हुकूम ह्यांच्या योगानें सन १३२० पासून धुमसत असलेल्या असंतोषांत भर पडून, त्याचा स्फोट सन १३४७त झाला. ह्या दोन्ही बंडांची हकीकत एकसमयावच्छेदेंकरून ध्यानांत घेतली पाहिजे.

सन १३२० सालीं दिल्ली शहरांत जें हिंदूंचें बंड झालें, त्यांत दक्षिणेंतील राजांचें अंग होतें. दिल्लींत बंड झाल्याबरोबर दक्षिणच्या राजांनीं

उचल घेतली. ग्यासुद्दीन तुघ्लखनें दिल्लीचा बंदोबस्त केल्यावर आपला मुलगा जो महंमद तुघ्लख म्हणून पुढें प्रसिद्धीस आला, त्यास दक्षिणच्या बंदोबस्तास पाठविलें. त्यानें देवगडचा बंदोबस्त केला; परंतु वरंगूळचे राजाकडून पराभव पावून त्यास जीव घेऊन देवगडास परत यावें लागलें. असा प्रकार होण्याचीं कारणें जरा गूढ आहेत. आशियाखंडांतील लोक धन्यावर सहसा उठावयाचे नाहींत, पण यःकश्चित् गावगप्प ऐकिली, कीं तिजवर त्यांचा लागलाच भरंवसा बसतो. वरंगुळास शहाजादा पोंचल्यावर त्यास एक महिनाभर दिल्लीचें वर्तमान कांहींच समजलें नाहीं. तेव्हां तिकडे सुलतान मेल्याची बातमी उठली. त्याबरोबर मोगल फौजेची पुनः कत्तल होणार असें फौजेंत कळलें. शहाजाद्याबरोबर बरीच फौज मोगल होती. तींतील लोक घाबरून त्यास सोडून गेले. कित्येक हरामखोर फितूर होऊन हिंदु फौजेस जाऊन मिळाले. वरंगूळच्या राजानें शहाजाद्याचा निकट पाठलाग केला. पुढें शहाजाद्यानें मुसलमानांची एक नवीन फौज तयार करून वरंगूळचा पाडाव केला हें मागें आलेंच आहे.

ह्या गोष्टीस पंचवीस वर्षें लोटलीं. दक्षिणेंतील बंड मोडलें, तरी त्याचें निर्मूलन झालें नव्हतें. अर्थात् अनुकूळ संधि येतांच, त्याचा पुनरपि उद्भव झाला. बंड केल्याबद्दल आपल्या वडिलांस पूर्वी काय शिक्षा भोगाव्या लागल्या हें त्यांचीं मुलें विसरून गेलीं. पुनः त्यांचे मनांत बंड करण्याची प्रेरणा झाली. सन १३२० व १३४७ ह्या दोनही सालांत एकच प्रकार घडला. मुसलमानी लष्करास महंमदाची भीति पडली. हिंदु राजांस आपलें स्वातंत्र्य परत मिळविण्याची संधि प्राप्त झाली. लष्करानें बंड केलें त्यास तेथच्या राजांनीं मदत केली. लष्कराच्या लोकांनीं आपल्या अधिकाऱ्यांस ठार मारून सरकारी तिजोऱ्या लुटल्या. महंमद तुघ्लखाच्यानें ह्या बंडाचा नाश करवेना. अर्थात् हसनगंगू नांवाच्या गृहस्थास दक्षिणेंत मुसलमानांचें नवीन राज्य स्थापितां आलें.

अशा प्रकारचीं बंडें दक्षिणेंतच झालीं असें नाहीं. बंगाल्याकडे गेलेल्या मुसल्मानांनीं हिंदूंच्या मसलतीनें स्वतंत्र राज्य स्थापण्याचे प्रयत्न केले. परंतु बंगाल्यांत हिंदु लोकांनीं बंडखोरांस मदत दिली नाहीं. दक्षिणचे हिंदु पाणीदार होते. त्यांस स्वातंत्र्याची अभिरुचि विशेष होती. बंगालचे

हिंदु मुसलमानांस वचकून असत. स्वधर्माचें वारें त्यांच्यांत प्रखरपणें खेळत नसल्यामुळें ते धर्माविषयीं बेपर्वा असत. पुष्कळांस तर मुसलमानांचा शियापंथच ज्यास्त आवडला.

२. दक्षिणेंतील बंडाचें अंतस्थ कारण.—शिया व सुनी यांजमधील विरोध हेंच ह्या बंडाचें अंतस्थ कारण होय. शिया व सुनी यांजमधील मतभेद मागें* सांगण्यांत आलाच आहे. हिंदुस्थानांत ह्या मतभेदास चमत्कारिक स्वरूप प्राप्त झालें. सुनी पंथाचा हिंदु धर्माशीं अत्यंत विरोध आहे. शिया पंथाचा कल हिंदुधर्माशीं कांहीं अंशीं मिळता आहे. एवढा भेद लक्षांत ठेविला म्हणजे ह्या वेळच्या मुसलमानी इतिहासाचें स्वरूप विशेष स्पष्ट होतें. सुनी लोक मादिना येथील धर्मसभेनें निवडिलेल्या पहिल्या चार खलीफांस मानितात. परमेश्वराचें स्वरूप व पुनर्जन्म वगैरे प्रश्नांवरील त्यांचीं मतें हेकेखोरपणाचीं नाहींत. महंमदाच्याच वंशजांत दैविक अंश आहे असें त्यांस वाटत नाहीं. हिंदुधर्म म्हणजे निव्वळ मूर्तिपूजा असें ते मानितात. शियापंथी मुसलमानांचा कल वेगळा आहे. ते पहिल्या चार खलीफांस मानीत नाहींत. ते ज्यास्त देवभोळे व आग्रही आहेत. महंमदाच्या औरस वंशास सय्यद असें म्हणतात. सय्यदांच्या शरीरांतील धमन्यांतून महंमद पैगंबराचें शुद्ध रक्त अद्यापि खेळत आहे असें शिया मुसलमान समजतात. त्यांचीं धर्मसंबंधीं व इतर मतें हिंदूंच्या मतांशीं बरींच मिळतीं आहेत. आरंभीं मोहरमचे पहिले पंधरा दिवस सर्व मुसलमानांत मोठे सणाचे होते. पण त्या महिन्याच्या दहाव्या दिवशीं हुसेनाचा खून झाल्यामुळें, हिंदूंच्या मूर्तिपूजेच्या धर्तीवर शिया मुसलमान ताबुतांत हुसेनाचें भजन करितात. ही एक प्रकारची मूर्तिपूजाच होय. दक्षिणेंतील मुसलमानी राज्याशीं शिया पंथाचा निकट संबंध आहे. आरंभी दक्षिणेंत आलेले मुसलमान सुनी होते. दक्षिणेंत जन्मलेले लोकही सुनीच. म्हणून सुनीपंथी लोकांस बहामनी राज्याचे वेळेस दक्षणी असें नांव मिळालें. पण लष्करांत मोगलांचा भरणा विशेष असे. हे मोगल बहुशः शियापंथी होते. तसेंच इराणांतून आलेले पुष्कळ लोक शियापंथीच असत. त्यांचा भरणा बहामनी राज्यांत

* प्रकरण २ कलम ५ पहा.

विशेष होता. हे बाहेरून आलेले असल्यामुळें त्यांस परदेशी असें नांव प्राप्त होऊन, ह्या दोन पक्षांचे तंटे त्या राज्यांत सतत चालू असत. फार तर काय, ह्या तंट्यांची हकीकत नीट समजली तरच बहामनी राज्याचा इतिहास चांगला समजेल.

तथापि मुसलमानांच्या जातीवरून त्यांचा धर्म ओळखतां येण्याजोगा नाहीं. ज्याच्या त्याच्या मर्जीप्रमाणें त्यास शिया किंवा सुनी धर्म स्वीकारण्याची मुभा असते. बहामनी राज्यसंस्थापक हसनगंगू हा शियापंथी असून त्याचाच मुलगा महंमदशहा हा सुनी होता. बहामनी राज्यांत पुष्कळ आरब व हबसी लोकांचा भरणा होता, म्हणून परदेशी असूनही ते दक्षणी पंथांत गणले जात. तसेंच खुद्द दक्षिणचे पुष्कळ लोक बाटून शियापंथी झाले, त्यांचा समावेश परदेशी पक्षांत होई.

३. हसन गंगू ऊर्फ अलाउद्दीनशहा, (सन १३४७–१३५८).— हसन गंगूची पूर्वपीठिका माहीत नाहीं. तो दिल्लीस गंगू नामक ब्राह्मणाच्या घरीं वाढला होता. सुलतान झाल्यावर त्यानें त्या ब्राह्मणास आपल्या पदरीं खजिनदारीचें काम सांगितलें. धर्माचे बाबतींत हसन आग्रही नव्हता. मलीक काफूर व खुस्रूखान यांप्रमाणेंच तो खुशामतीनें मोठ्या पदास चढला. त्यांच्याप्रमाणेंच धर्माच्या बाबतींत कांहीं कपट करून दक्षिणेंतील हिंदु राजांना त्यानें आपल्या पक्षास वळविलें. शियापंथी आब्बसी खलीफांप्रमाणें त्यानें आपल्या शिरावर कृष्णछत्र धारण केलें.

गंगू ब्राह्मणावर महंमद तुघ्लखाची मेहेरबानी असे. त्याजपाशीं हसन हा गुलाम होता. हसनचें इमानी वर्तन पाहून, त्यास गंगू ब्राह्मणानें कांहीं जमीन व एक बैलांची जोडी दिली. ती जमीन नांगरीत असतां तींत हसनास एक मोहोरांचा हांडा सांपडला. तो त्यानें नेऊन आपल्या धन्यास नजर केला. ह्या इमानीपणाबद्दल ब्राह्मणानें हसनची सुलतानापाशीं तारीफ केली. सुलतानानें खुष होऊन हसनास दहा हजार स्वारांची सरदारी दिली. ब्राह्मणानें त्याची जन्मपत्रिका पाहून भविष्य केलें, कीं '*तुला राज्यप्राप्ति होईल.*' तसें झाल्यास स्वतःच्या नांवास गंगू हें पद जोडून, आपणास फडणिशीचें काम देण्याचें ब्राह्मणानें हसनाकडून वचन घेतलें. पुढें सुलतानानें हसनास दक्षिणच्या सुभेदाराच्या मदतीस पाठविलें. गुजराथेंतील बंड

सुलतानानें मोडल्यावर तेथच्या कित्येक बंडखोरांस दक्षिणच्या सुभेदारानें आश्रय दिला, ह्याबद्दल बादशहा सर्वांसच शासन करणार, असें ऐकून ते बादशहावर उठले. त्यांनीं दौलताबादचा किल्ला हस्तगत करून इस्मईलखान यास नासिरुद्दीन हा किताब देऊन आपला सुलतान केलें. ह्या समयीं हसन यास जाफरखान हा किताब मिळाला. पुढें महंमदानें ह्या बंडवाल्यांवर स्वारी केली. पण दिल्लीस बंड झाल्याचें वर्तमान आल्यामुळें दक्षिणेंतील काम तसेंच सोडून महंमद तुघ्लख दिल्लीस गेला. मागें राहिलेल्या त्याच्या सैन्यावर जाफरखानानें स्वारी करून, त्याची दाणादाण केली, आणि बेदर व कंधारी हे किल्ले काबीज केले. नंतर जाफरखान दौलताबादेस गेल्यावर, नासिरुद्दीननें राज्याचा कारभार खुशीनें सोडून, जाफरखान यास दिला, (ता. १२ आगस्ट, सन १३४७). जाफरखानानें अला-उद्दीन हसन असा किताब धारण केला आणि आपल्या नांवचीं नाणीं पाडिलीं. कलबुर्गा शहरास ४ हसनाबाद असें नांव देऊन त्यानें आपली राजधानी केली. अला-उद्दीन हा फार हुशार व धोरणी असून वेळ पडेल तसें वागणारा होता. प्रथम त्यानें हिंदु राजांचा चांगला स्नेह संपादिला, आणि आपला कार्यभाग उरकतांच, तो त्यांजवर उलटला. गजनीच्या महंमुदासारखा तो हिंदुधर्मद्वेष्टा नव्हता. कोणत्याही प्रकारानें राज्यप्राप्ति व्हावी एवढीच त्याची इच्छा होती. मुसलमानांचा कडवेपणा त्यानें आपल्या वर्तनांत दाखविला असता, तर त्याचें काम साधलें नसतें. तथापि केवळ स्वार्थावर दृष्टि देऊन, आपणास साहाय्य करणाऱ्या हिंदु राजांशीं तो कृतघ्नपणानें वागला हें अनुचित होय. त्याचें राज्य दिवसेंदिवस वाढत गेलें. मलीक सैफुद्दीन घोरी यास त्यानें आपली वजिरी दिली. गंगू ब्राह्मणास दिलेलें वचन न विसरतां, त्यानें आपल्या नांवास गंगू—बहामनी असा किताब जोडिला, आणि त्या ब्राह्मणास दिल्लीहून आणवून आपल्या पदरीं इतमामानें ठेविलें. पुढें अकरा वर्षेंपर्यंत न्यायानें व सदाचरणानें राज्य करून बहामनी राज्याचा हा संस्थापक इसवी सन १३५८ ह्या वर्षीं ६७ वर्षांचा होऊन मरण पावला.

ह्या नवीन राज्याचा विस्तार मुख्यतः सर्व महाराष्ट्र देशास व्यापून होता. त्याच्या उत्तरेस नर्मदा नदी, पश्चिमेस सह्याद्रि पर्वत, दक्षिणेस कृष्णा नदी आणि पूर्वेस तैलंगणचें राज्य व गोंडवणचें रान, अशा त्याच्या

NATIONAL ARCHIVES OF INDIA

चतुःसीमा होत्या. ह्या राज्यास आरंभीं समुद्रकिनारा नव्हता. सरहद्दीवर माळव्यांत व खानदेशांत नवीनच मुसलमानी राज्यें स्थापन झालीं होतीं. इतर बाजूस हिंदु राज्यें असून बहामनी राज्याची प्रजा मुख्यत्वें करून हिंदु होती. ह्यामुळें हिंदु चालीरीतींचें विशेष वजन ह्या राज्यांत होतें. कृष्णेच्या दक्षिणेस तुंगभद्रा नदीच्या कांठीं विजयनगर येथें वरंगूळच्या राजघराण्यांतील एका पुरुषानें नवीन हिंदु राज्याची स्थापना केली, त्याची हकीकत आलाहिदा आहे. हेंच राज्य पुढें बलाढ्य होऊन त्याचें बहामनी राज्याशीं वैर जुंपलें. बहामनी राज्याची राजधानी कलबुर्गा शहर विजयनगरच्या उत्तरेस व वरंगूळच्या पश्चिमेस, दीडशें मैलांवर होतें. म्हणून ह्या दोन राज्यांमध्यें झगडा अपरिहार्य झाला.

४. **महंमदशहा,** (१३५८–१३७५).—*अला-उद्दीन यास दाऊद* व महंमद असे दोन मुलगे होते. महंमद हा हुशार असून, त्यानेंच पुढें गादीवर बसावें, असें बापानें ठरवून ठेविलें होतें. ह्या राजानें आपल्या नांवचीं नवीं चौकोनी नाणीं पाडिलीं. पहिलीं असलेलींच नाणीं राहवीं, असें हिंदु लोकांच्या मनांत असल्यामुळें, हीं नवीं नाणीं ते वितळवून टाकीत; ह्याबद्दल शहानें पुष्कळ हिंदु लोकांस कडक शिक्षा केल्या. विजयनगरचा व तैलंगणचा राजा हे एक होऊन, कालास वगैरे आपले गेलेले प्रांत परत घेण्याविषयीं महंमदशहाबरोबर लढण्यास आले. तैलंगणचे राजाचा मुलगा विनायकदेव हा त्यांचा सेनापति होता. कौलास प्रांताचा सुभेदार बहादूरखान यानें त्यांचा पराभव केला, तरी पुनः युद्ध सुरू होऊन शहा स्वतः फौज घेऊन तैलंगणांत वेलंपट्टण म्ह० हल्लीं बेलमकोंडा नांवाचें शहर आहे त्यावर गेला. तेथें विनायकदेवास त्यानें ठार मारिलें. लूट घेऊन परत येत असतां, त्याचे फार हाल झाले आणि बहुतेक लोक मेले. ह्या सुमारास हिंदु राजांस आपली चूक दिसून आली. दिल्लीचे बादशहाविरुद्ध हसन गंगू यास मदत करून त्यांनीं आपल्या दाराशीं एक नवीन शत्रु आणून उभा केला. या अडचणीच्या प्रसंगीं हिंदु राजांनीं दिल्लीचा सुलतान फिरोज तुघ्लख यास उत्तरेकडून स्वारी करण्याविषयीं भर दिली, पण त्यानें तें मनावर घेतलें नाहीं. पुनः युद्ध सुरू होऊन बहामनी सुलतानानें तैलंगणावर स्वारी केली; तेव्हां तेथच्या

राजानें ३२ लाख रुपये व गोंवळकोंड्याचा किल्ला महंमदशहास देऊन तह केला, आणि इतःपर त्यानें आपणाला त्रास देऊं नये, असा करार लिहून घेऊन वरंगूळचे राजानें तख्त-इ-फेरोज (अस्मानी तख्त) नांवाचें एक रत्नजडित सिंहासन महंमदशहास नजर केलें; तेंच सिंहासन पुढें बहामनी शहांनीं घेतलें. त्याची किंमत चार कोट रुपये असून तें नऊ फूट लांब व तीन फूट रुंद होतें. ह्यापुढें विजयनगरचे राजाशीं युद्ध सुरू झालें. विजयनगरचा राजा ह्या सुमारास फार प्रबळ असून बहुतेक दक्षिण हिंदुस्थान त्याचे ताब्यांत होतें. त्यानें मुसलमानांशीं अत्यंत चिकटपणानें टक्कर दिली. मुसलमानांचा मुद्गलचा किल्ला सरहद्दीवर होता, तो त्यानें घेतला आणि तेथील सर्व लोकांची कत्तल केली; त्यामुळें संतापून एक लाख हिंदूंस ठार मारण्याची महंमदशहानें प्रतिज्ञा केली. दोनही फौजांची तोंडातोंडी होतांच हिंदु लोकांचा पराजय होऊन सत्तर हजार लोक ठार झाले. ह्या लढाईंत हिंदु लोकांनीं तोफांचा उपयोग केला असें म्हणतात. ह्या विजयानें लढाई संपली नाहीं. अध्वनीनजीक पुनः एक निकराची लढाई झाली. विजयनगरच्या राजानें भोजमल्ल यास आपल्या सेनेचें आधिपत्य दिलें होतें. ह्या लढाईंत तोफखाना होता. भोजमल्लास जखम लागली आणि तो पळून गेला; तेव्हां हिंदु लोक आपला जमाव सोडून निघून गेले, (१३६६). पुढें कांहीं दिवस युद्ध-संग्राम चालून उभयतांमध्यें तह झाला. ह्या लढाईनंतर महंमदशहाचे कांहीं दिवस अंतर्गत बंडें मोडण्यांत गेले. महंमदशहानें चोर, रामोशी इत्यादि दुष्ट लोकांचा बंदोबस्त करून मुलखाचा बंदोबस्त केला.

एकंदरींत महंमदशहानें राज्य फार शहाणपणानें केलें. तो लोकांची दाद घेण्यासाठीं वारंवार प्रांतांतून फिरत असे. त्याच्या दरबारचें वैभव मोठें होतें. सतरा वर्षें राज्य करून हा शहा सन १३७५त मरण पावला. मलीक सैफ्-उद्दीन घोरी हा त्याचा दिवाण होता.

५. महंमदशहानंतर झालेले सुलतान.—या पुढील राजकर्त्यांचें महत्त्व ऐतिहासिक दृष्ट्या विशेष नाहीं. कित्येक सुलतान सद्गुणी व कित्येक दुर्वृत्त निघाले. त्यांच्या कारकिर्दीत हिंदु व मुसलमान यांजमध्यें एकसारखे युद्धप्रसंग चालू होते. शिया व सुनी, किंवा परदेशी व दक्षणी ह्या दोन पक्षांतील कलह कधींही मिटले नाहींत. मुसलमानी धर्मावर

NATIONAL ARCHIVES OF INDIA

हिंदूंची छाप विशेष बसत चालली, आणि मुसलमान लोक आपला मूळचा कडवेपणा विसरत चालले.

मुजाहिद्शहा, (सन १३७५–७८).—सैफ-उद्दीनची मुलगी महंमदशाहास दिली होती, तिच्या पोटीं मुजाहिद्शहाचा जन्म झाला. हा मोठा शूर, धीट व बळकट होता. तो १९व्या वर्षी तख्तावर बसला. लवकरच विजयनगरच्या राजाबरोबर युद्ध सुरू झालें. उभयतांनीं लढाईची जंगी तयारी केली. पण मुसलमानांची कडेकोट तजवीज पाहून, हिंदु लोकांच्या सैन्यानें पळ काढिला. त्यांचा पाठलाग शहानें चालविला, आणि शेवटीं दोनही फौजा विजयनगरांत आल्या. अनेक लढाया होऊन त्यांत मुजाहिद्शहाच्या अद्वितीय पराक्रमामुळें मुसलमान विजयी झाले. ह्या वेळीं मुसलमानांस अपार संपत्ति व पुष्कळ मुलूख मिळाला. मार्गांतील कित्येक किल्ले घेऊन शहा राजधानीस परत आला. शहाचा चुलता दाऊदखान यानें राज्यलोभानें मुजाहिद्शहास मारेकरी घालून ठार मारिलें, (सन १३७८).

दाऊदशहा, (सन १३७८).—दाऊद नांवाचा महंमदशहाचा भाऊ कलबुर्गा येथील किल्ल्यावर कैदेंत होता. तो तेथून सुटून राज्य मिळविण्याची खटपट करूं लागला. पिढीजाद वजीर व राज्याचा आधारस्तंभ मलीक सैफ्-उद्दीन यानें दाऊदशहाची सत्ता कायम होण्याबद्दल पुष्कळ प्रयत्न केले. पण ह्या कृत्यास वजिराच्या मुलीची मुलगी व मुजाहिद्शहाची बहीण रूपवर आघा इनें मात्र रुकार दिला नाहीं. पुढें घोरी रजा मागून घरीं बसला. दोन महिन्यांच्या आंत रूपवर आघानें शहाचा खून करविला.

महंमूदशहा, (सन १३७८–१३९७).—रूपवर आघानें दाऊदशहाच्या मुलाचे डोळे काढिले; आणि अला-उद्दीनचा कनिष्ठ पुत्र महंमूद यास तख्तावर बसवून, त्याचे नांवची द्वाही फिरविली. हा शहा दयाशील, सद्गुणी व न्यायी होता. त्यानें घोरी यास पुनः वजिरी दिली. पूर्ववत् जिकडे तिकडे स्वस्थता झाली. हा शहा विद्वान् होता. त्यास कवितांनी अभिरुचि होती. त्यानें एकपत्नीव्रत पाळिलें. इराण, आरबस्तान या देशांतून मोटमोठे विद्वान् गृहस्थ दक्षिणेंत येत, त्यांस शहा

चांगलें उत्तेजन देई. सर्व मोठमोठ्या शहरांतून त्यानें शालागृहें, व अनाथ-बालगृहें स्थापन केलीं. आंधळ्या लोकांस नेमणुकी बांधून दिल्या, आणि राज्यांत मुसलमानी धर्मोपदेशक नेमिले. दुष्काळ पडला असतां स्वतः दहा हजार बैल ठेवून, सर्वांस स्वस्त दरानें धान्य देण्याची तजवीज केली. तो गरिबांचा चांगला परामर्ष घेई. त्याची कार्कीर्द शांततेची झाली. त्यास दक्षिणचा ॲरिस्टॉटल अशी संज्ञा मिळाली होती. तो इसवी सन १३९७ त मरण पावला. त्याच्यामागून दुसऱ्याच दिवशीं तख्ताचा आधारस्तंभ प्रसिद्ध वजीर मलीक सैफ्-उद्दीन-घोरी हाही मरण पावला.

महंमूदशहाचे मागून त्याचे दोन मुलगे तख्तावर आले, पण थोड्याच काळांत दरबारांतील कांहीं मंडळींच्या गुप्त कारस्थानांत सांपडून ते पदच्युत झाले. नंतर दाऊदखानाचा मुलगा फिरोजशहा तख्तावर बसला.

६. **फिरोजशहा, (सन १३९७–१४२२).**—या शहाच्या कार्किर्दींत बहामनी राज्याचे वैभवाचा कळस झाला. त्यानें विजयनगरचे राजाच्या मुलीशीं बळजबरीनें लग्न लाविलें; आणि मुसलमानी धर्मास पुष्कळ उत्तेजन देऊन सभोंवारच्या प्रदेशांवर स्वाऱ्या करून राज्याची मर्यादा वाढविली. तो उदार होता. दारू पिण्याशिवाय इतर गोष्टींत तो अगदीं धर्मशास्त्राप्रमाणें वागत असे. खासगी मंडळींत तो सर्वांशीं साधेपणानें वागे. ज्यानें त्यानें आपल्या मर्जीप्रमाणें वर्तन करावें अशी त्याची इच्छा असे. राज्यकारभाराचे विषय व दुसऱ्याची पाठीमागें निंदा करणें, ह्या दोन गोष्टींचें बोलणें मात्र त्यानें मना केलें होतें. त्याचा शिक्षक मीर फैज्-उल्ला अंजू ह्यास त्यानें आपला वजीर नेमिलें. शहानें परदेशांतून मोठमोठे विद्वान् स्वतःच्या खर्चानें आणविले. त्यास पुष्कळ भाषा अवगत असून परकीय विद्वानांशीं तो त्यांच्याच भाषेंत बोलण्याचा प्रयत्न करी. त्याची स्मरणशक्ति चांगली होती. अंजूचें घराणें दक्षिणेंतील प्रसिद्ध सय्यद वंशांतील होतें. ह्या घराण्याशीं शहानें प्रथमतः शरीरसंबंध केला. ह्याचा जनानखाना मोठा होता. त्यात सर्व देशांतल्या स्त्रिया होत्या. भिमेच्या कांठीं फिरोजाबाद नांवाचें एक शहर त्यानें वसविलें, आणि तेथें जनानखान्याकरितां तटबंदी वाडा बांधिला, तो अद्यापि आहे. ह्या राजाच्या रंगेल स्वभावामुळें त्याचें नांव लोकांच्या तोंडीं अजून निघतें. तो सर्व

धर्मांशीं प्रेमानें वागे. ख्रिस्ती धर्मशास्त्र वाचण्याचा नाद त्यास विशेष होता. कलबुर्गा शहरांत त्यानें बांधिलेले वाडे आतां पडून गेले आहेत. स्पेनदेशच्या धर्तीवर बांधलेली एक मशीद मात्र हल्लीं आहे.

नेहमींप्रमाणें विजयनगरचे राजाशीं कलह सुरू होतेच. विजयनगरच्या देवरायानें रायचूर दुआबावर स्वारी केली, आणि केरळ देशचा राजा नरसिंहराय ह्यानें वऱ्हाडावर स्वारी केली. फिरोजशहा प्रथम देवरायावर चालून गेला. दोनही फौजा कृष्णेच्या दोन कांठांवर उतरल्या होत्या. फिरोजशहाला नदी उतरून देवरायाच्या फौजेवर जातां येत नव्हतें. तेव्हां सिराज नांवाचा एक कसबी काजी देवरायाच्या छावणींत शिरून एका कलावंतिणीबरोबर राजपुत्राच्या गोटांत गेला, आणि बायकोच्या वेषानें सुरे वगैरे घेऊन रात्रीं राजपुत्रासमोर आपला नाच दाखवूं लागला. नाच पाहण्यांत राजपुत्र तल्लीन झाला असतां, ह्या कपटवेषी काजीनें एकदम त्यास वार करून कापून काढिलें. तेव्हां हिंदु सैन्यांत एकच गोंधळ झाला. दुसरे दिवशीं फिरोजशहा आपल्या फौजेसह नदी उतरून अलीकडे आला; आणि अस्ताव्यस्त झालेल्या हिंदु सैन्याचा पाठलाग करीत विजयनगरपर्यंत गेला. तेव्हां देवराय टेंकीस येऊन त्यानें पुष्कळ दंड भरून फिरोजशहाशीं तह केला. अशा प्रकारें हिंदूकडील राजपुत्रांनीं ऐन युद्धाच्या प्रसंगीं विलासांत निमग्न राहवें, आणि तेणेंकरून वारंवार पराभव पावावे; हा प्रकार हिंदूंच्या त्या वेळच्या निकृष्ट स्थितीची चांगली साक्ष देतो.

१ केरळचा राजा नरसिंहराय ह्यानें वऱ्हाडप्रांतावर स्वारी केली होती. त्यांजवर फिरोजशहानें आपला भाऊ खानखानान व मीर फैज्-उल्ला ह्यांस रवाना केलें. आरंभीं हिंदूंस जय मिळाला, पण पुढें मुसलमानांनीं निकरानें हल्ले केले, ते त्यांस सहन न होऊन, नरसिंहराय [illegible] गेला, आणि त्यास फिरोजशहापुढें आणिलें. नरसिंहरायानें फिरोजशहाचें मांडलिकपण कबूल करून तह केला, (सन १३९९); आणि आपली एक मुलगी शहाच्या जनानखान्यांत पाठविली. ह्याच [illegible] तैमूरलंगानें दिल्लीवर स्वारी केली, आणि तो सर्व हिंदुस्थान- [illegible] टाकणार अशी वदंता ऐकूं आली. त्याचा प्रतिकार करण्याकरितां फिरोजनें आपले वकील तैमूरलंगाकडे पाठवून त्याचें सार्व-

स्वामित्व कबूल केलें. तयमूरलंगानेंही खुष होऊन शहास नजराणे पाठविले. या कृत्यामुळें गुजराथ व माळवा येथील मुसलमान शहांस फिरोजशहाविषयीं मत्सर उत्पन्न होऊन, त्यांनीं विजयनगरच्या राजाशीं गुप्त संधान लाविलें आणि फिरोजशहाशीं कटकट सुरू केली. ह्यास आणखी विशेष कारण असें झालें, कीं मुद्गल शहरीं एका सोनाराची निहाल नांवाची एक रूपवती मुलगी होती. विजयनगरच्या राजानें बापाकडे तिची मागणी केली. मुलीस ती गोष्ट पसंत पडली नाहीं. तेव्हां राजानें मुलीस पकडण्यासाठीं फौज घेऊन मुद्गल शहरावर हल्ला केला. पण निहाल पळून गेली. तो मुलूख फिरोजशहाचा असल्यामुळें त्यास मोठा राग आला आणि मोठें सैन्य घेऊन तो विजयनगरावर चालून आला. देवरायानें गुजराथ, माळवा, खानदेश वगैरे राजांकडून मदत मागितली, पण ती आली नाहीं. शेवटीं सन १४०६ मध्यें मुसलमानांनीं हिंदूंस अगदीं जर्जर केलें. तेव्हां देवरायानें आपली कन्या व बंकापूरचा किल्ला शहास देऊन तह केला. शहाचें व ह्या मुलीचें लग्न मोठ्या थाटानें विजयनगरास झालें. निहालबाईचें लग्नही शहाजादा हसनखान याजबरोबर झालें. पुढें सन १४१७ सालीं शहानें तैलंगणच्या मुलुखावर हल्ला केला, त्यांत वजीर मीर फैज्-उल्ला हा पडल्यामुळें मुसलमानांची हिंदूंनीं खोड मोडिली; आणि पूर्वीच्या वैराचा सूड उगविला. ह्याच अपजयामुळें शहा भ्रमिष्ट झाला. त्या भ्रमांत त्यानें आपला पराक्रमी भाऊ खानखानान हा पुढें राज्यावर हक्क सांगेल, म्हणून त्याचे डोळे काढण्याचा बेत केला. त्यामुळें खानखानान पळाला आणि त्यानें लढाईची तयारी केली. युद्ध होऊन शहाचाच पराभव झाला. ह्या कामीं आग्रह धरणें वेडेपणाचें आहे असें पाहून, फिरोजशहानें आपला मुलगा हसनखान ह्यास आपल्यामागें राज्य मिळूं नये, म्हणून स्वतःच्या देखत भाऊ खानखानान ह्यास अहंमदशहा बहामनी असें नांव देऊन तख्तावर बसविलें, आणि आपण सर्व कारभार सोडिला. नंतर दहा दिवसांनीं फिरोजशहा मरण पावला. (सन १४२२).

७. अहंमदशहा वली, (सन १४२२—१४३५).—वली म्हणजे साधु. बहामनी शहांनीं विद्येस उत्तेजन देण्याकरितां अनेक पाठशाळा बांधिल्या; आणि अनेक साधूंस इनामें करून दिलीं. अहंमदशहा

हा विद्वान व साधु लोकांस फार मान देत असे, म्हणून त्यास वली हें नांव मिळालें. सय्यद महंमद जिसू दुराज ह्या साधूच्या घराण्यास त्यानें मोटमोठीं इनामें करून दिलीं, माजी शहाच्या प्रधानास त्याच्या पहिल्या जागेवर कायम केलें आणि फौजेची शिस्त सुधारली. तसेंच पुतण्या हसन यास फौजेंत अगामी व राहण्यास स्वतंत्र वाडा दिला. येणेंप्रमाणें अनेक सत्कृत्यांनीं या शहानें रयतेची प्रीति संपादन केली. नेहमींप्रमाणें विजयनगर व केरळ येथील राजांनीं शहाबरोबर युद्ध आरंभिलें. अहंमदशहा हाही फौज घेऊन लढाईस गेला. एके दिवशीं छापा घालून देवरायास मुसलमानांनीं कैद केलें. पण तो सुटून पळून गेला. तेव्हां मुसलमानांनीं नाना प्रकारें विजयनगरच्या मुलखास त्रास दिला. तेव्हां शहाचा पाडाव करण्याच्या हेतूनें हिंदु लोकांनीं हरतऱ्हेचे प्रयत्न केले, पण त्यांत त्यांस यश आलें नाहीं. पुढें नेहमींप्रमाणें देवरायानें पुष्कळ ऐवज देऊन शहाशीं तह केला. सन १४२३ सालीं दक्षिणेंत मोठा दुष्काळ पडला. सन १४२४ सालीं वरंगुळच्या राजावर अहंमदशहानें स्वारी केली आणि राजास ठार मारून, बहुतेक सर्व प्रांत जिंकिला. तसेंच त्यानें अनेक हिंदु लोकांस ठार मारिलें, आणि बायका पोरांस बाटवून मुसलमान केलें. ह्या स्वारींत शहास एक हिऱ्यांची खाण सांपडली. सर्व मुलखांत हिंदु लोकांचीं असलेलीं देवळें पाडून तेथें त्यानें मशिदी बांधविल्या, आणि त्यांच्या खर्चास उत्पन्नें बांधून दिलीं. वऱ्हाड प्रांतांतील गाविलगड व नरनाळा हे दोन जुने किल्ले शहानें दुरुस्त केले. सन १४२६ सालीं माळव्याच्या सुलतानाशीं लढाई करून, त्याचा अहंमदशहानें पराभव केला. नंतर बेदरनजीक शहा शिकारीस गेला असतां, तेथें एक नवीन शहर वसवावें असें मनांत येऊन, त्यानें अहंमदाबाद बेदर नांवाचें शहर वसविलें. बेदर ही पूर्वी हिंदु राजांची राजधानी होती. याच शहरीं राजा भीमसेन होऊन गेला, त्याची कन्या दमयंती निषधदेशच्या नळराजास दिलेली होती, अशी कथा आहे. बेदरास अहंमदशहानें खडकावर एक किल्ला बांधिला, तो अत्यंत बळकट म्हणून नांवाजलेला होता. हें नवीन शहर त्यानें आपली राजधानी केली. नंतर कित्येक दिवसपर्यंत कोंकणपट्टी व गुजराथ ह्या प्रांतांत शहाच्या स्वाऱ्या चालू होत्या. मेसापोटेमियाप्रांतांत कर्बेला म्हणून १४ सय्यदांचें ठिकाण आहे. त्या ठिकाणचे

सय्यदांस शहानें अनेक दानधर्म केले. त्यानें इराण वगैरे देशांतून पुष्कळ साधूंस इकडे आणविलें. सन १४३५ त अहंमदशहा मरण पावला.

८. अलाउद्दीन शहा, (सन १४३५–१४५७).—हा बेदर येथें तख्तावर बसला. विजयनगरच्या राजानें खंडणी देण्याचें बंद केल्यामुळें, त्याजवर फौज पाठवून तिकडून ह्यानें पुष्कळ संपत्ति आणिली. धाकटा भाऊ महंमदखान यानें बंड केलें, तें मोडून त्यास क्षमा करून शहानें रायचूर परगणा त्यास राहण्यास दिला. सन १४३६ त कोंकणपट्टी जिंकण्यासाठीं दिलावरखानाचे हाताखालीं मोठें सैन्य रवाना केलें. रायरी व सोनखेड येथील राजे लवकरच शरण आले. दिलावरखानानें सोनखेडच्या राजाची सुंदर कन्या शहाकरितां नजर आणिली. तिच्यावर शहाची अत्यंत मर्जी बसली, आणि तीस त्यानें परिचेर (परी-चेहेरा) असें नांव दिलें. सन १४३७ त खानदेशचा सुलतान नशीरखान ह्यानें बंड केलें, त्यास गुजराथचा राजा सामील झाला. आणीबाणीच्या प्रसंगीं मलीक-उत्-तुजार नामक सरदारास शहानें फौजेसह त्याजवर पाठवून, बंडखोरांचें पारिपत्य केलें.

विजयनगरच्या राजास आपला वरचेवर होत असलेला अपमान सहन होईना. कांहीं तरी युक्तीनें मुसलमानांचा पाडाव करण्याचा त्याचा विचार होता. त्यानें पुष्कळ मुसलमान लोक आपल्या नोकरीस ठेविले. त्यांच्याकरितां विजयनगर शहरांत एक मशीद बांधिली. हिंदु राजांस मुजरा करणें मुसलमानांस अशास्त्र वाटेल, ही शंका दूर करण्याकरितां आपल्या सिंहासनापुढें एका उंच पीठावर त्यानें कुराणाचें पुस्तक ठेविलें. त्यामुळें स्वतःचा मान राहून मुसलमान लोक कुराणास मुजरा करितात असा प्रकार बाह्यतः दिसे. अशा उपायांनीं मोठी फौज जमा करून, सन १४४३त तुंगभद्रा उतरून विजयनगरच्या राजानें मुद्गलच्या किल्ल्यास वेढा दिला, आणि सभोंवारचा पुष्कळ मुलूख तो उद्ध्वस्त करूं लागला. अला-उद्दिनास ही खबर कळतांच तो त्याच्या पारिपत्यास निघाला. पुढें तीन मोठमोठ्या लढाया होऊन शहास जय प्राप्त झाला. तेव्हां देवरायानें पुष्कळ पैसा भरून तह केला.

या शहानें पुष्कळ धर्मकृत्यें केलीं. बेदर येथें भिक्षागृहें स्थापन करून, लोकांस औषधपाणी देण्याकरितां हिंदु व मुसलमान वैद्य ठेविले, दारू

पिण्याची सक्त मनाई केली. मुलकी व लष्करी खातीं सुधारलीं. तथापि हिंदु लोकांस पुष्कळ जाच होई. ब्राह्मणांशीं शहा बोलत मुद्दां नसे, किंवा त्यांस कामावर नेमीत नसे.

पुढें लवकरच शहा व्यसनासक्त झाला. तेव्हां समुद्रकिनाऱ्यावरच्या कोंकणांतील लोकांनीं आपलें प्रदेश परत घेण्याचा विचार चालविला. त्यांजवर जाण्यासाठीं मलीक-उत्-तुजार ह्याची सन १४५३त नेमणूक झाली. तुजारनें प्रथमतः शिर्के नांवाच्या एका प्रमुख राजास जिंकिलें. ह्याच कोंकणच्या स्वारींत कित्येक भानगडी घडून आल्या, त्यांमुळें दरबारच्या मंडळींत तंट्याचें बीज पेरिलें जाऊन, त्यायोगें अखेरीस बहामनी राज्याचा अंत झाला. तुजारनें शिर्क्यांस असा आग्रह केला, कीं ' तूं मुसलमान हो, नाहीं तर तुझा जीव घेतों.' अशा आणीबाणीच्या प्रसंगीं त्या धूर्त सरदारानें मोठ्या नम्रतेनें संकट टाळून, स्वतःचा बचाव केला. खेळणा म्हणून एक परगणा कोंकणांत आहे. त्यांत विशाळगड व त्याखालील सर्व जंगली प्रदेशाचा समावेश होत असे. शंकरराय नांवाचा एक हिंदु राजा या खेळणा परगण्यावर राज्य करीत होता. ' तो माझा शत्रु आहे, प्रथम आपण दोघे त्यास मुसलमान करूं, नंतर मी मुसलमान होईन,' असें शिर्क्यांनें तुजार यास सांगितलें. खेळणा परगण्यांत जाणें फार अवघड आहे, अशी हरकत तुजारानें दाखविली; पण तें काम आपण पत्करितों, असें शिर्क्यांनें कबूल केल्यावर, तुजार त्या गोष्टीस कबूल झाला. तुजार हा मूळचा परदेशी व्यापारी होता. दक्षिणचे सर्व मुसलमान लोक मूळचे इराणी व तुर्की होते. पण इकडे आल्यावर त्यांची पुष्कळ वृद्धि झाली होती. तसेंच हबशी लोकही त्यांच्या पक्षास होते. परंतु परदेशीय लोकांस मोगल अशी संज्ञा त्या वेळच्या इतिहासकारांनीं दिलेली असून, त्यांत बहुतेक सय्यद लोक होते. ते व्यापाराच्या उद्देशानें इकडे आले होते. त्यांचें व दक्षिणच्या मुसलमानांचें वांकडें असे. आजपर्यंत अनेक मोहिमांत तुजार ह्यानें दक्षणी व हबशी यांची मदत घेतली नव्हती. प्रस्तुत प्रसंगीं खेळण्याच्या अवघड प्रदेशांत शिरण्याचें दक्षणी व हबशी कामगारांनीं नाकबूल केलें, आणि ते आपल्या फौजांसह तुजारास सोडून मागें राहिले. शिर्क्यांच्या मसलतीनें तुजार हा अत्यंत अवघड

जंगली प्रदेशांतून खेळणा प्रदेशाच्या अगदीं निबिड अरण्यांत शिरला. तेथील हवा अतिशय खराब असल्यामुळें लोकही पुष्कळ आजारी पडले, अशा स्थितीत शिर्क्यानें शंकररायास एकदम येऊन हल्ला करण्याविषयीं खबर दिली. शंकरराय मोठी फौज घेऊन निघाला. त्यानें एकाएकीं छापा घालून सर्व मुसलमानांची कत्तल केली. तुजारहि मारला गेला. कांहीं लोक वांचले ते परत जाऊन दक्षणी फौजेस मिळाले, आणि तेथून सर्व लोक चाकणच्या किल्ल्यावर गेले.

वरील अपजयामुळें दक्षणी व परदेशी या दोन पक्षांमध्यें ज्यास्तच तंटे माजले. परदेशीक सय्यद लोकांचा संपूर्ण नाश करण्याकरितां, दक्षणी कामगारांनीं शहाकडे भलभलत्या हकीकती लिहून पाठविल्या; आणि त्याजकडून सर्व परदेशी अंमलदारांस पकडण्याचा हुकूम आणिला. हे परदेशी अंमलदार चाकणच्या किल्ल्यांत कोंडले गेले. शेवटीं उभयतांचें युद्ध होऊन त्यांतून कांहीं मोगल बचावून शहाकडे गेले. तेथें शहास त्यांनीं खरी हकीकत कळवून त्याजकडून दक्षणी लोकांचा सूड घेवविला, (सन १४५३). ह्या कार्किर्दीच्या अखेरीस अनेक ठिकाणीं बंडें उद्भवलीं, पण तीं शहानें मोडिलीं. ख्वाजेखान महंमद गवान हा प्रथमतः या शहाच्या लष्करांत उदयास आला. पायांवर व्रण होऊन त्या योगानें इ. स. १४५७ या सालीं अल्लाउद्दीनशहा मरण पावला.

अला-उद्दीनशहा मोठा वक्ता, धूर्त राज्यकर्ता व विद्येचा भोक्ता होता.

९. हुमायूनशहा जालीम व निजामशहा, (१४५७–१४६३).—अलाउद्दीनशहाचा मुलगा हुमायून हा तख्तनशीन झाला. त्यानें ख्वाजे-खान महंमद गवान यास मलीकउत्तुजार असा किताब देऊन, आपला वजीर केलें. प्रथमतः शिकंदरखान नामक सरदारानें केलेलें बंड शहानें मोडिलें, आणि नवलगुंदचा किल्ला घेतला. राजधानींत त्याचा भाऊ हसन-खान यानें गादी मिळण्यासाठीं बंड केलें. त्या वेळीं अत्यंत क्रूरपणानें शहानें हसनखानाचा वध केला, आणि त्याच्या सात हजार अनुयायी मंडळींस अतिशय हाल करून ठार मारिलें, (सन १४६०). शेवटीं त्याचा कोप इतका अनावर झाला, कीं कोणासही त्याच्या भेटीस जाणें झाल्यास, मरणाची तयारी करून बायकापोरांचा निरोप घेऊन जावें लागे. परंतु लवकरच सन १४६१त शहा मरण पावला.

नंतर हुमायूनशहाचा मुलगा निजामशहा तख्तावर बसला. तेव्हां तो आठ वर्षांचा होता. बापाच्या इच्छेनुरूप त्याची आई सर्व कारभार पाहत असे. खाजेखान महंमद गवान हाच मुख्य वजीर होता. त्याच्या सल्ल्यानें ती कारभार करी. आरंभीं ओढ्याप्रांतांच्या राजानें राजमहेंद्रीच्या रस्त्यानें शहाच्या मुलखावर स्वारी केली. परंतु तींत त्याचाच पराभव झाला. पुढें माळव्याच्या सुलतानानें दक्षिणदेशावर स्वारी केली, तींत शिकंदरखान तुर्क या सरदाराच्या भित्रेपणामुळें निजामशहास अपयश आलें, आणि तो राजधानी बेदर येथें पळून आला. पुढें माळव्याच्या सुलतानानें त्याचा पाठलाग करून बेदर राजधानी घेतली. परंतु इतक्यांत गुजराथच्या सुलतानानें निजामशहास मदत पाठविली, त्यामुळें माळव्याचा सुलतान परत गेला. वाटेंत त्यास महंमद गवानानें अत्यंत जेरीस आणिलें. बहामनी राजघराण्यांत मुलांमुलींचीं लग्नें फार लहानपणींच होत असत, त्याप्रमाणें निजामशहाच्या आईनेंही आपल्या मुलाचें लग्न लहानपणींच मोठ्या थाटानें केलें. ज्या दिवशीं लग्न झालें त्याच दिवशीं शहा मरण पावला, (सन १४६३).

१०. महंमदशहा दुसरा, (सन १४६३–१४८२).—निजामशहाचा भाऊ महंमदशहा यास मुत्सद्दी मंडळीनें तख्तावर बसविलें. तोही नऊ वर्षांचाच होता. लहानपणापासून त्याच्या शिक्षणाची व्यवस्था चांगली ठेविल्यामुळें, पुढें तो फार विद्वान झाला. बहामनी शहांत फिरोजशहाच्या खालोखाल हाच विद्वान होता. आरंभींच अधिकारासंबंधानें ख्वाजाजहान व महंमद गवान ह्या दोघां मुत्सद्यांत स्पर्धा उत्पन्न झाली. शहाची आई विचारी बायको होती. तिनें ख्वाजाजहान यास ठार मारून तंट्याचें मूळ मिटविलें; तेव्हां महंमद गवान हाच मुख्य कारभारी झाला. ह्या वेळेपासून दक्षणी तटाचें पारडें हलकें होऊन गवानाचा परदेशी पक्ष महत्त्वास चढला. सन १४६७मध्यें माळव्याच्या सुलतानानें दक्षिणदेशावर स्वारी केली. तेव्हां कित्येक दिवस युद्ध होऊन माळव्याच्या सुलतानाचा पराभव झाला; आणि दोघांमध्यें अखेरीस सलोख्याचा तह ठरला.

कोंकणपैकीं दाभोळ, चौल, व त्याच्या वरचे जुन्नर चाकण कोल्हापूर, वाई वगैरे प्रांत बहामनी राज्याच्या अमलाखालीं आले होते. तथापि कोंकणांत कांहीं हिंदु राजांचा अंमल चालू होता. सन १४६९ त

खेळणा उर्फ विशाळगड येथील राजा शंकरराय यास व इतर शिरजोर राजांस जिंकण्याकरितां महंमद गवान मोठी फौज घेऊन निघाला. शंकररायाचा अंमल समुद्रापर्यंत असून त्याजजवळ तीनशें जहाजांचें आरमार नेहमीं लढाईस तयार असे. त्याच्या मदतीनें तो मुसलमान व्यापाऱ्यांस फार उपद्रव देई. महंमद गवान आपणांवर चालून येतो असें समजतांच, सर्व हिंदु राजे एकत्र होऊन लढाईस सिद्ध झाले. महंमद गवान पहाडी पायदळ घेऊन खेळण्यावर आला. त्यानें बरसातीच्या दिवसांत कोल्हापुरास मुक्काम करून दोन वर्षेपर्यंत मोहीम चालविली, आणि शेवटीं खेळणा किल्ला हस्तगत केला. थोडे दिवसांनीं त्यानें विजयनगरच्या ताब्यांतील गोवें शहरही घेतलें, (सन १४७२). येणेंप्रमाणें आजपर्यंत अजिंक्य मानलेली कोंकणपट्टी बहामनी राज्याच्या ताब्यांत गेली.

ह्या विजयामुळें गवानचा लौकिक फार वाढला. त्याचा शहानें बहुमान केला. परंतु गवान हा विरक्त बुद्धीचा असल्यामुळें त्यानें आपली सर्व दौलत गरिबांस वाटून दिली. तो नेहमीं साधा व हलक्या किमतीचा पोषाख घालून गरिबीनें वागत असे.

ओढ्याप्रांताचा राजा अंबरराय यास त्याचा भाऊ मंगलराय उपद्रव देत होता. सन १४७१ सालीं अंबररायास शहानें मदत करून कंडापिली व गजमहेंद्री हीं ठिकाणें मिळविलीं. ह्या मोहिमेंत पुष्कळ नवीन सरदार प्रसिद्धीस आले. आणि त्यांस ह्या कार्किर्दीत मोठमोठीं हुद्यांचीं कामें मिळालीं. तैलंगणच्या सुभेदारीवर मलीक हसन बहिरी ऊर्फ निजाम-उल्-मुल्क् हा सरदार कायम झाला. वऱ्हाडच्या सुभेदारीवर दर्याखान ऊर्फ इमाद-उल्-मुल्क् हा कायम झाला. यूसुफ आदिलखान नामक दुसरा एक शूर गृहस्थ गवानच्या मर्जीतला होता, त्यास दौलताबादची सुभेदारी मिळाली. या यूसुफनें खानदेशांतले वगैरे पुष्कळ मुलूख काबीज करून बहामनी राज्यास जोडिले. हे सर्व सरदार परदेशांतून आलेले होते. त्यांच्या उत्कर्षाविषयीं दक्षिणच्या मुसलमानांस फार वैषम्य वाटूं लागलें.

पुढील वर्षीं (स. १४७२), बेळगांवचा वीरकर्णराय हा विजयनगरच्या राजाच्या वतीनें गोवें परत घेण्याचा प्रयत्न करूं लागला. त्याजवर

शहानें स्वारी करून बेळगांव घेतलें. या स्वारीहून परत येत असतां महंमदशहाची हुशार आई माईराणी मरण पावली. ही स्त्री त्या वेळच्या भरभराटीस पुष्कळ कारण झाली होती. पुढें दोन वर्षेपर्यंत दक्षिणेंत भयंकर दुष्काळ पडला; पर्जन्य मुळींच नाहीं; असंख्य लोक प्राणांस मुकले. बेदर येथील यवन राजाच्या पदरीं असलेल्या दामाजीपंत कारकुनानें सरकारी धान्याचीं कोठारें लुटवून लोकांचे जीव वांचविले, ही प्रसिद्ध दामाजीची गोष्ट ह्याच दुष्काळांतील असावी. सन १४७७त ओढ्या प्रांतावर पुनः स्वारी होऊन, तेथील राजा भीमराज याचा पुष्कळ मुलूख शहाच्या फौजेनें जिंकून घेतला. तसेंच शहानें कर्नाटक व तैलंगण येथील हिंदु राजा नरसिंहराय याजवर स्वारी करून त्याचा बराच मुलूख घेतला. ह्या स्वारींत एका किल्ल्याची डागडुजी करणें होती, ती महंमद गवाननें त्वरित करवून शहाची मर्जी इतकी संपादन केली, कीं महंमदशहा म्हणूं लागला, 'मोठें विस्तीर्ण राज्य व महंमद गवानासारखा नोकर, ह्या दोन्ही वस्तु देणाऱ्या ईश्वरानें उदार होऊन मला दिल्या आहेत.' शहानें कांची येथील देवळांवर स्वारी करून अपार संपत्ति मिळविली. या सर्व स्वाऱ्यांत महंमद गवानच्या शहाणपणामुळें यश येत गेलें. त्यामुळें त्याचें वजन फार वाढलें. पण पुष्कळ सरदार त्याचा द्वेष करूं लागले. हा द्वेष वाढण्यास आणखीही कित्येक कारणें झालीं. अलीकडे महंमद गवान याजकडे कारभार आल्यापासून राज्याचा विस्तार अतोनात झाला होता. तेव्हां अलाउद्दीन हुसेन गंगूनें केलेल्या व्यवस्थेंत फेरफार करणें फार अवश्य झालें. राज्याचे चार भाग होते ते महंमद गवानानें आतां आठ केले; लष्कराच्या व्यवस्थेचे व त्यास वेळेवर पगार देण्याबद्दलचे नियम ठरविले, आणि त्यांची अंमलबजावणी सक्तीनें केली. परंतु अशी सक्ती स्वतंत्रतेनें वागण्यास सवकलेल्या सरदारांस रुचली नाहींत.

महंमद गवान हा महंमदशहाचा मुख्य वजीर होता. तो बहामनी राज्याचा अत्यंत इमानी व हुशार नोकर असून, त्यानें राज्यकारभारांत फारच उत्तम सुधारणा केली. न्याय, लष्कर, शिक्षण वगैरे राज्यांतील सर्व खात्यांत त्यानें सुधारणा केल्या, इतकेंच नाहीं, तर जमिनीची नवीन मोजणी करून, त्यानें सरकारदेण्याचे दर कायमचे ठरवून दिले. ह्या पद्धतीचे अवशेष अद्यापि महाराष्ट्रांत दिसून येतात. सन १४७० त

NATIONAL ARCHIVES OF INDIA

बहामनी लष्करास मिळत असलेला पगार सन १८३० च्या इंग्रजी लष्करास मिळत असलेल्या पगारापेक्षां पुष्कळ ज्यास्त होता. शिवाय पैशाची किंमत त्या वेळीं हल्लींच्यापेक्षां फार ज्यास्त होती, तें वेगळेंच. ५०० घोडेस्वारांच्या पथकाचा स. १४७० तील वार्षिक खर्च ३,१५,९३० रुपये होता. एवढ्याच इंग्रजी लष्कराचा १८३० सालचा खर्च २,१९००० रुपये होता. स्वतःचा घोडा व हत्यारें बाळगणाऱ्या शिलेदारास त्या वेळेस महिना ४० रुपये पगार मिळे. इंग्रजी राज्यांत अशा नोकरास २० रुपये पगार असे. एकंदरींत राज्यांतील सर्व खात्यांचें काम चांगल्या रीतीनें चाललें होतें असें दिसतें. राज्यव्यवस्थेच्या निरनिराळ्या शाखांचा एकमेकांवर दाब इतका व्यवस्थित होता, कीं अन्याय करण्यास जागा नव्हती.*

गवानची व्यवस्था महत्त्वाकांक्षी लोकांस आवडली नाहीं. लोकांत असंतोष आहे, हें गवानास कळे. पण आपण केलेले नियम सार्वजनिक कल्याणाचे आहेत, असें समजून तो स्वस्थ बसला. अशा स्थितींत गवानचा नाश करण्याकरितां दुष्ट लोकांनीं एक गुप्त बेत केला. गवानचा मदतगार यूसुफ आदिलखान हा नरसिंहरायावर तैलंगणांत गेला आहे, अशी संधि साधून ते आपली मसलत पार पाडण्याच्या कामास लागले. गवान हा परदेशी पक्षांतला होता;आणि निजाम्-उल्मुल्क्, इतर दक्षणी व हबशी मंडळी त्याजवर उठलेली होती. या मंडळीनें गवानच्या मोर्तबाचें असें एक बनावट पत्र ओढ्याच्या राजास महंमदशहाविरुद्ध लिहिलें, आणि तें आपण रस्त्यांत पकडलें असें सांगून, शहाच्या हातांत दिलें. शहा दारू पिऊन गुंग झाला असतां त्यानें एकदम गवान यास आपल्यासमोर आणवून अविचारानें त्यास ठार मारविलें, (स. १४८१). त्या वेळीं गवानचें वय ७८ वर्षांचें होतें.

महंमद गवानचें नांव केवळ बहामनी राज्यांतच नव्हे, तर जगांतील कोणत्याही देशाच्या उपलब्ध असलेल्या इतिहासांतील थोर पुरुषांच्या नांवांत साजण्यासारखें असल्यामुळें, त्याची विशेष हकीकत देणें अवश्य वाटतें.

---

* वरील मजकूर टेलरच्या इतिहासांतून घेतला आहे.

११. वजीर महंमद गवान, (स. १४०३-८१).—गवानचे पूर्वज इराणांत वजिरीच्या कामावर फार दिवस होते. पुढें त्याच्या घराण्यास राज्यप्राप्ति झाल्यावर महंमद गवान याचा जन्म झाला. सुलतान तह्मास्प आपणास कांहीं दगा करील, या भीतीनें तो स्वदेश सोडून व्यापाराच्या उद्देशानें बाहेर निघाला. फिरत असतां त्यानें प्रत्येक देशांतील प्रसिद्ध विद्वान लोकांचा परिचय करून घेतला. पुढें आपल्या वयाच्या ४३ व्या वर्षी दक्षिणेंतील विद्वान मंडळीच्या भेटी घेण्याकरितां तो जलमार्गानें दाभोळ बंदरीं आला, आणि तेथून बेदरास गेला. बेदराहून पुढें दिल्लीस जाण्याचा त्याचा विचार होता. दुसरा अलाउद्दीनशहा यानें त्याचे अलौकिक गुण पाहून त्यास आपले पदरीं सरदारी दिली. तेव्हांपासून शहाणपणानें हा हळूहळू वाढत गेला. तो सुनी पंथाचा होता. महंमदशहावर त्याची अकृत्रिम निष्ठा होती. गवानच्या औदार्याची कीर्ति दूरवर पसरली असून, विद्वानांस त्याचा लाभ मिळाला नाहीं असें एकही शहर नव्हतें. त्याचा स्वभाव मनमिळाऊ असून, त्याची न्याय करण्याची पद्धत निर्दोष होती. दक्षिणेंत त्याच्या औदार्याची साक्ष देणारीं कामें पुष्कळ आहेत. बेदर येथें त्यानें एक भव्य पाठशाळा स्थापिली. हा स्वतः कवि होता. गणितांत त्याचा हात धरणारा त्या-वेळेस कोणी नव्हता.

मरणसमयीं आपण निर्दोषी आहों अशी शहाची खात्री करण्याचा त्यानें पुष्कळ प्रयत्न केला. शेवटीं मरण सुटत नाहीं हें पाहून तो शहास बोलला, 'अशा कृत्यानें तुमच्या नांवास काळिमा लागून तुमचें राज्यही लयास जाईल.' शेवटीं तसें झालें. बादशहाचें बोलावणें आल्यावर त्याजकडे जाऊं नये असें त्यास पुष्कळ स्नेही सांगत असतां, आपल्या खरेपणावर भरंवसा ठेवून तो बादशहाकडे गेला. पण तेथें त्याचा विपरीत परिणाम झाला.

महंमद गवानची योग्यता त्या वेळीं सर्व लोकांत मोठी होती इतकेंच नाहीं, पण हिंदुस्थानांतील त्या वेळपर्यंतच्या सर्व मुसलमानांमध्यें इतका थोर व शहाणा मनुष्य निपजला नाहीं असें समजतात. स्वदेशाची नोकरी करितांना स्वार्थ साधण्याची किंवा स्वतः मोठेपणास चढण्याची त्यास यत्किंचित् इच्छा नव्हती. राजावर त्याची भक्ति अगदीं पूर्ण व

अकृत्रिम होती. दोन अल्पवयी व अप्रबुद्ध राजांचें त्यानें संगोपन केलें, पण त्यांस बाजूस सारून स्वतःचा तळीराम गार करण्याचा अधमपणा त्यानें केला नाहीं. त्यानेंच थोरपणास चढविलेले सरदार पुढें लवकरच अधिकार बळकावून स्वतंत्र होऊन बसले, तर तीच गोष्ट त्यास करण्यास फारशी दुर्घट नव्हती. औदार्य व निष्पक्षपात कायम ठेवून त्यानें केलेल्या सुधारणा, युद्धकलेंत दिसून आलेलें त्याचें चातुर्य व धीटपणा, त्याची अप्रतिम न्यायबुद्धि आणि खासगी व सरकारी संबंधांत परोपकार करण्याची इच्छा, इत्यादि अनेक गुणांनीं इतिहासांत त्याचें नांव अजरामर झालें आहे. बेदरच्या पाठशाळेंत तो दररोज जात असे. त्याच्या थोरपणाच्या अनेक गोष्टी बहामनी राज्याच्या इतिहासकारांनीं लिहून ठेविल्या आहेत. कोंकणच्या स्वारींतून परत आल्यावर राजा व राणी ह्यांनीं मुद्दाम जाऊन त्याची भेट घेतली. राजानें तर त्या वेळेस स्वतःच्या अंगावरचा झगा काढून त्याच्या अंगावर घातला. राजा निघून गेल्यावर गवान आपल्या खोलींत जाऊन जमिनीवर अंग टाकून रडूं लागला. कांहीं वेळानें त्यानें बेदरच्या लोकांस बोलावून आणिलें, आणि जवळ असलेली सर्व संपत्ति त्यांस वांटून दिली. पुढें लोकांनीं असें करण्याचें कारण त्यास विचारिलें, तेव्हां तो म्हणाला, 'जेव्हां राजा माझ्या भेटीस आला आणि प्रत्यक्ष राणीनें मला आपला भाऊ म्हणून हांक मारिली, तेव्हां माझ्या मनांत दुष्टवासना उत्पन्न होऊन माझी विवेकबुद्धि गुंग होऊन गेली. त्यामुळें अत्यंत दुःख होऊन त्या दुःखाचें कारण जी संपत्ति ती मी सर्व वांटून टाकीत आहें.' दरशुक्रवारीं तो वेष पालटून लोकांस दानधर्म करीत शहरांत फिरे; आणि 'हें तुम्हांस राजानें दिलें आहे,' असें सांगून तो धर्म करी. दूरदूरच्या मुसलमानी राज्यांतील विद्वानांस त्याच्या औदार्याचा प्रसाद मिळत असे.

राजानें अधमपणानें ज्याचा खून केला त्याची योग्यता इतकी मोठी होती. गवानचा खजीनदार त्याचें द्रव्य दाखवितांना राजास बोलला, 'गवानला मारण्यापेक्षां हजारों मनुष्य तुम्हीं स्वसंरक्षणार्थ मारिले असते तरी हरकत नव्हती; परंतु ओढ्याच्या राजाला पाठविलेलें पत्र खरोखर कोणीं लिहिलें ह्याचा तपास तुम्हीं कां बरें केला नाहीं?'

गवानपाशीं अगणित संपत्ति आहे अशी शहाची समजूत होती. गवानास ठार मारिल्यानंतर त्याच्या खजानजीस त्यानें त्याची संपत्ति दाखविण्यास सांगितलें. त्यानें जीवदानें मिळण्याचें वचन घेऊन शहास संपत्ति दाखविली. गवानजवळ दोन खजिने होते. एक शहाचा खजिना, त्यांत फौजेच्या वगैरे खर्चाकरितां सुमारें १५००० रुपये शिल्लक होते. दुसरा गरिबांचा खजिना, त्यांत तीनशें रुपये होते. बंगल्यांत सामान कायतें निजण्याच्या चटया व स्वयंपाक करण्याचीं मातीचीं भांडीं इतकेंच सांपडलें. पुस्तकालयांत तीन हजार पुस्तकें होतीं, पण तीं सर्व पाठशाळेस दिलेलीं होतीं. त्यानें इराणांतून ४० हजारांची रक्कम आपणाबरोबर आणिली होती, तिचा तो व्यापार करी व मुद्दल कायम राखून जो फायदा होई, त्यांतून तो दररोज दोन रुपये स्वतःच्या खाण्याकडे व दोन रुपये पोषाख वगैरेकडे खर्च करी. याप्रमाणें त्याचा खासगी वर्तनक्रम पाहून शहास व गवानच्या शत्रूंस फार आश्चर्य वाटलें. शहास तर कृतकर्माचा इतका पश्चात्ताप झाला, कीं त्यामुळें तो झुरणीस लागून पुढें लवकरच मरण पावला. गवान मेल्यावर त्याचे साथीदार होते ते शहास सोडून दूर राहूं लागले. त्यांस संतोषविण्यास शहानें पुष्कळ उपाय केले, पण ते सफल झाले नाहींत. आपल्यामागून मुलगा महंमूद यानें तख्तावर बसावें असा ठराव करून, सन १४८१ त महंमद्-शहा मरण पावला.

१२. महंमूदशहा, (सन १४८२–१५१८)—गादीवर बसला तेव्हां महंमूदशहाचें वय बारा वर्षांचें होतें. त्यानें पुष्कळ वर्षें राज्य केलें. त्याच्या कारकिर्दींत दक्षणी व परदेशी या दोन पक्षांचे तंटे विकोपास जाऊन एकसारखे दंगेधोपे चालू राहिले, आणि त्यांतच राज्याचा अंत झाला. ह्या वेळीं निजामुल्मुल्क बहिरी हा दक्षणी तटाचा पुढारी असून वजीर होता, आणि यूसुफ आदिलखान हा गवानच्या मागून परदेशी तटाचा पुढारी झाला होता. बहिरी हा मूळचा बाटलेला हिंदु होता, आणि यूसुफ हा तुर्क गुलाम होता. यूसुफ हा विजापूरचा सुभेदार होता. तिकडे त्यानें आपला अधिकार पुष्कळ वाढविला. त्यास त्या कामावरून दूर करण्याकरितां शहानें पुष्कळ प्रयत्न केले. निजामाच्या हातांत शहा हा केवळ बाहुल्याप्रमाणें होता. त्याच्यानें दोन

पक्षांतील तंट्यांचा बंदोबस्त झाला नाहीं. हे तंटे विकोपास जाऊन राजधानींत वीस दिवस सारखा रक्तपात चालला होता. उभय पक्षांचे पुष्कळ लोक मेले. शहाच्या मनांत त्या दक्षणी वजिराविषयीं वांकडें येऊन त्यास ठार मारण्याचा त्यानें प्रयत्न केला, तो सफळ झाला नाहीं. पुढें परदेशी लोकांचा कट जास्त बळकट होऊन त्यांनीं वजीर निजाम्-उल्मुल्क यास ठार मारिलें. तेव्हां शहा निर्धास्त होऊन चैनबाजींत निमग्न झाला. तख्त-इ-फिरोज फोडून त्याचे त्यानें चहा पिण्याचे पेले केले. नंतर दक्षिणी व हबशी लोकांनीं शहास ठार मारण्याचा घाट केला. वाड्यांत मोठा दंगा उसळला. पण शेवटीं परदेशी लोकांच्या मदतीनें शहा वांचला. ह्यानंतर शहाच्या दुर्व्यसनाचा कळस झाला. सर्व रयतेनेंही तोच कित्ता उचलिला. पाठशाळेंतील शिक्षकही हातांत पेले घेऊन झिंगूं लागले. तेव्हां शहाचा अधिकार कोणी जुमानीनासें झालें. निरनिराळे सुभेदार स्वतंत्र झाले. मयत निजाम्-उल्मुल्क ह्याचा मुलगा मलीक अहंमद बहिरी यानें अहंमदनगर नांवाचें शहर वसविलें. विजापूरचा सुभेदार यूसुफ आदिलखान व वऱ्हाडचा सुभेदार फत्तेउल्ला इमाद्-उल्मुल्क यांस त्यानें आपआपल्या जागीं स्वतंत्र होण्यास भर दिली; तेव्हां तेही लवकरच स्वतंत्र झाले, (सन १४९३). त्याचप्रमाणें तैलंगणचा सुलतान कुली ऊर्फ कुत्ब्-उल्मुल्क हाही स्वतंत्र झाला. बेदरचा सुभेदार कासीम बेरीद हा शहास नामशेष करून स्वतंत्रतेनें सर्व कारभार करूं लागला. ह्या वेळेपासून म्हणजे सन १४९३ च्या सुमारास बहामनी राज्य समाप्त झालें, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

बहादूरखान नामक एक सरदार मिरज, पन्हाळा, कोल्हापूर, दाभोळ, चौल व इतर कोंकणांतील मुलूख बळकावून बसला होता. त्याजवर शहानें स्वारी करून त्यास ठार मारिलें, आणि त्या प्रांतीं दुसरा एक सरदार कायम केला. वरच्या स्वतंत्र सरदारांपैकीं कित्येक सरदार मरण पावले, आणि त्यांचे अधिकार त्यांच्या मुलांस प्राप्त झाले. पुढें इ.स. १५१८त दुर्दैवी महंमूदशहा बहामनी मरण पावला. त्याचें सर्व आयुष्य हाल अपेष्टेंत गेलें. त्यानें सदतीस वर्षें राज्य केलें.

अहमदशहा, (सन १५१८–१५२०).—मयत शहाचा मुलगा अहंमद यास राजधानीच्या प्रांताचा सुभेदार अमीर बेरीद, कासीम बेरीदचा मुलगा, ह्यानें तख्तावर बसवून राज्यकारभार चालविला, आणि शहाच्या निर्वाहास त्यानें थोडीशी नेमणूक करून दिली. अशा दैन्यावस्थेंत दोन वर्षे घालवून स. १५२० त शहा मरण पावला.

अला-उद्दीनशहा, (सन १५२०–२१)—पुढें अहंमद शहाचा भाऊ अला-उद्दीन गादीवर बसला, पण वजीर अहंमद बेरीद ह्यानें त्यास पदच्युत करून वल्ली-उल्ला यास तख्तावर बसविलें, (स. १५२१–२४). शहाच्या राणीवर फिदा होऊन अमीर बेरीदनें त्यास ठार मारिलें. यानंतरचा शहा कलीम-उल्ला (स. १५२४–१५२६) हा आमरण अहंमदनगरच्या बुऱ्हाण निजामशहाकडे राहत होता.

१३. बहामनी राज्याचें समालोचन.—प्रसिद्ध वजीर महंमद गवान मरण पावल्यावर बहामनी राज्य लवकरच मोडून त्याचीं पांच राज्यें झालीं तीं येणेंप्रमाणें:—१ विजापूरचें आदिलशाही; २ गोवळकोंड्याचें कुत्बशाही; ३ वऱ्हाडचें इमादशाही; ४ अहंमदनगरचें निजामशाही; आणि ५ अहंमदाबाद बेदरचें बेरीदशाही. बहामनी राज्य सन १३४७ पासून सन १५२६ पर्यंत सरासरी १७९ वर्षे चाललें. त्याच्या अंतःस्थितीचें थोडेंसें वर्णन देणें अवश्य आहे.

यादवांच्या* मागून महाराष्ट्रांत प्रबळ राज्य असें हेंच झालें. विजयनगरचें हिंदु राज्य मात्र ह्याच्या तोडीचें होतें. शिवाय वरगूळ, ओढ्या, कोंकणपट्टी, येथें लहान लहान हिंदु राज्यें होतीं त्या सर्वांस जिंकून, बहामनी शहांनीं नर्मदेपासून तुंगभद्रेपर्यंत आपला अंमल बसविला होता. गुजराथ व माळवा ह्या देशांवर स्वतंत्र मुसलमान राजे राज्य करीत होते. त्या काळच्या हिंदुस्थानांतील सर्व राज्यांत बहामनी राज्य बळकट असून, संपत्तीनें व ऐश्वर्यानें दिल्लीच्या तत्कालीन मुसलमानी बादशाहीच्या बरोबरीचें होतें. दिल्लीच्या बादशहास बहामनी राजांकडे वांकड्या नजरेनें पाहण्याची छाती नव्हती. ह्या राज्याची व्यवस्था आरंभीं

---

* यादव व इतर प्राचीन मराठी राजे यांचा इतिहास दुसऱ्या भागाच्या आरंभीं दिला आहे.

चांगली होती. पण कालांतरानें क्षुल्लक कारणांवरून परमुलखांवर स्वाऱ्या करून बहामनी राजे राज्यविस्तार करूं लागले; आणि जिंकिलेल्या प्रांतांची नीट व्यवस्था करण्याकडे कोणीं फारसें लक्ष दिलें नाहीं. महंमद गवानच्या वेळेपर्यंत ह्या राज्याच्या चार तर्फा किंवा चार सुभे होते. गवाननें एकंदर राज्याच्या आठ तर्फा केल्या. तर्फावर नेमिलेले अधिकारी एक प्रकारचे स्वतंत्र राजेच असतात. दिवाणी, मुलकी, फौजदारी व लष्करी वगैरे सर्व अनियंत्रित अधिकार त्यांजकडे असतात. तर्फदारांस जहागिरी नेमून दिलेल्या असत; रोकड वेतनें नसत. प्रत्येक तर्फदार आपापल्या शक्तीप्रमाणें हुजूरच्या हुकुमाची अवज्ञा करूं लागला. असें करितां करितां त्याचे अधिकार हळू हळू वाढत गेले. जोंपर्यंत शहाचें दरबार जोरांत होतें, तोंपर्यंत तर्फदारांचें कांहीं चाललें नाहीं. पण शहाचें वजन कमी पडतांच तर्फदारांस जोर आला. निजामशहा व महंमदशहा अल्पवयी असल्यामुळें, त्यांच्याच वेळेस हें राज्य मोडावयाचें, पण महंमद गवानच्या शहाणपणानें तें कांहीं दिवस टिकलें. गवाननें जी व्यवस्था केली तीमुळें तर्फदारांस स्वतंत्र अधिकार वापरितां येईनात; म्हणून ते सर्व या व्यवस्थेच्याविरुद्ध होते. ज्या सालीं बहामनी राज्याची समाप्ति झाली, त्याच सालीं बाबरनें मोगल राज्य हिंदुस्थानांत स्थापिलें. बाबरच्या वंशजांनीं ह्या बहामनी राज्याच्या शाखांचा शेवटीं अंत केला. बुडत चाललेल्या पेशवाईस तारणारा नाना फडनवीस, आणि हीन दशेस पावलेल्या बहामनी राज्याला पुनः ऊर्जित दशेस आणणारा महंमद गवान, ह्या उभयतांच्या कर्तबगारींत पुष्कळ साम्य आहे. राज्य स्थापन झाल्यापासून कांहीं दिवस तें सुरळीत चालून वृद्धिंगत व्हावयाचें, आणि वाढतां वाढतां शेवटीं त्याच्या स्वतंत्र शाखा बनून त्यांचाही पुढें लय व्हावयाचा, हा राज्यनियम मोगल बादशाही, मराठेशाही व जुनें चालुक्याचें राज्य ह्या सर्वांस सारखाच लागू पडतो. बहामनी राज्याच्या नाशाचीं कारणें येणेंप्रमाणें.

(१) सरदारांस मोठमोठ्या जहागिरी वंशपरंपरा नेमून देणें; (२) मोठमोठ्या सुभ्यांवर स्वतंत्र अधिकार देऊन कायमचे कामगार नेमणें; (३) सर्व नोकरांस व रयतेस सारखे लागू पडणारे कायदे व नियम यांचा अभाव असणें; (४) कामदारांच्या नियमित पायऱ्या बांधून

१६-७९१-२०००

नियमानुसार सर्वांस वर चढण्यास सारखी सवड ठेविल्यानें दरबार ही मुत्सद्दी बनविण्याची एक शाळाच होते, अशी व्यवस्था केलेली नसणें.

बहामनी राजे प्रजेस सुख देत, आणि जरी हिंदूंस विनाकारण त्रास देत नसत, तरी हिंदूंस दरबारांत मोठेमोठे अधिकार मिळत नसत. एवढ्या इतिहासांत वर लिहिलेल्या हकीकतींत हिंदु अंमलदारांचीं नांवें फार थोडीं आहेत. फौजेंत हिंदूंस जागा थोड्याच मिळत, आणि मुसलमानांचें वर्चस्व हिंदूंवर असे. हिंदु लोक हलक्या नोकऱ्या व शेतीभाती करून स्वस्थ असत. त्यांस आपल्या धर्मांप्रमाणें आचरण करण्यास प्रतिबंध नसे. बहामनी राज्यांत इतकीं बंडें झालीं, इतक्या लढाया झाल्या, व इतक्या राज्यक्रांती झाल्या, पण कोणत्याही खटपटींत हिंदु लोक अग्रेसर असल्याचें आढळत नाहीं. त्यांनीं बंडें केलीं नाहींत; आणि सामान्यतः दुष्ट कृत्यास साह्य केलें नाहीं. जरी बहामनी राज्यांत हिंदूंचीच मुख्यतः वस्ती होती, तरी हबशी, तुर्की, इराणी, मोगल वगैरे असंख्य परदेशी लोक इकडे येत, आणि त्यांसच राजाश्रय व इनामें मिळत. हल्लींच्या दक्षिणेंतील मोठमोठ्या मुसलमान घराण्यांची उत्पत्ति बहामनी राजांच्या वेळची आहे. अशीं घराणीं वाढत गेल्यानें व त्यांस राजाश्रय असल्यानें हिंदूंचें महत्त्व कमी कमी होत गेलें. विजयनगरचें राज्य शेजारीं नसतें तर हिंदूंचा निःपात ह्याहूनही जबरदस्त झाला असता.

बहामनी राज्याच्या वेळेस परदेशाशीं हिंदुस्थानचा व्यापार व दळणवळण वाढत गेलें. व्यापार बहुतेक कारवानांच्या हातीं होता. व्यापारी लोक युरोपांतील आणि उत्तर व पश्चिमआशियांतील हरएक माल दक्षिणेंत आणीत. नृत्यगायनादि राजाश्रयानें वाढणाऱ्या कला भरभराटींत होत्या. त्या वेळच्या हकीकतींवरून असें कळतें, कीं रस्त्यांवर चोरांचें भय नसून प्रवास करणारांस उपद्रव होत नसे. बहामनी राजे तोफांचा उपयोग करीत असत. त्या राजांनीं बांधिलेल्या कित्येक इमारती पाहण्यालायक आहेत. कलबुर्गा व बेदर हीं त्यांचीं राजधानीचीं शहरें होतीं. बेदरची पाठशाळा वर्णनीय होती. ह्या राज्यांत सर्व जातींच्या लोकांस शिक्षण मिळण्याच्या जरी सोयी नव्हत्या, तरी मुसलमान लोकांस शिक्षण देण्याची व्यवस्था प्रत्येक खेड्यांत केलेली होती. फारशी व आरबी या

भाषा बिनखर्चानें शिकतां येत असत. ह्या राज्यांत मुसलमान जातीच्या विद्वान्, कवि व पंडित लोकांस राजाश्रय चांगला मिळे.

हिंदु लोकांची ग्रामसंस्था ह्या राज्यांत दिवसेंदिवस दृढ होत चालली होती. अथेनेसियस नितिकिन ह्या नांवाचा रशियांतील आर्मिनिया प्रांतांतला एक व्यापारी सन १४७०त बेदर शहरास आला होता. त्यानें तेथली कांहीं हकीकत लिहून ठेविली आहे. दरदोन मैलांच्या अंतरानें हल्लींच्या प्रमाणेंच त्या वेळेस गांवें वसलेलीं असत. रस्त्यांवर चांगला बंदोबस्त असून प्रवास करणारांस भीति नसे. बेदरची हवा फार चांगली असून तें शहर सुरेख होतें. बहामनी राजांनीं बांधिलेले किल्ले हेच त्यांचें चिरकाल राहणारें स्मारक आहे. त्यांनीं सपाटीवरचे, व डोंगरी वगैरे सर्व प्रकारचे मजबूत किल्ले बांधिले. गाविलगड, व नरनाळा, हे मजबुदीची साक्ष आजमितीस देत आहेत. मोठमोठ्या गांवांतून मशिदी असून त्यांस सरकारांतून नेमणुका करून दिलेल्या असत. प्रत्येक मशिदींत एक मुल्ला नेमिलेला असे. तोच शालाशिक्षकाचेंही काम पाही. मोठमोठ्या शहरांतून पाठशाला असून त्यांस मोठाल्या नेमणुका करून दिलेल्या असत. तैलंगणप्रांतांत बहामनी राजांनीं बांधिलेले पुष्कळ तलाव हल्लीं शाबूद आहेत.

प्रकरण तेरावें.

बेरीदशाही, इमादशाही व निजामशाही.

सन १४८९–१६३७.

१. बेरीदशाही, (स. १४९२–१६५६). २. इमादशाही, (स. १४८४–१५७२). ३ निजामशाही, (स. १४८९–१६३७). ४. चांदबिबी व मोगलांशीं युद्ध, (१५९४). ५. मलिकंबरचा कारभार, (१५४६). ६. निजामशाहीची अखेर, (स. १६३३). ७. शहाजी भोसले याची अखेरची धडपड.

१. बेदरची बेरीदशाही, (सन १४९२–१६५६).—कासीम बेरीद, (सन १४९२–१५०४).—बहामनी राज्याची राजधानी

बेदर येथें कासीम बेरीद नांवाचा पुरुष स्वतंत्र राज्यकारभार करूं लागला, हें मागें सांगितलेंच आहे. कासीम हा प्रथम महंमदशहापाशीं गुलाम होता. त्या सुलतानाच्या कार्किर्दीत मराठ्यांनीं बंड केलें तें कासीम यानें मोडिलें, तेव्हां शहानें त्यास योग्यतेस चढविलें. तो स. १४९२त बेदूर येथें स्वतंत्र झाला, आणि बारा वर्षें कारभार करून सन १५०४त मरण पावला.

अमीर बेरीद, (सन १५०४–१५४९).—आसपासच्या राजांशीं लढून स्वतःचें संरक्षण करण्यांत ह्याचे दिवस गेले. सन १५२९त विजापूरच्या राजानें बेदरवर हल्ला करून, अमीर बेरीद याचें बहुतेक राज्य हिरावून घेतलें. बेदर व त्याच्या सभोंवारचा चार पांच लाखांचा मुलूख मात्र त्याजकडे राहिला. अमीर बेरीद सन १५४९ त मरण पावला.

अली बेरीदशहा, (सन १५४९–१५९२).—अलीनेंच प्रथमतः शहा हा किताब धारण केला. पण अहंमदनगरच्या निजामशहानें त्याच्या राज्याचा बराच भाग हल्ला करून घेतला. हा सन १५६२ त मरण पावला. नंतर त्याचा पुत्र इब्राहीम बेरीदशहा यानें सन १५६९पर्यंत, इब्राहीमचा धाकटा भाऊ दुसरा कासीम बेरीद ह्यानें सन १५७२पर्यंत, आणि नंतर कासीमचा पुत्र मीर्झा अली बेरीद, ह्यांनीं बेदरास राज्य केलें. हळूहळू बेदरचें राज्य कमी होत चाललें होतें. असें होतां होतां पुढें स. १६५६ सालीं दक्षिणदेशाचा मोगल सुभेदार औरंगजेब व त्याचा सरदार मीर जुम्ला ह्यांनीं विजापुरावर स्वारी केली. त्या वेळेस त्यांनीं बेरीदशाहीच्या तख्तावर असलेल्या पुरुषापासून बेदरशहर व किल्ला घेतला, आणि त्याच वेळीं, सन १४७८ त, महंमद गवाननें स्थापिलेली बेदरची पाठशाला दारू भरून उडवून दिली. येणेंप्रमाणें बेरीदशाहीचा अंत झाला.

२. वऱ्हाडची इमादशाही, (सन १४८४–१५७२). फत्तेउल्ला इमादशहा, (सन १४८४).—हा मूळचा तैलंगी ब्राह्मण. ह्याचा बाप विजयनगरांत राहत असे. विजयनगरच्या राजाबरोबर चाललेल्या लढाईत कैद होऊन तो मुसलमानांच्या हातीं लागला, आणि त्यास मुसलमानी धर्माची दीक्षा मिळाली. तेव्हांपासून तो महंमद गवानच्या

मेहेरबानीनें हळूहळू योग्यतेस चढला. पुढें त्यास इमाद-उल्मुल्क हा किताब, व वऱ्हाडची सुभेदारी मिळाली. सन १४८४ त इमादशहा असें नांव धारण करून तो आपल्या सुभ्याचा कारभार स्वतंत्रपणें करूं लागला. पुढें तो त्याच वर्षी मरण पावला.

अलाउद्दीन इमादशहा, (सन १४८४–१५२७)—ह्यानें गाविलगड ही आपली राजधानी केली. हा किल्ला बिकट ठिकाणीं बांधिलेला असून मजबूद आहे. तेथें त्या वेळची एक मशीद अद्यापि हयात आहे. महंमदशहा बहामनी बेदरहून पळाला, तो कांहीं दिवस अला-उद्दीनकडे येऊन राहिला होता. पण कांहीं दिवसांनीं तो पुनः वजीर अमीर बेरीद याजकडे गेला. कित्येक कारणांवरून[1] अहंमदनगरच्या निजामशहाशीं अला-उद्दीनचें वैर जडलें, आणि त्याशीं युद्ध करण्याकरितां खानदेश, व गुजराथ येथील राजांची त्यास मदत घ्यावी लागली. त्यासाठीं गुजराथच्या राजास त्यानें आपला बराच मुलूख दिला. सन १५२७त अला-उद्दीन मरण पावला, आणि त्याचा ज्येष्ठ पुत्र दर्या इमादशहा तख्तावर बसला.

दर्या इमादशहानें निजामशहाच्या घराण्याशीं सोयरीक केली. त्याच्या अंमलांत दंगेधोपे न होतां राज्यांत शांतता होती. त्याचा मुलगा बुऱ्हाण इमादशहा लहान असतांच गादीवर आला. त्याच्या अल्पवयांत तोफलखान नामक एका धाडशी व धूर्त सरदारानें सर्व अधिकार बळकाविला. सन १५७२ ह्या वर्षी तोफलखानावर मूर्तुझा निजामशहानें स्वारी केली. तोफलखान नरनाळा किल्ल्यांत जाऊन राहिला. मूर्तुझा निजामशहा व त्याचा दिवाण जंगीझखान यांनीं तोफलखान व इमादशहाचा वंशज ह्यांस जिंकून ठार मारिलें, आणि वऱ्हाडचें राज्य अहंमदनगरच्या निजामशाहीस जोडिलें. मोगल बादशहा अकबर ह्यास ही गोष्ट न आवडून, त्याच्या मनांत निजामशहाविषयीं द्वेषभाव उत्पन्न झाला, ती गोष्ट अकबराच्या कारकिर्दीत येईल. इमादशाहीचा शेवट वर लिहिल्याप्रमाणें झाला.

३. अहंमदनगरची निजामशाही, (स. १४८९–१६३७).—अहंमद निजामशहा, (स. १४८९–१५०८).—विजयनगरास तिमाप्पा बहिरू (बहिरव ?) नामक एक ब्राह्मण होता. मलीक नाईब निजामुल्मुल्क बहिरी हा त्या तिमाप्पाचा मुलगा होय. अहंमदशहाच्या फौजेनें विजय-

१ अहमदनगर व वऱ्हाड [illegible] मुलुख [illegible] कांहीं [illegible] असावी असें होते.

नगरच्या राजाबरोबर लढाई करून त्या मुलास कैद करून आणिलें. पुढें तो मुसलमान झाला. महंमदशहाच्या पदरीं महंमद गवानच्या वेळेस हा उदयास आला. त्याचा मुलगा अहंमद यानें अहंमदनगरच्या निजामशाहीची स्थापना केली. स्वतंत्र होण्यापूर्वी त्यानें कित्येक किल्ले घेतले. त्यांतच शिवनेरी किल्ला होता; त्यांत त्यास पुष्कळ धन सांपडलें. नंतर त्यानें चंदनवंदन, लोहगड, तोरणा वगैरे दक्षिणचे बहुतेक किल्ले काबीज केले; आणि राजापुरापर्यंत कोकणप्रांत जिंकिला. तो जुन्नरास राहत असे. त्यानें आपल्या मुलखाची व्यवस्था इतकी उत्तम ठेविली होती, कीं त्याच्या राज्यांत एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत काठीला सोनें बांधून लोकांनीं खुशाल फिरावें. त्याच्या हुकमाशिवाय राज्यांत पान देखील हालत नसे. बहामनी शहानें त्याजवर स्वारी केली, तींत त्या शहाचाच पराभव झाला. त्याचा शिरजोरपणा कमी करण्यासाठीं शहानें पुष्कळ उपाय केले, पण त्यास यश आलें नाहीं. अखेरीस अहंमद हा निजामशहा या नांवानें स्वतंत्रतेनें राज्य करूं लागला. दौलताबाद व जुन्नर ह्यांचे दरम्यान बिंकर म्हणून खेडें होतें, तें त्यास सोयीचें वाटल्यावरून तेथें अहंमदनगर नांवाचें शहर त्यानें बसविलें, (सन १४९४). ह्या वेळेस मराठे लोक दक्षिणेंत पुंडाई करूं लागले होते. अहंमद निजाशहानें दौलताबादचा किल्ला वेढा घालून घेतला. पुढें अनेक पराक्रम करून हा सुलतान सन १५०८ सालीं निवर्तला. अहंमदशहाच्या अंगचे सद्गुण वर्णन करण्यास आपण असमर्थ आहों, असें फेरिस्ता म्हणतो. त्यानें एकपत्नीव्रत पाळिलें. द्वंद्वयुद्ध करून तंट्याचा निकाल करण्याची चाल ह्यानेंच दक्षिणेंत पाडिली. राजाचें अनुकरण करून सर्व लहान थोर लोकांत खेड्यापाड्यांतून सुद्धां ह्या खेळाची अभिरुची वाढून, जिकडे तिकडे तलवारीचा पट्टा व बोथाटी खेळण्याचे आखाडे स्थापन झाले.

बुऱ्हाण निजामशहा, (स. १५०८–१५५३).—अहंमदशहाचा मुलगा बुऱ्हाण हा सात वर्षांचा असतांना गादीवर बसला. मखमलखान नामक हुशार व राज्यकार्यधुरंधर प्रधानाच्या देखरेखीखालीं बुऱ्हाणशहाचा अभ्यास फार चांगला झाला. दहा वर्षांचा असतांच तो फारशी भाषेमध्यें सुरेख निबंध लिहीत असे. विजापूरचा राजा इस्माईल आदि-

NATIONAL ARCHIVES OF INDIA

लशहाच्या मुलीशीं ह्याचें लग्न झालें. पुढें इस्मईलशीं बुऱ्हाणशहाचें युद्ध होऊन, बुऱ्हाणचा पराभव झाला. इमादशहाशीं युद्ध करूनही बुऱ्हाणचाच पराभव झाला. शेवटीं सर्व राजांमध्यें तह ठरला. कंवरसेन नांवाचा ब्राह्मण बुऱ्हाणशहाच्या दरबारीं फार दिवस मुख्य प्रधानाचें काम पाहत होता. त्यानें फार हुशारीनें कारभार केला. एकदां गुजराथचा बहादूरशहा व बुऱ्हाण निजामशहा ह्यांच्या भेटी मोठ्या समारंभानें गुजराथेंत होऊन दोघांचा स्नेह दृढ झाला. ह्या कार्किर्दींत मराठे लोक प्रसिद्धीस येऊं लागले. संभाजी चिटणीस यास प्रतापराव असा किताब मिळून त्याची परराज्यांतील वकिलातीच्या कामावर नेमणूक झाली. शहा ताहीर नांवाचा एक विद्वान् मुत्सद्दी बुऱ्हाणशहाच्या पदरीं होता. त्याच्या सल्लयानें शहानें आपल्या मुलखांत जबरदस्तीनें शिया धर्माची स्थापना केली, त्यामुळें सुनी लोकांनी दंगा चालविला, आणि गुजराथ, खानदेश, व विजापूर येथील राजे सुनी धर्माचा प्रसार करण्याच्या हेतूनें एकत्र झाले. त्या वेळीं बुऱ्हाणशहानें दिल्लीच्या हुमायून बादशहाकडे मदत मागितली. पण हुमायून धांदलींत असल्यामुळें त्यानें मदत दिली नाहीं. हे धर्मसंबंधीं तंटे फार वाढले. विजापूरच्या आदिलशहाशीं दोन वेळ युद्ध होऊन त्यांत बुऱ्हाणशहाचा पराजय झाला. विजयनगरच्या रामराजाची मदत घेऊन त्यानें विजापूरच्या राज्यावर अनेक स्वाऱ्या केल्या. येणेंप्रमाणें बुऱ्हाणशहाची बहुतेक कार्कीर्द लढण्यांत गेली. ४७ वर्षें राज्य करून बुऱ्हाणशहा सन १५५३त मरण पावला. त्यास पांच पुत्र होते. डोंगरी मुलखांतून राहणारे मराठे लोक प्रजेस त्रास देत, त्यांचा ह्या कार्किर्दींत बंदोबस्त होऊन त्यांस मोठमोठ्या हुद्यांच्या जागा मिळाल्या. ह्या कामीं त्याच्या ब्राह्मण दिवाणाची त्यास फार चांगली मदत झाली.

हुसेन निजामशहा, (स. १५५३–१५६५).—हा सुलतान गादीवर बसल्याबरोबर भावाभावांत तंटे उपस्थित झाले. विजापूर, गोवळकोंडें, व विजयनगर येथील राजे एकत्र होऊन अहंमदनगरावर चालून आले, आणि त्यांनीं त्या राजधानीस वेढा घातला. तेव्हां हुसेनशहानें सर्वांशीं तह केला. तरी हे तंटे पुष्कळ दिवस मिटले नाहींत. विजयनगरचा राजा ह्या वेळेस फार प्रबळ झाला होता. सर्व मुसलमान राजांस तो त्रास देऊं

लागला. त्याचा समूळ उच्छेद करावा, ह्या हेतूनें सर्व मुसलमान राजे एकत्र झाले. सन १५६४ सालीं तालिकोट येथें हिंदु व मुसलमानांची जंगी लढाई झाली, तिचें वर्णन विजयनगरच्या इतिहासांत यावयाचें आहे. वस्तुतः ह्या वेळेपासूनच मुसलमानांचा अंमल थेट दक्षिणेपर्यंत सुरू झाला. ह्या वेळेसच पराक्रमी बादशहा अकबर दिल्लीहून सर्व हिंदुस्थान आक्रमीत चालला होता. तालिकोटच्या लढाईत हुसेन निजामशहाच्या तोफखान्यानें उत्तम कामगिरी बजाविली. त्याजवळ ६०० तोफा असून, त्यांजवर चलीबी रूमीखान नामक एक मुसलमान सरदार मुख्य होता. हा आशियामायनरांतील राहणारा असून, युरोपांतील लष्करी खात्यांत तोफखान्याचें काम शिकून निपुण झाला होता. तालिकोटच्या लढाईत रामराय मारला गेला, आणि हिंदूंचें सैन्य पळून गेलें. लढाईहून परत आल्यावर हुसेन निजामशहा आपल्या वयाच्या २४ वे वर्षी मरण पावला. त्यास पुष्कळ मुलें होतीं.

मूर्तुजा निजामशहा, (सन १५६५–१५८६).—हा गादीवर बसला, तेव्हां लहान असल्यामुळें त्याची आई खुजा सुलताना राज्यकारभार पाहत असे. हिनें मोठमोठे सरदार दूर करून त्यांच्या जागीं स्वतःच्या आप्तांस मोठीं कामें दिलीं. विजयनगरचें जिंकिलेलें राज्य कसें वांटून घ्यावें, ह्याविषयीं वाद चालून शेवटीं मुसलमानी राजांच्या आपसांत लढाया सुरू झाल्या. त्याच संधीस राणीस कारभारांतून काढण्याचा गुप्त बेत झाला. तो राणीस कळून, तिनें त्यांत सामील असलेल्या मंडळीस पकडून कैदेंत टाकिलें. सन १५६९ त मूर्तुजानें राज्यकारभार आपल्या हातीं घेतला. त्यानें विजापूरच्या कीश्वरखान नामक सरदारावर स्वारी करून त्यास ठार मारिलें; आणि विजापूरचा धारूर नामक किल्ला हस्तगत केला. नंतर त्याचा विजापूर दरबाराशीं तह झाला. ह्या समयास पोर्तुगीज लोक हिंदुस्थानांत येऊन ते पश्चिमकिनारा बळकावीत चालले होते. रेवदंड्यास त्यांनीं वेढा घातला, आणि निजामशहाच्या सरदारांस दारूच्या बाटल्या नजर करून त्यांनीं तेथें प्रवेश केला. ह्याच सुमारास वऱ्हाडच्या इमादशहास दूर करून, तें राज्य तोफलखान नामक सरदार बळकावून बसला होता, सबब तें व बेदरचें राज्य अशीं दोनही जिंकावीं, असा निजामशहा व विजापूरचा आदिलशहा

ह्यांनीं गुप्त बेत करून, ते त्या उद्योगास लागले. मूर्तुजाचा जंगीझखान नामक हुशार दिवाण होता, त्याची ही सर्व खटपट होती. वऱ्हाडप्रांतावर स्वारी करून मूर्तुजानें तोफलखान व इमादशाही घराण्याचा वंशज ह्यांस ठार मारून वऱ्हाडचें राज्य आपल्या राज्यास जोडिलें. खानदेशचा सुलतान मिरन महंमदखान फरूकी ह्यानें ह्या कृत्यास प्रतिबंध केल्यामुळें, त्याचाही मूर्तुजानें पराजय करून त्याजकडून खंडणी घेण्याचें ठरविलें. बेदरचें राज्य जिंकण्याचें जंगीझखान याच्या मनांत फार होतें. तेव्हां बेदरच्या शहानें आपला वकील जंगीझखानास लांच वगैरे देऊन वश करण्याकरितां पाठविला. पण जंगीझखान पक्का राजनिष्ठ असल्यामुळें तो ह्या लालुचीस वश झाला नाहीं. तेव्हां बेदरच्या वकिलानें हरयुक्ति करून मूर्तुजा निजामशहाच्या मनांत जंगीझखानाविषयीं वाईट भरविलें. तेव्हां मूर्तुजानें विषप्रयोग करून त्या वजिरास ठार मारिलें. पुढें खरा प्रकार शहाच्या नजरेस येऊन त्यास कृतकर्माचा अत्यंत पश्चात्ताप झाला. आपल्यास खरें खोटें समजण्याची शक्ति नाहीं, त्या अर्थी आपण राज्य करण्यास नालायक आहों, असें समजून भरदरबारांत त्यानें सर्व राज्यभार चार हुशार कामगारांस सोंपविला, आणि आपण एकांतवासांत जाऊन ईश्वरभजनांत काळ घालवूं लागला. साहेबखान नामक एका इसमाशिवाय दुसऱ्या कोणासही तो भेटत नसे. हा साहेबखान पुढें फार अनीतीचें आचरण करून लोकांवर जुलूम करूं लागला. तेव्हां दरबारच्या मंडळींनें त्यास ठार मारिलें. पुढें सलाबतखान नामक सरदार मुख्य दिवाण झाला. पण ह्या वेळेपासून शहास बहुतेक वेड लागल्यासारखें झालें होतें. तो आपल्या स्वतःच्या मुलाचा प्राण घेण्यास टपला होता. ह्या कामीं त्याचे दिवाण त्यास मदत करीनात, म्हणून त्यानें त्यांस वारंवार बदलिलें. शहाचा मुलगा मिरन हुसेन ह्यास तख्तावर स्थापण्याचा सर्व मुत्सुद्दी मंडळीनें घाट करून त्यास शहरांत आणिलें. तेव्हां शहास त्रास होऊन तो मरण पावला, (स. १५८६).

मिरन हुसेन व इस्मईल निजामशहा, (स. १५८६–१५९१).— मिरनची बहुतेक कारकीर्द दरबारच्या भानगडींतच निघून गेली. तो स्वभावानें अत्यंत क्रूर होता. त्यांतही दक्षणी व परदेशी ह्या दोन पक्षांमध्यें पुनः तंटे उद्भवून विकोपास गेले. दक्षणी लोक शिरजोर होऊन

त्यांनीं परदेशी लोकांची कत्तल केली. मीर्झाखान नामक वजिराचाही त्यांत वध झाला. पुढें बंडवाल्यांनीं शहाचा वध करून इस्मईल नामक दुसऱ्या इसमास तख्तावर बसविलें, (स. १५८८).

इस्मईल हा मूर्तुजाचा धाकटा भाऊ व बुऱ्हाणनिजामशहाचा मुलगा होता. हा बुऱ्हाण अकबर बादशहाच्या आश्रयास जाऊन राहिला होता. इस्मईल हा लोहगडावर कैदेंत होता. इस्मईल राज्य करूं लागला, तेव्हां जमालखान नामक दक्षणी पक्षाच्या वजिराच्या हातांत बहुतेक सत्ता होती. हा ज़मालखान मह्दी पंथाचा होता. मह्दी पंथ मूळ चमत्कारिक रीतीनें निघाला. हनूफी पंथांतील सय्यद महंमद नांवाचा एक इसम लोकांस असें सांगूं लागला, कीं 'मला एक नवीन पंथ काढण्यासाठीं ईश्वरानें प्रेरणा करून पाठविलें आहे.' तो इसम मह्दी असें नांव धारण करून आपल्या नवीन पंथांचा प्रसार करूं लागला. हिंदुस्थानचे पुष्कळ मुसलमान ह्या पंथाचे अनुयायी बनले. त्यांपैकीं जमालखान हा मह्दी पंथाचा कट्टा अनुयायी होता. सर्व गोष्टी अनुकूल असल्यामुळें त्यानें ह्या पंथाचा विस्तार करण्याचा झपाट्यानें यत्न चालविला. तेव्हां सलाबतखान नामक सरदाराच्या आश्रयानें मह्दी लोकांस हांकून लावण्यासाठीं दुसरा एक पक्ष उत्पन्न झाला. जमालखानानें त्या पक्षांतील लोकांचा पराभव केला. सलाबतखान तर लवकरच मरण पावला. असे तंटे राजधानींत चालू असतां, शहाचा बाप बुऱ्हाण हा अकबर बादशहाची मदत घेऊन दिल्लीहून आला. त्यानें लढाई करून ज़मालखानास ठार मारिलें, आणि मुलास कैद करून निजामशाहीचें राज्य काबीज केलें.

८. बुऱ्हाण निजामशहा, [दुसरा] (सन १५६१–१५९४).— बुऱ्हाणशहाच्या कार्किर्दींत मागील व्यवस्थेची उलटापालट झाली. बुऱ्हाणशहा शियापंथी होता. त्यानें मह्दी लोकांचा अत्यंत छळ केला. त्याच्या कार्किर्दींत रेवदंडा येथील पोर्तुगीझ लोकांवर स्वारी झाली ती प्रसिद्ध आहे. ह्या वेळीं कुर्लां येथें मुसलमान लोकांनीं एक किल्ला बांधिला. त्या ठिकाणीं राहून ते पोर्तुगीझ लोकांशीं झगडूं लागले. अखेरीस मुसलमानांचा पराजय झाला. शहा आजारी पडून लवकरच मरण पावला. नंतर त्याचा मुलगा इब्राहीम निजामशहा गादीवर बसला. हा दुर्व्यसनी होता. दरबारांत दुफळी होऊन विजापुराशीं युद्ध सुरू झालें,

त्यांत शहा मारला गेला. त्यानें चारच महिने राज्य केलें. नंतर दिवाण मिआन अंजू ह्यानें अहंमद नामक एका मुलास गादीवर बसविलें.

४. चांदबिबी व मोगलांशीं युद्ध, (स. १५९४–१६००).— अहंमद निजामशहा हा निजामशाही वंशांतील खरा वारस नाहीं, असा वाद उत्पन्न झाला, आणि तंटे चालू असतां वजीर मिआन अंजूनें प्रथमतः अकबर बादशहाचा मुलगा मुराद गुजराथचा सुभेदार होता, त्याजकडे मदत मागितली. मुराद फौज घेऊन आला, आणि अहंमदनगरास त्यानें वेढा दिला. तेव्हां निजामशाही बुडण्याचा प्रसंग आला. अशा आणीबाणीच्या प्रसंगीं चांदबिबी नामक एका शूर स्त्रीनें अहंमदनगरचें संरक्षण करून दक्षिणच्या इतिहासांत आपलें नांव अजरामर करून ठेविलें.

सन १५६४ त विजयनगरच्या रामराजाविरुद्ध मुसलमानांचा मोठा जमाव झाला, त्याच्या पूर्वीं थोडे दिवस हुसेन निजामशहानें आपली चांदबिबी नांवाची मुलगी विजापूरचा राजा अली आदिलशहा यास दिली होती. त्याजबद्दल निजामशहाकडून सोलापूरचा किल्ला तिला आंदण मिळाला. अली आदिलशहा मारला गेल्यावर, त्यास संतान नसल्यामुळें त्याचा पुतण्या इब्राहीम आदिलशहा गादीवर बसला. त्याचा सर्व सांभाळ चांदबिबीकडे होता. पुढें वजिराचें व तिचें वांकडें आल्यामुळें, तिनें चिट्ठाई करून वजिरास ठार मारविलें. पण जो दुसरा इसम वजीर झाला त्यानें तीस पकडून, साताऱ्यास कैदेंत ठेविलें. थोड्याच दिवसांनीं तीस सोडविण्याकरितां म्हणून कित्येक लोक बंड करून साताऱ्यास गेले. त्यांनीं तिला कैदेंतून मुक्त करून पहिल्या अधिकारावर स्थापिलें. परंतु पुनः लवकरच तिचा सर्व अधिकार गेला. सन १५८४ ह्या वर्षी आदिलशहाची बहीण खुजा सुलताना हिचें लग्न मूर्तुजा निजामशहाबरोबर झालें. त्या वेळेस मुलीस सांभाळण्यासाठीं तिची चुलती चांदबिबी अहंमदनगरास माहेरीं आली, ती पुढें तेथेंच राहिली. येथपर्यंतची तिची हकीकत विजापूरच्या इतिहासांत येते.

अहंमद यास चांदबिबीनें अहंमदनगरचा सुलतान असें कबूल केलें नाहीं. बहादूर नांवाच्या मुलास तख्तावर बसविण्याचा घाट करून मोगलांस अहंदनगरांत शिरूं न देण्याचा तिनें प्रयत्न चालविला. वरील

अहंमदाशिवाय ह्या वेळेस आणखी तीन इसम राज्यावर आपला हक्क सांगत होते. चांदबिबी, एकलासखान, नेहंगखान हबशी व मिआन अंजू असे चार सरदार त्या चौघांचे पुरस्कर्ते झाले. ह्यांपैकीं एकलासखानाचा गोदावरी नजीक मोगल फौजेनें पराभव केला. नेहंगखानानें मोगल सैन्याची फळी फोडून किल्ल्यांत प्रवेश केला, आणि तो राणी चांदबिबीस येऊन मिळाला. इतक्यांत विजापूर व गोवळकोंडा येथून अहंमदनगरच्या मदतीस फौजा रवाना झाल्या.

मोगल शहाजादा मुराद ह्यानें तीन मुख्य दरवाजांखालीं भुयारें खोदून तीं दारूनें भरविलीं; त्यांस ठिणगी लागतांच अहंमदनगरचा किल्ला उडून गेला असता. सुरुंगवाल्यानीं राणी व तिच्या लोकांस स्वाधीन होण्याविषयीं सांगितलें. तसें न केल्यास पुढें काय भयंकर प्रसंग येईल याची त्यांनीं तीस समजूत दिली. परंतु राणीनें धीर सोडिला नाहीं. ती स्वतः मजुरांबरोबर काम करूं लागली, आणि मोगलांनीं भरलेलीं दोन भुयारें तिनें रिकामीं केलीं. तिसरें भुयार खुलें करीत असतां त्यास कोणी बत्ती लावून दिली आणि तें उडालें, त्याबरोबर थोडासा तट पडला. त्या वेळीं राणीच्या कामगारांनीं तीस पळून जाण्याची विनंति केली, पण तिनें त्यांचें न ऐकतां अंगांत चिलखत चढविलें, आणि हातांत तरवार व तोंडावर बुरखा घेऊन, जेथें तट पडून लोक आंत शिरत होते, तेथें तोंडाशीं उभी राहून लोकांस कापून काढूं लागली. तिचा आवेश पाहून स्फुरण चढलेले दुसरेही कित्येक लोक तिजबरोबर गेले. मोगलांनीं संध्याकाळीं हल्ला केला. पण ह्या आवेशी व शूर राणीपुढें इलाज न चालतां त्यांस परत फिरणें भाग पडलें. त्या वेळीं एकच गर्दी उडाली. सर्व खंदक प्रेतांनीं भरून गेला. पुनः पुनः मोगल वेगानें हल्ला करीत, आणि दरखेपेस फार नुकसान होऊन त्यांस परत फिरावें लागे. राणीनें इतक्या अवकाशांत सर्व तट पुनः बांधिला. तरी आपला मोगलांपुढें टिकाव लागणार नाहीं, हें जाणून तिनें त्वरा करून विजापूरच्या फौजेस मदतीस बोलाविलें. तिचीं पत्रें मुरादच्या हातांत पडलीं. मुरादनें 'लवकर या. आम्ही सर्वांचा समाचार घेण्यास तयार आहों,' असा ज्यास्त मजकूर त्या पत्रांत लिहून तीं पुढें विजापुरास पाठविलीं. त्याप्रमाणें विजापूरचा सरदार सोहलखान फौजेसह येऊन दाखल झाला. ह्या फौजेनें मोगलांस दाणापाण्याचा

इतका तोटा पाडिला, कीं ' वऱ्हाड स्वाधीन करा, म्हणजे आम्ही निघून जातों, ' असें मुराद ह्यानें चांदबिबीपाशीं बोलणें लाविलें. मोगलांशीं टक्कर देण्याइतकें सामर्थ्य आपणांत नाहीं, हें जाणून तिनें हें मागणें कबूल केलें, आणि मुराद निघून गेला (१५९४). थोड्याच दिवसांनीं सर्वांच्या मतें तिनें बहादूरशहास तख्तनशीन केलें, आणि आपण सर्व कारभार पाहूं लागली. अहंमद यास विजापूरच्या राजानें जहागीर देऊन ठेविलें. चांदबिबीच्या वरील पराक्रमामुळें अहंमदनगरच्या इतिहासांत तिचें नांव अजरामर झालें आहे.

चांदबिबीनें महंमदखान यास मुख्य वजीर नेमिलें; पण त्यानेंच सर्व कारभार बळकाविला. तेव्हां तिनें इब्राहीम आदिलशहाची मदत मागितली. सोहलखान फौज घेऊन आला होता, त्यानें अहंमदनगरास वेढा घातला. महंमदखान वजिरानें मोगलांची फौज वऱ्हाडांत होती तीस परत बोलाविलें. तेव्हां इतर सर्व सरदारांनीं मिळून महंमदखानास पकडून चांदबिबीच्या स्वाधीन केलें. यामुळें तिचा अधिकार पूर्ववत् चालूं लागला. इकडे मोगल वऱ्हाड प्रांत घेऊन स्वस्थ बसले नव्हते. ते उत्तरोत्तर निजामशाहीचा मुलूख काबीज करीत चालले. चांदबिबीनें बोलाविल्यावरून विजापूर, व गोवळकोंडें येथील राजांच्या फौजा मदतीस आल्या. येणेंप्रमाणें दक्षिणच्या मुसलमानांची एकंदर साठ हजार फौज उत्तरेच्या मोगलांशीं लढण्याकरितां तयार झाली.

अहंमदनगरच्या निजामशाही घराण्याचीं शंभर वर्षें भरलीं. वरील उभय फौजांमध्यें तुंबळ युद्ध झालें. दोन दिवस युद्ध चालू होतें. दोनही पक्षांनीं शिकस्त केली. अखेरीस मोगलांस जय मिळाला. ही लढाई तारीख १६ जानेवारी सन १५९७ रोजीं गोदावरीचे कांठीं सुपें सोनपत येथें झाली. ह्या वेळीं मोगल सरदार खानखानान व विजापूरचा सरदार सोहलखान यांनीं आपआपल्या पराक्रमाची पराकाष्ठा केली.

विजय प्राप्त झाल्यावर मोगल सरदारांत वाद पडला. अहंमदनगरावर एकदम चाल करावी, असें मुरादचें म्हणणें होतें, आणि खानखानानच्या मतें प्रथम वऱ्हाड प्रांतांतील कित्येक मजबूद ठिकाणें परत घ्यावीं असें होतें, ह्यामुळें कलह माजून मुरादनें खानखानान यास

परत बोलाविण्याविषयीं बापास लिहिलें. तेव्हां त्यास परत बोलावून अकबर बादशहानें आपल्या मर्जीतील सरदार अबुल् फज्ल् ह्यास दक्षिणेंत पाठविलें.

इकडे अहंमदनगरासही चांदबिबी व नेहंगखान ह्यांजमध्यें कारभारासंबंधी तंटा सुरू झाला होता. गृहभेद असल्याशिवाय परशत्रूचा शिरकाव व्हावा तरी कसा? नेहंगखानानें फौज गोळा करून अहंमदनगरावर हल्ला केला. बरसातीचे दिवस व मोगली फौज दूर आहे असें पाहून, दक्षिणच्या बंदोबस्तास जी मोगली फौज होती, तिजवर हल्ला करून बीड येथें अहंमदनगरच्या फौजेनें तिचा पराभव केला. इकडे मुराद मरण पावला, आणि अकबर बादशहा अबुल् फज्ल्च्या बोलण्यावरून स्वतः दक्षिणेंत बऱ्हाणपुरास आला. त्यानें आपला दुसरा मुलगा दानियाल मीर्झा व खानखानान ह्यांस दक्षिणची कामगिरी दिली, (स.१५९९). तेव्हां मोगलांची फौज बिनहरकत नगरावर चालून आली. नेहंगखान जुन्नरास पळून गेला. ह्या प्रसंगीं चांदबिबीजवळ भरंवशाचें एकही माणूस नव्हतें. हमीरखान खोजा म्हणून एक तृतीयप्रकृति अधिकारी होता, त्यास काय करावें म्हणून तिनें सल्ला विचारिला. लढाई करून किल्ल्याचा बचाव करावा असें त्यानें सांगितलें. राणी म्हणाली, कीं 'प्रसंग कठीण असल्यामुळें किल्ला मोगलांस देऊन आपण बालराजासह जुन्नरास जावें.' हें तिचें भाषण ऐकून तो दुष्ट खोजा फार खवळला, आणि बाहेर जाऊन लोकांस सांगत सुटला, कीं सुलताना ही आंतून मोगलांस सामील आहे. नंतर कित्येक दुष्ट लोकांस बरोबर घेऊन तो किल्यांत शिरला, आणि तिच्या महालांत जाऊन त्यानें तिचा खून केला. नंतर थोड्याच अवकाशांत मोगलांनीं किल्ल्यास खिंडारें पाडून तो सर केला. बहादूरशहास अकबरानें आग्र्यास कैदेंत ठेविलें, आणि दक्षिणचा कारभार दानियालकडे दिला, (स. १६००).

निजामशाहीच्या सरदारांनीं अलीशहाचा पुत्र मूर्तुजा ह्यास परिंडा येथें निजामशाहीच्या तख्तावर स्थापिलें, आणि कित्येक वर्षें खटपट करून ह्या घराण्याचें नांव आणखी कांहीं काळ कायम राखिलें.

दक्षिणहिंदुस्थानांत आजपर्यंत जीं पराक्रमी माणसें निपजलीं, त्यांत चांदबिबीची गणना मुख्यत्वानें आहे. तिच्यासारखीं स्त्रीरत्नें तर फारच थोडीं

सांपडतील. ती स्वरूपानें सुंदर असून अल्पवयांत भर्तृवियोग झाला असतां तिनें आपलें वर्तन अखेरपर्यंत निर्मळ ठेविलें. विजापूर व अहंमदनगर येथील घडामोडींत स्वकर्तव्य बजावण्यांत तिनें कसूर केली नाहीं. तिच्या अप्रतिम शौर्याची पारख अनेक प्रसंगीं झाली. तिचा शेवट दु:खमय झाला हें ऐकून सर्व लोक हळहळतात आणि आजतागाईत संमानपुर:सर तिचें स्मरण करितात.

५. मलिकंबराचा कारभार, (स. १६००–१६२६).—ह्या वेळीं मोगल सैन्य जरी दक्षिणेंत जिकडे तिकडे पसरलें होतें, तरी दोन तीन पुरुषांनीं निजामशाहीची बाजू बरीच संभाळिली. मिआन राजू व मलिकंबर हे दोघे हुशार मुसलमान मुत्सद्दी त्या संकटसमयीं निजामशाहीस लाभले. त्यांनीं दहा बारा वर्षांत बहुतेक निजामशाही मुलूख परत मिळविला. परंतु हे दोघे एकमेकांचा हेवा करूं लागले. ही संधि साधून मोगल सरदार खानखानान यानें त्यांजवर फौज पाठविली. तिजवर मलिकंबर चालून गेला, त्यानें मोगलांचा पराभव केला. परंतु पुढें लौकरच मलिकंबराचा पराभव झाला. मलिकंबर हा फार धूर्त व साहसी पुरुष होता. त्याच्यावर लोकांची भक्ति फार होती. वरील लढाईत त्यास पुष्कळ जखमा झाल्या. प्रसंग कठीण आहे, असें पाहून त्यानें मोगलांशी तह केला. येणेंकरून मूर्तुजाशहा व इतर सरदार यांच्या मनांत त्याच्या राजनिष्ठेविषयीं संशय उत्पन्न झाला, तरी फौज जमवून त्यानें शहास परिंड्याच्या किल्यांत नेऊन सुरक्षित ठेविलें. तेव्हां मिआन राजूनें तंटा चालवून मलिकंबरावर स्वारी केली. मलिकंबरानें मोगलांची मदत मागितली. पण इतक्यांत शहाजादा दानियाल मरण पावला, आणि खानखानान यानें राजूस मदत दिली. अशा संधीस मलिकंबरानें मोठ्या शहाणपणानें निजामशाही घराण्याचा अभिमान धरून राजूस पकडून कैद केलें, आणि बराच मुलूख मूर्तुजाच्या अंमलाखालीं आणिला. निजामशाही घराण्याचा फेरिस्त्यानें लिहिलेला इतिहास इतकाच झाला आहे. कारण ह्याच संधीस हा प्रसिद्ध व विद्वान् इतिहासकार मरण पावला. त्यानें लिहिलें आहे, कीं 'मलिकंबरचें वजन व वर्चस्व दिवसेंदिवस वाढत आहे. सर्व राज्यकारभार तो मोठ्या हुशारीनें व दक्षतेनें चालवीत आहे. तरी मोगल बादशहा तें घशांत टाकण्यास टपून बसला असल्यामुळें तें लवकरच लयास जाईल.' . . .

फेरिस्ता इराणांतील एका थोर कुळांत स.१५७०त जन्मला. लहानपणींच बापानें त्यास हिंदुस्थानांत आणिलें. तेव्हांपासून तो अहंमदनगरास निजामशहांच्या पदरीं राहिला. तरुण असतांच त्यानें आपला इतिहास लिहिण्यास सुरुवात केली. विजापूरच्या आदिलशाहीचा इतिहास त्यानें स.१५९६त संपूर्ण केला. निजामशाहीचा इतिहास त्यानें स. १६०७ च्या पुढें लिहिला असावा. स. १६११ च्या पुढची हकीगत त्यांत नाहीं, सबब त्या सालाच्या सुमारास फेरिस्ता मरण पावला. इतिहास लिहिण्याची आवड मुसलमानांत विशेष दिसून येते, आणि जे कित्येक चांगले इतिहास मुसलमानांनी लिहिलेले आहेत, त्यांत फेरिस्त्याचा ग्रंथ मोडतो. हिंदुस्थानांतील मुसलमानी राज्यांची व विशेषतः दक्षिणेंतील राज्यांची हकीगत फेरिस्त्यानें दिली असून, तिचे अनेक तर्जुमे झाले आहेत.

वजीर मलिकंबर, (स.१५४६-१६२६).—*मलिकंबर हा जातीचा हबशी असून पहिल्या मूर्तुजा निजामशहाचा इमानी दिवाण जो जंगीझखान त्याजपाशीं नोकरी करून,* राज्यकारभाराच्या कामांत फार तरबेज झाला होता. अहंमदनगर मोगलांच्या ताब्यांत गेल्यावर, दौलताबादेपासून सहा मैलांवर खडकी नामक शहरीं मोठमोठ्या हवेल्या बांधून तेथें त्यानें निजामशाहीची राजधानी केली. त्या ठिकाणीं राहून मलिकंबर सर्व राज्यकारभार पाहत असे. ह्याच शहरास पुढें औरंगजेबानें औरंगाबाद असें नांव दिलें. मलिकंबराच्या पदरीं पुष्कळ मराठे सरदार होते. सिंदखेडचे देशमूख जाधवराव, व मालोजी भोंसले हे सरदार पूर्वीपासून निजामशाहींत होते. अहंमदनगर व विजापूर या दोन ठिकाणीं लष्करी खात्यांत पुष्कळ मराठे सरदार ह्या वेळेस उदयास आले. अकबर बादशहा आणखी कांहीं वर्षें वांचता, तर निजामशाही साफ बुडाली असती. पण जहांगीर गादीवर बसण्याच्या घालमेलींत मलिकंबरानें फौज जमा करून, निजामशाहीचा मुलूख परत घेतला, खानखानान याचा पराभव करून अहंमदनगर हस्तगत केलें, आणि त्या मोगल सरदारास बऱ्हाणपूरपर्यंत घालवून दिलें. इतकें झाल्यावर तो देशस्थिति सुधारण्याच्या कामास लागला. राज्यकारभारांत त्यानें केलेल्या सुधारणांवरून त्याचें नांव दक्षिणेंतील लोकांच्या तोंडीं अद्यापि निघतें. त्यानें निजामशाही मुलखाची जमीन मापून सरकार घेण्याचे दर ठरविले, आणि उत्तरेंतील तोडरमल्लाची पद्धत दक्षिणेंत सुरू केली. ह्या कामीं

कित्येक मराठे सरदारांची त्यास चांगली मदत होती. भावाजी आनंदराव, शिवाजीपंत मुत्सद्दी, व सखाराम मोकाशी वगैरे कित्येक गृहस्थ त्याचे मदतगार होते. उत्तरहिंदुस्थानांत तोडरमल्लाची ख्याति आहे, त्याचप्रमाणें दक्षिणहिंदुस्थानांत मलिकंबरची आहे. इजाऱ्यानें जमिनी देण्याची चाल त्यानें अगदीं बंद केली, आणि वसुलाचें काम ब्राह्मण कारकुनांच्या हातीं दिलें. सर्व शेतांची मापणी व पाहणी करून मागील कित्येक वर्षांच्या उत्पन्नाची सरासरी काढून, प्रत्येक शेतावर सरकारचें नक्त देणें ठरविलें, आणि तें पिकाच्या मानानें कमी ज्यास्त देण्याची सवड ठेविली. कांहीं वर्षें लोकांस सान्याची माफी देऊन त्यानें नवीन जमिनी लागवडीस आणिल्या. ह्या सुधारणांमुळें अंमलदारांचा रयतेवर चालत असलेला जुलूम नाहींसा झाला, आणि देशांत आबादानी झाली. मलिकंबर खर्च फार करी, तरी नियमित वेळीं वसूल आल्यानें त्याची खर्चाच्या कामीं कधीं ओढाताण होत नसे. मलिकंबरनें देशांत इतकी स्वस्थता केली, कीं लवकरच मोगलांशीं टक्कर देण्यास तो समर्थ झाला.

जहांगीर बादशहानें निजामशाहीचा मुलुख परत घेण्यासाठीं मोठमोठ्या फौजा रवाना केल्या. त्यांत गुजराथचा मोगल सुभेदार अब्दुल्खान हा दिल्लीची फौज येण्यापूर्वी एकटाच मलिकंबरवर चालून गेल्यामुळें, त्याचा मलिकंबरनें चांगलाच समाचार घेतला. मलिकंबरची लढण्याची रीत थेट मराठ्यांसारखी होती. समोरासमोर सामना न करितां आड राहून तो शत्रूंस जेरीस आणी. सन १६१७ सालीं जहांगीर आपला मुलगा शहाजहान यास पुढें पाठवून, आपणही निजामशाही जिंकण्याकरितां चालून आला. शहाजहाननें विजापूरच्या राजास व कित्येक मराठे सरदारांस मलिकंबरचे कटांतून फोडिलें. तेव्हां निरुपाय होऊन मलिकंबर शहाजहानास शरण गेला, आणि त्यानें अहंमदनगर व सभोंवतालचा प्रांत मोगलांस दिला. पुढें शहाजहान काश्मिराकडे गेल्यावर मलिकंबरनें पुनः मोगली फौजेस हांकून देऊन आपले प्रांत परत घेतले. हें ऐकून शहाजहान पुनः दक्षिणेंत आला, आणि मलिकंबरचा पराभव करून त्यानें ते प्रांत परत मिळविले. ह्यापुढें मलिकंबर मोगलांशीं स्नेहानें वागला, आणि अशा रीतीनें त्यानें निजामशाहीचें होईल तितकें हित केलें. मोठमोठीं प्रजाहिताचीं कामें

करून हा महान पुरुष सन १६२६ सालीं मरण पावला. त्या वेळीं त्याचें वय ८० वर्षांचें होतें. दौलताबादेस त्यानें एक मोठा घुमट बांधिला होता, तेथें त्याचें दफन करण्यांत आलें. त्याची जमाबंदीची पद्धति अद्यापि दक्षिणच्या लोकांस पसंत वाटते. त्याचें राज्यकारभाराचें चातुर्य, न्यायी वर्तन, ईश्वरभक्ति, औदार्य व शौर्य या गुणांविषयीं दक्षिणेंत त्याची फार आख्या आहे.

६. निजामशाहीची अखेर, (स. १६३३).—मलिकंबर मरण पावल्यानंतर त्याचा मुलगा फत्तेखान हा कांहीं दिवस निजामशाहीचा कारभार पाहत होता. पण तो बापासारखा शहाणा नव्हता. तरी तो निजामशाही राखण्याविषयीं प्रयत्न करीत असतां, इतर सल्लागारांच्या सांगण्यावरून त्यास निजामशहानें कैदेंत टाकिलें. तेव्हां अर्थातच निजामशाहीच्या सर्व एकनिष्ठ सरदारांस अत्यंत भीति पडली. लखुजी जाधवराव म्हणून एक वजनदार मराठा सरदार दरबारांत होता. मोगलांच्या हल्ल्याचें निवारण कसें करावें ह्या विचारांत असतां, तो त्या सरदारांस सामील आहे अशा समजुतीनें, बुऱ्हाण निजामशहानें त्यास कैद करविलें, आणि कांहीं दिवसांनीं त्यास व त्याचा मुलगा आचलोजी ह्यांस ठार मारविलें. ह्या गोष्टीनें निजामशहाच्या पदरचे सर्व लोक चिडून गेले. जाधवरावाचा भाऊ भेताजीराव हा मोगलांकडे पळून गेला. त्याचा जांवई शहाजी भोंसले हा तर पुण्याच्या आसपास निजामशहाच्या व आदिलशहाच्या मुलखांवर साधेल तितका हात मारून स्वतंत्रपणें कारभार करूं लागला. तेव्हां निजामशाहीचा लय होण्याचा समय समीप येऊन ठेपला. राजधानींत मोगलांचा प्रवेश झाला होता, तरी बाहेरच्या मुलखावर त्यांचा ताबा बसला नव्हता. म्हणून प्रांतांत जे कामदार होते, तेच आपापल्या ताब्यांतील मुलखांवर स्वतंत्र अंमल करूं लागले. त्यांत विशेषतः सह्याद्रीचे पूर्वेकडील बहुतेक डोंगरी मुलूख मराठे मंडळीच्या ताब्यांत होता. जाधवरावाच्या मरणानंतर निजामशाहींतील मराठे कामदार थोडेबहुत एकचित्त झाले. त्यांत शहाजी भोंसले प्रमुख होता. जुन्नर येथें श्रीनिवास नांवाचा एक अंमलदार सरनाईक होता, तो शहाजीस मिळाला. ह्या उभयतांनीं मिळून शामगड किल्ला हस्तगत करून युक्तिप्रयुक्तीनें फौज जमविली, आणि संगमनेरपासून अहमदनगर व दौलताबादपर्यंत सर्व

मुलूख हस्तगत केला. शहाजीनें विजापूरकरांचाही कांहीं मुलूख बळकाविला होता. म्हणून आदिलशहानें मुरारराव नांवाच्या आपल्या सरदारास शहाजीवर पाठविलें. मुराररावानें पुणें वगैरे शहाजीचे प्रांत घेऊन त्याचें बरेंच नुकसान केलें. ह्याच मुराररावाच्या हाताखालीं बाजी दळवी म्हणून एक कामगार होता, तो मुराररावाच्या हुकुमानें तळ कोकणांत शिरून महाडकडील निजामशाहीचा मुलूख जिंकीत होता, हें वर्तमान निजामशहास समजतांच, त्यानें फौज पाठवून बाजी दळवी यास युद्धांत ठार मारून आपले प्रांत पुनः परत मिळविले. ह्याच संधीस खानजहान लोदी उत्तरहिंदुस्थानांत शहाजहान बादशहाविरुद्ध बंड करून दक्षिणेंत आला. त्यास शहाजी भोसले व दुसरे मराठे सरदार अनुकूळ झाले. पण बादशाही फौज खानजहानच्या पाठीवर असल्यामुळें, शहाजी लवकरच त्याचा पक्ष सोडून शहाजहानास शरण गेला. बादशहानें त्यास ५००० स्वारांची सरदारी दिली. तेव्हां लोदीनें मूर्तुजाशहाचा आश्रय केला. त्यावरून मोगलांनीं निजामशहाशीं युद्ध करून त्याचा पराभव केला. ह्याच सुमारास म्ह० स. १६२९ त दक्षिणेंत भयंकर दुष्काळ पडून निजामशाहीवर दुसरें अरिष्ट आलें. दोन वर्षें सारखें अवर्षण पडलें. त्यामुळें लोक मुलूख सोडून गेले आणि बहुतेक मरण पावले. वैरण न मिळून गुरांढोरांचाही फन्ना उडाला. प्रांतचे प्रांत ओसाड पडले. मागाहून महामारी येऊन लोकांच्या विपत्तीचा कळस झाला. ह्याच वेळीं मोगलांची आणखी मोठी फौज दक्षिणेंत आली. मूर्तुजा व दिवाण फत्तेखान यांचें बनेनासें होऊन फत्तेखान कैदेंत होता, त्यास सोडवून पुनः अधिकारापन्न करितांच त्यानें मूर्तुजास कैद करून, त्यास व त्याच्या पक्षाच्या अनेक सरदारांस ठार मारिलें, आणि आपण सर्व निजामशाही ताब्यांत घेऊन मोगलांस शरण गेला. मूर्तुजाचा हुसेन नांवाचा दहा वर्षांचा मुलगा होता, त्यास त्यानें निजामशाहीच्या तख्तावर स्थापिलें. ह्या कृत्याचा शहाजी भोसले यास फार तिटकारा आला. त्यानें विजापूरच्या राजाशीं सख्य करून मोगलांचा दौलताबाद किल्ला फत्तेखानापासून घेण्याकरितां विजापूरची फौज आणिली. तेव्हां फत्तेखानानें दिल्लीहून मोगलांची फौज आणविली. शहाजहाननें महाबतखान नामक सरदारास दौलताबादचा किल्ला घेण्यास पाठविलें. विजापूरच्या फौजेचा व मोगली

फौजेचा दौलताबादच्या समोर सामना होऊन विजापूरकरांचा पराभव झाला. तरी फत्तेखानास फितवून त्यास विजापूरच्या राजानें साहाय्य करून मोगलांशीं लढाई चालविली. ह्यामुळें महाबतखान फारच चिडून गेला. त्यानें दौलताबादेवर निकराचा हल्ला केला. अठ्ठावीस दिवसपर्यंत तुंबळ युद्ध झालें आणि अखेरीस किल्ला मोगलांच्या हातीं गेला. फत्तेखान व बालराजा यास कैद करून त्यानें दिल्लीस पाठविलें, आणि निजामशाहीचा सर्व मुलूख काबीज केला. येणेंप्रमाणें अहंमदनगर येथें निजामशाहीची स्थापना झाल्यापासून सुमारें दीडशें वर्षांनीं म्हणजे सन १६३३ त त्या राज्याची समाप्ति झाली. फत्तेखान व त्याचा भाऊ जंगीझखान यांस शहाजहानकडून उत्तरहिंदुस्थानांत नेमणुका मिळाल्या.

७. शहाजी भोसले ह्याची अखेरची धरपकड, (१६३३-३७).—इतकें झाल्यावरही शहाजी भोसले ह्या पराक्रमी मराठे सरदारानें निजामशाहीचा उद्धार करण्याची दोन तीन वर्षें जिवापाड मेहनत केली. ह्या वेळीं ह्या शूर पुरुषानें जें आचरण केलें, जीं धोरणें बांधिलीं, व जी शिताफी दाखविली, तीच त्याचा अल्पवयी मुलगा शिवाजी ह्यास कित्ता होऊन, त्यापासून मराठशाहीची संस्थापना करण्याची त्यास शक्ति आली. निजामशाहीखालीं मोडणारा सह्याद्रीवरचा डोंगराळ प्रदेश शहाजीनें ताब्यांत घेऊन तेथील अवघड किल्ल्यांच्या साह्यानें मोगलांशीं टक्कर देण्याची तयारी चालविली. बरीच जमवाजमव केल्यावर शहाजीनें एक मुलगा निजामशाहीच्या गादीवर बसविला, आणि कित्येक हुशार ब्राह्मण नोकरीस ठेवून त्यांच्या सल्ल्यानें तो निजामशाहीचा कारभार चालवूं लागला. असें करितां करितां कोकणपट्टी सुद्धां पुष्कळ मुलूख शहाजीच्या ताब्यांत आला. दक्षिणेंतील युद्धाचा पुनः पहिलाच दिवस आला असें पाहून शहाजहान बादशहानें स्वतः कंबर बांधिली, आणि मोठमोठे सरदार पुढें पाठवून मागाहून आपणही स्वतः आला. शहाजीस विजापूरचा दिवाण मुरारपंत व मुख्य सरदार रणदुल्लाखान यांची चांगली मदत होती. बादशहानें विजापूरकरांस कळविलें, कीं ‘ शहाजीचा पक्ष सोडा; नाहीं तर तुमचाही संहार करूं. ’ आदिलशहानें तें बोलणें मान्य केलें नाहीं, म्हणून शहाजहाननें आपल्या फौजेचे निरनिराळे भाग करून युद्ध सुरू केलें. सर्व ठिकाणीं मोगलांनीं शहाजीस जेरीस आणिलें. पुढें मोगल विजापूरच्या

मुलखांत शिरून त्रास देऊं लागले, तेव्हां आदिलशहानें त्याजशीं तह केला. नंतर शहाजी कोकणांत गेला. तेथेंही आपला निभाव लागत नाहीं असें पाहून, स. १६३७ त तो शहाजहानास शरण गेला, आणि आपणास पदरीं ठेवण्याविषयीं त्यानें बादशहास विनंति केली. शहाजहाननें ती मान्य केली नाहीं; तरी विजापूरकरांच्या पदरीं राहण्यास शहाजीस त्यानें परवानगी दिली. शहाजीनें गादीवर बसविलेल्या निजामशहास व त्याच्या इतर साथीदारांस शहाजहाननें आग्र्यास नेऊन कैदेंत ठेविलें. ह्याप्रमाणें निजामशाहीचा शेवट झाला, (सन १६३७).

प्रकरण चौदावें.

विजापूरची आदिलशाही.

सन १४८९—१६८६.

१. अबुल् मुज्फर यूसुफ् आदिलशहा. २. इस्माईल आदिलशहा,(१५१०-३४).
३. इब्राहीम आदिलशहा, [पहिला]. ४. अली आदिलशहा, (१५५७–८०).
५. इब्राहीम आदिलशहा, [दुसरा]. ६. महंमद आदिलशहा,(१६२६-५६).
७. अली आदिलशहा, [दुसरा]. ८. सिकंदर आदिलशहा,(१६७२-८६).
९. आदिलशाहीचें समालोचन.

१. अबुल् मुज्फर यूसुफ् आदिलशहा, (सन १४८९–१५१०).— हा तुर्कस्तानांतील एका सुलतानाचा पुत्र असून इराणांत वाढला होता. तो सन १४५९ त हिंदुस्थानांत दाभोळ बंदरीं येऊन उतरला, आणि महंमद गवानच्या पदरीं राहून मोठ्या योग्यतेस चढला. विजापूरच्या कारभारावर असतां महंमदशहा बहामनी निवर्तल्यावर, तो विजापुरास स्वतंत्रपणें कारभार पाहूं लागला. विजापूर हें प्राचीन काळापासून नामांकित शहर होतें. आदिलशहानें तेथें आपली राजधानी करून, सुंदर इमारती बांधून तें फार सुशोभित केलें. त्याचा बहुतेक काळ लढाया करण्यांतच गेला. त्यानें आपल्या राज्याची मर्यादा पुष्कळ वाढविली. विजापूरच्या दरबारीं शियापंथाची स्थापना ह्यानें प्रसिद्धपणें केली, त्यामुळें पुष्कळ

NATIONAL ARCHIVES OF INDIA

सुनी लोक मोकऱ्या सोडून गेले. पुढें सन १५१०त पोर्तुगीझ लोकांचा सरदार आल्बुकर्क यानें विजापूरच्या ताब्यांतील गोवें शहर घेतलें; तें यूसुफनें स्वतः स्वारी करून परत मिळविलें. एकवीस वर्षे राज्य करून यूसुफ् आदिलशहा सन १५१० त मरण पावला, तेव्हां त्याचें वय ७५ वर्षांचें होतें. त्यानें मुकुंदराव नामक एका शूर मराठे सरदाराच्या बहिणीशीं लग्न केलें; तिचें नांव त्यानें बुबुजीखान असें ठेविलें. तिच्यावर त्याची प्रीति विशेष होती. तिचा मुलगा इस्मईल हाच पुढें तख्तावर बसला.

दक्षिणेंतील सर्व राजांमध्यें यूसुफ् आदिलशहाशीं तुलना करण्याजोगा समकालीन पुरुष दुसरा कोणी नव्हता. शौर्य, विद्या, व्यवहारचातुर्य व राजकीय मसलत यांत यूसुफची बरोबरी करणारा महंमद गवानशिवाय दुसरा कोणी झाला नाहीं. तो कारकुनी कामांतही निष्णात असून, धर्मसंबंधांत त्याची समदृष्टि तारीफ करण्याजोगी असे. हिंदूंवर व विशेषतः मराठ्यांवर त्याची मेहेरनजर असे. दरबारचें काम तो नियमानें करी. हिंदूंस त्यानें मोठ्या दर्जाच्या कामांवर नेमिलें. त्याच्या वेळेस सर्व दप्तर मराठी भाषेंत होतें. त्यानेंच विजापूरचा मजबूद तट बांधिला.

२. इस्मईल आदिलशहा, (सन १५१०–१५३४).—बाप वारला तेव्हां हा नऊ वर्षांचा होता. बापानें कमालखान नामक सरदारास त्याचा सांभाळ करण्याकरितां नेमिलें होतें. कमालखानाच्या मनांत स्वतःच राज्य बळकवावें असें येऊन, त्यानें शेजारच्या राजांस अनुकूळ करून घेतलें, आणि राणीस व बालराजास मारण्याचा यत्न चालविला. हें राणीस समजतांच तिनें मोठ्या युक्तीनें यूसुफ् तुर्क नांवाच्या गृहस्थाकडून कमालखानास ठार मारविलें. पुढें कमालखानाचा मुलगा सफ्तरखान यानेंही दंगा केला, पण परदेशी स्वारांच्या मदतीनें राणीनें त्याचा मोड करून त्यास ठार मारिलें. इस्मईलशहानें लहान असतांच सर्व कारभार आपल्या हातीं घेतला. दक्षणी व हबशी लोकांस घालवून देऊन, त्यानें लष्करांत व दरबारांत परदेशी लोकांचा भरणा केला. विजापुरांतील हे घोटाळे पाहून अमीरबेरीद, अहंमदनगर व वऱ्हाडचे राजे, आणि बहामनी राजे सर्व एक होऊन, विजापूर हस्तगत करण्याकरितां आले. पण त्या सर्वांस युक्तीनें फोडून इस्मईलशहानें त्यांचा पराभव केला. इकडे

पोर्तुगीझ लोकांनीं गोवें शहर परत घेतलें. पुढें स. १५१४ पासून १५१९ पर्यंत राज्यांत शांतता होती. रायचूर दुआब हा मूळचा विजापूरच्या ताब्यांतील असून तो विजयनगरच्या राजानें घेतला होता. तो परत घेण्यासाठीं इस्मईलशहानें स्वारी केली, पण तींत त्यास यश आलें नाहीं. सन १५२५ त अहंमदनगरच्या बुऱ्हाण निजामशहानें विजापुरावर हल्ला केला. दोन तीन वर्षें युद्ध चालू होतें. तींत आसदखानाच्या साहाय्यानें आदिलशहानें बुऱ्हाणचाच पराजय केला. सन १५२८–२९ सालीं अमीर बेरीदची एकवार चांगली खोड मोडावी, म्हणून इस्मईलशहानें बेदरवर स्वारी केली, बेदरचा किल्ला घेऊन अमिरास पकडिलें, आणि त्याचें सर्व वित्त हरण करून तें आपल्या लोकांस वांटून दिलें. नंतर अमीर बेरीद यास कांहीं जहागीर देऊन त्यानें आपल्या पदरीं ठेविलें. पुढें लवकरच रायचूर दुआब घेण्यासाठीं विजयनगरच्या राज्यावर इस्मईलशहानें हल्ला केला. त्यांत अमीरबेरीदनें चांगली मदत केल्यामुळें त्यास त्याचें बेदरचें राज्य परत दिलें. परंतु अशा प्रकारें स्वातंत्र्य मिळून फार दिवस झाले नाहींत, तोंच तो दुसऱ्या राजांस इस्मईलशहाविरुद्ध उठविण्याची खटपट करूं लागला. त्याचा परिणाम असा झाला, कीं बुऱ्हाण निजामशहा व आदिलशहा यांची निकराची लढाई होऊन, बुऱ्हाणचा अगदीं पराजय झाला. पुढें उभयतांची सरहद्दीवर भेट होऊन असा तह ठरला, कीं विजापूरकरांनीं कुत्बशहाचा मुलूख जिंकून आपल्या राज्यास सामील करावा; आणि निजामशहानें इमादशाही जिंकून घ्यावी. हा तह अमलांत येण्यापूर्वींच इस्मईलशहाची तबियत बिघडून, तो स. १५४४ त मरण पावला. त्यानें पंचवीस वर्षें राज्य केलें.

इस्मईलशहा न्यायशील, दूरदर्शी, दयावान व उदार होता. मोठमोठ्या राजद्रोही अपराध्यांस सुद्धां वारंवार क्षमा करणें, चहाडखोरांच्या तोंडून चुगल्या न ऐकणें, ऐनरागाच्या भरांत देखील कोणास टाकून न बोलणें, हे त्याचे स्वाभाविक गुण होते. तो फार रसिक असून संगीत व काव्य यांची त्यास फार आवड असे. व्यवहारांतील पुष्कळ गोष्टी त्यास स्वतः करितां येत होत्या. त्यास सज्जनांची आवड असून विद्वानांस तो फार चाहत असे. समयोचित व खुबीदार भाषण करण्यांत तर त्याची बरो-

वरी कोणासही होत नसे. तो दक्षिणी मुसलमानांचा फार द्वेष करी. त्याची लष्करावर अत्यंत मेहेरनजर होती. शिपायांबरोबर तो त्यांच्या सारखे कष्ट करी व भूक तहान सोशी. त्याची राज्यकारभार करण्याची पद्धत चांगली असून त्याच्या वेळेस मुलूख बराच भरभराटीत होता. त्याचा वडील मुलगा मल्लू हा त्याच्यामागून तख्तावर बसला. परंतु तो अत्यंत दुर्व्यसनी असल्यामुळें प्रमुख सरदार आसदखान व त्याची आजी बुबुजीखान ह्यांनीं त्यास पदच्यूत करून, त्याचा भाऊ इब्राहीम ह्यास तख्तावर बसविलें. तेणेंकरून सर्वांस संतोष झाला.

३. इब्राहीम आदिलशहा, [पहिला], (सन १५३४–१५५७).—ह्याची कारकीर्द एकंदरींत फारशी महत्त्वाची झाली नाहीं. इब्राहीमनें राज्यकारभार हातीं घेतल्याबरोबर त्यानें शियापंथ मोडून सुनीपंथाची स्थापना केली आणि बहुतेक परदेशी लोकांस फौजेंतून काढून दक्षणी व मोगल लोकांस नोकरीस ठेविलें. ह्यांपैकीं पुष्कळ परदेशी मुसलमान विजयनगरच्या राज्यांत जाऊन नोकरी पत्करून राहिले. आसदखान हा मुख्य वजीर होता, त्यानें शहाची बाजू बरीच सांभाळिली. त्याजवरही कित्येक वेळां शहाची इतराजी झाली होती. पण तो अत्यंत राजनिष्ठ होता, म्हणून आणीबाणीच्या प्रसंगीं इब्राहीमशहास त्याची मदत चांगली होई. मागील कारकिर्दींत सर्व दप्तर फारशींत ठेवण्याची वहिवाट पडली होती, ती त्यानें बंद करून मराठी भाषा चालू केली, आणि ब्राह्मण, मराठे वगैरे पुष्कळ लोक निरनिराळ्या खात्यांतून नोकरीस ठेविले. तेव्हां-पासून मराठ्यांचें वजन फार वाढलें.

आरंभींच विजयनगरवर स्वारी करण्याची इब्राहिमास पाळी आली. विजयनगर येथें पुष्कळ वर्षें हिंदूंचें प्रबळ राज्य चालत आलें होतें. अलीकडचे बरेच राजे अल्पवयी झाल्यामुळें सर्व सत्ता तिमराज नामक पराक्रमी प्रधानानें हरण केली होती. तिमराज मरण पावल्यावर त्याचा मुलगा रामराय ह्यानें कारभार हातीं घेतला, आणि हळूहळू स्वतंत्र राज्यपद बळकाविण्याचा यत्न चालविला. राजवंशांतील एका पुरुषानें आपली सत्ता परत मिळविण्याकरितां रामरायाविरुद्ध आपणास मदत करण्यास इब्राहिम आदिलशहास बोलाविलें. आसदखानास घेऊन इब्राहीमशहा सन १५३५ त विजयनगरास गेला. तेव्हां रामराय त्यास

शरण गेला. पण इब्राहीमशहा परत गेल्याबरोबर रामरायानें बंड केलें. इब्राहीम रायचुरास होता, त्यानें आसदखानास अध्वनी किल्ल्यास वेढा घालण्यास पाठविलें. आसदखानानें रामरायाच्या भाऊ व्यंकटाद्रि ह्याचा पराभव केला. पुढें उभयतांमध्यें तह होऊन इब्राहीमशहा विजापुरास परत आला. परत आल्यावर, आपला पराक्रमी वजीर आसदखान याचा त्यानें पुष्कळ गौरव केला. थोड्याच दिवसांनीं कोंकणच्या अंमलदारानें बंड केलें तें शहानें स्वतः जाऊन मोडिलें.

कांहीं वर्षें शांततेनें कारभार केल्यानंतर आसदखानाच्या प्रामाणिकपणाविषयीं दरबारच्या मंडळीचे मनांत हेवा उत्पन्न होऊन, त्यांनी हळू हळू शहाचें मन त्या थोर पुरुषाविषयीं कलुषित केलें. त्यास ठार मारण्याचा प्रयत्न शहानें अनेक वेळां केला; पण तो निष्फळ झाला. राजा व प्रधान यांचें असें वांकडें पडलेलें पाहून शहाच्या शत्रूंनीं उचल घेतली; आणि निजामशहा व जमशीद कुत्‌बशहा, व विजयनगरचा रामराय हे सर्व एक होऊन विजापूरकरांशीं सामना करण्यास आले, (स. १५४३). पण आसदखान हा एकनिष्ठ होता; तो दूर राहूनही आदिलशहाचें कल्याण चिंतून वरील शत्रूंस दाद न देण्याचा प्रयत्न करीत होता. पुढें आसदखानाच्या प्रामाणिकपणाविषयीं शहाची खात्री होऊन त्यानें त्यास अधिकारापन्न केलें. आसदखानानें युक्तीनें विजयनगर व अहंमदनगर येथील राजांशीं तह करून, गोवळकोंड्याच्या कुत्‌बशहाशीं लढाई करून त्याचा पराभव केला; आणि त्यास त्याच्या राजधानीस पिटाळून लाविलें. ह्या वेळीं लागलेल्या जखमांनींच कुत्‌बशहा पुढें लवकरच मरण पावला. पुढच्या वर्षी अहंमदनगरच्या राजाचाही आसदखानानें पराभव केला. तरी युद्ध संपलें नाहीं. लवकरच निजामशहानें इब्राहीमशहाचा पुनः पराभव केला. त्या वेळेपासून शहाचा स्वभाव अगदीं बदलला. तो हिंदु व मुसलमान ह्या सर्वांस क्रूरतेनें वागवूं लागला. तेव्हां दरबारच्या मंडळीनें त्यास पदच्यूत करून त्याचा भाऊ अब्दुल्ला यास तख्तावर स्थापण्याचा गुप्तपणें बेत केला. हा बेत उघडकीस आल्यामुळें अब्दुल्ला गोव्यास पोर्तुगीझ लोकांकडे पळाला. ह्या वेळीं पोर्तुगीझ लोकांनीं त्यास आश्रय देऊन विजापुरावर फौज पाठविली असती, तर दक्षिणेंत त्यांचा शिरकाव होऊन त्याच वेळेस त्या पाश्चात्य लोकांचें राज्य हिंदु-

स्थानांत स्थापन झालें असतें, पण पोर्तुगीझ लोकांनीं अब्दुल्लास कांहींच मदत केली नाहीं; तेव्हां तो गोवळकोंडा व अहंमदनगर येथील राजांकडे मदत मागण्यासाठीं गेला. पण आसदखान जिवंत असल्यामुळें ह्या खटपटीचा कांहीं उपयोग झाला नाहीं. त्यानें शहाणपणानें बंडाचा पुरा मोड केला. पुढें सन १५४९ सालीं आसदखान मरण पावला.

आसदखान हा मूळचा तुर्क असून इस्मईल आदिलशहाच्या पदरीं वाढला. त्याचें मूळचें नांव खुस्रू. इस्मईलशहा लहान असतां, विजापुरावर जीं संकटें आलीं, त्यांचें निवारण आसदखानाच्या पराक्रमानें झालें. त्या पराक्रमाबद्दल शहानें त्यास आसद हा किताब व बेळगांव परगणा जहागीर दिला. पुढें वजीर व सेनापति अशीं दोनही कामें त्यानें फार दिवस केलीं. फेरिस्ता त्याची फार वाखाणणी करितो. आसदखानची राहणी महंमद गवानसारखी साधी नव्हती. तो मोठ्या थाटानें राही. आदिलशहांस त्याचा वचक मोठा असून, ते हंमेश पत्रें व नजराणे पाठवून त्याचा गौरव करीत. त्यास दुखविण्याची त्यांची छाती नसे. पोर्तुगीझ लोक मात्र त्याचा अत्यंत द्वेष करीत. त्याची कपटी वर्तणूक व खटपटी स्वभाव ह्यांचा त्यांस फार राग येई. तो कोणत्या वेळेस काय करील ह्याचा त्यांस भरंवसा वाटत नसे.

मुसलमान बादशाहींत महंमद गवानच्या खालोखाल ह्या महान पुरुषाची कीर्ति आहे. मरणसमयीं त्याचें वय शंभर वर्षांचें होतें. केवळ आसदखानच्या एकनिष्ठेनेंच विजापूरचें राज्य एवढ्या योग्यतेस चढलें. तो अत्यंत यशस्वी होता. कोणत्याही कामांत त्यास अपयश असें कधींच आलें नाहीं. तसेंच त्याचें घरचें ऐश्वर्यही मोठें होतें. इब्राहीमशहास त्याची मुलगी दिली असून तिचाच मुलगा पुढें राज्यारूढ व्हावयाचा होता. त्याच्याइतके मोठे पुरुष दक्षिणेंत फार थोडे झाले.

इब्राहीमशहाच्या कार्किर्दीचीं शेवटचीं कांहीं वर्षें निजामशहाशीं लढण्यांत गेलीं; त्यांत निजामशहास विजयनगरच्या रामरायाचें साहाय्य होतें. त्यांनीं सोलापूरनजीक इब्राहीमशहाचा पराजय केला. तेव्हां इब्राहीमच्या राज्यांत पुष्कळ बंडें झालीं. तो आजारी पडला, आणि चहूंकडून संकटांनीं घेरल्यामुळें वेड लागून वैद्य लोकांसही ठार मारूं लागला. अशा विपन्नावस्थेंत इब्राहीमशहा सन १५४७ त मरण पावला. त्याचें

दफन त्याचा बाप व आजा ह्यांच्या शेजारीं झालें. तो बराच पराक्रमी होता. विद्वान् व गुणिजनांस त्यानें आश्रय दिला होता. तरी कार्किर्दीच्या अखेरीस त्याचा स्वभाव विलासी व क्रूर बनल्यामुळें त्याच्या कीर्तीस पुष्कळ कलंक लागला.

४. अली आदिलशहा, (सन १५७७–१५८०).—अलीच्या मनाचा कल लहानपणापासून शियापंथाकडे होता. राज्यकारभार हातीं आल्याबरोबर त्यानें सुनीपंथ मोडून शियापंथ पहिल्याप्रमाणें पुन: चालू केला. इब्राहीमशहा मरण पावल्यावर, आसदखानचा मुलगा कीश्वरखान ह्याच्या साहाय्यानें त्यास राज्य प्राप्त झालें. अली हा पहिल्यानें मिरजेस राहत असे. तेथून विजापुरास येत असतां रस्त्यांत त्यानें मुक्काम करून नवीन शहर वसविलें; त्यास शहापूर असें म्हणतात. अलीस लहानपणींच चांगलें शिक्षण मिळालें असून तो सुस्वभावी होता. कल्याणी, व सोलापूर हे दोन किल्ले मूळचे आदिलशहाचे असून ते हुसेन निजामशहानें घेतले होते, ते परत मिळविण्याचा त्यानें विचार करून त्या कामीं विजयनगरच्या राजाचें साहाय्य घेण्याचें योजिलें. त्या हेतूनें विजयनगरास जाऊन तेथच्या राजास तो भेटला. ही भेट मोठ्या थाटाची झाली. रामरायानें अलीची बरदास्त उत्तम प्रकारें ठेविली. त्या वेळच्या राजे लोकांच्या अशा भेटींचें वर्णन वाचून त्यांच्या अप्रतीम वैभवाची कल्पना मनास गुंग करून सोडिते. पुढें रामरायाची कुमक घेऊन अलीनें सन १५५८ सालीं निजामशाहीच्या मुलखावर स्वारी केली, आणि सर्व मुलूख उद्ध्वस्त केला. तेव्हां निजामशहानें कल्याणीचा किल्ला अलीस देऊन तह केला. ह्या स्वारींत हिंदूंनीं फार अनीतीचें आचरण केलें; क्रूरपणाची सीमा केली; मोठमोठ्या इमारती व मशिदी फोडिल्या, आणि घरें जाळिलीं. पुढच्या वर्षीं हुसेनशहानें अलीशीं पुन: युद्ध केलें. तेव्हां अलीशहानें रामरायास मदतीस बोलाविलें. कुत्बशहाही आदिलशहासच मिळाला. तेव्हां हे त्रिवर्ग मिळून हुसेनशहाचा पाठलाग करीत, थेट अहंमदनगरवर चालून आले. विजयनगरच्या हिंदु फौजेनें ह्या प्रसंगीं पहिल्यापेक्षां फारच अनर्थ केला, आणि मुसलमानांस चीड येण्याजोगीं कृत्यें केलीं. त्यावरून सर्व मुसलमान राजांनीं मोठी एकी करून विजयनगरवर स्वारी केली, आणि सन १५६५ त तालिकोटची लढाई

जिंकून त्या राज्याचा कायमचा नाश केला. ती हकीकत विजयनगरच्या प्रकरणीं येईल.

तालिकोटनंतर दोन तीन वर्षांनीं निजामशहाचें आदिलशहाशीं वांकडें येऊन लढाया झाल्या; आणि विजापूरचे कित्येक प्रांत मूर्तुजा निजामशहानें घेतले. सन १५७१ सालीं आदिलशहा व निजामशहा ह्या दोघांनीं मिळून किनाऱ्यावरील पोर्तुगीझ लोकांस घालवून देण्यासाठीं फौजेसह स्वाऱ्या केल्या. गोव्यावर अली आदिलशहानें स्वारी केली; आणि चौल ऊर्फ रेवदंडा बंदरावर निजामशहानें स्वारी केली. पण उभयतांसही पोर्तुगीझ लोकांच्या हातून पराभव पावून मागें परतावें लागलें. सन १५७२ त अध्वनीचा मजबूद किल्ला अलीनें घेतला. ह्या वेळीं पूर्वीचे विजयनगरच्या ताब्यांतील कित्येक सरदार व किल्लेदार आपापल्या ठाण्यांत स्वतंत्र झाले होते, त्यांवर अलीनें शस्त्र धरून त्यांस आपला ताबा कबूल करण्यास लाविलें. दक्षिणेंत कित्येक स्त्रीराज्यें होतीं तीं सुद्धां आदिलशहानें जिंकिलीं. त्याच्या लष्करचें काम मुस्तफाखानाकडे होतें. सर्व वसुलांच्या कामावर शहानें एका ब्राह्मणाची नेमणूक केली होती.

सन १५८० सालीं अली आदिलशहाचा एका खोजानें खून केला. त्यास विजापुरींच पुरिलें. त्याच्या कबरेस रोझा अली असें म्हणतात. जुम्मामशीद, शहराचा तट व रस्तोरस्तीं पाण्याचे नळ, हीं कामें त्याच्या कारकिर्दीत झालीं. हा शहा विद्वान्, धर्मनिष्ठ व परोपकारी होता.

इब्राहीम आदिलशहा, [दुसरा] (स. १५८०–१६२६).—अली आदिलशहाचा भाऊ शहा तह्मास्प् म्हणून होता. त्याचा मुलगा इब्राहीम यानें आपल्यामागून तख्तावर बसावें, असें मरणसमयीं अलीनें ठरवून ठेविलें होतें. इब्राहीम केवळ नऊ वर्षांचा होता. कामिलखान व चांदबिबी यांजकडे सर्व कारभार होता. पण कामिलखानानें सर्व सत्ता बळकाविण्याचा प्रयत्न केल्यामुळें, त्यास कैद करून कीश्वरखान याजकडे तिनें सर्व कारभार दिला. ह्या कीश्वरखानाचें वर्तन कामिलखानासारखेंच होतें. त्यानें मुस्तफाखान यास ठार मारिलें आणि चांदबिबीस साताऱ्याच्या किल्ल्यावर ठेवून सर्व कारभार स्वतःकडे घेतला. पुढें तो लवकरच लोकांस अप्रिय होऊन त्यांच्या रागाच्या तडाक्यांत

सांपडणार होता. पण संधि साधून प्रथम तो अहंमदनगरास पळून गेला. तेथें आश्रय न मिळाल्यामुळें तो गोवळकोंड्यास गेला. तेथें मुस्तफाखानाच्या एका नातलगानें त्यास ठार मारिलें. नंतर इख्लास-खान व दुसरे हबशी सरदार यांनीं राणीस मुक्त करून तिच्या हातांत कारभार दिला. तरी विजापूरचा गोंधळ संपला नाहीं. अहंमदनगर व गोवळकोंडा येथील राजांस ही संधि चांगली वाटून ते विजापूरवर चाल करून आले. विजापूरचें राज्य बुडून तें या दोघां राजांच्या हातीं जाणार असा रंग दिसूं लागला. त्याच वेळीं किल्ल्याची थोडीशी भिंत पावसानें पडली.

अशा वेळीं अबुल् हुसेन नांवाच्या इसमानें शर्थ करून शहर बचा-विलें. दिलावरखान म्हणून दुसरा एक शूर सरदार होता, त्यानें शत्रूंस मागें हटविण्याची पुष्कळ खटपट केली. एक वर्षभर विजापुरास वेढा पडला होता; पण सरते शेवटीं निजामशहा व कुत्बशहा ह्यांचें कांहीं एक न चालतां त्यांस परत जावें लागलें. दिलावरखानानें पुढें अबुल् हुसेन यास ठार करून आपण मुख्य प्रधान झाला. पुढें पुष्कळ दिवसपर्यंत त्यानें राज्यकारभार चांगल्या रीतीनें केला. सन १५८४त शहाची बहीण खुजा सुलताना हिचें निजामशहाच्या मुलाशीं लग्न होऊन तिजबरोबर चांदबिबी अहंमदनगरास गेली, ती पुनः विजापुरास आली नाहीं. सन १५९६ मध्यें गोवळकोंड्याच्या राजाच्या मुलीशीं शहाचें लग्न झालें, पण हा संबंध निजामशहास पसंत पडला नाहीं. पुढें शहा जसजसा वयांत येऊं लागला, तसतसा राज्यकारभार स्वतःच्या हातीं घेण्याविषयीं तो उत्सुक झाला; पण दिलावरखान त्यास अधिकार देईना. शहावर सक्त पाहरे असत. ते सर्व चुकवून शहा रात्रीं वाड्यां-तून पळून ऐन्-उल्मुल्क् नामक सरदराच्या छावणींत गेला. दिलावर-खानानें त्यास पकडण्याविषयीं केलेले यत्न निष्फळ झाल्यावर, तो वृद्ध कारभारी पळून अहंमदनगरास गेला. त्याबरोबर प्रसिद्ध इतिहासकार फेरिस्ता होता. तो कांहीं दिवसांपूर्वीं इब्राहीमशहाकडे येऊन राहिला होता. अहंमदनगरकडे आश्रय न मिळाल्यावर दिलावरखान भटकूं लागला, त्यास इब्राहीमशहानें फसवून विजापुरास आणिलें, आणि अंध करून सातान्यास कैदेंत ठेविलें. तेथें तो पुढें दहा वर्षांनीं मरण पावला, तेव्हां त्याचें वय नव्वद वर्षांचें होतें.

सन १५९६ त शहाचा भाऊ इस्माईल ह्यानें स्वतःस विजापूरचें राज्य मिळण्यासाठीं बंड केलें. शहानें त्यास पकडून तोफेच्या तोंडीं दिलें. सन १५९४ त अहंमदनगरशीं लढाई होऊन निजामशहा मारला गेला. पुढें इब्राहीमशहानें निजामशहाशीं तह केला. ह्यानंतर अहंमदनगर व विजापूर ह्यांजमध्यें युद्ध झालें नाहीं.

इब्राहीमशहाची कारकीर्द अखेरीस फार भरभराटीची व प्रजेस हितावह अशी झाली. ह्याच वेळेस अकबर बादशहा आपलें सैन्य घेऊन दक्षिणेवर आला. तेव्हां अहंमदनगरच्या राजास मदत करण्याकरितां इब्राहीमनें आपली फौज पाठविली; पण सुपें येथें अकबराच्या सैन्यानें तिचा पराभव केला. सन १६०३मध्यें आदिलशहानें अकबरास पुष्कळ नजराणे वगैरे देऊन तह केला; आणि त्यानें आपली मुलगी अकबराचा मुलगा दानियाल ह्यास दिली. ह्या सर्व सलोख्याच्या वर्तनानें अहंमदनगरप्रमाणें विजापूरवर मोगलांची धाड ह्या वेळेस आली नाहीं. इब्राहीमशहा सन १६२६ त मरण पावला. त्या वेळीं त्याचें वय ५६ वर्षांचें होतें.

विजापूरच्या सर्व शहांमध्यें हा फार मोठा व यूसुफ्शहानंतर पुष्कळ पराक्रमी व लोकप्रिय झाला. तो कलहप्रिय नव्हता. त्यानें आपला काळ राज्यसुधारणेंत घालविला. तोडरमल्लानें मोगली राज्यांत जी वसुलाची पद्धत बांधून दिली होती, तीच ह्यानें विजापूरचे राज्यांत चालू केली. जमिनीची मोजणी करून ह्या वेळेस जे दर त्यानें ठरविले, त्यांचे अवशेष अजूनही कोठें कोठें दृष्टीस पडतात. ह्यानें तख्तावर बसल्याबरोबर शियापंथ मोडून सुनीपंथ चालू केला होता; तरी धर्माच्या बाबतींत हा अतिशय समबुद्धि असून सर्वांस सारखें वागवीत असे. त्याच्या कारकीर्दीत हिंदूंस त्रास झाला नाहीं, इतकेंच नाहीं, तर लष्करी व इतर खात्यांत ब्राह्मण व मराठे ह्यांचाच पुष्कळ भरणा होता. पोर्तुगीझ लोकांस जिंकणें दुरापास्त आहे असें पाहून त्यांजशीं त्यानें सख्य ठेविलें. पोर्तुगीझ व्यापारी विजापुरास पाहिजे तो व्यापार मोकळेपणानें करीत. वाडे वगैरे रंगविण्यासाठीं पोर्तुगीझ चित्रकार ठेविलेले होते. क्रिस्ती लोकांच्या धर्मोपदेशकांस त्यानें चांगला आश्रय दिला. इब्राहीमची अशी कीर्ति आहे, कीं अकबरापेक्षांही धर्माच्या बाबतींत तो कांकणभर

ज्यास्त उदार होता. त्यानें आपल्या राज्यांत बांधिलेलीं क्रिस्ती देवळें अद्यापि हयात आहेत. हल्लीं तीं गोवें येथील धर्माध्यक्षाच्या ताब्यांत आहेत.

त्याच्या वेळेस मोठमोठ्या प्रेक्षणीय इमारती बांधल्या गेल्या. त्याची स्वतःची मशीद विजापुरास आहे, ती अद्यापि त्या वेळच्या कारागिरींतील नैपुण्याची साक्ष देत आहे. तिचें काम छत्तीस वर्षें चाललें असून, तिला बावन लाख रुपये खर्च झाला. विजापूर शहराचा विस्तारही त्या वेळेस फार झाला.

मृत्युसमयीं शहाच्या खजिन्यांत मुबलक द्रव्य होतें. त्याजपाशीं ऐशीं हजार स्वार सदैव लढण्यास तयार असत. त्याच्या राज्याची सीमा म्हैसुरास भिडली होती. इब्राहीमच्या पश्चात् त्याचा मुलगा महंमद हा तख्तावर बसला.

७. महंमद आदिलशहा, (स. १६२६–१६५६).—ही कारकीर्द दक्षिणच्या इतिहासांत फार महत्त्वाची आहे. कारण दक्षिणेंतील मुसलमानी राज्यें जिंकून तेथें आपला अंमल दिल्लीचे पराक्रमी मोगल बादशहा बसवीत असतां, फार वर्षें परचक्राखालीं त्रास पावलेले दक्षिणचे पाणीदार मराठे लोक ह्या वेळेस स्वराष्ट्रोन्नतीसाठीं झगडूं लागून उदयास आले. म्हणून ह्या वेळची हकीगत सविस्तर देणें इष्ट आहे. इब्राहीमशहा मरण पावल्यावर त्याच्या इच्छेनुरूप त्याचा मधला मुलगा महंमद हा आदिलशाही तख्तावर बसला. त्यानें आपल्या वडील भावास अंध करून व इतरांचीं बोटें वगैरे तोडून, त्यास राज्याचे निरुपयोगी करून टाकिलें. ज्यांनीं त्यास मदत केली होती त्यांस त्यानें इनामें, किताब वगैरे दिले. आरंभींच निजामशहानें विजापूरचे मुलखावर एक दोन स्वाऱ्या केल्या, पण त्यांत त्यांचाच पराभव झाला.

बंकापूर येथें कदमराव म्हणून एक विजापूरचा मांडलिक होता. त्यानें बंड केलें, म्हणून शहानें मीर्झा अलीस फौज देऊन त्याजवर पाठविलें. मीर्झा अलीनें कदमरावास पकडून, सन १६२८ त ठार मारिलें, आणि आपण विजापुरास परत आला.

ह्याच संधीस जहांगीर बादशहा मृत्यु पावून, त्याचा पराक्रमी पुत्र शहाजहान दिल्लीच्या तख्तावर बसला. सर्व हिंदुस्थान मोगल बाद-

हीच्या ताब्यांत आणण्याचा त्याच्या आजाचा उद्देश त्याचे मनांत सतत घोळत होता. स्वतः दक्षिणेंत फार दिवस राहिला असल्यामुळें, त्याचा हा विचार फारच दृढ झाला. मलिकंबराच्या मागून निजामशाहीस कोणी त्राता राहिला नाहीं हें त्यास कळून चुकलें होतें. इकडे विजापूरचा महंमद आदिलशहा हा मोगलांशीं सख्य करून निजामशाही बुडवून तिचा कांहीं भाग मिळविण्यास इच्छीत होता. कदमरावाशिवाय मुरारराव नामक दुसरा एक मराठा जहागीरदार आदिलशहाच्या पदरीं होता. निजामशाही बुडविण्यास आपण कारण होऊं नये, असें मुरारराव व दुसरे सरदार यांच्या मनांत होतें, पण आदिलशहाचा मुख्य सल्लागार मुस्तफाखान हा असून त्याची महत्त्वाकांक्षा अनावर होती. शहाजहान हा आदिलशहासही मोजीत नव्हता. सवड सांपडेल त्याप्रमाणें सर्व दक्षणी राज्यें जिंकण्यास त्यानें मोठी फौज रवाना केली. प्रथमतः खानजहान लोदीनें दक्षिणेंत बादशहाविरुद्ध बंड उभारलें होतें. तें मोडण्याची ह्या फौजेस ताकीद होती. खानजहान लोदी मारला गेल्यावर मोगल सैन्य निजामशाहीवर आलें. मूर्तुजा निजामशहानें आदिलशहापाशीं मदत मागितली. पण मदत जाण्यापूर्वीच त्याचा खून होऊन फत्तेखान मोगलांस मिळाला. नंतर मोगल फौजेनें विजापुरावर चाल केली. ह्या फौजेचा मुख्य नूरजहानचा भाऊ आसफखान हा होता, त्यानें विजापुरास वेढा घातला. पण आदिलशाही फौजेनें मोगलांची पुरी खोड मोडिली. मुराररावानें हल्ले करून त्यांस इतकें जेरीस आणिलें, कीं ते विजापूरच्या मुलखांतून पाय काढून पळून गेले. मुरारराव परिंड्याचे किल्ल्यावर गेला. त्या किल्ल्यावर मुल्क्-इ-मैदान (रणभूमीचा राजा) नांवाची प्रसिद्ध तोफ होती. आतां ती महांकाळी नांवानें प्रसिद्ध आहे. पूर्वी हा किल्ला निजामशहाच्या ताब्यांत होता, त्या वेळीं ही तोफ चलीबी रूमीखाननें निजामशहाचे हुकुमावरून अहंमदनगरापासून एक कोशावर ओतली असून, तालिकोटच्या लढाईत रामरायावर जातांना हुसेन निजामशहानें बरोबर घेतली होती. ही अष्ट धातूंची ओतलेली आहे. हिचें वजन ६० खंडी आहे असें म्हणतात. पण एका इंग्रज कामगाराचें मत असें आहे, कीं तिचें वजन ४० खंडी किंवा बत्तीस हजार रचल आहे. लांबी १४ फूट व परीघ तितकाच आहे. तोंडाच्या पोक-

ळीचा व्यास बरोबर २ फूट ४ इंच आणि जाडी १ फूट आहे. हिच्या तोंडास सिंहाच्या जबड्याचा आकार आहे, आणि त्यानें तोंडांत हत्ती धरिला आहे असें दाखविलें आहे. औरंगजेबानें विजापूर घेतलें, तेव्हां हिच्यावर कांहीं लेख कोरून ठेविला आहे. भाविक लोक अजून तिची पूजा करितात. लोकांनीं वरचेवर हात फिरविल्यामुळें ती साफ चकचकीत होऊन तिच्यांत पाहणाराचें रूप दिसतें. ही तोफ महंमद आदिलशहानें हुकूम पाठवून मुराररावाकडून परिंड्याहून विजापुरास आणविली. दुसरी कडकबिजली म्हणून एक तोफ होती, ती आणण्यासही त्यास हुकूम झाला होता; पण आणतांना ती रस्त्यांत कृष्णा नदींत बुडाली, ती अद्यापि तेथें दिसते.

आसफखानाचा पराभव झालेला ऐकून शहाजहाननें महाबतखानास दक्षिणेंत पाठविलें. त्यानें दौलतबादचा किल्ला घेऊन निजामशाही बुडविली. त्या वेळींही आदिलशहानें मुरारराव व रणदुल्लाखान या सरदारांस पाठवून निजामशहास मदत केली. ह्या कृत्याचा शहाजहानास अत्यंत त्वेष येऊन त्यानें आपल्या फौजेचा मोर्चा विजापूरवर फिरविला. अशा अडचणीच्या प्रसंगीं शहाजीसारख्या मसलती सरदाराचें आपणास पाठबळ असावें अशी महंमद आदिलशहास इच्छा उत्पन्न झाली. शहाजी फार हुशार, महत्त्वाकांक्षी, व रणधुरंधर होता. तो ह्या वेळेस निजामशाहीचा पुनः उद्धार करण्याच्या खटपटींत होता. जुन्नरचा कारभारी श्रीनिवासराव यास पकडून शहाजीनें त्याचे सर्व प्रांत आपणाकडे घेतले, बारा हजार स्वार नोकरीस ठेवून आपली मोठी मजबुदी केली, आणि निजामशहास आपल्या ताब्यांत घेतलें. महाबतखान शहाजीवर फौज घेऊन आला, पण विजापूरकरांच्या मदतीनें शहाजीनें महाबतखानास परत लाविलें. येणेंप्रमाणें शहाजी हा वेळ पडेल तसा निजामशाही मुलूख अंगाखालीं घालून, विजापूरकरांशीं सख्य ठेवून स्वतःचें वर्चस्व कायम राखीत होता.

सन १५३५ सालीं विजापूरचा दिवाण खवासखान व त्याचा अंकित मुरारराव हे दोघेही आपणास भारी आहेत, असें समजून आदिलशहानें दोघांचाही वध करविला. ह्या खवासखानानें शहाजहान बादशहास विजापूरवर येण्याविषयीं आमंत्रण पाठविलें होतें. शहाजी प्रबळ

१८-७९१-२०००

झाला आहे त्याचा मोड केला पाहिजे, आणि खवासखानानें कळविल्या-प्रमाणें विजापूरवर आपला हात फिरविला पाहिजे; अशा उद्देशानें शहाजहान स. १६३५त स्वतः दक्षिणेंत आला; आणि त्यानें खान दौरान नामक आपला शूर सरदार विजापूरवर पाठविला. शहाजी भोसले व रणदुल्लाखान ह्या दोघांनीं हरप्रयत्न करून, मोगल फौजेचें कांहीं एक चालूं दिलें नाहीं. रणदुल्लाखानानें तर मोगल फौजेस अन्नपाणी सुद्धां मिळूं दिलें नाहीं. पण त्यामुळें मोगलांनीं विजापूरचा पुष्कळ प्रदेश ओसाड पाडिला; तेव्हां महंमदशहानें शहाजहानबरोबर तह केला. ह्या तहानें निजामशाहीच्या मुलखापैकीं पुष्कळ मुलूख त्यास मिळाला, आणि आदिलशहानें दरसाल शहाजहानास खंडणी देण्याचें कबूल केलें. त्याच वेळेस शहाजी राजे भोसले ह्यानें निजामशहास मोगलांच्या स्वाधीन करून शहाजहानच्या परवानगीनें आदिलशहाची नोकरी पत्करिली.

मोगलांशीं तह झाल्यानंतर अहंमदशहानें आपला काळ राज्यव्यवस्था करण्यांत घालविला. तसेंच थेट दक्षिणेकडील कित्येक लोक खंडणी वगैरे वेळेवर देत नसत, ती त्यांजकडून वसूल करण्याचे कामीं रणदुल्लाखान व शहाजी भोसले यांचें त्यानें साहाय्य घेतलें. शहाजी कर्नाटकांत कामगिरिवर असतां त्याचा मुलगा शिवाजी पुण्याकडे होता. त्या पराक्रमी मुलानें घांटमाथ्यावरील पुष्कळ किल्ले बळकाविले. विजापूरकरांस हें सहन झालें नाहीं. इकडे मुस्तफाखान व शहाजी यांचेंही वांकडें आलें, तेव्हां बाजीराव घोरपडे नामक सरदारास त्याजवर पाठवून मुस्तफाखानानें शहाजीस कैद करविलें, आणि त्याची मालमत्ता जप्त केली. तो दोन तीन वर्षें कैदेंत होता. पुढें शिवाजीनें मोगलांचा शह आणवून बापाची सुटका केली, ही हकीकत मराठ्यांच्या भागांत यावयाची आहे.

सन १६५६त महंमद आदिलशहा मरण पावला. त्यानें राज्य चांगल्या प्रकारें केलें. त्याच्या कारकिर्दीत विजापूर शहर अत्यंत विस्तृत व शोभिवंत झालें. तो स्वतः विलासी होता, तरी त्याचें सर्व लक्ष प्रजारक्षणाकडे असे. परदेशचे राजे त्यास फार मान देत. त्याजपाशीं ऐशीं हजार स्वार, दोन लक्ष पन्नास हजार पायदळ, व पांचशें हत्ती इतकी

फौज जय्यत असे. त्याच्या राज्याचा वसूल बीस कोटी होता. त्यानें एक मशीद बांधिली, तिच्या घुमटाइतकें मोठें घुमट दुसऱ्या कोठेंही नाहीं. ज्या शास्त्रीय पद्धतीवर तें बांधिलें आहे ती युरोपच्या पद्धतीहूनही वरचढ आहे, असें त्या शास्त्रांतील पंडित मि. फर्ग्युसन ह्यानें लिहून ठेविलें आहे.

७. अली आदिलशहा, [दुसरा], (स. १६५६–१६७२).—मागील शहाचा मुलगा अली आदिलशहा हा तख्तावर आला, त्या वेळेस शहाजहानचा पराक्रमी पुत्र औरंगजेब दक्षिणेंत होता. आपल्या परवानगीशिवाय अलीनें राज्यपद स्वीकारिलें ह्या सबबीवर औरंगजेबानें मीर जुम्ला यास विजापूरवर पाठविलें. मोगल फौजेनें विजापुरास वेढा घातला. तें शहर त्याच वेळेस मोगलांचे ताब्यांत गेलें असतें, पण वेढा चालू असतां दिल्लीस शहाजहान बादशहा आजारी पडला, तेव्हां विजापूरकरांशीं कसावसा तह करून, औरंगजेब दिल्लीस निघून गेला, (स. १६५७).

वास्तविक पाहतां आदिलशाहीस ह्या वेळेस दोन मोठे शत्रू उत्पन्न झाले होते, एक शिवाजी भोसले, व दुसरा दिल्लीचा मोगल बादशहा. निजामशाहीची शहाजहाननें वांटणी केली, त्यांत कोकणचा बहुतेक प्रांत आदिलशहाचे वांटणीस आला होता. त्यापैकींच पुणें व सुपें हे दोन परगणे शहाजीस जहागिरीदाखल दिलेले होते. शहाजीची कर्नाटक प्रांताकडे नेमणूक झाली, तेव्हां ह्या परगण्यांची वहिवाट शिवाजी करीत होता. ह्याच ठिकाणीं राहून शिवाजीनें आपले पुढचे सर्व बेत रचिले. शिवाजीचा बंदोबस्त वेळींच करावा, ह्या हेतूनें आदिलशहानें अफझलखान नामक सरदारास मोठी फौज देऊन त्याजवर पाठविलें. त्याच्याबरोबर मोठी फौज असल्यामुळें, उघड रीतीनें लढाई करून आपला निभाव लागणार नाहीं असें पाहून, शिवाजीनें त्यास नम्रतादर्शक एक पत्र लिहून कित्येक प्रांत परत दिले. त्यानें अफझलखानाकडे वकील पाठवून नम्रतापूर्वक विनंति करून, त्यास प्रतापगडावर मेजवानीस बोलाविलें. तो गाफीलपणानें किल्ल्यावर येतांच, त्याजवर शिवाजीनें हत्यारबंद लोकांनिशीं चालून जाऊन त्यास ठार मारिलें. तें समजतांच

त्याची सर्व फौज पळून गेली.* दुसऱ्या वर्षी सीदी जौहर नामक सरदाराची शिवाजीवर नेमणूक झाली. पण तो आंतून शिवाजीशीं सलोख्यानें वागूं लागला; तेव्हां आदिलशहानें स्वतः शिवाजीवर कूच केलें. पन्हाळा किल्ला शहाचे हातांत आला; आणि शिवाजी डोंगरी रस्त्यानें पळून गेला, तो त्यास सांपडेना. तेव्हां अशा बिकट जागेंत आपल्या सैन्याच्या हातून शिवाजीचा शोध लागणार नाहीं असें पाहून, त्याचा नाद सोडून शहा विजापुरास परत गेला.

पुढें सीदी जौहरनें बंड केलें त्याजवर बादशहानें स्वतः स्वारी केली. तो अनेक ठिकाणीं पळाला व शेवटीं मरण पावला. बेदनूरचा अधिकारी भद्रनाईक यानें बंड केलें होतें, तेंही शहानें मोडिलें. इकडे शिवाजीची पुंडाई फार माजली. विजापूरकर व मोगल या दोघांसही त्याचा धाक पडत चालला. तेव्हां औरंगजेबानें विजापुरास वकील पाठविले, कीं उभयतांनीं मिळून शिवाजीवर दोहोंकडून फौज पाठवावी. तें आदिलशहानें कबूल करून वकील परत पाठविले. तेव्हां औरंगजेबानें जयसिंहास मोठ्या फौजेनिशीं दक्षिणेंत रवाना केलें. तसेंच विजापूरहून खवासखान नांवाचा सरदार शिवाजीवर आला. दोनही फौजा एकत्र होण्यापूर्वींच खवासखान शिवाजीवर आल्यामुळें, एका अवघड जागीं उभयतांची निकराची लढाई झाली. मराठ्यांनीं विलक्षण पराक्रम केला, पण अखेरीस त्यांस रणांगण सोडून पळून जावें लागलें. इतक्यांत जयसिंह येऊन ठेपलाच. शिवाजी पुरंदर किल्ल्यावर होता. त्यास जयसिंहानें वेढा घातला. आतां आपला इलाज नाहीं असें पाहून शिवाजीनें जयसिंहास कळविलें, कीं 'मोगलांस जर आदिलशाही व दक्षिण देश जिंकणें असेल, तर त्यांनीं माझ्या सारख्याशीं दोस्ती करावी; म्हणजे मी हें काम तेव्हांच फत्ते करून देईन.' जयसिंहानें ही गोष्ट कबूल केली, शिवाजीशीं स्नेह केला, आणि पुरंदरचा वेढा उठवून विजापूरचा मुलूख लुटण्यास सुरुवात केली. अली आदिलशहास

---

* अफजलखानाच्या मरणाची हकीकत विजापूरच्या इतिहासांत अशा प्रकारची आढळते. विजापूरच्या इतिहासापुरताच येथें ह्या गोष्टीचा उल्लेख केला आहे. तिचें विस्तृत विवेचन मराठ्यांच्या भागांत येईल.

मोगलांच्या वचनभंगाचा मोठा चमत्कार वाटला. त्यानें मोगलांशीं लढण्याची जंगी तयारी केली. एक दोन लढाया झाल्या, त्यांत जयसिंहाचा पराजय झाला. सलाबतखान म्हणून एक सरदार दिल्लीहून येत होता, त्याचाही सर्जाखान नामक विजापूरच्या सरदारानें पराभव केला. पुढें गोवळकोंड्याच्या कुत्बशहाकडून आदिलशहास मदत आली. ह्या दोन फौजांनीं जयसिंहास अगदीं जेरीस आणिलें. जयसिंहास तोंड दाखविण्यास जागा उरली नाहीं. दिल्लीहून पत्रें येत, कीं 'जयप्राप्ति न झाल्यास तुम्हांस शिक्षा करण्यांत येईल.' सर्जाखान, व खवासखान हे विजापूरचे सरदार कट्या अभिमानानें लढत होते. एके दिवशीं सर्जाखानाचा मुलगा अडचणींत सांपडला असतां तो त्याचे मदतीस गेला. विजापूरच्या फौजेस जयप्राप्ति झाली; पण त्यांत सर्जाखान घोड्यावरून पडून मरण पावला, म्हणून विजापूरकरांची बाजू पुष्कळ खचली आणि जयसिंहास धीर आला. पण पुनः एक निकराचा युद्धप्रसंग होऊन जयसिंह मरतां मरतां वांचला आणि पळ काढून दिल्लीकडे गेला.

ह्याप्रमाणें अली आदिलशहानें स्वतःच्या कार्कीर्दींत शिकस्त करून विजापूरचें संरक्षण केलें. हा विषयी होता, तरी नियमितपणानें वागून प्रजापालनाच्या कामीं त्यानें चांगलें लक्ष पुरविलें. तो स्वतः कवि असून विद्वानांस चांगला आश्रय देई. त्याच्या जवळ अनेक फारशी कवि होते. दरबारांत पुष्कळ वैमनस्यें होतीं, पण तो जिवंत असतांना तीं उघडकीस आलीं नाहींत. धर्माजी पंडित वगैरे कित्येक हुशार दक्षणी गृहस्थ त्याचे पदरीं होते. अली आदिलशहा इ. स. १६७२ त मरण पावला. त्यानें हसनी महाल, आरसेमहाल, वगैरे इमारती बांधिल्या, आणि विजापूरची शहापेठ वसविली.

८. सिकंदर आदिलशहा, (स. १६७२–१६८६).—अनुभविक मुत्सद्दी अब्दुल महंमद घरीं बसला; आणि खवासखानानें अलीचा पांच वर्षांचा मुलगा सिकंदर ह्यास तख्तावर बसवून कुलमुखत्यारी आपणाकडे घेतली. ह्यामुळें दरबारांत सर्वत्र घोटाळे उत्पन्न होऊन शत्रूंचें आयतेंच साधलें. विजापूरकरांचा पहिला शत्रु शिवाजी ह्यानें पन्हाळा किल्ला परत घेतला. तेव्हां त्याजवर बुहलोलखान लोदीची रवानगी झाली. त्यानें शिवाजीच्या फौजेचा चांगलाच समाचार घेतला. दुसरा शत्रु औरंग-

जेब. त्यानें बहादूरखानास दक्षिणचा सुभेदार नेमिलें होतें. खवासखानानें युक्तीनें बहादूरखानाशीं तह केला. पण विजापूरच्या दरबारीं अनेक घोटाळे झाल्यामुळें शांतता फार दिवस टिकली नाहीं. पठाण लोकांचा पगार तुंबला होता, त्यासाठीं त्यांनीं दंगा केला. तसेंच चिंतो चिमणाजी नांवाच्या एका ब्राह्मणानें शहरांत कहर उडवून दिला. तो वाटेल त्या इसमापासून पैसे उपटूं लागला, तें कोणाच्यानेंही बंद करवेना. दिल्लीचा सरदार दिलेरखान ह्यानें विजापूर जिंकण्याच्या कामीं होते तितके प्रयत्न केले, ते तडीस गेले नाहींत. त्यामुळें दिलेरखानाची अपकीर्ति होऊन तो पुढें लवकरच मरण पावला.

सन १६८३ सालीं औरंगजेब दक्षिणदेश जिंकण्यासाठीं स्वतः फौज घेऊन आला. *विजापूरकरांस संभाजीची मदत होती. आदिलशाही जिंकण्याच्या इराद्यानें औरंगजेब सर्व फौजेसह विजापूरवर आला.* ह्या वेळीं विजापूरच्या गादीवर सिकंदर आदिलशाहा असून तो फक्त सोळा वर्षांचा होता. त्याजपाशीं चतुर मुत्सद्दी कोणी नव्हते. औरंगजेबानें शहरास वेढा दिला, तेव्हां आंत आकांत उडाला. सर्व लोक भयभीत झाले. पुरातनपासून चालत आलेली बादशाही आतां बुडणार आणि लढाई करण्याची ताकद कोणांत नाहीं, असें पाहून सिकंदरशहा औरंगजेबास शरण गेला. औरंगजेबानें त्यास सालीना एक लाखांची नेमणूक करून देऊन औरंगाबादेस अटकेंत ठेविलें; आणि विजापूरचें राज्य मोगल राज्याखालीं आणिलें, (ता. १५ ऑक्टोबर, १६८६). सन १७०१ सालीं सिकंदरशहास औरंगजेबानें विष घालून मारिलें. विजापूरचें राज्य १९७ वर्षें मोठ्या भरभराटीनें चाललें.

९. आदिलशाहीचें समालोचन.*—यूसुफ् बेगनें कुस्तंतुनियाच्या राजवंशांत जन्म घेऊन, गुलाम मंडळींत जागा मिळवून, आपल्या प्रारब्धाचे कित्येक दिवस इराणांत कंठिले, व कालांतरानें हिंदुस्थानांतील दाभोळसारख्या बंदरीं येऊन, बेदरच्या बहामनी राजाकडे चोपदारी पत्करिली. पुढें आपल्या बाहुबलानें हजारों जेठींस जिंकून ब्रीद बांधून आलेल्या पहिलवानांस चीत करून, त्यानें पांच गांवांची सनद मिळविली.

---

* प्रो. बा. प्र. मोडक यांच्या विजापूरच्या इतिहासावरून.

नंतर सरदारी संपादन करून, आपल्या राज्यकारस्थानपटुत्वानें बहामनी राज्यांतील बेबंदशाही मोडून, विजापूरसारख्या शहरीं आदिलशाही राज्याची स्थापना केली, व आपल्या वंशजांस राज्यप्राप्ति करून दिली. कित्येक बाजार व व्यापारासाठीं पेठा बसवून आणि अनेक अजस्र तट बांधून शहरास शोभा आणिली. तेवीस वर्षे सुखानें राज्य केलें. बेदर, अहंमदनगर, सोलापूर, परिंडा, मिरज इत्यादि किल्ल्यांचीं विशाल व मजबूद कामें ह्या कार्किर्दीत होऊन, आदिलशाहीचा कीर्तिसूर्य उगवला. त्याच्यामागून इसईलच्या कार्किर्दीत तर तो कीर्तिसूर्य बराच वर आला. सव्वीस वर्षें राज्य करून, नानाप्रकारचे विलास भोगून, व बंडें मोडून शांतता करीत असतां, त्यानें *समरभूमीस देह समर्पण केला. त्यानें चंपामहाल व मुद्गल हे किल्ले बांधिले. त्याच्यामागून थोडे दिवस मल्लूनें राज्य* केल्यानंतर, इब्राहीम गादीवर येतांच, गोव्यापासून मिरजेपर्यंत गांवेंच्या गांवें जाळून पोळून उजाड करणाऱ्या पोर्तुगीझ लोकांचा त्यानें चांगला बंदोबस्त केला. अर्क किल्ल्यास उत्तम दगडी कोट बांधून, इब्राहीमपूर शहर वसविलें. ह्याचे वेळीं निंबाळकर, घाडगे, घोरपडे, डफळे, माने, सावंत इत्यादि अनेक मराठे सरदार उदयास आले. ह्यानें पंधरा वर्षे राज्योपभोग घेतल्यानंतर अलीशहा तख्तनशीन झाला. विजयनगरचें प्राचीन, संपन्न व बलाढ्य राज्य नाहींसें करून, रामरायासारख्यास त्यानें बंदीवान केलें. सत्कर्मांत अपार संपत्तीचा विनियोग केला. गगनमहाल, जुम्मामसीद, शहाबुरूज, महाबुरूज ह्यांसारखीं सुंदर कामें उठविलीं. ह्यानें एकवीस वर्षे राज्योपभोग घेतला. पुढें विलासी व गाण्याचा शोकी, परंतु शूर व शहाणा इब्राहीमशहा तख्तावर येऊन त्यानें ईश्वरकृपेनें 'जगद्गुरु' हें नांव मिळविलें, व ४७ वर्षांच्या मोठ्या कार्किर्दीत नवरसपूर, नवरसमहाल, सात मजली माडी, आनंद महाल, आरसे महाल, अशीं सुंदर व रम्य स्थळें बांधून, त्यांवर जणूं काय आपल्या माध्यान्ह कुलकीर्तिसूर्यास विसावा दिला. त्याचा अनुगामी सुलतान महंमद ह्यानें मुल्क्-इ-मैदानसारख्या भयंकर तोफांचीं तोंडें शत्रुवक्षःस्थल विदारण्यास तयार ठेवून, मोगलांसारख्यांच्या प्रचंड प्रतापास दाद दिली नाहीं. बाले घुमटासारख्या उत्तम इमारती तयार करविल्या. ह्याच्यापुढें नवरत्नखचित

शिरपेंच लटकलेले हजारों मानकरी, सरदार, अमीर उमराव आणि बडे लोक लीनतेनें उभे असत. रत्नभूषणांनीं शृंगारिलेले शेंकडो हत्ती सज्ज असत. हा नुसता शहरांत फिरावयास गेला, तरी ह्याजवर लोक सोन्यारुप्याचीं फुलें उधळीत. ह्याच्याबरोबरच्या जिलिबीच्या हजारों घोड्यांच्या जिनांस हिरे, मोत्यें, पाच, माणकें वगैरे लटकलेलीं असत. वारंवार द्रव्याची तुळा करून तें तो गोरगरीब व फकीर ह्यांस वांटी. अशा थाटमाटांत व विलासांत शत्रूंचा फडशा पाडून, यानें आपली कारकीर्द लोटल्यावर अलीस राज्यपदप्राप्ति झाली. अलीच्या कारकिर्दीत अवघ्या विजापूर प्रांतांत सोन्याचा धूर निघत होता. ह्याच्या हाताखालीं कित्येक शूर, धीर, उदार व शहाणे मुत्सद्दी आणि राजकरणचतुर पुरुष विराजमान झाले. शिवाजीस दाद न देतां ह्यानें मोगलांस घाबरें केलें. कर्नाटक व चंदीसारखीं अफाट राज्यें खालसा करून घेतलीं. तरी ह्याच्याच १९ वर्षांच्या कारकिर्दीत आदिलशाहीचा कीर्तिसूर्य अस्ताचलाप्रत जाऊं लागला. त्याचाच अनुगामी सिकंदर आदिलशहा ह्यास, अवघीं दहा वर्षें बाळपणांत राज्योपभोग घेऊन, एवढें अफाट, श्रीमान, बलाढ्य, मजबूद, व शोभिवंत राज्य औरंगजेब बादशहाच्या हवालीं करून, पदरीं असलेलें द्रव्य व जडजवाहीर खंदकांत ओतीत व दानधर्म करीत औरंगजेबाच्या तंबूंत जावें लागानें, आणि दांतीं तृण धरून कीर्तिसूर्यास अस्ताचलीं पोंचविण्याचा प्रसंग यावा ही केवढी दुःखाची गोष्ट!!! तस्मात् ‘ भवितव्यता बलीयसी ’ हेंच म्हणणें खरें. मानवी प्राण्यानें ऐश्वर्यमदानें धुंद होऊन जाऊं नये; व सर्व शक्तिमान् परमेश्वराच्या अप्रतिहत इच्छेवर भरंवसा ठेवून, इहपरहित संपादण्यांत स्वशक्तीचा व्यय करावा, हें सत्तत्त्व त्या वैभवोत्तुंग शिखरास पोंचून प्रस्तुत जीर्णावस्थेस आलेल्या आदिलशाही राजधानीचें प्रत्यक्ष दर्शन घेणारांच्या व तिचा इतिहास वाचणारांच्या मनांत ठसल्यावांचून राहवयाचें नाहीं.

प्रकरण पंधरावें.

गोवळकोंड्याची कुत्बशाही.

सन १२१५–१६८७.

१. कुत्बशाही, प्रस्ताव, (१५१२–१६८७.) २. कुली कुत्बशहा, (१५१२–१५४३.)
३. जमशीद कुत्बशहा, (१५४३–५०.) ४. इब्राहीम कुत्बशहा, (१५५०–१५८०.)
५. महंमद कुली कुत्बशहा, (१६११.) ६. अब्दुल्ला हुसेन कुत्बशहा, (१६११–५८)
७. अबू हुसन कुत्बशहा, (स. १६५८–१६८७.)

१. गोवळकोंड्याची कुत्बशाही–प्रस्ताव, (१५१२–१६८७).— कलबुर्गा येथें बहामनी राज्याची स्थापना झाल्यावर त्याचा विस्तार हळू हळू पूर्वेकडे होत चालला. त्या बाजूस वरंगळचें हिंदु राज्य होतें. तें सन १४२३ सालीं बहामनी राजा अहंमदशहा वली ह्यानें जिंकिलें. वरंगळच्या राज्याच्या पूर्वबाजूस ओढयाप्रांताचें हिंदु राज्य होतें. आरंभीं ह्या राज्याची बहामनी राजांस फारशी माहिती नव्हती. तेथें समुद्रकांठ असून जमीन फार सुपीक होती. महाराष्ट्रदेश व ओढयाप्रांत यांजमध्यें एक पर्वताची रांग असून, तिचे माथ्यावर निबिड अरण्यें होतीं. त्या अरण्यांत राहणारे रानटी लोक हिंदु व मुसलमान ह्या दोघांसही फारसे माहीत नव्हते. सन १४७७ सालीं बहामनी राजांनीं उत्तरेस थेट राजमहेंद्रीजवळील समुद्रकांठापर्यंत, व दक्षिणेस कृष्णानदीपर्यंत प्रवेश केला. हा दक्षिणचा प्रदेश त्यांनीं नरसिंहराय नांवाच्या हिंदु राजापासून जिंकून घेतला. त्या प्रदेशांत पाळेगार वगैरे पुष्कळ लहान लहान स्वतंत्र राजे होते; आणि त्यांजवर विजयनगर वगैरे आसपासच्या राजांचा थोडाबहुत ताबा होता. तरी मुसलमानांचा अंमल कृष्णेच्या पलीकडे गेला नव्हता. महंमूदशहा बहामनीनें कांची किंवा कांचीवरं ह्या शहरावर सन १४७९ सालीं स्वारी केली, तरी त्यामुळें त्याच्या राज्यांत विशेष भर पडली नाहीं. बहामनी राज्याचा पूर्वेकडील मुलूख गोवळकोंड्याच्या सुभ्याखालीं मोडत असे. हा प्रांत विस्तृत व चांगला उत्पन्नाचा होता. प्राचीन काळच्या हिंदु राजांनीं ह्या प्रदेशांत पुष्कळ कालवे वगैरे बांधून शेतकीसाठीं पाण्याची सोय चांगली केली होती; आणि पुढें

वरंगळच्या आंध्र राजांनीं व इतर राज्यकर्त्यांनीं पूर्वीची कामें दुरुस्त ठेविलीं होतीं. ह्या सुपीक प्रांतावर वजीर महंमद गवान ह्यानें कुली-कुत्ब-उल्मुल्क् ह्या नांवाचा सुभेदार नेमिला.

२. कुली कुत्ब्शहा, (स. १५१२–१५४३).—कुली हा इराणांतील एका प्रमुख कुळांत जन्मला होता. लहानपणासून तो मोठा हुशार व चलाख असे. तो इराणांतून हिंदुस्थानांत आला, तेव्हां त्यास बहामनी सुलतान महंमदशहा ह्यानें आश्रय दिला. एका प्रसंगीं त्यानें शहाचा बचाव केल्यामुळें त्याजवर शहाची मर्जी बसली. बहामनी राज्याचे इतर सर्व सुभेदार स्वतंत्र होईपर्यंत, त्यानें आपली ताबेदारी उत्तम प्रकारें बजाविली. कासीम बेरीदचा अंमल त्यास सहन न होऊन, सन १५१२ सालीं गोवळकोंडा येथें शहा ही पदवी घेऊन तो स्वतंत्रतेनें राज्यकारभार करूं लागला.

कुली हा मोठा पराक्रमी पुरुष होता. त्यानें पुष्कळ वर्षे पराक्रमानें व शहाणपणानें राज्य करून, आपल्या मुलखाचा विस्तार केला. गोवळकोंडा हें प्रथम एक लहानसें खेडें होतें, तें त्यानें मजबूद बांधून लष्करी ठाणें केलें. पूर्वतैलंगणप्रांत त्यानें हळूहळू जिंकून, आपले राज्याची सीमा समुद्रास मिळविली. एवढ्या प्रदेशांत ६०।७० किल्ले त्यानें हस्तगत केले, आणि सर्व प्रांतांत मुसलमानी धर्म चालू केला. त्यामुळें सर्व हिंदु राजे एकत्र होऊन मुसलमानांस मागें हटविण्याची पराकाष्ठा करूं लागले, पण त्यांत त्यांस यश आलें नाहीं. कमामेतचा राजा सीतापति, कंडापिलीचा राजा रामचंद्रदेव, व ओढ्या प्रांतांतील विडियाद्रि व हरिश्चंद्र, हे राजे कुलीबरोबर लढण्यांत प्रमुख होते. विजयनगरचा राजा कृष्णराय व त्याचा जांवई शिवराय ह्यांचाही कुलीनें पराभव केला. त्याचप्रमाणें बेरीदशहा व आदिलशहा यांच्याशीं त्यानें अनेक झगडे केले. सन १५३४ त त्यानें केविलकोंड्यास वेढा घातला असतां, त्याच्या तोंडावर एक जबरदस्त जखम लागून तो अगदीं कुरूप झाला. आपल्या कारकिर्दीचीं शेवटचीं कांहीं वर्षे त्यानें राज्यकारभारांत घालविलीं. गोवळकोंड्यास एक भव्य व शोभिवंत मशीद बांधण्याचें काम त्यानें चालविलें. त्याचा मुलगा जमशीद यानें बंड केलें, म्हणून त्यास कुलीनें अटकेंत ठेविलें होतें. एके दिवशीं कुली हा वरील मशि-

दीची देखरेख करण्यासाठीं गेला असतां, शहाजादा जमशीद याच्या शिकवणीवरून शहरचा कोतवाल मीर महंमद हमदानी ह्यानें जंबिया खुपसून सुलतान कुली कुत्बूशहा याचा प्राण घेतला. त्या वेळीं त्याचें वय नव्वद वर्षांचें होतें. त्यानें साठ वर्षांतून १६ वर्षें बहामनी शहाच्या वतीनें व ४४ वर्षें स्वतंत्र रीतीनें कारभार केला. त्याचा वडील मुलगा कुत्बुद्दीन ह्याचे डोळे काढून जमशीदनें त्यास अंधारकोठडींत टाकिलें आणि स्वतः कुत्बूशाहीचें तख्त बळकाविलें.

३. जमशीद कुत्बूशहा, (स. १५४३–१५५०).—जमशीदचा कारभार फलद्रूप झाला नाहीं. विजापूरवर स्वारी करण्यासाठीं त्यानें बुऱ्हाण निजामशहास मदत केली. पण विजापूरचा सेनापति आसदखान यानें त्याचा चांगला पराभव केला. नंतर तो इतरांच्या भानगडींत विशेष पडला नाहीं. लहानमोठे पुष्कळ हिंदु राजे त्यानें आपल्या ताब्याखालीं आणिले. शेवटीं शेवटीं तो एकसारखा नानाप्रकारच्या विलासांत निमग्न राहूं लागला, आणि कांहीं भयंकर दुखणें येऊन स. १५५०त मरण पावला. सैफ् उल्-ल्मुल्क् व जगदेवराव ह्या नांवाचे दोन शूर सरदार त्याचे मदतगार असत. जमशीदच्या मरणानंतर त्याचा सात वर्षांचा मुलगा सुभान कुली ह्यास गादीवर बसवून, सैफ्खानानें कारभार चालविला; पण त्याचा अंमल सर्वांस दुःसह होऊन, जमशीदचा धाकटा भाऊ इब्राहीम विजयनगरच्या रामरायाकडे जाऊन राहिला होता, त्यास दरबारच्या मंडळीनें बोलावून आणून तख्तावर बसविलें.

४. इब्राहीम कुत्बूशहा, (स. १५५०–१५८०).—ह्या राजाची कार्कीर्द ऐतिहासिक दृष्ट्या स्मरणीय आहे. कारण, ह्या कार्कीर्दींत विजयनगरच्या बलाढ्य राज्याचा, व त्याबरोबरच हिंदूंच्या स्वातंत्र्याचा संपूर्ण नाश होऊन, मुसलमानांचा अंमल दक्षिणेंत चालू झाला. दुसरें कारण असें, कीं ह्या राजानें आपल्या मुलखावर अंमल करितांना प्रजेच्या सुखाकडे विशेष लक्ष पोंचविलें.

तख्तावर बसतांच हा चौकस रीतीनें सर्व कारभार पाहूं लागला. सभोंवारच्या राजांनीं त्यास अभिनंदनपर पत्रें पाठविलीं. विशेषतः हुसेन निजामशहाचा व ह्याचा चांगला स्नेह जमला. इब्राहीमचा पुष्कळ काळ-

पर्यंत विजयनगरच्या रामरायानें सांभाळ केला असल्यामुळें, रामरायाचे त्याजवर उपकार झाले होते. रामरायाचा व विजापूरच्या आदिलशहाचा स्नेह होता. त्या वेळीं आसपासच्या सर्व राजांचा एकमेकांशीं स्नेहभाव असल्यामुळें विनाकारण एकानें दुसऱ्यावर शस्त्र धरिल्यास इतर राजे त्याचा निषेध करीत. असें एक उदाहरण ह्या वेळीं घडलें. निजामशहाशीं सख्य करून इब्राहीमनें बेरीदशाही बुडविण्याचा यत्न चालविला. त्या वेळीं विजयनगरच्या राजानें पुढील पत्र इब्राहिमास लिहिलें. ‘ विजापूर व अहंमदनर येथील राजे हे आज पुष्कळ दिवस एकमेकांशीं झगडत आहेत, हें आपणास ठाऊक आहेच. ह्या झगडयांत दोघांची बरोबरी इतकी दिसून आली आहे, कीं एकसारखे लढत असतां कोणासही कांहीं फायदा झाला नाहीं. परंतु हल्लीं आम्हांस असें कळलें आहे, कीं आपले वडील ह्या तंटयापासून अगदीं अलिप्त राहिले असून, आपण विजापूरच्या राजाविरुद्ध निजामशहास मदत करण्यास तयार झालां आहां. इब्राहीम आदिलशहा हे आमचे दोस्त असून त्यांनीं आपणांस कोणत्याही तऱ्हेनें दुखविलें नाहीं. आपली व आमची दोस्तीही फार दिवस चालत आली असल्यामुळें, आपणापुढें ह्या गोष्टी मांडणें आम्हांस युक्त वाटतें. परापहरण करण्यासाठीं आपण जो कट केला आहे तो सोडून द्यावा, असें आमचें मागणें आहे. आपण आपलें सैन्य परत बोलावून दोहों पक्षांशीं सारखा स्नेह ठेवावा, म्हणजे त्या उभयतांमध्यें सलोखा होऊन हें फार दिवस चाललेलें युद्ध संपेल. ’

अशा प्रकारचे पत्रव्यवहार सोळाव्या शतकांत हिंदुस्थानांतील राजे एकमेकांशीं करीत असत. वरील पत्राचा उपयोग होऊन इब्राहीम कुत्बूशहानें रामरायाची भेट घेऊन सर्वांची एकी करून दिली. पुढें ऐनप्रसंगीं रामरायास इब्राहीम कुत्बूशहानें मदत करून त्याच्या भावांनीं केलेलें बंड मोडिलें.

ह्या कार्किर्दींत मराठ्यांचा उत्कर्ष पुष्कळ झाला असें दिसतें. इब्राहीम कुत्बूशहास राज्यपद मिळवून देण्याच्या कामीं जगदेवराव नामक सरदार फार उपयोगी पडला होता. त्याचे उपकार स्मरून शहानें त्यास आपला दिवाण केलें. त्याच्या हाताखालीं रायराव नांवाचा दुसरा एक हुशार सरदार होता. ह्या दोघांच्या वर्चस्वामुळें सर्व दरबारांत व

लष्करांत मराठ्यांचा भरणा पुष्कळ झाला. हें मुसलमान सरदारांस न रुचून, त्यांनीं जगदेवरावाविरुद्ध पुष्कळ तक्रारी शहाकडे केल्या. शहानें कांहीं दिवस तिकडे कानाडोळा केला. पण अखेरीस त्यानें रायरावास ठार मारिलें. तेव्हां जगदेवराव आपला बचाव करून गोवळकोंड्याहून निघाला, तो सर्व प्रांत उजाड पाडीत वऱ्हाडांत आला. त्यास कांहीं काळपर्यंत बुऱ्हाण निजामशहानें आश्रय दिला. पण त्यासही तो डोईजड झाला. सर्व मुलूख हस्तगत करून मुसलमानांस पादाक्रांत करण्याची जी इच्छा पुढें मराठ्यांस झाली, तिचीं पूर्वचिन्हें ह्या वेळेपासून दिसूं लागलीं होतीं. वऱ्हाडचे इमादशहास कांहीं त्रास न देतां जगदेवराव पुनः कुत्बशहाचे मुलखांत आला. त्याजबरोबर पुष्कळ दक्षणी पायदळ आणि आरबी, इराणी, व हबशी फौज होती. कुत्बशहानें मुस्तफाखानास जगदेवरावावर पाठविलें. युद्ध होऊन जगदेवाचा भाऊ व्यंकटराव पडला, आणि पुष्कळ लोक जखमी होऊन त्याचा पराभव झाला. नंतर जगदेवराव विजापूरच्या राजाकडे गेला. हुसेन निजामशहा व इब्राहीम कुत्बशहा यांनीं विजापूरच्या मुलखावर स्वारी केली असतां, विजापूरच्या राजानें रामरायाचें साहाय्य मागितलें. त्या वेळीं रामरायाचा भाऊ व्यंकटाद्रि व जगदेवराव हे एक झाले. त्यांनीं कुत्बशहा व निजामशहा यांच्या फौजेस जर्जर करून सोडिलें. जगदेवानें तर देशांतील नाईक लोकांच्या मदतीनें कुत्बशहाचे तैलंगणांतील बहुतेक किल्ले काबीज केले. जगदेवाची कुत्बशहास इतकी धास्ती पडली, कीं त्याचा पाडाव करण्याचा नाद सोडून देण्याविषयीं त्यानें आपला सरदार मुस्तफाखान यास हुकूम पाठविला, आणि हरयुक्तीनें जगदेवाशीं तह करण्यास सांगितलें. जगदेवानें गणपुरा व पानगल हे दोन किल्ले आपल्या ताब्यांत घेऊन मोठ्या शिताफीनें सर्व राजांचे तंटे मिटवून युद्ध बंद केलें. जगदेवरावाचें पुढें काय झालें, तें कळत नाहीं. त्यास नाईक लोकांची चांगली मदत होती.

सन १५६७त कुत्बशहानें पटापूर व राजकुंडी येथील राजा सीतापति व राजमहेंद्रीचा राजा विदियाद्रि, यांस जिंकिलें. या कामीं रिफतखान नामक मुसलमान सरदार कुत्बशहानें योजिला. ओढ्याप्रांतांतील वेलप राजा व चंदुरबारचे नरसिंह व सुरसिंह, ह्या राजांस जिंकून त्यांपासून

खंडणी घेण्याचें रिफतखानानें ठरविलें. कंडूदेवपल्ली येथें वैजनाथदेव नांवाचा हिंदु राजा होता. त्याचा पराभव होऊन तो खंडणी देण्यास कबूल झाला. ह्या सर्व हकीकतींवरून हिंदु राजांचा कसकसा नाश होत गेला हें स्पष्ट कळून येईल.

पुढें सर्व मुसलमान राजांचीं आपापसांत युद्धें सुरू झालीं. विजापूरच्या सैन्यांत पुष्कळ मराठे सरदार असत, आणि ते हरहंमेश कुत्बशाहीच्या मुलखास उपद्रव देत. परंतु इब्राहीमशहाच्या चांगल्या शिस्तीमुळें इतर मुसलमानी राजांचें त्याजपुढें कांहीं चाललें नाहीं. पुनः हिंदु राजांवर कुत्बशहानें शस्त्र धरिलें. कारण विजयनगरचे अवशेष म्हणून जे कित्येक सरदार राहिले होते, ते शहास वेळेवर खंडणी पोंचवीत नसत. पण मुसलमानी फौजेपुढें कोणाचाच टिकाव लागला नाहीं. इब्राहीम कुत्ब्शहाच्या लढाया विशेषेंकरून विजापूर, मराठे व दाक्षिणदेशचे हिंदु राजे यांजबरोबर झाल्या.

या कार्किर्दीच्या अखेरीस मुराररराव नामक एक ब्राह्मण कुत्ब्शहाचा दिवाण होता. हा सर्व राज्यांत अग्रगण्य झाला होता. ह्या मुराररावानें दक्षिणेंतील हिंदूंचीं देवस्थानें फोडून गोवळकोंडयास लूट आणिली असें म्हणतात. ही गोष्ट शहास पसंत पडली नाहीं. पुढें त्याची प्रकृति बिघडली, आणि तो सन १५८०त आपल्या वयाच्या ५१ वे वर्षी मरण पावला. त्यास एकंदर ३० मुलें झालीं, त्यांतून ६ मुलगे व १३ मुली त्याच्या मरणसमयीं जिवंत होत्या.

इब्राहीम कुत्ब्शहास लढाईंत कधींही अपजय आला नाहीं. मोहिमेवर असतांना सुद्धां तो कायदे करण्यासंबंधानें विद्वानांशीं संभाषण करी. त्याच्या राज्यांत सर्वोत्कृष्ट बंदोबस्त होता. गोवळकोंड्याहून कोणत्याही दिशेस एखाद्या दुर्बळ बाईनेंही सोन्याचें भांडें डोकीवर घेऊन जावें. प्रसिद्ध तैलंगी चोरांवर तर त्यानें विलक्षण वचक बसविला. त्याच्या राज्यविस्तारांत कासीमकोंडा, राजमहेंद्री, कोंडबीड हे प्रदेश मुख्य होते. त्यानें अनेक सुंदर व भव्य इमारती बांधिल्या. गोवळकोंड्याची तटबंदी, इब्राहीमबाग, फुलबाग, भिक्षागृहें, इब्राहीमपत्तनचा तलाव, हुसेनसागर तलाव, बडवळ येथील बांध आणि पुष्कळ मशिदी व

पाठशाळा इब्राहीमच्या कार्किर्दीत तयार होऊन त्याच्या राज्याची कीर्ति चहूंकडे पसरली. गोवळकोंडयास व्यापाराची भरभराट होऊन आरबस्तान, इराण, तुर्कस्तान वगैरे अनेक देशांतील व्यापारी इकडील माल खरेदी करून बाहेर नेत. तसेंच परदेशांतील पाहिजे ती चीज गोवळकोंडयास मिळे. ह्या कार्किर्दीत प्रजेची दाद जितकी लागत असे, तितकी लवकर दुसऱ्या कोणत्याही मुसलमानी राजाच्या कार्किर्दीत दुसऱ्या कोठें लागत नसे. न्यायान्यायाच्या कामीं शहा अत्यंत दक्ष असे. अधिकारमदानें धुंद न होतां परमेश्वरानें हवालीं केलेल्या लक्षावधि लोकांच्या हिताकडे तो चांगलें लक्ष पुरवी. अन्यायाचरण करीत नसे.

५. महंमद कुली कुत्बशहा, (सन १५८०–१६११).—महंमद हा इब्राहीमचा तिसरा मुलगा. प्रथमारंभींच हिंदु राजांबरोबर त्यास लढाई चालवावी लागली. विजयनगरच्या वंशजांनीं आतां पेनकोंडयास जाऊन आपल्या राज्याची स्थापना केली होती. तें राज्य बुडविण्याचे पुष्कळ यत्न महंमद कुलीनें केले. पण एकंदरींत त्यास विशेष यश आलें नाहीं. विजापूरच्या राजाचें महंमदाच्या बहिणीशीं मोठ्या थाटानें लग्न होऊन, ह्या दोघां मुसलमानी राजांचें आजवर एकमेकांशीं असलेलें वैर मिटलें.

अलीकडे गोवळकोंड्याची वस्ती फार दाट होऊन हवा खराब झाली होती, आणि शहरास पाण्याचा पुरवठा केलेला नव्हता. तेथून पांच कोसांवर मुशी नदीच्या कांठीं एक स्थळ पाहून सन १५८९ त महंमदशहानें एका नवीन शहराची स्थापना केली. ह्या राजाची भागावती नामक एक आवडती बायको होती. तिच्या स्मरणार्थ ह्या शहरास त्यानें भागानगरी असें नांव दिलें. महंमदाचा पुत्र हैदर ह्याच्या नांवावरून त्याच शहरास पुढें हैदराबाद असें नांव पडलें. आरंभींच सरळ व रुंद रस्ते आंखून नंतर महंमदशहानें तेथें सुरेख घरें बांधिलीं. रस्त्यांच्या दुतर्फा झाडांच्या रांगा लाविल्या. गोवळकोंड्याचे वर नदीस बांध घालून नळानें भागानगरांत पाणी आणून खेळविलें. तेव्हांपासून त्या शहरीं पाण्याचा पुरवठा उत्तम होऊन अद्यापि तसाच चालत आहे. पुष्कळ भव्य इमारतींनीं तें शहर शोभिवंत दिसूं लागलें. जुम्मा मशीद, चारमिनार, खेरीज पुष्कळ वाडे, दवाखाने, हमामखाने, पाठशाळा व भिक्षागृहें हीं त्याच्याच वेळीं ह्या नवीन शहरीं बांधली गेलीं, तीं आज

तागाईत चांगल्या स्थितींत आहेत. दवाखाने व हमामखाने चालण्यासाठीं शहानें मोठमोठ्या नेमणुका करून दिल्या. शहाचा कित्ता दरबाऱ्या लोकांनींही उचलिला. त्यास बागबगिच्यांची पुष्कळ आवड होती; आणि सर्वांनीं चढाओढीनें पुष्कळ उपवनें तयार केलीं. वस्ती वाढल्यामुळें शहराच्या जागेस किंमतही भारी पडूं लागली. एकंदरीत महंमदशहाची कारकीर्द चांगली झाली. हिंदूंशीं कित्येक युद्धें झालीं, पण स्वतः होऊन शहानें कधीं कोणाची कुरापत काढिली नाहीं. राजधानींत राहून लोकसुखाची वृद्धि करण्यांत त्यानें आपला कालक्षेप केला. सर्व राज्यांत शेतकीकरितां त्यानें पाण्याची सोय केली. राजधानींतचसें काय, पण सर्व राज्यांत मशिदी, वाडे वगैरे इमारती इतक्या तयार झाल्या, कीं दक्षिणेंतील कोणत्याही मुसलमानी राज्याच्या कार्किर्दींत तशा झाल्या नाहींत.

ह्या कार्किर्दींत अनेक हिंदु राजे व सरदार यांजबरोबर महंमद कुलीची फौज लढत होती. पण कृष्णानदीच्या पलीकडे महंमदशहाचा अंमल फारसा गेला नाहीं. इराणच्या शहाकडून भागानगरास एक वकील राहत असे; आणि इकडचा वकील इराणांत राहत असे. सन १६०७ ह्या वर्षीं शहरांत मोठा दंगा झाला. त्यास परदेशी व दक्षणी लोकांचें भांडण कारण होतें. अमीर उल्मुल्क् किंवा मीर जुम्ला हा शहाचा पुष्कळ दिवस दिवाण होता. हा फार हुशार व पराक्रमी होता. हा पूर्वीं जवाहिऱ्या होता.

सन १६११ त महंमदशहा एकाएकीं आजारी पडून मरण पावला. त्या वेळीं त्याचें वय ४९ वर्षांचें असून त्यानें ३४ वर्षें राज्य केलें होतें. त्याच्या कार्किर्दींत एकंदर ७८ लाख होन लोकोपयोगी कामांकडे खर्च झाले. दरसाल ६० हजार होनांचा भिकाऱ्यांस धर्म होत असे.

६. अब्दुल्ला हुसेन कुत्बशहा, (सन १६११–१६५८).—हा महंमद कुली कुत्बशहाचा पुत्र. ह्यानेंही पुष्कळ दिवस शांततेनें राज्य केलें. जहांगीरचा पुत्र शहाजहान ह्यानें अहंमदनगरचें राज्य बुडविलें, आणि विजापूरचे राजापासून खंडणी घेण्याचा ठराव केला. तेव्हांच अब्दुल्ला कुत्बशहानेंही त्यास खंडणी देण्याचें कबूल केल्यामुळें शहाजहानशीं त्याचा

स्नेह कायम राहिला. अब्दुल्लाचा मुख्य वजीर मीर जुम्ला हा होता. त्याची प्रख्याति सर्व दक्षिणेंत झाली होती. राज्यकारभार हाकण्यांत तरबेज म्हणून जे मुत्सद्दी हिंदुस्थानांत नामांकित झाले, त्यांत मीर जुम्ला याचें नांव प्रसिद्ध आहे. औरंगजेब सन १६५३ त दक्षिणचा सुभेदार झाला, तेव्हांपासून मीर जुम्लानें त्याजशीं स्नेह संपादिला. मीर जुम्ला ह्याचा मुलगा महंमद अमीन हा वाईट चालीचा होता. मीर जुम्ला तैलंगणांत गेला असतां, कुत्बूशहास राग येण्याजोगें कृत्य अमीननें केल्यावरून शहानें त्यास कैद केलें. स्वारीहून परत आल्यावर मीर जुम्लानें आपल्या मुलास सोडविण्याविषयीं पुष्कळ खटपट केली, पण ती व्यर्थ गेली. तेव्हां मीर जुम्ला कुत्बूशहास सोडून औरंगजेबास जाऊन मिळाला. औरंगजेब तरी पहिल्यापासून मसलती असून परराज्यांत शिरकाव करण्यास टपला होता. मीर जुम्ला याच्या मुलास सोडण्याबद्दल औरंगजेबानें शहाजहानचा हुकूम आणून कुत्बूशहास पाठविला. या गोष्टीनें आपल्या स्वातंत्र्यावर घाला आला असें पाहून, कुत्बूशहास अधिकच क्रोध आला. त्यानें अहंमद अमीन याची कैद अधिक सक्तीची करून मीर जुम्लाची सर्व मालमत्ता हिरावून घेतली. त्यावरून शहाजहाननें कुत्बूशहाशीं युद्ध करण्याचा हुकूम औरंगजेबास पाठविला. त्याप्रमाणें औरंगजेबानें गोवळकोंड्यावर स्वारी केली, तेव्हां शहा अबदुल्ला मोगलांस शरण गेला, आणि मीर जुम्लाची मालमत्ता परत देऊन व त्याच्या मुलास मोकळें करून, मोगलांस सालीना एक कोट रुपये खंडणी देण्याचें त्यास कबूल करावें लागलें. ह्या वेळेपासून कुत्बूशहा मोगलांचा ताबेदार झाला. त्यानें मरेपर्यंत मोगलांस नियमानें खंडणी दिली. त्यास सोडून मीर जुम्ला मोगलांच्या चाकरीस राहिला; आणि औरंगजेबानें राज्यप्राप्तीविषयीं जे पुढें विश्वासघाताचे अनेक उद्योग केले, त्यांत त्यास ह्या मीर जुम्लाचीच मुख्यतः मदत होती. औरंगजेबास दिल्लीपद प्राप्त झालें, त्याच वर्षी अब्दुल्ला कुत्बूशहा मरण पावला.

७. अबू हसन कुत्बूशहा, (सन १६५८-१६८७).—हा अब्दुल्लाचा जांवई त्याच्या पश्चात् गोवळकोंड्याच्या तख्तावर बसला. हा आळशी व विलासी होता. तरी राज्य चांगलें चालवून रयतेस सुख देण्याचे कामीं तो नेहमीं तत्पर असे, त्यामुळें त्याजवर लोकांची प्रीति होती.

त्यानें मदनपंत नामक एका ब्राह्मणास आपली वजिरी दिली. मदनपंतानें महसुलाचा व इतर बाबतींचा बंदोबस्त फार चांगला ठेविला. शहाचा त्याजवर पूर्ण विश्वास असे. त्याच्या विरुद्ध मुसलमानांनीं केलेल्या कागाळ्या शहा ऐकत नसे. त्या मंडळींत शहाचा सेनापति सामील होता. त्यास मदनपंताचें दरबारांतलें वजन सहन होईना. इकडे स. १६८३त औरंगजेबानें दक्षिणेवर स्वारी केली, त्या वेळीं संभाजी भोसले याजबरोबर कुत्बशहानें परस्परांच्या बचावाचा एक तह केला. त्याजवरून औरंगजेबास राग येऊन, त्यानें आपला मुलगा मुअज्जम व खानजहान यांजबरोबर गोवळकोंड्यावर फौज पाठविली. ही फौज आली, तेव्हां सेनापति इब्राहीमखान विश्वासघात करून मोगलांस जाऊन मिळाला. त्या वेळीं शहरांत जी गडबड झाली तींत मदनपंत मारला गेला. अबू हसननें दोन कोट रुपये खंडणी व पुष्कळ द्रव्य देऊन मोगलांशीं तह केला, (स. १६८६). पण हा तह फार दिवस टिकला नाहीं. विजापूरचें राज्य रसातळास गेल्यावर औरंगजेब हा जिसुदुराज साधूच्या कबरेचें दर्शन घेण्यासाठीं म्हणून कलबुर्ग्यास जाण्यास निघाला. बिचारा अबू हसन औरंगजेबाची मर्जी प्रसन्न करण्यासाठीं नानातऱ्हा करीत होता. नजीक आल्यावर औरंगजेबानें कुत्बशहास कळविलें, कीं 'तुम्हीं ब्राह्मण दिवाण नेमिला, परधर्मी संभाजी राजाशीं दोस्ती केली, आणि स्वतः बदफैली वर्तन सुरू ठेविलें, म्हणून आम्ही तुम्हांशीं लढाई करणार.' कुत्बशहाचे कामदार औरंगजेबानें फितूर केले; आणि गोवळकोंड्यास वेढा घातला. सात महिने कुत्बशहानें टिकाव धरिला. पुढें सन १६८७त औरंगजेबानें अबू हसनास पदच्युत करून दौलताबादच्या किल्ल्यावर ठेविलें, आणि त्याचें सर्व राज्य खालसा करून आपल्या राज्यास जोडिलें. अबू हसनासाठीं त्याची प्रजा फार हळहळली. त्याच्या सैन्याच्या व शौर्याच्या शेंकडो गोष्टी लोकांच्या तोंडीं अद्यापि त्या प्रांतीं ऐकूं येतात. त्यास कवितेचा मोठा नाद होता.

येणेंप्रमाणें कुत्बशाही घराण्याची समाप्ति झाली. या घराण्यानें इ. स. १५१२ पासून सन १६८७ पर्यंत, फक्त सहा सुलतानांनीं, १७५ वर्षें गोवळकोंड्यास राज्य केलें. त्यांनीं बांधिलेल्या इमारती व केलेलीं इतर सार्वजनिक कामें अजून मामें राहिलीं आहेत; तीं त्यांच्या वैभवाची साक्ष

हल्लीं देतात. बहामनी राज्य किंवा त्याच्या शाखा यांजमध्यें जे एकंदर राजे झाले, त्यांत कुत्ब्शाही घराण्यांतील राजे सर्व चांगले व रयतेच्या सुखाची काळजी बाळगणारे असे होते. तसेंच प्रत्येकानें पुष्कळ दिवस राज्यपद भोगिलें. दंगेधोपे, मारामाऱ्या व खून हे त्यांच्या वेळेस फारसे झाले नाहींत. सहा पिढ्यांपर्यंत एकसारखे एका घराण्यांतील सहा पुरुष सर्व चांगले कर्तृत्ववान व पुष्कळ वर्षे राज्य करणारे असे निघाल्याचें, कुत्ब्शाहीसारखें उदाहरण इतिहासांत अत्यंत दुर्मिळ होय.

येथें बहामनी राज्य व त्याच्या शाखा यांचा इतिहास संपला. महाराष्ट्रांत कोठेंही गेलें तरी ह्या राज्याच्या खुणा अद्यापि दृष्टीस पडतात. मुसलमानांस इमारतींची आवड विशेष; तिचे परिणाम ठिकठिकाणीं दिसून येतात. विजापूरच्या इमारती प्रत्येकानें एकवार तरी पाहण्या लायक आहेत. त्या बांधणारांचें कसब पाहून मोठमोठे पाश्चात्य एंजिनियर्सही थक्क होतात. अहंमदनगर, गोवळकोंडा, व कलबुर्गा येथेंही प्रेक्षणीय इमारती आहेत. महाराष्ट्रांतील मुसलमानांची बहुतेक लोकसंख्या बहामनी राज्याच्या वेळची असून, त्या वेळचीं अनेक घराणीं ठिकठिकाणीं हयात आहेत. हिंदूंचीं मात्र पुरातन व पिढीजाद घराणीं फारच थोडीं राहिलीं आहेत. ह्या काळांत हिंदुधर्माची व समाजाची अवनतीच होत होती.

बहामनी राज्यें जरी मुसलमानी होतीं, तरी त्यांत बहुतेक हिंदूंचेंच वजन ज्यास्त होतें. उत्तरेंत जसा देवालयांचा व हिंदु चालीरीतींचा विध्वंस झाला, तसा दक्षिणेंत होऊं शकला नाहीं. उलट पक्षीं हिंदूंच्याच तंत्रानें येथें त्यांस वागावें लागलें. ही स्वराज्याची इच्छा दक्षिणेंत विशेष प्रबल असल्यामुळें, मुसलमानी राज्यास अटकाव करण्याच्या हेतूनें विजयनगरास, बहामनी राज्याच्या समकालीन, एक नवीन हिंदु राज्य स्थापन झालें. ह्या विजयनगरचा इतिहास बहामनी राज्याच्या इतिहासांत अतिशय गुंतलेला आहे. ह्या कारणास्तव, हिंदुस्थानच्या इतर भागांतील मुसलमानी राज्यांचे इतिहास देण्यापूर्वी, विजयनगरचाच इतिहास प्रथम पुढील प्रकरणीं दिला पाहिजे.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

प्रकरण सोळावें.

विजयनगरचा इतिहास.*

स. १३३६–१५६५.

१. विजयनगरचें महत्त्व.
२. विजयनगरची उत्पत्ति, (स. १३३६).
३. पहिला वंश, (स. १३४४–१४९०).
४. दुसरा वंश, (स. १४९०–१५६७).
५. तिसरा वंश, रामरायाचा उदय.
६. तालिकोटची लढाई, (जानेवारी, १५६५).
७. ह्या लढाईचे भयंकर परिणाम.
८. या हिंदु राज्याचें सिंहावलोकन.
(क) माधवाचार्यांची अपूर्व योजना.
(ख) नीतिमत्तेचा अभाव.
(ग) संपत्तीची विपुलता.
(घ) प्रवाश्यांच्या हकीकती.
९. दक्षिणच्या इतिहासाचें समालोचन.

१. विजयनगरचें महत्त्व.–दक्षिणदेशाचा मध्यकालीन इतिहास विजयनगरची हकीकत दिल्याशिवाय पूर्ण होत नाहीं. उत्तरेकडच्या भागांत मुसलमान लोक आपला अंमल बसवीत असतां, दाक्षिणद्वीपकल्पांत विजयनगरचें प्रबळ हिंदु राज्य हयात होतें. माधवाचार्य, अप्पय्या दीक्षित वगैरे मोठमोठे मध्यकालीन पंडित ह्याच राज्यांत उदयास आले. हिंदूंच्या उत्कर्षास त्या वेळेस याखेरीज अन्यत्र योग्य जागा नव्हती. ह्या राज्याचा विस्तार कन्याकुमारीपासून जवळ जवळ बेळगांवपर्यंत होता. राज्य स्थापन झाल्यापासून ह्या हिंदु राजांशीं मुसलमानांचीं युद्धें अव्याहत चाललीं होतीं. ह्या राज्याचा समग्र इतिहास उपलब्ध नाहीं; पण शिलालेखांवरून वगैरे थोडी बहुत माहिती अलीकडे उपलब्ध झाली आहे.

विजयनगरचा इतिहास अनेक दृष्टींनीं मनोरंजक आहे. सन १५६५त तालिकोटच्या लढाईत विजयनगरचा पाडाव झाला; आणि त्याबरोबरच विजयनगरचा इतिहास पण संपला. त्या इतिहासाचें नांवही राहिलें नव्हतें; पण अलीकडे अनेक शोधक विद्वानांच्या प्रयत्नांनीं

---

* आधारभूत ग्रंथ. Robert Sewell's Forgotten Empire; B. Surya Narain Row's The never to be Forgotten Empire; &c. &c.

विजयनगरचा बराच इतिहास बाहेर आला आहे. हिंदूंनीं मुसलमानांच्या विरुद्ध टिकाव धरण्याचे कित्येक प्रयत्न केले, त्यांचा उल्लेख वर ठिकठिकाणीं आलाच आहे. त्यांचपैकीं देवगिरीचे यादव आणि विजयनगरचे राय ह्यांचे प्रयत्न होत. देवगिरीच्या यादवांचा इतिहास मराठी रियासतींत दिला आहे. पण विजयनगरचा इतिहास येथेंच देणें विहित आहे. हिंदूंच्या पाडावाची व मुसलमानांच्या उत्कर्षाची येथवर केलेली चर्चा विजयनगरच्या उदाहरणासही लागू पडत असल्याचें दिसून येईल. विजयनगरचा इतिहास जितका मनोवेधक तितका हृदयद्रावकही आहे; आणि कष्टमय परिस्थितींत राष्ट्राचे डोळे उघडण्यास त्याचा थोडाबहुत उपयोग होईल.

तेराव्या शतकाच्या अखेरीस मुसलमानांनीं नर्मदा नदी ओलांडून दक्षिणेंत प्रथम प्रवेश केला. सन १२९३, स. १३०६ व सन १३१८ ह्या तीन सालच्या स्वाऱ्यांत त्यांनीं देवगिरीच्या यादवांचा निःपात केला. सन १३०९ सालीं मलीक काफूरनें तेलंगणांतील वरंगळचें राज्य आणि इ. सन १३१०त म्हैसुरांतील होयसळवल्लाळांची द्वारसमुद्र राजधानी बुडविली. सन १३२६त वरंगळचा कायमचा पाडाव झाला. येणेंप्रमाणें तेराव्या शतकाच्या पहिल्या पंचविशींत सर्व हिंदुस्थान मुसलमानमय झालें. जिकडे तिकडे हिंदूंचा पाडाव झाला. हिंदूंस वर डोकें काढण्याची कांहीं आशा राहिली नाहीं. पुरातन राज्यें लयास गेलीं. मोठमोठीं मंदिरें जमीनदोस्त झालीं. अपार संपत्ति दक्षिणेंतून उत्तरेंत चालून गेली; आणि दक्षिणच्या लोकांस प्राणांहून प्रिय जो धर्म तो साफ बुडण्याचा समय प्राप्त झाला. अशा संकटसमयीं सन १३४४ त एकाएकीं मुसलमानांच्या तीव्र शक्तीस एकदम मोठा अडथळा झाला; आणि पुढें अडीचशें वर्षें पर्यंत हिंदूंनीं आपलें डोकें पुनरपि वर काढून, देश जिंकण्याचा मुसलमानांचा उद्योग पुढें चालूं दिला नाहीं.

विजयनगर हें शहर तुंगभद्रेच्या दक्षिणतीरावर असून, उत्तरतीरावर अनागोंदी हें शहर होतें. त्या ठिकाणीं हल्लीं पुरातन काळचीं अनेक देवळें आहेत. वालीची किष्किंधा नगरी येथेंच होती असें म्हणतात. आरंभीं जे युरोपियन लोक येथें आले, त्यांनीं ह्या राज्यास नरसिंहरायाचें राज्य, आणि देशास नरसिंहदेश असें नांव दिलें. विजयनगर हें फार

दाटवस्तीचें व विस्तीर्ण शहर असून, तेथें परदेशच्या सर्व मालाची देवघेव होत असे. ह्या राज्यांत कृष्णा व तुंगभद्रा ह्या दोन नद्यांच्या दक्षिणेकडील सर्व मुलखाचा व मलबार प्रांताचा समावेश होत होता.

२. विजयनगरची उत्पत्ति, (स. १३३६).—नकाशावर मुंबई-पासून मद्रासपर्यंत एक सरळ रेघा काढिली असतां तिच्या जवळ जवळ मध्य बिंदूवर तुंगभद्रा नदी येते. ही ईशान्यवाहिनी नदी कर्नूलच्या खालीं थोड्या अंतरावर कृष्णेस मिळते. मध्यंतरीं बल्लारीच्या वायव्येस सुमारें चाळीस मैलांवर ती नदी एका लहानशा खडकाळ प्रदेशांतून जाते. बल्लारीहून धारवाडास जाणाऱ्या आगगाडीच्या उत्तरभागीं हा प्रदेश आहे. वर सांगितलेल्या खडकाळ प्रदेशांत तुंगभद्रा नदीच्या उत्तरतीरावर अनागोंदी नांवाचें एक छोटेंसें तटबंदी केलेलें शहर होतें. ह्या ठिकाणीं एक लहानसा राजवंश बरेच दिवस राज्य करीत होता. पुष्कळ दिवस मेहेनत करून अनागोंदीचा किल्ला तेथील राजांनीं चांगला मजबूद केला होता. वर्षभर नदीचा प्रवाह जोरांत वाहत असल्यामुळें, खालीं वर लांब पर्यंत नदीस पायउतार नव्हता. वर्षाकालांत तर नदींत मोठमोठे धवधबे होऊन ती दुर्गम होते. अनागोंदीच्या राजवंशाची उत्पत्ति कोठून झाली, हें आज कळून येत नाहीं. पुष्कळ वर्षें ते द्वारसमुद्र येथील होयसळ बल्लाळांचे मांडलिक होते. फेरिस्ता म्हणतो, सन १३५० पूर्वीं सातशें वर्षें ह्या राजवंशाचा अंमल अनागोंदीस होता. हरि-हर व बुक्क असे दोन बंधु वरंगळच्या राजाचा पदरीं होते. सन १३२६ त वरंगळ पडल्यावर ते अनागोंदीच्या आश्रयास येऊन राहिले. तेथें एकास अनागोंदीची दिवाणगिरी व दुसऱ्यास खजीनदारी मिळून, त्यांचा लवकरच उदय झाला. सन १३३४ त दिल्लीचा सुलतान महंमद तुग्लख ह्याचा पुतण्या बहुद्दीन बंड करून दक्षिणेंत आला; त्यास अनागोंदीच्या राजानें आश्रय दिला; तेव्हां सुलतान महंमदानें अना-गोंदीवर स्वारी केली; आणि तें शहर काबीज करून, तेथें मलीक नांवाचा आपला एक कारभारी नेमिला. अशी व्यवस्था करून सुलतान परत गेला. अनागोंदीचा पाडाव झाल्यावर हरिहर व बुक्क ह्यांनीं अनागोंदीच्याच समोर तुंगभद्रेच्या दक्षिणतीरावर माधवाचार्य ऊर्फ विद्यारण्य ह्या विद्वान साधूच्या शिकवणीनें एक नवीन शहर स्थापिलें, आणि त्याचें नांव विजय-

नगर असें ठेविलें, (स. १३३५). अनागोंदी येथें पाडाव झालेले सरदार व लोक ह्या नवीन शहरांत येऊन राहिले, आणि तें लवकरच भरभराटीस आलें. इकडे मलीकच्या हातून अनागोंदीचा बंदोबस्त होईना, तेव्हां सुलतान महंमदनें हरिहर ह्यासच अनागोंदीचें राज्य देऊन, बुक्क ह्यास त्याची दिवाणगिरी दिली, (स. १३४४). अगोदरपासूनच हरिहर व बुक्क स्वतंत्र होण्याच्या तयारींत होते. त्यांनीं उत्तरेस व दक्षिणेस पुष्कळ मुलुख जिंकिला होता. सन १३४०त हरिहरानें बदामी येथें किल्ला बांधिला. हरिहर आपणास स्वतंत्र समजत नसे. तुघ्लख सुलतानाचा अंकित समजून, त्यानें राज्य केलें. सन १३४४त हरिहर मरण पावला. हल्लीं नदीच्या कांठीं हंपी म्हणून गांव आहे, त्याच ठिकाणीं विजयनगर शहराचे अवशेष दिसून येतात. हरिहरानें हंपी येथें सुंदर व भव्य मंदिर बांधिलें, तें अजून टिकलें आहे.

३. पहिलावंश, (स. १३४४–१४९०).—हरिहरनंतर त्याचा भाऊ बुक्क राज्यावर आला, (स. १३३४–१३७९). त्यानें छत्तीस वर्षें राज्य करून, विंध्याद्रिपासूनचें सर्व हिंदुस्थान आपल्या ताब्यांत आणिलें. मुसलमानांची लाट मागें हटविणारा पहिला पुरुष हाच होय. त्यानें अवशिष्ट हिंदु राजांचें एकीकरण केलें. सन १३४४त वरंगळच्या प्रतापरुद्राचा मुलगा कृष्ण नाईक विजयनगरास बुक्क ह्याजपाशीं येऊन राहिला. त्या दोघांनीं द्वारसमुद्र येथील बल्लाळ राजासही आपणाकडे आणिलें; तसेंच दक्षिणेंतील दुसऱ्या सर्व हिंदु राजांशीं मिलाफ करून, फौज जमविली, आणि मुसलमानांशीं युद्ध सुरू केलें, (वर पृ. १५८ पहा). दिल्लीच्या गंगू ब्राह्मणाजवळ हुसेनखान नांवाचा एक मुसलमान गृहस्थ होता, त्यास महंमद तुघ्लखनें हिंदूंच्या ह्या बंडाचा बंदोबस्त करण्याकरितां दक्षिणेंत पाठविलें. तेव्हां हुसेनखान व बुक्क ह्यांचे झगडे सुरू होऊन, दोघांनींही दक्षिणेंत स्वतंत्र राज्यें स्थापन केलीं: पहिलें मुसलमानांचें कलबुर्गा येथील बहामनी, आणि दुसरें विजयनगर येथील हिंदूंचें. ह्या दोन राज्यांमध्यें एकसारखे वैरभाव व युद्धप्रसंग चालू होते. ह्याच युद्धप्रसंगांनीं दोघांचे इतिहास भरलेले आहेत. बहामनी सुलतानांचा पाडाव करण्याकरितां बुक्कानें दिल्लीचा सुलतान फिरोजशहा ह्याची मदत मागितली. पण फिरोजशहाला राज्यविस्तार नको होता, म्हणून त्यानें

NATIONAL ARCHIVES OF INDIA

मदत पाठविली नाहीं. ही गोष्ट बहामनी सुलतानांच्या पथ्यावर पडली. म्हणूनच त्यांस कृष्णेपर्यंतचा प्रदेश सहज काबीज करितां आला. पुढें बहामनी सुलतान व विजयनगरचे राजे ह्यांचा खरा झगडा सन १३६५ त सुरू झाला; आणि त्याची समाप्ति सन १५६५ त तालिकोट येथें झाली. फेरिस्ता म्हणतो, मुसलमानांच्या अंगीं शौर्य व प्रखर तेज होतें, म्हणूनच विजयनगरच्या सत्तेपुढें त्यांचा निभाव लागला. बाकी शक्ति, संपत्ति व राज्यविस्तार ह्या गोष्टींत विजयनगरचें राज्य बहामनी राज्याहून फारच श्रेष्ठ होतें.

सन १३७९ त बुक्कराय मरण पावला. पश्चात् त्याची बायको गौरी हिच्या पोटीं जन्मलेला त्याचा मुलगा हरिहर (दुसरा) गादीवर बसला. त्यानें वीस वर्षें राज्य केलें, (स. १३७९–१३९९). हरिहरानें महाराजाधिराज ही पदवी धारण केली. त्यानें अनेक मंदिरें बांधून, त्यांस नेमणुका ठरवून दिल्या. माधवाचार्यांचा भाऊ सायण्णाचार्य हा हरिहराचा दिवाण होता. मुद्द, इरुग, गुंड ह्या नांवाचे हरिहराचे सेनापति होते. मल्लादेवी ऊर्फ मल्लांबिका नांवाची हरिहराची पट्टराणी होती. तो स्वतः शंकरभक्त असून, इतर पंथांचा द्वेष करीत नसे. हरिहराचे शिलालेख हिंदुस्थानच्या दक्षिण टोंकापर्यंत सांपडलेले आहेत; आणि त्यांवरूनच त्याचा इतिहास उपलब्ध झाला आहे. सन १३९९ त हरिहराचा मुलगा (दुसरा) बुक्क गादीवर बसला, (स. १३९९–१४०६). नंतर बुक्काचा भाऊ देवराय (पहिला) ह्यानें सन १४०६ पासून १४१२ पर्यंत राज्य केलें. हा देवराय विषयी होता. मुद्गल येथील एका हिंदु शेतकऱ्याच्या सुरूप मुलीचा त्यानें अभिलाष धरिल्यामुळें, बहामनी सुलतानाशीं युद्ध सुरू होऊन, विजयनगरचें राज्य त्याचे हातून जाण्याचा प्रसंग आला होता. अशा स्थितींत देवरायानें सुलतानास पुष्कळशी संपत्ति, बंकापूरचा किल्ला आणि आपली मुलगी देऊन, कसाबसा आपला बचाव करून घेतला. शेतकऱ्याच्या सुंदर मुलीनेंही सुलतानाच्या मुलाशीं लग्न केलें.

पहिला देवराय स. १४१२त मरण पावल्यावर त्याचा मुलगा वीरविजय ह्यानें स. १४१९ पर्यंत राज्य केलें. नंतर वीरविजयाचा वडील मुलगा दुसरा देवराय ह्यानें स. १४१९ पासून १४४४ पर्यंत राज्य केलें. त्या कारकिर्दींत बहामनी सुलतानांशीं रायाचें एकसारखें युद्ध सुरू होतें.

नागण्णा नांवाचा देवरायाचा एक दिवाण असून, त्यास 'धननायक' अशी पदवी होती. देवरायाच्या वेळेस विजयनगरची भरभराट कळसास पोंचली. देवराय मरण पावल्यावर सन १४४४ पासून १४४९ पर्यंत तिसरा देवराय नांवाचा एक राजा झाला असावा. पुढें देवरायाचे मुलगे मल्लिकार्जुन व विरूपाक्ष, आणि त्यांनंतर मल्लिकार्जुनाचे मुलगे राजशेखर व विरूपाक्ष इतक्या पुरुषांनीं मिळून स. १४४९ पासून स. १४८७ पर्यंत राज्य केलें. त्यांच्या कार्किर्दीचे सन अद्यापि निश्चित झालेले नाहींत. सन १४८७ च्या सुमारास राज्यक्रांति होऊन, नरसिंहराय नांवाच्या दुसऱ्या एका कुटुंबांतील पुरुषानें राज्यापहार केला; (स. १४९०). शेवटच्या चाळीस वर्षांत निकराचे युद्धप्रसंग फारसे झाले नाहींत. *बहामनी राज्यांतही अंतःकलह व घोटाळे माजले होते.* ह्याच वेळेस *बहामनी राज्याचा कारभार प्रसिद्ध वजीर महंमद गवान ह्याच्या* हातांत होता. येणेंप्रमाणें स. १३४४ पासून स. १४९० पर्यंत सुमारें दीडशें वर्षे ह्या पहिल्या राजवंशाकडे विजयनगरचें राज्य चाललें.

४. **दुसरा वंश,** (स. १४९०–१५६७), विरूपाक्षराय हा दुर्बल व दुर्वृत्त होता. त्याच्या वेळेस गोवा, चौल, दाभोळ वगैरे प्रांत मुसलमानांनीं काबीज केले. दरबारांत बंडें झालीं, त्यांत विरूपाक्ष व त्याचे मुलगे मारले गेले. त्याच्याच पदरीं शाल्ववंशी नरसिंहराय म्हणून एक शूर सरदार होता, त्यास दरबारच्या मंडळींनीं राज्यावर बसविलें. त्यास राज्यावर येण्यापूर्वी महामंडलेश्वर, मेदिनीश्वर वगैरे सेनापतीचे किताब होते. स. १४९५ तील एका शिलालेखांत त्यास महाराय अशी पदवी दिलेली आढळते, म्हणजे त्या वेळेस तो 'राजा' असला पाहिजे. नरसिंहरायास राज्य प्राप्त झाल्यापासून मुसलमानांच्या स्वाऱ्यांचा बराच बंदोबस्त झाला, आणि विजयनगरचा प्रभाव पूर्ववत् चमकूं लागला. ह्या वेळच्या इतिहासाचे मुख्य आधार फेरिस्ता, व पोर्तुगीझ लोकांनीं लिहिलेले वृत्तांत आहेत. त्यांच्यामध्यें पुष्कळ तफावत आहे. नरसिंहरायाच्या वंशांत खालील पुरुष राज्यावर बसले. नरसिंह व वीरनरसिंह (स० १४९०–१५०९); कृष्णदेवराय (१५०९–१५३०), अच्युतराय, (१५३०–४२) आणि सदाशिवराय, (१५४२–१५६७).

न्यूनिझ नांवाचा एक पोर्तुगीझ गृहस्थ अच्युतरायाच्या वेळेस विजयनगरांत राहत होता. त्यानें आपला वृत्तांत स.१५३५च्या सुमारास लिहिला आहे. मुसलमान इतिहासकार फेरिस्ता अहंमदनगरास निजामशहाच्या पदरीं राहत होता, त्याचा वृत्तांत स. १६०७ च्या पुढें लिहिलेला आहे. अर्थात फेरिस्त्यापेक्षां न्यूनिझचा वृत्तांत ज्यास्त विश्वसनीय आहे.

नरसिंहराय स. १४९० त राज्य करूं लागला, परंतु त्या पूर्वी ३०-४० वर्षे तो राज्याचा सर्व कारभार मुखत्यारीनें पाहत होता. स. १४९०च्या सुमारास बहामनी राज्याचे विभाग होऊन स्वतंत्र झालेले अंमलदार एकमेकांशीं झगडूं लागले. विजापूरच्या आदिलशहाचें व विजयनगरच्या राजांचें बहुतेक कायमचेंच युद्ध जुंपलें. बेदर येथें स्वतंत्र झालेला कासिम बेरीद ह्यानें यूसुफ् आदिलशहाची खोड मोडण्याकरितां नरसिंहरायाची मदत मागितली. नरसिंहरायानें आदिलशहावर स्वारी करून रायचूर व मुद्गल हीं दोन शहरें काबीज केलीं, (स. १४९३). नरसिंहरायानें राज्यास पुष्कळ बळकटी आणिली.

स. १५०९ त कृष्णदेवराय गादीवर बसला. विजयनगरच्या एकंदर राजांत ह्या कृष्णदेवाची कीर्ति फार मोठी आहे. एका पोर्तुगीझ गृहस्थानें त्याच्या दरबारीं राहून प्रत्यक्ष पाहिलेला वृत्तान्त लिहून ठेविला आहे. हरएक शारीरिक कसबांत कृष्णदेव प्रवीण होता. तसाच तो शूर व उदार होता. सर्व दक्षिणहिंदुस्थान त्याच्या ताब्यांत असून दुसरे पुष्कळ राजे त्यास करभार देत असत. त्याच्या कार्किर्दीत राज्याचा विस्तार फार झाला. प्रसिद्ध विद्वान् अप्पया दीक्षित कृष्णरायाचे पदरीं होता. हंपी येथील देवालयासमोर त्यानें बांधिलेले दोन मनोरे अद्यापि हयात आहेत. इंग्लंडचा राजा आठवा हेन्री हा त्याचा समकालीन असून अधिकार, ऐश्वर्य, स्वेच्छाचार इत्यादि बाबतींत दोघांचें बरेंच साम्य आहे. पोर्तुगीझ लोकांनीं आदिलशहापासून गोवें काबीज केलें, हें पाहून कृष्णरायास समाधान वाटलें. त्या वेळच्या विजयनगरच्या भरभराटीचें वर्णन अनेक पोर्तुगीझ गृहस्थांनीं केलें आहे. सर्व तेलंगणप्रांत त्यानें काबीज केला. कृष्णरायाच्या कार्किर्दीतील मोठी गोष्ट म्हणजे रायचूरची लढाई होय. रायचूर व मुद्गल हे परगणे कृष्णा व तुंगभद्रा यांच्या दुआबांत आहेत. या परगण्यांबद्दल मुसलमान व हिंदु यांचा नेहमीं वाद होता. स. १५२०च्या

NATIONAL ARCHIVES OF INDIA

मे महिन्यांत कृष्णदेवानें रायचूरवर स्वारी केली. त्याजबरोबर लढण्यास आदिलशहा मोठी फौज घेऊन आला. लढाई निकराची झाली. कृष्णदेवानें मोठ्या शिकस्तीनें मुसलमानांचा पराभव करून त्यांच्या सर्व फौजेचा फन्ना उडविला, आणि रायचूरचा किल्ला कावीज केला. ह्या विजयानें आदिलशहाची कंबर खचली आणि दक्षिणहिंदुस्थानांत आतां आपली धडगत नाहीं असें तेथील मुसलमानांस वाटूं लागलें. त्यामुळेंच ते सर्व मुसलमानांची एकी करण्याच्या उद्योगास लागले आणि तालिकोटचें अरिष्ट पुढें ओढवलें. इकडे विजयनगरचे लोक गर्वानें फुगून गेले आणि मुसलमानांस तुच्छ लेखूं लागले. ह्या गर्वाच्या योगानें त्यांना भावी संकटाचें भान राहिलें नाहीं. गोव्याच्या पोर्तुगीझ सत्तेचा अभ्युदयही *विजयनगरच्या भरभराटीवर अवलंबून होता, आणि विजयनगरच्याच व्यापारावर गोव्याची भरभराट अवलंबून होती.* विजयनगर पडल्याबरोबर *गोव्याच्या भरभराटीचाही अंत झाला.*

पराभव झाल्यावर कृष्णदेवानें आदिलशहाचा पुष्कळ अपमान केला, त्यामुळें मुसलमानांचीं मनें फार चिडून गेलीं. स. १५३०त कृष्णदेव वारला. कृष्णदेव राज्यावर असतांच दिल्लीस मोगलबादशाहीची स्थापना झाली. कृष्णदेवानें सन १५१३त कृष्णस्वामीचें मंदीर बांधिलें; हजाररामस्वामी नांवाचें दुसरें एक मंदीर सुरू केलें, आणि कित्येक मोठमोठे कालवे बांधून शेतीची सोय केली. विजयनगर येथें त्यानें मोठा तलाव बांधला. नागलादेवी नांवाची त्याची एक राणी होती, तिच्या स्मरणार्थ नागलापूर नांवाचा शहराचा एक नवीन भाग त्यानें विजयनगरास बांधिला. कृष्णस्वामीच्या देवळाजवळ नृसिंहाचा एक प्रचंड दगडी पुतळा हल्लीं दृष्टीस पडतो, तो त्यानेंच सन १५२८त कोरविला. तो संबंध एका दगडाचा कोरलेला असून सुमारें पंचवीस फूट उंच व १६।१७ फूट रुंद आहे. हल्लीं त्याचे हात वगैरे तुटलेले आहेत, ते मुसलमानांनीं विजयनगर काबीज केलें त्या वेळींच तोडले असावे. ह्या सर्व मंदिरांस त्यानें नेमणुका वगैरे करून दिलेल्या होत्या, असें उपलब्ध झालेल्या कृष्णदेवरायाच्या कोरींव लेखांवरून कळून येतें.

५. *तिसरा वंश, रामरायाचा उदय.*—रंगराय ऊर्फ तिम्मा किंवा तिमराज ह्या नांवाचा कृष्णरायाचा एक हुशार प्रधान होता. तिमराजानें विजापूरच्या आदिलशहाशीं पुष्कळ लढाया मारून विजयनगरची भर-

भराट केली. कृष्णदेवरायानंतर त्याचा भाऊ अच्युतराय गादीवर बसला. त्यानें सन १५३० ते १५४२ पर्यंत राज्य केलें. तो अगदीं भित्रा व राज्याला नालायक होता. त्याच्या वेळेस राज्यास उतरती कळा लागली. आरंभींच मुद्‌गल व रायचूर हे परगणे आदिलशहानें काबीज केले. ते पुनरपि हिंदूंच्या ताब्यांत कधींही आले नाहींत. अच्युतरायाच्या दुष्ट वर्तनानें त्याचे सर्व साह्यकर्ते नाखुष झाले. त्यामुळें त्यास इतके शत्रु उत्पन्न झाले, कीं त्यांच्या बंदोबस्तासाठीं त्यास आदिलशाहाची सुद्धां मदत मागावी लागली. सर्व सत्ता दिवाणाच्या हातांत होती. दिवाण तिम्मा ऊर्फ रंगराय यास तीन मुलगे होते. थोरला रामराय, दुसरा तिरुमल, व तिसरा व्यंकटाद्रि. वडील रामराय यास कृष्णदेवरायाची मुलगी तिरुमलम्मा ही दिलेली होती; आणि त्याची दुसरी मुलगी त्याचा भाऊ तिरुमल यास दिली होती. हा रामराय मोठा धूर्त होता आणि त्यानें आपणालाच राज्य मिळविण्याची खटपट सुरू केली. तींत त्याचा भाऊ तिरुमल याची त्यास मदत होती. या कामीं तिरुमलनें आदिलशहाची मदत मागितली; त्याप्रमाणें आदिलशहा विजयनगरास आला. तेव्हां त्यास पुष्कळ संपत्ति देऊन रामरायानें परत लाविलें, (सन १५३६). ह्या वेळेस आदिलशहाचा वजीर आसदखान हा विजयनगरचें राज्य बुडविण्याविषयीं मोठी खटपट करीत होता. सन १५४२ सांत अच्युतराय मरण पावला; त्यास सदाशिवराय म्हणून एक पुतण्या होता. त्यास गादीवर स्थापून रामराय, तिरुमल व व्यंकटाद्रि यांनीं सर्व राज्य आपल्या हातांत घेतलें. अच्युतरायाच्या कार्किर्दींत, विठ्ठलस्वामीचें मंदिर पुरें झालें. इकडे पोर्तुगीझांची सत्ता वाढत चालली होती. विजयनगरशीं त्यांचें सख्य होतें. परंतु फायदा होण्याची वेळ आली म्हणजे पोर्तुगीझ लोक तह वगैरे सर्व गुंडाळून ठेवीत.

६. तालिकोटची लढाई, (सन १५६५, जानेवारी ता. २३).—सदाशिवराय सन १५४२ पासून स. १५६७ पर्यंत गादीवर होता. पण त्याच्या हातांत काडीइतकी सत्ता नव्हती. तो बहुतेक बंदीवासांतल्यासारखा होता. तथापि कागदोपत्रीं मात्र त्याचें नांव चालत असे, आणि वर्षांतून एक दिवस तिघे प्रधानबंधु राजास जाऊन मुजरा करीत. मुसलमान सुलतानांचे व विजयनगरच्या अधिकाऱ्यांचे व्यवहार उत्तरोत्तर अ-

धिकाधिक चुरसीनें चालूं लागले. त्यांत रामरायाचें वर्तन अतिशय उद्दामपणाचें व मुसलमानांस चीड येण्यासारखें होऊं लागलें. रामराय मुसलमानांच्या मुलखावर हात मारूं लागला. दक्षिणेंतही त्यानें आपली सत्ता फार वाढविली. त्यानें पुष्कळ नवीन फौज चाकरीस ठेवून राज्यास बळकटी आणिली. बहामनी राज्याच्या अनेक शाखा होऊन, त्यांच्यांत सदा वैरभाव चालत असल्यामुळें रामरायाचें चांगलें फावलें. दक्षिणचे सर्व मुसलमान राजे त्याच्या कुमकेची अपेक्षा करीत. त्याच्या साहाय्याशिवाय कांहीं चालेनासें झालें. अली आदिलशहास मदत करण्याकरितां ज्या दोन स्वाऱ्या रामरायानें महाराष्ट्रावर केल्या, त्यांत त्याचें वर्चस्व व हिंदु फौजेचें गर्विष्ठपणाचें आचरण एकंदर मुसलमानांस दुःसह वाटूं लागलें. सर्व मुसलमानी राजांचे वकील रामरायाचे पदरीं असत. त्यांना तो पूर्वीप्रमाणें सभ्यपणानें वागवीनासा झाला. तेव्हां त्या वकिलांनींही रामरायाविरुद्ध आपल्या धन्यांकडे तक्रारी केल्या. शिवाय अली आदिलशहा व कुत्बूशहा ह्यांचीं राज्यें विजयनगरच्या सरहद्दीवर असल्यामुळें त्यांस रामरायाकडून नेहमीं उपद्रव पोंचे. रामरायाच्या या उपद्रवास अली आदिलशहा व त्याचा वजीर कीश्वरखान हे फारच कंटाळून गेले, आणि रामरायाचा नाश करण्याची त्यांनीं तोड काढिली. आदिलशहानें दरबार भरवून अमीरउमरावांना भाषण केलें, कीं 'हिंदु लोक अलीकडे गर्विष्ठ होऊन मुसलमानांची मानहानि करीत आहेत, म्हणून सर्वांनीं एकजुटीनें त्यांचें पारिपत्य करण्यास झटलें पाहिजे. यश आल्यास ठीकच. अपयश आल्यास धर्मसंरक्षणार्थ मृत्युमुखीं पडणें हेंही पुण्यच आहे.' कीश्वरखानानें सुचविलें, कीं 'सर्व मुसलमान राजे एकचित्त झाल्याशिवाय रामरायाचा पाडाव होणें शक्य नाहीं. कारण विजयनगरचा अंमल तुंगभद्रेपासून तहत रामेश्वरापर्यंत असून मुलूख आबाद आहे. त्याच्या ताब्यांत शेंकडों बंदरें असून व्यापाराची घडामोड मोठी चालते. राज्याचा वसूल वीस कोटि आहे. तेव्हां अशा प्रबळ राजाचा नाश एकट्याच्या हातून होणें शक्य नाहीं.' येणेंप्रमाणें वाटाघाट होऊन या कामांत सर्व मुसलमान राजांची मसलत घेण्याचें ठरलें.

कीश्वरखानानें कुत्बूशहाकडे एक विश्वासु इसम पाठविला. कुत्बूशहास हिंदूंपासून वारंवार उपद्रव होत असल्यामुळें, त्यानें वरील मस-

त्तीस खुषीनें आपलें अनुमोदन देऊन, ह्या कामीं हुसेन निजामशहाचें साहाय्य मिळवून देण्याची खटपट आपण पत्करिली. हुसेन निजामशहाही लागलाच ह्या गोष्टीस कबूल झाला. सर्वांचीं मनें शुद्ध राहवीं ह्यासाठीं हुसेनशहानें आपली कन्या चांदबिबी अली आदिलशहास दिली. आदिलशहानें आपली बहीण हुसेनचा मुलगा मूर्तुजा यास दिली. अली बेरीदशहाही ह्या कटांत सामील झाला. हे चौघे राजे सन १५६४ सालीं आपापल्या फौजांसह विजापूर शहरांत एकत्र जमले.

युद्ध सुरू करण्यास कांहीं तरी निमित्त पाहिजे, म्हणून अली आदिलशहानें आपले वकील रामरायाकडे पाठवून मुद्गल, रायचूर व बागलकोट वगैरे किल्ल्यांची त्याजपाशीं मागणी केली. अगोदर भाकित केल्याप्रमाणें रामरायानें वकिलांस धिक्कारून परत लाविलें. तेव्हां सर्व मुसलमानी फौजा विजयनगरकडे चाल करून कृष्णानदीच्या कांठीं तालिकोटपर्यंत गेल्या. तालिकोट डोण नदीच्या कांठीं, ती नदी कृष्णेस मिळते त्याच्या वर साठ मैल, आहे.

रामरायास ह्या अरिष्टाची फारशी परवा वाटली नाहीं. दोनशें वर्षें हिंदूंचा पाडाव करण्याचे प्रयत्न चालले होते, ते सर्व निष्फळ झाले, हें लक्षांत आणून ह्या वेळीं सर्व हिंदु लोक अगदीं बेफिकीर होते. लोकांचे नेहमींचे व्यवसाय निर्धास्तपणें चालू होते. दरएक बंदरांतून बैलांचे तांडेच्या तांडे माल भरून विजयनगरास येत होते; आपणांस पुढें धोका आहे अशी त्यांस यत्किंचित् कल्पना नव्हती. राजा सदाशिवराय बिचारा आपल्या कोठडींत पडून होता. रामराय जरी बेफिकीर होता, तरी त्यास ह्या सर्व गोष्टींची खबर होतीच. तो स्वस्थ बसला नव्हता. त्यानें बिलकुल न डगमगतां आलेल्या संकटांतून पार पडण्याची कडेकोट तयारी चालविली. तिरुमलराय व व्यंकटाद्रि ह्या दोन शूर भावांच्या हाताखालीं त्यानें मोठमोठ्या फौजा देऊन स्वतः सेनाधिपत्य स्वीकारिलें. कृष्णानदीवरील मुसलमानांचा उतार बंद करण्यासाठीं त्यानें तिरुमलरायास मोठी फौज देऊन तेथें ठेविलें. पण मुसलमानांनीं त्यास फसवून एकच उतार होता तो स्वाधीन करून घेतला, आणि ते विजयनगरच्या मुलखांत शिरले. ह्या प्रसंगीं दोनही पक्षांच्या अगणित फौजा जमल्या होत्या. मुसलमान इतिहासकारांनीं दिलेले आंकडे अगदींच असंभवनीय आहेत, तरी

एकंदरींत दोनही बाजूंस अतिशय मोठी फौज होती, ह्यांत संशय नाहीं. मुसलमान लोक उत्तरेकडून हिंदुस्थानांत शिरल्यावर ते एकामागून एक प्रांत आक्रमीत चालले होते. दिल्लीचा अकबर बादशहा सर्व हिंदुस्थानांत एकछत्री मुसलमानी राज्य स्थापन करण्यास हरप्रयत्न करीत होता. नांव घेण्यासारखें विजयनगरचें हिंदु राज्य मात्र आजपर्यंत मुसलमानांशीं टक्कर देऊन राहिलें होतें. हिंदूंचा अभिमान जागृत राहण्यास त्यांचा कैवार घेणारें असें दुसरें राज्य ह्या वेळेस नव्हतें; आणि तेव्हांपासून आजमित्तीपर्यंत इतकें प्रबळ हिंदु राज्य मराठशाहीशिवाय दुसरें झालें नाहीं. राष्ट्राच्या इतिहासाचें स्वरूप बदलून टाकणारे असे अनेक घनघोर युद्धप्रसंग प्राचीन काळापासून जगांत होत आले आहेत. त्यांत तालिकोटच्या संग्रामाची गणना आहे. ह्या वेळीं धर्माभिमान व स्वराष्ट्राभिमान जागृत ठेवण्यास मुसलमान लोक कसे झटले हें चांगलें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

मंगळवार, ता. २३ जानेवारी स. १५६५ रोजीं दोनही फौजा लढाईस सज्ज होऊन उभ्या राहिल्या. ह्या युद्धांत दोनही पक्षांकडे पुष्कळ तोफा होत्या. मुसलमानांकडील तोफखानेवाला प्रसिद्ध चलीबी रुमीखान हा होता. उभयपक्षीं फौजेची व्यवस्था फार काळजीपूर्वक ठेविलेली होती. मुसलमानी सैन्य, उजव्या बाजूस अली आदिलशहा, डावे बाजूस अली बेरीदशहा व इब्राहीम कुत्बुशहा, आणि मध्यभागीं हुसेन निजामशहा, अशा व्यवस्थेनें उभें राहिलें. सर्वांच्या पुढें सांखळीनें बांधून तोफा उभ्या केल्या होत्या. इकडे हिंदूंच्या फौजेंत डाव्या म्हणजे पश्चिमबाजूस तिरुमल, उजव्या बाजूस व्यंकटाद्रि, आणि मध्यभागीं स्वतः वृद्ध रामराय होता. रामराय सर्वांच्या मागें पालखींत बसून लोकांस उत्तेजन देत होता. कांहीं वेळानें पालखींतून उतरून तो एका रत्नजडित आसनावर बसला, आणि समोर मोहोरा, रत्नें व रुपये ह्यांचे ढीग घालून, जे कोणी शिताफीनें लढतील त्यांस बक्षीस देण्यास मी येथें बसलों आहें, असें तोंडानें तो सर्वांस सांगत होता. लढाईत मुख्य सेनापतीनें असें पायीं राहणें अतिशय धोक्याचें असतें. कांहीं वेळपर्यंत दोनही पक्षांचें अगदीं कडाकडीचें युद्ध झालें. प्रथमतः मुसलमानांची फार धांदल उडाली, पण हुसेन निजामशहा मध्यभागाची रामराजाची फळी फोडून त्यांच्या अंगावर धांवला. रामराय सत्तर

वर्षांचा होता. तो चटकन पालखींत चढला; पण निजामशहाचा एक मस्त हत्ती त्याच्या अंगावर धांवून जातांच भोई पालखी टाकून पळाले. नंतर रामराय घोड्यावर चढत असतां त्यास शत्रूंनीं पकडून तोफखान्याचा अधिकारी चलीबी रुमीखान याजकडे नेलें. रुमीखानानें त्यास निजामशहाकडे रवाना केलें. निजामशहानें त्याचें शिर कापून तें भाल्यास टोंचून शत्रूंस कळण्यासाठीं चोहोंकडे फिरविलें. हिंदूंनीं आपला राजा मेला असें पाहिलें, तेव्हां ते निराश होऊन लढाई टाकून पळाले. त्या वेळीं मुसलमानांनीं त्यांची अशी चंदी उडविली, कीं सर्व समरांगण व नदी रक्तानें भरून गेली. एकंदर एक लक्षावर हिंदु लोक मारले गेले.

एकदां हिंदु फौजा विसकळित झाल्याबरोबर त्यांची धांदल उडून त्या परत विजयनगरांत येऊन घुसल्या. जरा शांत वृत्ति कायम ठेवून त्या सर्वांस परत फिरवून पुनरपि मुसलमानांशीं सामना करण्याचा प्रयत्न कोणीं केला असता, तर पुढील भयंकर परिणाम पुष्कळ अंशीं टळले असते. पण इतकी व्यवस्था व लढाईची शिस्त हिंदूंच्या ठिकाणीं कधींच नव्हती, ती ह्या वेळेस कोठून असणार!

७. लढाईचे भयंकर परिणाम.—तालिकोटास घडलेल्या अनर्थाची बातमी राजधानीस पोंचण्यास विलंब लागला नाहीं. शहरच्या लोकांस त्याची कांहींएक कल्पना नव्हती. ते आपल्या नेहमींच्या व्यवसायांत निमग्न होते. पराभव झालेला ऐकून सुद्धां पुढें कांहीं विपरीत प्रकार होईल अशी कल्पनाही त्यांस शिवली नाहीं. नेहमींप्रमाणें मोठासा दंड घेऊन मुसलमान परत जातील, आणखी काय होणार, अशी त्यांस खात्री होती. सरकारी खजिना तुडुंब भरलेला होता. तेव्हां मुसलमान मागतील तो दंड देण्यास कांहीं अडचण नव्हती. परंतु ह्या भ्रमाचा लवकरच निरास झाला. पराभव पावलेले लोक घाबरून येऊन शहरांत घुसले. त्यांजबरोबर राजकुटुंबांतले पुरुषही पुष्कळ होते. त्यांनीं प्रथम त्वरा करून होती नव्हती तेवढी संपत्ति हत्तींवर लादून, तिच्यासह दक्षिणेकडे पलायन केलें. त्यांजबरोबर साडेपांचशें हत्ती संपत्तीनें भरून गेले. सदाशिवरायास बरोबर घेऊन तिरुमलही अशाच प्रकारें पळून गेला. ह्यामुळें गरीब बिचारी निरपराधी प्रजा शत्रूंच्या तावडींत आयतीच सांपडली. हा नुसता पराभवच नव्हे, हा सर्वस्वाचा संहार होय. आतां कोणी त्राता राहिला नाहीं.

पळून जाण्यास वाट नाहीं. सर्व रस्ते गोणीच्या बैलांनीं भरलेले होते. दुसऱ्या दिवशीं दरोडेखोरांच्या टोळ्या शहरांत घुसल्या, आणि भराभर लूट करूं लागल्या.

मुसलमानांच्या विजयी फौजा लगेच राजधानीवर आल्या नाहींत म्हणून बरें. एक दिवस विश्रांति घेऊन त्या तिसऱ्या दिवशीं शहरांत आल्या. त्या दिवसापासून पुढें पांच महिनेपर्यंत त्या दुर्दैवी शहराची विटंबना चालू होती. ह्या वेळीं मुसलमान लोक शहरांत कांहीं शिल्लक ठेवण्याकरितां आले नव्हते. त्यांनीं लोकांची साफ कत्तल केली; देवळें व वाडे पाडून जमीनदोस्त केले. एवढ्या सुंदर व विस्तीर्ण शहरापैकीं दगडांच्या राशी मात्र आज दिसून येतात, तसेंच नृसिंहाचा तो प्रचंड दगडी पुतळा हात वगैरे तुटलेला दिसून येतो. सुंदर व नकशीचें काम सर्व नाहींसें झालें. विठ्ठलस्वामीच्या मंदिरांत त्यांनीं होम पेटवून दिला. अग्नि, तलवार, कुऱ्हाडी, पहारा इत्यादिकांचा प्रयोग सारखा चालू होता. जगाच्या इतिहासांत अशा भयंकर प्रळयाचें उदाहरण क्वचित्च सांपडेल. लूट किती मिळाली ह्याची तर गणतीच नाहीं. कित्येक शतकेंपावेतों जेवढी म्हणून संपत्ति विजयनगरास जमली होती, तेवढी सर्व मुसलमानांस मिळाली. चार ही मुसलमान सुलतानांच्या बरोबर जितके लोक लढाईस आले होते, त्यांतील प्रत्येक इसम मातबर होऊन त्याजपाशीं सोनें, रत्नें, सामान, तंबू, हत्यारें, घोडे व गुलाम ह्यांचा विपुल संचय झाला. लुटीपैकीं हत्तीमात्र सुलतानांनीं स्वतःकरितां घेतले, बाकी सर्व संपत्ति ज्याची त्यास दिली. आदिलशहास एक मोठा हिरा सांपडला, तो कोंबडीच्या अंड्याएवढा होता.

ह्याप्रमाणें विजयनगर शहर मुसलमानांनीं लुटून त्यांतील सर्व इमारती जमीनदोस्त केल्या. लोकांवर नानाप्रकारचे जुलूम केले. सर्व देश उजाड पाडिला. व्यंकटाद्रि पळून दूर एका अरण्यांत जाऊन लपून राहिला, तेथून त्यानें लढाई तहकूब करण्याविषयीं मुसलमानांस आग्रहपूर्वक विनंति केली. पुढें तोही मारला गेला. साऱ्या देशाची धूळ केल्यावर मुसलमान राजे रायचुरास एकत्र होऊन परत आपआपल्या देशीं गेले. तालिकोटच्या नैर्ऋत्येस सुमारें ३० मैलांवर वरील लढाई झाली; तरी तीस तालिकोटची लढाई असेंच म्हणतात.

ह्या लढाईनें शेवटच्या हिंदु साम्राज्याचा शेवट झाला. विजयनगरच्या राजानें पुनः कधीं वर डोकें काढिलें नाहीं. शहराचा सर्वस्वी नाश होऊन लोक तें सोडून गेले. हल्लीं तेथें हजारों पडक्या इमारती मात्र पूर्वीच्या वैभवाची साक्ष देत आहेत. कांहीं दिवस तिरुमल पेनकोंड्यास एका लहानशा प्रदेशावर राज्य करून होता. तेथेंही त्यास मुसलमानांचा उपद्रव होऊं लागला, तेव्हां तेथून तो चंद्रगिरीस गेला, आणि इकडे विजयनगरचें राज्य मुसलमानांनीं वांटून घेतलें. सीझर फ्रेड्रिक नांवाचा एक इटालियन प्रवासी स. १५६७त विजयनगरास आला होता, तो म्हणतो, ‘ जिकडे तिकडे मोडकीं तोडकीं घरें वाटेल तितकीं रिकामीं पडलीं आहेत, त्यांत राहण्यास माणसें नाहींत, व्याघ्र वगैरे हिंस्र पशु त्यांत राहतात. ’ तिरुमलरायनें पुनः शहर बसविण्याचा प्रयत्न केला, पण तो सफळ झाला नाहीं. पूर्वीच्या विजयनगरच्या स्थलावर हल्लीं लहान लहान खेडीं बसलीं असून, त्या वेळच्या कालव्यांवर लोकांनीं बागाईत व शेती केली आहे.

प्रस्तुतचे वंशावशेष.—सदाशिवराय व तिरुमल पेनकोंड्यास कांहीं दिवस राहिले. पण विजयनगरचे मोठमोठे सरदार त्यांस अनुकूल झाले नाहींत. ते आपापल्या जागीं संधि साधून स्वतंत्र कारभार करूं लागले. विजयनगर पडल्यामुळें पोर्तुगीझांचा व्यापार बसला. सन १५६७त सदाशिवरायाचा खून करून तिरुमल पेनकोंड्यास स्वतंत्र झाला. तेथें मुसलमानांनीं त्यास त्रास दिल्यामुळें तो चंद्रगिरीस गेला. तेथें त्याच्या वंशानें कांहीं दिवस राज्य केलें. चंद्रगिरीचा राजा सहावा रंगराय ह्यानें हल्लींच्या मद्रास शहराची जागा स. १६३९ त ई० इं० कंपनीस विकत दिली, (ब्रिटिश रियासत, पृ० ३१४). विजयनगरच्या ताब्यांत जहागीरदार होते, त्यांस नाईक असें म्हणत. मदूरा व तंजावर येथें ह्या नाइकांनीं कांहीं दिवस स्वतंत्र राज्यें केलीं. तेथील राजे ‘ नाईक ’ ह्या नांवानें प्रसिद्ध आहेत. सन १७५६ सालीं तिरुमलराय अधिकारापन्न असतां त्याचा मुलूख हैदरअलीनें जिंकून घेतला, तो त्यानें पुनः परत मिळविला. टिपूचें राज्य इंग्रजांनीं घेतल्यावर तिरुमलरायाचा मुलूख कंपनी व निजाम ह्यांनीं वांटून घेतला, आणि तिरुमलरायास दरमहा १५०० रुपये नेमणूक करून दिली. तरी निजामानें आपणाकडे आलेल्या मुलखापैकीं अना-

गोंदा शहर व सभोंवतालचा कांहीं प्रदेश तिरुमलरायाकडे जहागिरीदाखल ठेविला. तिरुमलरायाचा पुत्र रामराय हा अल्पवयी असतां १८२९ सालीं मरण पावला, तेव्हां जहागीर व नेमणूक कमी झाली. हल्लीं पंपापतिराय व कुमारराघव असे तिरुमलरायाचे दोन वंशज अनागोंदीस असून, त्यांजपाशीं घराण्याच्या वंशावळी व कागदपत्र आहेत. हल्लीं ते हैदराबादच्या निजामाचे ताबेदार आहेत.

८. या हिंदु राज्याचें सिंहावलोकन. (क) माधवाचार्यांची अपूर्व योजना.—विजयनगरच्या राज्यांत प्रधान, सेनापति वगैरे कामें केलेल्या अनेक पुरुषांचीं नांवें प्रसिद्ध आहेत. बसवय्या धन्नायक, मल्लापा बोडियार, *माधव मंत्री, सायण्णा मंत्री, कंप मंत्री,* दंडाधिपति गुंड, बचाप्पा, *मल्लीनाथ, तिमराज ऊर्फ तिमण्णा* इत्यादि पुष्कळ नांवें जागजागीं *दिलेलीं आहेत;* पण त्यांचें खुलासेवार इतिवृत्त सांपडत नाहीं. विजयनगर शहर स्थापण्याची खटपट करणारा माधवाचार्य ऊर्फ विद्यारण्य स्वामी *ह्याची मात्र थोडीबहुत* हकीकत सांपडते. हा माधवाचार्य पूर्वी राजा संगमाजवळ होता. संगमाचा मुलगा हरिहर याजकडून त्यानें विजयनगरची स्थापना करविली. त्याकामीं हरिहरास पैशाचें साह्यही माधवाचार्यानें केलें. ह्यावरून त्या प्रांतीं आचार्यांचें वजन अतोनात असलें पाहिजे. भूगोलिक स्थितीवरून पाहतां, विजयनगरच्या स्थलाची जागा पसंत करण्यांत त्यानें आपल्या योजकतेची कमाल केली असें म्हणावें लागतें. शहरास इतकी उत्कृष्ट सोय बहुधा दुर्मिळ होय, असें तज्ज्ञ लोकांचें मत आहे. माधवानें अनेक हुशार गृहस्थांस स्वतः राजकीय धोरणें शिकवून हरिहराच्या नोकरींत ठेविलें. त्यानें अनेक कारस्थानें करून बुकाची सत्ता वाढविली आणि त्यास विजय संपादन करून दिले. ह्याच माधवाचार्यांची शृंगेरी येथील शंकराचार्यांच्या गादीवर प्रथम स्थापना झालेली होती. तेव्हां त्यास विद्यारण्यस्वामी हें नांव मिळालेलें होतें. मुसलमानांकडून सर्व दक्षिणदेश जिंकला जाऊन शृंगेरीच्या मठाचा उच्छेद झाला, तेव्हां त्यांचा बंदोबस्त करण्याच्या हेतूनें नवीन हिंदुराज्य स्थापण्याची खटपट त्यानें केली. धर्म, नीति, तत्त्वशास्त्र, न्याय, व्याकरण, इत्यादि अनेक विषयांवर माधवाचार्यानें केलेले संस्कृत ग्रंथ, टीका व व्याख्यानें सर्वमान्य आहेत. माधवाचार्य नांवाचे दोन ग्रंथकार असावेत असा

कित्येकांचा समज आहे, पण त्याचा निश्चय झालेला नाहीं. माधवाचार्यांचा भाऊच सायणाचार्य होय. त्यानें वेद व उपनिषद् यांजवर उत्कृष्ट प्रचंड भाष्य लिहिलें आहे, त्यावरूनच वेदांचा अर्थ हल्लीं निश्चित होत असतो. सायणाचार्यही दुसऱ्या हरिहराच्या प्रधानकीचें काम पाहत होता.

एका विशिष्ट दृष्टीनें ह्या दोघां पुरुषांची कर्तबगारी हिंदुस्थानच्या इतिहासांत विशेष स्मरणीय आहे. धर्म व राज्य ह्या दोन बाबतींची सांगड घालून, आणि एकीचें साह्य दुसरीस घेऊन, मुसलमानांच्या वाढत्या शक्तीस आळा घालण्याचा जो हा प्रयत्न ह्या दोन पुरुषांनीं विजयनगरास केला. *त्यावरून राज्यसंस्थापनेचें ह्रद्गत त्यांस कळलें होतें असें दिसतें. मुसलमानांनीं धर्म व राज्य ह्या दोहोंचा मिलाफ करून आपली उन्नति कशी केली*, आणि हिंदुस्थान काबीज करण्यास ते कसे समर्थ झाले हें त्यांनीं समजून घेऊन, तोच प्रकार त्यांनीं आपल्या कर्तव्यांत स्वीकारिला. एका राजास हाताशीं धरून दक्षिण हिंदुस्थानांत मध्यवर्ती अशा मजबूद ठिकाणीं त्यांनीं नवीन राज्यस्थापना केली, आणि शृंगेरीच्या मठाचा त्यास पाठिंबा देऊन मुसलमानांस मागे हटविण्याचा उपक्रम केला. आद्य शंकराचार्यांचे मनांत कदाचित् अशी योजना असेल, पण तिची खरी सांगता माधवाचार्यांनें केली. युरोपांत तर राजकीय व धार्मिक सत्ता एकाच पुरुषाच्या हातांत असल्यामुळें तिकडच्या राष्ट्रांस आपली उन्नति करून घेतां आली; हिंदुस्थानांतही पूर्वीं तसा प्रकार होता, पण पुढें तो बंद झाल्यावर पुनरपि तो निर्माण करून स्वराज्याची जी योजना मधवाचार्यांनें केली, ती प्रशंसनीय आहे ह्यांत संशय नाहीं. माधवाचार्यांच्या अनुगामी मुत्सद्यांनीं व विजयनगरच्या अनुगामी राजपुरुषांनीं आरंभींचीं हीं धोरणें ध्यानांत धरिलीं नाहींत, म्हणून विजयनगरचा पाडाव झाला. पुढें शिवाजीनें जेव्हां महाराष्ट्रांत स्वराज्य संस्थापना केली, तेव्हां त्यास कदाचित् ह्या जुन्या विजयनगरच्या उदाहरणानें थोडीबहुत स्फूर्ति आली असण्याचा संभव आहे. विजयनगरचा इतिहास परंपरेनें महाराष्ट्रांतील मुत्सद्दीमंडळींत उतरत गेला असला पाहिजे. अनागोंदीस व इतरत्र कानडीभाषेंत विजयनगरच्या राज्याचे पुष्कळ कागदपत्र आहेत असें कळतें, त्यांची चालना

करून एखादा विद्वान गृहस्थ त्या राज्याचा सुसंबद्ध इतिहास प्रसिद्ध करील, तर राष्ट्रावर त्याचे महदुपकार होतील.

(ख) नीतिमत्तेचा अभाव.—आरंभींच्या शंभर दीडशें वर्षांत विजयनगरच्या राजांची सत्ता व ऐश्वर्य बहामनी राज्याच्या मानानें फारच मोठें होतें. पण ह्या हिंदु राज्याच्या पायास न्याय व नीति ह्यांची भर नव्हती. पुष्कळसा धनसंचय करून ऐषआराम व चैन करावी इकडेच बहुतेक राजांची व दरबारी मंडळीची विशेष प्रवृत्ति होती. प्रजेच्या किंवा राष्ट्राच्या संबंधानें आपली अमुक एक जबाबदारी आहे, आणि स्वतः त्रास व संकटें सोसून ती जबाबदारी आपण पार पाडिली पाहिजे; अशी भावना विजयनगरच्या राजकर्त्यांच्या ठिकाणीं उत्पन्न झालेली दिसत नाहीं. सभोंवारची परिस्थिति ओळखून तदनुसार आपली राज्यव्यवस्था करण्यास लागणारी उदार व उच्चतर दृष्टि राज्यकर्त्यांपैकीं कोणाच्याच ठायीं असलेली दिसत नाहीं. बहुतेक राजे विषयी व स्त्रीलंपट होते. त्यांचें लक्ष सदा चैन करण्याकडे असे. प्रांतिक कामदारांस नेहमीं असे हुकूम दिलेले असत, कीं कोठेंही सुंदर किंवा विशेष देखणी मुलगी आढळून आली, कीं लगेच तिच्या आईबापांच्या संमतीनें ती राजाकडे पाठवून द्यावी. हा प्रघात राज्यांत विशेष जाचक झाला असेल हें सांगणें नकोच. राज्यांतील बऱ्याचशा लढाया व बहुतेक भानगडी अशा स्त्रीविषयक कारणांनीं उद्भवलेल्या आहेत. सोनाराच्या निहाल मुलीचें प्रकरण सुप्रसिद्धच आहे. तें प्रकरण आवरतां आवरतां रायास पुरे पुरे झालें. निहाल तर गेलीच, पण शेवटीं स्वतःची तरुण मुलगी कलबुर्ग्याच्या वृद्ध शहास देऊन स्वतःचा जीव बचावण्याची त्यास पाळी आली. अशा-प्रकारें स्वतःच्या जिवावर बेतली असतां, प्रत्यक्ष मुलामुलींचा अथवा बायकापोरांचा त्याग करण्यास रायांस दिक्कत वाटत नसे. अशी मानहानि सहन करण्यापेक्षां लढून जीव गेलेला बरा; अशा प्रकारची उत्तरेंतील रजपुतांची उच्च भावना दक्षिणेंतील ह्या राजांच्या मनास कधीं शिवली नाहीं. फार तर काय, पुष्कळसें द्रव्य दिलें म्हणजे आपणास पाहिजे ती गोष्ट अनुकूल करून घेतां येईल, अशीच त्यांची नेहमीं समजूत होती. म्हणूनच ते नेहमीं धनसंचय करण्यांत दंग असत. विजयनगरच्या अफाट संपत्तीमुळेंच राज्यास एवढी

भरभराट आली होती. एवढ्या मोठ्या राज्यास नीतिमत्तेची जोड मिळाली असती तर त्याचा क्षणार्धांत असा चुराडा उडाला नसता. तालिकोटच्या पूर्वी एवढा मोठा मुसलमानांचा कट झाला, त्याचा प्रतिकार करण्याची कांहींएक तजवीज रायांनीं केली नाहीं. ते नुसत्या घमेंडींतच राहिले. फार तर मोठासा दंड द्यावा लागेल, ह्यापलीकडे आपलें नुकसान तें काय होणार, अशा समजुतीनें ते स्वस्थ बसले. त्या वेळीं मुसलमानांच्या मनाची स्थिति, रयतेची राजनिष्ठा, अगर आपली एकंदर परिस्थिति ह्यांचा विचार त्यांनीं शांतपणें मुळींच केला नाहीं. तालिकोट येथील पराजयानंतर जी धांदल उडाली तिजवरून राज्याच्या अंतर्गत दुर्बल स्थितीची चांगली कल्पना होते. सामान्य प्रजाजनांची भक्ति राजांवर कधींच बसली नव्हती. आपलें जीवित व मालमत्ता राज्यांत सुरक्षित राहतील अशी त्यांस कधींच खात्री वाटत नसे. राजांची लहर लागली म्हणजे लाखों लोकांचे प्राण ते बिनदिक्कत घेत. असा प्रकार असल्यामुळें रयतेची प्रीति स्वतःच्या हिंदु राजांपेक्षां शेजारच्या मुसलमान राजांवरच सामान्यतः ज्यास्त होती. कारण ते राजे धर्माच्या वगैरे बाबतींत कितीही आग्रही असले, तरी ते राज्यकर्त्यांचें कर्तव्य ओळखून असत; राज्यांत बंदोबस्त चांगला ठेवीत; आणि परक्या लोकांत येऊन पडल्यामुळें रयतेच्याच तंत्रानें त्यांस थोडेंबहुत वागावें लागे. मुसलमानांचे वसुलाचे व बंदोबस्ताचे नियम व्यवस्थित पद्धतीवर ठरविलेले होते, तसे हिंदूंचे नव्हते. प्रसंग आला तर हिंदु स्त्रियांस सुद्धां विजयनगरच्या राजांच्या *जनानखान्यांत जाऊन पडण्यापेक्षां मुसलमानांच्या गोषांत जाण्यास खुशी वाटत असे. हिंदूंनीं स्वराज्य स्थापन करण्याचा मोठा प्रयत्न केला, त्याची स्थिति ही अशा प्रकारची आहे. बाकी विजयनगरच्या रायांच्या जनानखान्यांत बारा हजार स्त्रिया होत्या, म्हणून जें परकीयांनीं लिहिलें आहे, तें सर्व त्या अर्थानें खरें नाहीं. ह्या सर्व स्त्रिया म्हणजे रायांच्या बायका म्हणून नव्हता. बायका अशा चारदोनच असत. बाकी वाड्यांतील सर्व नोकरचाकर मिळून बायकांची जी मोठी संख्या असे, तिचा समावेश जनानखान्यांत होऊं शकत नाहीं.

(ग) संपत्तीची विपुलता.—विजयनगरच्या राज्यांत हिऱ्यांच्या खाणी पुष्कळ होत्या. त्यांतील हिऱ्यांचा पुरवठा सर्व जगास होत असून,

इतक्या संपत्तिमान खाणी पृथ्वीवर त्या वेळीं दुसऱ्या कोठेंही नव्हत्या. त्या खाणींचा मक्ता व्यापाऱ्यांस दिलेला असे. पंचवीस कॅरटपेक्षां ज्यास्त वजनाचे जेवढे हिरे मिळतील, तेवढे रायास देण्याचा मक्तेदारांशीं ठराव केलेला असे. स. १६१४त चंद्रगिरीच्या रायाजवळ हिऱ्यांनीं भरलेल्या तीन मोठाल्या पेट्या होत्या, असें लिहिलेलें आहे. प्रत्येक प्रवाशाच्या वर्णनांत ह्या हिऱ्यांची हकीकत आहे. सामान्यतः बऱ्याच लोकांजवळ असले लहान मोठे हिरे असत. बऱ्याच खाणी कृष्णा नदीच्या कांठीं कर्नूळ व अनंतापूर ह्या प्रांतांत असून, मुख्यतः वज्रकरूर येथें त्या विशेष चांगल्या होत्या. ह्या सर्वांस 'गोवळकोंड्याच्या खाणी' अशी सामान्य संज्ञा ग्रंथकारांनीं वापरिली आहे. कोंबडीच्या अंड्याएवढा एक हिरा तालिकोटच्या लढाईनंतर विजयनगर येथें आदिलशहास मिळाला. रामरायाचे खास घोड्यावर हिरेमोत्यांचा तुरा असे, त्यांत हा मोठा हिरा खालीं बसविलेला होता. ह्याशिवाय आणखी कित्येक सुंदर हिरे होते, त्यांचीं नांवें व हकीकत डॉ. बॉलनें दिली आहे. 'कोंबडीचें अंडें' व 'कोहिनूर' हे हिरे निरनिराळे होते. कोहिनूर हिरा स. १६५६त कृष्णेच्या कांठीं कोलूरच्या खाणींत मीरजुम्ला ह्यास सांपडला. त्या वेळीं त्याचें वजन ७'९६ इंग्लिश कॅरट्स् होतें. तो तसाच कापल्याशिवाय मीरजुम्लानें शहाजहान बादशहास नजर केला. पुढें तो दिल्लींतून नादिरशहानें इराणांत नेला, (स. १७३८) आणि त्यास 'कोह्-इ-नूर' (तेजाचा पर्वत) असें नांव दिलें. इराणांतून तो अहंमदशहा अब्दालीस मिळाला, (स. १७५१), तेव्हांपासून तो काबुलास होता. स. १८०८त काबूलच्या शहासुजानें तो रणजितसिंगास दिला. रणजितसिंगाचा मुलगा धुलीपसिंग ह्यानें स. १८४९त पंजाबचा कारभारी सर जॉन लॉरेन्स ह्यास तो दिल्यावर त्यानें तो विलायतेस व्हिक्टोरिया राणीस नजर केला. इतक्या प्रचंड घालमेलींत त्याची अनेक वेळां छाटाछाट झाली. विलायतेंत स. १८५२त एका डच कारागिराकडून तो पुनः कापविण्यांत आला. हल्लीं त्याचें वजन १०६ कॅरट् आहे.

सारांश, ह्या हिऱ्यांच्या खाणी, पूर्वकिनाऱ्यावरील मोत्यांचे कारखाने, पश्चिमकिनाऱ्यावरील बंदरांतून चालणारा परदेशांतील व्यापार इत्यादिकांनीं विजयनगरांत अपार संपत्तीचा संचय झाला होता. प्रत्येक मंदिरांत

संपत्तीचे ढीगच्या ढीग भरलेले असत. सरदारांच्या व इतर गृहस्थांच्या घरीं सणावारांच्या व समारंभांच्या प्रसंगीं हजारों वर्षांपासून संचित असलेली संपत्ति लोकांच्या नजरेस पडत असे. (Sewell's Forgotten Empire).

(घ) प्रवाश्यांच्या हकीकती,—(स. १३४४–१४९०).— निकोलो कोंटी नांवाचा व्हेनिसचा एक गृहस्थ विजयनगरास आला होता. स. १४२०त व्हेनिस सोडून तो प्रवासास निघाला. तो हिंदुस्थानांत प्रथम खंबायतेस गेला. तेथून कांहीं दिवसांनीं दक्षिणकिनाऱ्यानें खालीं येऊन तेथून पायरस्त्यानें तीनशें मैलांचा प्रवास करून विजयनगरास गेला. तेथें कांहीं वर्षें राहून व आणखी दुसरीकडे प्रवास करून तो स. १४४४त परत व्हेनिसला गेला. त्यानें प्रत्यक्ष पाहिलेली विजयनगरची पहिल्या राजवंशाच्या वेळची हकीकत लिहून ठेविली आहे. तो लिहितो. विजयनगर एका उंच डोंगराच्या पायथ्याशीं आहे. शहराचा घेर साठ मैल आहे. तटांच्या भिंती पर्वतांच्या रांगांइतक्या उंच असून त्या सर्व दऱ्यांना वेष्टून गेलेल्या आहेत. राज्यांत शहाण्णव हजार लोक लढाईच्या तयारींत आहेत. मोठमोठ्या लोकांचीं घरें व वाडे दगडी आहेत. शहरांत पाण्याचे कालवे आणिलेले असून, मोठमोठ्या बागा आहेत. ऊस व तांदूळ पुष्कळ पिकतो. जिकडे तिकडे सुंदर व विस्तीर्ण देवालयें असून, ब्राह्मणांच्या पाठशाळाही पुष्कळ आहेत. वाडे, मंदिरें, तट, गोपुरें वगैरेंनीं शहरास अवर्णनीय शोभा आली आहे. अनागोंदी व विजयनगर हीं नदीच्या दोन बाजूंचीं दोन शहरें मिळून एकच मोठें विस्तीर्ण शहर होतें, असें म्हटलें तरी हरकत नाहीं. शहराची दक्षिणोत्तर लांबी बारा मैल व पूर्वपश्चिम रुंदी सुमारें दहा मैल होती. त्या वेळचे कालवे अजून चालू आहेत; आणि त्यांच्या पाण्यावर तयार झालेले बागाईत अद्यापि हयात आहे. मध्यभागीं मुख्य राजवाड्याचें आवार होतें. निकोलो म्हणतो, येथील लोकांना पाहिजे तितक्या बायका करण्याची मुभा आहे. नवरा मेल्यावर त्या सर्व सती जातात. राजाजवळ नेहमीं बारा हजार बायका तयार असतात; त्यांपैकीं चार हजार राजाबरोबर पायीं चालतात. चार हजार स्वयंपाकखान्यांत असून, त्या घोड्यावर जातात; आणि दोन तीन हजार जनानखान्यांत असून, त्या पालखींतून फिरतात. दरसाल देवाची स्वारी शहरांतून मिरवते.

शिवाय दुसरे सणवार पुष्कळ आहेत. कोंटी लिहितो, विजयनगरच्या उत्तरेस पंधरा मैलांवर एक हिऱ्याची खाण आहे. मार्को पोलोनें उल्लेख केलेल्या गोवळकोंड्याच्या खाणी त्या ह्याच होत.

अब्दुर्रझाक नांवाचा इराणचा एक वकील सन १४४३त विजयनगरास आला होता. इराणचा शहा शहारुख ह्यानें त्यास स. १४४१त आपल्या नोकरीस ठेविलें; आणि कित्येक महत्त्वाच्या कामांसाठीं आपला वकील म्हणून विजयनगरास पाठविलें. त्यानें आपल्या प्रवासाचें दिनवृत्त लिहून ठेविलें असून, त्यांत त्या वेळच्या स्थितीचें उत्कृष्ट चित्र आहे. स. १४४२च्या ज़ानेवारींत तो हिरात सोडून निघाला, तेथून मस्कत येथें आला; तेथून जहाजानें कालिकोटास येऊन पुढें विजयनगरास गेला. त्यानें प्रत्यक्ष पाहिलेली हकीकत बरीच लिहून ठेविलेली आहे. त्याच्या लिहिण्याची शैली विशेष खुबीदार आहे. तो म्हणतो, 'रायाजवळ अकरा लाख फौज आहे; हिंदुस्थानांत इतका शक्तिमान राजा दुसरा नाहीं. शहरांत जिकडे तिकडे गुलाबाचीं फुलें विक्रीस आहेत. व्यापारांच्या पेठा अनेक आहेत. हिरे, माणकें, पाचू, मोत्यें इत्यादि जवाहिराच्या खरेदीविक्री करण्याच्याही पेठा आहेत. जिकडे तिकडे पाण्याचे पाट व कारंजांची मजा दिसते.' तेथें महानवमीचा उत्सव होत असे; तो पाहण्यास अब्दुर्रझाक हजर होता. ह्या उत्सवाचे प्रसंगीं सगळें शहर इतकें गजबजून गेलें होतें, कीं त्याचा देखावा एखाद्या महासागरासारखा दिसत होता. एकंदरींत विजयनगरचें वैभव अप्रतिम होतें, ह्यांत संशय नाहीं.

फेरिस्ता म्हणतो, 'स. १३६६त विजयनगरच्या रायांची सत्ता बहामनी सुलतानांपेक्षां फारच मोठी होती. सर्व दक्षिणहिंदुस्थान व ओरिसासुद्धां सर्व पूर्वकिनारा त्यांच्या ताब्यांत होता. गोवा वगैरे अनेक बंदरें त्यांच्या स्वाधीन होतीं. मंगलोर येथें त्यांचें एक मोठें आरमार होतें. सीलोन, तेनासरीम इत्यादि ठिकाणचे वकील मौल्यवान नजराणे घेऊन रायांकडे येत असत.

९. दक्षिणच्या मध्यकालीन इतिहासाचें पर्यालोचन.—(१) ज्या काळचा हा इतिहास आहे, त्या काळांत मुसलमान लोक हिंदूंचे देश एकामागून एक जिंकीत चालले होते. असें करण्यांत राज्यवृद्धि हा जरी त्यांचा उद्देश होता, तरी धर्मप्रसारानें त्यांना त्या कामीं विशेष

उत्साह प्राप्त होत असे. अनेक हिंदु लोकांस त्यांनीं मुसलमान केलें; आणि हिंदु स्त्रियांशीं लग्नें लाविलीं. असे प्रकार घडतांना बऱ्याच प्रसंगीं जरी जुलूम होत असे, तरी जुलमाशिवाय आपखुशीनेंही हिंदुमुसलमानांमध्यें लग्नादि संबंध घडत असत. इतकेंच नव्हे, तर सोनाराची मुलगी निहाल हिनें विजयनगरच्या राजपुत्रास न वरितां शहाजादा हसनखान ह्यास वरिलें हें वर सांगितलेंच आहे. अशीं उदाहरणें वारंवार घडत. इतिहासांत प्रसिद्ध झालेले पुष्कळ मुसलमान गृहस्थ हिंदु स्त्रियांच्या पोटीं जन्मलेले होते. कित्येक तर मूळचे ब्राह्मण असून जबरदस्तीनें मुसलमान झाले होते. उदाहरणेंच चाळून पाहिलीं असतां असें मानण्यास आधार दिसतो, कीं हिंदु स्त्रियांच्या पोटीं जन्मलेले पुरुष विशेष बुद्धिवान व पराक्रमी निपजत. पुष्कळ मुसलमानांस हिंदु स्त्रियांचीच आवड विशेष असे. राज्यकर्त्यांचे जातभाई असल्यामुळें मुसलमानांचा हिंदूंच्या सर्व वस्तींत स्वैर संचार चालू असे. हिंदु लोक परधर्मीयांस आपल्यांत घेत नसत. त्यामुळें वरच्याहून उलट प्रकार घडणें शक्य नव्हतें. तसा निर्बंध हिंदु धर्मांत नसता, तर ज्याप्रमाणें इंग्लंडांत सॅक्सन व नॉर्मन ह्या दोन जातींचा शें दोनशें वर्षांत एकजीव झाला, तसा हिंदुमुसलमानांचा येथेंही झाला असता. सारांश, ह्या काळांत दोनही धर्मांचे लोक बहुतकरून व्यवहारांत अभेदानें वागत असत, आणि उभयतांचें जें संघट्टण चालत आलें तें आजतागाईत अव्याहत तसेंच कायम आहे. अनेक हिंदु गृहस्थ जुलमानें अगर स्वेच्छेनें मुसलमानी धर्म स्वीकारीत, आणि त्यायोगें पुढें ते मोठ्या लौकिकास चढत. मोठेपणा मिळविण्यास मुसलमान होणें हें एक चांगलें साधन होतें. ह्या काळीं प्रसिद्धीस आलेल्या मुसलमानांत अस्सल मुसलमान थोडेच असतील.

(२) दुसरी अशी एक गोष्ट दिसून येते, कीं इराण, आरबस्तान, तुर्कस्तान वगैरे दूरदूरच्या देशांतून मोठमोठे व्यापारी, कवि, सौदागर, साधु व इतर सामान्य लोक एकसारखे दक्षिणेंत येत असत. त्यांस इकडे परदेशी म्हणत. अशा लोकांचा वर्ग इतका मोठा असे, कीं दरबारांत पुष्कळ वेळां दक्षणी लोकांस तो भारी होता. दक्षिणच्या राजांची कीर्ति दूरदूरच्या देशांत पसरली होती. तिकडच्या साधूंस व कवींस इकडून बक्षिसें, नजराणे वगैरे पाठविण्यांत येत असत. हे लोक बहुधा जलमार्गानें

दक्षिणेंत येऊन दाभोळ वगैरे बंदरीं उतरत. हिंदुस्थानाशीं त्या देशांचा व्यापार फारच भरभराटीचा होता. सारांश, देशपर्यटन हें एक विद्येचें मुख्य अंग आहे असें आज समजण्यांत येतें, तसें त्या वेळेसही तें लोकांस वाटत असे. सर्व देशांतील बुद्धिवान व साहसी लोकांस हा देश नांवलौकिक मिळविण्याचें एक उत्तम स्थळ झालें होतें.

(३) इराण, आरबस्तान वगैरे देशांच्या मार्गानें युरोपाशींही हिंदुस्थानाचें दळणवळण पुष्कळ चालत असे. तुर्कस्तान, रोम, वगैरे राष्ट्रांतून कित्येक हुशार गृहस्थ मुद्दाम आणवून त्यांजकडून इकडचे राजे आपली फौज व तोफखाने तयार करवीत. हिंदुस्थानच्या वैभवाची खरी कल्पना युरोपियन लोकांस ह्या वेळेपासूनच होऊं लागली. पोर्तुगीझ लोकांनीं हिंदुस्थानांत येऊन प्रबळ मुसलमान राष्ट्रांशीं टकरा मारिल्या, आणि अनेक वेळां त्यांजवर विजय संपादिले, ह्यावरून तीं मुसलमानी राज्यें बरींच दुर्बल होतीं असें म्हणावें लागतें.

(४) शिवाजीच्या पूर्वी दक्षिणहिंदुस्थानची स्थिति कशी होती, ह्याची कल्पना करण्यास हा मागचा इतिहास फार उपयोगाचा आहे. मराठ्यांस स्वतःचा अभिमान विशेष वाटत असे. आरंभीं मुसलमानांनीं त्यांस पुष्कळ जाच केला. त्यांच्या अफाट फौजेंत लहानशी सुद्धां नोकरी मराठ्यांस मिळत नसे. ह्या अन्यायाचा मोबदला देण्याची मराठे वाटच पाहत होते. मुसलमानांशीं समोर लढण्याची जरी त्यांस आरंभीं ताकद नव्हती, तरी त्यांना हार न जाणें, व त्यांस आपली जरूर भासविणें इतकीं कामें करून ते त्या वेळीं आपला बोज राखीत. अनेक नामांकित मराठे सरदारांचीं नांवें मागील इतिहासांत आलींच आहेत. या मुद्याचें विशेष विवेचन मराठी रियासतींत आलें आहे तें पाहवें, (प्र. २ कलम २)

मुसलमानांस हार जावयाचें नाहीं ही बुद्धि महाराष्ट्रांतील लोकांच्या अंगीं कायम होती. बहामनी राज्याशीं व मुसलमानांच्या वाढत्या शक्तीशीं टक्कर मारण्याकरितांच विजयनगरचा उदय झाला. पुढें विजयनगरचा पाडाव झाला तरी लोकांच्या अंगचें पाणी कमी झालें नाहीं. बहामनी राज्याच्या शाखांत तें दबून होतें, पण त्यास योग्य संधि सांपडतांच शिवाजीच्या मदतीनें तें पुनरपि उदयास आलें.

(५) लोकांची राजकीय स्थिति हल्लींच्या स्थितीच्या मानानें समाधानकारक होती असें दिसत नाहीं. लोक आपले सार्वजनिक हक्क पाळण्याविषयीं दक्ष नसत; आणि राजे आपण होऊन त्यांस जसे वागवीत तसे ते वागवून घेत. गांवगन्ना रयतेस फारसा त्रास पोंचत नसे. ग्रामसंस्थांची पद्धति सर्वत्र चालू असल्यामुळें लोकांस अमुक नवीन राजा झाला, किंवा अमुक मरण पावला ह्याची परवा वाटत नसे. राजघराण्यांतील क्रूर प्रकार व इतर बाबतींसंबंधानें, महाराष्ट्रांतील मुसलमानी राजांची स्थिति पूर्वीं वर्णन केलेल्या दिल्लीदरबारच्या स्थितीहून फारशी भिन्न नव्हती. मराठ्यांच्या उदयासंबंधानें मात्र हा महाराष्ट्रांतील मुसलमानी राज्याचा इतिहास विशेष महत्त्वाचा आहे.

गुजराथ, महाराष्ट्र व दक्षिणहिंदुस्थान येथील स्वतंत्र राज्यांचे इतिहास जरा विस्तारानें दिले, ह्याचें कारण मराठीभाषेशीं ह्या प्रांतांचा विशेष संबंध आहे. चौदाव्या शतकांत मुसलमानांचीं स्वतंत्र राज्यें जशीं इकडे स्थापन झालीं, तशींच तीं हिंदुस्थानच्या इतर प्रांतांतही झालीं. त्यांचे कारणापुरते वृत्तान्त पुढील प्रकरणीं येतील.

प्रकरण सतरावें.

स्वतंत्र मुसलमानी राज्यें.

१. काश्मीर, (इसवी सन १३२६–१५८६).२. बंगाल, (१३४१–१५२३).
३. माळवा, (इसवी सन १३८७–१५२६).४. खानदेश, (१३७०–१५९९).
५. जोनपूरचें शर्की घराणें, (१३९४–१४९३).६. मुलतान, (१४४३–१५२४).
७. सिंध, (इ. स. १२१४–१५२३).

१. काश्मीर,—(सन १३२६–१५८६). कल्हण नांवाचा एक पंडित काश्मिरांत होता, त्यानें सन ११४८–४९त राजतरंगिणी नांवाचा एक ऐतिहासिक ग्रंथ लिहिला आहे. पूर्वींचे पुष्कळ ग्रंथ तपासून व दुसरी ऐतिहासिक माहिती मिळवून कल्हणानें आपला ग्रंथ लिहिला.

हिंदूनें लिहिलेला, इतिहास नांव शोभेल असा हा एकच उत्कृष्ट ग्रंथ आहे. आरबस्तानांत इस्लामाचा उदय होत असतां हिंदुस्थानांत दोन राज्यें सुव्यवस्थित व भरभराटींत होतीं; एक काश्मीरचें व दुसरें कनोजचें. इ. स. ६२७ पासून स. ८५५ पर्यंत नागवंशी राजे काश्मिरांत राज्य करीत होते. त्यांत दुर्लभ, ललितादित्य (स. ७२५–५२), व जयापीड (स. ७८०) हे राजे विशेष प्रसिद्ध झाले. ललितादित्यानें काश्मिरांतील प्रसिद्ध मार्तंडाचें मंदिर बांधिलें. त्यानें तुर्कस्तान, तिबेट, पंजाब वगैरे देश जिंकिले; आणि चीनदेशांत आपले वकील पाठविले. नागवंशानंतर उत्पल वंशानें स. ८३५ पासून स. ९३९ पर्यंत राज्य केलें, त्यांत अवंतिवर्मा (स. ८५५–८८३), व त्याचा मुलगा शंकरवर्मा (स. ८८३–९०२) हे राजे फार पराक्रमी होते. अवंतिवर्म्यानें काश्मिरांत अवंतिपूर शहर स्थापिलें, आणि तेथें दोन मंदिरें बांधिलीं तीं प्रसिद्ध आहेत. तसेंच त्यानें बांधिलेले कालवे पाहून हल्लींचे शास्त्रज्ञसुद्धां आश्चर्य करितात. शंकरवर्म्यानें ठरविलेली वसुलाची पद्धत गेल्या शतकापर्यंत काश्मिरांत चालू होती. पुढें राज्यास उतरती कळा लागली. तथापि हा प्रांत एका बाजूस असल्यामुळें पुष्कळ दिवसपर्यंत तेथें मुसलमानांचा शिरकाव झाला नाहीं.

सेनदेव नांवाचा राजा काश्मिरांत श्रीनगर येथें राज्य करीत असतां, त्यानें शहामीर नांवाच्या एका तुर्क मुसलमानास आपल्या नोकरींत ठेविलें. तो वाढतां वाढतां सेनदेवाचा मुलगा रणचंद्र ह्याचे कार्किर्दींत मुख्य प्रधान झाला. रणचंद्र मरण पावल्यावर काश्मीरची गादी काश्घरचा राजा आनंददेव ह्यानें बळकाविली. त्या आनंददेवानें सर्व मुसलमानांस नोकरींतून काढिलें. त्यामुळें चवताळून त्यांनीं बंडें केलीं. त्यांत राजाचा खून झाला, (सन १३२६). आनंददेवाची राणी कवलदेवी म्हणून होती, तिनें राज्यसंरक्षणार्थ कांहीं दिवस धडपड केली; पण शहामीर ह्यानें तिचा पराभव केला, आणि शम्सुद्दीन असें नांव धारण करून त्यानें काश्मिरांत मुसलमानी राज्य स्थापिलें. स. १३३४त कवलदेवीनें शम्सुद्दीनबरोबर लग्न लाविलें!!!

शम्सुद्दीननें राज्यापहार केला, तरी कारभारांत त्यानें चांगलें नांव मिळविलें. लोकांस त्रासदायक असे अनेक कर त्यानें माफ केले. तातार

लोक वरचेवर स्वाऱ्या करून मुलुखास उपद्रव देत, त्यांचा त्यानें चांगला बंदोबस्त केला. शम्सुद्दीननें सन १३४९ त आपल्या दोघां मुलांस राज्य सोंपून दिलें. पुढें कांहीं काळानें तो वृद्ध शहा मरण पावला.

जमशीद व शेरअली हे शम्सुद्दीनचे दोघे मुलगे. त्यांच्यांत राज्यप्राप्तीविषयीं कलह सुरू झाला. त्यांत जमशीदचा पाडाव होऊन शेरअलीस राज्य मिळालें. तो अलाउद्दीन हें नांव धारण करून राज्यावर बसला. सन १३६३ त तो मरण पावल्यावर त्याचा धाकटा भाऊ शहाबुद्दीन ह्या नांवानें राज्य करूं लागला. हा शूर व धाडसी होता. तलवारीच्या जोरावर त्यानें राज्याची मर्यादा दक्षिणेस लांबपर्यंत वाढविली. सिंधप्रांतांतील जामचा त्यानें पराभव केला. नगरकोटचे राजासही त्यानें जिंकून आपला मांडलिक केलें. शहाबुद्दीन सन १३८६ त मरण पावल्यावर त्याचा भाऊ हिंदाल हा कुत्बुद्दीन हें नांव धारण करून तख्तावर बसला. तो स. १३९६त मरण पावला. तेव्हां कुत्बुद्दीनचा मुलगा सिकंदर राज्यकारभार पाहूं लागला. त्यानें काश्मिरांतील अनेक हिंदु देवालयांचा विध्वंस करून बुतशिकन (म्हणजे मूर्तिनाशक) असें पद आपल्या नांवास जोडिलें. ह्या कृत्यांत त्याच्या प्रधानानें त्यास चांगली मदत केली. हा प्रधान मूळचा ब्राह्मण(!)असून मुसलमान झाला होता. हिंदु धर्माचा पाडाव केला, एवढ्या गोष्टीखेरीज इतर बाबतींत सिकंदरनें राज्य चांगलें चालविलें. ह्या कार्किर्दींत बहुतेक हिंदु लोक बाटून मुसलमान झाले. हल्लींही तेथें मुसलमानांचीच वस्ती ज्यास्त आहे. सिकंदर तयमूरलंगास शरण गेला, म्हणून तयमूरनें काश्मीरवर स्वारी केली नाहीं. तो सन १४१६त मरण पावला. त्यास तीन मुलगे होते. त्यांतील वडील अमीरखान हा पुढें गादीवर बसला. अमीरखानानें अलीशहा असा किताब धारण केला. हिंदुस्थानांत प्रवास करण्याचें मनांत येऊन त्यानें आपल्या भावास राज्याची व्यवस्था सांगितली आणि काश्मिरांतून दक्षिणेंत प्रयाण केलें. मागें त्याचा भाऊ शादीखान ह्यानें झैन्-उल्-अबिद्दीन असें नांव स्वीकारून राज्य बळकाविलें, (स. १४२२).

हा सुलतान विशेष चांगला निघाला. हिंदूंचा पाडाव करण्यासाठीं जेवढे नियम पूर्वी राज्यांत चालू होते, ते सर्व त्यानें बंद केले, आणि

NATIONAL ARCHIVES OF INDIA

ब्राह्मण लोकांस परत येऊन आपलीं धर्मकर्मे पूर्ववत् करण्याची मोकळीक दिली. मागच्या राज्यकर्त्यांनीं पाडिलेलीं देवळें त्यानें पुनरपि बांधिलीं, आणि सर्व धर्मांच्या लोकांस सुखानें आपल्या राज्यांत नांदण्याची सोय करून दिली. त्यानें मशिदी, कालवे व तलाव बांधिले, आणि निष्पक्षपातानें व नीतीनें राज्यकारभार केला. काव्य, गायन, इत्यादि ललितकलांस त्यानें चांगलें उत्तेजन दिलें. घरगुतीं वर्तनांतही तो अगदीं चोख होता. वृद्धापकाळ झाला, तेव्हां त्याच्या मुलांत भांडणें लागलीं; आणि तीं चालू असतांच तो सन १४७२त मरण पावला.

झैन्-उल्-अबिद्दीनच्या मागून त्यांचा मुलगा हाजीखान ऊर्फ हैदर हा गादीवर बसला. तो दुर्वृत्त निघून एक वर्षांतच मारला गेला. नंतर त्याचा मुलगा हसन ह्यानें मोठ्या संकटानें तेरा वर्षें राज्य केलें. त्याचा महंमद म्हणून एक अल्पवयी मुलगा होता. त्यास गादीवर स्थापून (सन १४८६), सय्यद हसन नामक प्रधानानें राज्यकारभार चालविला. हा प्रधान सय्यद जातीचा असून भारी महत्त्वाकांक्षी होता. त्यामुळें दरबारांत दोन तट पडले. सय्यदांच्या पक्षानें सुलतानास सर्वस्वी आपल्या ताब्यांत ठेविलें. शेवटीं दुसऱ्या पक्षाची सरशी होऊन त्यानें इहास सय्यदांच्या ताब्यांतून सोडवून राज्यावर बसविलें. पण त्याचा जम कधींच बसला नाहीं. झैन्-उल्-अबिद्दीनचा फत्तेखान नामक एक नातू होता, त्यानें महंमदबरोबर कलह करून राज्यापहार केला, (स. १४९६). फत्तेखानानें महंमदास कैद करून ठेविलें.

फत्तेखान राज्य करीत असतां महंमदास सोडविण्यासाठीं कित्येकांनीं खटपट केली. फत्तेखानाचा पराजय करून महंमदानें राज्य परत मिळविलें, परंतु पुनरपि फत्तेखानास यश मिळून महंमद दिल्लीस सिकंदर लोदीकडे मदत मागण्यास गेला. लोदीच्या मदतीनें महंमदानें आपलें राज्य जिंकून परत घेतलें. तेव्हां फत्तेखान हिंदुस्थानांत आला आणि इकडेच त्याचा अंत झाला, (सन १५०७). महंमदास राज्य मिळालें, तरी त्याचें दुर्दैव कांहीं संपलें नव्हतें. त्याचे आप्त व प्रधान यांनीं त्याजविरुद्ध वारंवार खटपटी केल्या. तार्तार लोक उत्तरेकडून स्वाऱ्या करीतच होते. पन्नास वर्षेपर्यंत अनेक विपत्ति भोगून हा सुलतान सन १५३५ त मरण पावला. पुढें पन्नास वर्षें हें राज्य कसेंबसें चाललें.

गृहकलह व बंडें एकसारखीं चालू होती. नंतर अकबरानें इ. स. १५८६ सालीं काश्मीरच्या मुसलमानी वंशाची समाप्ति करून, तो प्रांत दिल्लीच्या सार्वभौम सत्तेखालीं आणिला, ती हकीकत पुढें येईल.

२ बंगाल व बहार, (सन १३४१–१५२३).—बंगालप्रांतांत पूर्वी अनेक लहान लहान भाग होते. पूर्वेकडच्या आसामकडील भागास प्राग्ज्योतिष म्हणत. उत्तरेकडचा भाग पुंड्र, गंगेच्या दक्षिणेकडील वंग, आणि पश्चिमेकडील कर्णसुवर्ण, अंग व मगध असे भाग होते. ह्या भागांचा मध्यकालीन इतिहास अगदीं अप्रसिद्ध आहे. इ. स. ९००च्या सुमारास ह्या प्रांतांवर बुद्धधर्मी पाल वंशाचें राज्य सुरू झालें. त्याचा पहिला राजा गोपाल म्हणून होता. गोपालाची राणी देड्डादेवी म्हणून होती, तिच्या पोटीं मुलगा झाला त्याचें नांव धर्मपाल. धर्मपालानंतर देवपाल, वाक्पाल, जयपाल, महीपाल, नयपाल, विग्रहपाल, रामपाल, मदनपाल, नारायणपाल वगैरे पुरुष झाले. त्यांची राजधानी पाटलिपुत्र ऊर्फ पाटणा ही होती. हे राजे बुद्धधर्मी होते, तरी ते हिंदूंचा छळ करीत नसत. ह्या पालराजांचा इतिहास अलीकडे सांपडलेल्या शिलालेखांवरून थोडासा उपलब्ध झाला आहे. वरील नांवांपैकीं महीपाल (स. १०००–१०३५) व रामपाल (स. १०७५) ह्यांनीं गौड येथें राज्य केल्याचा उल्लेख सांपडतो.

पण गौड येथें राज्य करणारा हिंदुवंश सेन राजांचा होय. सेनांचा उदय स. १०९५च्या सुमारास होऊन त्यांचा अंत स. ११९८त झाला. विजयसेनानें नदिया येथें सेन वंशाची स्थापना केली. स. ११९८त बख्त्यार खिलजीनें नदिया काबीज करून सेनवंशाची समाप्ति केली, (पृष्ठ ९९ पहा). सेनराजे हिंदु होते. त्यांनीं बुद्धधर्माचा पाडाव केला. सेनराजे क्षत्रिय असून ते मूळ कर्नाटकांतून बंगाल्यांत आले. बोपदेवाचें मुग्धबोध नांवाचें संस्कृत व्याकरण सेनवंशाबरोबरच बंगाल्यांत प्रचलित झालें. सेनांच्या वेळेस हिंदु शास्त्रविद्येचा बंगाल्यांत पुनरुद्धार झाला. (अक्षयकुमार मित्र,—मॉडर्न रिव्यू). जातिभेदाची दुर्भेद्य व्यवस्था ह्या सेनांनीं सुरू केली. बाराव्या शतकांत बल्लाळ सेन हा बंगाल्यांत पराक्रमी राजा झाला. (Imperial Gazetteer II).

NATIONAL ARCHIVES OF INDIA

बंगालप्रांत मुसलमानांनीं कसकसा जिंकिला त्याचें वर्णन मागें वेळोवेळीं आलें आहे. सन ११९८त बखत्यार खिलजीनें बंगालप्रांत जिंकिल्यापासून तेथचे अंमलदार बहुतेक स्वतंत्रतेनेंच कारभार करीत. त्यांचें पारिपत्य करण्यासाठीं दिल्लीच्या सुलतानांनीं बंगाल्यावर अनेक स्वाऱ्या केल्या, त्यांचें वर्णनही वर ठिकठिकाणीं आलेंच आहे. कांहीं काळपर्यंत बंगालच्या कारभाराचे दोन विभाग होते, पूर्वबंगालचा कारभार डाक्का नजीक सोनारगांव म्हणून आहे तेथून चाले; आणि पश्चिमबंगालचा हुगळी नजीकच्या सातगांवाहून चाले. महंमद तुघ्लख दिल्लीस राज्य करीत होता, तेव्हां कदरखान नामक सरदार बंगाल व ब्रहार प्रांताचा सुभेदार होता. फकिरुद्दीन नामक दुसऱ्या एका गृहस्थानें बादशहाविरुद्ध बंड करून कदरखानास ठार मारून पूर्वेकडील प्रांतावर स्वतंत्र राज्य स्थापिलें, (स.१३४१). पण अडीच वर्षांनीं मलीक-अली-मुबारिक नामक सरदारानें फकिरुद्दीन यास ठार मारून तें राज्य आपण घेतलें. मलीकअलीही दोन वर्षांतच मारला गेला. नंतर हाजी-इल्यास ऊर्फ शम्सुद्दीन पूर्बी हा बंगालचा सुलतान झाला. हा आपल्या कामांत दक्ष असल्यामुळें महंमद तुघ्लखच्या हातून त्याचें पारिपत्य होईना. सन १३५१त फिरोज तुघ्लख जातीनिशीं त्याजबरोबर संग्राम करण्यास गेला. पण त्या प्रयत्नांत त्यास यश न येऊन इल्यासनें सोनारगांव व सातगांव येथील ठाणीं मोडून, लक्ष्मणावती ऊर्फ लखनौती येथें आपल्या लष्करचें ठाणें नेलें. लखनौतीस त्यानें गौड असें नांव दिलें. ह्याच शहरास पुढें कांहीं दिवस जन्नताबाद म्हणजे स्वर्ग-नगर असें नांव मिळालें होतें. पांडवा म्हणून दुसरें एक जुनें शहर होतें त्यास फिरोजशहानें फिरोजाबाद असें नांव दिलें. हेंच शहर बंगालच्या सुलतानांची राजधानी होतें.

शम्सुद्दीन पूर्बी सन १३५७त मरण पावला. शम्सुद्दीन भांग पीत असे, म्हणून त्यांस 'भांगरा' असें टोपणनांव मिळालें होतें. शम्सुद्दीननंतर त्याचा मुलगा सिकंदर ह्यानें दहा वर्षें राज्य केलें. ह्या अवधींत एकवार त्यास फिरोजशहाबरोबर लढावें लागलें. त्या वेळीं सिकंदरचा पराजय होऊन त्यानें फिरोजशहास नियमितपणें खंडणी पाठविण्याचें कबूल केलें.

बंगालच्या इतिहासाविषयीं मुसलमानी ग्रंथांत फारच थोडा उल्लेख आहे. राज्यकर्त्यांचीं नांवें, आणि राज्यरोहणाचे व मरणाचे काल एवढें

मात्र दिलेलें आहे. सिकंदरचा मुलगा ग्यासुद्दीन पूर्बी सन १३६७त गादीवर बसला आणि सन १३७४ त मरण पावला. ग्यासुद्दीनचा मुलगा सुलतान-उस्-सलातीन ह्यानें नऊ वर्षें राज्य केलें. त्याचा मुलगा दुसरा शम्सुद्दीन हा दुर्वृत्त होता, तो तीन वर्षांतच मरण पावला, (स. १३८६). त्याचें राज्य कंस नामक एका हिंदु जमीनदारानें बळकाविलें. स. १३९२त कंस मरण पावल्यावर त्याचा मुलगा जितमल्ल ह्यास बंगालचें राज्य प्राप्त झालें. पण त्यास विपरीत बुद्धि आठवून त्यानें मुसलमानी धर्म स्वीकारिला आणि जलालुद्दीन असें नांव धारण करून राज्य करूं लागला. पुढें त्यानें सन १४०९ पर्यंत पराक्रमानें राज्य केलें. त्याचा मुलगा अहंमद ह्यानें त्याचे मागून अठरा वर्षें राज्योपभोग घेतला. अहंमदानंतर नासिरशहा नांवाचा सुलतान झाला, पण तो दोन वर्षांतच आटपल्यावर बूर्बक ह्यानें सतरा वर्षें शांततेनें राज्य केलें. तो सन १४४५त मरण पावल्यावर बारा वर्षें यूसुफ्शहा हा सुलतान होता. यूसुफ्शहानंतर चार वर्षें बऱ्याच घालमेली होऊन शेवटीं सन १४६१त, फिरोज पूर्बी नांवाचा सुलतान तख्तारूढ झाला. ह्यानें गौड राजधानींत सन १४९३ पर्यंत सुखानें राज्य केलें. त्याच्या पश्चात् कलह माजून सन १४९६त अलाउद्दीन पूर्बी ह्याच्या हातीं राज्यकारभार गेला. हा पराक्रमी व सज्जन निघाला, आणि मोठ्या ऐश्वर्यानें सन १५२३ पर्यंत राज्यकारभार हाकून अलाउद्दीन मरण पावला. त्याचा मुलगा नशीब हा राज्यकारभार चालवीत असतां, बंगाल व बहार ह्या प्रांतांचें राज्य शीरखान सूर यानें जिंकिलें, ती हकीकत मोगल बादशहांच्या कार्किर्दीत येईल. बंगालचे सुलतान बहुतेक तुर्क व अफगाण होते. कांहीं दिवस तेथील सर्व सत्ता आफ्रिकेंतून आलेल्या हबसी लोकांच्या हातीं होती. सुलतानांचा थाट मोठा असून, तेथील जुन्या इमारतींवरून त्यांच्या वैभवाची साक्ष अद्यापि पटते.

बंगालप्रांताचा वरील इतिहास अगदीं त्रोटक आहे, तरी तसल्या इतिहासावरून सुद्धां एक गोष्ट व्यक्त होते, ती अशी, कीं हा प्रांत धनधान्यानें समृद्ध होता. गौड हें फार मातबर, विस्तीर्ण व शोभिवंत शहर होतें. हल्लीं तें शहर मोडून जाऊन त्याच्या ठिकाणीं मोठालीं अरण्यें वाढलीं आहेत. हें मालडाच्या आग्नेयीस सहा मैलांवर आहे. तेथें मुसलमानांनीं बांधिलेल्या मशीदी, वाडे वगैरे दृष्टीस पडतात. प्रत्येक सुलतानाचें कांहीं

तरी स्मारक तेथें आहे. मशीदींस संगमरवरी दगड लाविलेले आहेत, त्यांच्या आंतल्या बाजूस हिंदु देवतांच्या प्रतिमा आहेत, त्यावरून ते मूळ देवळांचे काढून घेतलेले आहेत, हें उघड होतें. अनेक मशीदींचे घाट सुद्धां हिंदु रीतीचे आहेत. बंगालप्रांताचा व्यापार पूर्वेस व पश्चिमेस फार दूरपर्यंत अतिशय चालत असल्यामुळें लोक पुष्कळ सधन होते. गुलाम हुसेन म्हणतो, बहुतेक सर्व श्रीमंत लोक सोन्याच्या ताटांत जेवीत असत. सन १५२७त शीरशहानें गौड शहर लुटलें, आणि सन १५७५त एक मोठा प्लेग येऊन पुष्कळ लोक मेले, तेव्हांपासून गौडचें वैभव लयास गेलें, तें त्यास पुनः प्राप्त झालें नाहीं. तेथील जुन्या मोठमोठ्या इमारती पडून गेल्या आहेत. त्यांचे दगड व चुना नेऊन विकण्याचा पुष्कळ दिवस एक धंदाच चालला होता. हा धंदा करण्याबद्दल सरकारांत दरसाल आठहजार रुपये वसूल येत असे.

१४०१-१५५८

३. माळवा, (सन ~~१४००~~–१५२६).—दक्षिणेस नर्मदा नदी, उत्तरेस चंबळ, पश्चिमेस गुजराथ, आणि पूर्वेस बुंदेलखंड वगैरे प्रांत, ह्या माळवाप्रांताच्या चतुःसीमा पूर्वापार समजल्या जात आहेत. हा प्रदेश बऱ्याच अंशीं उंच सपाटीचा व सुपीक असून हवाही चांगली आहे. पौराणिक काळीं माळवाप्रांतावर राज्य करीत असलेले राजे सर्व भरतखंडांत नांवाजलेले होते. राजा विक्रमादित्य व राजा भोज हे त्यांपैकींच होत. अवंती ही त्या राजांची राजधानी होती. हिंदुस्थानच्या अत्यंत भरभराटीच्या काळांत उज्जनी शहराएवढें विद्या व कला यांनीं सुसंपन्न असें दुसरें शहर पृथ्वीच्या पाठीवर नव्हतें. हिंदुधर्माचें पुनरुज्जीवन ह्या माळवा प्रांतांत सुरू झालें. माळव्याच्या राजांच्याच आश्रयाखालीं संस्कृत भाषेचा बहुतेक विस्तीर्ण ग्रंथसंग्रह तयार झाला. आरंभींच्या मुसलमानांस माळवा प्रांतांत आपलें ठाणें बसविण्यास फारच प्रयास पडले. गुलामवंशी सुलतान अल्तमश ह्यानें सन १२२६त माळवाप्रांत जिंकून दिल्लीच्या अंमलाखालीं आणिला. सन १२३१त ग्वालेर व उज्जनी हीं दोन शहरें त्या सुलतानानें काबीज केलीं. त्या वेळेस उज्जनी शहरांतील सर्व पुरातन सुंदर मंदिरांचा व राजगृहांचा त्यानें विध्वंस केला. तेव्हांपासून माळवाप्रांताची व्यवस्था दिल्लीदरबारकडून होऊं लागली.

सन १३८७त दिलावरखान घोरी म्हणून फिरोज तुघ्लखच्या पदरीं एक सरदार होता, त्यास त्या सुलतानानें माळव्याच्या सुभेदारीवर नेमिलें. फिरोजच्या मरणानंतर दिल्लींत धामधूम उडाली, त्या अवधींत दिलावरखानानें दिल्लीचा ताबा झुगारून देऊन माळव्यांत स्वातंत्र्य धारण केलें. तो उज्जनींत न राहतां धार व मांडवगड येथें राहूं लागला. थोड्याच वर्षांनीं मांडवगड ही माळव्याच्या मुसलमानी सुलतानांची राजधानी झाली. मध्यहिंदुस्थानांत मांडवगडाइतका पुरातन व मजबूद किल्ला दुसरा नाहीं. सन १३९८त तयमूरलंगानें दिल्लीवर स्वारी केली, तेव्हां तेथचा सुलतान महंमूद तुघ्लख गुजराथेंत पळून आला. पण गुजराथच्या सुलतानानें त्यास आश्रय न दिल्यामुळें तो माळव्यांत दिलावरखानाकडे गेला. दिलावरखानानें त्यास तीन वर्षें सन्मानपूर्वक आपल्यापाशीं ठेवून घेतलें; आणि तो परत दिल्लीस गेल्यावर दिलावरखानानें आपल्या नांवाचें नाणें पाडून माळव्यांत स्वतंत्र राज्यकारभार सुरू केला, (स. १४०१). सन १४०५त दिलावरखान मरण पावला; आणि त्याचा मुलगा आलफ्खान हा सुलतान हुशंग घोरी असें नांव [illegible] मांडवगड येथें तख्तावर बसला. पण सरदार मंडळीस तो आवडत नसल्यामुळें त्यांच्या सल्ल्यानें गुजराथचा सुलतान मुज्फरशहा ह्यानें माळव्यावर स्वारी करून हुशंगास काढिलें, आणि तो प्रांत जिंकून आपला भाऊ नुस्रत ह्याच्या ताब्यांत दिला. पण नुस्रतखानानें तो प्रांत लवकरच सोडून दिल्यामुळें, हुशंगशहानें मुज्फरशहाशीं स्नेह करून माळव्याचें राज्य परत मिळविलें. सन १४१०त मुज्फरशहा मरण पावल्यावर गुजराथेंत भानगडी झाल्या, त्यांच्या योगानें हुशंगशहास पूर्वीच्या अपमानाचा सूड घेण्यास फावलें. त्यानें स. १४१८त गुजराथेवर स्वारी केली, पण तींत त्याचाच पराजय झाला. सन १४२८त महाराष्ट्राचा बहामनी सुलतान अहंमदशहा ह्यानें हुशंगशहाचा पूर्ण पराभव केला. तेव्हांपासून विपत्ति भोगून तो सन १४३२त मरण पावला. मांडवगडचा किल्ला हुशंगशहानें उत्कृष्ट रीतीनें बांधून मजबूद केला. त्या काळीं मांडवगडाइतके मजबूद किल्ले क्वचितच होते. मांडवगड येथें हुशंगशहानें बांधिलेली जुम्मामशीद फार प्रेक्षणीय आहे. हुशंगशहाच्यानें शत्रूंपासून आपला बचाव करवला नाहीं, तरी तो आपल्या राज्यांत फार प्रिय

होता.[1] हिंदु लोकांच्या देवळांस धक्का न लावितां, सर्वांस त्यानें ममतेनें व निष्पक्षपातानें वागविलें, त्याबद्दल माळव्यांतलि लोकांत अद्यापि त्याची आठवण निघते. त्यानेंच हुशंगाबाद शहर स्थापिलें.

हुशंगशहाच्या पश्चात् त्याचा मुलगा गज्नीखान[2] तख्तनशीन झाला; पण त्यास वजीर महंमूदखान खिलजी ह्यानें ठार मारून माळव्याचें राज्यपद मिळविलें. तेव्हां माळव्याच्या घोरी वंशाची समाप्ति होऊन, खिलजी वंशाचा अंमल सुरू झाला, (१४३५). सुलतान महंमूद खिलजी हा शूर व चतुर होता. परशत्रूंशीं लढण्यांत गुंतला असतां त्यानें अंतर्व्यवस्थेची हेळसांड केली नाहीं. मेवाडचा राणा कुंभ ह्याजबरोबर महंमूद शहाचें घनघोर युद्ध सुरू झालें. त्यांत कुंभ राण्यास जय मिळून त्यानें चितोड येथें विजयस्तंभ उभारिला, तो अद्यापि आहे, (स. १४४०). पुढें रजपुतांनीं अनेक विजय ह्या मुसलमानांवर मिळविले. सन १४५१त त्यानें गुजराथ प्रांतावर स्वारी केली, पण तींत त्यास यश आलें नाहीं. सभोंवारच्या रजपूत राजांशीं त्याचे झगडे अव्याहत चालू होते. सन १४५५त किरवली, अजमीर व रतनभोर येथील राजांस त्यानें जिंकिलें. [redacted]दां त्यानें महाराष्ट्रावर स्वारी करून बहामनी सुलतानाचा प्रत्यक्ष बेदर राजधानींत पराजय केला; आणि इलिचपूरचा परगणा घेऊन तो परत आला. सन १४६९त सुलतान मरण पावला. त्याच्या कार्किर्दींतही मांडवगड येथें पुष्कळ इमारती झाल्या. हुशंगशहानें सुरू केलेली मशीद त्यानें पुरी केली, तीस ३६० कमानी व २०० घुमट आहेत. आपल्या राज्यांतलि हिंदु प्रजेस त्यानें त्रास दिला नाहीं. तो परराज्यांत स्वाऱ्या करी, त्या वेळेस मात्र त्यांला त्रास पोंचत असे.

महंमुदाचा पुत्र ग्यासुद्दीन हा त्याच्या मागून माळव्याचा सुलतान झाला. तो आपल्या बापाबरोबर हरएक प्रकारचीं कामें करून कसलेला होता. त्यानें पुष्कळ वर्षे शांततेनें राज्याचा उपभोग घेतला. त्यास छानछोकी फार आवडे. तरी राज्यकारभारांत दक्ष असल्यामुळें माळव्यांतील लोकांस त्याच्या कार्किर्दींत जितकें सुख मिळालें, तितकें अलीकडे पुष्कळ वर्षे त्यांस प्राप्त झालें नव्हतें. सन १५०० ह्या वर्षीं सुलतान ग्यासुद्दीन मरण पावला. पुढें त्याच्या पुत्रांत राज्यप्राप्तीविषयीं तंटे लागून सुल्तान नासिरुद्दीन हा तख्तनशीन झाला. त्याच्या कारकिर्दींत महत्त्वाच्या

NATIONAL ARCHIVES OF INDIA

...ी फारशा घडल्या नाहींत. चितोडवर स्वारी करून तेथील राजाचा ...यानें एकदां पराजय केला. सन १५१२त सुलतान नासिरुद्दीन मरण पावला. नासिरुद्दीनचा मुलगा महंमूद यास महाप्रयासानें तख्त प्राप्त झालें. त्यांत मेदिनीराय नांवाच्या एका रजपूत सरदाराची त्यास चांगली मदत होती. म्हणून पुढें सर्व अधिकार मेदिनीरायाच्या हातांत आला. रायानें जुने मुसलमान कामगार काढून टाकून राज्यांत हिंदूंचा पुष्कळ भरणा केला, तेव्हां त्याचें व सुलतानाचें वितुष्ट आलें. दोघांची हातघाई होऊन सुलतान गुजराथेंत पळून गेला. तेथून मुज्फरशहाची मदत घेऊन तो परत आला. मुज्फरशहानें सर्व रजपुतांस हांकून देऊन मांडवगड काबीज केला. मेदिनीराय पळून मेवाडच्या संग राण्याच्या आश्रयास जाऊन राहिला. तेव्हां अर्थात् संग राण्याशीं सुलतान महंमूदची लढाई जुंपली. लढाईंत रजपुतांनीं सुलतानास जेर करून, घायाळ झाला असतां जिवंत पकडिलें. संग राण्यानें मोठ्या काळजीनें सुलतान महंमुदाच्या सर्व जखमा बऱ्या केल्या आणि सर्व इतमामासह त्यास त्याच्या राजधानीस परत पाठवून दिलें. ह्याच जर संग राणा मुसलमानांचे हातांत सांपडता, तर त्याची त्यांनीं काय दशा केली असती ह्याची कल्पना वाचकांनींच करावी.

सन १५२५त गुजराथचा सुलतान मुज्फरशहा मरण पावल्यावर बहादूरशहाच्या विरुद्ध ज्या खटपटी झाल्या, त्यांत माळव्याच्या महंमूदशहाचें अंग होतें. म्हणून बहादूरशहानें माळव्यावर स्वारी करून मांडवगड राजधानी काबीज केली. पुढें सुलतान महंमूद यास कैद करून चांपानेरास पाठवीत असतां रस्त्यांत महंमुदाचा खून झाला, (सन १५२६.) ह्या वेळेपासून माळवा प्रांत गुजराथच्या राज्यास जोडला जाऊन तेथील स्वतंत्र राज्याची समाप्ति झाली. अकबर बादशहानें गुजराथप्रांत जिंकिला, तेव्हां माळवाही त्याच्या ताब्यांत गेला. त्यानें आपला मुलगा मुराद याजकडे माळव्याची व्यवस्था सांगितली, ती हकीकत पुढें येईल.

येणेंप्रमाणें इसवी सन १३३७ पासून सन १५२६ पर्यंत माळव्यांत घोरी व खिलजी ह्या दोन घराण्यांतील सुलतानांनीं १३९ वर्षें राज्य केलें. पैकीं सन १४३५पर्यंत घोरी सुलतानांचा अंमल होता. मांडवगड राजधानी प्रसिद्धीस येऊन कित्येक मोटमोठ्या इमारती बांधल्या गेल्या,

ह्यापलीकडे विशेष स्मरणीय गोष्टी ह्या राज्यांत फारशा घडल्या नाहींत. एकंदरींत माळव्याचे राज्यकर्ते प्रजेस त्रास देणारे नव्हते, आणि परशत्रूंपासून राज्याचें संरक्षण करण्यांतच त्यांचा बहुतेक काल निघून गेल्यामुळें राज्याच्या अंतर्व्यवस्थेकडे लक्ष देण्यास त्यांस फुरसतच मिळाली नाहीं.

४. खानदेश, (सन १३७०–१५९९).—पश्चिमेस गुजराथ, उत्तरेस माळवा, पूर्वेस वऱ्हाड व दक्षिणेस महाराष्ट्राची डोंगर सपाटी, ह्या चतु:सीमांमध्यें असलेल्या प्रदेशास खानदेश असें म्हणतात. ह्या देशांतून तापी नदी पूर्वपश्चिम वाहते. हा प्रांत सुपीक असून सुलतानांच्या वेळेस बागाइतानें भरलेला होता. मोगल बादशाहीच्या पडत्या काळांत या प्रांतांतील शेती बंद पडून तेथें जंगलें वाढलीं.

सन १३७०त दिल्लीचा सुलतान फिरोज तुघ्लख यानें मलीक राजी फरुकी ह्यास खानदेशाचा सुभेदार नेमिलें. हा मूळचा उच्च घराण्यांतला असून प्रथम फिरोज तुघ्लखच्या खास पागेंत नोकर होता. एके दिवशीं शिकारींत चुकामुक होऊन सुलतान एकटाच एकीकडे गेला असतां, मलीक फरुकीनें त्याची चांगली शुश्रूषा केली. त्या वेळीं त्याची चलाखी पाहून सुलतानानें त्यास मोठ्या हुद्यास चढवून शेवटीं खानदेशच्या सुभेदारीवर नेमिलें. आपण खलीफा उमरचा बावीसावा वंशज आहों, असें तो म्हणे. त्या वेळच्या महत्त्वाकांक्षी व साहसी लोकांस अशा दूरच्या प्रांताचा स्वतंत्र कारभार प्राप्त होणें त्यांच्या फार फायद्याचें असे. मलीक फरुकीनें थोड्याच वेळांत आपल्या नांवाचा दरारा आसपासच्या प्रांतांवर उत्तम प्रकारें बसविला. सुलतान फिरोज मरण पावल्यावर माळव्याचा सुभेदार दिलावर घोरी व गुजराथचा मुज्फरखान ह्यांचेंच अनुकरण फरुकीनें केलें. आपल्या पक्षास पुष्टि आणण्याकरितां त्यानें दिलावर घोरीच्या मुलीशीं लग्न केलें. गुजराथप्रांत मुज्फरशहाकडून जिंकण्याचें त्याच्या मनांत होतें. पण मुज्फरशहानेंच त्याचा पराजय केल्यावर तो आपल्या राज्यांत स्वस्थ बसला. त्यानें शेती सुधारून प्रजेचा चांगला परामर्ष घेतला, आणि भरभराटीस आणिलेलें राज्य वडील मुलगा मलीक नासीर ह्याचे स्वाधीन करून, आपण सन १३९९त मरण पावला. तालनेर ही त्यानें आपल्या राज्याची राजधानी केली.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

खानदेशच्या आसपास जुनीं हिंदु राज्यें होतीं. अशीरगड, गावीलगड, नरनाळा वगैरे मोठमोठे किल्ले तेथील राजांनीं वऱ्हाडांत बांधिले होते. अश-अहीर म्हणून कोणी एक 'हिंदु राजा होता. त्यानें अशीरगडचा मजबूद किल्ला बांधिला. हा किल्ला मलीक नासीरनें फार कावेबाजपणानें घेतला. अशीरगडचा राजा मलीक फरूकीबरोबर फार स्नेहानें वागत असे. मलीक फरूकी मरण पावल्यावर त्याचा मुलगा नासीर ह्यानेंही बापाचा स्नेह पुढें चालविला. एकदां नासीरनें आपल्या बायकामुलांस राहण्यास अशीरगडच्या राजाजवळ त्या किल्ल्यांत जागा मागितली. राजानें ती विनंति खुशीनें मान्य केल्यावर नासीरनें हत्यारबंद शिपायांनीं भरलेल्या पडद्याच्या पालख्या अशीरगडावर पाठविल्या. राजानें त्यांस आंत येऊं दिलें. त्या हत्यारबंद शिपायांनीं राजाची व सर्व लोकांची कत्तल करून किल्ला नासीर याचे स्वाधीन केला. ह्या अद्भुत धाडसाबद्दल नासीर यास शाबासकी देण्यास झैन-उद्दीन व बुऱ्हाण-उद्दीन असे दोन साधु मुद्दाम दौलताबादेहून खानदेशांत आले. त्यांच्या सन्मानार्थ नासीर यानें दोन शहरें नवीन स्थापिलीं, तीं झैनाबाद व बुऱ्हाणपूर हीं होत. हीं शहरें तापीच्या दोन कांठावर समोरासमोर आहेत. बुऱ्हाणपूर शहर ह्या वेळेपासून खानदेशची राजधानी झालें.

मलीक नासीर याची मुलगी बहामनी सुलतान अला-उद्दीन यास दिलेली होती. या कारणावरून उभयतांमध्यें कलह जुंपून युद्ध झालें, त्यांत नासीरचा पराजय झाला. त्यानेंच त्रासून, चाळीस वर्षें राज्य केल्यावर, तो सन १४३७त मरण पावला.

त्याच्या पश्चात् त्याचा पुत्र मीरन आदिलखान फरूकी हा तख्तनशीन झाला. पण तीन वर्षांच्या आंत त्याचा अशीरगडच्या किल्ल्यांत खून झाल्यावर त्याचा मुलगा मीरन मुबारिकखान फरूकी हा राज्य करूं लागला, (स. १४४१). कोणत्याही युद्धप्रसंगांत न पडतां सतरा वर्षें शांततेनें प्रजेचें कल्याण करून तोही सन १४५७ त परलोकवासी झाला. त्याचा वडील मुलगा आदिलखान फरूकी हा राज्यकारभार पाहूं लागला. त्याजला गुजराथच्या सुलतानानें करभार देण्यास लाविलें. त्याप्रमाणें खंडणी भरून पुष्कळ वर्षें शांततेनें राज्य केल्यावर तो सन १५०३ त मरण पावला. त्याच्या वेळेस खानदेशचें राज्य अत्यंत भर-

भराटीस आलें. बुऱ्हाणपूर शहर त्यानें नानाप्रकारें सुशोभित केलें, आणि तें सर्व हिंदुस्थानांत प्रसिद्धीस आलें. आदिलखान फरूकीनें तापी नदीच्या कांठीं सुंदर वाडा बांधिला, त्याच्या खुणा अद्यापि दृष्टीस पडतात. ह्या वाड्यांतील हवा व उजेड येण्याच्या सोयी इतक्या उत्कृष्ट होत्या, कीं सर्व हिंदुस्थानांत त्या काळीं तशा कोठें नव्हत्या. बाजारांतील जुम्मा-मशीद, तट, उपवनगृहें, मृगयामंदिरें, मृगविहारवनें व नजीकच्या डोंगरांतून नळानें बांधून आणिलेलें विपुल पाणी, ह्यांच्या योगानें बुऱ्हाणपूर शहरांत ह्या सुलतानानें आपलें नांव अजरामर करून ठेविलें आहे. हल्लींच्या पडक्या स्थितींत सुद्धां त्या शहरच्या तत्कालीन वैभवाची साक्ष मिळते. अशीरगड किल्ल्यास शहानें विशेष शोभा आणिली. हीं दोनही स्थळें फार प्रेक्षणीय आहेत. सोन्याचांदीचें काम, रेशमी वस्त्रें, मलमल वगैरे वीणकाम ह्या सुलतानाच्या वेळेस बऱ्हाणपुरांत अत्युत्कृष्ट होत असे. अशा कामांमुळें शहरांत फार भरभराटीचा व्यापार चाले, आणि लाखों लोकांचा निर्वाह होई. प्रस्तुत काळीं सुद्धां तितकें सुबक काम कोठें निघत नाहीं.

आदिलखानाच्या मागून त्याचा भाऊ दाऊद हा तख्तावर बसला. तो सन १५१० त मरण पावला. लगेच त्याच्या अल्पवयी मुलाचा खून होऊन फरूकी घराण्याचा शेवट झाला. तेव्हां गुजराथचा सुलतान महंमूदशहा बेगडा ह्यानें नासीरखान फरूकीचा नातू आदिल यास खानदेशच्या राज्यावर बसविलें. हा आदिल महंमूदशहाच्या मुलीचा मुलगा होता. आदिलशहानें गुजराथच्या मुजफरशहाच्या मुलीशीं लग्न केलें. थोडींच वर्षें शांततेनें राज्योपभोग घेऊन आदिलशहा स. १५२० त मरण पावला. नंतर त्याचा मुलगा मीरन महंमद हा तख्तारूढ झाला. सन १५३७त गुजराथचा बहादूरशहा मरण पावल्यावर दरबारच्या मंडळीनें खानदेशचा सुलतान मीरन महंमद ह्यास गुजराथचें राज्य दिलें. पण तेथें दोन महिन्यांच्या आंतच तो मरण पावला. मीरन बहादुरखान हा खानदेशचें राज्य करीत असतां, इसवी सन १५९९ ह्या वर्षी अकबर बादशहानें तें राज्य जिंकून मोगल अंमलाखालीं आणिलें.

ह्या खानदेशच्या राज्याची विशेष हकीकत देण्याजोगी नाहीं. एकंदरींत राज्यकर्ते जुलमी नसून ते शेती व व्यापार यांस चांगलें उत्तेजन

देत, आणि प्रजेचा प्रतिपाल चांगला करीत. हिंदु लोकांवर त्यांनीं जुलूम केल्याचें दिसून येत नाहीं.

५. जोनपूरचें शर्की घराणें, (सन १३९४–१४९३).—जोनपूर शहर बनारसच्या उत्तरेस सुमारें ५० मैलांवर गोमतीच्या कांठीं आहे. मुसलमानी अमलांत हें शहर फार भरभराटींत असून पूर्वेकडील प्रदेशाचें मुख्य ठिकाण होतें. उत्कृष्ट इमारती बांधण्यांत मुसलमानांची ख्याति आहेच; आणि हिंदुस्थानच्या प्रत्येक भागांत अशा इमारतींवरून मुसलमानी अंमलाची साक्ष चांगलीच पटते. तथापि ह्या बांधकामांत जीं कित्येक स्थळें विशेष नांवाजलेलीं आहेत, त्यांत जोनपूरची गणना आहे. जोनपूर शहर स. १३५१ त फिरोजशहानें वसविलें. त्याचें मूळचें नांव राठगड असें असून, गोमतीच्या समोरच्या तीरावर जाफराबाद नांवाचें शहर आहे. अयोध्या प्रांत हा पूर्वापार हिंदूंच्या भरवस्तीचा व भरभराटीचा होता. त्या प्रांताच्या मध्यभागीं आपलें ठाणें असावें आणि तेथून सर्व प्रांताचा नकशा उतरावा ह्या हेतूनेंच हें शहर फेरोजशहानें वसविलें, आणि महंमद तुघ्लखच्या पूर्वीच्या 'जोना' नांवावरून त्यास जोनपूर हें नांव दिलें. सर्वार नांवाचा एक इसम फिरोजच्या जनानखान्यावर होता, तो पुढें महंमूद तुघ्लखचा वजीर होऊन ख्वाजा जहान झाला. त्यास मलीक-उस्-शर्क असा किताब देऊन, सुलतानानें जोनपूरच्या सुभेदारीवर नेमिलें. शर्क शब्दाचा अर्थ आरबी भाषेंत पूर्व असा आहे. महंमूद तुघ्लखच्या कार्किर्दींत जिकडे तिकडे धामधूम सुरू झाली, तेव्हां ह्या सुभेदारानें जोनपूर येथें स्वातंत्र्य धारण केलें, (सन १३९४). तेव्हां ह्या वंशास शर्की हें आडनांव पडलें. सुलतान मलीक-उस्-शर्क हा सन १३९९त मरण पावला. त्याचा पुत्र मलीक खुर्रम् फाल (कर्ण फल ?) हा मुबारिकशहा शर्की ह्या नांवानें तख्तावर बसला. हें वर्तमान ऐकून दिल्लींतील वजीर मल्लू इक्बालखान ह्यानें जोनपुरावर स्वारी केली; पण तेथें तुघ्लखांच्या अमलाची स्थापना त्याच्या हातून झाली नाहीं. दिल्लीस अंदाधुंदी चालली असतां ह्या शहानें विद्येस उत्तेजन देऊन आणि इतर सत्कृत्यें करून चांगला लौकिक मिळविला. मुबारिकशहा सन १४०१त मरण पावल्यावर त्याचा मुलगा इब्राहीमशहा शर्की हा जोनपूरचा सुलतान झाला. महंमूद तुघ्लख व त्याचा वजीर इक्बालखान ह्यांनीं पुनरपि

पूर्वेकडील प्रांत परत मिळविण्याची खटपट बरेच वर्षें केली, पण तींत त्यांस यश आलें नाहीं. इक्बालखान १४०५ त मरण पावला, आणि महंमूद तुघ्लख कनोज येथें राहत होता, तो परत दिल्लीस आला. तेव्हांपासून पुष्कळ वर्षेंपर्यंत इब्राहीमशहानें शांतपणें राज्योपभोग घेतला. एकदोनदां दिल्लीचा सुलतान सय्यद मुबारिक व माळव्याचा सुलतान हुशंग याजबरोबर लढण्याचे त्यास प्रसंग आले. जोनपूरच्या राज्यांत ह्या सुलतानाचा लौकिक मोठा होता. एकदां त्यानें प्रत्यक्ष दिल्ली काबीज करण्याचाही प्रयत्न केला. सय्यद सुलतानांशीं त्याची लढाई झाली. पुढें तह होऊन दिल्लीच्या सुलतानानें आपली मुलगी जोनपूरच्या राजपुत्रास दिली. एकंदरींत ह्या सुलतानाची कारकीर्द जोनपूरच्या इतिहासांत विशेष स्मरणीय झाली. त्यानें विद्येस उत्तेजन दिलें. सन १४०८त त्यानें बांधिलेली अटाला मशीद फार प्रेक्षणीय असून, तींत हिंदुघाटाचें मिश्रण बिलकूल नाहीं. इब्राहीमशहा सन १४४०त मरण पावल्यावर त्याचा वडील मुलगा महंमूदशहा सुलतान झाला. त्यानें दिल्लीवर स्वारी करून बुह्लोल लोदीशीं युद्ध सुरू केलें. त्या युद्धाचा निकाल होण्यापूर्वी सन १४५७त तो मरण पावला. लालदरवाजा नांवाची एक सुंदर मशीद ह्यानेंही बांधिलेली आहे. नंतर त्याचा पुत्र महंमदशहा सुलतान झाला. तो शूर परंतु क्रूर असल्यामुळें सर्व रयतेस अप्रिय झाला, आणि त्याचा खून झाला. नाना तऱ्हेचे भयंकर प्रकार त्याच्या कार्किर्दींत चालू होते, पण ती पांच महिन्यांहून ज्यास्त टिकली नाहीं. त्याचा भाऊ हुसेनशहा ह्याचे हातीं सुलतानपद आल्यावर त्यानें ओढ्याप्रांतावर स्वारी केली. त्या प्रांतावर कोणी हिंदु राजा राज्य करीत होता. हुसेनशहास तो प्रांत जिंकितां आला नाहीं. तेव्हां पुष्कळ लूट मिळवून तो परत आला. सन १४७३त दिल्लीचा सुलतान बुह्लोल लोदी मोठ्या फौजेनिशीं हुसेनशहावर चालून आला. त्या वेळीं तीन मोठे युद्धप्रसंग होऊन जोनपूरच्या फौजेचा पराभव झाला. सन १४७७त सिकंदर लोदीनें जोनपूरचें राज्य बुडवून दिल्लीच्या अमलाखालीं आणिलें. असा प्रकार झाल्यावर हुसेनशहा शर्की बंगालचा सुलतान अला-उद्दीन पूर्वी याजकडे जाऊन राहिला. हुसेनशहानें जामी-मशीद बांधिली, तिची वरच्या इतर सुंदर इमारतींमध्येंच गणना आहे. सिकंदर लोदीनें जोनपू-

रच्या अनेक इमारतींचा विध्वंस केला. पुनरपि स. १४८८त त्यानें राज्य मिळविण्याचा प्रयत्न केला तो सिद्धीस गेला नाहीं. स. १४९३त शर्की राज्य लोदीनें कायमचें क़ाबीज केलें.

६. मुलतान, (स. १४४३–१५२४).—कैक वर्षे मुलतान प्रांताचें स्वामित्व बदलत चाललें होतें. गज्नवी महंमुदाकडे तो प्रांत कांहीं दिवस होता. पुढें दिल्लीच्या सुलतानांचे सुभेदार त्याजवर कांहीं काल अंमल करीत होते. कांहीं वर्षे तर तेथें हिंदु राज्याची स्थापना झाली होती. दिल्लीस सुलतान सय्यद महंमद हा राज्य करीत असतां, सन १४४३त मुलतानच्या लोकांनीं त्रासून शेख यूसुफ यास आपला राजा निवडिलें. रायसिन्हा नांवाचा एक लंगा अफगाण जातीचा प्रमुख सरदार मुलतान येथें राहत होता. त्यानें युसुफ यास आपली मुलगी दिली. लग्न मोठ्या थाटानें झालें. पण रायसिन्हा याचे मनांत स्वतः राज्य घ्यावें असें येऊन त्यानें आपल्या जांवयास पकडिलें, आणि कुत्बुद्दीन असें नांव धारण करून, तो मुलतानास स्वतंत्रपणें राज्य करूं लागला, (स.१४४५). शेख यूसुफ हा दिल्लीस जाऊन राहिला. कुत्बुद्दीन लंगा ह्यानें सन १४६९ पर्यंत शांततेनें राज्य केलें.

त्याचा मुलगा हुसेनशहा सन १४६९त तख्तावर बसला. दिल्लीचा सुलतान बुह्लोल लोदी ह्यानें मुलतानप्रांत परत घेण्याचा यत्न केला, पण तो सिद्धीस गेला नाहीं. हुसेनशहा स. १५०२ ह्या वर्षी वृद्धापकाळीं मरण पावला. हा विद्येचा मोठा पुरस्कर्ता असून त्यानें पुष्कळ पाठशाळा स्थापिल्या. त्याचा मुलगा महंमूद हा दुर्वृत्त असल्यामुळें वजीर जाम बायजीद यानें मुलतानचें बरेंच राज्य बळकाविलें. पंजाबचा सुभेदार दौलतलोदी ह्यानें रावीनदी ही मुलतानच्या राज्याची आपल्या बाजूची हद्द ठरविली. महंमूद लंगा सन १५२४त मरण पावल्यावर त्याचा मुलगा दुसरा हुसेनशहा तख्तावर असतां, बाबर बादशहाच्या सांगीवरून पंजाबचा सुभेदार शहा हुसेन अर्घून यानें मुलतानचा किल्ला काबीज केला, आणि तें राज्य दिल्लीच्या अमलाखालीं आणिलें, (सन १५२५). येणें प्रमाणें लंगा घराण्याची समाप्ति झाली.

७. सिंध, (सन १२१४–१५२३).—सन ७११त महंमद कासीमनें स्वारी केल्यानंतर, सिंधप्रांत सुमेर नामक रजपुतांच्या ताब्यांत गेला,

हें मागें सांगण्यांत आलें आहे. घोरी व गुलाम सुलतानांनीं सिंधप्रांत जिंकण्याचे अनेक प्रयत्न केले, पण त्यांत त्यांस फारसें यश आलें नाहीं. सुमेरवंशी रजपुतांची हकीकत विशेष उपलब्ध नाहीं. गुलाम सुलतान कुत्बुद्दीन ह्याचा जांवई नासिरुद्दीन कुबाचा ह्यानें बरेच दिवस सिंध प्रांतावर स्वतंत्रपणें कारभार केला. ख्वारिज्मचा सुलतान जलालुद्दीन हा सिंधप्रांत जिंकण्याकरितां कुबाचाबरोबर पुष्कळ वर्षें झगडत होता. सन १२२४त सुलतान अल्तमश ह्यानें सिंध प्रांत जिंकण्यासाठीं फौज पाठविली. त्या झगड्यांत नासिरुद्दीन कुबाचा सिंधु नदींत बुडून मरण पावला. तेव्हांपासून सन १३२६ पर्यंत सिंधप्रांत दिल्लीच्या सुलतानाकडे होता. सन १३३६त जाम अफ्रा नामक सुमेरवंशी रजपूत राजानें दिल्लीचा ताबा झुगारून स्वातंत्र्य धारण केलें. तो सन १३३९त मरण पावल्यावर जाम चोभान गादीवर बसला. त्यास जिंकण्यासाठींच महंमद तुघ्लखनें गुजराथ व सिंध प्रांतांवर स्वारी केली होती. पण त्या स्वारींत तो सुलतान ठट्टा शहरीं मरण पावला. जाम चोभान सन १३५३ त मरण पावल्यावर जाम बनी हा सिंध प्रांताचा राजा झाला. हा वेळपर्यंत जाम राजे दिल्लीच्या सुलतानास खंडणी देत होते असें दिसतें. जाम बनी ह्यानें खंडणी पाठविण्याचें नाकबूल केल्यामुळें फिरोज तुघ्लखनें सिंधप्रांतावर स्वारी केली, (स. १३०७), आणि जाम बनी यास पकडून दिल्लीस नेलें; परंतु तेथें त्यास सत्कारानें वागवून स्वदेशीं परत पाठविलें. जाम बनी सन १३६७त मरण पावला. नंतर त्याचा भाऊ जाम तिमाजी ह्यानें सन १३८०पर्यंत राज्य केलें. ह्याच्या पुढच्या रजपूत राजानें मुसलमानी धर्म स्वीकारिला, तेव्हांपासून जाम म्हणजे मुसलमानी राजे असें समजलें जातें. ह्या जाम वंशाच्या केवळ नांवांशिवाय ज्यास्त माहिती मिळत नाहीं.

तिमाजीच्या पाठीमागून जाम सलातीन राज्य करूं लागला, तो सन १३९१त मरण पावला. नंतर जाम निजामुद्दीन सन १३९३त व जाम अली शेर १४०९त मरण पावले. पुढें जाम फत्तेखान गादीवर बसला, तो सन १४२३त मरण पावला. जाम तुघ्लखनें सन १४२३ पासून १४५० पर्यंत राज्य केलें. अशा प्रकारें केवळ नांवें देण्यांत अर्थ नाहीं. जाम निजामुद्दीन नंद हा राज्य करीत असतां सिंध प्रांताचा उत्तरभाग

व बक्करचा मजबूत किल्ला कंदाहारच्या तुर्क लोकांनीं स्वारी करून काबीज केला. सन १५२०त मुलतानचा सुलतान शहाबेग अर्घून यानें जाम फिरोज याजपासून सिंध प्रांत जिंकून आपल्या राज्यास जोडिला. तेव्हां जाम फिरोज गुजराथच्या बहादूरशहाकडे जाऊन राहिला. त्याजबरोबरच जाम वंशाची समाप्ति झाली. सन १५२४त शहाबेग अर्घूनचा पुत्र शहा हुसेन अर्घून ह्यानें बाबरच्या सांगण्यावरून सर्व प्रांत जिंकला. यापुढची सिंध प्रांताची हकीकत मोगल बादशहांच्या कार्किर्दीत येईल.

स्वतंत्र झालेल्या मुसलमानी राज्यांचे वृत्तान्त येथें संपले. तरी मुसलमानांशिवाय रजपुतांचीं पुष्कळ राज्यें ठिकठिकाणीं होतीं. त्यांची हकीकत दिल्याशिवाय एकंदर हिंदुस्थानचा हा मध्यकालीन इतिहास पुरा होत नाहीं. शिवाय पुढें मोगलांचे व मराठ्यांचे बहुतेक मोठमोठे झगडे ह्या रजपूत राज्यांबरोबर झालेले आहेत. ते सर्व नीट कळण्यासाठीं तीन मुख्य रजपूत राज्यांची हकीकत पुढील प्रकरणीं देणें जरूर आहे.

प्रकरण अठरावें.

स्वतंत्र रजपूत राज्यें.

इ. स. १०००—प्रस्तुतकालपर्यंत.

१. रजपुतांच्या इतिहासाचें स्वरूप. २. मेवाड,-राणासंग पर्यंत.
३. राणासंग पासून प्रतापसिंहापर्यंत. ४. प्रतापसिंहापासून आजतागाईत.
५. जयपूरचा इतिहास. ६. जोधपूरचा इतिहास.
७. रजपुतांच्या इतिहासाचें समालोचन.

१. रजपुतांच्या इतिहासाचें स्वरूप.—हिंदुस्थानच्या बहुतेक इंग्रजी ग्रंथांत रजपूत राज्यांच्या हकीकतींला स्वतंत्र स्थळ दिलेलें नाही. मुसलमानी रियासतीचा इतिहास रजपुतांच्या इतिहासाशिवाय पूर्ण होत नाहीं. रजपुतांचा इतिहास म्हणजे हिंदुस्थानचा राष्ट्रेतिहास होय. अठराव्या शतकांतील मराठ्यांचा इतिहास स्वराष्ट्राच्या दृष्टीनें विशेष उपयुक्त व प्रधान गणला जातो, त्याचप्रमाणें मुसलमानांच्या अम्मल कार्किर्दीत

रजपुतांचा इतिहास महत्त्वाचा व उपयुक्त आहे. 'इंग्रजांसारख्या परकीयांचा प्रवेश हिंदुस्थानांत होण्यास एकट्या मराठ्यांचाच कायतो अडथळा आहे,' असें अनेक मुत्सद्यांचें मत होतें. तद्वतच मुसलमानांचा प्रवेश हिंदुस्थानांत होण्यास जबरदस्त अडथळा रजपूत लोकांचाच होता. मुसलमानांचे सर्व मोठमोठे झगडे रजपुतांबरोबर झाले आहेत. वीर्यशाली रजपुतांच्या हस्तें मुसलमानांचा निःपात होण्याचे अनेक प्रसंग आले होते, परंतु रजपुतांस यश आलें नाहीं. बाबरच्या कारकीर्दींत संगराणा, व पुढील एकदोन कारकीर्दींत जयसिंह, अभयसिंह वगैरे एका हाताच्या बोटावर मोजतां येतील इतकीं नांवें फार तर विद्यार्थ्यांस माहीत होतात. अर्थात् रजपूत घराण्यांची संगतवार हकीकत आपणापुढें न आल्यानें राष्ट्रेतिहासाच्या एका मोठ्या भागास *आपण मुकतों; आणि अनेक स्वराष्ट्रनिंदापर कल्पना विद्यार्थ्यांच्या डोक्यांत भरतात. बाबर आपला व संगराणा शत्रु असा विपर्यास* घडतो. अर्थात् आमची आम्हांसच ओळख राहत नाहीं. शिंदेहोळकरांचा पाडाव करणारा वेल्स्ली व हिंदुस्थानदेश जिंकून इंग्लंडचे ताब्यांत देणारे दुसरे इंग्रज मुत्सद्दी यांजविषयींही आमच्या ऐतिहासिक कल्पना वरच्यांहून फारशा भिन्न नाहींत. हा विपर्यास समूळ काढून टाकण्यास इतिहासाचें स्वरूप सर्वांशीं निराळें करावें लागेल. मुसलमानांच्या उत्कर्षाचा इतिहास न देतां हिंदूंच्या अपकर्षाचा इतिहास असें त्यास नांव देऊन तदनुरूप सर्व फेरफार करावे लागतील. उत्कर्षाचा इतिहास जितका उपयुक्त, तितकाच, किंबहुना ज्यास्त, अपकर्षाचा इतिहास उपयुक्त असतो, हें ग्रीक, रोमन वगैरे राष्ट्रांच्या इतिहासांवरून व्यक्त होतें. तथापि हिंदुस्थानच्या इतिहासावरील अलीकडील पाश्चात्य ग्रंथांनीं आपल्या इतिहासाचें स्वरूप इतकें निश्चित करून ठेविलें आहे, कीं तें आतां बदलणें बहुतेक दुरापास्तच आहे. तथापि रजपूत राजांशीं मोगल बादशहांचे, त्यांच्या पश्चात् मराठ्यांचे व अंशतः इंग्रजांचे जे व्यवहार घडले, त्यांचें स्वरूप बरोबर समजण्याकरितां *रजपुतान्यांतील* तीन प्रमुख घराण्यांचे इतिहास अगदीं त्रोटकपणें येथें दिले आहेत. इतर घराण्यांशींही अनेक व्यवहार घडले, पण ते सर्व येथें देणें शक्य नाहीं. रजपुतांचा इतिहासकार कर्नल टॉड ह्याचा ग्रंथ

NATIONAL ARCHIVES OF INDIA

इतका विस्तृत, व रजपुतांच्या आख्यायिकांनीं इतका ओतप्रोत भरलेला आहे, कीं त्याचें मुसतें सार देण्याचा प्रयत्न केला तरी निराळाच ग्रंथ होईल, म्हणून परिशिष्टांत ज्या वंशावळी दिल्या आहेत, त्यांची स्पष्ट फोड करण्यापलीकडे ज्यास्त हकीकत प्रस्तुतस्थळीं देतां येत नाहीं. वरील तीन घराण्यांची हकीकत प्रस्तुत काळापर्यंत आणून पोंचविली आहे, कारण पुढील अनेक प्रकरणांत तिचा उपयोग पडणार आहे. मोगलबादशाहीच्या उतारवयांत, मराठ्यांच्या इतिहासांत व इंग्रजी राज्यस्थापनेच्या हकीकतींत ह्या घराण्यांचा उल्लेख वारंवार येईल. ज्या हकीकती विस्तारेंकरून इतरत्र यावयाच्या आहेत, त्यांचा ह्या प्रकरणांत समावेश केला नाहीं; पुढें न येणाऱ्या कित्येक गोष्टींचा करितां आला तितका विस्तृत उल्लेख येथें केला आहे.

रजपुतांचे अनेक वंश आहेत. त्यांपैकीं उदेपूर, डोंगरपूर, प्रतापगड, बांसवाडा वगैरे कित्येक संस्थानांतील राजे सूर्यवंशी सिसोदिया आडनांवाचे आहेत. जोधपूर, बिकानेर, ईडर, किशनगड, रतलाम, झभू वगैरे संस्थानचे राजे राठोडवंशाचे आहेत. बुंदेलखंडांतील ओर्च्छा, तेहेरी, दतिया, पन्ना, अजयगड, बिजावर, चर्खरी इत्यादि संस्थानिकांस बुंदेले रजपूत अशी संज्ञा आहे. रेवाचे महाराज आपणांस चालुक्यवंशी समजतात. बुंदी, कोटा, झालावाड, शिरोही येथचे संस्थानिक चव्हाणवंशी असून त्यांचें सरनांव 'हाडा' असें आहे. काठेवाडांतील कच्छ, नवानगर, गोंडळ, राजकोट, मोरवी हे चंद्रवंशीं यादव कुळांतील असून, त्यांचें नांव 'जाडेजा' असें आहे. जसलमीरचे चंद्रवंशी भट्टी व भावनगरचे चंद्रवंशी गोहेल होत. ध्रांगध्राचे राजे सूर्यवंशी 'झाला' आडनांवाचे आहेत. जयपूर व अलवार हे सूर्यवंशी असून त्यांचें नांव कच्छवाह असें आहे.

२. मेवाड,–राणासंगपर्यंत, (सन १५०९).—मेवाड हा मध्यवाड म्हणजे मध्यदेश ह्या शब्दाचा अपभ्रंश आहे. सर्व रजपूत राजघराण्यांमध्यें मेवाडचा वंश फार प्राचीन व श्रेष्ठ आहे. तेथचे राज्यकर्ते सिसोदिया आडनांवाचे रजपूत आहेत. अयोध्येचा सूर्यवंशी राजा रामचंद्र याजपासून ते आपल्या घराण्याची उत्पत्ति मानितात. घेलोट हें त्यांचें मूळचें आडनांव आहे. घेलोट वंशांत कनकसेन

नांवाचा राजा पंजाबांत लाहोर* येथें राज्य करीत असून तो रामचंद्रापासून त्रेसष्टावा पुरुष होय. त्यानें पंजाबप्रांत सोडून सौराष्ट्र देश जिंकिला, आणि परमार राजांचा पाडाव करून इ. स. १४४च्या सुमारास वीसनगर शहर स्थापिलें. कनकसेनाच्या वंशजांनीं वल्लभीपूर नांवाचें शहर आपली राजधानी करून वल्लभी नांवाचा नवीन शक सुरू केला. हें शहर भावनगराजवळ होतें. ह्याच वंशांत पुढें शीलादित्य नांवाचा राजा झाला. तो गज्नीस राज्य करीत होता, आणि म्लेंच्छांकडून मारला गेला अशी आख्यायिका आहे. पुढें कांहीं दिवस ईडर येथें ह्या घेलोटवंशी राजांचा अंमल होता. ह्या राज्यां-तील भिल्ल लोकांनीं घेलोट राजा ग्रहादित्य ह्यास ठार मारिलें. तेव्हां त्याच्या बाप्पू नामक अल्पवयी पुत्राचें अनेक साथीदारांनीं अरण्यांत संरक्षण केलें. त्या वेळीं मेवाडांत चितोडगडावर परमार राजे राज्य करीत होते, त्यांजपाशीं बाप्पू हा वयांत आल्यावर चाकरीस राहिला. एक-लिंगजी नामक एक प्रसिद्ध देवालय उदेपुराजवळ आहे, त्या देवाचा बाप्पू हा निस्सीम उपासक होता. सोळंखी कुळांतील एका ठाकुराच्या मुली-बरोबर बाप्पूचें लग्न झालें होतें. परमार राजाची बाप्पूवर मोठी मर्जी असे. शेवटीं प्रबल होऊन बाप्पूनें धन्याचें राज्य बळकाविलें, (सन ७२८). बाप्पू हा रामचंद्रापासून ऐशींवा पुरुष असून चितोडच्या घराण्याचा मूळ पुरुष होय. ह्याच्याच वेळेस सिंध प्रांतावर महंमद कासीमनें स्वारी केली. पश्चिमेकडे इराणपर्यंत सर्व प्रदेश बाप्पू रावळानें जिंकिला होता, असें सांगतात.

बाप्पूरावळानंतर अठरावा पुरुष समरसिंह हा सन ११४०त चितो-डच्या गादीवर बसला. दिल्लीचा पृथ्वीराज चव्हाण ह्याची बहीण पृथा समरसिंहास दिलेली होती. ह्या उभयतांचें चांगलें सख्य होतें. समरसिंह बलाढ्य, शूर, शांत व बुद्धिमान असा होता. त्या वेळचे कवि त्याचें फार वर्णन करितात. सन ११९३त स्थानेश्वरच्या घोर संग्रामांत पृथ्वीराजास मदत करण्याकरितां गेला असतां, समरसिंह धारातीर्थीं पतन पावला. त्याचा वडील मुलगा कल्याणरायही त्याच युद्धांत पडला.

* लहुकोट ऊर्फ लाहोर अशी 'लाहोर' शब्दाची उपपत्ति, रामचंद्राचा पुत्र लहु याच्या नांवावरून, समजतात.

२२-३०-६-७९१-२०००

नंतर समरसिंहाचा धाकटा मुलगा कर्ण हा राज्य करूं लागला. तो लहान असल्यामुळें त्याची आई करुणदेवी ही सर्व राज्याचा कारभार पाही. तिनें महंमद घोरीचा सरदार कुत्ब्-उद्दीन ह्याचा अंबरनजीक पराजय करून आपल्या राज्यास बळकटी आणिली. कर्णापासूनच डोंगरपूरच्या घराण्याची उत्पत्ति आहे.

कर्णानंतर समरसिंहाच्या भावाचा नातू रहूप हा सन १२१० त चितोडास गादीवर बसला. रहूपानें मुसलमानांचा पराजय करून शहाणपणानें राज्य केलें. रहूपापासूनच ह्या घराण्याचीं घेलोट व रावळ हीं नांवें जाऊन, सिसोदे व राणा हीं नवीन नांवें मिळालीं. रहूपापासून नववा पुरुष राणा लक्ष्मणसिंह सन १२७५ त चितोडच्या गादीवर बसला. लक्ष्मणसिंहाचा चुलता भीमसिंह ह्यानें सिंहलद्वीपचा राजा हमीर संक चव्हाण ह्याची लावण्यवती मुलगी पद्मिनी इजशीं लग्न लाविलें. तिच्या अभिलाषानें दिल्लीचा सुलतान अला-उद्दीन खिलजी ह्यानें चितोडगडावर स्वारी केली, तिचें वर्णन मागें आलेंच आहे, (पृ. १२९). सन १३०३त त्यानें पुनरपि चितोडवर स्वारी करून तें राज्य काबीज केलें. त्या प्रसंगीं राणा लक्ष्मणसिंह व त्याचे अकरा मुलगे लढून मेले. पुढें ह्या घराण्यांत हमीर नांवाचा एक विलक्षण पराक्रमी पुरुष निपजला, त्याच्या शौर्यामुळें मुसलमानांच्यानें चितोडच्या घराण्याचा निःपात करवला नाहीं. लक्ष्मणसिंहाचा नातू सुजनसिंह हा सातारकर भोसल्यांचा मूळ पुरुष असें म्हणतात.

उर्सिसिंह म्हणून लक्ष्मणसिंहाचा एक भाऊ होता. त्याचा पराक्रमी मुलगा हमीर हा लक्ष्मणसिंहाच्या पश्चात् रजपुतांचा पुढारी झाला. शिवाजी व हमीर ह्यांच्या आयुःक्रमांत पुष्कळ साम्य आहे. मुसलमानांनीं सर्व रजपुतांचा पाडाव केला असतां, पुनरपि आपलें स्वातंत्र्य परत मिळविण्याचें महाप्रयासाचें काम उभयतांनीं मोठ्या हिंमतीनें तडीस नेलें. हमीरसारखे वीर पुरुष ह्या देशांत शेंकडो निपजले असून, त्यांच्या पराक्रमवृत्तांनीं राष्ट्रेतिहासास रमणीय स्वरूप प्राप्त झालें आहे. अला-उद्दीननें चितोडचा कारभार मालदेव नामक एका रजपूत राजास दिला होता. त्याजकडून हमिरानें युक्तीनें चितोडचें राज्य परत घेतलें. पुढें अला-उद्दीनच्या फौजेचा पराभव करून त्याच्या मुलास आपल्याजवळ कैद

करून ठेविलें, (सन १३१२), आणि मोठी खंडणी घेऊन त्यास सोडून दिलें. हमिरानें मेवाडचेंच राज्य ऊर्जित दशेस आणिलें असें नाहीं, तर सर्व रजपुतांची एकी करून मुसलमानांचा मोड केला. ह्याच्या कार्किर्दीत रजपुतांचें पुरातन वैभव पुनरपि झळकूं लागलें. सर्व हिंदु राजांत हमिराइतका बलिष्ठ राजा त्याच्या वेळेस दुसरा कोणी नव्हता. कलाकौशल्य व कारागिरी ह्यांस उत्तेजन देऊन आणि प्रजेचें योग्य संगोपन करून, त्यानें आपल्या राष्ट्रास भरभराटीस आणिलें. हा पराक्रमी पुरुष सन १३६५त मरण पावला. बनवीर व रणवीर असे हमिराचे दोन मेहुणे होते.

हमीरचा मुलगा खेतसिंह हा बापाप्रमाणेंच पराक्रमी होता. त्यानें आठ वर्षे राज्य केलें. बनोडा येथील संस्थानिकाशीं युद्ध करीत असतां तो मारला गेला, (स. १३७३). नंतर खेतसिंहाचा मुलगा लक्ष्मणसिंह ऊर्फ लाखाराणा हा चितोडच्या गादीवर बसला. तो पराक्रमी, व नीतिमान होता. युद्धसंग्रामानें देशाची विनाकारण खराबी होते, हें जाणून त्यानें रयतेच्या निरंतरच्या कल्याणाकडे विशेष लक्ष पोंचविलें, आणि तलाव, मंदिरें, राजगृहें वगैरे पुष्कळ कामें नवीन केलीं. मारवाडचा राणा रणमल्ल याची मुलगी, जोधसिंहाची बहीण, लाखाराण्यास दिलेली होती. तिच्या पोटचा पुत्र मुकुलजी हा लाखाराणा मरण पावल्यावर चितोडच्या राज्याचा मालक झाला, (सन १३९८). लाखाराण्याचा वडील मुलगा चंद्रसिंह उर्फ चौंडा ह्यानें आपखुशीनें राज्यावरचा हक्क सोडिला, आणि मुकुलजी लहान असतां त्याचा प्रतिपाळ केला. वयांत आल्यावर मुकुलजीनें आपल्या पूर्वजांप्रमाणेंच तलवार गाजविली. सन १४१९त मुकुलराण्याचा खून झाला.

नंतर मुकुलाचा मुलगा कुंभराणा गादीवर बसला. त्यानें पुष्कळ वर्षे फार हुशारीनें राज्य केलें. तो राजकार्यधुरंधर व हुशार होता. चितोडच्या घराण्यांत आजपर्यंत जे सन्माननीय पुरुष होऊन गेले, त्या सर्वांचे चांगले गुण कुंभराण्यांत उतरले होते. त्यानें आसपासच्या मुसलमान राजांचा पाडाव केला. माळव्याच्या सुलतानास युद्धांत पकडून आणिलें, पण खंडणी वगैरे न घेतां मोठ्या सन्मानानें त्यास नजराणे देऊन परत पाठविलें. कुंभराणा स्वतः कवि असून विद्येचा भोक्ता

NATIONAL ARCHIVES OF INDIA

होता. त्यानें बत्तीस नवीन किल्ले बांधिले. त्यांत कुंभेरचा किल्ला फार मजबूद होता. त्याची पत्नी मीनाबाई ही सौंदर्य व औदार्य ह्या गुणांनीं संपन्न असून कुंभराण्यास अनुरूप होती. कुंभराण्यानें पन्नास वर्षें राज्य करून मोठा लौकिक मिळविला. परंतु मोठ्या दुःखाची गोष्ट ही, कीं त्याच्याच राज्यलोभी मुलानें त्यास कपटानें ठार मारिलें, (स. १४६९). त्या मुलाचें नांव उदयसिंह. उदयसिंहानें पांच वर्षें राज्य केलें, आणि वीजपडून सन १४७४त तो मरण पावला. उदयसिंहानें आपल्या दुर्वर्तनानें बापाच्या व एकंदर घराण्याच्या उज्वल कीर्तीस डाग लाविला.

उदयसिंहानंतर त्याचा भाऊ रायमल्ल गादीवर बसला, (स. १४७४). ह्या चांगला पराक्रमी होता. दिल्ली व माळवा येथील सुलतानांचा त्यानें पराभव केला. गुजराथचा सुलतान मुज्फरशाहा ह्यास त्याचा मुलगा पृथ्वीराज ह्यानें कैद करून आणिलें, आणि खंडणी घेऊन सोडून दिलें. रायमल्लाची कार्कीर्द फार नांवाजण्यासारखी झाली असती, पण त्याचे अनेक पुत्र होते त्यांत तंटे लागून त्याचे शेवटचे दिवस फार दुःखांत गेले. सन १५०९ ह्या वर्षी रायमल्ल मरण पावला, तेव्हां त्याचा वडील मुलगा संग्रामसिंह ऊर्फ संगराणा चितोडच्या गादीवर बसला.

३. राणा संगपासून प्रतापसिंहापर्यंत, (स. १५०९-१५९७).— संगराणा फार पराक्रमी निघाला. त्याच्या कार्किर्दीत मेवाडच्या भाग्योदयाचा कळस झाला. सर्व रजपूत राजांपासून करभार घेऊन सार्वभौमाप्रमाणें त्यानें अनेक वर्षें वैभव भोगिलें. माळवा व दिल्ली येथील मुसलमानी फौजांचा त्यानें अनेक वेळां पराभव केला. मुसलमानांवर त्यानें एकंदर अठरा लढाया जिंकिल्या. त्याच्याच वेळेस बाबरानें मोगल बादशाहीची दिल्लीस स्थापन केली. त्यास अडथळा करण्याचें सामर्थ्य संगराण्याच्या मात्र अंगीं होतें. पण दुर्दैवानें फत्तेपूर शिक्रीच्या लढाईत त्याचा पराभव होऊन रजपुतांचें वर्चस्व बाबराच्या ताब्यांत गेलें. ही हकीकत बाबराच्या कार्किर्दीत येईल. संगराणा युद्धांतून निघून गेला, आणि बाबराचा सूड उगविण्याचा बेत करीत असतां अरण्यवासांत मरण पावला, (सन १५३०). संगराण्यानंतर मेवाडच्या राण्यांस मोगलांशीं अव्याहत झुंजावें लागलें. त्या झगड्यांत त्यांच्या अंगचें विलक्षण धैर्य व्यक्त झालें.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

संगराण्याच्या पश्चात् त्याचा तरुण पुत्र रत्नसिंह राज्यावर बसला. त्याच्या अंगींही बापाचे शौर्यपराक्रमादि गुण होते. समरभूमि हीच आपलें वसतिस्थान करून चितोडचें महाद्वार नेहमीं उघडें ठेवण्याचा त्यानें हुकूम दिला. सारांश, मुसलमानांचा निःपात करीपर्यंत विश्रांति घ्यावयाची नाहीं असा त्याचा निश्चय होता. अशा निश्चयामुळेंच बाबरास शिक्रीच्या जयाचा फायदा घेतां आला नाहीं. बापाचें संपूर्ण राज्य रत्नसिंहाकडे राहिलें. एका क्षुल्लक प्रसंगीं बुंदीच्या राजाबरोबर द्वंद्वयुद्ध करीत असतां, रत्नसिंह गादीवर बसल्यापासून पांच वर्षांतच मरण पावला, (सन १५३५).

रत्नसिंहानंतर त्याचा भाऊ विक्रमाजित चितोडचा राणा झाला. तो धाडसी होता; परंतु अंगीं शहाणपणा नसल्यामुळें त्यानें आपलें पुष्कळ वैभव गमाविलें. राज्यकारभाराकडे तो लक्ष देत नसे. त्यानें आपल्या फौजेंत नुसत्या पायदळाची भरती केली. तेथील अव्यवस्था ऐकून गुजराथच्या बहादूरशहानें चितोडगडावर स्वारी केली. चितोडबद्दल सर्व रजपुतांच्या मनांत पूज्यबुद्धि असल्यामुळें, ते बहादूरशहाशीं लढण्यास एकत्र झाले. तरी बहादूरशहाची तयारी जय्यत होती. त्याच्या तोफखान्यावर पोर्तुगीज अधिकारी होते. सर्व फौज कवाईत शिकलेली होती. त्यांनीं सुरुंग लावून किल्ल्याचा तट तेव्हांच उडवून दिला. राजपुतांचें कांहीं चालेना. तेव्हां सर्वांनीं आपल्या स्त्रियांस दारूच्या भडक्यांत उडवून देऊन शस्त्रास्त्रांसहित शत्रूवर चाल केली, आणि धारातीर्थीं आपले जीव बळी दिले, (स.१५३६). अशा निकराच्या प्रसंगास रजपूत लोक 'जोहार' असें म्हणतात. बहादूरशहास विजय प्राप्त झाल्यावर आंत येऊन पाहतो तों त्यास सर्व प्रेतमय दिसलें. जोहारानें चितोड राजधानीचा संहार झाल्याचा हा दुसरा प्रसंग. पहिला प्रसंग अला-उद्दीन खिलजीच्या वेळेस आला होता. बहादूरशहानें चितोड आपल्या ताब्यांत घेतलें, पण तें त्याजकडे फार दिवस राहिलें नाहीं. बाबराच्या मनांत संगराणा व त्याचे वंशज ह्यांजबद्दल विशेष पूज्यबुद्धि होती, तशीच हुमायूनचीही असे. उदयसिंह म्हणून संगराण्याचा एक लहान मुलगा होता. वरील जोहार झालें, तेव्हां दरबारमंडळीनें उदयसिंहास दूर निर्भय ठिकाणीं पाठवून दिलें. उदयसिंहाची आई ही जोहारांत मरून गेली. पण मरणापूर्वीं तिनें 'तुम्ही माझे

भाऊ आहांत, अशा प्रसंगीं साहाय्य करून अब्रू बचावा, ' असा निरोप हुमायुनास पाठविला आणि त्याबरोबर एक राखी पाठविली. अशी राखी रजपूत स्त्रीकडून आली म्हणजे ती स्वीकारून तिचें बंधुत्व पत्करण्याचा प्रघात रजपुतान्यांत आहे. हुमायूननें ' मी तुमचा राखीबंध भाई झालों ' असा निरोप पाठविला; आणि स्वतः फौज घेऊन बहादूरशहाशीं लढण्यास आला. तेव्हां चितोड सोडून बहादूरशहास परत जावें लागलें.

पण एवढ्या अरिष्टानें विक्रमाजिताचे डोळे उघडले नाहींत. नाखुष झालेल्या सरदारांनीं बंड करून त्यास ठार मारिलें आणि संगराण्याचा भाऊ पृथ्वीराज ह्याचा दासीपुत्र बनबीर ह्यास गादीवर स्थापिलें, (सन १५३६). उदयसिंह मोठा होईपर्यंतच बनबिरानें राज्यकारभार पाहवा असा त्यांचा विचार होता. पण उदयसिंहास ठार मारण्याचा बनबिरानें बेत करितांच, पन्ना नांवाच्या दाईनें चमत्कारिक युक्तीनें स्वतःचा मुलगा बळी देऊन, उदयसिंहाचें रक्षण केलें, ती गोष्ट सुप्रसिद्ध आहे. उदयसिंहाचें संगोपन बाहेर झालें. बनबिरानें कहर उसळून दिल्यामुळें तो सर्वांस अप्रिय झाला. शेवटीं सन १५४१ त उदयसिंहानें येऊन आपलें राज्य घेतलें. तेव्हां बनबीर निघून नागपुराकडे गेला, तोच तेथच्या भोसल्यांचा मूळपुरुष होय असें म्हणतात.

पुनः एकदांचें चितोडचें राज्य औरस संततीच्या ताब्यांत आलें. उदयसिंह एकंदरींत दुर्बल निघाला. परंतु हुमायूनचा पराभव होऊन दिल्लींत अस्वस्थता उत्पन्न झाल्यामुळें चितोडच्या वाटेस फारसें कोणी गेलें नाहीं. अकबर बादशहा सिंहासनावर बसल्यावर आपल्या हातीं साम्राज्यसत्ता आणण्याची त्याला आशा सुटली. रजपूत राजे मुसलमानांचे कदीम शत्रू, तशांत मारवाडच्या राजानें अकबराच्या बापास प्रत्यक्ष त्रास दिलेला; तेव्हां त्यानें हळू हळू रजपुतांस आपलें सार्वभौमत्व कबूल करण्यास लाविलें. जयपूरचा राजा बहारमल्ल ह्यानें आपलें दुर्बलत्व ओळखून अकबरास आपली मुलगी दिली आणि त्याजशीं स्नेहसंबंध जोडिला. सन १५६७ त अकबरानें चितोडावर स्वारी केली. त्या वेळीं उदयसिंहाच्या एका राखेच्या हातांत सर्व सत्ता होती. तिनें कांहीं वेळ नेटानें मोगलांशीं युद्ध केलें. उदयसिंह पळून गेला. पण इतर सर्व सरदारांनीं पलायन करून आपल्या पिढीजाद बाण्यास व्यत्यय आणिला नाहीं. ते चितोडच्या

बचावाकरितां आवेशानें लढले. बेदनूरचा ठाकूर जयमल हा ह्या युद्धांत पुढारी होता. तो तोफेच्या गोळा लागून पडला. तेव्हां आपणास जय येत नाहीं असें पाहून, सर्वांनीं आपला नेहमींचा जोहार करून रणांगणीं जीव दिले. हा चितोडचा तिसरा जोहार होय. अकबरानें शहरांत शिरून सर्व स्त्रीपुरुषांची कत्तल केली. तीस हजार लोक ह्या कत्तलींत मृत्युमुखीं पडले. नंतर त्यानें धर्माभिमानानें हिंदूंचीं देवळें, मंदिरें, राजवाडे वगैरे दरोबस्त जमीनदोस्त करून त्या त्या ठिकाणीं मशिदी वगैरे बांधिल्या. नगरदेवीच्या देवळाची वरच्याप्रमाणेंच स्थिति होऊन, तेथील नगारे, दिवे, नौबती, दागिने, दरवाजे वगैरे सर्व आग्र्यास रवाना झाले. उदयसिंह प्रथम राजपिंपळ्याच्या अरण्यांत आणि तेथून पुढें आरवलीच्या डोंगरांत पळून गेला, आणि पुढें चार वर्षांनीं राज्यभ्रंशजन्य दुःखानें मरण पावला, (सन १५७२). मरणापूर्वी आरवली डोंगराच्या एका खोऱ्यांत त्यानें उदयसागर नांवाचा एक तलाव बांधिला, आणि त्याच ठिकाणीं त्यानें एक लहानसें खेडें वसविलें. पुढील पुरुषांनीं ह्या गांवास शोभा आणिली आणि तेथें राजधानी केली. तेंच हल्लींचें उदेपूर शहर होय. त्यावरूनच मेवाडच्या राण्यांस हल्लीं उदेपूरचे राणे असेंही म्हणतात.

उदयसिंहाचा मुलगा राणा प्रतापसिंह सन १५७२ त गादीवर बसला. हा शूर, शहाणा व पूर्वजांचें नांव राखणारा असा होता. अनेक यातना सोसून त्यानें रजपुतांचें धैर्य व उमेद खचूं दिली नाहीं. संकटकाळीं प्रतापराण्याला पुष्कळ साह्यकर्ते मिळाले. हळू हळू मुलूख कमावून राज्यांत त्यानें स्वस्थता केली. ह्या वेळीं बहुतेक राजांनीं मुसलमानांस आपल्या मुली देऊन अकबराचा स्नेह संपादिला होता, इतकेंच नव्हे, तर कित्येक रजपूत ठाकुरांनीं मुसलमानी धर्मही स्वीकारिला होता. ह्या गोष्टीविषयीं प्रतापसिंहाचे मनांत अत्यंत तिरस्कार उत्पन्न होऊन त्यानें एक असा जाहीर ठराव केला, कीं मुसलमानांबरोबर कन्याव्यवहार ठेवणाऱ्या रजपुतांशीं निष्कलंक राहिलेल्या कोणाही रजपुतानें सोईरगत करूं नये. हा ठराव उदेपूरच्या राण्यांनीं आजपर्यंत पाळिला आहे. जोधपूर व जयपूर येथील राजांस कृतकर्माचा पश्चात्ताप होऊन, आपणास शुद्ध करून घेण्याकरितां अनेक वेळ त्यांनीं उदेपूरच्या राण्यांची विनंति केली. दिल्लीची बादशाही बुडाल्यावर मुसलमानांस आपल्या मुली

देण्याचें इतर राजांनीं बंद केलें, तेव्हां अर्थात् सर्व रजपूत पुनः एक झाले. प्रतापसिंहाची खबर अकबरास लागतांच अकबरानें त्याजवर आपली फौज रवाना केली. तिचें आधिपत्य शहाजादा सलीम याजकडे असून, शिवाय जयपूरचा राजा मानसिंह व संगराजिताचा बाटलेला मुलगा मोहबतखान हे सरदार बरोबर होते. त्यांजबरोबर प्रतापसिंह व त्याचे साथीदार ह्यांनीं मोठ्या निकरानें युद्ध केलें. लढाईंत सलीम मरतां मरतां बांचला. मोगल फौजेपुढें प्रतापसिंहाचा टिकाव लागेना, तेव्हां तो पळूं लागला आणि मोगलांनीं त्याचा पाठलाग केला. अशा प्रकारें हें युद्ध पुष्कळ दिवस चाललें. प्रतापाचें धाडस व दृढनिश्चय पाहून त्याची दिल्लीस मोठी वाहवा झाली. पुढें प्रतापसिंह व अकबर ह्यांजमध्यें कांहीं दिवस पत्रव्यवहार चालला. तथापि सख्य झालें नाहीं. नंतर प्रतापसिंहानें लुटारूपणा चालविला, आणि अल्पावकाशांत सर्व मेवाड-प्रांत हस्तगत करून घेतला. परंतु चितोड त्याच्या हस्तगत झालें नाहीं. उदेपूरच्या इतिहासांत प्रतापसिंहाचें नांव अजरामर झालें आहे. एकाएकीं दुखणें लागून तो इ. स. १५९७ त मरण पावला.

४. प्रतापसिंहापासून आजतागाईत, (इ. स. १५९७).—प्रतापसिंहाच्या पश्चात् त्याचा पुत्र अमरसिंह उदेपूर येथें गादीवर बसला. अमरसिंहाला स्वस्थता फार आवडत असे. तरी त्यानें पुष्कळ पराक्रमाचीं कृत्यें केलीं. सन १६०८ त त्यानें मोगल फौजेचा पराभव केला. मोगलांचा दिवाण खानखानान याचा भाऊ अब्दुल्ला हा त्या फौजेचा मुख्य होता. स. १६१० त त्यानें पुनः मोगलांच्या फौजेचा पराजय केला. सगराजित म्हणून राणा प्रतापसिंह ह्याचा एक भाऊ पूर्वींपासून मोगलांस मिळाला होता, त्यास जहांगीर बादशहानें चितोडगडावर राज्याभिषेक करून अमरसिंहास घाबरविण्याचा प्रयत्न केला. पण संगराजितास रजपुतान्यांत कोणींच जुमानिलें नाहीं. मोहबतखान नामक पुढें प्रसिद्धीस आलेला पराक्रमी सरदार ह्या संगराजिताचा मुलगा असून तो बाटून मुसलमान झाला होता. रजपुतान्यांतील ह्या सर्व मोहिमांत मोहबतखान पुढारी असे. सन १६११ सालीं अमरसिंहानें जहांगीरच्या फौजेची अशी दाणादाण उडविली, कीं तेणेंकरून त्या विलासी बादशहास पुढें काय करावें हें कांहींच सुचेना. शेवटीं बादशहानें शहाजहानच्या

हाताखालीं पुनरपि प्रचंड फौज देऊन त्यास राण्यावर पाठविलें. तेव्हां तिच्याशीं झगडण्यांत आपला निभाव लागणार नाहीं असें जाणून, अमरसिंह जहांगिरास शरण गेला. जहांगिरानें इतक्या दिवस झालेली खराबी मनांत आणून अमरसिंहास सन्मानानें वागविलें; आणि त्याचा मुलगा कर्ण यास आपल्या दरबारांत थोरपद दिलें. ह्याप्रमाणें उभयतांमध्यें सलोख्याचा तह ठरला. येणेंप्रमाणें ह्या प्रचंड युद्धाचा शेवट होऊन रजपुतांच्या अंगीं धैर्य व चिकटपणा किती आहे हें सर्वांस दिसून आलें. आपल्या देखत राजा कर्ण यास गादीवर स्थापून अमरसिंहानें वानप्रस्थाश्रम स्वीकारिला. तो १६२१ त मरण पावला.

राणा कर्ण हाही बापाप्रमाणेंच हुशार होता. चितोड येथील किल्ला दुरुस्त करून उदेपुरामही त्यानें नवीन किल्ला, तलाव व राजवाडे बांधिले. कर्णाचा भाऊ भीमसिंह यानें ठरलेल्या तहान्वयें एक हजार स्वारांनिशीं बादशहाची नोकरी पत्करिली. भीमसिंह व शहाजहान यांजमध्यें उत्तम प्रकारचा स्नेह होता. जहांगीरच्या मुलांत तंटे लागले, तेव्हां उदेपूरच्या फौजेनें शहाजहानास मदत केली. पुढें लढाई होऊन भीमसिंह मारला गेला आणि शहाजहानास उदेपुरास आश्रय मिळाला, तेथें तो घरच्याप्रमाणें सुखांत राहिला. राणा कर्णानें तरी ‘ शत्रुवरिही उपकार ’ करून रजपुतांच्या मनाचा थोरपणा व्यक्त केला. ह्या कृत्यामुळें जहांगीरची राण्यावर इतराजी झाली होती; पण त्यामुळें राण्याचें कांहीं वांकडें झालें नाहीं. राणा कर्ण सन १६२८ त मरण पावला, आणि त्याचा मुलगा जगत्सिंह उदेपूरच्या गादीवर बसला.

जहांगीर बादशहा मरण पावल्याची बातमी राणा जगत्सिंहानें शहाजहानास सुरतेस कळविली, आणि त्यास मोठ्या समारंभानें दिल्लीस पोंचतें केलें. ह्या उपकाराबद्दल शहाजहाननें राण्यास फार सन्मानानें वागविलें. त्यामुळें जगत्सिंहाची कारकीर्द फार सुखाची व शांततेची गेली. जगत्सिंहानें पुष्कळ इमारती व लोकोपयोगी कामें करून उदेपूर शहरास शोभा आणिली. हा राणा सन १६५४ त मरण पावला. पुढें त्यांचा पुत्र राणा राजसिंह मेवाडच्या गादीवर बसला. शहाजहानच्या कारकिर्दीच्या अखेरीस मोगल राज्यांत कलह माजले, त्यांच्या योगानें रजपुतांचें चांगलेंच फावलें. राजसिंहानें दारा यास मदत केली. पुढें औरंगजेबानें रजपु-

NATIONAL ARCHIVES OF INDIA

तांबरोबर जें प्रचंड युद्ध केलें, त्यांत राजसिंह हा रजपुतांचा पुढारी होता. तो औरंगजेबाचा पक्का वैरी असून अनेक प्रसंगीं त्या हट्टी बादशहाचा ह्या बाणेदार रजपुतानें चांगलाच समाचार घेतला. मारवाडच्या घराण्याची एक शाखा रूपनगर येथें असून तेथच्या ठाकुराच्या कन्येची मागणी औरंगजेबानें केली, तेव्हां तिनें राजसिंहास पत्र लिहून आश्रय मागितला. त्यावरून राजसिंहानें मोठ्या शिकस्तीनें त्या कन्येस औरंगजेबाच्या तडाख्यांतून सोडवून आणून स्वतः वरिलें. राजसिंहाच्या वेळीं मारवाडांत जसवंतसिंह व अंभेर (अंबर) येथें जयसिंह हे पराक्रमी राजे राज्य करीत असून, तिघांचा एक विचार होता. जिझिया कर रजपुतांवर पुनः बसविण्यांत आला, तेव्हां राजसिंहानें औरंगजेबास कानउघाडणीचें एक खरमरीत पत्र लिहिलें तें वाचण्यालायक आहे.

ह्या पत्राचा गोषवारा रा. रा. हरि नारायण आपटेकृत रूपनगरची राजकन्या ह्या पुस्तकांतून उतरून घेऊन खालीं दिला आहे.

'धन्य त्या सर्वशक्तिमान प्रभूच्या शक्तीची आणि महाराजांच्या औदार्याची. यद्यपि हा महाराजांचा हितचिंतक आपल्या चरणांपासून दूर येऊन राहिला आहे, तथापि स्वामिभक्तीचें व आज्ञाधारकतेचें कोणतेंही काम करण्यास त्याची उत्सुकता यत्किंचित् कमी झालेली नाहीं. सर्व प्रकारच्या लोकांची भरभराट करण्याच्या कामीं माझी सोज्वल इच्छा व नौकरी वाहिलेली आहे. ही माझी इच्छा सर्वविश्रुत असून महाराजांसही त्याबद्दल यत्किंचित् शंका येणें नाहीं, म्हणूनच महाराजांच्या मेहेरबानीचा व आजवर बजाविलेल्या नौकरीचा विचार करून, मी कांहीं सार्वजनिक कल्याणाच्या गोष्टींचा हुजूरपुढें अर्ज करण्याचें धाष्टर्य करीत आहें.

'माझ्या ऐकण्यांत असें आलें आहे, कीं आपल्या ह्या हितचिंतकाविरुद्ध आपले बरेच बेत चालले असून, ते घडवून आणण्याच्या कामीं हजारों रुपयांचा चुराडा करण्यांत आला आहे. त्या कामीं रिकामा झालेला खजिना भरून काढण्याकरितां महाराजांनीं एक नवीन कर लादण्याचा हुकूम फर्माविला आहे.

'महाराज ! वैकुंठवासी बादशहा जलालुद्दीन अकबर, त्यांचे चिरंजीव नुरुद्दीन जहांगीर, व आपले वडील शहाजहान बादशहा ह्यांनीं कैक वर्षें दक्षतेनें प्रजापालन करून अमर कीर्ति संपादन केली आहे. त्यांच्या औ-

दार्यादि गुणांमुळें त्यांची अव्याहत भरभराट होत गेली, आणि पुष्कळ मुलूख व किल्ले त्यांच्या कबज्यांत आले. परंतु आपल्या कारकिर्दीत पुष्कळांचीं मनें बादशाहीच्या विरुद्ध बिघडून गेलीं आहेत; आणि नामधूस व लूटमार ह्यांचा फैलाव अशृंखल होत चालल्यामुळें, आपल्या हातचा पुष्कळ मुलूख जाऊन, आणखीही जाण्याचा समय आला आहे. आपल्या प्रजेची पायमल्ली होत आहे, आणि राज्यांतील प्रत्येक भाग भिकारी झाला आहे. लोक उदध्वस्त होत आहेत, आणि एकामागून एक अडचणी राज्यावर कोसळत आहेत. दारिद्र्याची मजल बादशहाच्या व राजेरजवाड्यांच्या घरापर्यंत जेथें पोंचली आहे, तेथें अमीरउमरावांची व सामान्य रयतेची काय स्थिति असेल बरें! सैन्याकडे पाहवें तर सर्व शिपाई लोक कुरकूर करीत आहेत; व्यापारी रडत आहेत; मुसलमान नाखुश, हिंदु निराश्रित, व लाखों लोक इतके कंगाल, कीं एक वेळ रात्रींचें जेवणही मिळण्याचें त्यांस मुष्किल झालें आहे. सर्व लोक दुःखानें, निराशेनें व त्वेषानें आपलीं डोकीं रात्रंदिवस पिटीत आहेत.

'अशा दुःस्थितीस पावलेल्या लोकांपासून जो राजा जबरदस्तीनें भारी कर उकळण्याकडे आपल्या शक्तीचा उपयोग करितो, त्याची महती कायम राहणें शक्य आहे काय ? या कठीण प्रसंगीं चोहोंकडे एकच वार्ता सांगण्यांत येत आहे, कीं हिंदुस्थानच्या बादशहास गरीब बिचाऱ्या हिंदु साधूंचा मत्सर वाटत असल्यामुळें, ब्राह्मण, बैरागी, वगैरे सर्वांपासून ते जबरदस्तीनें कर वसूल करणार आहेत. आपल्या मूर जातीच्या सुप्रसिद्ध नांवाकडे दुर्लक्ष करून, एकांतवासी, निरुपद्रवी साधुसंतांवर आपल्या शक्तीचा ते प्रयोग करणार आहेत. ईश्वरप्रणीत धर्मपुस्तकावर जर महाराजांचा कांहीं भरंवसा असेल, तर त्यावरून महाराजांस समजेल, कीं ईश्वर हा एकंदर सर्व मानवजातीचा देव आहे. केवळ मुसलमानांचाच नव्हे. त्याच्या दृष्टीनें मुसलमान व इतर धर्मांचे लोक सारखेच आहेत. रंगभेद त्याच्याच हुकमानें झाला आहे. सर्वांस तोच जीवित देतो. आपल्या मशिदींतून आपण नामघोष करून स्तवन करितां, तर ज्या आमच्या देवालयांत मूर्तीपुढें घंटा वाजविल्या जातात, तेथेंही त्याच प्रभूचें पूजन होतें. दुसऱ्या लोकांच्या धर्मास किंवा चालीरीतींस नांवें ठेवणें म्हणजे त्या सर्वशक्तिमान प्रभूच्या मर्जीस धाब्यावर बसविण्या-

सारखें आहे. एकाद्या चितान्याचें चित्र जर आपण बिघडविलें, तर आपणावर त्याचा साहजिक किती बरें राग होतो! म्हणूनच कवीनें म्हटलें आहे, कीं इश्वरानें जीं नानातऱ्हेचीं कामें निर्माण केलीं आहेत, त्यांस नांवें ठेवण्याचें धाष्टर्य करूं नका.

'सारांश, हिंदुलोकांवर जो महाराजांनीं कर लादला आहे, तो न्यायास अनुसरून नाहीं, त्यांत सुनीति नाहीं. एवढेंच नव्हे, तर त्यामुळें देशास दारिद्र्य प्राप्त होणार आहे. शिवाय हा अगदीं नवीनच प्रकार असून हिंदुस्थानच्या कायद्याचें यानें उल्लंघन होत आहे. स्वधर्माच्या कळकळीमुळें जर आपण असें करण्याचा निश्चय केला असेल, तर न्यायदृष्टीनें हिंदूंमध्यें श्रेष्ठ व प्रमुख म्हणून ज्यांची गणना आहे, त्या रामसिंगावर प्रथम मागणी व्हावयास पाहिजे होती. नंतर महाराजांनीं ह्या हितचिंतकाकडे वळावयाचें होतें. कारण मजपासून कराचा वसूल करण्यास महाराजांस तितकी अडचण पडणार नाहीं. गरीब मुंग्यामाशांस त्रास देणें आपल्यासारख्या शूर व उदार अंतःकरणास अयोग्य आहे. आपला न्याय व मरातब कशारीतीनें राखावा ह्या संबंधानें प्रधानमंडळीनें महाराजांस योग्य सल्ला देण्यांत हयगय केल्याबद्दल मला आश्चर्य वाटतें.'

ह्या पत्रानें चिडून जाऊन औरंगजेबानें आपल्या सर्व लष्करानिशीं मेवाडवर स्वारी केली. त्या वेळीं तीन चार प्रचंड लढाया होऊन औरंगजेबाचा पराजय झाला, आणि अत्यंत मानहानि व निरुपाय होऊन त्यास कसाबसा तह करून रजपुतान्यांतून आपला पाय माघारा घ्यावा लागला, (स. १६८१). हिंदुस्थानांत मुसलमानांच्या विरुद्ध हिंदु राजांनीं अनेक कट केलेले इतिहासांत नमूद आहेत. महंमद तुघ्लखच्या विरुद्ध विजयनगरास झालेला कट, बाबराच्या विरुद्ध संगराण्यानें केलेला कट, तशाच तोडीचा, किंबहुना त्याहून ज्यास्त जोराचा हा रजपुतांचा औरंगजेबाविरुद्ध कट होता. परिणामावरून पाहतां ह्याच कटास ज्यास्त सिद्धि मिळाली असें म्हणण्यास हरकत नाहीं. मोगल बादशाही ढांसळून पाडण्याची सुरुवात ह्या कटानें केली. त्याचें सर्व श्रेय राजसिंहास आहे. प्रत्यक्ष लढाईंत राजसिंहानें कावा लढविला म्हणूनच रजपुतांस जय आला. पराभव होऊन आपण पळून जात आहों, असें राजसिंहानें औरंगजेबास भासवून, त्याच्या फौजेस अडचणीच्या जागीं

आणिलें; आणि लगेच उलट खाऊन त्या फौजेचा फन्ना उडविला. म्हणून युद्धकलेच्या दृष्टीनें सुद्धां राजसिंहाचा हा पराक्रम हिंदुस्थानच्या इतिहासांत संस्मरणीय झाला आहे. राजसिंहाच्या पश्चात् त्याच्या तोडीचा पुढारी रजपुतांस मिळाला नाहीं, हें दुर्दैव होय.

राजसिंहानें उदेपुरास मोठमोठीं कामें केलीं. राजसमुद्र नांवाचा एक विस्तीर्ण तलाव बांधिला. भयंकर दुष्काळ पडला असतां रयतेचें पोषण चांगल्या रीतीनें केलें; औरंगजेब बादशहासारख्या क्रूर, कपटी व बलवान् पुरुषाशीं मोठ्या नेटानें टिकाव धरिला; आणि आपल्या पराक्रमानें मोगल बादशहास लाजविलें, असें मुसलमान इतिहासकारही कबूल करितात. सारांश, नांवाजलेल्या उत्तम राजमालिकेंतील हा राणा एक बहुमोल हिऱ्यासारखा मेवाडच्या इतिहासांत झळकत आहे, आणि त्यामुळें त्याचें सत्कुल अधिक सुशोभित व दीप्तिमान झालें आहे. ह्यांत संशय नाहीं. हा थोर पुरुष सन १६८१त मरण पावला.

राजसिंहाच्या पश्चात् त्याचा पुत्र राणा जयसिंह गादीवर बसला. त्याला भीमसिंह नांवाचा दुसरा एक भाऊ होता. बापाच्या इच्छेस्तव भीमसिंहानें आपला गादीवरचा हक्क सोडून पुनः उदेपुरांत पाऊल ठेविलें नाहीं. दिलेरखानाच्या मध्यस्थीनें रजपूत व औरंगजेब ह्यांचा कायमचा तह ठरला. तरी अनेक वेळां राण्यास मोगलांशीं झगडावें लागलें. जयसमुद्र नांवाचा एक विस्तीर्ण तलाव ह्यानें बांधिला, त्याच्या पाण्यावर उत्तम शेती होते. जयसिंहाच्या कारकिर्दींत गृहकलह माजल्यामुळें मेवाडच्या वैभवास उतरती कळा लागली. दिवसेंदिवस जयसिंह विलासी व आळशी बनला.

सन १७०० ह्या वर्षी जयसिंह मरण पावल्यावर त्याचा पुत्र अमरसिंह (दुसरा) गादीवर बसला. पुढील इतिहासांत ह्या वेळच्या रजपुतांच्या भानगडी विशेष महत्त्वाच्या आहेत. मोगल बादशाहीस उतरती कळा लागली. उत्तरेस शीख लोक प्रबळ झाले. मराठे रजपुतांवर स्वाऱ्या करूं लागले. अखेरीस इंग्रजांनीं आपली सत्ता स्थापिली. असो, अमरसिंहाच्या कारकिर्दींतील मुख्य गोष्ट म्हटली म्हणजे त्यानें मुख्य मुख्य रजपूत घराण्यांमध्यें कित्येक अटी ठरवून स्नेह जोडिला, आणि सर्वांनीं एक विचारानें चालावें असें ठरविलें. ह्या ठरावानें रजपुतांनीं मोगलांशीं आपला संबंध

तोडिला. इतःपर मुसलमानांशीं कोणीही लग्नसंबंध करूं नये, व आपसांत बंद पडलेले संबंध पुनः चालू करावे असें ठरलें. ह्या ठरावामुळें पुढें कलह माजले असें कित्येकांचें मत आहे. जोधपूरचा राणा अजितसिंह ह्यानें आपली मुलगी फर्रुख्सेयर बादशहास देऊन वरील ठराव मोडिला, तेव्हां रजपुतांत पुनरपि कलह सुरू झाले. राणा अमरसिंह सन १७१६त मरण पावला. तो मोठा चपळ, स्वकार्यदक्ष व थोर मनाचा होता. त्यानें शेतकीला विशेष उत्तेजन देऊन कलाकौशल्याचें संरक्षण केलें. एकंदरींत त्यानें आपल्या राष्ट्राचा बोज चांगला राखिल्याबद्दल त्याची कीर्ति आहे.

अमरसिंहाच्या पश्चात् त्याचा पुत्र संग्रामसिंह उदेपूरच्या गादीवर बसला. ह्यास शांतता फार प्रिय असे. मोगल बादशाहीच्या पडत्या काळांत वाटेल तसा हात मारून, इतर रजपूत राजांनीं आपल्या राज्याचा विस्तार केला. पण संग्रामसिंह आपल्या राज्यांत प्रजा-हिताकडे लक्ष देत स्वस्थ बसला. न्याय व वसूल हीं खातीं त्यानें सुधारून रयतेचें कल्याण केलें. बिहारीदास पंचोली नांवाचा हुशार व प्रामाणिक दिवाण त्याजपाशीं होता. तो मोठा धोरणी व राजकार्यकुशल होता. संग्रामसिंह सन १७३४त मरण पावला. संग्रामसिंहाच्या पश्चात् उदेपूरच्या राज्यास उतरती कळा लागली.

संग्रामसिंहाचा पुत्र दुसरा जगत्सिंह गादीवर बसला. रजपुतांमध्यें झालेला एकोप्याचा तह मोडला होता, तो त्यानें पुनरपि अमलांत आणि-ला. त्याच्या कार्किर्दींत मराठ्यांनीं रजपुतांवर हल्ले सुरू केले. ह्याच वेळेस नादीरशहानें दिल्लीवर स्वारी करून बादशहाची उरलीसुरली शक्ति नाहींशी करून टाकिली. त्या वेळीं रजपुतांनीं बादशहास साह्य न करितां पूर्वीचें वैर उगवून घेतलें. परंतु इकडे मराठ्यांनीं रजपुतान्यांतून चौथाई वसूल केली. त्यांजपुढें राजस्थानांतील सर्व सरदार हतवीर्य व निस्तेज झाले. राणा जगत्सिंह सुखोपभोगांत निमग्न राहिला, आणि सन १७५२त वारला. मिजास, विलास व अश्लीलतेचे प्रकार उदेपुरांत दिसतात, त्यांचा उगम मुख्यतः जगत्सिंहाच्या कार्किर्दींत झाला.

जगत्सिंहानंतर त्याचा वडील पुत्र दुसरा प्रतापसिंह गादीवर बसला. शिंदे, होळकर व रघुनाथराव पेशवे ह्यांचे हल्ले एकसारखे रजपुतांवर चालू होते. सन १७५५त राजा प्रतापसिंह मरण पावला; आणि

त्याचा मुलगा राजसिंह (दुसरा) गादीवर बसला. मराठ्यांनीं राजस्थानावर तीन स्वाऱ्या केल्या, आणि त्या सर्वांचा खर्च उदेपूरच्या खजिन्यांतून त्यांनीं घेतला. एक पै सुद्धां राजसिंहाजवळ शिल्लक राहिली नाहीं. स्वतःच्या लग्नासाठींही त्यास कर्ज काढावें लागलें. सन १७६२त हा दुर्दैवी राणा मरण पावला, आणि त्याचा चुलता राणा उर्सिसिंह गादीवर बसला. उर्सिसिंह हा रागीट व हट्टी होता. त्यानें मोठमोठ्या सरदारांस फार अनुचित रीतीनें वागविलें. मेवाडांत भयंकर दुष्काळ पडला. एकंदरींत उर्सिसिंहाच्या योगानें मेवाडच्या गादीवर मोठें दुर्दैवच ओढवलें असें म्हणावें लागतें. रजपूत सरदारांनीं त्याजविरुद्ध कट केले. कोट्याचा रणशूर ठाकूर जालिमसिंह हा उर्सिसिंहाचे बाजूनें लढत होता. अशा प्रकारें भानगडी चालत असतां सन १७७२ ह्या वर्षी उर्सिसिंहाचा खून झाला. अमरचंद म्हणून त्याचा एक हुशार दिवाण होता. त्यानें बऱ्याच अंशीं या घराण्याची अब्रू बचाविली. ह्या राण्याचें बहुतेक राज्य लोकांनीं घेतलें. उर्सिसिंहानंतर त्याचा वडील मुलगा हमीर हा गादीवर बसला. ‘ उदेपूरचा राणा ‘ ह्या नावांत आतां फारसें महत्त्व राहिलें नव्हतें. अंतर्द्वेष फार वाढल्यामुळें चोहोंकडे शत्रु उत्पन्न झाले. हमीर हा फार लहान असल्यामुळें त्याची आई सर्व कारभार पाहत असे. राज्याचा आधारस्तंभ अमरचंद होता. त्याजविषयीं मनांत वैषम्य धरून तिनें त्याचें कांहीं चालूं दिलें नाहीं. पुढें लवकरच अमरचंद मरण पावला. त्याला राणीनें विषप्रयोग केला असा समज आहे. अमरचंदाची राजनिष्ठा, स्वदेशप्रीति व सचोटी ह्या गुणांवरून राजस्थानांत त्याचें नांव फार प्रसिद्ध आहे. राणा हमीर सन १७७८त मरण पावला.

हमीर नंतर त्याचा लहान भाऊ भीमसिंह सन १७७८त मेवाडच्या गादीवर बसला. तेव्हां त्याचें वय केवळ आठ वर्षांचें होतें. आपल्या भावाप्रमाणें तोही कांहीं दिवस आईच्या ताब्यांत होता. ह्या परवशतेमुळें त्याच्या स्वभावांत पुष्कळ प्रकारचे दोष उत्पन्न होऊन ते अखेरपर्यंत कायम राहिले. भीमसिंहानें पन्नास वर्षें राज्य केलें. एवढ्या अवकाशांत त्यानें जितके नशिबाचे खेळ पाहिले तितके दुसऱ्या कोणींही पाहिले नसतील. मराठ्यांनीं त्याच्या राज्यावर वारंवार स्वाऱ्या करून तें अगदीं उद्ध्वस्त करून टाकिलें. कृष्णाकुमारी म्हणून यास एक रूपवती मुलगी होती. तिच्याबद्दल सर्व

रजपूत राजांत तंटे लागून शेवटीं भीमसिंहानें तीस वर्षे देऊन ठार मारिलें. शिंद्याचा सरदार अंबाजी इंगळे यानें मेवाडांत आपलें ठाणें दिलें. ह्या गोष्टी मराठ्यांच्या इतिहासांत यावयाच्या आहेत. मराठ्यांशीं इंग्रजांचें दुसरें युद्ध संपल्यावर मराठ्यांच्या जाचांतून रजपूत सुटतील असें वाटत होतें, पण तसा प्रकार झाला नाहीं. कित्येक दिवस तर कोट्याचा जालिमसिंह याजकडून कांहीं नेमणूक घेऊन भीमसिंहास आपला निर्वाह करावा लागला. सन १८१७ मध्यें पेंढाऱ्यांशीं इंग्रजांचें युद्ध सुरू झालें, तेव्हां भीमसिंहानें इंग्रजांचें सार्वभौमत्व पत्करिलें. भीमसिंह सन १८२९ त मरण पावला. भीमसिंहानंतर त्याचा पुत्र जवानसिंह यानें सन १८२९ पासून १८३८ पर्यंत राज्य केलें. नंतर त्याचे मुलगे सरदारसिंह व सुरूपसिंह यांनीं अनुक्रमें १८३८ ते १८४२ व १८४२ ते १८५१ पर्यंत राज्य केलें. सुरूपसिंहाचा दत्तक मुलगा शंभुसिंह सन १८५१ पासून १८७४ पर्यंत गादीवर होता. शंभुसिंह फार लोकप्रिय होता. त्याच्या मरणाबद्दल लोकांस फार वाईट वाटलें. शंभुसिंहाचा दत्तक मुलगा सजनसिंह यानें दहा वर्षे राज्य केलें. हल्लीं महाराणा फत्तेसिंह सन १८८४ पासून उदेपूर येथें राज्य करीत आहे.

मेवाडची लोकसंख्या सुमारें अठरा लाख असून उत्पन्न सुमारें चाळीस लक्ष रुपये आहे. हे राणे सालीना अडीच लाख रुपये इंग्रजांस खंडणी देतात.

८. जयपूरचा इतिहास.—जयपूरच्या राजास अंबरचे राजे असेंही म्हणतात. अंबर हें जयपूरच्या नजीकच एक शहर आहे. ती प्राचीन राजधानी होय. अठराव्या शतकांत जयसिंह नांवाच्या विख्यात राजानें अंबरनजीक नवीन शहराची स्थापना करून त्यास आपल्या नांवावरून जयपूर हें नांव दिलें. जयपूरचे राजे सूर्यवंशी कच्छवाह आडनांवाचे आहेत. श्रीरामचंद्राचा मुलगा कुश ह्यास कूर्म ऊर्फ कच्छ म्हणून पुत्र होता, त्यापासून ह्या घराण्याची उत्पत्ति असल्यामुळें, त्यास कच्छवाह हें नांव प्राप्त झालें. कुशाचा वंशज नलराजा नैषध देशावर राज्य करीत होता. नळापासून चवतिसावा पुरुष धवलराय हा कैक वर्षे यवनांबरोबर झगडत होता. त्या झगड्यांत पाडाव झाल्यामुळें तो नैषध देश सोडून बाहेर निघाला, आणि सन ९५७ त अंबर शहराची स्थापना करून धुंडार देशचा राजा ह्या नांवानें राज्य करूं लागला. धवलरायानें घेतलेला मुलूख

दिल्लीच्या रजपूत राजांचा होता. अजमीरच्या चव्हाण राजाची मुलगी धवलरायास दिलेली होती. धवलरायानंतर कंकल, मैदलराय, हूणदेव, कुंतल, व पंजून असे राजे गादीवर आले. पंजून हा शूर व पराक्रमी होता. त्यास दिल्लीच्या पृथ्वीराज चव्हाणाची बहीण दिलेली होती. पृथ्वीराजाच्या पदरीं हा एका तुकडीचा नायक होता. शहाबुद्दीन घोरीचा पराजय करून त्यास गज्नीपर्यंत पंजूननें हांकून लाविलें. पृथ्वीराजाकरितां संयुक्तेचें हरण करितांना लढाईंत पंजून मारला गेला. पंजूनपासून अकरावा पुरुष पृथुराज हा अंबर येथें पराक्रमी राजा झाला. सिंधुनदावर यात्रेकरितां गेला असतां पृथुराजास त्याचा मुलगा भीम ह्यानें ठार मारिलें. नंतर पृथुराजाचा पुत्र बिहारीमल्ल यास गादी मिळाली. बिहारीमल्लाच्या वेळेस बाबरानें हिंदुस्थानांत मोगलांची सत्ता स्थापन केली. प्रथम बिहारीमल्ल बाबराशीं लढण्यास तयार होता. पण अंबरचा मुलूख दिल्लीच्या नजीक असल्यामुळें मोगलांचे हल्ले वरचेवर येणार असें पाहून, त्यानें बाबरास करभार दिला, आणि त्याजशीं सख्य करून आपली नात, पुढें येणाऱ्या मानसिंहाची बहीण, हुमायून ह्यास दिली. मुसलमानांशीं शरीरसंबंध घडवून आणणारा पहिला रजपूत राजा हाच होय. हुमायून तख्तनशीन झल्यावर बिहारीमल्लास त्यानें अंबरचा महाराज अशी पदवी दिली. त्याजवर अकबर बादशहाचीही बहाल मर्जी होती. त्याच्या मुलीबरोबर स्वतः अकबरानें लग्न केलें, आणि त्याच्या सर्व मुलांस आपल्या फौजेंत सन्मानाच्या जागा दिल्या. बिहारीमल्लाच्या पश्चात् त्याचा पुत्र भगवानदास अंबरच्या राज्याचा धनी झाला. त्यानें आपली मुलगी अकबराचा पुत्र सलीम ह्यास दिली. तेणेंकरून व एकनिष्ठपणानें चाकरी केल्यामुळें अकबराजवळ त्याचें वजन फार होतें. पंजाब प्रांताची सुभेगिरी भगवानदासाकडे होती. लाहोरासच तो सन १५८९त मरण पावला. भगवानदास हा बुद्धिमान, शूर व शहाणा होता. त्याच्या मरणानें अकबरास फार दुःख झालें.

भगवानदासास मूल नव्हतें. त्यानें आपल्या भावाचा मुलगा मानसिंह ह्यास दत्तक घेतलें. अकबरच्या दरबारांत मानसिंहाचो विशेष बडेजाव होती. त्याजवर मोठमोठीं जोखमाचीं कामें अकबरानें सोंपविलीं. ओढ्या व आसाम हे प्रांत मानसिंहानें जिंकून अकबराच्या राज्यास जोडले. अकबरानें ज्या एकंदर मोहिमा केल्या, त्यांपैकीं निदान निम्यांत मान-

२३-४-७-७९१-२०००

सिंहाचें अंग होतें. मेवाडचा राणा प्रतापसिंह याजबरोबर मानसिंहाचें वांकडें होतें. त्याजबरोबर झालेल्या युद्धांत मानसिंहच पुढारी होता. मानसिंहाचा पुत्र भावसिंह याजकडे पंजाबच्या सुभेदारीचें काम होतें. मानसिंहाची बहीण सलीम ह्यास दिली होती; तिचा मुलगा खुस्रू म्हणून होता. खुस्रूचें व सलीमचें वांकडें होतें. त्या तंट्यांत खुस्रूच्या आईनें विष खाऊन जीव दिला. तेणेंकरून सलीम पुढें फारच चिडखोर झाला. अकबराच्या मरणासमयीं खुस्रूस राज्य मिळावें म्हणून मानसिंहानें खटपट केली, सबब त्याजवर सलीमाची पुढें गैरमर्जी झाली. परंतु मानसिंहासारखे सरदार प्रत्यक्ष बादशहासही भारी आहेत हें ओळखून, सलीमनें त्यास आपणाकडे वळवून घेतलें. मानसिंह सन १६१५त मरण पावला. मानसिंहाचा मुलगा भावसिंह हा बापासारखा शूर नव्हता. तो १६२१त मरण पावला. त्याचा मुलगा महासिंह हाही पराक्रमी नसल्यामुळें, मोगलांच्या दरबारीं जोधपूरवाल्याचें वजन वाढलें. पुढें मानसिंहाचा भाऊ जगत्‌सिंह ह्याचा नातू जयसिंह ह्यास जहांगीरनें, आपली राणी जोधाबाई इच्या सल्ल्यानें, अंबरच्या गादीवर स्थापन केलें. हा जयसिंह पुढें मीर्झा राजा ह्या नावानें प्रसिद्धीस आला. शहाजहान व औरंगजेब ह्यांच्या पदरीं जयसिंहाचें वजन विशेष होतें. शिवाजीस दिल्लीस नेण्याचें काम जयसिंहानें युक्तीनें बजाविलें. औरंगजेब बादशहानें सर्वच रजपुतांस वाईट रीतीनें वागविल्यामुळें त्याचें व ह्याचें वांकडें आलें, आणि रजपुतांच्या मोठ्या कटांत हा सामील झाला. जयसिंहाचा मुलगा कीरतसिंह ह्यानें औरंगजेबाच्या सांगणीवरून बापाचा खून केला. जयसिंहाचा मोठा मुलगा रामसिंह हा पुढें अंबरच्या राज्याचा धनी झाला. कांहीं दिवस राज्यांत अव्यवस्था चालू होती, आणि राज्याचा बहुतेक भाग मोगलांच्या स्वाधीन होता. सन १६९९त दुसरा जयसिंह गादीवर आला. ह्यास सवाई जयसिंह म्हणतात. हा फार विद्वान् होता. ह्यानें चवेचाळीस वर्षें राज्य केलें. ह्याच्या वेळेस मोगल बादशाही झपाट्यानें रसातळास चालली होती. चोहोंकडे बेबंदशाही सुरू असतां जयसिंहास युद्धप्रसंग करून रजपुतांचें शौर्य दाखविण्यास पुष्कळ जागा होती. तरी शांततेनें व शहाणपणानें लोकांच्या कल्याणार्थ झटण्यामध्यें जयसिंहाचें कर्तृत्व निमालें. ह्यानें राज्यास सुव्यवस्था लावून दिली.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

चांगले चांगले कायदे केले. शास्त्राध्ययनास उत्तेजन दिलें. ह्यानेंच जयपूर शहराची हल्लींची बांधणी सिद्धीस नेली. ह्या शहराची सुंदर रचना आजपर्यंत हिंदुस्थानांत नांवाजली जात आहे. अंबरास लागूनच हें शहर आहे. ह्या शहरांत अनेक प्रकारच्या विद्या व कला झपाट्यानें उदयास आल्या. विद्याधर नांवाचा एक हुशार व विद्वान् बंगाली गृहस्थ जयसिंहापाशीं होता. त्याच्या साह्यानें ह्या सर्व गोष्टी जयसिंहानें तडीस नेल्या. दिल्ली, जयपूर, उज्जनी, बनारस, मथुरा इत्यादि ठिकाणीं त्यानें वेधशाळा व ज्योतिषशाळा स्थापिल्या. ग्रहांचे शोध लावण्याचीं नवीन नवीन यंत्रें त्यानें बनविलीं. पाश्चात्य ज्योतिषशास्त्राचा अभ्यास करण्यासाठीं इकडचे पंडित त्यानें युरोपास पाठविले. बिनचूक वेध घेऊन एक नवीन पंचांग जयसिंहानें चालू केलें. मुसलमानी पंचांग जयसिंहानें शुद्ध करून दिलें तें आजतागाईत चालत आहे. शास्त्रीय शोधांशिवाय रस्ते, धर्मशाळा वगैरे अनेक कामें प्रजेच्या हिताकरितां जयसिंहानें केलीं. त्यानें केलेल्या सर्व कृत्यांचें यथास्थित वर्णन ह्या संकुचित स्थळीं देणें अशक्य आहे. रक्तपात व कृष्ण कारस्थानें यांस अगदीं ऊत आलेल्या अशा त्या काळांत आपल्या आवडत्या विद्याव्यासंगांतच जयसिंहानें आपलें सर्व लक्ष घातलें. मोगलबादशाहीची जुनी पुराणी इमारत खिळखिळी होऊन जमीनदोस्त होण्याच्या बेतास आली, अशा प्रसंगीं आपली राज्यनौका हालूं न देतां, तिचें सुकाणूं संथपणें चालवून, आसपासच्या राज्यांपेक्षां आपल्या राज्याचें श्रेष्ठत्व लोकांच्या नजरेस त्यानें आणिलें, ही गोष्ट सामान्य नव्हे. जयसिंह लोकोत्तर राजा झाला असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं. मोगल बादशाहीची धडगत नाहीं हें कळून चुकलें असतां, स्वराज्य सुरक्षित ठेवण्याच्या भरांत त्यानें धन्याशीं बेइमानगिरी केली नाहीं. फर्रुखसेयर बादशहाच्या विरुद्ध कट चालले असतां, जयसिंहाची मोगल घराण्यावरील राजनिष्ठा कसास लागली आहे. तयमूरच्या वंशांतील संततीला योग्य अशा शौर्याचा एक कण जरी फर्रुखसेयरच्या अंगीं असता, तरी जयसिंहाच्या स्वामिभक्तीचें चीज झालें असतें. महंमदशहा सन १७२०त तख्तनशीन झाला, तेव्हां जयसिंहास त्यानें माळव्याचा सुभेदार नेमिलें. त्या वेळीं त्यानें जाठ लोकांचा बंदोबस्त केला, आणि मुसलमानांकडून

हिंदूंवरचा जिझिया कर माफ करविला. मोगल बादशहाकडून प्रांतांचें रक्षण होणें दुर्घट आहे असें पाहून, त्यानें बादशहाकडून बाजीराव पेशव्याबरोबर तह करविला; आणि माळवाप्रांत मराठ्यांकडे दिला. नादीरशहानें स्वारी केली, तेव्हां आपल्या हातून संकट परिहार होणार नाहीं असें जाणून तो अगदीं तटस्थ राहिला. अशा रीतीनें पुष्कळ वर्षें लौकिक मिळवून जयसिंह सन १७४३त मरण पावला.

जयसिंहाचा वडील मुलगा ईश्वरसिंह अंबरच्या गादीवर बसला. त्याबरोबर रजपुतान्यांत युद्ध सुरू झालें. उदेपूरचा राणा अमरसिंह ह्याच्या वेळेस सर्व रजपूत राजांत असा एक ठराव झाला होता, कीं 'मेवाडच्या घराण्यांतील कन्या ज्या राज्यांत दिली असेल, त्यांत त्या कन्येचा मुलगा लहान किंवा मोठा कसाही असला, तरी तोच गादीचा वारस समजला जावा.' कित्येक रजपुतांनीं मोगलांचे घराण्यांत मुली दिल्यामुळें ते जातिभ्रष्ट झाले, असा समज झाला होता, तो दूर करण्याकरितां आणि सर्व रजपूत घराणीं पुनः शुद्ध होण्याकरितां वरील ठराव करण्यांत आला. मेवाडच्या राजकन्येचा मुलगा माधवसिंह हा लहान असतांही ह्या ठरावाप्रमाणें तो जयपूरच्या गादीस ज्यास्त हक्कदार होता. म्हणून मेवाडचा राणा जगत्‌सिंह ह्यानें माधवसिंहाचा हक्क स्थापन करण्याकरितां जयपूरशीं युद्ध सुरू केलें. घोर रणकंदन झालें. त्यांत जगत्‌सिंहांचा पराभव झाला. तेव्हां मल्हारराव होळकर यास कित्येक परगणे देऊन जगत्‌सिंहानें आपल्या मदतीस बोलाविलें. ही खबर ऐकून ईश्वरसिंहानें विष घेऊन प्राण दिला.

पुढें माधवसिंहास जयपूरचें राज्य प्राप्त झालें. तो विद्वान्, शूर व चतुर होता परंतु जाट लोकांशीं सतत झगडावें लागल्यामुळें त्यास राज्यकारभाराकडे लक्ष देण्यास फुरसत मिळाली नाहीं. शिवाय तो अल्पवयी झाला. सन १७६३त तो वारल्यावर त्याचा पुत्र पृथुसिंह गादीवर बसला. तो वयानें लहान असल्यामुळें त्याच्या आईच्या हातीं राज्यकारभार होता. ही बाई दुराचारी व दुष्ट होती. तिच्या वेळेस राज्याची फार खराबी झाली. सन १७७८त पृथुसिंह घोड्यावरून पडून मरण पावला. नंतर पृथुसिंहाचा सावत्र भाऊ प्रतापसिंह गादीवर बसला. हा शूर व शहाणा होता. महादजी शिंदे याजबरोबर लढण्यांत हाच

प्रमुख होता. मराठ्यांशीं टक्कर देण्याकरितां त्यानें विलक्षण जमाव केला. प्रथम त्यास थोडासा जय प्राप्त झाला; पण अखेरीस शिंद्यानें सर्व रजपुतांची जूट मोडून त्यांजवर आपला पूर्ण ताबा बसविला. पुढें मरेपर्यंत त्यास मराठ्यांचा त्रास सहन करावा लागला. राणा प्रतापसिंह सन १८०३त मरण पावला. नंतर त्याचा पुत्र जगत्‌सिंह राज्याचा मालक झाला. हा अत्यंत हलकट संगतींत व नीच व्यसनांत सर्वकाळ निमग्न राही. रजपुतान्यांत ह्याचें नांव ऐकून लोक तिरस्कार व्यक्त करितात. सन १८०३त लॉर्ड लेक ह्याजबरोबर त्यानें तैनाती फौजेचा तह केला. पण लॉर्ड कॉर्नवॉलिस व त्यापुढचे गव्हर्नर्स् जनरल ह्यांनीं ही तैनाती फौजांची पद्धत पुढें चालू ठेविली नाहीं, म्हणून जयपूरचा प्रदेश पुनः शिंद्याचे तावडींत सांपडला. उदेपूरची राजपुत्री कृष्णाकुमारी इचा अभिलाष धरून जगत्‌सिंह व इतर रजपूत राजांनीं सर्वस्वाचें नुकसान करून घेतलें. पेंढाऱ्यांबरोबर सन १८१७त इंग्रजांनीं युद्ध सुरू केलें, त्या वेळीं पूर्वीचा तह पुनरपि इंग्रज सरकारानें अमलांत आणिला. दुसरे अनेक कडक करार राण्याबरोबर करण्यांत आले, त्यांचें वर्णन करण्याचें हें स्थळ नव्हे. राणा जगत्‌सिंह सन १८१८त मरण पावला. नंतर चार महिन्यांनीं त्यास एक पुत्र झाला, त्याचें नांव जयसिंह ठेवण्यांत येऊन तो गादीवर बसला. पुढें राज्यांत पुष्कळ गडबड चालू झाली. सन १८३५त राजा जयसिंह मरण पावल्यावर त्याचा पुत्र रामसिंह जयपुरास गादीवर बसला, तो सन १८८० सालीं वारला. तेव्हांपासून राणा माधवसिंह राज्य करीत आहे.

जयपूरची लोकसंख्या अठ्ठावीस लाख असून उत्पन्न सालीना सुमारें एक लाख रुपये आहे.

६. **जोधपूरचा इतिहास.**—हें राज्य मारवाड किंवा जोधपूर ह्या नांवानें प्रसिद्ध आहे. येथील राज्यकर्ते चंद्रवंशी राठोड जातीचे असून त्यांना महाराजा अशी पदवी आहे. कनोजचा राजा जयचंद राठोड हा, शहाबुद्दीन घोरीचा सरदार कुत्बुद्दीन याजबरोबर इटावानजीक चंदवाड येथें झालेल्या लढाईत, मारला गेला,(स.११९४). नंतर १८ वर्षांनीं त्याचे दोन नातू शिवजी व सैत्रम स्वदेश सोडून पश्चिमेस मारवाडप्रांतांत आले. तेथें त्यांनीं पराक्रम करून लहानसें राज्य स्थापन केलें. शिवजीच्या वंशजांनीं राज्याची

मर्यादा पुष्कळ वाढविली. पुढें विरमदेव म्हणून एक पराक्रमी राजा झाला. त्याचा मुलगा चांद ह्यानें मंदोड शहर जिंकून तेथें आपली राजधानी केली. चांद हा नागोर येथें सन १४०२त मारला गेला. त्याचा मुलगा रावरणमल्ल हा मेवाडच्या लाखा राण्याचा दोस्त होता. त्या दोघांनीं अनेक पराक्रमाचीं कृत्यें केलीं. लाखा राणा मरण पावल्यावर मेवाडचें राज्य आपल्या राज्यास जोडण्याची रणमल्लास इच्छा उत्पन्न झाली. त्याची मुलगी लाखा राण्यास दिलेली होती. परंतु मेवाडच्या राण्याचें पाणी प्रखर होतें. राणा मुकुलजीचा भाऊ चंद्र ह्यानें रणमल्लास ठार मारिलें आणि सर्व कुटुंबाचा नाश केला. रणमल्लाचा मुलगा जोधसिंह मात्र सुटून गेला. त्यानें महाप्रयासानें राठोड वंश तारिला. बराच मुलूख उदेपूरवाल्यांस देऊन त्यानें त्यांजबरोबर सख्य केलें. जोधसिंह हा प्रतापी पुरुष होऊन गेला. त्यानें लढाईची भानगड सोडून देऊन राज्यांत शांतता केली. सन १४५९त त्यानें जोधपूर शहराची स्थापना केली. तेंच शहर हल्लीं ह्या राजांची राजधानी आहे. जोधसिंह सन १४८९ त मरण पावला. त्याचा पुत्र सुरजमल्ल ह्यानें सत्तावीस वर्षे राज्य केलें. त्यानें राज्याची वृद्धि बरीच केली. सुरजमल्लानंतर त्याचा नातू गंग हा राज्य करीत असतां मोगलबादशाहीची स्थापना झाली. गंगानें मेवाडच्या संग राण्यास उत्तम प्रकारें साह्य करून रजपुतांचें स्वातंत्र्य कायम राखण्याचा प्रयत्न केला. पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं, हें मागें सांगण्यांत आलेंच आहेच. गंग सन १५३२त मरण पावला. त्याचा मुलगा मालदेव हा राज्कारस्थानी व धूर्त होता. शीरशहा सूर याजला पुष्कळ दिवसपर्यंत त्यानें धाब्यावर बसविलें. जोधपुरास उत्तम तटबंदी करून कोणत्याही शत्रूबरोबर लढण्याची त्यानें जय्यत तैयारी ठेविली. हुमायून बादशहा त्याजकडे आश्रय मागण्यास आला असतां त्यास त्यानें शत्रूप्रमाणें वागविलें. या अपराधाचें पूर्ण प्रायश्चित् त्यास भोगावें लागलें. अकबर दिलीच्या तख्तावर आला. त्यानें १५६१त मारवाडवर स्वारी केली, आणि मालदेवाचें बहुतेक राज्य दुसऱ्या एका इसमास दिलें. आठ वर्षांनंतर मालदेव अकबरास शरण गेला. तरी स्वतः तो दिल्लीस न गेल्यामुळें अकबराची मर्जी गेली. शेवटीं मालदेव सन १५७३त अपेष्टेमध्यें मरण पावला. त्याचा मुलगा उदयसिंह ह्यानें

अकबराचें प्राबल्य जाणून सर्व झगडा सोडून मोगलांचें स्वामित्व कबूल केलें, आपली बहीण जोधाबाई अकबरास दिली, आणि बहुतेक मुलूख अकबरापासून परत मिळविला. अकबराच्या सरदारांत उदयसिंह हा विशेष नामांकित व शूर होता. त्याचा मुलगा सूरसिंह हाही अकबराच्या फौजेंत नोकरीवर होता.

उदयसिंह १५९५त मरण पावल्यावर त्याचा पुत्र सूरसिंह मंदोडच्या गादीवर बसला. त्यानें अकबराच्या हुकमानें धंधूका येथें गुजराथच्या सुलतानाचा पराजय केला. त्यानें जोधपूर शहरास पुष्कळ मजबुदी केली, आणि राज्यकारभार सुरळीत चालविला. मोगलांची नोकरी करण्यास लागल्यामुळें स्वतःच्या राज्यकारभारांत लक्ष देण्यास त्यास फुरसत मिळत नसे, म्हणून त्यास फार वाईट वाटे. जहांगीर बादशहास त्याची चांगली मदत होती. सूरसिंह १६२०त मरण पावल्यावर त्याचा पुत्र गजसिंह जोधपूरचा राजा झाला. त्याजकडे जहांगीरनें दक्षिणची सुभेदारी सांगितली. शहाजहानविरुद्ध त्यानें शहाजादा खुस्रू व बादशहा जहांगीर ह्यांस मदत केल्यामुळें शहाजहानची त्याजवर विशेष इतराजी झाली. गुजराथेंत लढत असतां सन १५३८त गजसिंह मारला गेला. गजसिंहाचा वडील मुलगा अमरसिंह ह्यास गादी मिळूं नये असें अगोदरच बापानें ठरविलें होतें. शहाजहानच्या दरबारांत असतां ह्या अमरसिंहाचा अंत झाला, तेव्हां दुसरा मुलगा जशवंतसिंह जोधपूरच्या गादीवर बसला. तो औरंगजेबाबरोबर दक्षिणेंत वीस वर्षे होता, (स. १६३८–१६५८). तेथें त्यानें मोठमोठे पराक्रम केले. पुढें शहाजहानच्या मुलांत तंटे लागले, तेव्हां जशवंतसिंहानें दाराचा पक्ष घेतला. पण त्याचा पराजय झाला. तरी जशवंतसिंहासारख्या पराक्रमी सरदारास दुखविणें औरंगजेबास हितकर वाटलें नाहीं. त्यास त्यानें जवळ बोलावून सन्मानानें वागविलें. पुनरपि तो दारा व सुजा यांस मिळाला; आणि परामव पावून जोधपुरास गेला. परंतु औरंगजेबानें त्यास पुनः माफी करून आपला पुत्र मुअज्जम याजबरोबर दक्षिणेंत शिवाजीवर पाठविलें. तेथेंही त्याचा विश्वासघात दृष्टीस पडल्यावर त्यास औरंगजेबानें काबूलच्या सुभ्यावर पाठविलें, आणि इकडे त्याच्या सर्व कुटुंबाचा औरंगजेबानें अत्यंत दुष्टपणें घात केला; त्या दुःखानें शेवटीं काबुलांत हा शूर राजा मरण पावला, (स. १६७८).

जशवंतसिंहाचा सर्वच इतिहास फार मनोरम व उपयुक्त आहे, पण तो येथें न देतां औरंगजेबाचे प्रकरणीं दिला आहे. जशवंतसिंहाच्या मृत्यूनंतर त्याच्या बायकांमुलांची औरंगजेबानें वाताहत केल्यामुळें, सर्व रजपुतांच्या मनांत बादशहाविषयीं विलक्षण वैर उत्पन्न होऊन, निकराचें युद्ध झालें, त्यांत शेवटीं बादशहास माघार घ्यावी लागली.

जशवंतसिंहाचा बालपुत्र अजितसिंह जोधपूरचा राजा झाला. औरंगजेब मरण पावल्यावर त्यानें आपलें गेलेलें सर्व राज्य परत मिळविलें. त्रिवर्ग रजपूत राजांनीं मुसलमानांस रजपुतांच्या मुली देण्याचें बंद करून मोगलांविरुद्ध कट केला, त्यांत हा अजितसिंह सामील होता. बापाची जी वाताहत बादशहानें केली, तिचा भरपूर सूड घेऊन त्यानें बादशहाशीं अखेरपर्यंत वैर चालविलें; आणि आपलें स्वातंत्र्य चिरंतन करून, सन १७३१त दुष्ट पुत्राच्या हस्तें मारला गेला. हा पुत्र अभयसिंह होय. अभयसिंहाची कारकीर्द भाऊ बख्तसिंह ह्याजबरोबर लढण्यांत गेली. अभयसिंह दुष्ट, व्यसनी व विलासी होता. त्यानें कपटानें बराच मुलूख मिळविला. पण त्यायोगें रजपुतांत कलह माजले. तेव्हां त्याचा पुत्र रामसिंहानें गादीवर बसला. रामसिंह चुलता बख्तसिंह यास वाईट रीतीनें वागविल्यामुळें बख्तसिंहानें त्याचें राज्य घेतलें. बख्तसिंह हा राज्य करण्यास लायक होता, आणि बापास मारण्यांत त्याचें अंग नसतें तर जोधपूरच्या इतिहासांत त्याचें नांव फार पूज्य झालें असतें. तीन वर्षांनींच विषप्रयोगानें बख्तसिंह मरण पावला, (स. १७५०–१७५२).

त्याचा पुत्र विजयसिंह गादीवर बसला. पण पूर्वी हद्दपार झालेल्या रामसिंहानें त्याजशीं लढून आपलें राज्य परत मिळविलें. ह्या दोघांच्या तंट्यांतच मराठ्यांचा जोधपुरांत शिरकाव झाला. त्याच्या राज्यांत जयाप्पा शिंद्याचा खून झाल्यामुळें सर्व मराठे चवताळून राज्यांत घुसले. रामसिंहास हरवून जोधपूरच्या राज्याची त्यांनीं वाट लाविली. रामसिंह जयपुरास सन १७७३त मरण पावला. तेव्हां पुनः विजयसिंहास मारवाडचें नामधारी स्वामित्व मिळालें.

विजयसिंहाची कारकीर्द धामधुमींत गेली. सर्व राज्य मराठ्यांच्या हातांत होतें. त्यानें हाताखालच्या प्रबळ झालेल्या सरदारांचा पाडाव केला, आणि मराठ्यांचा नाश करण्याकरितां जयपूरच्या प्रतापसिंहाबरोबर स्नेह जोडून महादजी शिंद्याशीं युद्ध सुरू केलें. आरंभीं थोडा

जय प्राप्त झाला, तरी शिंद्यानें अंतीं सर्व रजपुतांचा पाडाव करून अजमीर व दुसरे पुष्कळ प्रांत मिळविले; आणि सालीना साठ लक्ष खंडणी घेण्याचें ठरविलें. विजयसिंह १७९३त मरण पावला. त्याचा पुत्र भीमसिंह इतर भावांस ठार मारून गादीवर बसला. पण दहा वर्षे झगडून त्यानें आपलें राज्य घालविलें. सन १८०३त तो मरण पाव- त्यानंतर त्याच्या भावाचा मुलगा मानसिंह गादीवर बसला, (स.१८०३). मराठ्यांच्या युद्धांत मानसिंहानें होळकरास मदत दिली; आणि तें युद्ध संपल्यावर अमीरखान पठाणानें जोधपूरच्या मुलखास पुष्कळ उपद्रव दिला. उदेपूरची पुत्री कृष्णाकुमारी इची प्राप्ती करून घेण्याकरितां मानसिंहानें जयपूरच्या जगत्सिंहाबरोबर युद्ध सुरू केलें. ह्या युद्धामुळें अमीरखानासारख्यांचें रजपुतान्यांत चांगलेंच फावलें. सन १८१८त मानसिंहाचा मुलगा चतुसिंह ह्याजबरोबर इंग्रजांनीं तैनाती फौजेचा तह केला. पुढें चतुसिंह लवकरच मरण पावला. मानसिंहानें लवकरच राज्यकारभार हातीं घेऊन तह मोडिला, तेव्हां इंग्रज सरकाराशीं त्याच्या अनेक तक्रारी झाल्या. पुढें सन १८३९त इंग्रजांनीं जोधपूरच्या मुलखांत शिरून स्वस्थता केली. सन १८४३त राजा मानसिंह मरण पावला.

नंतर तख्तसिंह नामक एका दूरच्या वंशजास इंग्रजांनीं जोधपूरच्या गादीवर बसविलें. सन १८५७ सालच्या बंडांत ह्या राजाकडून इंग्रजांस चांगली मदत झाली. तरी त्यानें राज्यकारभार चांगल्या रीतीनें चाल- विला नाहीं. सन १८७३त तख्तसिंह स्वर्गवासी झाल्यावर त्याचा मुलगा जशवंतसिंह गादीवर बसला, तो स. १८९५त वारल्यावर, त्याचा मुलगा सरदारसिंह गादीवर बसला, तोच हल्लीं राज्य करीत आहे.

मारवाडच्या राज्याची वस्ती सुमारें तेवीस लाख असून, सालाचें उत्पन्न अदमासें त्रेचाळीस लाख रुपये आहे.

७. रजपुतांच्या इतिहासाचें समालोचन.—रजपुतान्यांत लहान मोटीं पुष्कळ संस्थानें आहेत. त्यांत उदेपूर, जयपूर व जोधपूर हीं तीन ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचीं आहेत, म्हणून तेवढ्यांचाच त्रोटक इति- हास येथें दिला. थोड्या बहुत फरकानें सर्वांची स्थिति आज एकसारखीच झाली आहे, म्हणून ह्या एकुणिसाव्या शतकांतील रजपुतांच्या इतिहासांत

एक प्रकारचें शोचनीय मांद्य दृष्टीस पडतें. उदेपूरचें घराणें आज गरीबींत आहे, तरी तें फार प्राचीन व निष्कलंक आहे. इतिहासाचें शास्त्रीय अध्ययन करणारास ह्या घराण्यांत भरपूर साहित्य सांपडेल. राष्ट्राची उन्नति व अवनति कशी होते हें समजल्यानें जो बोध व्हावयाचा, तो एकट्या उदेपूरच्या इतिहासानें होण्यासारखा आहे. वरील हकीकती त्रोटक आहेत तरी पुढें त्यांतील उणेपणा अनेक ठिकाणीं भरून काढावा लागणार आहे. संगतवार गोष्टी डोळ्यांपुढें असल्या म्हणजे पुढील हकीकती चांगल्या समजतील, एवढ्याच करितां हा भाग स्वतंत्रतेनें दिला आहे.

रजपुतांत पराक्रमी राजे पुष्कळ झाले. एकट्या उदेपुरांतच सन १२०० पासून १८०० पर्यंत पांचशें वर्षांचा काळ गेला, तेवढ्या अवधींत नालायक राजा बहुधा कोणी निपजलाच नाहीं असें म्हटलें तरी चालेल. मात्र ही लायकीनालायकी रजपुतांच्याच दृष्टीनें ठरविली पाहिजे. जयपूरच्या राजांनीं गेल्या दोन शतकांत मिळविलेली कीर्ति इतकी उज्वल आहे, कीं ती कालासही पुसून टाकतां यावयाची नाहीं. जोधपुरांतही जसवंतसिंह व अजितसिंह ह्यांच्यासारखीं नररत्नें निपजलीं. ह्या सर्व राजांच्या मनांत प्रजेचें कल्याण करणें हाच मुख्य हेतु होता. उदेपूरच्या इतका सज्जन राज्यकर्त्यांचा लांबच्या लांब वंश दुसऱ्या कोठें सांपडेल कीं नाहीं ही शंका आहे. त्यांच्यावर शत्रूंनीं इतके आघात केले, कीं त्यांतून निभावल्याबद्दल त्यांची तारीफ केल्याशिवाय राहवत नाहीं. अलाउद्दीन, बाबर, अकबर, औरंगजेब वगैरे अनेक पराक्रमी पुरुषांनीं उदेपूरच्या राजपुरुषांपुढें अगदीं हात टेंकिले. सर्व राज्याचा नाश केलासें समजून ह्या पराक्रमी पुरुषांनीं आपली पाठ फिरविली नाहीं, तोंच उदेपूरचें राज्य पूर्ववत् चालू आहे असें त्यांस दिसे. मुसलमानांस हार जावयाचें नाहीं, व सत्य सोडावयाचें नाहीं, ह्या निर्धाराबद्दल त्यांस अनेक वेळां जोहार करावे लागले, राजधानीचीं शहरें बदलावीं लागलीं, आणि अनेक संकटें सहन करावीं लागलीं. सत्य सुटलें नाहीं, नीति सुटली नाहीं, सदाचरणाचा धोपट मार्ग सुटला नाहीं. अलाउद्दीन, तयमूरलंग, सय्यदलोदी वगैरेंच्या वावटळी जोरानें सभोंवार उठत असतां, चितोडच्या राण्यांनीं आपलें स्वातंत्र्य दुसऱ्यास दिलें नाहीं, आणि दुसऱ्याचें हरण केलें नाहीं, ही गोष्ट विशेष आहे.

रजपूत लोक विलक्षण हट्टी आहेत. क्षुल्लक मानपानार्थ ते वाटेल तो स्वार्थत्याग करितात. त्यांच्यांतील बरेच झगडे अशा मानपानांच्या कारणांवरून, किंवा स्त्रियांचें पातिव्रत्य व अब्रू रक्षण करण्याकरितां घडून आले आहेत. वीर, करुण, वगैरे रसांनीं परिप्लुत असे अनेक प्रकार त्यांच्यांत प्रत्यक्ष घडून आले आहेत.

वरील रजपूत घराण्यांच्या तोडीचीं मुसलमानांचीं घराणीं थोडींच आढळून येतात. कपट, विश्वासघात, क्रौर्य, हत्या, इत्यादि गोष्टींनीं मुसलमानांचे इतिहास परिपूर्ण आहेत. एक इसम गादीवर बसला कीं त्यानें आपल्या भावांस व इतरांस हालहाल करून ठार मारावें; तसेंच शेजारच्या राजाचा पडता काळ पाहून त्याजवर हात मारून आपला लाग साधून घ्यावा; हे प्रकार वारंवार घडत. रजपूत राजांमध्यें प्रसंगास सर्वांनीं एक होण्याजोगा मित्रभाव वसत होता. औरंगजेबाच्या जुलमास त्रासून पुनः मोगलांशीं सख्य करावयाचें नाहीं, असा त्रिवर्ग राजपुरुषांनीं निर्धार करून तो अखेरपर्यंत चालविला, हें प्रसिद्धच आहे. शत्रु कितीही बलाढ्य असो, आपण नीतीनें व नेटानें वागलें म्हणजे त्याच्या हातून आपलें कांहीं होत नाहीं, हें उदेपूर व अकबर ह्यांच्या संबंधावरून उघड होतें. अकबरानें होते तेवढे प्रयत्न केले, पण उदेपूरचे राणे त्यास वश झाले नाहींत.

मुसलमानांची खरी कर्तबगारी मोगल बादशाहींत दिसून येते. त्या भागास आतां सुरुवात करावयाची. पण त्यापूर्वी पांचशें वर्षांतील मुसलमानी अंमलाचें विहंगमदृष्टीनें विवेचन करणें जरूर आहे.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

प्रकरण एकोणिसावें.

गतकालाचें पर्यालोचन.

इ. स. १०००–१५००.

१. राज्यव्यवस्था व लोकस्थिति. २. दोनधर्मीलोकांचे एकमेकांवर परिणाम.
३. रजपुतांच्या पाडावाची मीमांसा.
(१) उत्पत्तीचा संघशक्तीला विरोध. (२) रजपूत बाण्याची बाधकता.
(३) उपाध्यायांचा राष्ट्रद्रोह. (४) आनुवंशिक वैरभाव.
(५) वेडगळ धर्मसमजुती. (६) युद्धकलेचें अज्ञान.
(७) प्रतिकूल सृष्टस्थिति. (८) बाटलेल्या हिंदूंचा उत्साह.
(९) मुसलमानांच्या परिस्थितीचा पेंच. (१०) 'लेन्पूल'नें केलेलें निदान.
४. स्वत्वरूपी भावनेचा अभाव. ५. आल्बेरूनीचें हिंदूंविषयीं मत.
६. ग्रंथसंपत्ति व हिंदूंची बौद्धिक सरशी. ७. मध्यकालीन इमारतींचें बांधकाम.
८. आशियायूरोपच्या तत्कालीन संस्कृतीची तुलना.

१. राज्यव्यवस्था व लोकस्थिति.—मुसलमान ग्रंथकारांनीं व अनेक प्रवाशांनीं गेल्या चारशें वर्षांतील हिंदुस्थानच्या अंतःस्थितीविषयीं बरीच माहिती लिहून ठेविली आहे. तिजवरून तत्कालीन स्थितीची कल्पना करितां येते.

सन् १००१तील महंमुदाच्या पहिल्या स्वारीपासून स. १५२६त बाबरानें हिंदुस्थानांत मोगल बादशाहीची स्थापना केली, तेथपर्यंत एकंदर सव्वा-पांचशें वर्षांचा काल गेला. पण पहिलीं दोनशें वर्षें, म्हणजे महंमद घोरीनें रजपूत राज्यें जिंकिलीं तेथपर्यंत, मुसलमानांचा अंमल हिंदुस्थानांत होता असें म्हणतां येत नाहीं. सन ११९३त घोरीवंशाची स्थापना झाल्यापासून दिल्लीपदावर मुसलमान सुलतान कायम झाले. त्या वर्षा-पासून सन १५२६ तील पानिपतच्या लढाईपर्यंत ३३३ वर्षांपैकीं पहिल्या कांहीं वर्षांपर्यंत मुसलमानी अंमलाचा विस्तार बराच संकुचित होता. अला-उद्दीन खिळजीपासून महंमद तुघ्लखपर्यंत मुसलमानी राज्याची

वृद्धि सामान्यतः सर्व हिंदुस्थानभर झाली. तथापि कृष्णेच्या दक्षिणेकडील प्रदेश ह्या काळांत बहुतेक हिंदूंच्याच ताब्यांत होता. महंमद तुघलखच्या वेळेपासून मुसलमानी राज्याचे अनेक विभाग झाले, त्यांची हकीकत मागें आलीच आहे.

आंकड्यांनीं ह्या काळाचें महत्त्व मापतां येण्याजोगें नाहीं. ३३३ वर्षें ही संख्या मोठी दिसते. पण युरोपांतल्याप्रमाणें राष्ट्रेतिहासांत नमूद करण्यासारख्या विशेष गोष्टी ह्या काळांत घडल्या नाहींत. हिंदु-मुसलमानांचे झगडे अव्याहत चालू होते. ह्या झगड्यांमध्येंच सर्व काळ निघून गेल्यामुळें दिल्लीच्या सुलतानांस जनहिताकडे लक्ष देण्याला फुरसत मिळाली नाहीं. किंवा अशा कृत्यास लागणारी योग्यताच बहुतेकांच्या अंगीं नव्हती. *लाखों हिंदूंस मुसलमानांनीं आपल्या धर्मांत आणिलें. त्यांचीं देवालयें मोडून मूर्तींचा व अनेक नामांकित विद्यापीठांचा विध्वंस केला.* मुसलमानांच्या जुलुमास न जुमानितां हिंदूंनीं आपले धर्माचार पूर्ववत्-किंबहुना ज्यास्तच निकरानें-पाळिले.

बराण म्हणून एक शहर होतें, त्यासच हल्लीं बुलंदशहर म्हणतात. त्याजवर स. १०१८त गज्नीच्या महंमुदानें स्वारी केली, त्या वेळीं तेथें हरदत्त नांवाचा राजा राज्य करीत होता. तो महंमुदास शरण गेला; आणि त्यानें आपल्या दहा हजार अनुयायांसह मुसलमानी धर्म स्वीकारिला, (Vincent Smith). अशा प्रकारें नाइलाज होऊन, जुलमानें, अगर जिजिया कर देण्यास ऐपत नसल्यामुळें, पुष्कळ हिंदु लोक मुसलमान होत असत. शेवटल्या कारणानें तर खालच्या वर्गांतील असंख्य लोक मुसलमान झाले. हिंदुस्थानांतील मुसलमानांची बरीचशी संख्या मूळच्या बाटलेल्या हिंदूंची आहे. कित्येक मोठमोठ्या लोकांचे मात्र उल्लेख ग्रंथांतरीं आहेत. सामान्य लोकांचा उल्लेख असणें शक्य नाहीं. सारांश, मुसलमानांच्या ह्या जबरदस्त तडाख्यांतून हिंदुलोक वांचले हेंच नवल.

मुसलमान राज्यकर्त्यांनीं हिंदूंचे कायदे मानिले नाहींत. न्यायाधीशाच्या कामांवर मुसलमान लोक नेमिलेले असल्यामुळें, त्यांस हिंदु कायदे समजत नसत; आणि समजले तरी त्यांप्रमाणें अंमलबजावणी करणें त्यांस अधर्म वाटे. म्हणून हिंदुधर्मशास्त्राचा उपयोग, फार तर चोरून मारून, मिळकतीचा वारसदार ठरविणें वगैरे प्रश्नांत, लोक आपसांत

करीत. हिंदूंमध्यें जातिभेद व त्यांचीं कर्तव्यें यांजबद्दल सक्त नियम असत. त्यांचें उल्लंघन मुसलमानांच्यानें होत नसे. दरबारच्या सर्व कामांत त्यांस हिंदूंची मदत अवश्य लागे, तरी मानाच्या व मोठाल्या अधिकाराच्या जागा हिंदूंस मिळत नसत. म्हणून राज्यकारभारांत हिंदूंचा हात बिलकुल नसे. रजपुतांचीं कित्येक राज्यें खेरीजकरून बाकीचीं पुरातन काळचीं सर्व हिंदु राज्यें मुसलमानांच्या ह्या रियासतींत लयास गेलीं, आणि जीं राहिलीं त्यांनीं मुसलमानांस खंडणी देऊन मांडलिकपणा पत्करिला. दक्षिणेंत विजयनगरचें राज्य भरभराटींत होतें, पण त्याचाही पुढें लवकरच अंत झाला. फिरोज तुघ्लख शिवाय करून इतरांनीं रयतेच्या कल्याणाचीं कोणतींही स्मरणीय कृत्यें केलीं नाहींत.

सरकारच्या उपयोगाकरितां घोड्याच्या व पायदळ टपालाची सोय केलेली असे. मुसलमानांनीं घातलेल्या पाठशाळा असत. पण त्यांत आरबी व फारसी ह्या भाषा मात्र शिकवीत. म्हणून सामान्य रयत लोकांस त्यांचा उपयोग होत नसे. शिवाय कित्येक धर्मपुस्तकांपलीकडे त्यांत कांहींच शिक्षण होत नसल्यामुळें, हिंदूंच्या प्रचंड ज्ञानभाण्डाराची त्यांच्यानें बरोबरी करवली नाहीं. पुष्कळ सुलतान विद्येचे आश्रयदाते असत असें लिहिलेलें आहे. ह्याचा अर्थ इतकाच, कीं सिरिया, आरबस्थान, इराण इत्यादि देशांतून अनेक पंडित आणवून त्यांस दिल्लीचे सुलतान आश्रय देत. पण अशा विद्वानांकडून देशोपयुक्त कांहीं कृत्य झाल्याचें दिसून येत नाहीं. तसा आश्रय हिंदु पंडितांस मिळाला नाहीं. राजाश्रय नसून हिंदूंनीं भाषेची केवढी कामगिरी केली हें निराळ्या कलमांत सांगितलें आहे. आश्रय असता तर ह्याहून प्रचंड उद्योग त्यांनीं केले असते. मुसलमान बादशहांनीं हिंदुशास्त्रांस मदत दिली असती, तर त्यांच्यांतूनच पाश्चात्य सुधारणेस पुरून उरणाऱ्या प्राच्य सुधारणेचा उद्भव होऊन, त्याचें श्रेय मुसलमानी राज्यकर्त्यांस मिळण्याचा संभव होता, असें अनेकांचें मत आहे. मध्ययुगांत पाश्चात्य राष्ट्रें अज्ञानसागरांत बुडालीं असतां, हिंदुस्थानांतील पूर्वीच्या अमदानींत लोकांस ज्ञानलाभासाठीं ह्या देशाच्या तोंडाकडे पाहवें लागे. पण हा मान ह्या देशास कायमचा मिळावा अशी व्यवस्था ठेवण्याची बुद्धि मुसलमान राज्यकर्त्यांस झाली नाहीं, आणि आमचें राष्ट्र दिवसेंदिवस अज्ञानपंकांत निमग्न होत गेलें. बगदाद, डमास्कस इत्यादि

ठिकाणीं आरबांनीं जशी ज्ञानज्योत पाजळिली, तशी तुर्कांनीं हिंदुस्थानांत पाजळिली नाहीं हें त्यांस मोठें लांच्छन आहे.

ह्या काळांत 'ऊर्दू' भाषेची उत्पत्ति झाली. 'ऊर्दू' हा शब्द मूळचा तुर्की भाषेंतला असून त्याचा अर्थ कँप म्हणजे छावणी असा आहे. 'होर्ड' (horde=फौजेचा जमाव) म्हणून जो इंग्रजीभाषेंत शब्द आहे, तो 'ऊर्दू' शब्दापासूनच निघालेला आहे. आरंभीं जे मुसलमान योद्धे स्वाऱ्या करीत या देशांत आले, त्यांस आपल्या छावणींत बसूनच दरबारचीं कामें करावीं लागत. त्यांची मूळची भाषा तुर्की अगर पर्शियन असून, हिंदुस्थानांत आल्यावर त्यांचे व्यवहार दिल्लीनजीकच्या पश्चिम-हिंदी भाषेंत घडूं लागले. ह्या कारणास्तव इराणी, तुर्की, आरबी वगैरे *भाषांतील पुष्कळ शब्द व प्रयोग ह्यांचें हिंदीभाषेंत मिश्रण होऊन, मुसलमानांच्या छावणींची म्हणून* एक नवीन भाषा बनली, तीच ऊर्दू होय. (Vincent Smith). राज्यकर्त्यांच्या भाषेवर हिंदूंनीं जो पगडा बसविला, त्याचा परिणाम ही भाषा आहे.

त्या वेळच्या हकीकतींवरून असें दिसून येतें, कीं मुसलमान राज्यकर्ते लोकांची भेट घेण्यास आळस करीत नसत. स्वतःच पुष्कळ कामकरीत आणि कुराणांतील नियमांनुसार वागून रयतेचा परामर्ष घेत. ते आपला स्वतःचा अधिकार प्रांतोप्रांतींच्या सुभेदारांस देत; आणि हे सुभेदार मर्जीस वाटेल त्याप्रमाणें आपला अधिकार वापरीत. बादशाही लष्करास लोक पुरविण्याचें काम ह्या सुभेदारांचें असे. लष्करचे लोक कित्येक जन्मभर नोकरी करणारे असत आणि बाकीचे जहागीरदार लोकांनीं युद्धाचे प्रसंगीं पुरविण्याचा प्रघात असे. कुराण पढलेल्या काजींची न्याय देण्याच्या कामावर नेमणूक होत असे. त्यांच्या मदतीस दुसरे कामदार नेमिलेले असत. मौलवी किंवा मुल्ला या लोकांस पसंतीप्रमाणें न्याय-खात्यांत नोकरी मिळे. मुलकी कज्जे, सरकारच्या विरुद्ध केलेले गुन्हे व हिंदूंचे गुन्हे यांचा इनसाफ वर सांगितलेल्या कामदारांकडे सोंपविलेला असे, आणि दिवाणी व दुसरे गुन्हे काजीकडे पाठविण्यांत येत. हिंदु-धर्मास मात्र कोणत्याही प्रकारची मदत करण्यांत येत नसे मशिदी वगैरे मुसलमानी देवस्थानांचे खर्च लोक खासगी रीतीनें संभाळीत.

एकंदरींत हिंदु लोकांस कोणी विचारीत नसे. त्यांजला जिझिया-कर द्यावा लागे खरा, पण खालच्या प्रतीच्या सरकारी नोकऱ्या त्यांस मिळत. मुलकी खात्यांत त्यांचा भरणा विशेष असे. व्यापार व उदीम मुख्यत्वेंकरून हिंदूंच्याच हातांत असे. आरंभींचे मुसलमान लोक धर्माचे बाबतींत विशेष कडवे होते, पण उत्तरोत्तर त्यांच्या अंगांतील कडवेपणा जिरत चालला, आणि हळूहळू हिंदूंचें मुसलमान होणें कमी होत गेलें.

मुसलमानी अमलाच्या ह्या चारशें वर्षांच्या काळांत लोकसौख्यवृद्धि-कारक राज्यकारभाराची उन्नति झाल्याचें दिसून येत नाहीं, ही शोचनीय गोष्ट आहे. प्राचीन हिंदु राज्यव्यवस्थेंत किंवा पश्चिमेकडे रोमन किंवा ग्रीक राष्ट्रांत राजनीतीचीं तत्त्वें दिवसेंदिवस दृढतर होत जाऊन लोकांस स्वातंत्र्य व सौख्य मिळत गेलें. पण हिंदुस्थानांत मुसलमानांच्या अमदानींत तसा कांहीं प्रकार घडला नाहीं. संग्रामपरंपरा, धामधूम व कडव्या लष्करी जोरावर एकामागून एक प्रदेश हस्तगत करणें, ह्यांपलीकडे इतिहासकारास क्षणभर आराम वाटणारी उच्चतर सुधारणेची गोष्ट नमूद करण्यासारखी मुसलमानांच्या ह्या अमलात घडली नाहीं. सुलतानांचा अंमल अनियंत्रित असे. आपला खून किंवा बंड होऊन राज्य जाईल, ह्या भीतीनेंच तो अनियंत्रितपणा काय कमी होईल तेवढाच. राजवंशाची स्थापना किती क्षणभंगुर, आणि राज्यपदाची अदलाबदल किती सुलभ आहे, हें मात्र ह्या कालाच्या इतिहासावरून चांगलें व्यक्त होतें. राज्यकर्त्यांच्या स्वभावावर व लहरीवर प्रजेचें सुखदुःख सर्वस्वी अवलंबून असल्यामुळें, राज्यव्यवस्था ह्या क्षणीं सुखावह तर अन्यक्षणीं अत्यंत दुःसह होई. क्षणांत राज्यचक्र सर्व देशभर पसरे आणि क्षणांत त्याचा इतका संकोच होई कीं त्याचा मागमूस सांपडणेंही कठीण. एकंदरींत ह्या मुसलमानी राज्याला लष्करी जोराशिवाय चिरस्थायिकतेचें दुसरें बंधन नव्हतें. फार तर काय, चालू असलेल्या राज्यसत्तेस उतरती कळा लागून कालांतरानें ती विसकळीत होणें, म्हणजे मुख्य राज्य मोडून त्याचीं निरनिराळीं लहान स्वतंत्र राज्यें बनणें, नंतर एखादा पराक्रमी पुरुष पुढें येऊन त्यानें त्या सर्वांस जिंकून पुनः स्वतःची एकछत्री सत्ता स्थापन करणें, त्या सत्तेचाही पूर्ववत् लय व पुनरपि एकीकरण होणें, असा अव्याहत क्रम आज हिंदुस्थानच्या इतिहासांत कैक

वर्षें सारखा चाललेला आहे. पौराणिक कालापासून चालत आलेल्या हिंदु राजसत्तेस विसकळीत रूप प्राप्त होतांच, गज्नवी महंमूद, शहाबुद्दीन घोरी, व अलाउद्दीन खिलजी, अशा पराक्रमी वीरपुरुषांनीं एकछत्री मुसलमान बादशाहीची इमारत प्रथमतः उभी केली. महंमद तुघ्लखच्या वेडेपणानें ती इमारत लवकरच ढांसळली, आणि तिचे तुकडे देशभर स्वतंत्रपणें पसरले. काश्मीर, सिंध, जोनपूर, बंगाल, गुजराथ, माळवा, खानदेश, महराष्ट्र इत्यादि ठिकाणीं दिल्लीच्या सुलतानांचे सुभेदार धन्यांची सत्ता आपणच आपल्या हातीं बळकावून, स्वतंत्रतेनें राज्यकारभार करूं लागले. सुमारें दोनशें वर्षें अशाप्रकारें विसकळीत राज्यसत्ता चालल्यावर, अकबरासारख्या वीर्यशाली पुरुषानें ह्या स्वतंत्र सुभ्यांस पुनः स्वतःच्या एकछत्री अमलाखालीं आणिलें. पुनः दोनशें वर्षें लोटतात न लोटतात, तोंच ठिकठिकाणच्या मोगल सुभेदारांनीं आपल्या धन्याच्या सत्तेस धाब्यावर बसवून आपापल्या जागीं स्वतंत्रता धारण केली. त्यामुळेंच अयोध्या, बंगल, अर्काट, हैदराबाद इत्यादि ठिकाणचे अंमलदार अव्वल इंग्रजींत स्वतंत्र असे फडकलेले दृष्टीस पडतात. फिरोज तुघ्लखनें शहाणपणा करून विभक्त झालेल्या कित्येक बादशाही अंमलदारांचें स्वातंत्र्य कबूल केलें.

पण सामान्यतः ह्या मानवसृष्टींत कोणतीच क्रान्ति एकदम घडून येत नाहीं. विशेषतः हिंदुस्थानांत तर मोठी क्रान्ति म्हणून क्वचित्च घडते असें म्हटलें तरी चालेल. हजारों वर्षें मुसलमानांचे हल्ले ह्या देशावर येत होते, तरी हिंदु लोकांच्या पूर्वजीवनक्रमांत फारसा फरक झाला नाहीं. हल्लीं सुद्धां इंग्रजी राज्याखालीं जुने प्रचार बरेच कायम आहेत. हिंदु व मुसलमान हीं दोन राष्ट्रें इतके दिवस एकेठिकाणीं राहून एकमेकांपासून इतकीं अलिप्त राहिल्याचें उत्कृष्ट उदाहरण भूतलावर हिंदुस्थानाशिवाय दुसरें नाहीं. इंग्लंडांत नार्मन व सॅक्सन ह्या दोघांचें संमिश्रण शंभर वर्षांच्या आंत झालें. म्हणून हिंदुस्थानच्या इतिहासांत मोठमोठ्या पराक्रमी पुरुषांच्या हालचालींपलीकडे अत्रस्थ लोकांच्या जीवनक्रमाचें वर्णन बहुधा येतच नाहीं. गज्नवी महंमूद, अला-उद्दीन खिलजी, बाबर, अकबर, औरंगजेब असल्या विख्यात मूर्तींनीं केलेल्या उलाढाली वर्णिल्या, कीं येथचा इतिहास संपला. अर्थात् हिंदुस्थानचा इतिहास राज्यकर्त्यांचा आहे, लोकांचा नव्हे. अशा दृष्टीनें पाहतां एकामागून एक अनेक राजवंश मुसलमानी अमलांत

२४-५-७-७९१-२०००

उदयास आले व लय पावले. त्यांच्याच भारूड कथांनीं हा मुसलमानांचा इतिहास भरलेला आहे. ह्याविषयीं गिबननें बांधिलेला सिद्धांत सर्वथैव खरा ठरतो. तो असा. ‘ आशियांतील राजवंशांचा इतिहास थोडक्यांत सांगावयाचा म्हणजे, एखाद्या वंशानें स्वपराक्रमानें महत्पदास चढणें, पुढें आपसांत कलह होऊन त्यास उतरती कळा लागणें, व शेवटीं त्याचा नाश होणें, अशा घडामोडींचें निरवधि वर्तुल होय. ’* हा क्रम हिंदुस्थानच्या इतिहासांत अव्याहत दिसून येत आहे.

तख्तनशीन झाल्याबरोबर कुटुंबांतील यच्चयावत् पुरुषांची व अनेक वेळां स्त्रियांची अत्यंत क्रूरतेनें दुर्दशा करणें,—त्यांस जन्मांध करून बंदिवासांत लोटणें,-शिरच्छेद करणें,—हा निंद्य प्रकार मुसलमानी रियासतीप्रमाणें इतरत्र फारसा आढळून येत नाहीं. अशा कृत्यांचा साहजिक परिणाम जो भयंकर सूड, तोही ह्या अमलांत भरपूर दृष्टीस पडतो. दैववशात् एखादा इसम राज्यपदापन्न नातेवाइकाच्या तावडींतून सुटला, तर त्याच्या पापाचें पुरेपूर प्रायश्चित्त तो त्यास देण्यास चुकत नाहीं. हाही आपली पाळी आली असें समजून नानातऱ्हेचीं अनुचित कृत्यें करितो. दरबारी लोक त्यास मदत करितात; आणि अशा राज्यक्रान्तीचा परिणाम राजधानी शहरापलीकडच्या लोकांस बहुधा भोंवत नाहीं.

दक्षिणेंत विजयनगरचें राज्य फार भरभराटींत होतें. त्या राज्यांत व्यापाराची घडामोड पुष्कळच चाले. गंगानदीवर बांबूचीं गलबतें चालत. ताडपत्रांचा उपयोग ग्रंथ लिहिण्याचे कामीं होई. तरी पुढें लवकरच कागदही इकडे तयार होऊं लागला. पोर्तुगीझ प्रवासी बार्बोझा, सोळाव्या शतकाच्या आरंभीं गुजराथेंत फिरत होता. तो सांगतो कीं गुजराथचे लोक एकंदरींत सुसंपन्न व विलासी होते. त्यांजला कपड्यालत्त्याची ददात नसून ऐषआराम उपभोगिण्याला पैसा उरत असे. तो प्रांत संपत्तिमान असल्यामुळें बाहेरच्या सर्व देशांतील लोक तेथें येऊन राहिले होते. बार्बोझा म्हणतो, ‘ गुजराथचा प्रदेश सुपीक आहे. घरें कौलारू व देखणीं

* ‘ Gibbon sums up the history of Asiatic dynasties as one unceasing round of valour, greatness, discord and decay.’ Lane-Poole.

आहेत. बागबगीचे व फळमळे विपुल आहेत. दिव येथें चणचणीचा उदीम चालतो. खंबायतेस सुती व रेशमी कापड अप्रतिम होतें; तेथचे कारागीर हस्तिदंत, चांदी, लांकूड ह्यांजवर नकशीचें उत्कृष्ट काम करितात. पश्चिम किनाऱ्यावर सुपारी, नारळ, मसाले व औषधी ह्यांचा व्यापार अतोनात आहे.'

हिंदुस्थानांत मुसलमान लोक शिरले, तेव्हांपासून त्यांनीं येथें अनेक वेळां लूट केलेली आहे. आरंभीं आरंभीं तर देवळें व शहरें लुटणें, मूर्ति फोडणें, घरें जाळणें व माणसांची कत्तल करणें, हे प्रकार बरेच वारंवार होत असत. गझ्नवी महंमूद, महंमद घोरी, अलाउद्दीन खिलजी, तयमूरलंग, नादीरशहा, अहंमदशहा अब्दाली, इत्यादि पुरुषांनीं व त्यांच्या अनेक सरदारांनीं व प्रांतोप्रांतींच्या अमलदारांनीं अनेक शहरें व देवालयें लुटलीं आहेत. मुसलमान योध्यांची आरंभींची बरीच संपत्ति ह्या लुटीनें मिळविलेली होती ह्या लुटीपैकीं आरंभींचा बराच पैसा देशाबाहेर गेला, पण पुढें बादशहांनीं येथेंच कायमचें वास्तव्य केल्यामुळें लुटीचा पैसा देशांतच राहिला.

२. दोनधर्मी लोकांचे एकमेकांवर परिणाम.—मुसलमानांची ऐहिकसौख्यपरता व हिंदूंची पारमार्थिकसौख्यपरायणता—यांच्या कलहाचें पर्यवसान कसें झालें हें समजण्यास विशेष साधन नाहीं. बहुतेक हकीकती मुसलमानांनीं लिहिलेल्या अतएव एकतर्फी आहेत. परंतु हिंदु लोकांनीं आपलें स्वातंत्र्य परत मिळविण्यास केव्हां केव्हां खटपट केली, ही गोष्ट खुस्रूचें बंड व फिरोज तुघ्लखनें केलेला ब्राह्मणांचा छळ, अशा प्रकारांनीं चांगली व्यक्त होते. लष्करी जोरावर हिंदूंच्या भक्कम धर्माचा पाडाव करण्यास झटणें भ्रांतिमूलक होय, हें तत्त्व पांचशें वर्षांच्या अनुभवानें कां होईना, पण अकबरासारख्या सुजन राज्यकर्त्यास तेव्हांच कळून आलें होतें. म्हणूनच वैरभाव सोडून गोडीगुलाबाचा सौम्य मार्ग त्यानें स्वीकारिला, आणि हिंदूंशीं अनेक स्नेहसंबंध जोडिले. अंततः ह्या युक्तीचाही फारसा उपयोग झाला नाहीं हें इतिहासावरून स्पष्ट कळतें. तथापि कित्येक सद्गुणी राज्यकर्त्यांच्या चातुर्याचा व हिंदुधर्माच्या मुळाशीं असलेल्या उत्कृष्ट उदार तत्त्वांचा मात्र चांगला परिणाम झाला, तो असा. दोन धर्म भिन्न असले म्हणून ते एक ठिकाणीं सुखशांतीनें नांदू

शकणार नाहींत असें मानणें चुकीचें होय, हें हिंदुस्थानच्या इतिहासावरून जगाच्या निदर्शनास आलें आहे. दुसऱ्यांस उपसर्ग न देतां आपापले धर्म स्वतःच्या समजुतीप्रमाणें पाळण्यास तयार असल्यास, लोकांचे सामाजिक, राजकीय व इतर व्यवहार सुरळीत चालण्यास धर्मांची हरकत येत नाहीं. दोन धर्मांच्या लोकांमध्यें नेहमींचे व्यवहार बिनतक्रार चालतात; हिंदु मुसलमानास जामीन राहतो; हिंदु शेतकरी मुसलमान जमीनदाराचें शेत लागवडीनें ठेवितो; अशा प्रकारचें ह्या दोन धर्मांचें सख्य हिंदुस्थानांत फार स्मरणीय झालें आहे.

मुसलमानांनीं हिंदुस्थान देश जिंकिला, तरी हिंदूंची उच्च संस्कृति त्यांच्यानें नष्ट करवली नाहीं. येथेंही रोमन व गाथ लोकांच्या अनुभवाची पुनरावृत्ति झाली. हिंदूंच्या बाह्य शक्तीवर मुसलमानांचा ताबा बसला, पण त्यांच्या सामाजिक, नैतिक व व्यावहारिक बाबतात हिंदूंनींच मुसलमानांस ग्रासून टाकिलें. व्यवहाराची प्रत्येक बाब हिंदूंच्या हातांत होती. हिंदूंच्या मदतीशिवाय मुसलमानांचें येथें क्षणभर चाललें नसतें. धर्मसंबंधांतही हिंदूंचा पगडा मुसलमानांवर बसला आहे, हें मागें पान १७ वर सांगितलेंच आहे. पण जेवणखाण, आहारविहार, सणवार, करमणुकी, पोशाख इत्यादि बाह्य बाबतींत, आणि बहुतेक बौद्धिक व नैतिक बाबतींत हिंदूंनींच मुसलमानांस जिंकिलें आहे, असें म्हणावें लागतें. आरबस्तानांत मुसलमानांचे जे मूळ धर्मसंस्कार होते, त्यांपैकीं येथें पाऊण हिस्सा नाहींसे होऊन, त्यांच्या बदलीं हिंदूंचे समारंभ त्यांनीं स्वीकारिले आहेत. साधूंची पूजा, मयतांचे उत्सव व श्राद्धें, इत्यादि अनेक बाबती हिंदूंपासून मुसलमानांनीं घेतल्या. मयतांचें स्मरण मागें जाग्रत ठेवणें, अथवा मयतांच्या आत्म्याच्या शांतीसाठीं प्रार्थना करणें ह्या गोष्टी कुराणांत मना केलेल्या आहेत. प्रत्येकानें ह्या आयुष्यांतच कायतो पुरुषार्थ साधून घ्यावा, मरणानंतर त्याची कांहींएक किंमत नाहीं; असें असतां, मेल्यानंतरही आपली योग्यता मोठी समजून ती कायम ठेवण्याचा प्रयत्न करणें निंद्य होय, असा पैगंबराचा उपदेश होता. प्रत्यक्ष महंमद पैगंबराची सुद्धां कबर नाहीं. त्याच्या उलट ताजमहालचें उदाहरण पहा. सारांश, 'हिंदुस्थानावर मुसलमानांनीं एकसारखे पांचशें वर्षें निकराचे हल्ले करून आर्यसुधारणा मागें हटविली आणि

तिजवर आपला पगडा बसविला. पण युरोपांत जो प्रकार मुसलमानांनीं केला, तो हिंदुस्थानांत होणें शक्य नव्हतें. मुसलमानांनीं हिंदुस्थान जिंकिलें, तथापि मुसलमानी छाप आर्य सुधारणेवर बसली नाहीं. उलट मुसलमानांनाच हिंदुलोकांनीं पुष्कळसें आपल्यासारखें बनविलें. युरोपियन सुधारणा मुसलमानांच्यापेक्षां हीन असल्यामुळें, युरोपांत जशी मुसलमानांनीं आपली छाप बसविली, तशी छाप, हिंदुस्थानांत बसविणें शक्य नव्हतें.' (Frazer's Literary History of India.)

'ह्या वेळीं सर्व हिंदुस्थानांत जिकडे तिकडे घोर रणें माजलीं होतीं. मुसलमान आले असें म्हटलें, कीं सर्वांच्या अंगावर थरदिशीं कांटा उभा राही. जे शूर असत ते मुसलमानांस न जुमानतां त्यांजबरोबर संग्राम करण्यास प्रवृत्त होत. पण त्यांचा तरी नुसत्या शौर्यानें निभाव लागत नसे. मुसलमानांस न जुमानणारे थोडे असून त्यांना भिऊन लपून बसणारेच फार असत. त्यांमुळें अल्पसंख्य हिंदूंचा मुसलमानी सेनासागरापुढें निभाव लागत नसे. उलट अंगीं धैर्य असलेले लोक एकामागून एक रणांगणीं पडून मृत्युमुखीं जात. त्यामुळें दिवसेंदिवस क्षत्रियवर्गांतील शूर व कर्तबगार पुरुष नष्ट होत चालले. स्त्रिया शत्रुभयानें पातिव्रत्य रक्षणार्थ पटापट अग्निकाष्ठें भक्षण करण्याकरितां सतीचीं वाणें घेऊन बेधडक आपल्या पतींबरोबर चितांमध्यें प्रवेश करण्यास ज्यास्त ज्यास्त तत्पर होत चालल्या. मुलेंबाळें तरी सुरक्षित स्थळीं राहवीं, म्हणून त्यांस रानावनांत पोंचवून, आईबाप त्या अपत्यांचें वियोगजन्य दुःख सहन करण्यास निरढावून गेले. जवळ असलेली चीजवस्त व सोनेंनाणें, छपवून पुरून कोणाच्या दृष्टीस न पडे असें करावयाचें, आणि भांडींकुंडीं विहिरींत वगैरे टाकून ठेवावयाचीं, हा क्रम चालला. नेहमीं दर्शनीं गरिबी व हाय हाय दर्शविण्याचा प्रघात पडला. कीं आपल्याजवळ द्रव्य आहे असा कोणास वहीम सुद्धां येतां उपयोगी नाहीं. अशा लपवालपवीचा परिणाम एकंदर जनसमूहाच्या नीतिमत्तेवर कोणत्या प्रकारचा झाला असेल याची वाचकांस सहज कल्पना करितां येईल. जवळ पैसा, व कपडालत्ता असला तरी त्याचा उपभोग घेण्याची सर्वत्रांस चोरी वाटे. द्रव्याची मोजदाद करावयाची झाली तर ती अत्यंत गुमरणें, कोणाचे कानीं नाद जाणार नाहीं अशा रीतीनें, करावी लागे. सर्वच मन्वंतर फिरून जिकडे तिकडे

अस्वास्थ्य, क्षणभंगुरता, अस्थिरता मूर्तिमंत दिसूं लागल्या. चैन, विलास आराम व उपभोग जणुं काय हद्दपार होऊन, चिंता, हुरहुर, काळजी, उदासीनता व वैराग्य हीं मोठमोठया कुटुंबवत्सलगृहांमध्यें सुद्धां नांदूं लागलीं. व्यापारधंदा कोणास कांहीं सुचेनासा झाला. स्वकर्म व स्वधर्माचरण यांचा लोप झाला असें मुद्दाम दाखवावें लागे. रस्ते व वाटा बंद होऊन दळणवळण स्तब्ध झालें. शेतेंभातें ओसाड पडूं लागलीं. सुरक्षितता व संरक्षण नाहींसें होऊन पिकापाण्याची वाताहत झाली. कोणाचाच जोडा कोणाच्या पायीं राहीनासा झाला. शेतें केलीं तर त्यांतील पिकें जशींच्या तशीं मालकास मिळतील असा भरंवसा नव्हता. बरें, धान्य व दाणादुणा पिकविला तर त्याचा खप कसा करावा ही पंचाईत. दहादहा वीसवीस वर्षांचीं धान्यें घरांत पेवें भरून ठेवावीं लागलीं. ज्यास जसा संरक्षणाचा मार्ग सांपडे तसा तो करी. मोठमोठीं घरें बांधिलीं, तरी खिडक्या व बाऱ्या जितक्या कमी ठेववतील तितक्या ठेवावयाच्या; दारें व जिने आकुंचित व लहान करावयाचे; आणि घरांभोंवतीं व गांवाभोंवतीं मोठमोठया मजबूद गढ्या व कोट बांधून बंडखोरांचा उपद्रव कमी करावयाचा, ह्या तजविजीस जो तो लागला. आपला गांव सोडून दुसऱ्या गांवीं जावें लागलें तर तें महाप्रयासाचें व संकटाचें काम असे. एखादें लग्न शेजारच्या गांवीं जाणें म्हणजे मारामार पडे. यात्रा व जमाव स्वारशिबंदीशिवाय पार पडेनासे झाले. व्यापारी लोकांस आपला माल बाहेर नेणें झाल्यास ज्या ज्या राजांचे ताब्यांत चौक्या पहारे असतील त्यांचे परवाने घेऊन, आणि ज़काती, दस्तुऱ्या वगैरेंचा अनेक प्रकारें खर्च करूनही, पुनः रस्यानें लुटालुटीचा उपद्रव व भीति असेच. सर्व विद्याकलांचा लोप होऊन ज्याला त्याला आपला जीव व अब्रू कशी बचावली जाईल ह्याची काळजी पडली. असा दारुण प्रसंग हिंदुस्थानांतील एका भागांत व एकाच ठिकाणीं नसून चोहोंकडे सर्वत्र एकसारखा प्राप्त झाला होता.'*

अशा विपत्काळीं एकमेकांस साह्य करण्यासाठीं लोकांत सहज ऐक्य उत्पन्न व्हावें तें झालें नाहीं. एवढी मात्र गोष्ट खरी, कीं मुसलमानांशीं आमचा परिचय विशेष होऊन ते व आम्ही एकत्र स्नेहभावानें

---

* लोकहितवादीकृत गुजराथचा इतिहास.

राहण्यास शिकलों. संघशक्तीनें सार्वजनिक कामें करण्याची बुद्धि जरी उत्पन्न झाली नाहीं, तरी व्यक्तिविषयक सांसारिक नैपुण्य लोकांत कांहीं कमी नव्हतें. प्रसंगाशीं झुंजण्यासाठीं प्रत्येक इसमास आपापली तयारी जय्यत ठेवावी लागे. घोड्यावर बसणें, शरीरकष्ट सोसणें, कसरत करून शरीर कंटक बनविणें, पळणें, पोहणें, शस्त्रास्त्रांचा उपयोग करणें ह्या व अशा प्रकारचे उद्योग बहुधा प्रत्येकास अवगत असावे लागत. बादशहापासून तों गरिबापर्यंत प्रत्येक इसम गंगेसारख्या नदींतील पुरांत उडी टाकून पोहून जाण्यास समर्थ असत. विद्येचा प्रकारही असाच होता, हें ह्या काळच्या वाङ्मयावरून कळून येईलच. अशा विपत्तींत लोकांनीं स्वसंरक्षणाचें काम आपलें आपण करण्याचें मनावर घेतलें पाहिजे असतें; *पण राज्यकर्त्यांवर सर्वस्वी अवलंबून राहण्याची संवय झाल्यामुळें लोकसंस्था निर्माण झाल्या नाहींत.*

हिंदुस्थानच्या लोकांस राजावर अवलंबून राहण्याची संवय होती, तथापि *अला-उद्दीन खिलजी* व फिरोझ तुघ्लख वगैरे एक दोन पुरुष खेरीजकरून बाकीच्या राज्यकर्त्यांच्या कृत्यांचा परिणाम हिंदुस्थानांत सामान्य जनसमूहावर विशेष घडला नाहीं. ह्याचें कारण हिंदुस्थानांतील प्रत्येक गांवांत आमच्या पूर्वजांनीं घालून दिलेली ग्रामसंस्था इतकी भक्कम बनली होती कीं, तिचीं मुळें खोदून नाहींशीं करण्यास बलाढ्य राज्यकर्त्यांचे शेकडों वर्षांचे अव्याहत परिश्रम अगदीं फुकट गेले. प्रत्येक गांव आपल्या हद्दींत एक लहानसें प्रजासत्ताक राज्य होतें. जो कोणी पुरुष नवीन स्वारी करून देश जिंकी त्याची बाधा फार तर राजधानीच्या शहरास पोंचे. तिच्या पलीकडे इतर लोकांचे व्यवहार अगदीं सुरळीत चालत. मुसलमानांचा जिझिया कर व सरकारचा सारा दिला, म्हणजे आपण सरकारचें कांहीं एक लागत नाहीं असें सर्व ग्रामस्थांस वाटे. आपलें संरक्षण करण्यास राजानें नेमिलल्या लष्कराची त्यांस जरूर पडत नसे. आपल्या फिर्यादींचा निकाल लावण्यास त्यांस राजानें नेमिलेला न्यायाधीश नको होता. मुसलमानांचा अंमल कितीही जुलमी झाला, तरी लोकांनीं आपल्या कामकाजांची व्यवस्था आपली आपण पाहणें ह्यांत जें एकप्रकारचें अमोल स्वातंत्र्य आहे, तें मुसलमानांस हिरावून घेतां आलें नाहीं. एखाद्या दुष्ट राजानें स्वारी केली असतां तो गांवचे गांव जाळून लूटून फस्त

करी, किंवा तेथच्या सर्व रहिवाशांस जुलमानें मुसलमान करी. त्यांच्या या जुलमाच्या आड येऊं पाहणाऱ्याचा मुसलमान लोक शिरच्छेद करीत, पण ह्यांचा परिणाम फार तर तेवढीं गावें नष्ट होत, इतकाच. एकंदर देशाची त्यामुळें हानि होत नसे. ग्रामसंस्था हल्लीं नष्ट होत चालल्यामुळें दूरच्या खेड्यापाड्यांतील कोपऱ्यांत राहणाऱ्या माणसाचें सुद्धां सरकारी न्यायाधीशाशिवाय किंवा काळे डगल्याच्या पोलिसाशिवाय क्षणभर सुद्धां चालेनासें झालें आहे; किंवा पैपासून लाखापर्यंत केवढीही चोरी झाल्यास तिचा शोध लावण्याचें यत्किंचित् साधन लोकांच्या हातांत नाहीं. ग्रामसंस्थेच्या व्यवस्थेंत जनमताचा सर्व लोकांस केवढा तरी वचक वाटत असे.

आर्यांनीं प्रजेच्या *चिरंतनकल्याणाच्या इच्छेनें ज्या कित्येक संस्था अमलांत आणिल्या, त्यांत ही ग्रामसंस्था महत्त्वाची समजली पाहिजे.* रयतेच्या ताब्यांत *जमिनी असून त्यांची ते लागवड* करीत. पण अशा शेतकरी लोकांकरितां दुसऱ्या अनेक कारागीर लोकांच्या कामाची जरूर पडे. सुतार, लोहार, सोनार, कुंभार व असेच दुसरे धंदेवाले, *यांच्या मदतीशिवाय शेतकऱ्यांच्या नेहमींच्या गरजा भागणें शक्य नाहीं.* अशा सर्व लोकांची प्रत्येक गांवांत आर्यांनीं वसाहत केली. शेतांची कापणी झाल्यावर जें उत्पन्न होई, त्यांतील कांहीं अंश ज्याच्या त्याच्या उपयोगाच्या मानानें प्रत्येक कारागीरास दिला जाई. त्या उत्पन्नावर गांवांतील सर्व लोकांचीं कामें त्या कारागीरास करावीं लागत. सर्वांची व्यवस्था पाहण्यासाठीं एक कामदार नेमिलेला असे, त्यालाही गांवच्या उत्पन्नाचा हिस्सा तोडून देण्यांत येई. सर्व लोकांचे अधिकार व कामें वंशपरंपरा चालत. गांवचा मुख्य, व इतर धंदेवाले वगैरे मंडळींची एक ' गांव पंचायत ' नांवाची सभा असे. लोकांस जमीन विभागून देणें, त्यांच्या तक्रारींचा निकाल करणें, वसूल जमा करण्यास सरकारी कामदारांस मदत करणें, किंवा जमा झाल्यावर तो वसूल सरकारी तिजोरींत पाठविणें, वगैरे कामें ह्या पंचायतीकडून होत. लहानशा प्रजासत्ताक राज्याप्रमाणें प्रत्येक गांवची व्यवस्था असे. राज्यक्रान्तीचें वादळ परभारें वरच्यावर निघून जाई; तळाशीं बसलेल्या ह्या संस्थेस तिचा संपर्क पोंचत नसे सामाजिक व्यवहारांत ह्या पंचायतीचा उपयोग फार होई. सरकारचें देणें दिल्यावर प्रत्येक गांव आपापल्यापरी अगदीं स्वतंत्र असे. एखादा

जुलुमी राज्यकर्ता आला, म्हणजे तो फार तर जबरदस्त वसूल घेई. पण तो दिल्यावर त्यांचे स्वातंत्र्यास व्यत्यय येत नसे. राजा हिंदु किंवा मुसलमान कोणीही असला, तरी ग्रामसंस्थांच्या कामास हरकत पडत नसे. महंमद तुघ्लखसारखा क्रूर पुरुष गांवेंच्यागांवें ओसाड पाडी, पण एकदां त्याची वावटळ निघून गेली, म्हणजे लगेच सर्व पूर्ववत् शांत होई. मुसलमानांतील कित्येक जुलुमी राजे खेरीज करून इतरांनीं रयतेपासून ज्यास्त कर घेतले नाहींत जिझिया कर मात्र बहुतेकांनीं वसूल केला. कित्येक जुलुमी राज्यकर्ते खेरीजकरून इतरांनीं रयतेवर कर वाढविले नाहींत. सरकार देणें धान्याच्या रूपानें न घेतां पैशानें वसूल करण्याची चाल मुसलमानांनीं घातली. हिंदु लोकांचा व्यापार बसला. असलेली सुधारणा नाहींशी करण्याची मेहनत घेऊन मुसलमानांनीं दुसरी सुधारणा सुरू करण्याचें श्रेय घेतलें नाहीं. वरिष्ठ सुधारणेचा पगडा हलक्या सुधारणेवर बसावयाचा, ह्या नियमास अनुसरून हिंदु लोकांच्या वरिष्ठ सुधारणेपुढें मुसलमानांच्या हीन सुधारणेस हार जावें लागलें. हिंदूंचा च संपर्क मुसलमानांस घडला.

हिंदूंच्या देवळांवर व मूर्तीवर तर मुसलमानांचा अतिशय कटाक्ष होता. पूर्वींचीं नामांकित मंदिरें पाडून तेथें मुसलमानांनीं आपल्या मशिदी उभ्या केल्या. बहुतेक ठिकाणच्या मुसलनांच्या इमारतींस देवालयांचेंच सामान वापरिलेलें असून, कित्येक ठिकाणीं तर मूळच्या इमारतींत फारच थोडा फरक केलेला आहे (Imperial Gazette, II). अयोध्येस रामाच्या जन्मभूमीवर मशीद आहे, आणि मशिदीच्या आवारांतील एका कोपऱ्यांत रामजन्माचें लहानसें पत्थराचें देऊळ आहे. हाच प्रकार बनारस, प्रयाग, जगन्नाथ, रामेश्वर इत्यादि ठिकाणीं झाला. सामान, जागा, मजूर, सर्व कांहीं तयार,—जुन्या इमारतींतील मूर्ति नाहींशा करून त्यांस नवीन स्वरूप दिलें, कीं झाली मशीद तयार. अशा आयत्या पायावर राज्य स्थापन करण्यास मुसलमानांस अवकाश लागला नाहीं.

तयमूरलंगाच्या स्वारीपासून दिल्लीचे नामधारी सुलतान; प्रसंग पडेल तसें वागून वेळ मारून नेत होते. हिंदु राजे तरी प्रत्यक्ष अंगावर स्वारी आली म्हणजे तेवढ्या वेळेपुरते शरण जात; आणि सुलतानाची पाठ फिरल्याबरोबर पुनः स्वतंत्रपणें वागूं लागत. मुसलमानांची इतकी

हलक दशा होण्याचीं आणखीही पुष्कळ कारणें होतीं. हिंदुस्थानच्या उष्ण हवेंत व ऐषआरामांत राहून अलीकडचे तुर्क नामर्द बनले होते. त्यांचा नामर्दपणा पाहून हिंदुही त्यांस वेचकुल्या दाखवूं लागले. मुसलमानांचा अम्मल हिंदूंनीं आपखुशीनें असा कधींच पत्करिला नाहीं. संधि सांपडतांच ते विरुद्ध भाव दाखवीत. शिवाय अलीकडे बरेच दिवस मुसलमानांनीं हिंदु स्त्रियांचा स्वीकार केल्यामुळें, त्यांजपासून उत्पन्न झालेल्या नवीन पिढीच्या अंगांत बहुतांशीं हिंदु रक्तच खेळत होतें. त्याचप्रमाणें मुसलमानांनीं पुष्कळसे हिंदु लोक बाटवून आपल्या धर्मांत आणिले. त्यांचा मुसलमानांस थोडाबहुत उपयोग झाला, तरी बाटलेल्यांची संख्या जसजशी वाढत गेली, तसतसा हिंदूंचा मूळचा स्वभाव आपला प्रभाव दाखवूं लागला. त्यांचें लक्ष पुष्कळदां हिंदूंच्या बाजूस राहूं लागलें; आणि हिंदूंशींच त्यांचे व्यवहार घडूं लागल्यामुळें त्यांचें पहिलें मुसलमानी वारें लयास गेलें. ह्या कारणास्तव मध्यआशियांतून नवीन अस्सल बाण्याची व जोराची मदत आल्याशिवाय हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत एखाद्या नवीन वंशाची स्थापना कायम होणें शक्य नव्हतें. म्हणूनच पुढें लोदी घराण्याची समाप्ति होऊन बाबरास जय मिळत गेले. पंधराव्या शतकांतील सय्यद व लोदी घराण्यांच्या धडपडी व राज्य राखण्याचे प्रयत्न मूळच्या अस्सल तुर्की बाण्याचे नसून, ते सर्वथैव हिंदु धर्तीचे होते, हें सूक्ष्म विचारांतीं ध्यानीं येईल.

मुसलमानांनीं हिंदूंच्या धर्माचा उच्छेद केला, त्यांचीं देवळें पाडिलीं, मूर्ति फोडिल्या, संपत्ति हरण केली, इत्यादि अनेक दुष्ट प्रकार जरी घडून आले, तरी कित्येक बाबतींत त्या परकीय राज्यकर्त्यांचा जाच हिंदूंस झाला नाहीं. विशेषतः विद्याविषयक बाबतींत हिंदूंस पूर्ण स्वतंत्रता होती; आणि ठिकठिकाणीं हिंदूंचीं जीं विद्यापीठें होतीं, त्यांजकडून लोकशिक्षणाचें काम चांगल्या रीतीनें होत असे. संस्कृत व प्राकृत ग्रंथरचनेचा ओघ पूर्वीप्रमाणेंच या काळींही सुरू होता. कारागिरी, व उद्योगधंदे पूर्वींप्रमाणेंच लोकांच्या हातीं पूर्णपणें होते. उलट पक्षीं मुसलमानांच्या चैनी वाढत गेल्यामुळें कारागिरीस एक प्रकारचें उत्तेजनच मिळत गेलें. शेती व तत्संबंधीं सर्व धंदे हिंदूंचेच होते.

बंदरोबंदरीं चालणाऱ्या व्यापाराची नेआण हिंदूंच्याच हातीं होती, आणि गलबतांचा धंदाही पूर्वीप्रमाणें त्यांजकडेच होता. त्यांत मुसलमान राज्यकर्त्यांनीं स्वार्थदृष्टि कधीं ठेविली नाहीं. वसूल व फौज ह्या दोन बाबतींपलीकडे मुसलमानांकडून हिंदू प्रजेला प्रतिबंध झालेला दिसत नाहीं.

३. रजपुतांच्या पाडावाची मीमांसा.—रजपूत लोक हिंदुस्थानचे क्षत्रिय होत. त्यांच्याशींच मुसलमानांचे झगडे झाले. म्हणून रजपुतांचा पाडाव कोणत्या कारणांनीं झाला, हें समजून घेणें अगत्याचें आहे.

रजपुतांच्या उत्पत्तीसंबंधीं अनेक मतें प्रचलित आहेत. त्यांतील सत्यासत्य पाहण्याचें येथें प्रयोजन नाहीं. 'राजपुत्र' या शब्दाचा अपभ्रंश होऊन 'रजपूत' शब्द बनला आहे. महाभारतादि ग्रंथांत 'राजपुत्र' नांवाचा एक स्वतंत्र वर्ग म्हणजे जात आहे, आणि त्याचा अर्थ सामान्यतः क्षत्रिय असा आहे. 'राजपुत्र' किंवा 'राजन्य' हे शब्द तेथें क्षत्रिय ह्या अर्थी पदोपदीं आढळतात. तेव्हां सामान्यतः हल्लींचे रजपूत पूर्वीच्या क्षत्रियांचेच वंशज होत असें मानण्यास हरकत नाहीं. रजपुतांचा मानी स्वभाव, त्यांचा उदात्त व शूर बाणा, आपल्या उच्च कुलाचा अभिमान इत्यादि गोष्टींवरूनही तेच आर्यावर्तांतले अस्सल क्षत्रिय होत असें म्हणावें लागतें.

(१) संघशक्तीला उत्पत्तीचा विरोध.—सर्व रजपूत वंशांचें मूळ एकच नव्हतें. आर्य लोक प्रथम ह्या देशांत आले, ते सर्व एकदांच आले असें नाहीं. निरनिराळ्या काळीं निरनिराळ्या ठिकाणीं अनेक टोळ्या इकडे आल्या; आणि त्यांनीं ह्या देशांत निरनिराळ्या ठिकाणीं वास्तव्य केलें. पुढें त्या सर्वांस आर्य या नांवानें संबोधण्याचा प्रघात पडला. रा. ब. चिं. वि. वैद्य यांनीं 'एपिक इंडिया' नांवाच्या आपल्या पुस्तकांत अशा दोन अडीचशें टोळ्यांचीं किंवा लोकांचीं नांवें दिलीं आहेत. ह्या लोकांचें कालांतरानें झालेलें मिश्रण हल्लींच्या लोकसंख्येंत जरी दिसेनासें झालें, तरी त्यांच्या मूळच्या भेदांमुळें सर्व भारतवर्षाचा एक जीव होऊं शकला नाहीं. ह्या बहुतेक लोकांचीं लहान लहान स्वतंत्र राज्यें होतीं. त्या सर्वांचा एक जीव होण्याचा योग आला नाहीं. त्यांतील एखादें राज्य पराक्रमी होऊन, त्याचें सार्वभौमत्व कांहीं काळ-

पर्यंत इतर राज्यांवर स्थापलें जाई; आणि तीं राज्येंही प्रसंग पडे त्याप्रमाणें दुसऱ्याचें मांडलीकत्व कबूल करीत. पण कालांतरानें त्या सार्वभौमाचा वंश सत्त्वहीन झाला, म्हणजे पुनरपि सर्व पहिल्याप्रमाणें विसकळीत होत; अगर दुसराच कोणीतरी सार्वभौम होई. पण लहान लहान राज्यें स्थापण्याकडे व आपला पृथग्भाव कायम राखण्याकडे सर्व आर्य कुळींचा मूळपासून ओढा होता. ज्या आर्यांनीं पश्चिमेकडे जाऊन ग्रीसदेशांत लहान लहान नगरराज्यें स्थापन केलीं, त्यांचेच जातभाई हिंदुस्थानांत आले असतां त्यांनीं सुद्धां आपापलीं स्वतंत्र राज्येंच येथें स्थापिलीं. एक मात्र मोठा फरक झाला तो हा, कीं ग्रीसदेशांत लोकसत्ताक राज्यपद्धति उत्पन्न झाली आणि आपल्या इकडे एकसत्ताक राज्य निर्माण झालें. (ह्या मुद्याचा विचार रा. ब. वैद्य यांनीं आपल्या पुस्तकांत केला, आहे.) येथें आपणास इतकें समजणें पुरे आहे, कीं मूळपासूनच आपल्या देशांत अनेक राजवंश व नानाजातींचे लोक राहत आले आहेत. देशांत सुबत्ता असून, हवापाणी किंवा फुकट जागा मुबलक असल्यामुळें, निरनिराळ्या कुळींनीं एक व्हावें अशी स्फूर्ति उत्पन्न होण्याचें प्रयोजनच पडलें नाहीं. एकी होण्यास तरी कांहीं कारणांची जरूर आहेच. समान आपत्ति आली, किंवा समान अर्थ उत्पन्न झाला, कीं एकी होते. अशा प्रकारचा समान अर्थ किंवा समान आपत्ति मुसलमानांच्या स्वाऱ्यांपर्यंत ह्या देशांत निर्माण झाली नव्हती. शिवाय, हिंदुस्थानदेश एक आहे ही कल्पनाच मुळीं अगदीं अलीकडची आहे. हल्लींच्या एकछत्री अंमलानें ही कल्पना उत्पन्न झाली आहे. त्यापूर्वी हिंदुस्थान किंवा आर्यावर्त म्हणजे एक देश नसून, यूरोपसारखें एक खंड समजलें जात असे, हें प्राचीन ग्रंथांतील नानाविध देशांच्या व कुळींच्या नांवांवरून उघड होतें. तेव्हां एका खंडांतील सर्व राष्ट्रें आपत्काळीं एक झालीं नाहींत, ह्याचें नवल वाटावयास नको. अशा प्रकारच्या विवेचनांत आपली सामान्यत: चूक होत असते, ती अशी कीं सर्व हिंदुस्थान म्हणजे एक देश, सर्व रजपूत तितके एक जातीचे क्षत्रिय, आणि हिंदुस्थानचे यच्चयावत् सर्व लोक म्हणजे एक राष्ट्र, अशा गोष्टी अगोदर गृहीत धरून, मग अलेक्झांडरांशीं अगर गज्नवी महंमुदाशीं सामना करण्यास हे सर्व लोक एक कां झाले नाहींत, ह्याचा आपण तपास करूं लागतों.

वास्तविक प्रकार ह्याच्या उलट आहे. हिंदुस्थानांत आरंभापासून निरनिराळे लोक राहत आले असल्यामुळें, सर्व देशांत एक राष्ट्र असें नांदलेंच नाहीं. तसेंच आपलें स्वराज्य असावें, आणि आपल्या राष्ट्रानें स्वराज्याखालीं नांदावें, ही भावनाच ऐतिहासिक कालांत येथें वास करीत असलेली दिसून येत नाहीं. हिंदुस्थानांतील सर्व लोकांचें एक राष्ट्र होण्याची कल्पना अनेक कारणांच्या योगानें अलीकडे भासूं लागली आहे.

(२) रजपूत बाण्याची बाधकता.—पूर्वापर चालत आलेले रजपुतांचे शुद्ध संप्रदाय व वीर्यशालीपणाचे (Chivalry) संकेत अनेक वेळां त्यांसच बाधक झाले आहेत. असे संकेत लढणाऱ्या दोनही पक्षांनीं पाळिले, तरच त्यांचा हेतु सफल होतो. नाहीं तर, एकट्यानेंच पाळिले असतां, ते पाळणारास बाधक होतात. उदाहरणार्थ, समरांगणीं पराभव झाला असतां, शत्रूस पाठ दाखवून परत यावयाचें नाहीं, अथवा शरण आलेल्या शत्रूचें पारिपत्य करावयाचें नाहीं, हे रजपुतांचे संकेत प्राचीन काळीं त्यांस कितीही सन्मान्य वाटले, तरी मुसलमानांशीं झगडण्यांत त्यांजपासून रजपुतांचें नुकसानच झालें आहे, हें जयपाळ, पृथ्वीराज इत्यादिकांच्या गोष्टींवरून व्यक्त होईल. एकवार पराभव झाला असतां गोंधळून न जातां व्यवस्थितपणें फौजेस परत आणून, पुनः युद्धाची सर्व तजवीज नीटपणें लावून, शत्रूस जिंकावें तें सोडून देऊन रजपुतांनीं आपल्या सन्मान्य संकेतांस अनुसरून अनेक प्रसंगीं बायकामुलांची कत्तल करून धारातीर्थीं मोक्षपद मिळविलें आहे. पडता काळ आला असतां युक्तीनें स्वसंरक्षण करून कावेबाजपणानें शत्रूस जिंकण्याचा अवश्य मार्ग आरंभीं आरंभीं तरी रजपुतांनीं स्वीकारिला नाहीं. उदात्त व वीर्यशाली वर्तन, तशाच प्रकारचा सामनेवाला असेल तरच फायदेशीर होतें, नाहीं तर प्रसंग पडेल तशीच तजवीज ठेवणें भाग आहे. रणजितसिंगाचा एक सेनापति हरिसिंग ललवा अफगाणिस्तान जिंकण्यास गेला होता. शीख लोकांस गोमांस वर्ज्य असून डुकराचें मांस प्रिय असतें. अफगाणांनीं शिजविलेलें अन्न लुटून आणून त्याजवर हरिसिंगाची फौज आपला निर्वाह करीत असे. शीख लोक गोमांस खात नाहींत असें समजल्यावरोबर, अफगाणांनीं पुष्कळ गाई मारून त्यांचें मांस शिजवून तयार ठेविलें. पुढें तें लुटण्यास शीख लोक आले,

तेव्हां त्यांस कळलें, कीं हें गोमांस आहे. त्याबरोबर हरिसिंगानें एक डुकराचें हाड त्या मांसान्नांत घालून त्यानें तें सर्व गोमांस खूप ढवळिलें, आणि "वाः गुरुजीका खालसा, वाः गुरुजीका फत्ते" असा आपला मंत्र म्हणून, 'हें डुकराचें मांस आहे, खुशाल खा," असें त्यानें आपल्या शिपायांस सांगितलें. सारांश, जशास तसें वर्तन ठेवल्याशिवाय अशा कामीं निभावणूक नसते.

(३) उपाध्यायांचा राष्ट्रद्रोह.—मुसलमानांनीं येथील लोक बाटविण्याचा जो सपाटा चालविला, त्याचा परिणाम हिंदूंच्या खालच्या जातींवर विशेष घडला. वरच्या जातींतले लोक फारसे बाटले नाहींत. परंतु जे खालच्या जातींचे लोक हजारों वर्षें वरच्यांचें दास्य करून एक प्रकारच्या गुलामगिरींत खितपत पडलेले होते, *त्यांस मुसलमानी धर्म स्वीकारिल्यामुळें, आपल्या स्थितींत एकदम मोठा फरक झालेला दिसून आला.* त्यांची परदास्यांतून एकदम सुटका होऊन मुसलमानराज्यकर्त्यांचे ते बरोबरीच्या नात्याचे जातभाई बनले. त्यांस ऐहिक संपत्ति प्राप्त झाली. हजारों वर्षांचें त्यांचें नष्टचर्य संपल्यासारखें झालें. त्यांचा नांवलौकिक व मानमरातब कल्पनातीत वाढला. एका वर्गानें दुसऱ्याला गुलामाप्रमाणें वागविल्यामुळें राष्ट्रास वरच्यासारखे अपाय घडल्याशिवाय राहत नाहींत. इराणदेश मुसलमानांच्या ताब्यांत सहज गेला, त्याचें कारण तरी इतिहासकारांच्या मतें, असेंच झालें. तेथें उपाध्याय वर्गाचें माहात्म्य अतिशय वाढून, खालचे सर्व लोक दास बनलेले होते. परमेश्वरी कृपेच्या व ऐहिक सुखोपभोगाच्या सर्व किल्या ह्या उपाध्यायांच्या हातांत असून, इतर लोकांच्या हातांत काडीमात्र सत्ता नव्हती. अशा स्थितींत परचक्र आल्याबरोबर, ह्या उपाध्यायवर्गानें खालच्या लोकांस नशिबाच्या हवाली करून आपण पोबारा केला. त्या लोकांस मदत करून सर्वांनीं मिळून देशसंरक्षण करण्याचा विचार उपाध्यायांस शिवला सुद्धां नाहीं. येणेप्रमाणें दीन व निराश्रित झालेले कनिष्ठवर्गाचे सर्व लोक अनायासें मुसलमानांच्या तावडींत सांपडले; आणि स्वदेश किंवा स्वधर्म *ह्यांचें संरक्षण करण्याचा कांहींच उपाय हातीं न राहिल्यामुळें, इराणी लोकांनीं मुसलमानी धर्म स्वीकारून आपला फायदा करून घेतला.* हाच प्रकार थोडाबहुत हिंदुस्थानासही लागू पडतो. उपाध्याय व सुशिक्षितवर्ग यांजवर

राष्ट्रसंरक्षणाची जबाबदारी केवढी आहे हें ह्यावरून कळून येईल. शिवाजीनें ह्या गोष्टी ध्यानांत ठेवून काम सुरू केलें, आणि त्यावेळच्या लोकनायकांनीं धर्माची आडकाठी मनांत न आणितां प्रसंग पडेल तशी वागणूक सुरू केली, म्हणूनच त्यांस यश आलें.

(४) **आनुवंशिक वैरभाव.**—रजपुतांचा समाज कधींही एक झालेला नसून, त्यांच्यांतील निरनिराळ्या कुळींमध्यें मानपानासंबंधानें, नेहेमीं वैरभाव असे. लग्नाच्या किंवा इतर मानापमानाच्या क्षुल्लक सबबीवरून सुद्धां त्यांच्यांत पिढ्यानुपिढ्या युद्धें चालत; आणि अर्थार्थी कांहीं एक प्राप्ति नसतां, ते सर्वस्वाचें नुकसान करून घेत. आनुवंशिक वैर कायमचें पुढें चालविण्यांत त्यांस अभिमान वाटे. *धर्माच्या नांवानें सुद्धां ते कधीं एक झाले नाहींत. पृथ्वीराज चव्हाणासारखे कित्येक पुढारी कांहीं दिवस मुसलमानांशीं टक्कर देऊं शकले,* पण त्याला सुद्धां रजपूतच शत्रु झाले.

(५) **वेडगळ धर्मसमजुती.**—धर्माच्या नांवाखालीं अनेक वेडगळ समजुती त्यांच्या ठिकाणीं दृढ झालेल्या होत्या. शकुन किंवा प्रश्न पाहिल्यावांचून त्यांचें पाऊल पडत नसे. घुबड ओरडलें, उल्कापात, किंवा दुसरे अपशकुन झाले, म्हणजे त्यांचें धैर्य खचून जाई, आणि हातीं धरलेला उद्योग ते बेधडक सोडून देत. ह्याचीं उदाहरणें पदोपदीं आढळतील. मुसलमानांचा प्रकार ह्याहून भिन्न होता. कोणतीही अडचण आली, तरी अल्लाचें नांव घेऊन ते लढाईंत घुसत आणि त्यांस हटकून जय मिळे.

(६) **युद्धकलेचें अज्ञान.**—त्या वेळच्या मानानें रजपुतांचें युद्धकलेचें ज्ञान परिपूर्ण नसून, त्यांनीं नवीन युक्त्या किंवा नवीन पद्धति स्वीकारल्या नाहींत. ते जुन्यांचाच आश्रय धरून राहिले. शस्त्रास्त्रांच्या व युद्धकौशल्याच्या बाबतींत ते मुसलमानांहून फार मागें होते. युक्तीचा किंवा काव्याचा ते आश्रय करीत नसत. युद्धाच्या वेळीं ऐनप्रसंगीं ते आळशी राहत. हेर पाठवून शत्रूच्या हालचालीची बातमी आणून त्यांजवर नजर ठेवणें, रात्रीचे छापे घालणें, हुलकावणी दाखवून शत्रूस पेंचांत आणणें, असल्या गोष्टींचा त्यांनीं अवलंब केला नाहीं. तसेंच अनेक बारीक बाबतींची तजवीज

आगाऊ लावून ठेवणें जरूर असते. आपल्या बेळीं विपरीत प्रकार झा-ल्यास त्याच्या प्रतिकाराचा विचार आगाऊ ठरवून ठेवावा लागतो. हें काम हिंदूंनीं केल्याचें दिसत नाहीं. त्यांच्या फौजांत भरप्रकारचा गोंधळ व अव्यवस्था असे. गज्नवी महंमूद, महंमद घोरी, अल्ला-उद्दीन खिलजी, तयमूरलंग, बाबर, हे सर्व कसलेले योद्धे असून, तत्कालीन युद्धकलेंत पूर्णपणें वाकब होते. त्यांच्या तोडीचा एकही पुरुष हिंदूंच्या बाजूस दिसून आला नाहीं. रजपुतांचें युद्धकलेचें ज्ञान हजारों वर्षांचें जीर्ण झालेलें होतें. आपसांतल्या युद्धांत त्यांस त्या ज्ञानाचा कितीही उपयोग होत असला, तरी परकीयांशीं त्यांचा सामना झाल्याबरोबर ते फिके पडले. युद्धकलेचा तरी वारंवार अनुभव पाहिजे. बाह्य जगाशीं वरचेवर युद्धप्रसंग येऊन राष्ट्र कसत गेलें पाहिजे. तसे प्रसंग हिंदुलोकांस पूर्वी फार दिवस आले नसल्यानें, मुसलमानांशीं त्यांची एकदम गांठ पडली, तेव्हां त्यांचा निभाव लागला नाहीं.

युद्धकलेसंबंधानें आणखी दुसरा एक मुद्दा असा आहे, कीं रजपुतांनीं केवळ स्वसंरक्षणापुरताच विचार पाहिला, आपण होऊन शत्रूंवर स्वाऱ्या करून त्यांस त्यांच्या मुलखांत जेरीस आणण्याचा प्रयत्नच कोणी केला नाहीं. संरक्षणात्मक व अभिघातात्मक अशीं युद्धाचीं दोन अंगें आहेत. एकदां युद्ध सुरू झाल्यावर जरुरीप्रमाणें ह्या दोनही अंगांचा अवलंब करावा लागतो. शत्रूंच्या मूळ ठिकाणावर प्रहार केल्याशिवाय त्याचा निःपात होत नाहीं. गज्नवी महंमूद किंवा महंमद घोरी ज्याप्रमाणें हिंदुस्थानावर स्वाऱ्या करीत होते, त्याचप्रमाणें, जयपाळ किंवा पृथ्वीराज ह्यांनीं अफगाणिस्तानावर स्वाऱ्या केल्या पाहिजे होत्या. त्यांनीं पुष्कळदां मोठमोठे जमाव करून मुसलमानांशीं टक्कर मारिली, पण किल्ल्यांचा आश्रय करून ते शत्रूंच्या हल्ल्यांची वाट पाहात स्वस्थ बसत. अशा पद्धतीनें मुसलमानांचें नुकसान होणारें नव्हतें. त्यांचा पराभव झाला, तरी डोंगरांपलीकडील त्यांचें स्वतःचें राज्य सुरक्षित असे. हिंदुस्थानांत इंग्रजांनीं आपली राज्यस्थापना ज्या पद्धतीवर केली, तिचें उदाहरण प्रस्तुत विवेचन करितांना ध्यानांत ठेवण्याजोगें आहे.

(७) प्रतिकूल सृष्टस्थिति.—देशस्थितीच्या मानानें हिंदू लोक मुसलमानांहून हीन होते. थंड व पहाडी प्रदेशांतले लोक मैदानांतील

गरम हवेंतल्या लोकांपेक्षां चपळ, कणखर व जोरदार असावयाच. तोच प्रकार रजपुतांचा व मुसलमानांचा झाला. ह्याच मुसलमानांस पुढें हिंदुस्थानांतील मैदानी हवा लागून चारदोनशें वर्षांनीं ते दक्षिणेंतील डोंगराळ मराठ्यांपुढें टेंकीस आले, हें मशहूर आहेच.

(८) **बाटलेल्या हिंदूंचा विशेष उत्साह.**—हिंदुस्थानांतले बरेचसे मुसलमान मूळचे हिंदु असून पाठीमागून बाटून मुसलमान झालेले आहेत. अफगाण अंमलाच्या दोनतीनशें वर्षांतच कायते बरेचसे मुसलमान बाहेरून येथें आले, ते बहुतेक तुर्क पठाण होते. त्यांजबरोबर बायका तर फारशा आल्याच नाहींत. त्यांजला बहुतेक बायका आपल्या देशांतूनच मिळाल्या. त्यांजपासून जी संतति झाली, तिचा आमच्या धर्मानें अव्हेर केल्यामुळें, तिनें आयतीच मुसलमानांत भर पडली. ह्यांशिवाय आरंभीं बरेचसे लोक मुसलमानांनीं जुलूम करून बाटविले. हे बाटलेले मुसलमान, अस्सल मुसलमानांपेक्षां हिंदुस्थानास ज्यास्त जाचक झाले. मग ते जुलमानें बाटलेले असोत, वा आपखुशीनें बाटलेले असोत. एकदां परधर्मांत गेल्यावर पूर्वधर्माचा पाडाव करण्यास लोकांस विशेष स्फुरण येत असतें. त्यांस आमच्या लोकांचीं व्यंगें व राहणी सर्व ठाऊक असल्यामुळें, त्या माहितीचा उपयोग त्यांनीं मुसलमानांस करून दिला. देवालयांचा नाश करून तेथील संपत्तीचा अपहार करण्याचे कामीं मुसलमानांस ह्या बाटलेल्या हिंदूंचाच विशेष उपयोग झाला आहे. कोणती युक्ति केली असतां लढाईंत हिंदूंचा पराभव होईल, हें मुसलमानांस बाटलेल्या हिंदूंकडून कळे. लढाई चालू असतां मध्यें गाई आणून उभ्या करणें, गाईचें रक्तमांस टाकून हिंदूंच्या विहिरी बाटविणें, इत्यादि युक्त्या मुसलमानांस ह्या हिंदूंकडून कळत. परधर्मी लोकांस शुद्ध करून परत आपल्या धर्मांत आणण्याची योजना हिंदुधर्मानें स्वीकारिली नाहीं, म्हणून देशाचें केवढें नुकसान झालें आहे, हें ह्यावरून स्पष्ट कळून येतें.

मुसलमानांच्या संख्येंत हिंदुधर्मांतून बाटलेल्या लोकांचा भरणा जसजसा ज्यास्त झाला, तसतसें त्यांच्या अंगचें तीव्र पाणी पुढें कमी होत गेलें. हा प्रकार जरी खरा आहे, तरी आरंभीं आरंभीं मुसलमानांच्या राज्यवृद्धीचें येथील बरेंचसें काम ह्या बाटलेल्या लोकांकडूनच झालेलें

२५–७–७–७९१–२०००

आहे. मुसलमानांस येथें भराभर जय मिळत गेलेले पाहून येथच्या पुष्कळ कर्तृत्ववान लोकांस असें वाटूं लागलें, कीं मुसलमानी धर्मांतच कांहीं-तरी जादू भरलेली आहे. आपला हिंदुधर्म हीन असल्यामुळें, त्यांतील लोकांच्या हातून पराक्रम होत नाहीं, अशी समजूत झालेले पुष्कळ लोक होते; आणि तदनुसार पुष्कळांनीं धर्मत्याग केलेला आहे. बंगालचा राजा जितमल्ल (पृ. ३०६) कोलिकोटचा सामुरी, केरलदेशचा राजा, सिंधचे सुमेरवंशी रजपूत जाम, बराणचा राजा हरदत्त व त्याचे दहा हजार अनुयायी (पृ.३६५) इत्यादिकांनीं आपण होऊन मुसलमानी धर्म स्वीकारिल्याचीं उदाहरणें आहेत. काश्मिरांतील सेनदेवाच्या राणीनें, सर्व प्रयत्न निष्फळ झाल्यावर, तेथील सुलतान शम्सुद्दीन ह्याजबरोबर लग्न लाविलें. ह्या गोष्टी प्रसंगोपात्त झाल्या. शिवाय ह्या दोन समाजांचें एकमेकांशीं जसजसें संघट्टन वाढत गेलें, तसतशी एकमेकांची एकमेकांस माहिती होऊन उभयतांतील सोयीरगती वाढत गेल्या. अर्थात् अशा रीतीनें मुसलमानांची संख्या वृद्धि पावली. त्या वेळच्या ह्या सामाजिक व्यवहारांची माहिती उपलब्ध होणें शक्य नाहीं. तथापि बाटलेल्या गृहस्थांचीं कित्येक ठळक ठळक नांवें प्रसिद्ध आहेत, त्यांवरून धर्मांतर केल्याबरोबर हिंदूंच्या हातूनही मुसलमानांच्यासारखे, किंबहुना, ज्यास्तच पराक्रम घडून आल्याचें दिसून येतें.

मलीक काफूर व खुस्रू हे दोघेही मूळचे हिंदु असून मुसलमान झाले होते. अला-उद्दीनच्या राज्यवृद्धीचें अर्धें अधिक काम एकट्या मलीक काफूरनें केलेलें आहे. खुस्रूचे थाट काय होते याचें विवेचन वर आलेंच आहे. (पृ.१४८, व कलम १ पृ.२१६) लोदी घराण्यांतील सुलतान सिकंदर, अहंमदनगरची निजामशाही स्थापन करणारा निजामुल्मुल्क् बहिरी, गुजराथचें मुसलमानी राज्य स्थापन करणारा मुज्फरखान, इमादशाहीचा संस्थापक फत्ते-उल्ला, फिरोजशहाचा वजीर मक्बुलखान, जहांगीरचा सेनापति महाबत-खान इत्यादि अनेक पराक्रमी पुरुष मूळचे हिंदु असून बाटून मुसलमान झालेले होते. त्यांस हिंदूंच्या स्वभावाची खांचखोंच पूर्णपणें ठाऊक असल्यामुळें हिंदूंचा पाडाव करण्याचें काम त्यांस सहज करितां आलें; आणि नवीन स्वीकारिलेल्या धर्मानें त्यांच्या अंगीं एक प्रकारचा विशेष चेव उत्पन्न झाला. हीच मंडळी हिंदुधर्मांत असतां पराक्रमशून्य कां, आणि

धर्मांतर केल्याबरोबर त्यांच्या अंगीं कोणती नवीन शक्ति उत्पन्न झाली, ह्याचा विचार प्रत्येकानें शांतपणानें आपल्या मनाशीं अवश्य केला पाहिजे

ग्यासुद्दीन* व फिरोज तुघ्लख, जहांगीर व शहाजहान बादशहा, विजापूरचा दुसरा सुलतान इस्माईल आदिलशहा इत्यादि पुरुष हिंदु स्त्रियांच्या पोटीं जन्मलेले असून, त्या सर्वांच्या हातून लोकोत्तर कृत्यें घडलेलीं आहेत. प्रसंग आल्याशिवाय अंगचा पराक्रम दिसून येत नाहीं, हें म्हणणें कितपत खरें, तसेंच पराक्रमास धर्माचें पाठबळ कितपत पाहिजे, ह्या प्रश्नांचा विचार ज्याचा त्यानें करावा.

(९) मुसलमानांच्या परिस्थितीचा पेंच.—मुसलमान येथें परक्या देशांत येऊन पेंचांत सांपडल्यासारखे होते. सभोंवारच्या परधर्मी प्रचंड *लोकसागरांतून त्यांस तरून जावयाचें होतें. मारावें किंवा मरावें ह्याशिवाय त्यांस अन्यगति नव्हती. जिवावर उदार होऊन चवताळून* आलेले दहा इसम शांतवृत्तीच्या शंभर दोनशें इसमांस भारी होतात, हा नेहमींचा व्यवहारांतला अनुभव येथेंही थोडाबहुत लागू पडतो. म्हणून मुसलमानांच्या अंगचा जोर हिंदूंच्या अंगीं कधींच उत्पन्न झाला नाहीं. परंतु देवळें फोडिलीं, बायका पळवून नेल्या, घरेंदारें लुटलीं, फार तर काय, सरकारचे कामदार तोंडांत थुंकूं लागले तर आ करण्याची पाळी आली, तरी हिंदूंच्या अंगीं चेव आला नाहीं हें मात्र आश्चर्य आहे.

ह्या तुर्की अंमलांत अनेक राजवंश झाले. एक वंश जाऊन दुसरा स्थापन होण्याच्या वेळेस अतिशय अंदाधुंदी व अव्यवस्था चालू असे. मोगल बादशाही स्थापन होण्यापूर्वीच्या तीनशें वर्षांत दहा पांच प्रसंग तर असे आले होते, कीं त्यांत हिंदूंना आपलीं राज्यें सहज परत घेतां आलीं असतीं. तुघ्लखांच्या वेळेपासून तर अशीं अनेक राज्यें स्वतंत्र झालीं सुद्धां. पण तीं मुसलमानांचीं झालीं, हिंदूंचीं झालीं नाहींत. बंगाल, माळवा, जोनपूर, महाराष्ट्र इत्यादि ठिकाणीं जर मुसलमानांना स्वतंत्र राज्यें स्थापितां आलीं, तर हिंदूंनांही तशीं राज्यें स्थापन करण्यास विलंब लागला नसता. तयमूरलंग निघून गेल्यावर शंभर वर्षें सर्व देश मोकळा होता. एवढ्या अवधीचा हिंदूंस उपयोग करून घेतां आला नाहीं,

---

* तुघ्लख घराण्याचा संस्थापक ग्यासुद्दीन हा गुलाम-सुलतान बल्बन याचा, जाट स्त्रीच्या पोटीं जन्मलेला मुलगा होता. (Vincent Smith).

यावरून वरील सर्व कारणांपेक्षांही अत्यंत भयंकर असा कांहीं तरी विपरीत प्रकार हिंदूंच्या समाजांत अगदीं मुळाशीं माजून राहिला होता, असें म्हटल्याशिवाय गत्यंतर नाहीं. ह्याची थोडीबहुत मीमांसा खालील लेन्पूलच्या म्हणण्यांत दिसून येईल.

(१०) 'लेन्पूल'नें केलेलें निदान.—अल्पसंख्य मुसलमानांना हिंदुस्थानांत थारा कसा मिळाला, ह्याविषयीं लेन्पूल म्हणतो. 'हिंदूंच्या जातिभेदांमुळें त्यांचा पाडाव झाला. एकमेकांविषयीं हिंदूंच्या मनांत कोणत्याही प्रकारचा ओढा नसल्यामुळें, त्यांच्यांत जेव्हां तुर्क येऊन घुसले, तेव्हां त्यांची तरी एक निराळी जातच बनली. परकीयांच्या अफाट लोकसमुदायावर ह्या मुसलमानांस आपला वर्चष्मा ठेवावयाचा होता. मुसलमानांची जूट बळकट होती. सर्व लोक बरोबरीच्या नात्यानें बंधूप्रमाणें वागत. जुलमानें अथवा युक्तीनें त्यांस आपली संख्या वाढवावी लागली. बाहेरच्या प्रदेशांतून नवीन ताज्या दमाच्या लोकांची भर यांच्यांत पडत असे; त्यायोगें त्यांचें तीव्र वारें कायम राही. धर्माचा कडवेपणा त्यांच्या उत्कृष्ट कामास आला. धर्मप्रसार करण्याचें तत्त्व त्यांच्या फार उपयोगी पडलें. सर्वांचा उद्देश एक, आचार एक, यथेच्छ आचाराची पूर्ण मुभा, निरर्थक सामाजिक बंधनांची अडचण नाहीं, सर्व असामी बंधुत्वाच्या भावनेनें, 'मारीन किंवा मरेन' अशा निकरानें पराक्रम करण्यासाठीं बाहेर पडलेले, अशा एकजुटीच्या लोकांपुढें आपसांत झगडणाऱ्या बेबंद लोकांचा निभाव कसा लागावा! रजपूत राजे व क्षत्रिय सरदार पिढीजाद हाडवैरांनीं जखडलेले, मानापमानांच्या वेडगळ कल्पनांनीं, मागचा पुढचा विचार न पाहतां व ऐहिक स्वार्थावर नजर न देतां, वाटेल तसें वागणारे होते. त्यांच्या धर्माचा पाया जातीवर म्हणजे जन्मावर व कुलावर रचिलेला होता. परकीयांस ते आपल्या धर्मांत घेत नाहींत, म्हणून दुसऱ्यांस आपल्या धर्मांत ओढून आणितांना उत्पन्न होणारें तीव्र वारें हिंदूंच्या ठिकाणीं येणें शक्य नव्हतें. युद्धप्रसंगांत केवळ स्वसंरक्षणानें काम भागत नाहीं; शत्रूंच्या मुलखांत घुसून आघात करावा लागतो, तें रजपुतांनीं केलें नाहीं. मुसलमान परक्या देशांतून येथें येऊन कोंडले गेल्यामुळें, लढून जय तरी मिळवावा, नाहीं तर मरून तरी जावें, ह्यांशिवाय त्यांस मार्ग नव्हता. हिंदूंनीं प्रसंगा-

नुसार वर्तन ठेविलें नाहीं. क्षात्रधर्माच्या व अब्रूच्या बड्याबड्या कल्पनांचा निभाव प्रत्यक्ष व्यवहारांत लागत नसतो. जातिभेदानें कामाची वांटणी झाल्यामुळें, क्षत्रिय आपल्या कामांत कचरूं लागले तर त्यांच्या मदतीस इतर जाति येत नसत. राज्याच्या भानगडी करण्याचें काम केवळ क्षत्रियांचें आहे, असें म्हणून ब्राह्मणादि इतर वर्ग स्वस्थ बसले. तसेंच सार्वजनिक भूतदयेची कल्पना जातिभेदामुळें हिंदुलोकांत उत्पन्नच झाली नाहीं; आणि निंद्य प्रकारांबद्दल सार्वजनिक तिटकाराही त्यांच्यांत कधीं दिसून आला नाहीं. जो तो केवळ स्वतःपुरतें पाही.'

'मुसलमानांस आपला लष्करी पेशा कायम ठेवावा लागला. कोणतेंही *ठिकाण जिंकिल्यावर ते तेथें लष्करी बंदोबस्तानें राहत. हिंदुस्थानांतील ऐषआरामानें त्यांच्या ठिकाणीं शिथिलता आल्याबरोबर ताज्या दमाच्या नवीन झुंडी मध्यआशियांतून पुनः इकडे येत, आणि पूर्वीचा जोर कायम राखीत.'* लेन्पूल म्हणतो, 'मुसलमानांचें ऐक्य, त्यांचा उत्साह व *प्रसंगानुसार वर्तन ह्या बाबतींत हिंदुलोकांहून ते श्रेष्ठ होते; आणि व्यक्तिविषयक शौर्य जरी हिंदूंच्या ठिकाणीं कमी नसलें, तरी हिंदूंचे जातिभेद,* एकमेकांशीं झगडणाऱ्या निरनिराळ्या सरदारांचे अंतःकलह, फूट पाडणाऱ्या वेडगळ धर्मसमजुती, परधर्मी लोकांस आपल्या धर्मांत ओढून आणण्याची मनाई, ह्या कारणांनीं हिंदुस्थानांत राष्ट्रीय अभिमान कसा तो उत्पन्न झालाच नाहीं. मुसलमानांचें साहस, लष्करी पेशा, धर्मद्वेष, व राज्यलोभ ह्यांमुळें हिंदूंस ते वरचढ झाले; आणि योग्य पुढारी मिळाल्याबरोबर त्यांचा उत्कर्ष होत गेला.'

'ह्या सर्व विवेचनावरून मुसलमानांनीं हिंदुस्थानचा पाडाव कसा केला, ह्या प्रश्नाचा उलगडा सहज होतो. आरब, तुर्क, मोगल ह्यांजविषयीं मागें दिलेल्या हकीकती; इस्लामाच्या स्वरूपाचें खुलासेवार दिलेलें वर्णन; ईजिप्ट, इराण, पूर्वरोम इत्यादि देशांतील प्राचीन सुधारणांचा इस्लामापुढें झालेला नाश, हे प्रकार ध्यानांत आणिले म्हणजे हिंदुस्थानचा पाडाव *झाला याचें आश्चर्य वाटणार नाहीं. तुर्कांनीं सतत तीनशें वर्षें प्रहार चालविले, तेव्हां अला-उद्दिनास यश मिळालें. घोरी व गुलाम वंशांनीं केलेल्या उद्योगाचा फायदा अला-उद्दिनास मिळाला. मोगल लोक तरी सारखे तीनशें वर्षें ह्या देशावर आघात करीत होते, तेव्हांच*

पुढें बाबरास व अकबरास मोगलबादशाही स्थापन करितां आली. अशि-क्षित व रानटी लोकांनीं प्राचीन व सुधारलेल्या पण निःसत्त्व राष्ट्रास जिंकिल्याचें हिंदुस्थानचें हें एकच उदाहरण इतिहासांत आहे असें नाहीं. युरोपांत सुद्धां सुधारलेल्या रोमन लोकांस रानटी गॉथ लोकांनींच जिंकिलें. सुधारलेल्या लोकांस जिवाची किंमत ज्यास्त वाटते. रानटी लोकांस मरणाचा बाऊ वाटत नाहीं. सुधारलेल्या लोकांस शांतता हवी असते. रानटी लोकांचें अस्तित्व धामधुमीवर अवलंबून असतें. इतिहासामध्यें हा प्रश्न महत्त्वाचा असून, ह्या मुसलमानी रियासतीचें तें सार आहे.

तरवारीच्या जोरावर म्हणजे करड्या अंमलानेंच हिंदुस्थानावर राज्य करणें शक्य आहे, असा मुसलमानी अंमलापासून अनेकांनीं निष्कर्ष काढिला आहे. लेन्पूल म्हणतो, *राजानें कडकपणा किंवा जोर दाखविला कीं पुरे, त्याचें राज्य टिकावयाचें; पण त्यानें भ्याडपणा दाखविला, कीं तो राज्यास मुकला म्हणून समजावें.* अर्थात् हिंदुस्थानच्या इतिहासांत मुख्य विषय म्हणजे धाडसी पुरुष व त्यांचे पराक्रम. खालच्या भारवाहक व सोशिक रयतेस विचारतो कोण ? ह्या लोकांचें वर्तन अगदीं प्राचीन काळापासून आहे तसें आहे. अनेक परकीय लोक स्वाऱ्या करून आले व गेले, त्यांच्यांतले कित्येक अपरिहार्य प्रकार हिंदवासीयांनीं आपल्या राहणींत स्वीकारले इतकेंच. आर्य, हूण, ग्रीक, पारसिक, तुर्क, अफगाण, मोगल व इंग्रज इत्यादिकांच्या अनेक स्वाऱ्या एकामागून एक हिंदुस्थानावर आल्या, पण लोकांच्या अंगीं मुरलेला सोशिकपणा, अद्याप आहे तो कायमच आहे. ' राजा चांगला असो कीं वाईट असो, त्याचें आपणास काय, ईश्वराची मर्जी असेल तसें होईल, असें म्हणून लोक स्वस्थ बसतात. '

४. स्वत्वरूपी भावनेचा अभाव.—मुसलमान लोक ह्या देशांतले प्रदेश एकामागून एक काबीज करीत चालले असतां, त्यांस मागें हटवून हिंदूंनीं आपलें स्वराज्य स्थापण्याचे प्रयत्न कां केले नाहींत, हा प्रश्न राहतो. गज्नवी महंमूद अथवा महंमद घोरी स्वाऱ्या करूं लाग-ल्यानंतर, अथवा त्याचेही पुढें अनेक प्रसंगीं, मुसलमानांची दशा अगदीं निकृष्ट झालेली होती. गुजराथ, माळवा, बंगाल, दक्षिण वगैरे ठिकाणीं स्वतंत्र मुसलमानी राज्यें जर स्थापन झालीं, तर त्याच वेळेस हिंदूंनीं

NATIONAL ARCHIVES OF INDIA

आपापलीं राज्यें स्थापण्याचे प्रयत्न केले असते, तर विजयनगरप्रमाणें ते कदाचित् सिद्धीस गेले असते. असे प्रयत्न थोडेबहुत झाले, हिंदूंचीं ठिकठिकाणीं तुरळक बंडें झालीं, पण मुसलमानांचें राज्य आपणांस नको, अशी सर्वसाधारण भावना जनतेच्या ठिकाणीं उत्पन्न झाली नाहीं. उत्तरहिंदुस्थानांत तर अशी भावना कधींच झाली नाहीं. दक्षिणेंतील लोकांच्या अंतःकरणांत स्वत्वाची थोडीबहुत स्फूर्ति होती असें दिसतें. मलीक काफूर व महंमद तुघ्लख ह्यांनीं दक्षिणदेश काबीज केला, ही गोष्ट दक्षिणच्या हिंदूंस न आवडून त्यांच्या अवशिष्ट पुढाऱ्यांनीं एकमत करून विजयनगरची स्थापना केली. (पृ. २९५ पहा). त्याबरोबर हिंदु-मुसलमानांचा तीव्र झगडा दोन अडीचशें वर्षें दक्षिणेंत चालू झाला. त्या झगड्यांत शेवटीं विजयनगरचा पाडाव होऊन मुसलमानांची कांहीं दिवस सरशी झाली. तथापि मुसलमानांचें हें वर्चस्व बरेंच अस्थिर होतें. उत्तरेंत हिंदूंचें स्वत्व सर्वथैव नष्ट होऊन, त्यांचें मन पूर्णपणें मुसलमानांच्या कवज्यांत गेलें होतें, मोठमोठे मी मी म्हणणारे रजपूत सुद्धां मुसलमानांचेच अंकित होऊन बसले होते, तशांतलाच केवळ प्रकार दक्षिणेंत झाला नाहीं. विजयनगरचा पाडाव झाला, तरी अनेक हिंदु सरदार व पुढारी ठिकठिकाणीं जीव धरून होते; त्यांच्याच मदतीनें बहामनी राज्याचा कारभार चालला होता; त्यांची मनधरणी केल्याशिवाय मुसलमानांचें चालणारें नव्हतें. निजामशाही, कुत्बशाही, आदिलशाही इत्यादि राज्यांच्या कारभारांत हिंदु सरदारांचा व मुत्सद्यांचा भरणा विशेष होता. (पहा, मराठी रियासत पृ. २७) ह्या सरदारांसच पुढें शिवाजी-सारखा पुढारी मिळाल्याबरोबर मराठशाहीची स्वतंत्र स्थापना झाली. पण असा प्रकार उत्तरेंत झाला नाहीं. पंजाब, दिल्ली, अयोध्या वगैरे ठिकाणचे लोक शक्तीनें कितीही बळकट असले, तरी परकीय हल्ल्यांपुढें त्यांचा निभाव कधींच लागला नाहीं. पंजाबच्या लोकांस तर परकीय हल्ले सोसण्याची संवय सिकंदर बादशहाच्या वेळेपासून लागलेली होती. ज्या लोकांस परकीयांचे आघात सोसण्याचे प्रसंग वारंवार येतात, त्यांच्या अंगीं त्या अघातांच्या योगानें एक प्रकारची विशेष बळकटी व चिकटपणा सामान्यतः उत्पन्न होत असतो. सभोंवार शत्रूंच्या कचाट्यांत सांपडलेल्या राष्ट्रांच्या अंगचें प्रखर तेज वाढत गेल्याचीं अनेक

उदाहरणें इतिहासांत आहेत. तसा प्रकार हिंदुस्थानांत पंजाब वगैरे उत्तरेकडील प्रांतांतील लोकांचा झालेला दिसत नाहीं. पंजाबप्रांत हजारों वर्षे गाढ निद्रेंत पडून होता, त्यास गुरु नानक व गुरु गोविंद ह्यांनीं जागें करून, आणि त्यांच्या धर्मसमजुतींस निराळें वळण लावून, शीखांचें पराक्रमी राष्ट्र बनविलें. तेव्हांच पंजाबांतील शीखांचा पुढें एवढा उदय झाला.

परकीयांच्या हल्ल्यांचा प्रतिकार हिंदु लोकांनीं कधींच केला नाहीं असें नाहीं. सिकंदर बादशहाच्या वेळेपासून परकीयांचे हल्ले हिंदुस्थानावर होऊं लागले. त्यापूर्वींच्या हल्ल्यांची ऐतिहासिक माहिती नाहीं. खरें म्हटलें म्हणजे हिंदुस्थानास संपूर्ण स्वतंत्रता कधीं असेल, तर ती सिकंदर बादशहा येण्याच्या पूर्वीं असेल. सिकंदरच्या वेळेपासून ग्रीक, सिथियन, शक, हूण व पुढें आरब, तुर्क, मोगल, आणि सरशेवटीं पाश्चात्य क्रिस्ती इत्यादि अनेक परकीय लोकांचे हल्ले आज दोनअडीच-हजार वर्षें हिंदुस्थानावर येत आहेत; आणि त्या सर्वांचा थोड्याबहुत अंशानें येथें रिघाव झाला आहे. तथापि त्यांचा प्रतिकारही वेळोवेळीं येथील लोकांकडून झालेला आहे, हें सहसा कोणाच्या लक्षांत येत नाहीं. 'सिकंदर बादशहाच्या स्वारीनंतर शहाबुद्दीन घोरीच्या स्वारीपर्यंत जीं पंधराशें वर्षें गेलीं, तेवढ्या काळांत ह्या देशावर परकीयांच्या स्वाऱ्या एकामागून एक येत होत्या; आणि तितक्यांस येथचे लोक मागें हटवून स्वतःची सत्ता स्थापन करीत होते. जगाच्या इतिहासांत इतके प्रचंड झगडे सांपडणें कठीण. सिकंदर बादशहाचें वास्तव्य येथें झालेंच नाहीं. त्याचे कांहीं लोक मागें राहिले, त्यांस चंद्रगुप्तानें घालवून दिलें. पुढें शंभर वर्षांनीं वायव्येकडील बॅक्ट्रिया देशांतून ग्रीक लोकांनीं पुनः हिंदुस्थानावर स्वारी केली, त्या वेळीं मगधदेशचा राजा पुष्यमित्र व त्याचे सेनापति ह्यांनीं इ. स. पू. १५० च्या सुमारास त्या यवनांस बाहेर घालवून दिलें. यवनांनंतर शक आले, त्यांनीं तक्षशिला व मथुरा येथें सुमारें शंभर वर्षें राज्य केलें. त्यांचा पाडाव इ. स. पू. ५७ च्या सुमारास उज्जनीच्या विक्रमादित्यानें केला. नंतर पश्चिमेकडून शकांची दुसरी एक टोळी आली, त्यांचा राजा नहपान याचा गौतमीपुत्र पुळुमायि शातकर्णी ह्यानें इ. स. १२६त

पराभव केला. त्यानंतर यूची नांवाचे लोक हिंदुस्थानावर आले. त्यांचे राजे कनिष्क, हविष्क, व वासुदेव ह्यांनीं शंभर वर्षेंपावेतों पंजाब व सभोंवारच्या प्रदेशावर राज्य केलें. त्यांचा पाडाव गुप्तवंशी प्रबल राजा समुद्रगुप्त ह्यानें चवथ्या शतकांत केला. पांचव्या शतकांत श्वेतहूण लोक हिंदुस्थानावर चालून आले; त्यांचा दुष्ट राजा मिहिरकुल ह्यास सहाव्या शतकांत यशोधर्मराजानें जिंकिलें. तरी सातव्या शतकांत पुनरपि हूण लोक हिंदुस्थानांत आले, त्यांस कनोजच्या श्रीहर्षानें कायमचें हांकून लाविलें. त्यानंतर सुमारें तीनशें वर्षेंपावेतों हिंदुस्थानावर परचक्र आलें नाहीं. पुढें सबक्तगीन व गज्नवी महमूद चालून आले; त्यांजपुढें हिंदु लोक हार पावले, *तथापि त्यांनीं स्वराज्य घालविलें नाहीं.* आणखी दोनशें वर्षें गेल्यावर *महंमद घोरी हिंदुस्थानावर आला, त्याजला अडविणारा* शेवटचा शूर वीर पृथ्वीराज होय. परंतु त्या सामन्यांत पृथ्वीराजाचा पाडाव होऊन बाराव्या शतकाचे आरंभीं हिंदुस्थानावर परराज्य स्थापन झालें.' (इंडियन रिव्ह्यू, डिसेंबर १९०९). वरील पंधराशें वर्षांतील प्रचंड व बहुविध झगड्यांत अनेक शूर पुरुषांचीं नांवें इतिहासांत चिरस्मरणीय झालीं आहेत. परंतु त्या पुरुषांचीं इतिवृत्तें आज समग्रतेनें उपलब्ध नसल्यामुळें त्यांचें आपणांस विस्मरण घडतें; दूरगत काळच्या हकीकती आपल्या मनांतून नाहींशा होतात; समीपकाळच्या घडामोडींस महत्व येतें. त्यायोगानें नवीन अपसंस्कार मनास जडतात, आणि आत्मप्रतीति बुजून जाऊन आपण सदैवच परचक्राखालीं लोळत आहों, अशी मनाची दृढ भावना होऊन बसते. सारांश, बाराव्या शतकाच्या अखेरीस पृथ्वीराजाचा पाडाव झाला तोंपावेतों, हिंदुस्थानांत आर्यांचेंच स्वतंत्र राज्य कायम होतें. तेराव्या शतकापासून मात्र हा देश परचक्राखालीं गेला आहे.

फार दिवसांच्या सहवासानें राष्ट्राच्या मनांत अशी एखादी भावना कायमची होऊन बसते; आणि अशी भावना एकदां कायम झाली, म्हणजे ती राष्ट्राच्या मनांतून सहसा जात नाहीं. तेराव्या शतकाच्या आरंभापासून पुढें कित्येक शतकें हिंदुस्थानावर मुसलमानांचेंच राज्य कायम राहिलें. तेवढ्या अवधींत हिंदुस्थानचे राज्यकर्ते मुसलमान होते. राज्य करण्याची योग्यता हिंदूंची नाहीं अशा प्रकारचा सामान्य जनांचा

ग्रह होऊन बसला. प्राचीन काळीं राज्य करण्याचें काम क्षत्रियांचें होय, असा समज दृढ होता. ह्या समजामुळेंच राज्याची जोखीम एकट्या क्षत्रियांच्या अंगावर येऊन पडली. इतर जातींनीं त्यांस साहाय्य केलें नाहीं. तशांलाच थोडाबहुत प्रकार पुढें मुसलमानांच्या संबंधानें झाला. राज्य करण्याचें काम मुसलमानांचें, ही गोष्ट एकदां ठरून चुकल्यामुळें हिंदूंना आपलें राज्य स्थापन करण्याची स्फूर्तिच झाली नाहीं. गंगु ब्राह्मणानें हुसेनखानास भर देऊन दक्षिणेस स्वतंत्र राज्य स्थापन करण्यास त्यास उत्तेजन दिलें, याची मीमांसा ह्या विचारसरणीवरच बसू शकते. नाहीं तर हुसेनखानाप्रमाणेंच एखाद्या पराक्रमी हिंदूस तशा प्रकारचें उत्तेजन देऊन गंगु ब्राम्हणाला स्वराज्य स्थापन करवितां आलें असतें.

महंमद तुघ्लखापाशीं ह्या ब्राह्मणाचें वजन चांगलें होतें. कदाचित् हिंदूंच्या वहाड्या सुलतानास सांगून तो सुलतानाच्या उपयोगीं पडत असेल. ह्या वजनाचा उपयोग करून गंगु ब्राह्मणानें दक्षिणेंत मुसलमानी राज्य स्थापविलें. ह्याचा अर्थ इतकाच, कीं जनतेच्या मनांत स्वराज्याची स्फूर्ति वागत नव्हती. तशी स्फूर्ति वागत असती, तर पंधराव्या शतकांत हिंदूंना स्वराज्य स्थापन करण्याचे वाटेल तितके प्रसंग उत्पन्न झालेले होते. बाबरासही अशाच एका प्रसंगाचा उपयोग झाला. गुजराथ, माळवा, महाराष्ट्र, बंगाल इत्यादि ठिकाणीं, स्वतंत्र राज्यें स्थापन होऊं शकलीं; यावरून त्या वेळीं नवीन राज्यस्थापनेला योग्य असे प्रसंग पुष्कळ आले हें उघड होतें. राजकीय व्यवहारांत राष्ट्राच्या या सामान्य भावनेचा उपयोग राज्यकर्त्यांस विशेष होत असतो. मोगल बादशाही स्थापन झाल्यावर, वर सांगितलेली राष्ट्रीय भावना ज्यास्तच दृढ होत गेली. ‘ दिल्ली राजधानी ’ व ‘ मोगल बादशहा ’ ह्या दोन कल्पनांचें साहचर्य लोकांच्या मनांत कायमचें बसून गेलें. इ. स. १७०७त औरंगजेब मृत्यु पावला, त्यानंतरच्या पांचपन्नास वर्षांत हिंदूंस नवीन राज्यस्थापना सहज करितां आली असती. मराठ्यांनीं तर तशा प्रकारचा प्रयत्न केलाही.

परंतु लोकसमूहाला हा प्रयत्न रुचला नाहीं. मोगल बादशहाला सिंहासनावरून दूर सारून त्या ठिकाणीं हिंदूंच्या चक्रवर्तीची स्थापना करणें ही कल्पनाच लोकांच्या मनांत येत नव्हती. पानपताच्या पूर्वी सदाशिवराव पेशव्यानें बादशहाच्या वाड्यांतील तख्त फोडलें त्या वेळेस लोकांनीं

केवढा गहजब केला, हें सुप्रसिद्धच आहे. मुसलमानांनीं हिंदुस्थानांत लाखों देवळांचा व मूर्तींचा विध्वंस करून संपत्ति हरण केली, ह्याची आठवण सुद्धां त्या लोकांस झाली नाहीं. उदेपूरचा राणा राजसिंग ह्यानें औरंगजेबास लिहिलेलें बाणेदार पत्र वर दिलेंच आहे. (पृ. ३४६). त्यांत सुद्धां तो शूर पुरुष मोगल बादशाही कायम राहवी, अशीच भावना व्यक्त करितो, आपण स्वतंत्र होण्याची धमकी देत नाहीं; स्वतंत्र होण्याच्या भावनेनें त्याच्या मनांस स्पर्शसुद्धां केला नाहीं. एवढा पराक्रमी महादजी शिंदे, ज्यानें सर्व उत्तरहिंदुस्थान हालवून सोडलें, त्यास मोगल बादशाही घशांत टाकण्यास यत्किंचित् विलंब लागला नसता. परंतु वृद्ध, अंध व नालायक बादशहाचें बाहुलें सिंहासनावर कायम ठेवून, त्याची हलकी नोकरी पत्करण्यांतच त्यास धन्यता वाटली, ह्यांतील बीज हेंच आहे. सत्तावनसालच्या बंडांत बंडवाल्यांनीं नामशेष बादशहालाच पुढाकार दिला. सारांश, एकदां पूर्वपरंपरेनें जनसमूहाची एकादी भावना दृढ झाली, म्हणजे ती सहसा नाहींशी होत नाहीं. या मुद्याची चर्चा महाभारतांत सुद्धां ठिकठिकाणीं केलेली आहे.

पुढें पुढें ह्या भावनेचा उपयोग मुसलमान राज्यकर्त्यांस चांगलाच झाला. राज्य परकीयांनीं करावें आणि आम्ही त्यास सर्वस्वी मदत करावी असा समज कायमचा बनला. आमच्या बुद्धिशक्तीचा उपयोग परकीयांनीं करून घेतला. राज्यांतील वसुलाचें व व्यवस्थेचें कचें काम बहुधा हिंदूंच्याच हातीं होतें. बहामनी राज्यांत तर हिंदूंवरच सर्व भिस्त होती. फौजेंतील मोठमोठे सरदार व राज्यकारभार हांकणारे मोठमोठे कामदार बहुतेक हिंदु होते. हिंदूंचेंच वजन मुसलमानांवर पडलें होतें. हिंदूंच्या मदतीशिवाय मुसलमानांचें चालणारें नव्हतें.

५. आल्बेरुनीचें हिंदूंविषयीं मत.—खिवा येथील खानांच्या पदरीं आल्बेरुनी नांवाचा एक विद्वान् गृहस्थ राहत होता. त्याचा जन्म स. ९७३ त झाला. त्याचें नांव आबू रैहान असें असून, बेरुनी हें त्याचें आडनांव होय. लहानपणीं त्यास चांगलें शिक्षण मिळून भाषा व गणित विषयांत तो फार तरबेज झाला. इ. स. १०१७त गज्नवी महंमुदानें खिवाप्रांत काबीज करून तेथील पुष्कळ लोकांस पकडून आणिलें. त्यांत आल्बेरुनी गज्नीच्या दरबाराशीं फार दिवस भांडत असल्यामुळें, त्याज-

वर महंमुदाची वक्रदृष्टि होती. बेरुनीस ज्योतिषशास्त्राची विशेष अभिरुचि असून आरब, ग्रीक व आर्य ज्योतिषांत त्याचा हात धरणारा कोणी नव्हता. पण महंमुदानें त्यास आश्रय दिला नाहीं; आणि महंमूद जिवंत असेपर्यंत त्याची ख्यातीही झाली नाहीं. पुढें मस्‌ऊदच्या कारकिर्दींत त्यास आश्रय मिळाला. आल्बेरूनीनें पुढें हिंदुस्थानांत येऊन पुष्कळ प्रवास केला; आणि संस्कृतभाषेचा अभ्यास करून इकडील अनेक विद्या तो शिकला. मोठा ज्ञानसंपन्न तत्त्वज्ञ व बहुश्रुत पंडित अशी त्याची कीर्ति आहे. आमच्या धर्मशास्त्राचा अभ्यास त्यानें, प्लेटो व आरिस्टॉटल ह्यांच्या ग्रंथाइतकाच मोठ्या आस्थेनें केला. पुढें त्यानें आरबीभाषेंत अनेक ग्रंथ लिहिले, त्यांत 'प्राचीन राष्ट्रांचा कालक्रम' (Chronology of Ancient nations), 'ज्योतिषशास्त्र,' आणि 'इंडिया' हे मुख्य आहेत. ह्या ग्रंथांचीं इंग्रजींत भाषांतरें झालेलीं असून ते सर्व मोठ्या योग्यतेचे आहेत. हिंदुस्थानांत आल्यावर, येथील लोकांची निरनिराळ्या विषयांतली योग्यता पाहून, येथें आपणास पुष्कळ शिकण्यासारखें आहे, असें त्यास वाटलें. एकंदरींत हिंदुस्थान देशाबद्दल त्याच्या मनांत आदरबुद्धि वसत होती.

बेरुनीच्या लेखाचा एक मोठा गुण असा आहे कीं, तो अत्यंत निष्पक्षपात बुद्धि कायम ठेवून, आणि प्रत्येक गोष्ट मेहनतीनें समजून घेऊन मग काय लिहिणें तें निर्भीडपणें लिहितो. हिंदूंचें गणितशास्त्र, ज्योतिष, तत्त्वज्ञान, वैद्यक, संस्कृतभाषा व तिचा ग्रंथसंग्रह, हिंदूंच्या धर्मकल्पना इत्यादि हरएक विषयाचें वर्णन त्यानें लिहून ठेविलें आहे; आणि असें करतांना त्यानें हिंदुग्रंथांतून पुष्कळसे उतारे घेऊन त्यांजवर आपली टीका थोडक्यांत केली आहे. संस्कृतांतलें अगाध ग्रंथभांडार त्यानें बहुतेक समजून घेतलें होतें असें दिसतें. हिंदुस्थानांतल्या कितीतरी ग्रंथांचीं भाषांतरें मुसलमानी भाषांत होऊन त्यांचा बाहेर प्रसार झाला, ह्याची आपणास आज कल्पनाही नाहीं. आल्बेरूनीस ग्रीकभाषा सुद्धां अवगत होती, आणि प्रत्येक ठिकाणीं त्यानें आर्य व ग्रीक विचारांची तुलना करून दाखविली आहे. येथें त्याच्या लेखाचे उतारे देणें शक्य नाहीं. तथापि एक लहानसा उतारा देतों.

"हिंदूंच्या स्वभावांतील कित्येक ठळक गोष्टी उघड उघड दिसून येतात. मूर्खपणाला औषध नाहीं हेंच खरें. हिंदुलोकांना वाटतें, आपल्या देशासारखा देश नाहीं, आपल्या राष्ट्रासारखें राष्ट्र नाहीं, आपल्या राजांसारखे राजे नाहींत, आपल्या धर्मासारखा धर्म नाहीं, आणि आपल्या विद्येसारखी विद्या नाहीं. ते उद्दाम, गर्विष्ठ व मंद आहेत. आपली विद्या दुसऱ्यास देण्यास ते अतिशय नाखुष असतात. परक्यांस तर काय, पण आपसांत सुद्धां एका जातीचा गृहस्थ आपली विद्या दुसऱ्या जातीस देत नाहीं. त्यांना वाटतें, सगळ्या पृथ्वीवर देश काय तो आपला एकच आहे, दुसरे देशच नाहींत; आणि आपल्या विद्या दुसऱ्या कोणास यावयाच्याही नाहींत. मुसलमानांच्या देशांत एखादी विद्या आहे, किंवा तिकडे कोणी विद्वान् गृहस्थ आहेत असें सांगितलें तर, तें त्यास खरेंसुद्धां वाटत नाहीं. ते जर प्रवास वगैरे करून दुसऱ्या लोकांशीं मिसळतील तर त्यांचे अनेक मिथ्याग्रह आपोआप दूर होतील. त्यांचे पूर्वज कसेही असले तरी दुराग्रही व संकुचित मनाचे नव्हते. हिंदुस्थानांत येऊन तेथील विद्या शिकून घेण्यास मला किती प्रयास पडले, तें माझें मलाच ठाऊक! हिंदूंच्या सर्व विद्यांचा आज भयंकर गोंधळ झालेला आहे. कशास कांहीं ठिकाण नाहीं. उत्कृष्ट विद्या, अज्ञानी व मूर्ख लोकांच्या हातीं पडून त्यांचें मातेरें झाल्यामुळें, चांगलें कोणतें व वाईट कोणतें ह्याचा उलगडाच करितां येत नाहीं. उत्कृष्ट रत्नें उकिरड्यांत मिसळून जावीं, तशांतला प्रकार झालेला आहे." हा मजकूर सन १०४० च्या सुमारास लिहिलेला आहे; आणि तो आजही आपल्या आत्मनिरीक्षणास चांगला उपयोगी पडतो.

आल्बेरूनीला हिंदुस्थान जसें दिसलें तसें त्यानें त्याचें वर्णन केलें आहे. त्याला भेटलेल्या पंडितांपैकीं कांहींच्या ज्ञानाची त्यानें बरीच वाखाणणी केली आहे. परंतु सामान्य जनसमूहाची शारीरिक व मानसिक स्थिति अतिशय शोचनीय होती, असें त्यानें लिहिलें आहे. नैतिक आणि धार्मिक बाबतींत देखील सर्व तऱ्हेनें गांजलेले; अनाथ आणि पतित; सामाजिक, धार्मिक आणि राजकीय बाबतींमध्यें विभागलेले; धड नीट विचारदेखील न करतां येणारे; व्यसनांनीं शरीरें कमकुवत करून घेतलेले; आणि महंमद गज्नीच्या बरोबर दरवर्षी चाल करून येणाऱ्या मुसलमानांपुढें शिस्तीच्या अभावीं रजःकणाप्रमाणें उडून जाणारे कळपचे

कळप, असें त्यानें हिंदुलोकांचें वर्णन केलें आहे. बाबरानें देखील आपल्या चरित्रांत येथच्या लोकांविषयीं असा उल्लेख केला आहे, कीं हिंदुस्थानांतील लोकांना हरएक बाबतींत चातुर्य व कल्पकता हीं कांहींच नाहींत. वस्तुतः त्यांना उद्योगधंद्यांचा गंधही नाहीं, ललितकला नाहींत, शिल्पज्ञान नाहीं, बगीचे नाहींत, कालवे नाहींत, बंदुकीची दारूही नाहीं, मोकळेपणानें एकमेकांत त्यांना मिसळतांदेखील येत नाहीं, म्हणून बाबरानें त्यांचा धिक्कार केला आहे. आत्मश्लाघा व अतिशयोक्ति यांचा भाग असल्यास तो वगळून देखील वरील गोष्टींत बरेंच सत्य आहे, असें आपणांस मोठ्या कष्टानें क़बूल करावें लागेल. हिंदुलोकांमध्यें दिसून येणाऱ्या व्यावहारिक ज्ञानाचा अभाव हेंच हिंदुस्थानच्या अवनतीचें कारण होय.

६. ग्रंथसंपत्ति व हिंदूंची बौद्धिक सरशी.—ह्या अमदानींत हिंदूंच्या बुद्धीचा प्रभाव सुरूच होता. त्यांची ग्रंथसंपत्ति अव्याहत वृद्धि पावत होती. बंगालप्रांतानें संस्कृत विद्येचें संरक्षण चांगल्या प्रकारें केलें. प्रसिद्ध साधु चैतन्य ज्यास केवळ बुद्धाचा द्वितीयावतार समजतात, तो बंगाल्यांतच पंधराव्या शतकांत निपजला. चौदाव्या शतकांत कुल्लुकभट्टानें काशी येथें मनुस्मृतिवरील आपली सुंदर टीका लिहिली. त्यापूर्वी पांचशें वर्षें म्हणजे नवव्या शतकांत मिथिला नगरींत मेधातिथीनें आपली मनुस्मृतीवरील टीका लिहिली होती. चौदाव्या शतकांत बंगाल्यांत 'जीमूतवाहना'नें दायभाग नांवाचा हिंदुधर्मशास्त्रावरील उत्कृष्ट ग्रंथ लिहिला. त्यापूर्वी म्हणजे अकराव्या शतकांत विज्ञानेश्वरानें बहारप्रांतांत याज्ञवल्क्य स्मृतीवरील मिताक्षरी नांवाची टीका लिहून आपलें नांव अजरामर करून ठेविलें.

बंगाल्यांतील उत्कृष्ट कवि जयदेव होय. हा बाराव्या शतकांतला आहे. जयदेवाचा गीतगोविंद ग्रंथ वाचून कोण तल्लीन होणार नाहीं? त्याच शतकांत शांडिल्यानें भक्तिसूत्र केलें. शंकराचार्य, रामानुज, रामानंद, मध्वाचार्य, बसव, वल्लभाचार्य, ह्यांनीं भक्तीच्या ह्या विषयाचें आपल्या अधिकारयुक्तवाणीनें जें निरूपण करून ठेविलें आहे, त्यामुळें संस्कृत वाङ्मयांत अत्युत्कृष्ट भर पडली असून, वरील थोर आचार्यांनीं ही भूमि पुनीत केली आहे. पश्चिमेकडे दिल्लीच्या बाजूस भयंकर रक्तपात व राजकीय उलाढाली चालू असतां पूर्वेकडे बंगाल्यांत रामानंदानें वैष्णव धर्माचा प्रचार सुरू केला, त्याचा अद्वितीय प्रभाव अद्यापि दिसून येतो. कबीर

हा रामानंदाचा शिष्य. कबिराची कीर्ति 'शब्दावली'नें अजरामर केली आहे. बहारप्रांतांत विद्यापति ठाकूर ह्यानें मैथिली भाषेंत राधाकृष्णांच्या प्रीतीवर उत्कृष्ट कवन केलें आहे. त्याच वेळेस बंगाल्यांत चण्डीदास निपजला. त्याची कविता लोक भक्तिपूर्वक वाचितात. पंधराव्या शतकांत मेवाडांत मिराबाई निपजली; तिनें उत्कृष्ट भक्तिपर कवनें लिहिलीं. पुढें वल्लभाचार्य व चैतन्य ह्यांनीं अनुक्रमें गुजराथेंत व बंगाल्यांत भक्तीचें माहात्म्य वाढविलें. वल्लभानें भागवतावर टीका लिहिली. चैतन्यास पूर्वेकडील ल्यूथर समजतात. चैतन्य, नदिया येथें स. १४८५त जन्मला, आणि स. १५२७त जगन्नाथपुरीनजीक मरण पावला. नदिया म्हणजे नवद्वीप येथेंच अठराव्या शतकांत रघुनाथभट्टानें न्यायशास्त्र शिकविण्याची एक पाठशाला काढिली, तिचा लौकिक पुढें फारच वाढला.

भट्टनारायणाचें वेणीसंहार नाटक व राजशेखराची विद्धशालभंजिका, बालरामायण व बालभारत हीं नाटकें नवव्या शतकांतील आहेत. कनोजच्या महीपाल राजाच्या पदरीं पंडित क्षेमेश्वर म्हणून होता, त्यानें दहाव्या शतकांत चंडकौशिक नाटक लिहिलें. संस्कृताचा जैन व्याकरणकार हेमचंद्र हाही दहाव्या शतकांतला.

भोजराजाच्या पदरचा 'हनुमान्' नाटककर्ता दामोदरमिश्र, विक्रमांकदेव चरितकार बिल्हण, राजतरंगिणीकार कल्हण, काव्यप्रकाशकार मम्मट, नदियाचे गंगेश वगैरे नैय्यायिक, दक्षिणेंतले भट्टोजी दीक्षित, वगैरे वैय्याकरण, नैषधकार श्रीहर्ष, निर्णयसिंधु व स्मृतीवरील टीकाग्रंथ, काश्मीरचा सोमदेवकवीचा कथासरित्सागर (स. १०७०), क्षेमेंद्र, व्यासदासानें लिहिलेला बृहत्कथामंजरी, हलायुधाची अभिधानरत्नमाला व अमरसिंहाचा अमरकोश, इत्यादि ग्रंथ व ग्रंथकार इ. स. १०००च्या पुढचे आहेत. हेमाद्रीचा चतुर्वर्गचिंतामणि तेराव्या शतकांतला आहे. प्रसिद्ध ज्योतिषी भास्कराचार्य इ. स. १११४त होता. कृष्णमिश्राचें प्रबोधचंद्रोदय नाटक बाराव्या शतकांतलें आहे. ह्यांशिवाय न्याय, वेदान्त व इतर अनेक विषयांवर ग्रंथ झालेले आहेत. जगन्नाथ पंडित अप्पया दीक्षित, सप्तशतीकार गोवर्धन इत्यादि कवीही ह्याच काळांतले आहेत. त्या काळीं हिंदुस्थानचा कांहीं भाग संस्कृत भाषेच्या संबंधानें निजून होता, तर कांहीं भाग देशी भाषेनें जागूं लागला होता.

काश्मीर, बंगाल, उत्तरहिंदुस्थान इत्यादि ठिकाणीं संस्कृताचाच अंमल दिसतो. मराठी, तेलंगी व तामील ह्या भाषांतही नामांकित ग्रंथकार ह्या काळीं निपजलेले आहेत. संस्कृतभाषा बहुधा ब्राह्मणांनींच प्रचारांत ठेविलेली दिसते. एकाददुसरा राजा संस्कृत जाणणारा झाला असल्यास नकळे. न्याय, व्याकरण, अलंकार व धर्मशास्त्र ह्या चार शास्त्रांवर जे ग्रंथ आज प्रचारांत आहेत, ते एकंदरींत इसवी सन १००० नंतरचे आहेत. तसेंच संस्कृत व पाली ह्या दोनही भाषांत बौद्ध ग्रंथही पुष्कळ झाले. जैनांचे ग्रंथ महाराष्ट्री व अर्धमागधी ह्या भाषांत झाले. जैनांनीं पुढें संस्कृताचा सुद्धां उपयोग केला. सारांश, देशांत युद्धें रक्तपात, राज्यक्रान्ती वगैरेंचा धडाका चालू असतां, विद्वानांचें ग्रंथलेखन शांतपणें अव्याहत चालू होतें. संस्कृत भाषेप्रमाणें देशी भाषांचाही उत्कर्ष झाला. पण त्याचें विवेचन करण्यास येथें अवकाश नाहीं. ह्या ग्रंथसंग्रहानें लोकांत धर्मजागृति कायम राहिली.

' हिंदुस्थानांतील लोक निरनिराळ्या राष्ट्रांचे व धर्मपंथांचे असल्यामुळें, आणि सर्वांस एक छत्राखालीं दाबांत ठेवणारा असा एकच मध्यवर्ती राजा नसल्यामुळें मुसलमानांपासून हिंदुधर्माचा बचाव झाला. पूर्वीं ह्या देशांत बौद्धांचा पाडाव होण्यास उशीर लागला नाहीं. बौद्ध साधु अविवाहित असत, त्यांस ठार मारून त्यांचे विहार मोडल्याबरोबर बुद्धधर्म संपला. परंतु हिंदूंचें तसें झालें नाहीं. मुसलमानांनीं त्यांचीं देवळें फोडलीं, मूर्ति फोडिल्या, मथुरा, कनोज, बनारस, सोमनाथ येथें ब्राह्मणांच्या कत्तली झाल्या, अपार संपत्ति घोर व गज्नी येथें गेली, तथापि हिंदुधर्माचीं पाळेंमुळें सामाजिक आचाराच्या बाबतींत व संस्कृत वाङ्मयांत फार खोल गेलेलीं असल्यामुळें, धर्माचा पाडाव झाला नाहीं. अगदीं दूरदूरचे प्रांत जिंकून ताब्यांत आणण्यासाठीं तीनशें वर्षें पावेतों मुसलमानांनीं आपली शिकस्त केली, तरी तें काम सिद्धीस गेलें नाहीं. आरंभीं जे मुसलमान सरदार हिंदुस्थानांत शिरले, त्यांचे हेतु दोन होते. एक येथील धर्माचा पाडाव करून मुसलमानी धर्म येथें स्थापावयाचा, व दुसरा येथील देवालयांची संपत्ति लुटून न्यावयाची. ह्या सरदारांत एकी नसल्यामुळें पुष्कळ वर्षेंपर्यंत सिंधुनदीच्या पूर्वेस त्यांस थारा मिळाला नाहीं. पुढें त्यांचा दाब हिंदु-

स्थानावर चांगला बसला, तरी सुद्धां मध्यआशियांतील लुटारू लोकांच्या झुंडी त्यांजवर येतच होत्या. ह्या परकीयांस घालवून देण्यासाठीं हिंदु लोकांची मदत मुसलमान राज्यकर्त्यांस मिळणें शक्य नव्हतें. अकबराच्या वेळेपासून मात्र हा प्रकार बदलला, आणि रजपूतलोक आपलें सर्व बळ मुसलमानबादशाहीच्या प्रीत्यर्थ खर्चूं लागले. अद्यापिही तीच गोष्ट ब्रिटिश बादशहासाठीं करीत आहेत.' (Frazer's Literary History of India.)

७. मध्यकालीन इमारतींचें बांधकाम.—दिल्ली येथील अफगाण अमदानींत ओढ्याप्रांत बहुतेक स्वतंत्र होता. त्याजवर 'गांग' नामक राजवंशाचें राज्य होतें. त्या वंशाचा पहिला राजा अनंतवर्मा चोलगांग यानें ओढ्या प्रांतावर ७१ वर्षें राज्य केलें, (स. १०७६–११४७) जगन्नाथपुरीचें भव्य मंदीर त्यानेंच इ. स. ११०० च्या सुमारास बांधिलें. ओढ्याप्रांतांत अनेक भव्य मंदिरें आहेत, त्यांची बांधणी शुद्ध हिंदु तऱ्हेची आहे. कोणार्क नांवाचें सूर्यमंदीर तेराव्या शतकांत राजा नृसिंहानें (इ. १२३८–६४) बांधिलें. तें व भुवनेश्वर येथील मंदिरसमूह हे ह्या शुद्ध हिंदुबांधणीचे उत्कृष्ट मासले होत.

हिंदुस्थानांत पुरातन काळचीं बांधकामें अतोनात आहेत. हिंदु, बौद्ध, जैन, व मुसलमान अशा चारधर्मी लोकांचीं कामें विद्यमान असून अद्यापि पुष्कळांचे शोध लागत आहेत. ह्या शोधांत अनेक विद्वान गुंतलेले असून, त्यांच्याच प्रयत्नानें ह्या देशाचा प्राचीन इतिहास स्पष्ट होत आहे. हिंदूंचीं मुख्य कामें म्हणजे देवालयें, मूर्ति, तलाव, किल्ले वगैरे आहेत. जैनांचीं मंदिरें, वाडे वगैरे असून, बौद्धांचे विहार, व डोंगरांतील गुहा वगैरे आहेत. मुसलमानांच्या मशिदी, बागा, रस्ते, वाडे, विहिरी, सराया, मनोरे इत्यादि आहेत. कनोज, मथुरा, उज्जनी, जगन्नाथ, मदुरा, कांची, तंजावर, त्रिचनापल्ली इत्यादि शहरांतील कामें अवश्य प्रेक्षणीय असून, ह्यांशिवाय मुसलमानांच्या राजधानींची व शहरांची यादी वर ठिकठिकाणीं आलीच आहे.

नुसत्या इमारतींच्याच संबंधानें पाहिलें, तर हिंदुस्थानांत बांधणीचे जितके निरनिराळे प्रकार आहेत तितके बहुधा दुसऱ्या कोणत्याही देशांत सांपडावयाचे नाहींत. बांधणींतले फरकही तसेच बहुविध आहेत.

३६–७९१–२०००

मुसलमानी अंमदानींतलीं हिंदुस्थानांतील बांधकामें पाश्चात्य कामांपेक्षां कोणत्याही बाबतींत कमी नसून, त्यांचे रचना, नकशी, सौंदर्य इत्यादि प्रकार खरोखरच वर्णनीय आहेत. ह्या बांधणींचे मासले हल्लीं अनेक मासिकांतून व इतरत्र प्रसिद्ध होत आहेत. 'ज्यांनीं ह्या इमारतींची रचना प्रथम कल्पनेनें बसविली, त्यांची कल्पकता अनुपमेय आहे; इमारती तयार करणारांचे परिश्रम केवळ निःसीम आहेत; अगदीं बारीक बारीक बाबतींत सुद्धां लक्ष घालण्याची त्यांची हौस पाहून धन्यता वाटते.' (Imperial Gazetteer, II). गुप्त राजांच्या अंमदानींतलीं कामें, दक्षिणहिंदुस्थानांतील तंजावर, मदुरा इत्यादि ठिकाणचीं प्रचंड देवालयें, कानडामुलुखांतील जैनांचीं मंदिरें, गोदावरीच्या थडींतील चालुक्यांच्या [illegible] इमारती, हीं सर्व पाहिलीं असतां पूर्वीं आपल्याकडे शिल्पकला [illegible] पूर्ण होती हें कळून येतें.

मुसलमानांच्या इमारती म्हणजे मुख्यतः मशिदी आहेत. सामान्यतः [illegible] नाहीं, असें शहर हिंदुस्थानांत सांपडणें कठीण. राजधानींच्या [illegible] वाडे, कोट, मनोरे, वगैरे आढळतात. दिल्लीची कुव्‌-मशीद व कुतब्‌-मिनार हे अगदीं जुने आहेत. विजापूरच्या इमारतींत अस्सल मुसलमानी म्हणजे इराणी व शिया बांधणी दिसून येते. पण अहंमदाबादच्या [illegible] तींत हिंदुबांधणीचें मिश्रण अतिशय आहे; तें विजापुरांत नाहीं. [illegible]कला शहाजहानच्या वेळेस अगदीं पूर्णत्वास आली; आणि पुढें औरंगजेबाच्या वेळेस तिचा ऱ्हास झाला. औरंगजेबाच्या वेळच्या नांव[illegible]सारख्या इमारती मुळींच नाहींत. जैनपद्धतीचीं कामें गुजराथ व [illegible] ह्या प्रांतांत दिसून येतात.

[illegible]जनवी महंमुदानें आठवी स्वारी स. १०१४ त केली, त्या वेळीं त्यानें कांग्रा किल्ला काबीज केला. ह्याच ठिकाणास पूर्वीं नगरकोट ऊर्फ भीमनगर अशीं नांवें होतीं. येथें महंमुदास अपार संपत्ति मिळाली, त्यांत एक चांदीचा बंगला होता. त्याची लांबी ९० फूट व रुंदी ४५ फूट होती. त्याची घडी करून तो वाटेल तेथें उभा करितां येत असे. (Vincent Smith).

जोनपूरचा लौकिक केवळ इमारतींच्या बांधकामापुरताच होता, नाहीं. तर तेथें आरबी व फारशी वाङ्मयास उत्तम प्रकारचें उत्तेजन

मिळून, इराणांत जसें शिराज हें कवींचें आगर, तसें हिंदुस्थानांत त्या वेळीं जोनपूर होतें. उत्कृष्ट कारागिरीच्या व बांधणीच्या संबंधानें गुजराथेंत अहंमदाबादचा लौकिक फार मोठा होता. अहंमदाबादच्या इतक्या सुंदर व सुशोभित इमारती त्या वेळीं दुसऱ्या कोठें नव्हत्या. ह्या बांधकामांत मुसलमानांनीं तरी, आपल्या पूर्वगामी हिंदु व जैन इमारतींचा कित्ता उचलिला. गुजराथेंतील चालुक्यवंशी सिद्धराज व कुमारपाल यांच्या वेळच्या इमारतींत अप्रतिम कौशल्य भरलेलें होतें, (Vincent Smith).

स. १५०५त एक मोठा धरणीकंप होऊन आग्र्याचा पुष्कळ नाश झाला. त्या वेळी जगत्प्रलय होतो असें लोकांस वाटलें. दिल्ली सोडून आग्र्यास जाऊन राहणारा पहिला सुल्तान सिकंदर लोदी होय. सिकंदरा म्हणून आग्र्याजवळ एक गांव आहे, तेथें अकबराची सुंदर कबर आहे. तें गांव व तेथील बारदारी हीं सिकंदर लोदीनें स. १४९५त बांधिलेलीं आहेत.

मुसलमानांचीं जीं बांधकामें सर्वत्र दिसून येतात, तीं केवळ राजेलोकांनींच केलेलीं आहेत असें नाहीं. तर बागा, वाडे, विहिरी, सराई वगैरे लोकोपयोगी कामें अनेक धनवान व परोपकारी लोकांनीं स्वतःच्या खासगी पैशानें केलेलीं आहेत.

८. **आशियायूरोपच्या तत्कालीन संस्कृतींची तुलना.**—आशियाखंडांतील लोकांविषयीं जी माहिती उपलब्ध आहे, ती बहुतेक मुसलमानांनीं व पाश्चात्यांनीं लिहिलेली असून, येथील लोकांविषयीं त्यांनीं पदोपदीं अनादर व्यक्त केला आहे. आशियांतील लोक अज्ञानांधकारांत निमग्न आहेत, राष्ट्राची सुधारणा म्हणजे काय व एकंदर जनहित कशांत आहे हें त्यांस कधींच कळलें नाहीं; तयमूरलंगासारखे पुरुष मानवजातीचे शत्रु होत; अशा प्रकारचे उद्गार आपण वारंवार ऐकितों. पण हीं मतें देतांना बाराव्या शतकांतील लोकांच्या गुणदोषांचें निरीक्षण आपण एकुणिसाव्या शतकांतील अत्यंत विभिन्न तुलनादृष्टीनें करितों हें विसरतां कामा नये. तयमूरलंग कितीही दुष्ट असला, तरी त्याच्या वेळच्या पाश्चात्य पुरुषांशीं त्याची तुलना केली असतां, ती खचित शोभण्यासारखी आहे. त्याची दरबारची टापटीप, त्याचे राज्यकारभार चालविण्याचे नियम, व त्याचा दरारा ह्या गोष्टी पाहूं गेलें असतां, त्यांत शहापण व जन-

हितेच्छा नाहीं असें म्हणतां येत नाहीं. त्याचें खरें वैभव पाहवयाचें असेल तर प्राच्येतिहासकारांचेच ग्रंथ वाचले पाहिजेत. युरोपांतील अज्ञानरूपी महानिद्रेंतून युरोपीय राष्ट्रांस जागें करण्यास मुळारंभीं चंगीझखान व तयमूर ह्यांच्याच स्वाऱ्या कारण झाल्या आहेत. ह्यांनीं स्वाऱ्या करून जीवितादि सर्वस्वाचा विध्वंस केल्यामुळें, युरोपीय लोक दचकून जागे झाले; आणि स्वातंत्र्य, स्वराज्यभक्ति वगैरे पुढें कालांतरानें विकास पावलेल्या गुणसमुदायाची त्यांच्या ठिकाणीं प्रारंभीं प्रेरणा झाली. तयमूरचा नातू उलूघबेग ह्यानें सन १४३७त समर्कंद येथें एक ज्योतिषपाठशाला व वेधगृह स्थापिलें. एवढें अवाढव्य काम सर्व भूतलावर दुसरें कोठेंही नाहीं. प्रसिद्ध टायकोब्राही ह्यानें अशीच वेधशाळा डेन्मार्कांत स्थापिली, तेव्हां उलूघबेगची ज्योतिषशाला स्थापन होऊन १४० वर्षे झालीं होतीं. ग्रीक लोकांच्या वेळेस अलेक्झांड्रिया येथें गणितादि शास्त्रांचा उत्कर्ष झाला, त्यानंतर बगदाद, कोर्डोव्हा, सेव्हिल, तांजर्स आणि समर्कंद हीं ठिकाणें एकामागून एक विद्यासंपन्न होत गेलीं. टायकोब्राही जन्मास येण्यापूर्वीं ती विद्या पाश्चात्यांस लाभली नव्हती. मुसलमान लोकांत जे पुरुष विद्येनें लौकिकास चढले, त्यांतील उलूघबेग हा शेवटचा होय. ज्योतिषशास्त्राच्या अभ्यासाकरितां त्यानें अवाढव्य उपकरणें तयार केलीं; आणि त्यांच्या मदतीनें ग्रह व नक्षत्रें ह्यांच्या गतीचे वेध घेऊन ते प्रसिद्ध केले. उलूघबेगची वेधशाळा तीन मजल्यांची होती. समर्कंद शहरांतील इमारती व कलाकौशल्याचीं कामें तयमूरच्या वेळेस सर्व पृथ्वींत अग्रगण्य असून तें शहर फार नांवाजलेलें होतें. पृथ्वीच्या सर्व भागांतून तयमूरनें कारागीर आणविले होते. ज्योतिषशास्त्र, गणित, काव्य व त्या काळाला अनुरूप अशीं इतर विद्यांगें ह्यांची तेथें चांगलीच भरभराट होती. या गोष्टी ध्यानांत धरून मग तयमूरसारख्या पुरुषांविषयीं योग्य तें मत द्यावयास पाहिजे.

बारा, तेरा, व चौदा ह्या तीन शतकांत युरोपियन राष्ट्रांची अंतःस्थिति बरीच हीन होती. रस्ते, इमारती, गाड्या, कपडा, शिल्पकला, इत्यादि बाबतींत हिंदुस्थानदेश युरोपहून श्रेष्ठ होता. विजापूर, जोनपूर येथील उत्कृष्ट इमारती अद्यापि जर लोकांस थक्क करितात, तर त्या वेळचें काय वर्णन करावें ! भाषेचा, वाङ्मयाचा, किंवा व्याकरणाच

युरोपांत उदय सुद्धां नव्हता, त्या वेळेस हिंदुस्थानांत उत्तमोत्तम कोश, व्याकरणें, नाटकें, काव्यें, व अलंकार, न्याय तर्क इत्यादिकांवर सर्वमान्य ग्रंथ होऊन चुकले होते. ही गोष्ट मनांत आणिली म्हणजे परकीय अंमलाखालीं सुद्धां वरील काळांत हिंदुस्थानची स्थिति बरीच समाधानकारक होती असें म्हणावें लागतें. युरोपांत अज्ञानांधकार भरला होता. इंग्लंडच्या उदयास आरंभ नव्हता; इटलीच्या पुनर्जन्माची वार्ता नव्हती. जर्मनी व फ्रान्स येथें बादशाही अंमल नांदत होता, तरी समाज एकंदरींत हीन स्थितींतच होता. पुस्तकें छापण्याच्या कलेस आरंभ होऊन ज्ञानवृद्धि होण्यास युरोपांत अजून अवकाश होता. तत्पूर्वी यूरोपचे लोक अज्ञानी असून हिंदुस्थानच्या मानानें फारच मागसलेले होते. अटलांटिक महासागरांत अगर आफ्रिकेच्या दक्षिणटोकापर्यंत सुद्धां जाण्याची यूरोपच्या खलाशांस छाती होत नसे अशा वेळीं, काठेवाडच्या खलाशांनीं पूर्वेस जावा, सुमात्रा, बोर्निओ व जपान, आणि पश्चिमेस आफ्रिकेच्या दक्षिणकिनाऱ्यापावेतों समुद्रप्रवास करून आपल्या वसाहती स्थापिल्या होत्या. व्यापाराच्या संबंधानें यूरोपखंड किती मागसलेलें होतें, याचें वर्णन ब्रिटिश रियासतींत पाहवें. अर्वाचीन युरोपांत मुत्सद्दी पुरुषाचें नांवही नव्हतें, अशा वेळीं हिंदुस्थानांत महंमद गवान, आसदखान, माधवाचार्य, विद्यारण्य, ह्यांच्यासारखे राज्यकरणकुशल पुरुष निपजले.

युरोपीय राष्ट्रें ह्या वेळेस नूतन ज्ञानाच्या बालार्कप्रकाशानें नुकतीच कोठें जागीं होऊं लागलीं होतीं. पहिला मोंगल बादशहा बाबर हा योग्यतेनें व ज्ञानानें ह्या पुनरुज्जीवनाच्या काळास शोभणारा असा होता. इंग्लंड व स्कॉटलंड ह्या दोन देशांमध्यें फ्लॉडनफील्ड येथें प्रचंड युद्ध होऊन स्कॉटलंडच्या मध्यकालीन सरदार लोकांचा पाडाव झाला. क्रिस्ती व मुसलमान यांच्यांत सारखे झगडे चालू होते. क्रिस्तीधर्माची श्रेष्ठता जगास दाखविण्यासाठीं लूथरसारख्या माहात्म्यांनी जिवापाड मेहनत सुरू केली, तिच्या योगानें सर्व यूरोपखंडभर धर्मजागृति झाली. प्रसिद्ध चित्रकार मिकेल ॲंजेलो ह्यानें रोमशहरीं सेंटपीटर्स नांवाचें विख्यात मंदिर बांधण्याचें काम सुरू केलें. सन १४५३ त तुर्क लोकांनीं पूर्वरोमन बादशाहीचा पाडाव करून कान्स्टांटिनोपल ऊर्फ कुस्तंतनिया हें शहर काबीज केलें, तेथें तुर्क

बादशहा आजतागाईत राज्य करीत आहे. होकायंत्राच्या शोधानें भूगोलशास्त्रांत प्रगति होऊन कोलंबसासारख्या साहसी पुरुषांनीं अमेरिका खंड पाश्चात्यांचे आटोक्यांत आणून दिलें. हिंदुस्थानांत पोर्तुगीज लोकांचा प्रवेश झाला. इंग्लंडांत आठवा हेन्री, फ्रान्सावर पहिला फ्रान्सिस, जर्मनी व स्पेन येथें पांचवा चार्लस, असे पराक्रमी राजे युरोपांत राज्य करीत असतां, हिंदुस्थानांत मोगल बादशाहीची स्थापना झाली. युरोपांत अज्ञानांधकाराचा झपाट्यानें नाश होत चालला असतां, पूर्वेकडे हिंदुस्थानांत नवीन ज्ञानवृद्धि तर दूरच, पण असलेली सुधारणा व ज्ञान ह्यांचा तितक्याच झपाट्यानें ऱ्हास होत चालला होता. नाहीं म्हणण्यास मराठी भाषेस मात्र या काळीं नवीन चलन मिळूं लागलें. संस्कृत भाषेचा अभ्यास उत्तरोत्तर नष्ट होत चालल्यामुळें तींतील ज्ञानभांडाराचा लाभ बहुतेकांस दुर्मीळ झाला. तेव्हां ज्ञानदेवासारख्या पंडितांनीं संस्कृतांतील ज्ञानभांडार फोडून, आबालवृद्ध महाराष्ट्रीयांस तें लुटण्यास खुलें करून दिलें. ज्ञानदेवाचा हा कित्ता अखंड वळैविण्याचा प्रघात पडल्यामुळें मराठींत अनेक विद्वान् पंडित व संत-कवि निपजून, त्यांनीं संस्कृताच्या धर्तीवर मराठींत मोठमोठे ग्रंथ रचिले.

प्राचीन काळापासून देशोदेशचे प्रवासी निरनिराळ्या हेतूंनीं ह्या देशांत येऊन परत जात. अशा प्रवाशांस येथें जें कांहीं विशेष चमत्कारिक वाटलें, तें परत गेल्यावर त्यांनीं स्वभाषेंत लिहून ठेविलें. अशा प्रवासवृत्तांचीं अनेक पुस्तकें तर्जुम्याचे रूपानें बहुतेक पाश्चात्य भाषांत प्रसिद्ध झालीं आहेत. फा हियान नांवाचा बुद्धधर्मानुयायी चिनी प्रवासी त्या धर्माची प्रत्यक्ष माहिती घेण्याकरितां हिंदुस्थानांत आला होता. ह्या प्रवासांत इ. स. ३९९ पासून ४१४ पर्यंत त्याचीं पंधरा वर्षें गेलीं. त्याचें प्रवासवृत्त प्राचीन इतिहासांत येत असल्यामुळें तें येथें दाखल करण्याची जरूर नाहीं. त्याच्यानंतर इ. स. ६२९ पासून सन ६४५ पर्यंत हियोअनत्संग नांवाचा दुसरा एक बुद्धधर्मी चिनी गृहस्थ या देशांत फिरत होता. त्याची निरीक्षणशक्ति विशेष तीव्र असल्यामुळें, त्याच्या हकीगतीवरून आपल्या देशांतील अनेक संशयप्रचुर प्रश्नांचा सुरेख उलगडा होतो. पण ह्याचेंही प्रवासवृत्त प्रस्तुत कार्यास उपयोगाचें नाहीं.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

स्थानच्या इतिहास, तेथील राज्यांच्या घडामोडी, व तेथचे प्रचंड उत्पात, ह्यांच्या योगानें एकंदर मनुष्यजातीवर जेवढा परिणाम घडला आहे, तेवढा बहुधा दुसऱ्या कशानेंही घडला नसेल.*

प्रकरण विसावें.

मोगलवंश.

जहीरुद्दीन महंमद बाबर.

इ. स. १५२६–१५३०.

१. पूर्ववृत्त, (ज. १४८३). २. मध्यआशियांतील नशिबाचे खेळ.
३. पानपतची लढाई व हिंदुस्थान काबीज. ४. शिक्रीची लढाई, राणासंगचा पाडाव.
५. इतर शत्रूंचा पाडाव व मृत्यु. ६. बाबराची योग्यता.
७. बाबराचें आत्मचरित्र.

१. पूर्ववृत्त, (स. १४८३–९४).—जहीरुद्दीन महंमद बाबर हा तयमूरलंगाचा सहावा वंशज होय. त्याचा आजा अबू सईद मीर्झा हा तयमूरनें जिंकिलेल्या विस्तृत राज्याचा मालक होता. अबू सईद यास अकरा मुलगे होते. त्या सर्वांनीं त्याच्या मरणानंतर तें राज्य वांटून घेतलें. चवथा मुलगा उमरशेख मीर्झा हा बाबरच्या बाप होय. उमरशेख याजला प्रथम काबूलचें राज्य मिळालें होतें, परंतु तें त्याजकडून जाऊन सिरदर्या नदीच्या उगमाजवळील फरगाना प्रांत त्यास मिळाला. झगताई म्हणून चंगीझखानाचा एक मुलगा होता. हेंच नांव पुढें एका तुर्क टोळीस प्राप्त झालें. ह्या झगताईचा महंमूदखान म्हणून एक वंशज होता. त्याची बहीण उमरशेख याजला दिली होती. म्हणून बाबर हा आई-कडून चंगीझखानाचा व बापाकडून तयमूरलंगाचा वंशज होय. फरगाना प्रांत म्हणजे कवि व विद्वज्जन यांचें आगर अशी ख्याति होती.

---

* 'The history, politics and apheavals of India have left a greater impress than almost any other, upon the history of mankind.' Lord Curzon's speech at Eton-Prize Essay, 1909.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

उमरशेख मीर्झा हा विद्वान असून कवींचा आश्रयदाता व महत्त्वाकांक्षी होता. तसाच तो उदार, शूर व न्यायदक्षही होता असें बाबरनें लिहिलें आहे.

फेब्रुवारी, ता. १४ स. १४८३ रोजीं बाबराचा जन्म झाला. बाबर हा बापाकडून तयमूरलंग तुर्काचा व आईकडून चंगीझखान मोंगलाचा वंशज होता. तयमूरलंग स. १४०५ त वारला, त्या वेळीं त्याचें राज्य जरी अफाट होतें, तरी त्याची व्यवस्थित जुळवाजुळव झालेली नव्हती; म्हणून लगेच त्याचे तुकडे होऊन त्याच्या वंशजांच्या हातांत मध्यआशियांतला ऑक्सस् ऊर्फ अमूदर्या व जक्झार्टस् ऊर्फ सिरदर्या ह्या दोन नद्यांच्या मधला प्रदेश होता. तयमूरचा वंशविस्तार मोठा असून, प्रत्येक वंशजाच्या हातीं कांहींना कांहीं कारभार होता. बाबरचा चुलता सुलतान अहंमद मीर्झा हा समर्कंद येथें राज्य करीत असे. पूर्वेस हिसार येथें त्याचा दुसरा चुलता महंमूद ह्याचें राज्य होतें. तिसरा चुलता उलुघबेग ह्याच्या ताब्यांत काबूल व गज्नी हे प्रांत होते; आणि बाबरचा बाप उमरशेख मीर्झा ह्याचा अंमल फरगाना प्रांतावर होता. हा प्रांत खिरदर्या नदीच्या उगमाशीं असून, त्यास हल्लीं खोकंद असें म्हणतात. ह्या प्रांताची राजधानी अंदिजान शहर असून, आक्शी म्हणून दुसरें एक मजबूद शहर त्या प्रांतांत होतें. हा सर्व प्रदेश डोंगराळ असून बराच बर्फाच्छादित असतो. बाबरचा बाप उमरशेख मीर्झा हा आक्शी येथें ता. ९ जून, १४९४ रोजीं डोंगरावरून खालीं घसरून मरण पावला. 'जून १४९४ त मला फरगाना प्रांताचें राज्य प्राप्त झालें,' हें बाबरच्या आत्मचरित्रांतलें पहिलें वाक्य आहे.

वर सांगितलेल्या तयमूरच्या वंशजांच्या राज्यापलीकडे, पूर्वेस व उत्तरेस, चंगीझखानाचे मोगल वंशज आपला आनुवंशिक लुटीचा धंदा करून राहत होते. त्यांत यूनसखान म्हणून एक बराच प्रसिद्ध पुरुष होता. बाबरचा आजा सुलतान अबू सईदमीर्झा हानें यूनसखानास पुष्कळ साह्य केल्यामुळें, त्यानें आपल्या तीन मुली अबू सईद मीर्झाच्या तिघां मुलांस दिल्या; त्यांतील एक कुत्लुक निगार खानम ही बाबरची आई होय. यूनसखानाची बायको इसान-दौलत बेगम ही बाबरची आजी पुढें बहुतेक त्याजपाशींच राहत असे. बाबर जन्मला, तेव्हां नांव ठेवण्याच्या समारंभास सत्तर वर्षांचा वृद्ध यूनसखान मुद्दाम अंदिजान येथें आला.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

जहीरुद्दीन महंमद हें त्याचें आरबी नांव ठेवण्यांत आलें. पण यूनसखानास तें परकी नांव चांगलेंसें उच्चारितां येईना, म्हणून त्यानें 'बाबर' हें दुसरें नांव स्वतः त्यास दिलें, त्याच नांवानें तो पुढें प्रसिद्धीस आला. बाबरचा अभ्यास लहानपणीं चांगलाच झाला असला पाहिजे. कारण बाप वारल्यावर त्याजवर ज्या आपत्ति कोसळल्या, त्यांमुळें विद्या शिकण्यास त्यास फुरसत मिळणें शक्य नव्हतें. हें त्याचें लहानपणचें शिक्षण त्याची आई व आजी ह्यांनीं केलें. ह्या बायांच्या ठिकाणीं मोगलांचे कित्येक अस्सल गुण कायम होते; आणि अनेक संकटें आलीं असतांही ह्या बायांनीं त्यास कधीं सोडिलें नाहीं. त्याच्या आजीची योग्यता फार मोठी होती. 'तिचें शहाणपण व अक्कल कोणासही येणार नाहीं. ती मोठी धोरणी असून, पुढें काय प्रकार घडणार तें ती सहज ताडी. तिच्या सांगीवरून मीं अनेक मोठमोठीं कामें हातीं घेतलीं. एकदां तिच्या नवऱ्याला व तिला शत्रूंनीं पकडिलें, आणि तिला एका सरदाराच्या हवालीं केलें. पुढें तो सरदार तिच्याकडे आल्याबरोबर, तिनें खोलीचें दार लावून घेतलें, आणि आपल्या बायामंडळीकरवीं त्याचा खून करविला. हें पाहून तिचा शत्रु शेख जमाल ह्यास संताप आला. तेव्हां तिनें जबाब दिला, कीं 'मी यूनसखानाची बायको असतां शेख जमालनें मला दुसऱ्यालाच देऊन टाकिलें, म्हणून मीं त्याचा प्राण घेतला. मर्जी असेल तर त्याबद्दल माझा जीव घ्या, मी तयार आहें.' हा रोखठोक जबाब ऐकून जमालखानानें तिला नवऱ्याकडे पोंचविलें. ह्या गोष्टीवरून तिचें प्रखर पाणी व्यक्त होतें. ह्या निर्धारी बाईचाच बाबरास हरएक अडचणींत विशेष उपयोग झाला.

सन १४९४च्या जून महिन्यांत अंदिजानच्या किल्ल्यावर राज्याचें ओझें बाबराच्या अंगावर येऊन पडलें. त्याबरोबर अनेक शत्रूंनीं चहूंकडून अंदिजानवर चाल केली; त्यांत त्याचा चुलता समरकंदचा सुलतान अहंमद हा मुख्य होता. अंदिजानवर येण्यास मध्यें एक लहानशी नदी लागते, तिजवरील पुलावरून अहंमदचे लोक येत असतां, पूल कोसळून बरेच लोक मेले. तेव्हां हा अपशकून समजून अहंमद मीर्झा परत गेला. शिवाय चार वर्षांपूर्वी ह्याच ठिकाणीं बाबरच्या बापानें अहंमदाच्या फौजेचा पराजय केला होता. ह्याच संधीस कांहीं एका भयंकर सांथीनें अहंमदाचे

पुष्कळ घोडे मेले. अशा अडचणींत बाबरशीं सलोखा करून अहंमदशहा परत गेला; आणि तेवढ्यापुरता बाबरचा बचाव झाला. तथापि बाबरच्या मनांत आपण समर्कंद येथें तयमूरच्या सिंहासनावर बसावें असें फार होतें. हा नाद त्यानें पंचवीस वर्षें एकसारखा चालविला होता. तीनदां समर्कंद राजधानी त्याच्या हातांत पडली, पण तीनदांही ती हातची गेली. त्यामुळें उद्विग्न होऊन शेवटीं त्यानें आपला मोर्चा हिंदुस्थानकडे फिरविला. ह्या पंचवीस वर्षांच्या युद्धप्रसंगांत व अडचणींत जें अमोलिक शिक्षण त्यास मिळालें, त्याच्या योगानें हिंदुस्थानांत नवीन राज्य कमाविण्याची योग्यता त्याच्या अंगीं उत्पन्न झाली.

२. मध्यआशियांतले नशिबाचे खेळ, (१४९४–१५१९).—मध्यआशियांतील बाबराच्या झटापटी कल्पित कादंबरीलाही शोभण्यासारख्या आहेत. समर्कंद, बुखारा, बाल्क हीं शहरें शिकंदर बादशहाच्या वेळेपासून प्रसिद्धीस येऊन हजारों वर्षांच्या घडामोडींत संपन्न व सुंदर झालीं होतीं. येथें अनेक विद्याकलांचा उत्कर्ष झाला होता. अमूदर्या व सिरदर्या ह्या दोन नद्यांच्यामधील प्रांत अत्यंत सुपीक व रमणीय आहे. त्यांच्या मुळाशीं वर फरगाना प्रांत आहे, त्यास एखाद्या उत्कृष्ट बागाची उपमा देतां येईल. 'द्राक्षें, डाळिंबें, खरबुजें, इत्यादि फळें अंदिजान व आक्शी येथें होतात तशीं दुसऱ्या कोठें होत नाहींत' असें बाबर म्हणतो. आक्शीच्या खरबुजांचें वर्णन तर पदोपदीं आढळतें. आपल्या नातेवाइकांचीं व तत्कालीन अनेक पुरुषांचीं वर्णनें बाबरनें आपल्या आत्मचरित्रांत दिलीं आहेत. त्याचे बरेच नातेवाईक व स्नेही त्याच्या अगदीं भजनीं असत. लहानपणापासून दुसऱ्याचें चित्त आपणाकडे आकर्षून घेण्याची कला बाबरास चांगली साधलेली होती. तथापि ऐन आणीबाणीच्या प्रसंगीं अगदीं भरंवशाच्या लोकांनीं त्यास सोडून दिल्याचे प्रसंग कांहीं थोडेथोडके आले नाहींत. पुष्कळदां असा प्रकार घडावा, कीं आतां पुढें बाबरास कांहीं एक आशा उरलेली नाहीं. सर्वांनीं त्यास सोडून द्यावें. तथापि त्याचा स्वतःचा दम कधीं खचला नाहीं. आपण आपला भाग्योदय काढणार, ही त्याची निष्ठा अक्षय होती. ह्या निष्ठेच्या जोरावरच त्याचें बेत सिद्धीस गेले.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

समर्कंद येथें अहंमद मीर्झा राज्य करीत होता, तो मरण पावला, व बाबरचा दुसरा चुलता महंमूद मीर्झा ह्यास तें राज्य मिळालें. पण तोही स. १४९५ त मरण पावल्यावर अनेक असामी समर्कंदवर चालून गेले, त्यांत बाबरही गेला. नोव्हेंबर स. १४९७ त समर्कंद त्याच्या हातांत आलें. तयमूरच्या राजधानींत त्यास राज्याभिषेक झाला, आणि त्या ठिकाणीं आपला नीट बंदोबस्त करण्याच्या उद्योगास तो लागला. त्या वेळीं त्यानें आपल्या सरदारांस व फौजेस समर्कंद शहरांत लूट करूं दिली नाहीं, म्हणून नाखूष होऊन एकामागून एक त्याचे लोक बाबरास सोडून गेले. अशा अडचणींत तो स्वतः अतिशय आजारी पडला. चार दिवसपर्यंत बोलणेंसुद्धां बंद होतें. ही बातमी अंदिजान येथें पोंचून त्या शहरावर शत्रु चाल करून आले, तेव्हां अंदिजानच्या बचावास त्वरा करून यावें, अशीं निकडीचीं पत्रें बाबरास येऊन, थोडा बरा झाल्यावर तो लगेच समर्कंद सोडून निघाला. त्याबरोबर इकडे त्याचा चुलतभाऊ सुलतान अली ह्यानें समर्कंद काबीज केलें, आणि तिकडे त्याचा भाऊ जहांगीर मीर्झा ह्यानें विश्वासघात करून लष्करास वश करून घेऊन अंदिजान घेतलें. समर्कंद शहर चांगलें ताब्यांत आलें नव्हतें; तरी वडिलोपार्जित फरगाना प्रांतावर त्याची विशेष प्रीति असल्यामुळें तो एकदम आपल्या भावाची खोड मोडण्यास निघाला. रस्त्यांत त्यास अशी बातमी लागली, कीं आपण मेलों अशी गप्प उठवून जहांगीर मीर्झानें फरगाना प्रांताचें राज्य बळकाविलें. सारांश, समर्कंदच्या नादांत, अंदिजानही जाऊन बाबरास वनवास पत्करावा लागला. समर्कंद येथें त्याचा मुकाम फक्त शंभर दिवस होता. चांगले चांगले सर्व लोक त्यास सोडून गेले. फार तर शेंदोनशें टाकाऊ लोक त्याजपाशीं राहिले. 'आतां मात्र माझा धीर अगदीं खचला. माझी चोहोंकडून निराशा झाली, आणि मी एकसारखा रडूं लागलों,' असें त्यानें आत्मचरित्रांत लिहिलें आहे. खोकंद येथें त्याची आई व आजी त्यास येऊन भेटल्या. तेव्हां नवीन हुरूप येऊन तो पुढील उद्योगास लागला. रानांतील नवीन लोकांच्या टोळ्या त्याच्या मदतीस आल्या; आणि लवकरच आक्शी व अंदिजान हीं दोनही शहरें त्याच्या हस्तगत झालीं, (जून, स. १४९९). इतक्यांत पुनरपि युद्धप्रसंग सुरू

होऊन त्याचा भाऊ जहांगीर ह्यास आक्शीचें ठिकाण देणें बाबरास भाग पडलें, (स. १५००); आणि दोघां भावांची गोडी झाली. दोघांनीं मिळून समर्कंद जिंकावें आणि मग फरगाना प्रांत जहांगिरास द्यावा अशी कबुली झाली होती. समर्कंद जिंकण्याची बाबरास फार उत्कंठा लागली होती, इतक्यांत तेथून त्यास बोलावणेंही आलें. स. १५००च्या जून महिन्यांत बाबर पुनः समर्कंदवर निघाला, आणि एके दिवशीं रात्रीं अनायासें बाबराचा शहरांत प्रवेश झाला. त्याबरोबर लोकांत जिकडे तिकडे आनंदी-आनंद झाला. त्याची आई व आजी त्यास येऊन भेटल्या. बाबरास अजून पुष्कळ बंदोबस्त करावयाचा होता. उझबेक मोगलांचा सरदार महंमद शयबानीखान समर्कंद काबीज करण्यास टपला होता. चंगीझखानाचा नातू शयबान म्हणून होता, त्याचा हा वंशज असल्यामुळें, त्यानें शयबानीखान असें नांव घेतलें. त्याजबरोबर बाबरची लढाई होऊन बाबरचा पुनरपि पराजय झाला. त्याचे सर्व लोक पळून गेले आणि दहापंधरा लोकांनिशीं घोड्यासकट कोहिक नदींतून पोहून तो परत समर्कंद येथें आला. शयबानीनें त्यास वेढा घातला, त्या वेढ्यांतून एके दिवशीं मध्यरात्रीं आपल्या आईआजींसह तो जीव घेऊन पळून गेला. त्या रात्रीच्या त्याच्या हालांचें चित्तवेधक वर्णन त्यानें दिलें आहे. बरेच दिवस तो डोंगरांतून भटकत होता, त्या वेळीं एक फार वृद्ध बाई त्यास भेटली. तिनें तयमूरलंगाच्या स्वारीच्या गोष्टी लहानपणीं ऐकिलेल्या होत्या, त्या बाबरास सांगून त्यास हिंदुस्थानवर स्वारी करण्याची भर दिली. पुढें कांहीं दिवस तो आपल्या मामाच्या आश्रयास ताश्कंद येथें गेला. इकडे शयबानीखानानें आपलें राज्य पुष्कळ वाढविलें. त्यानें ताश्कंदही काबीज केलें, तेव्हां स. १५०३त आक्शी येथें पराभव होऊन, बाबर आपल्या भावासह पळून काबुलाकडे आला.

"अशा अनिश्चित स्थितीनें मी अगदीं कंटाळून गेलों. घर, नाहीं, दार नाहीं, अशा स्थितींत जगावें तरी कशाला! मी मनांत म्हटलें, असल्या हालअपेष्टेंत व विपत्तींत दिवस कंठण्यापेक्षां कोठें तरी एकांतांत जाऊन बसणें बरें. तेथें मला कोणी ओळखणार नाहीं व विचारणारही नाहीं. अशा अपमानांत लोकांस तोंड दाखविण्यापेक्षां मनुष्याचें दर्शन नाहीं अशा ठिकाणीं जिकडे पाय नेतील तिकडे पळून जावें. एकदां

मनांत वाटे चीन देशांत जावें. लहानपणापासून चीन देश पाहण्याची मला उत्कट इच्छा होती. पण मी राजा पडलों ना, राज्य सोडून जायचें कसें. शिवाय माझा गोतवळा व लवाजमा कोठें टाकून द्यायचा ! आतां राज्य तर गेलें. तेव्हां एक अडचण दूर झाली. आईची व्यवस्था लागली आहे. तेव्हां आतां वाटेल तिकडे जाण्यास मला कसची आडकाठी !'

काबूल येथें बाबराचा चुलता उलूघबेग राज्य करीत होता, तो सन १५०१ त मरण पावला. त्याच्या अल्पवयी मुलाकडे कारभार आल्यामुळें वजीर सर्व अधिकार बळकावून बसला होता. हा वजीर लोकांस अप्रिय होऊन मारला गेला. अशा घालमेलींत बाबरानें जाऊन काबुलचें राज्य हरण केलें. नंतर थोड्याच दिवसांनीं त्यानें कंदाहार शहर घेतलें, (स. १५०४). ह्या वेळेपासून त्याच्या विचारास व उद्योगास निराळी दिशा लागली. समरकंदहून काबूल व काबूलहून दिल्ली असा पूर्वीपारचा मार्ग चालत आलेला होता. बाबरनें बरेच लोक जमा केले. स. १५०४ च्या ऑक्टोबर महिन्यांत काबूल त्याच्या हातांत आलें. तेथें नवीन बागा वगैरे करून त्यानें आपली राहण्याची व्यवस्था केली. पुष्कळ नवीन फळांची त्यानें लागवड केली. त्या वेळीं काबूलचा वसूल सुमारें पांच लक्ष रुपये होता. काबूलप्रांत सृष्टिसौंदर्यासंबंधानें उत्कृष्ट होता. तथापि तेथें धान्यसामुग्रीचें सदा दुर्भिक्ष असे. तेव्हां कोठें तरी हात मारून बाहेरून संपत्ति आणण्याशिवाय गत्यंतर नव्हतें. अर्थात् त्याची दृष्टि हिंदुस्थानाकडे वळली. त्यानें सिंधुनदीपर्यंत एक स्वारी केली. आणि चार महिन्यांत गज्नी काबीज करून परत आला, (स. १५०५, जानेवारी–मे). ह्याच सुमारास त्याची आई व आजी वारल्या. काबूल येथें बाबरचा चांगला जम बसला; तथापि समरकंद काबीज करण्याची त्याची हुरहूर बंद पडली नाहीं. पुनः एकवार त्या बाजूनें प्रयत्न करण्याचा विचार करून, तो हिरात येथें गेला, (स. १५०५). हिरातप्रांत त्या वेळीं चांगला समृद्ध व विद्याकलांनीं नांवाजलेला होता. तेथील त्या वेळच्या अनेक विद्वान् व नामांकित पुरुषांची यादी बाबरनें दिली आहे. हिरात येथें त्याचे चुलतभाऊ होते, त्यांजपाशीं त्यानें वीस दिवस मोठ्या आनंदांत व चैनींत घालविले. ह्याप्रमाणें तिकडच्या प्रांताची माहिती

NATIONAL ARCHIVES OF INDIA

मिळवून व फौजेची वगैरे व्यवस्था करून, बाबर काबुलास परत आला. इतक्यांत शयबानीखानानें हिरात काबीज केल्याची बातमी आली. अर्थात् तयमूरच्या विस्तृत वंशांतला बाबर एवढा एकच गृहस्थ राज्यपदावर राहिला; आणि त्याचाही अंत शयबानीखान लवकरच करणार अशी भीति वाटूं लागली. बाबर आपलें राज्य मजबूद करण्याच्या उद्योगास लागला. ह्याच वेळीं त्यास मद्यप्राशनाचा विशेष नाद लागून तो चैनी बनला. स. १५०८ पासून १५१९ पर्यंतच्या काळाचें आत्मचरित्र लिहिलेलें नाहीं, तेव्हां त्यांत कोणते विशेष प्रसंग घडले. हें सांगतां येत नाहीं. तथापि स. १५१०त त्यानें एकाएकीं समर्कंदवर स्वारी केली. त्यापूर्वींच इराणचा शहा इस्माईल सूफी ह्याज बरोबरच्या लढाईंत शयबानीखान मारला गेला होता. त्याचे ऊझबेग सरदार बाबरशीं लढण्यास आले, त्यांचा त्यानें पराभव केला, आणि शहा इस्माईल सूफीच्या मदतीनें तिसऱ्यांदां समर्कंदचें तख्त मिळविलें, (स. १५११ ऑक्टोबर). त्याबरोबर एकदम सर्व मध्यआशियाचा तो बादशहा झाला. त्यानें काबूलचें राज्य भाऊ नासिर यास दिलें, आणि आपण समर्कंदासच राहण्याचा निश्चय केला. परंतु हा त्याचा विजय फार वेळ टिकला नाहीं. इराणच्या शहास खूष करण्याकरितां बाबरनें शियापंथाचा स्वीकार केला; त्यामुळें सर्व सुनी लोकांस वाईट वाटून ते त्यास सोडून गेले. पुनरपि ऊझबेग लोकांनीं त्याचा पराजय केला; म्हणून त्यास समर्कंद सोडून जावें लागलें. कित्येक दिवस असाच तो रानावनांत भटकत राहिला; आणि सन १५१४त काबुलांत गेला, तो पुनरपि कधीं परत वळला नाहीं. ऊझबेग मोगलांनीं समर्कंदचें राज्य घेतलें. बाबर तुर्क होता, आणि तो मोगलांचा अत्यंत द्वेष करी.

आजपर्यंत वीस वर्षें काबुलास बाबराचा अंमल होता, तितक्या अवकाशांत हिंदुस्थानाविषयीं त्यास बरेच वेळां लोभ सुटला. शिवाय आपली महत्त्वाकांक्षा पुरी करून घेण्यास त्यास उत्तरेकडे व पश्चिमेकडे मुळींच मार्ग उरला नव्हता. म्हणून तयमूरप्रमाणें राज्यवृद्धि केल्याची कीर्ति मिळविणें असेल, तर हिंदुस्थानदेशच जिंकून घेतला पाहिजे, अशी त्याची खात्री झाली. लोदी घराण्याचे अमलाखालीं हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेंत कांहीं त्राण उरलें नव्हतें; सर्वत्र धामधूम सुरू असून दिल्लीच्या सार्वभौमाचा ताबा प्रत्यक्ष शहराबाहेर फारसा उरला नव्हता.

तेव्हां असला धनसंपन्न देश आपल्या हाताखालीं सहज घालतां येईल असें बाबरास वाटलें ह्यांत आश्चर्य नाहीं. वास्तविक म्हटलें तर वरील उद्देश पार पाडण्यास बाबरसारख्या शूर व चतुर पुरुषास इतका विलंब लागला हेंच आश्चर्य आहे. म्हणून यापुढें त्यानें आपली दृष्टि हिंदुस्थानाकडे वळविली. १५१९त त्यानें हिंदुस्थानावर स्वारी करून, बरीच लूट काबुलास नेली. सात वर्षांत त्यानें पांच स्वाऱ्या केल्या. पांचव्या स्वारींत त्यास हिंदुस्थानचें राज्य प्राप्त झालें. ह्या स्वाऱ्यांत त्यानें तोफांचा उपयोग केला. हिंदुस्थानांत पहिल्यानें तोफांचा उपयोग हाच होय.

३. पानपतची लढाई व हिंदुस्थान काबीज, (एप्रिल २१, स. १५२६).– सन १५१९त बाबरनें हिंदुस्थानवर पहिली स्वारी केली. पंजाबांत येऊन त्यानें इब्राहीम लोदी यास निरोप पाठविला, कीं 'पंजाबप्रांत तयमूरच्या वंशजांकडे चालत आला आहे, तो आपण परत द्यावा, नाहीं तर लढाईस सिद्ध व्हावें.' ह्या वेळीं चिनाबनदीपर्यंत जाऊन बाबर काबुलास परत गेला. त्याच वर्षी त्यानें हिंदुस्थानावर दुसरी स्वारी केली. परंतु काश्गरच्या राजानें बदकूशानप्रांतावर स्वारी केल्याचें ऐकून तो तसाच परत गेला. सन १५२०त सियालकोटपर्यंत तो आला असतां, पुनरपि पहिल्याप्रमाणें त्यास परत जावें लागलें. पंजाबचा सुभेदार दौलतखान लोदी स्वतंत्र कारभार करूं लागला होता, त्यानें दिल्लीच्या सुलतानाविरुद्ध लढण्यास सन १५२४त बाबरची मदत मागितली. बाबरास हेंच पाहिजे होतें. तो तत्काळ हिंदुस्थानांत आला व इब्राहीमखानाच्या फौजेबरोबर लढून त्यानें पंजाबप्रांत घेतला. हिंदुस्थानांतील अव्यवस्था ऐकून, तेथील राज्य काबीज करण्याची बाबरास अतिशय उत्कंठा लागली. त्याची तयारी उत्कृष्ट होती, आणि इब्राहीमलोदी त्याच्याशीं टक्कर देण्यास समर्थ नव्हता. दौलतखान लोदीस बाबरची ही मनीषा आवडली नाहीं. आपणास बाजूस सारून ह्याच हिंदुस्थानचें राज्य गट्ट करणार, हें पाहून दौलतखानलोदी बाबरास सोडून डोंगरी मुलखांत पळाला. अर्थात् दौलतखान बिथरल्यानें बाबरचे बेत जरा थंड पडले. तथापि पंजाबांत अलाउद्दीन लोदीस बंदोबस्तास ठेवून आणि ठिकठिकाणीं आपलीं ठाणीं बसवून बाबर काबुलास परत गेला.

ह्या अलाउद्दीन लोदी इब्राहीम लोदीचा भाऊ असून रुसून बाबरकडे गेला होता. त्याबरोबर बाबरनें आपली फौज हिंदुस्थानांत पाठविली.

आरंभीं अलाउद्दिनास जय मिळाला; परंतु पुढें बेसावध राहिल्यानें दिल्ली-नजीक इब्राहीमच्या फौजेनें त्याचा चांगलाच पराजय केला, म्हणून तो पंजाबांत पळून गेला. हें बाबरास कळतांच तो स्वतः विशेष तयारीनिशीं अलाउद्दीनच्या मदतीस आला. ही बाबरची पांचवी व शेवटची स्वारी होय, (नोव्हेंबर १५२५). दौलतखान व त्याचा मुलगा गाजीखान यांचा तळ रावी नदीच्या कांठीं होता. बाबर येतो हें वर्तमान ऐकतांच ते दोघेही पळून गेले. दौलतखानाचा पाठलाग करून बाबरनें त्यास घेरिलें. पुढें तें ठिकाण घेतल्यावर बाबरचे शिपाई लूटालूट करूं लागले असतां तो स्वतः तेथें गेला; दौलतखानाच्या कुटुंबांतील एका बाईस सोडवून त्यानें सुरक्षित स्थळीं पाठविलें, आणि गाजीखानानें स्थापिलेल्या एका उत्तम पुस्तकालयाचा बचाव केला. दौलतखान बाबरास शरण आला, तथापि लवकरच तो मरण पावला.

पंजाबांत असा प्रकार चालू असतां, दिल्लीशहरांत चाललेले घोटाळे बाबरास कळत होते. दरबारच्या अनेक वजनदार लोकांनीं बाबरास अभिनंदनपूर्वक पुढें येण्याची विनंति केली. बाबर त्वरा करून दिल्ली-वर चालून गेला. इब्राहीम लोदी एक लक्ष फौज घेऊन त्याजशीं लढण्यास बाहेर पडला. बाबरजवळ सारी त्याच्या पंचमांश फौज होती. तरी त्याचा प्रत्येक इसम लढाईत कसलेला असून, 'मारीन किंवा मरेन' अशा हिंमतीनें लढाईस आलेला होता. त्याचा मुलगा हुमायूनही आपल्या फौजेनिशीं हजर होता. त्याचा तरी लढण्याचा हा पहिलाच प्रसंग होय. इब्राहीमची फौज पानिपतच्या प्राचीन रणभूमीवर जमा झाली. बाबरनें आपल्या तोफांचे सातशें गाडे कातडयाच्या दोरडयांनीं ओळीनें जखडून, त्यांच्या मागें अपली फौज उभी केली. ह्यामुळें शत्रूंच्या स्वारांचें कांहीं चाललें नाहीं. खरें म्हटलें म्हणजे बाबरची फौज फार थकून आलेली होती. लोदीपाशीं शंभर हत्ती होते. त्यांची भीति बाबरच्या फौजेस फारच वाटत होती. कारण लढाईत हत्तींचा उपयोग त्यांनीं पूर्वी कधींच पाहिला नव्हता. तथापि लढाईची शिस्त बाबरकडे उत्तम असून, लोदीकडे सर्व अव्यवस्था होती. स. १५२६, ता. २१ एप्रिल रोजीं लढाईस सुरवात झाली. बाबरची नेहमींची लढण्याची युक्ति येथेंही उपयोगी पडली. गाडयांच्या आश्रयामागें आपल्या फौजेचें

अर्धचंद्राकृति वर्तुळ करून त्याच्या दोनही टोकांनीं हळूहळू पुढें सरून शत्रूच्या फौजेस घेरावयाचें. त्याप्रमाणें इब्राहीमच्या फौजेस बाबरनें घेरिलें. इकडे त्याच्या तोफखान्यानें शत्रूंची दाणादाण उडवून दिली. ह्याप्रमाणें दोनप्रहरपर्यंत तुंबळ संग्राम होऊन लोदीचे पंधराहजार लोक पडले. त्यांत तो स्वतःही पडला, आणि त्याचें शिर कापून बाबरकडे आणिलें. लगेच बाबरनें हुमायून ह्यास आग्रा काबीज करण्यास पाठवून दुसरी एक तुकडी दिल्लीवर पाठविली, आणि दोनही शहरें काबीज केलीं. शुक्रवार ता. २७ एप्रील रोजीं दिल्लीच्या मशिदींत बाबरच्या नांवानें खुत्बा वाचण्यांत आला. इकडे त्याच्या लोकांनीं अपरंपार लूट मिळवून आणिली. दिल्लींत शिरल्याबरोबर त्यानें खजिना उघडून त्यांतील द्रव्य व जमलेली लूट आपल्या लोकांस वांटून दिली. ह्या प्रसंगीं त्यानें केलेली उधळपट्टी अवर्णनीय आहे. आपल्याबरोबरच्या प्रत्येक सरदारास तीस पासून पंनास हजार रुपये व शिपायास थोडेंबहुत द्रव्य त्यानें दिलें; एवढेंच नव्हे, तर काबुलांतील प्रत्येक इसमास त्यानें कांहींना कांहीं बक्षिस पाठवून दिलें. एकट्या हुमायुनास तीन लक्ष रुपये रोख व न मोजलेलें पुष्कळसें जवाहीर मिळालें. तयमूरप्रमाणें हिंदुस्थान सोडून परत जाण्याचा बाबरचा विचार असता, तर ही उधळपट्टी शोभली असती. पण पहिल्यापासूनच येथें कायम राहण्याचा त्याचा इरादा असूनही, त्यानें ह्या महान् विजयाच्या स्मरणार्थ सर्वांस बक्षिसें देऊन खूश केलें, ह्यावरून 'कलंदर' म्हणजे 'उधळ्या फकीर' हें नांव बाबरास मिळालें.

बाबरच्या सरदारांच्या मनांत काबुलास परत जावयाचें होतें. पण बाबरनें त्यांस निक्षून सांगितलें, कीं 'ज्यास परत जाणें असेल त्यानें खुशाल जावें. मी येथेंच राहणार.'

लोकांनीं परत जाण्याचा फारच आग्रह धरिला, तेव्हां त्यानें सर्व सरदारांची सभा बोलावून त्यांस, आजपर्यंत आपण कसकशीं संकटें सोसलीं, व त्या सर्वांचें निरसन होऊन आज आपणास केवढें फल प्राप्त झालें आहे, हें त्यानें समजून सांगितलें 'प्रचंड फौजांचा पाडाव होऊन, हिंदुस्थानचें राज्य आपल्या हस्तगत झालें आहे. ह्याप्रमाणें आपल्या सर्व इच्छा पूर्ण होऊन, हातांत आलेलें फळ फेंकून देणें व भागुबाई-सारखें पळून जाणें आपल्यासारख्या मर्दांस शोभतें काय? माझ्याशीं

संगत ठेवण्याची ज्यांची इच्छा असेल, त्यांनीं इतःपर परत जाण्याचें नांव सुद्धां काढूं नये, ज्याला जाणें असेल त्यानें खुशाल निघून जावें.' हें मर्द निर्धाराचें बोलणें ऐकिल्यावर पुढें ब्र काढण्याची कोणासही छाती झाली नाहीं. हा त्याचा कठोर निश्चय त्याच्या शूर बाण्यास उत्कृष्ट शोभतो. शिवाय तो हिंदुस्थानांतील लोकांस माहीत झाल्यावर, तयमूर-लंगसारखाच लूट करून बाबर निघून जाईल, म्हणून जो त्यांस भ्रम होता, तोही नाहींसा होऊन, जे लोक अर्धवट कचरत होते, त्यांनीं एकदम बाबरास मिळून आपला पुढील मार्ग कायमचा ठरवून टाकिला.

पूर्वींच्या राजघराण्याच्या पक्षाचे अनेक अफगाण सरदार रोज दंडें करीत, त्यांजबरोबर बाबरास झगडावें लागलें. ह्यामुळें अनेक युद्धप्रसंग घडून आले. इब्राहीम लोदीच्या आईनें एकवार त्याजवर विषप्रयोग करविला. बाबरनें थोडेसें विषयुक्त अन्नही खाल्लें होतें, पण तें लागलेंच कळून आल्यामुळें त्याचा जीव बचावला. हिंदुस्थानांतील अफगाण अंमलदारांस बाबरचें येथें राहणें आवडलें नाहीं. त्यांनीं त्याचा पिच्छा पुरविला. शिवाय बाबर एकामागून एक प्रांत जिंकीत चालला, तेव्हां अफगाणांचा पुरा बंदोबस्त होण्यापूर्वींच त्यास रजपुतांशीं झगडावें लागलें.

४. शिक्रीची लढाई, राणासंगचा पाडाव, (१६ मार्च, १५२८).— रजपुतांच्या सर्व राज्यांत ह्या वेळेस मेवाडचें राज्य फार बलिष्ठ होतें. चितोडगडवर राणासंग राज्य करीत होता. चितोडच्या घराण्यांत आजपर्यंत जे नामांकित राजे होऊन गेले, त्यांत संगराण्याची गणना आहे. बाबरप्रमाणेंच संगराणा हा लहान-पणापासून हालअपेष्टेंत वाढला असल्यामुळें, राजाच्या अंगीं अवश्य लागणारे अनेक गुण त्याच्या ठिकाणीं वसत होते. शौर्यानें व पराक्रमानें त्यानें आपल्या नांवाचा दरारा दूरपर्यंत बसवून, आपल्या राज्याची हद्द पुष्कळ वाढविली होती. दिल्लीचा सुलतान इब्राहीम लोदी ह्याचा संगराण्यानें अनेक वेळां पराभव केला होता. बाबरसारखा पराक्रमी पुरुष ह्याच संधीस त्याचा प्रतिस्पर्धी झाला नसता, तर ह्या संगाच्या हातून चितोडगड ही हिंदुस्थानची सार्वभौम राजधानी होण्याचा समय आला होता. भिलसा व चंदेरीपर्यंत माळव्याचा पूर्वभाग संगाच्या राज्यात होता. हिंदुस्थानांत येण्यापूर्वी बाबरचा व संगराण्याचा पत्र-

व्यवहार होऊन बाबरास मदत करण्याचें संगानें कबूल केलें होतें. जेणेंकरून दिल्लीच्या मुसलमानी सत्तेचा पाडाव होईल, तें करण्यास संगराणा झटत होता; आणि बाबर हा तयमूरप्रमाणें स्वारी करून परत जाईल असें त्यास वाटत होतें. म्हणून संगानें बाबरास मदत करण्याचें वचन दिलें. परंतु बाबरनें हिंदुस्थानचें बादशाही पद स्वीकारून येथेंच राहण्याचा निश्चय केला, तेव्हां आपल्या शेजारीं असला बलिष्ठ शत्रु राहूं देणें संगराण्यास बरें वाटलें नाहीं. बाबरच्या सत्तेस शाश्वती आली नाहीं, तोंच त्याचा पाडाव करावा ह्या उद्देशानें, संगानें आसपासच्या हिंदु राजांस मदतीस बोलावून युद्धाची जंगी तयारी केली. मारवाड व अंबरचे राजे त्यास भजत होते, इतकेंच नाहीं, तर ग्वाल्हेर, अजमीर, शिक्री, रायसेन, काल्पी, चंदेरी, बुंदी, गाग्रौन, रामपुरा, व आबू इत्यादि ठिकाणचे लहान मोठे राव, त्याच्या हाताखालीं राहून, त्यास मदत करण्यास तयार होते. त्याच्या शरिरावर मूर्तिमंत वीर्याची साक्ष भरपूर दिसत होती. भावाशीं लढून त्याचा एक डोळा गेला होता. दिल्लीच्या लोदी सुलतानाशीं लढतांना त्याचा एक हात तुटला असून, दुसऱ्या एका लढाईंत त्यास गोळी लागून तो एका पायानें पंगु झाला होता. त्याच्या शरिरावर तलवारभाल्यांच्या जखमांच्या ऐशीं खुणा दिसत होत्या. प्रत्यक्ष बाबरचे उद्गार असे आहेत, 'संगराण्याचा जो इतका लौकिक झाला आहे, तो त्यानें केवळ स्वपराक्रमानें मिळविला आहे.' सर्व रजपूत वीर हिंदूंचें नांव राखण्याकरितां संगाच्या छावणींत एकत्र झाले. सर्वांच्यासमोर उभें राहून संगराण्यानें त्यांजला उद्देशून प्रस्तुत आलेल्या संकटाविषयीं वीरश्रीयुक्त भाषण केलें. क्षात्रधर्मास अनुसरून व वाडवडिलांचे पराक्रम आठवून प्रत्येकानें ह्या प्रसंगीं बर्तावें, असा त्यांस त्यानें उपदेश केला. मुसलमानांचा पाडाव करण्याचा प्रसंग हाच आहे, ही संधि एकवार सांपडली, म्हणजे त्यांस आपलें डोकें फिरून वर काढितां येणार नाहीं, आणि सर्व देशभर हिंदुपद पादशाहीचा ध्वज फडकत राहील, अशा सर्व गोष्टी त्यानें त्यांस उत्तम प्रकारें समजावून दिल्या. हें भाषण संपल्यावर सर्वांनीं उत्तरादाखल त्याचा मोठा जयजयकार केला. संगराण्याकडूनच युद्धाचा उपक्रम झाला. मेवाड व दिल्ली ह्या राज्यांची हद्द बियाना नदी होती, ती ओलांडून रजपूत फौज दिल्लीकडे आली. तेव्हां बाबरास

NATIONAL ARCHIVES OF INDIA

मोठी धास्ती पडली. ह्या पूर्वी त्याचे सामने मुसलमानांशीं झाले होते. पण रजपुतांशीं लढण्याचा हा त्याचा पहिलाच प्रसंग. रजपुतांचें रणशौर्य तो ऐकून होता. म्हणून एवढ्या मोठ्या जमावाशीं सामना करण्याजोगें त्याचें सामर्थ्य नव्हतें. तथापि स्वस्थ बसून उपयोगी नाहीं, अशा समजुतीनें कशीबशी तयारी करून तो संगाबरोबर लढण्यास निघाला. त्याचे पंधराशें मुसलमान पुढें गेले होते, त्यांची रजपुतांनीं कत्तल उडविली. आग्र्यापासून दहा कोशांवर शिक्री म्हणून एक ठिकाण आहे, तेथें बाबरनें आपल्या फौजेचा तळ दिला; आणि आपली लढाईची सर्व व्यवस्था ठरविली. पानिपतच्यासारखे त्यानें आपल्या तोफखान्याचे गाडे सांखळीनें एकत्र बांधून त्यांच्या आश्रयानें मागें राहून लढण्याचा बेत ठरविला. दर दोन गाड्यांमध्यें पांच पावलें अंतर होतें. गाडे नव्हते तेथें खंदकांनीं मजबुदी केली. ह्या तयारींत पंचवीस दिवस गेले; आणि ती पाहून त्याच्या लोकांस बराच धीर आला.

शिक्री गांवास हल्लीं फत्तेपूर शिक्री असें म्हणतात. तेथून त्यानें रजपूत फौजेवर लहान लहान टोळ्या पाठविल्या. पण त्या सर्व पराभव पावून परत येऊं लागल्या. तेव्हां त्याची पांचांवर धारण बसली. त्याच्या बाजूचे मोठमोठे योद्धे कचरूं लागले. काबुलाहून आलेल्या एका ज्योतिष्यानें येऊन 'तुझा पराजय होणार,' असें त्यास सांगितलें. तेव्हां पश्चात्ताप पावून, तो ईश्वराची करुणा भाकूं लागला. आपण असें घोर पातक तरी काय केलें आहे, व त्याचें क्षालन कसें करावें, ह्याचा तो मनांत विचार करूं लागला. त्याला दारू पिण्याचा नाद फार असे. कुराणांत दारू पिण्याची सक्त मनाई आहे. हेंच आपलें घोर पातक असें समजून त्यानें इतःपर दारू प्यावयाची नाहीं असा उघडपणें निर्धार केला. दारू पिण्याचीं सर्व पात्रें त्यानें फोडून टाकिलीं; व जवळ असलेली दारू ओतून देऊन त्या ठिकाणीं ह्या गोष्टीच्या स्मरणार्थ एक भिक्षागृह स्थापन केलें. त्याचप्रमाणें सर्व मुसलमानांकडून शिक्याचा कर म्हणून एक कर घेण्यांत येत असे, तो त्यानें माफ केला. इतकें झाल्यावर आपल्या लोकांशीं उत्तेजनपर व जोरदार असें त्यानें भाषण केलें. 'भाई शिपाई हो! आजपर्यंत तुम्हीं केवढा सन्मान मिळविला, अनेक प्रसंगीं कसे विजय संपादन केले! काफर लोकांस भिऊन आपण पळालों, तर ते लोक आपणांस

काय म्हणतील ! न पळालों तरी आपण शत्रूंच्या हातून सुटत नाहीं. मनुष्य जन्मास आला कीं त्यास मरण हें आहेच; आणि एक दिवस हें दुःखमय जग सोडून आपणा सर्वांस गेलेंच पाहिजे. तर मग अब्रू घाल-वून जिवंत राहण्यापेक्षां कीर्ति करून मरणें काय वाईट! धर्माकरितां जीव देण्याची पाळी आली तरतेंही एक पुण्यच आहे. तर मग जिवांत जीव आहे तोंपर्यंत लढाईतून अपयश घेऊन परत फिरावयाचें नाहीं, अशी एकदिलानें शपथ घेऊं या.' त्याबरोबर सर्वांनीं एकदम कुराणावर हात ठेवून शपथ घेतली. इत्यादि सर्व प्रकार त्यानें आपल्या लोकांस उत्तम रीतीनें समजावून दिल्यावर, त्यांनीं जयघोष करून बाबरच्या म्हणण्यास रुकार दिला. दोहों बाजूंची पूर्ण तयारी झाली. पण हीं सैन्यें कांहीं दिवस समोरा-समोर छावणी देऊन स्वस्थ बसलीं; त्यामुळें बाबरास फायदा झाला. संगराण्यानें आरंभींच एकदम हल्ला केला असता, तर मुसलमानांची दाणादाण उडाली असती. बाबरास वेळ मिळून त्याला सर्व तयारी नीट करतां आली. मुसलमान आपण होऊन पुढें येतील, ह्या आशेवर संगराणा स्वस्थ बसला. जसजसे दिवस जात चालले, तसतसा तो बेफिकीर राहूं लागला. शिवाय उभयतांचा स्नेह जुळावा म्हणून आंतून तहाची वाटाघाटही चालू होती.

अखेरीस शनिवार तारीख १६ मार्च, सन १५२७ रोजीं सकाळीं साडेनऊ वाजतां मुसलमानांवर रजपुतांनीं हल्ला केला. युद्ध मोठ्या निकराचें झालें. मुसलमानांच्या तोफांपुढें रजपूत लोक पटापट मरूं लागले. चार दोन तास चांगली जोराची चकमक उडाल्यावर बाबरनें आपली नेहमींची शत्रूस घेरून घेण्याची युक्ति अंमलांत आणिली. अगोदरच त्यानें आपली फौज चंद्रकोरीप्रमाणें उभी करून रजपूत सैन्य लढाईच्या भरांत अगदीं अंगावर येतांच, एकदम दोनही कोरींनीं पुढें सरून त्याजवर झडप घातली, तेव्हां ते कोंडले गेले; आणि लगेच बाबरच्या तोफखान्यानें त्यांचा फन्ना उडविला. संध्याकाळ होतांच एकच गोंधळ उडाला, आणि भयंकर कत्तल झाली. रजपूत लोकांस पुढें जाणें दुर्घट झालें, तेव्हां ते मागें वळून मुसलमानांच्या अंगावर घुसून पळूं लागले. लगेच बाबरनें त्यांचा पाठलाग केला. येणेंकरून त्यास जय मिळाला. अगणित लोक रणांगणीं पतन पावले.

संगराण्यास जखमा लागून त्याचे मोठमोठे पराक्रमी साथीदार मारले गेले. याप्रमाणें चोहोंकडून संगराण्याची फार नुकसानी व नाश होऊन, वरतीं पराजयाचें अपयश घेऊन त्यास माघारें परतावें लागलें. तो मेवाडच्या डोंगरांत पळून गेला. मुसलमानांवर जय मिळविल्याशिवाय चितोड राजधानींत प्रवेश करावयाचा नाहीं; असा त्यानें निश्चय केला. पण हा निश्चय तडीस जाण्यापूर्वींच तो अरण्यवासांत मरण पावला, (सन १५३०). इकडे शिक्रीच्या लढाईत मुसलमानांनीं वीरश्रीनें उन्मत्त होऊन रणांगणांत सांपडलेल्या रजपुतांची शिरें कापून त्यांचे ढीग रचिले. या जयाचें द्योतक असें 'गाजी' हें नांव बाबरनें आपणांला घेतलें. आरबी भाषेंत 'गाजी' शब्दाचा अर्थ 'काफरांचें पारिपत्य करणारा' असा आहे. हें नांव मोगलवंशी बादशहांच्या सनदांत, शिक्क्यांवर व नाण्यांवर अखेरपर्यंत वापरण्यांत येत असे.

शिक्रीच्या ह्या लढाईच्या वृत्तांतावरून मागलि प्रकरणांत रजपुतांच्या पाडावाची जी मीमांसा केली आहे, तिच्यांतील बऱ्याच मुद्यांची सत्यता कळून येते. हरएक बाबतींत रजपुतांचा पक्ष प्रबल होता. तथापि प्रत्यक्ष लढाईची शिस्त म्हणजे समरांगणावरील फौजांच्या हालचाली ठरविण्याचें सेनानायकाचें कर एवढ्या एका बाबतींत संगराण्याहून बाबर फारच वरचढ होता. सुमारें एक महिनाभर संगराणा शत्रूच्या हल्ल्याची वाट पाहत स्वस्थ बसला हें ठीक ... नाहीं.

ह्या लढाईनंतर मेवाडच्या राण्यांनीं मोगल बादशहांविरुद्ध उघडपणें केव्हांही शस्त्र उचललें नाहीं. एका वर्षांत पानपत व शिक्री येथें दोन प्रचंड विजय मिळवून, अफगाण व रजपूत त्या दोनही शत्रूंचा पाडाव केल्यानें बाबरचा जम हिंदुस्थानांत चांगला बसला.

५. इतर शत्रूंचा पाडाव व मृत्यु, (१५३०).—संगराण्याचा पाडाव झाल्यावर रजपुतांत त्राण उरलें नाहीं. बाबरनें ठिकठिकाणीं आपलीं ठाणीं बसवून बंदोबस्त केला; आणि जे लोक स्वदेशीं जाण्यास इच्छीत होते, त्यांची एक टोळी करून त्यांस हुमायूनच्या हाताखालीं देऊन काबुलास पाठविलें. बदकूशानच्या सुभ्यावरही त्यानें हुमायूनचीच नेमणूक करून त्यास तेथें राहण्यास सांगितलें. इतःपर काबूल वगैरे प्रांत मोगल राज्याचा एक सुभा झाला, हें पुढें लक्षांत ठेविलें पाहिजे.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

शिक्रीच्या लढाईनंतर बाबरनें आपला वेळ राज्यांत स्वस्थता करण्यांत घालविला. तरी सभोंवारच्या प्रांतांत युद्धप्रसंग बंद पडले नव्हते. माळवा व बुंदेलखंड ह्यांच्या सरहद्दीवर चंदेरी नांवाचा किल्ला आहे. तो मेदिनीराय नामक एका रजपूत सरदाराच्या ताब्यांत होता. मेदिनीराय हा संग्राम्याचा मित्र होता. तो बाबरास शरण गेला नाहीं, म्हणून बाबरनें चंदेरीवर स्वारी केली, (ता. २० जानेवारी, स. १५२८). ह्या प्रसंगीं रजपूत लोक मोठ्या शौर्यानें लढले; आणि मुसलमानांपुढें आपला निभाव लागत नाहीं असें पाहून, बायकामुलांची कत्तल करून रणांगणांत घुसले; आणि ते पतन पावल्यावर किल्ला बाबरच्या हातीं आला. त्या वेळीं थोडे रजपूत लोक मेदिनीरायच्या वाड्यांत जमा झाले; एक मनुष्य आडवी तरवार धरून उभा राहिला, आणि इतरांनीं धावून येऊन, त्या तरवारीवर आपला शिरच्छेद करून घेतला. अशा प्रकारें जिवाची परवा न बाळगितां, आपल्याच हातानें ह्या लोकांनीं आपला अंत करून घेतला, हें पाहून बाबरास विलक्षण आश्चर्य वाटलें.

रजपुतांचा पाडाव झाला तरी बाबरास स्वस्थपणा मिळाला नाहीं. अफगाण लोक ठिकठिकाणीं जमाव करून होते, त्यांस हा मोगलांचा अंमल नको होता. आज तीनशें वर्षें अफगाणांनीं [illegible]लांचें कांहीं एक चालूं दिलें नव्हतें. बाबरास दिल्लीचें [illegible] मिळालें, तत्राप त्यास आपण हुसकून देऊं, अशी आशा वाट[illegible]. इब्राहीम लोदीचा भाऊ महंमूद बहार प्रांत काबीज करून बाबरशीं युद्ध करण्याकरितां काशीपर्यंत चालून आला. जौनपूरसुद्धां त्याच्या ताब्यांत गेलें. ही बातमी स. १५२९च्या जानेवारींत धोलपूर येथें बाबरास कळल्याबरोबर, लगेच आग्र्यास जाऊन त्यानें अफगाणांवर स्वारी केली. गंगेच्या उजव्या कांठानें स्वतः बाबर व डाव्या कांठानें त्याचा मुलगा अस्करी असे, अलाहबाद, चुनार, बनारस, गाजीपूर वरून बक्सार पर्यंत आले. त्याबरोबर अफगाण फौजा पळून गेल्या आणि त्यांचे बरेच सरदार बाबरास शरण आले. महंमूद लोदी बंगाल्यांत जाऊन तेथचा सुलतान नस्रतशहा ह्यास मिळाला. पुढें ह्या दोघांनीं फौजा जमवून बाबरशीं सामना करण्याची तयारी केली. तेव्हां त्यांजवर चाल करून बंगाल काबीज करणें बाबरास भाग पडलें. गोग्रा व घ भागीरथी ह्या नद्यांच्या संगमावर हा युद्ध प्रसंग झाला. बाबरच्या

NATIONAL ARCHIVES OF INDIA

तोफखान्यानें उत्कृष्ट काम केलें. त्याच्या तोफखान्यांवरील सरदार उस्ताद अली हा पुष्कळ वर्षें बाबरजवळ राहून चांगला कसलेला व वाकबगार होता. स. १५२९ च्या मे महिन्यांत सर्व फौजेनें भागीरथी ओलांडून गोग्रेच्या कांठीं तळ दिला. पुढें लगेच गोग्रा ओलांडून बाबर व अस्करी ह्यांनीं बंगालच्या फौजेची दाणादाण उडवून दिली; तेव्हां नसरतशहानें शरण येऊन बाबरशीं तह केला. हीच बाबरच्या आयुष्यांतील शेवटची मोहीम होय.

मृत्यु, (ता. २६ डिसेंबर, स. १५३०).—हिंदुस्थानांत आल्यापासून बाबरास वरचेवर ताप येऊं लागला; आणि त्याची प्रकृति हळू हळू क्षीण होत चालली. त्याच्या आजपर्यंतच्या वनवासांनीं त्याची शरीरकाठी अगदींच हलकी झाली होती. त्याचा वेळ एकसारखा बहुतेक प्रवासांत जाई. मार्च १५२९ त तो लिहितो, 'मी गंगानदींतून पलीकडे पोहून गेलों; त्यावेळीं मीं हात मोजले, ते तेहतीस भरले. थोडा दम घेऊन, मी लगेच पोहत अलीकडे आलों. समर्कंदपासून इकडे जेवढी म्हणून नदी मला लागली, त्या प्रत्येकींतून मी पोहून गेलेला आहें. फक्त गंगानदी राहिली होती, ती ह्या वेळीं संपविली. कित्येक सबंध दिवसरात्र त्याचे घोड्यावर जात. पुष्कळदां दररोज ऐशीं मैल मजल तो घोड्यावर करी.

स. १५२९ च्या डिसेंबर महिन्यांत आग्रा येथें बाबरनें एक मोठी गार्डनपार्टी दिली. त्या वेळीं समर्कंदपासून बंगालपर्यंतचे अनेक मोठमोठे सरदार हजर होते. त्यांची नांवनिशी दिलेली आहे. अनेकांनीं त्यास नजराणे आणिले, त्यांचा स्वीकार करून, व मोठमोठ्या देणग्या देऊन, सर्वांचा त्यानें परामर्ष घेतला. त्याची जन्मभूमि अंदिजान येथील अनेक लोक अगदीं लहानपणापासून हरएक संकटांत त्यास चिकटून राहिले होते, त्या सर्वांस उत्तम प्रकारचीं बक्षिसें देऊन मोठ्या गर्हिवरानें त्यांच्या उपकाराचें त्यानें प्रसिद्धपणें स्मरण केलें. ह्या प्रसंगीं कुस्त्या, हत्तींच्या टकरा व निरनिराळ्या प्रकारचे खेळ पाहुण्यांच्या करमणुकीसाठीं ठेविले होते. भोजनप्रसंगीं हिंदुस्थानांतील गारुडी व जादुगार खेळ करीत होते, ते पाहून बाबर व त्याचे पाहुणे फार खूष झाले. असले खेळ पूर्वी बाबरनें कधीं पाहिलेले नव्हते. हा सर्व प्रकार

आग्रा येथें घडला. दोन चार वर्षांचे अवधींत आग्रा शहरचें स्वरूप अगदीं पालटून गेलें. वाडे, बागा, विहिरी वगैरेंनीं शहरास नवीन शोभा आली.

समर्कंदचें राज्य काबीज करण्याच्या हेतूनें हुमायून मध्यआशियांत राहिला होता, पण तो हेतु सिद्धीस जाण्याचा संभव राहिला नाहीं, म्हणून एकदम बदकशान सोडून हुमायून बापास भेटण्याकरितां उतावळीनें आग्र्यास आला. त्याजबदलची खबर त्यानें अगाऊ दिली नव्हती. 'हुमायूनच्या आईशीं मी बोलत बसलों असतां, एकदम हुमायून येऊन दाखल झाला. त्याबरोबर आम्हा उभयतांस जो आनंद झाला, त्याचें वर्णन करितां येत नाहीं. त्याच्या येण्याबद्दल मीं अनेक मेजवान्या दिल्या आणि हुमायुनास फारच आदर व ममता दाखविली. हुमायूनचें संभाषण अतिशय मधुर व मोहक होतें. उत्कृष्ट गृहस्थास योग्य असेंच त्याचें वर्तन नेहमीं असे.' बाबरची हुमायूनवर प्रीति किती होती हें त्याच्या मरणसमयीं निदर्शनास आलें.

हुमायून इकडे आल्यावर कांहीं महिन्यांनीं संभळ येथें एकाएकीं आजारी होऊन त्यास बोटींतून आग्र्यास आणिलें. तेव्हां त्याचें दुखणें विकोपास जाणार असा सुमार दिसूं लागला. औषधानें कांहीं गुण यावयाचा नाहीं असें वैद्यांनीं सांगितलें, तेव्हां बाबरास अत्यंत दुःख झालें. शेवटीं आपल्या समजुतीप्रमाणें मनांत आलेला एक उपचार त्यानें करून पाहिला. आपलें आयुष्य दुसऱ्यास अर्पण करितां येतें, अशा समजुतीनें बाबरनें सर्वांसमक्ष, हुमायूनच्या बिछान्याजवळ, ईश्वराची करुणा भाकून निर्धारपूर्वक आपलें आयुष्य आपल्या मुलास दिल्याचा संकल्प केला, आणि तीन वेळां तो मुलाच्या बिछान्यासभोंवतीं फिरला. क्षणभर ध्यान लावून बसल्यावर त्यास स्फूर्ति झाली, कीं आपली विनंति परमेश्वराला रुजू झाली; आणि तो 'फत्ते फत्ते' म्हणून ओरडला. त्या वेळेपासून हुमायुनास आराम पडून बाबर क्षीण होत चालला. हिंदुस्थानांत त्यास अतोनात श्रम पडल्यामुळें अलीकडे त्याची प्रकृति अगोदरच ढांसळली होती. अखेरीस सन १५३० तारीख २६ डिसेंबर रोजीं आग्रा येथें बाबर मरण पावला. त्या वेळीं त्याचें वय अठ्ठेचाळीस वर्षांचें होतें.

६. बाबरची योग्यता.—बाबर हा हिंदुस्थान व आशिया ह्यांस जोडणाऱ्या सांखळींतील मध्यवर्ती दुवा होय. चंगीझखान व तयमूरलंग ह्यांजपासून मोगल व तुर्क जातीचें मिश्रण बाबरच्या ठिकाणीं उतरलें होतें. मोगलांचा कणखरपणा व तुर्कांचें साहस हे गुण त्यानें हिंदूंच्या बेफिकिरींत मिसळून दिले. हिंदुस्थानाशीं त्याचा संबंध शेवटच्या चार वर्षांतच कायतो जडला. त्यापूर्वींचें त्याचें सर्व आयुष्य मध्य-आशियांत खर्च झालें.

बारा वर्षांचा असतां बाप वारला, तेव्हांपासून मरेपर्यंत बाबरनें एकंदर छत्तीस वर्षें राज्य केलें. मध्यें अनेक प्रसंगीं त्याचें राज्य गेलें होतें. त्याची हिंदुस्थानांतील कारकीर्द जरी अगदीं थोडी आहे, तरी त्याच्या एकंदर चरित्रापासून नानातऱ्हेचा बोध घेण्याजोगा आहे. हा स्वतः विद्वान व रसिक असून, त्यानें आपलें आत्मचरित्र इत्थंभूत लिहून ठेविलें आहे. तें अत्यंत रसभरित व प्रत्येकानें वाचण्यालायक आहे. बाबरची खरी योग्यता ह्या चरित्रापासून कळून येते.

बाबरची आईही यूनस्खानाची मुलगी होती. हा यूनस्खान चंगीझखानाचा वंशज होता. 'बहुतेक स्वाऱ्यांत व युद्धांत ती मजबरोबर येत असे.' त्याच्या आईची आई हीही धूर्त व दृढनिश्चयी बायको होती. तिच्याइतकें 'शहाणपण व अक्कल दुसऱ्या बायकांत क्वचित् सांपडेल.' लहान वयांत असतां बाबरनें राज्यप्राप्तीसाठीं जे प्रयत्न केले, त्यांत ह्या दोन स्त्रियांच्या उपदेशाप्रमाणें बाबर नेहमीं चालत असे. महत्पदास चढण्यास मातेच्या बोधाची थोरवी विशेष गणिली आहे. शिवाजीचा उदय होण्यास कारण जिजाबाई होय. त्याचप्रमाणें बाबरच्या अंगीं सद्गुणारोप होण्यास वरील दोघी स्त्रिया कारण झाल्या.

हिंदुस्थानांत स्वस्थता झाल्यावर काबुलांतून आपला जनानखाना व नातेवाईक मंडळी बाबरनें आग्र्यास आणिली. जनानखान्यांत त्याच्या नात्याच्या शहाण्णव बायका आल्या. बाबरास पुष्कळ बायका होत्या; पण त्याची मुख्य राणी महामबेगम हुमायूनची आई हिजवर त्याचें प्रेम विशेष होतें. हुमायुनास तीन बहिणी होत्या; आणि त्याचे दुसरे भाऊ भिन्न राण्यांच्या पोटीं जन्मास आले होते. हिंदालची आई दीलदार

अगाचा म्हणून होती. आग्रा येथें दर शुक्रवारीं सर्व नातेवाइकांकडे व बायां मंडळीकडे जाऊन, बाबर त्यांस भेटत असे.

मागें सांगितलेला उलुघ्बेग ह्यास त्याचा मुलगा अब्दुल्लतिफ् मीर्झा ह्यानें ठार मारून समर्कंदचें राज्य बळकाविलें. पण त्यास तें फार दिवस उपभोगितां आलें नाहीं. अब्दुल्ला मीर्झा ह्यानें तें बळकावून दोन वर्षें चालविलें. त्याच्यामागून बाबरचा आजा अबू सईद् मीर्झा तख्तावर बसला. त्यानंतर त्याचा वडील मुलगा अहंमद मीर्झा याजकडे तें आलें. अहंमद मीर्झा सन १४९४ त वारल्यावर त्याचा धाकटा भाऊ महंमद मीर्झा समर्कंदचा बादशहा झाला. महंमद मीर्झाच्या मागून बायसंकर मीर्झा* तख्तावर असतां बाबरनें समर्कंदवर स्वारी केली. त्या वेळीं राज्यपदाची घालमेल किती वरचेवर होत असे, हें ह्या यादी-वरून उघड दिसतें. प्रत्यक्ष बाबरच्या पांच बहिणींतून दोघींस शत्रूंनीं पकडून आपल्या जनानखान्यांत ठेविलें. बाबरनें आपल्या चरित्रांत आपल्या सोबत्यांचें वर्णन दिलें आहे. एक सोबती साधा भोळा होता. मद्यपानाचे प्रसंगीं नाच करण्यांत तो फार प्रवीण असे. दुसरा होता तो चांगला धर्मनिष्ठ व सदाचरणी होता. त्याचें चातुर्य व बुद्धि हीं विशेष तारीफ करण्याजोगीं होतीं. मीर अली दुस्त म्हणून तिसरा एक सोबती होता; 'तो आमच्या आजीबाईचा नातेवाईक असल्यामुळें त्याजवर मीं पुष्कळ मेहेरबानी केली, परंतु त्यानें माझें कांडीचेंही काम बजाविलें नाहीं.' 'अमीर उमरबेग म्हणून माझा दुसरा एक स्नेही शूर, साधा व प्रामाणिक होता. त्याचा मुलगा हल्लीं मजजवळ आहे. परंतु तो अत्यंत आळशी व मूर्ख आहे. असल्या बापाच्या पोटीं असा मुलगा व्हावा!' 'अली शेरबेग नांवाचा एक गृहस्थ विद्वान् असून उत्तम काव्यें करी. बुद्धिमान व कल्पक मनुष्यांस उत्तेजन देणारा ह्याच्यासारखा

---

* मीर्झा शब्द फारशी आहे. तो फक्त राजघराण्यांतील पुरुषांस 'राज-पुत्र' ह्या अर्थी लावितात. ते तख्तावर आल्यावर पाठीमागें सुलतान हा शब्द लावूं लागले, उ० सुलतान महंमद मीर्झा. त्याच अर्थी 'अमीर' शब्द आरबी व 'खान' शब्द तुर्की आहे. खानाहून जरा खालचा तो 'बेग' होय. अकबरचा पालनकर्ता बहरामखान ह्यास प्रथम बहराम बेग असें म्हणत.

दुसरा मनुष्य इतिहासांत आढळत नाहीं. गवय्ये, चित्रकार व कवि नेहमीं त्याच्या आश्रयास येऊन राहत. त्याला बायकोमुळें नव्हतों, वृद्धापकाळ झाल्यावर ऐहिक पसारा सोडून, तो विद्येचें अध्ययन करीत एकांतवासांत राहिला.' अशा प्रकारचे बाबरचे सोबती होते. रोमचा प्रसिद्ध बादशहा मार्कस ऑरेलियस ह्यानें ज्याप्रमाणें जवळच्या मंडळीविषयीं आपला अभिप्राय लिहून ठेविला, त्याचप्रमाणें बाबरनेंही लिहून ठेविला आहे. विस्तारभयास्तव येथें ज्यास्त हकीकत देतां येत नाहीं.

बाबरनें सृष्टींतील प्रत्यक्ष घडामोडींच्या अत्यंत उपयुक्त पाठशाळेंत आपलें युद्धकलाप्राविण्य मिळविलें होतें. असें शिक्षण अगदीं तरतरीत असावयाचें हें सांगणें नकोच. एके प्रसंगीं त्याच्या लोकांनीं त्याच्या परवानगीशिवाय लूट केली. 'माझ्या लष्करांतील शिस्त इतकी कडक होती, कीं ती सर्व लूट मीं परत देवविली. दुसऱ्या दिवशीं पहिला पहारा संपण्याचे अगोदर लुटीपैकीं एक सुतळीचा तोडा किंवा सुईचा तुकडाहीं परत देण्याचा राहिला नव्हता.' पूर्वीं लढाईच्या प्रसंगीं निरनिराळ्या टोळ्या मर्जीस येईल त्याप्रमाणें हल्ला करीत, अगर वेगवेगळ्या लढत; सर्वांनीं एकमतानें व शिस्तवार लढण्याची पद्धत बाबरनें घातली. त्याचा उपयोग कसा झाला हें वरील युद्धप्रसंगांत दिसून आलेंच आहे. समर्कंद शहर बाबरच्या अत्यंत आवडीचें होतें. तीन वेळ तें त्याच्या हातांत आलें व तीन वेळ गेलें. त्याची रचना मोठी मोहक असून तेथें राहणें बाबरास फार आवडत असे. तेथचे रस्ते फरसबंदीनें बांधून काढिलेले होते. बुखाऱ्याचें मद्य व समर्कंदचीं खरबुजें हीं बाबरास फार आवडत. तो अनेक ठिकाणीं फिरला, परंतु समर्कंदचीं खरबुजें कधीं विसरला नाहीं. समर्कंदांतच बाबरनें कविता करण्याचा अभ्यास केला. त्या वेळीं चांगली पाठशक्ति असणें हें विद्वत्तेचें मोठें लक्षण समजलें जात असे. हिलाली कवि तीस चाळीस हजार कविता बिनचूक तोंडपाठ म्हणे. आम्हां हिंदु लोकांस ह्या पाठशक्तीचें विशेष माहात्म्य वाटणारें नाहीं. बाबरनें एक नवीन लिपी काढून ती प्रसिद्ध केली, त्याच तुर्क लिपींत तो आपल्या कविता व इतर ग्रंथ लिही. त्या लिपीस बाबरी लिपी असें त्यानें नांव दिलें. कविता करण्यांत तो फार कुशल व तरबेज होता. त्याचा मुलगा हुमायून काबुलास राज्य करीत असतां त्यानें कांहीं

कर्दनें करून बापास दाखविली. 'तुला दोन ओळींसुद्धां चांगल्या लिहितां येत नाहींत,' म्हणून बाबरनें त्याची फार निर्भर्त्सना केली.

बाबरचा शकुनांवर विशेष भरंवसा होता; एकदां एखाद्या दिवशीं लढाईंत पराजय झाला, म्हणजे त्या वारीं तो पुनः कधीं लढाई करीत नसे. शिवाय कोणत्याही कृत्यास हात घालतांना तो अगोदर मुहूर्त पाहत असे. एकदां बाबरवर असा बिकट प्रसंग आला होता, कीं फक्त दोन साथीदारांसह पळून जीव बचावण्याची त्यास पाळी आली असून, शत्रूंपैकीं दोन असामी त्याच्या पाठीवर होते. ह्या संकटांतून तो कसा सुटला, हें लिहिलेलें नाहीं. खुसूशहानें समर्कंद घेऊन बाबरास हांकून लाविलें, तेव्हां इराणांतील लोकांनीं त्यास मदत केली. त्यांच्याच मदतीनें त्यानें काबूलचें राज्य कमाविलें. हे इराणी लोक शिया पंथाचे असल्यामुळें समर्कंदकडील सुनी मुसलमानांस बाबरचें करणें आवडलें नाहीं. मग समर्कंद शहर स्वाधीन करून घेण्यास लागणारी सैन्याची मदत इराणी लोकांकडून त्यास न मिळाल्यामुळें, त्यास आपला मोर्चा हिंदुस्थानकडे फिरवावा लागला. त्याचा हाडवैरी शयबानीखान ह्याचा नाश मात्र इराणी लोकांच्या मदतीनें झाला. शयबानीच्या शरीराचे तुकडे करून ते आसपासच्या राजांकडे पाठविण्यांत आले. त्याच्या डोक्यांत पेंढा भरून तें कान्स्टांटिनोपलच्या तुर्क बादशहाकडे पाठविण्यांत आलें. त्याच्या कपाळाची कवची सोन्यानें मढवून इराणच्या शहानें मद्यप्राशनाच्या उपयोगीं आणिली. त्या वेळचें दुसरें प्रसिद्ध शहर हिरात तेंही बाबरकडे आलें. चंगीझखानाच्या वेळेस हिरातची लोकसंख्या पुष्कळ लाख होती. चंगीझनें त्या शहरास वेढा घालून लाखों लोक ठार मारिले. पुढें तें ओसाड पडलें. उल्लूखानानें सन १२३९त तें फिरून बांधिलें. बाबरच्या वेळेस तें चांगलें भरभराटींत होतें. 'हिरात शहरांत अनेक विद्वान् गृहस्थ आहेत, त्यांच्या बरोबरीचे विद्वान् पृथ्वीच्या पाठीवर दुसरे नाहींत. मुल्ला अब्दुर्रह्मान् जामी हा थोर व विद्वान् साधु पुरुष येथें राहतो. ह्या थोर पुरुषाचें गुणवर्णन करण्याचें माझ्या अंगीं सामर्थ्य नाहीं.' सन १५०७त हिरात शहरांत जे नामांकित कवि व कारागीर होते, त्यांचें वर्णन प्रसिद्ध पाश्चात्य विद्वान्

व्हांबेरी ह्यानें दिलें असून, त्यानें त्यांची केलेली तारीफ आपणास खरी-सुद्धां वाटणार नाहीं.

संकटांत असतांही बाबरनें कविता रचण्याचा नाद सोडिला नाहीं. 'मी दररोज सरासरीनें बावन कविता रचीत असें.' लष्करांतील लोकांची काळजी तो स्वतःच्या शरीरापेक्षां ज्यास्त घेई. एकदां हिंवाळ्यांत काबुलास जात असतां वादळ होऊन अतिशय बर्फ पडला. 'मी त्या बर्फांत लहानशा सत्रंजीइतका मोठा व छाती-इतका खोल खळगा खणून त्यांत बसलों. जवळच्या एका धर्मशाळेंत जाण्याचा कित्येकांनीं मला आग्रह केला. परंतु माझ्या शिपाई लोकांस तसेंच थंडीवाऱ्यांत सोडून, एकट्यानें निवाऱ्याच्या जागेंत जाणें ही अत्यंत बेइमानाची व शरमेची गोष्ट आहे, असें सांगून मी जाग्यावरून हाललों नाहीं.' नेपोलियन व शिवाजी ह्यांच्या अशाच अनेक आख्यायिका उपलब्ध आहेत. सर्व असामी सारखे लेखणें हें थोरपणाचें चिन्ह असून, महत्पदास चढणाऱ्या पुरुषाच्या अंगीं तर तें अवश्य असलें पाहिजे.

बाबरच्या अंगीं एक मोठा दुर्गुण होता. तो मद्यपानाचा नाद हा होय. लहानपणीं तो लाजाळू होता; पण अधिकार हातांत आल्यावर मंडळी जमवून तो खूब मद्यप्राशन करीत असे. आत्मचरित्रांत अशा प्रत्येक प्रसंगाची हकीकत तो मोठ्या कौतुकानें वर्णन करितो. हिंदुस्थानावरील स्वाऱ्यांत बाबरचें मद्यप्राशन फारच वाढलें. तो पक्का दारूबाज बनला. जरा कांहीं सुंदर देखावा दिसला, शेतें चांगलीं पिकल्याची बातमी आली, अथवा असेंच कांहीं यत्किंचित् कारण झालें, कीं दिवसभर मद्यप्राशनाचा तडाखा चाले. सकाळीं तेंच, दुपारीं तेंच, रात्रीं तेंच. अशांत त्याचीं पांचसात वर्षें गेलीं. शिवाय तो भांग घेत असे. काबुलांत असतां तो हरहंमेश शिकारीस जाई. ह्या वेळीं मद्यप्राशन विशेष चाले. ह्या त्याच्या नादामुळें त्याचें एखादें काम फसलें, असें मात्र कधींही झालें नाहीं; किंवा मद्यप्राशनाची दुसऱ्यावर त्यानें बळजबरी केली नाहीं. फत्तेपूर शिक्रीच्या लढाईंत त्यानें शपथ घेऊन मद्यप्राशन सोडून दिलें. पुढें त्यानें त्यास कधीं स्पर्श केला नाहीं.

सृष्टिसौंदर्य अवलोकन करण्याचा बाबरास अत्यंत आवड असे. काबूलकडील प्रदेश सृष्टिसौंदर्यानें अतिशय संपन्न आहेत. नाना प्रकारचीं फुलें, फळें व हरएक प्रकारचीं शोभिवंत झाडें तिकडे होतात. अशा सृष्टिवैभवाच्या अवलोकनापासून संतोष पावण्याची शक्ति बाबरचे अंगीं होती हें विशेष आहे. काबूलशहराबाहेर एका सुंदर टेंकडीवर त्यानें आपल्या करमणुकीसाठीं एक जलमंदिर बांधून, सभोंवार अर्धवान फुलांचे व सुंदर फळांचे बागबगीचे करून, ती जागा फार सुशोभित केली होती. काबूलनजीक एका टेकडीच्या पायथ्याशीं झुळझुळ वाहणाऱ्या ओल्याच्या कांठीं आपलें दफन करावें असें त्यानें ठरविलें होतें. कारण, मरणानंतरही सृष्टिसौंदर्यसंपन्न प्रदेशांत आपलें शरीर पडावें अशी त्याची उत्कट इच्छा होती. तदनुरूप बाबर व त्याचीं बायकामुलें ह्यांचा अंत्यविधि करण्यांत आला. शहाजहान बादशहानें सन १६४०त त्या जागेवर एक लहानशी टूमदार कबर बांधिली. अद्यापि त्या रमणीय स्थळीं काबूलचे लोक हवा खाण्यास व नवस करण्यास जातात.

सामान्यतः बाबरचा स्वभाव परोपकारी व गोड होता, तथापि अनेक प्रसंगीं त्याच्या अंगचें तुर्क स्वभावाचें क्रूर पाणी बाहेर दिसल्याशिवाय राहत नसे. अफगाण सरहद्दीवर त्यानें एकदां बंडवाल्यांची क्रूरपणानें कत्तल केली. तीन हजार लोक कापून काढिले. पुढारी लोकांचीं शिरें कापून काबुलास पाठविलीं; आणि बंडाच्या जागीं एक शिरांचा प्रचंड मनोरा रचिला. त्याजवर हिंदुस्थानांत विषप्रयोग झाला, तेव्हां असेंच क्रूर व भयंकर वर्तन त्यानें केलें. मुलांशीं मात्र त्याचें आचरण अतिशय ममतेचें असे. एका अर्थी त्यानें त्यांचे फाजील लाड केले असें म्हणण्यास हरकत नाहीं. हुमायूनच्या पुढील दुर्दशेचें कारण कांहीं अशीं हें ममतेनें वर्तनच होय.

बाबरास हिंदुस्थानांत एवढा विजय प्राप्त होण्याचें अंतस्थ कारण असें आहे, कीं त्यानें आपल्या फौजेस उच्च प्रतीचें लष्करी शिक्षण देऊन तींत उत्तम शिस्त व टापटीप ठेविली होती. धनुष्यबाण, भाले, खंजीर, गदा व कांहीं बंदुका, अशीं हत्यारें त्याच्या लोकांपाशीं असत. तोफखाना त्या वेळेस फार अवजड होता. उस्ताद अली-कुली ह्या नांवाचा त्याचा तोफखान्याचा कामदार होता. 'गंगेवरील पूल चालला असतां उस्ताद

कुलीनें तोफेचा मारा चांगला केला. पहिल्या दिवशीं त्यानें आठ वेळ तोफ सोडिली; दुसरे दिवशीं व पुढें दररोज तो दिवसांतून सोळा गोळे सोडीत असे.'

बाबरनें हिंदुस्थानांत बादशाही अंमल स्थापन केला, पण त्यास हा देश एकंदरींत आवडला असें त्याच्या लेखांवरून दिसत नाहीं. 'हिंदुस्थानांत उपभोगाच्या वस्तु मुळींच नाहींत; लोक देखणे नाहींत; त्यांना बुद्धि नाहीं; त्यांची ग्राहकता अगदींच कोती आहे; त्यांच्या रीतिभाती सभ्यपणाच्या नाहींत; अंगीं दया किंवा बंधुप्रेम नाहीं; कलाकौशल्याचीं कामें करण्याची त्यांना अक्कल नाहीं; कारागिरीविषयीं त्यांस कांहींच माहिती नाहीं; घोडे चांगले नाहींत; मांस चांगलें नाहीं; द्राक्षें, खरबूज, बर्फ, थंड पाणी, चांगलें अन्न किंवा यःकश्चित् मेणवत्तीचा दिवा ह्यांपैकीं कांहींच ह्या देशांत नाहीं. हिंदुस्थानचा मुख्य गुण काय तो हा, कीं देश मोठा असून सोन्याचांदीनें भरलेला आहे.' हें बाबरचें वर्णन वस्तुस्थितीशीं ताडून पाहिलें असतां विचित्र दिसतें. हें वाचतांना एक गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे, ती ही कीं, हें वर्णन बहुधा हिंदुस्थानांतील मुसलमानांसंबंधाचें आहे. काबूल, हिरात, समर्कंद, येथील मुसलमानांच्या वैभवांत मुरलेल्या बाबरास हिंदुस्थानांतील अफगाण मुसलमान आळशी, मिजासखोर व अशिक्षित वाटले ह्यांत नवल नाहीं. वरील उताऱ्याच्या खालींच अफगाण लोकांविषयीं त्यानें तिरस्कारबुद्धि व्यक्त केली आहे. अफगाणांशीं बाबरचें वांकडें होतें. ह्या गोष्टी ध्यानांत ठेविल्या म्हणजे वरील वर्णनाची यथार्थता जुळते. बाबरचें सर्व आयुष्य धामधुमींत व युद्धप्रसंगांत गेलें होतें. 'वयाच्या अकराव्या वर्षापासून माझे रमजानचे लागोपाठ दोन सण एका जागेंत गेल्याचें मला स्मरत नाहीं.' बाबरचीं कांहीं पत्रें उपलब्ध आहेत. एकांत त्यानें मुलाच्या गैरवर्तणुकीबद्दल कडक मजकूर लिहिला आहे; दुसरें एक त्यानें आपल्या काबूलच्या एका स्नेह्यास लिहिलें असून, त्यांत आपल्या जन्मभूमीचें दर्शन घेण्याची उत्कट इच्छा प्रदर्शित केली आहे.

ह्या एकंदर वर्णनावरून बाबर हा मर्दगडी व मोठा सभ्य गृहस्थ होता ह्यांत संशय नाहीं. थोरपणास उचित असे बहुतेक गुण त्याच्या अंगीं होते. धूर्तता, विद्वत्ता, मेहेनतीची आवड, महत्त्वाकांक्षा, औदार्य इत्यादि

नानाविध गुणांनीं तो युक्त होता. त्याच्या नशिबांतच भाग्योदय लिहिलेला होता. बाबरच्या आत्मचरित्राचा तर्जुमा करणारा मि. अर्स्किन् म्हणतो, 'आशियांतील सामान्य राजपुरुषांहून बाबर अगदीं भिन्न होता, हाच त्याचा लक्षांत ठेवण्याजोगा विशेष गुण आहे. मानवी प्राण्यांत नैसर्गिक म्हणून जें काय असावयाचें तें त्याच्यांत होतें. तो चलाख, ममताळु व साधा असून, मोठा अधिकार हातीं आल्यावरही हे त्याचे गुण कमी झाले नाहींत. इतर राजांसारखा तो डामडौली, थाटमाटाच्या नियमांनीं जखडलेला व दिखाऊ चांगुलपणा धारण करणारा असा नव्हता. कल्पकता व बहुगुणसंपन्नता ह्यांत त्याची बरोबरी करणारे थोडेच राजपुरुष सांपडतील. अकबरानें दूरवर दृष्टि देऊन उदार राज्यपद्धति घालून दिली, ह्यामुळें अकबरास पहिला मान मिळतो; कापट्यनीतींत औरंगजेबाची कीर्ति विशेष आहे; चंगीझखान व तयमूरलंग ह्यांनीं बाबरच्या शेकडोंपट मुलूख जिंकिला, म्हणून त्यांचीं नांवें स्मरणीय झालीं आहेत. परंतु मनाची तरतरी, विपत्ति येवो वा भाग्योदय प्राप्त होवो, दोनही स्थितींत मनाचें धैर्य ढळूं न देतां आनंदी व शांतवृत्ति धारण करणें, तसेंच राजपुरुषाच्या अंगीं सहसा न आढळणारा मनमिळाऊपणा, धैर्य, विद्याभिरुचि, आणि तिजमध्यें मिळालेली सिद्धि, इत्यादि गुणांमध्यें बाबरच्या वर बसवितां येईल असा दुसरा बादशहा आम्हांस आढळत नाहीं.'

बाबर दोन नियमांचा उल्लेख वारंवार करितो. ते दोन नियम डोळ्यांपुढें ठेवून तो वागत असे. 'विजय संपादावे व राज्यवृद्धि करावी, असा माझा मूळपासून हेतु असल्यामुळें, एकदोनदां पराभव झाला, म्हणून मी धीर सोडून स्वस्थ बसत नसें.' आणि दुसरा, 'मृत्यूनंतर कीर्तीस डाग लागेल, असें वर्तन शहाण्या मनुष्यानें कधींही करूं नये.' हे दोनही नियम प्रत्येकानें लक्षांत ठेवण्याजोगे आहेत. तत्कालीन परिस्थिति व कालाचें महदंतर ह्यांच्या योगानें होणारे फेरफार सोडून दिले असतां, रणधुरंधर, मुत्सदी, व विद्यासंपन्न अशा बाबरची तुलना जूलियस सीझरबरोबर करण्यास कांहीं अडचण नाहीं. उलट सीझरपेक्षां ज्यास्त अभिमान बाळगण्याजोगी बाबरची योग्यता

NATIONAL ARCHIVES OF INDIA

आहे. त्यानें हिंदुस्थानदेशांत मोगल बादशाहीची स्थापना केली. एकंदर चरित्रक्रमावरून पाहतां सर्व मोगल बादशहांमध्यें बाबर हा निःसंशय विशेष सन्माननीय आहे.

आमच्या महाराष्ट्रेतिहासांत बाबरची तुलना बऱ्याच अंशीं शिवाजीशीं करितां येण्यासारखी आहे. दोघांसही आरंभापासून अनेक अडचणी व संकटें आलीं. शत्रूंच्या कचाट्यांत सांपडण्याचे प्रसंग व त्यांतून युक्तीनें सुटका करून घेणें, ह्या दोनही गोष्टींचे अनुभव उभयतांस आले. मातृभक्ति व मातेच्या उपदेशानुसार वर्तन, आपणांस रात्रंदिवस मदत करणाऱ्या शिपाई लोकांचा परामर्ष स्वतःच्या जिवापेक्षां ज्यास्त घेणें, आणि लढाईंत आणीबाणीच्या प्रसंगीं जोरदार संभाषणानें लोकांच्या अंगीं वीरश्री उत्पन्न करून विजय संपादणें, इत्यादि गोष्टींत या दोन भिन्नकालीन पुरुषांचें निकट साम्य आहे. हिंदुस्थानांत आल्यावर बाबर फार दिवस वांचला नाहीं, म्हणून रयतेस सुख देण्यांत राज्य करण्याचें त्याचें कौशल्य शिवाजीप्रमाणें प्रगट झालें नाहीं. तसेंच स्वराष्ट्र व स्वधर्म ह्यांस ऊर्जितावस्था आणण्यास शिवाजीनें जिवापाड मेहेनत केली, पण तसे प्रयत्न करण्यास बाबरास सवड नव्हती. सामान्य रीत्या नवीन राज्य स्थापन करण्याच्या कामीं लागणारे अवश्य गुण दोघांमध्यें भरपूर होते. कोलंबसानें अमेरिका खंडाचा शोध लाविला त्यापूर्वीं दोन वर्षें, व वास्को ड गामा हिंदुस्थानांत आला त्यापूर्वीं सुमारें चार वर्षें, बाबर फरगाना येथें तख्तावर बसला. स्पेन देशांत फर्डिनंड व इझाबेला, आणि इंग्लंडांत सातवा व आठवा हेन्री हे त्याचे समकालीन राजे होते.

मि. ॲन्ड्रयू म्हणतो, 'मोगल असून दयावंत, मुसलमान असून परधर्मीयांशीं ममतेनें वागणारा, शूर, उदार, गरिबांचा कनवाळू, मातृभक्त पुत्र, अपत्यस्नेहयुक्त पिता, असा बाबर बादशहा, पूर्व व पाश्चात्य देशांत थोरपणाला अवश्य मानिलेल्या सर्व गुणांनीं संपन्न होता.' एकंदरींत बाबरसारखा वनवासांत व विपत्तींत मुरलेला पुरुष मोगल बादशाहीची टोलेजंग इमारत सुरू करण्यास सर्वथैव लायक होता.

बाबरच्या वेळेपासून हिंदुस्थानांत नवीन मन्वंतर सुरू झालें. झोटिंगपादशाही, जुलूम व धामधूम ह्यांचा अंत झाला. प्रजेच्या संबंधानें आपलें कर्तव्य काय आहे, हें राज्यकर्ते ध्यानांत बाळगूं लागले. रयतेवर

धर्माच्या बाबतींत जुलूम करण्यास आपणास अधिकार नाहीं असें ते समजूं लागले. अर्थात् अनेक प्रकारचा बोध घेण्याजोग्या राजनीतींतील गोष्टींच्या खल करण्याची इतिहासकारास पुढें सोय झाली. असा फरक एकदम होण्याचें कारण थोडेंसें गूढ आहे. अफगाण व मोगल ह्या दोन जातींतला अंतस्थ भेद हें त्याचें कारण होय. हा भेद पुढील इतिहासाची गुरुकिल्ली आहे. मोगल हे नांवाचे मुसलमान होते. प्रसंग पडेल त्याप्रमाणें ते शिया किंवा सुनी पंथ स्वीकारीत. अफगाण लोकांचा ते द्वेष करीत. अर्थात् हिंदु लोकांशीं स्नेह करून सुनी अफगाणांचा पाडाव करणें ते आपलें काम समजूं लागले. लष्करी जोरावर देश आपल्या ताब्यांत ठेवण्यापलीकडे अफगाणांचें लक्ष जात नसे. अफगाण लोक हे कट्टे धर्माभिमानी होते. ते बहुतेक सुनी पंथाचे असून, हिंदुलोक व हिंदुधर्म ह्यांचा अतिशय द्वेष करीत असत. त्यांच्या अनेक पोटजाति होत्या. त्या एकमेकांशीं शत्रुत्वानें वागत. म्हणून त्यांचा पाडाव करणें सुलभ जाई. आजपर्यंत जे मुसलमान सुल्तान झाले, त्यांचीं घराणीं वरचेवर पादाक्रान्त होत गेलीं ह्याचें अंतस्थ कारण हें आहे. तसेंच अकबराच्या राज्यकारभाराचें धोरणही ह्या कारणानेंच ठरलें गेलें.

बाबरच्या राज्याचा विस्तार पश्चिमेस मध्यआशियांतील अमूदर्या नदीपासून पूर्वेस आसामपर्यंत, आणि उत्तरेस सियालकोटपासून दक्षिणेस रतनभोरपर्यंत असून, त्याच्या राज्याचा वसूल सुमारें साडेसहा कोटि रुपये होता, (Talbot's Memoirs of Baber).

७. **बाबरचें आत्मचरित्र.**—बाबरच्या हातून मोगल बादशाही स्थापन झाली, म्हणून इतिहासांत त्याचें नांव चिरस्मरणीय झालें आहे, खरें, पण त्याच्या आत्मचरित्रामुळें त्याचें नांव वाङ्मयाच्या इतिहासांतही अजरामर झालें आहे. तो सुसंस्कृत होता. अनेकांच्या गुणदोषांवर त्यानें मार्मिक टीका केली आहे. त्यानें आपले लेख व कविता अनेक संकटांच्या प्रसंगांत व युद्धांच्या धांदलींत लिहिलेल्या आहेत. त्याच्या लेखांत मार्मिकपणा व सौरस्य ओतप्रोत भरलेलें आहे; केवळ युद्धांच्या व मोहिमांच्या शुष्क व नीरस हकीकतींनीं त्याचें आत्मचरित्र भरलेलें नाहीं. संसाराच्या अनेक प्रसंगांत पूर्णपणें कसलेला एखादा विद्वान व बहुश्रुत गृहस्थ ज्या प्रकारची टीका करील, तशीच बाबरची टीकासरणी

आहे. एच्. बीव्हरिज् म्हणतो, 'जगांतील कित्येक अप्रतिम लेखांत ह्या आत्मचरित्राची गणती होईल. गिबन, न्यूटन, रूसो इत्यादिकांचीं आत्मचरित्रें जशीं मनोरम आहेत, त्यांच्याच तोडीचें बाबरचें चरित्र आहे. आशियाखंडांतील वाङ्मयांत तर तें एकच्या एकच. पुढच्या भागाहून पहिले पहिले भाग चांगले झाले आहेत. ते पुनः पुनः वाचून मागाहून दुरुस्त केलेले असावेसे दिसतात. कित्येक ठिकाणीं कंटाळवाणा भाग आहे, नाहीं असें नाहीं, पण मधूनमधून चटकदार टीका असल्यामुळें, त्यांत एक प्रकारची बहार उत्पन्न झाली आहे. निर्भीड, प्रेमाळु, उत्साही, धैर्यनिश्चयादि गुणांनीं परिपूर्ण, नेहमीं आशेवर जगणारा व उल्लासी, असा बाबरचा स्वभाव त्यांत पावलोपावलीं दृष्टीस पडतो, आणि त्याजविषयीं मनाची आदरबुद्धि वाढत जाते. स्वतःच्या दुर्गुणांवर पांघरूण घालण्याचा त्यानें प्रयत्न केलेला नाहीं, म्हणून सत्याचें मूर्तिमंत चित्र मनांत उभें राहतें. ह्या कारणांस्तव बाबरच्या आत्मचरित्रास अपूर्व मान मिळणें योग्य आहे.

'मला शरण आला म्हणजे शत्रूला सुद्धां मी आपल्या कुटुंबांतल्या माणसाप्रमाणें वागवितों......ह्या माझ्या लिहिण्यांत स्वतःची प्रौढी मिरविण्याचा माझा उद्देश नाहीं. जें खरें खरें आहे तेवढेंच मी लिहितों. त्यांत मी आपली प्रौढी मिरवावी अशी माझी बिलकुल इच्छा नाहीं. ज्या गोष्टी घडल्या त्या मीं लिहिल्या आहेत. आजपावेतों एवढ्या लिहिण्यांत एक अक्षर सुद्धां सत्य सोडून मीं लिहिलेलें नाहीं. बाप असो कीं भाऊ असो, कोणाची भीड न धरितां, जें खरें तेंच मीं लिहिलें आहे. स्नेही असो कीं शत्रु असो, प्रत्येकाचे गुणावगुण अगदीं अत्यंत निष्पक्षपातानें मीं लिहिले आहेत, म्हणून माझ्या स्पष्ट लिहिण्याचा वाचकांनीं रोष मानूं नये.' मध्य-आशियांतील तत्कालीन राहणी, रीतीभाती, अंदाधुंदी, राजकीय उलाढाली इत्यादिकांविषयीं बरीच माहिती बाबरच्या पुस्तकांत आहे. लोक किती विश्वासघातकी होते, कोणाचा कांहीं निरोप आला तरी त्याजवर भरंवसा न ठेवितां, त्याविषयीं कशी खबरदारी ठेवावी लागे, अन्नाच्या द्वारा विषप्रयोग होण्याची भीति असल्यामुळें, आगाऊ अन्न चाखण्याचा बंदोबस्त किती करावा लागे, इत्यादि अनेक गोष्टी त्यावरून कळतात. बाबरचें आत्मचरित्र दिन-

चर्येच्या रूपाचें आहे. त्याची सुरुवात जून स. १४९४ त झाली. त्यांत मध्यंतरीं दोनतीन ठिकाणीं खळ पडलेला आहे. विशेषतः १५०८ पासून १५१९ पावेतों बारा वर्षांचा वृत्तान्त बिलकुल नाहीं. पुढें पुनः सुरुवात करितांना हा खळ पडण्याचें कारणही दाखविलेलें नाहीं. हें चरित्र तुर्की भाषेंत लिहिलेलें असून तें बोधप्रद व चटकदार आहे. बाबरचा चुलत भाऊ मीर्झा हैदर म्हणून होता, त्याच्या हातची ह्या आत्मचरित्राची एक प्रत, बाबरच्या मृत्यूनंतर दहाच वर्षांनीं लिहिलेली, उपलब्ध झाली. दुसरी एक प्रत हुमायूनच्या हातची, स. १५५३ त लिहिलेली सांपडली, तींत हुमायूनचा असा शेरा आहे, कीं '*ही प्रत बाबरनें स्वतः लिहिलेल्या प्रतीवरून मीं उतरून घेतली आहे.*' *पुस्तकांत हुमायूनवर कित्येक ठिकाणीं* जोराचा ताशेरा झाडलेला आहे, *ते भाग हुमायूननें आपल्या प्रतींत* गाळले नाहींत, ह्यावरून हुमायूनची प्रत भरंवसेलायक समजण्यास हरकत नाहीं. वरील दोनही प्रतींचा सर्वस्वी मेळ आहे. अकबरानें ह्या आत्मचरित्राचा तर्जुमा प्रथम फारशी भाषेंत करविला, (स. १५९०). पुढें स. १८२६ त वुल्यम अर्स्किननें त्याचें इंग्रजींत सुंदर भाषांतर केलें. पुढें फ्रेंच व इतर भाषांतही त्याचे तर्जुमे झाले. मोगलबादशाही नाहींशी झाली, मध्य-आशियांत सुद्धां मोगलांचें नांव ऐकूं येत नाहीं; तेथील तुर्क लोक रशियाच्या ताब्यांत गेले आहेत; सारांश, बाबरचा वंश नष्ट झाला असतांही, त्याचा हा चरित्रग्रंथ जशाचा तसा कायम असून त्यास कांहीं एक भंग नाहीं. बाबरचा इतिहास बराचसा ह्या आत्मचरित्रावरून व कांहीं भाग मीर्झा हैदरनें लिहिलेल्या 'तारीखी-रशिदी' नांवाच्या मोगलांच्या इतिहासावरून उपलब्ध झाला आहे. शिवाय आणखी अनेक मुसलमानी ग्रंथांत बाबरचा उल्लेख थोडा बहुत आला आहे. बाबरचीं दोन पत्रें हुमायुनास लिहिलेलीं उपलब्ध आहेत, त्यांतील उतारेः—'अडचणी सोसून संकटांत उडी घालण्याचे व शस्त्रास्त्रांनीं पराक्रम गाजविण्याचे हे तुझे दिवस आहेत. कोणतीही अडचण आली, तरी आपली शिकस्त करण्यास चुकूं नको. आळस व हयगय केल्यानें राज्य टिकत नसतें.

'तुझ्याशीं माझा एक वाद आहे. आज दोन तीन वर्षें तुझ्याकडून कोणीही मंडळी येऊन मला भेटत नाहींत. मी इकडून लोक पाठविले,

NATIONAL ARCHIVES OF INDIA

ते, अर्धे झालें, परत आले नाहींत. 'स्नेही मंडळी सोडून मला येववत नाहीं,' असें तूं वारंवार आपल्या पत्रांत लिहितोस, परंतु हें ध्यानांत ठेव कीं राजा होणें ही जेवढी कैद आहे, तेवढी दुसरी कोणतीही नाहीं. म्हणून जुने सोबती सोडून येववत नाहीं, हें म्हणणें तुला शोभत नाहीं.

'मी सांगतों म्हणून तूं मला पत्रें लिहितोस खरीं; पण तीं तूं कधीं फिरून वाचून पाहत नाहींस. कारण तीं वाचून पाहतास, तर अशीं पत्रें तूं कधीं लिहिलीं नसतींस. तुझें शेवटचें पत्र वाचण्यास मला किती तरी प्रयास पडले. तें अगदीं अस्पष्ट व अशुद्ध होतें. तुला शुद्ध लिहितां येतें, तरी कित्येक चुका होतातच. पत्रांत इतकी दुर्बोधता कशास पाहिजे ! तुझ्या शब्दांचा संदर्भ नीट लागत नाहीं, म्हणून अर्थ चटदिशीं ध्यानांत येत नाहीं. तूं पत्रांत आपली विद्वत्ता दाखविण्यास जातोस, म्हणून सर्व चुकतें. आतां इतःपर स्पष्ट लिहीत जा. संदिग्धता ठेवूं नको. साधे शब्द वापर. अशानें लिहिणारास त्रास नाहीं, व वाचणारासही नाहीं.

'फौजेची शिस्त व व्यवस्था अत्यंत काळजी पूर्वक ठेवीत जा. तुझें कुशल असो असें वारंवार चिंतून पुरे करितों.' गुरुवार, ता. १३ रवी.

दुसरें असेंच एक पत्र ता. १३ नोव्हेंबर स. १५२८ चें आहे. त्यांत बदक्शानप्रांतांत हुमायुनास मुलगा झाला, त्याबद्दल त्याचें अभिनंदन करून, समर्कंदचें राज्य परत मिळविण्याविषयीं त्यास आग्रह केला आहे. समर्कंदपासून बंगालपर्यंतच्या अफाट प्रदेशावर आपलें राज्य असावें अशी बाबरची फारच मनीषा होती. 'संकटास जुमानूं नको. वाटेल तसा प्रसंग आला तरी त्यांतून हिंमतीनें वागून आपला मार्ग काढीत जा. आळसानें व ऐषआरामानें राज्य टिकत नाहीं. भाऊ कामरान काबुलास कारभार करीत आहे, त्याजशीं गोडीनें वागून, तूं स्वतः तिकडे इतक्या लांब एकटा आहेस, याजबद्दल दुःख करीत राहूं नको. रोज दोन वेळ दरबार भरवून सर्वांच्या भेटी घेत जा. सल्लागारांची मसलत ऐकून तदनुसार वर्तन ठेव. फौजेचा बंदोबस्त नीट ठेव.'

प्रकरण एकतिसावें.

मोगलवंश.

नासिरुद्दीन महंमद हुमायून.

इ. स. १५३०–४० व १५५५–५६.

१. राज्यारोहण व चुका, (१५३०). २. गुजराथची स्वारी (१५३४-३५). ३. शेरखानचें बंड, पदच्युति, (१५३७-४०). ४. शेरशहा सूर, (१५४०–४५). ५. पुढील सूरवंशी सुलतान, (१५४५-५५). ६. हुमायूनचा वनवास, १५४०-५५. ७. मृत्यु व योग्यता, (स. १५५६).

१. राज्यारोहण व चुका, (स. १५३०).—प्रसिद्ध फ्रेंच प्रवासी बर्नियर ह्यानें शहाजहान व औरंगझेब ह्यांच्या कारकिर्दीचें वर्णन केलें आहे. त्या हुशार गृहस्थानें मोगलांच्या राज्यपद्धतींत एक शोचनीय दोष काढिला आहे, तो असाः—'ह्या राज्यांत एक घातुक प्रचार चालू होता. राज्यकर्ता मरण पावल्यावर त्याच्या मागून तख्तावर कोणीं बसावें ह्याविषयीं कांहीं ठरीव नियम नसे. त्यामुळें बळी तो कान पिळी, असा प्रकार दरवेळेस घडून येई.' बादशहा मेला, कीं त्याच्या मुलांत व इतर वारसांत तंटे लागत. ज्याची शक्ति ज्यास्त त्यास जय प्राप्त होऊन, इतरांची तो हवी तशी वाट लावी. ठार मारणें, डोळे काढणें, एखाद्या मजबूत ठिकाणीं जन्मकैदेंत टाकणें, कैफाचें वेड लावून राज्यकारभाराला नालायक करणें, अथवा मक्केच्या यात्रेस पाठविणें, इत्यादि नाना प्रकारच्या युक्त्यांनीं इतर हक्कदारांची वाट लागत असे. नवीन बादशहा स्वभावानें क्रूर नसला, तर तो अशा लोकांस दूरच्या प्रांतीं कामें देऊन ठेवी. परंतु त्या ठिकाणीं ते अनेक खटपटी करून बादशहास त्रास देत. म्हणून गादीस हक्कदार फार थोडे असत, तेव्हांच बादशहाची कारकीर्द विशेषतः भरभराटीची होई. उत्तरकालीन मोगल बादशहा हा प्रकार पूर्णपणें ओळखून, बहुधा सर्व हक्कदारांचा संहार करण्यास चुकत नसत.

बाबरास चार मुलगे होते. वडील मुलगा हुमायून. हिरातचा सुलतान हुसेन मीर्झा याच्या घरांतील मुलगी महाम बेगम इच्या पोटीं स. १५०५ त हुमायून जन्मला. ती जातीनें तुर्क होती. बाबरच्या दुसऱ्या मुलांचीं नांवें कामरान, हिंदाल व मीर्झा अस्करी अशीं होतीं. कामरान हा दुसट व विश्वासघातकी होता. बाबरचा मुलगा असा कसा निघाला ह्याचेंच आश्चर्य वाटतें. अस्करी व हिंदाल हे दोघेही पराक्रमशून्य असून प्रसंग पडेल तसें वागून वेळ मारून नेत असत. शिवाय दुसरे कित्येक चुलतबंधु हुमायुनास त्रास देणारे होते. मरणसमयीं बाबरनें हुमायुनास जवळ बोलावून सांगितलें, 'बाबारे, अल्लानें हें राज्यपद तुला दिल्यास, तूं आपल्या भावांस ममतेनें वागीव. त्यांस ठार मारून टाकूं नको.' ही बापाची शेवटची आज्ञा पाळण्याचें त्या कोमल अंतःकरणाच्या हुमायूननें लगेच कबूल केलें. बाबर मरण पावल्यावर हुमायून तख्ततशीन झाला. त्या वेळेस त्याचा भाऊ कामरान हा काबूलच्या सुभ्यावर होता. काबूलप्रांत बादशाही अंमलाखालीं राहवा, स्वतंत्रपणें तोडून देऊं नये, अशी बाबरची मनापासून इच्छा होती. काबूलच्या आसपास तुर्क, मोगल, अफगाण वगैरे जातींचे लोक राहत असून, त्यांच्यांतूनच बादशाही फौजेंतील लोकांची व विशेषतः वरिष्ठ अंमलदारांची भरती होत असे. हिंदुलोकांवर अगर हिंदुस्थानांतील अफगाण लोकांवर आपणास भरंवसा टाकितां येणार नाहीं; प्रसंगीं उपयोगी पडण्यास आपल्या जिव्हाळ्याचे व जन्मभूमींतलेच लोक पाहिजेत, हें बाबर चांगलें समजून होता. पण बाबरची शेवटची आज्ञा पाळण्याकरितां हुमायूननें कामरान यास काबूल व पंजाब हे दोन प्रांत स्वतंत्रपणें तोडून दिले. असें केल्याशिवाय त्यास गत्यंतर नव्हतें. हिंदाल यास अंतर्वेदींतला संबळप्रांताचा कारभार देऊन, मीर्झा अस्करी यास दिल्लीच्या दक्षिणेस मेवाटचें काम सांगितलें. त्यानें स्वतः बादशाही पद धारण केले, तथापि आपल्या लष्कराचें सामर्थ्य त्यानें कायम ठेविलें नाहीं. बाबरच्या चार वर्षांच्या कार्किर्दींत देशांत स्वस्थता झाली नव्हती, म्हणून हुमायुनास सर्वस्वी आपल्या फौजेवर अवलंबून राहवें लागणार होतें. परंतु अफगाणिस्तान हातचें गेल्यानें आपल्या फौजेचें सामर्थ्य वाढविण्याचें साधन त्याच्या हातांत राहिलें

नाहीं. येथें असलेली चांगली फौजें दिवसेंदिवस कमी होत गेली. हिंदुस्थानच्या उष्ण हवेंत राहून त्यांच्या अंगीं आळस व ऐष-आराम उत्पन्न झाला. शिवाय जी थोडी फौज हुमायूनजवळ होती, तीही सर्व त्यानें एकत्र ठेविली नाहीं. निरनिराळ्या प्रांतांत विभागून टाकिली. येणेंकरून त्याचा चांगुलपणा व अव्यवस्था त्याच्या नाशास कारण झाली. साधारण माणसांत मोठेपणा पावण्याजोगा हुमायूनचा स्वभाव होता. तो शूर व अकलवान होता. पण राज्यकर्त्यास लागणारा निश्चय व तडफ हे गुण त्याच्या अंगीं नव्हते. त्यानें आपल्या भावांचा आरंभींच नीट बंदोबस्त केला असता, म्हणजे पुढील अनर्थ बऱ्याच अंशीं टळले असते. जेव्हां तिघां भावांचा शेवट झाला, तेव्हांच हुमायुनास स्वास्थ्य प्राप्त झालें, पण त्याचा उपभोग घेण्यास तो पुढें फार दिवस वांचला नाहीं. गृहकलहांमुळें त्याचें सर्व आयुष्य विपत्तींत गेलें.

२. **गुजराथची स्वारी**, (सन १५३४–१५३५).—गादीवर बसल्याबरोबर तीन प्रकारचीं संकटें दिसत होतीं. एक त्याचा भाऊ कामरानची वायव्येकडील खटपट; पूर्वेस शेरखानच्या हाताखालीं अफगाणांचा जमाव; आनि गुजराथेंत बहादूरशहाचा उत्कर्ष. तडफातडफीनें एकएका संकटाशीं झुजून त्याचें निर्मूलन कायमचें करावें, तें हुमायूननें केलें नाहीं. एक गोष्ट तशीच अर्धवट टाकून तो दुसरी हातांत घेई. निश्चयानें जोराचें वर्तन न करितां, नेहमीं आळशी व ढिला राहून तो भांबावल्यासारखा होई. प्रथम हुमायुनास बुंदेलखंडावर स्वारी करावी लागली. कित्येक अफगाण सरदारांनीं कलिंजर किल्ला घेऊन बंड चालविलें. हुमायूननें स्वतः जाऊन तो किल्ला घेतला. नंतर तसाच पुढें जोनपुरावर जाऊन गोमतीच्या कांठीं त्यानें महंमूद लोदीचा पराभव केला, (सन १५३१). तों बनारसनजीक चुनारगड नांवाचा मजबूद किल्ला आहे, तो शेरखान नामक अफगाण सरदार व त्याचा मुलगा जलालखान बळकावून बसले आहेत, असें त्यास कळलें. हुमायूननें एकदम चुनारगडवर जाऊन किल्ल्यास वेढा घातला. चार महिनेपर्यंत वेढा पडल्यावर आपलें कांहीं चालणार नाहीं असें पाहून, शेरखान शरण आला. तेव्हां त्याच्याशीं ठराव करून चुनारगड किल्ला हुमायूननें त्याच्याच ताब्यांत परत दिला, आणि त्याच्या दुसऱ्या एका मुलानें बादशहाच्या पदरीं नोकरी धरिली. ह्या वेळीं

चुनारगड किल्ला हुमायूननें शेरखानाकडे ठेवावयाचा नव्हता. परंतु नेहमींच्या स्वभावाप्रमाणें मेहेरनजर करून शेरखानाकडे तो किल्ला सोंपवून बादशहा आग्र्यास परत आला, (सन १५३२). शेरखानाच्या बंडाव्याचा पुरा मोड त्यानें केला नाहीं. उलट बंगाल व बहार प्रांतांत त्याचेंच वर्चस्व कायम ठेविलें; आणि अशाच भानगडींत त्यानें गुजराथची स्वारी हातीं घेतली. हीच हुमायूनची पहिली मोठी चूक होय.

ह्या वेळीं गुजराथचें राज्य फार भरभराटींत होतें. तेथें बहादूरशहा राज्य करीत होता. सन १५२६ त तख्तनशीन झाल्यापासून त्यानें माळवा वगैरे देश जिंकून, आपल्या राज्याची मर्यादा पुष्कळ वाढविली. दक्षिणचे राजेसुद्धां त्यास करभार देऊं लागले. दिल्लीच्या बादशहाची तो पर्वा करीत नसे. इतकेंच नव्हे तर जिकडे तिकडे बंडावे उपस्थित करून व आंतून त्यास साह्य करून, बादशहाची खोड मोडावी, आणि मग बादशाही घशांत टाकावी असा बहादूरशहाचा अंतस्थ कावा होता. कदाचित् लोदी सुलतानास त्यानें मान दिला असता. कारण तो स्वतः गुजराथेंतून पळून गेला असतां, त्यास दिल्लीस लोदी सुलतानाकडे आश्रय मिळाला होता. तथापि तो आपल्या ठिकाणीं स्वस्थ बसता, तर हुमायून त्याच्या वाटेस गेला नसता. परंतु हुमायूनचा मेहुणा महंमद जमान मीर्झा हा त्याजविरुद्ध बंड करून गुजराथेंत पळून गेला. त्यास बहादूरशहानें आश्रय देऊन मुद्दाम मोठ्या सन्मानास चढविलें. त्याजबद्दल बोलाचाली चालू असतां, इब्राहीम लोदीचा चुलता अलाउद्दीन लोदी अफगाणिस्तानांत होता, तो एकाएकीं हिंदुस्थानांत आला, आणि हुमायूनशीं लढण्याकरितां मदत मागण्यासाठीं त्यानें बहादूरशहाकडे गुजराथेंत आपला मुलगा तातारखान यास पाठविलें. त्यास उघडपणें मदत देण्याची बहादूरशहाची छाती नव्हती; तरी त्यानें त्यास मुबलक द्रव्य दिलें. तेणेंकरून एक फौज तयार करून तातारखान दिल्लीवर चालून आला. तेव्हां बादशहाच्या हुकमानें हिंदाल ह्यानें बियाना येथें त्या फौजेचा पराजय करून तातारखानास ठार मारिलें. ह्या सर्व उद्दामपणाबद्दल बहादूरशहाची खोड मोडण्याकरितां बादशहा स्वतः गुजराथेवर चालून आला. त्या वेळेस बहादूरशहा चितोडगडास वेढा घालून बसला होता. अशा प्रसंगीं त्याजवर एकदम हल्ला करावा तर काफर जे हिंदू त्यांस मदत

केल्यासारखी होईल, म्हणून कांहीं दिवस हुमायून तशीच वाट पाहत स्वस्थ बसला. असें करण्यांत आपण आपलेंच नुकसान करून घेतों हें त्यास कळलें नाहीं. अशा प्रकारच्या थोर कल्पनांच्या नादांत हुमायूनचें नुकसान होत गेलें. पुढें बहादूरशहानें चितोडगड घेतल्यावर, मंदेसोर येथें त्याजवर हुमायूननें हल्ला केला, (नोव्हेंबर सन १५३४). बहादूरची सारी भिस्त तोफखान्यावर होती. त्याच्या तोफखान्यावर पोर्तुगीझ अधिकारी होते. परंतु हुमायूननें अन्नसामुग्रीची बंदी केल्यामुळें बहादूरचा निरुपाय होऊन तो मांडवगडास पळून गेला. तेथेंही हुमायून त्याच्या पाठीवर होताच; म्हणून बहादूरशहा पळाला तो खंबायतवरून दीव येथें पोर्तुगीज लोकांच्या आश्रयास गेला. हुमायूननें सर्व गुजराथ प्रांत काबीज करून चांपानेर किल्ल्यास वेढा घातला. हा किल्ला फार दिवस हातीं येईना. तेव्हां त्याच्या उभ्या कड्यांत लोखंडी गज रोंवून त्याजवरून तीनशें लोक आंत शिरले. प्रथम चाळीस लोक आंत शिरल्यावर स्वतः हूमायून ४१ व्या खेपेस वर चढून गेला. किल्ल्यांतील शिबंदी दरवाजाच्या बाजूस शत्रूच्या फौजेस तोंड देऊन लढत होती. मागल्या बाजूनें लोक आलेले पाहून किल्लेकरी घाबरले, आणि हुमायूनचे हातीं किल्ला आला. ह्या ठिकाणीं बादशहास बरेंच द्रव्य मिळालें. ह्या मोहिमेंत गुजराथ व माळवा हे दोन उत्कृष्ट प्रांत हुमायूनच्या ताब्यांत आले असतां, तेथें सर्व प्रकारचा बंदोबस्त करून आपला अंमल हुमायूननें कायम केला पाहिजे होता. पुढें बंगाल व बहारप्रांत हातचे गेले, त्या वेळीं ह्या गुजराथ व माळवा प्रांतांचा त्यास चांगला उपयोग झाला असता. पण हुमायूनच्या चालढकली स्वभावानें सर्व फसलें. धाकटा भाऊ मीर्झा अस्करी यास ह्या नवीन जिंकिलेल्या प्रदेशाच्या बंदोबस्तास ठेवून हुमायून आग्र्यास गेला; आणि खुशाल चैन करीत राहिला. इकडे त्याचाच किता अहंमदाबाद येथें अस्करीनें वळवून, उलट भावावर ताण केली. अस्करी चैनींत आला म्हणजे म्हणे, 'मीच सर्व बादशहा आहें.' अशा घमेंडींत सर्व गेलें. अहंमदाबादेस बहादूरशहाच्या पक्षाचे पुष्कळ लोक होते. त्यांच्या व पोर्तुगीझांच्या मदतीनें बहादूरनें परत येऊन आपलें राज्य काबीज केलें. अस्करी पळून गेला. पुढें बहादूरशहानें माळवाप्रांत सुद्धां जिंकून घेतला.

३. शेरखानचें बंड व पदच्युति, (स.१५३७-१५४०).—शेरखान पुढें हिंदुस्थानचा बादशहा झाला. यास्तव त्याचा थोडासा पूर्ववृत्तान्त समजणें इष्ट आहे. सूर म्हणून घोर प्रांतांतील लोकांची एक जात आहे, तींत शेरखानाचा जन्म झाला. त्याचा आजा इब्राहीमखान सूर हा पेशावर प्रांतांतील रोह् शहरीं राहत असे. बुद्दलोल लोदी दिल्लीस राज्य करीत असतां, इब्राहीमखान सूर नोकरी शोधीत त्याजकडे आला. बादशाही लष्करांत त्यास नोकरी मिळाली नाहीं. पुढें जोनपूरचा सुभेदार जमालखान यानें इब्राहीमखानास नोकरी दिली. इब्राहीमचा मुलगा हसनखान हा जोनपूरच्या राज्यांत पांचशें स्वारांचा असामदार होता. हसनखानास आठ मुलगे असून त्यांपैकीं दोन औरस होते. वडील मुलगा फरीदखान हा हुशार असल्यामुळें, त्याजकडे बापाचा सर्व कारभार आला. तरी बापानें एका राखेच्या नादीं लागून तिच्या पोटच्या सुलेमान नामक मुलास सर्व अधिकार सोंपविल्यामुळें, फरीदखान जोनपूरचें राज्य सोडून आग्र्यास आला, आणि तेथें त्यानें दौलतखान लोदीच्या पदरीं नोकरी धरिली. आज काल ज्याप्रमाणें विलायतेहून आलेल्या गौर-कायाचा नोकरींत मान असतो, आणि त्यास नोकरी सहज मिळते, त्याच-प्रमाणें मुसलमानी रियासतींत बाहेरच्या मुसलमानांस नोकरी मिळण्यास विलंब लागत नसे. इतकेंच नव्हे, तर असल्या परस्थ मुसलमानांची बादशाही लष्करांत नेहमींच जरूर असे. असो. फरीदखानास दिल्लींत आश्रय मिळून त्याचा अनौरस भाऊ सुलेमान ह्याची जोनपुरास तजवीज लागली. ही व्यवस्था थोडे दिवस चालल्यावर सुलतान इब्राहीमखान लोदी यास ठार मारून बाबरनें दिल्लीपद काबीज केलें. त्या घालमेलींत महंमदशहा लोहानी नांवाचा एक सरदार बहारप्रांत बळकावून बसला होता. त्यानें फरीदखानास आपल्या पदरीं ठेविलें. एके प्रसंगीं शिकारींत फरीदखानानें तरवारीच्या एका वारानें वाघ ठार मारिला; म्हणून त्यास शेरखान असें नांव प्राप्त झालें. त्याच नांवानें पुढें तो प्रसिद्धीस आला. परंतु जोनपूरचा सुभेदार महंमदखान सूर त्याच्या वाइटावर होता. त्यानें पुनः फरीदचा सर्व अधिकार काढून सुलेमान ह्यास दिला. तेव्हां शेरखानानें आसपासची कांहीं फौज जमवून बाबर बादशहाच्या नांवानें प्रांत जिंकण्यास सुरुवात केली. त्यानें लवकरच पुष्कळ मुलूख काबीज केला; आणि महंमदखाना-

करून जोनपूरचा कारभारही घेतला. हळूहळू उद्योग करून त्यानें पूर्वे-कडील अफगाण सरदारांत ऐक्य उत्पन्न केलें, आणि तिकडे बराच प्रांत ताब्यांत आल्यावर, महंमदखान सूर ह्यास जोनपूरचा अधिकार परत दिला. पुढें दिल्लींतील नवीन बातबेत पाहण्याकरितां शेरखान दिल्लीस गेला. मोगलांनीं बादशाही पद बळकाविलेलें त्यास रुचलें नाहीं. कांहीं तरी खटपट करून मोगलांस हिंदुस्थानांतून घालवावें, आणि अफगाण वंशाकडे फिरून बादशाही चालू करावी, असा त्याचा घाट होता. सर्व अफगाण सरदार एकविचारानें चालतील, तर ही गोष्ट अशक्य नाहीं असें त्यास वाटलें. एकदां बाबर बादशहाच्या तंबूत भोजनास आला असतां, त्यास सुरी मिळाली नाहीं, तेव्हां कमरेचा खंजीर काढून त्यानें आपलें काम भागविलें. हें बाबरनें पाहून म्हटलें, 'लहा-नशा गोष्टींत ह्या अफगाण सरदाराचा असा अपमान करूं नका. दैव-योगेंकरून त्यास एकादे दिवशीं महान् पद प्राप्त होईल.' पुढें बादशा-हाच्या मनांत आपणाविषयीं किंतु आला असें ताडून तो त्वरित निघून बंगाल्यांत गेला. तिकडे लवकरच बहारचा सुलतान महंमदशहा लोहानी मरण पावला. तेव्हां त्याचा बहुतेक सर्व अधिकार शेरखानास प्राप्त झाला. अफगाण लोक परोत्कर्षासहिष्णु असत. म्हणूनच त्यांच्या अनेक घराण्यांचा पाडाव झाला. शेरखानाचा उत्कर्ष बंगाल व जोनपूर येथील सुलतानांस सहन न होऊन, त्यांनीं शेरखानावर फौज पाठविली. पण शेरखानानेंच उभयतांच्या फौजांचा पराजय केला. त्यामुळें त्याचा अधिकार पुष्कळ वाढला. त्यानें चुनारगड[1] किल्ला आपणाकडे घेऊन तेथें उत्तम प्रकारचा बंदोबस्त केला. महंमदशहा लोदी हुमायूनवर उठलाच होता. तेव्हां असे अफगाण सरदार प्रबळ झालेले पाहून हुमायुनास चैन पडेना. कलिंजर किल्ला घेतल्यावर तो एकदम शेर-खानावर गेला. शेरखानाची व महंमदशहा लोदी यांची फौज एकत्र जमली होती. ह्या प्रसंगीं शेरखानानें महंमदशहास सोडिलें. अर्थात् हुमायूननें गोमतीच्या कांठीं एकट्या महंमदशहाचा तेव्हांच पराभव केला. नंतर हुमायूननें चुनारगड स्वाधीन करण्याविषयीं शेरखानाकडे मागणी केली. आरंभीं शेरखान कबूल होईना; परंतु बादशहा स्वतः चुनारगडा-वर फौज घेऊन येतो असें पाहून, शेरखान त्यास शरण गेला. आणि

आपला मुलगा बादशाही फौजेंत नोकरीस ठेवून, त्यानें चुनारगड किल्ला स्वतःचे देखरेखीखालीं मागून घेतला. ही हकीकत वर आलीच आहे. हुमायून गुजराथेंत गुंतला असतां, शेरखान व बादशाही फौजेच्या टोळीनें आधिपत्य मिळालेला त्याचा मुलगा, ह्यांनीं बंगाल व बहार हे दोनही प्रांत जिंकिले.

बादशहा गुजराथेंतून परत आल्यावर त्यास शेरखानच्या बंडाची हकीकत समजली. इकडे गुजराथेंत अस्करीचा पाडाव झाल्याची बातमी येऊन पुनः गुजराथेंत स्वारी करण्याचा प्रसंग आला तरी तूर्त गुजराथेंत न जातां प्रथम शेरखानावर चालून जाण्याचाच हुमायूननें निश्चय केला. पण ह्या विचारांत त्यानें आम्यास एक वर्ष फुकट घालविलें. बाबरची तडफ हुमायूनच्या अंगांत असती तर, दोनही कामें त्यानें फत्ते केलीं असतीं. सन १५३७च्या जुलै महिन्यांत तो शेरखानावर चालून गेला. शेरखान बंगालप्रांतांत गुंतला आहे असें पाहून, बादशहानें चुनारगडास वेढा घातला. तो किल्ला घेण्यास त्यास बरेच दिवस लागले. तरी शेरखान दूरच गेला. तो मुद्दामच नजीक आला नाहीं. तो शरण आल्यास जोनपूर सुद्धां पूर्वे-कडील सर्व प्रांतांचा कारभार त्यास देऊन आपण स्वस्थपणें परत जावें, असा हुमायूनचा विचार होता. इकडे शेरखानास स्वतःच्या जोरावर स्वतंत्र राज्य करावयाचें होतें; साधल्यास मोगलांस घालवून दिल्लीचें राज्य आपणच घेण्याचा त्याचा विचार होता. बहारप्रांतांतून बंगाल्यांत उतरण्याची राजमहालच्या डोंगरांत एक खिंड आहे, तींतून बादशहानें दूरपर्यंत जावें, त्याचा व मागील लोकांचा संबंध तुटावा, आणि नजीक आलेल्या पावसाळ्यामुळें बाहेर पडण्यास त्यास अवकाश सांपडू नये, अशी शेरखानाची मसलत होती. अखेरीस त्याचप्रमाणें झालें. रोठस किल्ल्यांत लूट, दारूगोळा, द्रव्य व इतर सामान बंदोबस्तानें ठेवून शेरखानानें राजमहालच्या खिंडींत मुलगा जलालखान ह्यास पाठविलें. स. १५३८ त हुमायून ह्या खिंडींतून बंगाल्यांत उतरला. त्यानें गौड शहर काबीज केलें. तथापि सर्व प्रांत शेरखानानें मुद्दामच उजाड पाडिला होता. तथापि अशा अडचणींत सुद्धां हुमायून बंगाल्यांत सहा महिने चैन करीत स्वस्थ बसला. इकडे पावसाळा सुरू झाला. गंगानदीस पूर येऊन सर्व प्रदेश जलमय झाला. बादशहा गौडनजीक तळ देऊन होता. पावसानें व

आजारानें त्याची फौज भराभर कमी होऊं लागली. त्याचा भाऊ हिंदाल परवानगीशिवाय त्यास सोडून आग्र्यास निघून गेला, आणि आपणास बादशहा म्हणवूं लागला. पावसाळा संपतांच शेरखानानें पाठीमागून येऊन मागच्या लोकांशीं बादशहाचें दळणवळण बंद केलें, आणि चुनारगड किल्ला परत घेतला. ह्या अडचणी हुमायुनास वेळेवर कळल्या सुद्धां नाहींत. शेरखानासारख्या वस्ताद शत्रूपुढें हुमायूननें इतकें बेफिकीर राहवयाचें नव्हतें. पुढें बादशाही फौज परत येऊं लागली. तिजवर छापा घालून मोंगीरनजीक शेरखानानें हुमायूनचा पराभव केला. शेरखानाच्या फौजेची व्यवस्था व लढण्याची टापटीप विशेष चातुर्यानें आगाऊ ठरवून ठेविलेली होती. कनोजच्या पूर्वेकडील सर्व प्रदेश त्याच्या ताब्यांत होता; आणि रोठस येथें त्यानें आपणास 'स्वतंत्र सुलतान' असें नांवही घेतलें होतें. शेरखानाचें धाडस ह्या रोठस काबीज करण्यांत दिसून आलें. चुनारगड बादशहापासून घेतल्यावर, शेरखानास आपलीं बायकामुलें व खजिना ठेवण्यास सुरक्षित अशी जागा पाहिजे होती. नजीकच रोठस नांवाचा एक किल्ला हरिकृष्ण नामक किल्लेदाराच्या ताब्यांत होता. त्यास शेरखानानें विनंति केली, कीं आमचा खजिना व बायकामुलें रोठस किल्ल्यांत ठेवून द्यावीं. हरिकृष्णानें तें कबूल केलें. शेरखानानें त्या किल्लेदारास फसविण्याची युक्ति केली. पालख्यांतून हत्यारबंद शिपाई पाठवून त्यानें हरिकृष्णास हांकून लाविलें आणि रोठस किल्ला घेतला. ह्या किल्ल्यांत मजबूद फौज ठेवून शेरखानानें बादशहाशीं टक्कर देण्याचा उद्योग केला.

इकडे कामरान हिंदालचें पारिपत्य करून तिकडेच राहिला. हे दोघे भाऊ वडील भावाच्या मदतीस न जातां परभारें त्याची दुर्दशा पाहत स्वस्थ बसले. हुमायूनचा नाश झाल्यावर शेरखान आपणावर उलटेल, अशी कल्पनाही त्यांस शिवली नाहीं. हळूहळू ह्या गोष्टी हुमायूनच्या कानांवर आल्या, पण तो डगमगला नाहीं. दोन महिने दोनही दळें एकमेकांसमोर छावणी देऊन राहिलीं. हुमायूननें एकदम हल्ला केला असता, तर कदाचित् शेरखानाचा पराजय झाला असता. पण तशी छाती कोणासच होईना. कांहीं दिवस तहाची वाटाघाट चालली. पण शेरखान हुमायुनास बादशहा कबूल करीना. अशा स्थितींत मे सन १५३९ त शेरखानानें बादशाही फौजेवर बक्सारनजीक हल्ला केला. हुमायून तवारीनें

२९-७-९-१०-७९१-२०००

नव्हता. त्याचा त्या लढाईत इतका नाश झाला, कीं त्याला पळून जाण्यासही सवड सांपडेना. गंगानदीवर होड्यांचा पूल तयार करण्याचें काम त्यानें चालविलें होतें, पण तें पुरें झालें नसल्यामुळें, जीव बचावण्यासाठीं पोहून जाण्याचा विचार करून, हुमायूननें आपला घोडा नदींत घातला. घोडा तर बुडून मेलाच, आणि स्वतःही बुडावयाचा; पण एका पखालजीनें हवेनें फुगविलेल्या आपल्या पखालीवर त्यास सांवरून पलीकडे नेलें. तेथून तो तडक आग्र्यास आला. बापाच्या वेळचें उत्कृष्ट सैन्य शत्रूंच्या तरवारीखालीं आणि नदीच्या पुरांत मरून गेलें. हुमायूनची राणी शेरखानाच्या हातीं सांपडली, तीस त्यानें सर्व इतमामानिशीं आग्र्यास हुमायूनकडे पोंचतें केलें.

शेरखानानें बादशहाचा पाठलाग केला नाहीं. पाठीमागें बादशहाची फौज होती, तिचा संहार करून त्यानें सन १५३९त बादशाही किताब धारण केला. आग्र्यास आल्यावर हुमायून फारच गोंधळांत पडला. त्याची सर्व फौज जायां झाली. पराभव पावल्यामुळें त्याचा दरारा नाहींसा झाला. त्याचा भाऊ हिंदाल हा त्याजवर उठला; अस्करीचेंही मन शुद्ध नव्हतें; कामरानही काबुलाहून त्याजवर चालून येण्यास निघाला. पण तितक्यांत स्थिरस्थावर करून हुमायूननें कसेंबसें भावांशीं ऐक्य केलें. शेरखान आग्र्याकडे आलाच नाहीं. बंगालप्रांतांत तो आपला अंमल पूर्णपणें बसवीत होता. इकडे बादशहास दम निघेना. सन १५४० च्या एप्रिल महिन्यांत फौजेची तयारी करून हुमायून पुनः शेरखानावर निघाला; तेव्हां शेरखानही बंगाल्यांतून तयारीनिशीं आला. कनोजनजीक उभय सैन्यांची गांठ पडली. हुमायूननें गंगेवर होड्यांचा पूल बांधून आपली फौज पलीकडे नेली, (२७ मे, १५४०). पण ह्या वेळची हुमायूनची फौज शेंडीस फुलें बांधून व बाबापुता करून जमविलेल्या भाडोत्री लोकांची बनविलेली होती. सर्व घाबरून गेलेले असून वेळ पडेल तसें वागणारे होते. अशांनीं निभाव कसा लागणार? एक बाण सुटतो न सुटतो, तोंच सर्वजण वाट फुटेल तिकडे सैरांवैरां पळून गेले, आणि कांहीं एक केल्याशिवाय शेरखानास जय मिळाला. सारांश, दुर्दैवानें ह्याही प्रसंगीं हुमायूनची पाठ पुरविली. आतां त्यास कोठेंच थारा राहिला नाहीं. त्याचा घोडा जखमी झाला व स्वतःही शत्रूंच्या हातांत सांपडावयाचा; पण तितक्यांत एका

NATIONAL ARCHIVES OF INDIA

च्याकरानें त्यास जवळ असलेल्या हत्तीवर बसविलें. तो हत्ती नदींतून पोहून पलीकडे गेला. तथापि पलीकडची दरड उंच असल्यामुळें बादशहा नदींतच बुडाला असता; परंतु कांठावरील दोघां शिपायांनीं बादशहास संकटात पडलेला पाहून आपलीं दोन पागोटीं एकापुढें एक गांठवून खालीं सोडिलीं; त्यांच्या आधारानें बादशहा वर आला. नंतर त्याचे भाऊ हिंदाल व अस्करी हे त्यास येऊन भेटले. तिघे मिळून त्वरेनें आग्र्यास पळत आले, आणि जेवढी चीजवस्त बरोबर घेतां आली तेवढी व कांहीं लष्कर बरोबर घेऊन त्यांनीं लाहोराकडे पलायन केलें. लाहोरास कामरान आपणास मदत करील अशी त्यांस आशा होती. सर्व भाऊ एकत्र भेटले, पण त्यांचें ऐक्य होईना. कामराननें त्यांस पुरें फसविलें. शेरखान हुमायूनच्या पाठीवर आलाच होता. कामराननें पंजाबप्रांत शेरखानास देऊन त्याच्याशीं सख्य केलें, आणि स्वतःचा बचाव करून तो काबुलास निघून गेला. हिंदालही वाट फुटेल तिकडे गेला. एकूण हुमायुनास लाहोर येथेंही थारा मिळाला नाहीं.

४. शेरशहा सूरची कारकीर्द, (स. १५४०–१५४५).—अखेरीस शेरखानानें आपल्या मनांतील उद्देश तडीस नेला. मोगल बादशहास हांकून देऊन त्यानें दिल्लीस अफगाण वंशाची पुनरपि स्थापना केली. त्यानें रोहतस किल्ला मजबूद पायावर नव्यानें बांधिला, आणि खवासखान नामक सरदारास तेथें ठेविलें. इतक्यांत बंगाल्यांतील त्याचा सरदार खिजरखान ह्यानें बंड केल्याचें वर्तमान कळल्यावरून स्वतः जाऊन त्यानें त्याचें पारिपत्य केलें, आणि बंगालप्रांताचे लहान लहान विभाग करून तेथें नवीन व्यवस्था केली. स. १५४२त मध्यहिंदुस्थानांत स्वारी करून त्यानें ग्वाल्हेर, रतनभोर वगैरे किल्ले घेतले. परत आल्यावर त्यानें प्रजेच्या हिताचीं अनेक कामें केलीं. सन १५४३ त त्यानें माळवा प्रांतावर स्वारी केली. रस्त्यांत त्यास असें कळलें, कीं रायसीनचा ठाकूर प्राणमल्ल ह्यानें पुष्कळ मुसलमान स्त्रियांस पकडून आपल्या जनानखान्यांत ठेविलें आहे. तें ऐकून शेरशहानें प्राणमल्लास आपणाकडे बोलाविलें; पण तो आला नाहीं. फक्त सहाशें हत्ती त्यानें पाठवून दिले. त्यावरून राग येऊन शेरशहानें रायसीनला वेढा घातला. त्या प्रसंगीं प्राणमल्लाचे लोक फारच शौर्यानें लढले. आपणाकडे असला एकसुद्धां शूर शिपाई नाहीं असें अफगाणांस वाटलें. शेरशहानें

निकराचे हल्ले केले. प्राणमल्लानें सहा महिने टिकाव धरिला. शेवटीं इलाज न चालून तो शेरशहास शरण गेला, आणि किल्ला स्वाधीन करण्यास कबूल झाला. तेव्हां लोकांची संपत्ति व हत्यारें आपण हिरावून घेणार नाहीं व बायकामुलांस त्रास देणार नाहीं, असें शेरशहानें त्यास वचन दिलें. त्यावरून प्राणमल्ल शहाच्या भेटीस आला. परंतु शेरशहाबरोबरच्या एका मुसलमान साधूनें त्यास सांगितलें, कीं काफरांस दिलेलें वचन पार पाडण्याची जरूर नाहीं. तेव्हां स्वाधीन झालेल्या त्या निरपराधी लोकांवर शेरशहानें फौज सोडून त्यांची कत्तल करविली. आपली कत्तल होणार असें प्राणमल्लास समजल्याबरोबर, रत्नावली नांवाची त्याची प्रियकर राणी होती, तिचा त्यानें स्वहस्तानें शिरच्छेद करून, इतर मंडळींसही त्यानें आपल्या बायकांचा शिरच्छेद करण्यास सांगितलें. तें करीत असतांच अफगाणांनीं हिंदूंची कत्तल केली. त्या प्रसंगीं स्वतः आपलें शूर पाणी दाखविण्यास रजपुतांनीं कमी केलें नाहीं. प्राणमल्ल स्वतः कापला गेला. प्राणमल्लची एक मुलगी व तीन मुलगे शेरखानाच्या हातीं सांपडले. त्यानें मुलीस गाणारणीचा धंदा शिकवून, मुलांचें पुरुषत्व हरण केलें. असा प्रकार रायसीन येथें झाला. (तारीखी–शेरशाही,–एल्यट, पु. ४). ही गोष्ट मुसलमानी शिपायांसही अत्यंत घोर वाटली. रायसीन भोपाळजवळ आहे.

थोडा वेळ दम धरून शेरशहा मारवाडांत गेला. त्या ठिकाणीं राजा मालदेव राज्य करीत होता. तो आपणांशीं अत्यंत निकारानें लढत आहे, असें पाहून, एक बनावट पत्र पाठवून त्याच्यांत आपसांत फूट उत्पन्न करण्याचा शेरशहानें प्रयत्न केला. राजा मालदेव, ह्यास तें कपट न उमजून तो युद्ध सोडून गेला. पण त्याचा सरदार कुंभ ह्यानें शेरशहाचा कावा जाणून समरांगण सोडिलें नाहीं. कुंभानें मालदेवाची पुष्कळ समजूत केली, पण त्याची खात्री होईना. अखेरीस एकट्यानें लढून रजपुतांचें नांव राखण्याचा कुंभानें निश्चय केला. शेरखानाजवळ ऐशींहजार फौज असून, कुंभाजवळ फक्त बारा हजार होती. रजपुतांनीं इतक्या निकरानें हल्ला केला, कीं शहाचा बहुतेक पराजय झाला. इतक्यांत शहास नवीन मदत आल्यामुळें रजपुतांचा दम सुटला. तेव्हां शेरशहानें पुष्कळांचा संहार केला. तथापि ह्या स्वारींत शेरशहास अतोनात नुकसान लागलें. 'मूठभर दाणे मिळविण्याच्या नादांत सर्व राज्य गमावण्याचा समय

आला होता,' असें त्यानें स्वतः बोलून दाखविलें. नंतर चितोडगडवर स्वारी करून शेरशहा रतनभोरास गेला; आणि तेथें त्यानें आपला मुलगा आदिलखान ह्यास ठेविलें. तेथून निघून त्यानें कलिंजरच्या किल्ल्यास वेढा घातला. हा किल्ला फार मजबूद होता. रायसीनच्या लोकांस शेरशहानें विश्वासघातानें फसविलें, ही गोष्ट ऐकून कलिंजरचा राजा स्वाधीन होईना. तेव्हां शेरशहा स्वतः किल्ला घेण्यासाठीं झटत असतां किल्ल्यांतील तोफेचा एक गोळा एकाएकीं शहाच्या दारूखान्यांत येऊन पडला. त्यामुळें सर्व दारूखाना जोरानें उडून त्यांत शेरशहा व त्याचे पुष्कळ सरदार ह्यांचा संहार झाला. संध्याकाळीं प्राण जाण्यापूर्वी किल्ला ताब्यांत आला असें शेरशहास कळलें, त्यामुळें समाधान पावून तो सायंकाळीं मरण पावला, (ता. २२ मे, सन १५४५). कलिंजर बांद्यानजीक आहे.

शेरशहानें पांच वर्षें राज्य केलें. त्याचा बहुतेक काळ लढण्यांत गेला. तरी प्रजाहिताच्या कामीं त्यानें दुर्लक्ष केलें नाहीं. बंगाल्यांत सोनारगांवापासून सिंधुनदीपर्यंत दोनहजार मैलांच्या अंतरावर त्यानें दरदोन मैलांस विहिरी व धर्मशाळा बांधिल्या. अशा विहिरींची संख्या पंधराशें होती. त्याचप्रमाणें रस्त्यावर मोठमोठ्या ठिकाणीं मशिदी बांधिल्या. रस्त्यांच्या दुतर्फा झाडें लावून लोकांच्या उपयोगासाठीं घोड्यांच्या टपाली त्यानें ठेविल्या. प्रवासी लोकांस रस्त्यांवर फुकट जेवण व पाणी मिळावें म्हणून मजले मजलेवर अन्नछत्रें घातलीं. सर्व राज्यांत वजनें व मापें ह्यांची एकच पद्धत चालू केली. रुपया हें चांदीचें नाणें प्रथम ह्यानेंच सुरू केलें असें म्हणतात. त्याचें एक तोळा वजन पुढें अकबरानें ठरविलें. भरज्वानींतच शेरशहा मरण पावला, नाहीं तर आणखी अनेक कामें करून त्यानें रयतेस सुखी केलें असतें. मोगल लोकांस आपण कायमचें हिंदुस्थानांतून घालवून दिलें असें त्यास वाटलें. उत्तरहिंदुस्थानांत त्यास कोणीच शत्रु उरला नव्हता. अफगाण घराण्यांतील राज्यकर्त्यांमध्यें शेरशहाचें नांव विशेष प्रसिद्ध आहे. रायसीनच्या लोकांची त्यानें क्रूरपणानें कत्तल केली, त्याशिवाय दुसरें क्रूरपणाचें कृत्य त्याच्या हातून घडलें नाहीं. बंगाल्यांत त्यानें पुष्कळ दिवस अंमल गाजविला; तरी तेथली बहुतेक प्रजा हिंदु असतांही, त्यांजविषयीं त्यानें धर्मद्वेष दाखविल्याचें दिसून येत नाहीं. तथापि मनांतील

हेतु तडीस जाण्याकरितां त्यानें अनेक प्रसंगीं विश्वासघात केला ही गोष्ट निर्विवाद आहे. युद्धकलेमध्यें तो विशेष प्रवीण होता असें दिसतें. हुमायूनबरोबर त्यानें दोन झगडे केले, त्यांत त्याच्या अंगच्या विशेष चतुराईमुळेंच त्यास यश आलें. वास्तविक म्हटलें तर मोगलांच्या बादशाही फौजेबरोबर टक्कर देण्याचें त्याचें सामर्थ्य नव्हतें. त्याची कुशलत हुमायूनचे अंगीं नसल्यामुळें हुमायून फसला. केवळ लष्करी चातुर्याच्या जोरावर बादशाही पद मिळविल्याचीं जीं उदाहरणें हिंदुस्थानच्या इतिहासांत आहेत, त्यांत शेरशहाचें नांव प्रमुखत्वानें आहे. बहारप्रांतांत सासिराम हें गांव शेरशहाचें मूळचें राहण्याचें ठिकाण होतें. तेथें नेऊन त्यास पुरिलें. त्याची भव्य मशीद अजून चांगल्या स्थितींत आहे. तिच्या सभोंवतीं एक मैल परिघाचा पाण्याचा खंदक असून, अफगाण पद्धतीच्या बांधणीचें हें काम सुरेख व पाहण्यालायक आहे.

शेरशहाच्या कारकिर्दीचा इतिहास पुढें अकबर बादशहाच्या हुकुमानें अब्बासखान सारवानी ह्यानें लिहिला. त्याचें नांव 'तारिखीशेरशाही' असें आहे. अब्बासखानाचें शेरखानाशीं नातें होतें. त्यानें इतिहास लिहिला, त्या वेळीं अफगाण व मोगल ह्यांचीं जबरदस्त भांडणें चालू असून मोगलांची सरशी होत चालली होती. अशा प्रसंगीं 'अफगाण लोकांची तरफदारी करून शेरशहाची विनाकारण फाजील स्तुति अब्बासखानानें केली आहे, आणि शेरशहाचा सर्व काळ युद्धांत गेल्यामुळें प्रजेच्या हिताकडे लक्ष देण्यास त्यास फुरसत सांपडली असेल हें संभवत नाहीं,' असें एतद्देशीय इतिहासकारांविषयीं अनिबार बेभरंवसा दाखविणाऱ्या व्हीलरचें म्हणणें आहे. शेरखान अतिशय क्रूर व विश्वासघातकी होता, असें ह्या आंग्ल इतिहासकाराचें मत आहे. वास्तविक रीत्या हीं दोन्ही मतें पक्षपाताचीं दिसतात. दोहींतही थोडाबहुत सत्यांश असावा हें निर्विवाद आहे.

५. पुढील सूरवंशी सुलतान. सलीमशहा सूर, (स. १५४५–१५५३). शेरशहास आदिलखान व जलालखान असे दोन मुलगे होते. वडील मुलगा आदिलखान ह्यानें आपल्या पश्चात् तख्तावर बसावें अशी शेरशहाची इच्छा होती, पण जलालखान ज्यास्त लोकप्रिय होता. त्यास्तव कलिंजरच्या किल्ल्यावर सरदारमंडळीनें राज्याभिषेक केला. तेव्हां-

पासून सलीमशहा सूर असें नांव धारण करून तो राज्य करूं लागला. आम्यास गेल्यावर सलीमशहानें आपला भाऊ आदिलखान ह्यास राज्य स्वीकारण्याविषयीं निमंत्रण पाठविलें. तो आल्यावर भावाभावांच्या भेटी आनंदानें झाल्या. पण लोक आपणास अनुकूल नाहींत असें पाहून, आदिलशहानें राज्यावरील आपला हक्क आपण होऊन सोडिला, आणि रजपुतान्यांत बियाना येथें जहागीर घेऊन तो स्वस्थ राहिला. खवासखान म्हणून शेरशहाचा मुख्य सेनापति व विश्वासु सल्लागार होता. त्याची वरील कृत्यास पूर्ण संमति होती. दोन महिने सर्व सुरळीत चाललें. पण सलीमशहाच्या मनांत भावाविषयीं अंदेशा उत्पन्न होऊन त्यानें कांहीं लोक बियानास पाठविले, आणि आदिलखानास सोन्याच्या बेड्या घालून आम्यास आणिलें. खवासखानास हें कळतांच त्यास सलीमशहाच्या विश्वासघाताचा तिरस्कार उत्पन्न झाला. त्यानें फौज घेऊन आदिलखानास मदत केली. उभयतां भावांची लढाई होऊन सलीमशहास जय मिळाला. आदिलखान पाटणाकडे पळाला, पण पाठलागाच्या भीतीनें तो तेथून कोणीकडे गेला तें कळलें नाहीं. खवासखानही रानोमाळ पळत होता. पुढें तो संबळचा सुभेदार ताजखान ह्याजकडे राहत असतां त्यास ताजखानानें ठार मारिलें, (सन १५५०). त्याचें शव दिल्लीस आणून पुरण्यांत आलें. खवासखानाविषयीं लोकांच्या मनांत विशेष पूज्यबुद्धि होती. त्याच्या कबरस्तानाजवळ जाऊन लोक त्यास भजत, असें फेरिस्ता म्हणतो.

सलीमशहानें नऊ वर्षें राज्य केलें. बापाबरोबर अनेक स्वाऱ्यांत काम केल्यानें त्याच्या अंगीं शौर्यधैर्यादि गुण आले होते. त्याची कारकीर्द एकंदरीत शांततेची गेली. त्यानें बापाप्रमाणेंच लोकोपयोगी अनेक कामें केलीं. बापानें टपालघरें बांधिलीं होतीं, त्यांच्या दरम्यान एक एक टपालघर ह्यानें ज्यास्त वाढविलें, आणि रस्त्यांवरून पोलिसचा उत्तम बंदोबस्त ठेविला. त्याची मेहेनत व दृढनिश्चय यांत कधींही अंतर पडलें नाहीं. जखमेस जळवा लाविल्या असतां काबूलच्या शहानें पंजाबावर स्वारी केल्याचें वर्तमान त्यास कळलें. तेव्हां ताडकन उठून संध्याकाळ होण्याच्या अगोदर सर्व फौजेसह तो मोठी मजल मारून गेला. बैल चरावयास गेले होते, त्यांची वाट न पाहतां मनुष्यांकडून त्यानें तोफखाना ओढून नेला. तो बरेच दिवस कांहीं विकारानें आजारी होता, आणि सन १५५३त

मरण पावला. त्याच वर्षी गुजराथचा सुलतान महंमूदशहा व अहंमदनगरचा सुलतान बुऱ्हाण निजामशहा हेही मरण पावले.

महंमदशहा सूर आदिली, (सन १५५३–१५५४).—भाऊ निजामखान सूर ह्याची मुलगी बिबीबाई इच्याशीं सलीमशहाचें लग्न झालें असून, तिच्यापासून त्यास फिरोजनामक एक मुलगा झाला होता. मुबारिझखान नामक बिबीबाईचा एक भाऊ होता. तो अल्पवयस्क फिरोजयास दगा करून आपण राज्य बळकावील, अशी भीति सलीमशहास होती. मुबारिझखानास मारून टाकण्याबद्दल अनेक वेळां सलीमशहानें बिबीबाईची परवानगी विचारिली. पण तिला ती गोष्ट पसंत पडली नाहीं. सलीमशहा मरण पावल्यावर त्यानें भाकित केल्याप्रमाणेंच गोष्ट घडून आली. मुबारिझखानानें आईच्या हातांतून मुलास ओढून आणून ठार मारिलें, आणि महंमदशहा सूर आदिली ह्या नांवानें तो राज्य करूं लागला. लहानपणापासून हलकट मंडळींत वाढला असल्यामुळें तो राज्य करण्यास अगदींच नालायक होता. त्यास लिहितां वाचतां कांहीं येत नव्हतें. सर्वकाळ हलकट व्यसनांत निमग्न असे. हिमू नांवाचा कोणी एक हुशार हिंदु व्यापारी होता. सलीमशहाच्या कारकिर्दीत त्यास बाजार दरोग्याची जागा मिळाली होती. त्यास अहंमदशहानें आपला मुख्य प्रधान केलें. त्यामुळें उद्दाम अफगाण सरदारांस आपली मानहानि झाली असें वाटून ते आपल्या धन्यावर उठले. हिमूनें मात्र आपल्या पुरस्कर्त्याची नोकरी इमानानें बजाविली. महंमदशहा सूरनें जे मूर्खपणाचे विलास भोगिले, त्यांचें वर्णन करणें अशक्य आहे. त्यानें सर्व संपत्ति हलकट कामांत उधळून दिली. राज्यांत जिकडे तिकडे दंगे चालूं लागले. इब्राहीमखान सूर म्हणून महंमदशहाचा एक मेहुणा होता. त्यानें दिल्लीचें राज्य बळकाविलें. तेव्हां महंमदशहा चुनारगड येथें पळून गेला आणि तेथें पूर्वेकडील प्रदेशावर राज्य करूं लागला. ह्याप्रमाणें राज्याचे दोन विभाग झाले. अहंमदखान सूर म्हणून महंमदशहाचा दुसरा एक मेहुणा पंजाबचा सुभेदार होता. तो फौज घेऊन दिल्लीवर आला. इब्राहीमशहानें आपलें सर्व सैन्य जमवून अहंमदखानाशीं टक्कर दिली. त्या वेळीं इब्राहीमखान पराजय पावून पळून गेला, आणि अहंमदखान सूर हा सिकंदरशहा असें

नांव धारण करून दिल्लीस राज्य करूं लागला. पण त्याचा उपभोग त्यास फार वेळ घेतां आला नाहीं.

इब्राहीमखान पळून काल्पीस गेला. तेथें हिमू हा महंमदशहाच्या तर्फेनें त्याजबरोबर लढण्यास फौज घेऊन आला. चुनारगड येथें त्यानें ही फौज उत्तम प्रकारें तयार केली होती. हिमूनें इब्राहीमखानाचा पराभव केला, आणि त्याचा पाठलाग करून त्यास बियानाच्या किल्ल्यांत कोंडिलें. पण इतक्यांत बंगालचा सुलतान महंमदशहा सूर ह्यानें महंमदशहा आदिलीवर हल्ला केल्यामुळें, त्यानें हिमूस तावडतोब परत बोलाविलें. इब्राहीमनें हा झगडा बरेच दिवस चालू ठेविला. अखेरीस सन १५६७ त अकबर बादशहानें पकडून त्याचा वध केला. हिमूनें आपल्या धन्यास मदत करून बुंदेलखंडांत बंगालचा सुलतान महंमदशहा सूर ह्याच्याशीं लढून त्यास ठार मारिलें. इतक्यांत हुमायूननें हिंदुस्थानांत परत येऊन सिकंदरशहा सूर याजपासून दिल्लीचें तख्त परत मिळविलें. त्याचा पाडाव करण्यासाठीं हिमू मोठी फौज गोळा करून दिल्लीवर चालून आला. अकबरानें बहरामखान ह्यास त्याजवर पाठविलें. तेव्हां हिमूचा पराभव होऊन त्यास देहान्त शिक्षा झाली, हा प्रकार पुढें अकबराच्या कारकिर्दीत सांगण्यांत येईल. हिमू पराक्रमी सरदार होता. तो आपल्या धन्यास कधींही विसरला नाहीं, किंवा त्याच्याशीं त्यानें कधीं बेइमान केलें नाहीं. तो मेल्यावर महंमदशहा आदिलीचा पक्ष अगदींच बसला, आणि शेवटीं बंगालच्या महंमदशहा सूरच्या मुलानें त्यास युद्धांत गांठून ठार मारिलें.

सिकंदरशहा सूर, (स. १५५४–१५५५).—सिकंदरशहास अफगाण सरदारांची चांगली मदत होती. पण त्यास तख्तावर बसविल्याबरोबर ते मानपानासाठीं आपसांत भांडूं लागले. फेरिस्ता ह्मणतो, 'ह्या वेळीं कलहाग्नि फिरून पेटला आणि त्याच्या ज्वाला बेसुमार भडकल्या.' हे कलह ताब्यांत ठेवण्याचें सामर्थ्य सिकंदरशहाच्या अंगीं नव्हतें. तो स्वतः शूर होता; पण राज्य करण्याची अक्कल नसल्यामुळें तो पेचांत सांपडला. इतक्यांत हुमायून परत आला. त्याला अडविण्यास सिकंदरशहानें आपली फौज पाठविली, तिचा पराभव झाला. पुनः तो स्वतः फौज घेऊन गेला. त्या वेळीं सरहिंदनजीक बहराम व अकबर ह्यांनीं त्याचा

पुनरपि पूर्णपणें पाडाव केला. तेव्हां तो डोंगरी प्रदेशांत पळून गेला. तेथून पुढें त्यानें कित्येक दिवस मोगलांशीं झगडा चालविला. पण त्याचा कांहीं एक उपयोग न होतां, त्यास अज्ञातवासांत मरण आलें. येथेंच ह्या सूर नामक शेवटच्या अफगाण वंशाची समाप्ति झाली. ह्या घराण्यांतील पुरुषांनीं पुनः कधीं वर डोकें काढिलें नाहीं. अफगाणांच्या क्रूर वर्तनाचा लोकांस फारच कंटाळा आला होता; आणि नवीन मन्वंतरास लवकरच प्रारंभ होऊन, त्यांच्या जाचांतून लोकांची सुटका व्हावी, असें ईश्वरी सूत्र होतें, त्या हकीकतीस आतां लागलें पाहिजे.

६. **हुमायूनचा बनवास, (स. १५४०–१५५३).**—राज्यपदास मुकल्यावर हुमायून पंधरा वर्षें बाहेर राहून दिवस कंठीत होता. ह्या वनवासाची हकीकत जितकी हृदयद्रावक आहे, तितकाच तिजवरून त्याचा दुर्बल, अनिश्चित व थंड स्वभाव व्यक्त होतो. बाबरालाही पुष्कळ वर्षें अशींच कंठावीं लागलीं, पण बाबराच्या अंगीं जें प्रखर पाणी त्या वेळेस दिसून आलें, तें हुमायुनांत नव्हतें. आपल्या हेतूच्या पाठीस तो जोरानें व तडफेनें लागला असता, तर त्याचीं इतकीं वर्षें फुकट गेलीं नसतीं. एक काबूल घेऊन कामरानचा बंदोबस्त करण्यांत सात वर्षें गेलीं. प्रथम चैन व मग उद्योग हा त्याचा नेहमींचा क्रम दिसून येतो. ही हयगय हुमायूनच्या खालील ठोकळ कालक्रमावरून कळून येईल.

स. १५३१ लोदीचा पाडाव; १५३४–३६ माळवा, गुजराथ;
१५३७–४० बंगाल बहार; १५४० लाहोरकडे पलायन;
१५४१–४२ हमीदाशीं लग्न, आणि सिंधरजपुतान्यांतील संकटें;
१५४३ कंदाहारकडे पलायन; १५४३–४४ इराणच्या शहाकडे प्रयाण.
१५४४–४५ कंदाहार काबूल; १५४६–५३ काबूल व कामरान.
१५५४–५५ पुनः हिंदुस्थान; १५५६ मृत्यु.

लाहोरास आश्रय मिळाला नाहीं, तेव्हां पुढें काय करावें हें हुमायुनास सुचेना. सिंधप्रांत तयमूरनें जिंकिलेला होता. कदाचित् तेथें आपणास थारा मिळेल, ह्या आशेनें हुमायून तिकडे गेला. रस्त्यांत हिंदालच्या मुक्कामावर तो कांहीं वेळ थांबला. खुरासान प्रांतांत राहणारा शेख अली अक-

बर जामी म्हणून हिंदालचा गुरु तेथें होता, त्याच्या मुलीवर हुमायून लुब्ध झाला. ती चौदा वर्षांची होती. तिचें लग्न अगोदर दुसरीकडे ठरलें असतांही हुमायूननें तिच्याशीं लग्न लाविलें, (१५४१.) हीच अकबरची आई हमीदाबानू होय. हिंदाल यानें आपल्या भावास बरेच दिवसपर्यंत थारा दिला नाहीं. सिंधप्रांत हुसेन अर्घून याच्या ताब्यांत होता; तो आपल्याला मदत करील ह्या आशेवर हुमायून त्याजकडे गेला. पण अर्घूननें त्याचा सत्कार न करितां आपल्या प्रांतांतून त्यास घालवून दिलें.[१] तेव्हां दुर्गम वाळवंटांतून तो जोधपुरास राजा मालदेव याजकडे जाण्यास निघाला. ह्या वाळवंटांत त्याचे अतोनात हाल झाले. पाण्यावांचून त्याचे लोक पटापट मरूं लागले. शेवटीं अतिसंकटानें तो जोधपुरास पोंचला, पण तेथेंही त्याची निराशाच झाली. मालदेवच त्यास पकडून ठेवणार होता. हें समजल्यावर तो पुनः परत सिंधुनदीकडे येऊं लागला. तो प्रदेश जळजळीत वाळूचा होता. रस्त्यांत मुळींच वृक्ष नसून थेंबभर पाणीही मिळण्यासारखें नव्हतें. कित्येक ठिकाणीं दरोडेखोर वगैरे लोकांची वस्ती होती, तेथें एखादी खोल विहीर असावयाची, पण तींतील पाण्याचें रक्षण करण्यास मोठमोठ्या टोळ्या बसलेल्या असत. हुमायूनचे लोक पाणी आणण्यास जात, तेव्हां त्यांची त्या टोळ्यांकडून दाणादाण होऊं लागली. शिवाय हुमायूनच्या बरोबर घोडे, उंट, व मोठा जनानखाना होता. त्याच्या बायकोची प्रसूति नजीक आली होती. ते लहान लहान मजला करीत चालले. श्रमानें, तहानेनें व युद्धांत पडून त्याचे बहुतेक लोक प्राणास मुकले. इतक्यांत जोधपुराहून स्वारांची एक टोळी त्याचा पाठलाग करीत आली. प्रत्यक्ष हल्ला न करितां त्यांनीं हुमायूनच्या लोकांचें दाणापाणी बंद करण्याचा प्रयत्न केला. हुमायून कांहीं जिव्हाळ्याच्या मंडळीसह तसाच पुढें चालला. पण अशा प्रकारें निभाव लागत नाहीं, असें पाहून त्यांनीं लढून मरण्याची तयारी केली. तेव्हां त्या पाठलाग करणारांस बादशहाची दया येऊन त्यांनीं त्यास पुढें जाऊं दिलें, आणि अन्नपाण्याची थोडीशी सोय केली. पुढें नानातऱ्हेचे हाल होऊन फक्त सात लोकांनिशीं तो उमरकोटास येऊन पोंचला. उमरकोटचा मजबूद किल्ला एकांतवासांत आहे. तेथचा अंमलदार राणाप्रसाद यानें त्यास उत्तम प्रकारचा आश्रय दिला. ह्याच ठिकाणीं तारीख १४

ऑक्टोबर सन १५४२ रोजीं हमीदा राणी प्रसूत होऊन पोटीं मुलगा झाला. तोच प्रसिद्ध अकबर बादशहा होय. मुलाच्या जन्माची बातमी त्यास जासुदांनीं सांगितली. तेव्हां त्यांस बक्षीस देण्यास त्याजपाशीं कांहीं नव्हतें; म्हणून जवळ असलेली कस्तुरीची डबी उघडून ती त्यानें लोकांस वांटून दिली आणि म्हणाला, 'ह्या कस्तुरीच्या वासाप्रमाणें ह्या मुलाची कीर्ति जगभर पसरो.' मुलाचें नांव जलालुद्दीन महंमद अकबर असें ठेविलें.

उमरकोटच्या राण्याकडून मदत घेऊन हुमायूननें सिंधप्रांत काबीज करण्याचा पुनरपि प्रयत्न केला. इतर हिंदु राजे त्यास येऊन मिळाले, आणि त्याजपाशीं एकंदर पंधराहजार फौज जमली. पण हुसेन अर्घूनचें त्याच्या हातून कांहीं एक वांकडें झालें नाहीं. हुमायूनच्या कित्येक मोगल लोकांनीं उद्दामपणाचें वर्तन करून राणाप्रसाद याचा अपमान केला. म्हणून तो राणा व दुसरे जमलेले साथीदार हुमायुनास सोडून गेले. तेव्हां हुसेन अर्घूनबरची स्वारी सोडून हुमायून कंदाहारकडे निघाला. हुमायून येथून जाईल तर बरा असें राणाप्रसाद यास झालें होतें; म्हणून त्यानेंही सर्व तजवीज लावून त्याची रवानगी करून दिली. येणेंप्रमाणें हिंदुस्थानच्या राज्याची आशा सोडून ह्या मोगल बादशहास हद्दपार व्हावें लागलें.

ह्या वेळीं कंदाहारचा कारभार कामरानच्या वतीनें मीर्झा अस्करी ह्याजकडे होता. अस्करी यास फितवून आपणाकडे घ्यावा, आणि आपण कंदाहारास राहून पुढील उद्योग करावा, असा बेत करून हुमायून तिकडे जावयास निघाला. कांहीं मजल गेल्यावर कंदाहार सुमारें शंभर सवाशें मैल दूर राहिलें असतां हुमायुनास कळलें, कीं अस्करी हा फौज घेऊन आपणाशींच लढण्यास त्वरेनें येत आहे. हें ऐकतांच त्यानें इराणचा रस्ता धरिला. पळण्यास विलंब लागेल, म्हणून अकबरासही त्यानें रस्त्यांतच ठेविलें. बायकोस मात्र हुमायूननें आपणाबरोबर घेतलें. मीर्झा अस्करी आला तों हुमायून निघून गेला होता. अकबर त्यास सांपडला. अस्करीनें त्यास सुरक्षितपणें कंदाहारास नेऊन, तेथून कामरान याजकडे काबुलास पाठविलें. अकबरास जेव्हां अस्करी घेऊन चालला, तेव्हां हुमायूनच्या एका राजभक्त नोकरानें पहारेकऱ्यांस पैसे देऊन मुलास सोडवून हुमायून-कडे नेण्याचा विचार केला. परंतु पहारेकऱ्यांनींच विचारांतीं असें ठरविलें, कीं येणेंकरून कदाचित् मुलाच्या जिवास अपाय होईल; हुमा-

यूनच्या कांहीं तरी अंतस्थ हेतु असल्याशिवाय तो आपल्या मुलास अशा स्थितींत टाकून जाणारा नव्हे. पुढें त्या नोकरानें इराणांत जाऊन मुलाच्या सुखरूपतेची वार्ता हुमायुनास कळविली.

इराणांत ह्या वेळीं शियापंथी सूफी शहा तह्मास्प् राज्य करीत होता. तह्मास्प्चा बाप इस्माईल ह्यानें इराणांत शियापंथाची स्थापना केली. तुर्क लोकांनीं सन १४५३ त रोमन बादशाहीचा पाडाव करून युरोपांत मुसलमानी राज्य स्थापिलें, हें मागें सांगितलेंच आहे. सन १५१६ त कांस्टांटिनोपलचा बादशहा पहिला सलीम ह्यानें इजिप्ट देश जिंकिला, आणि तेथील आब्बसी वंशाचा खलीफा मूतवकिल याजपासून खिलाफत आपणाकडे घेतली. तेव्हांपासून तुर्कस्तानचा बादशहा हाच मुसलमानांचा खलीफा मानिला जातो. परंतु तो महंमदाच्या वंशापासून जन्मला नसल्यामुळें, शियापंथी कट्टे मुसलमान त्यास खलीफा न मानतां इराणच्या शहास आपला मुख्य समजतात. तरी मुसलमान धर्माची अलीकडे अभिवृद्धि होत नसल्यामुळें सर्व मुसलमान एकच खलीफा मानितात. इस्माईलशहा ज्याप्रमाणें शियापंथाचा कट्टा अभिमानी होता, तसाच त्याचा मुलगा तह्मास्प्ही होता. आरंभीं त्यानें हुमायूनचा आदरसत्कार फार उत्तम केला, आणि बादशहाच्या इतमामास शोभेल अशी त्याची बरदास्त ठेविली. तथापि प्रत्यक्ष भेट होण्यास कित्येक महिने लागले; आणि हुमायूनन मदतीची गोष्ट काढिली, तेव्हां उभयतांचें पटेनासें झालें. बह्रामखान नामक एक विश्वासु व चतुर सरदार वनवासांत नेहमीं हुमायूनच्याबरोबर असे. त्यास हुमायूननें बोलाचाली करण्याकरितां तह्मास्प्कडे पाठविलें. बह्रामखानास असें कळून आलें, कीं आपण सर्वस्वी पराधीन आहों. इराणचा सुलतान आपल्या यजमानास मुळींच मोजीत नाहीं. 'हिंदुस्थानांत शिया पंथ सुरू कराल तर तुम्हांस मदत देतों' असें तह्मास्पनें सांगितलें. ती गोष्ट हुमायूनच्यानें कबूल करवेना. शेवटीं निकरावर येऊन तह्मास्प्नें हुमायूनकडे एक लांकडाची मोळी पाठवून कळविलें, कीं 'जर तुम्ही शिया धर्म न स्वीकाराल, तर हींच लांकडें तुमच्या सरणास उपयोगी पडतील.' निरुपायास्तव हुमायूननें तह्मास्प्चें म्हणणें कबूल केलें, आणि कंदाहारप्रांत जिंकून त्यास देण्याचें वचन दिलें. तेव्हां इराणच्या सुलतानानें आपला मुलगा मीर्झा मुराद याच्या हाताखालीं चौदा हजार स्वार

हुमायूनच्या मदतीस दिले, आणि मोठ्या सन्मानानें त्यास परत जाण्यास रजा दिली. सन १५४५ च्या मार्च महिन्यांत हुमायून कंदाहारसमोर आला. मीर्झा अस्करीनें सहा महिनेपर्यंत त्यास दाद दिली नाहीं. पुढें धान्यसामुग्री संपून किल्ला हुमायूनच्या ताब्यांत आला आणि इराणचा शहाजादा तेथें जाऊन राहिला.त्यांनीं मीर्झा अस्करी यास बंदोबस्तानें अटकेंत ठेविलें. येथपर्यंत हुमायूननें आपलें वचन पार पाडिलें. पण पुढें विशेष मदतीची त्यास आशा दिसेना. तेव्हां कामरानशीं बोलाचाली करण्याकरितां तो काबुलास निघाला. फारसा लांब गेला नाहीं, तोंच इराणचा शहाजादा मुराद कंदाहारास मरण पावल्याची त्यास बातमी समजली. तेव्हां औषधाशिवाय खोकला गेला असें समजून हुमायून लगेच परत आला, आणि इराणी लोकांस घालवून देऊन त्यानें कंदाहारचा चांगला बंदोबस्त केला. मध्यंतरीं कामरानची समजूत करण्याकरितां बहरामखानास हुमायूननें काबुलास पाठविलें, पण कामराननें दाद दिली नाहीं. पुढें कंदाहार येथें असतां हुमायुनास बातमी समजली, कीं काबूल येथें कामरानाच्या पुष्कळ शत्रु उत्पन्न झाले आहेत. तेव्हां फौजेचा चांगला बंदोबस्त करून तो काबुलास निघाला. त्याचा भाऊ हिंदाल गझनीच्या सुभ्याचें काम पाहत होता, तो व दुसरे पुष्कळ सरदार रस्त्यांत त्यास येऊन मिळाले. हुमायून येतांच कामरान सिंधप्रांताकडे पळाला,आणि हिंदालनें त्याचा पाठलाग चालविला. सन १५४५च्या ऑक्टोबर महिन्यांत काबूल हुमायूनचे हातीं आलें. तेथें त्याचा मुलगा अकबर त्यास सुरक्षित येऊन भेटला. कांहीं दिवसांनीं हुमायूननें बदक्शान प्रांतावर स्वारी केली. इकडे कामरान सिंधप्रांतांत थारा न मिळाल्यामुळें काबुलास परत आला. तेथें हुमायून नाहींसा पाहून, लगेच तें शहर त्यानें काबीज केलें. शहाजादा अकबरही त्याच्या हातांत सांपडला. हिंदाल व हुमायून लगेच परत आले, आणि त्यांनीं किल्ल्यास वेढा दिला.कामरान ह्या प्रसंगीं अकबराच्या जिवास अपाय करणार होता, पण दैवानें त्यास वांचविलें. काबूल हुमायूनच्या हातीं आलें. कामरान पळून गेला आणि त्यानें बदक्शान प्रांत काबीज केला. सन १५४८ त कामरान ह्यास कैद करून हुमायूननें बदक्शान प्रांत परत घेतला. त्यानें कामरान ह्यास फारच ममतेनें वागविलें. चारही भाऊ पुनः एकत्र होऊन गोडीगुलाबीनें कांहीं दिवस राहिले. परंतु लवकरच काम-

रान व मीर्झा अस्करी ह्यांनीं बंड करून काबूल हस्तगत केलें. हुमायून गैरसावध नव्हता. त्यानें काबूल परत घेतलें आणि कामरान पुनः पंजाबाकडे पळून गेला. हुमायूननें कामरान ह्यास पुष्कळ ममतेचीं पत्रें लिहून जवळ राहण्यास बोलाविलें. पण त्यास तें रुचलें नाहीं. हिंदाल यास हुमायूननें त्याजवर पाठविलें. पाठलाग करीत असतां एके दिवशीं कामरानच्या अफगाण लोकांनीं हिंदाल यास ठार मारिलें, (नोव्हेंबर १५५१). अलीकडे हिंदाल ह्यानें हुमायुनास उत्तम प्रकारें साह्य केल्यामुळें त्याजवर हुमायूनची विशेष प्रीति जडली होती. म्हणून त्याच्या मृत्यूचें वर्तमान ऐकून हुमायुनास अत्यंत दुःख झालें. हिंदाल यास रझिया सुलताना नामक एक मुलगी होती. तिचें अकबराशीं लग्न लावून बापाची सर्व संपत्ति हुमायूननें तीस दिली. कामरानास हिंदुस्थानांत सलीमशहा सूरकडून आश्रय न मिळाल्यामुळें गक्कर वगैरे रानटी लोकांमध्यें तो भटकत होता. शेवटीं सन १५५२त गक्कर लोकांच्या मुख्य सरदारानें त्यास हुमायूनच्या स्वाधीन केलें. तेवीस वर्षें हुमायूनशीं त्यानें एकसारखी बेइमानगिरी केली, याजबद्दल त्यास जिवें मारावें अशी मोगल अधिकाऱ्यांची सल्ला पडली. पण हुमायुनास तें बरें न वाटून त्यानें त्याचे डोळे मात्र काढविले, (१५५३). पुढें एके प्रसंगीं कामरानच्या भेटीस गेला असतां त्याची ती दुःखद स्थिति पाहून हुमायुनास अत्यंत कळवळा आला, आणि तो पुष्कळ रडला. कामरान ह्यासही कृतकर्मांचा पश्चात्ताप झाला, आणि ज्यांचें ज्यांचें नुकसान केलें होतें त्या सर्वांची त्यानें क्षमा मागितली. अनेक वेळां विश्वासघात केल्यामुळें अशी शिक्षा करण्याशिवाय हुमायुनास दुसरा मार्ग नव्हता. कांहीं दिवसांनीं हुमायूनच्या परवानगीनें तो मक्केस जाण्यास निघाला, पण रस्त्यांतच सिंधप्रांतांत मरण पावला, (१५५६). कामरान शूर व धीट होता. पण स्वभावानें कपटी व क्रूर असल्यामुळें, त्याजवर त्याच्या बायकोशिवाय कधीं कोणी विश्वास ठेविला नाहीं. बायकोस तिचा बाप आपल्या घरीं बोलावीत असतां न जाऊन ती नवऱ्याबरोबर मक्केस गेली. मीर्झा अस्करी ह्यासही हुमायूननें हद्दपार केलें. तो मक्केस जाऊन तेथें सन १५५८त मरण पावला.

ह्या भावांचीं बंडें, लढाया, वेढे व एकमेकांनीं एकमेकांस पकडणें, ह्या गोष्टींची वारंवार आवृत्ति झालेली वाचून कंटाळा येतो. खरें पाहतां

ह्या काळचा इतिहास म्हणजे धामधुमीच्या वर्णनाशिवाय दुसरें कांहीं नाहीं. अशीं वर्णनें कोणास तुच्छ वाटत असतील, तर त्यास एकच उत्तर आहे, कीं जगाच्या कोणत्याही भागांत अठराव्या शतकाच्या अखेरीपर्यंत युद्धांचा व राज्यांचा इतिहास अशाच प्रकारचा आहे. अर्वाचीन युद्धपद्धतीची सुरुवात नेपोलियनच्या वेळेपर्यंत झाली नव्हती.

७. मृत्यु व योग्यता, (स.१५५५–१५५६).—सर्व भावांचा निकाल लागल्यावर हुमायुनास स्वास्थ्य प्राप्त झालें. काबूलकडील सर्व राज्य ताब्यांत आल्यानें हिंदुस्थानाकडे लक्ष देण्यास त्यास फुरसत सांपडली. शिवाय ही संधि चांगली होती. सूर घराण्यांतील पुरुषांत तंटे लागून दिल्लीस धामधूम चालू होती. प्रजेलाही अफगाण लोकांचा तिटकारा आला होता. आग्रा व दिल्ली येथें हुमायूनचे पुष्कळ स्नेही होते, त्यांनीं त्यास हिंदुस्थानांत येण्याविषयीं पत्रें गेलीं. पण एवढें जोखीम अंगावर घेण्याची त्यास प्रथम छाती होईना. तो स्वभावानें धाडशी नव्हता. बापाच्या शेवटच्या आज्ञेप्रीत्यर्थ त्यानें आपल्या भावांस अमर्याद ममता दाखवून सर्वतोपरी स्वतःची खराबी करून घेतली. हिंदुस्थानांत जावें कीं न जावें ह्या पंचाइतींत तो पडला. शेवटीं शकून पाहून अनुकूल उत्तर येतांच त्यानें जाण्याचा निश्चय केला. सन १५५४ च्या डिसेंबर महिन्यांत निर्ढावलेले १५००० घोडेस्वार बरोबर घेऊन तो काबुलाहून निघाला. त्याचा मुलगा अकबर व वजीर बह्रामखान हे गज्नी व कंदाहार येथील फौज घेऊन पेशावर येथें त्यास येऊन मिळाले. कामरानबरोबरचें युद्ध संपल्यावर अकबराकडे गज्नीचा कारभार आला होता. ह्याच ठिकाणीं स्वतंत्रपणें राहून अल्पवयांत त्याच्या अंगीं चातुर्य येत चाललें. पंजाबांत तातारखान हा सूर सुलतानांचा कारभारी होता. त्यानें हुमायुनास आडकाठी केली नाहीं. रोहृतक किल्ला व लाहोर हीं ठिकाणें त्यास अनायासें प्राप्त झालीं. सिकंदरशहानें तातारखानाच्या हाताखालीं हुमायूनवर आपली फौज रवाना केली. तिजवर हुमायूननें अकबरास बह्रामखानाच्या स्वाधीन करून पाठविलें. बह्रामखानानें सरहिंदनजीक तातारखानाच्या फौजेचा पराजय करून, दिल्लीच्या आसपासचा प्रदेश लहानलहान टोळ्या पाठवून घेतला. तेव्हां सिकंदरशहा स्वतः ८० हजार फौज व मोठा तोफखाना घेऊन युद्ध करण्याकरितां

बाहेर पडला. बह्रामखानाच्या बोलावण्यानें हुमायूनही त्वरा करून आला. तारीख १८ जून सन १५५५ रोजीं उभय सैन्यांची गांठ सुरहिंद येथें पडली. बह्रामखान् व त्याचे धनी बापलेंक हे तिघेही भरगर्दींत लढले. ह्या प्रसंगीं अकबरानें विलक्षण शौर्यप्रभाव दाखविला. सिकंदरशहाचा पराभव होऊन कापाकापी सुरू झाली, तेव्हां जीव रक्षण करण्याकरितां तो पंजाबच्या डोंगरी प्रदेशांत पळून गेला. सरहिंदच्या ह्या लढाईनें अफगाण-वंशी सुलतानांची आशा समूळ खुंटली. मोगलांकडे हिंदुस्थानचें स्वामित्व जाऊन, हिंदुस्थानच्या राज्यकारभारास नवीन व निराळें वळण लागलें. पुढें दिल्ली व आग्रा काबीज होण्यास विलंब लागला नाहीं. येणेंप्रमाणें पंधरा वर्षें यातना व वनवास भोगलेला हुमायून जुलई महिन्यांत बाद-शाहीपदावर कायम झाला. पुढील पांच सहा महिने तो बारीकसारीक बंडें मोडण्यांत गुंतला होता. अशा कष्टानें प्राप्त झालेल्या बादशाहीचा उपभोग घेण्यास तो दुर्दैवानें फार दिवस वांचला नाहीं. दिल्लीच्या राजवाड्यांत पुस्तकालयाच्या गच्चीवर बसला असतां, सायंकाळच्या निमाजाची वेळ झाली असें समजून खालीं येऊं लागला. जिन्यावरच त्यानें मशीदींतील प्रार्थनेच्या सुरुवातीस होणाऱ्या पुकारणीचा शब्द ऐकिला. तेव्हां लागलाच पायरीवर गुढघे टेंकून तो निमाज पढूं लागला. तें कृत्य आटोपल्यावर तो काठी टेंकीत वर उठून खालीं येणार, तों आरसपानी गुळगुळीत पायरीवरून हातांतील कांठी सरली, त्यामुळें तो धाडदिशीं खालीं चौकांत पडला; आणि जखमी होऊन पुढें चार दिवसांनीं मरण पावला, (तारीख २५ जानेवारी सन १५५६). ह्या वेळीं त्याचें वय ५१ वर्षांचें होतें. तार्दीबेग म्हणून त्याचा विश्वासु सरदार होता, त्यानें लगेच दिल्लीचा बंदो-बस्त करून हुमायूनच्या मृत्यूची बातमी कांहीं वेळ बाहेर फोडिली नाहीं. अकबराशिवाय हकीम म्हणून त्यास दुसऱ्या बायकोपासून आणखी एक मुलगा होता. दिल्ली येथें हुमायूनच्या थडग्यावर अकबरानें पुढें आरस-पानांची सुंदर कबर बांधिली. ह्याच इमारतींत सन १८५७ सालच्या दंग्यांत दिल्लीचा बादशहा आपल्या पुत्रांसह लपून राहिला होता. इंग्रजांनीं दिल्ली घेतल्यावर हुमायूनच्या कबरेंत त्या दोघां शहाजाद्यांस ठार मारून वृद्ध बादशहास पकडून नेलें.

३०-१९-९-१०-७९१-२०००

हुमायूनची योग्यता.—पडण्याचा संभव असून हुमायून पडला नाहीं असें कधीं झालें नाहीं. शेवटच्या जिन्यावरून पडण्यानें तर तो परलोकासच गेला. हमीदाशीं केलेल्या लग्नावरून त्याचा अप्रयोजक, गुलजार व बेफिकीर स्वभाव व्यक्त होतो. हमीदाचा बाप मीरबाबा दोस्त हाच अली अकबर जामी ह्या नांवानें प्रसिद्ध असावा. हा इराणांतील एका थोर साधूच्या कुळांतला होता. ह्या साधूचें नांव अहंमद जाम. ह्या कुळांतलीच हुमायूनची आई महामबेगम ही होती. साधु अहंमद जाम ह्यानें इराणांत तीन लाख लोकांस मुसलमानी धर्मांत आणिलें होतें. हुमायून इराणांत गेला असतां, त्यानें ह्या आपल्या पूर्वजाच्या कबरेचें दर्शन घेतलें.

हुमायून सिंधप्रांतांत स. १५४१त बक्करचा किल्ला काबीज करीत होता, तेव्हां हिंदालविषयीं त्यास संशय येऊन तो पात्र नांवाच्या गांवीं हिंदालच्या भेटीस गेला, त्या वेळीं हिंदाल मुक्कामावर नव्हता. हिंदालची आई दिलदार बेगम व बहीण गुलबदन ह्यांनीं हुमायूनचें स्वागत करून त्यास मेजवानी दिली. त्या प्रसंगीं हमीदाबानू व तिचा लहान भाऊ हीं तेथेंच दिलदार बेगमपाशीं होतीं. त्यांचा बाप अली अकबर ऊर्फ मीरबाबा दोस्त हा हिंदालचा गुरु होता. हुमायूनची व हमीदाची दृष्टादृष्ट होतांच 'ही कोण', म्हणून त्यानें विचारिलें. ही अली अकबरची मुलगी असें समजतांच, तो म्हणाला, 'मग तर ती आमच्यांतलीच आहे.' तिच्यावर हुमायूनचें मन बसलें, आणि त्यानें आपल्या सावत्र आईस सांगितलें, 'इचें माझें लग्न जुळवून द्या.' हिंदाल परत आल्यावर त्यास ही गोष्ट समजून राग आला. तो म्हणाला, 'हमीदा मला बहिणीसारखी असून, तुमच्यासारख्या बादशहाला ती शोभत नाहीं. आपण येथें मला भेटण्यास आलां आहां, लग्नासाठीं नाहीं.' हें उत्तर ऐकून हुमायुनास फारच वाईट वाटून तो रूसून निघून गेला. तेव्हां दिलदारबेगमनें त्याची समजूत करून लग्न जुळवून देण्याचें कबूल केलें. दुसऱ्या दिवशीं दिलदारबेगमच्या मुक्कामावर त्यांचें लग्न लागलें, (सेप्टेंबर १५४१). तेव्हां तिचें वय १४।१५ वर्षांचें होतें. हमीदाचें आयुष्य एकंदरींत फारसें सुखांत गेलें नाहीं. पहिलीं पंधरा वर्षें हुमायूनबरोबर वनवासांतच गेलीं. अकबर चौदा महिन्यांचा असतां त्यास रस्त्यांत सोडून तिला नवऱ्याबरोबर

इराणांत जावें लागलें. नवरा मरण पावल्यावर, मुलानें तिचा परामर्ष उत्तम घेतला. त्यानें तिचें वचन कधीं मोडिलें नाहीं. तिला पुष्कळ मुलें झालीं; आणि नातू पणतू पाहून स. १६०४त सत्त्याहत्तर वर्षांचें वय होऊन मरण पावली. तिचें दफन हुमायूनच्या कबरेंत त्याच्याच शेजारीं करण्यांत आलें. हाजीबेगम म्हणून हुमायूनची दुसरी बायको होती.

हुमायूनच्या अंगीं पुष्कळ दोष होते, तरी एकंदरींत तो थोर मनाचा व उदार होता. समरभूमीवर उभा राहिला म्हणजे तो शूर कमी होता असें नाहीं, पण निश्चय व हिकमत हे गुण त्याच्या अंगीं नसल्यामुळें, त्याजवर नानातऱ्हेचीं संकटें आलीं. अशा संकटांतून तो चांगल्या रीतीनें पार पडला हेंच विशेष आहे. 'ऐश्वर्यापेक्षां विपत्तीचें ओझें त्यास ज्यास्त चांगलें सहन करितां येत असे,' असें एका मार्मिक लेखकानें लिहिलें आहे तें योग्य आहे. तो उतावळा होता, पण उतावळीनें बोललेलें वचन तो खरें करी. गंगानदीवरून ज्या भिस्त्यानें आपल्या पखालीवर त्याचा जीव वांचविला, त्यास अर्धा दिवस बादशाही तख्त देण्याचें हुमायूननें वचन दिलें होतें, तें त्यानें बरोबर पाळिलें. भावांस ममतेनें वागविण्याचें बापास दिलेलें वचन तो कधीं विसरला नाहीं. कामरानच्या मुलाचा हुमायूननें चांगला परामर्ष घेतला. पुढें अकबरानें मात्र कामरानचा मुलगा अबुल कासीम ह्यास ठार मारिलें. युद्धकलेंत अत्यंत निपुण जो शेरशहा सूर त्याच्याशींच हुमायूनची प्रत्यक्ष गांठ पडली, म्हणून त्यास अपयश आलें. दुसऱ्या शत्रूस त्यानें सहसा दाद दिली नसती. हिंदुस्थानांतील मुसलमानांची अफगाणांविषयीं पूज्यबुद्धि व मोगलांविषयीं तिरस्कार ह्यांमुळेंही शेरशहास पुष्कळ मदत झाली. शेरशहासारखा शत्रु उत्पन्न झाला नसता, तर हुमायूनला हिंदुस्थानचें राज्य मिळून तें त्यानें चांगल्या रीतीनें हांकिलें असतें असें मानण्यास वरींच कारणें आहेत. भरज्वानींत त्यास जीं संकटें प्राप्त झालीं, त्यांचा विचार केला असतां, कोणालाही कळवळा आल्याशिवाय राहणार नाहीं. त्याचा विश्वासू नोकर जौहर त्याचें पिण्याचें पाणी संभाळण्याच्या कामावर होता, त्यानें त्याचें चरित्र लिहिलें आहे, त्यांत त्या बादशहाच्या गुणावगुणांचें चांगलें वर्णन आहे. तो वर्तनानें साधा, अंतःकरणाचा दयाळू, आपल्या कुटुंबावर व परिवारावर अत्यंत

ममता करणारा असा होता. खर्च करण्यांत व बक्षीस देण्यांत त्याचा हात सढळ होता. क्रूर कृत्यानें त्याच्या कीर्तीस डाग लागलेला नाहीं. त्यानें आपल्या भावाचे डोळे काढविले, ह्यापलीकडे दुसरें कोणतेंही क्रूर कर्म केलें नाहीं. अकबरावर त्याची अमर्याद प्रीति होती. दहा वर्षांचा असतांच त्यास त्यानें कामांत घातलें. हुमायूनचा चरित्रकार अर्स्किन म्हणतो, ' त्याची बुद्धि तीव्र असून अनिश्चय, धरसोड व विचारशून्यता हे दोष, व औदार्य, ममताळूपणा, व सौजन्य हे गुण स्वभावतःच त्याच्या अंगीं होते. परंतु हळू हळू औदार्याच्या ठिकाणीं उधळेपणा, व सौजन्याच्या ठिकाणीं दुर्बलता त्याच्या स्वभावांत येत गेल्यामुळें, अखेरपर्यंत त्याजवळ खुषमस्करे व तोंडपुजे लोकांचा जमाव जमला. त्यास विद्येची अभिरुचि असून विद्वानांस तो चांगला आश्रय देई. त्याच्या आश्रयास कित्येक ज्योतिषी व इतिहासकार होते. वनवासांत सुद्धां त्याजबरोबर पुस्तकांचे भारे असत. तो व त्याचा भाऊ हिंदाल हे स्वतः कविता करीत. गणित व ज्योतिष ह्या शास्त्रांचा हुमायूननें बराच अभ्यास केला होता. एक वेधशाळा स्थापण्याचा त्याचा विचार होता. मुसलमानी धर्मावर त्याची श्रद्धा दृढ असून मंत्रतंत्रांवर व शकुनांवर त्याचा भरंवसा असे. कोणत्याही गुणाचा अतिरेक म्हणजे दोषच होय, ह्या नियमानुसार त्याचा प्रत्येक गुण अतिरेकाच्या योगानें दोष बनला, व त्याची नानातऱ्हेनें खराबी झाली.' बाबरानेंही आपल्या मुलाविषयीं हाच अभिप्राय लिहून ठेविला होता. ' लोकांस हुमायून फार आवडेल, परंतु तो कर्तृत्वशून्य होईल.' राज्यपद चालवावयाचें नसतें तर हुमयूनसारखा चांगला मनुष्य सहसा सांपडला नसता. मात्र त्यास अफूचें सेवन प्रिय होतें; त्यामुळेंच कदाचित् त्याचें मांद्य उत्पन्न झालें असेल. बाबर व अकबर दोघांसही हें व्यसन होतें. हुमायून यानें आपल्या बापाचें आत्मचरित्र स्वहस्तानें लिहून व जागजागीं ज्यास्त माहिती देऊन तयार केलें. त्याच्या औदार्याच्या अनेक आख्यायिका आहेत, पण विस्तारभयास्तव त्या येथें देतां येत नाहींत. बाबराचें वीर्यशालित्व, व अकबराचें राजनीतिनैपुण्य ह्यांच्या दरम्यानगिरीमुळें हुमायूनच्या कर्तबगारीस पुढें येण्यास सवड झाली नाहीं, ही गोष्ट निराळी; पण तो बाबरास शोभेल असा पुत्र व अकबरास शोभण्यासारखा बाप होता ह्यांत संशय नाहीं.

प्रकरण बाविसावें.

जलालुद्दीन महंमद अकबर.

सन १५५६–१६०५.

१. पूर्व चरित्र व राज्यारोहण. २. सूरवंशी शत्रूंचा बंदोबस्त.

३. स्वकीय सरदारांचे बखेडे (सन १५५९–१५६६).

(अ) बहरामखान (१५५९–६१).	(इ) खानजमान (१५६६).
(आ) आदमखान वगैरे (१५६१).	(ई) महंमद हकीम मीर्झा (१५६६).

४. अकबरानें जिंकिलेले प्रदेश (सन १५६१–१६००), उपक्रम.

(अ) रजपूतराज्यें (१५६१–६७).	(उ) काश्मीर (१५८७).
(आ) गुजराथ (१५७२–७३).	(ऊ) सिंधप्रांत (१५९२).
(इ) बंगाल (१५७२–१५७५).	(ऋ) कंदाहार (१५९४).
(ई) काबूल (१५७९).	(ॠ) महाराष्ट्र (१५९५–१६००)

५. सलीमचें दुर्वर्तन. ६. मृत्यु व बायकामुलें.

१. पूर्वचरित्र व राज्यारोहण.—बाप वनवासांत असतां उमरकोट येथें अकबराचा जन्म झाला हें मागें सांगितलेंच आहे. चौदा महिन्यांचा असतां, आईबापांपासून त्याची ताटातूट होऊन तो चुलत्याच्या हातांत सांपडला. पुढें तीन वर्षांनीं काबूल येथें त्यास बाप भेटला; आणि आणखी सहा महिन्यांनीं आईची भेट झाली. त्या भेटीच्या वेळीं हुमायूननें मुद्दाम आईबरोबर पुष्कळ बाया आंत आणिल्या; पण अकबरानें न चुकतां आईस ओळखून तिला एकदम मिठी मारिली. पुढें पुनः तो चुलत्याच्या हातीं पडला. हुमायून व कामरान ह्यांचें काबुलास युद्ध चालू असतां, अकबरास तोफेचा गोळा लागावा अशा उद्देशानें कामरान ह्यानें मुद्दाम त्यास तटावर नेऊन ठेविलें. त्या ठिकाणीं केवळ परमेश्वरानेंच त्याचा बचाव केला. पुष्कळ वेळां त्यास कडक कैदही भोगावी लागली होती. जिवावरचे प्रसंग किती गेले याची तर गणतीच नाहीं. परंतु सर्वांतून तो सुरक्षित पार पडला. अशा

NATIONAL ARCHIVES OF INDIA

संकटांमुळें लहानपणीं त्याचा विद्याभ्यास कसा तो मुळींच झाला नाहीं. स. १५४७च्या नोव्हेंबरांत बापानें त्यासाठीं एक शिक्षक ठेविला. सुरुवातीच्या दिवशीं तो कोठें लपून बसला, तो कांहीं केल्या सांपडेना. पुढें शिकूं लागला, तेव्हां शिक्षक व तो दोघेही कबुतरें उडविण्यांत सर्व वेळ घालवीत. चुलता कामरान जरी त्याचा छळ करी, तरी त्याची दाई, चुलती व सावत्र आई ह्या त्यास अगदीं जीव कीं प्राण करीत असत. बाबरची बहीण खानोजेदा बेगम म्हणून होती, तिच्या ताब्यांत लहानपणीं अकबर होता. ती त्यास अगदीं प्राणापलीकडे वागवी. दहा वर्षांचा असतां चर्ख् व गज्नी हे दोन परगणे हुमायूननें अकबराच्या खर्चासाठीं लावून दिले; आणि हिंदाल मरण पावल्यावर त्याची सर्व जहागीर अकबरास मिळाली. त्याच वेळेस हिंदालची मुलगी रुकैय्या म्हणून होती, तिच्याशीं अकबराचा निका ठरला. ही अकबराची अगदीं पहिली बायको असून, ती त्याच्या मागून एकवीस वर्षांनीं, चौऱ्यांशीं वर्षांची होऊन मरण पावली. ती अकबराहून एक वर्ष लहान होती. सारांश अकबराच्या शिक्षणाची लहानपणीं अगदींच हेळसांड झाली. एकंदरींत आईबापांपासून त्यास विशेष मदत झालेली दिसत नाहीं. बाप प्रेमळ व कुलवान होता, पण चलचित्त असल्यामुळें, मुलाची काळजी त्यानें विशेष घेतली नाहीं. धामधुमीच्या प्रसंगीं हजर राहून प्रत्यक्ष अनुभवानें जें शिक्षण मिळावयाचें तें मात्र अकबरास भरपूर मिळालें होतें. त्याची बुद्धि तीव्र असल्यामुळें, अशा शिक्षणाचा बोध त्याच्या मनावर चांगला ठसला. बहूरामखान हा हुमायूनचा एकनिष्ठ व शूर सरदार होता. कितीही संकटें आलीं, तरी हुमायुनास त्यानें सोडिलें नाहीं. हुमायूननें आपला मुलगा बहूरामखानाच्या हवालीं केला होता, तेव्हां अर्थातच बहूरामखान अकबरचा गुरु व पालनकर्ता झाला. हरएक कामांत हुमायून अकबराचा सल्ला घेत असे. बापाच्या मरणसमयीं अकबर जवळ नसून बहूरामखानाबरोबर पंजाबच्या मोहिमेवर होता. बापाच्या मृत्यूची वार्ता कळतांच बहूरामखानानें त्यास लागलेंच बादशाहा म्हणून जाहीर केलें. त्या वेळीं त्याचें वय तेरा वर्षें तीन महिन्यांचें होतें. त्यास पंजाबांत स्वतंत्र कारभार करण्याचा अनुभव सहा महिने मिळून, शिवाय बहूरामच्या तालमींत तो

आपल्या जहागिरींत पुष्कळ गोष्टी शिकला. म्हणून प्रधानाच्या नात्यानें राज्याचा सर्व कारभार बहरामखान पाहूं लागला. अकबर राज्य करूं लागला, तेव्हां बादशाही अंमलाखालीं दिल्ली व आग्रा ह्या शहरांपलीकडे फारसा मुलूख नव्हता. परंतु पन्नास वर्षांच्या अवधींत अकबरानें अफगाणिस्तानपासून आसामपर्यंत, व दक्षिणेस अहंमदनगरपर्यंत, हिंदुस्थानांतील सर्व प्रदेश आपल्या ताब्यांत आणिला; आणि नीतीनें व चातुर्यानें राज्यकारभार करून रयतेस सुखी केलें. ह्यामुळें जगांतील महान राज्यकर्त्यांमध्यें अकबराची गणना होत आहे.

२. सूरवंशी शत्रूंचा बंदोबस्त.—सरहिंदच्या लढाईमध्यें पराजय झाला असतांही सूरवंशी पुरुषांची आशा संपली नव्हती. सिकंदरशहा सूर हा पठाण लोकांची मोठी फौज घेऊन पंजाबांत राहिला होता. पूर्वेकडील प्रांतांत महंमदशहा आदिली व हिमू हे मोठ्या जमावानिशीं अकबराशीं युद्ध करण्यास तयार होते. मध्यहिंदुस्थान व रजपुताना येथील हिंदु राजे मुसलमानी अंमलास मोजीत नव्हते. नवीन मोगल सरदारांस हुमायूननें जहागिरी व नेमणुका करून दिल्यामुळें, जुन्या पठाण सरदारांस वैषम्य वाटून ते बादशहावर उठण्यास तयार झाले होते. अकबराची मोगल फौज तीस हजारांवर नव्हती. उलट पक्षीं शत्रूंची पठाण फौज एक लाखावर होती. अफगाणिस्तानांतले अंमलदार अकबराशीं नीट रीतीनें वागत नव्हते. अशा ह्या सर्व अडचणींचें ओझें चौदा वर्षांच्या मुलावर एकदम येऊन पडलें.

अकबरानें बहरामखानास 'खानखानान' म्हणजे राजाधिराज असा किताब देऊन, त्याच्या हातीं सर्व अधिकार दिला. तथापि स्वतः सर्व गोष्टी पाहून व सर्व गोष्टींत मन घालून आणि मेहनत करून, तो बहरामखानाबरोबर हजर राहत असे. प्रथम तो सिकंदरशहाच्या बंदोबस्तास लागला. सरहिंद येथें पराभव झाल्यावर सिकंदरशहा फौजेचा जमाव करून पुनरपि युद्धाच्या तयारीनें राहूं लागला. गुल्बदन बेगमचा नवरा खिजरख्वाजा ह्याचा सिकंदरशहानें पराभव केला. तेव्हां त्याचा बंदोबस्त करण्याकरितां अकबर मोठ्या फौजेनिशीं पंजाबांत चालून गेला. अंबालानजीक निकराची लढाई होऊन, सिकंदरशहाचा पराभव झाला. तेथून तो शिवालिक पहाडांत मानकोट किल्ल्यावर जाऊन राहिला. तेथें अकबरानें

त्यास वेढा घालून काबीज केलें, (मे १५५७). सहा महिने वेढा चालल्यावर सिकंदर अकबरास शरण आला. तेव्हां त्याच्या मुलास स्वतःजवळ नोकरींत ठेवून, शिकंदरास बंगाल्यांत राहण्याची परवानगी अकबरानें दिली. तेथें तो लवकरच मरण पावला. सुलेमान मीर्झा ह्यास हुमायूननें बदकूशानप्रांताचा कारभार सांगितला होता, त्यानें काबुलावर स्वारी करून तेथचा अधिकारी अकबराचा सावत्र भाऊ महंमद हकीम मीर्झा याजकडून तें शहर घेतलें, आणि तेथें सुलेमान स्वतंत्रतेनें राज्य करूं लागला. अकबर त्या वेळेस पंजाबांतील पहाडी लोकांशीं लढत होता. त्यानें काबुलास कांहीं मदत पाठविली, पण तिचा उपयोग झाला नाहीं. तथापि इकडे हिमूनें फारच दंगा चालविल्यामुळें काबुलाकडे लक्ष देण्यास अकबरास ह्या वेळेस फुरसत मिळाली नाहीं.

महंमदशहा आदिली व हिमू हे पूर्वेकडून मुलूख काबीज करीत थेट दिल्लीपर्यंत आले. आग्र्याचा अधिकारीसुद्धां पळून दिल्लीस आला. खान जमान नांवाचा अकबराचा सरदार थोडीशी फौज घेऊन शादीखान नामक हिमूच्या सरदारावर चालून गेला असतां पराभव पावून पळाला. हिमूनें आग्रा शहर घेतलें, आणि दिल्लीचा अधिकारी तार्दीबेगखान ह्याचा मीरत येथें पराभव केला. ह्या गोष्टी घडत असतां अकबर पंजाबांत जालंदर तेथें होता. खान जमान, तार्दीबेग व दुसरे पराभव पावलेले सरदार आपापल्या फौजांनिशीं तेथें जाऊन अकबरास मिळाले. नंतर पुढील विचार करण्याकरितां मुख्य मुख्य सरदारांची एक सभा भरली. हुमायूनची जशी दुर्दशा झाली, तसाच हा आणीबाणीचा प्रसंग होता. सभेंत बहुतेकांचा सल्ला असा पडला, कीं अशा प्रसंगीं हिमूशीं युद्ध करणें श्रेयस्कर होणार नाहीं; सर्वांनीं मिळून तूर्त काबुलास निघून जावें. पण बहरामखानानें असा अभिप्राय दिला, कीं आपण एकदम जाऊन हिमूशीं लढाईच केली पाहिजे. एकवार शत्रु वाढला, म्हणजे तो हिंदुस्थानचें राज्य बळकावून बसेल, आणि पुनरपि तें घेण्यास प्रयास पडतील. अकबरास बहरामखानाचा सल्ला पसंत पडून, त्यानें दिल्लीवर जाण्याचा निश्चय ठरविला. ह्या वेळीं मोगल सरदारांत शिस्त नव्हती. प्रत्येकजण आपापल्या मर्जीप्रमाणें वागत असे. ह्याचा बंदोबस्त होऊन जरब बसावी ह्या हेतूनें, अकबर

छावणीच्या बाहेर गेला असतां, बह्रामखानानें तार्दीबेगखानास दिल्ली सोडून आल्याबद्दल ठार मारिलें. अकबर परत आल्यावर बह्रामानें त्यास कळविलें, कीं 'आपल्या लष्करांत जरब राहून सर्वांचा बचाव व्हावा अशा प्रकारची कडक शिक्षा एका इसमास करावी लागली. आपण कदाचित् असें करण्यास अनुमोदन देणार नाहीं, म्हणून मींच हें कृत्य आपणास न विचारितां उरकून घेतलें.' अकबरास हा प्रकार आवडला नाहीं; तार्दीबेगखान हा हुमायूनचा मूळपासून इमानी नोकर होता. अशा सरदाराचा प्राण विनाकारण बह्रामानें घेतला, ही गोष्ट अकबर कधींही विसरला नाहीं. तरी होऊन गेलेली गोष्ट परत येणें शक्य नाहीं असें पाहून, मोठ्या नाखुषीनें त्यानें या कृत्यास आपली संमति दिली. एकंदरींत ह्या कडक शिक्षेचा परिणाम व्हावा तसा झाला. बह्रामखानास सर्व लोक भिऊं लागले. अकबराचें सैन्य दिल्लीकडे आलें, तसा हिमूही आपली फौज घेऊन पानिपतच्या समरभूमीवर गेला. अगोदरच हिमूनें विक्रमाजित हें नांव धारण करून दिल्ली येथें आपलें राज्य सुरू केलें होतें. हिमूचा तोफखाना अंमळ पुढें गेला होता, त्याजवर एकदम छापा घालून, बह्रामखानानें तो स्वाधीन करून घेतला. तारीख ५ नोव्हेंबर, सन १५५६ रोजीं लढाईस प्रारंभ झाला. उभय दळें मोठ्या निकरानें झगडूं लागलीं. हिमू आपल्या 'हवा' नामक हत्तीवर बसून सर्वांपुढें झळकत असतां तो डोळ्यास तीर लागून पडला, तेव्हां हिमू मेला आणि दुसरा कोणी पुढारी नाहीं असें पाहून, त्यांचे लोक पळून गेले. तो स्वतः पिछाडीस जात असतां अकबराच्या स्वारांनीं त्यास पकडून नेलें. ह्या काफरास स्वहस्तानें ठार मारून 'गाजी' हें नांव मिळवावें, असा बह्रामानें अकबरास पुष्कळ आग्रह केला. अकबराच्यानें ती गोष्ट करवेना. पतित शत्रूस मारण्याचें त्याच्या जिवावर आलें. त्याच्या डोळ्यांत आंसवें आलीं. हें पाहून बह्रामखानानें चटकन् पुढें होऊन आपल्या हातानें हिमूचा शिरच्छेद केला. अशा प्रकारें ह्या पुरुषाचा अंत झाला. केवळ स्वपराक्रमानें तो मोठ्या योग्यतेस चढला होता. त्याच्याच अकलेच्या जोरावर सूरवंशी पठाणांस इतके दिवस मोगलांशीं झगडतां आलें. मुसलमानांच्या ताबेदारींत राहून एवढ्या मोठ्या पदास चढलेला असा हा एकच हिंदु गृहस्थ होता. त्याची हुशारी व राजनिष्ठा ह्या गुणांचा मोबदला त्यास

ज्यास्त चांगला मिळणें वाजवी होतें. अकबरास एवढ्या मोठ्या फौजेशीं लढण्याचा पुनः कधीं प्रसंग आला नाहीं.

ह्या जयानें अकबर निर्वेध झाला. पुढें त्यास एकसारखे लढण्याचे प्रसंग आले खरे, तथापि बंडाचा फैलाव होण्यापूर्वीच शत्रूवर हल्ला करण्याची त्यास सोय झाली. हिमूचा पाडाव केल्यावर मोठ्या समारंभानें त्यानें दिल्लींत प्रवेश केला. आपल्या सन्मान्य पित्याच्या तख्तावर चढतांना त्याचें अंतःकरण कचरूं लागलें, कारण ह्या पदाच्या प्राप्तीकरितां अनेक रक्तपात आजपर्यंत घडून आले होते, आणि आपला पुढें परिणाम काय होईल हा विचार त्या वेळीं त्याच्या मनांत घोळत होता.

स. १५५७त सिकंदरशहावरील स्वारींत असतां, अकबरानें काबुलास फौज पाठवून आपल्या आईस व इतर बायकांस तेथून आपणापाशीं आणिलें. हुमायून व अकबर काबुलाहून हिंदुस्थानांत आले, तेव्हां ह्या बायका मागेंच राहिल्या होत्या. ह्याच वेळेस अकबराचें दुसरें लग्न झालें. अब्दुल्लाखान मोगल म्हणून कामरानचा मेहुणा होता, त्याची मुलगी अकबरानें पसंत केली. बह्रामखानास हा कामरानच्या नातेवाइकाशीं घडलेला संबंध आवडला नाहीं. तरी अकबरानें आग्रहानें लग्न लाविलें.

३. स्वकीय सरदारांचे बखेडे.—अकबरानें पंनास वर्षें राज्य केलें. त्याच्या कार्किर्दीस मोगल बादशाहीचा सुवर्णकाल असें म्हणतात. वास्तविक त्या वेळेस सर्वत्र शांतता होती असें नाहीं. शहाणपणानें व दयेच्या वर्तनानें जरी त्यानें बरेंचसें काम केलें, तरी युद्ध केल्याशिवाय ह्या पंनास वर्षांच्या अवधींत एक वर्षही अकबराचें गेलें नाहीं. प्रथम तर स्वतःच्याच मंडळीचा त्यास बंदोबस्त करावा लागला.

(अ) बह्रामखान, (१५५९-६१).—गुल्बर्ग बेगम म्हणून हुमायूनची एक सावत्रबहीण होती, तिला सलीमा नांवाची एक मुलगी होती. ही सलीमा बह्रामखानास द्यावयाची असें हुमायूननें ठरविलेलें होतें. ती स्वरूपानें सुंदर असून फार शहाणी म्हणून नांवाजलेली होती. स. १५५७त तिचें लग्न अकबरानें जालंदर येथें बह्रामखानाशीं मोठ्या थाटानें केलें. ह्या वेळीं बह्रामखानाची सर्वांशीं गोडी होती. स. १५६०त बह्रामखानाचा खून झाल्यावर, अकबरानेंच ह्या सलीमाशीं पुनः लग्न लाविलें.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

अकबर व बहरामखान यांस एकठिकाणीं काम करण्याचा प्रसंग पडूं लागला, तसा त्यांजमध्यें मतभेद होऊं लागला. अनेक भानगडीचे प्रश्न दररोज उत्पन्न होत, आणि त्यांचा निकाल करणें अकबरास भाग पडे. आपल्यावरची जबाबदारी तो कधींही टाळीत नसे. ज्यांनीं त्याची नोकरी चांगल्या रीतीनें बजाविली, त्यांस बक्षिसें देणग्या वगैरे देतांना तो उत्तरोत्तर बहरामखानास विचारीनासा झाला. कित्येक वेळां बहरामखान त्याच्याजवळ नसेही. बहरामखान हा निष्ठुर, एककल्ली व स्वभावाचा खुनशी होता. तार्दीबेगखानाप्रमाणें त्यानें अनेकांस कडकपणानें वागविलें होतें. अधिकार वापरण्याच्या कामीं तो न्यायान्याय सहसा पाहत नसे. अकबराची दाई महाम अनागा हिनें बहरामखानाविरुद्ध खटपट चालवून अकबराचें मन त्याजविषयीं दूषित केलें; आणि आपला कारभार आपण करावा, असें त्यास सुचविलें. अशा अनेक कारणांनीं बहराम व अकबर ह्यांजमध्यें द्वेषभाव वाढत चालला. मुल्ला पीर महंमद म्हणून अकबराचा शिक्षक होता, त्याचा व बहरामचा बेबनाव होऊन, बहरामनें त्यास एकदम कामावरून काढिलें, आणि त्याच्या जागेवर आपल्या मार्फतीचा दुसरा शिक्षक नेमिला. एके दिवशीं दरबारच्या सर्व लोकांनींही बहरामविरुद्ध अकबराकडे तक्रारी नेल्या. त्या वेळीं अकबर मोठा होत चालला होता, आणि राज्यसत्ता आपल्या हातांत असावी असेंही त्यास वाटूं लागलें. त्यानें कांहीं तरी युक्ति करून, बहरामच्या हुकमतींतून मोकळें होण्याचा प्रयत्न चालविला. एके दिवशीं दोघे मिळून शिकारीस गेले असतां आपली आई आजारी पडल्याचें निमित्त करून अकबर कोणाच्या ध्यानीं मनीं नसतां दिल्लीस परत आला. तेथून त्यानें बहरामखानास कळविलें कीं 'आजपर्यंत आमचा विद्याभ्यास व बाळपणचे खेळ चालले होते, म्हणून सर्व राज्याचा कारभार तुमच्या हातांत असणें जरूर होतें; परंतु आतां आपण आपलें राज्य स्वतः चालवावें असें आम्हीं मनांत आणिलें आहे, तरी आमचें कल्याण व्हावें या इच्छेनें तुम्हीं आतां सर्व कारभार सोडून द्यावा, आणि संसाराचा त्याग करून ईश्वरचिंतनांत कालक्रमण करण्याकरितां मक्केस जाऊन राहवें. तेथें तुमच्या खर्चाचा बंदोबस्त उत्तम ठेविला जाईल.' शिवाय त्यानें आपल्या सर्व लोकांस कळण्याकरितां असा एक जाहीरनामा काढिला, कीं 'आम्हीं

आपल्या राज्याचा सर्व कारभार इतःपर आपल्या हातांत घेतला आहे, तरी यापुढें आमचा हुकूम सर्वांनीं पाळावा; दुसऱ्या कोणाचा मानूं नये.' हा जाहीरनामा बह्रामखानास कळला, तेव्हां प्रथम ह्या कृत्याचा त्यास राग आला नाहीं. त्यानें निमूटपणें सर्व अधिकार सोडिला, आणि मक्केस जाण्याकरितां म्हणून रजपुतान्यांत नागोरपर्यंत गेला. तेथें त्याची बुद्धि फिरली: तेथें बादशहाविरुद्ध बंडावा करून स्वतंत्र अधिकार बळकाविण्याचा तो उद्योग करूं लागला. सन १५५९त त्यानें आपली स्वतंत्र फौज जमविली. तेव्हां अकबरानें त्याच्या पारिपत्यास सैन्य पाठविलें. त्यास चुकवून बह्राम पंजाबांत पळाला. त्याचा पाठलाग करून मच्छीवाडा येथें अकबराच्या फौजेनें त्याचा पराभव केला. पुढें कांहीं दिवस रानावनांत भटकल्यावर निभाव लागत नाहीं असें पाहून, क्षमा मागण्यासाठीं त्यानें आपल्या तर्फेनें बादशहाकडे कांहीं मनुष्यें पाठविलीं. तेव्हां अकबरानें आपले उमराव रवाना करून मोठ्या सन्मानानें त्यास दरबारीं आणविलें, (डिसेंबर १५६०). पागोटें मानेस बांधून सिंहासनासमोर पडून त्यानें बादशहाची माफी मागितली. अकबर त्याची खरी योग्यता व पूर्वींचे उपकार विसरला नव्हता. बह्रामखानाची ती दीनावस्था पाहून त्याच्या मनास कळवळा आला. आपल्या हातानें त्यास वर उठवून बादशहानें आपल्या उजव्या बाजूस त्यास त्याच्या पूर्वींच्या जागीं बसविलें, आणि बहुमानपोषाख दिला. नंतर अकबर त्यास म्हणाला, 'बह्रामखान, आमच्या घराण्यावर आपले बहुत उपकार आहेत. आपली इच्छा असेल, तर काल्पी व चंदेरी ह्या प्रांतांची सुभेदारी आपणांस देतों; तसें नसेल तर खुशाल येथेंच दरबारीं राहून कामकाज करीत जा. अथवा तेंही पतकरत नसेल, तर मक्केस जाऊन राहा. तेथें आपल्या मोठेपणास साजेल असा आपला बंदोबस्त ठेवण्यांत येईल.' बह्रामखान अभिमानी व धूर्त होता. आपणास आपला पूर्वीचा स्वतंत्र अधिकार पुनरपि मिळणार नाहीं हें तो पक्कें जाणून होता. त्यानें मक्केस जाण्याचें पतकरिलें, आणि म्हणाला, 'खाविंद, एकवार आपल्या चरणापाशीं मीं बेइमान केलें; आतां येथें काम करण्याची माझी योग्यता नाहीं. आपण क्षमा केली, हेंच माझ्या नोकरीचें योग्य बक्षीस आपण मला दिलें.' बादशहानें त्यास सालीना पन्नास हजार रुपयांचें वेतन करून दिलें. नंतर तो मक्केस जाण्या-

करितां गुजराथेंत आला. तेथें एके दिवशीं होडींतून उतरून किनाऱ्यावर आल्यावर, मुबारिकखान नामें एक पठाण त्याच्या भेटीस आला. ह्या मुबारिकखानाच्या बापास बहरामनें पूर्वी लढाईंत ठार मारिलें होतें. भेटीचे वेळीं मुबारिकनें बहरामच्या पाठीकडून पोटांत शस्त्र खुपसून त्याचा प्राण घेतला, (जानेवारी, सन १५६१). त्याची बायकामुलें आग्र्यास पाठविण्यांत आलीं आणि तेथें बादशहानें त्यांची उत्तम बरदास्त ठेविली. त्याचा मुलगा मीर्झाखान ह्याजला अक-अकबरानें मोठें काम दिलें, आणि पुढें कांहीं दिवसांनीं त्याची हुशारी पाहून बापाची खानखानान ही पदवी त्यास दिली. हा गृहस्थ पुढें फार प्रसिद्धीस आला. बहरामखानाचें समरांगणावरील शौर्य, व आपत्कालचें धैर्य, इत्यादि अनेक गुण आठवून बादशहास आमरण त्याचें स्मरण होत असे. एकंदरींत बहरामखानसारखा हुशार व नेटाचा पुरुष मिळाला, म्हणूनच हुमायून विपत्तींतून पार पडून, अकबरास पुढील सुदीन प्राप्त झाले. बहरामसारखा धाडसी वीर अकबराजवळ नसता, तर सूरवंशी सरदारांनीं अकबरासारख्या बालकाची डाळ कधींच शिजूं दिली नसती. आणीबाणीच्या वेळीं मोगल सरदारांत ऐक्य व उत्साह राहिला, ह्याचें सर्व श्रेय बहरामास आहे. सारासार विचार न पाहतां कोणतीही गोष्ट मनांत आल्याबरोबर तडाख्यासरशी करून टाकणें हा त्याच्या वर्तणुकींत दोष होता, म्हणूनच त्याचा असा परिणाम झाला. अशा उपकारकर्त्याचे अन्याय पोटांत घालून, त्यास मोठ्या संतोषानें रजा देण्यांत अकबरानें जो मनाचा मोठेपणा व्यक्त केला, तो त्याच्या थोरपणास चांगला शोभतो.

अकबराचें वय आतां अठरा वर्षांचें झालें. इतःपर तो कोणाच्या ताब्यांत राहिला नाहीं. स्वतःवर भरंवसा ठेवून अनेक बिकट प्रसंगांतून त्यानें आपली राज्यनौका सुस्थळास कशी आणिली हें आतां पाहवयाचें आहे.

(आ) आदमखान वगैरे, (१५६१).—अकबराची दाई महाम अनागा ही हुशार व खटपटी बाई होती. ती हमीदाची नातेवाईक होती असें दिसतें. हरएक कारभारांत ढवळाढवळ करण्याची तिला हौस होती. ती स्वभावानेंही दुष्टच होती. तिचा मुलगा आदमखान ह्यास योग्यतेस चढविण्यासाठीं तिनें नाहीं नाहीं त्या खटपटी केल्या. एकदां असा प्रकार

घडला, कीं बाझ बहादूर म्हणून एक पठाण सरदार माळवा प्रांतांतील कांहीं भाग बळकावून बसला होता. त्याजवर अकबरानें ह्या आदमखानास पाठविलें. आदमखान हा अकबराचा विश्वासू कामदार होता. त्यानें बाझ बहादूरचा पराजय करून, त्याचा सर्व मुलूख काबीज केला. तेव्हां बाझ बहादूर पळून ब्ऱ्हाणपुराकडे चालता झाला. परंतु पुढें आदमखानानेंच अधमपणाचें वर्तन चालविलें. सर्व लूट त्यानें स्वतःकडे ठेविली, आणि बाझ बहादूरचा जनानखानाही आपल्याजवळ अडकवून ठेविला. त्यांत बाझ बहादूरची एक सुंदर स्त्री होती. तिचा अभिलाष धरून आदमखानानें तिच्या भेटीस जाण्याची वेळ नेमिली. तिला नाहीं म्हणतां येईना. ती सुंदर पोषाख करून आदमखान येण्याच्या वेळेस पलंगावर निजून राहिली. खान आल्यावर पाहतो, तों ती मेलेली दिसली. आदमखानाकडून अप्रतिष्ठा न व्हावी म्हणून तिनें विष खाऊन आत्महत्या केली होती. बाझ बहादूरच्या दुसऱ्या पुष्कळ स्त्रिया जनानखान्यांत होत्या, त्या अकबरास च्हाडया सांगतील म्हणून, महाम अनागानें सर्वांस ठार मारविलें. बाझ बहादूर हा मुसलमान असूनही हिंदुधर्माचा द्वेष करीत नसे. त्याच्या जनानखान्यांत पुष्कळ हिंदु स्त्रिया होत्या. आदमखानानें अधिकाराबाहेर काम केलें हें अकबरास खपलें नाहीं. तो एकदम फौज घेऊन आग्र्याहून आला, आणि आदमखानास बरोबर घेऊन परत गेला. पुढें त्याजपासून सर्व लूट परत घेऊन त्यास कामावरून काढिलें, आणि त्याच्या जागीं आपला गुरु पीरमहंमदखान यास नेमिलें. स्वतः बादशहा आपणावर रागावला आहे असें आदमखानास वाटलें नाहीं. महंमदखान ऊर्फ शम्सुद्दीन नांवाचा अकबराचा वजीर व त्याच्या एका आवडत्या दाईचा नवरा होता. बहरामखानाचा बंदोबस्त करण्यांत ह्यानेंच पुढाकार घेतला असून, महाम अनागाचें प्रस्थही त्यानेंच मोडिलें. म्हणून आदमखानाचा त्याजवर डोळा होता. तेव्हां हाच आपला नाश करूं पाहत आहे असें समजून, वजीर वाड्यांत काम करीत बसला असतां त्याजकडे जाऊन त्याचा आदमनें प्राणघात केला, (मे १५६२). हें वर्तमान ऐकून अकबर त्या ठिकाणीं आला. आदमखान त्यास गच्चीवर दिसला. अकबराचा हात तलवारीकडे गेला; पण झटकन आत्मसंयमन करून त्यानें आदमखानास गच्चीवरून

खालीं लोटून देण्याचा हुकूम केला. तेणेंकरून त्याचा अंत झाला. मुलाच्या दुःखानें आई महाम अनागा पुढें चाळीस दिवसांनीं मरण पावली. माळव्याच्या बंडाचा निकाल मात्र ह्या वेळीं लागला नाहीं.

मुन्यिमखान व शिहाबुद्दीन हे दोघे सरदार शम्सुद्दीनच्या खुनाचे प्रसंगीं जवळ होते; परंतु त्यांनीं आदमखानास खून करूं दिला, हें अकबरास आवडलें नाहीं. ते पळून गेले. अकबरानें त्यांस पकडून आणून क्षमा केली. मुन्यिमखान पुढें वजीर झाला. शराफुद्दीन म्हणून दुसरा एक गृहस्थ होता, त्यास अकबराची बहीण बक्षीबानू दिलेली होती. त्यानें पळून जाऊन बंड उभारिलें. त्याच्या एका गुलामानें मागें राहून अकबराचा खून करण्याचा प्रयत्न केला. दिल्ली शहरांत अकबर सायंकाळीं वाड्यांत परत येत असतां, त्या गुलामानें त्यास बाणानें घायाळ केलें. त्याबरोबर जवळचे लोक गुलामास पकडून तपास करूं लागले. परंतु तपासांत भलभलतींच नांवें बाहेर येऊन ज्यास्त त्रास होईल सबब अकबरानें त्यास एकदम मारून टाकविलें. कांहीं दिवसांनीं त्याची जखम बरी झाली. शराफुद्दीनला पकडून अकबरानें कैदेंत ठेविलें.

ख्वाजा मुअज्जम म्हणून अकबराचा मामा होता. तो मोठा व्रात्य असून बेलाशक खून वगैरे करीत असे. जहरा आगा नांवाची त्याची बायको होती; तिचा तो अतिशय छळ करी. तिची आई बिबी फातिमा हिची देखरेख हुमायूनच्या जनानखान्यावर असे. तिच्यावर अकबराची भक्ति होती. तिनें ख्वाजाची दुष्ट वर्तणूक अकबरास कळवून आपल्या मुलीचें संरक्षण करण्याविषयीं त्यास विनंती केली. अकबर शिकारीस म्हणून निघाला तो ख्वाजाच्या घरावरून गेला, आणि पुढें निरोप पाठवून त्यास कळविलें, कीं 'जरा बाहेर येऊन मला भेटा.' तें ऐकून ख्वाजास राग आला. त्यानें लगेच घरांत जाऊन, बायकोचा खून केला, आणि रक्तानें भरलेली कट्यार अकबराचे जासुदास दिली. अकबरास हें वर्तमान समजतांच तो लगेच ख्वाजाच्या घरांत गेला. ख्वाजा तलवारीस हात घालून अकबरावर चाल करणार, तोंच अकबरानें त्यास दरडावून गप्प बसविलें; आणि गरीब बायकोचा खून कां केलास, म्हणून विचारलें. त्यावर तो बादशहास शिव्या देऊं लागला. तेव्हां त्यास पकडून

अकबरानें ग्वाल्हेरच्या किल्ल्यांत कैदेंत ठेविलें, तेथेंच तो मरण पावला, (सन १५६३).

(इ) खानजमान (स. १५६६).—महंमदशहा आदिली व हिंनू यांचा निकाल लागल्यावर शेरखान नांवाचा सूर जातीचा पठाण सरदार बंगाल व अयोध्या प्रांतांकडे बंडावा चालवीत होता. त्याच्या बंदोबस्तासाठीं खानजमान नांवाचा इमानी सरदार अकबरानें रवाना केला. शेरखान हा मुलूख जिंकीत जोधपूरपर्यंत आला. खानजमाननें त्याचा पराजय करून सर्व लूट हरण केली, आणि शेवटीं स्वतंत्रतेनें राहण्याचा त्याचा झोंक दिसूं लागला. अकबरास ह्या गोष्टी कळल्या. बादशहा स्वतः आपणावर येत आहे हें समजतांच, त्यानें सर्व लूट त्याजकडे पाठवून दिली. तेव्हां बादशहा परत गेला. पण खानजमानच्या मनांतील द्वेषबुद्धि कमी झाली नाहीं. कित्येक ऊझबक लोकांनीं अयोध्याप्रांतात बंडें चालविलीं, त्यांस खानजमान व आसफखान ऊझबेक नांवाचा दुसरा एक अकबराचा सरदार, कुरा प्रांताचा सुभेदार होता तो, असे त्यास जाऊन मिळाले. तेव्हां भरपावसाळ्यांत अकबर अयोध्या प्रांतांत गेला. सर्व फौज मागें टाकून फक्त बरोबरच्या खाशा स्वारांनिशीं तो शत्रूंपाशीं पोंचला. गंगेच्या पलीकडच्या कांठीं शत्रूची फौज उतरली आहे, असें पाहून अकबर आपल्या स्वारांनिशीं रातोरात नदींतून पोहून पलीकडे गेला. मध्यें नदी असल्यामुळें अकबराच्यानें अलीकडे येववणार नाहीं, अशा समजुतीनें शत्रु स्वस्थ बसले होते. अकबरानें एकाएकीं येऊन हल्ला करितांच ते सैरावैरां पळून गेले. खानजमान मारला गेला. इतर सरदारांस पकडून अकबरानें हत्तीच्या पायीं दिलें, (सन १५६६). मग पूर्वेकडील प्रांतांत बरीच स्वस्थता झाली.

(ई) महंमद हकीम मीर्झा, (सन १५६६.).—अकबराचा सावत्र भाऊ हकीम ह्यास सुलेमान मीर्झा यानें काबुलांतून घालवून दिलें, तेव्हां तो पंजाबांत आला, व तो प्रांत हस्तगत करण्याचा विचार करूं लागला. अकबर पूर्वेकडे ऊझबेक लोकांचीं बंडें मोडण्यांत गुंतला असतां हकीमचें इकडे चांगलें फावलें. नोव्हेंबर सन १५६६ त अकबर स्वतः पंजाबांत गेला. तो आल्याची बातमी लागतांच हकीम त्वरेनें पळून काबुलाकडे गेला. तेथें सुदैवानें काबूल त्याच्या हस्तगत झालें; कारण

सुलेमान मीर्झा बदक्शान प्रांतांत गेला होता. तूर्त हकीमच्या वाटेस अकबर गेला नाहीं. त्याची हकीकत पुढें काबूलप्रकरणीं येईल.

ह्यांशिवाय आणखी अनेक सरदारांनीं दंगे केले; पण त्यांत विशेषेंकरून ऊझबेक सरदारच पुढारी असत. त्या सर्वांचा बंदोबस्त अकबरानें केला. सन १५६० पासून १५६७ पर्यंत अकबराचा काळ असलीं बंडें मोडण्यांत गेला. कोणतेंही काम त्वरेनें करण्याची अकबराची हातोटी आणि शत्रूसही क्षमा करण्याचें त्याचें औदार्य हे त्याचे गुण ह्या सर्व प्रसंगीं विशेष दृष्टोत्पत्तीस आले. अकबराच्या राज्यांत अजून स्वस्थता झाली नव्हती.

४. अकबरानें जिंकिलेले प्रदेश, (स. १५६१–१६००).

उपक्रम.—पहिलीं पांच वर्षें बहरामच्या हाताखालीं, व पुढील पांच वर्षें बंडावे वगैरे मोडण्यांत, मिळून अकबरानें ह्या दहा वर्षांत जो अनुभव मिळविला, त्यावरून आपलें राज्य लोकांस सुखावह व चिरस्थायी कसें करितां येईल, ह्याविषयीं त्याचे मनांत विचार घोळूं लागले. चारशें वर्षें झालीं, तरी मुसलमानांचें राज्य टिकाऊ झालें नाहीं. हुमायूनवरील प्रसंग त्याच्या डोळ्यांपुढें होते. अशा स्थितींत रजपूत राजांचीं मनें आपणाकडे वळवून आपलें राज्य सुरक्षित करण्याचा त्यानें निश्चय ठरविला. सर्वांस समतेनें व ममतेनें वागवावयाचें, राज्यकर्त्यांचा जाच त्यांस होऊं द्यावयाचा नाहीं, त्यांची सामाजिक व सांपत्तिक स्थिति सुधारावयाची, धर्माच्या बाबतींत कोणावर जुलूम करावयाचा नाहीं, अशा रीतीनें लोकप्रीति संपादून सर्व हिंदुस्थानदेश युक्तिप्रयुक्तीनें आपल्या ताब्यांत आणावयाचा, अशी आपली कर्तव्यमर्यादा कायमची ठरवून अकबरानें उद्योग आरंभिला. स. १५६२ त त्यानें अंबरच्या भगवानदासाच्या मुलीशीं लग्न लाविलें, लगेच हिंदूंना अत्यंत जाचक झालेला जिझिया कर त्यानें माफ केला (स. १५६२); तसेंच हिंदु यात्रेकरूंवर यात्रेच्या ठिकाणीं कर घेण्यांत येत असे, तोही त्यानें बंद केला. अशा उपक्रमानें त्यानें आपला मुख्य उद्देश कसा तडीस नेला, हें पुढें हळू हळू व्यक्त होईल.

अकबरानें आपलें राज्य चिरस्थायी करण्याकरितां ज्या ज्या युक्त्या योजिल्या, त्यांत रजपुतांशीं केलेले शरीरसंबंध ही गोष्ट मुख्य होय. पुरातन

३१–२९–९–१०–७९१–२०००

NATIONAL ARCHIVES OF INDIA

काळापासून रजपूत राजे हे हिंदुस्थानचे मालक आहेत; मुसलमानांनीं पुष्कळांस आजपर्यंत जिंकिलें, पण त्यांचा अंमल बसावा तसा बसला नाहीं. ते स्वतंत्रतेनें वागतच होते. अकबरानें त्यांजवर आपला अंमल विलक्षण रीतीनें बसविला. त्यांचीं राज्यें खालसा करण्याच्या भानगडींत तो पडला नाहीं. तर त्यांच्याशीं शरीरसंबंध जोडून आणि त्यांस आपल्या दरबारीं लष्करी व इतर खात्यांत मोठमोठीं कामें देऊन, आपलेसें करून घेतलें. अफगाण हे मोगलांचे शत्रु होते. अफगाणांचा पाडाव करण्यास रजपूत आपणास चांगले उपयोगी पडतील, हें अकबरानें पक्कें ताडिलें, आणि आपल्या बादशाही साम्राज्याची व्यवस्थाच त्यानें अशा प्रकारची ठरविली, कीं तींत सर्व प्रकारच्या व सर्व जातींच्या लोकांचा समावेश व्हावा. रजपूत व मुसलमान ह्यांस त्यानें एका माळेंत गोवून दिलें. ह्या कृत्यांत अकबरास जें यश आलें, आणि जे प्रमाद त्याच्या हातून घडले, त्यांजपासून सर्व राज्यकर्त्यांनीं सर्वदा बोध घेण्यासारखा आहे.

(अ) रजपूत राज्यें,(स.१५६१–१५६७).—जयपूर. स.१५६१त अकबर रजपुतान्यांत गेला. त्या वेळेस जयपूर संस्थानचा रजपूत राजा बहारमल्ल यानें आपली मुलगी अकबरास दिली. त्याजबद्दल त्या राजास व त्याचा मुलगा भगवानदास ह्यास अकबरानें आपल्या लष्करांत सरदारी देऊन ठेविलें.

जोधपूर, (स. १५६१).—अकबर अजमिरास गेला असतां त्यानें मीर्झा शरीफुद्दीन हुसेन ह्यास जोधपूरच्या राजाचा मेढतें किल्ला काबीज करण्याकरितां पाठविलें. राजा मालदेव ह्यानें हुमायुनास त्रास दिला होता, आणि तो अकबरासही एकदम शरण आला नाहीं. मेढत्याचा किल्ला घेण्यास अकबराच्या फौजेस फार प्रयास पडले. आंतील अन्नसामुग्री संपेपर्यंत किल्ला मोगलांच्या स्वाधीन झाला नाहीं. अर्धे रजपूत लोक लढून मेले, तेव्हां राजा मालदेव अकबरास शरण आला. त्याचा अकबरानें आपल्या दरबारीं उत्तम सन्मान केला. दरबारांत बादशहाच्या उजव्या बाजूस त्यास जागा मिळाली, आणि ज्यास्त मुलूखही बादशहाकडून त्यास प्राप्त झाला. मालदेवानें आपली मुलगी जोधाबाई अकबरास दिली, तिचाच मुलगा सलीम होय. ह्याप्रमाणें दुसरे अनेक रजपूत राजे अकबरास शरण आले.

मेवाड.—मेवाडचा राणा उदयसिंह ह्यानें अकबराचें सार्वभौमत्व कबूल केलें नाहीं. तो आपणाला स्वतंत्र समजे, आणि सर्व

रजपूत राजांत आपण श्रेष्ठ व सार्वभौम आहों, असें तो आपणास मानी. तो अकबरास शरण गेला नाहीं. त्यास जिंकिल्याशिवाय रजपुतान्यावर आपला अंमल बसावयाचा नाहीं, हें अकबर पूर्णपणें ओळखून होता. बाझबहादूर माळव्यांतून पळून गेला, त्यास उदयसिंहानें आश्रय दिला. तेव्हां ऊझबेक लोकांच्या बंडांतून मोकळा होतांच तो स्वतः माळव्यांतून चितोडगडावर चालून आला, (१५६७). चितोडगड किल्ल्याच्या संरक्षणार्थ आठ हजार लोक ठेवून राणा उदयसिंह दुसऱ्या एका अवघड जागीं जाऊन राहिला. ह्या वेळपर्यंत अकबरानें तोफखाना बाळगिला नव्हता. हा किल्ला घेण्याचें काम त्यानें स्वतः तडीस नेलें. चितोगड चारशें फूट उंच असून वर अगदीं अवघड आहे. तो अकबराच्यानें काबीज करवणार नाहीं, असें उदयसिंहास वाटलें होतें. किल्ल्यांत धान्य, दारूगोळा, वगैरे भरपूर सामान असून, आठ हजार शूर शिपाई जयमल्लाच्या हाताखालीं लढण्यास सिद्ध होते. जयमल्ल व अकबर ह्या दोघांनीं लढाईची व हरएक युक्तीची शिकस्त केली. अकबराचाही निश्चयच झाला होता, कीं हा किल्ला घेतल्याशिवाय राहवयाचें नाहीं. कारण अकबराच्यानें हिंदुस्थानांतला अमुक एक किल्ला काबीज करवला नाहीं, असें पुनः लोकांनीं म्हणूं नये. जयमल्लास 'संग्राम' नांवाच्या आपल्या बंदुकीनें ठार केलें, तेव्हांच किल्ला हस्तगत झाला. त्या वेळीं रजपुतांनीं जोहार करून लढण्यांत प्रळय उडविला, त्याची आठवण कधीं नाहींशी होणार नाहीं. चितोड येथें अकबरानें दाखविलेलें युद्धकलानैपुण्य त्या वेळच्या युद्धकलाविशारद पाश्चात्य सेनानायकांच्या अंगीं सुद्धां नव्हतें असें अनेकांचें मत आहे. चितोडगडावर अकबरास जय मिळाल्यामुळें रजपुतान्यांत जिकडे तिकडे स्वस्थता झाली. बहुतेक राजे स्वसंरक्षणार्थ अकबरास शरण आले. उदयसिंहानें मात्र त्यास दाद दिली नाहीं. राजधानी मुसलमानांच्या ताब्यांत गेली, तरी कित्येक वर्षें त्याच्या कुटुंबानें अरण्यवासांत काढिलीं, आणि शेवटीं अकबराच्या तोंडून आपलें स्वातंत्र्य कबूल करविलें.

सन १५६९ सालीं रतनभोर व कलिंजर हीं रजपुतांचीं ठिकाणें अकबरानें काबीज केलीं. सन १५७०त बिकानेरचा राजा कल्याणमल्ल ह्यानें आपल्या भावाची मुलगी बादशहास दिली; आणि बादशहानें

राजास आपल्या लष्करांत मनसबगिरी दिली. कल्याणमल्ल व त्याचा मुलगा राय रायसिंग हे पुढें पुष्कळ दिवस बादशाही नोकरींत होते.

(आ) गुजराथ, (१५७२-७३).—हिंदुस्थानांतील निरनिराळे प्रांत आपल्या ताब्यांत आणून आपलें राज्य सलंग्न करण्याचा अकबराचा मनोदय मूळपासून होता. शिवाय ज्या ज्या ठिकाणीं त्याच्या बापास त्रास पडला, ते प्रांत तर अवश्य जिंकावयाचे अशी त्याची इच्छा होती. त्यास अनुसरूनच गुजराथ, बंगाल वगैरे प्रांत त्यानें जिंकून आपल्या अंमलाखालीं आणिले. गुजराथेंत या समयीं मोठी अंदाधुंदी सुरू होती, हें त्या प्रांताच्या इतिहासांत सांगितलेंच आहे. तयमूरच्या वंशांतील सुलतान मीर्झा ह्या नांवाचा एक राजपुत्र बाबरबरोबर हिंदुस्थानांत आला होता. त्यास हुमायूननें अंतर्वेदींत संवळच्या सुभ्याचें काम दिलें होतें. पुढें त्याच्या मुलांनीं बंडें केलीं. माळवाप्रांतांत अकबरानें त्यांचा मोड केल्यावर ते गुजराथेंत पुंडाई करीत होते. शिवाय, गुजराथच्या गादीबद्दल लागलेले तंटे मोडण्याकरितां इतिमादखान नामक सरदारानें अकबरास गुजराथेंत बोलाविलें. त्याप्रमाणें सन १५७२च्या सेप्टेंबर महिन्यांत अकबर दिल्ली सोडून गुजराथेंत पाटण येथें आला. तेथील सुलतान मुज़फरशहा यानें अकबरास शरण येऊन सर्व राज्य त्याच्या स्वाधीन केलें. त्यास अकबरानें दिल्लीस नेऊन बंदोबस्तांत ठेविलें. तेथून कांहीं दिवसांनीं चुनारगड येथें व पुढें गौड येथें त्याची रवानगी झाली. अकबरानें अजीज कोका नांवाच्या सरदारास गुजराथचा सुभेदार नेमिलें, आणि प्रांताच्या बंदोबस्ताची सर्व व्यवस्था केली. सुरत, भडोच व चांपानेर येथें वर सांगितलेले मीर्झा फौजबंद राहिले होते, त्यांजवर जाऊन अकबरानें त्यांचा पाडाव केला. तिकडे अकबराच्या फौजेनें त्यांचा पाठलाग करून त्यांस ठार मारिलें. त्यांच्याशीं गुजराथेंत लढतांना एकदां आनंदनजीक सारसा येथें अकबरावर जिवावरचा प्रसंग आला होता. परंतु जयपूरचा राजा भगवानदास व त्याचा पुतण्या मानसिंह यांनीं विलक्षण पराक्रम करून अकबराचा जीव वांचविला, आणि अखेरीस अकबराची फत्ते झाली. पुढें ते मीर्झा पंजाब व माळव्याकडे पळाले. गुजराथचा बंदोबस्तकरून अकबर आग्र्यास आला. पुढें स. १५७३ त अहंमदाबादेहून अकबर खंबायतेस जाऊन, तेथें

त्यानें यावज्जन्मांत प्रथम समुद्रदर्शन घेतलें. तेथें एक आठवडा राहून अकबर बडोद्यास आला. तेथें त्यानें गुजराथच्या बंदोबस्ताची सर्व व्यवस्था लावून दिली. नंतर भडोच घेऊन अकबर सुरतेस गेला. सुरत घेण्यास तर फारच प्रयास पडले. तेथील तट फार मजबूत होता. अकबरानें दीड महिना वेढा चालवून सुरत काबीज केलें; आणि सर्व बंदोबस्त करून स. १५७३ च्या जून महिन्यांत अकबर आग्र्यास परत गेला. समुद्रावर पोर्तुगीझ लोकांनीं काय उद्योग चालविले आहेत, ह्याची कल्पना अकबरास या स्वारींत प्रथम झाली. गुजराथेंत पुनरपि बंड झाल्याची बातमी आली. महंमद हुसेन मीर्झा व गुजराथचा एक पदच्युत सुलतान ह्यांनीं तेथें दंगा चालविला. अकबर विलक्षण चपळ होता. प्रसंग पडल्यावर तो वाटेल तें काम तेव्हांच उरकून टाकीत असे. त्यानें दोन हजार स्वार पुढें एकदम रवाना केले, आणि लागलेच खास तैनातींतील तीनशें इसम बरोबर घेऊन सांडणीवर बसून तो लांब लांब मजला मारीत पाटण येथें आला. नऊ दिवसांत साडेचारशें मैलांची त्यानें मुशाफरी केली. पाटण येथें त्याची फौज तीन हजार होती. विश्रांति न घेतां तो लागलाच अहंमदाबादेवर चाल करून आला. अहंमदाबादेस जी अकबराची थोडी फौज होती, तिला वेढा पडला होता. अकबर इतक्या त्वरेनें आला, हे शत्रूंच्या लोकांस खरें सुद्धां वाटलें नाहीं. अकबरानें उतावळीनें लढाई सुरू करून बंडखोरांस जिंकून ठार मारिलें; आणि पुनरपि गुजराथचा सुभा अजीज कोका याच्या स्वाधीन करून, अहंमदाबादच्या आसपास त्यास जहागीर तोडून दिली. दिल्लीस परत गेल्यावर गुजराथप्रांताची जमाबंदी व नवीन व्यवस्था ठरविण्याकरितां बादशहानें प्रसिद्ध खत्री अंमलदार राजा तोडरमल्ल यास पाठविलें. त्यानें गुजराथप्रांताची दरोबस्त पाहणी केली; आणि प्रतबंदी व दरठरोती करून तोडरमल्ल दिल्लीस परत गेला. अजीज कोका हा फार सात्विक वृत्तीचा होता. राज्यकारभाराची दगदग न आवडून तो विरागी होऊन दिल्लीस जाऊन राहिला. पुढें माळव्याचा अधिकारी शहाबुद्दीन अहंमदखान व इतिमादखान हे गृहस्थ कांहीं दिवस अहंमदाबादच्या सुभेदारीवर होते. सुलतान मुज़फर बंगाल्यांतून सुटून पुनरपि गुजराथेंत आला, आणि अहंमदाबाद काबीज करून त्यानें बंड चालविलें. त्यानें बडोद्याचा अंमलदार कुत्बुद्दीन ह्यास ठार मारून

बहुतेक गुजराथप्रांत हस्तगत केला. तें अकबरास कळल्यावर त्यानें बहरामखानाचा पराक्रमी मुलगा मीर्झाखान यास गुजराथच्या बंदोबस्तास पाठविले, (१५८३). मीर्झाखानानें मुज़फ्फरशहाचा पराभव करून अहंमदाबादचा बंदोबस्त केला. ह्या पराक्रमाबद्दल अकबरानें खूश होऊन मीर्झाखानास खानखानान ही पदवी दिली. अकबर व जहांगीर ह्यांच्या कार्किर्दीत हा सरदार फार प्रमुख होता. पुढें सन १५९० त मीर्झाखानास अकबरनें परत बोलावून अजीज कोका यास पुनरपि गुजराथचें काम दिलें. त्या वेळीं मुज्फरशहा रानावनांतून भटकत होता. त्यास कच्छप्रांतांत अजीज कोकाचा मुलगा अब्दल्ला ह्यानें पकडिलें. तेथून जुनागडास येत असतां रस्त्यांत मुज्फरनें वस्त्र्यानें आपली मान कापून आत्महत्या केली, (स. १५९२). त्याचा मुलगा बहादूर ह्यानें पुढें बरेच दिवस बंड चालविलें, तो जहांगीरच्या वेळेस स. १६१४ त मरण पावला. इकडे स. १५९० त अजीज कोका गुजराथचा बंदोबस्त केल्यावर, बादशहाच्या परवानगीशिवाय मक्केस निघून गेला. तेव्हां अकबरानें गुजराथची सुभेदारी आपला मुलगा मुराद यास दिली. त्यास पुढें अहंमदनगरास जावें लागलें, आणि तिकडे मुराद मरण पावल्यावर अजीज कोका मक्केहून परत आला होता, त्यास पुनरपि अकबरानें गुजराथच्या सुभ्यावर नेमिलें. अकबर मरण पावला त्या वेळेस हाच गृहस्थ गुजराथच्या कामावर होता. कोका म्हणजे दूधभाऊ. अजीम हा अकबराच्या प्रमुख सरदारांपैकीं असून त्याची एक मुलगी मुराद यास व दुसरी खुस्रूस दिलेली होती.

(इ.) बंगाल, (१५७५).—आपल्या बापास बंगाल्यांत जाच झाला, सबब तो सधन प्रांत जिंकून आपलें राज्य एकछत्री करण्याची अकबरास मोठी उत्कंठा होती. बंगाल, बहार व ओढ्या ह्या तीनही प्रांतांवर सूरवंशी सुलतानांचे अफगाण अंमलदार स्वतंत्र कारभार करून होते. पहिला अंमलदार ताजखान म्हणून होता. तो मेल्यावर त्याचा भाऊ सुलेमान कारभार करूं लागला. प्रथम तो तांडा येथें राहत असे. पण पुढें पाटणास गेला. तांडा हें गोगरा नदीच्या काठीं अयोध्येच्या दक्षिणेस आहे. सुलेमान १५७२ त मेल्यावर त्याचा मुलगा दाऊद कारभार पाहूं लागला. सुलेमाननें सामदामानें वागून अकबराशीं तंटा उपस्थित केला नाहीं. पण दाऊद एकदम स्वातंत्र्य धारण करून अकबरास जुमानीना. तेव्हां अक-

NATIONAL ARCHIVES OF INDIA

-बरानें स्वत: स्वारी करून पाटणा शहर काबीज केलें, (स. १५७४), आणि दर्यापूरपर्यंत दाऊदचा पाठलाग केला. तेथून अकबर परत आग्र्यास आला, तो पुनरपि बंगालप्रांतांत कधीं गेला नाहीं. परत येतांना अकबरानें मुन्यिमखान व तोडरमल्ल ह्या दोन सरदारांस बंगालप्रांत जिंकण्यासाठीं ठेविलें, आणि आपण परत आला. ह्या दोघां सरदारांच्या दाऊदखानाबरोबर दोन तीन लढाया झाल्या. दाऊदखान प्रथम तांडा येथें पळून गेला; आणि त्यानें लांबून बंडाळी चालविली. सन १५७५ त बंगाल, बहार व ओढ्या हे तीनही प्रांत अकबराच्या अंमलाखालीं आले. मुन्यिमखान हा ह्याच वेळेस तांडा येथें मरण पावला. पुढें मुन्यिमखानच्या जागीं हुसेन कुलीखान ऊर्फ खानजहान ह्याची नेमणूक झाली. तो बहरामखानच्या वहिणीचा मुलगा होता. त्याच्या अंगीं बहरामची तडफ होती. त्यानें दाऊदचा जोरानें पाठलाग करून त्यास पकडून ठार मारिलें. पुढें स. १५७८ त खानजहान मरण पावल्यावर बंगाल्यांत पुनरपि बंडाळी चालू झाली. नवीन जिंकिलेल्या बंगालप्रांतांतून जबरीनें पुष्कळ वसूल गोळा करण्यासाठीं लहान मोठे अनेक अधिकारी अकबरानें त्या प्रांतांवर सोडिले, त्यांस रयत त्रासून गेली. फौजेंत ठेवावयाचे घोडे सरकारांत पास करितांना, त्यांजला डागून खूण करीत. त्यामुळें घोडे मिळेनातसे झाले, आणि फौजेंत भरती होईना. हा असंतोष वाढून बंगालचा नवीन अमलदार मुज्फरखान ह्याचा तांडा येथें खून झाला, (१५८०). ह्या बंगालच्या बंडखोरांस अकबराचा सावत्र भाऊ मीर्झा हकीम ह्याची काबुलांतून मदत होती. पण व्यसनी व भित्रा असल्यामुळें तो काबुलांतून बाहेर आला नाहीं. नाहीं तर त्याजपासून अकबरास फार त्रास झाला असता. स. १५८१ त हकीमवर नजर ठेवण्यकरितां अकबर स्वतः पंजाबांतून थेट काबूल येथें गेला. पण हकीमची त्याची प्रत्यक्ष भेट न होऊन आणि हें प्रकरण ज्यास्त वाढवूं नये असा शहाणपणाचा बेत करून अकबर परत आला. वास्तविक बंगाल्यांतील बंड अकबराच्या कार्किर्दीत कायमचें मोडलें नाहीं. पुढें जहांगीरच्या कार्किर्दीत बंगालप्रांतांत स्वस्थता झाली. कांहीं वर्षांनीं बंगालप्रांताचा कारभार राजा मानसिंह यास मिळाला. त्या प्रांतांत आणखी बरेच दंगे झाले, पण अकबराच्या फौजेनें त्या सर्वांचा बंदोबस्त केला, (१५९२).

NATIONAL ARCHIVES OF INDIA

(ई.) काबूल, (१५७९).—सन १५७५ पासून अकबराचीं तीन चार वर्षें शांततेंत गेलीं. त्या अवकाशांत त्यानें राज्यव्यवस्थेंत कित्येक सुधारणा केल्या, आणि शिक्री व आग्रा येथें इमारती बांधिल्या. तो बहुशः दिल्लीस न राहतां ह्या दोन ठिकाणीं राहत असे. सन १५७९ त त्याचा भाऊ महंमद हकीम मीर्झा काबुलास राज्य करीत होता, त्यानें राज्यलोभानें पंजाबप्रांतावर स्वारी केली. पंजाबांत राजा मानसिंह कारभारावर होता, त्याचा हकिमानें पराभव केला. हें वर्तमान कळतांच अकबर एकदम पंजाबांत गेला. त्यासरशी हकीम परत काबुलास गेला. शहाजादा मुराद यास अकबरानें फौज देऊन हकिमाचा पाठलाग करण्यास काबुलास पाठविलें. मुरादचा पराजय झाला. तेव्हां अकबरानें स्वतः जाऊन हकिमाची खोड मोडिली. काबूलप्रांताचें काम त्यानें पुनरपि हकिमास दिलें, तरी तो पुनः कदाचित् दंगा करील म्हणून जयपूरचा राजा भगवानदास यास काबूल येथें ठेविलें. परत येतांना अकबरानें अटकचा किल्ला पुनः बांधिला. हकीम मीर्झा स. १५८५ त मरण पावला. त्यासही दारूचें व्यसन असून, मरणसमयीं त्याचें वय फक्त ३१ वर्षांचें होतें. हकीमच्या मृत्यूची वार्ता ऐकून अकबरानें लगेच राजा मानसिंहास काबुलास पाठविलें; आणि आपणही स्वतः पंजाबांत गेला. मानसिंगानें काबुलांतील घोटाळे मोडून सर्व पक्षांस संतोषकारक अशी व्यवस्था केली. स. १५८९ त अकबर पुनः काबुलांत गेला. तेथें दोन महिने त्याचा मुक्काम होता. तेथें त्यानें पूर्वजांच्या कबरींचें दर्शन घेतलें. परत येतांना बह्रामखानचा मुलगा खानखानान ह्यानें अकबरास बाबरच्या आत्मचरित्राची प्रत नजर केली.

(उ.) कश्मीर, (१५८७).—काश्मीरसारखा सुंदर प्रदेश आपल्या ताब्यांत असावा अशी अकबराची फार इच्छा होती. ह्या समयास काश्मिरांत पुष्कळ अव्यवस्था चालू होती. तरी तो प्रांत जिंकण्यास अकबरास फार अडचणी होत्या. तेथील रस्ते फार बिकट असून लोक हट्टी व शूर होते.

काश्मीरचा राजा युसुफ् अकबराचें सार्वभौमत्व कबूल करीना. तेव्हां अकबरानें मोठी फौज व सर्व नामांकित सरदार पंजाबांत गोळा करून त्यानें सर्व सरहद्दीवरील प्रदेशांत त्यांस रवाना केलें. त्यांत काश्मिरावर

राजा भगवानदास ह्यास पाठविलें, त्याचा विशेष उपयोग झाला नाहीं. दुसऱ्या वर्षी महंमद कासीमखान ह्याचे हाताखालीं जी फौज गेली, तिनें काश्मीरच्या राजास पकडून आणिलें. तेव्हां काश्मीरप्रांत अकबराच्या राज्यास जोडला जाऊन, तेथील राजास अकबरानें बहारप्रांतांत लहानशी जहागीर देऊन ठेविलें.

पण त्या बाजूचे तंटे अद्यापि मिटले नव्हते. पेशावरच्या पलीकडील अफगाण लोकांस जिंकण्याची अकबराची इच्छा होती. हे अफगाण युसफझै जातीचे असून ते हिंदुकुश पर्वताच्या पहाडी प्रदेशांत राहत असत. वर ज्या अनेक फौजा अकबरानें पाठविल्या म्हणून सांगितलें, त्यांत झैनखान कोका, मागें सांगितलेला अकबराचा दूधभाऊ, ह्यास त्या अफगाण लोकांवर अकबरानें पाठविलें. डोंगराळ प्रदेशांत जेव्हां मोगल फौज शिरली, तेव्हां अफगाण लोकांनीं रात्रीच्या समयीं तिचा चांगलाच समाचार घेतला. त्यांच्या परत येण्याच्या सर्व वाटा बंद झाल्या. राजा बीरबल व त्याचे आठ हजार लोक हे एका भयंकर घाटांत अफगाण लोकांचे हातून ठार झाले, (फेब्रुवारी १५८६ त). दुसऱ्या बाजूनें खैबर-घाटांतून तोडरमल्ल व राजा मानसिंह गेले होते, त्यांस चांगली जयप्राप्ति झाली. तेव्हां ह्या अफगाण लोकांबरोबर कांहीं करार करून अकबरानें आपली फौज परत आणिली. ह्या स्वारींत त्याची जी खराबी झाली, तशी पूर्वी कधीं झाली नव्हती. अफगाण लोक मोगलांच्या अंमलाखालीं आले नाहींत. झैनखानाचा बाप नेहमीं हमीदाच्या हौद्याजवळ हजर असे. त्याची बायको लहानपणीं अकबराची दाई होती. ह्या स्वारींत झैनाखानाचा पराजय होऊन त्याची बहुतेक फौज कापली गेली. एवढा मोठा फौजेचा नाश अकबराच्या एकंदर कार्किर्दींत कधीं झाला नाहीं. अगोदरच खानानें ताबडतोबीनें अकबराकडे मदत मागितली होती. ह्या मदतीबरोबर कोणास पाठवावें हा विचार चालून, अबुल् फजूल् व बीरबल ह्या दोघांच्या नांवाच्या चिठ्या टाकून पाहतां, बीरबलाच्या नांवाची चिठ्ठी निघाली.त्याप्रमाणें बीरबलाची रवानगी स्वारींत झाली.वास्तविक बीरबलाच्या मनांत जावयाचें नव्हतें; आणि त्यास युद्धाचा प्रत्यक्ष अनुभवही नव्हता. झैनखान अनुभवी आहेच, तेव्हां बीरबल गेला

तरी हरकत नाहीं अशा समजुतीनें अकबरानें त्यास रवाना केलें. आपणास लोकांनीं भित्रा म्हणूं नये, म्हणून बीरबलही मोठ्या हिंमतीनें गेला.

बीरबलाच्या मृत्यूचें वर्तमान अकबरास अटक येथें समजून त्यास अतोनात दुःख झालें, आणि सेनापति निवडण्याचा प्रश्न आपण चिठ्या टाकून ठरविला ह्याबद्दल त्यानें अत्यंत खेद केला. अटक येथें अकबर तीन महिने होता, त्या अवधींत तोफा ओतणें, गोळीबार उडविण्याचा अभ्यास करणें, सरहद्दीच्या बंदोबस्ताची व्यवस्था लावणें आणि जिंकिलेल्या प्रांतांत वसुलाची व इतर तजवीज करणें ह्या गोष्टी तो अहर्निश करीत होता. अटक येथें काश्मीरचा यूसुफ्शहा त्यास शरण आला. तथापि काश्मीरप्रांत पूर्णपणें ताब्यांत आला नाहीं, म्हणून आग्र्याचा किल्ला बांधणारा कासीमखान ह्यास त्यानें काश्मिरांत पाठविलें. त्यानें तो प्रांत नीट रीतीनें जिंकिल्यावर, एप्रिल सन १५८९त अकबर स्वतः काश्मीर प्रांतांत शिरला, आणि दोन महिन्यांत तेथील कारभाराची सुव्यवस्था लावून तेथून तो काबुलास गेला. सेप्टेंबरांत त्यास तेथें अशी खबर कळली, कीं आपला हुशार मुत्सद्दी राजा तोडरमल्ल हा मरण पावला. ह्या बातमीनें त्यास अत्यंत दुःख झालें, आणि तो एकदम लाहोरास परत आला.

तोडरमल्ल गुजराथच्या स्वारींत प्रथम प्रसिद्धीस आला. त्यानंतर त्यानें अनेक मोठमोठीं कामें केलीं. राजा बीरबल मरण पावल्यावर मानसिंह व तोडरमल्ल ह्या दोघांनीं सरहद्दीवरील अफगाण लोकांची खोड मोडून बीरबलाच्या मरणाचा सूड उगविला. पुढें वृद्धापकाळ झाल्यामुळें तोडरमल्लानें गंगेच्या कांठीं जाऊन राहण्याची परवानगी मागितली. प्रथम अकबरानें कबुली दिली. तथापि लाहोरासच स्वस्थ बसून होईल तो उद्योग करा, असें अकबरानें त्यास सांगून हरिद्वारहून परत आणविलें. तेव्हांपासून तो लाहोरास होता. त्याच्या अंत्यविधीस राजा भगवानदास हजर होता, तोही स्मशानांतून परत आल्याबरोबर लगेच मरण पावला. एवंच हे दोन मोठे सरदार एकदम परलोकवासी झाले.

(ऊ.) सिंधप्रांत, (सन १५९२).—मीर्झा अजीज कोका हा गुजराथप्रांताचा सुभेदार होता. त्यानें सन १५८९ त काठेवाडांतील जामराजास जिंकण्याचा प्रयत्न केला, पण तो सफल झाला नाहीं. पुढचे वर्षी त्यानें जुनागड काबीज केलें. सिंधप्रांतांत अर्घून घराण्याचा शेवट

होऊन तेथें कित्येक इराणी सरदार अंमल करीत होते. त्यांचे आपसांत तंटे लागले होते. ही संधि साधून अकबरानें लाहोराहून उत्तरेच्या बाजूनें सिंधप्रांतावर फौज रवाना केली. सावान नांवाचा किल्ला नाक्यावर होता, त्याजवर मोगल फौजेनें हल्ला केला. गुजराथची फौज घेऊन मीर्झा अजीजही दक्षिणेकडून सिंधप्रांतावर गेला होता. मीर्झा जानीबेग नांवाचा गृहस्थ सिंधप्रांतांत स्वतंत्र कारभार करीत होता, तो अकबराच्या फौजेशीं लढण्याकरितां होड्यांतून मोठा तोफखाना घेऊन आला. लढाई निकराची झाली. आरंभीं जानीबेगनें मोगलांस मागें हटविलें. तेथें आपलें कांहीं चालत नाहीं असें पाहून मीर्झाअजीमखानानें मोगल फौज ठट्टाशहर काबीज करण्यास पाठविली. त्याजबरोबर जानीबेगनेंही आपली अर्धी फौज ठट्टाशहरावर पाठविली. पण असें केल्यामुळें मोगल फौजेस इकडे जयप्राप्ति झाली. सिंधप्रांत अकबराच्या ताब्यांत आला आणि जानीबेग ह्यास मोगल लष्करांत नोकरी मिळाली.

कंदाहार, (सन १५९४).—इराणची मदत घेऊन हुमायूननें कंदाहार काबीज केलें होतें. त्या वेळेस इराणचा शहाजादा मरण पावल्यामुळें ठरलेल्या कराराअन्वयें तें ठिकाण इराणच्या शहास मिळालें नाहीं. हुमायून गादीवर बसण्याच्या सुमारास इराणच्या शहानें आपली फौज पाठवून कंदाहार काबीज केलें, तें सन १५९४ पर्यंत इराणच्या ताब्यांत होतें. ह्या वर्षी अकबरानें आपली फौज कंदाहारवर पाठविली. तेव्हां लढाई केल्याशिवाय किल्ला व सभोंवारचा प्रदेश अकबराच्या स्वाधीन झाला. कंदाहार येथें जो इराणी सरदार होता, त्यास अकबरानें आपल्या फौजेंत नोकरीस ठेवून त्यास मुलतान प्रांताची सुभेगिरी दिली.

सुलतान शहा आब्बास हा इराणांत राज्य करीत होता. स्वराज्यांतच त्यास पुष्कळ काम असल्यामुळें कंदाहार परत घेण्याच्या भरीस तो पडला नाहीं. त्याची व अकबराची दोस्ती होती. कंदाहार ताब्यांत आल्यानें अकबराच्या ताब्यांत अफगाणिस्तानपासून बंगालच्या उपसागरापर्यंतचा सर्व प्रदेश आला. सिंधुनदीच्या पश्चिमेकडील वडिलोपार्जित सर्व राज्य त्याच्या कबज्यांत आलें. काश्मीर, बंगाल, बहार, ओढ्या व आसाम, हे प्रांत त्याच्या ताब्यांत आलेच होते. गुजराथचा बंडखोर सुलतान मुज्फरशहा मरण पावल्यामुळें, त्या प्रांतांतील सर्व बखेडे नाहींसे झाले. उदेपूरच्या

राण्याशिवाय इतर सर्व रजपूत राजांनीं त्याचें सार्वभौमत्व कबूल केलें. एवंच नर्मदेच्या उत्तरेस जेवढा प्रदेश अकबराच्या ताब्यांत आला, तेवढा पूर्वी कधींही एका राजाच्या अंमलाखालीं नव्हता. येणेंप्रमाणें सर्वत्र स्वस्थता झाल्यावर दक्षिण देशाकडे लक्ष देण्यास अकबरास फुरसत मिळाली.

(ऋ) महाराष्ट्र,-अहंमदनगर,-खानदेश—(१५९५-१६००). उत्तरेकडील भानगडींत गुंतला असतां दक्षिणेंत काय प्रकार घडत आहेत इकडे अकबरानें दुर्लक्ष केलें नव्हतें. सन १५७२ त अहंमदनगरच्या निजामशहानें वऱ्हाडप्रांत जिंकिला, त्यामुळें निजामशहाची सत्ता वाढली हें अकबरास खपलें नाहीं. पण प्रथम त्यास स्वस्थ बसावें लागलें. पुढें अहंमदनगरच्या राज्यांत घोटाळे उत्पन्न झाले. दाक्षिणी व परदेशी ह्या पक्षांचे तंटे माजून सर्व राजधानींत कहर उसळला. तेव्हां बुऱ्हाण निजामशहा पूर्वीच अकबराकडे येऊन राहिला होता, तो अहंमदनगरास जाऊन निजामशाहीच्या तख्तावर बसला. पुढें सन १५९० त दक्षिणच्या सर्व राजांकडे वकील पाठवून त्यांस आपलें सार्वभौमत्व कबूल करण्याविषयीं अकबरानें निरोप धाडिले. परंतु सर्वांनीं ती गोष्ट नाकबूल केली. पुढें आपला पुत्र मुराद ह्यास त्यानें गुजराथचा सुभेदार नेमून पाठविलें, आणि जेणेंकरून अहंमदनगरांत आपला प्रवेश होईल असे उपाय करण्याविषयीं त्यास ताकीद दिली. तसेंच बहरामखानचा मुलगा मीर्झाखान ऊर्फ खानखानान ह्यास फौज देऊन अकबरानें दक्षिणेंत पाठविलें. मीर्झाखान प्रथम मांडवगडास गेला. इतक्यांत बुऱ्हाणशहा मरण पावून अहंमदनगरास गादीविषयीं तंटे लागले, आणि तेथच्या वजिरानें गुजराथचा अंमलदार शहाजादा मुराद ह्याजकडे मदत मागितली. मुरादही बापाची परवानगी घेऊन अहंमदनगरास गेला. मीर्झाखानाची व त्याची गांठ पडली. अहंमदनगरच्या फौजेचें आधिपत्य चांदबिबीनें स्वीकारिलें. तिनें अहंमदनगरच्या वेढ्यांत असा कांहीं विलक्षण पराक्रम केला कीं मोगल फौजेचें कांहींएक चाललें नाहीं. अखेरीस दोनही फौजा टेंकीस आल्यावर वऱ्हाडप्रांत मोगलांस देऊन चांदबिबीनें तह केला, (१५९६). मुराद वऱ्हाडप्रांत घ्यावयास गेला, पण त्यास तो मिळाला नाहीं. त्या प्रांताबद्दल सर्व दक्षिणच्या राजांच्या तक्रारी होत्या. त्या सर्वांनीं एक मत करून मोगलांशीं लढण्याची तयारी केली. गोदावरीच्या कांठीं सुपें

येथें तीन दिवस निकाराचें युद्ध झालें, परंतु जयापजयाचा निकाल लागला नाहीं. मीर्झाखान व मुराद यांचें वांकडें आलें. मीर्झाखान शत्रूस फितूर आहे असा अकबरास संशय आला. तेव्हां त्यास परत बोलावून बादशहानें आपल्या भरंवशाचा सरदार अबुल् फज्ल् यास दक्षिणेंत पाठविलें. अबुल् फज्ल् हा त्या वेळीं अडीच हजार स्वारांचा मनसबदार होता. तो ताबडतोब बऱ्हाणपुरास आला. तेथचा राजा बहादूरखान याची त्यानें मदत मागितली. ती बहादूरखाननें दिली नांहीं आणि अबुल् फज्ल् यास लांच देऊन परत लावण्याचा त्यानें प्रयत्न केला. तो प्रयत्न सफळ झाला नाहीं, आणि अबुल् फज्ल् एकटाच अहंमदनगरास आला. रस्त्यांत मुराद परत येत होता तो त्यास भेटला. तेथून मुराद वऱ्हाडांत गेला. अहंमदनगर आपल्या हातून काबीज होत नाहीं, ह्याजबद्दल त्यास अत्यंत लज्जा व खेद वाटून त्यांतच त्याचा मद्यपानाचा नाद अनावर झाला होता. खानदेशच्या बहादूरखानच्या मुलीशीं त्यानें लग्न केलें होतें. पुढें हा शहाजादा बऱ्हाणपूरच्या दक्षिणेस शहापूर (ऐने अकबरी—जालनापूर) येथें एकाएकीं मरण पावला, (१५९८). तेव्हां इतर सरदारांनीं दिल्लीस परत जाण्याविषयीं अबुल् फज्ल् यास आग्रह केला. ही गोष्ट त्यास बरी न वाटून तो तसाच अहंमदनगरवर चाल करून गेला, आणि तिकडचे घोटाळे व आपल्या सरदारांची फितुरी पाहून, त्यानें खुद्द अकबरास तिकडे येण्याविषयीं लिहिलें. आज चौदा वर्षे अकबर सिंधुनदाच्या आसपासच्या प्रांतांत राहत होता. तेथून निघून सन १५९९ ह्या वर्षी प्रथमच तो नर्मदा उतरून दक्षिणेंत बऱ्हाणपुरास आला. त्यापूर्वीच दौलताबादचा किल्ला मोगलांनीं घेतला होता. अहंमदनगरचा किल्ला काबीज करण्याकरितां अकबरानें आपला मुलगा दानियाल व खानखानान यांस पाठविलें. अहंमदनगरांत बेबंदशाही चालू होती. कोणीं दुष्टांनीं पराक्रमी चांदाबिबीचा खून केला, (जुलई १६००), तेव्हां निजामशाहीस कोणीच त्राता उरला नाहीं, आणि अहंमदनगर राजधानी अकबराच्या फौजेनें काबीज केली, (सन १६००). तरी अहंमदनगरचें सर्व राज्य अकबरास प्राप्त झालें नाहीं. कित्येक मुत्सद्यांनीं दुसऱ्या ठिकाणीं निजामशाहीचें तख्त नेऊन कांहीं दिवस राज्य चालविलें. खानखानान वगैरे अकबराचे सरदार आपल्या कामांत कसूर करीत होते म्हणून ही मोहीम फत्ते झाली नाहीं.

अहंमदनगरास असा प्रकार चालू असतां खानदेशच्या सुलतानाचा अकबराशीं बेबनाव झाला होता. मोगल फौज दक्षिणेंत आली, तेव्हांपासून त्या सुलतानानें अकबराचें स्वामित्व कबूल करून स्वतःचा बचाव केला होता. पुढें अकबरानें एक वर्षपर्यंत त्या सुलतानाबरोबर लढून अशीरगडचा किल्ला व सर्व खानदेश काबीज केला. वऱ्हाड व खानदेश ह्या प्रांतांचा कारभार त्यानें दानियाल यास सांगितला आणि खानखानान यास त्याचा वजीर नेमिलें. विजापूर व गोवळकोंडें येथील सुलतानांकडून नजराणे घेऊन वकील आले होते त्यांचा स्वीकार करून, अकबरानें आपला मुलगा दानियाल याचें लग्न विजापूरच्या शहाजादीशीं केलें. हें लग्न पैठण येथें मोठ्या थाटानें झालें. पुढें अहंमदनगरकडील युद्धाचें काम अबुल् फज्ल् याजवर सोपवून अकबर परत आग्र्यास गेला. त्यानें अबुल् फज्ल् यास चार हजारांची मनसबी दिली. ह्या स्वारींत अकबराच्या तोफखान्यावर इंग्रज लोक नोकरीस होते.

५. सलीमचें दुर्वर्तन.—अकबराचीं शेवटचीं वर्षें दुःखांत व त्रासांत गेलीं. स. १५९७ च्या नोव्हेंबरांत तो काश्मिरांतून परत आला. काश्मिरांत त्यानें एकंदर तीन सफरी केल्या, पहिली स. १५८९ त, दुसरी १५९२ त, व ही १५९७ तली तिसरी. ह्या वेळीं परत येतांना मुरादचा मुलगा मीर्झा रुस्तम वारला. तो अकबराचा फार आवडता होता. त्याच्या मृत्यूनें त्यास फार दुःख झालें. अजीजखानाची आई जिजी अनागा रुस्तमची पणजी होत होती, तिनें त्यास वाढविलें होतें. एकंदरींत मुलापेक्षां सुद्धां नातवंडांवर अकबराची मर्जी विशेष होती. जहांगीरचे मुलगे खुस्रू व खुर्रम् ह्यांस तो अगदीं जीव कीं प्राण करी. रुस्तमच्या मृत्यूनंतर दीड वर्षानें त्याचा बाप मुराद वारला; आणि त्याच समयीं अहंमदनगरची स्वारी फसल्याचें वर्तमान आलें. त्या योगानें अकबराची कंबर अगदीं खचून गेली.

पुढें सलीमनें त्रास देण्यास सुरुवात केली. पूर्वीपासून तो बंडखोर व खुनशी होता. अकबरानें इतर मुलांस राज्यांत कामें दिलीं, तरी सलीमास बरेच दिवस दिलीं नाहींत. एकदां त्यास मध्यआशियाखंडांतील स्वारीवर जाण्यास अकबरानें सांगितलें. पण तो जाईना. एकदां उदेपुरावर पाठविलें असतां, मार खाऊन परत आला. लाहोर येथें अनारकळी नांवाची अकबराची एक राख होती, तिजवर सलीमचें मन गेलेलें

ऐकून अकबरानें तीस जिवंत पुरून टाकिलें. सलीमनें पुढें तिजवर टुमदार थडगें बांधिलें. लाहानपणीं फैजी हा सलीमचा शिक्षक होता. पण त्यांचें बिलकुल पटलें नाहीं. अशी एक गोष्ट सांगतात कीं सलीम एकदां अबुल् फज्ल्च्या घरीं एकाएकीं गेला. तेव्हां तेथें चाळीस लेखक कुराणाच्या एका मोठ्या टीकेच्या प्रती उतरून घेत आहेत असें त्यास आढळलें. ही विस्तृत टीका फज्ल्चा बाप मुबारीक ह्यानें लिहिलेली होती. सलीमनें ते सर्व कागद तसेच नेऊन बापास दाखवून कळविलें, कीं 'अबुल् फज्ल् तुमच्या तोंडावर मात्र नवीन धर्माची बढाई मारतो, पण अंतःकरणांत त्याची भक्ति कुराणावरच आहे. ह्या प्रती तो मोठमोठ्या राजेरजवाड्यांकडे पाठविणार आहे. असे हे तोंडपुजे लोक तोंडावर गोड बोलून तुम्हांस फसवितात.' हें ऐकून अकबराची फज्ल्वर थोडीशी इतराजी झाली. ह्याजबद्दल फज्ल् ह्यास अत्यंत वाईट वाटलें. तो म्हणाला, 'अलीकडे बरेच दिवस, कामांत असल्यामुळें, सलीमच्या भेटीस जाण्यास मला सवड झाली नाहीं. त्यावरून त्याची मर्जी जाऊन माझी खराबी करण्याचा त्यानें प्रयत्न चालविला. माझे द्वेष्टे पुष्कळ आहेत. त्यांनीं आगींत तेल ओतलें; आणि वाटेल तसें खऱ्याचें खोटें केलें.' वरील इतराजीमुळेंच अकबरानें फज्ल् ह्यास अहंमदनगरच्या स्वारीवर काढिलें. कांहीं दिवस गेल्यावर पुनः अकबर व फज्ल् ह्यांचें प्रेम पूर्ववत् जुळलें. एकंदरींत सलीमचा स्वभाव दुष्ट होता. एकदां त्यानें आजी हमीदाचा अतिशय अपमान केला. ह्या बाईचें प्रस्थ घरांत मोठें असून तिची अवज्ञा करण्याची कोणाची प्राज्ञा नव्हती. जहांगीर होडींतून अलाहबादेस जात होता. रस्त्यांत तिचा मुक्काम होता; तिनें त्यास सांगून पाठविलें, 'मी तुझ्या भेटीस येत आहें; जरा थांब.' ह्या वेळीं सलीमचें व बापाचें पटत नव्हतें. तेव्हां त्यास दोन गोष्टी सांगून दोघांची गोडी करून द्यावी अशी बाईची इच्छा होती. तिचा निरोप ऐकून सलीम थांबला नाहीं. उलट त्यानें आपल्या होडीवाल्यांस निकड लावून ज्यास्तच त्वरेनें पोबारा केला. बिचारी बाई फार कष्टी होऊन परत आली. अलाहबादेस सलीमनें बापाचे सर्व कामदार काढून, आपल्या मर्जींतली मंडळी नेमण्याचा सपाटा चालविला; आणि बहारप्रांताचा सर्व वसूल स्वतः घेऊन स्वतंत्रपणें राज्यकारभार करूं लागला. हा प्रकार

NATIONAL ARCHIVES OF INDIA

स. १६०० सालीं घडला. पुढच्या वर्षी बापाशीं युद्ध करण्याच्या बेतानें तो अलाहबादेहून निघाला. पण हा त्याचा बेत सिद्धीस गेला नाहीं. मात्र अबुल् फज्ल् दक्षिणेंतून परत येत असतां ओर्च्छाचा राजा वीरसिंह ह्याच्या मार्फत त्यानें त्याचा खून करविला. अबुल् फज्ल् आपल्या वाईटावर आहे; तो जिवंत असेपर्यंत आपले बेत सिद्धीस जावयाचे नाहींत, अकबराच्या पश्चात् आपणांस राज्य मिळूं नये अशी पण तजवीज हा करून ठेवील, असें सलीमच्या मनानें घेतलें, आणि त्यास ह्या जगांतून नाहींसा करण्याचा विचार त्यानें ठरविला. ओर्च्छाचा राजा वीरसिंहदेव हा पुष्कळ दिवस सलीमजवळ नोकरीस होता. ह्या वेळीं तो अलाहबादेसच होता. अबुल् फज्ल् ओर्च्छाच्या वाटेनें येत आहे असें कळतांच, सलीमनें ही कामगीरी वीरसिंहास सांगितली, आणि ती फत्ते झाल्यास मोठीं इनामें देऊं केलीं. काम कांहीं विशेष कठीण नव्हतें. ओर्च्छाचा प्रदेश डोंगरांनीं व जंगलांनीं व्यापिलेला होता. त्यांतूनच फज्लची वाट होती. अबुल् फज्ल् उज्जनीस आला, तेव्हां वीरसिंह आपणास मारण्यास टपला आहे असें त्यास कळलें. ओर्च्छाचा रस्ता सोडून दुसरीकडून आग्र्यास जावें असें त्यास पुष्कळांनीं सांगितलें. पण त्यानें तें मानिलें नाहीं. तो तसाच पुढें गेला. ग्वाल्हेरच्या दक्षिणेस अंत्रीनजीक त्याजवर वीरसिंहाच्या लोकांनीं छापा घालून ठार मारिलें, (ता. १२ आगष्ट, १६०२); त्याचें डोकें अलाहबादेस जहांगीरकडे पाठविलें. ' जहांगीर आपल्या आत्मचरित्रांत म्हणतो, ' फज्लच्या मृत्यूनें माझ्या बापास अत्यंत दुःख झालें खरें, तथापि त्याचा एक परिणाम चांगला झाला. मला समक्ष जाऊन बापाशीं उघडपणें बोलतां येऊं लागलें; आणि हळू हळू मजविषयीं त्याचें मन साफ झालें. ' जहांगीरनें फज्लचें शीर गलिच्छजागीं टाकून दिलें. त्याच्या धडावर अंत्री येथें लहानसें थडगें अबुल् फज्लचें म्हणून अद्यापि दाखविण्यांत येतें.

ह्या भयंकर कृत्याबद्दल अकबरानें मुलास कडक शिक्षा केली नाहीं, ह्यावरूनच त्याचें मन आतां पुष्कळच दुर्बल झालें होतें असें दिसतें. वीरसिंहाचा छळ करून त्यानें आपल्या मनाचें समाधान करून घेतलें. वीरसिंह चार पांच वर्षें जंगलांत लपून होता. जहांगीरनें पुढें त्यास ओर्च्छाचें राज्य दिलें. सलीमनेंच फज्लचा खून करविला ह्याबद्दल अक-

बराच्या मनांत संशय नव्हता. अकबर कबुतरें उडवीत असलेलीं पाहत बसला असतां, फरीद बक्षीनें येऊन, अबुल् फज्लूचा खून झाल्याची बातमी त्यास कळविली. त्याबरोबर एकदम मोठ्यानें ओरडून तो बेशुद्ध पडला. पुढें कांहीं वेळानें तो शुद्धीवर आला, पण कित्येक दिवसपर्यंत त्याचे अश्रु खळले नाहींत. तो एकसारखा सलीमावर चडफडूं लागला, आणि खरें म्हटलें म्हणजे त्यास त्यानें क्षमा केली असें कधींच झालें नाहीं. भाग इतकाच कीं, कौटुंबिक पेंचांत सांपडल्यामुळें, मुलास शिक्षा करण्याचें साधन त्यास राहिलें नाहीं. स्वतःच्या मुलास शिक्षा करण्याचें काम अकबरासारख्यासही अशक्य झालें. अबुल् फज्लूच्या ह्या दुःखानें अकबर पुढें मरेपर्यंत सदैव अत्यंत विव्हळ होत असे. तो असें सुद्धां म्हणे कीं, 'सलीमास राज्यच पाहिजे होतें, तर त्यानें मलाच मारावयाचें होतें. बिचाऱ्या फज्लास मारून त्यास काय मिळालें!' कांहीं दिवस सलीमाशीं त्यानें कठोरपणा धारण केला. पण प्रत्यक्ष त्याची आई, आत्या गुलबदन् बेगम, त्याची बायको सलीमा सुलताना ह्यांनीं नाना प्रकारें सलीमबद्दल अकबरापाशीं रदबदली केली. सलीमास समजावून आणण्याचें त्यांनीं आपल्या अंगावर घेतलें. अकबरानें कबुली देतांच सलीमा सुलताना निघून अलाहबादेस गेली. 'अकबरानें तुला क्षमा केली आहे,' ह्याची खात्री करण्याकरितां, तिनें एक हत्ती, एक घोडा व पोशाख असा नजराणा सलीमास दिला. अशा रीतीनें त्याची समजूत झाल्यावर तो येऊन बापास भेटला. बारा हजार मोहरा व जवळ जवळ एक हजार हत्ती एवढा नजराणा त्यानें बापास केला. दोघांची समजूत झाली. पण खरें म्हटलें तर अकबरानें सलीमास मनांतून क्षमा केली नव्हती. ह्याच सुमारास हुमायूनची सावत्र बहीण गुलबदन बेगम ८१ वर्षांची होऊन मरण पावली, (७ फेब्रुवारी, १६०३). हुमायूननामा नांवाचा बहुमोल ग्रंथ तिनें लिहिलेला आहे.

सलीमचा पराक्रम ठाऊक असतांही त्यास पुनः अकबरानें फौज देऊन उदेपूरच्या राण्यावर पाठविलें. अकबराचें दौर्बल्य वाढत होतें, याचें हें आणखी उदाहरण होय. सलीम सुमारें वीस मैल गेला असेल नसेल, तोंच माझ्या हातून ही कामगिरी होत नाहीं म्हणून तो रड सांगूं लागला. त्यावर अकबरानें त्यास अलाहबादेस निघून जाण्यास सांगितलें. स. १६०४ त

३२-६-१०-१०-७९१-२०००

बंगाल्यांत मानसिंहानें विजय मिळविल्याची बातमी येऊन अकबरास जरासें समाधान वाटलें. पण सलीमच्या वर्तनानें त्याजवर विरजण पडलें. अलाहबादेस गेल्यावर सलीम इतका व्यसनाधीन झाला, कीं त्याच्यांतलें मनुष्यपण बहुतेक नाहींसें झालें. त्याच्या एका कारकुनानें नोकरीचा राजीनामा दिला म्हणून त्यास त्यानें जिवंत सोलविलें, आणि त्याच्या दोघां सोबत्यांचे हातपाय तोडून जीव घेतले. अकबरास ही गोष्ट कळली तेव्हां तो मोठ्या उद्वेगानें बोलला, ' अरे, मी नुसती मुंगी चिरडण्यास भितों, मेलेल्या बकऱ्याची सुद्धां चामडी सोलण्यास मला धीर होत नाहीं, आणि ह्या माझ्या पोटच्या पुत्रानें मनुष्यप्राण्याची दशा अशी करावी ! ' त्या उद्वेगाच्या झटक्यांत तो स्वतः अलाहबादेस जाण्यास निघाला. थोडें अंतर गेल्यावर त्याची बोट पाण्यांत रुतली; आणि वादळ होऊन लोकांचे हाल झाले. इतक्यांत आई हमीदा अत्यंत आजारी असल्याची बातमी आली; त्यामुळें तो लगेच परत गेला. त्याची आई ता. २९ ऑगस्ट १६०४ रोजीं वारली. तिची त्याची भेट झाली, पण ती शुद्धींत नव्हती. दिल्ली येथें हुमायूनच्या कबरेंत तिचें दफन करण्यांत आलें. तिला सर्व मंडळी घरांत ' मारियं मकानी ' म्ह० घराची मेरी असें म्हणत. आई वारल्याबद्दल सांत्वन करण्यासाठीं म्हणून सलीम नोव्हेंबरांत अकबराकडे आला. बरोबर बापास खुश करण्यासाठीं त्यानें नजराणेही पुष्कळ आणिले. बापानें ते स्वीकारिले; परंतु त्याचा राग कमी झाला नाहीं. त्यानें बारा दिवस सलीमास घुशालखान्यांत कोंडून ठेविलें, तेवढ्या अवधींत त्यास दारू किंवा अफू बिलकुल दिली नाहीं. त्याच्या बहिणी मात्र जाऊन त्यास भेटत असत. त्याची कैद ज्यास्त कडक करण्याचा अकबराचा विचार होता; परंतु त्याच समयीं दानियाल अत्यंत आजारी आहे, जगण्याची आशा नाहीं, अशी बातमी आल्यानें, सलीमास कठोरपणा दाखविण्यास अकबराचें मन धजलें नाहीं. त्यानें त्यास मोकळा करून पूर्वीचा मानमरातब दिला.

६. मृत्यु, बायकामुलें.—अकबराच्या कार्किर्दीस पन्नासावें वर्ष लागलें. स. १६०५ च्या एप्रिलांत दानियाल बऱ्हाणपूर येथें मद्यातिरेकानेंच मरण पावला. तीनही मुलगे असे मद्यपी निघाले. तिघेही बहुधा निरनिराळ्या हिंदु स्त्रियांच्या पोटीं जन्मलेले होते. तेव्हां अशीं व्यसनें आनु-

वंशिक असतील, तर त्यांचा उगम पितृवंशाकडूनच झाला असला पाहिजे. अकबर मद्य व अफू यांचें सेवन करीत असे, असा पुरावा आहे. त्याचा बाप, आजा व पणजा ह्या सर्वांस तीं व्यसनें होतीं. असो. अकबराच्या सर्व मुलांत दानियाल हाच विशेष हुशार व कर्तृत्ववान होता. सर्वांत बापाचा लाडका तोच होता. त्याच्या मृत्यूनें अकबर अत्यंत हताश झाला. सर्व जग त्यास अंधारमय दिसूं लागलें. मन अगदीं भांबावून गेलें. त्यास पुढें आशातंतु कोठेंच दिसेना. त्याची प्रकृति क्षीण होत चालली, आणि सन १६०५ च्या सेप्टेंबर महिन्यांत तो अगदीं अंथुरणास खिळाला. पुढें तख्तावर कोणी बसावें ह्याजबद्दल वाटाघाटी चालू झाल्या. राज्य चालविण्यास सलीमशिवाय दुसरा इसम लायक आहे असें अकबरास वाटत नव्हतें. पण *मानसिंह हा खुस्रूचा मामा*, व दुसरा प्रबल सरदार अजीजखान कोका हा खुस्रूचा सासरा होता. ह्या उभयतांनीं खुस्रूच्या पक्षानें खटपट चालविली. आपल्या जिवास अपाय होईल अशी धास्ती सलीम यास पडून तो राजमंदिरांत येईनासा झाला. शहाजादा खुर्रम् हा मात्र आज्याजवळ सदा सर्वकाळ बसलेला असे. सलीमनें आपणास भेटावें अशी अकबरानें वारंवार इच्छा दर्शविली. कायदेशीर हक्काच्या विरुद्ध ठराव करण्यास त्याचें मन धजेना. तेव्हां आपल्या पश्चात् सलीमनेंच राज्य चालवावें असें पुनः पुनः त्यानें सर्वांस जाहीर केलें. त्याबरोबर अजीज व मानसिंहसुद्धां सर्व सरदार निमूटपणें सलीमास मिळाले. मग सलीम राजवाड्यांत जाऊन बापास भेटला. अकबरानें सर्व अमीर-उमरावांस जवळ बोलावून सर्वांचा शांतपणें निरोप घेतला. ‘मीं कोणाचा अपराध केला असल्यास त्यांनीं मला क्षमा करावी,’ असें मागणें मागून, त्यानें सलिमास सदुपदेश केला. ‘कुटुंबांतील मनुष्यांचा आणि दोस्त व आश्रित मंडळीचा चांगला परामर्ष घेत जा. राजघराण्यांतील बायकांच्या नेमणुकांस यत्किंचित् धक्का लावूं नको. ज्यांनीं ज्यांनीं मजबरोबर इतकीं वर्षे श्रम करून मला कीर्ति मिळवून दिली, त्यांशीं तूं वांकडें धरूं नको.’ वगैरे निर्वाणीचीं बोलणीं बोलून, आणि मुसलमानी धर्मांप्रमाणें कलमा म्हणून, हा थोर व पराक्रमी बादशहा, तारीख १५ ऑक्टोबर सन १६०५ ह्या वर्षी, त्याचें त्रेसष्टावें वर्ष संपलें त्याच दिवशीं, आग्रा येथें मरण पावला.

आपण दैविक अंशावतार आहों; इतर मनुष्यप्राण्यांहून आपण ज्यास्त जगणार; ही अकबराची बढाई, बदाऊनी म्हणतो, क्षणांत नष्ट झाली. तथापि त्याच्या सर्व पूर्वजांपेक्षां, आणि औरंगजेबाशिवाय त्याच्या बहुतेक अनुजांपेक्षां अकबर ज्यास्त जगला. मरणापूर्वी त्यानें 'सदरजहान' म्हणजे धर्माध्यक्ष यास जवळ बोलाविलें, आणि त्याजकडून कुराणांतील कलमा वाचविला. नंतर वर सांगितल्याप्रमाणें पुनः सलिमास उपदेश करून पुनरपि त्यानें सदरजहानकडून कलमा वाचविला, आणि आपणही त्याजबरोबर स्पष्ट आवाजानें तो म्हटला. दुसरेही कुराणांतले कित्येक भाग व इतर कवनें त्यानें मोठमोठ्यानें म्हटलीं. त्यांत फैजीची एक कविता होती. अशा रीतीनें देहावसानसमयीं त्यानें इसलामाचा विधि पाळिला. दुसऱ्याच दिवशीं शिकंदरा येथें त्याचें दफन झालें.

सलीम व त्याचे तिघे मुलगे ह्यांनीं स्वतः अकबराचें प्रेत उचलून किल्या-बाहेर पुढें आणिलें. तेथून आग्र्यापासून चार मैलांवर शिकंदरा येथें तें दरबारच्या कामदारांनीं वाहून नेलें. शिकंदरा येथें त्याचें दफन झालें, त्या ठिकाणीं जहांगीर बादशहानें पुढें सुंदर कबर बांधिली, तिचें वर्णन पुढें येईल. ह्याच कबरेंत १८०३ सालीं दिल्ली काबीज करीत असतां लॉर्ड लेक ह्याच्या स्वारांस राहण्यास जागा मिळाली. अकबराच्या मृत्यूनें मोगल बादशाहीरूपी नाटकाचा पहिला अंक समाप्त झाला, तें राज्य भक्कम पाया-वर स्थापन झालें व सुमारें दीडशें वर्षे तें अबाधित चाललें. हें बादशाही पद हिरावून घेणाऱ्या एका संस्थेचा जन्म अकबर जिवंत असतांनाच सातासमुद्रांपलीकडे झाला होता. सन १६०० ह्या वर्षीं विलायतेंत ईस्ट-इंडिया कंपनी स्थापन झाली; आणि धिमेपणानें पुष्कळ वर्षे परिश्रम करून तिनें ह्या पुरातन वैभवशाली भरतभूमीचें आधिपत्य आपल्या राष्ट्रास प्राप्त करून दिलें.

अकबराचीं बायकामुलें.—अकबराच्या लग्नाच्या व राखलेल्या पुष्कळ बायका होत्या. पहिली बायको हिंदालची मुलगी रुकियाबेगम. ही वृद्ध होऊन स. १६२६ त वारली. तिला मूल झालें नाहीं. शहा-जहानचा लहानपणीं सांभाळ करण्याचें काम अकबरानें तिच्याकडे सोप-विलें होतें. नवरा मेल्यावर नूरजहानला पकडून आणून जहांगीरनें तिला रुकियाच्या ताब्यांत दिलें. अकबरानें स्वतः पसंत केलेली दुसरी बायको,

(नांव उपलब्ध नाहीं) कामरानचा मेहुणा अब्दुल्ला मोगल ह्याची मुलगी. त्याची तिसरी बायको सलीमा सुलतान बेगम ही बाबरच्या मुलीची मुलगी. हिचें पहिलें लग्न बह्रामखानाशीं झालें होतें. अकबरानें स. १५६१त तिच्याशीं लग्न लाविलें. हीच अकबराची विद्वान, चतुर व शहाणी बायको होय. हमीदा व गुल्बदनबेगम ह्या दोघींची तिजवर भक्ति होती. त्या तिघी दोन वर्षें मक्केस जाऊन राहिल्या होत्या. सलीमा बेगम स. १६११ त वारली, त्या वेळीं तिचें वय साठ वर्षांचें होतें. ह्यावरून, स. १५५७ त बह्रामखानाशीं तिचें लग्न झालें, तेव्हां ती सात वर्षांची असली पाहिजे. ती कविता करी. बदाऊनी तिच्याबद्दल आदरानें बोलत नाहीं. तिनें आपलें एक पुस्तक बदाऊनीस वाचण्यास दिलेलें त्याजकडून हरवलें, तें प्रकरण अकबरापर्यंत जाऊन बरेंच विकोपास गेलें. स. १५६२ त अकबरानें सांवर येथें अंबरच्या बिहारीमल्लाच्या मुलीशीं लग्न केलें. ही भगवानदासाची बहीण व मानसिंहाची आत्या. तिलाच सलीम हा मुलगा स. १५६९ त झाला. तिनें अकबराच्या जनानखान्यांत मुसलमानी पेहराव पत्करिला. हा पेहराव करून कुराणांतला एक मंत्र म्हटला कीं, हिंदुस्त्री मुसलमान बनत असे. (जोधपूरच्या अजितसिंगानें आपली मुलगी फर्रुख्सेयर बादशहास (स. १७१३–१८) दिली. पुढें फर्रुख्सेयरचा खून झाल्यावर बापानें तिला रजपूत पेहराव देऊन परत आपल्या घरीं घेतलें. बिबी दौलतशहा म्हणून दुसरी एक अकबराची बायको होती, तिला दोन मुली झाल्या. मुराद व दानियाल ह्यांच्या आयांचीं नांवें आढळत नाहींत, त्या अकबराच्या आणखी दोन बायका होत. रंगराई, बिबी आरामबक्ष, बिबी सेल्मा, बिबी खैरा, आणि मिहर्समा अशीं आणखी नांवें अकबराच्या बायकांचीं आढळतात, (H. Beveridge). मॅलेसन (Rulers of India, Akbar) म्हणतो, सलीमच्या आईचें नांव जोधाबाई; ही जोधपूरच्या मालदेवाची मुलगी. मॅलेसन व लेन्पूल म्हणतात, बिकानेरची राजकन्या अकबराची तिसरी रजपूत बायको होती. ह्यावरून अकबराच्या तीन बायका रजपूत व इतर मुसलमान होत्या.

प्रथम अकबरास हसन व हुसेन नांवाचे दोन जुळे मुलगे झाले, ते एक महिन्याच्या आंत मृत्यु पावले. नंतर सलीम आणि दुसरे दोघे दानियाल व मुराद हे झाले. त्यास तीन मुली होत्या; शहाजादी खानम, शुक्रुन्निसाखानम

(ल० मीर्झाशहारुख), आणि आरामबानू. शहाजादी खानमचें लग्न चोविसाव्या वर्षी झालें. दुसऱ्या दोघी बिबी दौलतच्या मुली. ह्या सर्व अकबराच्या मृत्यूनंतर पुष्कळ वर्षे जिवंत होत्या. पहिल्या दोघींचीं लग्नें १५९४ त झालीं. तिसरीचें लग्न झाल्याचें दिसत नाहीं. ती बापाची फार लाडकी होती.

मुराद यास एक मुलगी होती तिचें लग्न जहांगीरचा मुलगा पर्वीझ ह्याजबरोबर झालें होतें. दानियालचें लग्न बहरामखानाचा मुलगा खानखानान याच्या जानान बेगम नामक मुलीशीं होऊन, त्यास मुलगे तीन झाले, १ तहमूरास ल० सुलतान बहार बेगम, जहांगीरची मुलगी; २ बायसंघर; ३ हुशंग, ल० खुस्रूची मुलगी होशमंद बानू बेगम. ह्या मुलांस पुढें शहाजहाननें ठार मारिलें. शिवाय दानियालास चार मुली होत्या.

प्रकरण तेविसावें.

अकबराची योग्यता.

१. नवीन धर्मस्थापना.	२. शरीर, स्वभाव व करामत.
३. राज्यकारभाराचें धोरण.	४. जमाबंदीची व्यवस्था.
५. अवांतर सुधारणा.	६. आग्रा–सिक्रीचीं बांधकामें.
७. परिस्थिति व तुलना.	८. बीव्हरिज्चा अकबरावर अभिप्राय.

९. अकबराचा नवरत्नदरबार.

(क) अबुल्फज्ल् व फैजी.	(ख) राजा मानसिंग.
(ग) मुल्ला दोप्याजा.	(घ) राजा तोडरमल्ल.
(ङ) राजा बीरबल.	(च) तानसेन.
(छ) हकीम हुमाम.	(ज) बदाऊनी.

१. **अकबराची नवीनधर्मस्थापना.**—येथपावेतों अकबराच्या कार्किर्दीचें वर्णन झालें त्याची योग्यता व करामत ह्यांचा अंदाज करण्यापूर्वी त्यानें आपलें राज्य चिरंतन करण्यासाठीं जी धर्माची मुख्य बाब हातीं घेतली, तिचें वर्णन प्रथम करणें जरूर आहे. कारण त्यामुळें पुढील विषय चांगला समजेल.

मोगल लोकांस आरंभीं तुर्क जातीचें वळण होतें. पुढें तें इराणी वळणावर गेले, हें मागें एकवार सांगितलेंच आहे, (पृ० ४५ पहा). तुर्की वळण जाऊन इराणी वळण येऊं लागलें, अशा संक्रमणकाळांतील पुरुष बाबर व हुमायून हे होत. ते दोघेही नांवाचे मुसलमान होते. त्यांचा मुसलमानी बाणा केवळ दिखाऊ होता. हुमायूननें शियापंथ स्वीकारिला. हिंदुस्थानांत परत आल्यावर त्याचें मोगली वळण दिसेनासें झालें. इराणी वळणाचा पहिला मोगल राज्यकर्ता अकबरच होय. त्याची आई इराणांतील होती. त्याचें वर्तन व विचारसरणी इराणी धर्तीची होती. धर्मसंबंधांत मोगल लोक दुराग्रही नाहींत, एवढेंच मोगलांच्या स्वभावाचें लक्षण त्यांच्यांत उतरलें होतें. अकबर धर्माच्या बाबतींत ढिला व बेपरवा होता. मुसलमानांची कडक श्रद्धा त्याच्यांत नव्हती. इराणी वर्षाच्या प्रथम दिवशीं नवरोझचा सण असतो; त्या सणाचा मुसलमानी धर्माशीं संबंध नसतां अकबर त्या दिवशीं मोठा समारंभ करी. दरबारीं भिन्न रंगाचा पोषाख करून तो सप्तग्रहांची पूजा करी. तो आपल्या रजपूत राण्यांबरोबर यज्ञयाग व ब्राह्मणोक्त धर्मविधि करूं लागे. तरी आरंभीं दिसण्यांत तो मुसलमान होता. त्याला मूल होत नव्हतें, म्हणून अजमीरच्या साधूस केलेला नवस फेडण्याकरितां दोनशें मैल तो पायीं चालत गेला.

ह्याप्रमाणें मुसलमानी धर्माविषयीं बादशहाचा अनादर आल्याचे उलमांस (पृष्ठ १६९ टीप पहा) खपेनासा झाला. दरबारांत उलमांचें वजन भारी होतें. त्यांचें मत घेतल्याशिवाय बादशहास कोणत्याही बिकट प्रश्नाचा निकाल करितां येत नसे. न्यायाधीश, कायदेपंडित वगैरे जागा ह्या उलमांस देण्यांत येत. कोणत्याही प्रश्नाच्या निकालाविषयीं सर्व मिळून जो अभिप्राय देत, तोच प्रत्येक प्रश्नावर शेवटला निकाल समजला जाई. आल्याचे उलमा दुराग्रही सुनीपंथाचे होते. शियापंथी मुसलमानांस ते छळीत असत. इराणांत सुफी नांवाचा नवीन मुसलमानी पंथ निघून तो हिंदुस्थानांत पसरत चालला होता; त्या नवीन पंथाचा हे उलमा अत्यंत द्वेष करीत. बहिरामखानाचा पाडाव करून अकबरानें सर्व सत्ता आपल्या हातांत घेतली, तेव्हांपासून हे उलमा विशेष गवगवा करूं लागले. हिंदुस्थानांत शिया व सुनीपंथ पसरत चालले हें उलमांस खपेना. त्या पंथांचा मोड करण्यासाठीं ते तरुण अकबरास आपल्या मुठींत ठेवण्याचा प्रयत्न करूं लागले.

अकबर तर मूळपासून धर्मसंबंधांत उदासीन असून, दुसऱ्याच्या तंत्रानें चालणारा नव्हता. अर्थात् उलमा खवळून गेले; आणि लोकांत त्यांजविषयीं द्वेषबुद्धि उत्पन्न झाली.

त्या वेळचे धर्मकलह विशेष स्मरणीय आहेत. त्याच वेळेस क्रिस्ती धर्मांतही असेच कलह माजले होते. युरोपांत थोतांडी व दांभिक उपाध्यायांशीं नवीन मतांचे सुधारक भांडूं लागले होते. मुसलमानी धर्माच्या इतिहासांतील एक भविष्य त्या वेळेस खरें व्हावयाचें होतें. 'इस्लामाचीं एक हजार वर्षें भरतांच जिकडे तिकडे धर्माची अवनति होईल; सर्वत्र हाहाकार उडेल; ईश्वरास संकट पडून धर्माचें व लोकांचें तारण करण्याकरितां परमेश्वर पृथ्वीवर अवतार घेईल, आणि जिकडे तिकडे देवराज्य होऊन लोक सुख पावतील.' मुसलमानांत जे बारा इमाम होऊन गेले, त्यांतील शेवटचा इमाम महदी हा पुनः पृथ्वीवर अवतरणार, आणि हें भविष्य खरें होण्याचा हाच समय आहे असें लोकांस वाटूं लागलें. सोळाव्या शतकांत मुसलमानी धर्माचा ऱ्हास सर्वांस दिसूं लागला होता. देवभोळ्या उपाध्यायांस धर्मांत होत असलेला नवीन फेरफार केव्हांच खपत नसल्यामुळें, 'धर्म बुडत चालला, आतां परमेश्वर अवतार घेऊन संकटपरिहार करणार,' अशी ओरड ते नेहमीं करीत असतात. लोकसमुदायास हें म्हणणें खरें वाटतें. कारण असा नवीन अवतार आपणास पाहवयास मिळणार याविषयीं त्यांस मोठा अभिमान वाटतो. हिजरी शकाचीं एकहजार वर्षें क्रिस्ती सन १५९१ त भरत होतीं. तेव्हां लोकांचीं मनें ह्या धर्मवेडानें भरून गेलीं. त्यामुळें उलमा मंडळींचा रस्तोरस्तीं उपहास सुरू झाला. त्यांचा पोकळ अभिमान, त्यांची दांभिक विद्वत्ता, व सरकारी नोकरी मिळविण्याकरितां त्यांनीं केलेल्या भानगडी, ह्यांजबद्दल सर्वतोमुखीं त्यांची थट्टा सुरू झाली. न्यायाचें काम त्यांच्या हातीं असल्यामुळें, अन्याय, पक्षपात वगैरेसंबंधानें त्यांजविरुद्ध बादशहाकडे असंख्य तक्रारी भराभर येऊं लागल्या. त्याच संधीस परमेश्वर अवतार घेऊन येणार, म्हणून सर्व लोक एके ठिकाणीं जमून प्रार्थना करूं लागले. तितक्यांत भोंदू महदी उत्पन्न झाले, तेव्हां दंगे होऊं लागले. मग वाटेल तशा शिक्षा देऊन उलमा न्यायाधीश आपल्या अधिकाराच्या जोरावर ह्या अपमानाचा वचपा काढूं लागले.

धर्माच्या ह्या भानगडींत कित्येक मोठमोठे लोकही पडले होते. शेख मुबारिक नांवाचा एक प्रसिद्ध विद्वान् गृहस्थ उलमांवर उठला होता. केवळ चालत आलेल्या प्रघातांवर अवलंबून न राहतां स्वतः विचार करून धर्मांच्या बाबतींत योग्य दिसलेले फेरफार करण्यास तो उद्युक्त झाला. लूथरप्रमाणेंच तो स्वतंत्र विचार करणारा होता. त्याचा जन्म सन १५०५ त झाला. सन १५९३ त तो मरण पावला. मागें सांगितलेंच आहे कीं सोळावे शतकांत सुनी, शिया व सूफी असे तीन वेगळे पंथ मुसलमानांत झाले होते. सूफी पंथाची उत्पत्ति इराणांत झाल्यामुळें, सूर्य व अग्नि ह्यांची उपासना पारशी लोकांतून त्या पंथाच्या लोकांनीं स्वीकारली. ह्याशिवाय आणखी एक चवथा धर्मप्रवाह नुक्ताच हिंदुस्थानांत शिरला होता. गोवें येथें पोर्तुगीझ लोकांनीं ह्याच सुमारास रोमनक्याथोलिक नामक क्रिस्तीपंथाची स्थापना केली. उत्तरेंत मुसलमान व हिंदु ह्या धर्मांचा सामना होऊन गुरु नानक व कबीर इत्यादि महान् पुरुष निपजले; आणि दोनही धर्मांतील उदात्त तत्त्वांचें ग्रहण करून तिकडे त्यांचा प्रसार त्यांनीं चालू केला. हिंदु व मुसलमान ह्या उभयतांचा देव एकच आहे असें ते प्रतिपादन करूं लागले. शेख मुबारिकचा वर्तनक्रम ह्या समयास अगदीं अनुरूप आहे. तो सुनीपंथांत वाढला होता. त्या वेळच्या प्रघातास अनुसरून त्यानें आरंभीं पुष्कळ वर्षें उत्तरहिंदुस्थानांत प्रवास केला. त्यानें अनेक गुरूंजवळ विद्याध्ययन केलें. त्यानें आपली विद्वत्ता इतकी वाढविली, कीं त्या वेळीं त्यास ज्ञानाचें चालतें बोलतें भांडार असें लोक म्हणूं लागले. पुढें त्यानें सुनीपंथ सोडून शियापंथ स्वीकारिला. आपला प्रवास संपल्यावर तो आग्रा येथें येऊन राहिला. विद्वान् लोकांच्या उप-जीवनासाठीं बादशहाकडून कांहीं जमिनी तोडून दिलेल्या असत, तशी एक नेमणूक त्यास मिळाली; आणि तो अध्यापकाचें काम करूं लागला. त्यास पुढें दोन मुलगे झाले. वडील अबुल् फैजी हा सन १५४७ त आणि धाकटा अबुल् फज्ल् सन १५५१ त जन्मला. मह्दीच्या प्रकरणांत मुबारिक पुढारी होता. त्यामुळें उलमा लोक त्याजवर दांतओंठ खाऊं लागले. त्यांनीं अकबरास कळविलें, कीं शेख मुबारिक स्वतः पतित असून दुसऱ्यांस नरकास पोंचवीत आहे. यासाठीं त्यास एकदम देहान्तप्राय-श्चित द्यावें. त्यास पकडण्याचा त्यांनीं हुकूम मिळविला, पण मुबारिक ह्यास

ती खबर पोंचून तो पळून गेला. त्याचे मुलगे आग्यास राहिले. हे मुलगे पुढें मोठ्या योग्यतेस चढले. त्या वेळच्या लोकांवर त्यांनीं आपलें वजन बसविलें. वडील फैझी हा सूफीपंथी कवि होता. तो सदैव विचारांत मग्न असे. फुलें, सुवास, सौंदर्य, मद्य, इत्यादि विषयांत त्याचें मन गढलेलें असे. तो केव्हां सुरेख कवनें करी; केव्हां भक्तिपुरःसर ईश्वराचा स्तव करी. त्याचीं कवनें अकबराच्या कानावर गेलीं. बादशहास कवितेची फारशी अभिरुचि नव्हती; परंतु त्याच्या नवीन व चमत्कारिक कल्पना पाहून, बादशहानें त्यास जवळ बोलावून घेतलें,(स. १५६८). तेव्हांपासून मुबारिकच्या कुटुंबाचें दैव उघडलें. उलमांनीं त्यांचा छळ बंद केला आणि तो आग्यास परत येऊन लोकांस पढवूं लागला.

धाकटा भाऊ अबुल् फज्ल् ह्याची बुद्धि विशाल आणि महत्त्वाकांक्षा जबर होती. लहानपणींच तो त्या वेळच्या सर्व विद्यांत निपुण झाला. त्यास अधिक ज्ञान मिळविण्याची उत्कंठा लागली. जगांतील सर्व धर्मांच्या मुळाशीं जाऊन त्यांची ओळख करून घ्यावी, असें त्यास वाटूं लागलें. क्रिस्ती, बौद्ध, फारशी इत्यादि धर्म, गोवें, तिबेट, इराण वगैरे ठिकाणीं जाऊन तो शिकणार होता, इतक्यांत वडील भावाच्या शिफारसीनें त्याची बादशाहशीं ओळख झाली. अकबराच्या मनांत त्यानें आपणाविषयीं उत्तम ग्रह उत्पन्न केला, आणि त्याजवर आपली छाप बसविली. पुढें लवकरच तो बादशहाचा विश्वासू मित्र आणि चतुर सल्लागार झाला. अकबर व फज्ल् हे दोघेही पुरुष थोर होते. हिंदुस्थानच्या इतिहासनभोमंडलांतील ते दोन देदीप्यमान तारेच होत. त्यांचे विचार त्या वेळच्या मानानें पाहतां फार पुढें गेलेले होते, आणि उभयतांमध्यें जें मनोदौर्बल्य होतें, तें एकमेकांच्या साहाय्यानें त्यांस भरून काढितां आलें. अकबराच्या अंगीं मोगलांचे दुर्गुण आले होते; तो गर्विष्ठ, अज्ञान व चिकित्सक असून दुसऱ्याचे मदतीची पर्वा करणारा नव्हता. अबुल् फज्ल् हा केवळ दरबारी असून, खुशामत वगैरे करण्यांत तरबेज होता. प्रसंगानुरूप वर्तन ठेवून स्तुतिपाठकाचें काम करण्यांत त्याचा हातखंडा होता. अकबरास तो परम दैवत समजूं लागला. देवाप्रमाणें त्याजला नमन करून भजूं लागला. अर्थात् दोघांचा स्नेह जमण्यास उशीर लागला नाहीं. एकमेकांची एकमेकांस जरूरच तशी होती. अबुल् फज्ल्पासून

अकबरास स्तुति प्राप्त होई, आणि अकबरापासून अबुल् फज्ल् यास गौरव प्राप्त होई. अबुल् फज्लचे मदतीशिवाय अकबराच्या बुद्धीचें तेज कांहींच पडलें नसतें. तसेंच अकबरासारखें स्तुतिप्रिय दैवत अबुल् फज्ल् यास प्राप्त झालें नसतें, तर त्याच्या योग्यतेचें कांहींच चीज झालें नसतें.

अबुल् फज्ल्ची गांठ पडली, त्या वेळेस अकबर मोठ्या कचाटयांत सांपडलेला होता. सर्व लोकांना सारख्या प्रेमानें वागवावयाचें, असा त्याच्या मनाचा निर्धार असतां उलमा त्याचे आड येत. आग्र्याच्या सरन्यायाधीशानें, पुष्कळ लोकांस शियापंथ स्वीकारिल्याबद्दल आणि विचारस्वातंत्र्य प्रकट केल्याबद्दल देहान्तशिक्षा सांगितल्या; आणि बादशहानें त्या अमलांत आणाव्या म्हणून उलमा त्यास आग्रह करूं लागले. उलमांशीं कुरापत काढून त्यांस दुखविण्याची त्याची इच्छा नव्हती. तथापि केवळ अन्य मार्गानें ईश्वरभक्ति केल्याबद्दल लोकांस दिलेल्या त्या जबरदस्त शिक्षा अमलांत आणण्यास त्याचें मन धजेना. अबुल् फज्ल् यानें अकबराच्या मनांतील हेतु बरोबर ताडिला. आपल्या बापास त्रास दिल्याबद्दल उलमांचा सूड घेण्याची ही संधि त्यास आयतीच सांपडली. उलमा हे अभिमानानें फुगून गेलेले व हेकेखोर होते. आरबी भाषा व कुराण ह्यांपलीकडे त्यांची विद्वत्ता गेलेली नव्हती. जें आपल्याला येत नसे व समजत नसे तें ते छपवून ठेवीत. अबुल् फज्ल्सारख्या माणसास त्यांचा तिरस्कार येणें साहजिक होतें. परंतु तो दरबारांत वागलेला व मनोनिग्रही असल्यामुळें, त्यानें आपले विचार एकदम प्रकट केले नाहींत. आपसांत उलमा मंडळींचा मिलाफ नव्हता, हें फज्ल् यास पक्कें ठाऊक होतें. त्यांना बादशहापुढें वादविवाद करण्यास लावावें, म्हणजे त्यांच्या पोकळ ज्ञानाचा भोंपळा तेव्हांच फुटेल, आणि त्यांची खरी योग्यता काय आहे हें बादशहास आपोआप कळून येईल, असा विचार फज्ल्च्या मनांत आला. बरीच वाटाघाट झाल्यावर अखेरीस अकबरास तो बेत पसंत पडला. उलमांनीं सर्व प्रश्नांचा ऊहापोह आपल्या देखत करावा, म्हणजे मग खऱ्याखोट्याचा निकाल सहज करितां येईल, असा अकबरानें हुकूम सोडिला. हा मार्ग अबुल् फज्ल् यानेंच सुचविला असें म्हणण्यास आधार नाहीं. पण आगींत तेल ओतण्यास अबुल् फज्लनें कांहीं कमी केलें नसेल. लोकांनीं आपले अभिप्राय बादशहापुढें मांडा-

वयाचे, आणि त्यानें बसून निकाल करावयाचा. जरूर लागल्यास अबुल् फज्ल् मदत करण्यास जवळ तयार असावयाचाच. फार तर काय, पण प्रश्न विचारण्याचें आणि अभिप्राय मागविण्याचें काम अबुल् फज्लच करणार. बादशहानें फक्त ऐकून निकाल द्यावयाचा. अशा प्रकारें वादविवाद करण्यासाठीं तयारी करण्यांत आली.

हिंदुस्थानांत अशी वादविवाद करण्याची चाल पुरातन काळापासून चालत आली आहे. स. १५७६ च्या सुमारास बादशहानें वादविवादाकरितां फत्तेपूरसिक्री येथील खासबागेंत एक भव्य व सुंदर मंदिर बांधिलें. त्यास इबादतखाना असें नांव होतें. त्याला चार मोठीं दालनें होतीं. प्रत्येक दालनांत भिन्न भिन्न धर्मांचे लोक बसत. सर्व जातींच्या आणि धर्मांच्या विद्वान् लोकांस बोलावून त्यांजकडून तो या मंदिरांत वादविवाद करवी, आणि आपण ते ऐकत बसे. दरबारची इतर मंडळीही त्या ठिकाणीं हजर असत. असे वादविवाद बहुधा दरगुरुवारीं रात्रीं होत. प्रश्न काढून वादविवाद सुरू करण्याचें काम अबुल् फज्ल् करी. बादशहा गांभीर्य धारण करून ऐकत असे. एखादें संभाषण विशेष चांगलें झालें, म्हणजे तो बोलणाराची तारीफ करून बक्षिसें वगैरे देई. अबुल् फज्लनें लिहून ठेविलें आहे कीं, सूफी, पंडित, धर्मोपदेशक, वकील, सुनी, शिया, ब्राह्मण, बौद्ध, क्रिस्ती, यहुदी, फारसी, व इतर पंथांचे विद्वान् लोक या सभेंत वादविवाद करण्यासाठीं आणिलेले होते. प्रत्येकजण आपलें म्हणणें निर्भीडपणें सांगत असे. केव्हां हे वादविवाद फार वेळ आणि मोठ्या आवेशानें चालत. गोंव्याच्या एका पाद्यानें सर्वांचें म्हणणें खोडून काढिलें; आणि मोठ्या गांभीर्यानें व तत्परतेनें असें सुचविलें, कीं 'मी बायबल हातांत घेऊन अग्नींत दीव्य करण्यास तयार आहें. मुसलमानांनींही तसेंच दीव्य करून दाखवावें. जो दीव्यांत उतरेल, त्याचा पक्ष खरा.' मुसलमानांनीं त्वेषानें ती गोष्ट नाकबूल केली. 'जन्मतःच मनुष्याची प्रवृत्ति धर्माकडे असते,' ह्या म्हणण्याची सत्यता पाहण्याकरितां अकबरानें एक चमत्कारिक प्रयोग करविला.—आईच्या अंगावर पिणारीं लहान मुलें घेऊन त्यांस एकांतवासांत त्यानें कोंडून ठेविलें. तेथें त्यांच्या कानीं कोणत्याही भाषेचा शब्दसुद्धां पडूं नये,

अशी तजवीज ठेविलेली होती. ह्या प्रयोगापासून कांहींच निष्पन्न झालें नाहीं. सर्व मुलें मुकीं मात्र निघालीं. असो.

कित्येक दिवसपर्यंत हें वादविवादाचें काम सुरळीत चाललें. परंतु बादशहाशीं जसजशी त्यांची घसण ज्यास्त पडूं लागली, तसतसे ते विशेष बहकूं लागले. एके दिवशीं वादविवादांत मोठी आरडाओरड झाली. बादशहासमोर विद्वान् लोक एकमेकांस शिव्या देऊं लागले. ह्याचें कारण कांहीं अंशीं अबुल् फज्ल्च होता. तो पाहिजे ते प्रश्न पुढें आणून उलमांस चिडवी. अकबराकडून असा एक प्रश्न त्यानें विचारविला, कीं 'धर्मशास्त्राप्रमाणें किती बायका करण्याचा मला अधिकार आहे?' अकबरांच्या बायका पुष्कळ होत्या. अकरांचीं तर नांवें दिलेलीं आहेत. कुराणांतील नियम असा आहे कीं, चोहोंपेक्षां ज्यास्त बायका करूं नयेत. पंडित लोक संकटांत पडले. चारच बायका करणें योग्य आहे असें म्हणावें, तर बादशहा रागावणार; सर्वच योग्य आहेत असें म्हणावें, तर धर्मशास्त्राविरुद्ध खोटें बोलल्याचें पाप लागणार. एका दोघां पंडितांनीं कुराणाला अनुसरून उत्तर दिलें, म्हणून बादशहानें त्यांस सभेंतून घालवून दिलें. तेव्हांपासून नवीन नवीन सुधारक पंडित सभेंत येऊं लागले, आणि अकबर आपल्या धर्मातील दोष उघडपणें काढूं लागला. होतां होतां सुनीपंथावरील त्याची श्रद्धा उडाली. त्याला शियापंथ बरासा वाटूं लागला. उलमांचा पाडाव करून त्यांचा सर्व अधिकार आपण घ्यावा, आणि पूर्वी धर्मकलहांचा निकाल करण्यास 'मुजाहिद्' नेमलेले असत, त्यांच्या ऐवजीं आपणच धर्मगुरु बनावें, अशी अकबरास इच्छा उत्पन्न झाली. एके दिवशीं गुरुवारीं त्यानें हा प्रश्न काढिला. त्याजबद्दल उलमा गहजब करतील हें त्यास ठाऊकच होतें. वादविवादावरून एक गोष्ट उघड दिसून आली होती ती अशी, कीं उलमा मंडळींतच मतभेद फार आहे. हें जाणून अकबरानें असें सुचविलें, कीं ज्या ठिकाणीं उलमांचा मतभेद पडेल, त्या ठिकाणीं बादशहानें निकाल करावा. पुढें उलमांच्या नांवानें एक करारनामा करण्यांत आला. त्यांत असें लिहिलें होतें, कीं जेव्हां जेव्हां मतभेद होईल, तेव्हां निकाल करण्याचा व कुराणांतील वचनांस अनुसरून धर्मांत नवीन फेरफार करण्याचा अधिकार बादशहास आहे. हा करारनामा शेख मुबारिक ह्यानें लिहून काढिला. अकबरानें सर्व उलमांस त्याजवर सह्या

करण्यास सांगितलें. उलमास जर बादशहाच्या पदरीं सरकारी नोकऱ्या नसत्या तर त्यांनीं सह्या केल्या नसत्या. शेवटीं निरुपायास्तव त्यांनीं सह्या केल्या, (सन १५७९). नंतर हा करारनामा जिकडे तिकडे प्रसिद्ध करण्यांत आला. झालें. उलमांचा अधिकार गेला. बादशहा करील ती पूर्वदिशा असें झालें. उलमांचा अध्यक्ष, आणि सरन्यायाधीश या दोघांस अकबरानें एकदम नोकरीवरून दूर केलें. इंग्लंडांत आठव्या हेन्रीनें जसा पोपचा संबंध तोडून, आपणच धर्माचा मुख्य असें जाहीर केलें, तसाच हा प्रकार होय. हिंदुस्थानांत मुसलमानी धर्माच्या इतिहासांत उलमांचा पाडाव झाला, ही गोष्ट विशेष स्मरणीय आहे. उलमा जरी अज्ञानी आणि दुराग्रही होते, तरी मुसलमान धर्माचीं चालत आलेलीं मतें व मुसलमानी दरबार यांचें स्वरूप कायम राखण्यास त्यांनीं अव्याहत प्रयत्न केले होते. आजपर्यंतच्या मुसलमानी धर्मांत त्यांचें महत्त्व विशेष होतें. महंमद पैगंबराच्या कायद्याची बरोबर अंमलबजावणी करून ते एखाद्या दुष्ट राजाच्या जुलमी वर्तनाला मर्यादेबाहेर जाऊं देत नसत; आणि राज्यांतील सर्व कामदारांस ते कुराणाचीं महातत्त्वें पाळण्यास लावीत. एकंदर मुसलमानांचें सार्वजनिक मत अमुक एक प्रकारचें आहे असें ठरविण्यांत ते पुढारी असत. सारांश, राजाच्या मर्जीविरुद्ध कोणतीही गोष्ट करण्यास उलमा मंडळीच कायती धजत असे.

गुरुवार रात्रींच्या वादविवादांस एकदां सुरुवात झाल्यावर चार वर्षांच्या आंत उलमांचा अधिकार नाहींसा झाला. एवढ्यानेंच अबुल् फज्ल्ची तृप्ति झाली नाहीं. त्याच्या बुद्धीचें धाडस आणि खुशामत करण्याची त्याची इच्छा ह्या दोहोंसही जागा मिळेल असा एक नवीनच बूट त्यानें बाहेर काढिला. 'अकबर हाच बारावा इमाम होय; जगाचा उद्धार करण्याकरितां परमेश्वरानेंच हा अवतार घेतला आहे,' असें अबुल् फज्ल्नें जाहीर केलें. ही गोष्ट ऐकून सर्व दरबारास अचंबा वाटला. परंतु एकंदरींत त्या वेळेस अकबरावर लोकांची भक्ति विशेष असल्यामुळें त्यांनीं त्याबद्दल कुरकूर केली नाहीं. अकबराला तर ही गोष्ट फारच मनोरम वाटली. अबुल् फज्ल्विषयीं त्याच्या मनांत ज्यास्त पूज्यबुद्धि आणि विश्वास उत्पन्न झाला. इतक्या गोष्टी होईपर्यंत अकबराच्या धर्मसमजुतींत फारच फरक पडला. विचारसरणीच्या व सामान्य नीति-

तत्त्वांच्या सांच्यांतून जेवढें उतरेल तेवढें खरें, आणि बाकी सगळें झूट, असा त्याचा पक्का ग्रह बनला. अर्थात् मुसलमानी धर्मावरील त्याचा विश्वास साफ उडाला. महंमद पैगंबरानें दहा वर्षांच्या मुली (आयेशा) शीं लग्न लाविलें. झैनाब ही त्याच्या दत्तक–पुत्राची बायको असतां, तिचा घटस्फोट झाल्यावर महंमद पैगंबरानें स्वतःच तिच्याशीं लग्न लाविलें. असले अनाचार करणारा महंमद परमेश्वराचा प्रेषक होऊं शकणार नाहीं, असें अकबर उघडपणें म्हणूं लागला. महंमद पैगंबर एका रात्रीं स्वर्गास चालून गेला, अशी जी गोष्ट आहे ती खोटी होय, असें त्यानें जाहीर केलें. तेव्हां आतां दुसऱ्या धर्मांचा तपास करण्याची जिज्ञासा अकबरास आपोआप उत्पन्न झाली. मोठमोठे विद्वान्, ब्राह्मण, सूफी व फारशी पंडित आणि क्रिस्ती साधू यांस त्यानें आपआपले धर्म प्रतिपादन करण्यासाठीं दिल्लीस आणिलें. आत्म्याचें जन्मांतर व अखेरीस त्याचा मूलप्रकृतींत लय होणें; सूर्य व अग्नि हे परमेश्वराचे पार्थिव अंश होत असें मानणें, इत्यादि गोष्टींवर त्याचा भरंवसा बसत चालला. क्रिस्ती धर्माकडे त्याचा कल विशेष दिसूं लागला. तथापि क्रिस्तांची देवत्रयी व त्यांचे अवतार हे विषय त्यास खरे वाटले नाहींत. क्रिस्ती धर्माकडे त्याचा ओढा वळण्यास आणखी कित्येक कारणें झालीं. पोर्तुगीझ लोकांनीं थोड्याच वेळांत जें यश हिंदुस्थानांत संपादन केलें होतें, तें त्याचे कानावर जाऊन, त्यांजबद्दल त्याचा ग्रह अनुकूल बनत चालला होता. पोर्तुगीझ लोकांचीं विशाल गलबतें, त्यांचे दुर्भेद्य किल्ले आणि अवजड तोफा, इत्यादि गोष्टी ऐकून, त्यानें गोवें येथील मुख्य अधिकाऱ्यास पत्र लिहिलें, आणि क्रिस्तीधर्म शिकविण्याकरितां तीन चार विद्वान् गृहस्थ फत्तेपूरसिक्रीस बोलाविले. एवढ्या पराक्रमी बादशहास आपल्या धर्मांत ओढण्याची संधि आलेली पाहून गोव्यांतील पाद्री लोक हर्षोद्रेकानें वेडे होऊन गेले. जो तो आपणाला पाठविण्याविषयीं आग्रह करूं लागला. शेवटीं तीन असामी सिक्रीस गेले. अकबर मोठ्या उत्कंठेनें त्यांची प्रतीक्षा करीत होता. ते सिक्रीस जाऊन पोंचले, तेव्हां अकबरानें त्यांचा चांगला सत्कार केला. क्रीस्तीधर्माचीं पुस्तकें वगैरे कित्येक नजराणे त्यांनीं आणिले होते, त्यांचा बादशहानें मोठ्या आदरानें स्वीकार केला. बायबलाचें पुस्तक त्यानें आपल्या डोक्यावर ठेविलें. तें वाचण्याची

त्याला इतकी उत्कंठा झाली होती, कीं लागलाच तो त्या क्रिस्ती गुरूपाशीं तें वाचीत बसला. वाड्याच्या नजीकच त्यानें त्यांस उतरण्यास जागा दिली. अंतर्यामीं त्याचा मुसलमानी धर्म सुटला होता, तरी बाह्याचार फारसा बदलला नव्हता. मुसलमानी मुल्ला आणि क्रिस्ती गुरु यांजला आपआपल्या धर्माचें प्रतिपादन करण्यासाठीं त्यानें वादविवाद करण्यास लाविलें. क्रिस्ती धर्मावर त्याची श्रद्धा बसली. मुसलमान इतिहासकार क्रिस्ती गुरूंना वाक्प्रहार करितात. बदाऊनी म्हणून जो इतिहासकार आहे त्यानें लिहिलें आहे, कीं अकबर क्रिस्ती झाला. परंतु वास्तविक प्रकार तसा नव्हता. क्रिस्ती गुरूंनीं होता तितका प्रयत्न केला, तरी अकबर बाप्तिस्मा घेण्यास तयार झाला नाहीं. त्यानें आपला तेरा वर्षांचा मुलगा मुराद यास त्यांचे हवालीं करून, क्रिस्ती धर्म आणि पाश्चात्य शास्त्रें यांचा अभ्यास करण्यास लाविलें, आणि बायबलाचा तर्जुमा करण्यास अबुल् फज्ल् यास हुकूम दिला. त्यानें एक क्रिस्ती मंदिर बांधविलें. त्यांत तो पोर्तुगीझ गुरूंबरोबर केव्हां केव्हां जाई, आणि क्रिस्ताच्या मूर्तीपुढें नमन करी. आपल्या राज्यांत पाहिजे तेथें लोकांनीं क्रिस्ती धर्म शिकण्याची आणि आपले धर्मविधी उघडपणें करण्याची त्यांस मोकळीक दिली. इतकें करूनही अकबरानें त्या धर्माची दीक्षा घेतली नाहीं. अबुल् फज्ल्शिवाय दुसरा कोणी तसें करण्याविषयीं त्यास आपली संमति देईना. त्याची आई पुष्कळ दिवस जिवंत होती, तिनें त्याचा फार निषेध केला. त्याच्या बायका तर क्रिस्ती धर्म स्वीकारण्यास तयार नव्हत्या. अखेरपर्यंत अकबरानें धर्मांतर केलें नाहीं. सन १५८२ च्या सुमारास फत्तेपूरसिक्री सोडून राज्याचे बंदोबस्ताकरितां त्यास लाहोर येथें जाऊन राहवें लागलें. अकबराच्या धर्मसमजुतींत फरक पडला हें ऐकून अफगाण लोक त्याजविरुद्ध उठले होते. त्यांच्या धर्माचा पाडाव करण्याकरितांच राजा मानसिंग यास त्यानें काबूलचा सुभेदार नेमिलें.

लाहोर येथें अकबरानें नवीन धर्म स्थापण्यास सुरुवात केली. महंमद पैगंबरानें ज्याप्रमाणें यहुदी आणि क्रिस्ती ह्या दोन धर्मांतील चांगल्या चांगल्या गोष्टी निवडून मुसलमानी धर्म तयार केला, त्याचप्रमाणें सर्व धर्मांतून चांगल्या चांगल्या गोष्टी निवडून घेऊन, अकबरानें ह्या आपल्या नवीन धर्माची स्थापना केली. त्याचें नांव त्यानें 'दीने इलाही' असें

ठेविलें. अकबर स्वतः ह्या धर्माचा पैगंबर झाला. सृष्टींतील अनेक चमत्कार पाहून जें सृष्टिकर्त्या परमेश्वराचें ज्ञान होतें, त्याजवर ह्या धर्माचा पाया असून, यच्चयावत् प्रसिद्ध धर्मांतील उत्तमोत्तम संप्रदायांचा ह्यांत समावेश केलेला होता. मुसलमानांतील सुंता व बहुपत्नीत्व, क्रिस्तांमधील बाप्तिस्मा व येशूची उपासना, हिंदु धर्मांतील पुनर्जन्म व आत्म्याचें श्रेष्ठत्व, फारशी लोकांतील अग्निपूजा इत्यादि विषयांची त्यानें एक गोळाबेरीज केली. एवंच लाहोरास तो इस्लामाचा वैरी बनला. त्यानें अनेक मशिदी मोडून त्यांत घोड्यांचे तबेले केले. हिंदु लोकांवर जिझिया कर आजपर्यंत घेण्यांत येत असे, तो त्यानें माफ केला. सरकारी संबंधांत जे जातिभेद व धर्मभेद चालत आले होते, ते सर्व त्यानें मोडून टाकिले. आपणाला ईश्वराचा अंश समजून लोकांनीं भजावें अशी त्याची इच्छा होती. तथापि त्याचा धर्म खरोखरी काय होता हें बरोबर समजत नाहीं. सकाळीं, दुपारीं, सायंकाळीं व मध्यरात्रीं तो सूर्याची उपासना करी. वर्षांतून एकवार नवीन अग्नि तयार करवून तो त्याची पूजा करी. इराणांत किर्मान येथें मुद्दाम माणसें पाठवून, आणि मोठा खर्च करून त्यानें तेथील मंदिरांतून पवित्र अग्नि आणविला. अकबराचे कित्येक अनुयायी बनले होते, ते त्यास परमेश्वराचा अंश समजत; पण असें करण्यांत त्यांचा स्वार्थापलीकडे दुसरा हेतु नसावा. लोकांस अपूर्व चमत्कार दाखविण्याची त्यास फार आवड होती. रोग बरे होण्यासाठीं तो त्यांस आपल्या पायांचें तीर्थ देई. मुलें होण्याकरितां पुष्कळ बायका त्यास नवस करीत. त्यांच्या इच्छा तृप्त झाल्यावर त्या नवस फेडण्यास येत, तेव्हां त्यांनीं आणिलेल्या वस्तूंचा अकबर मोठ्या आनंदानें स्वीकार करी. सकाळीं त्याचें दर्शन घेण्यास पुष्कळ लोक येत. म्हणून पहिल्या मजल्यावर लोकांस दर्शन देण्यासाठीं खिडकींत झरोका म्हणून एक जागा तयार केलेली होती, त्या ठिकाणीं अकबर येऊन बसे आणि लोक खालीं उभे राहून त्याची देवाप्रमाणें पूजा करीत. आपणास परमेश्वराचा अवतार समजून लोकांनीं भजावें, ह्या त्याच्या इच्छेवरून त्याचे मनांत काय होतें हें समजण्यास साधन मिळतें. सर्व जातींच्या लोकांस एका अंमलाखालीं आणावयाचें, हा त्याचा मुख्य हेतु होता. राज्यांत एकी राहण्यास मुसलमानी धर्म त्यास

सोयवार वाटला नाहीं. प्रथमतः आपण बारावा इमाम आहों असें त्यानें जाहीर केलें. परंतु मुसलमानांशिवाय इतरांचा या गोष्टीवर भरंवसा बसण्यासारखा नव्हता. म्हणून ही इमामाची कल्पना त्यास लवकरच सोडून द्यावी लागली. सूर्य व अग्नि यांची उपासना ही हिंदु व फारशी या दोनही लोकांस मान्य होती. राजा हा ईश्वरी अंश आहे, सर्व जगतास प्रकाश पुरविणाऱ्या सूर्यदेवतेचा तो एक किरणच होय, ही अबुल् फज्ल्नें काढलेली कल्पना अकबरानें उचलली. राजा ईश्वरी अंश होय, ही कल्पना प्राच्य लोकांस नवी नाहीं. इंग्लंडांतही याच वेळेस हीच कल्पना चालू होती. अशा सर्व साहित्यानिशीं अकबरानें आपला नवीन धर्म स्थापन केला. अकबर स्वतः या नवीन धर्माची दीक्षा देत असे. जो कोणी दीक्षा घेण्यास येई, तो डोकीचें पागोटें काढून बादशहाचे पायांपाशीं ठेवी. बादशहा त्यास कांहीं खूण देई. तींत परमेश्वराचें नांव असून ‘ अल्ला हो अकबर ’ अशीं अक्षरें लिहिलेलीं असत. अकबर या शब्दाचे अर्थ दोन आहेत. अकबर म्हणजे थोर आणि अकबर हें बादशहाचें नांव. ह्यामुळें वरील वाक्याचे अर्थ दोन होतात. अल्ला म्हणजे ईश्वर हा थोर आहे हा एक अर्थ; आणि अकबर हाच ईश्वर आहे असा दुसरा अर्थ. अशा संशयित अर्थाच्या वाक्याचा उपयोग करून, अकबरानें कोणास न दुखवितां आपला हेतु तडीस नेला. दरबारांत होणारे सर्व मुसलमानी सणांचे समारंभ त्यानें बंद केले. एकंदरीनें पाहतां त्याच्या नवीन धर्मांत फारशी व हिंदु या दोहोंचें मिश्रण होतें. फारशी लोकांचा शक आणि त्यांचे सण अकबरानें चालू केले. नवरोजचा जंगी समारंभ सुरू केला. गोवध व गोमांसभक्षण त्यानें मना केलें; दाढ्या राखणें व चुलत बहिणीशीं लग्न लावणें हीं त्यानें मना केलीं. नमाज पढणें आणि मक्केची यात्रा करणें ह्या गोष्टी त्यानें बंद केल्या. सन १५८३त तो स्वतः गंध लावूं लागला. डुक्कर आणि कुत्रा यांस अपवित्र समजूं नये असें त्यानें फर्माविलें. अकबराचा एक आवडता कुत्रा मेला, त्याजवर त्यानें मोठी कबर बांधिली. मद्यप्राशनाची मनाई त्यानें काढून टाकिली; मात्र त्याच्या अतिरेकाबद्दल शिक्षा ठरविल्या. वेश्यांच्या नांवाची नोंद करून शैतानपुरा नामक पृथग्भाग त्यांस नेमून दिला, आणि त्यांजवर कर बसवून अल्पवयी मुलींस अशा धंद्यांत घेण्याची सक्त मनाई केली. ह्या

नवीन फेरफारांविषयीं दरबारांतील मुसलमानांचें कांहीं चाललें नाहीं. ते अबुल् फज्लचा द्वेष करीत. हिंदूंस मोठमोठे अधिकार दिल्याबद्दल त्यांस मोठें वैषम्य वाटे. आरंभींच उलमांची थट्टा करण्यास ते शिकले होते, तेव्हां अंतःकरणांतून प्रत्यक्ष बादशहाचाही ते उपहास करीत असतील.

तथापि अकबराच्या मनांत आपल्या ह्या नवीन धर्माबद्दल हेकेखोरपणा नव्हता. त्याचा प्रसार करण्याच्या भरांत त्याची दृष्टि पक्षपातानें मुळींच अंध झाली नाहीं. कोणीकडून तरी राज्याचा उत्कर्ष व्हावा, हा त्याचे मनांतील मुख्य हेतु असल्यामुळें, स्वसंस्थापित धर्माच्या अभिमानाचें विवेकबुद्धीस अंधत्व आणणारें प्रखर वारें त्याच्या अंगीं संचार करीत नव्हतें. म्हणून त्याच्या मृत्यूबरोबर त्याचे धर्माचाही अंत झाला. सामान्य जनसमूहास देवभोळेपणा पाहिजे, तो नसल्यामुळेंच अकबराचा धर्म नाश पावला असावा असें वाटतें. या नवीन धर्माच्या अनुयायांचीं अबुल् फज्ल् यानें अठरा नांवें दिलीं आहेत. त्यांत स्वतः अबुल् फज्ल्, त्याचा भाऊ व बाप असे तिघे असून हिंदूंचें नांव एकच आहे, तें बीरबलाचें होय. ह्या नवीन धर्मसंस्थापनेंत बीरबलाचेंही अंग विशेष होतें. सूर्योपासनेबद्दल अकबराची खात्री बीरबलानें केली. शेतेंभातें, धान्यें आणि फळफळावळ इत्यादि उत्पन्न होण्यास तेजाची अत्यंत जरूरी असून सूर्यापासूनच ह्या अखिल विश्वास प्रकाश मिळतो; सर्व ब्रह्मांडास ज्याच्यापासून जीवनकला प्राप्त होते, त्या परमात्म्याचा सूर्य हा प्रतिनिधि आहे. म्हणून सर्वांआधीं सूर्याची पूजा करणें अवश्य आहे, हें बीरबलानें अकबरास शिकविलें. त्याचप्रमाणें अग्नि, उदक, धेनु, वनस्पति इत्यादि उपयुक्त इष्ट पदार्थांच्या ठिकाणीं ईश्वरी अंश खेळत असतो, हीही कल्पना बीरबलानेंच अकबरास शिकविली.

सन १५९७ च्या सुमारास लाहोर येथें बादशहा नवरोजचा समारंभ करीत होता. सूर्याची मूर्ति गादीवर बसवून तिची त्यानें पूजा चालविली होती, इतक्यांत एकाएकीं मोठी वीज पडून त्याची सर्व छावणी जळून गेली. तेव्हांपासून आपल्या धर्माविषयीं अकबरास संशय येऊं लागला. ख्रिस्ती उपदेशक बरोबर घेऊन कांहीं दिवस तो काश्मिरास जाऊन राहिला. तेथून पुढें लाहोरास परत आला. पुढील कांहीं वर्षें दक्षिणेंतील युद्धसंग्रामांत गेलीं. अबुल फज्लचा खून झाला, तेव्हांपासून अकबराची

सर्व हिंमत खचली. आलेला दिवस कसा तरी लोटावयाचा यापलीकडे त्यानें पुढें कांहीं केलें नाहीं. त्यामुळें त्याचा नवीन स्थापिलेला धर्मही जागच्या जागींच राहिला.

अकबराच्या धर्मस्थापनेवर बील्हरिजनें उत्तम साधकबाधक टीका केली आहे, तिचा गोषवारा बोधप्रद असल्यामुळें पुढें देतों.

'अकबराच्या धर्माचें विवेचन अनेक ग्रंथकारांनीं निरनिराळ्या ठिकाणीं केलें आहे. टेनिसन कवीनें त्याजवर कविता सुद्धां लिहिली आहे. नीट विचार केला असतां, अकबरानें खऱ्या धर्मसंस्थापकासारखा निष्ठापूर्ण उद्योग मुळींच केला नाहीं. केवळ वेळ जाण्याचें व थोडी-बहुत जिज्ञासा भागविण्याचें तें एक साधन त्यास झालें होतें इतकेंच. क्रिस्ती व मुसलमान पंडित जोराजोरानें वादविवाद करूं लागले म्हणजे त्यास मोठी मौज वाटे. क्रिस्तीधर्म मनापासून स्वीकारावा अशी त्यास मुळींच इच्छा झाली नाहीं. त्याचें एकंदर धोरण, स्वभाव व करामत ह्यांचा नीट विचार केला म्हणजे खरी धर्मस्थापना करण्याच्या कामास तो नालायक होता असेंच म्हणावें लागतें. अकबर मुत्सुद्दी होता, आणि इहलोकचे व्यवहार सुरळीत चालविण्याची त्याची ही सर्व खटपट होती. भोजनानंतरची करमणूक म्हणून धर्मांचे वादविवाद त्यानें कितीही ऐकिले असले, तरी त्यानें आपल्या दृष्टीपुढचें मुख्य कर्तव्य यत्किंचित् ढळूं दिलें नाहीं. इबादतखान्यांत रात्रभर वादविवाद ऐकून, सकाळीं तो आपलीं नित्याचीं कामें शांतपणें सुरू करी. धर्माचा विचार त्या मंदिरा-बाहेर त्यानें आणिला नाहीं. त्याच्या धर्मसुधारणा कितीही योग्यतेच्या असल्या, तरी त्या जर सुरळीत राज्यकारभाराच्या आड येण्यासारख्या असल्या, तर त्यांचा स्वीकार तो करीत नसे. धर्मसंस्थापकाची योग्यता त्यास नव्हती, म्हणून त्या कामांत त्यास यशही आलें नाहीं. मनापासून जर तो धर्माचे नादास लागता, तर त्यास राज्य तरी सोडावें लागतें, अथवा औरंगजेबाप्रमाणें, धर्मसिद्धीसाठीं राज्यास मुकावें तरी लागलें असतें. धर्म म्हणजे काय, आणि त्याजवर आजपर्यंत कसा व किती विचार झाला आहे, हें समजण्याइतकी बुद्धि व विद्वत्ता अकबराच्या अंगीं मुळींच नव्हती. त्यास लिहितां वाचतां सुद्धां येत नव्हतें, मग ज्यास्त तर काय! बदाऊनी म्हणतो, 'अकबर अगदींच अक्षरशून्य होता.' म्हणून विद्वानांचे धार्मिक

वादविवाद चालले असतां, तेथील अध्यक्षस्थान स्वीकारण्यास तो बिलकुल लायक नव्हता. नुसती निरनिराळ्या विद्वानांनीं बोलण्यांत वापरलेली परिभाषा त्यास समजली असेल कीं नाहीं ह्याची सुद्धां शंका आहे. बोलणारांचे आवेशी हावभाव पाहण्यांतच त्यास करमणूक होऊन, जो जोरानें व आवेशानें आपलें म्हणणें प्रतिपादन करील, तो खरा असें त्यास वाटलें असेल. पूर्ववयांत स्थानेश्वर येथें एका मेळ्याचे प्रसंगीं तो हजर होता. त्या वेळीं तलावांत स्नान करण्याचे बाबतींत दोन पंथांच्या साधूंचा तंटा लागला. ते बादशहासमोर येऊन म्हणाले, 'आम्ही आपसांत लढून ह्या तंट्याचा निकाल करितों.' अकबरानें होय म्हणून लढाईची मौज पाहिली. दोनही बाजूंचे बहुतेक लोक मरून गेले. ही जशी प्रत्यक्ष लढाईची मौज त्यास विनादिक्कत आवडली, तसेंच इबादतखान्यांतील हें जिव्हायुद्ध त्यास आवडलें. पुढें पुढें ह्या विषयांत त्यास बरेंच यश येऊं लागलें, तेव्हां त्यास वाटूं लागलें कीं आपणास विद्या येत नाहीं हें एकपरी चांगलेंच आहे. धर्मसंस्थापकांस कोठें विद्या येत असते!' त्याच्या खुषमस्कऱ्यांनीं ही कल्पना त्याच्या डोक्यांत भरवून दिली, आणि त्यालाही ती आवडली. जर विद्या न येणें हा खरोखर गुण असेल, तर मग महंमदपैगंबराविषयीं अकबराचे मनांत एवढा अनादर काय म्हणून! 'पैगंबर काय यःकश्चित् अडाणी आरब!' अशी त्याची निंदा तरी अकबरानें कां करावी!

'पुष्कळ पौर्वात्य (!) लोकांस धर्मांचे बाबतींत लुडबुडण्याची संवय असते. (क्रिस्त सुद्धां पौर्वात्यच असल्यामुळें, धर्माच्या कामांत लुडबुडण्याचा मान पाश्चात्यांस मिळणें शक्यच नाहीं.) तयमूर, बाबर, हुमायून, बुखाऱ्याचा शयबानीखान, नादीरशहा, टिपु सुलतान, अशा अनेक पुरुषांनीं धर्मसंस्थापनेची घमेंड मारिलेली आहे. अकबरांत व त्यांच्यांत फरक एवढाच कीं, धर्माच्या नांवाखालीं त्यानें कोणावर जुलूम केला नाहीं. उलट पक्षीं प्रत्येक धर्मांत कांहीं तथ्य व कांहीं भेसळ आहे, अशी त्याची खात्री झाली. अकबराच्या ठिकाणीं असा विशेष फरक पडण्याचें कारण इतकेंच दिसतें, कीं त्याची बुद्धि कोणत्याही विषयाचा स्वतंत्र विचार करण्यास समर्थ होती; आग्रही नव्हती. ह्या त्याच्या गुणाची तारीफ बदाऊनीनेंही केली आहे. तथापि मुसलमानी धर्माबद्दल त्यानें इतका कठोरपणा

NATIONAL ARCHIVES OF INDIA

धारण करण्याचें कारण नव्हतें. आरंभीं इस्लामावर अकबराची निष्ठा दृढ होती. दररोज पांच वेळ तो नमाज पढे; सालोसाल अजमीर येथील पीराच्या दर्शनास पायीं जाई; मक्केची यात्रा करण्यास लोकांस प्रोत्साहन देई. यात्रेकरूंसाठीं अकबरानें जितका खर्च केला, तितका दुसऱ्या राजानें कधीं केला नाहीं. स्वतः मक्केस जाण्याचाही त्याचा इरादा होता. त्यानें यात्रेकरूचा पोशाख घातला, आणि कांहीं मार्ग गेलाही; परंतु सर्वांनीच निषेध केल्यामुळें त्यास परत यावें लागलें. तो स्वतःच म्हणतो, 'आरंभीं मी लोकांवर धर्माच्या बाबतींत जुलूम करीत असें. परंतु माझें ज्ञान वाढत गेलें, तशी सर्व धर्मांबद्दल माझ्या मनांत समता उत्पन्न झाली. जुलमानें मुसलमान झाल्यांची किंमत काय ?' प्रत्यक्ष व्यवहारांत मात्र हें सुंदर तत्त्व त्यानें पाळिल्याचें दिसत नाहीं. बदाऊनी लिहितो, कंदाहार व अन्य ठिकाणीं पुष्कळ शेख व फकीर गुलाम म्हणून विक्रीसाठीं पाठवून, त्यांचे बदल्यांत तिकडून अकबर घोडे आणवीत असे. ही गोष्ट त्यानें पोरवयांत केली, असें मॅलेसन म्हणतो, तें खरें नव्हे. माणसें देऊन घोडे आणण्याचें काम स. १५८१–८२ तलें, म्हणजे अकबरानें मुसलमानी धर्म सोडल्यानंतर पुष्कळ दिवसांचें आहे. अकबराच्या दयाळु स्वभावाच्या लांब लांब गोष्टी सांगण्यांत येतात. प्रत्यक्ष तो स्वतः हा गुण आपल्या अंगीं असल्याची प्रौढी मिरवितो. तथापि नीट तपासून पाहिलें असतां औरंगजेबाहून तो ज्यास्त क्रूर होता. त्यानें निरपराधी लोकांची कत्तल तूर केली; हत्तीच्या पायांखालीं माणसें तुडविली; आणखी क्रूरपणा तो कसा असावयाचा ? तो गरीब व दयाळु दिसतो याचें कारण, सलीमप्रमाणें रागाच्या आवेशांत तो क्रूर कृत्य करीत नसे. तथापि त्याचें अंतःकरण कठोर होतें, आणि बापाचा गोड व विनोदी स्वभाव त्याच्या ठिकाणीं मुळींच उतरला नव्हता.

अकबराची मुसलमानी धर्मावरची श्रद्धा उडण्यास आणखीही कारणें झालेलीं आहेत. एकदां रजपूत मुलीशीं लग्नें करून रजपुतांस खुष ठेवण्याचें काम त्यानें स्वीकारिलें, त्यामुळें मुसलमानी धर्मास फांटा देणें ओघानेंच प्राप्त झालें. दुसऱ्या धर्मांत हजारों लोक पवित्रपणें व नीतानें वागणारे त्यास दिसले, तेव्हां धर्माचा व नीतीचा अर्थार्थी संबंध नाहीं अशी त्याची खात्री होऊं लागली. पोर्तुगीझ मिशनरी आणि इटॅलियन विद्वान्

पाद्री आक्वेव्हिया यांच्या संगतीचा परिणामही अकबराच्या मनावर पुष्कळ झाला. तो कालच सुधारणेचा व विचक्षणेचा होता; युरोपांत त्या वेळेस खडाजंगी चालली होती. तिचा थोडाबहुत परिणाम हिंदुस्थानावरही झाल्याशिवाय राहिला नाहीं. वास्तविक धर्माच्या संबंधांत अकबरानें नवीन विशेष कांहीं न करितां, पहिलें असलेले मोडिलें ज्यास्त. मुसलमानीधर्म बरा नाहीं, म्हणून तो मोडण्याची कामगिरी त्यानें बरोबर केली, पण नवीन धर्म बनविण्याचें काम त्यास साधलें नाहीं. त्याचा 'दीनेइलाही' धर्म मनापासून एकानेंही स्वीकारिला नाहीं, आणि तो अकबराबरोबरच समाप्तही झाला. धर्मसंस्थापकाच्या अंगीं जी जाज्वल्य निष्ठा असावी लागते ती त्याच्या ठायीं नव्हती. बुद्ध, किंवा क्रिस्त यांच्या ठायीं सर्वस्वाचा त्याग करण्याचें सामर्थ्य होतें, तें अकबराच्या ठिकाणीं नव्हतें. राज्यव्यवस्थेच्या बाबतींत आपल्या नवीन धर्माचा अडथळा येतो असें दिसतांच, त्याचा वेग त्यानें लगेच कमी केला. त्याच्या धर्मस्वातंत्र्याच्या नवीन कल्पनांनीं बंगाल्यांत बंड झालें असें कळलें, त्याबरोबर त्यानें पूर्वीचा पोकळपणा बराच सोडून दिला. बंडापूर्वी क्रिस्ती पाद्र्यांस जसा तो आदरानें भेटे तसा बंडानंतर भेटेनासा झाला. स. १५८६ त तुराणचा अब्दुल्लाखान ऊझबेग ह्यानें अकबरास वकिलाबरोबर पत्र पाठविलें, आणि मुसलमानी धर्माची अवज्ञा करून, ब्राह्मण वगैरे पंडितांना आदर दाखविल्याबद्दल त्याची खूप कानउघाडणी केली. त्यावर अकबरानें जो जबाब लिहिला आहे, त्यावरून अकबराची लटपट दिसून येते. आरंभीं कुराणांतील वाक्यें लिहून तो म्हणतो, 'माझा धर्म कुराणास अनुसरून आहे, आणि त्यामुळेंच माझ्या राज्याची अशी भरभराट होत आहे. धर्म आणि भाग्य हीं जुळीं भावंडें आहेत; आणि सर्व धर्मांचे लोक माझ्या मजनीं आहेत. अशा रीतीनें हिंदु व क्रिस्ती ह्यां दोघांचाही पाडाव मीं केला आहे. तेव्हां मुसलमानी धर्माचें मीं धारण केलेलें स्वरूपच योग्य आहे ह्यांत संशय नाहीं. आतां माझी एवढीच इच्छा आहे, कीं हिंदुलोक पूर्णपणें ताब्यांत आल्यावर, मग फिरंग्यांचा समाचार घ्यावा. ह्या फिरंग्यांनीं पश्चिमकिनाऱ्यावर बराच मुलूख काबीज केला असून, ते आमच्या मक्केच्या यात्रेकरूंना विनाकारण त्रास देत असतात. मी सुनी

असून, इराणच्या शहाचा शियापंथ मला पसंत नाहीं.' तुराणचा अब्दुल्लाखान सुनीच होता.

'एल्फिन्स्टन म्हणतो, कीं अकबराच्या धर्मात परमेश्वराची शुद्धभक्ति तेवढीच राहिलेली होती. पण हेंही खरें दिसत नाहीं. आपण स्वतःच परमेश्वराचा अवतार असें तो समजे. ह्या बाबतींत अबुल् फज्लसारख्या त्याच्या भजकांनीं हिंदुधर्मांतील बऱ्याच तत्त्वांचा स्वीकार केला. धर्माच्या बाबतींत बादशहाच मुख्य आहे, तो करील तें सर्वांनीं निमूटपणें मानिलें पाहिजे, असा जो करारनामा मुबारिकनें लिहिलेला जाहीर करण्यांत आला, तो तरी निव्वळ अकबराची स्तुति करण्याकरितांच होय. ह्या असल्या महत्त्वाच्या करारनाम्याचा उल्लेख अबुल्फज्ल् मुळींच करीत नाहीं, ह्यावरून हा सर्व प्रकार त्यास संमत होता असें दिसत नाहीं.'

२. **शरीर, स्वभाव व करामत.**—अकबराच्या तसबिरा अनेक प्रसिद्ध आहेत; आणि त्या निरनिराळ्या वेळीं व निरनिराळ्या लोकांनीं काढिलेल्या आहेत. त्यांवरून असें दिसतें, कीं तो बराच लठ्ठ व गोरा असून त्याचें कपाळ रुंद होतें; आणि त्यास दाढी नव्हती. जहांगीर आपल्या वृत्तान्तांत लिहितो, 'त्याची उंची बेताची असून रंग गव्हासारखा गोरा, आणि डोळे व भिंवया काळ्या कुळकुळित होत्या. त्याचा चेहरा पाणीदार व सुंदर दिसे. त्याची कमर बारीक, छाती रुंद, व हात लांब होते. डाव्या नाकपुडीवर एक लहानसा चामखूळ होता, त्याच्या योगानें चेहरा खुलत असे. त्याचा आवाज फारच मोठा असून वर्णनाच्या वगैरे भरांत ज्यास्त मधुर भासत असे. त्याच्या चर्येंत दिव्य तेज झळकत असे. त्याच्या गुणांची स्तुति करावी तितकी थोडीच. त्यांचें वर्णन करूं लागल्यास मोठे ग्रंथ होतील, पण गुण संपावयाचे नाहींत. एवढें राज्य, एवढी अपार संपत्ति, इतके लढाऊ हत्ती व घोडे वगैरे सर्व कांहीं असून, त्यानें आपला अत्यंत नम्र भाव व ईश्वरभक्ति केंसाइतकी ढळूं दिली नाहीं. परमेश्वरापुढें आपण नीच पामर आहों असें तो सदैव समजत असे.' गोव्याचे पोर्तुगीझ पाद्री त्याजपाशीं होते, ते म्हणतात, 'पंन्नास वर्षांचा असतां अकबर युरोपियन लोकांसारखा गोरा असून विशेष शहाणा व बुद्धिमान् होता.'

अकबराच्या स्वभावांतील मोठा गुण म्हणजे लोकांवरील त्याचें प्रेम होय. मित्र संपादन करण्याची त्याची तऱ्हा अप्रतिम होती. बाबर व हुमायून यांच्या ठिकाणींही हा गुण होता. अबुल् फज्ल्, फैजी, बीरबल, दूधभाऊ अझीझ कोका, त्याच्या अनेक राण्या व इतर मंडळी ह्या सर्वांवर त्याचें अकृत्रिम प्रेम होतें. अझीझ कोका लहरी होता. त्यानें पुष्कळदां अकबरास चीड येण्यासारखीं कृत्यें केलीं, तथापि अकबरानें त्यास नेहमीं क्षमा करावी. अझीझचा बाप लहानपणीं अकबराचे लाड करीत असे, तें आठवून अकबरानें अझीझचे सर्व अपराध पोटांत घातले. जहांगीर म्हणतो, 'अकबरानें मला स्वप्नांत येऊन सांगितलें, कीं बाबारे, कसेंही करून अझीझचे अपराध पोटांत घाल. त्यास शासन करूं नको.'

सामान्य राज्यकर्त्यांपेक्षां अकबराच्या अंगीं अनेक विशेष गुण होते, त्यांमुळेंच तो इतका मोठेपणास चढला. दुसऱ्याच्या कह्यांत राहवयाचें नाहीं, हा सर्व मोगलांत सांपडणारा गुण अकबराच्याही अंगीं होता. तरी तो अंत:करणाचा कोमल व अत्यंत मनमिळाऊ होता. शरीरानें तो फार उंच नव्हता व फार ठेंगूही नव्हता. त्याची छाती रुंद व हात लांब असून एकंदर बांधा सुंदर होता. वर्ण पिंगटगोरा होता. त्याची शक्ति विलक्षण असून धैर्यही तसेंच अप्रतिम होतें. हिमूशीं लढण्यांत त्यानें अतिशय चातुर्य व शौर्य प्रगट केलें तें कोणाही वीर-पुरुषास शोभण्यासारखें आहे. हत्तीनें आपल्या माहुतास ठार मारिलें असतां हा त्याजवर चटकन उडी मारून बसे, आणि त्यास ताळ्यावर आणी. त्यानें अतिशय जलद चालणाऱ्या सांडणी बाळगिल्या होता, त्यांच्या साह्यानें तो दूरदूरच्या मजला थोड्या अवकाशांत पार पाडून, त्वरेनें शत्रूस गांठून निमिषमात्रांत त्याचा नाश करी. दरसहा मैलांवर त्यानें टपालाचे पळते शिपाई ठेविले होते, आणि सांडणीस्वारांकरवीं लांब-लांबच्या ठिकाणीं देखील बादशहाचे हुकूम त्वरित पोंचत असत. त्याचे एकंदर खासगी घोडे बाराहजार होते.

निशाण मारण्यांत तो मोठा पटाईत होता. संग्राम नांवाची त्याची एक आवडती बंदूक होती, तिच्या साह्यानें त्यानें हजारों माणसें मारिलीं. चितोडगड घेतांना सरदार जयमल्ल याचा वध त्यानें ह्याच बंदुकीनें केला.

अकबरास शारीरिक खेळांची अतोनात आवड होती. त्यास पोलो खेळण्याचा नाद इतका असे, कीं रात्रीं सुद्धां आगीचे गोळे करून तो खेळत असे. मुसलमानांनींच हा खेळ प्रथम जनानखान्याकारितां शोधून काढिला. मोगलांच्या जनानखान्यांत हा खेळ विशेष प्रिय असून, सर्व स्त्रिया घोड्यावर बसण्यांत उत्कृष्ट पटाईत होत्या. अकबरास शिकारीचा नाद अतिशय होता. मोटमोठे हाके करून, चाळीस पन्नास मैल घेराचें जंगल वेढण्यांत येई. त्यांत सर्व प्रकारचीं श्वापदें सांपडत. त्यानें एका दिवसांत साडेतीनशें हत्ती पकडल्याचा उल्लेख आहे. अकबरास यांत्रिक कलेची आवड होती. अनेक उपयुक्त युक्त्या त्यानें स्वकल्पनेनें बसविल्या आहेत. नवीन नवीन प्रयोग व जिन्नस तयार करण्याची त्यास हौस असे. हिंदुस्थानांत तंबाखू प्रथम त्याच्याच वेळेस आला, तो त्यानेंच प्रथम वापरून पाहिला.

अकबराचा मुलगा जहांगीर यानें असें लिहिलें आहे, कीं 'माझ्या बापास लिहितां वाचतां येत नव्हतें; तरी तो सर्व प्रकारच्या विद्वान् लोकांशीं संभाषण करीत असे; आणि नेहमीं चतुर व हुशार लोकांशीं सहवास घडल्यानें त्याची भाषा इतकी सुधारली होती, कीं त्याला विद्येचा गंध नव्हता हें कोणासही ओळखतां येत नसे. पद्य व गद्य यांतील खुब्या त्यास चांगल्या कळत असत.' हें अकबराच्या मुलानेंच लिहिलें असल्यामुळें खोटें म्हणतां येत नाहीं. तरी त्याला लिहितां वाचतां सुद्धां येत नसावें हें संभवत नाहीं. खरा प्रकार निराळाच होता. तेरा वर्षांचा असतांना तो गादीवर बसला. तोंपर्यंत त्यास लिहितां वाचतां येण्याचा संभव नव्हता. चुलत्याजवळ राहत असल्यामुळें त्यास शिक्षण देण्याची कोणी काळजी घेतली नसेल. कंटकपणा, उद्योगाची आवड व धैर्य हे गुण मात्र त्याच्या अंगीं लहानपणींच आले. राज्यावर आल्यानंतर त्याला शिक्षणाची आवड उत्पन्न झाली. त्यानें एक हुशार शिक्षक ठेविला. त्याचें नांव मीर अब्दुल्लतीफ्. अब्दुल्लतीफ्च्या बापानें अकबराच्या कार्किर्दीचा इतिहास लिहिलेला आहे, त्यांत पुढील वाक्य आहे. 'त्या वेळेस अकबरास लिहितां वाचतां येत नव्हतें.' 'त्या वेळेस' ह्या शब्दांवरून अकबर मागाहून विद्या शिकला हें उघड होतें. पुढल्या काळांत अनेक पुस्तकें अकबरानें वाचिलीं, आणि दुसरे कित्येक शिक्षक ठेविले, असा पुरावा

सांपडतो. म्हणून जहांगीरच्या लिहिण्याचा अर्थ इतकाच, कीं राज्यावर आला त्या वेळेस अकबरास कांहीं येत नव्हतें. निरनिराळ्या राष्ट्रांचे इतिहास वाचण्याचा अकबरास फार नाद होता. दररोज कोणी तरी विद्वान् गृहस्थ त्यास पुस्तकें वाचून दाखवी. प्रत्येक पुस्तक अथपासून इतिपर्यंत वाचण्याचा त्याचा नेम होता. वाचन बंद होई, तेथें तो पुस्तकावर तारीख घालून ठेवीत असे. त्याच्या ऐकण्यांत व अवलोकनांत न आलेलीं अशीं पुस्तकें फारशीं राहिलीं नव्हतीं. कित्येक पुस्तकें तो पुनःपुनः वाचीत असे. त्या वेळीं विद्वान् गणलें जाण्यास कोणकोणत्या विषयांचें ज्ञान असावें लागत असे, हेंही अकबराची विद्वत्ता ओळखणारांनीं लक्षांत ठेविलें पाहिजे. आरबी भाषा चांगली लिहितां वाचतां येणें; कुराणाचा बराच भाग तोंडपाठ म्हणतां येणें; फारशी भाषा अवगत असून, सादी आणि हाफीज ह्या कवींचे ग्रंथ आणि फिर्दौसीचीं कित्येक कवनें समजणें; कित्येक राजांचीं चरित्रें वाचिलेलीं असणें; गणित व ज्योतिष शास्त्रांचा थोडाबहुत परिचय, आणि गायनकलेचें ज्ञान असणें; इतक्या गोष्टी ज्यास येत, अशांचीच गणना विद्वानांत होत असे. जहांगीरच्या कारकिर्दीपावेतों मोगलांस तुर्की भाषाही येत असे.

' जहांगीर व त्यानंतरच्या मोगल बादशहांपेक्षां अकबर चांगला होता, हें खरें; पण तो कितीही चांगला व थोर असला, तरी त्या वेळच्या देशकालाचे दुर्गुण त्याच्या अंगीं पूर्णपणें होते. शिवाय तो अत्यंत अज्ञानी होता. त्याची श्रम करण्याची हौस व अक्कल विशेष असून तो मोठा नशीबवान होता, म्हणून त्याची वाहवा होते. पण ही तारीफ थोडीशी फाजील असून, खरा प्रकार म्हणजे सामान्य मंडळींत तो चांगला होता एवढाच आहे. अकबराचा बाप व आजा विद्वान् असून, तो इतका अशिक्षित राहिला हें आश्चर्य होय.' एच्. बीव्हरिज,—इंडियन वर्ल्ड, ऑक्टो०, १९०५.

अकबराच्या दरबारचा डामडौल कांहीं कमी नव्हता. त्याचे स्वारीचा थाट पाहून, गोव्याहून आलेल्या पोर्तुगीज गुरूंना अत्यंत अचंबा वाटला. लाहोरास जातांना त्याजबरोबर पांचहजार हत्ती होते. त्यांच्या डोक्यांवर लोखंडी ढाली बांधिल्या असून सोंडेस तलवारी व दांतांस कट्यारी बांधिलेल्या होत्या. प्रत्येक हत्तीवर चार चार तिरंदाज किंवा बंदूकवाले असत. असें होतें, तरी अकबराच्या एकंदर व्यवस्थेंत विलक्षण साधेपणा दिसून

येत असे. केवळ बाह्य डामडौल आणून लोकांचे डोळे दिपविण्याची त्यास आवड नव्हती. लोकांस न्याय तावडतोब देण्याविषयीं तो फार जपत असे. ज्या शहरांत त्याचें वास्तव्य असे, तेथील सर्व खटले तो स्वतः पाहून निकाल करी. त्याच्या संमतीशिवाय मोठयामोठया शिक्षा देण्यांत येत नसत. फांशीं देणें, किंवा सुळावर चढविणें, ह्या त्यानें देहान्तशिक्षा ठरविल्या होत्या. अकबरानें देहान्तशिक्षेचा उच्चार तीन वेळ केल्याशिवाय ती शिक्षा कायमची अमलांत येत नसे. दररोज एकदां तो दरबार भरवी. तेथें पाहिजे त्यास येण्याची मोकळीक होती. ह्या ठिकाणीं सामान्य लोकांकरितां व खासगी मंडळीकरितां असे दोन वेगळाले भव्य दिवाणखाने करून प्रत्येकांत गादी ठेविलेली असे. लोकांचें म्हणणें ऐकून घेणें, त्यांनीं आणिलेल्या नजराण्यांचा स्वीकार करणें, इत्यादि गोष्टी तो ह्या वेळेस करी. अशा प्रसंगीं तो गादीवर न बसतां बाजूस उभा राही. इतर वेळीं अकबर गालिच्यावर बसत असे. बारा विद्वान् गृहस्थ नेहमीं त्याजवळ असत; ते एखाद्या विषयावर वादविवाद करीत, किंवा त्यास इतिहासांतल्या गोष्टी सांगत. कसाही मनुष्य त्याजकडे आला, तरी अकबर त्याजवर आपली छाप बसविल्यावांचून राहत नसे. सामान्य लोकांशीं तर तो फारच ममतेनें वागे; परंतु सरदार आणि बडे लोक मात्र त्याजपुढें चळचळां कांपत. अंतःकरणाचा मृदुपणा व कठोरता ह्या दोन गुणांचें त्याच्या स्वभावांत विलक्षण संमेलन झालें होतें. व्यवहारांतल्या बहुतेक सर्व गोष्टी त्यास स्वतः करितां येत होत्या. तोफा ओतणें व बंदुका करणें हीं कामें तो स्वतःची देखरेख ठेवून करीत असे. वाड्याच्या आवारांत तोफा ओतण्याचा एक कारखाना त्यानें ठेविला होता. त्याजबद्दल बारीक नियमही त्यानें बांधिले होते. प्रत्येक बंदुकीला त्यानें नांव दिलें होतें. अकबरास मर्दानी खेळांची फार आवड होती. कुस्त्या, कसरत, जनावरांच्या टकरा, साठमाऱ्या, वगैरे खेळ तो नेहमीं करवी. हत्ती, घोडे, वगैरे सर्व जनावरांचीं त्यानें निरनिराळीं नांवें ठेविलीं असून, त्या नांवांनीं तो सर्वांस ओळखीत असे. त्यास शिकारीचा नाद फार होता, आणि शिकारीकरितां चित्ते शिकविलेले असत. एकीकडे खेळ वगैरे चालू असत, तेव्हां दुसरीकडे तो दरबारचीं कामें करीत असे. त्याचा आहार अगदीं

NATIONAL ARCHIVES OF INDIA

नेमस्त पण दांडगा होता. मांसान्न तो फारच क्वचित् खाई; दूधभात व मेवामिठाई हीं त्याच्या खाण्यांत विशेष असत. तो बहुधा दिवसांतून एकदांच जेवी. त्याची पचनशक्ति तीव्र होती. मांसाहाराविषयीं तो असें म्हणे, कीं 'परमेश्वरानें नानाप्रकारचे खाद्य पदार्थ पृथ्वीवर उत्पन्न केले असतां, हा खादाड मनुष्यप्राणी इतर प्राण्यांचा जीव घेऊन आपल्या सुंदर पोटांत त्यांचें दफन करितो, हें केवढें अज्ञान आहे! मी राजा नसतों तर मांसाला शिवलों सुद्धां नसतों. तरी तें हळूहळू सोडून देण्याचा माझा विचार आहे.' त्याला फळफळावळीची विशेष आवड असून दूरदूरच्या देशांतून नानाप्रकारचीं फळझाडें त्यानें हिंदुस्थानांत आणून लाविलीं होतीं. अकबर रात्रीं तीन तासांपेक्षां ज्यास्त झोंप घेत नसे. कदाचित् तो दिवसा थोडा निजत असेल. रात्रीं आपलें खासगी मंडळ बरोबर घेऊन त्यांजबरोबर कालक्रमणा करीत असे. अकबरास सुवासांची मोठी अवड असे. नानाप्रकारचीं सुवासिक फुलें आणि सुवासिक अत्तरें यांचा तो नेहमीं उपयोग करी. सर्व खोल्यांतून द्रव्य सुवासिक पदार्थांचा सुवास एकसारखा चालू असे. फुलें व अत्तरें यांजबद्दलही बारीक नियम अकबरानें ठरविले होते.

सख्ख्या व सावत्र आईची आज्ञा अकबरानें कधींही उल्लंघन केली नाहीं. एकदां मात्र त्यास आईची आज्ञा मोडावी लागली. हमिदानें अकबरास सांगितलें, 'क्रिस्ती लोकांचें बायबल कुत्र्याच्या गळ्यांत बांधून त्याची धिंड काढ.' ही गोष्ट त्यानें ऐकिली नाहीं. त्याचें मन व शरीर कधीं निरुद्योगी नसे. मन उद्योगी असल्यामुळें त्याच्या ठिकाणीं सर्व धर्मांवर सारखें प्रेम उत्पन्न होऊन, राज्यकारभारांत व समाजांत त्यानें पुष्कळ सुधारणा केल्या. त्यानें युद्ध व स्वाऱ्या दरसाल चालू ठेविल्या, हें तरी त्याच्या मानसिक कार्यव्यापृततत्वाचें लक्षण होय. ह्याच कारणामुळें, नवीन धर्म व नवीन शक ह्यांची त्यानें सुरुवात केली.

कित्येक दुर्गुणही अकबराच्या अंगीं होते. केव्हां केव्हां तो अत्यंत क्रूरपणाचें आचरण करी. मुसलमानांचा त्यानें छळ केला तो फार अयोग्य आहे. लहानपणीं त्याचा स्वभाव फार क्रूर होता. एके दिवशीं रात्रीं तो नेहमींच्यापेक्षां लवकर निजावयास गेला; तों महालाचा बत्तीवाला झोंपी गेलेला त्यास आढळला. ह्याबद्दल त्यानें त्या नोकराचा

बुरुजावरून कडेलोट केला. पाहरेकरी आपल्या कर्तव्यांत चुकले, तर त्यांचा केव्हां केव्हां तो फार छळ करी. चितोडगड काबीज केल्यावर त्यानें बाराहजार रजपुतांची कत्तल उडविली. आपल्या कारकिर्दीच्या अठराव्या वर्षी त्यानें दोनहजार लोकांचीं डोकीं कापून त्यांचे ढीग रचिले. त्यानें आरंभीं अनेक लोकांस क्रूरपणाच्या शिक्षा दिल्याचीं उदाहरणें आहेत. पण हीं सर्व कृत्यें तरुणपणचीं व अबुल् फज्लची गांठ पडण्यापूर्वीचीं आहेत. तो मोठा होत गेला तसतशी त्याची वर्तणूक बदलत गेली. आपल्या शत्रूंस ठार मारण्याची एक विलक्षण क्रूर पद्धत त्यानें स्वीकारिली होती. नेहमीं त्याजबरोबर एक मनुष्य पानपट्टीचा डबा घेऊन हजर असे. त्या डब्यास तीन खण असत. त्यांतील एकांत सुपारी, दुसऱ्यांत पाचक गोळ्या व तिसऱ्यांत विषयुक्त गोळ्या असत. बादशहाकडे गेल्यावर तो ज्याच्या त्याच्या सलगीप्रमाणें त्यास वरील वस्तूंपैकीं कांहीं तरी खावयास देई. बादशहानें खावयास दिलेल्या वस्तूचा अनादर करणें शक्य नसे. मोठा प्रसाद समजून सर्वांस त्याचा स्वीकार करावा लागे. अशा रीतीनें किती लोक मेले, तें कळण्यास मार्ग नाहीं. स्वतः अकबरास अशीच एक गोळी जहांगीरनें दिली अशी वदंता होती; पण ती खरी असेल असें वाटत नाहीं. कदाचित् ही सर्वच गप्प असेल.

अकबर लहानपणीं खादाड असे, व उत्तरोत्तर तो फारच मिताहारी झाला. फज्ल् म्हणतो, 'तो एकदांच जेवी, आणि पदार्थांकडे विशेष लक्ष नसे.' शेवटीं शेवटीं त्यानें मांस सुद्धां वर्ज्य केलें. उपासही पुष्कळ करी. त्याच्या बापआज्यांस अफू घेण्याची सवय होती, तशी त्यासही होती. फज्ल् म्हणतो. 'तो केव्हां केव्हां मद्य, अफू व गांजा ह्यांचें सेवन करी.' त्या वेळेस चहाकाफीचा प्रचार नव्हता. तो बाहेरख्याली नव्हता. त्याच्यासारखा उद्योग करणारास अशा विषयाकडे फुरसतच मिळत नाहीं. त्या वेळीं सृष्टक्रमाविरुद्ध अनाचार मध्यआशियाखंडांत फारच प्रचलित होता. बाबरहुमायूनसुद्धां त्यापासून अलिप्त नव्हते. अकबरानें मात्र या व्यभिचाराचा आपल्या दरबारीं त्वेषानें निषेध केला.

स्वतःची विद्वत्ता बेताचीच असल्यामुळें, कोणीं कांहीं येऊन सांगितलें, तरी त्याजवर अकबराचा भरंवसा बसे; आणि सर्व बाजूंनीं विचार न करितां तो नवीन सूचना अंमलांत आणी. पूर्वीचे खलीफा प्रार्थना-

पीठावर उभे राहून, लोकांस उपदेश करीत, हें ऐकून त्याच्याही मनांत तसें करण्याचें आलें. सन १५७९ त फत्तेपूरसिक्री येथें तो उपदेश करण्यास उभा राहिला. त्या प्रसंगीं बोबडी वळून, त्यास परत जागेवर येऊन बसावें लागलें.

३. **राज्यकारभाराचें धोरण.**—अकबराच्या कार्किर्दीची कच्ची हकीगत ऐन्-ए-अकबरी नांवाच्या ग्रंथांत त्याचा विश्वासु व विद्वान् मित्र अबुल् फज्ल् ह्यानें दिली आहे. मोगल बादशहाच्या ऐश्वर्याची, आणि अकबराच्या नीतिमत्तेची व कर्तृत्वाची ह्या पुस्तकांत दिलेली हकीगत प्रत्येक इसमानें वाचण्यालायक आहे. राज्यवृद्धि करण्याकरितां अकबरानें ज्या मोहिमा केल्या, त्यांची हकीगत त्याचा स्वभाव ओळखण्यास उपयोगी आहे खरी; तरी त्यानें राज्यकारभार करण्यामध्यें जें कौशल्य प्रगट केलें, त्याचें वर्णन अत्यंत मनोरम आहे. अबुल् फज्ल् म्हणतो, 'लोकांच्या रीतिभाती सुधारणें, शेतकीस उत्तेजन देणें, सैन्याची व राज्याच्या इतर अंगांची पद्धतवार व्यवस्था लावणें, आणि ह्या उपयुक्त गोष्टी करितांना लोकांस खुष राखून व वसुलाची व्यवस्था बरोबर ठेवून काटकसरीनें खर्च करणें, हींच राजानें प्रजेकरितां करण्याचीं उत्तम कामें होत हें कोणीही कबूल करील. ह्या गोष्टी लक्षांत ठेवून राज्यकारभार केल्यास लोक वैभवास चढलेच पाहिजेत.' अकबराची राजनीति अशा प्रकारची होती. ह्यावरून तयमूरलंग व अकबर ह्यांच्या समजुतींत केवढा बरें फरक दिसून येत आहे! लोकांस संतुष्ट करण्याची अकबराची आतुरता कोणीकडे, आणि असंख्य शहरांचा पाडाव करून मानवी शिरकमलांचे मनोरे बांधण्याची तयमूरची हौस कोणीकडे!

अकबर राज्य करूं लागला, तेव्हां त्याचें वय तेरा वर्षांचें होतें. तो अठरा वर्षांचा होईपर्यंत त्यास बह्रामखानाच्या हाताखालीं शिक्षण मिळालें. तो आपलें युद्धकलानैपुण्य बह्रामखानापासून शिकला. लहानपणीं ठिकठिकाणीं प्रवास घडला, त्या वेळीं दांडगाईची जुलमी राज्यपद्धति चहूंकडे त्याच्या दृष्टीस पडली. त्या पद्धतीस तयमूरलंगची राज्यपद्धति असें नांव दिलें असतां शोभेल. बाबर व हुमायून यांच्या उदार व उदात्त स्वभावानें त्या पद्धतीवर काय परिणाम घडले, हें त्यानें प्रत्यक्ष पाहिलें. त्यावरून त्याच्या मनांत एक गोष्ट चांगली बिंबली. ती ही

कीं, हिंदुस्थानावर राज्य करणें असेल, तर तेथील राजांशीं खरोखर सख्य ठेविलें पाहिजे, त्यांशीं भांडून परिणाम लागावयाचा नाहीं. ह्या उद्देश पार पाडण्यासाठीं पूर्वापर चालत आलेल्या पद्धतींत पुष्कळ फेरफार केले पाहिजेत. सर्वांसच कुराणांत सांगितलेला मुसलमानी कायदा लागू केल्यानें हिंदु लोक संतुष्ट राहवयाचे नाहींत. म्हणून धर्म व राज्यकारभार या बाबतींत लोकांशीं विशेष ममताळूपणानें वागण्याची आवश्यकता अकबरास दिसून आली. ही विचारसरणी बह्‌रामखानास पसंत पडली नाहींसें दिसतें. जनानखान्यांतील कित्येक वजनदार स्त्रियांसही ती पसंत पडली नाहीं. बह्‌रामखानास तर त्यानें मोठ्या सन्मानानें रजा दिली, आणि सन १५६० पासून तो सर्व कारभार स्वतंत्रपणें करूं लागला. यापुढें फंदफितूर व तंटेबखेडे मोडून राज्यांत शांतता व सुव्यवस्था करण्यांत त्याचीं एकंदर तेरा वर्षें गेलीं. पुढेंही त्यास पुष्कळ युद्धप्रसंग करावे लागले, पण त्यांत स्वतः अंगावर घेऊन त्यानें फारशीं कामें केलीं नाहींत.

सन १५७४ त अबुल् फज्ल् ह्याचा अकबराच्या दरबारांत प्रवेश झाला. त्याच वेळेपासून त्याच्या कार्किर्दीच्या उत्तरभागास सुरुवात झाली. ह्यापुढें धर्मसंबंधांत अकबराचे जे विशिष्ट ग्रह बनत चालले, त्यांचा परिणाम राज्यकारभारावर घडूं लागला. पहिल्या भागांत अकबराची वर्तणूक कट्टया मुसलमानास साजण्यासारखी होती. पण उत्तरभागांत सर्व धर्माच्या लोकांस सारख्या ममतेनें वागविण्याचा त्यानें क्रम आरंभिला. अकबराचीं धर्मसंबंधीं मतें समजल्याशिवाय त्याच्या राज्यकारभाराचें गुह्य समजावयाचें नाहीं असें कित्येकांचें म्हणणें आहे, त्याचें कारण हेंच. अबुल् फज्ल् म्हणतो, 'धर्माच्या बाबतींत लोकांवर जुलूम केल्यानें मनांत धरलेला उद्देश निष्फळ होतो. लोक तेवढ्या वेळेपुरतीं आपलीं मतें चोरून ठेवितात; जुलूम केल्यानें तीं बदलत नाहींत.' अकबरानें प्रत्येक खात्यांत एक हिशेबी शाखा नेमिली. ह्या शाखेकडून दररोजचे, मासिक, त्रैमासिक व वार्षिक हिशेब तयार होत. सरकारी जडजवाहीर होतें, त्याची मोजदाद करून, त्यानें किंमती ठरविल्या. मोत्यांच्या माळा बांधून टोंकांस मोहोरबंद करून ठेविल्या. त्या योगानें त्यांचें हरवणें व बदलणें बंद झालें. नाणें पाडण्याकरितां अकबरानें एक टांकसाळ

घातली, आणि ती चालविण्याचे नियम बांधून दिले. अकबराच्या वेळचीं नाणीं चोख व ठरीव वजनाचीं होतीं. स्वतः प्रयोग करून नाण्यांची भेळ तो ठरवीत असे. बारीकसारीक गोष्टींबद्दलही त्यानें सूक्ष्म नियम करून ठेविले होते. हत्तींना दाणावैरण बरोबर पोंचते कीं नाहीं, ह्याचा तपास करण्यासाठीं हत्तींच्या रोडकेपणाचे त्यानें तेरा विभाग ठरविले होते. ह्यावरून अकबराचे नियम किती सूक्ष्म होते, तें दिसून येतें.

कोणत्याही विषयाचें वर्गीकरण करून व्यवस्था बांधून देण्याची अकबरास विशेष आवड असे. त्याच्या बापालाही अशी आवड होती. पण हुमायूनचें बहुतेक आयुष्य वनवासांत गेल्यामुळें, आपली इच्छा पार पाडण्यास त्यास सवड झाली नाहीं. हुमायून राज्य करूं लागला, तेव्हां दरबारच्या एकंदर लोकांचे त्यानें तीन विभाग केले. राजघराण्यांतली मंडळी, सरदार व लष्करी अंमलदार ह्यांचा वर्ग पहिला; फकीर, पैगंबराचे वंशज, विद्वान् लोक, न्याय करण्यास नेमलेले कामदार, ज्योतिषी, कवि व अशाच प्रकारचे इतर लोक ह्यांचा वर्ग दुसरा; गवई मंडळी व त्याच दर्जाचे इतर लोक ह्यांचा समावेश तिसऱ्या वर्गांत होई. ह्या प्रत्येक वर्गाच्या लोकांकडे ठरीव दिवसांचीं कामें त्यानें नेमून दिलीं होतीं. पण ह्या व्यवस्थेचा फारसा उपयोग झाला नाहीं.

जनानखान्यासंबंधीं अकबराची धूर्तता विशेष ध्यानांत ठेवण्याजोगी होती. जनानखाना कायम राहून त्यापासून उपद्रव होऊं नये, म्हणून त्यानें हिंदुस्थानांतील व इतर देशांतील राजघराण्यांशीं लग्नसंबंध जोडिले. त्यामुळें सभोंवारच्या राजघराण्यांशीं स्नेह जडून, त्यांजपासून भीति नाहींशी झाली. विशेषतः रजपूत राजांशीं लग्नसंबंध जोडण्यांत अकबराच्या मनांत असलेली विचारसरणी समजणें कठीण नाहीं. कारण आजपर्यंत रजपूत राजेच हिंदुस्थानदेशावर राज्य करीत आले. अनेक मुसलमानी राजांनीं त्यांचा पाडाव केला असतां, ते नाहींसे झाले नाहींत. तेव्हां कोणीकडून त्यांस आपल्या ताब्यांत आणण्याची ही सोपी युक्ति अकबरानें योजिली. त्यांशीं दोस्ती करून बंडखोर अफगाण लोकांशीं झगडण्यास त्यांस पाठवावें, असें अकबराच्या मनांत आलें. मुसलमान व हिंदु ह्यांचें हाडामांसाचें मिश्रण झाल्यानें परिणाम फार हितावह होईल, असेंही त्यास वाटलें. ही कल्पना अगदीं नवीन पण उदात्त होती. पण ती

३४-११-१०-१०-७९१-२०००

तडीस नेतांना मुसलमानी धर्माची त्यास अडचण वाटली. लगेच त्यानें आपल्या धर्मसमजुतींत फेरफार केला. रजपुतांशीं अकबरानें जीं युद्धें केलीं, त्यांत अकबराचा खरा उद्देश काय होता, हें समजून घेतलें पाहिजे. थोडासा ज्यास्त मुलूख जिंकण्याची त्याची इच्छा नव्हती. जयपूर, जोधपूर व उदेपूर ह्या तीन प्रमुख रजपूत घराण्यांनीं आपलें सार्वभौमत्व कबूल करावें, हा त्याचा अंतस्थ हेतु होता. रजपुतांच्या मुली आपण करून आपल्या त्यांस द्याव्या, म्हणजे रजपूत राज आपल्या कबजांत येतील असा त्यानें तर्क बांधिला. रजपुतांस ही गोष्ट आवडली नाहीं. शेवटीं नाइलाजास्तव कित्येकांनीं अकबराचें म्हणणें कबूल केलें. तरी पण मुसलमानांच्या मुली त्यांनीं केल्या नाहींत. अकबराच्या मनांत हीही गोष्ट होती, पण ती तडीस गेली नाहीं. अकबराची रजपूत राण्यांवर विशेष प्रीति असे. त्यांच्याकरितां तो ब्राह्मणांस दानधर्म करी; आणि त्यांच्याबरोबर हिंदुदेवतांची पूजाअर्चा करी. मुसलमानांस अकबराचें करणें आवडलें नाहीं. पण त्याच्या हातांत सर्व अधिकार असल्यामुळें दोघांचेंही कांहीं चाललें नाहीं. अकबराचा उद्देश बऱ्याच अंशीं तडीस गेला. त्याच्या राज्याची उभारणी मजबूद पायावर झाली. अर्थात् तें पुढें पुष्कळ दिवस टिकलें. एकनिष्ठ रजपुतांचें त्यास साह्य असल्यामुळें अफगाण व मोगल हे त्यास शिरजोर झाले नाहींत. अकबरानें हिंदूंस योग्यतेस चढविलें, तें त्यांचें कल्याण करण्याच्या इराद्यानें नव्हे, असें व्हीलरचें म्हणणें आहे. अफगाण लोक नेहमीं दंगेखोर असत; अकबराचे अमीरउमराव अनेक प्रसंगीं त्यास मोजीत नसत. त्यांस दाबांत ठेवण्यासाठीं अकबरास रजपुतांचें साह्य घ्यावें लागलें. जे मुसलमानी धर्माचे कट्टे अनुयायी होते, त्यांस त्याचें धर्मांतर रुचलें नाहीं, म्हणून ते त्याजवर उठण्यास तत्पर असत; आणि ज्यांस अकबराचें धर्मांतर आवडलें, ते त्याच्या चांगुलपणाचा फायदा घेऊन स्वतः सत्ता बळकाविण्यास टपले होते. अशा पेंचामुळें हिंदु लोकांस संतुष्ट ठेवणें अकबरास भाग पडलें.

अकबराचें सर्वांत मोठें कृत्य म्हणजे त्यानें हिंदुस्थानदेश एकछत्री अमलाखालीं आणिला, हें होय. हो गोष्ट साध्य करण्याचे प्रयत्न पुष्कळांनीं केले; पण अकबरानें मात्र ती सिद्धीस नेली. समर्कंदपर्यंतचा

सर्व प्रदेश ताब्यांत आणण्याचा त्याचा फार मनोदय होता; ह्याच हेतूनें त्यानें पुष्कळ वर्षे लाहोरास काढिलीं. परंतु समर्कंदच्या नादास लागल्यानें, हिंदुस्थानही हातचें जाण्याचा प्रसंग येईल, असें मनांत आणून, त्यानें शहाणपणानें आपला उद्देश आवरून धरिला. त्याच्या नातवास मात्र तो शहाणपणा साधला नाहीं. शहाजहाननें मध्य-आशियाखंडांत फौज पाठवून बाल्ख काबीज केलें, पण तें त्यास लगेच सोडून द्यावें लागलें.

४. जमाबंदीची व्यवस्था.—हिंदुस्थानांत सरकार-उत्पन्नाची मुख्य बाब जमीनमहसूल असल्यामुळें, ह्या महसुलाचा प्रश्न नेहमींच मोठ्या महत्वाचा आहे. हिंदुधर्मशास्त्रांतही त्याचा विचार असून, मुसलमानांत प्रथम *अलाउद्दीन खिलजी व पुढें शेरशहा ह्या दोघांनीं ह्या बाबतींत बरेच नियम वगैरे केले. शेरशहानें अलाउद्दीनचेच कित्येक नियम स्वीकारिले. मुसलमानी राज्यकर्त्यांची राज्यमर्यादा नेहेमीं कमीज्यास्त होत असे;* त्यांच्या नाण्यांची किंमतही निरनिराळ्या वेळीं भिन्न होती. इत्यादि कारणांस्तव कोणत्या राज्याचा वसूल किती होता, हें आज नक्की सांगतां *येत नाहीं.* बाबराचे राज्याचा वसूल अडीच पावणेतीन कोट रुपये असावा. ख्वाजा अब्दुल मजीद नांवाचा हुमायूनचा एक विश्वासू नोकर होता. त्याजला अकबरानें प्रथम आसदखान हा किताब देऊन जमाबंदीच्या कामावर नेमिलें. पुढें १५६७ त आसफखानाची जमाबंदी रद्द करून, मुजफ्फरखान याजकरवीं फिरून जमाबंदी करविली. पुढें स. १५८२ त सर्व राज्याचे एकंदर बारा सुभे करून अकबरानें राजा तोडरमल्ल व शहा मनसूर यांजकडून तिसरी जमाबंदी करविली. ह्यांनीं मागील दहा वर्षांचे आंकडे घेऊन त्यांच्या सरासरीवर नवीन रक्कम बांधून दिली. अमील म्हणजे वसूल गोळा करणारे १८२ कामदार नवीन नेमण्यांत आले. शहा मनसूरवर पुढें राजद्रोहाचा आरोप ठेवून त्यास अकबरानें फांशीं दिलें. तथापि तोडरमल्लाच्या उद्योगांतील बरेंचसें काम शहा मनसूरचे हुशारीचें फल होय, हें निर्विवाद आहे. अकबरानें कुळांकडून रोकड रक्कम घेण्याची वहिवाट सार्वत्रिक केली. पूर्वी हाच *प्रघात थोड्या बहुत अंशानें शेरशहानें सुरू केला होता.*

सन १५९६ त अकबराचे राज्याचे १२ सुभे असून, त्या सर्वांत १०५ सरकार होते आणि त्या सर्वांचा वसूल ९ कोटि रुपये होता, तो

हळू हळू १४ कोटि रुपयांवर वाढला आणि ज्यास्तींत ज्यास्त म्हणजे १७॥ कोटींच्यावर कधींच गेला नाहीं.

जमीनमहसुलाशिवाय तयार झालेल्या कित्येक पदार्थांवर कर होते. जिझिया, व यात्रेकरूंवरील व इतर कित्येक कर अकबरानें माफ केले, तरी त्यानें कित्येक नवीन करही बसविले.

प्रत्येक प्रांतावर सुमेदार हा मुख्य कामदार असून त्याच्या हाताखालीं फौजदार म्हणजे लष्करी मदतनीस असून, त्याचें काम प्रांतांत बंदोबस्त ठेवण्याचें असे. शिवाय मीर आदल व काजी हे दोन कामदार न्यायाचे कामासाठीं असत. प्रत्येक शहरास एक कोतवाल असे.

तोडरमल्लानें पंजाबांतील रोठक किल्ला शेरशहाच्या हुकुमानें बांधिला. तोडरमल्ल अत्यंत प्रामाणिक व उद्योगी होता. काम करण्यांत त्याची बरोबरी कोणाच्यानें होत नसे, (Beveridge). तो पैशाचा लोभी नव्हता. तोडरमल्लाच्या विरुद्ध इतर कामदार एकसारखा गिल्ला करीत व अनेक कट घडवून आणीत. पण कोणाचेंही न ऐकतां तोडरमल्लाचे हुशारीचा उपयोग अकबरानें करून घेतला, हें त्यास भूषणावह आहे. फारच गिल्ला झाला म्हणजे अकबर आपल्या मुसलमान कामदारांस सांगे, 'हिंदु कामदारांची मदत घेतल्याशिवाय तुमच्यापैकीं एकाचेंही काम तडीस जात नाहीं; मग तशाच प्रकारें मी सुद्धां एक हिंदु गृहस्थ माझ्या कामांत मदतीस घेतला तर तें तुम्हांस कां खपत नाहीं?' सर जॉन् शोअर म्हणतो, बादशहाच स्वत: उद्योगी व व्यवस्थित असल्यामुळें त्याच्या बहुतेक कामदारांनाही तसेंच शिस्तीनें राहवें लागे; आणि ह्यामुळेंच राज्यांत सुव्यवस्था कायम होती.

तोडरमल्लासारखा हुशार पुरुष अकबराला लाभला, हें त्या बादशहाचें मोठें सुदैव म्हणावयाचें. अबुल् फज्ल् ह्यानें लिहिलें आहे, कीं 'प्रामाणिकपणा, चोख वर्तन, धारिष्ट, प्रत्येक कामाची पुरी माहिती व खात्याची सुरळीत व्यवस्था बांधून देण्याचें चातुर्य, ह्या गुणांत तोडरमल्लाची बरोबरी करूं शकेल, असा एकही पुरुष मिळावयाचा नाहीं.' विद्वान् ग्रंथकार बुइल्सन यानें लिहिलें आहे, कीं 'अकबराच्या महसुलाच्या पद्धतींत जेवढें चांगलें म्हणून आहे, त्याचें सगळें श्रेय हिंदूंस

आहे.' येथें हिंदु म्हणजे राजा तोडरमल्लच होय. बादशहा चतुर होता, व कामदारांनीं सुचविलेल्या पद्धतीचे गुणावगुण ओळखून ताबडतोब हुकूम सोडण्याचें कसब कांहीं लहान नव्हे. प्रथमतः सर्व जमिनीची मापणी करण्यांत आली. नंतर त्या जमिनीची प्रतवारी ठरविली. उत्तम, मध्यम, व कनिष्ठ अशा तीन प्रती अकबरानें ठरविल्या होत्या. मागील एकोणीस वर्षांचें उत्पन्न काढून त्याच्या सरासरीनें प्रत्येक बिघ्याचें सरकारदेणें त्यानें ठरविलें. उत्पन्नाचा तृतीयांश सरकारांत घ्यावयाचा प्रघात घातला. शेरशहा सूरनें ठरविलेला जमीनदस्त ह्यापेक्षां कमी होता. परंतु अकबरानें जमिनीच्या साऱ्याशिवाय इतर सर्व कर माफ केले. कामदार लोकांस ज्या रकमा द्याव्या लागत, त्या बंद केल्या; आणि इजाऱ्यानें जमिनी देण्याची वहिवाट बंद करून वसूल जमा करण्यास सरकारी अधिकारी नेमिले. इजाऱ्याची वहिवाट अशी होती, कीं सबंध परगणे लिलांव करून ज्यास्त रक्कम देणारास ते सोंपण्यांत येत. जो लिलांव घेईल, त्यास इजारदार म्हणत. हे इजारदार रयतेस पाहिजे तसे पिळून काढीत. इजारे बंद केल्यामुळें रयतेची बहुतेक पीडा नाहींशी झाली. अकबराची महसुलाची पद्धत हल्लींच्या मुंबई इलाख्यांतील पद्धतीसारखी होती. जमिनीची मापणी व प्रतवारी, लागवड करणारांची नांवानिशी, उत्पन्नाचा अंदाज, इत्यादि गोष्टींमध्यें दोहोंचें अगदीं निकट साम्य आहे. अकबरानें लोकांकडे वहिवाटीस असलेल्या व चालत आलेल्या जमिनी काढून घेतल्या नाहींत. जोंपर्यंत सरकारानें ठरवून दिलेल्या साऱ्याचा ऐवज पैशानें किंवा ऐनजिनसी कुळाकडून भरला जाई, तोंपर्यंत त्यांच्याकडील जमीन काढून घेण्याची कोणाची प्राज्ञा नसे. त्या पद्धतींत दोष नव्हते असें नाहीं. आरंभीं केलेले नियम फार सूक्ष्म आणि त्रासदायक होते. प्रथम दरवर्षी शेतांची पाहणी करण्याचा ठराव होता, पण त्यामुळें फार त्रास पडूं लागला. तेव्हां दहा वर्षांचा सारा एकदम ठरवून देण्यांत आला. ह्याच धर्तीवर पुढील राज्यकर्त्यांनीं आपली व्यवस्था बांधून दिली. खुद्द इंग्रज सरकारासही अकबराच्या पद्धतीचा फार उपयोग झाला आहे.

अकबराच्या राज्याचे मुख्य सुभे सोळा होते, ते हेः—१ काबूल, २ लाहोर, ३ मुलतान, ४ सिंध (ठठ्ठा), ५ गुजराथ, ६ माळवा,

७ अजमीर, ८ दिल्ली, ९ आग्रा, १० अलाहबाद, ११ अयोध्या, १२ बहार, १३ बंगाल, १४ वऱ्हाड, १५ खानदेश, आणि १६ अहंमदनगर ओढ्या व काश्मीर हे दोन मागाहून झाले. ह्या प्रत्येक प्रांतावर एकेक सुभेदार असून त्याजकडे मुलकी व लष्करी अशा दोनही कामांचा पूर्ण अधिकार होता. लष्करी, मुलकी आणि जमाबंदी, अशीं तीन मुख्य खातीं त्याच्या हातांत होतीं हे सर्व प्रांत मिळून अकबराचा महसूल चौदा कोटि रुपये होता. हंटरच्या मतें इंग्रज सरकारच्या वसुलापेक्षां अकबराचा वसूल ज्यास्त होता. ह्या म्हणण्याच्या समर्थनार्थ त्यानें अनेक आधार दाखविले आहेत. एतद्देशीय संस्थानें सोडून इंग्रजसरकारचा हिंदुस्थानचा वसूल आज एकशें दहा कोटींवर आहे; खानदेशच्या अलीकडील दक्षिणहिंदुस्थान सोडून, व अफगणिस्तान धरून अकबराचा वसूल चौदा कोटि रुपये होता. हल्लीं हिंदुस्थानच्या उत्पन्नांतून सुमारें तीस कोटि रुपये विलायतेंतील खर्चास जातात. अकबराचा सर्व पैसा ह्याच देशांत खर्च होई. एकंदरींत जमिनीच्या साऱ्याचा प्रश्न फार महत्त्वाचा असून ह्या विषयाचा स्वतंत्र अभ्यास करणारांस त्यापासून पुष्कळ माहिती मिळण्यासारखी आहे. ' पूर्वी प्रांतांतील कामदार बहुधा स्वतंत्र असत. अकबरानें नानाप्रकारच्या नियमांनी त्यांच्या स्वैर वर्तनास आळा घातला. ठिकठिकाणीं तपासणी कामदार नेमून, लोकांवर जुलूम न व्हावा, अशी तजवीज केली. शेतकऱ्यांस विशेष सवलती देऊन तीन वर्षांत सर्व पडित जमीन लागवडीस यावी, अशी योजना केली. जमीन महसुलासंबंधानें पूर्वी हिंदु व मुसलमान शेतकऱ्यांत भेदभाव ठरविलेला होता, तो अकबरानें काढून टाकिला.' (Malleson).

बदाऊनी नांवाच्या मुसलमान इतिहासकारानें तोडरमल्लाच्या पद्धतींतील एक दोष दाखविला आहे. पडतर जमीन लागवडींत आणण्यासाठीं करोडी नांवाचे अधिकारी नेमण्यांत आले, आणि प्रत्येकाकडे नवीन मापणीप्रमाणें पंचवीस हजार रुपये उत्पन्नाची जमीन सोंपविण्यांत आली. तीन वर्षांत जमिनीची लागवड झाली पाहिजे, असा नियम होता. हा नियम पाळण्याबद्दल प्रत्येक करोडीकडून जामीन घेतलेला होता. परंतु ह्या व्यवस्थेचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. उलट लोकांस त्रास मात्र फार सोसावा लागला. करोडींनीं स्वतःच्या तुंबड्या भरून सर्व देश भिकेस

NATIONAL ARCHIVES OF INDIA

लाविला. तोडरमल्लानें असल्या पुष्कळ अंमलदारांस कडक शिक्षा केल्या. त्यांत पुष्कळ मुसलमानांसही शिक्षा झाल्या. दूरदूरच्या प्रांतांत रयतेवर पुष्कळ जुलूम होत असे. बंगाल्यांतील कोनाकोपऱ्यांत मुसलमान कामदार रयतेस अत्यंत त्रास देत, अशाबद्दल बराच पुरावा सांपडतो. एका ग्रंथकारानें लिहिलें आहे, कीं 'सर्व लोकांवर सारखा जुलूम चालला होता. अधिकारी सरकारी पत्रकांत पडतर जमिनी पिकाच्या म्हणून दाखल करीत; आणि खोटी मापणी करून पाऊण बिघ्याच्या ठिकाणीं एक बिघा लिहीत. खजानजीस दररुपयावर कांहीं रकम ज्यास्त घेत, यामुळें पुष्कळ शेतकरी आपलीं गुरें, ढोरें विकून जमिनी सोडून जात.'

ह्या गोष्टी जरी सर्वथैव खोट्या नाहींत, तरी त्या अपवादादाखल आहेत. मागाहून जिंकिलेल्या प्रांतांत पुष्कळ अंदाधुंदी होती परंतु जुन्या प्रांतांत सर्व कामें सुरळीत चालत असत, यांत संशय नाहीं. तसेंच अकबर व राजा तोडरमल्ल यांनीं रयतेच्या कल्याणाकरितां पुष्कळ गोष्टी केल्या, म्हणूनच त्याचें नांव चिरस्मरणीय झालें आहे.

(५) लष्कराची व्यवस्था.—अकबराची राज्यव्यवस्था सुरळीत चालण्यास रजपुतांशीं केलेल्या शरीरसंबंधांहून दुसऱ्या अनेक गोष्टी कारणीभूत झाल्या. अकबराच्या लष्कराची व्यवस्था त्या वेळच्या मानानें फार चांगली होती. त्यानें रजपूत राजांस आपल्या लष्करांत मोठमोठ्या जागा दिल्या. रजपुतांस दुसरें कांहीं नको होतें. लष्करी काम दिलें म्हणजे ते अगदीं खूष असत. तरी बादशहाचे स्वतःच्या घराण्याबाहेर स्वकीय असे कोणी नव्हतेच, तेव्हां रजपुतांस जागा देण्यास सवड होती. पांच हजारांवर फौज बाळगणाऱ्या सरदारांस अमीर अशी संज्ञा होती. पांचहजारांहून कमी लोक बाळगणारांस मनसबदार असें म्हणत. ह्यांशिवाय खालच्या दर्जाचे लहान लहान असामदार पुष्कळ होते. तसेंच अहदी नांवाचे एकेकटेच चाकरीस राहणारे लोक पुष्कळ असत. अमीर व मनसबदार ह्यांची संख्या सुमारें ४१५ होती. खालच्या दर्जाचे सरदार सुमारें १४०० होते. शहाजादा सलीम हा दहाहजारांचा अमीर होता, दुसरा मुलगा मुराद हा आठहजारांचा आणि तिसरा दानियाल सातहजारांचा सरदार होता. शहाजाद्यांशिवाय दुसऱ्या कोणास पांचहजारांवरची जागा सहसा मिळत नसे. सलीमचा पुत्र खुस्रु

NATIONAL ARCHIVES OF INDIA

हा पांच हजारांचा अमीर होता. मनसबदाराचा पगार दरमहा दीडशें रुपयांहून कमी किंवा सातशेंहून ज्यास्त नसे. सातशेंहून ज्यास्त पगार अमिरास असे. अमीर व मनसबदार ह्यांची पूर्ण यादी ऐन्–ए–अकबरींत दिली आहे. तीवरून असें दिसून येतें, कीं हिंदुस्थानांतल्या मुसलमानांस वरिष्ठ प्रतीच्या जागा फारशा मिळत नसत; बहुतेक जागा इराणी, तुर्क किंवा आरब ह्या लोकांस दिल्या जात. तसेंच एकंदर ४१५ असामींपैकीं ५१ लोक हिंदु होते. शहाजहानच्या वेळेस ६०९ मनसबदार असून त्यांपैकीं ११० हिंदु होते.

पूर्वी लष्करी अंमलदारांच्या खर्चासाठीं जहागिरी तोडून दिलेल्या असत. त्यामुळें लष्कर ठेवण्याची आपली जबाबदारी पार न पाडतां ते खतेपासून पैसा मात्र पिळून घेत. ही व्यवस्था मोडून अकबरानें होईल तितक्या रोकड नेमणुकी बांधून दिल्या. पगार देण्यापूर्वी प्रत्येक सरदारानें नेमणुकीप्रमाणें लोक ठेविले आहेत कीं नाहींत हें दाखविण्याकरितां हजिरीपत्रकें ठेवण्याची अकबरानें फरज पाडिली. त्या पत्रकांत प्रत्येक इसमाच्या चेहऱ्यावरील खाणाखुणा दाखल कराव्या लागत. घोड्यांची संख्या बरोबर राहावी, व अदलाबदल होऊं नये म्हणून त्यांवर राजचिन्हाचा डाग देण्यांत येई. लष्करास लागणाऱ्या इतर जनावरांची व तसेंच सामानाचीं पत्रकें ठेवण्याची अकबरानें वहिवाट घातली. प्रत्येक मनसबदारानें स्वारांच्या निम्मे पायदळ ठेवावें, त्यांतील चतुर्थांश बंदुकवाले असावेत, आणि बाकीचे तिरंदाज असावेत, अशी व्यवस्था होती. अकबराच्या एकंदर फौजेची संख्या किती होती तें समजत नाहीं. तरी ती दोन लाखांजवळजवळ असावी असा अदमास करितां येतो.

अकबरानें एवढा जरी बंदोबस्त केला, तरी त्याच्या लष्कराची घडी बरोबर बसली नाहीं. सरदार लोक माणसांच्या व जनावरांच्या खोट्या हजिऱ्या भरीत; आणि कांहीं केलें तरी त्यांस लबाडी करण्यास सवड सांपडेच. फार तर काय, पटांत दाखल केलेल्या संख्येचा फक्त एक तृतीयांश प्रत्यक्ष कागदावर असे; बाकीचे लोक हजिरीच्या वेळेपुरते संख्येच्या भरतीसाठीं आणण्यांत येत. पटावर संख्या पांचहजार, व प्रत्यक्ष नोकरींत ठेविलेले लोक पांचशें असा प्रकार वारंवार घडे. शिवाय सरदारगिरी मिळणें केवळ बादशहाच्या मर्जीवर असे. त्यामुळें नेहमीं चांगल्याच लोकांची

निवड होई असें नाहीं. एकंदरींत त्या वेळच्या मानानें अकबरानें लष्करांत पुष्कळ सुधारणा केली. आपसांतील फुटीमुळें त्याची व्यवस्था चांगली टिकली नाहीं. मोगल अशी ज्यांस संज्ञा होती, ते वर्णानें गोरे असून परदेशांतून आलेले लोक होते. त्यांच्यांत पिढीजाद गुण कांहीं नव्हता. इराणी, तुर्क, आरब वगैरे कोणत्याही जातीचा मनुष्य असला, तरी वर्ण गोरा असला म्हणजे तो मोगल समजला जाई. अशाच लोकांस बादशहा वरिष्ठ प्रतीच्या जागा देई. जे अमीर म्हणून असत त्यांच्यांतूनच कित्येकांस वजीर, सुभेदार वगैरे जागा देण्यांत येत. हे मोगल लोक दोन तीन पिढ्या हिंदुस्थानांत राहिले म्हणजे त्यांचा वर्ण बदले. मग त्यांच्या वंशजांस जागा मिळत नसत; अर्थात् त्यांस हलक्या जागा पतकरून राहवें लागे. त्याचप्रमाणें गोऱ्या परदेशीय लोकांस जहागिरी वगैरे मिळाल्या, तरी त्या वंशपरंपरेनें चालत नसत. जहागीर संपादन करणारा इसम मरण पावल्यावर त्याच्या वारसास लहानशी नेमणूक देऊन, जहागीर खालसा करण्याची वहिवाट होती.

परंतु मोगल सरदारांची ही व्यवस्था रजपुतांस लागू केलेली नव्हती. रजपुतांविषयीं केलेला प्रत्येक निर्बंध वंशपरंपरा चालावयाचा असे. त्यांच्या नोकरीबद्दल त्यांस वंशपरंपरा चालणाऱ्या जहागिरी नेमून दिलेल्या असत. रजपूत शिपाई आपल्या यजमानाची नोकरी करी; तो यजमान राजाच्या तैनातीस असे; आणि असे राजे सार्वभौम दिल्लीपतीचे मांडलिक असत. ही पद्धत मूळपासून चालत आलेली होती, ती अकबरानें फिरविली नाहीं. प्रथम रजपूत राजांस अकबराची नोकरी करणें आवडलें नाहीं. पण त्यानें सुचविलेली व्यवस्था उभयतांसही हितावह होती. रजपूत राजांस त्यानें अमिरांच्या योग्यतेस चढविलें, तेव्हां ते त्याची नोकरी एकनिष्ठपणें करूं लागले. ज्या प्रांतांतून फौजेचें कूच होई, तो प्रांत उद्ध्वस्त होत असे. ह्या कारणानें झालेलें शेतकऱ्याचें नुकसान भरून द्यावें, असें अकबरानें ठरविलें.

येणेंप्रमाणें मोगल व रजपूत अशा दोन फौजा अकबराच्या पदरीं होत्या. त्यांपैकीं मोगल लोक भाडोत्री माणसांप्रमाणें तात्पुरतें काम करणारे होते; रजपूत लोक अनेक पिढ्यांपर्यंत वंशपरंपरा काम करीत आले होते. ह्यामुळेंच ह्या दोन जातींत स्नेहभाव असणें शक्य नव्हतें.

तसा स्नेहभाव उत्पन्न करण्याचा अकबरानें प्रयत्न केला नाहीं असें नाहीं. साऱ्या मोगल बादशाहीच्या इतिहासांत रजपूत व मोगल ह्यांचें परस्परांतील वैमनस्य आणि उभयतांच्या वितुष्टामुळें अफगाण लोकांनीं केलेले पुढें येण्याचे प्रयत्न, ह्या दोन गोष्टी विशेष महत्त्वाच्या आहेत.

५. अवांतर सुधारणा.—शहाणपणानें व औदार्यानें राज्य करण्याची ज्याची इच्छा असेल त्यानें अकबराचा कित्ता घ्यावा. जमिनीच्या महसुलासंबंधानें अकबराची व्यवस्था दुसरीकडे सांगितली आहे. सरकार-देण्याचें ओझें सर्वांवर सारखें पडावें, हा अकबराच्या व्यवस्थेचा विशेष गुण होता. आवर्षण किंवा दुष्काळ पडे, तेव्हां सरकारचा सारा सगळा किंवा अंशतः तरी तो माफ करीत असे. पूर्वीपासून अनेक अनियमित कर चालत आले होते, ते सर्व त्यानें माफ केले. सर्व राज्यांत त्यानें ठरींव वजनें आणि मापें सुरू केलीं; सरकारी अंमलदारांस देणग्या वगैरे कित्येक बाबी रयतेकडून मिळत, त्या सर्व अकबरानें बंद करून सर्व कामदारांस नियमित पगार बांधून दिले. ह्यामुळें त्यांच्याकडून रयतेवर होणारा जुलूम बंद झाला. सर्व खात्यांचे नियम ठरवून टाकिल्यामुळें अधिकाऱ्यांचा स्वेच्छाचार अगदीं बंद झाला. उदाहरणासाठीं अशा प्रकारच्या कांहीं नियमांचें सार येथें देतों.

सुभेदार.—यानें लोकांच्या सुखाकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे; दूरवर विचार केल्याशिवाय कोणास देहान्तशिक्षा देऊं नये; न्याय मागण्याकरितां आले असतील, त्यांस विलंब करून छळूं नये; विपन्नावस्थेंत असलेल्या इसमाची हकीकत ऐकून घ्यावी आणि त्यास शिक्षा करूं नये; रस्ते नेहमीं सुरक्षित ठेवावे; 'उद्योगी शेतकऱ्यांचा मित्र' असा लोकांच्या मनावर आपणाविषयीं त्यानें ग्रह उत्पन्न करावा.

काजी (न्यायाधीश).—लोभ व पक्षपात ह्या दुर्गुणांचा त्यानें आपणास स्पर्श सुद्धां होऊं देतां कामा नये; गुन्हेगार कोण व निरपराधी कोण, ह्याचा सूक्ष्म रीतीनें निकाल करून त्याप्रमाणें आपलें वर्तनही शुद्ध ठेवावें.

कोतवाल.—ह्याची वागणूक चोख व प्रामाणिकपणाची असली पाहिजे. जे निरुद्योगी असतील त्यांस कांहीं तरी उद्योग करण्यास लावावें. कमी वजनाचीं नाणीं सरकार भरण्यांत आल्यास जितकें वजन कमी

असेल तितक्यापुरतीच ज्यास्त रक्कम घ्यावी, अधिक घेऊं नये. लोकांत मद्यपान बंद करण्याची सक्त तजवीज ठेवावी, पण असें करितांना लोक गुप्त स्थळीं काय करितात, तें जाणण्याची आतुरता बाळगूं नये. नवऱ्याच्या शवाबरोबर सती जाण्याची कोणा विधवेची इच्छा नसेल तर तिजवर लोकांचा जुलूम होऊं देऊं नये.

मुलकी कामदार.—आपण शेतकऱ्यांचे निकट व जिवलग दोस्त आहों, असें ह्यानें सर्वदा मनांत बाळगावें; शेतकऱ्याशीं सर्व व्यवहार स्वतः करावा, मध्यस्थीची जरूर ठेवूं नये; शेतकऱ्यांस जरुरीच्या प्रसंगीं कर्जाऊ पैसे द्यावे, आणि त्यांची फेड पुढें सवडीसवडीनें करून घ्यावी; ठरलेल्या रकमेपेक्षां ज्यास्त सारा वसूल न होईल अशी खबरदारी ठेवावी; वसूल गोळा करण्याचे कामीं जोरजबरी करूं नये. कित्येक निरर्थक व त्रासदायक करांच्या बाबी आहेत, त्या वसूल करूं नयेत.

लांबलचक नियमांचा हा केवळ गोषवारा आहे. ह्यांपैकीं कांहीं नियमांच्या अस्सल प्रती आज उपलब्ध आहेत. बऱ्याच अंशीं हे नियम पाळले जात होते, ह्यांत संशय नाहीं. निदान आपणास काय कर्तव्य आहे हें डोळ्यांपुढें ठेवून अकबर नेहमीं वर्तत होता, एवढें तरी निर्विवाद आहे.

न्याय—मीर आदिल ह्या किताबाचा मुख्य न्यायाधीश व एक काजी असे दोघे सर्व कज्यांचे निकाल करीत. काजीचें काम कायदा सांगण्याचें व मीर आदिलचें काम निकाल देण्याचें असे. मुसलमानी चाली व मनूचे कायदे ह्यांचा आधार घेऊन अकबरानें सर्व अपराधांच्या शिक्षा ठरवून दिल्या होत्या. पोलिसचा बंदोबस्त रामोशी वर्गाच्या लोकांकडून ठेविला जाई. त्यांजवर देखरेख कोतवालाची असे. खेड्यापाड्यांतील पोलिसची व्यवस्था गांवपंचायतीकडे सोंपविलेली असे.

आपणापुढें येणाऱ्या अमीर मंडळींनीं सिज्दा म्ह० नमस्कार घालावा असा हुकूम अकबरानें काढिला, पण तो फार दिवस चालला नाहीं. एकंदरींत अकबराचा अधिकार अनियंत्रित होता. त्याचे प्रांतोप्रांतींचे सुभेदारही अनियंत्रित अधिकार वापरीत असत. पापाचरण न करण्यास त्यांस बादशहाची भीति एवढीच काय ती हरकत वाटत असे. बादशहानें तरी मर्जीस येईल तसें वर्तन न करण्यास त्यास फंदफितूर होण्याचीच कायती

भीति असे. बादशहावर दाब ठेवण्यास उलमामंडळ होतें, तें तर अकबरानें उडवून दिलें; तेव्हांपासून लाकांच्या हातांतील सर्व अधिकार गेला; आणि अखिल मोगल बादशाहींत यथास्थित स्वेच्छाचार चालू झाला. राज्यकारभार पाहण्यास तो वजीर नेमीत असे, पण बादशहाच्या हातांत सर्व सत्ता असल्यामुळें त्याचें कांहीं चालत नसे. केव्हां केव्हां वरिष्ट प्रधानांचें मंडळ अकबर जमवीत असे. त्यांत विशेषेंकरून मुख्य प्रधान आणि हिशेबी व टपाल ह्या खात्यांचे मुख्य अधिकारी असत. ह्यांशिवाय इतरांस बादशहा कारणपरत्वें बोलावी. एकंदरींत बहिरामखन, व अबुल् फज्ल् ह्यांखेरीज इतरांचें बादशहावर कांहींच वजन पडलें नाहीं.

अकबर आपला वेळ कसा घालवीत असे हें समजण्यासाठीं त्याच्या तीन विशिष्ट संस्था होत्या, त्या समजून घेतल्या पाहिजेत. त्या संस्था म्हणजे झरोका, दरबार व घुशालखाना ह्या होत. झरोका म्हणून वाड्याच्या पिछाडीस एक खिडकी होती. ह्या ठिकाणीं दररोज सकाळीं येऊन अकबर सूर्याची पूजा करी; आणि अकबरास वंदन करण्याकरितां खालच्या मैदानांत भक्त मंडळींची गर्दी जमलेली असे. हा विधि आटोपल्यावर पुनः एक दोन तासांनीं तो त्या झरोक्याजवळ येई. त्या वेळीं खालच्या मैदानांत कांहीं कुस्त्या वगैरे खेळ चालत. लष्कराची तपासणी करून कवाईत पाहणें हेंही काम तो ह्याच वेळेस करी. वाड्याच्या पुढच्या बाजूस मोठ्या दालनांत दरबार भरत असे. त्या ठिकाणीं अकबर दररोज येऊन गादीवर बसे, सर्वांच्या भेटी घेई, लोकांचे अर्ज ऐके, न्यायमनसुबा करी, मांडलिक राजे, परदेशचे वकील व अमीर ह्यांच्या भेटी घेई. दरबारच्या सर्व मोठमोठ्या मंडळींस ह्या दरबारांत व झरोक्यापाशीं हजर राहवें लागे. घुशालखाना एका स्वतंत्र जागेंत होता. तेथें दररोज सायंकाळीं खासगी मंडळ जमा होई. ह्या ठिकाणीं राज्याच्या कित्येक गुप्त गोष्टींचीं व भानगडीचीं कामें चालत. तशीं कामें नसलीं म्हणजे इतर सामान्य विषयावर चर्चा होई. मुसलमानांपेक्षां हिंदु व विशेषतः रजपूत लोकांवर अकबराची विशेष भक्ति होती. तो राज्यावर आला तेव्हांच त्यास असें कळलें, कीं अफगाण व मोगल ह्यांच्या भांडणांत आपला निभाव मुळींच लागावयाचा नाहीं. आजपर्यंत कोणत्याही बादशहास त्यांनीं मोजिलें नाहीं, म्हणून रजपुतांचा व इतर

सर्व हिंदु लोकांचा स्नेह संपादून आणि त्यांजला भरंवशाचीं कामें सांगून आपल्या राज्यास त्यानें बळकटी आणिली.

अकबराची स्वारी बाहेर फिरावयास निघाली, म्हणजे त्याच्या छावणीचा देखावा एखाद्या मोठ्या नांदत्या शहराप्रमाणें दिसे. त्याची स्वारी म्हणजे एक अवाढव्य शहरच असे. राजधानीप्रमाणें सर्व सोयी त्याच्या छावणींत केलेल्या असत. नोकर, चाकर, व्यापारी, जनावरें वगैरे सर्व त्याच्या बरोबर फिरत असत. अकबराजवळ पुष्कळ प्रकारचीं मोर्तबें होतीं; आणि कोणत्या प्रसंगास कोणत्या मोर्तबाचा उपयोग करावयाचा हें ठरलेलें होतें. कोठार किंवा मुदपाकखान्याच्या बारीकसारीक गोष्टींतही अकबराचें लक्ष पोंचत असे. ह्या खात्यांवर चांगल्या विश्वासु व इमानी माणसांची नेमणूक तो करी. समोर वाढून आणिलेलें अन्न प्रथम चाखून पाहण्यास योग्य इसम नेमिलेले असत. अन्न शिजतांना त्यांजवर सक्त पाहरा असे. 'बादशहाच्या उपयोगास जीं जीं म्हणून तांब्याचीं भांडीं लागावयाचीं, त्यांजला महिन्यांतून दोन वेळ कल्हई करावी; व जनानखान्याच्या व शहाजाद्यांच्या उपयोगास लागणाऱ्या भांड्यांस महिन्यांतून एकच वेळ कल्हई करावी,' असा अकबरानें नियम ठरविला होता. ह्यावरून त्याचें अवलोकन किती सूक्ष्म असे हें उघड होतें. तो गंगेचें पाणी पीत असे व तें थंड करण्याकरितां सोऱ्याचा उपयोग करी. पाणी व पाणी पिण्याचीं भांडीं मोहोरबंद ठेविलेलीं असत. त्याचप्रमाणें बागा व दारूखाने ह्यांजवर सक्त पाहरा असे. राजपुरुषांचे जीव घेण्याचीं कारस्थानें वारंवार चालत असत, म्हणून अशा प्रकारच्या नियमांची विशेष जरूर होती.

आरंभीं अकबरानें क्रूर आचरण केलें असलें, तरी पुढील वयांत त्यानें केलेल्या प्रजाहिताच्या अनेक गोष्टींकडे पाहतां त्याचे दोष क्षम्य समजले पाहिजेत. लढाईत पकडलेल्या लोकांस गुलाम करण्याची चाल त्यानें बंद केली; आपल्या कार्किर्दीच्या आठव्या वर्षी यात्रेकरूंवरील कर त्यानें माफ केले; नवव्या वर्षी जिझिया कर काढून टाकिला; आणि कराचें ओझें सारखें बसविण्याच्या हेतूनें त्यानें सर्व राज्याची खानेसुमारी केली.

आपल्या रयतेचें नैतिक वर्तन सुधारण्याची अकबराची फार इच्छा होती. व्यभिचार बंद करण्यासाठीं त्यानें अनेक उपाय केले. मद्य-

पानाची बंदी केली नव्हती, तरी त्याच्या अतिरेकानें माद उत्पन्न झाल्यास, शिक्षा ठरविलेली होती. मुलगे सोळा वर्षांचे होईपर्यंत, व मुली चौदा वर्षांच्या होईपर्यंत, त्यांचीं लग्नें करूं नयेत असा त्यानें कायदा केला होता. हिंदु विधवांस पुनर्विवाहाची बंदी होती ती त्यानें काढून टाकिली. मुसलमानांनीं अनेक बायका करणें, आणि हिंदूंच्या बायकांना सती जाण्याची सक्ती करणें ह्या गोष्टी त्यानें मना केल्या. तसेंच वृद्ध बायकांनीं तरुण पुरुषांशीं लग्न करूं नये, आणि वधूवरांच्या संमतीशिवाय कोणतेंही लग्न होऊं नये, असें त्यानें ठरविलें. एकोणिसाव्या शतकांतील सामाजिक सुधारणेचें स्वप्न अकबरास अगोदरच पडलें होतें, असें दिसतें. एकंदरींत या बाबतींत अकबरास विशेष यश आलें नाहीं, ही गोष्ट त्या कालाच्या मानानें फारशी आश्चर्यकारक नाहीं.

आपण केलेली व बोललेली प्रत्येक गोष्ट लिहून ठेवण्यासाठीं त्यानें लेखक नेमिले. ह्या लेखास बादशाही तवारीख म्हणत. मोठमोठ्या शहरांतून आणि बाहेरच्या प्रांतांतून विशेष वर्तमान काय चाललें आहे, तें लिहून कळविण्यासाठीं तो स्वतःचे अंमलदार नेमून पाठवी. त्यांजकडून आलेल्या बातम्यांचा ह्या तवारिखींत संग्रह केला जात असे. वाड्यांत त्यानें एक घंटा टांगून ठेविली होती. तिची सांखळी बाहेर देवडीवर ठेवून, ती पाहिजे त्यानें ओढावी म्हणजे त्याची बादशहाकडे लागलीच दाद लागत असे. अकबर स्वभावतः फार शोधक होता. मुद्दाम पुष्कळ खर्च करून गंगेच्या उगमाचा त्यानें शोध लाविला. मुलांची उपजत प्रवृत्ति कोणत्या धर्माकडे असते हें कळण्याकरितां त्यानें एक प्रयोग करून पाहिला, तो मागें सांगितलाच आहे.

मुसलमान फकिरांस अन्न देण्याचे कारखाने पूर्वी होतेच. त्याशिवाय गोपीपुरा नांवाचा एक नवीन भाग आग्रा शहराच्या बाहेर वसवून, तेथें मुसलमानांप्रमाणें हिंदु अतीत अभ्यागतांच्या भोजनाची व राहण्याची तजवीज अकबरानें केली.

अकबराच्या अंगीं चित्रकलेविषयीं उत्तम मार्मिकता वसत होती. पहिल्यापासून उत्तेजन देऊन ही कला त्यानें पुष्कळ सुधारिली. निरनिराळे चितारी लोक चित्रें काढून त्याजकडे पाठवीत; त्यांचें दरआठवड्यास

बादशहापुढें एकदां प्रदर्शन होऊन प्रत्येकास योग्यतेप्रमाणें बक्षीस मिळे. त्याच्या दरबारच्या अठरा नामांकित चितार्‍यांची नांवनिशी अबुल् फज्लनें दिली आहे. पुस्तकांत चित्रें घालून त्यांतील विषय मनोरंजक व स्पष्ट करण्याचा प्रघात त्या वेळीं पडला. दरबारच्या मोठमोठ्या पुरुषांच्या तसबिरा काढून त्यांचें पुस्तक बांधून ठेविलेलें होतें. अकबरानें असें म्हटलें आहे, कीं 'चित्रकाराच्या अंगीं परमेश्वरास ओळखण्याची एक विशेष शक्ति असते. एखादें हुबेहूब चित्र काढिलें म्हणजे त्यांत जीव उत्पन्न करण्याचें सामर्थ्य आपल्या अंगीं नाहीं, तें परमेश्वराच्याच ठिकाणीं आहे, हें ध्यानांत येऊन आपला उणेपणा व परमेश्वराचा थोरपणा डोळ्यांपुढें उभा राहतो.' गाण्याचाही अकबरास फार शोक होता. त्यास त्या कलेची उत्तम माहिती होती. रात्रीं झोंप लवकर न येण्यास उत्तम उपाय गाणें होय असें अकबरास वाटे.

फैजीचें पुस्तकालय होतें, त्यांत ४६०० हस्तलिखित पुस्तकें होतीं. अकबराचा पुस्तकसंग्रह ह्याहूनही मोठा होता. अबुल् फज्लची गांठ पडल्यापासून अकबराच्या वर्तुणुकींत अत्यंत फेर पडला. एकंदरींत अबुल् फज्लनें आपल्या अधिकाराचा दुरुपयोग केला असें म्हणतां येत नाहीं. शहानवाजखान नामक गृहस्थानें असें लिहून ठेविलें आहे, कीं पुष्कळ लोक म्हणतात, कीं 'अबुल् फज्ल् हा नास्तिक होता.' असें म्हणण्यापेक्षां तो अद्वैतवादी होता हें म्हणणें योग्य आहे. तो फार थोर मनाचा असून सर्व प्रकारच्या लोकांशीं स्नेहभावानें वागण्यास इच्छित असे ह्यांत संशय नाहीं. शत्रूंशीं त्याचें वर्तन उदारपणाचें होतें; तो मनाचा निर्मळ होता; राज्याचीं कामें करण्यांत त्याचें वर्तन चोख, निस्पृह, व प्रामाणिक होतें. त्याची लिहिण्याची शैली फार मोहक होती. 'अकबराच्या बाणापेक्षां फज्लच्या लेखणीस लोक ज्यास्त भीत असत.' अबुल् फज्ल् हा अकबराचा उत्कृष्ट मुत्सद्दी, राजनिष्ठ व इमानी नोकर, उदार साह्यकर्ता, आणि सन्माननीय मित्र असा होता. अकबराची कीर्ति वाढण्यास पुष्कळ अंशीं तोच कारण झाला आहे.

६. **आग्रा शिक्रीचीं बांधकामें.**—अकबरानें बांधिलेल्या इमारती फारशा नाहींत. आग्रा व अलाहबाद येथील किल्ले त्यानें बांधिले.

फत्तेपूरशिक्री येथील मशीद व राजवाडा पाहण्यालायक आहे. दिल्लींतील हुमायूनची कबर अकबरानेंच बांधविली. शहाजहानसारखे कलाकौशल्याचे पुरस्कर्ते निपजले नसते, तर ह्या कामीं अकबराचा लौकिक फारसा झाला नसता. पूर्वी आग्र्याची भिंत हलकी विटांची होती. तेथील लाल दगडांचा मजबूद व प्रेक्षणीय किल्ला अकबरानें बांधिला; आणि तेथील मोठमोठ्या सुंदर इमारती पुढें शहाजहाननें तयार केल्या. अकबरानें स. १५६५त कासिमखान नामक सरदारास ह्या किल्ल्याचें काम सोंपविलें. त्या कामास आठ वर्षे व बत्तीस दिवस लागले. तेथच्या लाल दगडांचे सांधे लोखंडाच्या कड्यांनीं खिळलेले आहेत. आग्रा, फत्तेपूरशिक्री व लाहोर, इतक्या ठिकाणीं अकबराचें बहुतेक वास्तव्य झालें.

सलीमच्या जन्मामुळें फत्तेपूर शिक्रीचा जन्म झाला. स. १५६८ च्या फेब्रुवारींत चितोडगड पडला. त्या वेळच्या भयंकर प्रळयांत लाखों लोक मृत्युमुखीं पडल्याबद्दल अकबरास चटका लागला, आणि त्या पापाचें क्षालन करण्याकरितां तो अजमीर येथें मैमुद्दीन चिस्ती म्हणून एक साधु होऊन गेला, त्या पीराच्या दर्शनास पायीं चालून गेला. लोकांचे जीव बळी घेतल्यावर पापक्षालनाचा हा मार्ग अकबरास उत्कृष्ट साधला होता; कारण कोणतीही स्वारी आटपली व फुरसत सांपडली, कीं तो अजमिरास पिराच्या दर्शनास वारंवार जात असे. तसेंच आपणास मुलगा व्हावा म्हणून तो ठिकठिकाणीं नवस वगैरे करी. प्रथम दोन जुळे मुलगे त्यास झाले, ते लागलेच मरण पावल्यावर, त्यास कोणीं सांगितलें, कीं शेख सलीम चिस्ती म्हणून एक साधु शिक्री येथें राहत आहे. शिक्री गांव आग्र्याच्या नैर्ऋत्येस २२ मैल आहे. तेथें त्या साधूचें दर्शन घेतल्यावर त्यानें मुलगा होईल असा आशीर्वाद दिला. कांहीं दिवसांनीं त्याची राणी अंबरची राजकन्या, गर्भवती झाली. प्रसूतीचे दिवस नजीक आले तेव्हां अकबरानें तिला त्या साधूच्याच घरीं नेऊन ठेविलें. तेथेंच ती प्रसूत होऊन मुलगा झाला. त्यास त्या साधूच्या नांवावरून सलीम हेंच नांव देण्यांत आलें. तेव्हांपासून वारंवार शिक्रीस जावें, तेथें दहा वीस दिवस राहवें असा क्रम चालला. त्या वेळीं तेथें राहण्यास अडचण पडूं लागल्यामुळें, त्यानें तेथील एका उंच टेकाडावर प्रथम एक वाडा बांधिला, आणि त्या साधूनें एक उत्तम मशीद बांधिली. नंतर दरबारच्या इतर मंडळींनी-

ही आपआपलीं राहण्याचीं मकाणें तेथें केलीं. अशा रीतीनें नवीन शहर वसलें. त्यास अकबरानें मुलाच्या जन्माप्रीत्यर्थ 'फत्तेपूर-शिक्री' असें नांव दिलें; आणि सभोंवार सुंदर व मजबूत कोट बांधिला.

अकबराचे वेळीं शिक्रीचें वैभव अप्रतिम होतें. आज सुद्धां तेथील शांत व भव्य देखावा पाहून मनास उपरति होते, आणि मानवी जीविताचे खेळ कसे स्वप्नवत् असतात ह्याची खात्री पटते. शिक्रीचा तट अजून चांगला आहे. त्याचा घेर सात मैल असून त्यास मोठाले दरवाजे आहेत. तेथील वाडे, मशीदी, साधु सलीम चिस्तीचें शुभ्र आरसपानी मंदिर, तेथील नकशीचें काम व सुंदर रंगांचीं चित्रें, इत्यादि देखावा पाहून प्राणरहित शरीराची कल्पना मूर्तिमंत डोळ्यांपुढें येते. फक्त चौदाच वर्षे शिक्रीचें भाग्य टिकलें. वुल्यम फिञ्च् स. १६१० त शिक्रीस गेला, तेव्हां 'रात्रीं तेथें राहण्यास भीति वाटते,' असें तो म्हणतो. त्यानें स्थापिलेल्या ह्या सुंदर शहरांत वास्तव्य करण्याची पुढें कोणाची छाती झाली नाहीं. तेथें पाण्याची सोय मुळींच नसल्यामुळें अकबरासच तें शहर सोडून द्यावें लागलें. तथापि पृथ्वीवरील एका थोर बादशहाची प्रत्यक्ष आठवण करून घ्यावयाची असेल तर शिक्रीचें दर्शन एकवार तरी अवश्य घ्यावें. अकबराचें स्नानगृह, शय्यागृह, अबुल् फजल् वगैरे मंडळींचीं वसतिस्थानें इत्यादिकांत आज आपणांस फिरतां येतें. तेथील भिंतींवरील सुंदर व सोनेरी चित्रें, व रंगांत बनविलेल्या फारशी कविता पाहून डोळ्यांचें सार्थक झालेंसें वाटेल. 'इबादतखाना' नांवाचें व्याख्यानमंदिर येथेंच आहे. त्यास चार मोठीं दालनें आहेत. दरगुरुवारचे धार्मिक वादविवाद ह्याच मंदिरांत होत. ह्या ठिकाणीं सर्व धर्मांच्या मोठमोठ्या विद्वान् व साधु लोकांस अकबरानें आणवून ठेविलें होतें, आणि येथेंच त्यांच्या समागमांत त्याच्या रात्रीच्या रात्री केव्हांच निघून जात. नवीन कवि, साधु किंवा विद्वान् पुरुष कोणी अकबराचे भेटीस आला, कीं त्याचें वास्तव्य ह्या मंदिरांत होई; आणि येथेंच बादशहा येऊन त्याची भेट घेई. बहुधा हरहंमेश कोणी तरी नवीन पुरुष आल्याशिवाय राहत नसे. त्यांस पोषाख, बक्षिसें, नजराणे वगैरे देऊन ह्याच मंदिरांत अकबर त्यांची संभावना करी. बुद्धिबळाच्या पटावरील मोहऱ्यांऐवजीं प्रत्यक्ष स्त्रिया उभ्या करून, बुद्धिबळाचा डाव आपल्या

३५-१६-१०-१०-७९१-२०००

राण्यांबरोबर माडीवर बसून अकबर खेळत असे. हा भव्य व विचित्र पट आणि त्यासमोर असलेला वरच्या मजल्यावरील रंगमहाल पाहून विलक्षण कौतुक वाटतें. पंचमहाल नांवाचा पांचमजली इमला, राजा बीरबलचा वाडा, मातुश्री हमीदाची इमारत, इत्यादि अनेक कामांची वाखाणणी पाश्चात्य तज्ज्ञांनीं करून त्यांचीं चित्रें व वर्णनें अनेक वेळां प्रसिद्ध केलीं आहेत. इंडियन आर्ट्चा अभ्यास करणारास त्यांचा अतिशय उपयोग होतो. क्रिस्ती, चिनी, बौद्ध, हिंदु वगैरे सर्व प्रकारचे कारागीर व चित्रकार लावून, सर्व धर्मांतील चित्रें व कामें अकबरानें तयार करविलीं. अकबरास चित्रकला फार आवडत होती. दरआठवड्यास नवीन नवीन चित्रांचें प्रदर्शन त्याजपुढें होत असे. पूर्वींच्या दुराग्रही मुसलमानांनीं चित्रकलेचा त्याग केल्याबद्दल अकबरास मोठा खेद वाटून, त्यानें ती कला ऊर्जित दशेस आणिली. पूर्वींच्या अफगाण अमदानींत ती अगदीं लयास गेली होती. शिक्री येथील चित्रांची तुलना अत्युत्तम पाश्चात्य चित्रकारांच्या कृतीशीं केली असतां, तीं कोणत्याही बाबतींत हीन नाहींत, असाच मार्मिक पाश्चात्यांचा अभिप्राय आहे. (The Moghul Arechitecture of Fathpur Sikri, 4 vols, पहा.) उत्कृष्ट चित्रकारांचीं सुमारें शंभर नांवें अबुल् फज्लनें दिलीं असून सर्वांत हिंदु चित्रकार श्रेष्ठ होते असें तो म्हणतो.

७. परिस्थिति व तुलना.—एकंदरींत अकबर बादशहाची गणना पृथ्वीवरील थोर राज्यकर्त्यांमध्यें झाली पाहिजे. हिंदु व मुसलमान यांच्यासंबंधानें त्यानें जातिभेद किंवा धर्मभेद दाखविला नाहीं. इतका निष्पक्षपात हिंदुस्थानांत कधीं कोणीं दाखविल्याचें उदाहरण आढळत नाहीं. स्वजातीयांच्या हेकेखोरपणाबद्दल त्यानें शब्दानें व कृतीनें तिरस्कार व्यक्त केला आहे. दोनही धर्मांतील आढळून आलेलीं व्यंगें काढून टाकण्याचा त्यानें प्रयत्न केला, हें विलक्षण होय. शौर्यामध्यें त्याची बरोबरी करूं शकणारे, असे थोडेच पुरुष सांपडतील. त्याची बुद्धि अचाट होती. इंग्लंडांत त्याच्या वेळेस एलिझाबेथ राणी राज्य करीत होती. अकबर गादीवर येण्याचे अगोदर युरोपांत सीझर बॉर्जिया नुकाच मरण पावला होता. सन १५२७ त रोम शहराची सात महिनेपर्यंत भयंकर लुटालूट चालली होती. इंग्लंडांत गणितशास्त्रावर पहिलें पुस्तक सन १५४०त छापलें गेलें. सेंट् बार्थोलोमोची कत्तल सन १५७२ त

झाली. स्पेन देशाहून इंग्लंड देश जिंकण्याकरितां आलेल्या मोठ्या आरमाराचा सन १५८८त नाश झाला. शेक्सूपियर कवीचें पहिलें काव्य सन १५९३त छापलें गेलें. सन १६००मध्यें रोम शहरांत ब्रूनोला जिवंत जाळिलें. युरोपांतील भिन्न भिन्न राष्ट्रांमधील व्यवहारांचें नियमन करणारा कायदा तयार होण्यास आणखी शंभर वर्षांचा काल लागला. चेटकें करणारांस इंग्लंडांत सन १७१२ पर्यंत फांशीची शिक्षा होत असे. सन १७१८ पर्यंत फ्रान्सांत व सन १७८० पर्यंत स्पेन देशांत चेटकी लोकांस जाळून टाकीत. प्रत्यक्ष लूथर (सन १५२०) ह्यास भुतांबरोबर झगडे करावे लागले. म्हणजे लूथरसारख्या माणसाचा त्या वेळीं भुतांवर विश्वास होता. त्या काळच्या लोकांत चेटकांविषयीं असा समज होता, कीं चेटक करणारणीच्या घरचें मांजर घेऊन त्याचें रक्त काढावें; सात वर्षांच्या कुमारीनें सूर्योदयापूर्वी उठून कांहीं वनस्पतींचा पाला गोळा करावा; आणि तो त्या रक्तांत वांटून त्याचा लेप लावावा म्हणजे चेटक उतरतें; असा युरोपांत लोकांचा समज होता. ब्लेझ पॅस्कल एक वर्षांचा असतांना त्याचें चेटक वरील उपचारानें उतरलें. विद्वान् शास्त्रवेत्ता केप्लर याच्या मावशीस चेटक करण्याबद्दल फांशीची शिक्षा झाली. त्याची आई मोठ्या मिनतवारीनें ह्या संकटांतून सुटली. स्वतः केप्लर सर्व युरोपांत त्या वेळेस शास्त्रीय विषयांत इतका विद्वान् असतां, 'चेटकें सत्य आहेत, तीं मिथ्या असें कोणास म्हणतां यावयाचें नाहीं,' असा त्याचा स्वतःचा ग्रह होता. केप्लर सन १६३० त मरण पावला. सारांश, अकबराच्या वेळचें हिंदुस्थान व यूरोप ह्यांची तुलना केली असतां, हिंदुस्थानचीच योग्यता अधिक ठरते. युरोपांतील बहुधा कोणत्याही देशाची राज्यव्यवस्था हिंदुस्थानपेक्षां चांगली नव्हती. अकबराच्या ताव्यांतील मध्यहिंदुस्थानच्या सामान्य लोकांपेक्षां इंग्लंडांतील सामान्य जनसमूहाची स्थिति ज्यास्त सुखकर नव्हती. सतराव्या शतकाच्या आरंभीं यूरोपच्या शेतकरी वर्गाची स्थिति वास्तविक कशी होती हें समजण्यास फारसा मार्ग नाहीं. तरी 'सायमन साधूचें चरित्र' म्हणून फ्रेंच भाषेंत एक पुस्तक आहे, त्यांत सन १७०९ च्या सुमारास, म्हणजे अकबरानंतर शंभर वर्षांनीं फ्रान्सच्या शेतकऱ्यांची स्थिति कशी होती, ह्याचें फार मनोरम वर्णन दिलें आहे, तें वाचलें असतां हिंदुस्थानचें

मागें दिलेलें वर्णन मिथ्या अगर अतिशयोक्तीचें असें कोणासही वाटणार नाहीं. फ्रान्सच्या शेतकऱ्यांची स्थिति विशेष निकृष्ट होती, ही गोष्ट खरी; पण अकबरानें दुःसह कर बंद करून, लोकांस तगाइच्या रकमा देऊन, आणि आणीबाणीच्या प्रसंगीं त्यांस धान्य वांटण्याची तजवीज अमलांत आणून, आपत्कालीं लोकांचें रक्षण करण्याची उत्कृष्ट योजना करून ठेविली होती. इंग्लंडच्या लोकांच्या स्थितीबद्दलही अनेक पुस्तकांतून माहिती मिळते; पण अकबराच्या रयतेपेक्षां ते लोक सुखी होते, असें मानण्यास कोठेंच आधार दिसत नाहीं.

रयतेच्या आबादानीच्या प्रश्नानंतर अकबराच्या वेळेस हिंदुलोकांची नीतिमत्ता कशी होती, तें समजून घेण्यासारखें आहे. बाबरास हिंदुस्थानचे लोक फारसे आवडत नव्हते, हें त्याच्या कार्कीर्दीत सांगितलेंच आहे. परंतु अबुल फज्ल् ह्यानें हिंदुलोकांविषयीं खालीं लिहिल्याप्रमाणें उल्लेख केला आहे. 'एकंदरीनें पाहतां, हिंदुलोक स्वधर्मनिष्ठ, मनमिळाऊ, आनंदी, विद्यार्जनरत, न्यायप्रिय, कृतज्ञ, सत्यवादी आणि अत्यंत इमानी असे आहेत; परकीयांशीं ते गोडीनें वागतात; कामकाजांत ते दक्ष व हुशार असे आहेत, दुसऱ्याच्या भानगडींत ते पडत नाहींत. समरांगणांतून पळून जाणें म्हणजे काय हें त्यांस ठाऊक नाहीं; ते आपल्या गुरूंवर अत्यंत भक्ति करितात; ईश्वरप्रीत्यर्थ देह अर्पण करण्यास ते मागेंपुढें पाहत नाहींत.' अन्यप्रसंगीं अबुल फज्लनें भिन्न मत दिलें आहे. 'कित्येक देवासारखे चांगले आहेत, पण कित्येकांचें आचरण केवळ राक्षसांसारखें आहे.'

कैलासचंद्र कानजीलाल म्हणतात, (हिंदुस्थान रिव्ह्यू, एप्रिल, १९०८) 'अकबराचें मोठें काम म्हणजे हिंदुमुसलमानांचें व अफगाणलोकांचें वैर त्यानें मोडिलें. निरानिराळ्या धर्मांच्या व कल्पनांच्या लोकांस एकछत्री अमलाखालीं बरोबरीच्या नात्यानें गोंवून, त्यांचें एक मजबूद राष्ट्र बनविण्याचें काम पूर्वी अकबरानें केलें, तेंच पुनरपि हल्लीं ब्रिटिशराज्यकर्ते करीत आहेत.'

अकबराची तुलना अशोकाशीं केली असतां शोभण्यासारखी आहे. अशोकाचा बाप मरण पावला, तेव्हां अकबराप्रमाणेंच तोही पंजाबप्रांतांत बंड मोडण्यांत गुंतला होता. अकबराप्रमाणेंच अशोकास आपलें राज्य

वाढवून त्याची सुव्यवस्था लावण्यास पुष्कळ वर्षे लागलीं. नर्मदेच्या उत्तरेकडील सर्व प्रदेश अशोकाच्या ताब्यांत होता. अशोक परधर्मीयांचा उच्छेद करीत नसे. धर्मसंरक्षक हें नांव धारण करणाऱ्या उपाध्यायांचा त्यानें बहुत प्रकारें छळ केला. त्याचप्रमाणें नानातऱ्हेचे वादविवाद करवून अशोकानें नवीन धर्म स्थापिला. अशोक मांसाहार करीत नसे. अंतकाळीं अशोकानें बौद्धसंप्रदायानुसार वर्तन केलें; आणि अकबरानें इस्लामविधि पाळिला. इत्यादि बाबतींत या दोन भिन्नकालीन महान् पुरुषांचें निकट सादृश्य दृष्टीस पडतें. धर्माच्या बाबतींत अकबराची प्रशंसा पाश्चात्य कवींनींही केली आहे. प्रसिद्ध इंग्रज कवि टेनिसन ह्यानें म्हटलें आहे, 'धर्मसंबंधांतील जाच बंद करून आणि सर्व धर्मांशीं समबुद्धीचें वर्तन ठेवून, अकबरानें टयूडर घराण्यांतील आमच्या राजपुरुषांना लाजविलें आहे.'

तथापि एकंदरींत अकबर हा थोर पुरुष होता यांत शंका नाहीं. परोपकार करण्यांत त्यानें आपला देह झिजविला. व्यक्तिसंबंधानें पाहिलें असतां त्याचा आजा बाबर हा ज्यास्त पराक्रमी व दीलदार होता. ऐश्वर्याच्या संबंधानें पाहिलें, तर शहाजहानची बरोबरी अकबराच्यानें करवणार नाहीं. परंतु शहाणपण, नीति आणि औदार्य हे गुण व्यक्त करणारे असे नवीन नियम करून अकबरानें मोगल बादशहीची मजबूद आणि टोलेजंग इमारत उठवून दिली; नाना जाति व धर्म वगैरे ह्या इमारतीचे निरनिराळे व परस्परविरोधी भाग जेथल्या तेथें युक्तीनें बोठवून तीस सुस्वरूप आणिलें. मोगल बादशाही म्हणजे केवळ जुलमी व रानटी राज्यकर्त्यांची एक मालिका असें ज्यांचें मत असेल, त्यांचें तें मत ह्या बादशाहीचें खरें स्वरूप अवलोकन केल्यावर बदलल्यावांचून राहवयाचें नाहीं. तयमूरच्या वेळेपासून अकबरापर्यंत एकंदर जनसमूहाची स्थिति पुष्कळ सुधारली होती. नानाविध विद्या व कला यांचें अध्ययन चालू होऊन लोकांच्या सौख्याची वृद्धि झाली. अकबरानें आशियाखंडाच्या पश्चिमभागांतील सर्व जातींच्या लोकांस व कारागिरांस उत्तेजन दिलें. बादशाहीचें जुनें दांडगाईचें, उग्र, लष्करी स्वरूप बदलून, तीस सौम्य, उदार व रजपुती बाण्याचें नवीन स्वरूप प्राप्त झालें. हाच क्रम पुढील कार्किर्दींत चालू राहिल्यामुळें जगाच्या इतिहासांत मोगल बादशाहीचें नांव चिरस्मरणीय

झालें आहे. अकबरापासून औरंगजेबापर्यंत जो काळ गेला, त्यांत सर्व जातींचे लोक स्वातंत्र्याचा उपभोग यथेच्छ घेत होते. जो तो आपल्या कामाकडे लक्ष देऊन स्वस्थ राहत होता. दुसरा काय करितो, किंवा आपणास काय म्हणतो, याची कोणी परवा करीत नसे. औरंगजेबाच्या वेळेपासून हा प्रकार बदलला; आणि लोकांचें विचारस्वातंत्र्य व इच्छाचार नष्ट झाले. तेव्हां थोडक्याच काळांत पूर्वीचा मनु बदलून मोगल बादशाहीच्या इतिहासास निराळें स्वरूप प्राप्त झालें.

इंग्लंडच्या इतिहासांत ज्याप्रमाणें एलिझाबेथ राणीचें नांव पहिलें आहे, त्याचप्रमाणें हिंदुस्थानांत अकबराचें आहे. दोघेंही समकालीन होतीं. दोघांच्याही स्वभावांत स्वच्छंदीपणा व थोडासा हेकेखोरपणा दिसून येतो. दोघांवरही लोकांची भक्ति विशेष होती. दोघांबद्दलही लोकचर्चेत दुर्वर्तनाचा आरोप ऐकूं येत असे. दोघांनींही आपापल्या प्रजेकरितां अनेक कामें केलीं. परंतु एलिझाबेथनंतर इंग्लंडांत पार्लमेंटचा अधिकार वाढत गेला आणि लोकांस स्वातंत्र्याचा उपभोग मिळत चालला, तसा प्रकार हिंदुस्थानांत घडून आला नाहीं. लोकसत्तात्मक राज्यसत्तेचा प्रकार प्राच्य देशांत प्रायः फारसा चालू नव्हता, म्हणून त्याजबद्दल अकबरास दोष देणें वाजवी नाहीं; परंतु आपलें राज्य चिरकाल चालून लोकसुखास व्यत्यय न यावा, याजबद्दल करावे तितके उपाय अकबरानें केले नाहींत याजबद्दल त्यास दोष देण्यास जागा आहे. मोगल लोकांच्या स्वभावास अनुसरून अकबर हा आपल्या मुलांविषयीं अत्यंत स्नेहाळु होता. त्यांचे हट्ट त्यानें चालूं दिले. त्यांस त्यानें दाबांत ठेविलें नाहीं. नवीन राज्यारोहणाविषयीं त्यानें कायमचा नियम ठरविला असता, तर एकंदर लोकांवर उपकार होऊन, प्रत्येक बादशहा मरण पावल्यावर जो गोंधळ उडतो तो उडाला नसता, आणि मोगलवंशाचें राज्य हिंदुस्थानांत दिवसेंदिवस प्रबल होत गेलें असतें.

'सर्वांचीं अंतःकरणें आपणाकडे वेधून घेण्यासाठीं बादशहा रात्रंदिवस खपत असतो. सभोंवार हजारों भानगडी चालू असतांही त्याची चित्तवृत्ति अगदीं बदलत नाहीं, आणि तो नेहमीं आनंदी असतो. परमेश्वरास मान्य होईल अशीच वागणूक तो नेहमीं ठेवितो. तत्त्व-

NATIONAL ARCHIVES OF INDIA

ज्ञानाच्या गहन विचारांत त्याचें मन सदा निमग्न असतें. प्रत्येक इसमाचें म्हणणें तो स्वस्थपणें ऐकून घेतो. रागाच्या आवेशांत तो भलतीच गोष्ट कधीं करीत नाहीं. अनेक शारीरिक व मानसिक बंधनें त्यानें आपणास लावून घेतलीं आहेत. लोकांनीं आपणास नांवें ठेवूं नयेत, म्हणून आपल्या बाह्य आचरणाविषयीं तो विशेष दक्ष असतो. कोणत्याही जातीच्या किंवा धर्माच्या लोकांचा तो उपहास करीत नाहीं. कोणतेंही काम करावयाचें तो बाकी ठेवीत नाहीं. वारंवार ईशस्तव करून स्वतःचें वर्तन शुद्ध आहे कीं नाहीं हें तो नेहमीं तपासून पाहतो. सर्व लोकांस सुखी ठेवण्याची त्याची इच्छा असल्यामुळें तो गुन्हेगारांस देहान्त शिक्षा बेताबातानेंच देतो. दररोज दोन वेळां तो सर्व लोकांच्या दृष्टीस पडतो; आणि कोणाच्या मध्यस्थीशिवाय स्वतः लोकांचे अर्ज घेतो. लोकांस संतुष्ट राखणें हें स्वतःच्या सुखाचें मुख्य साधन आहे असें तो मानितो.' या ऐनेअकबरींतील वर्णनांत अतिशयोक्तीचा अंश असला, तरी एतदनुसार वागण्याचा प्रयत्न करणाऱ्या पुरुषास थोर ही पदवी देणें अगदीं योग्य होईल.

८. **वीन्सेंट स्मिथ्‌चा अकबरावर अभिप्राय.**—'सोळाव्या शतकांत पृथ्वीवरील बड्या मंडळींत अकबर हा निःसंशय एक महान् व प्रसिद्ध पुरुष झाला. हिंदुस्थानच्या इतिहासांत तर त्याचें नांव अप्रतिम व अनुपमेय आहे. थोरपणाचें वर्तन, कर्तृत्वशक्ति, आणि प्रखर बुद्धि ह्या गुणांत त्याच्या वेळच्या कोणत्याही युरोपियन राजपुरुषांशीं त्याची तुलना शोभण्यासारखी आहे. जहांगीरवरून इंग्लंडच्या पहिल्या जेम्स्‌ची आठवण होते, तशीच अकबराची तुलना एलिझाबेथ किंवा फ्रान्स्‌चा चवथा लुई ह्यांच्याशीं सहज होऊं शकेल. कायदे, नियम व व्यवस्था विचारानें ठरविणें आणि कृतीनें पराक्रम गाजविणें, ह्या दोनही बाबतींत अकबर तयार होता. अकबराची योग्यता ठरविण्याचें काम बरेंच बिकट वाटतें. कारण त्याचें कर्तृत्व बहुविध असून, त्याच्या अंतस्थ स्वभावाची असावी तितकी माहिती उपलब्ध नाहीं. बाबरनें आपलें आत्मचरित्र स्वतः लिहिलें. हुमायूनची हकीकत त्याचा नोकर जौहर व बहीण गुलबदन ह्यांनीं लिहून ठेविलेली आहे. पण अकबराचा वृत्तान्त अशा प्रकारचा कोणींच लिहिलेला नाहीं. अबुल् फज्लनें मोठमोठे ग्रंथ लिहून वाटेल तितकी हकीकत दिली आहे.

पण एक तर अकबर तीस वर्षांचा होईपर्यंत त्याची व फज्लची ओळख सुद्धां नव्हती. शिवाय तो अकबराचा नोकर व भक्त होता, तेव्हां त्याच्या लेखांत फाजील स्तुति रेलचेल भरलेली आहे. औरंगजेबाचा वृत्तान्त 'मिरातुलालम' ह्या ग्रंथांत किंवा बर्नियर व मनूची ह्यांच्या लेखांत भरपूर मिळतो, तसा अकबराचा मिळत नाहीं. जहांगीरच्या लेखांत तो असला पाहिजे होता, पण जहांगीरचें व बापाचें फार दिवस पटत नव्हतें; आणि एखाददुसऱ्या वाक्यापलीकडे त्याच्यांत ज्यास्त कांहीं नाहीं. बदाऊनीच्या लेखांवरून मात्र बरीच माहिती मिळते. बदाऊनी अकबराचा द्वेष्टा होता, तरी त्याच्या द्वेषमूलक लेखांतून अकबराची जितकी तारीफ निघते, तितकी स्तुतिपाठक फज्लच्या लेखांतून निघत नाहीं.

'अकबर स्वभावानें मानी असून अडचणीच्या प्रसंगीं डगमगणारा नव्हता. त्याचें शरीर व मन हीं मोठीं तरतरीत होतीं. आईबापां-प्रमाणेंच त्याची शरीप्रकृति निकोप व कणखर होती. त्याची विचार-शक्ति मोठीशी खोल नव्हती; आणि लहानपणचा वेळ खबुतरें उडविण्या-सारख्या उनाडपणामध्यें गेल्यानें, त्याचें जें नुकसान झालें तें कधीं भरून आलें नाहीं. परंतु तो अत्यंत उद्योगी होता. कधीं एका ठिकाणीं स्वस्थ बसला नाहीं. बारीक चौकशी करून, हरएक विषयाची खडान-खडा माहिती तो काढून घेई. धर्म, तत्त्वज्ञान असल्या कठीण विषयांत सुद्धां तो मोठ्या आवडीनें मन घाली. बदाऊनी निंदेच्या हेतूनें म्हणतो, 'प्रत्येकाचें मत काढून घेण्याची बादशहास भारी आवड. आरंभापासून अखेरपर्यंत त्याजवर नानाप्रकारचे प्रसंग आले. सर्व प्रकारच्या पुस्तकांतून माहिती गोळा करण्याची त्यास मोठी उत्कंठा. योग्यायोग्य न पाहतां, वाटेल त्या शंका काढून तो पाहिजे तशी चर्चा करीत बसे. हा प्रकार त्याचा त्यालाच शोभतो.' स्वतः अकबराचे शब्द अबुल फज्लनें लिहून ठेविलेले आहेत, ते असे. 'एकदां तत्त्वज्ञानाचे वाद-विवाद ऐकूं लागलों, म्हणजे मला दुसरें कांहीं सुचत नाहीं. मोठ्या संकटानें, नाइलाज होऊन मन दुसऱ्या कामाकडे लावावें लागतें.' फ्रान्सचा राजा सेंट् लुई किंवा रोमन बादशहा मार्कस् ऑरेलियस् ह्यांच्यासारखा अकबर साधु नव्हता; कारण अकबराचे मनोविकार पुष्कळदां अगदीं अनावर होत. बाप किंवा योग्य शिक्षक ह्यांजकडून लहानपणीं त्याचें मन

सुशिक्षित झालें नाहीं. साधुत्वास विरुद्ध असें पिसें त्याच्या ठिकाणीं सदैव कायम होतें. कोरड्या ठणठणीत अरण्यांत त्याचा जन्म झाला, आणि नोकरांत व दुष्ट नातेवाइकांत तो वाढला, त्यावरून त्याचें मनही थोडेंसें तसेंच कोरडें राहिलें. आईचा मात्र त्यास पुष्कळच उपयोग झाला. तसेंच त्याच्या आत्या व दाया ह्यांची त्याजवर अतिशय ममता होती, ह्यामुळें त्याच्या स्वभावांतील मूळचा कठोरपणा बराच नरम पडला. एकंदरींत त्याची मानसिक वाढ पुष्कळच मंद होती. बहरामखान व महाम अनागा ह्यांच्या मुठींत कांहीं दिवस तो सर्वस्वी होता, त्यावरून त्याचें मन आरंभीं असावें तितकें निश्चयी व स्वतंत्र नव्हतें. जरुरीशिवाय तो कठोरपणा धारण करीत नसे, आणि जहांगीरच्या क्रूर कृत्यांचा तर त्यास अतोनात तिटकारा येई. तथापि प्रसंगीं क्रूरपणा दाखविण्यास व त्रासदायक इसमांचा जीव घेण्यास त्याचें मन कचरत नसे. अबुल् फज्ल् त्याच्या दयेची तारीफ करतो ती वायफळ आहे. 'नरदेह ही परमेश्वराची कृति, आम्हीं माणसांनीं काय म्हणून तोडून टाकावी!' असे उद्गार अकबर वारंवार काढीत असल्याचें अबुल् फज्ल् सांगतो. परंतु चितोडास त्यानें क्रूरपणाची सीमा करून दाखविली; किंवा पुष्कळांस आपल्या आवडत्या हत्तींच्या पायांखालीं चिरडून मारिलें, तेव्हां वरील उद्गार वायफळ नाहींत तर काय? आपल्या आवडत्या प्राण्यांकडून असलीं कामें त्यानें घ्यावीं! कामरानचा मुलगा इब्राहीम ह्यास त्यानें ग्वाल्हेर येथें ठार मारिलें. कित्येक मुलांस यमुनेंत बुडविलें; मख्दुमुल्मुल्क ह्यास विष दिलें, आणि अब्दुन्नबीचा श्वास कोंडून प्राण घेतला! जहांगीरनें अबुल् फज्लचा खून करविला, तशाच प्रकारें अकबरानें मैसूमखानावर मारेकरी घातले. अशीं क्रूर कृत्यें पुष्कळ आहेत, आणि त्यांत योग्य शिक्षा झाल्या असेंही नाहीं. तथापि हिमू व असेच दुसरे कित्येक इसम ह्यांचे प्राण घेण्याची संधि आली असतां, त्यानें आपला हात मागें घेतला, अशींही उदाहरणें आहेत. अकबराहून औरंगजेब ज्यास्त क्रूर होता, असा लोकांचा सामान्य समज आहे. बादशाही तख्त मिळविण्याच्या वाटेंत किंवा धर्मसंस्थापनेंत जे त्यास आड आले, त्यांची औरंजेबानें वाट लाविली, हे प्रकार बाजूस ठेविले, म्हणजे उगाच लहरीखातर लोकांचे प्राण घेतल्याचें उदाहरण औरंगजेबाच्या हातून घडलेलें नाहीं.

उलट पक्षीं जरुरीपेक्षांही कमीच शिक्षा औरंगजेब देई. खाफीखान म्हणतो, 'अशा प्रकारच्या भलत्याच दयेनें औरंजेबाच्या राज्यांत अव्यवस्था माजली.' औरंगजेबाच्या निजण्याच्या खोलीच्या खालच्या मजल्यांत एकदां चुकीनें नोकरांच्या हातून बंदूकीची दारू ठेविली गेली. तें औरंगजेबास कळल्यावर तो इतकेंच म्हणाला, 'जहांगीरच्या समोर असा प्रकार झाला असता तर त्याच दारूवर बसवून, त्यानें तुम्हांस उडवून दिलें असतें.' सारांश, अकबराचा स्वभाव जात्या क्रूर होता. मात्र सारासारविचारानें तो पुष्कळ नरम पडला. नावडत्या लोकांस भेटीस बोलावून त्यांजकडून विष घातलेले विडे खावविणें, गर्भाची वाढ तपासण्याकरितां गर्भवती बायकांचीं पोटें चिरणें, मुलांची उपजतबुद्धि पाहण्याकरितां, त्यांस एकांतवासांत कोंडून कायमचीं मुकीं बनविणें, हे अकबराचे प्रकार शास्त्राच्या नांवाखालीं सुद्धां क्षम्य नाहींत. अकबर न्यायाच्या कामांत आपपर बिलकूल लक्षांत आणीत नाहीं असें फज्ल् वारंवार लिहितो. पण प्रत्यक्ष त्याचाच खून जहांगीरनें केला, अशी अकबराची खात्री झाल्यावर, त्यानें मुलास कोणती शिक्षा केली!'

९. अकबराचा नवरत्न दरबार.—'घोड्यावर बसणें, शिकार करणें, कबुतरें उडविणें, अशांत अकबराचें पोरपण निघून गेलें. तथापि शहाण्या लोकांचा सहवास हें त्याच्या मोठेपणाचें कारण होय. मनुष्यमात्राशीं सहानुभूति ही त्याची गुरुकिल्ली. त्याच्या वेळेस चांगलीं माणसेंही पुष्कळ निपजलीं; अथवा अकबराची गुणग्राहकता व लोकसंग्रहेच्छा ऐकून चहूंकडची गुणी माणसें त्याजजवळ जमलीं. बहरामखान, राजा मानसिंग, तोडरमल्ल, बीरबल, अबुल् फज्ल्, फैजी हे गृहस्थ कोणत्याही काळीं व कोणत्याही ठिकाणीं चमकल्याशिवाय राहवयाचे नाहींत. लोकसंग्रह करण्याचें कौशल्य मोगल लोकांत खचित होतें. हीं नवरत्नें दूर करा आणि एकट्या अकबराचें चित्र पहा. तें अगदीं उकें, अपूर्ण, नीरस व हिडिस दिसेल. बरें हीं नवरत्नें ठेवा आणि त्यांमधून अकबर नाहींसा करा, म्हणजे ह्या रत्नांचा मुख्य जीवच नाहींसा झाला असें होईल. त्यांस प्रोत्साहन देणें, बक्षिसें देणें, त्यांच्या गुणांचें चीज करणें, त्यांच्याबद्दल सतत अश्रु ढाळणें, हीं कामें अकबरानेंच केलीं, आणि त्यासच तीं शोभतात. नवरत्नें व त्यांचा पोशिंदा अकबर, मिळून एक

कलकत्ता, व्हिक्टोरिया मेमोरियल हॉलच्या ट्रस्टींच्या परवानगीनें.

सूचना—हीं नांवें डाव्या बाजूस खालीं सुरुवात करून, बादशहाचें नांव न धरितां, उजवीकडे वाचीत जावीं.

१ हकीम हुमाम. २ तोडरमल. ३ मानसिंह. ४ बीरबल. ५ मुल्ला दोप्याजा. ६ फैजी. ७ अबुल्फजल. ८ मीर्झा खानखान. ९ बहरामखान.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

NATIONAL ARCHIVES OF INDIA

कुटुंब बनलें होतें. त्यांनींच अकबरास राज्य मिळवून दिलें, आणि त्याची कीर्ति आजपर्यंत कायम ठेविली.' (शहा मुनीर आलम, हिंदुस्तान रिव्ह्यू—जुलै १९१०.)

अकबराच्या बहुतेक साह्यकर्त्यांचीं थोडीबहुत माहिती वर ठिकठिकाणीं आलीच आहे. तथापि त्यांचीं जीवनचरित्रें गमतीदार वाटल्यावरून अल्पांशानें खालीं देतों.

अकबराच्या नवरत्नांत बहूरामखानाचें नांव प्रथम आहे. बहूरामखानाचें चरित्र मागें येऊन गेलेंच आहे. अकबरानें त्यास नोकरींतून कमी केलें, त्या वेळची त्याच्या अन्यायांची एक यादी अकबरनाम्यांत दिलेली आहे. त्यानें नोकरींत सारे आपले नातेवाईक भरले, असा एक आरोप अकबरानें केलेला आहे. तो कामावरून दूर झाल्यावर बहूरामानें नोकरीस लावलेल्या मंडळींपैकीं त्याचे पंचवीस नातेवाईक पांच हजारी मनसबीवर होते. ह्यावरून, वीव्हरिज् म्हणतो, 'नोकरींत नातेवाईक भरले असें म्हणण्यापेक्षां लायक मनुष्य निवडण्याची हातोटी बहूरामखानास साधली होती. त्याच्या स्वभावांत प्रखर इराणी तेज भरलेलें होतें.'

बहूरामचा मुलगा मीर्झा अब्दुर्रह्मान जो पुढें खानाखानान ह्या नांवानें दक्षिणेंत प्रसिद्धीस आला, तो अकबराच्या सरदारांत बलवान व विद्वान् म्हणून गणला जात असे.

अबुल् फज्ल् व फैजी.—ह्यांची बहुतेक हकीकत वर ठिकठिकाणीं येऊन गेलीच आहे. ह्या कुटुंबाचा पूर्वज शेख मुसा हा आरबस्तानांतला राहणारा. म्हणजे हें कुटुंब अस्सल आरबी होतें. नवव्या शतकांत हें कुटुंब सिंधप्रांतांत येऊन राहिलें. पुढें शेख खिज्र् हा साधुवृत्तीनें फिरत फिरत अजमीरनजीक नागोर येथें येऊन राहिला. तेथेंच त्याचा मुलगा शेख मुबारिक ह्याचा जन्म झाला. लहानपणापासून मुबारिकची बुद्धि तीव्र व चलाख होती. लहानपणींच दुष्काळानें ह्या कुटुंबाची वाताहत होऊन फक्त मुबारिक व त्याची आई एवढीं मात्र त्यांतून वांचलीं. तीही पुढें लवकरच वारली. त्या वेळीं निरनिराळ्या ठिकाणीं विद्यापीठें असून, कित्येक अध्यापकांची ख्याति देशभर पसरलेली होती. अशांच्यापाशीं जाऊन मुबारिक बरीच विद्या शिकला. त्यानें पुष्कळ वर्षें अहंमदाबादेस काढिलीं. नंतर तो आग्यास

जाऊन यमुनेच्या कांठीं एका साधूपाशीं राहिला; आणि तेथेंच त्यानें अध्यापकाचें काम सुरू केलें. मुबारिक फार विद्वान् होता, आणि त्याची विचारशैली व शिकविण्याची पद्धत प्रचलित पद्धतीहून अगदींच निराळी असल्यामुळें, त्याचा लौकिक सर्वत्र पसरला. विशेषतः जुन्या पुस्तकांवर विश्वास न ठेवितां, खऱ्याखोट्याचा निर्णय स्वतः स्वतंत्र विचार करून ठरवावयाचा असा त्याचा नेम होता. त्यामुळें दुराग्रही मुसलमानी धर्मावरील त्याची श्रद्धा बरीच कमी होऊन इतर धर्मांतही पुष्कळ सत्य आहे, अशी त्याची खात्री झाली; आणि अशाच प्रकारचे विचार त्यानें आपल्या मुलांस शिकविले. त्या वेळीं मुसलमानी धर्मविचारांत एक मोठी क्रान्ति घडून येत होती. एक हजार वर्षांनीं मुसलमानी धर्म बुडून नवीन धर्म प्रचारांत येणार, असा एक सार्वत्रिक समज होऊन, त्यामुळें जो तो नवीन विचारास लागला. 'फ्री थिंकिंग' म्हणजे स्वतंत्र विचारास ऊत आला. अशा विचारांचे पुष्कळ पुरुष पुढें आले. युरोपांत विक्लिफ्, ल्यूथर वगैरे ज्या प्रकारचे पुरुष उदयास आले, तशांतलाच हा प्रकार असून, शेख मुबारिकनें आरंभापासूनच प्रचलित धर्मकल्पनांच्या विरुद्ध आपला मोर्चा फिरविला. जोनपूर येथें एक नवीन 'महादी' उत्पन्न झाला, आणि अशाच प्रकारचे आणखी महादी दुसऱ्या ठिकाणींही पुढें आले. ते रस्तोरस्तीं फिरून लोकांस नवीन पंथांचा उपदेश करूं लागले. आग्रा येथें दरबारांत 'मखदुम्-उल्मुल्क' ह्या नांवाचा एक वजनदार गृहस्थ जुन्या पक्षाचा पुढारी व मुख्य धर्माध्यक्ष असून, त्याचें व मुबारिकचें वांकडें आलें. कारण, मुबारिकचे नवीन विचार जुन्या पक्षास पसंत नव्हते, आणि त्यानें आपले नवीन विचार लोकांस शिकवूं नयेत, म्हणून त्या पक्षानें नाना तऱ्हा केल्या. पुष्कळ महादींस व नवीन अध्यापकांस त्यांनीं ठार मारविलें. हा क्रूरपणाचा प्रकार अकबर राज्यारूढ झाला, त्या वेळीं चालू असून पुढेंही कांहीं दिवस तो चालला. सुनीपंथी उलमा व त्यांचा अध्यक्ष मखदुमुल्मुल्क हे, बादशहाला जुन्या धर्ममार्गापासून हलूं द्यावयाचें नाहीं, हें आपलें मुख्य काम समजत. त्यांच्या तडाख्यांतून आजपावेतों अकबर व अलाउद्दीन खिलजी हे दोघेच थोडेबहुत स्वतंत्र झाले. ह्या उलमांचा पहिला रोंख शियापंथाच्या विरुद्ध होता. बह्रामखान शियापंथी होता. तो

जिवंत असतांना उलमा गप्प होते. पण त्याचा पाडाव झाल्यावर अकबरास आपल्या जाळ्यांत गुंतविण्याचा त्यांनीं प्रयत्न चालविला. शेख मुबारिक ह्मास पकडून आणवून ठार मारावें, असा हुकूम त्यांनीं अकबराकडून मिळविला. ही वार्ता कळल्याबरोबर मुबारिक आग्र्याहून पळून गेला. त्यास शिक्रीचा शेख सलीम चिस्ती याची मदत होती. त्याच्या साह्यानें मुबारिक गुजराथेंत गेला. इकडे त्याच्या शत्रूंनीं त्याचें घर फोडून सामान-सुमानाची वाट लाविली. गुजराथेंत अजीज कोका ह्यानें मुबारिक ह्यास आपल्या आश्रयाखालीं घेऊन, त्याजबद्दल बादशहाकडे रदबदली केली. इकडे मुबारिकचे दोघे मुलगे अबुल् फैजी व अबुल् फज्ल् बापासारखेच विद्वान् व हुशार झाले होते. फैजीचीं कवनें वाचून अकबरास समाधान वाटलें; आणि चितोडच्या वेढ्याचें काम चालू असतां त्यानें फैजीस भेटीस बोलाविलें. त्यास शिक्षा करण्याकरितां बादशहानें हें पाचारण केलें अशी प्रथम उलमांची समजूत होऊन, त्यांस आनंदाच्या उकळ्या फुटूं लागल्या. फौजेच्या अधिकाऱ्यानें मुबारिकच्या घरीं जाऊन त्यास वाटेल तसा त्रासही दिला. फैजीला पकडून त्यानें बादशहासमोर नेलें. तेथें बादशहानें फैजीचा सत्कार केला, तेव्हां त्याच्या जिवांत जीव आला. इकडे अबुल् फज्ल् बापाजवळ राहून उत्कृष्ट शिक्षण मिळवीत होता. केवळ धर्म-समजुतींखातर आपल्या कुटुंबाचे असे हाल होत आहेत, हें पाहून मुसल-मानी धर्माचा त्यास तिटकारा वाटूं लागला. फज्ल्च्या मनांत सर्व धर्मांबद्दल जी समता पुढें उत्पन्न झाली, तिचें कारण त्याच्या आरंभींच्या विपत्ति होत. त्यानें नानातऱ्हेची विद्या संपादन करून व सर्व नामांकित ग्रंथांचें अवलोकन करून उलमांचा पाडाव करण्याचा निश्चय केला. ही त्याची तयारी पुढें अकबराच्या दरबारीं गेल्यावर त्याच्या फार उपयोगी पडली. पंधरा वर्षांच्या वयांत त्यानें बहुतेक ग्रंथ वाचून काढिले. वीस वर्षांतच तो बापाप्रमाणें लोकांस पढविण्याचें काम करूं लागला. त्याची बुद्धिमत्ता अलौकिक होती. इस्पहानी म्हणून एक नामांकित कवि पूर्वी होऊन गेला. त्याच्या ग्रंथाची एक उत्कृष्ट हस्तलिखित प्रत फज्ल्च्या हातीं पडली. ती तो वाचीत असतां, सर्व पानांची समग्र अर्धी बाजू सहज त्याच्या हातून जळून गेली. अशा स्थितींत त्यानें अवशिष्ट मजकुरावरून जळा-लेला सर्व मजकूर स्वतः जुळवून लिहून काढिला, आणि ती प्रत माल-

कास दिली. पुढें मूळकवीच्या ग्रंथाची दुसरी एक अस्सल प्रत उपलब्ध झाली, तिजशीं ही नवीन प्रत ताडून पाहतां, कांहीं ठिकाणीं ती ज्यास्तच सरस झाली होती, असें दिसून आलें. ह्यावरून फज्लच्या बुद्धिशक्तीची कल्पना होईल.

फज्लच्या मनांत संन्यासवृत्तीनें राहवें आणि निरनिराळ्या धर्मांचें ज्ञानसंपादन करीत दूरदूरच्या देशांत फिरावें, असें होतें. परंतु अकबरानें फैजीचा जो सत्कार केला, त्यानें हा सर्व प्रकार बदलून गेला. सन १५७४ त अकबर बंगालच्या स्वारींत असतां फैजी त्याजबरोबर गेला होता. तेथून फैजीचें पत्र भावास आलें, कीं तुम्हांस बादशहानें भेटीस बोलाविलें आहे. त्याप्रमाणें बादशहा परत आल्यावर फत्तेपूर-शिक्री येथें अबुल् फज्लनें बादशहाची भेट घेतली. लगेच त्यानें आपल्या विद्वत्तेची छाप बादशहावर बसविली. 'दोघां भावांची ही चलती पाहून, मखदुमुल्मुल्क व त्याचे उलमा ह्यांस अत्यंत वाईट वाटलें. त्यांचा पाडाव करण्याचें अबुल् फज्लच्या मनांत होतें; त्याप्रमाणें बादशहाकडून दरगुरुवारीं रात्रीं त्यानें धर्मावर वादविवाद चालू केले. त्यांचें वर्णन वर आलेंच आहे. धर्माच्या बाबतींत बादशहाचा अधिकार सर्वांवर आहे, अशा आशयाचा जो जाहीरनामा प्रसिद्ध करण्यांत आला, तो शेख मुबारिकच्या हातचा असून त्याची सर्व कल्पना अबुल् फज्लनें रचिली आहे. जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यानंतर लवकरच मखदुमुल्मुल्क नवीन व्यवस्थेस कंटाळून, आपलें काम सोडून, मक्केस निघून गेला; आणि अबुल् फज्लची फत्ते झाली. अकबरास ह्या दोघां बंधूंबद्दल अतिशय आदर वाटत असे. अबुल् फज्ल् सदैव बादशहाच्या संनिध असे; आणि त्याजबरोबर स्वारीस जाई. फैजी ह्याजकडे कांहीं दिवस शहाजादा मुराद ह्यास पढविण्याचें काम होतें. पुढें त्याची आग्र्याच्या 'सदरच्या' जागीं नेमणूक झाली. सन १५८८ त त्यास 'कविराज' ह्या अर्थाचा किताब मिळाला. हिंदुस्थानांत दोनच मोठे उत्कृष्ट फारशी कवि होऊन गेले, पहिला अमीर खुस्रू व दुसरा फैजी.

सन १५८९त अबुल् फज्लची आई मरण पावली. त्या प्रसंगीं बादशहा स्वतः सांत्वनार्थ त्याच्या घरीं गेला होता. अबुल् फज्लच्या सल्यानें बादशहानें नवीन धर्म स्थापन केला, हा प्रकार पुष्कळ मुसलमानांस आव-

हलत नाहीं. वाटेल तसे घाट करून हा प्रकार मोडून काढण्याचे अनेक प्रयत्न दरबारांत चालू होते. सलीमच्या सल्लागारांनीं त्यास विरुद्ध पक्षांत ओढिलें. त्यामुळें अबुल् फज्लच्या शत्रूंस बरीच बळकटी आली; आणि स्वतः सलीम त्याचा पाडाव करण्याची खटपट करूं लागला. सलीमनें बंड केलें, त्या वेळीं अबुल् फज्लशिवाय बाकीचे बहुतेक सर्व कामदार त्यास मिळाले होते. ह्या खटपटीची व अबुल् फज्लच्या खुनाची हकीकत वर आलीच आहे. सन १५९३ त शेख मुबारिक मरण पावला, तेव्हां त्याच्या दोघांही मुलांस अत्यंत दुःख झालें. मुबारिकला जरी पुष्कळ शत्रु होते, तरी त्याच्या विद्वत्तेबद्दल सर्व लोकांत मोठा आदर होता. बापाच्या पश्चात् दोन वर्षांनीं फैजी मरण पावला, (५ ऑक्टोबर, स. १५९५). मरणापूर्वीं थोडावेळ बादशहा अकबर आपला विद्वान् हकीम बरोबर घेऊन फैजीच्या समाचारास गेला असतां, फैजीचें बोलणें बंद झालें होतें. बादशहा बोलला, 'शेखजी, माझे हकीम औषध द्यायला आणिले आहेत, औषध घ्या.' त्यावर कांहींच उत्तर आलें नाहीं असें पाहून बादशहाला अत्यंत कळवळा आला. बैतागानें डोक्ीचें पागोटें काढून त्यानें जमिनीवर आपटलें; आणि बराच वेळ बसून अत्यंत शोक केला. नंतर कांहीं वेळानें अबुल् फज्लची समजूत करून, बादशहा परत गेला. अशा विद्वद्रत्नाबद्दल भूषण मानणाऱ्या व शोक करणाऱ्या बादशहाची धन्य होय! अबुल् फज्लची बंधुप्रीति तर पदोपदीं व्यक्त झालेली आहे. अबुल् फज्लला खाण्याचा मोठा शोक होता. त्याच्या टेबलावर नानाप्रकारचे उत्तमोत्तम पदार्थ सदैव तयार असत, आणि त्याजबरोबर भोजनास मंडळीही पुष्कळ असे. इतके विद्वान्, उद्योगी व भाग्यशाली पुरुष क्वचित् आढळतात.

अबुल् फज्लची योग्यता तर बाप व भाऊ ह्या दोघांच्याही पेक्षां श्रेष्ठ होती. त्यानें किती काम केलें हें त्याच्या ग्रंथांवरून दिसून येतें. त्याची भाषा साधी व उदात्त होती. त्याचे विचार थोर होते. खोडसाळपणाचा त्यास अत्यंत तिटकारा होता. त्याच्या लेखांत अपशब्द तर बिलकुल सांपडत नाहीं. तत्कालीन ग्रंथकारांनीं अनेक आचारविचारांबद्दल व क्रियांबद्दल वाटेल तसें तोंडसुख घेतलेलें आहे; परंतु अबुल् फज्लच्या लेखांत स्त्री काय किंवा पुरुष काय, राव काय, किंवा रंक काय, सर्वांविषयीं अत्यंत प्रेम,

आदर व निष्पक्षपात ओतप्रोत भरलेला आहे. इतका त्याचा छळ झाला, इतके त्याला शत्रु होते, तथापि एकाही इसमाबद्दल आपल्या मनांतील द्वेषबुद्धीचा यत्किंचित् चकारशब्द त्याच्या लेखांत सांपडत नाहीं. अकबर नामा ग्रंथांत उल्मांच्या कृत्यांची भरपूर चर्चा आहे, पण ती सर्व चर्चा इतकी गंभीर उदात्त आहे, कीं ती वाचतांना अबुल् फज्लच्या थोर मनाची अप्रत्यक्ष रीतीनें साक्ष पटत जाते. शत्रूवर द्वेषमूलक शब्दांचा वर्षाव तींत कोठेंच आढळत नाहीं. म्हणूनच अबुल् फज्लच्या लेखांस फारशी इतिहासांत अग्रस्थान मिळत आहे. शेख मुबारिकानें कुराणावर उत्कृष्ट व विस्तृत टीका लिहिली आहे. अबुल् फज्लचा मोठा ग्रंथ म्हणजे 'अकबर नामा'. होय. ह्या मोठ्या ग्रंथाचे तीन भाग असून तिसरा भाग 'ऐने अकबरी' नांवानें प्रसिद्ध आहे. हा ग्रंथ सरकारी कागदपत्रांच्या साह्यानें त्यानें लिहिला. ह्या कामीं तो पुष्कळ वर्षे खपत असला पाहिजे; आणि दुसऱ्या पुष्कळ मंडळीचें साह्यही त्यास झालें असलें पाहिजे. अकबरानें जीं कितीएक उत्कृष्ट-कामें केलीं, त्यांत आपल्या वंशाचा जो हा संपूर्ण इतिहास विद्वानांकडून त्यानें लिहविला, त्याची किंमत विशेष असून, आजकालच्या ऐतिहासिक जागृतींत ह्या कृत्याची महती विशेष आहे. अकबरनाम्याच्या पहिल्या भागांत तयमूरपासून हुमायूनचा इतिहास दिलेला आहे. दुसऱ्या भागांत अकबराच्या कारकिर्दीतील एकंदर महत्त्वाच्या गोष्टींचें वर्णन अबुल् फज्लच्या मृत्यूपर्यंत दिलेलें आहे. तिसरा भाग 'ऐने अकबरी' म्हणजे अकबराच्या राज्यव्यवस्थेचा वृत्तान्त. 'ऐन' म्हणजे कायदा किंवा नियम. दुसरा भाग ऐतिहासिक असून, तिसऱ्या भागांत नियम व विवेचन केलेलें आहे. म्हणजे अलीकडे जसे रिपोर्ट किंवा गॅझेटियर्स प्रसिद्ध होतात, तशाच धर्तीचा हा 'ऐने अकबरी' ग्रंथ आहे. हा तिसरा भाग सन १५९८ त पुरा झाला. ऐने अकबरीचे पांच विभाग आहेत. पहिल्यांत बादशहा, त्याचें कुटुंब, दरबार, इत्यादिकांचें वर्णन आहे. दुसऱ्यांत दिवाणी, लष्करी व दरबारी नोकर, त्यांचीं नांवें, कामें, पगार इत्यादिकांचें वर्णन आहे. तिसऱ्या विभागांत न्याय व जमाबंदी ह्या खात्यांचें विवेचन आहे. चौथ्या विभागांत लोकांची व विशेषतः हिंदूंची सामाजिक व बौद्धिक स्थिति वर्णिलेली आहे. पांचव्या विभागांत थोर पुरुषांच्या व कवींच्या उक्ति, म्हणी व स्फुट वचनें ह्यांचा संग्रह

केलेला आहे. अशा प्रकारचा सर्व बाजूंनीं भरपूर विचार केलेला असा 'ऐने अकबरी' हा एकच ग्रंथ आहे. इतर इतिहास फारशी भाषेंत पुष्कळ आहेत, पण त्यांत युद्धांच्या व धामधुमींच्या हकीकतींशिवाय फारसें कांहीं सांपडत नाहीं. तीनचारशें वर्षांपूर्वी लोकस्थिति कशी होती, राज्यकारभार कसा चालला होता, राज्यकर्त्यांपुढें मोठमोठे प्रश्न कोणते होते, आणि त्या वेळच्या व आजच्या स्थितींत आणि विचारांत कसें व किती अंतर पडलें आहे, इत्यादि प्रकार समजून घेण्यास 'ऐने अकबरी'–सारखा दुसरा ग्रंथ नाहीं. ऐने अकबरीच्या बऱ्याचशा भागाचें इंग्रजी भाषांतर सन १७८३ त ग्लॅड्विन ह्यानें करून, तें त्यानें वॉरन् हेस्टिंग्स् ह्यास नजर केलें. तें सन १८०० ह्या वर्षी छापिलें. परंतु ग्लॅड्विन् ह्यास मिळालेली मूळग्रंथाची प्रत बरीच अशुद्ध असल्यामुळें, भाषांतरही चांगलें झालें नाहीं हल्लीं ब्लॉक्मन् व जॅरेट ह्यांनीं अबुल् फज्लच्या असल प्रतीवरून. इंग्रजींत सुंदर भाषांतर केलेलें उपलब्ध आहे. अबुल् फज्लविषयीं ब्लॉक्मनचा अभिप्राय येणेंप्रमाणें आहे.

'अबुल् फज्लची सत्यप्रीति, परमतसहिष्णुता, त्याचा दरबारचा फार वर्षांचा अनुभव, त्याची सुंदर भाषा व बादशहाचा त्याजवरील भरंवसा, ह्यांच्यायोगानें त्याच्या ग्रंथांस विशेष किंमत आली आहे. हें त्यानें आपल्या बादशहाच्या थोरपणाचें व स्वतःच्या विद्वत्तेचें एक प्रकारचें कायमचें स्मारकच करून ठेविलें आहे. त्याच्या उदार अंतःकरणांत सर्व कांहीं चांगलें होतें. त्यानें आपली धन्याची तरफदारी करण्याकरितां पुष्कळ गोष्टी लपवून ठेविल्या आणि त्याच्या स्तुतीनें आपलें पुस्तक भरून काढिलें, अशा प्रकारचा आरोप पाश्चात्यांनीं केलेला असून, तो सर्वथैव निराधार आहे. (ह्या आरोपाचें दिग्दर्शन वर दिलेल्या बीव्हरिज्च्या टीकेंत आलेंच आहे.) प्रसंगवशात् अबुल् फज्लच्या लेखणींतून अकबराची स्तुति उतरते, नाहीं असें नाहीं; पण ती अगदीं न्याय्य असून तिला तो बादशहा निस्संशय पात्र होता.'

अकबरनामा हा अबुल् फज्लचा सर्वांत मोठा ग्रंथ; शिवाय निरनिराळ्या राजेरजवाड्यांस अबुल् फज्लनें अकबराच्या नांवानें जीं पत्रें लिहिलीं, त्यांच्या संग्रहाचें एक मोठें पुस्तक अबुल् फज्लचें आहे. आणखी अनेक विषयांवर त्यानें लिहिलेली स्वतंत्र पुस्तकें व तर्जुमेही आहेत.

३६–२८–१०—१०–७९१–२०००

अबुल् फज्लूचा बाप मुबारिक ह्यास दोन बायका होत्या. पहिलीला मुलगे पांच, त्यांपैकीं पहिला फैजी व दुसरा अबुल फज्ल्. दुसरीला एक मुलगा होता. शिवाय त्यास चार मुली होत्या. अबुल् फज्लूचा मुलगा शेख अब्दुर्रहमान अफ्झलखान हा बापाबरोबर दक्षिणच्या स्वारींत होता. जहांगीरनें त्यास बहारप्रांताचा कारभार दिला, तो स. १६१३ त मरण पावला. जहांगीरनें अबुल् फज्लूचें वैर त्याच्या मुलांवर साधून घेतलें नाहीं.

राजा मानसिंग.—हा जयपूरचा कच्छवाहवंशी राजा. ह्याचा बाप भगवानदास प्रथम अकबरास सामील झाला त्याचें शौर्य व स्वामिनिष्ठा पाहून अकबर फार खुष झाला, आणि त्यानें त्यास आपल्या पदरां ठेवून घेतलें. पुढें भगवानदासाच्या बहिणीची मागणी अकबरानें केली, ती कबूल होऊन पुढें तें लग्न हिंदुरीतीनें सप्तपदी वगैरे होऊन मोठ्या थाटानें झालें. गुजराथच्या स्वारींत बडोद्यानजीक सारसा येथें अकबरावर जिवावरचें संकट आलें, त्या प्रसंगीं मानसिंगानें शिकस्त करून बादशहाचा जीव बांचविला. त्यावरून मानसिंगास त्यानें मोठमोठीं कामें देऊन चढविलें. पुढें मानसिंगानें पराक्रम करून काबूल व बंगाल हे प्रांत जिंकून घेतले, त्याचें वर्णन मागें आलेंच आहे. मानसिंग हा फार दिवस अकबराचा मुख्य सेनापति होता. 'सप्तहजारी' मनसबदारी अकबरानें प्रथम मानसिंगासच दिली, येणेंकरून सर्व मुसलमानांपेक्षां ज्यास्त गौरव अकबरानें मानसिंगाचा केला. पुढें कांहीं दिवसांनीं आणखी दोघां मुसलमान सरदारांस त्यानें 'सप्तहजारी' पद दिलें. 'मीर्झा' म्हणजे 'राजपुत्र' ही मुसलमानी पदवीही बादशहानें मानसिंगास दिली, तिजवरून पुढें जयपूरचे राजे 'मीर्झा राजा' असें आपल्या नांवामागें लावीत. चितोडगड काबीज करण्यास मानसिंगाचा उपयोग अकबरास फारच झाला; आणि त्यामुळें रजपूत घराण्यांत दुफळी होऊन ती फार दिवस कायम होती. जसें अकबराच्या राज्यकारभारांतील सुधारणांचें श्रेय मुख्यत: अबुल् फज्ल् ह्यास आहे, त्याचप्रमाणें अकबराच्या युद्धकर्मांतील मुख्य श्रेय मानसिंगास आहे. बंगालप्रांत जिंकिल्यावर मानसिंगानें अकबरनगर नांवाचें शहर स्थापिलें, तेंच हल्लींचें 'राजमहाल' होय. अकबराच्या मृत्युसमयीं जे कट झाले, त्यांत मानसिंग सामील होता. मानसिंग दक्षिणच्या स्वारींत असतां स. १६१४ त मरण पावला. त्याचें प्रेत अंबरास

आणून दहन करण्यांत आलें. त्या प्रसंगीं त्याच्या १५०० बायकांपैकी साठ बायका सती गेल्या 'हिंदु लोकांचीं अंतःकरणें प्रेमळ असून, त्यांस ममतेनें वागविलें असतां, ते आपले गणगोत सुद्धां विसरून, आपल्यां उपकारकर्त्याला मनापासून भजणारे आहेत; स्वतःचें हिताहित न पाहतां हरएक अर्थाचा त्याग करून आपली कृतज्ञता ते व्यक्त करतील, हा प्रकार मानसिंगाच्या उदाहरणावरून उत्तम व्यक्त होतो.' (सरदार जोगेन्द्रसिंग, ईस्ट एन्ड वेस्ट, जानेवारी १९०६).

मुल्ला दोप्याजा.—अकबराच्या नवरत्नांमध्यें मुल्ला दोप्याजा म्हणून एक गृहस्थ होता. तो आरबस्तानांत तैफ् येथें जन्मला. त्याचा बाप फार श्रीमंत होता त्याची आईही फार देखणी व विद्वान् बायको होती. लहानपणा-पासूनच हा फार चलाख होता. सगळें कुराण त्यानें तीन वर्षांत तोंडपाठ केलें. नवव्या वर्षीं त्याची आई वारली आणि बापानें दुसरें लग्न केलें. तें सुखकारक न होऊन बाप घर सोडून गुप्तपणें चालता झाला. मुलगा त्याच्या मागोमाग शोध करीत निघाला, तो भिक्षा मागत इराणांतून हिंदुस्थानांत आला. हुमायूनच्या पदरीं असलेल्या एका गृहस्थाची व त्याची ओळख होऊन तो त्याजपाशीं राहिला; आणि हुमायूनच्या लवा-जम्यांत तो हिंदुस्थानांत आला. त्या वेळीं त्याचें वय अवघें १५ वर्षांचें होतें. दिल्लीस आल्यावर तेथील एका मशिदींत राहून तो लोकांस कुराण पढवूं लागला. तेथें या मुल्लाजीची लवकरच चांगली प्रसिद्धी झाली तो मोठा थट्टे-खोर असून नानातऱ्हेच्या कोटया करून लोकांस हसवीत असे. एकदां तो एका गृहस्थाकडे भोजनास गेला असतां तेथें पुलावा केलेला होता, तो त्यास फार आवडला. हा पदार्थ त्यानें पूर्वी कधीं खाल्ला नव्हता. तेव्हां त्याचें नांव काय? असें त्यानें शेजारच्या इसमास विचारलें. त्यानें 'पिलाव' म्हणून सांगितलें तें त्यास कळेना, तेव्हां त्याची थट्टा करण्याकरितां दोप्याजा (दोन कांदे) असें त्यास उत्तर मिळालें. पुढें तो कोठेंही भोजनास गेला असतां 'माझ्यासाठीं दोप्याजा करा' असें सांगत असे. त्यावरून त्यास मुल्ला दोप्याजा असें नांव पडलें. अबुल् फज्ल् व फैझी ह्यांनीं त्याची विद्वत्ता पाहून त्याच्याशीं मैत्री संपादिली. चेहेऱ्यावरून तो मनुष्याचा स्वभाव तेव्हांच ओळखीत असे. फैझीनें त्यास बाद-शहाकडे नेलें. त्याचा थट्टेखोर स्वभाव बादशहास फार आवडला,

आणि त्यास त्यानें आपल्या पदरीं ठेवून घेतलें. अकबरानें आपल्या नवीन धर्माचें जें प्रार्थनामंदिर बांधिलें, त्या मंदिराची सर्व व्यवस्था ह्या मुल्लाकडे सोंपविली. बीरबल व मुल्लाजी यांजमध्यें नेहमीं एक प्रकारची चुरस असे, म्हणून त्या दोघांचा तंटा लावून अकबर मजा पाहत बसे. भरदरबारांत विलक्षण कोटी करून तो वाटेल त्याचा पाणउतारा करी. प्रत्यक्ष बादशहाचीही तो भीड ठेवींत नसे. म्हणून सर्व लोक त्यास पाण्यांत पाहत. स्वारीशिकारींत नेहमीं मुल्ला अकबराच्याबरोबर असावयाचा. दक्षिणच्या स्वारींत तो आजारी पडला, तेव्हां त्यास स्वारींतला त्रास सहन होईना. बापाचा शोध त्यास कधीं लागलाच नाहीं, म्हणून तो शेवटीं अत्यंत विव्हळ झाला, आणि सन १६०० ह्या वर्षी नर्मदेच्या कांठीं हंड्या येथें मरण पावला. अकबरानें सर्व फौजेसह त्यास सन्मान देऊन त्याचा अंत्यविधि उरकला. (Modern Review, July 1910).

राजा तोडरमल्ल—तोडरमल्ल हा अयोध्याप्रांतांत लाहरपुर येथें जन्मला. तो जातीचा खत्री होता. पूर्वी शेरशहा सूरपाशा त्यानें काम केलें होतें. स. १५७४ च्या सुमारास त्यानें अकबराची नोकरी पत्करिली. गुजराथप्रांत जिंकिल्यावर तेथील जमाबंदीचें काम अकबरानें तोडरमल्लाकडून करवून घेतलें. नंतर बंगालप्रांत जिंकिल्यावर तेथें त्याची नेमणूक झाली. तेथील जमाबंदीचें काम संपल्यावर तो आग्र्यास गेला. तेथें कांहीं दिवस राज्याच्या एकंदर वसुलाचें काम त्यानें केलें. बंगाल, गुजराथ वगैरे ठिकाणीं बंडें होत, तीं मोडण्यास तोडरमल्लाची नेमणूक होत असे. स. १५७८ त त्याची वजिराच्या जागीं नेमणूक झाली. पुढें कांहीं दिवसांनीं त्यास बंगालच्या कारभारावर पाठविण्यात आलें. कोणत्याही स्वारींत तो फत्ते करून आल्याशिवाय राहत नसे. स. १५८३ त पुनः आग्र्यास आल्यावर त्यानें जमाबंदीच्या नवीन सुधारणा अंमलांत आणल्या, त्या ऐने-अकबरीच्या तिसऱ्या पुस्तकांत दिलेल्या आहेत. पूर्वी राज्याचे हिशेब हिंदी भाषेंत ठेवण्यांत येत असत, ते फारशी भाषेंत ठेवण्याचा प्रचार तोडरमल्लानें पाडिला. त्यामुळें हिंदी भाषा मागें पडून फारशी ही दरबारची भाषा झाली, आणि हिंदुलोक सुद्धां फारशी भाषेंत तरबेज होऊं लागले. इतकें कीं, पुढें शंभर वर्षांनीं मुसलमानांस फारशी शिकविण्यासाठीं हिंदूंचीच योजना होत असे. राज्यकर्त्यांच्या बरोबरीनें हिंदूंना हक्क मिळ-

NATIONAL ARCHIVES OF INDIA

ह्याला ह्या फारशी भाषेचा पुष्कळ उपयोग झाला. बीरबल मरण पावल्यावर तोडरमल्लानें मानसिंगाबरोबर अफगाणसरहद्दीवर मोहीम केली. अकबर काश्मिरांत गेला, तेव्हां तोडरमल्ल लाहोरास राहून सर्व कारभार पाहत असे. पुढें वृद्धापकाळ झाल्यामुळें गंगेच्या काठीं जाऊन राहण्यासाठीं त्यानें बादशाहाची परवानगी मागितली; आणि तो हरिद्वारपर्यंत निघूनही गेला. तेथून त्यास बादशहानें आग्रहानें परत आणलें, आणि सांगितलें, 'गंगातीरीं रिकामें बसण्यापेक्षां लाहोरासच स्वस्थ बसून राहा.' पुढें थोड्याच दिवसांनीं तो लाहोरास मरण पावला, (स. १५८९). तोडरमल्ल स्वभावानें तापट व आग्रही होता. युद्धकलेच्या व जमाबंदीच्या कामांत त्याची बरोबरी करणारा दुसरा सरदार नव्हता. तो आरंभीं लहानसा कारकून असून स्वपराक्रमानें योग्यतेस चढला. अबुल्फज्ल् व तोडरमल्ल यांचें फारसें सख्य नव्हतें, तथापि फज्लनें त्याची फारच वाखाणणी केली आहे. तो पक्का स्वधर्मनिष्ठ असून अकबराच्या नवीन धर्माच्या भानगडींत सामील झाला नाहीं. एकदां अकबराबरोबर स्वारींत असतां त्याचे देव हरवले. देवपूजा केल्याशिवाय तो अन्नग्रहण करीत नसे. कित्येक दिवस त्यानें तोंडांत पाणी सुद्धां घातलें नाहीं. शेवटीं अकबरानें स्वतः जाऊन त्याची समजूत केली, आणि नवीन देव आणविल्यावर त्याची पूजा चालू झाली. ह्या त्याच्या कडक निष्ठेबद्दलच फज्लचें व त्याचें जुळलें नाहीं. अकबरानेंही त्याजबद्दल त्याला दुखविलें नाहीं आणि त्याच्या गुणाचा उपयोग करून घेतला.

राजा बीरबल.—ह्याचें मूळचें नांव महेशदास. हा ब्राह्मण जातीचा भाट, काल्पीचा राहणारा. तो गरीब पण बुद्धिमान होता. अकबर राज्यारूढ झाल्यावर फिरत फिरत तो त्याच्या दरबारीं आला. तेथ त्याच्या सुंदर कवनांनीं बादशहाकडे त्याची दाद लागून लवकरच तो त्याचा आवडता झाला. अकबरास त्याचीं हिंदी कवनें फार आवडूं लागलीं, आणि त्यास त्यानें 'कविराय' असा किताब दिला. स. १५७४ त नागरकोटच्या जयचंद राजास अकबरानें कैद करून त्याची जहागीर व 'राजा बीरबल' हा किताब ह्या कवीस दिला. त्याच नांवानें तो पुढें प्रसिद्ध झाला. जयचंदाचा मुलगा बुद्धिचंद ह्यानें नागरकोटची जहागीर बीरबलास मिळूं दिली नाहीं. गुजराथच्या स्वारींत बीरबल अकबरा-

बरोबर होता. अनेक रजपूत राजांकडे अकबर त्यास वकील म्हणून पाठवी. रजपूत राजांस अकबराकडे शरण आणणें, त्यांच्या मुलींचीं लग्नें बादशाही कुटुंबांत जुळविणें, इत्यादि अनेक महत्त्वाचीं व नाजूक कामें बीरबलास सागण्यांत येत. तो बहुतेक साधुवृत्तीनें राहून कालक्रमणा करी. हिंदुधर्मांतील उत्तमोत्तम तत्त्वें त्यानें अकबराच्या मनावर ठसविलीं, या कारणास्तव दरबारचे मुसलमान सरदार त्याचा द्वेष करीत असत. बीरबलाचें भाषण गमतीदार व बोधपर असे. मरणापूर्वीं थोडे दिवस त्यानें अकबराचा नवीन धर्म स्वीकारिला होता.

तानसेन.—सुंदरबनांतील भाटीचा राजा रामचंद्र बाघेला याजपाशीं तानसेन हा एक गवई होता. हा उत्कृष्ट गवई आहे अशी बातमी अकबरास पोंचल्यावरून त्यानें रामचंद्राकडे तानसेनची मागणी केली. रामचंद्राला नाहीं म्हणतां येईना. तानसेन त्याचा मोठा दोस्त होता. त्यास सर्व वाद्यें देऊन रामचंद्रानें अकबराकडे आग्र्यास पोंचतें केलें. त्याचें पहिलें गाणें बादशहानें ऐकिलें त्याच वेळीं त्यानें त्यास दोन लाख रुपये बक्षीस दिले. तेव्हांपासून तानसेन अकबराच्या दरबारीं राहिला. त्यानें अनेक कवनें केलीं, त्या बहुतेकांत अकबराचें नांव गोंविलेलें आहे. अद्यापि तानसेनचीं गाणीं लोक प्रेमानें गातात.

हकीम हुमाम.—हकीम फत्ते व हकीम हुमाम, आणि त्यांचा भाऊ कवि नुरुद्दीन हे तिघे बंधु कास्पियन समुद्राच्या कांठीं गिलान येथें राहणारे, त्यांच्या बापाचा तेथें खून होऊन, स. १५७६ त ते अकबराकडे आले. त्यानें त्यांस आश्रय दिला. पैकीं दोघेही हकीम मोठ्या योग्यतेस चढले. अकबराची त्यांजवर फार मर्जी होती. ते अनेक स्वाऱ्यांत व वकिलातींत जात असत. स. १५८७ त हकीम हुमाम तुराणच्या शहाकडे अकबराचा वकील म्हणून गेला होता. तो समीप नसला तर अकबरास जेवण गोड लागत नसे. तो स. १५९६ त मरण पावला. अकबराच्या नवरत्नांत त्याचें नांव आहे.

बदाऊनी.—मुल्ला अब्दुल कादिर बदाऊनी हा दिल्लीनजीक बदाऊन येथें स. १५४०च्या सुमारास जन्मला. लहानपणीं अनेक विद्वानांपाशीं अध्ययन करून तो हुशार व विद्वान झाला. त्याचा आवाज उत्तम असून, गायन, ज्योतिष व इतिहास ह्या विषयांचा त्यास मोठा नाद असे. जलाल-

खान कुडची म्हणून अकबराच्या मर्जींतला एक गृहस्थ होता, त्यानें बदाऊनींची बादशहाशीं मुलाकात करून दिली. ह्याच जलालखानानें तानसेनला दरबारीं आणिलें. शेखमुबारिक, फैजी व अबुल्फज्ल् ह्यांच्या संगतींत बदाऊनी एकसारखा चाळीस वर्षे होता, तथापि त्यांच्या विचारांचें वारें त्यास लागलें नाहीं. धर्मसमजुतींबद्दल तो त्यांचा मनापासून द्वेष करी त्यानें संस्कृत शिकून अकबराच्या हुकुमानें समग्र रामायणाचें व महाभारताच्या कांहीं भागांचे फारशींत भाषांतर केलें. पण त्याचा मुख्य ग्रंथ म्हणजे 'मुन्तखाबुत्तवारीख' म्हणजे अकबराच्या कार्किर्दीचा इतिहास होय. ह्या सुंदर ग्रंथाचा इंग्रजींत तर्जुमा झाला असून, बदाऊनी अकबराचा द्वेष्टा असल्यामुळें, इतर ग्रथांच्या पडताळयास बदाऊनीचा हा मार्मिक ग्रंथ फार उपयोगी पडतो. बदाऊनीचा ग्रंथ अकबराचे कार्किर्दींत बाहेर आला नाहीं. पुढें जहांगीरच्या वेळेस प्रसिद्ध झाला. स. १५९४ च्या सुमारास बदाऊनी मरण पावला. अबुल् फज्लवर बादशहाची कृपा आहे हें बदाऊनीस सहन होत नसे 'बादशहाची कृपा माझ्यापेक्षां अबुल फज्ल्वर ज्यास्त आहे. आपल्या मृदुल स्वभावानें, अपारिमित उद्योगानें, कपटप्रचुर वर्तनानें आणि अमर्याद स्तुतीनें, फज्लनें बादशहाची कृपा संपादन केली तो बादशहाच्या मनाचा कल पाहून वर्तत असे. परंतु मी साधा व दरबारी वागणुकींत अपरिचित असल्यामुळें, मला बादशहाची तब्यत संभाळतां येईना. मला हें काम फारसें आवडत नाहीं; दुसरें मिळेल तर फार चांगलें.' हें लिहिणें जरा द्वेषभावाचें दिसतें. त्या वेळच्या मानानें पाहतां अबुल् फज्ल् मिथ्या स्तुतिपाठक होता असें म्हणतां येत नाहीं. स्वतःच्या कर्तबगारीनेंच तो उच्च पदास चढला. बदाऊनी आपल्या कामांत दक्ष नसे. बादशहाच्या परवानगीशिवाय तो वारंवार गैरहजर राही. अबुल् फज्ल् व फैजी ह्यांस तो मुळींच चाहत नसे, तरी ते दोघे भाऊ त्याच्याशीं अखेरपर्यंत फार ममतेनें वागले. बदाऊनी हा कडवा मुसलमान होता हेंही त्यांच्या वैराचें एक कारण असेल. बदाऊनी हा विद्वान्, बुद्धिमान व स्पष्टवक्ता होता. अकबराजवळ अयोग्य माणसांचा प्रवेश फारसा होत नसे.

बदाऊनीस अकबरानें महाभारताचें भाषांतर करावयास सांगितलें. तें काम करण्याची त्याला हौस नव्हती. तत्संबंधीं त्यानें पुढें लिहिल्याप्रमाणें उद्गार काढिले आहेत. 'खऱ्या मुसलमानानें असलें काम करावें! मीं

एक दोन प्रकरणांचें भाषांतर केलें. त्यांतील बालिश व असंबद्ध प्रलाप ऐकूनही सर्व जगताला आश्चर्य वाटेल! असलीं वचनें कधीं कोणीं ऐकिलीं सुद्धां नसतील! काय म्हणे, निषिद्ध पदार्थांची यादी! पण माझें नशीब केवढें बलवत्तर! माझ्याच कपाळीं असलें काम कां यावें! अबुल् फज्लनें ह्या पुस्तकाची प्रस्तावना लिहिली! ह्या पापापासून अल्लाच आमचें संरक्षण करो!' बदाऊनीनें रामायणाचेंही भाषांतर केलें, त्यास चार वर्षें लागलीं. हें पुस्तक त्यास बरेंच आवडलें होतसें दिसतें; कारण तें तयार झाल्यावर त्याची फारच वाहवा झाली. गोव्याच्या एका क्रिस्तभक्तानें अकबराच्या हुकुमावरून अनेक ग्रीक ग्रंथांचीं भाषान्तरें फारसीभाषेंत केलीं. याशिवाय आणखी पुष्कळ संस्कृत व दुसऱ्या पुस्तकांचे तर्जुमे अकबरानें त्या भाषेत करविले. रोमच्या पोपाकडूनही कित्येक सुंदर ग्रंथ अकबरानें मिळविले होते.

धर्मसंबंधी वादविवाद ज्या सभेंत होत, तींत ३८ शेख म्हणजे आरब-साधु, ६९ विद्वान् पंडित, १५ वैद्य, व १५३ कवि इतकी मंडळी होती, असें बदाऊनीचें म्हणणें आहे. सन १५७८ सालीं अकबराचें बदाऊनीनें खालीं लिहिल्याप्रमाणें वर्णन केलें आहे. 'हा काळपावेतों बादशहा सरळपणानें वागत होता; सत्यान्वेषणाची त्यास उत्कट इच्छा होती. पण अलीकडे त्याचें शिक्षण बरोबर चालत नाहीं; जवळची मंडळी हलकट व नास्तिक असल्यामुळें, त्यास इस्लामाच्या खरेपणाबद्दल संशय वाटूं लागला आहे. अडचणीवर अडचणी येऊं लागल्या. असें होतां होतां त्याचा सत्य शोधून काढण्याचा मूळचा उद्देश सुटला; आणि उत्कृष्ट स्वधर्माचें मजबूद बंधन तुटून जातांच बादशहा बेपर्वा झाला; आणि पांच सहा वर्षांच्या आंत त्याच्या मनांत मुसलमानी धर्माचा लेशही राहिला नाहीं. तेव्हां सर्वच प्रकार वेगळा झाला. सन १५९५त बादशहाचीं मतें इतकीं फिरलीं होतीं, कीं मक्केस जाण्याची कोणीं परवानगी मागितली असतां त्यानें त्यास देहान्त शासन केलें असतें.'

अकबराच्या नवरत्नदरबाराचें एक चित्र सोबत जोडिलें आहे, त्यांत बदाऊनीचें नांव नाहीं; आणि बहरामखानाचें नांव आहे. बहरामचा अंत कारकीर्दीच्या आरंभाच झाला होता. कवींनीं अकबराच्या दरबारास नवरत्नदरबार असें नांव पूर्वसंप्रदायानुसार दिलें असलें

तरी, त्यांत नऊच रत्नें होतीं असें नाहीं. अकबराच्या पदरीं हजारों रत्नें निपजलीं, त्या सर्वांचें वर्णन येथें करणें शक्य नाहीं. एकंदरींत त्या धामधुमीच्या काळांत सुद्धां गुणी व पराक्रमी लोक कसे पुढें येत होते हें वरील चरित्रांवरून दिसून येतें. अशा प्रकारच्या चरित्रांवरून त्या काळच्या घडामोडींची व वस्तुस्थितीची बरीच कल्पना मनांत उभी राहते. मोगल बादशहांचा इतिहास पुष्कळांस ठाऊक आहे म्हणजे त्यांचीं युद्धं व पराक्रम पुष्कळांस कळतात. परंतु तेवढ्यावरून तत्कालीन अंतःस्थितीचें खरें चित्र मनांत उभें राहत नाहीं. तसें चित्र उत्पन्न व्हावें, तत्कालीन स्थितीची थोडीबहुत वास्तविक कल्पना मनांत यावी, एतदर्थ, अनेक पुरुषांचीं चरित्रें व अनेक घडामोडींचीं तपशीलवार वर्णनें, थोडासा पाल्हाळ करूनही, मुद्दाम वर दिलीं आहेत. त्यावरून इतिहासांत केवळ राजकीय घडामोडीचाच नव्हे, तर मानवी चरित्राच्या सर्वांगांचा समावेश कसा झाला पाहिजे हें कळून येईल.

अकबराच्या कारकिर्दीवर इतकें वाङ्मय उपलब्ध आहे, कीं हजार पांचशें पानांचा स्वतंत्र ग्रंथ त्याजवर लिहिला, तरी विषय समाप्त होणार नाहीं. स्वतंत्र पुस्तकांतून व मासिक पुस्तकांतून नानाविध प्रश्नांची चर्चा झाली आहे व अजूनही होत आहे. इंडियनवर्ल्ड, मॉडर्न रिव्ह्यू, हिंदुस्थान रिव्ह्यू, ईस्ट ॲन्ड वेस्ट इत्यादिकांत उपयुक्त चर्चा आहे. अशा माहितीचा गोषवारा जितका घेतां आला तितका येथें घेतला आहे. ऐने-अकबरींत ४१५ मनसबदारांचीं चरित्रें दिलेलीं आहेत. त्यांत हिंदु लोक ५१ आहेत. बहुतेक मंडळी इराण, आरबस्तान वगैरे देशांतून अकबराच्या दरबारीं येत असत आणि त्यांचा गौरव होत असे. हिंदूंची भरती पुढें शहाजहानच्या वेळेस बरीच कमी होऊं लागली. अकबराच्या मनसबदारांत हिंदुस्थानांतले मुसलमानही फारच थोडे होते. एकंदरींत त्याच्या वेळेस परदेशी मुसलमानांचा भरणा हिंदुस्थानांत अतिशयच झाला. अबुल् फज्ल् म्हणतो, दररोज कोणी नवीन इसम येऊन त्यास मनसब मिळाली नाहीं, अथवा बक्षिसें, नोकरी वगैरे मिळून लोकांचा संतोष झाला नाहीं, असा एकही दिवस जात नसे. मोगल बादशहाच्या सारखें ऐश्वर्य, अकबरासारखा पुरस्कर्ता, मुसलमानांसारखे ताज्या दमाचे व पराक्रमी लोक, असा सर्व योग जमल्यावर त्या काळचा भाग्योदय काय वर्णावा! त्याची

केवळ कल्पनाच केली पाहिजे. वर जीं चरित्रें दिलीं आहेत, त्यांजवरून व विशेषत: अबुल् फज्ल् सारख्यांच्या उदाहरणावरून, गुणिजनांची संभावना त्या वेळीं कशी होई, आणि हरएक गुण व कसब नांवारूपास येण्यास त्या वेळीं केवढा आश्रय मिळे, ह्याची कल्पना करितां येते. हिंदुस्थानदेशाची समृद्धि अपूर्व होती; आणि राजा परकी असूनही स्वदेशांत राहणारा असला म्हणजे लोकसंग्रहाच्या व गुणोत्कर्षाच्या कामीं त्याजकडून केवढें साह्य मिळे हें अकबराच्या उदाहरणावरून व्यक्त होतें.

सर्व सूत्रचालक व सर्वाधिकारी असा एक धनी आपणांवर आहे, त्याजकडे धांवत जाऊन दाद मागतां येते, त्याला आपला गुण दाखवून त्याचें चीज करून घेतां येतें, अशा प्रकारची भावना प्रत्येक प्रजाजनाच्या मनांत उत्पन्न होऊन, अकबराच्या वेळेस नवीन मन्वंतर सुरू झालें. नुसत्या हिंदुस्थानांतूनच नव्हे, तर पृथ्वीवरील दूरदूरच्या भागांतून गुणिजन दरबारांत येऊं लागले. त्यांचा तेथें उत्कृष्ट परामर्ष घेतला जाई; आणि त्यांच्या गुणांचा तेथें विकास होई. येणेंकरून हरएक सद्गुण, कसब व हुन्नर ह्यांचा परिपोष होऊन, मोगल बादशाहांचा जो लौकिक सुरू झाला, तो अद्यापि सर्व जगभर दुमदुमत आहे.

अकबराच्या तीन दायांचीं नांवें प्रसिद्ध आहेत. झैनखानाची आई पीछाजान अनागा, आदमखानाची आई महाम अनागा, आणि अझमखानाची आई जिजी अनागा. ह्या सर्व बायांचा मान मोठा असून त्यांच्या मुलांस मोठमोठीं कामें मिळालीं. त्यांत शेवटच्या बाईवर अकबराची विशेष भक्ति होती. बहरामखान, मुनियमखान, आदगाखान, बहादूरखान, ख्वाजाजहान, खानखानान, आणि मीर्झा अझम कोका इतके इसम अकबराचे वजीर होते. वरच्यांशिवाय अथर्वण, लीलावती, जातक, हरिवंश, आणि नलदमयंती, ह्या ग्रंथांचीं अकबरानें फारशी भाषांतरें करविलीं. अबुल् फज्ल् व बदाऊनी यांच्या ग्रंथाखेरीज, मासिरी-रहिमी, निजामुद्दीनचा तबकाती-अकबरी; आणि पुष्कळ विद्वानांनीं तयार केलेला तारिखी आल्फी, हे फारशी इतिहास अकबराच्या कारकिर्दीचे उपलब्ध आहेत.

प्रकरण चोविसावें.

नुरुद्दीन महंमद सलीम ऊर्फ जहांगीर.

स. १६०५–१६२७.

१. राज्यारोहण. २. जहांगीरचीं बायकामुलें, खुस्रू.
३. रजपुतांशीं युद्ध (स. १६०८–१४). ४. नूर-जहान, इराणी वळण.
५. दक्षिणतील भानगडी. ६. जहांगीर बादशहा व इंग्रज लोक.
७. अखेरच्या घालमेली (१६२३–२७). (अ) हॉकिन्स, (आ) सर टी रो.
८. जहांगीरची योग्यता. ९ जहांगीरचा जीवनक्रम
१०. जहांगीरचीं धर्मसंबंधीं मतें. ११. जहांगीरची राज्यव्यवस्था.
१२. जहांगीरच्या स्वारीचा थाट.

१. राज्यारोहण.—अकबराच्या मृत्यूनंतर थोड्याच दिवसांनीं, त्याचा वडील मुलगा सलीम हा 'जहांगीर' म्हणजे 'जगज्जेता' असें नांव धारण करून आग्रा येथें बादशाही तख्तावर विराजमान झाला. अकबर व जहांगीर ह्यांच्या स्वभावांत महदंतर होतें. अकबराच्या सद्गुणांचा जहांगीरच्या अंगीं लेशही नसून, अकबराचे दोष मात्र त्याच्या ठायीं भरपूर उतरले होते शिवाय त्याच्यांत आणखी दुर्गुण होते, ते वेगळेच. तो विषयासक्त, निष्ठुर, स्वच्छंदी स्वार्थसाधु व बालिश असा होता. तथापि अकबरानें बांधून दिलेली राज्यव्यवस्था त्यानें बदलली नाहीं, म्हणून त्याची कारकीर्द एकंदरींत शांततेची व सुखाची गेली. जहांगीरच्या वेळेस इंग्लंडांत पहिला जेम्स् व फ्रान्सांत तेरावा व चौदावा लुई हे राजे राज्य करीत होते. त्यांच्याशीं तुलना करून पाहिली असतां जहांगीर कमी योग्यतेचा ठरत नाहीं.

सिंहासनावर बसल्याबरोबर जहांगीर बादशहानें रयतेच्या सुखाकरितां बारा फर्मानें काढिलीं, तीं त्यानेंच आपल्या हकीकतींत लिहून ठेविलीं आहेत, तीं अशीं:—

(१) जमीनदार लोक आपल्या हद्दींतील रयतेपासून स्टांपाचे व जकातीचे कर घेत असत, ते बंद करावे. (२) प्रवासी लोकांच्या चोऱ्या

होत व दरवडे पडत ते बंद करून, त्यांजकरितां रस्त्यांवर ठिकठिकाणीं धर्मशाळा व विहिरी बांधाव्या. (३) व्यापारी लोकांचा माल रस्त्यांत कधींही उघडून पाहू नये. तसेंच कोणी इसम मरण पावल्यावर त्यास वारस नसल्यास त्याची जिंदगी सरकारांत जमा होत असे, तो प्रघात बंद करून, वारस नच मिळाल्यास, अशी निवारसी जिंदगी लोकोपयोगी कामांत खर्च करावी. (४) राज्यांत मद्य तयार करूं नये व तें विकूं नये. (स्वतः बादशहानें आपल्या मद्यप्राशनाची व तत्संबंधीं घेतलेल्या खबरदारीची हकीकत या लगत दिली आहे.) (५) सरकारी नोकरांनीं किंवा इतरांनीं दुसऱ्यांचीं घरें आपल्या उपयोगासाठीं घेऊं नयेत; आणि राज्यांत गुन्हेगाराचे नाककान कापण्याच्या शिक्षा सर्वथा मना करण्यांत याव्या. (६) जमीनदारांनीं अगर सरकारी नोकरांनीं रयतेच्या जमिनी त्यांजपासून आपल्या लागवडीस घेऊं नयेत. (७) प्रत्येक मोठमोठ्या शहरीं रोग्यांच्या सोयीसाठीं इस्पितळें बांधून, त्यांच्या औषधपाण्याची तजवीज करण्यांत यावी. (८) माझ्या जन्मदिवसापासून वयाच्या वर्षी-इतके दिवस, व प्रत्येक गुरुवार व रविवार ह्या दिवशीं राज्यांत कोणत्याही प्रकारचा पशुवध होऊं नये (९) दररविवारीं सूर्योपासना करण्यांत यावी. (१०) फाजताल व खासगीकडील सर्व नोकरांचे पगार सवाईपासून दुपटीपर्यंत वाढविण्यांत यावे. (११) वतनदारांचीं सर्व वतनें त्यांज-कडे बिनतक्रार चालविण्यांत येतील; (१२) किल्ल्यांतून व तुरुंगांतून फार दिवसांचे कैदी पडून राहिले आहेत, ते सोडून द्यावे.

अशा प्रकारच्या आरंभीं केलेल्या कित्येक कृत्यांवरून जहांगीर हा बापा-सारखाच प्रजापालनदक्ष निघेल असें लोकांस वाटलें. बापाच्या वेळचे सर्व अनुभवक कामदार त्यानें कायम ठेविले जकात घेण्याच्या नियमांत त्यानें अनेक उपयुक्त फेरफार केले; आणि सर्व प्रकारच्या अर्ज-दारांची बादशहापर्यंत वाटेल तेव्हां दाद लागावी म्हणून सुवर्णघंटेची योजना केली आपल्या महालांतून एक सोन्याची सांखळी बाहेरपर्यंत त्यानें ठेवावली. तास साठ घंटा अडकविलेल्या हाल्या. बाहेरून ती सांखळी ओढतांच सर्व घंटा वाजत आणि बादशहाकडे अर्जदाराची ताबडतोब दाद लागे. बाह्यात्कारी मसलमानी धर्माविषयीं त्यानें आपली निष्ठा प्रद-र्शित केली, त्यामुळे मसलमानी प्रजेस विशेष समाधान वाटलें. मद्य, अफू

वगैरे मादक पदार्थांचें सेवन करूं नये, असा त्यानें कायदा केला. ह्या कृत्यांनीं जहांगीरची कारकीर्द सुखावह होईल, असा लोकांस भरवसा वाटला.

ह्या कारकिर्दीची हकीकत अनेक पाश्चात्य प्रवाशांनीं लिहून ठेविली आहे. जहांगीरच्या पूर्वीच्या कालाविषयीं मुसलमान ग्रंथकाराच्या एकतर्फी माहितीवर अवलंबून राहवें लागतें, तसा प्रकार ह्या पुढील कालासंबंधानें नाहीं. सर टॉमस रो, फादर काटू, कॅप्टिन हॉकिन्स वगैरे गृहस्थांनीं मोगल बादशहांच्या लिहून ठेविलेल्या हकीकती वाचण्यालायक आहेत.

७. जहांगीरचीं बायका मुलें, शहाजादा खुस्रू.—जहांगीरची पहिली **बायको**—जोधपूरच्या राजाची मुलगी जोधाबाई* इचें लग्न १५८४ त झालें; हिला मुलें दोन, १ सुलतानुन्निसा बेगम, २ शहाजादा खुस्रू. **दुसरी बायको** बिकानेरचा राय रायसिंगची मुलगी. **तिसरी बायको**—राजा मालदेवचा मुलगा उदयसिंग ह्याची मुलगी, हिचें नांव जगद्गोशायिनी; हिला मुलगा एक, शहाजादा खुर्रम्; हिचा मृत्यु १६१९. **चौथी बायको**—ख्वाजा हसनची मुलगी, हिचा मुलगा पर्वीझ. ही स. १५९८ त मेली. **पांचवी बायको**—राठोड राजा केशवदासची मुलगी; हिला मुलगी एक बहार बानू बेगम. **सहावी व सातवी** (नांवें उपलब्ध नाहींत), मुलगे दोन, जहांदर व शहर्यार. **आठवी बायको**—छोटातिबेटचा राजा अलीराय ह्याची मुलगी. **नववी** राजा मानसिंगाची नात. **दहावी** मिहरुन्निसाखानम् ऊर्फ नूरमहाल, अथवा इतिहासप्रसिद्ध नूरजहान. मूल नाहीं. जहांगीरचें वजन ६५१४ तोळे म्हणजे ६२ पौंड होतें.

ह्यांशिवाय आणखी दहा बायकांचीं नांवें ब्लॉकूमननें दिलीं आहेत. त्यांत जसलमीरच्या रावळची मुलगी, आणि रामचंद बुंदेल्याची मुलगी, ह्या दोन रजपूत आहेत. खुस्रू, पर्वीझ, खुर्रम् शहर्यार हे चार मुलगे प्रसिद्ध आहेत वडील खुस्रू याचें वैर बापाचें कधीं जुळलें नाहीं. पर्वीझ हा मद्यपानांत निमग्न असे. ह्या दुर्व्यसनानें मोगल घराण्याचा पुष्कळ नाश झाला. प्रत्यक्ष जहांगीरचा थोरपणा बाहेर न पडण्यासही हाच दुर्गुण कारण झाला. पर्वीझ हा दुर्बुद्ध व गर्विष्ठ होता. दक्षिणेंतील फौजेचें आधिपत्य त्याजकडे असून तो खानखानानच्या हातांत बाहुल्यासारखा होता.

---

* एने अकबरी—ब्लॉकूमन—पु. १ पृ. ६१९.

खुर्रम् हाच पुढें प्रसिद्धीस आलेला शहाजहान होय. तो मोठा धूर्त व तीव्र बुद्धीचा होता. त्याची महत्त्वाकांक्षा फार जबर असून ती सिद्धीस जाण्यास लागणारें प्रसंगानुसार वर्तन, चलाखी, कावेबाजपणा वगैरे गुण त्याच्यांत भरपूर होते. पर्वीझसारखा त्यास मद्यपानाचा नाद नव्हता, तरी त्यास इतर ख्यालीखुशाली आवडे. राज्यपदप्राप्तीवर त्याची सारखी नजर होती. त्यानें राज्यांत पुष्कळ उलाढाली केल्या. शह्यारचें नांव विशेष महत्त्वाचें नाहीं. कार्किर्दीच्या अखेरीस जे बखेडे झाले, त्यांत त्याचें थोडेंसें अंग होतें.

वडील मुलगा खुस्रू याची हकीकत प्रस्तुत विशेष महत्त्वाची आहे. जहांगीर तख्तनशीन झाल्यावर सहा महिन्यांतच खुस्रूनें बापाविरुद्ध बंडाळी चालविली अकबराच्या दरबारीं रजपूत व मुसलमान असे दोन तट नेहमीं असत. अकबराच्या करड्या नजरेपुढें ह्या दोन तटां-मधील द्वेषभाव बाहेर दिसत नव्हता. आपल्या पाठीमागें खुस्रूनें राज्यपद घ्यावें अशी अकबराची इच्छा होती. रजपूत पक्षानें त्यास साह्य देऊन जहांगिरास तख्तावरून काढण्याचा विचार चालविला. खुस्रूचा कल क्रिस्ती धर्माकडे होता. कधीं ना कधीं जहांगीर आपले डोळे काढील किंवा प्राण घेईल अशी त्यास दहशत होती. म्हणून आग्रा सोडून तो पंजाबाकडे पळून गेला. तेथें त्यास पुष्कळ लोक येऊन मिळाले. त्यानें लाहोरास वेढा घातला; परंतु किल्ला त्याच्या हस्तगत झाला नाहीं. जहांगीरनें लगेच त्याचा पाठलाग चालविला. बादशाही फौजेपुढें त्याचा निभाव न लागून तो हुमायूनप्रमाणें इराणांत जाण्याचे इराद्यानें पळून जात असतां, जहांगीरच्या लोकांनीं झेलम नदींत त्यास नावेंत पकडून बापासमोर आणिलें. जहांगीरनें त्याच्या साथीदारांस पक-डून अत्यंत क्रूर शिक्षा दिल्या. शेकडों लोकांस हत्तीच्या पायांखालीं देऊन, व जिवंत सोलून किंवा नदींत बुडवून ठार मारिलें. दरवाजा-बाहेर सुळांची रांग उभारून सातशें लोकांस त्यांजवर चढविलें. त्यांचीं दुःखें पाहून खुस्रूस शरम वाटून दहशत बसावी, म्हणून जहांगीरनें त्यास त्या सुळांच्या रांगांसमोरून फिरविलें. त्यास जहांगीरनें जीवदान दिलें, तरी त्याला जन्मभर बंदिखान्यांत ठेविलें. त्याचें बहुतेक आयुष्य याच बंदिखान्यांत गेलें. अनाराय नामक रजपूत सरदार खुस्रूवर देखरेख

ठेवण्यास नेमिलेला होता. नम्रतेनें वागून बापाची मर्जी आपण पुनरपि संपादन करूं अशी खुस्रूस आशा होती. बंदिखान्यांत पडल्यापासून तो सर्वांस आवडूं लागला. खुस्रूला दोन बायका होत्या, एक अझमखान कोकाची मुलगी, व दुसरी मीर्झा मुज्फरहुसेनची मुलगी. त्यास मुलगे तीन व एक मुलगी झाली. पहिला मुलगा बुलंद अख्तार लहानपणींच मेला; दुसरा दावरबक्ष ऊर्फ बुलकी; व तिसरा गर्सास्प. मुलीचें नांव होरमंदबानू बेगम ही दानियालचा मुलगा होशंग ह्यास दिलेली होती. पर्वीझ ह्यास एकच मुलगी असून ती दाराशखो ह्यास दिलेली होती.

नूरजहान व तिचा भाऊ आसफ्खान यांच्या मनांतून खुस्रूची वाट लावावी असें होतें. आसफ्खानाची मुलगी मुम्ताजमहल ही जहांगीरचा मुलगा खुर्रम् यास दिलेली होती; तेव्हां खुर्रम् यास जहांगीरच्या पश्चात् बादशाही तख्त मिळावें अशी खटपट नूरजहान व आसफ्खान यांनीं चालविली. एके दिवशीं बादशहा मद्यपानानें गुंग होऊन पडला असतां, अनाराय यास काढून त्याच्या ठिकाणीं आसफ्खान यास खुस्रूवर देखरेख ठेवण्यास नेमावें, अशी नूरजहाननें बादशहास विनंती केली. त्याच रात्रीं अनारायकडे जाऊन, खुस्रूस आपल्या ताब्यांत देण्याची बादशहाची आज्ञा झाली आहे, असें आसफ्खान सांगूं लागला. अनारायनें त्याचें म्हणणें नाकबूल केलें. 'बादशहानें खुस्रूस माझ्या ताब्यांत दिलें आहे; त्यास मी बादशहाला परत देईन, दुसऱ्या कोणास देणार नाहीं,' असा सणसणीत जबाब आसफ्खानास मिळाल्यावर तो निरुत्तर झाला. दुसऱ्या दिवशीं अनारायनें रात्रीं घडलेला प्रकार बादशहास कळविला. त्यावर जहांगीरनें अनारायची फारच तारीफ केली, आणि अशाच प्रकारें नोकरी बजाविण्याविषयीं त्यास सांगितलें. पुनः सात दिवसांनीं नूरजहाननें बादशहाजवळ ती गोष्ट काढिली. ह्या वेळीं अनारायास बादशहानें हुकूम दिला, कीं खुस्रूस आसफ्खानाच्या स्वाधीन करावें. तेव्हां प्रत्येकाला वाटलें कीं खुस्रूचे दिवस भरले. आसफ्खान खुस्रूस आपल्या ताब्यांत घेण्यास गेला असतां, त्याची बहीण व इतर बाया यांनीं जनानखान्यांत रडून आकांत केला. त्यांनीं खाणेंपिणें सुद्धां सोडिलें. 'खुस्रूचा वध होईल, तर आपण आत्महत्या करूं,' असें त्यांनीं कळविलें. जहांगीरनें त्यांची नाना प्रकारें समजूत केली, कीं

NATIONAL ARCHIVES OF INDIA

खुस्रूच्या जिवास अपाय होणार नाहीं. त्यानें नूरजहानला त्यांचें समाधान करण्यास पाठविलें. परंतु त्यांनीं शिव्यागाळी करून, नूरजहानची भेट घेतली नाहीं. बादशहाच्या दरबारीं आलेले इंग्रज लोक हा प्रकार लक्षपूर्वक अवलोकन करीत होते. खुस्रूस राज्य प्राप्त झालें, तर तो क्रिस्ती लोकांस मान देईल; खुर्रम् यास तें प्राप्त झालें, तर तो क्रिस्ती लोकांचें नुकसान करील; असा सुमार होता. पुढें कांहीं वर्षांनीं जहांगीर बादशहा सर्व लवाजम्यानिशीं मांडवगडास गेला; निघतांना खुस्रूची भेट घेऊन त्यास त्यानें आपणाबरोबर घेतलें. तेव्हां खुस्रूच्या शत्रूंचीं तोंडें कांहीं दिवस बंद झालीं. रस्त्यांत इंग्रजांचा वकील सर टामस रो व खुस्रू यांचा भेट झाली. दरबारच्या भानगडी खुस्रूस कांहींच कळत नव्हत्या असें त्या भेटींत दिसून आलें.

कांहीं दिवसांनीं नूरजहानचा खुस्रूवरील राग कमी झाला. खुर्रमनें बादशाहीचा प्रसिद्ध सरदार खानखानान ह्याच्या नातीशीं लग्न लाविलें. आपली भाची मुमूताज महल् ही एक बायको असतां खुर्रमनें दुसरें लग्न केलें, ही गोष्ट नूरजहानला आवडली नाहीं. बादशहाचीही अलीकडे खुस्रूवर मर्जी बसली होती. नूरजहानची पहिल्या नवऱ्यापासून झालेली एक मुलगी होती, ती खुस्रूस देऊन त्याबरोबर सख्य करण्याचा तिनें घाट घातला. हा बेत खुस्रूस आवडला नाहीं. खुस्रूची आपल्या बायकोवर अत्यंत मर्जी होती. त्यास कोणतेंही व्यसन नव्हतें, म्हणून अकबराच्या वेळेपासून त्याजवर सर्व लोकांची व विशेषतः रजपुतांची विशेष भक्ति असे. त्याचा सासरा अझमखान यास अकबराचा नवीन धर्म न आवडून तो मक्केस जाऊन राहिला होता. परंतु त्या पवित्र ठिकाणीं त्याची मुसल्मानी धर्मावरील भक्ति उडाली, आणि तो परत येऊन अकबराच्या नवीन धर्मांत सामील झाला. त्याच्या मुलीचा स्वभावही त्याच्याच सारखा होता. तिच्या प्रीतीस्तव खुस्रूनें नूरजहानच्या मुलीशीं लग्न करण्याचें नाकबूल केलें. ह्या त्याच्या नाकबुलीनें त्यानें होऊनच आपला जीव धोक्यांत घातला. त्याची राज्यप्राप्तीची आशाही लयास गेली. नूरजहानचें मन दुखविणें हें काम सामान्य नव्हतें. खुस्रूच्या बायकोनेंही नुरजहानच्या मुलीशीं लग्न करून तिची प्रीति संपादन करण्याविषयीं त्यास पुष्कळ सांगितलें; पण त्या पत्नीनिष्ठ राजपुत्रानें तें मानिलें नाहीं.

पुढें जेव्हां जहांगीरचा अंतकाळ समीप आला असें लोकांस वाटून पुढील व्यवस्थेबद्दल दरबारीं कलह सुरू झाले, तेव्हां नूरजहान आपली मुलगी शहर्यार यास देऊं करून, त्यास राज्य मिळवून देण्याच्या खटपटीस लागली. तीनही राजपुत्रांचा नाश करण्याचा तिनें उद्योग चालविला. त्या वेळेस दक्षिणेंत युद्धप्रसंग चालू होते, ते मोडण्यासाठीं खुर्रम्‌ची रवानगी तिकडे झाली. मागें बादशहाचा काळ झाल्यास खुस्रू त्याच्याजवळ असूं नये ह्या इराद्यानें त्यास खुर्रम्‌नें आपणाबरोबर दक्षिणेंत बऱ्हाणपूर येथें नेलें. नूरजहाननें ह्या गोष्टीस कांहीं हरकत केली नाहीं. बादशहा आजारी पडल्याची बातमी खुर्रम् यास बऱ्हाणपुरास पोंचली. एके दिवशीं आजारीपणाचें ढोंग करून शहाजहान छावणी सोडून दूर गेला असतां, मागें खानखानानच्या हुकुमानें खुस्रूचा खून झाला. बऱ्हाणपुरास आल्यावर भावाच्या मृत्यूचें वर्तमान शहाजहानास समजलें, तेव्हां त्यानें आपणास अत्यंत दुःख झालें असें दाखविलें. येणेंप्रमाणें मोगल घराण्यांतील एका अत्यंत होतकरू व सुशील राजपुत्राचा खून झाला. तेणेंकरून बादशाहीचें फार नुकसान झालें. तिकडे जहांगीर दुखण्यांतून बरा झाला, आणि खुस्रूच्या वधाची बातमी त्यास समजली. तेव्हां खुस्रूची बायको व एकुलता एक मुलगा बुलकी यांस त्यानें आपल्या जवळ आणविलें; आणि त्या दुःखाच्या आवेशांत आपल्या पश्चात् बुलकीस राज्य मिळावें असें ठरविलें.

३. रजपुतांशीं युद्ध, (स. १६०८–१६१४).—जयपूर व मारवाड येथील राजांशीं जहांगीरचा स्नेह होता. उदेपूरच्या राजाशीं मात्र त्यास युद्ध करावें लागलें. ह्या युद्धाची संक्षिप्त हकीकत त्या घराण्याच्या इतिहासांत आली आहे. अकबर मरण पावला, त्या वेळेस राणा अमरसिंह उदेपुरास राज्य करीत होता. हा स्वभावानें चैनी व विलासी असल्यामुळें, मोगलांशीं टक्कर देण्याचें त्याचें काम ढिलें पडलें. ही गोष्ट उदेपूरच्या कित्येक स्वामिभक्त सरदारांस रुचली नाहीं. सालुंब्र्याचा ठाकूर एके दिवशीं अमरसिंहाच्या महालांत शिरला. तेथें त्यानें राण्याचे विलासाचे सर्व प्रकार अवलोकन केले, ते त्यास सहन न होऊन त्यानें तेथील मोठ्या आरशावर दगड मारून तो फोडून टाकिला, आणि राण्याजवळ जाऊन त्यास सिंहासनावरून खालीं ओढिलें. नंतर तो भोंव-

३७–३१–१०—१०–७९१–२०००

तालच्या सरदारांस म्हणाला. 'सरदार लोक हो, बघतां काय? घोड्यावर स्वार व्हा, आणि प्रतापसिंहाच्या ह्या मुलाची जी लोकांमध्यें बदनामी होत आहे, तिजपासून त्याचें संरक्षण करा!' ह्या कृत्यानें राणा अमरसिंह शुद्धीवर आला, आणि त्यानें लागलेंच आपलें आलस्य टाकून युद्धाची कडेकोट तयारी केली. उदेपूरच्या घराण्यानें अद्यापपर्यंत मोगलांचें स्वामित्व कबूल केलें नव्हतें. त्याची खोड मोडण्यासाठीं जहांगीर बादशानें चांगली तयारी केली. सन १६०८त बादशाहानें आपली फौज वजीर खानखानानचा भाऊ अब्दुल्ला याच्या हाताखालीं देऊन त्यास उदेपुरावर चाल करून जाण्यास सांगितलें. दिवेर येथें रजपुतांनीं या फौजेचा पराभव केला. पुनः १६१०त अब्दुल्लाची व रजपुतांची राणापूर नामक क्षेत्रांत दुसरी लढाई होऊन रजपुतांस विजय प्राप्त झाला. परंतु ह्या लढाईत अनेक नामांकित रजपूत सरदार पतन पावले, व भयंकर रक्तपात झाला. ह्या पराभवाचें वर्तमान ऐकून जहांगीर बादशहा फार अस्वस्थ झाला. अमरसिंहाची खोड मोडण्याकरितां चितोड येथें संग्रामसिंह उर्फ संग्राजी ह्यास त्यानें गादीवर बसविलें. परंतु मेवाडांतील रणशूर योद्ध्यांच्या शौर्यवीर्यादि गुणांचीं अनेक मूर्तिमंत चिन्हें आपल्या सभोंवार पाहून, त्यास आपल्या विश्वासघाताची शरम वाटली. त्यानें राज्यत्याग केल्यामुळें पुढें जहांगीरनें त्याची अप्रतिष्ठा केली, तेव्हां त्यानें आपल्या पोटांत कट्यार भोसकून प्राणत्याग केला. दिल्लीच्या दरबारांत प्रसिद्धीस आलेला महाबतखान ह्या संग्राजीचा मुलगा होय.

सर्व उपाय हरले असें पाहून जहांगीर स्वतः फौजेची तयारी करून अजमिरास आला; आणि तेथून शहाजादा पर्वीझ् ह्यास त्यानें मेवाडांत पाठविलें. त्या वेळीं खामनेरच्या बारींत मोगल व रजपूत यांची कड्याक्याची लढाई होऊन पुनरपि मोगलांचा पराभव झाला. ह्या लढाईनें मेवाडचें वैभव फार वाढलें. जहांगीरनें पर्वीझ् यास परत बोलावून महाबतखानास रजपुतान्यांत ठेविलें, आणि मागाहून शहाजदा खुर्रम् यासही तिकडे पाठविलें. इकडे राणा अमरसिंह यानें आपला पुत्र कर्ण याजला मोगलांशीं सामना करण्यास पाठविलें. खुर्रम् ह्यानें रजपुतांस जेरीस आणून तह करण्यास लाविलें, (सन १६१३). राजपुत्र कर्ण बादशहास शरण गेला, आणि त्यास बादशाही फौजेंत मनसबदारी मिळाली, (सन १६१४).

जहांगीरनें कर्णाला मोठ्या सन्मानानें आणि ममतेनें वागविलें. ह्याजबद्दलची कच्ची हकीकत बादशहानें आपल्या रोजनिशींत सविस्तर लिहून ठेविली आहे. येणेंप्रमाणें रजपुतान्यांतील युद्धाचा तूर्त शेवट झाला.

४. नूर-जहान, इराणी वळण, (सन१५७६-१६४५).—जहांगीर बादशहाच्या कार्किर्दीत नूरजहानचा वृत्तान्त विशेष महत्त्वाचा आहे. मोगल बादशाहीच्या अमदानींत हिंदुस्थानची भरभराट होती, ह्याचा अर्थ, मोठमोठ्या नोकऱ्या, जहागिरी किंवा अधिकाराचीं कामें येथच्या लोकांसच मिळत गेलीं असा नाहीं. ह्या बाबतींत सरकारचा आश्रय बहुधा परदेशस्थांस मिळाला. परंतु बादशहा, त्याचे नातेवाईक व परदेशांहून आश्रयाकरितां देशांत आलेलीं अनेक मुसलमान कुटुंबें, ह्या देशांत येऊन निरनिराळ्या ठिकाणीं कायमचेंच वास्तव्य करून राहूं लागलीं, त्यामुळें अप्रत्यक्ष रीतीनें देशांतील लोकांचा फायदा पुष्कळ झाला. उद्योगधंदे, कसबें व हुन्नर ह्यांची वृद्धि होऊन, कामकरी लोकांस निर्वाहाचें साधन सुलभ झालें; देशांत संपत्ति खेळूं लागली, आणि प्रत्येक कलेस आश्रय मिळून ती ऊर्जितदशेस आली. बाहेरून येथें येऊन निर्वाह करणाऱ्या मुसलमानांची संख्या जरी अतोनात वाढली, तरी त्यांच्या गरजांचा व ऐषआरामाचा फायदा येथील लोकांसच मिळाला. राज्यकर्ते परकी व स्वजातीचे पक्षपाती असले, तरी ते येथेंच येऊन राहिल्यामुळें, उभयतांचें कल्याण झालें. त्यांच्या चैनीसाठीं येथील लोकांस सुस्थितींत ठेवण्याची त्यांस आवश्यकता वाटून, उलट पक्षीं, येथील लोकांस भरपूर काम मिळालें. अशा ह्या परस्परापेक्षेनेंच मुसलमानांचा परकी अंमल हिंदी लोकांस जाचक झाला नाहीं.

अफगाणांचा पाडाव करण्यासाठीं अकबरानें रजपुतांचीं मनें सांभाळिलीं. सुमारें पन्नासपाऊणशें वर्षें ह्या रजपुतांचें व एकंदर हिंदु रीतीभातींचें वजन रियासतींत बरेंच वाढलें. परंतु जहांगीरच्या अखेरीस हा प्रकार बहुतेक बदलला. अनेक शियाधर्मी इराणी कुटुंबें दरबारीं येऊन त्यांचें माहात्म्य वाढलें. बादशहांचा त्यांजवर दाब न बसतां, उलट त्यांनींच बादशहावर व दरबारावर आपला पडगा बसविला. हा प्रकार वाढतां वाढतां औरंगजेबाच्या वेळेस एतद्देशीयांचें वजन बहुतेक नाहीसें

झालें. ह्याच प्रकार शिल्पकलेंत व बांधकामांतही दिसून येतो, हें अकबराची शिकंदरा येथील कबर व आग्र्याचा ताजमहाल ह्या इमारतींच्या तुलनेवरून व्यक्त होईल. असो. दरबारांत इराणी वळण वाढविणारीं जीं नवीन कुटुंबें ह्या देशांत आलीं, त्यांत नूरजहानचें कुटुंब विशेष प्रसिद्ध असून, त्या एका कुटुंबाच्या मासलेवाईक हकीकतीवरून, वरील सामान्य विधानें ज्यास्त स्पष्ट होतील.

खुरासानच्या सुलतानापाशीं ख्वाजा महंमद शरीफ नांवाचा वजीर होता. तो शियाधर्मी व विद्वान् असून कवि होता. इराणचा शहा तह्मास्प् ह्यानें त्यास यज्द् प्रांताचा कारभार दिला. तो सन १५७६ त मरण पावला. त्याचे दोघे भाऊही इराणांत त्याच्या सारखेच मोठमोठ्या अधिकारांवर होते. सारांश, इराणच्या रियासतींत हें कुटुंब नामांकित होतें. महंमद शरीफचा एक मुलगा होता त्याचें नांव घ्यासबेग. हा घ्यासबेग नूरजहानचा बाप होय. त्यास मीर्झा घ्यासुउद्दीन महंमद असेंही म्हणत. पाश्चात्य ग्रंथकार त्यास अयाझ हें नांव देतात. घ्यासबेगची बायको एका थोर कुळांतली होती. बाप मरण पावल्यावर त्यास कष्टदशा प्राप्त झाली, तेव्हां आपले दोन मुलगे व एक मुलगी बरोबर घेऊन बायकोसह तो इराणांतून पळून गेला. रस्त्यांत त्यांस दरोडेखोरांनीं लुटलें, तेव्हां फक्त दोन खेचरें त्यांजपाशीं राहिलीं, त्यांजवर ते आळीपाळीनें बसत. कंदाहार येथें पोंचल्यावर त्याची बायको प्रसूत होऊन(१५७६) मुलगी झाली, तिचें नांव ' मिहरुन्निसा (=स्त्रियांमध्यें सूर्य). हीच नूरजहान होय. तिच्या बापाची स्थिति त्यावेळेस इतकी कष्टप्रद होती, कीं तिला रस्त्यात सोडून तो तसाच अडचणींतून प्रवास करीत असतां, मलीकमसूद नांवाच्या एका व्यापाऱ्याची व त्याची गांठ पडली. हा व्यापारी अकबराचे ओळखीचा होता. त्याचा तांडा हिंदुस्थानास येत होता, त्याजबरोबर घ्यासबेगही इकडे आला. फत्तेपूर-शिक्री येथें तो अकबरास भेटला, तेव्हां त्यास बादशहानें लहानशी मनसब दिली, आणि पुढें त्यास काबुलांत वसुलाच्या कामावर नेमिलें. घ्यासबेगच्या बायकोचें वाड्यांत जाणें येणें असे. बरोबर तिची मुलगी जाई. नूरजहानची आई गुणसंपन्न होती तशीच मुलगीही निघाली. तिला चित्रें व कशिदा काढण्याचा नाद असे. ती फारशी भाषेंत कवनें करी. जहांगीर तख्तावर आल्यावर त्यानें घ्यासबेग ह्यास इतिमाद्दुद्दौला ही

पदवी दिली. त्याचा मुलगा महंमद शरीफ हा खुसूस सामील आहे असा संशय आल्यावरून, त्यास जहांगीरनें ठार मारून, बापास कैदेंत ठेविलें.

जहांगीरची पहिली बायको खुस्रूची आई इनें विष खाऊन प्राण दिला, हें मागें आलेंच आहे. तिजवर जहांगीरची मर्जी विशेष होती. जहांगीर म्हणतो 'तिच्या गुणांचें वर्णन किती करावें! तिची मजवर इतकी प्रीति होती, कीं माझ्या एका केंसावरून तिनें हजार मुलगे ओंवाळून टाकिले असते. तिच्या मृत्यूनें मला इतकें दुःख झालें, कीं मला आपल्या जिवाचा देखील कंटाळा आला. सबंध चार दिवस आणि चार रात्री मी कांहीं एक खाल्लें नाहीं कीं प्यालों नाहीं. ही जहांगीरची बायको मरण्याच्या सुमारास, नूरजहानचा अकबराच्या वाड्यांत प्रवेश झाला होता. ती आपल्या आईबरोबर वाड्यांत गेली असतां जहांगीरनें तिला पाहिलें, तेव्हांपासून त्यास तिच्या प्राप्तीची इच्छा झाली. तिच्या आईस हें न आवडून तिनें ती गोष्ट अकबराच्या कानावर घातली. अकबरासही ती गोष्ट बरी वाटली नाहीं. जहांगीरच्या डोळ्यांसमोर ती नसावी, ह्या इराद्यानें त्यानें शेर अफग़ाणखान नामक एका उमद्या पठाणाशीं तिचें लग्न लावून, त्यास नोकरी देऊन दूर बंगालप्रांतीं पाठविलें; आणि जहांगीरचें दुसरें लग्न करून नूरजहानला त्याच्या दृष्टीआड केलें.

सन १६०५ त जहांगीर तख्तनशीन झाला. त्यानें आपला दूधभाऊ कुत्बुद्दीन यास बंगालच्या सुभेदारीवर पाठविलें. नूरजहानला नवऱ्याजवळून दूर करून आपणाकडे पाठवावी, असा त्यास जहांगीरचा हुकूम होता. शेर अफगाणखानास तें समजल्यावर चैन पडेना. नूरजहानला ही बातमी त्यानें कळविली सुद्धां नसेल. तिची नवऱ्यावर पूर्ण भक्ति होती यांत संशय नाहीं. शेर अफगाणखान आपली बायको सोडून देण्यास तयार नाहीं असें जहांगिरास कळल्यावर, त्यास आपणाकडे पाठवून देण्याविषयीं बादशहाचा हुकूम कुत्बुद्दिनास गेला. तेव्हां कुत्बुद्दीन शेर अफगाणखानास जाऊन भेटला. कुत्बुद्दीनचे लोक शेरखानासभोंवतीं जवळ जवळ येऊं लागले; तेव्हां हा काय प्रकार आहे, म्हणून शेरखानानें विचारिलें. कुत्बुद्दीननें आपल्या लोकांस दूर उभें राहण्यास सांगितलें; आणि नूरजहानबद्दल शेरखानशी बोलणें लाविलें. शेरखानास

तो सर्वच प्रकार विपरीत भासून, जवळ लप ग ठेवलेला खंजीर बाहेर काढून त्यानें कुत्बुउद्दीनचा तत्काळ प्राण घेतला. त्याबरोबर कुत्बुउद्दीनचे लोक जवळ उभे होते, त्यांनी शेरखानास तेथेंच कापून काढून बादशहाचा हेतु तडीस नेण्याची सिद्धता केली. एका इतिहासकारानें थोडीशी वेगळी हकीकत दिली आहे. कुत्बुउद्दीन यास ठार मारिल्यावर नूरजहान बादशहाच्या हातांत पडूं नये म्हणून तिलाही मारून टाकण्याकरितां घायाळ-झालेला शेरखान घरांत जात होता. इतक्यांत नूरजहानची आई दरवाज्यांत आड आली आणि म्हणाली, 'नूरजहाननें अगोदरच विहिरींत जीव दिला.' तें ऐकून त्यानें आत्महत्या केली. शेरखान मेल्यावर लोकांनीं नूरजहानला पकडून आग्र्यास पाठविलें, (१६०७). तेथें जहांगीरनें आपली सावत्र आई रुकियाबेगम इच्या परिवारांत तिची योजना केली. तिला अत्यंत दुःख झालें असून बादशहाशीं लग्न करण्याची गोष्ट तिनें झिडकारून टाकिली. कुत्बुउद्दीन मेल्याबद्दल जहांगिरास फारच दुःख झालें. सुमारें चार वर्षेंपर्यंत नूरजहानकडे बादशहानें लक्ष दिलें नाहीं. तिच्या खाण्यापिण्याचाही बंदोबस्त बरोबर नव्हता. कपडे शिवून व कशिदा काढून होईल त्या उत्पन्नावर ती मोठ्या कष्टानें आपला निर्वाह करी. अखेरीस अशा स्थितीस कंटाळून तिनें बादशहाचें म्हणणें कबूल केलें. तेव्हां दोघांचें लग्न लागलें आणि नूरजहान पट्टराणी झाली, (स. १६१०). प्रथम तिला नूरमहल म्हणजे 'राजवाड्याची प्रभा' असें नांव जहांगीरनें दिलें, आणि पुढें कांहीं दिवसांनीं नूरजहानबेगम (जगत्प्रभा राणी) असें नांव ठेविलें. ह्याच नांवानें ती प्रसिद्ध आहे.

ह्या लग्नापासून सर्व कुटुंबाचें भाग्य उदयास आलें. तिचा बाप मुख्य वजीर होऊन त्यास सहा हजारांची मनसब मिळाली. स. १६२२ त प्रथम त्याची आई व पुढें तीन महिन्यांनीं स्वतः घ्यासबेग मरण पावला. तो उदार व धार्मिक होता. कोणीही इसम त्याच्या दारीं येऊन विमुख जात नसे. तो कविता करीत असे. राजकीय पत्रव्यवहारांत तो अत्यंत कुशल होता. चांगलें पत्र असें त्यानेंच लिहावें. त्याचा समागम मोठा आल्हादकारक असे. त्यास राग येत नसे; आणि घरांत बेड्या, चाबूक, किंवा शिव्या ह्यांचा उपयोग त्यानें कधीं केला नाहीं. त्याचे कागदपत्र मोठे व्यवस्थित असत. तथापि तो लांच मात्र सडकून घेत असे. त्याची सुंदर कबर आग्र्याजीक

आहे. त्याचा दुसरा मुलगा मीर्झा अबुल् हसन ऊर्फ आसफ्खान हा पुढें फार प्रसिद्धीस आला. आसफ्खानाची मुलगी मुम्ताजमहल ही शहाजहानची बायको. तो स. १६४१त मरण पावला, त्याची कबर लाहोरास जहांगीरच्या शेजारीं आहे. त्याचा सालाचा पगार चाळीस लाख रुपये असून शिवाय आणखी जहागिरी होत्या. मरणसमयीं त्याची संपत्ति अडीच कोटि रुपये होती. त्याचा लाहोरचा वाडा दाराशेखो ह्यास देण्यांत आला. आसफ्खानाचा मुलगा मीर्झा आबू तालीब ऊर्फ शाएस्तेखान हा औरंगजेबाच्या कार्कीर्दीत प्रसिद्धीस आला. ह्याशिवाय घ्यासबेगच्या कुटुंबाचा विस्तार अति मोठा असून सर्व प्रांतांत त्यांचे नातेवाईक भरले होते. नूरजहानच्या आणखी दोन बहिणी होत्या. सारांश, घ्यासबेगच्या ह्या कुटुंबानें पन्नास वर्षांवर मोगल बादशाहीचा कच्चा कारभार केला. जहांगीर व शहाजहान दोघेही विलासी असल्यामुळें राज्यांतील सर्व कामें बायकांच्या व नातेवाइकांच्या हातांत आलीं. त्यामुळें रियासतींत अकबराच्या वेळचें हिंदी वळण उत्तरोत्तर कमी होऊन इराणी वळण अतोनात वाढलें.

स. १६१० पर्यंत नूरजहानचे दिवस एकाद्या सामान्य स्त्रीप्रमाणें गेले. परंतु पुढें ती एकदम सार्वभौम बादशाहीण बनली. जहांगीरची तिच्यावर फारच मर्जी बसली. तो सर्वथा तिच्या तंत्रानें वागूं लागला. स्वभावतःच ती रुआबदार व अंमल गाजविणारी बायको होती. तिनें आपल्या नातेवाइकांस एकदम मोठमोठीं कामें दिलीं. तिचा बाप मुख्य वजीर झाला. तो शहाणा व एकमार्गी असून, हें काम त्यानें सुरेख बजाविलें. बादशहा व त्याचे आप्त ह्यांच्या हातांतील सत्ता गेली. राज्याचा सर्व कारभार नूरमहल पाहूं लागली. मानमरातब सर्व तिच्या हातांत खेळूं लागले. बादशाहीण होण्यास तिच्या नांवानें खुत्बा वाचणें मात्र बाकी राहिलें होतें. एवंच वनांत टाकून दिलेल्या इराणी अर्भकाच्या हातीं हिंदुस्थानचें सार्वभौमपद गेलें. त्या वेळीं तिचें वय चौतीस वर्षांचें होतें. एवढ्या थोर वयांत तिनें बादशहावर एवढा पगडा बसविला हें विशेष आहे. दिवसेंदिवस तिचें वजन आणि महत्त्व वाढत चाललें. तिचें मोर्तब झाल्याशिवाय कोणाला जहागीर मिळेनाशी झाली. वाड्याच्या सज्जांत बसून ती अमीरउमरावांस हुकूम फरमावूं लागली. नाण्यांवर आपल्या नांवाशेजारीं बादशहानें तिचेंही नांव घातलें. सर्व फरमानांवर ती

बादशहाच्या सहीच्या शेजारीं आपली सही करीत असे. जनानखान्यांत तर तिचा दरारा विशेष होता. एकंदरींत तिचा अधिकार इतका वाढला, कीं बादशहा अगदीं नामशेष झाला. तो लिहितो. 'बायकोची खरी योग्यता मला प्रथम कळत नव्हती. नूरजहानशीं लग्न झाल्यापासून ती मला कळूं लागली. मीं सर्व कारभार तिच्याच हवालीं केला आहे. एकशेर दारू व अदशेर मांस मला दररोज मिळालें म्हणजे पुरे.' तिच्या नांवानें ज्या जहागिरी चालत होत्या, त्यांची योग्यता राज्यांतील तीसहजारी मनसबीच्या एवढी होती. तिनें आपल्या नोतेवाइकांची व ओळखींची उत्तम तर्तूद करून दिली. तिची दाई दीलाराम म्हणून होती, तिच्या तंत्रानें सर्व कामें चालत. अनेक अल्पवयस्क व पोरक्या पोरींचा नूरजहाननें सांभाळ केला. त्या वेळीं राज्यांत दंगे धोपे नसून सर्वत्र शांतता होती. नूरजहानच्या कारभाराचा बादशहास फारच अभिमान वाटूं लागला. नूरजहानइतका लायक मनुष्य ह्या कामास दुसरा कोणी मिळणार नाहीं असें त्यास वाटूं लागलें. 'राणीच्या शहाणपणाचें वर्णन करितां यावयाचें नाहीं. कोणत्याही गोष्टींत कांहीं अडचण दिसली, कीं नूरजहान ती तेव्हांच दूर करी.' जहांगीर आजारी असला म्हणजे म्हणे, 'वैद्यांला काय अक्कल आहे? नूरजहानचें चातुर्य व अनुभव त्यांस मुळींच नाहीं.' ती स्वभावाची उदार होती. कोणावर जुलूम करीत नसे. निराश्रित मुलांचा ती सांभाळ करी. सर्व लोक तिची वाखाणणी करूं लागले. बादशहाला तर तिचा उपयोग विशेष झाला. त्याच्या लहरी व जुलमी वर्तनावर तिनें उत्तम दाब ठेवून चांगला बंदोबस्त केला. दिवसास ती त्यास मद्यपान करूं देत नसे; आणि रात्रीस तरी तें मर्यादेबाहेर जाऊं देत नसे. बादशहानें सर्व लोकांशीं सभ्यतेनें व योग्यतेनें वागावें याबद्दल ती विशेष खबरदारी घेई. व्यसनाच्या नादीं लागून त्याचा पोषाख व रीतभात ती बिघडूं देत नसे. स्वतःच्या अकलेनें व परीक्षेनें, शहाण्या व परोपकारी बापाच्या मदतीनें, आणि नवऱ्याच्या उदार सौजन्यानें, तिनें सर्व राज्यास एक विशेष प्रकारची शिस्त लावून दिली. तेणेंकरून खर्चेही कमी लागूं लागला. राज्याची भरभराट ज्यास्त होऊं लागली. त्या वेळच्या रीतीस अनुसरून जो न्याय लोकांस मिळावयाचा, तो तात्काळ मिळत असे. दरबारची

शोभा व वैभव वाढविण्यांत तिचें चातुर्य विशेष होतें. राजवाड्यांतील सामानसुमान व्यवस्थितपणें लावून सर्व वस्तु जेथच्या तेथें ठेवण्यांत ती विशेष कुशल होती. ह्या कामीं तिची आवड व कल्पना विशेष तारीफ करण्याजोगी होती. स्त्रियांचे अनेक नवीन शृंगार व दागिने तिनें प्रचारांत आणिले. स्त्रीवर्गाची स्थिति सुधारण्याचे तिनें पुष्कळ प्रयत्न केले. तिच्या गुणांस मोहित झालेल्या बादशहाचें वर्तनही पुष्कळ सुधारलें. पूर्वीच्या सारखीं दुष्ट कृत्यें त्याच्या हातून ती होऊं देत नसे. सुलताना रझिया इच्याबद्दल इतिहासकारानें लिहिलेला अभिप्राय नूरजहानला लागू पडतो. तो असा, कीं 'तिच्या अंगीं राज्यकर्त्या पुरुषाला अवश्य ते सर्व गुण होते. अत्यंत कसोशीनें तिचें वर्तन तपासूं लागल्यास, ती जात्या बायको होती, या पलीकडे अन्य अवगुण तिच्यांत मिळावयाचा नाहीं.'

येथवर नूरजहानच्या चांगुलपणाचें वर्णन झालें. पण कसें झालें तरी ती बायको होती, आणि तिच्यांत जबर महत्त्वाकांक्षा वसत असल्यामुळें जहांगीरच्या उतार वयांत, पुढें तख्तावर कोणास बसवावें, याजबद्दल तिनें नानातऱ्हेच्या भानगडी व उलाढाली उपस्थित केल्या; तेणेंकरून सर्व राज्यांत बखेडे उत्पन्न झाले. त्या प्रसंगाच्या नूरजहानच्या वर्तनाचा राज्यांतील इतर पुरुषांशीं विशेष संबंध असल्यामुळें, ती हकीकत पुढें येईल.

५. दक्षिणेंतील भानगडी.—अकबर बादशहानें अहंमदनगरावर स्वारी केल्यानंतर खानखानान नामक सरदाराची दक्षिणच्या सुभ्यावर नेमणूक झाली होती. मीर्झा अब्दुर्रहीम खानखानान, हा बहरामखानाचा मुलगा दक्षिणच्या कारभारावर होता. त्याच्या हातून दक्षिणचा बंदोबस्त योग्य प्रकारें होईना, म्हणून महाबतखान व खानजहान लोदी यांस तिकडे पाठवून खानखानान ह्यास जहांगीरनें परत बोलाविलें. पुढें त्यास निरनिराळ्या ठिकाणीं काम देऊन पुनः दक्षिणेंत पाठविलें. शहाजहाननें बापाच्या विरुद्ध बंड केलें, त्यांत ह्याचें अंग होतें. खानखानान १६२६ त लाहोर येथें मरण पावला. जहांगीरच्या वेळेस खानखानानची बडेजाव विशेष नव्हती. प्रसंग पडेल तसा वागणारा असल्यामुळें त्याजवर कोणाचा भरंवसा नसे. तीस वर्षें तो दक्षिणेंत होता; परंतु शत्रूंस सामील

होऊन, त्यानें मोगल बादशहांची कामगिरी विश्वासानें बजाविली नाहीं. मलिकंबरची व त्याची उत्तम दोस्ती होती. ठिकठिकाणीं आपले हेर ठेवून हरएक व्यवहाराची बातमी ठेवण्यांत तो मोठा पटाईत होता. तो विद्वान् असून त्यास भाषाही पुष्कळ येत होत्या.

प्रसिद्ध मुत्सद्दी मलिकंबर अहंमदनगरचा उद्धार करीत होता, (पृष्ठ २५७ पहा). त्यानें खानखानानचा पाडाव करून अहंमदनगर परत घेतलें. खानखानान बऱ्हाणपुरास परत आला. उत्तरेकडे शहाजादा खुस्रू ह्यानें केलेलें बंड मलिकंबरच्या पथ्यावर पडलें. खानखानान हा दक्षिणच्या राजांपासून लांच घेऊन स्वस्थ बसतो, असें जहांगीर यास वाटलें. त्यावरून खानजहान लोदी नामक दुसऱ्या सरदारास त्यानें दक्षिणचें आधिपत्य दिलें. ह्यापलीकडे दुसरी कांहीं तजवीज त्यानें तूर्त केली नाहीं. पुढें सन १६१६ ह्या वर्षीं शहाजादा खुर्रम् यास जहांगीर बादशहानें दक्षिणदेश जिंकण्याकरितां पुनरपि पाठविलें, आणि आपण आपल्या सर्व इतमामासह मांडवगडपर्यंत त्याजबरोबर गेला. स्वतः बादशहा चालून आल्यामुळें लष्करास विशेष उत्तेजन आलें. खुर्रम् ह्यानें चांगलाच पराक्रम गाजविला. त्याच्या अंगीं युद्धचातुर्य विशेष आहे असें सर्वांस दिसून आलें. मलिकंबरचा पराभव होऊन अहंमदनगर फिरून मोगलांस मिळालें. वरील प्रसंगीं दक्षिणेंतील मुसलमानांचे तंटे खुर्रम्च्या उपयोगीं पडले. मलिकंबर सुनी होता; विजापूर व गोवळकोंड्याचे सुलतान शियापंथी होते. त्यांनीं मलिकंबरास मदत केली नाहीं. जय प्राप्त झाल्यावर खुर्रम् मांडवगडास बापास भेटण्याकरितां गेला. जहांगीरनें त्याचें स्वागत फारच प्रेमानें केलें; आणि त्यास 'शहाजहान' असें नांव दिलें. पुढें जहांगीर गुजराथेंत गेला, आणि तो प्रांतही आपल्या मुलाच्या ताब्यांत देऊन आपण परत आग्र्यास आला, (१६१८).

दक्षिणची ही व्यवस्था फार दिवस टिकली नाहीं. शहाजहान उत्तरेकडे गेला असतां मलिकंबरनें मोगल फौजेचा मोड करून, (१६२०), तो मांडवगडपर्यंत चालून गेला. तेव्हां पुनरपि शहाजहान दक्षिणेंत आला. ह्या प्रसंगी त्यानें आपला भाऊ खुस्रू यास बरोबर आणिलें. तिकडेच पुढें त्या उमद्या राजपुत्राचा शेवट झाला हें वर सांगितलेंच आहे. शहाजहाननें मलिकंबरचा बंदोबस्त करून बराच मुलूख परत मिळ-

विला. परंतु लवकरच दरबारांत घोटाळे उत्पन्न झाल्यामुळें, अहमदनगरच्या बंदोस्त तितकाच सोडून त्यास दरबारीं परत जावें लागलें (१६२३).

६. जहांगीर बादशहा आणि इंग्रज लोक.(अ) कॅप्टिन हॉकिन्स.---सोळाव्या शतकाच्या अखेरीस पूर्वेकडील राज्यांविषयीं कांहीं चमत्कारिक बातम्या विलायतेंत उठल्या होत्या. हिंदुस्थान म्हणून एक देश आहे. तेथें कोणी विलक्षण पराक्रमी राजा उत्पन्न होऊन सर्व देशावर राज्य करूं लागला आहे. त्याच्याइतका शहाणा पुरुष क्वचित्च जन्मास येतो. सर्व धर्मांवर त्याची समानदृष्टि अनुपमेय आहे. स्त्रियांची सुद्धां तेथें वाहवा होते. इंग्लंडांत त्या वेळीं धर्मसंबंधीं जुलूम अत्यंत दुःसह झाले असल्यामुळें, पूर्वेकडील ह्या विलक्षण कहाण्यांनीं लोकांचें चित्त वेधून गेलें.अशा राजास एकदां पाहवा तरी, अशी लोकांस इच्छा उत्पन्न झाली. येथें आल्यावर प्रवाश्यांस जे देखावे दृष्टीस पडले, त्यांनीं ते थक्क होऊन गेले. हिंदुस्थानचे लोक हरएक बाबतींत सुधारलेले आहेत, राज्यकारभारपद्धति त्यांस चांगली साधली आहे, त्यांच्या कित्येक गोष्टी फ्रान्सच्या चौदाव्या लुईनें सुद्धां अनुकरण करण्यासारख्या आहेत; अशी त्या प्रवाश्यांची खात्री झाली. विशेषतः इकडचे लोक रानटी व अज्ञानी असतील, हा त्यांचा भ्रम दूर होऊन इकडे धर्म, भाषा, कविता, कला, इत्यादिकांची विलक्षण उन्नति झालेली त्यांच्या दृष्टीस पडली.

इकडे अकबर बादशहानें हिंदुस्थानांत भक्कम पायावर स्थापिलेलें राज्य हस्तगत करून घेणारा शत्रु त्याच्याच कार्किर्दीत उत्पन्न झाला होता, हें त्याच्या स्वप्नींही नसेल. स. १६०० ह्या वर्षी इंग्लंडांत प्रसिद्ध राणी एलिझाबेथ राज्य करीत असतां, पूर्वेकडील देशांशीं व्यापार करण्याच्या निमित्तानें ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाली. ह्या वेळीं युरोपांतील राष्ट्रांमध्यें जी चढाओढ चालू होती, तिचा व त्या वेळच्या एकंदर परिस्थितीचा वृत्तान्त ब्रिटिश रियासतींत योग्य स्थळीं आला आहे. ह्या ठिकाणीं जहांगीरच्या कार्किर्दीशीं निकट संबंध असलेल्या तेवढ्याच गोष्टी सांगावयाच्या आहेत. जहांगीरच्या वेळेस हिंदुस्थानांत पोर्तुगीझ, डच, व इंग्रज अशीं तीन राष्ट्रें आपापला व्यापार वाढविण्याच्या कामीं बादशहाची कृपा संपादण्याची खटपट करीत होतीं. पोर्तुगीझ लोक आज शंभर वर्षांवर हिंदुस्थानांत राहत होते. अकबराची त्यांजवर कृपा होती. जहां-

गीरचाही लोभ त्यांनीं संपादिला होता. ते पूर्वसमुद्रांतील बेटांत डच लोकांचें व इंग्रजांचें पटलें नाहीं. तेव्हां त्यानीं सुरतेस आपला तळ देण्याची खटपट चालविली. सुरत हें फार दिवसांपासून व्यापाराचें ठाणें होतें. त्या वेळेस तेथें व्यापाराच्या सोयी उत्तम होत्या स. १६०८ त कॅप्टिन हॉकिन्स नांवाचा गृहस्थ हेक्टर नामक गलबतांतून सुरत बंदरीं आला. इंग्लंडचा राजा पहिला जेम्स याजकडून त्यानें जहांगीर बादशहास पत्र आणिलें होतें. मुकर्रबखान म्हणून त्या वेळेस गुजराथचा सुभेदार होता. त्यास हेक्टर जहाजावरील तोफांची बरीच धास्ती वाटली. तो सुरतेस आला, आणि त्यानें हॉकिन्सपासून कांहीं जिन्नस खरेदी केले. सुरतेस पोर्तुगीझ लोक होतेच, त्यांनीं मुकर्रबखानास पैसे भरले; आणि त्याजवळ इंग्रजांची व त्यांच्या राजाची पुष्कळ नालस्ती केली. ग्रेट ब्रिटन हें बेट अगदीं भिकार व तेथचा त्यांचा राजा म्हणजे कोळी लोकांचा नायक होय, अशी त्यांनीं कागाळी केली. त्यांनीं हॉकिन्सचें एक गलबत पकडिलें, पण हेक्टरवर हल्ला करण्याची त्यांची छाती नव्हती शेवटीं हिंदुस्थानांतील माल खरेदी करून तो हेक्टर जहाजांतून हॉकिन्सनें विलायतेस पाठविला. हेक्टर निघून जातांच मुकर्रबखान हॉकिन्सपासून घेतलेल्या मालाचे पैसे देईना. आग्र्यापर्यंत सुरक्षित पोंचविण्यासाठीं स्वार व शिपाई बरोबर घेऊन हॉकिन्स बादशहाच्या भेटीस गेला.

त्या वेळीं दरबारांत फारशी भाषा चालत असे. पण हिंदुस्थानीही सर्वांस समजे. शिवाय जहांगीर व त्याचे बहुतेक कामदार तुर्की भाषाही बोलत. ह्याच तुर्की भाषेत हॉकिन्सशीं बादशहा संभाषण करी. हॉकिन्सला तुर्की येत होतें. लवकरच हॉकिन्सवर जहांगीरची मर्जी बसली. त्यानें त्याच्या मागण्या कबूल केल्या, आणि सुरतेस वखार घालण्याची परवानगी दिली. त्यांजवर कोणीं जुलूम करूं नये, व विनाकारण पैसे उपटूं नयेत, असें त्यानें फर्माविलें. हॉकिन्स यास त्यानें चारशें स्वारांची मनसब देऊं केली. ह्या मनसबीचें सालाचें उत्पन्न अठ्ठेचाळीस हजार रुपये होतें. हें काम घेऊन आपल्याजवळील एका बाईला क्रिस्ती करून तिच्याशीं हॉकिन्सनें लग्न लावावें. असें त्यानें सुचविलें हॉकिन्सनें ती बाई न पत्करितां दुसऱ्या एका बाईशीं लग्न केलें; आणि स्वतः इंग्रजांच्या व्यापाराची वृद्धि करण्याकरितां आग्र्यास राहिला. दोन वर्षेंपर्यंत

सतत त्याचें वाड्यांत जाणें येणें असे. खुशालखान्यांत बादशहाबरोबर तो खानपानास जाई. त्या वेळीं यूरोपविषयीं अनेक प्रकारची माहिती त्यानें बादशहास दिली. हॉकिन्सनें मुकर्रबखानाच्या गैरवर्तनाचें बादशहाकडे गाऱ्हाणें केलें. त्या खानाविरुद्ध पुष्कळ कागाळ्या बादशहाच्या कानावर अगोदरच गेल्या होत्या. त्यानें लोकांपासून पैसे उपटून जुलूम केले होते. बादशहाकडे पाठविण्याकरितां म्हणून एका हिंदु स्त्रीस त्यानें पकडिलें आणि शेवटीं तिला स्वतःपाशींच ठेवून घेतलें. इत्यादि गोष्टी ऐकून बादशहानें त्यास आग्र्यास बोलाविलें, आणि त्याजपासून होतें नव्हतें तें सारें हिसकावून घेतलें. तथापि मुकर्रबखानानें पैसे वगैरे भरून आपली सुटका करून घेतली. पुढें त्यास पहिलें काम पुनः मिळून तो गुजराथेंत गेला. तेव्हां हॉकिन्सचा सूड घेण्याचा त्यानें संकल्प केला. इंग्रजांना व्यापार करण्याची बंदी केल्यास आपण गोंव्याहून हिरेमाणकें आणवून देतों असें त्यानें बादशहास कळविलें. दुसरे अमीरही इंग्रजांविरुद्ध ओरड करूं लागले. एक तर असें सुद्धां म्हणाला,कीं इंग्रजांना हिंदुस्थानांत पाऊल ठेवूं दिल्यास ते लवकरच सर्व देश बळकावून बसतील. हें ऐकून जहांगीरची पांचांवर धारण बसली; त्यानें पूर्वीं दिलेलीं सर्व वचनें परत घेतलीं; आणि इंग्रजांस हिंदुस्थानांत व्यापार करण्याची मनाई केली. तेव्हां सन १६११ मध्यें हॉकिन्स आपल्या बायकोसह आग्र्याहून निघून गेला. येणेंप्रमाणें दोन वर्षांचे श्रम फुकट गेले. हॉकिन्सच्या हातून पुढें कांहीं महत्त्वाचीं कामें झालीं नाहींत. थोडीं वर्षें व्यापार करून परत जात असतां तो ऐर्लंडनजीक समुद्रांत मरण पावला, आणि त्याच्या बायकोनें इंग्लंडांत दुसरें लग्न केलें, (ब्रि. रि. पृष्ठ २७०).

मोगल बादशहाच्या वैभवाविषयीं नाना प्रकारच्या गोष्टी हॉकिन्सनें विलायतच्या लोकांस कळविल्या. जहांगीरच्या राज्याचा वसूल पन्नास कोटी रुपये आहे, असें जेव्हां त्या लोकांनीं ऐकिलें, तेव्हां ते अगदीं थक्क झाले. इंग्लंड व स्कॉटलंडचा वसूल त्या वेळेस एक कोटि रुपये होता. फ्रान्सचा पराक्रमी राजा चौदावा लुई ह्याच्या राज्याचा वसूल पांच कोटी होता. 'जहांगीरचा स्वतःचा व जनानखान्याचा दररोजचा खासगी खर्च ८० हजार रुपये आहे; वीस कोटि रुपये त्याच्या खजिन्यांत नेहमीं शिल्लक असतात; हत्ती, घोडे, उंट, खेचरें, हरणें, ससाणे

व गाणारे पक्षी, वगैरे किती आहेत यांची तर गणतीच नाहीं. क्षणमात्रांत २५ हज़ार लोकांची फौज जवळ येऊन उभी राहते, आठ दिवसांचा अवकाश दिला तर तीनलाख फौज गोळा होते. एकंदर मनसबदार तीनहजार आहेत. बादशहापुढें जाणाऱ्या प्रत्येक इसमास नजराणा करावा लागतो. नवरोजचा सण व बादशहाचा वाढदिवस आले, म्हणजे लोक सुंदर व बहुमोल वस्तु बादशहास नजर करीत असतात.' इत्यादि गोष्टी ऐकून पाश्चात्यांचीं मनें चकित झालीं, ह्यांत नवल नाहीं.

(आ) सर टॉमस रो, (१५८०–१६४४).—हॉकिन्स गेल्यावर मोगलांच्या दरबारीं इंग्रजांचें वजन राहिलें नाहीं. तरी त्यांनीं सुरतेस पुष्कळ धामधूम केली. ते मोगल अधिकाऱ्यांस विचारीनातसे झाले. मक्का व सुरत यांजमधील मुसलमानांचा व्यापार त्यांनीं बंद केला. सर हेन्री मिडल्टन् नांवाचा एक चलाख इंग्रज व्यापारी सुरतेस आला, पण त्याला तेथें व्यापार करण्याची परवानगी मिळाली नाहीं, म्हणून तांबड्या समुद्रांत जाऊन मोंचा येथें जात येत असलेलीं सर्व मुसलमानी गलबतें त्यानें अडविलीं; व त्यांस आपला विलायती माल विकत घेण्यास भाग पाडिलें; आणि त्यांजवळचा सर्व माल सुरतेच्या भावानें त्यानें खरेदी केला. तेव्हां सुरतेच्या मोगल व्यापाऱ्यांस धास्ती पडून त्यांनीं इंग्रजांस सुरत येथें वखार घालूं दिली. हें पोर्तुगीझ लोकांस न आवडून त्यांनीं मोगलांस दोष दिला. त्यांची व इंग्रजांची मोठी कडाक्याची लढाई होऊन पोर्तुगीझ पराभव पावले. आपल्या राज्यांत येऊन हे परस्थ लोक कां लढतात, याची मोगल अंमलदारांनीं चौकशी केली नाहीं. त्यांनीं आपला आब राखणें जरूर होतें. इंग्रजांस जय मिळतांच त्यांजबरोबर मोगल अधिकारी सलोख्यानें वागूं लागले.

अशा गोष्टी चालू असतां सर टॉमस रो नांवाचा हुशार व नामांकित गृहस्थ विलायतच्या राजाकडून जहांगीरकडे वकील म्हणून आला, (१६१५). तो हॉकिन्सपेक्षां ज्यास्त वजनदार होता. त्याचा जन्म सन १५८०त झाला असून, ह्या वेळीं त्याचें वय ३५ वर्षांचें होतें. त्याजबरोबर सेक्रेटरी, उपाध्याय वगैरे बराच लवाजमा होता. त्यानें मोगल दरबारचें केलेलें वर्णन फारच सुरेख आहे. तो मोठ्या

थाटानें सुरत येथें उतरला. बंदरांतील इंग्रजांच्या जहाजांनीं त्यास ४८ तोफांची सलामी दिली. त्याचें स्वागत करण्याकरितां एक लष्करी टोळी (गार्ड) तयार ठेविली होती. एका उघड्या शामियान्यांत मोगल अधिकाऱ्यांनीं रोची भेट घेतली. पण लवकरच त्यांनीं त्याजबरोबर दांडगाई सुरू करून त्याच्या पेट्या वगैरे उघडिल्या. बादशहास देण्याकरितां आणिलेले नजराणे त्या पेट्यांत आहेत असें रोनें सांगितलें, तरी त्यांनीं तें मानिलें नाहीं. शहरांत उतरण्यास त्यास जागा व तंबू मिळाले. बऱ्हाणपुरास जाण्यास गाड्या व पाहरा मिळण्यास एक महिना लागला. बऱ्हाणपूर हें दक्षिणचें नाकें होतें. सर्व बाजूंकडून तेथें रस्ते आले होते. सुरतेहून बऱ्हाणपुरास उत्तम रस्ता केलेला होता. बऱ्हाणपुरास पोंचण्यास रो यास पंधरा दिवस लागले. रस्त्यावरील प्रदेश रुक्ष होता. मातीच्या भिंतींचीं घरें बांधिलेलीं होतीं. रोच्या पसंतीस एकही घर आलें नाहीं. रस्त्यांत रामोशांची वगैरे भीति होती. बऱ्हाणपूरचा कोतवाल शहराबाहेर त्यास घेण्यास आला. उतरण्यास दिलेला बंगला रो यास आवडला नाहीं; म्हणून तो आपल्या तंबूंतच राहिला. बऱ्हाणपुरास दक्षिणच्या फौजेची छावणी असून तिजवर शहाजादा पर्वीझ् मुख्य होता. पर्वीझ्ची व रोची भेट झाली. त्याचा थाटही बादशहासारखाच होता. तो उंच सज्जांत बसला असून आसनाच्या वर भरगच्ची चांदवा उभारला होता. खालच्या बाजूस उमराव मंडळींकरितां एक भव्य चौरंग केला असून, त्याच्या सभोंवती गजांचा कठडा होता. बादशहापुढें जमिनीस लवून नमन करावें लागे. रो तसें करण्यास खुषी नव्हता. 'मी वकील आहें, तुमचा नोकर नव्हें;' असें बोलून तो थेट पर्वीझ्पुढें गेला. उमराव लोक त्याजपुढें हात जोडून उभे होते. रोनें शहाजाद्यास लवून सलाम केला, तेव्हां पर्वीझ्नें उलट सलाम केला. रोनें आपलें काम काय आहे तें कळविलें. शहाजाद्यानें पुष्कळ प्रश्न विचारले. त्यांचीं उत्तरें देण्यास रो सज्जापाशीं जाऊं लागला, परंतु सेक्रेटरीनें त्यास पुढें जाऊं न देतां सांगितलें, कीं 'इराणचा किंवा तुर्कस्तानचा शहा यांस सुद्धां सज्जांत जागा मिळावयाची नाहीं.' हें सर्व रो यास मुळींच आवडलें नाहीं. तथापि पर्वीझ्चा स्वभाव गोड होता. त्यानें रोच्या मागण्या

NATIONAL ARCHIVES OF INDIA

कबूल केल्या. 'तुम्ही पाहिजे तर बऱ्हाणपुरास वखार घाला; तुम्हांस आग्र्यास जाण्यास शिबंदी व गाड्या देतों,' असें त्यानें सांगितलें. रोनें आणिलेले नजराणे त्यानें स्वीकारिले. मद्याची एक पेटी पाहून तर त्याच्या तोंडाला पाणी सुटलें. 'तुमच्याशीं कांहीं एकांतांत बोलावयाचें आहे,' असें रोला सांगून तो निघून आंत गेला. रोनें बाहेर बराच वेळ वाट पाहिली. परंतु पर्वीझ् मद्यपानानें इतका गुंग झाला होता, कीं त्यास कोणीं भेटण्याची सोय नव्हती. शेवटीं रो वाड्यांतून निघून गेला.

पुढें रो बऱ्हाणपूर सोडून निघाला. अजमिरास जाण्यास त्यास एक महिना लागला; त्या वेळीं त्यास ताप येत होता. रस्त्यांत त्यानें मांडवगड, चितोड इत्यादि प्रेक्षणीय स्थळें पाहिलीं. तारीख २३ डिसेंबर सन १६१५ रोजीं तो अजमिरास पोंचला. जहांगीरचा मुक्काम त्या वेळीं अजमीर येथेंच होता. तारीख १० जानेवारी १६१६ रोजीं त्याची बादशहाशीं प्रथम मुलाकात झाली. त्यानें आपल्या भेटीचें इत्थंभूत वर्णन केलें आहे. तो बादशहापुढें जमिनीपर्यंत लवला नाहीं. तीन प्रकारच्या आसनांतून पुढें जातांना प्रत्येक ठिकाणीं त्यास मुजरा करावा लागला. शेवटीं प्रधानमंडळांत त्यास जागा मिळाली. जहांगीरचा दरबार त्यास लंडनच्या नाटकगृहासारखा वाटला. बादशहा उंच सज्जांत बसला असून खालीं कमी ज्यास्त उंचीच्या चौरंगपीठांवर मंडळी बसली होती. जहांगीरनें ह्या इंग्रज वकिलाची मोठ्या आदरानें भेट घेतली. 'इंग्लंडचा राजा माझा भाऊ आहे,' असें त्यानें म्हटलें. जेम्सचें पत्र त्यानें मोठ्या कौतुकानें न्याहाळून पाहिलें. त्यासोबत फारशी भाषांतर होतेंच. एक बाजा, सुऱ्या, चाकू एक भारी तलवार, एक कशिदा काढिलेला दुपट्टा, आणि एक बगी इतक्या वस्तु रोनें नजर करण्याकरितां आणिल्या होत्या, त्यांचा जहांगीरनें स्वीकार केला. रोबरोबरच्या एका इसमास तो बाजा वाजविण्यास बादशहानें सांगितलें. गाडी बाहेर होती, ती पाहण्यास त्यानें कांहीं लोक पाठविले. रोच्या तब्यतीविषयीं बादशहानें अनेक कुशल प्रश्न विचारिले, आणि ती बरी नाहीं असें ऐकून, फार दिलगिरी प्रदर्शित केली. 'माझे वैद्य तुम्हांस बरे करतील, बरे होईपर्यंत तुम्ही बाहेर पडूं नका, पाहिजे तें

मोकळेपणानें मागत जा,' वगैरे सांगून त्यास बादशहानें निरोप दिला. ह्या मुलाखतीनें तो अत्यंत खुष होऊन गेला. इतक्या सन्मानानें बादशहा दुसऱ्या कोणास भेटत नसतो असें त्यास पुढें कळलें.

दरबार आटपल्यावर जहांगीरनें आपला पहिला थाट सोडून दिला. स्वतः जाऊन त्यानें गाडी पाहिली; आंत बसून त्यानें आपल्या नोकरांस ती ओढण्यास लाविलें. नंतर त्यानें रोच्या नोकरांकडून दुपट्टा व तलवार इंग्रजी पद्धतीनें स्वतःच्या अंगावर पेहरविली. तलवार उपसून ती परजून पाहिली. 'ह्या वस्तु अगदीं भिकार आहेत, इंग्लंडच्या राजानें कांहीं तरी मोलवान् हिरे माणकें पाठविलीं पाहिजे होतीं,' असें तो पोर्तुगीझ धर्मगुरूंपाशीं बोलला. पुष्कळ दिवसपर्यंत व्यापाराच्या तडजोडीचें बोलणें चाललें. शहाजादा खुर्रम ह्यानें त्या कामीं बरीच मेहनत घेतली. जमिनीवर इंग्रज व्यापाऱ्यांपासून जकात घेऊं नये, असें जहांगीरनें फर्माविलें. पण रो ह्यास नुसतें फर्मान नको होतें. दोन राष्ट्रांमध्यें शिरस्त्याप्रमाणें कायमचा तहनामा जहांगीरनें सही केलेला त्यास पाहिजे होता; पण असा तह केल्यानें मोगल अधिकाऱ्यांचें वर्तन नियंत्रित होईल; इंग्रजांच्या हातून थोड्याशा हलक्या किंमतीच्या नजराण्यांपेक्षां त्यांस ज्यास्त कांहीं प्राप्ति व्हावयाची नाहीं, आणि त्यांचे सर्व अधिकार जातील, ही गोष्ट रोच्या लक्षांत आली नाहीं. मोगल दरबारची अशी चाल होती, कीं बादशहा जे जे शब्द बोले आणि जीं जीं कृत्यें करी तीं सर्व लिहून ठेवण्यांत येत; म्हणून एकंदर दिवसाची सर्व कच्ची हकीकत पाहिजे त्यास पाहण्यास मिळे. ती गुप्त ठेवण्यांत येत नसे. ही बादशाही तवारीख पाहण्यास एक रुपया फी पडे. तो रुपया दिला म्हणजे अत्यंत गुप्त व महत्त्वाच्या गोष्टींचे व्यवहार पाहिजे त्यास कळत. बादशहा मरण पावल्यावर त्याच्या कारकिर्दीचा इतिहास ह्या तवारिखीवरून तयार केला जाई. हा प्रकार रो यास फारच अनिष्ट वाटला. कांहींच गुप्त राहत नसे. अशा प्रकारें दिवस काढीत असतां, रो यास दरबारचा कंटाळा आला. त्यांतील नवेपणा निघून गेल्यावर कंटाळा येणें साहजिक आहे. कामगार लोक रो यास वारंवार दाबूं लागले. एकदां लोकांनीं त्यास लाल कठड्याच्या आंत येऊं दिलें नाहीं. बादशहाकडे तक्रार केल्यावर ती हरकत दूर झाली. एकदां

३८-३१-१०-१०-७९१-२०००

NATIONAL ARCHIVES OF INDIA

उदेपूरच्या राण्याच्या मुलाची दरबारांत मुलाकात झाली; त्या राजपुत्रानें बादशहास तीन नमस्कार घातले, तेव्हां बादशहानें त्यास आपल्यानजीक सज्जांत बोलावून मस्तकावर हात ठेविला. हा प्रकार पाहून रोच्या मनांत हेवा उत्पन्न झाला. तरी आरंभीं बादशहाची रोवर पुष्कळ मर्जी होती. एकदां एका गुन्हेगारास बादशहानें रो याजकडे शिक्षा करण्यास पाठविलें; असें करणें म्हणजे बादशहाची मोठी मर्जी आहे असें समजलें जात असे. रोनें त्या इसमास स्वतःजवळ नोकर म्हणून ठेवून घेतलें.

ह्याच समयास रोनें जहांगिरास तह करून देण्याची विनंति केली. तेव्हां लागलाच जिकडे तिकडे गवगवा झाला. दरबारच्या मंडळींचा निश्चयच झाला होता, कीं तह करूं द्यावयाचा नाहीं. जहांगीर रोची मागणी कबूल करील अशी त्यांस भीति पडली. खुर्रम् व आसफ्खान यांनीं दुभाष्यांस फितवून ठेविलें. बोलणें चालत असतां ते त्यांस खुणा करीत. तथापि रोनें आपलें म्हणणें बादशहापुढें स्पष्टपणें ठेविलें. जहांगीर बोलला, 'फर्मान आहे तेवढें पुरे.' रोनें लेखी तहनामा देण्याविषयीं आग्रह केला. जहांगीरनें विचारिलें 'इंग्रज लोक मला जवाहीर देतील काय?' रो बोलला, 'जेथें आपण बादशहा आहां, त्या हिंदुस्थानांतच रत्नें होतात; आपलींच रत्नें पुनः आपणांस परत आणून देण्यांत अर्थ कोणता?' जहांगीर पुढें कांहीं बोलला नाहीं. एका सरदाराचा पोर्तुगीझ लोकांकडे कल होता, तो बोलला, 'इंग्रज लोक तरवारी, सुऱ्या, कापड ह्यांवांचून दुसरें कांहीं आणीत नाहींत; पोर्तुगीझ लोक रत्नें, पाच, हिरे वगैरे आणितात.' रोनें पुनःपुनः मागणी करून बादशहा, खुर्रम् व आसफ्खान या सर्वांस कंटाळा आणिला. शेवटीं बादशहानें तहनाम्याचा मसुदा तयार करण्याची रो यास आज्ञा केली. रोनें पडत्या फळाची आज्ञा समजून मसुदा तयार करून आणिला. त्या मसुद्यावरून रोची ह्या कामीं किती योग्यता आहे हें दिसून येतें. मसुद्यांतील कलमें अशीं होतीं, कीं ग्रेट ब्रिटनचा राजा व हिंदुस्थानचा बादशहा यांजमध्यें कायमचा स्नेह असावा. इंग्रजांस वाटेल तेथें व्यापार करण्याची मोकळीक असावी. बादशहाकरितां आणिलेले नजराणे रस्त्यांत अंमलदारांनीं खोलून पाहूं नयेत. इंग्रजांनीं आणिलेला कोणताही माल बादशहाचें नांव सांगून जबरदस्तीनें घेतला जाऊं नये.

आयात व निर्यात मालांवर एकदां बंदरावर शेंकडा ३॥ टक्के केवळ नांवाची जकात घ्यावी. मग दुसरे कोठेंही जकात घेण्यांत येऊं नये. इंग्रज व्यापारी मरण पावल्यावर त्यांचा माल बादशहानें सरकारांत घेऊं नये. जे कामदार हीं कलमें पाळणार नाहींत त्यांस शिक्षा व्हावी. बादशहानें इतक्या गोष्टी केल्या, म्हणजे इंग्रजांनीं त्यास लागेल तो माल योग्य दरानें पुरवावा. त्यांनीं बादशहाच्या शत्रूंचा पाडाव करण्याकरितां त्यास मदत करावी.' हीं कलमें रो यास फारच सौम्य वाटलीं. त्यास त्यांत हरकत घेण्याजोगें कांहीं एक दिसलें नाहीं. त्याजवर लागलेंच मोर्तब होईल असें त्यास वाटलें होतें. परंतु कलमें सर्व राज्यांतील लहान मोठ्या कामदारांस जाचणारीं होतीं, हें रोच्या ध्यानांत आलें नव्हतें. नजराण्यांच्या लोभानें बादशहानें कदाचित् तह कबूल केला असता. पण खुर्रम् व आसफ्खान अगदीं आडवे पडले.

मध्यंतरीं जहांगीरच्या मुलांत तंटे लागले. त्यांत नूरजहानचें अंग होतें. दरबारची कच्ची हकीकत रो ईस्ट इंडिया कंपनीस लिहून पाठवीत असे. 'आपण समुद्रकांठ सोडून फार आंत गेल्यास आपला निभाव लागणार नाहीं; सर्व हिंदुस्थानांत गडबड उडून जाईल, असा प्रसंग कदाचित् लवकरच येऊन ठेपेल; खुस्रूच्या प्रयत्नांस यश आल्यास, इंग्रजांचा फायदा होईल. क्रिस्ती लोकांवर त्याची भक्ति आहे, आणि तो त्यांस फारच चाहतो म्हणून क्रिस्त्यांचें चांगलें फावेल. पण शहाजादा खुर्रम् बादशहा झाल्यास सर्व पारडें फिरेल; इंग्रजांचा तो उच्छेद करील; क्रिस्ती लोकांवर त्याची करडी नजर आहे; तो स्वभावानें अभिमानी, लबाड, जुलमी व प्रसंग पडेल तसा वागणारा आहे.' इत्यादि गोष्टी रोनें आपल्या मालकांस कळविल्या. रोचें म्हणणें कितपत बरोबर होतें हें पुढील हकीकतींवरून व्यक्त झालें.

कांहीं दिवसांनीं महंमद रेझा-बेग नांवाचा इराणचा एक वकील जहांगीरकडे आला. त्याचा लवाजमा मोठा होता. उंची हत्यारें घेतलेले पन्नास स्वार, चाळीस बंदूकवाले व दोनशें शिपाई इतके केवळ त्याच्या बंदोबस्ताकरितां होते. त्यानें जहांगीरची अशी कांहीं स्तुति केली, कीं तिला सुमारच नाहीं. त्यानें आणिलेले नजराणे पाहून तर रो यास लाजच

वाटली. सत्तावीस मौल्यवान् घोडे, नऊ मोठालीं खेचरें, सात उंट भरून मखमल, एक सुंदर पेटी, चाळीस बंदुका, पांच घड्याळें, एका उंटाच्या ओझ्याचा भरजरीचा कपडा, सात रेशमी गालिचे, दोन रत्नें, एकवीस उंट भरतील इतकें द्राक्षासव, चौदा उंटें गुलाबपाणी, सात रत्नखचित खंजीर, पांच तशाच तलवारी, आणि सात सुंदर आरसे; इतकें सामान त्यानें बादशहास नजर म्हणून आणिलें होतें. इराणचा वकील आल्यावर कांहीं दिवसांनीं बादशहाची स्वारी सर्व फौज बरोबर घेऊन मांडवगडाकडे जाण्यास बाहेर निघाली. अजमीर सोडल्यावर चार महिन्यांनीं बादशहा उज्जनीस पोंचला. इराणी वकिलाचा व रोचा स्नेह जडला. कारण दोघांसही मोगलांच्या धरसोडीचा तिरस्कार आला होता. इराणच्या वकिलाचें काम तडीस न जातां त्यास परत जावें लागलें. बादशहानें इराणच्या शहास परत दिलेले नजराणे अगदींच हलके होते. महंमद रेझा-बेग हा इतका त्रासून गेला, कीं आसफ्खानाचा निरोप घेतल्याशिवाय आजाराचें निमित्त करून तो तसाच निघून गेला. त्याच संधीस खुर्रम् व खुस्रू ह्या दोघांची भेट रोनें घेतली. खुस्रूस दरबारची माहिती कांहीं नव्हती असें दिसलें.

मध्यंतरीं रो ह्यास मोगलांचा फारच राग आला. इंग्लंडाहून कांहीं नवीन् नजराणे येत होते, त्यांच्या पेट्या रस्त्यांत कोणी अडविणार नाहीं, हें बादशहास कळल्यावर त्या त्यानें उजनी येथें मागितल्या. पेट्या हातीं आल्याबरोबर त्या जहांगीरनें स्वतः उघडिल्या आणि पाहिजे तें सामान त्यानें घेतलें. रोनें तक्रार केली, तेव्हां जहांगीर बोलला, 'तुमचें नुकसान भरून देऊं.' परंतु मद्यपानाचे नादांत तें काम तसेंच अर्धवट राहिलें. असें होतां होतां रो लोकांस अप्रिय होऊं लागला. त्याचें तह करण्याचें काम तर मागेंच पडलें. त्यानें कामदारांविरुद्ध तक्रारी केल्या, त्यामुळें त्यास सर्वत्र शत्रु उत्पन्न झाले. तो स्वतः हें जाणून होता. प्रांतोप्रांतांच्या सुभेदारांस व दुसऱ्या अंमलदारांस रोची भीति वाटण्याचें कारण असें होतें, कीं ते रयतेवर जुल्म करून पैसा काढीत; आणि सर्व जमिनी मक्त्यानें देत; हिंदूंचा तर ते विशेष छळ करीत, आणि त्यांनीं मोठमोठे दंड द्यावे म्हणून त्यांस उलटें टांगीत. ह्या सर्व गोष्टी रो बादशहाच्या कानावर घाली; तेव्हां त्यास चहाडखोर असें समजून सर्व

अधिकारी पाण्यांत पाहूं लागले. इतक्यांत एक प्रकार घडून आला, त्यामुळें इंग्रजांचा आशातंतु तुटला. प्राच्य लोकांविषयीं इंग्रजांच्या मनांत विलक्षण अनादरबुद्धि आहे. ती त्यांस झांकतां येत नाहीं. कांहीं आरमारावरचे इंग्रज शिपाई बंदुका घेऊन सुरतेस उतरले. त्यांनीं सहज गप्प ठोकिली, कीं आपण सुरतेचा किल्ला घेण्यास चाललों. ह्या म्हणण्यांत कांहीं अर्थ नव्हता; पण तितक्यानेंच मोगलांची धाबरपट्टी उडाली. ती बातमी दिल्लीस कळविण्यांत आली. सुरतच्या किल्याची डागडुजी सुरू झाली. इंग्रज लोक गोवें घेणार व इंग्लंडांतून एक मोठें आरमार येत आहे, अशी वदंता उठली होती. रो केव्हां तरी नकळत पळून जाईल, असें बादशहास वाटलें. परंतु कालांतरानें ह्या वदंता खोट्या आहेत, असें सर्वांच्या नजरेस आलें. दुसरी एक चमत्कारिक गोष्ट त्याच संधीस घडली. जहांगीरची आई मक्केहून परत येत होती. इंग्रज चांच्यांनीं तिचें गलबत पकडिलें, तेव्हां ईस्ट इंडिया कंपनीच्या गलबतांनीं त्या बाईस सोडविलें. ही बातमी समजतांच दरबारच्या लोकांनीं रोची वाहवा केली. ते असेंही बोलले, कीं इंग्लंडच्या राजानें आपल्या लोकांस चांचेपणाचा धंदा करूं द्यावा हें आश्चर्य आहे.

इतर उपाय हरले असें पाहून रोनें आसफ्खानास लांचादाखल एक मोठें मोतीं नजर केलें. त्याचा परिणाम लगेच झाला. आसफ्खान इंग्रजांशीं गोडीनें वागूं लागला. लगेच बादशहाकडून जावयाच्या रकमा त्यास मिळाल्या. सर्व सरदार इंग्रजांचा माल घेण्यास उद्युक्त झाले. सर्व माल एकदम संपून गेला. आणखी तिप्पट असता तरी खपला असता. शेवटीं आसफ्खानाचा स्नेह कमी होत चालला. तरी इंग्रज व मोगल ह्यांजमध्यें स्नेहभाव होता. शेवटीं रोच्या हातून महत्त्वाचें काम कांहीं सुद्धां झालें नाहीं आणि निरुपाय होऊन तो १६१८त निघून विलायतेस गेला. रोच्या वकिलातीची व्यापारसंबंधाची बाजू ब्रि. रि. प्रकरण ९, कलम ५-८ त्यांत दिली आहे.

७. अखेरच्या घालमेली, (१६२३-१६२७).—सर टॉमस रो निघून गेल्यावर जहांगीर बादशहानें सात वर्षे राज्योपभोग घेतला. पण एकंदरींत हे दिवस त्याला फार कष्टप्रद गेले. बादशहाची तब्येत बिघ-

झली, की पुढील राज्यव्यवस्थेबद्दल एकदम तंटे सुरू होत. ह्या तंट्यांत सामील होणारी अनेक माणसें होतीं. बादशहाचे चार मुलगे, आणि त्याची खटपटी व पराक्रमी बायको नूरजहान हीं मुख्य होतीं. शिवाय महाबतखान, बहरामखानाचा मुलगा खानखानान, व नूरजहानचा भाऊ आसफ्खान हे वजनदार सरदार मर्जीप्रमाणें, आज एका पक्षास, तर उद्यां दुसऱ्या पक्षास जाऊन मिळत. ह्यापुढची कार्किर्दीची हकीकत म्हणजे ह्या मंडळीनें केलेल्या खटपटी होय. ह्या सर्वांत वडील मुलगा खुस्रू बिचारा गरीब होता; त्याची गोष्ट मागें येऊन गेलीच आहे. आरंभापासून खुस्रू व पर्वीझ् यांचा पाडाव करण्याचे खुर्रमूचे बेत चालले होते. पर्वीझच्या हातून दक्षिणचा बंदोबस्त होत नाहीं, असें त्यानें बापाच्या मनांत भरविलें. त्यास परत बोलावून सन १६१६त दक्षिणचें आधिपत्य बादशहानें खुर्रमू यास दिलें, आणि पर्वीझ् याजकडे बंगालचा कारभार सोंपविला. जहांगीरच्या मनांत खानखानान यासही दक्षिणेतून परत बोलवावें असें होतें; परंतु तो बलाढ्य सरदार बंड करील तर आपणास जड जाईल अशा समजुतीनें, कांहीं युक्ति करून त्याचा बंदोबस्त करण्याचा बादशहाचा विचार होता. खानखानान यास एक पोषाख पाठवावयाचा आहे, असें बादशहानें त्या सरदाराच्या एका नातलग बाईस कळविलें. त्या वेळेस ती बाई रागाऊन बोलली, 'हा पोषाख विषयुक्त असेल; तो खानखानान वापरणार नाहीं. आजपर्यंत दोन वेळां तुम्हीं त्यास विष देण्याचा प्रयत्न केला; पण त्या धूर्त माणसास तुमचें कपट कळून आलें.' जहांगीरनें तिची पुष्कळ खात्री केली, आणि 'मी स्वतः तो पोषाख घालून दाखवितों' असें सांगितलें, तरी त्या बाईनें त्याचें म्हणणें ऐकिलें नाहीं. अखेरीस खानखानानचा बंदोबस्त करण्यास स्वतः दक्षिणेस जाण्याचा बादशहानें विचार ठरविला. तो मांडवगडापर्यंत मोठ्या थाटानें गेला, हें मागें सांगितलेंच आहे. परंतु मांडवगडास पोंचल्यावर त्यास दुसऱ्याच भानगडींत पडावें लागलें.

नूरजहानचा भाऊ आसफ्खान याची मुलगी मुम्ताज-महल् ही शहाजहानास दिलेली होती. ह्या संबंधामुळें शहाजहानवर नूरजहानची मर्जी असून त्यासच पुढें बादशाही पद मिळावें अशी तिची आरंभीं खटपट चालू होती. परंतु शहाजहान आपल्या तंत्रानें वागणारा नाहीं असें पाहून,

अफगाण-शेरखानापासून नूरजहानला झालेली एक मुलगी होती ती खुस्रूस देऊन, त्याजला राज्य मिळवून देण्याचा विचार तिच्या मनांत आला. शहाजहान दक्षिणेंत गेल्यावर त्यानें खानखानानच्या नातीशीं लग्न करून त्या बलाढ्य सरदाराची दोस्ती संपादन केली. ही गोष्ट नूरजहानला वाईट वाटली. शहाजहान व खानखानान एक झाले म्हणजे त्यांजपुढें आपलें कांहीं चालणार नाहीं; आणि आपलें स्वतःचें महत्त्व ठेवावयाचें असल्यास, आपली मुलगी खुस्रूस दिली पाहिजे, असा विचार मनांत आणून तिनें खुस्रूस आपला बेत कळविला. खुस्रूच्या लग्नाची गोष्ट मागें आलीच आहे. त्याचें आपल्या बायकोवर उत्कृष्ट प्रेम होतें, म्हणून त्यानें सात्त्विकपणास जागून राज्यावर लाथ मारिली, आणि नूरजहानचें बोलणें झिडकारून लाविलें. तेव्हां नूरजहान विचारांत पडली. मांडवगडाहून परत आल्यावर जहांगीर लाहोरास गेला. इतःपर लाहोर हेंच त्यानें आपलें मुख्य ठाणें केलें. उन्हाळ्याच्या दिवसांत तो काश्मिरांत जाई. व्यसनासक्त झाल्यामुळें त्याच्यांत फारसें त्राण राहिलें नव्हतें. तो केवळ नूरजहानच्या मुठींत राहून कसे तरी दिवस लोटीत होता. त्याच्या सर्व पुत्रांत शहाजहानच काय तो धूर्त असून पाहिजे ती खटपट करून राज्य मिळविण्यास झटत होता. खुस्रूनें लग्न करण्याचें नाकबूल केल्यावर सर्वांत धाकटा पुत्र शहर्यार यास नूरजहाननें आपली मुलगी देण्याची तजवीज करून जहांगीरच्या पश्चात् त्याजकडेच राज्य चालविण्याची खटपट सुरू केली. त्यामुळें अर्थात् इतर तीनही शहाजाद्यांशीं ती वांकडी झाली. तिघांचाही नाश करण्याचा तिनें घाट घातला. जहांगीर आतां फार दिवस वांचत नाहीं हें तिला कळत होतें. इकडे तिचा भाऊ आसफ्खान शहाजहानचा सासरा असल्यामुळें त्या बहीणभावांचे हेतु भिन्न होऊन त्यांचेंही वांकडें आलें. आसफ्खानानें शहाजहानच्या वतीनें खटखट सुरू केली.

ह्या भांडणांत महाबतखान व खानखानान हे सामील झाले. खानखानाननें दक्षिणेंत अनेक अनन्वित कृत्यें केलीं होतीं. त्यानें शहाजहानचा पक्ष उचलिला. महाबतखान हा जातीचा रजपूत होता. त्याच्या हाताखालीं उत्तम रजपूत फौज होती. केवढेही प्रसंग आले तरी जहांगीरशीं राजनिष्ठा व्यक्त करून, त्यानें आपला रजपुती बाणा सोडिला नाहीं. खुस्रू हा उभय पक्षांच्या आड येत असल्यामुळें शहाजहान त्यास दक्षिणेंत

घेऊन गेला, तेव्हां त्यास कोणीं हरकत केली नाहीं. तिकडे त्याचा खून झाला हें मागें आलेंच आहे. जहांगीरची तब्यत विशेष बिघडली होती, ती बरी झाली व त्यास खुस्रूच्या मृत्यूची वार्ता कळली. तेव्हां खुस्रूचा मुलगा बुलकी यास जवळ आणून त्यानें त्यास गादीचा हक्कदार नेमिलें. हें पाहून नूरजहान अस्वस्थ झाली. बुलकी एकटा आहे, त्याचा समाचार सहज घेतां येईल, प्रस्तुत शहाजहानचा बंदोबस्त करावा, असा तिचा मानस होता. शहाजहानला दक्षिणेंतून काढण्याची तिनें एक युक्ति केली. इराणच्या शहानें कंदाहार काबीज केलें होतें (१६२१), तें जाऊन परत घेण्याचा बादशहाकडून तिनें शहाजहानास हुकूम पाठविला. शहाजहाननें कळविलें, कीं 'दक्षिणेंत बंडे फार आहेत; तर ह्या संधीस मला येतां येत नाहीं.' तेव्हां नूरजहाननें दुसराच बेत करून कंदाहार परत घेण्याचें काम शहर्यार यास दिलें. शहाजहानच्या हाताखालच्या मोठमोठ्या सरदारांस आपल्या फौजा घेऊन शहर्यार यास मिळण्याचा हुकूम झाला. तेव्हां शहाजहान निकरावर आला. त्यास नूरजहानशीं लढाई तर करितां येईना. आसफ्खानाचें त्यास आंतून साह्य होतेंच. त्यानें एक भयंकर युक्ति योजिली. ती तडीस गेली असती, तर शहाजहानास सगळे सरदार येऊन मिळाले असते. अलीकडे बादशहाचें ठाणें लाहोरास होतें. परंतु बादशाही खजिना आग्र्यास होता. तो उठवून लाहोरास न्यावा असें आसफ्खानानें बादशहास सुचविलें. खजिना बाहेर काढिला, म्हणजे शहाजहाननें एकदम येऊन तो काबीज करावा असा घाट होता. शहाजहान लोभी व महत्त्वाकांक्षी होता. प्रत्यक्ष बापाची चोरी करण्यास तो मागेंपुढें पाहणारा नव्हता. त्यास ही युक्ति पसंत पडून तीप्रमाणें वागण्याचा त्याचा निश्चय झाला.

आसफ्खानानें तिजोरी उठविण्याबद्दल बादशहाचा हुकूम आग्र्याच्या खजिनदारास आणून पोंचविला. त्यास तो हुकूम चमत्कारिक भासला. विनाकारण खर्च येऊन, दगा होण्याचा संभव आहे असें त्यानें परत कळविलें. पण आसफ्खानानें ती सबब ऐकिली नाहीं. उंटें भरून खजिना बाहेर पडणार, इतक्यांत शहाजहान त्वरा करून दक्षिणेंतून येत आहे, ही वार्ता खजिनदारास समजली. तेव्हां एकदम त्याच्या डोळ्यांत उजेड पडला. त्यानें क्षणांत सर्व घाट ताडिला, आणि उंटावरून खजिना

उतरून तो परत किल्ल्यांत भरिला. शहाजहाननें आग्र्याचा किल्ला काबीज करण्याचे होते तेवढे प्रयत्न केले, पण ते सिद्धीस गेले नाहींत. इतक्यांत जहांगीर लाहोर सोडून दिल्लीस येत आहे असें त्यास कळलें. तेव्हां बापाशींच युद्ध करण्याशिवाय दुसरा मार्ग त्यास उरला नव्हता. ह्या कृत्यानें जहांगीरच्या डोळ्यांतील झोंप चांगली उडाली. खजिना लुटण्याची वार्ता आकाशांतल्या कुऱ्हाडीप्रमाणें त्याजवर येऊन आदळली. त्यानें सर्व बाजूंकडून फौजा मागविल्या. काबूलचा सुभेदार महाबतखान, बंगालचा कारभारी पर्वीझ् वगैरे सर्व त्यास येऊन मिळाले. दिल्लीनजीक बापलेकांची निकराची लढाई झाली. शहाजहानास जय मिळण्याचा योग आला होता. त्याच्या फौजेंतील एका इसमानें जाऊन जहांगिरास पकडिलें. पण त्यांत तो इसम मारला गेल्यामुळें त्याचे सर्व लोक पळाले, आणि शहाजहानलाही पळून जाण्याशिवाय दुसरा मार्ग राहिला नाहीं. तो थोड्या स्वारांनिशीं निसटून मेवाडच्या डोंगरांत गेला. पुढें कांहीं दिवसांनीं बापलेकांचा पुनः समेट झाला. शहाजहाननें धुळींत बापासमोर साष्टांग नमस्कार घातला; आणि पुनः असें दुष्कृत्य न करण्याची शपथ वाहिली. शेवटीं जहांगीरनें त्यास क्षमा केली. तथापि थोड्याच दिवसांत शहाजहाननें पुनः बंडाळी मांडिली. शहाजादा पर्वीझ्वर बादशहाची विशेष मर्जी होती. त्यानें महाबतखानास सेनापति केलें, तेव्हां पर्वीझ्चें वजन सहन न होऊन शहाजहाननें बंड केलें. खानखानान ह्यास महाबतखानाचा हेवा वाटून तो शहाजहानास मिळाला. ते दोघे बऱ्हाणपुराकडे गेले. पर्वीझ् व महाबतखान ह्यांनीं त्यांचा पाठलाग चालविला. इतक्यांत खानखानाननें शहाजहानास पकडून देऊन स्वतःचा बचाव करण्याचा विचार चालविला. पण हा बेत घडून येण्यापूर्वींच तो शहाजहानास समजून आला, आणि तो स्वराज्य सोडून दूर पळाला. तेव्हां खानखानान उघडपणें पर्वीझ् यास जाऊन मिळाला. शहाजहान कोणीकडे गेला, त्याचा पुष्कळ दिवस पत्ताच लागला नाहीं. कित्येक महिन्यांनीं तो एकदम बंगाल्यांत प्रगट झाला. बऱ्हाणपुराहून तो तैलंगणांतून ओढ्या प्रांतांत व तेथून बंगाल्यांत गेला. शहाजहानची चपळाई पाहून अलाउद्दीन व मलीक काफूर ह्यांच्या त्वरेची लोकांस आठवण झाल्याशिवाय राहिली नाहीं. बंगालची राजधानी

डाक्का येथें तो एकाएकीं आला. तेव्हां तेथील अधिकारी घाबरून काशीस पळून गेला. शहाजहाननें सर्व बंगालप्रांत उद्ध्वस्त केला, व लोकांची संपत्ति हिरावून घेतली. त्यानें इतका छळ मांडिला, कीं त्यास लोक चळचळां कापूं लागले.

पर्वीझ् व महाबतखान तयारींत होतेच. दक्षिणेंतून अलाहाबादच्या रस्त्यानें ते काशीस आले. तेथें एक लढाई होऊन शहाजहानचा पराजय झाला. ह्या प्रसंगीं रजपूत-मुसलमानांचें वांकडें होतें, तेंच शहाजहानच्या पराभवास कारण झालें. रजपुतांच्या पराक्रमामुळें शहाजहानास जय मिळण्याचा योग आला होता, इतक्यांत त्याचे मुसलमान साथीदार अलिप्त राहिले. रजपुतांस पाठबळ राहिलें नाहीं; तेव्हां ते रणांगण सोडून पळाले. शहाजहान पुनः नशिबाची परीक्षा पाहण्याकरितां चारहजार स्वारांनिशीं दक्षिणेंत गेला. वास्तविक रजपूत व मुसलमान ह्यांच्या तंट्यांनीच सर्व राज्याचा विध्वंस व्हावयाचा होता. अकबरानें हे दोन पक्ष एकमेकांवर दाब म्हणून मुद्दाम कायम राखिले होते. त्याच्या वेळेस मुसलमानांचें अंग जहांगीरच्या पक्षांत होतें; आणि रजपूत लोक खुस्रूच्या पक्षांत होते. जहांगीर तख्तावर आल्यावर त्यानें लष्करी ठरीव पद्धत म्हणून ठेविली नाहीं. स्वतःची लहर किंवा नूरजहानचा दपटशा ह्यांच्या जोरावर कसा तरी कारभार चालला होता. तरी त्याचा कल मुसलमानांकडे असे. पण खुस्रूच्या बंडानंतर तो रजपुतांकडेही कांहींसा वळला होता. त्यामुळें सैन्यांत दोन पक्ष होते. महाबतखान रजपूत असून खानखानान हा रजपुतांचा पाडाव करण्यास टपला होता. महाबतखानास हें कळून आल्यावर त्यानें खानखानान ह्यास आटकेंत ठेविलें. तरी त्यानें आपल्या खटपटी सोडिल्या नाहींत. त्यानें महाबतखान व पर्वीझ् यांचें भांडण लाविलें. इकडे नूरजहान व आसफ्खान यांचे महाबतखानाच्या नाशाचे बेत चालू होतेच. ते सिद्धीस जाऊन त्या रजपूत सरदाराचे दिवस भरले. जहांगीरनें खानखानान यास लाहोरास पाठवून महाबतखानाचें सेनापतीचें काम काढून घेतलें, आणि त्याच्या जागीं खानजहान नामक दुसऱ्या एका अफगाण सरदाराची नेमणूक केली. या कृत्यावरून जहांगीरच्या राज्यकारभाराचें धोरण दिसून येतें. अकबरानें अफगाणांचा

पाडाव करण्याकरितां रजपुतांस पुढें आणिलें. ह्या पद्धतीचे परिणाम पुढील कार्किर्दीत दिसून येतील.

महाबतखानाची कंबर खचली. जहांगिरास म्हातारचळ लागला असून खानखानान व नूरजहान ह्यांनीं आपला नाश केला हें त्याला माहीत होतें. तो आपल्या स्वतःच्या क़िल्ल्यांत जाऊन आपली राजनिष्ठा व्यक्त करण्याची संधि पाहत स्वस्थ बसला. पण नूरजहान एवढ्यानें निश्चिंत झाली नाहीं. तिनें त्यास ओढ्या प्रांतांत निघून जाण्याविषयीं आज्ञा केली. निराश होऊन त्यानें पांचहजार रजपूत जमा केले आणि लाहोरास जाऊन बादशहास भेटण्याचा निश्चय केला. आसफ्खान व नूरजहान ह्यांस त्याची प्रत्येक हालचाल कळत होती. त्यांना रजपुतांची भीति फार होती. महाबतखान बादशहाचें मन आपणाकडे वळवील असें त्यांस वाटत होतें. म्हणून जहांगीरकडून त्यांनीं महाबतखानास असें कळविलें, कीं 'तुम्हीं आपल्या अपराधाचा जबाब देण्यास एकटेंच यावें, बरोबर फौज आणूं नये.' महाबतखानास ह्यांतील इंगित कळलें. त्याचा एक जांवई तरुण व साहसी होता, त्यास त्यानें बादशहाकडे आपल्यातर्फें बोलणें करण्यास पाठविलें. जांवई आला ही गोष्ट नूरजहाननें बादशहास कळविली नाहीं; आणि मधल्यामध्यें हुकूम सोडून महाबतखानाचा सूड घेण्याचा विचार चालविला. जेव्हां महाबतखानाचा जांवई बादशहाच्या छावणीजवळ पोंचला, तेव्हां तिनें त्यास हत्तीवरून उतरवून वीर्योत्तेजक सर्व कपडे काढण्यास लाविलें आणि हलकट चिंध्या घालण्यास दिल्या. नंतर त्यास काठ्यांनीं बडवून एका रोडक्या तट्टावर पृष्ठमुख बसविलें, आणि अशा रीतीनें फौजेंतून त्याची धिंड काढिली. हें वर्तमान ऐकून महाबतखानाचें पित्त खवळलें. पण त्याचें प्रसंगावधान गेलें नाहीं. हें सर्व नूरजहानचेंच कृत्य होय, हें तो जाणून होता. महाबतखानाचेंचसें काय, पण वरच्यासारख्या कृत्यांनीं बहुतेकांचीं मनें तिच्याविषयीं बिथरलीं. ह्या सर्व गोष्टी जाणून त्याप्रमाणें महाबतखान वागत होता. बादशाही फौज लाहोर सोडून काबुलास जात होती. होड्यांच्या पुलावरून झेलम नदी उतरून लोक पलीकडे चालले होते. उजाडण्याचे सुमारास बहुतेक फौज व सर्व सामानसुमान नदीपार होऊन जहांगीर बायकामुलांसह पलीकडच्या बाजूस निजला होता. महाबतखान नजीक आहे, हें माहीत असतांही आसफ्खानानें बादशहाचा बंदोबस्त बरोबर

ठेविला नाहीं. ही संधि साधून महाबतखानानें तावडतोब येऊन आपल्या रजपूत लोकांनिशीं बादशहास वेढून आपल्या ताब्यांत घेतलें. त्या वेळीं जो घोंटाळा उडाला, तो कांहीं विचारूं नये. दोनशें लोक बरोबर घेऊन महाबतखान बादशहाच्या तंबूत शिरला. एक नोकर बाहेर येऊन म्हणाला, 'काय महाबतखान, काय ही अमर्यादा! तुमच्या धाडसास सीमा आहे काय? जरा येथें थांबा, बादशहास हें वृत्त कळवून तुमची खोडच मोडितों!' ह्याच नोकरानें त्या वेळच्या घालमेलींची सुरेख हकीकत लिहून ठेविली आहे. महाबतखानानें उत्तर केलें नाहीं. त्याच्या नोकरांनीं फळ्यांची पडदी फोडिली, तेव्हां बादशहा बाहेर येऊन बसला. महाबतखान अदबीनें पुढें जाऊन बोलला, 'आसफ्खानाच्या तडाक्यांतून सुटणें मला अशक्य झालें आहे. माझी फजिती होऊन मरण येणार असें पाहून, नाइलाजास्तव असें धाडस व मर्यादोल्लंघन करून मी आपणास शरण आलों आहें. मरणाची किंवा इतर शिक्षा मला देणें आपल्या मतें योग्य असेल तर आपण तसें एकदम फर्मान करा; ती मीं आपल्यासमोर भोगावी इतकीच ह्या दासाची इच्छा आहे.' बादशहास उत्तर देण्यास सवडच मिळाली नाहीं. महाबतखानाचे लोक आंत घुसले आणि बादशहा त्यांच्या ताब्यांत आला. प्रथमतः तो रागानें लाल झाला. पण क्षणार्धात आपलें मन आंवरून त्यानें पुढील सोंगाची बतावणी इतकी उत्तम सुरू केली, कीं तीमुळेंच अंतीं त्याची सुटका झाली. तो सर्वस्वी खानाच्या स्वाधीन झाला. खानानेंही त्यास त्याच्या योग्यतेनुरूप वागविलें. अंतःकरणांतून तर बादशहास नूरजहानच्या जाचांतून सुटल्याबद्दल समाधानच वाटलें असेल. त्यानें महाबतखानास तसें बोलून सुद्धां दाखविलें. मद्य व अफीण यांच्या सेवनांत त्यास कशाचीही काळजी किंवा दुःख वाटत नव्हतें. परंतु नूरजहानची स्थिति मात्र हातांतील भक्ष्य दुसऱ्यानें हिसकून घेतलेल्या वाघिणीप्रमाणें झाली. ती नदी उतरून पलीकडे गेली. तिला सुद्धां एकदम पकडिलें नाहीं, याजबद्दल महाबतखानास पुढें पश्चात्ताप झाला. खान बादशहास घेऊन शहर्यारच्या वाड्यांत जाऊन राहिला. नूरजहान नदी उतरून पलीकडे गेल्यावर तिनें आपले सर्व सरदार एकत्र जमवून त्यांजला उद्देशून भाषण केलें, कीं 'तुमच्या निष्काळजीपणानें व अव्यवस्थेनें असा प्रकार घडून आला. कोणाच्या

ऱ्यानीं मनीं नाहीं अशी गोष्ट घडन आली; आतां तुम्हांला आपल्या वर्तनाची लज्जा वाटत नाहीं काय? तर हें नुकसान भरून काढण्यास तुम्हीं झटलें पाहिजे.' इकडे पूल मोडला, व उतारावर नदी उतरून बंडखोर खानाशीं लढाई करण्याचा त्या सरदारांनीं विचार केला. तो उतार वाईट होता, व सर्वच धांदल उडाली. वर सांगितलेला गृहस्थ म्हणतो, 'मी नदीची एक शाखा उतरून दुसरीचे कांठीं नशीबाचे खेळ पाहत उभा असतां, राणीचा कामदार येऊन बोलला, 'बेगमसाहेब विचारतात, ही वेळ उशीर किंवा हयगय करण्याची आहे काय? चला पुढें तडाख्यासरसे. वाट काय पाहतां?' राणी सुद्धां त्याच गर्दीत हजर होती. हत्तीवर बसून ती कशीबशी पलीकडच्या कांठावर गेली. तेथें रजपूत लोक तिला अडविण्याकरितां उभे होते. तिच्या हौद्यांत बसलेल्या दासीला एक बाण लागला. तो राणीनें ओढून काढितांना तिचें अंग रक्तानें भरून गेलें, तरी ती डगमगली नाहीं. ती स्वतः छातीची असून कुशल व अचूक नेम मारणारी बायको होती. तिनें स्वतः अनेक वाघ मारिले होते. वाघ मारण्याच्या तिच्या हौसेची जहांगीरनें आपल्या वर्णनांत फारच तारीफ केली आहे. तथापि ह्या प्रसंगीं तिचें कांहींच न चालतां फौजेसह पराभव पावून ती परत फिरली. रजपुतांनीं तिला नेऊन बंदींत ठेविलें. आसफखान पळून महाबतखानास जाऊन मिळाला. इकडे बादशहा महाबतखानाशीं फारच गोडीनें वागूं लागला. त्यानें त्याजवर इतकी मेहेरबानी दाखविली, कीं महाबतखानाचे मनांत बादशहाविषयीं मुळींच आकांक्षा राहिली नाहीं. वास्तविक रीत्या नूरजहानचाच नाश करण्याचा त्याचा विचार होता. तिनें सर्व राज्यांत अंदाधुंदी माजविली होती. सर्व लोक तिजविरुद्ध ओरडत होते. तेव्हां सुटका करून घेण्याचा शेवटचा उपाय तिनें केला. बादशहाला एकवार डोळ्यांनीं पाहण्याची तिनें परवानगी मागितली, ती मोठ्या संकटानें महाबतखानानें दिली. भेट झाल्यावर तिनें जहांगिरास आपणाकडे वळविलें. तिला बंदींतून मोकळें करण्याविषयीं बादशहानें महाबतखानाची विनंति केली. त्याच्यानें 'नाहीं' म्हणवेना. त्याला वाटलें कीं बादशहा आपणाला आतां कधीं सोडणार नाहीं. कदाचित् बायकोचा जीव घेणें त्याला अप्रशस्त वाटलें असेल. असें समजून तिला खानानें सोडून दिलें. मोकळी झाल्यावर

नूरजहाननें आपले बेत चालविले. बादशहाचें वर्तन दिसण्यांत तरी अगदीं साधें होतें. नूरजहान जें जें बादशहाशीं अंतस्थपणें बोले तें तें सर्व तो खानास कळवी. महाबतखानाचा जीव घेण्याचा तिचा विचार आहे हें सुद्धां बादशहानें त्यास कळविलें. तरी महाबतखान बेफिकीर राहिला. त्याचे कित्येक शूर साथीदार लढाईत पडले होते. नूरजहान त्याजविरुद्ध खटपट करीतच होती.

रजपूत व मुसलमान ह्यांजमधील दुफळी दिवसेंदिवस वाढतच होती. म्हणून अफगाण व मोगल ह्यांचा मिलाफ करून तिनें त्यांस रजपुतांचा सूड घेण्यास प्रवृत्त केलें. खरोखर मोगल सरदार ह्यांत सामील होते कीं काय हा प्रश्नच आहे. आपली सर्व फौज एके ठिकाणीं जमवून तिची पाहणी करावी अशी युक्ति तिनें बादशहाचे मार्फत अंमलांत आणिली. त्या प्रसंगीं तिनें आपल्या पक्षाचे पुष्कळ लोक जमा केले. सर्व फौज एकत्र जमली. 'तुम्ही आपली रजपूत फौज घेऊन बाजूला रहा, नाहीं तर विनाकारण त्यांची व मुसलमानांची झटापट होऊन रक्तपात होईल', असें बादशहानें महाबतखानास कळविलें. त्या सरदारानें ती गोष्ट कबूल केली हा मोठा चमत्कार आहे. शेवटीं बादशहाजवळ थोडेच लोक राहिले. फौजेची तपासणी करण्यास गेला असतां राणीच्या स्वारांनीं बादशहास गराडा घालून आपले ताब्यांत घेतलें. येणेंप्रमाणें युक्तिमान् राणीच्या साह्यानें बादशहा बंदींतून मुक्त झाला. परंतु महाबतखानाचें पारिपत्य त्यास एकदम करितां येण्याजोगें नव्हतें. शहाजहानला पकडून आणण्याची त्याला आज्ञा झाली. तसेंच आसफ्खानास सोडून देणें त्यास भाग पडलें. शहाजहानवर चालून जाण्यास प्रथम त्यानें नाखुषी दर्शविली. पण नूरजहाननें दरडावल्याबरोबर त्याच्यानें नाहीं म्हणवेना. तो दोनहजार लोकांनिशीं निघून उदेपूरच्या राण्याकडे गेला. नूरजहाननें राण्याकडून त्यास परत मागितल्यामुळें तो दक्षिणेंत जाऊन शहाजहानास मिळाला. ह्याच संधीस शहाजदा पर्वीझ् मद्यातिरेकानें एकाएकीं मरण पावला, (स. १६२६), नाहीं तर महबतखान त्यासच जाऊन मिळाला असता. पर्वीझ् यास शहाजहाननें विषप्रयोग केला असेंही कित्येकांचें म्हणणें आहे.

जहांगीरच्या कार्किर्दीस २२.वें व वयास ६० वें वर्ष लागलें. नूरजहानच्या हातीं सर्व सत्ता होती. शहाजहानची फौज वाढत होती.

लाहोर येथें ता. ११ मार्च सन १६२७ रोजीं जहांगीरनें आपला बाविसावा नवरोजचा समारंभ केला; पण त्यांत नेहमींचा थाट झाला नाहीं. त्याची तब्येत बरी नव्हती, म्हणून लगेच तो हवाफेर करण्यासाठीं काश्मिरास गेला. रस्त्याच्या श्रमानें तो ज्यास्तच थकला. आतां आपले दिवस भरत आले, असें त्यास वाटूं लागलें. अन्नावरील वांछा उडाली. चाळीस वर्षें सेवन करीत असलेली अफूसुद्धां त्यास नकोशी झाली. एखाददुसरा मद्याचा प्याला असला कीं पुरे. बरोबर नूरजहान होती. तसेंच मुलगा शह्र्यार व नातू दावरबक्ष हेही बरोबर होते. ह्या वेडसर शह्र्यारला हाताशीं धरून, आपण राज्यकारभार करावा, अशी नूरजहानची इच्छा होती. इतक्यांत दुर्दैवानें शह्र्यारही आजारी पडला; आणि बापाची परवानगी घेऊन, लगेच काश्मिरांतून लाहोरास औषध घेण्याकरितां आला. बरोबर दावरबक्ष आला. त्याजवर देखरेख ठेवण्यास इरादतखान ह्या नांवाच्या आपल्या एका भरंवशाच्या सरदारास नूरजहाननें सांगितलें. उन्हाळा संपल्यावर जहांगीर काश्मीर सोडून, परत येण्यास निघाला. रस्त्यांत त्यास शिकारीची हुक्की येऊन, एका डोंगराच्या पायथ्याशीं शिकार करीत असतां, एक शिकारी डोंगरावरून घसरून बादशहा उभा होता, त्या ठिकाणीं येऊन, धाडकन् मरून पडला. ह्या यःकश्चित् गोष्टीचा परिणाम जहांगीरच्या दुर्बल मनावर विलक्षण झाला. त्याला वाटे, 'मृत्युच, त्या माणसाच्या रूपानें मला नेण्यासाठीं आला आहे.' त्या धास्तीनें तो अगदीं खंगला. त्याचा दमा व खोकला अतिशय वाढला; आणि रस्त्यांतच ता. २८ ऑक्टोबर रोजीं तो मरण पावला. सहाव्या दिवशीं त्याचें शव लाहोरास येऊन पोंचलें. आपल्या पश्चात् बुलकीनें तख्तावर बसावें असें त्यानें सांगितलें होतें.

क्षणमात्रांत नूरजहानची सत्ता गेली. नवऱ्याच्या वृद्धापकाळामुळें तिला मिळत असलेला मान त्याच्या शरिरांतील प्राणांबरोबरच नाहींसा झाला. तिनें जरी अनेक खटपटी केल्या, तरी राज्यकारभाराचें धोरण तिच्यांत नव्हतें. स्वार्थ व सूड ह्यांच्या योगानें ती अगदीं अंध झाली होती. शह्र्यारयाचा पक्ष घेऊन, महाबतखानास तिनें शहाजहानकडे जाऊं दिलें ही मोठी चूक होय. कदाचित् तिचे कांहीं अंतस्थ हेतु असून ते इतिहासकारांस समजण्याजोगे नसतील. शहाजहान तिच्या-

विषयीं लुब्ध होता, असा अंदेश सर टॉमस् रो ह्यास होता. महाबतखानाच्या मुलावरही तिची प्रीति होती असें म्हणतात. पर्वीझ व जहांगीर ह्यांस विषप्रयोग केल्याचा आरोप कित्येकांनीं तिच्यावर घातला आहे. जहांगीरच्या मृत्यूनें जिकडे तिकडे एकदम गडबड सुरू झाली. शहाजहान बापाविरुद्ध बंड करून दक्षिणेंत होता. अगोदरच जहांगीरनें त्यास 'बेदौलत' (दौलतीस नालायक) ठरविलें होतें. शह्‌र्यार लाहोरास होता. आसफ्‌खान व इरादतखान हे दोघे प्रमुख सरदार जहांगीरजवळ हजर होते. इरादतखान हा इराणांतला एक सय्यद असून आसफ्‌खानाच्या वशिल्यानेंच वाढला होता. आसफ्‌ची मनापासून इच्छा जांवई शहाजहानास राज्य मिळावें, अशी होती. नूरजहानचा खटपटी स्वभाव आफ्‌सखानास न आवडून, ह्यापुढें तरी तिची खटपट चालूं द्यावयाची नाहीं, असा विचार ठरवून, जहांगीर मृत्यु पावतांच त्यानें इरादतखानाशीं खलबत केलें. लाहोर येथें शह्‌र्यार एकदम बादशाही पद धारण करील; शहाजहानास दक्षिणेंतून येण्यास निदान दोन महिन्यांचा तरी अवधि पाहिजे. शह्‌र्यारला एकदम कैद करावें, तर तेंही धोक्याचें होईल. अशा गोष्टी मनांत आणून, तूर्त खुस्रूचा मुलगा दावरबक्ष ऊर्फ बुलकी ह्याच्या नांवानें खुत्बा वाचवून, त्याजला त्यांनीं बादशाही पद दिलें; आणि त्याच्या हुकमानें शह्‌र्यार ह्यास अटकेंत ठेविलें. हा सर्व प्रकार त्यांनीं इतक्या ताबडतोब केला, कीं नूरजहानला प्रथम त्याची वर्दी सुद्धां लागली नाहीं. वास्तविक दावरबक्षास देखील हें पसंत पडलें नाहीं. नूरजहाननें कांहीं तरी खटपट केली असती, परंतु नवऱ्याचें शव टाकून तिला दूर जातां येईना; आणि सुतकामुळें ती अडकून पडल्यासारखी झाली. तिनें आसफ्‌खानास वारंवार भेटीस बोलाविलें, पण खान तिच्या भेटीस गेलाच नाहीं. इकडे त्यानें बनारसीदास नांवाचा एक भरंवशाचा मनुष्य आपली आंगठी देऊन, शहाजहानकडे पाठविला, आणि त्यास ताबडतोबीनें आग्र्यास बोलाविलें. लेखी पत्र असें त्यानें मुद्दामच दिलें नाहीं. पुढें जहांगीरचें प्रेत लाहोरास आलें. तेथें आसफ्‌खानानें नूरजहानवर जाता ठेवून, तिला कोणीं भेटूं नये, असा बंदोबस्त केला. इकडे दानियालचा मुलगा बायसंघर आसफ्‌खानास चुकवून, अगोदरच लाहोरास आला. त्यानें शह्‌र्यार ह्यास मदत करून, त्याजकडून लाहोरचा किल्ला

व खजिना ताब्यांत घेविवला; आणि दोघांनीं मिळून आसफ्खानावर चाल केली. लढाई होऊन, शह्र्यारचा पराभव झाला; आणि तो जाऊन जनानखान्यांत लपून बसला. पुढें त्यास व इतर सर्व राजपुत्रांस आसफ्खानानें कैदेंत ठेविलें. बायसंघर मात्र पळून अफगाणिस्तानांत गेला.

बनारसीदास वीस दिवसांनीं शहाजहानकडे येऊन पोंचला. प्रथम त्यानें महाबतखानाची गांठ घेतली. मग दोघांनीं जाऊन शहाजहानास झोंपेंतून जागें केलें; आणि जहांगीरच्या मृत्यूचा व पुढील सर्व प्रकार त्यास कळविला. शहाजहानला दुःख तर झालेंच; पण विलंब न करितां सुमुहूर्त पाहून, त्यानें आग्र्याकडे कूच केलें. तो प्रथम अहंमदाबादेस गेला. तेथून सर्व राजपुत्रांस मारून टाकण्याविषयीं त्यानें आसफ्खानास हुकूम लिहून पाठविला. ता. २१ जानेवारी १६२८ रोजीं हा हुकूम खानास पोंचला; आणि २३ जानेवारीस लाहोर येथें आसफ्खनानें त्यांस ठार मारिलें. येणेंप्रमाणें शह्र्यार, खुस्रूचे मुलगे दावरबक्ष व गर्शास्प, आणि दानियालचे मुलगे तह्मुरास व होशंग ह्या पांच दुर्दैवी राजपुत्रांचा वध झाला. पुढें शहाजहान अहंमदाबाद सोडून अजमिरास आला. तेथें शेख चिस्तीच्या दर्ग्याचें त्यानें दर्शन घेतलें. तेथपासून हळूहळू बहुतेक सरदार त्यास येऊन मिळूं लागले. ता. २४ जानेवारी रोजीं शहाजहान आग्र्यास पोंचला. दुसऱ्या दिवशीं आग्र्याचा किल्लेदार कासिमखान ह्यानें किल्ला व खजिना शहाजहानचे हवालीं केला. त्याचदिवशीं शहरांत शहाजहानच्या स्वारीची हत्तीवर मिरवणूक निघाली. नवीन बादशहाला पाहून, लोकांनीं आपले डोळे तृप्त करून घेतले. ता. ५ फेब्रुवारी रोजीं यथाविधि राज्यारोहणसमारंभ होऊन, खुत्बा वाचण्यांत आला. मारलेल्या राजपुत्रांचीं शवें लाहोरच्या बागांत पुरून शिरें शहाजहानकडे पाठविण्यांत आलीं. एवंच बादशाही तख्त मिळवितांना शहाजहानास स्वबांधवांच्या रक्तरूपी कर्दमांतून आक्रमण करावें लागलें.

८. जहांगीरची योग्यता.—‘ दुर्व्यसनें असूनही जहांगीर साठ वर्षांपर्यंत जगला, ह्यावरून त्याची प्रकृति निकोप होती. तो वेडा नव्हता. तो अक्कलवान् असून बापानें घालून दिलेलें वळण पुढें चालविण्याचें त्यास शहाणपण होतें. युद्धाचें काम हातीं घेतलें म्हणजे मग तो तें शक्य शेवटास नेई. त्याचा मनःक्षोभ झालेला नसला, म्हणजे तो

१९-५-११—१०-७९१-२०००

न्यायाचें कामही अगदीं चोख करी.' (लेन्पूल.) अकबराच्या सुव्यवस्थेमुळें जहांगीर बादशहास पुष्कळ सुख भोगतां आलें. त्याच्या अंगीं कित्येक चांगले गुण होते, पण मद्यपानाच्या नादामुळें त्याच्या गुणांचा प्रकाश पडण्यास सवड मिळाली नाहीं, आणि दुर्गुण मात्र पदोपदीं व्यक्त झाले. युद्धकलेंत तो बराच प्रवीण होता. त्यास स्तुति आवडत असे. छानछोकी करण्याची त्यास फार हौस होती. अंगावर उंची पोशाख व जडजवाहीर घालून तो बहुधा बाहेर पडे. खाण्यापिण्यांत तर मुळींच नियम नव्हता. आत्मसंयमन म्हणजे काय व मर्यादेंत राहून स्वतःचा बोज कसा राखावा, हें त्यास मुळींच कळत नव्हतें. प्राण गेला तरी आपला शब्द बदलावयाचा नाहीं, हा गुण त्याच्या ठिकाणीं नव्हता. आरंभीं त्याचा स्वभाव फार क्रूर होता, पण राज्याचें ओझें अंगावर पडल्यावर तो बराच निवळला. त्याचा मोठा दुर्गुण मद्यपान होय. ह्या मद्यपानाविषयीं त्यानें आत्मचरित्रांत पुष्कळ मजकूर लिहिला आहे. तो लिहितो, 'तेव्हांपासून मी मद्यपान करूं लागलों; दिवसेंदिवस तें वाढत गेलें; शेवटीं मी फार तीव्र मद्याचें सेवन करीं. नऊ वर्षांच्या अवधींत मी दररोज वीस प्याले पिऊं लागलों, पैकीं चौदा दिवसास व सहा रात्रीं पीत असें. शेवटीं माझ्या एका विश्वासु वैद्यानें ह्या व्यसनाबद्दल माझी चांगली कानउघाडणी केली. त्याचा उपदेश फार चांगला होता. सर्वांस जीव प्यारा आहे. म्हणून मी आपली संवय कमी करून दररोज सहा प्याले पीत असें; पंधरा वर्षांत ह्यापेक्षां कमी ज्यास्त कधीं प्यालों नाहीं.' मात्र कमी झालेल्या मद्याच्या बदल्यांत अफूचें सेवन तो करूं लागला. मद्यपानापासूनच त्याचे दोघे भाऊ मृत्युमुखीं पडले. स्वतः जहांगीर मद्यसेवन करीत असे, तरी इतरांनीं तसें न करण्याबद्दल त्यानें सक्त नियम केले होते. एकदां ह्या नियमांचें उल्लंघन चमत्कारिक रीतीनें घडलें. इराणचा वकील आला होता, त्यास मेजवानी देण्यांत आली. त्या वेळेस बादशहानें जवळच्या सर्व मंडळींस दारू पिण्यास सांगितलें. दरबारबक्षीकडे सर्व व्यवस्था होती. त्यानें सर्वांचे प्याले दारूनें भरले. रीतीप्रमाणें दारू पिणाऱ्या सर्व मंडळींचीं नांवें तवारिखींत नमूद झालीं. स्वतः बादशहा एवढा गुंग झाला होता, कीं आपण दारू पिण्याचा हुकूम दिला, हें त्याच्या ध्यानांत राहिलें नाहीं.

दुसरे दिवशीं दरबारांत कोणी एकानें आदल्या रात्रीं दारू प्याल्याचा उल्लेख केला. बादशहा रागानें लाल झाला. दारू पिण्याचा हुकूम कोणीं दिला म्हणून त्यानें विचारिलें. सर्वांनीं बक्षीचें नांव घेतलें. त्याबरोबर मागाहून गुन्हेगारांचीं नांवें वाचण्यांत आलीं, तेव्हां सर्वांस त्यानें आपणासमोर उभे केलें. कित्येकांस जबर दंड केले. कित्येकांस भरदरबारांत चाबकांनीं मारिलें. ह्या मारानें कित्येक अगदीं मरणोन्मुख होऊन पडले. तेव्हां जहांगीरनें लोकांकडून त्यांस लाथांनीं तुडविलें. एक इसम तर भरदरबारांत मरण पावला. बऱ्याच लोकांस तेथून उचलून न्यावें लागलें. इराणच्या वकिलास तो कांहीं बोलला नाहीं. गुन्हेगारांच्या तर्फेनें एक शब्द सुद्धां बोलण्याची कोणाची छाती नव्हती. ही गोष्ट मनास उद्वेग करणारी आहे खरी, पण तिजवरून बादशहाचा सद्धेतु व्यक्त होतो यांत संशय नाहीं. त्यानें आपल्या नाण्यांवर दारूच्या प्याल्याचें चित्र खोदलेलें होतें.

अंगीं अनेक दुर्गुण असतांही त्याच्या ठिकाणीं कित्येक नांवाजण्याजोगे गुण होते. मनोनिग्रह नसल्यामुळें त्याचे दुर्गुण वाढले. विलास व लहर यांच्या अमलांत जें काय त्याच्या हातून घडे, त्याशिवाय जाणून बुजून तो वाईट कृत्य करीत नसे. 'न्यायशृंखला' नांवाची जी सोन्याची सांखळी त्यानें कारकिर्दीच्या आरंभींच तयार करविली, ती साठ फूट लांब असून तीस साठ सोन्याच्या घंटा होत्या. ती त्याच्या बसण्याच्या खोलीपर्यंत नेलेली होती. तिच्या योगानें सर्वांस वाटेल तेव्हां बादशहाची भेट घेतां येत असे. जहांगीरनें सर्व प्रकारच्या विद्येस चांगलें उत्तेजन दिलें. दररविवारीं तो गरिबांस दानधर्म करीत असे. शिल्पकला व इतर कसबें यांची त्यास फार आवड होती. सृष्टिसौंदर्य, बागबगीचे, व फुलांचे ताटवे त्यास अत्यंत रमणीय वाटत. एकाद्या सुंदर प्रदेशांत त्याचें मन रमलें, म्हणजे त्यास कशाचेंच भान राहत नसे. काश्मिरास जात असतां त्याची फौज एकदां नदीकिनाऱ्यावरून चालली होती. तेथें सुंदर व चित्रविचित्र रंगांचीं फुलें अतोनात उगवलेलीं त्याच्या दृष्टीस पडलीं. तो म्हणतो, 'मी आपल्या सर्व लोकांस त्या फुलांचे गुच्छ करून आपापल्या पागोट्यांत खोवण्यास सांगितलें, तेणेंकरून एक नवीन चालता बोलता फुलबाग तयार झाला. दुसऱ्या एका ठिकाणीं इतकीं सुंदर फुलें उगवलीं होतीं, कीं त्यांवरून दृष्टि

परत फिरविणें शक्य नव्हतें. हवाही उत्तम सुटली होती. 'मीं त्या वेळेस मद्यप्राशन करून चैन केली. हा प्रवास मला अत्यंत सुखकर वाटला.' सारांश, सृष्टिसौंदर्यापासून मनास आल्हाद करून घेण्याचा मोगलांचा स्वभाव जहांगीरच्या ठिकाणीं उतरला होता. 'काश्मीरदेश फार आल्हाद-दायक आहे. पावसाळ्यांत व उन्हाळ्यांत तेथील शोभा अप्रतिम असते. मीं तो देश प्रत्यक्ष पाहिला, तेव्हां मला वाटलें होतें, त्यापेक्षां तो अतिशयच रमणीय दिसला. काश्मिरांत केशर विपुल उत्पन्न होतें, तितकें दुसरें कोठेंही होत नाहीं. केशराचे मळे दोन दोन मैल लांबीचे असून ते दुरून फारच शोभिवंत दिसतात. त्यांचा वास इतका तीव्र असतो कीं, त्यानें डोकें दुखूं लागतें. पण काश्मीरच्या लोकांस हा विकार होत नाहीं. जमिनीचा पृष्ठभाग गालिचा आंथरल्याप्रमाणें सुंदर दिसतो.'

जहांगीर चांगला शिकारी होता. मर्दुमकीचे खेळ त्यास आवडत. मित्रांशीं तो अत्यंत प्रेमभावानें वागे, पण त्यांच्या स्वार्थासाठीं तो रयतेच्या कल्याणांत अंतर पाडीत नसे. प्रोफेसर डॉसन त्यानें जहांगीरच्या योग्यतेविषयीं खालील अभिप्राय दिला आहे. 'जहांगीरच्या आत्मचरित्रावरून त्याची योग्यता सामान्य नव्हती असें दिसतें. आपल्या अंगचे दुर्गुण व व्यंगें त्यानें स्पष्टपणें कबूल केलीं आहेत. केवळ आत्मचरित्र वाचलें म्हणजे त्याची बुद्धिमत्ता व योग्यता ह्यांविषयीं वाचणाराचा ग्रह फारच चांगला होतो. जवाहीर, फुलें, कलाकौशल्य, सृष्टिशोभा यांची त्यास फार आवड असून तो शिकार करण्यांत तरबेज होता. मद्याच्या धुंदींत तो नसे, तेव्हां न्याय व औदार्य हे गुण उत्तम प्रकारें व्यक्त होत. परंतु गादीवर येण्यापूर्वी बाटलीच्या नादांत त्यानें अनेक क्रूर कृत्यें केल्याचा पुरावा आहे.'

जहांगीरविषयीं ब्लॉक्मनचा अभिप्राय खालील आशयाचा आहे. 'जहांगीरची योग्यता ठरविणें विशेष कठीण नाहीं. मी व माझें ह्या पलीकडचा विचार त्यास फारसा शिवला नाहीं. त्यानें लिहविलेलें आत्मचरित्र वाचिलें असतां, त्याचा मूर्ख व बालिश स्वभाव पदोपदीं दृष्टीस पडतो. त्याला भुरळ पाडून, त्याजवर छाप बसविणारा कोणी भेटला, कीं तो त्याच्या तंत्रानें चाले. लहर हीच त्याची नीति. अंतःकरणांत दयेचा पाझर होता, पण लहरी स्वभावामुळें तो पाझर बाहेर आला नाहीं.

एखादां निःशस्त्र मनुष्याची व वाघाची कुस्ती लावून, तो मजा पाहत असे. माणसांना हत्तीच्या पायांखालीं तुडवून, तो आपली करमणूक करून घेई. तथापि जुन्या नोकरांना किंवा नातेवाइकांना त्यानें बिलकुल दुखविलें नाहीं. शहाजहान व औरंगजेब ह्यांनीं जसे एकूणएक नातेवाईक मारून टाकिले, तसा प्रकार जहांगीरनें केला नाहीं. प्रसंगविशेषीं तो दया दाखवी, परंतु आपल्या हातांत बरेंवाईट करण्याची केवढी सत्ता आहे, हा विचार त्याच्या मनांत कधीं आलेला नाहीं. एखादें चांगलें काम सुद्धां तो भलत्याच उद्देशानें करी. गांवांतले गरीब लोक जमवून आणून, त्यांस दानधर्म करी, पण तो कशाकरितां ? तर करमणूक होऊन वेळ जावा म्हणून; लोकांचें दुःख निवारण करण्याकरितां नव्हे. अडचण आली, म्हणजे देवास नवस वगैरे करण्यांत वाटेल तेवढा उदार, पण पुढें ते नवस पाळील, तर शपथ. त्याचें आत्मचरित्र अगदीं सोप्या भाषेंत लिहिलेलें आहे; पण त्यांत सर्व खानपानाच्या, शिकारीच्या आणि नेमणुकांच्या क्षुल्लक हकीकती भरलेल्या आहेत. एखादा उदात्त विचार किंवा स्वतःचा एखादा अनुभव ह्यांपैकीं कोठें कांहीं सांपडावयाचें नाहीं. एकाही विद्वानाचें किंवा सुंदर पुस्तकाचें नांव त्यांत नाहीं. त्याच्या थोरपणाचें निदर्शक असें एकही वाक्य त्यांत नाहीं. शिकारींत त्यानें सतराहजार प्राणी मारिले, त्यांची नांवनिशीवार यादी त्यानें दिली आहे.

'जहांगीरचा मद्यपानाचा नाद विलक्षण होता. शहाजहानचा वाढदिवस होता, त्या दिवशीं त्याचें वजन केल्यावर जहांगीर त्यास म्हणतो, 'बाबा तूं अजून मद्यास कधीं स्पर्श केला नाहीं. तुला आतां मुलें झालीं. म्हणून सणावारीं वगैरे मद्य घेण्याची मी तुला परवानगी देतों. मी पंधरा वर्षांचा असतांच दारू पिऊं लागलों, हळूहळू ही माझी चटक वाढून माझी प्रकृति बिघडली. हकीम हुमामनें मला सांगितलें, हें व्यसन मीं सोडिलें नाहीं, तर मी लवकरच मरेन. तेव्हांपासून मीं तें अगदीं मर्यादित ठेविलें आहे. मी अफूचेंही सेवन करितों. माझें वय हल्लीं शेचाळीस वर्षांचें आहे, आणि मला दररोज चौदा रती अफू लागते.' ह्या मद्यपानानें सर्व बादशाही कुटुंबाचा नाश झाला. विशेषतः जहांगीरच्या वेळेस बादशहानेंच त्यांत पुढाकार घेतल्यामुळें सर्व दरबार दारूबाज बनलें.

जहांगीरनें केलेलीं त्याचीं वर्णनें ऐकून अंगावर रोमांच उभे राहतात हिंदु सरदार सुद्धां दारूबाज बनले. अंबरचे भावसिंग, जगत्सिंग, महा सिंग हे सर्व ह्या व्यसनाला बळी पडले. थोर मंडळीच्या ह्या वर्तनाचा परिणाम सामान्य जनसमूहावरही पुष्कळ झाला. प्रांतोप्रांतीं हें व्यसन व तदंगभूत गुन्हे व अनाचार अतोनात वाढले, त्यामुळें राज्यकारभारांतही घोटाळे माजले.

'जहांगिरास राज्यकारभारांत मन घालण्याची बिलकुल हौस नव्हती. तो म्हणतो, कोणत्याही विषयाच्या बारीक तपशिलांत शिरणें बादशहास शोभत नाहीं. उलट पक्षीं, शांतपणें बारीक तपशील समजून घेणें हेंच राजाच्या थोरपणाचें लक्षण होय, असें अकबर समजत होता. जहांगीरच्या अंगीं नांव घेण्यासारखा एकही गुण नव्हता; म्हणूनच त्याच्या कारकिर्दीत सार्वजनिक महत्त्वाची गोष्ट कांहींच घडली नाहीं. अकबरानें रानटी लोकांस कामास लावण्याकरितां त्यांची एक पलटण बनविली, अशा प्रकारची एकही गोष्ट जहांगीरची नमूद करण्याजोगी नाहीं. अकबरानें सारखीं तीस वर्षे खटपट करून शेंकडों वर्षे चालत आलेला उल्मांचा व 'सदर'चा अधिकार नाहींसा केला; आणि धर्मगुरूंचें थोतांड मोडिलें. त्याचा पुढें उपयोग करून, धर्माच्या बाबतींत कायमची व्यवस्था कांहीं एक जहांगीरनें केली नाहीं. ह्याच्या उलट युरोपियन लोकांनीं आपल्या धर्मसुधारणा किती नेटानें केल्या, तें इतिहास सांगतच आहे.

'स्वतःच्या धर्मसमजुतीसंबंधानेंही जहांगीर अगदीं बेफिकीर होता. अकबरानें स्वतः विचार करून आपला कांहीं एक निश्चित पंथ ठरविला, पण जहांगीरला एवढा विचार करण्याची ताकदच नव्हती. म्हणून लहर लागेल त्याप्रमाणें, क्षणांत हिंदु, तर क्षणांत पारशी, क्षणांत मुसलमान, तर क्षणांत ख्रिस्ती, अशी त्याची धरसोड चाले. त्याजपाशीं सर्व कांहीं ढोंग चालत. ढोंग हेंच त्याचें दैवत असें म्हटलें तरी चालेल. ग्रहांवर त्याचा विश्वास होता. ग्रहणाची किंवा ग्रहांच्या युतीची त्यास पराकाष्ठेची भीति वाटे. अशा वेळीं तो जनानखान्यांत वगैरे कोठें तरी अगदीं कोपऱ्यांत लपून बसे. अकबराच्या वेळेपासून ज्योतिषराय नांवाचा एक हिंदु ज्योतिषी दरबारांत नेहमीं हजर असे. जहांगीरच्या वेळेस जो ज्योतिषराय होता, त्याचीं भविष्यें तंतोतंत उतरत, त्याजबद्दल

सर्व दरबारास मोठा अचंबा वाटे. पण ज्योतिषरायास प्रश्न विचारल्या-बरोबर जहांगीरच्या अंगांत कापरें भरे. जहांगीरनें त्या ज्योतिष्याची एकदां सुवर्णतुलाही केली होती. आपण बादशहा आहों, म्हणून आपणास देव मुक्ति दिल्याशिवाय राहणारच नाहीं असा त्याचा समज होता. त्याच्या आत्मचरित्राच्या आरंभीं ईश्वरवंदनाचें किंवा प्रस्तावनेचें नांवसुद्धां नाहीं. महंमद पैगंबराचें नांव तर सर्व पुस्तकांत कोठेंही नाहीं. कित्येक प्रसंगीं तर कोणत्याही मुसलमानास तें टाळतां आलें नसतें.

'अकबरानें चालू केलेले हिंदु आचारविचार सलीमनेंही पुढें चालविले. दीपावलीपूजा, व गाईंना शृंगार घालून त्यांची मिरवणूक काढणें ह्या गोष्टी जहांगीर करी. शिवरात्रीच्या दिवशीं जोगी लोकांस वाड्यांत बोलावून त्यांजबरोबर उपाहार करी. राखीबंधनविधि तो पाळीत असे. कारकिर्दीच्या आठव्या वर्षी जहांगीरनें सिकंदरा येथें जाऊन बापाचें श्राद्ध केलें. कोणाही हिंदूला मुसलमान होण्याबद्दल जुलूम करूं नये, असें त्यानें फर्माविलें. हे सर्व प्रकार तो मनाची खात्री होऊन करीत होता असें नाहीं; तर केवळ लहरीखातर वेळ पडेल तसें तो आचरण करी. कारण अनेक वेळां देवळें व मूर्ति फोडणें व पुजाऱ्यांस ठार मारणें, इत्यादि क्रूर प्रकारही जहांगीरच्या हातून कधीं कधीं घडले आहेत. आपल्या मुली काफर हिंदूंना देणें त्यास बिलकुल पसंत नसे. पारशीधर्मांतील कित्येक विधि जहांगीर पाळीत असे. अकबरच्या नातवंडांपासून राजघराण्यांतील सर्व मुलांचीं नांवें फारशी चालींचीं ठेवण्यांत येऊं लागलीं. महंमद ह्या नांवाचा किंवा पैगंबराच्या कुटुंबांतील नांवाचा अकबरास मोठा तिटकारा असे. सूर्य व अग्नि ह्या देवतांस जहांगीर पूज्य मानी, परंतु अकबराचे विधी त्यानें मनापासून पाळिले नाहींत. एकंदरींत धर्मसंबंधांतही जहांगीर अनिश्चित होता. त्यास स्वतःचें ठरीव मत म्हणून कांहीं नव्हतेंच.' (Blochmann, Calcutta Review, 1869.)

९. **जहांगीरचा जीवनक्रम.**—जहांगीरचा रोजचा वर्तनक्रम अकबराच्या सारखाच होता. झरोका, दरबार, व घुशालखाना हे तीन मुख्य प्रकार कायमचे होते. बादशहास वारंवार लोकांच्या दृष्टीस पडावें लागे. तो जिवंत आहे अशी लोकांची खात्री झाली नाहीं, तर ते एकदम बंड करून उठत. दररोज सकाळीं जहांगीरचें दर्शन घेण्याकरितां

झरोक्यापुढील मैदानांत लोकांची गर्दी जमे. दुपारीं लष्करी व इतर खेळ होत. ह्या सर्व गोष्टींत जहांगीर व अकबर ह्यांजमध्यें भेद इतकाच होता, कीं जहांगीरचा स्वभाव क्रूर असल्यामुळें तो एकदम एखाद्यास ठार मारून टाकीत असे. परंतु दुसऱ्याचा जीव घेणें म्हणजे अकबराच्या जिवावर येई. हत्तीच्या पायांखालीं गुन्हेगार लोकांस तुडवून जहांगीर मजा पाहत स्वस्थ बसे. वाघाची व निःशस्त्र मनुष्याची झोंबी लावी. व्यभिचार बंद करण्याकरितां अकबरानें पुष्कळ इलाज केले; जहांगीरच्या दरबारांत गाणारणी व नाचणारणी यांचा सुळसुळाट झाला. अकबर शांत वृत्तीचा असून नेहमीं विद्वान् मंडळींच्या समागमांत कालक्षेप करी. जहांगीर हा मद्यपान, खुषमस्करी, व निरर्थक गप्पा ह्यांत आपला वेळ घालवी. अकबराच्या सबंध रात्री वादविवादांत निघून जात; जहांगीर आपल्या रात्री विलासांत घालवून पूर्ण धुंदींत आला म्हणजे बसल्या ठिकाणींच रात्रभर पडून राही. हॉकिन्स्नें असें लिहिलें आहे, कीं 'सकाळीं सूर्योदयाबरोबर उठून तो माळ घेऊन नामस्मरण करितो, नंतर झरोक्याशवळ येऊन लोकांस दर्शन देतो. पुढील दोन तास तो निजतो. निजून उठल्यावर भोजन करून नंतर जनानखान्यांत बायकांमध्यें बसतो. पुनः दुपारपासून तीनचार वाजेपर्यंत झरोक्याजवळ येऊन तमाशे, खेळ वगैरे पाहत बसतो. पुढें दरबारांत जाऊन सिंहासनावर बसतो. तेथें लहान थोर सर्व मंडळी हजर असते. मोठमोठे लोक लाल कठड्याच्या चौरंगी पीठावर बसतात आणि इतर त्याच्या खालीं बसतात. बादशहाच्या दुसऱ्या बाजूस एक अधिकारी चाळीस लोक बरोबर घेऊन लोकांस शिक्षा करण्याकरितां उभा असतो. त्यांजवळ दोऱ्या, कुऱ्हाडी, चाबूक वगैरे सर्व साहित्य असतें. दरबारांत राजा सर्वांच्या फिर्यादी ऐकतो; व इन्साफ करितो. दरबार आटपल्यावर बादशहा नमाज पढण्यास मशिदींत जातो. नमाज आटोपल्यावर पुनः भोजन होतें. त्याच वेळेस मद्यप्राशनास सुरुवात होते. भोजनोत्तर घुसलखान्यांत मंडळी जमते. ह्या ठिकाणीं तो मद्याचे पांच पेले झोकतो. वैद्य त्याला ज्यास्त पिऊं देत नाहींत. नंतर तो झोंपी जातो; आणि सर्व लोक घरोघर जातात. दोन तास झाल्यावर रात्रीं एक वाजण्याच्या सुमारास नोकर त्यास जागें करून आणखी थोडेसें खावयास देतात. तें आटो-

ल्यावर तो पुनः रात्रभर निजून राहतो. संध्याकाळचें भोजन झाल्यावर तो फारसा शुद्धीवर असत नाहीं. त्या वेळेस सुद्धां तो ज्या ज्या चेष्टा करितो, त्या सर्व दरबारलेखक तवारिखींत नमूद करितात. अगदीं क्षुल्लक व गुप्त गोष्टी सुद्धां ह्या तवारिखींत दाखल होतात.' वरील प्रकार घडत असतांच सरकारी कामें बादशहा पाहत असे.

बादशहाचा वाढदिवस मोठ्या समारंभानें साजरा केला जात असे. सोन्याच्या मोठ्या ताजव्यांत सहा वेळ बादशहाची तुला करण्यांत येई. सोनें, चांदी, मोत्यें, रेशमी कापड, धान्य, लोणी इत्यादि सहा पदार्थांनीं त्याचें वजन केलें जाई, आणि त्या वस्तु गरिबांस वांटून देत. जहांगीरच्या वजनाचा उल्लेख एकदां साडेसहाहजार तोळे व दुसऱ्या वेळीं नऊहजार तोळें, अशा प्रकारचा आढळतो. दुपारीं दरबारापुढें सर्व हत्ती समारंभानें बाहेर काढीत. हत्तींचे कळप असून प्रत्येकावर एक नायक हत्ती मुख्य असे. ह्या नायक हत्तीबरोबर चार नायिका हत्तिणी व आठ किंवा दहा दुसरे हत्ती असत. त्यांचें सर्व सामान सोन्याचांदीचें असून त्याजवर भरगच्ची निशाणें फडकत असत. अशा हत्तींच्या बारा टोळ्या बादशहास सलामी देऊन निघून जात. सर्वांतील मुख्य नायक हत्ती फारच सुंदर व बांधेसूद होता. त्याच्या अंगावरील सामानास हिरे-माणकें जडलेलीं होतीं. इंग्रज वकील सर टॉमस रो यास हा हत्तीचा देखावा पाहून अत्यंत मौज वाटली. त्या दिवशीं सायंकाळीं मोठा खाना होत असे. अशा प्रसंगीं बादशहा आपल्या मित्रमंडळीस मद्यप्राशन करण्याची मोकळीक देई. खाणापिण्यांत सर्व मंडळी अगदीं दंग होऊन जाई. बादशहा सोन्याचांदीच्या नाण्यांचा गरीब लोकांवर एकसारखा वर्षाव करीत असे. सोन्याचांदीचे बदाम तो आपल्या सरदारमंडळींत फेंकी, त्या वेळेस ते वेंचून घेण्यासाठीं लोकांची मोठी धांदल उडत असे.

सरदार लोकही बादशहास मेजवान्या करीत. तारीख ३१ मार्च सन १६१६ रोजीं आसफ्खानानें मेजवानी दिली. वाड्यापासून आसफ्खानाचा बंगला एक मैल दूर होता. तेथपर्यंत सर्व रस्त्यावर रेशमी कपड्याची बिछाईत करण्यांत आली होती. मेजवानी आणि पोशाक एवढ्याचा खर्च पंधरालाख रुपये झाला. शिकारीविषयीं जहांगीरनें लिहिलें आहे, कीं 'मीं आपल्या हातानें एकंदर १७१६८

प्राणी मारिले, त्यांपैकीं ८६ वाघ, ९ रानडुकरें, १३७२ हरणें, व बाकीचे पक्षी होते. काबूलचा इतिहास समजण्यासाठीं मी बाबरचें आत्मचरित्र वाचलें. त्यांतील चार भाग दुसऱ्यांच्या हातचे होते, ते मी स्वतः लिहून त्यांत घातले आणि शेवटीं तुर्कीभाषेंत कांहीं मजकूर ज्यास्त वाढविला. मी हिंदुस्थानांत वाढलों होतों, तरी तुर्की भाषा लिहिण्या-वाचण्यांत मी कमी नव्हतों.' सन १६२१ त त्यानें आपल्या नांवाची प्रसिद्ध मोहोर पाडिली. तिच्या एका बाजूस ओंठांस दारूचा प्याला लाविलेल्या बादशहाचें चित्र असून, दुसऱ्या बाजूस सिंहराशींत आलेला सूर्य काढिला आहे. मुसलमान लोक नाण्यांवर सुद्धां कधीं प्रतिमा काढावयाचे नाहींत, मद्य तर त्यांच्या धर्मांत वर्ज्य आहे. ह्या कारणांमुळें या जहांगीरच्या नाण्यांस महत्त्व आहे. त्याच वर्षी दुसरें नाणें पाडिलें, त्यावर मद्याच्या प्याल्याऐवजीं बादशहाचे हातांत पुस्तक आहे.

अशा प्रकारचें जहांगीर बादशहाचें चरित्र आहे. प्राच्य आणि पाश्चात्य राजपुरुषांची तुलना करितांना उभयतांचें स्थितिवैचित्र्य ध्यानांत ठेविलें पाहिजे. पाश्चात्य ग्रंथकार जहांगीर यास जुलमी व विलासी बादशहा असें म्हणतात. परंतु सीझर नांवाचे जे रोमन बादशहा झाले, त्यांहून जहांगीर ज्यास्त खुनशी, क्रूर किंवा जुलमी होता असें नाहीं. म्हणून सीझरांबद्दल पूज्यबुद्धि दाखविणारांनीं जहां-गिरास नांवें ठेवण्याची जरूर नाहीं. ज्याच्या अंगीं इंग्रज गृहस्थाच्या अंगचे सर्व विशिष्ट गुण पूर्णपणें वास करीत होते, अशा सर टॉमस रोनें अनेक प्रसंगीं जहांगीरची तुलना तत्कालीन इंग्लंडच्या पहिल्या जेम्स् राजाशीं केली आहे. त्यांत तो इंग्रज राजा, रो यासही विशेष चांगला वाटलेला नाहीं. व्हीलर म्हणतो, 'जहांगीरच्यासारखें लहरी व हट्टी वर्तन जेम्स्चे हातून सुद्धां घडलें हें इतिहासज्ञांस अवगत आहे. वास्तविक रीत्या पाश्चात्य आणि प्राच्य राजांची तुलनाच करितां येत नाहीं. दोहोंमध्यें अत्यंत स्थितिवैचित्र्य आहे. जहांगीर कितीही वाईट, अप्रबुद्ध व क्रूर असला, तरी पहिल्या जेम्स्पेक्षां तो ज्यास्त तिरस्कारार्ह नाहीं. त्याची राणी नूरजहान व इंग्लंडची राणी एलिझाबेथ ह्या दोघींच्याही कर्तृत्वशक्तींत पुष्कळ साम्य आहे, पहिलीचे हेतु तडीस गेले नाहींत, व दुसरीचे गेले इतकाच भेद. नूरजहानच्या तोडीची दुसरी समकालीन स्त्री

जगाच्या इतिहासांत सांपडत नाहीं. तिच्याशीं तुलना करण्याचें मनांत आणण्यास सुद्धां एलिझाबेथकडेच गेलें पाहिजे. नूरजहानच्या वेळेस सर्व आशियांतच काय, पण सर्व पृथ्वीमध्यें सुद्धां ती स्त्री महान् होती ह्यांत संशय नाहीं.'

१०. **जहांगीरचीं धर्मसंबंधीं मतें.**—जहांगीर बादशहा बाह्यतः मुसलमानी धर्मावर आपली निष्ठा दाखवीत असे; पण वस्तुतः त्याचीं मतें पुष्कळ भिन्न होतीं. पूर्वीं लोकांस खुष करण्याकरितां अकबरानें स्थापिलेल्या धर्माबद्दल त्यानें आपला तिरस्कार व्यक्त केला, आणि त्याच सबबीवर त्यानें बापाविरुद्ध बंड करून विद्वान् अबुल् फज्लचा खून केला. 'इस्लामाचें तारण करीन' अशी त्यानें प्रथम शपथ घेतली, तेव्हांच त्यास बादशाही तख्त प्राप्त झालें. अकबराचा ओढा रजपुतांकडे होता, त्याप्रमाणें जहांगीरचा ओढा मुसलमानांकडे होता. असें होतें, तरी त्याचा नेहमींचा वर्तनक्रम इस्लामाशीं विरुद्ध होता. डुकराचें मांस, मद्यप्राशन, पुरुष, बायका व जनावरें ह्यांचीं चित्रें व प्रतिमा इत्यादि इस्लामविरोधी विषयांवर त्याची विशेष आसक्ति होती. तो रोजे म्हणजे मुसलमानी उपास पाळीत नसे. बऱ्याच प्रसंगीं त्याची क्रिस्ती धर्माविषयीं आवड दिसून येत असे. बाह्य वर्तनांत त्याची श्रद्धा क्रिस्ती धर्मावर अकबरापेक्षांही ज्यास्त दिसून येई. पोर्तुगीझ लोकांनीं वाटेल तेथें आपलीं मंदिरें बांधावीं, शाळा घालाव्या, पाहिजे त्यास क्रिस्ती करावें, अशी त्यांस जहांगीरनें मोकळीक दिली. आपला भाऊ दानियाल याच्या मुलांस त्यानें क्रिस्ती धर्म शिकण्यास पाठविलें. क्रिस्ती पाद्र्यांचे उपदेश तो इतके ऐके, कीं हा क्रिस्ती झाला असें त्यांस वाटे.

ह्या कामीं जी मर्यादा अकबरानें उल्लंघिली नाहीं, ती जहांगीरनें ओलांडिली. त्याचे पुतणे क्रिस्ती झाले, त्या प्रसंगीं हत्तीवर बसवून त्यांस त्यानें शहरांत मिरविलें. ह्या त्याच्या कृत्यानें सर्व लोक चकित झाले. परंतु त्याची क्रिस्ती धर्माकडे इतकी प्रवृत्ति कां, हें पुढें कळून आलें. क्रिस्ती धर्मांत उपवास करावे लागत नाहींत; डुकराचें मांस आणि मद्य हीं वर्ज्य नाहींत, ह्या गोष्टी जहांगिरास आवडत होत्या. त्याचे पुतणे क्रिस्ती झाले, ते केवळ पोर्तुगीझ बायका मिळविण्याच्या उद्देशानें झाले.

जहांगीरनेंही आपल्या जनानखान्याकरितां पोर्तुगीज बायका मागण्यास आपल्या पुतण्यास सांगितलें होतें. ही मागणी ऐकून ते पाद्री चिडून गेले, आणि आपला हेतु सफळ झाला नाहीं असें पाहून, त्या शहाजाद्यांनीं आपले क्रूस फेकून दिले आणि पुनरपि मुसलमानी धर्म स्वीकारिला.

ह्या गोष्टीवरून प्रसिद्ध इतिहासकार व्हीलर यानें एक चमत्कारिक सिद्धांत काढिला आहे. 'क्रिस्ती धर्मांत एकापेक्षां ज्यास्त बायका करितां येत नाहींत म्हणूनच क्रिस्त्यांचे अव्याहत परिश्रम चालले असतांही हिंदुस्थानांतील लोक स्वधर्मत्याग करून क्रिस्ती धर्मांत शिरत नाहींत. ते मुसलमान होतात, पण क्रिस्ती होत नाहींत.' परकीयांनीं अम्हांविषयीं असे तर्क बांधणें आश्चर्यकारक नाहीं. धर्मत्याग करणें अशा सामाजिक फायद्यांवर अवलंबून असतें, तर इतर बाबतींत वर्तनस्वातंत्र्य मिळविण्याच्या आशेनें, एकच बायको करण्याची अडचण पत्करूनही, पुष्कळ लोक क्रिस्ती झाले असते. एकंदरींत धर्मांतराचीं कारणें पुष्कळ निराळीं आहेत. दिल्लीच्या राजपुत्रांस क्रिस्ती बायका मिळाल्या नसत्या असें नाहीं; पण एकदां लग्न केल्यावर, ते फिरून मुसलमान होऊन आणखी बायका करणार नाहींत म्हणून कशावरून? त्या राजपुत्रांस अस्सल गोऱ्या पोर्तुगीज मुली पाहिजे होत्या. जातिभ्रष्ट पोर्तुगीज मुली मिळण्यास अडचण पडली नसती.

जहांगीर बादशहाची जप करण्याची माळ होती, तीस आठ पदर होते; प्रत्येक पदरांत मोत्यांचे व हिरेमाणकांचे चारशें मणी होते. ज्या खोलींत तो प्रार्थना करीत बसे, तेथें येशू क्रिस्त व मेरी यांचें दगडी पुतळे ठेविलेले होते. फारशी लोकांचा नवरोज सण जहांगीरच्या दरबारीं मोठ्या समारंभानें पाळला जाई. त्या प्रसंगीं दरबारचा थाट विशेष भपक्याचा असे. अकबराप्रमाणें कधीं कधीं धर्मसंबंधीं वादविवाद जहांगीर करवीत असे. पण अशा प्रसंगीं वादविवादापेक्षां मद्यपानांतच बादशहाचें लक्ष विशेष असे. आग्र्यास जेझुइट पंथी क्रिस्ती लोकांचें एक प्रार्थनामंदिर होतें. त्या ठिकाणीं क्रिस्तीधर्माचें शिक्षण लोकांस देण्यांत येई. ह्या लोकांस अकबरानें करून दिलेल्या नेमणुका जहांगीरनें चालविल्या; इतकेंच नाहीं, तर त्यानें अन्य मदतही त्यांस पुष्कळ केली. शहाजहाननें मात्र पुढें क्रिस्ती लोकांचा छळ फार केला; आग्रा व लाहोर येथील मंदिरें नाहींशीं केलीं आणि त्यांच्या नेमणुकाही बंद केल्या.

एकंदरींत जहांगिरास धर्माची फारशी पर्वा नव्हती. त्याच्या विलासास जेणेंकरून व्यत्यय होईल असा धर्म त्यास नको होता. एकदां त्यानें सभा भरवून असा प्रश्न केला, कीं 'कोणत्या धर्मांत खाण्यापिण्याविषयीं निर्बंध नाहीं?' 'क्रिस्ती धर्मांत निर्बंध नाहीं,' असा जबाब मिळाल्यावर तो बोलला, 'तर मग आपणा सर्वांस क्रिस्ती धर्म स्वीकारणें भाग आहे.' त्याचप्रमाणें हिंदूंच्या मुली आपण कराव्या, परंतु आपल्या त्यांस देऊं नये असें त्याचें ठाम मत बनलें होतें.

११. जहांगीरची राज्यव्यवस्था.—ह्या सदराखालींही विशेष मजकूर देतां येण्याजोगा नाहीं. अकबराच्या पद्धतींत त्यानें विशेष फेरबदल केला नाहीं. अकबराचें अंतःकरण दयाळु असल्याळें सौम्य उपचारांनीं तो रयतेवर अंमल करीत असे. जहांगीरच्या स्वाभाविक क्रौर्यामुळें क्षुल्लक अपराधांस कित्येक वेळां कडक व तऱ्हेवाईक शिक्षा करण्यांत येत. एकदां त्यानें आपल्या एका पुतण्यास सिंहाच्या तोंडावर हात ठेवण्यास सांगितलें. त्यानें तसें केलें नाहीं, म्हणून त्यास जन्मभर अंधार कोठडींत कोंडून ठेविलें. नूरजहानच्या एका दासीनें कांहीं यःकश्चित् चुकी केली, म्हणून त्यानें तिला जमिनींत गळ्यापर्यंत पुरलें. तेथें तीन दिवस व दोन रात्रींपर्यंत ती जगल्यास तिला माफी द्यावयाची होती. पण ती इतका वेळ जगली नाहीं. एकदां शंभर रामोशी धरून बादशहासमोर आणिले, त्यांच्या मुख्यास त्यानें कुत्र्यांकडून खावविलें; तेरा असामींचीं डोकीं उडविलीं; आणि बाकीच्यांच्या टोळ्या करून त्यांस अजमीरच्या निरनिराळ्या रस्त्यांवर ठार मारविलें. शिक्षा वगैरे करण्यांत अमुक एक नियम ठरविलेले असत असें नाहीं. बादशहा करील ती पूर्वदिशा, आणि बादशहाची इच्छा हाच कायदा असा प्रकार असे. प्रांतावरील अधिकाऱ्यांस स्वतंत्र राजाचे अधिकार दिलेले असत. बादशहा हाच सर्व जमिनीचा मालक असे. मोलवान व चमत्कारिक वस्तु वारंवार नजर करून लोक बादशहाची प्रीति संपादन करीत. निर्वंश झालेल्या इसमाची संपत्ति सरकारखजिन्यांत जमा होई.

जमालुद्दीन हुसेन या नांवाचा पाटण्याचा सुभेदार हुमायून व अकबर यांच्या वेळेपासून कामावर होता. त्यास पांचहजारांची मनसबदारी असून सर टॉमस रोच्या वेळेस वृद्धापकाळांत नेमणूक घेऊन तो स्वस्थ

बसला होता. त्याचा व रोचा चांगला स्नेह असून क्रिस्ती लोकांवर त्याची विशेष भक्ति होती. रो यास त्यानें एक वडी मेजवानीही दिली. त्या जमालुद्दीननें मोगलांच्या राज्यव्यवस्थेविषयीं रो यास खालीं लिहिल्या-प्रमाणें हकीगत सांगितली. 'लोक दास्यस्थितींत आहेत; कायदेकानू नाहींत; राज्याचा विस्तार अतोनात झाला आहे; राज्याचा वसूल वाढत्या प्रमाणावर आहे; नजराणे, दंड, परापहार इत्यादिकांनीं त्याच्यांत विशेष भर पडत आहे. एकट्या बहारप्रांतांतून बादशहास सालिना अकरा लाख रुपये मिळतात. ह्याहून ज्यास्त राहील तें सुभेदारास मिळतें. त्यास प्रत्येक घोडयाच्या खर्चाबद्दल सालिना दोनशें रुपये सरकारां-तून मिळतात. मी पांच हजारांचा मनसबदार असून मजजवळ खरो-खर पंधराशें घोडे मात्र तयार आहेत; बाकीचे सर्व कागदावरच.' ह्यावरून त्या वेळच्या स्थितीची बरीच अटकळ करितां येते. तथापि ह्या हकीकतीच्या सत्यतेविषयीं इतिहासकारांचा मतभेद आहे. तरी रो निघून गेल्यानंतर, स्वतः जहांगीर गुजराथेंत जाऊन तेथून उज्जनीच्या रस्त्यानें आग्र्यावरून दिल्लीस गेला, तेव्हां प्रत्यक्ष पाहिलेल्या गोष्टींवरून आत्मचरित्रांत खालील हकीकत त्यानें नमूद केली आहे, ती बरीच भरंवसेलायक दिसते.

'गुजराथेंत चोर व रामोशी यांचा उपद्रव फार आहे; कित्येक वेळां एका दिवसांत मीं दोन दोन तीन तीनशें लोक पकडून फांशीं दिले आहेत, तरी त्यांचा बंदोबस्त माझ्यानें झाला नाहीं. सभोंवार अरण्यें माजलेलीं आहेत. वीसहजार लोक लावून त्यांतून मला रस्ता करावा लागला. परत येत असतां मी उज्जनीस गेलों. तेथें एका मोगल गृहस्थावर खटला चाललेला होता. तो आपल्या बागांत शहरच्या बायका बोलावून आणी, आणि त्यांस दारू पाजून व गळा दाबून त्यांचे डाग-डागिने काढून घेई. त्याचें घर शोधिलें, तेव्हां त्यांत डागिन्यांचे सातशें जोड सांपडले. मी त्याजला डाग देऊन कापून काढिलें. तेथून आग्र्यास गेलों. आग्रा येथें शहाजादा खुस्रूचें व माझें पुनः सख्य झालें. दिल्लीस गेल्यावर कनोज येथें बंड झाल्याची बातमी आली. तें मोडण्या-साठीं मीं फौज पाठविली. तींत हजार बंडवाले मारले गेले. दहा-हजारांचीं शिरें दिल्लीस आणिलीं. मोठमोठ्या रस्त्यांवरून दहाहजार

NATIONAL ARCHIVES OF INDIA

लोकांस झाडांवर उलटें टांगिलें. वरचेवर कत्तली होत आहेत, तरी ह्या हिंदुस्थानांत बंडांचें निर्मूलन होत नाहीं. माझ्या वडिलांच्या व माझ्या कार्किर्दीत मिळून पांचलाख लोक मारले गेले नाहींत असा सुभाच नाहीं. कोणी तरी लबाड पुढें येऊन बंडाचा उद्भव करितो. हिंदुस्थानांत पूर्ण शांतता वसत आहे असें कधीं झालेंच नाहीं.' ह्या लिहिण्यांत पुष्कळ सत्य दिसतें. शेतकरी लोकांनीं बंडावा केला म्हणजे तो मोडण्यास अकबरासही जड जात असे. दरोडेखोरांचा बंदोबस्त मोगलांच्या हातून कधीं झालाच नाहीं, असें तत्कालीन प्रवासी सांगतात.

सन १६१३त सुरत येथें ईस्ट इंडिया कंपनीची वखार स्थापन झाली. तंबाकूचा प्रचार हिंदुस्थानांत जहांगीरच्या वेळेस झाला असें सांगतात.

१२. **जहांगीरच्या स्वारीचा थाट.**—नोव्हेंबर सन १६१६ ह्या वर्षी जहांगीर बादशहाची स्वारी राजवाडा सोडून छावणींत राहण्याकरितां म्हणून बाहेर पडली. वाड्यापासून चारपांच मैलांवर ह्या छावणीचा मुक्काम होता. दोनतीन हजार उत्तम व चपळ घोडे, आठनऊशें हत्ती, शिवाय खेचरें व असंख्य मजूर स्वारीचें सामान नेण्यास लागले. मोठमोठे तंबू, भोजनाचें व इतर सामान, स्नानाकरितां गंगेचें पाणी इत्यादि सर्व गोष्टींची बादशहास सर्व ठिकाणीं घरच्याप्रमाणें जरूर असे. अशा एका स्वारींत रो स्वतः होता, त्यानें पुढील चित्तवेधक हकीकत लिहून ठेविली आहे.

'स्वारी सकाळीं निघावयाची होती. जहांगीर झरोक्यांत येऊन बसला. गादीमागें पडद्यांत त्याच्या दोन बायका होत्या. त्या थोड्याबहुत रोच्या दृष्टीस पडल्या, तेव्हां त्यास मोठी मौज वाटली. सर्व सरदार दरबारांत जमले. रो जाऊन त्यांजमध्यें बसला. इतक्यांत जहांगीर येऊन सिंहासनावर थोडा वेळ बसला. इकडे जनानखाना हत्तीवर चढत होता. त्याजकरितां पन्नास हत्ती राखून ठेविलेले होते. त्यांच्या पाठीवर मोठमोठे हौदे असून सभोंवार किनखापी पडदे होते. नंतर बादशहा निघाला, त्या वेळीं सर्व लोकांनीं मोठा जयघोष केला, त्यानें कानठळ्याच बसल्या. जिन्याच्या पायथ्याशीं बादशहाची दृष्ट काढण्यांत आली. त्याचा पोशाख फारच उंची होता. अंगांत भव्य जरीचा झगा.

घातला असून सर्वांगावर हिऱ्यामोत्यांची रेलचेल होती. नोकरांनीं येऊन त्याची ढालतलवार बांधिली, आणि धनुष्यबाण लटकावून दिले. नंतर तो चार घोड्यांच्या गाडींत बसला. त्याचा गाडी हांकणारा इंग्रज असून त्याचाही पोशाख रत्नखचित होता. बादशहाच्या दोन बाजूंस दोन नोकर चवऱ्या वारीत होते. सर्वांपुढें वाद्यें चाललीं होतीं. भरगच्ची सामान घातलेले नऊ घोडे रिकामे चालले होते. त्यांच्या पाठीमागें कांहीं सुंदर पालख्या होत्या. पालख्या गेल्यावर विलायती बग्गी आली. तींत नूरजहान बसली होती. तिच्यामागें बादशहाचे दोघे धाकटे मुलगे येत होते. मागाहून शृंगारलेले वीस हत्ती चालले होते. त्यांच्यामागें सरदार मंडळी पायीं चालली होती. सर्व रस्त्यावर सहाशें हत्तींचा पाहरा लागला होता. प्रत्येक हत्तीवर निशाण व बंदुका होत्या. रस्ते पाण्यानें भिजविले होते. कोणास बादशहास भेटण्याचें असेल, तर फार लांबपासून पायीं चालत यावें लागे. स्वारी निघतांना जहांगीर आपला मुलगा खुस्रू यास भेटला, आणि त्यानें त्यास आपणाबरोबर घेतलें.

'जेथें मुक्काम होता तेथें सर्वांकरितां तंबू लाविलेले होते. त्यांत बादशहाच्या तंबूची शोभा कांहीं अवर्णनीय होती. सभोंवार अर्धा मैल परिघाच्या वर्तुळाकार कनाती लाविल्या होत्या. नाक्यावरील दिंडीदरवाजा फार शोभिवंत दिसत होता. वाड्याप्रमाणें दरबारची वगैरे सर्व व्यवस्था तंबूंतही केलेली होती. जनानखान्याकरितां पाठीमागून निराळा रस्ता होता. दरवाज्यांतून आंत शिरल्यावर रस्त्याच्या दोनही बाजूंस सरदार लोक रांगेनें उभे होते, त्यांमधून बादशहाची स्वारी गेली. हरएक बाबतींत तंबूंतली व्यवस्था अगदीं राजवाड्यांतल्या सारखीच होती. इतर मंडळींचेही तंबू लागले होते. ह्या सर्व स्वारीच्या योगानें एक नवीन शहरच वसल होतें' असें दिसे. त्याचा विस्तार वीस चौरस मैल होता. बादशहाचे तंबू लाल असून इतर मंडळीचे सफेत, हिरवे असे होते. स्वारीच्या मुक्कामावर राजधानींतल्याप्रमाणें मोठमोठे रस्ते काढिलेले असून दुतर्फा दुकानांच्या रांगा होत्या. कँपची व्यवस्था कशी लावावयाची त्याचे नकाशे ठरलेले असून, कोणाचा मुक्काम कोठें आहे हें पाहिजे त्यास कळण्याची सोय होती. ऐने-अकबरींत असे कित्येक नकाशे दिलेले आहेत. दररोज स्वारीचा मुक्काम उठून थोडे मैल पुढें

जात असे. पण व्यवस्थेमध्यें कोणत्याही प्रकारचा घोटाळा होत नसे. सर्व सामानाचे तीनचार जोड होते. एकंदर मुक्कामाची तयारी चार तासांत होई.

'स्वारींत नेहमींच मौज असे असें नाहीं. रस्त्यांत चोरांचा व दरोडेखोरांचा उपद्रव फार असे; आणि क्षणोक्षणीं शेंकडों लोकांचीं डोकीं उडविलीं जात. वाड्यांतल्याप्रमाणें स्वारीत असतांना बादशहाजवळ फारसे लोक जात नसत. सकाळचा झरोका कधीं चुकला नाहीं. दरबार भरत नसे. पुष्कळ वेळ शिकारांत निघून जाई. सायंकाळीं घुशालखाना चालू असे; आणि तेथें निवडक मंडळीस बोलावणें येई. पुढें स्वारी रजपुतान्यांतून मांडवाकडे चालली, तेव्हां चोरांच्या योगानें सर्वांचेच हाल झाले. अन्नपाणी सुद्धां वेळेवर मिळण्याची कित्येक वेळां मारामार पडे. त्यांत विशेषतः गरीब लोकांचे फार हाल होत. सन १६१७ च्या फेब्रुवारी महिन्यांत जहांगीर उज्जनीस पोंचला.' असा जहांगीरच्या स्वारीचा थाट होता.

प्रकरण पंचविसावें.

शहाबुद्दीन महंमद खुर्रम्, ऊर्फ शहाजहान.

स. १६२७–१६५८.

कार्किर्दींतील महत्त्वाच्या गोष्टीः—

(अ) राज्यारोहण. (आ) खानजहान लोदी,(१६२९).
(इ) निजामशाहीचा पाडाव,(१६३७). (ई) रजपुत राजांशीं संबंध.
(उ) पोर्तुगीझांचा पाडाव,(१६३२). (ऊ) बल्क्‌कंदाहारच्या स्वाऱ्या.
२. शहाजहानची बायका मुलें. ३. औरंगजेबाचा पूर्वायुःक्रम.
४. राज्यपदाकरितां राजपुत्रांचा झगडा. ५. योग्यता व राज्यव्यवस्था.
६. शिल्पकलेचा उत्कर्ष, ताजमहाल वगैरे.

१. कार्किर्दींतील महत्त्वाच्या गोष्टी. (अ) राज्यारोहण.—ह्या कार्किर्दीच्या बरेवाईटपणासंबंधानें निरनिराळ्या इतिहासकारांत जो मतभेद आहे, त्याची एकवाक्यता होणें शक्य नाहीं. अलीकडच्या इंग्रज ग्रंथकारांत एल्फिन्स्टन व व्हीलर हे प्रसिद्ध आहेत. व्हीलरची विवेचनसरणी चटकदार आहे. निरनिराळ्या दिशांनीं एखाद्या प्रश्नाचा विचार

४०–५–११–१०–७९१–२०००

करण्यांत तो हुशार आहे. अतएव ऐतिहासिक दृष्ट्या त्याचा ग्रंथ वाचनीय व उपयुक्त आहे. परंतु ह्या ग्रंथकारास एतद्देशीयांचा चांगुलपणा सहन होत नसल्यामुळें, सामान्यतः मुसलमान ग्रंथकारांवर व प्रसंगविशेषीं मुसलमानांची तरफदारी करणाऱ्या एल्फिन्स्टन वगैरे सारख्या इंग्रज ग्रंथकारांवरही वाक्प्रहार करण्याची संधि त्यानें वायां जाऊं दिलेली नाहीं. एतद्देशीयांची नालस्ती करण्याचा त्यानें विडाच उचललेला आहे असा भास होतो. शहाजहान बादशहाविषयीं अनेक ग्रंथकारांनीं आदरोद्गार काढिले आहेत. ताजमहालसारख्या त्यानें बांधिलेल्या इमारती आजमितीस सुद्धां सर्व जगतास चकित करून सोडीत आहेत. परंतु त्या बादशहाचें स्त्रैणत्व व्हीलरच्या डोक्यांत घोळत असल्यामुळें, त्या सुंदर इमारतींसही त्यानें स्त्रैण ठरवून दूषणें दिलीं आहेत. असो. तात्पर्य इतकेंच, कीं शहाजहानच्या कर्तब-गारीबद्दल निश्चयात्मक मत देतां येत नाहीं.

शहाजहाननें सर्व प्रतिपक्ष्यांचा संहार करून बादशाही पद कसें मिळ-विलें हें मागील प्रकरणांत सांगितलेंच आहे. आरोहणप्रसंगीं त्यानें मोठा उत्सव केला तो अदृष्टपूर्व होता. त्या समारंभाच्या वेळीं दीडकोट रुपये खर्च झाला. त्या वेळेस त्यानें मक्का व मदीना येथील मंदिरांस मौल्य-वान नजराणे दिले. पैगंबराच्या कबरेसन्निध ठेवण्याकरितां त्यानें एक रत्नजडित दिवा पाठविला. तो अंबरचा केलेला असून अठरा शेर वजनाचा होता. त्याजवर अनेक हिरे बसविलेले होते. त्यांत गोवळ-कोंड्याहून आणिलेला एक मोठा हिरा होता, त्याची किंमत दीडलाख रुपये होती. आरंभीं जो हा अवाढव्य खर्च झाला, तो कोणास गैर वाटला नाहीं. कारण, या कारकिर्दीत एकंदरीत स्वास्थ्य होतें आणि युद्ध-संग्रामांत फारसा खर्च झाला नाहीं. पूर्वी बादशहाची तुला निरनिराळ्या धातूंनीं करण्यांत येत असे. त्याशिवाय शहाजहाननें असा परिपाठ पाडिला, कीं रत्नांनीं भरलेलीं भांडीं त्याच्या मस्तकासभोंवतीं ओंवाळून त्याजवर तीं उधळावीं. मग जवळचे लोक तीं वेंचून घेत.

मुसलमान लोक प्रार्थना करितात, त्याचीं चार आसनें आहेत: कयाम, रूकू, सिज्दा, आणि कोदा. कयाम म्हणजे उभें राहून, रूकू म्हणजे वांकून, सिज्दा म्हणजे जमिनीवर गुडघे, हात व डोकें टेकून, आणि कोदा

NATIONAL ARCHIVES OF INDIA

म्हणजे नुसते गुडघे टेंकून. क्रिस्ती व ज्यू धर्मांत सिज्दा नाहीं. सिज्दा फक्त मुसलमानांत आहे. सिज्दा ज्या ठिकाणीं करावयाचा त्यास 'मस्जीद' म्हणतात. हा सिज्दा फक्त देवासाठीं करावयाचा, कोणाही माणसास करावयाचा नाहीं, असा मुसलमानी धर्माचा निषेध आहे. अकबरानें धर्मांत नवीन फेरफार केले, त्यांत दरबारांत आपणांपुढें येणाऱ्या मंडळींनीं सिज्दा केला पाहिजे, म्हणजे जमिनीवर हात, गुडघे व डोकें टेंकून बादशहास वंदन केलें पाहिजे असें त्यानें फर्माविलें. ही गोष्ट पुष्कळ भाविक मुसलमानांस रुचली नाहीं. तथापि हळूहळू तो प्रघात कळत गेला. फक्त मुख्य काजी मात्र बादशहापुढें सिज्दा करीत नसे. जहांगीरनें हा सिज्दा करण्याचा प्रघात जोरानें चालविला. परंतु शहाजहाननें बादशहापुढें सिज्दा करण्याची चाल राज्यारोहणाच्याच दिवशीं बंद केली; आणि मुसलमानी धर्मास अनुकूल असे आणखी कित्येक फेरफार केले. तेव्हांपासून पुनरपि अस्सल मुसलमानी वळण वाढत गेलें, त्याचेंच हें एक उदाहरण होय. (Blochmann, Calcutta Review, 1869).

शहाजहाननें तीस वर्षें राज्य केलें. कार्किर्दीचे आद्यंत लढाया व क्रूरपणा ह्यांनीं भरलेले आहेत. बादशाहीपद मिळविण्यास त्यास युद्ध करावें लागलें, तसेंच त्याजपासून तें हिरावून घेण्यास त्याच्या मुलांनींही युद्ध केलें. मधील काल शांततेचा गेला. ह्या शांततेमध्यें शहाजहाननें आपला कालक्षेप कसा केला हें विशेषतः पुढें सांगावयाचें आहे. गादीवर आल्याबरोबर आसफखान व महाबतखान ह्यांस त्यानें मोठमोठ्या देणग्या व पदव्या दिल्या; आणि मित्र व आश्रित मंडळींचे पगार वाढविले. शहाजहानच्या वेळेस इंग्लंडांत पहिल्या चार्ल्स् राजाचा वध होऊन क्रॉम्वेल कारभार पाहूं लागला. फ्रान्स देशांत तेरावा व चौदावा लुई हे राजे राज्य करीत होते.

(आ) खानजहान लोदी, (१६२८-१६२९).—शहाजहान राज्यारूढ झाल्याबरोबर ऊझबेक लोकांनीं काबूलवर हल्ला केला; आणि अबुल् फज्लचा खून करणारा राजा वीरसिंहदेव ह्यानेंही बुंदेलखंडांत बंड केलें. तथापि दोघांचाही बादशाही फौजेनें लगेच बंदोबस्त केला. पण आरंभाची महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे खानजहान लोदीचें बंड होय. हा दौलतखान लोदीचा मुलगा. त्याचें मूळचें नांव पीरखान. प्रथम तो

दानियालजवळ नोकरीस होता. जहांगीरच्या वेळेस तो प्रसिद्धीस आला, आणि जहांगीरनेंच त्यास खानजहान ही पदवी दिली. महाबतखानास दक्षिणेंतून परत बोलाविल्यावर शहाजादा पर्वीझच्या मदतीस त्याची दक्षिणेंत नेमणूक झाली होती, (स. १६०९). जहांगीरच्या उत्तरकारकिर्दींत दक्षिणेंतील कारभारांत ढवळाढवळ करून त्यानें आपलें महत्त्व वाढविलें. तो सुनी अफगाण होता. मलिकंबरही सुनीच होता. खानजहाननें त्याजशीं सख्य केलें, आणि पूर्वी शहाजहाननें जिंकिलेला निजामशाहीचा बहुतेक मुलूख मलिकंबरास परत दिला. जहांगीर मरण पावल्यावर शहाजहान दिल्लीस आला, त्या वेळेस त्यानें खानास आपणाबरोबर बोलाविलें, पण तो आला नाहीं. पुढें शहाजहाननें महाबतखानास दक्षिणची सुभेदारी देऊन खानजहान यास माळवा प्रांताचें काम दिलें. तेथून त्यास दिल्लीस बोलावून बादशहानें त्याचा चांगला सत्कार केला. पण लवकरच खानास असा संशय आला, कीं बादशहा आपणास पकडण्याच्या विचारांत आहे. त्यावरून त्यानें पळून जाऊन बंड करण्याचा निश्चय केला. पण त्याच्या पाठीमागें दोन बायका व तीन मुलें इतका परिवार होता. ह्या वेळेस त्या स्त्रियांनीं आपणास एका खोलींत कोंडून घेऊन, कोणास कळूं न देतां आपला नाश करून घेतला, आणि नवऱ्याला काळजींतून मुक्त केलें. त्यामुळें लोदी फार कष्टी होऊन त्यानें आपल्या मृत बायकांस शोकाश्रूंनीं स्नान घातलें, आणि त्यांस एका कबरेंत पुरून मुलांस बरोबर घेऊन तो शहराबाहेर पळून गेला. त्या वेळीं त्याच्या जिवास जीव देणारे असे दोनहजार लोक त्याजबरोबर होते. पाठीस आलेल्या बादशाही फौजेस दाद न देतां, तो बुंदेलखंड व गोंडवण प्रांतांतून दक्षिणेंत आला. तेथें शहाजी भोसले त्यास मिळाला.

ह्या बंडाची बातमी ऐकून शहाजहानास धास्ती पडली. दक्षिणदेश काबीज करण्याचे कामीं आजपर्यंत बादशहाचें पुष्कळ सामर्थ्य खर्च झालें होतें. खानजहानच्या बंडानें दक्षिणच्या युद्धाचा पुनः पहिला दिवस प्राप्त झाला. निजामशाहीचे मोठमोठे सरदार त्यास अनुकूल झाले होते. विजापूर व गोवळकोंडें येथील राजे त्यास मिळाल्यास केवळ दक्षिणदेश हातचा जाईल इतकेंच नाहीं, तर हें काहूर कदाचित् दिल्लीवरही चालून येईल. तेव्हां स्वतः कंबर बांधून आरंभींच त्याचा बंदोबस्त

करण्याचा विचार करून शहाजहान मोठ्या फौजेनिशीं दक्षिणेंत आला, (सन १६२९). बऱ्हाणपुरास येऊन त्यानें आपल्या फौजेच्या तीन टोळ्या करून तीन हुशार सरदारांच्या हाताखालीं दिल्या. त्यांत अजीमखानाच्या फौजेनें चांगलाच पराक्रम केला. त्यानें खानजहानचा अशा वेगानें पाठलाग केला, कीं त्यास कोठेंच थारा मिळेना. त्याची वाताहत झालेली पाहून शहाजी व इतर सरदार शहाजहानास येऊन मिळाले. शहाजीस बादशाही फौजेंत पांच हजारांची मनसबदारी मिळाली. इतर सरदारांसही शहाजहाननें देणग्या देऊन खूष केलें. खानजहान पळून विजापुरास गेला. तेथें महंमद आदिलशहा आपणास आश्रय देईल असें त्यास वाटत होतें. पण तसें झालें नाहीं. महंमद अत्यंत शांतताप्रिय होता. शहाजहानशीं वैर बांधिलें तर आपलाच नाश होईल, हें त्यास कळत होतें. शिवाय खानजहानकडूनही त्यास कांहीं विशेष प्राप्ति होण्याजोगी नव्हती. तेथून तो मूर्तुजा निजामशहाकडे गेला; पण त्यानेंही त्यास आश्रय न दिल्यामुळें, बादशाही फौजेस चुकवून तो परत बुंदेलखंडांत शिरला. तेथेंही त्यास मदत न मिळतां कलिंजर किल्ल्यानजीक बादशाही फौजेशीं लढून तो समरांगणीं मारला गेला. त्याच्या पाठलागाचा व वधाचा वृत्तान्त अत्यंत हृदयद्रावक आहे.

(इ) **निजामशाहीचा पाडाव, (१६२९–१६३७).**—लोदीचा पाडाव झाल्यावर शहाजहान बादशहा लगेच दिल्लीस परत गेला नाहीं. एकवार निजामशाहीचा संपूर्ण नाश करण्याचा त्यानें विचार केला. ह्या स्वारीची हकीकत मागें निजामशाहीच्या इतिहासांत आली आहे. दक्षिणेंत दुष्काळ पडल्यामुळें शहाजहानचें एक वर्ष फुकट गेलें. सन १६३० त अजीमखानानें दौलताबादचा मजबूद किल्ला काबीज केला. निजामशहाच्या मदतीस विजापूरचा आदिलशहा आला, म्हणून बादशहानें आसफखानास विजापुरावर पाठविलें. सन १६३२ त दक्षिणचा सर्व कारभार महाबतखानास सांगून बादशहा आग्र्यास गेला. महाबतखानानें फत्तेखान वगैरे निजामशाहीच्या सरदारांशीं लढून अहंमदनगर काबीज केलें, आणि तेथच्या राजास कैद करून ग्वालेरीस पाठविलें. परंतु विजापूरच्या शहाचा मोड झाला नाहीं. शहाजादा सुजा हा महाबतखानाबरोबर दक्षिणेंत होता. दोघांचाही परिंड्याच्या हल्ल्यांत परा-

भव होऊन ते बऱ्हाणपुरास परत गेले. तेथून बादशहानें त्यांस परत बोलाविलें. इकडे शहाजी भोसले यास निजामशाहीचा उद्धार करण्यास ही संधि चांगली वाटली. त्यानें त्या राज्याचा बंदोबस्त इतका चांगला केला, कीं स्वतः जाऊन युद्ध केल्याशिवाय गत्यंतर नाहीं असें वाटून, बादशहा १६३५त पुनः दक्षिणेंत आला. त्यानें आपल्या फौजेच्या दोन टोळ्या केल्या. पैकीं एक खान डौरानच्या हाताखालीं विजापुरावर पाठविली. विजापूरचा सरदार रणदुल्लाखान ह्यानें बादशाही फौजेस पुष्कळ त्रास दिला, तरी अखेरीस विजापूरच्या सुल्तानास तह करणें भाग पडलें. त्याचप्रमाणें शहाजीचा सर्वत्र मोड होऊन, तो शहाजहानास शरण गेला आणि अहंमदनगरचा मुलूख कायमचा मोगलांच्या ताब्यांत गेला, (१६३७).

(ई) **रजपुत राजांशीं संबंध.**—शहाजहानच्या वेळेस उदेपुरास राणा जगत्सिंह गादीवर होता. त्याचा बाप राणा कर्ण ह्यानें जहांगीरच्या विरुद्ध शहाजहानास मदत केली होती. जयपुरास राजा जयसिंह राज्य करीत होता. तसेंच जोधपुरास राजा गजसिंह व अमरसिंह हे राज्यावर असून त्यांचें शहाजहानचें वांकडें होतें. गजसिंहावर जहांगीर बादशहाची मर्जी; त्यांस हुगळ..शाजहानच्या विरुद्ध त्यानें खुस्रू व जहांगीर यांस मदत केल्या; हुगळीस पेनचा त्याजवर विशेष डोळा होता. गुजराथेंत लढत असतां पाळली सन १६३८ त मारला गेला, आणि त्याचा वडील मुलगा अमरसिंह प्रोद्दरबारीं असल्यामुळें दुसरा मुलगा जसवंतसिंह जोधपूरच्या गादीवर बसला. हा जसवंतसिंह औरंगजेबाबरोबर पुष्कळ वर्षें दक्षिणेंत होता. एकंदरींत रजपुतांची मदत शहाजहानास फारशी नव्हती. अकबराच्या दराऱ्यामुळें ते त्यास वश झाले खरे, परंतु जहांगीर व शहाजहान यांस त्यांनीं कधींच दाद दिली नाहीं. त्यांस बादशहाकडून मोठमोठ्या नेमणुका होत्या, तरी बादशहाविरुद्ध चालू असलेल्या दंग्यांत सामील होण्यास ते चुकत नसत. बादशहाबद्दल त्यांच्या मनांत भीति किंवा पूज्यबुद्धि उत्पन्न झाली नाहीं. ही स्थिति बादशाही फौजेंत असलेल्या रजपुतांची होती. बाहेरचे रजपूत राजे ह्यांहून उद्दाम होते. मजबूद डोंगरी किल्ल्यांत त्यांचें राहणें असल्यामुळें मोगल फौजेसच त्यांची भीति वाटे. त्यांच्यामध्यें आपसांत फूट असल्यानें ते दबून होते, नाहीं तर प्रत्यक्ष मोगल बादशाही त्यांनीं उडवून दिली असती. बाद-

NATIONAL ARCHIVES OF INDIA

शहांस तरी रजपुतांचें हें दुर्बलत्व माहीत असल्यामुळें त्यांच्यांतील वैर ज्यास्त माजवून ते आपला निभाव लावून घेत. गजसिंहाचा वडील मुलगा अमरसिंह बादशाही फौजेंत नोकर होता. तो हुकमत पाळण्यांत कुचराई करी. एकदां रजा घेतल्याशिवाय तो पंधरा दिवस कोठें जाऊन राहिला. परत आपल्यावर शहाजहान त्यास टाकून बोलला. तेव्हां अमरसिंहानें सांगितलें, 'शिकारीस गेलों होतों.' त्याजवर शहाजहाननें त्याजला दंड करून तो वसूल करण्याची आपल्या बक्षीस आज्ञा केली. अमरसिंहानें आपल्या छावणींत त्या बक्षीस पाय ठेवूं दिला नाहीं. तेव्हां बादशहानें त्यास दरबारांत बोलाविलें. अमरसिंह अस्तनींत कट्यार घालून दरबारांत आला. बक्षी बादशहाशीं कांहीं बोलत होता, इतक्यांत अमरसिंहानें बादशहाशीं बोलण्याच्या निमित्तानें जवळ जाऊन लगेच त्यानें बक्षीस कापून काढिलें; आणि तो सभोंवारच्या लोकांस मारूं लागला. बादशहा घाबरून जनानखान्यांत पळाला. त्याबरोबर अमरसिंहास इतर लोकांनीं पकडून ठार मारिलें. तेव्हां त्याचे लोक फार चवताळले. त्यांनीं बादशहास घाबरवून अमरसिंहाचें [illegible]न आपल्या ताब्यांत घेतलें. अमरसिंहाच्या तेरा बायका त्य[illegible]वर सती गेल्या. सारांश, रजपूत लोकांची शहाजहान[illegible] छाप कशी पडली, हें ह्या गोष्टीवरून स्पष्ट दिसतें. रजपूत व मु[illegible]र्थांजमधील तंटे ह्या कारकिर्दीत विशेष वाढले. पूर्वी मोगल व अफ[illegible] ह्यांजमध्यें असलेला द्वेषभाव ह्या वेळीं बहुतेक नाहींसा झाला होता. मात्र आतां हरएक बाबतींत रजपूत व मुसलमान एकमेकांचा पाडाव करण्यास झटूं लागले.

(ड) पोर्तुगीझ लोकांचा पाडाव,* (स. १६३२).—हिंदुस्थानांत युरोपियन लोकांचा प्रवेश न होऊं देण्याचे कामीं शहाजहानची विशेष खबरदारी होती. क्रिस्ती धर्माविषयीं जहांगीरची आदरबुद्धि शहाजहानास खपत नसे. शहाजहानची बायको मुम्ताजमहल् ही फार लावण्यवती असून बादशहा तिच्या म्हणण्याप्रमाणें वागत असे. नूरजहानचें वेड जहांगीर यास होतें, त्याचप्रमाणें शहाजहानास मुम्ताजमहल्चें वेड होतें. ती अस्सल तुर्क जातीची असून मुसलमानी धर्माची अभिमानी

* ह्या लोकांची सविस्तर हकीकत ब्रिटिश रियासतींत दिली आहे.

होती. ह्या दोन बायांच्या व त्यांच्या आप्तांच्या द्वारें दरबारांत इराणी वळण वाढत गेलें. मुम्ताजमहल क्रिस्ती धर्माचा द्वेष करी. तशांत पोर्तुगीझ लोकांचा तिरस्कार करण्यास तिला एक विशेष कारण झालें होतें. जहांगीरच्या कारकिर्दीत क्रिस्ती धर्माची प्रवृत्ति चालू असतां तिच्या दोन मुलींस पाद्री लोकांनीं क्रिस्ती केलें होतें. ह्या गोष्टीची ज्यास्त माहिती मिळत नाहीं. व्हीलर सांगतो, कीं तरुण मुसलमानी स्त्रियांस पडद्यांत राहणें जिवावरचें वाटत असल्यामुळें, जेणेंकरून त्यांस मोकळें फिरण्यास सांपडेल, ती गोष्ट करण्यास त्या नेहमीं तत्पर असत; क्रिस्ती धर्मांतील मोकळें आचरण त्यांस प्रिय वाटून, त्यांनीं क्रिस्तीधर्म स्वीकारिला. ही कल्पना कितपत खरी असेल ह्याचा ज्याचा त्यानें विचार करावा.

पोर्तुगीझ लोकांशीं शहाजहानचें वांकडें पडण्यास आणखी विशेष कारण झालें होतें. अकबर व जहांगीर या बादशहांचा वेळ दक्षिणेंत गेल्यामुळें, बंगाल्यांतील पोर्तुगीझ लोकांकडे लक्ष देण्यास त्यांस फुरसत झाली नाहीं. बंगालच्या उपसागरांत चित्तगांवचे चांचे लोक जहाजांस फार उपद्रव देत असत. तो पोर्तुगीझ लोकांनीं बंद करावा ह्या शर्तीवर जहांगीरनें [illegible] ळी बंदरांत वखारी घालण्याची परवानगी दिली. त्याप्रमाणें [illegible] र्तुगीझ लोकांनीं वखार घातली. परंतु त्यांनीं आपली शर्त [illegible] नाहीं. चांचे लोकांचा बंदोबस्त न करितां त्यांजशीं हुगळीच्या पोर्तुगीझ व्यापाऱ्यांनीं सख्य केलें, आणि त्याजबद्दल चांचे लोक त्यांस आपल्या प्राप्तीचा हिस्सा देऊं लागले. ते चांचे लोक जहाजांतून प्रवास करणाऱ्या लोकांस पकडून आणून गुलाम म्हणून विकीत. हुगळी बंदरांत त्या गुलामांस पोर्तुगीझ लोक विकत घेत. कित्येकांस ते क्रिस्ती करीत, आणि बाकीच्यांस शहरोशहरीं नेऊन विकीत. हीं दुष्ट कृत्यें बंद करण्याचा शहाजहानचा मूळपासून विचार होता; पण जहांगीरच्या वेळेस हातीं सत्ता नसल्यामुळें तें काम तसेंच राहिलें. व्यापाराची परवानगी घेऊन लोकांस बाटवून क्रिस्ती करणें किंवा त्यांस गुलाम म्हणून विकणें, ह्या गोष्टी मुसलमानी रियासतींत क्षणभर देखील सहन होण्याजोग्या नव्हत्या. जहांगीरच्या कारकिर्दींत शहाजहान बंड करून बंगाल्यांत पळाला, तेव्हां हुगळी येथील पोर्तुगीझ लोकांची त्यानें मदत मागितली. ती त्यांनीं दिली नाहीं.

इतकेंच नाहीं, तर शहाजहानचे विरुद्ध त्यांनीं बादशाही फौजेस मदत दिली. हें वैषम्य शहाजनहाचे मनांत होतें. खानजहान लोदीचें बंड संपल्यावर शहाजहाननें पोर्तुगीझ लोकांस असा निरोप पाठविला, कीं गुलाम म्हणून पकडलेले लोक आपल्या स्वाधीन करावे. ही सरळ व न्याय्य मागणी पोर्तुगीझ लोकांनीं अमान्य केली, त्याजबद्दल त्यांस चांगली शिक्षा झाली. बादशहानें त्याजबद्दल मागचा सर्व सूड पुरता उगवून घेतला. स. १६३२ त त्यानें हुगळीवर फौज पाठवून तेथील सर्व लोक व त्यांची मालमत्ता जप्त करून आग्र्यास नेली. त्यांतील सुंदर व तरुण स्त्रियांस बादशहानें आपल्या जनानखान्यांत ठेविलें; बाकीच्यांस दरबारांतील मंडळीच्या हवालीं केलें, आणि मुलांस मुसलमानी धर्मांत घेतलें. पुरुषांना कित्येक दिवस हत्तीच्या पायांखालीं देण्याची धमकी दाखविली व मुसलमान होण्यास सांगितलें. नोकरीच्या किंवा बक्षिसाच्या लालुचीनें त्यांच्यापैकीं बहुतेक मुसलमान झाले. पुष्कळांची कत्तल झाली. मुम्ताजमहल् अगोदरच मरण पावली होती, नाहीं तर ह्या सर्वांचा क्रूरपणानें वध झाला असता. पोर्तुगीझ लोकांचें हुगळी येथील ठाणें मोडिलें, तरी बंगालच्या उपसागरांतील चांचे लोकांचा उपद्रव बंद झाला नाहीं. चित्तगांव येथील पोर्तुगीझ लोक समुद्रांत लुटालूट करीत. औरंगजेबाच्या हातांत दिल्लीपतीचें राज्यसूत्र आल्यावर त्यानें शाएस्तेखान यास बंगालचा सुभेदार नेमून, त्यास पोर्तुगीझ लोकांची पुंडाई बंद करण्याचा सक्त हुकूम दिला. त्याअन्वयें शाएस्तेखानानें पोर्तुगीझ लोकांस बंगाल प्रांतांतून घालवून लाविलें.

(ऊ) बल्क्‌कंदाहारच्या स्वाऱ्या, (१६३८–५३).—शहाजहान बादशहा दक्षिणेंत आला होता, तो स. १६३७त परत आग्र्यास पोंचला. मध्यंतरीं त्याच्या फौजेस कांहीं कामें पडलीं, त्या कित्येकांत तीस यश आलें. कंदाहारप्रांत जहांगीरच्या कारकीर्दींत इराणच्या शहानें काबीज केला होता. तो परत घेण्याकरितां शहाजहानची फौज झगडत होती. अलीमर्दानखान नामक इराणच्या सरदाराच्या ताब्यांत कंदाहारचा किल्ला होता. त्यास इराणच्या शहानें इतक्या वाईट रीतीनें वागविलें, कीं त्या सरदारानें तो किल्ला शहाजहानच्या हवालीं करून मोगलांच्या दरबारीं नोकरी पत्करिली. ह्या अलीमर्दानखानानें पुढें पुष्कळ नांवाजण्याजोग्या

कामगिऱ्या बजाविल्या. दिल्ली शहरास ज्या पाटानें पाण्याचा पुरवठा झाला आहे, तो ह्यानें बांधिला; त्यास अद्यापि अलीमर्दानचा काल्वा असें म्हणतात. तो चांदणीचौकांतून वाहत जातो. उदेपूरचा राणा जगत्सिंह आपल्या चौदाहजार फौजेनिशीं ह्या स्वारींत होता बाबर बादशहाचा अंमल ह्या प्रांतावर होता. पुढें कित्येक प्रसंगीं तेथील मोगल अंमलदार स्वतंत्र होते. शहाजहानच्या वेळेस तो प्रांत हातचा गेला होता, तो परत जिंकून तयमूरची राजधानी आपल्या ताब्यांत घ्यावी, बल्क् येथें तंटे सुरू असल्यामुळें आपलें काम लौकर सिद्धीस जाईल, असें शहाजहानास वाटलें. परंतु हा त्याचा भ्रम होता. हिंदुस्थानची फौज दूरच्या प्रदेशांत राहण्यास अत्यंत नाखुष होती. तेथें जाऊन लुटीचा वगैरे कांहीं एक फायदा तीस होण्याजोगा नव्हता. नुसता नेहमींचा वसूल होण्याची मारामार. सन १६४५च्या जून महिन्यांत फौज रवाना झाली. ऑक्टोबरांत राजा जगत्सिंग काबुलाहून तिच्या मदतीस गेला. त्यांनीं रस्ते केल्यावर सन १६४६ च्या जून महिन्यांत बादशहानें मुरादबक्षास पन्नास हजार फौज देऊन पाठविलें. बरोबर अलीमर्दानखान होता. हिंदुस्थानची श्रीमंत व भपकेबाज फौज पाहून तिकडील रानटी लोकांचे डोळे दिपून गेले. विशेष लढाई केल्याशिवाय प्रांत ताब्यांत आला. परंतु तो ताब्यांत ठेवण्याचें काम कठाण होतें. मुरादास तेथें राहणें गोड वाटेना; आणि तो एकाएकीं निघून परत आला; तेव्हां शहाजहाननें आपला वजीर सादुल्लाखान ह्यास घाईघाईनें तिकडे पाठविलें. त्यानें जाऊन थोडीशी व्यवस्था केली, आणि आपण हिवाळ्यामुळें काबुलास परत आला. स. १६४७च्या आरंभीं बादशहानें दक्षिणेंतून व बंगाल्यांतून पुष्कळ पैसा आणून, आफगाणिस्तानांत रवाना केला; आणि औरंगजेबास तातडीनें दक्षिणेंतून बोलाविलें. ता. २० जानेवारी १६४७ रोजीं तो लाहोरास येऊन बादशहास भेटला, आणि लगेच पेशावरावरून काबुलास गेला. अलीमर्दानखान त्याचा मुख्य सरदार होता. औरंगजेबास नानातऱ्हेच्या अडचणी आल्या, तरी त्यांस न जुमानतां, मोठ्या शहाणपणानें व शौर्यानें त्यानें बापाची कामगिरी तडीस नेली. स्वतः शहाजहान काबुलास जाऊन राहिला. ता. ७ जून सन १६४७ रोजीं उजबेक लोकांशीं खडाजंगीची लढाई झाली. तींत औरंगजेबास जय मिळाला, तरी शत्रू

NATIONAL ARCHIVES OF INDIA

पहाडी लोकांचा पाडाव करणें मुष्किलीचें होतें.
... फाजचे अतिशय हाल होऊं लागले. अशा स्थितींत बल्क् येथें
राहण्यापासून कांहीं एक फायदा नाहीं, असें औरंगजेबानें बापास लिहून
पाठविलें. तेव्हां तेथील अधिकारी नजरमहंमद ह्याजबरोबर कसाबसा
तह करून ऑक्टोबर महिन्यांत तो काबुलास परत आला. जयसिंगाचे
रजपूत सर्वांत मागें होते; त्यांचे फारच हाल झाले. ह्याप्रमाणें चार
कोटींचा व्यर्थ खर्च करून आणि पुष्कळ लोक व जनावरें नाहींशीं होऊन
बादशहाला स्वारी परत आणावी लागली. औरंगजेबाचें अपूर्व धाडस
मात्र ह्या स्वारींत आशियांतील सर्व मुसलमानांच्या नजरेस आलें; आणि
त्यास युद्धकलेचा उत्कृष्ट अनुभव मिळून फौजेंतील लोकांची ओळख झाली,
ती राज्यप्राप्तीच्या युद्धांत पुढें त्यास फारच उपयोगी पडली.

सन १६४८ त इराणी लोकांनीं कंदाहार फिरून घेतलें. औरंग-
जेबास तें परत घेण्याचा हुकूम झाला. परंतु त्यास कंदाहारवर
जाण्यास विलंब लागला. सन १६४९ त वेढयास सुरुवात झाली. पुढें
औरंगजेबानें कंदाहार घेण्याचा सतत तीन वर्षें प्रयत्न केला. परंतु त्यांत
त्यास यश न आल्यामुळें त्याची दक्षिणच्या सुभ्यावर नेमणूक झाली. पुढें
शहाजादा दाराशेखो ह्यानें बापास विनंति करून कंदाहार घेण्याचें काम
आपणाकडे मागून घेतलें, परंतु इराणच्या फौजेनें त्या किल्ल्याचा बचाव
इतक्या निकरानें केला, कीं सन १६५३ सालीं दाराशेखो ह्यास वेढा
उठवून हिंदुस्थानांत परत यावें लागलें. सारांश इतःपर कंदाहार मोगलांच्या
ताब्यांतून कायमचें गेलें, आणि काबूलच्या पलीकडे बादशाही सत्ता
फारशी उरली नाहीं.

२. शहाजहानचीं बायकामुलें.—इराणी राजवंशांतील पुरुष मीर्झा
मुजफर हुसेन याची मुलगी कंदाहार महल् ही शहाजहानची पहिली बायक
तिचें लग्न स. १६०९ त झालें. त्या वेळीं शहाजहान १९ वर्षांचा हो
कंदाहार महल्पासून त्याला एक मुलगी झाली, तिचें नांव परेझबानू बेग
पुढें तीन वर्षांनीं शहाजहानचें लग्न मुमताजमहल्शीं झालें. मोगल ब
शाहींत राज्यकारभार चालविणारी शेवटची पराक्रमी राणी मुमता
महल् होय. ही आसफ्खानाची मुलगी, स १५९१ त जन्मलेली
शहाजहानपेक्षां एक वर्षानें लहान असून पांच वर्षें तिचें लग्न ट

NATIONAL ARCHIVES OF INDIA

राहिलें होतें, तें तारीख १२ एप्रिल स. १६१२ रोजीं लग्नाची कांहीं चमत्कारीक हकीकत कित्येक ठिकाणीं आढळते. पूर्वी मोगल बादशहांच्या वेळेस स्त्रियांचे मेळे भरविण्याची चाल होती. त्या कांहीं तरी तऱ्हेवाईक व मौजेच्या चिजा विक्रीसाठीं घेऊन येतात, आणि जे पुष्कळ किंमत देतील त्यांस त्या चिजा विकतात. मोगल बादशहांच्या वेळेस जे मेळे भरत, तेथें बादशहा व शहाजादे यांच्याशिवाय इतरांस जाण्याची बंदी असे. जहांगीर बादशहानें अशा प्रकारचा एक मेळा भरविला, आणि सर्व रूपवती स्त्रियांस तेथें बोलाविलें. आपल्या जिनसांबद्दल त्या जी किंमत मागतील, ती दिली पाहिजे, असा त्या दिवशीं बादशहानें हुकूम फिरविला होता. त्या मेळ्यांत बापाबरोबर शहाजहानही गेला होता. तेथें आसफ़्खानाची लावण्यवती मुलगी अर्जुमंद बानू इचें सौंदर्य पाहून तो शहाजादा मोहित झाला. त्या वेळीं अर्जुमंद बानूचें लग्न जमालखान नामक सरदाराशीं ठरलें होतें. अर्जुमंद बानूनें हिऱ्यासारखा कापून तयार केलेला साखरेचा खडा पुढें करितांच शहाजहाननें त्याची किंमत काय म्हणून विचारिलें. तिनें एकदम सवालक्ष रुपये किंमत मागितली. तिच्या रूपास मोहित झालेल्या शहाजाद्यानें ती रकम देऊन तो खडा विकत घेतला. त्या वेळ दोघांचें बोलणें होऊन संकेत ठरला, व सायंकाळीं ती शहाजहानानें पाठविलेल्या वाहनांत बसून त्याच्या मंदिरांत गेली. तेथें तीन दिवस राहिल्यामुळें जमालखानानें तिजविषयीं आपला रोष प्रदर्शित केला. त्याच्या ह्या वर्तणुकीवरून संताप येऊन, तिनें लगेच त्याजविषयीं शहाजहानकडे कागाळी केली. त्यावर शहाजहाननें हुकूम फर्माविला, कीं जमालखानास हत्तीच्या पायांखालीं देऊन ठार करावें. ही दुःखदायक वार्ता ऐकून जमालखान तावडतोब शहाजहानकडे जाऊन म्हणाला, 'खाविंद मीं आपल्या बायकोविषयीं अनादर केला, तो ती आपणाकडे राहिली म्हणून नव्हे; तर जिच्यावर आपली मर्जी गली, तिजविषयीं मी आदर दाखविणें अत्यंत अनुचित होय.' अशा उत्तरानें जमालखानानें आपला जीव वांचविला व शहाजहानास संतुष्ट केलें. लगेच त्यास पांच हजारांची मनसब शहाजहाननें देवविली, आणि त्या दिवसापासून अर्जुमंद बानू शहाजहानकडे येऊन राहिली. ह्या हकीकतींत काय तथ्य असेल तें असो.

नूरजहानचें शहाणपण व सौंदर्य, आणि ग्यासबेगचें तारतम्य व प्रामाणिकपणा, हे गुण अर्जुमंद बानूच्या अंगीं पुष्कळ अंशीं वसत होते. आपल्या सद्गुणांनीं स्त्रीरत्न हें यथार्थ नांव तिला मिळालें. पतिसमागमांत तिचीं वीस वर्षें गेलीं, तितक्या काळांत तिनें बादशहाचें सारें लक्ष आपल्याचकडे वेधून घेतलें होतें तेरा वेळां प्रसूत झाल्यावर चवदाव्या खेपेस प्रसूतिविकारानें ती सन १६३१ त मरण पावली. त्या समयीं आपल्या प्रियकर पतीपासून तिनें दोन गोष्टी मागून घेतल्या. आपल्यापश्चात् पतीनें लग्न करूं नये; आणि आपल्या अपूर्व प्रीतीचें स्मारक बादशहानें करावें. तिला अशी भीति होती, कीं बादशहाला आणखी मुलें झाल्यास तीं आपल्या मुलांशीं भांडतील. दुर्दैवेंकरून तिच्याच मुलांनीं भांडून बादशाहीचा विध्वंस केला! बादशहानें ह्या प्रिय पत्नीस दिलेलीं वचनें तडीस नेलीं. पुढें आमरण तो अविवाहित राहिला; आणि ताजमहाल नांवाची जगद्विख्यात इमारत त्यानें आपल्या प्रियपत्नीच्या स्मरणार्थ बांधिली.

मुम्ताजमहल्पासून शहाजहान बादशहास आठ मुलगे व सहा मुली अशीं चौदा मुलें झालीं; त्यांपैकीं आठ लहानपणींच मरण पावलीं. त्यांची यादी येणेंप्रमाणेः—

(१) मुलगी मिहरुन्निसा, ज. आग्रा १६१३, अजमीर येथें तीन वर्षांनीं मृत्यु; (२) मुलगी जहानारा बेगम ज. १६१४, मृ. १६८१; (३) मुलगा दाराशेखो ज. अजमीर १६१५, मृ. १६५९; (४) मुलगा शहासुजा ज. अजमीर १६१६, मृ. १६६०; (५) रौशनारा बेगम ज. बऱ्हाणपूर स. १६१७, मृ. १६७१; (६) औरंगजेब ज. १६१८ ता. २४ ऑक्टोबर, मृ. १७०७; (७) मुलगा उमेदबक्ष ज. सरहिंद स. १६२०, मृत्यु बऱ्हाणपूर येथें दोन वर्षांनीं; (८) मुलगी सुरय्याबानू बेगम ज. १६२१, सात वर्षांनीं मृत्यु; (९) मुलगा, नांव ठेवण्यापूर्वींच मृत, स. १६२३; (१०) मुरादबक्ष, ज. रोठस स. १६२४, मृत्यु १६६१; (११) लुत्फुल्ला ज. स. १६२७ व (१२) दौलतब्जा, स.१६२८, दोघेही एक वर्षानें मेले; (१३) मुलगी, ज. १६३०, उपजतांक्षणीं मृत्यु; (१४) गौहरारा बेगम, ज. बऱ्हाणपूर १६३१. इच्या प्रसूतिसमयीं आई मेली. ह्या मुलांचीं सर्व नांवें पारशी चालीचीं आहेत, मुसलमानी नाहींत.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

शहाजहानच्या उत्तर कार्किर्दीचा इतिहास म्हणजे ह्या त्याच्या अपत्यांचे झगडे होत. वडील पुत्र दारा हा बुद्धिमान, थोर मनाचा व उदार होता. धर्मशास्त्र व तत्त्वज्ञान ह्या विषयांचा त्यानें बराच अभ्यास केला असून पाश्चात्य शास्त्रांचीही त्यास बरीच ओळख होती. युरोपियन लोकांवर त्याची विशेष मेहेरनज़र असे. इमारतींच्या कामावर व तोफखान्यावर त्यानें पुष्कळ युरोपियन लोक नेमिले होते. परंतु त्याचा स्वभाव कांहींसा भोळा व गर्विष्ठ होता. तो आपल्या मनांतील विचार पाहिजे त्याच्या-जवळ मोकळेपणानें सांगे. अनेक वेळां त्याचें बोलणें लोकांस दुःसह होत असे. मुसलमानी धर्माविषयीं त्याच्या मनांत बरीच द्वेषबुद्धि वसत होती; आणि क्रिस्ती व हिंदु या धर्मांकडे त्याचा ओढा पुष्कळ होता. एक फ्रेंच पाद्री व हिंदु साधु असे त्याचे दोन गुरु होते. त्यानें उपनिषदें वगैरे अनेक संस्कृत ग्रंथांचीं फारशींत भाषांतरें करविलीं असून, 'सर्व धर्मांची एकवाक्यता' या नांवाचें स्वतः एक पुस्तक लिहिलें होतें. त्याच्या स्वतःच्या हातचीं लिहिलेलीं सहा पुस्तकें खुदाबक्ष संग्रहांत पाटणा येथे आहेत. स्तुतिप्रिय असल्यामुळें लोकांनीं केलेली खुशामत तो खरी समजे. स्तुति करणारे लोक मनापासून आपला द्वेष करितात हें त्यास कळत नसे. तो अविचारी असून, त्याला स्वपराक्रमाची मोठी घमेंड होती. म्हणून अकबराचे कांहीं गुण त्याच्या अंगीं असूनही अकबराची योग्यता त्यास कधींच आली नव्हती. लोकांवर छाप बसवून त्यांजकडून राज्याच्या फायद्याचें काम घेण्याचें शहाणपण त्यास नव्हतें. आपणासारखा शहाणा त्रैलोक्यांत कोणी नाहीं असें त्यास वाटे. तसेंच त्याचा क्रोध अगदीं अनावर असे. दाराच्या दोन बायका होत्या. एक शहाजादा पर्वीझची मुलगी नादिर-बेगम व दुसरी मीर्झा रुस्तमची मुलगी, (लग्न स. १६२३). सुलेमान व सिपिरशेखो हे दोन मुलगे त्यास होते.

दुसरा मुलगा सुजा हा शूर व कर्तृत्ववान होता; परंतु जवळच्या मंडळीवर त्याचा भरंवसा नव्हता. दिल्लीच्या दरबारीं आपले हेर ठेवून तो नेहमीं बातमी काढीत असे. जशवंतसिंह वगैरे बलिष्ठ हिंदु राजांशीं त्यानें आंतून सख्य बांधिलें होतें. इराणच्या शहाशीं त्याचा पत्रव्यवहार चालू होता. इराणी लोकांस संतुष्ट करण्याकरितां त्यानें शियापंथ स्वीकारिला; आणि सुनी धर्माचा तो द्वेष करूं लागला. त्याच्या प

गुणामुळें त्याच्या सर्व गुणांवर पाणी पडलें. तो अत्यंत व्यसनी होता, वेंकाळ नानातऱ्हेच्या विलासांत तो निमग्न असे.

औरंगजेब सर्व कुटुंबांत अत्यंत धूर्त व चाणाक्ष होता. कापट्य व दूरदृष्टि हे गुण त्याच्या अंगीं पूर्णपणें वास करीत होते. त्याची बुद्धि विशाल व तीव्र असून, त्यास मनुष्याची पारख उत्तम होती. धर्मप्रेमाच्या मिषानें त्यानें आपली महत्त्वाकांक्षा झांकून टाकिली होती. दिल्लीची गादी बळकाविण्याचे विचार पूर्वीपासून त्याच्या मनांत घोळत होते. परंतु आपला कोणास ...य येऊं नये, म्हणून संसार असार आहे, राज्याची दगदग आपणास ..., इत्यादि पोकळ गप्पा तो वाक्चातुर्यानें सांगत असे. दागदागिने अंगावर न घालितां तो नेहमीं साधा व शुभ्र पोशाख घाली. त्याच्या शरिराचा बांधा सडपातळ असून हा खरोखरीच स्वतःविषयीं बेपरवा आहे असें लोकांस वाटे त्याची वृत्ति उदास असे. बहुशः तो जवळ नेहमीं कुराणाचें पुस्तक बाळगी. प्रत्यक्ष शहाजहान बादशहासही त्यानें भुरळ पाडिली होती. औरंगजेबाच्या गुणांची शहाजहान वारंवार तारीफ करीत असे. दारानें मात्र औरंगजेबाचें कपट पूर्णपणें ओळखिलें होतें. दरबारच्या मंडळीशीं दाराशेखो फार उद्दामपणानें वागत असे; आणि ...कटदां त्यांचा पाणउतारा करी. परंतु औरंगजेबानें, गोडीनें व गरिबीनें वागून, सर्वांची प्रीति संपादन केली होती; त्यामुळें आरंभापासून त्याचीं गुप्त कारस्थानें बहुधा बाहेर फुटत नसत. कामदार लोकांशा इतके गरिबीनें वागूं नये, आपला बोज आपण कायम ठेवावा, असें बापानेंही त्यास सांगितलें. परंतु राज्य प्राप्त होईपर्यंत त्यानें आपला गरिबीचा क्रम कधीं बदलिला नाहीं.

चौथा पुत्र मुराद हा शूर, परंतु भोळा व मूर्ख होता. तो कोणतीही ...गुप्त ठेवीत नसे. त्यास शिकारीचा नाद विशेष होता. 'खाना, ...ना, और लढना' यांशिवाय इतर व्यवसाय त्यास अगदीं तुच्छ वाटत. सुनी धर्माविषयीं त्यास विशेष आस्था होती. त्याच्या धाडसास शहाणपणाची जोड मिळाली असती, तर तो अद्वितीय पुरुष झाला असता.

वडील कन्या जहान्-आरा (जगाला भूषविणारी) ऊर्फ बेगमसाहेब ही सुस्वरूप व आनंदवृत्तीची बाई होती. बादशहाची तिजवर ...ल मर्जी असे. त्याच्या भोजनाचे पदार्थ तिच्या देखरेखीखालीं तयार

होत. दरबारांतील प्रत्येक उलाढालींत तो तिचें मत घेत असे. ह्यामुळें दरबारांत तिचें वजन पुष्कळ वाढलें होतें. तिची नेमणूक मोटी असून, सरदार लोकांकडून वारंवार देणग्या मिळाल्यामुळें तिजपाशीं अपार संपत्ति जमली होती. दाराची सर्व भिस्त तिच्यावर होती, आणि तिचें त्यास पूर्ण पाठबळ होतें. बादशहाच्या घराण्याशीं शरीरसंबंध ठेवण्याइतकें उच्च घराणें दुसरें नसल्यामुळें, अलीकडील पोकळ डौलाच्या काळांत ह्या मुलींचीं लग्नें होतनाशीं झालीं. शिवाय असली बादशाही बायको गळ्यांत अडकवून तिच्या हुकमतींत राहणें कोणासही आवडणारें नव्हतें. आणखी असें कीं, प्रसंगविशेषीं नवऱ्याच्या जिवावर, प्रत्यक्ष राज्यावरही आपला हक्क सांगण्यास त्या कमी करणाऱ्या नव्हत्या. परंतु 'आपण गादीवर बसल्यावर तुझें लग्न करून देऊं,' असें दारानें आपल्या ह्या बहिणीस वचन दिलें होतें. शहाजहानची ह्या मुलीवर वाईट दृष्टि होती असाही बोभाटा त्या वेळेस झालेला होता. एवढया थोर व ऐषआरामांत वाढलेल्या ह्या मुलीविषयीं, लोकांच्या तोंडीं बरी वाईट चर्चा चालणें साहजिक आहे. मुम्ताज्महल् गेल्यावर तीस पस्तीस वर्षें सर्व जनानखान्यावर तिचाच ताबा होता. बादशहाच्या खानपानावर तिची सक्त नजर असे. बाप कैदेंत असतांना सुद्धां ती त्याजपाशींच नेहमीं राहत असे. तिच्या नांवाची एक भव्य धर्मशाळा दिल्लींत आहे. दिल्लीशहराबाहेर एका साधूच्या कबरेनजीक तिची कबर आहे. आपल्या कबरस्थानावर डामडौलाची मशीद बांधूं नये अशी तिची शेवटची इच्छा होती. त्याप्रमाणें ती कबर अगदीं साधी आहे.

धाकटी मुलगी रोशन्-आरा (प्रकाशरश्मि) बेगम ही आपल्या बहिणीइतकी सुस्वरूप व शहाणी नव्हती. तरी पण ती उलाढाली करण्यांत कांहीं कमी होती असें नाहीं. तिचा सर्व ओढा औरंगजेबाकडे होता. म्हणून दारा व बेगमसाहेब यांजबद्दल तिचें उघड वैर होतें. दरबारांत तिला मान नव्हता, आणि तिला पैशाचेंही पाठबळ नव्हतें. परंतु जनानखान्यांत असल्यामुळें बेगमसाहेबाचीं कारस्थानें तीस कळत असत, तीं ती औरंगजेबास कळवी.

शहाजहान बादशहा आपल्या मुलाचे गुण ओळखून होता. त्याने आपल्या मुलांविषयीं लिहून ठेविलेला अभिप्राय सुरेख आहे:- 'दारा हा बुद्धिमान सरदार आहे, आणि राज्याच्या अधिकारास यो

रशी त्याची प्रौढी आहे. परंतु कोणाचाही उत्कर्ष त्यास सहन होत नाहीं; यामुळें चांगल्यास वाईट व वाइटास चांगला असा तो आहे. शुजा हा शुद्ध मद्यपी आहे, आणि मुराद खादाड व विषयी आहे. औरंगजेबाची हातोटी व बुद्धिमत्ता मोठी आहे; आणि राज्यकारभाराचें गाडें ओढण्यास हा फार योग्य आहे. परंतु हा कपटानें भरलेला आहे, यास्तव त्यास विश्वासु असा बहुधा कोणीच मिळावयाचा नाहीं.' असा शहाजहानचा अभिप्राय होता. थोडक्यांत ह्या मुलांचें वर्णन करावयाचें असल्यास, गर्विष्ठ, विषयी, कपटी, आणि मूर्ख, हीं चार विशेषणें चौघांस देल्यास शोभण्यासारखीं आहेत. आपले मुलगे एकमेकांवर उठून खून करण्यासही मागें पुढें पाहणार नाहींत अशी खात्री असल्यामुळें, पुढें होणारे अनर्थ टाळण्याकरितां शहाजहाननें नाना तऱ्हेचे बेत मनांत आणिले. सर्वांचीं लग्नकार्यें होऊन मुलेंबाळें सुद्धां झालीं होतीं. सर्वांस कैद करून ग्वालेरच्या किल्ल्यांत ठेवावें असाही विचार त्याच्या मनांत आला. परंतु आतां हे थोर झाले असून आपलें हिताहित त्यांस कळतें आहे असें मनांत आणून, बादशहानें त्यांचा राज्याचे कामीं उपयोग करून घेण्याच्या इराद्यानें, त्यांस दूरदूरच्या प्रांतीं अधिकार देऊन पाठविलें. दारा यास स्वतःजवळ ठेविलें; शुजास बंगालप्रांताचा कारभार दिला; औरंगजेबास दक्षिणेंत पाठविलें; आणि मुरादची रवानगी गुजराथेंत केली. अशा रीतीनें त्यांची सत्ता व स्वतंत्रता वाढेल हें शहाजहानच्या लक्षांत राहिलें नाहीं. मोगलघराण्यांत गादीच्या वारसाचा प्रश्न नेहमींच बिकट असून जे गोंधळ झाले, त्यांचा बंदोबस्त कधींच झाला नाहीं.

३. **औरंगजेबाचा पूर्वायुःक्रम.**—जहांगीर बादशहा मलिकंबरचा बंदोबस्त करून परत आग्र्यास जात असतां, शहाजहानची बायको मुम्ताजमहल् गुजराथच्या पंचमहाल जिल्ह्यांत दोहद येथें ता. २४ ऑक्टोबर इ. १६१८ रोजीं प्रसूत होऊन मुलगा झाला, तोच औरंगजेब होय. ह्या दोहद गांवाबद्दल औरंगजेबास अगदीं मरेपर्यंत मोठें प्रेम वाटत असे.

शहाजहान आपल्या बायकोस नेहमीं आपल्या बरोबर घेई. बापाचें व त्याचें वितुष्ट पडून तो सर्व देशभर रानोमाळ भटकत होता, तेव्हां सुद्धां बायको व सर्व मुलें त्याच्याबरोबर होतीं. पुढें तो बापास शरण गेला, तेव्हां दारा व औरंगजेब हे दोघे शहाजहानचे ओलिस म्हणून, जहां-

४१-७-११-१०-७६१-२०००

गीरनें आपणाजवळ लाहोर येथें ठेवून घेतले, (जून १६२६). ते तेथें नूरजहानच्या ताब्यांत होते. पुढें जहांगीर वारल्यावर शहाजहान आग्र्यास येऊन सिंहासनारूढ झाला, तेव्हां आसफ्खानानें ह्या दोघां मुलांस आग्र्यास आणिलें. त्या प्रसंगीं आपले मुलगे परत भेटल्याबद्दल त्यांच्या आईस प्रेमाचें अतिशय भरतें आलें. ता. २६ फेब्रुवारी रोजीं औरंगजेबाच्या रोजच्या खर्चाकरितां ५०० रुपये बांधून देण्यांत आले.

त्याच वेळीं त्याच्या शिक्षणास सुरुवात झाली. पुढें प्रसिद्धीस आलेला सादुल्लाखान हा त्याचा पहिला शिक्षक होता. नंतर गिलानचा मीरमहंमद हाशीम हा औरंगजेब गादीवर बसेपर्यंत त्याजपाशीं शिक्षक म्हणून होता. औरंगजेबाची बुद्धि तरतरीत असून हरएक गोष्ट तो ताबडतोब शिकत असे. त्याला पुष्कळ ग्रंथ व कवनें तोंडपाठ येत होतीं. आरबी, फारशी, हिंदुस्थानी ह्या भाषा त्यास उत्तम येत असून, हिंदी चांगली समजत होती. मध्यआशियांतील स्वारींत तो तेथची तुर्की भाषा शिकला. त्याचें अक्षर सुंदर होतें. मोगल बादशाहींत मुलांचीं अक्षरें घटविण्याची मेहनत विशेष करीत असत. औरंगजेबाचा धर्मग्रंथांचा अभ्यास दांडगा होता. दक्षिणच्या कारभारावर असतां, इकडच्या एकूणएक फकीर व विद्वान् लोकांची त्यानें गांठ घेतली होती. कला मात्र तो कांहीं एक शिकला नाहीं. चित्रकला, गायन इत्यादिकांस त्यानें पुढें रजाच दिली.

सन १६३३ च्या ता. २८ मे रोजीं आग्रा येथें यमुनेच्या वाळवंटांत औरंगजेब घोड्यावर बसून हत्तींच्या टकरा पाहत असतां, एक मस्त हत्ती त्याजवर चाल करून आला, त्याबरोबर हातांतील भाला औरंगजेबानें हत्तीच्या सोंडेवर मारिला, तेव्हां हत्तीनें सोंडेचा एक तडाखा औरंगजेबाच्या घोड्यावर मारून त्यास खालीं पाडिलें. औरंगजेबानें लगेच उठून पायींपायींच पुनः हत्तीवर चाल केली. इतक्यांत लोकांनीं धांवत येऊन त्यास सोडविलें. त्याचा बाप शहाजहान किल्ल्यांतील झरोक्यांतून हा सर्व प्रकार पाहत होता. त्यास मुलाच्या ह्या शौर्याचें मोठें कौतुक वाटून, व त्याच्या जिवावरचें संकट टळलें असें समजून, त्यानें लगेच बहादूर हा किताब व दुसरीं बक्षिसें त्यास दिलीं. पुढें तीन दिवसांनीं त्याचा वाढदिवस आला, तेव्हां त्याची सुवर्णतुला केली; आणि दोनलाख रुपये बक्षीस दिले. स. १६३४ त तो बापाबरोबर काश्मिरांत गेला होता. त्याच वर्षाच्य

अखेरीस त्यास बापानें दहाहजारांची मनसब देऊन दक्षिणच्या कारभारा-र पाठविण्याचें ठरविलें, आणि अनुभवासाठीं म्हणूनच स. १६३५च्या सेप्टेंबरांत बुंदेल्यांवरील स्वारींत मोठमोठ्या सरदारांच्या हाता-खालीं त्यास देऊन त्याची रवानगी केली. हरएक बाबत औरंग-जेबास विचारून व त्यास नीट समजावून नंतर ती अमलांत आणावी, असा त्या सरदारांस बादशहाचा हुकूम होता. ही स्वारी चार महिन्यांत आटपली. मोगलांनीं बुंदेल्यांची राजधानी ओर्च्छा काबीज केली, आणि राजा झुंजारचा पाठलाग करून त्यास ठार मारिलें; व त्याच्या बायका जनानखान्यांत नेल्या. तथापि हे बुंदेले सर्वस्वी शरण गेले नाहींत. कांहीं दिवसांनीं चंपकराय व त्याचा मुलगा छत्रसाल हे पराक्रमी निघाले, त्यांची गोष्ट अन्यत्र येईल.

ता. १४ जुलै स. १६३६ रोजीं औरंगजेबाची नेमणूक दक्षिणच्या कारभारावर झाली. पुढें अहंमदनगरचें राज्य काबीज होऊन विजापूर गोवळकोंड्यांचे सुलतान बादशहास शरण आले. ह्या एकंदर युद्धांनीं एक कोटी उत्पन्नाचा वसूल, व दोन कोटींचा ऐवज बादशहास मिळाला. नंतर औरंगजेबानें बागलाणप्रांत जिंकला. आठ वर्षे औरंगजेब ह्या पहिल्या कारभारावर होता. तेवढ्या अवधींत तो चार वेळां आग्र्यास जाऊन बापास भेटला. त्याच्या गैरहजिरींत दक्षिणचा कारभार शाएस्ते-खान पाहत असे. अहंमदनगरच्या सुभ्याची व्यवस्था लावणें व बागलाण-प्रांत जिंकणें हीं दोन मोठीं कामें त्यानें ह्या आठ वर्षांत केलीं.

ता. ७ मे सन १६३७ रोजीं औरंगजेबाचें लग्न शहानवाजखानाची मुलगी दिलरासबानू बेगम हिच्याशीं झालें. इराणच्या राजकुटुंबांतील पुष्कळ पुरुष दिल्लीस मोगलांच्या पदरीं येऊन राहत असत; आणि तिकडील थोर कुलांशीं संबंध जोडून, आपल्या कुटुंबाचें महत्त्व वाढ-विण्याविषयीं दिल्लीचे बादशहाही नेहमीं आतुर असत. मीर्झा मुजफर हुसेन नांवाचा एक इराणी राजपुत्र अकबराचे नोकरींत होता. त्याचा धाकटा भाऊ मीर्झा रुस्तम ह्यानें जहांगीरपाशीं नोकरी केली. मीर्झा मुजफरची मुलगी शहाजहानास दिलेली होती; आणि रुस्तमच्या दोन मुली शहाजादा पर्वीझ व सुजा ह्यांस दिलेल्या होत्या. रुस्तमचा मुलगा शहानवाजखान हा शहाजहानपाशीं मोठ्या इभ्रतीचा गृहस्थ होता.

त्याची मुलगी दिलरास बानू बेगम औरंगजेबास करावयाची असा ठराव होऊन, पुढें तें लग्न लवकरच झालें. पुढच्या वर्षी तिचीच बहीण शहाजादा मुराद ह्यास दिली. शहानवाजखानाची नात (मुलाची मुलगी) अज़्रम बानू ही पुढें औरंगजेबाचा मुलगा कामबक्ष यास देण्यांत आली.

लग्न ठरलें तेव्हां औरंगजेब दक्षिणेंत होता. त्यास शहाजहाननें मोठ्या ममतेचें पत्र पाठवून तावडतोब आग्र्यास बोलाविलें. त्याप्रमाणें ता. १९ एप्रिल सन १६३७ रोजीं तो आग्र्यास दाखल झाला. दुसरे दिवशीं तो बापास भेटला; आणि ता. ८ मेचा मुहूर्त ज्योतिष्यांच्या सल्ल्यानें कायम करण्यांत आला. ता. ७ रोजीं 'हेन्नाबंदी' चा म्हणजे नवऱ्या मुलाचे हातपाय हेन्नानें (मेंदीनें) रंगविण्याचा विधि झाला. हत्तीवरून वधूकडून हा हेन्ना आला होता. हा विधि हिंदूंच्या हळदीसारखा आहे. हेन्नाबरोबर दागदागिने, पोशाख व बहुमोल नजराणेही आले होते. हेन्नाचा विधि आटोपल्यावर वराचा दरबार झाला. त्या वेळीं गाणें बजावणें चालू होतें. सर्व नजराणे मोठमोठ्या ताटांत घालून मांडलेले होते. बाहेर दारूकाम सुटत होतें. रात्रीं मोठी मेजवानी झाली. दुसऱ्या दिवशीं सायंकाळीं लग्नसमारंभ झाला. सूर्योदयापूर्वी चार तास म्हणजे पहांटे दोन वाजतां विवाहकाल निश्चित झाला होता. त्यापूर्वी बराच वेळ वराची स्वारी आग्र्याच्या किल्ल्यांत जाऊन, बापास वंदन करून वधूच्या घरीं जावयास निघाली. भाई मुराद व आसफ्खान हे नेहमीं बराबरोबर असत. वरघोड्याची स्वारी फार मोठी होती. सासऱ्यानें जांवयाचा सत्कार उत्तम केला. शहाजहान बोटींतून ऐन वेळेस आला. नंतर लग्न लागलें. वरानें वधूस चारलाखांचा ऐवज दिला. म्हणजे पुढेंमागें काडी मोडल्यास ही रक्कम तिला मिळावयाची होती. ता. १४ मे रोजीं परत पोशाखाचा दरबार होऊन, सरकारांतून लोकांस पोशाख देण्यांत आले. ह्या समारंभानंतर आग्र्यास तीन महिने राहून, औरंगजेब ता. ४ सेप्टेंबर रोजीं दक्षिणेंत आपल्या कारभारावर निघून गेला. हा कारभार त्यानें आठ वर्षे केला हें मागें आलेंच आहे.

सन १६४४त औरंगजेबाची चित्तवृत्ति एकदम विरक्त होऊन तो फकीर बनला. ह्याचीं कारणें अनेक सांगतात. बऱ्हाणपूर येथें त्याची मावशी होती, तिच्या भेटीस औरंगजेब गेला असतां, हिराबाई म्हणून एक सुंद-

रुण स्त्री तिच्यापाशीं गाणारीण म्हणून होती, तिच्यावर औरंगजेबाचें न बसलें. पुढें मोठ्या प्रयासानें औरंगजेबानें तिला मावशीच्या नवऱ्यापासून मागवून आपणापाशीं आणिलें. परंतु पुढें लवकरच ती मरण पावल्यामुळें तो विरक्त झाला. दुसरें कारण असें आहे, कीं दाराशीं औरंगजेब मोठ्या चुरशीनें वागत असे. अशा कारणांनीं बापानें त्यास दक्षिणच्या कारभारावरून दूर करून रागानें त्याच्या नेमणूका वगैरे सर्व बंद केल्या. तेव्हां आभ्यास येऊन तो मोठ्या दुःखानें दिवस कंठूं लागला. त्याच वेळीं त्याची बहीण जहानारा भाजली होती, ती बरी झाल्यावर तिनें बापाजवळ रदबदली करून त्याच्या नेमणुका पुनः चालू करविल्या. पुढें ता.१६ जानुवारी १६४५ रोजीं त्याची गुजराथच्या सुभ्यावर नेमणूक होऊन ती कामगिरी सन १६४७ पर्यंत चालली. नंतर त्यास मध्यआशियांतील मोहिमेवर जावें लागलें. गुजराथेंत दरवडेखोरांचा उपद्रव अतिशय चालू होता. म्हणून ज्यास्त फौज ठेवून व ठिकठिकाणीं बंदोबस्त करून त्यानें दरवडे साफ बंद केले. ही त्याची चांगली कामगिरी ऐकून बापानें त्यास सालाचा ६० लाख रुपये तनखा करून दिला, आणि गुजराथचा कारभार शाएस्तेखानाच्या हावालीं करून कंदाहारच्या स्वारीकरितां लवकर निघून ये, असें त्यास लिहिलें. त्याप्रमाणें २० जानेवारी १६४९ रोजीं तो लाहोरास जाऊन बापास भेटला.

सन १६४९–५२पर्यंत औरंगजेब मुलतानच्या सुभ्यावर होता. ता.१७ ऑागस्ट १६५२ रोजीं त्याची नेमणूक पुनरपि दक्षिणच्या सुभ्यावर झाली. तेव्हांपासूनच्या पांच वर्षांत मोठ्या धूर्ततेचें व सावधगिरीचें वर्तन ठेवून राज्यकारभारांतील हरएक बाबतीचा व लोकांचा अनुभव त्यानें मिळविला. रात्रंदिवस श्रम करून फौज सुधारिली. तेणेंकरून शहाजहान आजारी पडला, त्या वेळीं इतर भावांच्या मानानें पुढील उपक्रमाविषयीं औरंगजेबाची तयारी परिपूर्ण होती.

शहाजहानचें वय होत गेलें, तसतसें राज्यकारभाराकडे त्याचें दुर्लक्ष होऊन दाराच्या हातीं सर्व राज्यसूत्रें आलीं. पैशाची व्यवस्था मात्र बादशहानें स्वतःच्या हातीं ठेविली होती. इतर मुलांनीं राज्यपद मिळविण्याच्या आशेनें आपआपल्या फौजा वाढविण्यास सुरुवात केली. प्रांतांतील वसूल ते पाहिजे तसा खर्च करूं लागले.

सर्वांत औरंगजेबानें रचिलेला व्यूह फार खोल व भयंकर होता. दक्षिणेंत असतां मीर जुम्ला नामक एका कर्तृत्ववान पुरुषाशीं त्याची गांठ पडली.

मीर-जुम्ला.—हा जातीचा इराणी असून एका तेल्याचा मुलगा होता. तो एका व्यापाऱ्याबरोबर हिंदुस्थानांत आला होता. त्याचा इराणी बाणा त्याच्या फार उपयोगी पडला; आणि त्यानें पुष्कळ वर्षे दक्षिणेंत राहून आपलें वजन वाढविलें. प्रथम त्यानें दिल्लीस बादशाही फौजेंत नोकरी धरिली तेथें तो पुष्कळ वाढला. परंतु दाराचें व त्याचें वांकडें आल्यामुळें दिल्ली सोडून तो गोवळकोंड्यास गेला; तेथें त्यास प्रथम महसुलाचें काम मिळालें. त्याशिवाय त्याचा खासगी व्यापार चालूच होता. त्या योगानें त्यानें अपार संपत्ति मिळविली. पुढें गोवळकोंड्याच्या सुलतानास हरतऱ्हेचे पदार्थ नजर करून त्यानें [illegible] वजिरी मिळविली. गोवळकोंड्यास हिऱ्याच्या खाणी काढून [illegible] अपार पैसा संपादिला. हळू हळू त्यानें आपली फौज वाढविली आणि सुलतानावर आपला वचक बसविला. लवकरच त्याच्याविषयीं कुत्बशहाच्या मनांत मत्सर उत्पन्न झाला. शहाची मातुश्री व मीर जुम्ला यांजमध्यें फाजील स्नेह असल्याची शहास खबर कळल्यावरून, त्यानें त्यास कर्नाटकांत नवीन जिंकिलेल्या मुलुखाच्या बंदोबस्तास पाठविलें. तिकडे गेल्यावर त्याच्या द्रव्यलोभास सीमाच राहिली नाहीं. हिऱ्यांच्या खाणी खोदून, त्यानें उत्तमोत्तम हिरे स्वतःकरितां ठेविले, आणि कचरा सांपडेल तो सुलतानाकडे पाठविला. गोव्याच्या पोर्तुगीज लोकांस हिरे देऊन त्यांचें साहाय्य घेतलें; आणि तोफखान्यावर कुशल पोर्तुगीज लोक ठेविले. हिंदूंचीं देवळें लुटून, व त्यांस मारहाण करून धन मिळविलें. पाश्चात्य जव्हेरी टॅव्हर्नियर हा सन १६५२त मीर जुम्ला यास पेन्नार नदीच्या कांठीं गंडीकोट येथें भेटला होता. त्या वेळेस मीर जुम्लानें गंडीकोट नुक्तेंच काबीज केलें होतें. तेथील सोन्या चांदीच्या मूर्ती त्यानें घेऊन वितळविल्या. दहा फूट उंचीच्या सहा पितळेच्या मूर्ती त्यानें आटविण्याची खटपट चालवून त्यांच्या तोफा करण्याचा त्याचा मनोदय होता; पण त्या वितळतना, ब्राह्मण मंत्रांनीं मूर्ति भारतात म्हणून त्या वितळत नाहींत, अशा समजुतीवर त्यानें अनेक ब्राह्मणांस फांशीं चढविण्याची धमकी दिली, तरी त्या वितळस

नाहींत. शेवटीं फ्रेंच कारागिरांनीं एक तोफ ओतली; पण ती उडवीत असतां फुटली. टॅव्हर्नियर म्हणतो, 'मीर-जुम्ला यास खरे हिरे मिळाले नाहींत. बेरंगी खडे मात्र पुष्कळ सांपडले.' कर्नाटकचा कारभार त्यानें मन मानेल तसा केला. ह्या त्याच्या कृत्यांनीं कुत्बूशहास ज्यास्तच त्वेष आला, आणि त्याचा मुलगा महंमद अमीर यास त्यानें वाईट रीतीनें वागविलें. तो प्रकार कुत्बूशाहीच्या इतिहासांत आला आहे, (पृ २८७). मीर-जुमूला यास परत बोलावून त्याचा नाश करावा असें कुत्बूशहाच्या मनांत आलें. परंतु ही बातमी शहाच्या आईनें मीर-जुम्ला यास कळविली. त्यावर त्यानें पुढील मजकुराचें पत्र औरंगजेबास लिहिलें. 'हिंदुस्थानांतील अत्यंत धनाढ्य राज्य घशांत टाकण्याचा समय आला आहे. मीं मोगलांची नोकरी केली असून, त्यांचेंच हित साधण्याकरितां गोवळकोंड्याच्या कुत्बूशहाची नोकरी पत्करिली. गोवळकोंड्याच्या राणीशीं माझें संधान आहे. कर्नाटकची फौज माझ्या मुठींत आहे. माझा मुलगा महंमद अमीरखान ह्याच्या हातीं गोवळकोंड्याची फौज आहे. अशा संधीस तुम्हीं गोवळकोंड्यावर स्वारी केल्यास राज्य तुमचें झालें म्हणून समजा.' हें पत्र वाचून औरंगजेबास अत्यानंद झाला. शियाधर्मी कुत्बूशहाचा पाडाव करण्याची ही संधि त्यास आयतीच मिळाली. गोंवळकोंडें ताब्यांत आल्यास सर्व हिंदुस्थानचें स्वामित्व बळकावण्यास त्यास विलंब लागणारा नव्हता. हा बेत सिद्धीस नेण्यास त्या दोघां कपटपटु पुरुषांनीं चमत्कारिक युक्ति केली. शहाजहान बादशहाचा वकील म्हणून औरंगजेबानें कांहीं महत्त्वाच्या कामाची तडजोड करण्याच्या मिषानें भागानगरास जावें, आणि शहास भेटून एकदम कैद करावें असें ठरलें. ह्या कामीं मीर-जुम्लाचा मुलगा औरंगजेबास मदत करणार होता. त्याप्रमाणें औरंगजेब दौलताबाद सोडून भागानगरास गेला. वाटेंत त्यानें अशी कंडी उठविली, कीं 'मी आपला मुलगा महंमद याचें सुजाच्या मुलीशीं लग्न करण्याकरितां बंगाल्यांत जात आहें.' सुलतानच्या पदरीं एक इमानी सरदार होता, त्यानें आपल्या धन्यास वेळींच सावध केल्यामुळें, सुलतानाची ह्या पेंचांतून सुटका झाली. तो जीव बचावून गोवळकोंड्याच्या किल्ल्यांत पळून गेला. तेव्हां औरंगजेब बुचकळ्यांत पडला. मीर-जुम्ला त्यास येऊन मिळाला, (२० मार्च १६५५).

दोघांनीं मिळून गोवळकोंड्यास वेढा दिला. इतक्यांत दिल्लीहून बादशहाचा हुकूम आल्यामुळें औरंगजेबास वेढा उठवून परत जावें लागलें.

या वेळेस बादशहापाशीं दारा सर्व कारभार पाहत होता. औरंगजेबाचे वरील खेळ पाहून त्यास धास्ती पडली. गोवळकोंडा काबीज होतांच बादशाही पद मिळविण्यास औरंगजेबास प्रयास पडावयाचे नाहींत, हें दारा जाणून होता. म्हणून गोवळकोंड्याहून एकदम परत यावें असा बादशहाकडून सक्तीचा हुकूम मिळवून, तो दारानें औरंगजेबाकडे पाठविला. अजून योग्य संधि आली नाहीं; असें पाहून त्या कावेबाज औरंगजेबानें हा हुकूम पाळण्यास कांकूं केलें नाहीं. मुसलमानानें मुसलमानाशीं लढणें युक्त नाहीं, असें सांगून तो लगेच परत गेला. पण ह्या प्रसंगीं त्यानें पुढील कलमांचा तह गोवळकोंड्याच्या शहापासून करून घेतलाः—(१) कुत्बूशहानें लढाईचा सर्व खर्च द्यावा; (२) आपली मुलगी औरंगजेबाचा पुत्र महंमद यास देऊन त्यास आपल्या पश्चात् कुत्बूशाहीच्या तख्तावर बसवावें, आणि रामगड परगणा तीस आंदण द्यावा; (३) आपल्या राज्यांतील सर्व नाणीं शहाजहानच्या नांवानें पाडावीं; आणि (४) मीर-जुम्ला यास आपली सर्व फौज व दौलत घेऊन मर्जीस वाटेल तिकडे जाण्यास मोकळीक द्यावी. हीं कलमें कुत्बूशहानें कबूल केलीं. शिवाय औरंगजेबास ह्या युद्धाचा सर्व खर्च मीर-जुम्ला यानें दिला. तिकडे आग्र्यास दाराचा कारभार पुष्कळ मंडळीस दुःसह झाला होता. त्याच्या हातांतली सत्ता वाढली असून युरोपियन लोकांशिवाय दुसऱ्या कोणावर त्याचा भरंवसा नव्हता. रजपूत राजांशीं तो फारच उद्दामपणानें वागे. महाबतखानास त्यानें दुखविलें, तेव्हां त्या बाणेदार वृद्ध सरदारानें लढण्याची तयारी केली. शहाजहानचे पांचावर धारण बसली. त्यानें कसें-तरी दारास स्वस्थ बसविलें. त्याचप्रमाणें दारानें जयसिंहाचा अपमान केला. 'तूं केवळ गवई, तुला दुसरें काय येतें!' असे शब्द तो जयसिंहास बोलला. तो रजपूत सरदार हे शब्द कधीं विसरला नाहीं. मोठमोठ्या कामदारांस दारानें ठार मारल्याचा गवगवा झाला. त्यांनीं आपला पक्ष स्वीकारावा एतदर्थ त्यानें नाना उपाय केले. दक्षिणेंत औरंगजेब व मीर-जुम्ला हे स्नेही बनले असून, दोघांचें दाराशीं वैर होतें. मीर-जुम्ला ह्यानें शहाजहान बादशहास हिरे वगैरे

पाठवून संतुष्ट केलें. त्यांतच कोहिनूर हिरा होता असें म्हणतात. पुढें शहाजहाननें मीर-जुम्ला यास फौज घेऊन विजापूरचें राज्य जिंकण्याची परवानगी दिली. औरंगजेबानें मात्र आपला प्रदेश सोडून जाऊं नये अशी दारानं तजवीज केली होती. परंतु औरंगजेबाचें व मीर-जुम्लाचें एकमत होण्यास विलंब लागला नाहीं. औरंगजेब त्यास म्हणाला, 'दारा हा दुष्ट असून, बादशहास गुलामाप्रमाणें वागवितो. आम्हां इतर मुलांशीं पितृत्वाचें नातें बादशहानें सोडून दिलें आहे. तर तुम्हीच मला पितृस्थानीं आहां.' ह्या भाषणासि तो शूर सरदार भाळला; आणि त्यानें औरंगजेबास मदत करण्याचे होतील तितके प्रयत्न करण्याचें कबूल केलें. नंतर मीर-जुम्ला विजापूरच्या मुलखांत शिरला, आणि तिकडे त्यानें बेदरच्या किल्ल्यास वेढा दिला. औरंगजेब औरंगाबाद येथें स्वस्थ राहिला. खिडकी शहरास औरंगाबाद हें नांव त्यानें ह्याच वेळेस दिलें.

४. **राज्यपदाकरितां चार भावांचा झगडा.**—अशा प्रकारें बादशहाचे चारही पुत्र आपापला पक्ष जोरांत आणण्याचा प्रयत्न करीत असतां, तारीख ६ सेप्टेंबर सन १६५८ रोजीं शहाजहान बादशहा अपस्मार वायूनें एकाएकीं आजारी पडला. विद्युल्लतेप्रमाणें ती बातमी सर्व राज्यांत हां हां म्हणतां पसरली. संपूर्ण मोगल बादशाहींत राज्याच्या उलाढालीविषयीं चळवळी सुरू झाल्या. पुष्कळांचा समज बादशहा मरण पावला असाच झाला. त्याच्या सर्व पुत्रांनीं युद्धाची तयारी केली. दरबारांत त्यांचीं पत्रें खेळूं लागलीं. दारानें आपली फौज अतोनात वाढविली. त्याजबरोबर सामना करण्याकरितां सुजानें बंगाल्यांत कडेकोट तयारी चालविली. बंगालप्रांत सर्व राज्यांत सधन होता. सुजानें नाना उपाय करून अपार संपत्ति मिळविली होती. तो जय्यत तयारीनिशीं दिल्लीवर चालून आला. रिकिबींत पाय ठेवितांना त्यानें शपथ वाहिली, कीं 'मारीन किंवा मरेन.' दारानें बादशहास विषप्रयोग करून ठार मारिलें अशी त्यानें बाहेर कंडी पिकविली; आणि त्याला शासन करण्याच्या हेतूनें आपण त्वरेनें चालून आलों असें लोकांत पसरविलें. परंतु तो येऊन पोंचण्यापूर्वींच बादशहाची प्रकृति सुधारत चालली. तो येत आहे असें बादशहास कळतांच, त्यानें त्यास पुढें न येण्याविषयीं पत्र पाठविलें. 'मी आतां चांगला बरा झालों, दाराचें कांहीं कपट

नाहीं,' वगैरे मजकुराचें पत्र बादशहानें सुजास पाठविलें. परंतु हें पत्र लबाडीचें आहे, बादशहा खरोखरी फार आजारी आहे, अशी सुजास त्याच्या बातमीदाराकडून बातमी कळल्यामुळें तो मागें फिरला नाहीं. दारानें त्याजवर फौज पाठविली. तिजवर दाराचा वडील मुलगा सुलेमान हा मुख्य होता. त्या फौजेंत अफगाण व रजपूत असे दोन जातींचे लोक होते. अफगाण लोकांचा पुढारी दलीलखान असून रजपुतांचा मुख्य जयसिंह होता. सुजाच्या फौजेंत शियाधर्मी लोक असल्यामुळें त्यांजबरोबर सामना करण्यास सुलेमानचे सुनी अफगाण तरारले होते. जयसिंह दारानें केलेला अपमान विसरला नव्हता. सुजाचा पाडाव करण्याची त्याची इच्छा नव्हती. शिवाय कोणीकडून लढाईवर प्रकरण आणूं नये, अशी शहाजहानचीही त्यास ताकीद होती. जयसिंहानें त्यास पुढें न येण्याविषयीं सामोपचाराचें पत्र लिहिलें. सुजानें जबाब पाठविला, कीं 'तुम्ही म्हणतां, त्यापक्षीं मी परत जाण्यास तयार आहें. परंतु मी अगोदर परत फिरल्यास भिऊन पळालों असें लोक म्हणतील. याकरितां बादशाही फौजेनें प्रथम परत जावें.' असें करण्यांत सुजाचा हेतु लबाडीचा आहे हें जयसिंह समजून होता; तरी तो सावधगिरी ठेवून परत फिरला. इतक्यांत सुजानें त्या फौजेवर मागून एकाएकीं येऊन छापा घातला. जयसिंह तयारीनें होताच. ता. १४ फेब्रुवारी, स. १६५८ रोजीं बनारसच्या समोर बहादूरपूर येथें त्यानें सुजाच्या फौजेवर असा निकराचा हल्ला केला, कीं त्यास बंगाल्यांत पळून जाणें भाग पडलें. त्याच्या उत्कृष्ट सैन्याची दाणादाण झाली. पुष्कळ लोक युद्धसामुग्रीसह जयसिंहाच्या हातीं पडले. मोंगीरपर्यंत जयसिंहानें सुजाचा पाठलाग केला.

इकडे असा प्रकार चालू असतां दक्षिणेंत औरंगजेब स्वस्थ बसला नव्हता. आरंभीं आपण स्वस्थ बसून परभारें सर्व भावांचा नाश व्हावा, असें त्यानें आपलें वर्तन ठेविलें मुराद गुजराथेंतून दिल्लीवर जाण्याच्या तयारींत आहे असें त्यास कळलें. तेव्हां औरंगजेबानें त्यास खालील आशयाचें पत्र लिहिलें. 'मुरादसाहेब, मला राज्याचा किती कंटाळा आहे हें तुम्हांस माहीत आहेच. फकीर बनून या नाशवंत देहाचें सार्थक करून घ्यावें, असें माझ्या मनांत आहे. दारा व सुजा हे राज्याच्या

अगदीं नालायक आहेत. दारा यास आपल्या धर्माचा अभिमान मुळींच वाटत नाहीं. सुजाही पाखंडी आहे. इराणचा शियाधर्म त्यास आवडतो. खऱ्या मुसलमानी धर्माचा अभिमान कायतो तुम्हांसच आहे. म्हणून राज्यभार वाहण्यास तुमच्यासारखा लायक मनुष्य मला दुसरा दिसत नाहीं. कसेंही करून हें राज्य तुम्हांस मिळवून द्यावें, एवढीच माझी इच्छा आहे. तसें झाल्यावर माझा एक मनोदय आहे, तो मात्र तुम्हीं पूर्ण केला पाहिजे. मक्केस जाऊन पैगंबराच्या चरणापाशीं काल-क्रमण करण्यास तुम्हीं मला मोकळीक द्यावी.' ही मसलत कशी तडीस न्यावयाची याजबद्दलही औरंगजेबानें मुराद यास आपला अभिप्राय कळविला. पत्र पोंचतांच तो बेअक्कल मुराद औरंगजेबाच्या कपट-जालांत पूर्णपणें सांपडला. त्याच्या अनेक हितचिंतकांनीं औरंगजेबाच्या विश्वासघातकी वर्तनाचें पुष्कळ स्पष्टीकरण केलें; पण तें त्यास रुचलें नाहीं. 'मी तुम्हांस आपल्या पित्याप्रमाणें समजतों,' असा मुरादनें औरंगजेबास जबाब लिहिला. औरंगजेबानें सैन्याची जमवाजमव करून मीर-जुमला यास विजापुरांतून परत बोलाविलें. परंतु मीर-जुम्ला याचीं नायकामाणसें दिल्लीस दाराचे ताब्यांत ओलीस म्हणून दिलेलीं होतीं. तेव्हां त्यास उघडपणें औरंगजेबास मिळतां येईना. म्हणून या उभयतांनीं एक विलक्षण युक्ति केली. मीर जुम्लाच्या फौजेंतील मंडळींकडून बंड करवून त्यास पकडून औरंगजेबाचे स्वाधीन केलें. औरंगजेबानें त्यास औरंगाबादचे किल्ल्यावर कैदेंत ठेविलें. हें वर्तमान दिल्लीस समजल्यावर दारास वाईट वाटलें. पण बिचारा करतो काय? इतकी तजवीज झाल्यावर औरंगजेब मुराद यास मिळण्याकरितां दक्षिणदेश सोडून निघाला. निघतेवेळीं त्यानें कुराणाचें पुस्तक हृदयाशीं लावून सर्वांसमक्ष पुनः एकदां आपल्या कपटपूर्ण उद्देशाचें प्रदर्शन केलें आणि बोलला, 'दारानें ह्या कुराणाचा अपमान केला आहे, तो मी भरून काढणार.' शहाजहान मरण पावला आहे असें त्यानें सर्वांस जाहीर केलें. मुरादास तो पत्रें पाठवी, त्यांत 'तुम्ही माझे सर्वस्वी धनी आहां,' असें तो सांगे. तो आपली फौज घेऊन निघाला. त्याची व मुरादच्या फौजेची दीपलपूर येथें भेट झाली. प्रथमदर्शनीं हत्तीवरून उतरून त्यानें मुरादपुढें साष्टांग नमस्कार

घातला. त्या दिवसापासून मुराद यास तो बादशहाप्रमाणें वागवूं लागला. प्रत्येक बाबतींत तो मुरादचा हुकूम विचारीत असे. एकत्र झालेल्या दोनही फौजा रजपुतान्यांतून पुढें चालल्या.

हें वर्तमान ऐकून दाराची पांचांवर धारण बसली. त्याचा मुलगा सुलेमान ह्यानें सुजाचा पराजय केला, तेव्हां त्यास अत्यानंद झाला होता; पण ह्या वेळीं तो घाबरला. 'शहाजहान जिवंत आहे; त्याचा हुकूम तोडून तुम्ही पुढें याल, तर सांभाळून राहा,' असें दारानें त्या दोघां भावांस लिहून पाठविलें, पण त्यांनीं तें जुमानिलें नाहीं. शहाजहान जिवंत आहे, हें ऐकून मुराद कचरूं लागला. पण दाराचें सांगणें खोटें आहे, अशी त्याची औरंगजेबानें खात्री केली; आणि जरी जिवंत असला तरी हरकत नाहीं, आपण त्याजपुढें जाऊन क्षमा मागूं व दाराची खोड मोडूं. पण आतां परत गेल्यास दारा राज्यपद बळकावील, आणि आपणा सर्वांचा सूड घेईल.' इत्यादि गोष्टी सांगून त्यानें मुरादची समजूत केली. त्यायोगें मुरादास धीर आला. तशांत बाहेर सर्व लोकांचा समज शहाजहान मेला असाच झाला होता. आग्रा येथें शहाजहान लोकांच्या दृष्टीस पडला, तरी तें बादशहाचें भूत आहे असें लोकांस वाटे. दोघे मुलगे दिल्लीवर चालून येत आहेत असें ऐकून, बादशहानें त्यांजवर आपली फौज पाठविली. तो स्वतः फौजेबरोबर येऊन आपण जिवंत आहों अशी लोकांची खातरी करणार होता. तसें झालें असतें, तर मुरादनें औरंगजेबास सोडिलें असतें. पण दरबारांत औरंगजेबाचे कित्येक साथीदार होते, त्यांनीं बादशहास बाहेर येऊं दिलें नाहीं. खलीलखान म्हणून औरंगजेबाचा एक स्नेही होता, त्याच्या बायकोवर बादशहाची दृष्टि असल्याबद्दल बोभाटा असून तो हें वैर उगविण्याच्या बेतांत होता. त्यानें शहाजहानास कळविलें, कीं 'आपली तब्यत अगदीं अशक्त झाली आहे; फौजेबरोबर प्रवास करण्यांत आपला निभाव लागणार नाहीं; तुम्ही स्वतः गेल्यानें मुलांच्या मनांतील अंदेशा जाणार तर नाहींच; पण ते उद्धटपणें प्रत्यक्ष बादशहाशीं लढण्यासही मागें पुढें पाहणार नाहींत.' खलीलखानानें आपली बायको व बेगमसाहेब ह्यांच्या मार्फतीनें शहाजहानास आग्र्यास ठेवून घेतलें. अर्थात् दाराही बापास सोडून बाहेर आला नाहीं. सुलेमान सुजाचा पाठलाग करीत होता, तो

वेळेवर परत येऊं शकला नाहीं. तेव्हां दारानें कासिमखान यास मुसलमानी फौजेचें व जशवंतसिंह यास रजपूत फौजेचें आधिपत्य देऊन आपल्या भावांवर पाठविलें. कासिमखानाचें दाराशीं नीट नसून तो अंतस्थपणें औरंगजेबास मिळण्यास उत्सुक होता. औरंगजेब व मुराद यांची फौज मांडवगडाहून उज्जनीकडे येत होती. त्यांचा रस्ता एका मोठ्या खिंडींतून असून दोनही बाजूंस मोठमोठे पर्वत होते. बादशाही फौजेनें ही खिंड अडविली असती, तर बंडखोर शहाजाद्यांची फौज पुढें येऊं शकली नसती. उज्जनीच्या दक्षिणेस दहा मैल धरमतपूर गांवाजवळ उभय सैन्यांची गांठ पडली, (ता. १५ एप्रिल सन १६५८). कासिमखानानें ऐन लढाईच्या प्रसंगीं माघार घेतली; तेव्हां एकट्या जशवंतसिंहाच्या रजपुतांवर सगळें ओझें येऊन पडलें. शिवाय औरंगजेबाच्या फौजेस विश्रांति घेण्यास कासिमखानानें सवड दिली. बहुतेक रजपूत लोक आपल्या ब्रीदास अनुसरून रणांगणीं पतन पावले. तेव्हां जशवंतसिंह शत्रूची फळी फोडून आपल्या राज्यांत जोधपुराकडे निघून गेला. या प्रसंगीं औरंगजेबास तोफा व सामानसुमान अतिशय मिळालें. कासिमखान औरंगजेबाच्या सुनी फौजेशीं लढेना, याचें कारण तो स्वतः सुनी अफगाण होता असें म्हणतात.

हें पराजयाचें वर्तमान ऐकून दारा रागानें वेडा झाला. त्यानें आपल्या फौजेच्या अधिपतींवर दांत ओंठ खाल्ले. मीर-जुम्लास त्यानें वाक्प्रहार केला. 'तो दुष्ट आपली फौज घेऊन औरंगजेबास मिळाला नसता, तर आज हा प्रसंग येताना,' असें दारा म्हणाला. त्याची बायकामुलें ठार मारण्याचा दारानें हुकूम सोडिला; या योगानें मीरजुम्ला आयताच औरंगजेबास मिळेल असें सांगून शहाजहाननें तो हुकूम रद्द करविला. मुराद व औरंगजेब विजयोत्सव करीत आग्र्याकडे येऊं लागले. दाराचे शत्रु व औरंगजेबाचे मित्र भराभर त्यांस जाऊन मिळाले. शहाजहान गर्भगळित झाला. वृद्धावस्था, तब्यतीची अस्वस्थता, मुलांचे तंटे निवारण करण्याचें आपलें असामर्थ्य, इत्यादि विवंचनांनी तो विव्हळ होऊन केवळ मृत्युवश होऊन पडला; आणि तशा संकटावस्थेंत कांहीं सुचेनासें होऊन, त्यानें सर्व राज्यकारभाराची अनियंत्रित लगाम दाराच्या स्वाधीन केली. तेणेंकरून त्यानें स्वतःचा व

आपल्या कुलाचा एकदम नाश करून घेतला. लोकांस त्यानें सांगितलें, कीं 'इतःपर दाराचे हुकूम तुम्हीं पाळावे.' ह्या प्रकारानें सर्वच गोंधळ झाला. शहाजहानबद्दल पुष्कळांचे मनांत प्रेमबुद्धि होती; पण दाराचा दरारा त्यांस सहन होत नव्हता. अशा प्रसंगीं दारा डगमगला नाहीं त्यानें एकदम एक लाख फौज जमविली; बादशाही खजिना खुला करून, लोकांस खुष केलें; त्याचप्रमाणें फौजेंत पुष्कळ युरोपियन लोकांची त्यानें भरती केली. येणेंप्रमाणें तो मोठ्या वेगानें आपल्या भावांवर चालून आला. परंतु त्याचे सल्लागार विश्वासघातकी होते. त्याचा दुय्यम खलीलखान हा त्याचा नाश करण्याचो संधि पाहत होता. फौजेंत शिस्त बरोबर नव्हती. कवाईत शिकून तयार झालेली फौज सुलेमानबरोबर बंगाल्यांत होती. दाराच्या हाताखालचे सर्व लोक बिथरले होते, तरी रजपूत आपल्या इमानास जागत होते. रजपुतांचा मुख्य रामसिंह होता. सुलेमानच्या येण्याची दारानें कांहीं वेळ वाट पाहिली; शेवटीं वेळ निघे नासा होऊन तो तसाच डोळेझांक करून पुढें चालला. चंबळ नदीच्या कांठीं त्याच्या फौजेनें तळ दिला. दुसऱ्या बाजूस बंडखोर फौज उतरली. औरंगजेबानें संधि सांपडतांच आपल्या सर्व लोकांस नदीपलीकडे जाण्याची इशारत दिली. इतक्यावरच तो स्वस्थ बसला नाहीं. बुंदेलखंडचा राजा चंपतराय याजशीं त्यानें संधान बांधिलें. ह्या चंपतरायाची हकीकत पुढें औरंगजेबाच्या कारकिर्दींत येणार आहे. शहाजहाननें चंपतरायास जिंकण्याचे पुष्कळ प्रयत्न केले. पण ते सर्व फुकट गेले होते. चंपतरायानें ह्या प्रसंगीं औरंगजेबास आपल्या मुलखांतून जाण्यास वाट दिली. त्याबरोबर दारास फसवून रात्रीच्या वेळीं औरंगजेबाची फौज चंपतरायाच्या हद्दींत चंबळ नदी उतरून पलीकडे गेली. दारास ही बातमी समजतांच त्यानें औरंगजेबास अडविण्यासाठीं खलीलखानास पाठविलें. खलीलखानाच्या विश्वासघातास सीमाच नव्हती. त्यानें औरंगजेबास स्वस्थपणें नदीअलीकडे येऊं दिलें, आणि परत येऊन दारास कळविलें, कीं तो मजबूद ठाणें धरून बसला आहे. शेवटीं दाराच्या फौजेवर बंडखोर फौजेनें हल्ला केला. त्यांत सुद्धां औरंगजेब व खलीलखान ह्यांनीं सर्व गोष्टी ठरवून ठेविल्या होत्या. दारा बिचारा भोळा; तो खलीलखानाच्या भूलथापा ऐकत स्वस्थ राहिला. लढाईचें तोंड लागलें, तेव्हां दारा

औरंगजेब, खलीलखान व महंमद, आणि रामसिंह व मुराद, अशा सरदारांचा सामना झाला. ह्या प्रसंगीं दारानें असा कांहीं विलक्षण पराक्रम केला कीं औरंगजेब त्याच्या हातांत कैद होऊन पडावयाचा, परंतु इतक्यांत खलीलखानानें आपण संकटांत आहों असें दाखवून दारास आपल्या मदतीस बोलाविलें. आपलें काम टाकून दारा त्याच्या मदतीस गेला. तेणेंकरून सर्व पारडें फिरलें. तिकडे मुराद आणि रामसिंह यांच्या सामन्यांत मुरादच्या हत्तीनें रामसिंहास पकडून ठार मारिलें. त्यासरसे सर्व रजपूत रणांगण सोडून गेले. तरी दाराची अजून सरशी होती. इतक्यांत खलीलखानानें त्यास सांगितलें, 'शत्रूंची दाणादाण उडाली आहे, तर आतां हत्तीवरून उतरून घोड्यावरून त्यांचा पाठलाग करा.' हा गुरुमंत्र त्या बिचाऱ्यानें ताबडतोब अमलांत आणिला. मग काय विचारावयाचें आहे? दाराचे लोक आपला धनी मेला, असें समजून सैरावैरां पळून गेले; आणि त्या धांदलींत खलीलखान तीसहजार फौज घेऊन औरंगजेबास जाऊन मिळाला. ही चंबळ नदीवरील सामूगडची लढाई तारीख २९ मे सन १६५८ रोजीं, सकाळीं सात वाजतां सुरू झाली; आणि सायंकाळीं पांच वाजतां दारा आग्र्याकडे पळून गेला. सामूगड आग्र्याच्या दक्षिणेस असून त्यास हल्लीं फत्याबाद हें नांव आहे. दारा आग्रा येथें थांबला नाहीं. तो तडक दिल्लीस गेला. तेथच्या अधिकाऱ्यानें त्यास किल्ल्यांत घेतलें नाहीं, म्हणून तो लाहोरास जाऊन तेथें फौजेची जमवाजमव करूं लागला. बापानें त्यास दहा उंटें भरून मोहोरा व रुपये पाठविले.

ह्या विजयानें औरंगजेबाच्या मनांतील राज्यप्राप्तीची हांव तृप्त होण्याचा संभव दिसूं लागला. खलीलुल्लाखानास तो मुरादापुढें घेऊन जाऊन बोलला, 'आजचा जय मिळण्यास मुख्य कारण तुमचें धाडस व ह्या शूर मित्राचें इमान होय. जय मिळाल्याबद्दल मीं परमेश्वराची प्रार्थना केलीच आहे. आतां मी आपल्या धन्यापुढें साष्टांग नमस्कार घालितों. ह्या इमानी खलीलुल्लाखानावर तुम्ही सर्व विश्वास टाका; तुम्हांस राज्यपद प्राप्त होण्यास आणखी एका विजयाची जरूर आहे. तेवढें झालें म्हणजे मी ईश्वरसेवेंत कालक्षेप करण्यास मोकळा होईन.' असें बोलला, तरी त्याचे अंतर्यामीं निराळाच प्रकार चालला होता.

मुरादची गुह्य व्यंगें आपणास कळावीं, एतदर्थ त्यानें खलीलुल्लाखानास त्याजपाशीं ठेविलें. सर्व राज्यांतील अधिकाऱ्यांस औरंगजेब रात्रंदिवस पत्रें पाठवून पुढील घाट ठरवीत होता. सुलेमानबरोबर दलीलखान व जयसिंह हे सरदार बंगाल्याकडे होते; त्या दोघांसही औरंगजेबानें पत्रें पाठवून सुलेमान ह्यास कैद करावें अगर ठार मारावें असें सुचविलें परंतु ते दोघेही सरदार इमानी असल्यामुळें त्यांच्यानें ती गोष्ट झाली नाहीं. उलट त्यांनीं सुलेमान यास दाराच्या पराभवाचें वर्तमान सांगून त्यास काश्मिराकडे पळून जाण्यास सांगितलें आणि आपण राजधानीकडे परत आले. सामूगडची लढाई झाल्यावर औरंगजेब व मुराद आग्र्यास गेले; आणि शहराबाहेर बागांत आपली छावणी ठेवून त्यांनीं बादशहाकडे खालील निरोप पाठविला. 'तुमच्या मुलांनीं राज्य घेण्याकरितां किंवा तुमची अवज्ञा करण्याकरितां हें युद्ध केलें आहे असें नाहीं. आपला बाप बादशहा याचा मान कसा ठेवावा, हें त्यांस चांगलें समजतें. दारानें तुम्हांस ठार मारिलें असें ऐकिल्यावरून, त्याचा सूड घेण्याकरितां त्यांस ही उठाठेव करावी लागली. ईशकृपेनें आपण जिवंत आहां ही आनंदाची गोष्ट आहे. तर आपल्या मुलांमध्यें इमानी व पितृनिष्ठ कोण आणि लबाड कोण ह्याचा निर्णय आपणच केला पाहिजे.' शहाजहान कांहीं कमी कपटी नव्हता. त्यानें वरच्या इतकेंच लबाडीचें उत्तर आपल्या मुलांस पाठविलें. 'औरंगजेब व मुराद ह्यांजवर माझी खरी प्रीति आहे; त्यांच्या अवज्ञेनें ती कमी झाली नाहीं; तर त्यांनीं आपल्या फौजेस रजा देऊन, माझ्याजवळ यावें व क्षमा मागावी, म्हणजे माझी कृपा केवढी आहे हें त्यांस कळून येईल.' पण औरंगजेब कांहीं भोळा नव्हता. त्याची बहीण रोशनारा हिनें त्यास कळविलें, कीं 'तुम्ही राजवाड्यांत याल तर तार्तार स्त्रियांच्या हातून तुमचा खून होईल.' औरंगजेबानें ह्या कपटास कपट लढविलें. बापाच्या भेटीस जाण्याचें जाहीर करून ती गोष्ट त्यानें हळू हळू लांबणीवर टाकिली. तेवढ्या अवकाशांत दरबारचे सर्व लोक त्यानें वश करून घेतले, आणि आपला मुलगा महंमद याजकरवीं राजवाड्यास वेढा घातला. शहाजहाननें वाड्याच्या शिखरावरून खालचा प्रकार पाहिला. महंमदानें वाड्यास तोफा लाविलेल्या त्याच्या दृष्टीस पडल्या. औरंगजेबानें बापाच्या मनांतील संशयनिवृत्ति करण्

करितां निरोप पाठविला, कीं 'मी आजारी आहें, बरा झाल्यावर आपल्या भेटीस येईन; तोंवर मी आपल्या तर्फे महंमद यास आपणाकडे जाऊन क्षमा मागण्यास सांगितलें आहे.' शहाजहाननें नातवाची भेट घेतली. त्याजला भारी किंमतीचे नजराणे त्यानें दिले. त्यायोगें औरंगजेबास फसविण्याचा त्याचा इरादा होता. महंमद वाड्यांत शिरला. सहज वश होण्याजोगे होते, तेवढे लोक त्यानें आपणाकडचे करून घेतले. अनेकांस तलवारीनें कापून काढिलें. त्यांत राजवाड्यांतील पुष्कळ नोकर प्राणांस मुकले. पुढें बादशहासमीप तो गेला; तेथें तातार बायांचा खडा पहारा होता. महंमदानें न डगमगतां खालील मजकूर बादशहास कळविला. 'तुमची आतां वृद्धावस्था झाली; म्हणून तुम्ही राज्य करण्यास नालायक आहां. आतां तुम्ही जनानखाना बरोबर घेऊन बागांत जाऊन राहा, आणि राहिलेलें आयुष्य शांतपणें घालवा; तुम्हांस मोकळ्या हवेंत राहूं देण्यास आम्ही तयार आहों; परंतु तख्तावर बसण्यास तुम्ही योग्य नाहीं; तें तुम्हीं आतां आपल्या मुलांच्या हवालीं केलें पाहिजे. तातार बायांनीं गिल्ला केला, पण महंमद त्यांजला हार जाणारा नव्हता. बादशहा निमूटपणें आपल्या बायकांबरोबर शहराबाहेर बागांत जाऊन राहिला. तेथें त्याच्यासभोंवतीं बायांचा पहारा होता. त्यानें पुनः एकवार महंमदास आपल्या भेटीस बोलाविलें; आणि त्यास म्हणाला 'बाबारे, माझ्या मुलांनीं माझें राज्य हिरावून घेतलें. आतां माझी सगळी भिस्त तुझ्यावर आहे. हें राज्य तूंच घे; तूंच बादशहा होऊन या वृद्ध आजोबाचा बोज राख; तुझ्या हातांत फौज आहे; आग्रा तुझ्या ताब्यांत आहे; औरंगजेबाचा पक्ष तूं सोडून दे. ज्यानें आपल्या बापाचा अपमान केला, तो आपल्या मुलाचाही मान ठेवणार नाही.' महंमदानें क्षणभर विचार केला. आजोबापेक्षां त्यास बापाची भीति ज्यास्त होती. म्हणून ह्या लालुचीस तो भुलला नाहीं. वृद्ध आजोबाकडून त्यानें सर्व राजवाड्याच्या किल्ल्या बलात्कारानें आपणाकडे घेतल्या. तेव्हांपासून औरंगजेब सर्व राज्याचा धनी झाला. त्यानें जिकडे तिकडे आपले पहारे बसविले. आग्र्याच्या किल्ल्यांतच तो कैदी होऊन बसला. इतःपर शहाजहानचें वर्तमान बाहेरच्या लोकांस कळेनासें झालें. ही त्या वृद्ध बादशहाची स्थिति पाहून दरबारच्या कित्येक मंडळींस त्याचा कळवळा आला. पण शहाजहाननें

४२-७-११---१०-७९१-२०००

लिहिलेलें एक पत्र बाहेर काढून औरंगजेबानें लोकांचें सांत्वन केलें. तें पत्र खरें होतें कीं बनावट होतें, हें कधींही कळून आलें नाहीं. तें दाराच्या नांवचें होतें. त्यांत असा मजकूर होता, कीं 'मुराद व औरंगजेब हे वाड्यांत यावयाचे आहेत; त्या दोघांचाही खून करण्याची मीं तजवीज केली आहे, तर तुम्हीं एकदम निघून आग्र्यास यावें.' औरंगजेब वाड्यास वेढा घालीत असतां त्यास हें पत्र देण्यांत आलें. शहाजहाननें असें पत्र लिहिणें असंभवनीय नाहीं, किंवा औरंगजेबाची तरी ही लबाडी नसेल असेंही म्हणतां येणार नाहीं. दोघेही जशास तसेच होते. कसेंही असलें तरी त्याचा परिणाम व्हावयाचा तो झाला. शहाजहानास सर्व लोक दूषणें देऊं लागले, आणि असा गुप्त बेत पकडिल्याबद्दल औरंगजेबाची वाखाणणी करूं लागले.

शहाजहान वाड्यांत राहिल्यामुळें औरंगजेबानें तूर्त आपलें वास्तव्य दाराच्या वाड्यांत केलें. पुढें ह्या दोघां भावांनीं आपल्या मर्जीप्रमाणे सर्व राज्याची व्यवस्था केली. राज्यांतील सर्व मोठमोठ्या जागा त्यांनीं आपल्या आप्त मंडळीस दिल्या. त्यांचा मामा आसफखानाचा मुलगा शाएस्तेखान यास त्यांनीं आग्र्याचा सुभेदार नेमिलें. प्रत्येक हुकूम दोघांच्या नांवानें सुटूं लागला. आपल्या साहाय्यकर्त्यांस त्यांनीं मोठमोठीं इनामें दिलीं. ह्याप्रमाणें सर्वत्र स्वस्थता झाल्यावर दाराचा पाठलाग करण्याचा त्यांनीं विचार चालविला. मुरादच्या स्नेह्यांनीं त्यास सांगितलें, कीं 'तुम्हीं औरंगजेबाबरोबर आग्रा सोडून बाहेर जाऊं नये; तुमची येथेंच फार जरूर आहे. तुमचा घात करण्याचा विचार औरंगजेबानें केला आहे, असें आम्हांस खात्रीलायक समजतें.' परंतु त्या वेड्यापीरानें तो उपदेश ऐकिला नाहीं. औरंगजेबानें त्यास अगदीं भारून टाकिलें होतें. तो भावाबरोबर दिल्लीकडे गेला. त्यां[illegible] फौजेचा तळ मथुरा येथें पडला. यमुनेच्या दोन कांठांवर दोघां शहाजाद्यांच्या फौजा उतरल्या. मध्यें पूल असून त्यावरून दोघांमध्ये व्यवहार चालत असे. पूर्वीच्या सुलतानांनीं मथुरा येथें टेंकडीवर एक भव्य मशीद बांधिली होती. त्या मशिदीसमोर मुरादच्या राज्यारोहणविधि करण्याची कडे[illegible] तयारी चालली. औरंगजेब दररोज सकाळ व सायंकाळीं मुराद[illegible] जाऊन भेटे, त्या वेळीं राज्याभिषेकाशिवाय दुसरी कांहीं गोष्ट तो बोलत नसे. पण कांहींना कांहीं सबब सांगून

ा समारंभ उरकण्याचें काम त्यानें लांबणीवर टाकिलें. मुराद उत्सुकतेनें
ाट पाहत होता. ह्या अवकाशांत त्या दोन फौजांत विलक्षण फरक दिसत
रसून येत होती. मुरादचें सैन्य नाना प्रकारचे विलास करण्यांत
निमग्न होतें. सर्व अंमलदार खाऊन पिऊन आनंद करीत होते. परंतु
ौरंगजेबाकडे निराळा प्रकार दिसत होता. परमेश्वराची आराधना
रून ईश्वरभजनीं लीन झालेल्या आपल्या धन्याचें कल्याण होवो म्हणून,
ाच्या लोकांचा वेळ जाई. 'औरंगजेबच बादशहा होईल तर किती
ांगलें होईल!' अशा चिंतेंत ते निमग्न असत. शेवटीं मुरादच्या
ज्याभिषेकाचा दिवस मुक्रर झाला. मशिदीपुढें तयार केलेल्या एका
व्य रंगपीठावर आरोहण करून राज्यांतील मुख्य आमीर, धर्माधीश,
ाच्या हस्तें बादशाही पोशाख तो स्वीकारणार होता. समारंभाच्या
लक्षण थाटानें मुरादचे डोळे इतके दिपून गेले, कीं ह्यांत कांहीं कपट
सेल अशी त्यास शंका सुद्धां आली नाहीं. समारंभाच्या आदले दिवशीं
ौरंगजेबानें आपण आजारी असल्याचें ढोंग केलें, आणि मुरादास भेटून
हण्यासाठीं आपल्या तंबूंत बोलाविलें. शहा अब्बास नांवाचा मुरादचा
क विश्वासु नोकर होता, त्यानें मुराद यास नानाप्रकारें समजावून
ंगितलें, कीं 'तुम्हीं ह्या वेळीं औरंगजेबाकडे जाऊं नये.' त्यानें तें
केलें नाहीं. त्याजबरोबर शहा अब्बासही गेला. रस्त्यांत पुष्कळांनीं
ुरादचा निषेध केला, पण त्या सर्वांचा त्यानें धिक्कार केला. औरंग
ाच्या छावणींत गेल्यावर मुख्य काजीनें त्यास सन्मानपूर्वक आंत
ाणिलें. त्या प्रसंगीं औरंगजेबानें मुरादचा असा विलक्षण सत्कार केला,
कांहीं पुसूं नये. मेजवानीची तयारी झाली. ह्या मेजवानींत मोकळ्या मनानें
ापान करण्याची औरंगजेबानें सर्वांस परवानगी दिली. औरंगजेब स्वतः
ीं मद्यास शिवत नसे, आणि दुसऱ्यास तसें करूं देत नसे. मुराद व
ौरंगजेब असे दोघेच एका तंबूंत भोजनास बसले. मुरादच्या सर्व
थीदारांस औरंगजेबाच्या मंडळींनीं दूरच्या तंबूंत मेजवानीस नेलें.
ा अब्बासनें मात्र मुराद यास सोडिलें नाहीं. भोजनोत्तर नाना-
ंचे खेळ वगैरे झाले. औरंगजेबानें मद्यास स्पर्श केला नाहीं.
ादनें मात्र कांहीं सुमार ठेविला नाहीं. तो शुद्ध पडला, तेव्हां
ा अब्बासनें त्यास जवळच्या तंबूंत नेलें, आणि त्यास बिछान्यावर

निरंकुश आपण पलंग्याचीं बसला. इतक्यांत औरंगजेब आपला लहा- नसा मुलगा हातांत घेऊन मुरादच्या तंबूंत आला, आणि त्या मुला- रजांविण्याच्या मिषानें मुरादजवळचा खंजीर, त्यास जागें केल्याशिवाय काढून घेण्यास त्या मुलास सांगितलें. मुलानें तें काम केलें. लगेच औरं- गजेबाचे सहा शिपाई बिड्या घेऊन तंबूंत शिरले. मुराद जागा होऊन औरंगजेबाच्या शिपायांनीं त्याचें तोंड दाबून त्यास पकडिलें. औरंगजे- बानें पुढें होऊन मोठ्या गंभीर स्वरानें म्हणाला, 'मुसलमान कायद्याप्रमाणें मद्यप्राशन करणारा मनुष्य पातकी होय; तो राज्य कर- ण्याच्या लायक नाहीं. मुराद यास बेड्या घालून घेऊन चला.' मुराद शहाजादे ह्यांस निरनिराळ्या हत्तींवर बांधून ते लोक घेऊन गेले, (जून २२ स. १६५८). मुरादनें 'कुराणावर हात ठेवून तूं शपथा घेतल्या त्य- ह्याच करितां' एवढेच शब्द उच्चारिले. मुराद कैद झाल्याचें वर्तमा- न पुष्कळ लोकांस कळलें सुद्धां नाहीं. औरंगजेबाच्या तंबूंत वाद्यांचा गजर चालू होता. दुसऱ्या दिवशीं मशिदीसमोरच्या मैदानांत मुरादचा राज्याभिषेकविधि पाहण्याकरितां सर्व लष्कर जमा झालें. सर्व लोक मुरादची मार्गप्रतीक्षा करीत होते. औरंगजेबाच्या निवडक स्वारांनी सभोंवतीं वेढा घातला. इतक्यांत 'औरंगजेब बादशहाचा जयजयकार असो' असे चोपदारांचे शब्द सर्वांस ऐकूं आले. लष्करच्या लोकांनींही तेच शब्द पुनः पुनः उच्चारिले. त्यासरसा औरंगजेब समोर येऊन बादशाही सिंहासनावर बसला, आणि लगेच निघून गेला. त्याजबद्दल कोणी कुरकुर सुद्धां केली नाहीं. मुरादच्या कित्येक लोकांनीं गवगवा केला, परंतु औरंगजेबानें लगेच जागच्याजागीं बसविलें. पुढें त्यानें मुरादास ग्वाल्हेरच्या किल्ल्यांत कैदेंत टाकिलें. कांहीं काळ लोटून दारा व सुजा ह्यांची वाट लाविल्यावर मुरादवर औरंगजेबानें खुनाचा आरोप आणिला; आणि त्यास लाप चावबून ठार मारिलें, (२६ डिसेंबर स. १६५९). ह्या प्रसंगीं राज्याच्या मुख्य काजीनें अशी तक्रार केली, कीं शहाजहान जिवंत असल्यामुळें औरंगजेबाचा राज्या- भिषेकविधि झालेला नाहीं, आणि हा विधि झाला नसल्यानें त्यास खुनाच्या खटल्याचा निकाल करण्याचा अधिकार नाहीं. औरंगजेबानें सर्व उलमांस जमवून त्या काजीस कामावरून दूर केलें, आणि आप-

देश तडीस नेला. ता. २१ जुलै, सन १६५८ रोजीं औरंगजेबानें दिल्लीस ज्यारोहण केलें. बाप जिवंत असेपर्यंत तो आग्र्यास कधीं गेला नाहीं.

इकडे मुरादास कैद केल्यावर औरंगजेब दारावर चालून गेला. दारा ाबांत फौज जमवून राहिला होता. औरंगजेब येतांच दाराची फौज ेऊन पळून गेली. तेव्हां हुमायूनप्रमाणें इराणांत पळून जाण्याचा राचा विचार होता. पण मुलतान व काबूल येथील सुभेदार औरंग-बाचे पक्षपाती असल्यामुळें त्यास तिकडे रस्ता मिळाला नाहीं. सिंधु-दीवरील बक्कर किल्ल्याचा अधिकारी एवढाच कायतो दाराचा एक ही होता. पंचनद एक ठिकाणीं मिळतात, तेथून खालीं थोड्या तरावर बेटांत बक्कर किल्ला आहे, तेथें दारास आश्रय मिळाला. ह्या ळीं दारा काबूलचा सुभेदार महाबतखान याजकडे गेला असता तर चा फायदा झाला असता, असें अनेकांचें मत आहे. महाबतखानाचें रंगजेबाशीं वांकडें होतें. त्याजकडे गेला असता, तर इराणांतूनही रास मदत मिळण्याचा संभव होता. दारा सिंधप्रांतांत गेल्याचें ऊन औरंगजेबास बरें वाटलें. त्यानें मीरबाबा नांवाच्या स ारास टी फौज देऊन दाराचा पाठलाग करण्यास पाठविलें; आणि आपण ावळीनें आग्र्यास परत आला. कारण बंगाल्याकडून सुजा आ ावर ल करून येत होता. शिवाय मुराद व शहाजहान यांस मुक्त करण्याची टपट आग्र्यास चालू आहे असें त्यास कळलें. परत येत असतां रस्त्यांत जा जयसिंह दहाहजार रजपूत फौज घेऊन येत असलेला त्यास ढळला. सुलेमानास सोडून जयसिंह हा औरंगजेबास मिळण्यासाठीं होता. पण औरंगजेब थोड्या लोकांनिशीं एकटाच भटकत आहे सें पाहून जयसिंहास वाटलें, कीं दारानें पराभव केल्या हा ून जात आहे, तर अशा प्रसंगीं औरंगजेबाचा खून करून शहास कैदेंतून मुक्त केल्यास आपली मोठी वाहवा होईल. रंगजेबानें जयसिंहाचा उद्दे . तेव्हांच ताडिला; आणि प्रसंगावधान न छाती करून हें संकट टाळण्याचा त्यानें धिम्मेपणानें निश्चय केला. सिंहास मोठ्या अदबीनें भेटून औरंगजेब म्हणाला, 'आपल्या दर्श-ं मला अत्यानंद होत आहे. दाराचा संपूर्ण नाश झाला आहे, तर कडे आतां तुम्हीं जाण्याचें कारण नाहीं. माझ्याबरोबर चला,

आपण सुजाचा समाचार घेऊं.' असें म्हणून आपल्या गळ्यांतील मोत्यांचा हार काढून औरंगजेबानें जयसिंहाच्या गळ्यांत घातला. त्यावरोन जयसिंह आपला बेत सोडून औरंगजेबाची आज्ञा उठविण्यास तयार झाला. जयसिंहास औरंगजेबानें लाहोरची सुभेदारी देऊन तेथच्या बंदोबस्ता पाठवून दिलें. आग्र्यास पोंचल्यावर औरंगजेबास महंमद व मीर जुम्ला हे आपापल्या फौजांसह येऊन मिळाले. मीर जुम्ला औरंगाबाद सोडून नवीन फौज जमवीत इकडे आला होता; आणि दारा पळून गेल्या त्याच्या बायकामुलांचीही सुटका झाली होती.

औरंगजेब वर सांगितल्याप्रमाणें सर्व फौज घेऊन अलाहबादक गेला. फत्तेपूरच्या पश्चिमेस तीस मैलांवर काजवा येथें सुलेमान फौजवं राहिला आहे असें त्यास आढळलें. ती जागा फारच मजबूद होती शत्रूस जवळ येण्यास अन्नपाणी मिळण्याचाही संभव नव्हता. सुजा द आपली जागा सोडून पुढें येईना. असें पाहून मीर जुम्लानें एक कपट युक्ति केली. शत्रु आपल्या ताब्यांत येत नाहीं. तर उदईक आपण निघून जाणार, अशी त्यानें कंडी पिकविली; आणि तदनुसार औरंगजे बाच्या छावणीत सर्व सामसूम केलें. एक दिवा सुद्धां पेटविला नाहीं. तं पाडिले; आणि आग्र्यास जाण्याकरितां सर्व सामान रवाना केलें. इतक्यां सुजा पुढें येऊन पाहूं लागला, तों त्यास वाटलें कीं औरंगजेबाचें मो सैन्य निघून गेलें असून हे केवळ पिछाडीचे कांहीं लोक मागें राहि आहेत. असें समजून त्यानें आपले लोक औरंगजेबावर हल्ला करण्या करितां एकदम पुढें आणिले. परंतु हें सर्व कपट होतें. औरंगजेबाची सर्व फौज तयारीनेंच होती. तिनें सुजाच्या फौजेचा तेव्हांच फडशा उड विला. काजवा येथें जी लढाई झाली, तिच्यासारख्या रक्तपाताच्या भयं कर लढाया हिंदुस्थानच्या इतिहासांत थोड्याच झाल्या असतील. सुजा लोक फितविण्याबद्दल औरंगजेबानें होते तेवढे प्रयत्न केले, पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. दोघांचाही लढण्याचा हेतु राज्यपदप्राप्तीचे सुनी व शिया असें धर्मवैरही दोहों पक्षांत पूर्णपणें जागृत होतें. दोहों कडचे मुसलमान कट्टया वैरानें लढले. दोघां भावांचे हत्ती समोरासमो आले. एकाएकीं औरंगजेब परत फिरला; सुजा त्याचे पाठीस लागा हेंही सर्व औरंगजेबाचें कपटच. ज्या रस्त्यानें औरंगजेब चालला, त्या

एक खाडा खोदून तो त्यानें झाडांच्या फांद्या व गवत वगैरेंनीं झांकून ठेविला. सुजा त्या वाटेनें येतांच त्याचा हत्ती त्या खाड्यांत पडला. परंतु सुजा बचावून घोड्यावर बसला. तरी त्याच्या लोकांस वाटलें, कीं आपला धनी मेला; आणि ते चार दिशांस चार, पळून गेले. येणें-करून औरंगजेबास जय मिळाला. काजवा येथील लढाई तारीख ५ जानेवारी सन १६५९ रोजीं झाली.

इकडे औरंगजेब पळूं लागला, ही बातमी आग्र्यास पोंचली. राजा जसवंतसिंह उज्जनी येथील आपल्या पराभवाचा वचपा काढण्याची संधि पाहतच होता. त्याच्या पत्नीनें ह्या पराभवामुळें त्यास मोठें दूषण दिलें, आणि आपण अग्नींत उडी टाकून आत्महत्या करण्यास तयार झाली. तेव्हां औरंगजेबाची पुरी खोड मोडण्याचें वचन देऊन त्यानें तिचें समाधान केलें होतें. पुढें औरंगजेब जेव्हां अलाहबादेकडे गेला, तेव्हां जसवंतसिंह जोधपूर सोडून औरंगजेबाच्या पाठीवर गेला; आणि त्याच्या फौजेस लुटून काजव्याची लढाई सुरू असतांच आपण आग्र्यास आला. तेथें शहाजहानास सोडवून तख्तावर बसविण्याचा जसवंतसिंहाचा विचार होता. आग्र्याचा सुभेदार शाएस्तेखान व इतर मोठमोठे अधिकारी यांची पुरी खात्री झाली होती, कीं काजवा येथील लढाईत औरंगजेब मरण पावला. जसवंतसिंह येतो असें ऐकून आग्र्याच्या लोकांची गाळण झाली. इतक्यांत औरंगजेब विजयी होऊन येत आहे, असें जसवंतसिंहास समजल्यावरून तो आपली लूट घेऊन जोधपुरास परत गेला. तिकडे औरंगजेब अत्यंत चिंताक्रान्त होऊन आग्र्याच्या बंदोबस्ताकरितां ताबडतोब परत आला. सुजाचा पाठलाग करण्याचें काम त्यास सोडून द्यावें लागलें. या कामावर त्यानें मीर जम्ला व आपला मुलगा महंमद या दोघांची नेमणूक केली. पण दोघांचाही त्यास भरंवसा नव्हता. मीर जुम्लानें एका धन्यास सोडिलें, तेव्हां तो दुसऱ्यास सोडणार नाहीं कशावरून ? या भीतीस्तव त्यानें मीर-जुम्लाचा मुलगा महंमद अमीरखान यास आपणाजवळ ओलीस म्हणून ठेवून घेतलें. शिवाय औरंगजेबाचा मुलगा महंमद यानें अलीकडे मोठमोठीं कामें केलीं असल्यामुळें तोही चढून गेला होता. सबब गोवळकोंड्याच्या राजाची मुलगी महंमदाची बायको हिला यानें स्वतःजवळ ओलीस म्हणून ठेवून, व मीर-जुम्ला यास मुख्य

सेनापतीचें काम देऊन सुजाच्या बंदोबस्तास पाठविलें. इतका बंदोबस्त केला तरी महंमद सुजास जाऊन मिळाला. सुजा मोंगीरनजीक तळ देऊन कडेकोट बंदोबस्तानें राहिला होता. ह्याच ठिकाणीं शेरखानानें हुमयुनास अडविलें होतें. सुजाच्या मुलीशीं महंमदाचें लग्न ठरलें होतें. महंमदाची बायको औरंगजेबानें अडकवून ठेविल्यामुळें तो बापावर रागावला होता. तो सुजाच्या मुलीशीं लग्न करून उघडपणें त्यास जाऊन मिळाला. त्यामुळें आणखी बरेच लोक सुजाच्या पक्षास मिळाले. हें वर्तमान ऐकून औरंगजेबास धास्ती पडली. पण मीर-जुम्ला यानें त्या गोष्टीचा चांगला बंदोबस्त केला. महंमदास पस्तावा झाला. औरंगजेबानें गोडगोड पत्रें पाठवून त्यास बंदोबस्तानें दिल्लीस नेलें. रस्त्यांत त्यानें काश्मिरास पळून जाण्याचा प्रयत्न केला, पण त्याजवरील पहारा मजबूद होता, म्हणून तें साधलें नाहीं. शेवटीं त्यास ग्वाल्हेरच्या किल्ल्यांत औरंगजेबानें कैद करून ठेविलें. तेथें तो शूर राजपुत्र सन १६७६ त मरण पावला. मीर जुम्ला यानें सुजाचा पाठलाग केला. तो डाक्का येथें पळाला. तेथून पोर्तुगीझ लोकांच्या जहाजांतून तो आराकानच्या राजाकडे गेला. आरंभीं त्यानें सुजाचा सत्कार केला, पण उत्तरोत्तर दोघांमध्यें वितुष्ट आलें. आराकानच्या राजानें सुजाच्या मुलीची मागणी केली. बुद्धधर्मी मूर्तिपूजकाला मुसलमानाची मुलगी देणें सुजाच्या जिवावर आलें. तेव्हां सुजानें बंड करून आराकानचें राज्य बळकावण्याचा बेत केला. हा बेत बाहेर फुटल्यामुळें राजानें आपली फौज सुजावर पाठविली. तेव्हां सुजा पराभव पावून ब्रह्मदेशच्या अरण्यांत पळून गेला. तिकडेही त्याचा पाठलाग होऊन तो मारला गेला. वास्तविक त्याचा अंमल कसा झाला हें बरोबर समजत नाहीं. त्याच्या वडील मुलीशीं आराकानच्या राजानें जबरीनें लग्न लाविलें. त्या राजाच्या आईच्या मनांत सुजाच्या मुलाबरोबर लग्न लावावयाचें होतें. त्यांतच आराकानच्या मुसलमानांस चिथवून बुद्धधर्मी राजाचा पाडाव करण्याचा सुजाचा बेत होता, तोही उघडकीस येऊन राजानें सुजाच्या सर्व कुटुंबाचा क्रूरतेनें वध केला. सुजाच्या ज्या मुलीशीं राजानें लग्न केलें, तिलासुद्धां गरोदर असतां उपासमार करून राजानें ठार मारिलें, अशी हकीकत कळते. औरंगजेबानें तख्तनशीन झाल्यावर

[ग]ाएस्तेखानास बंगालचा सुभेदार नेमून आराकानच्या राजाची पुरी खोड [म]ोडिली. सारांश, शहाजादा सुजा याचा अशा प्रकारें शोचनीय अंत झाला.

शहाजहानचा वडील पुत्र दारा याचा शेवट सुजाच्या पेक्षांही ज्यास्त हृदयद्रावक झाला. सुजाचा पराभव करून औरंगजेबानें मोठ्या समारंभानें देह्लीशहरांत प्रवेश केला, आणि राजवाड्यांत दरबार भरवून आपल्या नांवचें नाणें पाडविलें. लगेच दाराकडे त्यास लक्ष द्यावें लागलें. दारा [ब]क्कर किल्ल्यांत होता हें मागें सांगितलेंच आहे. मीर बाबा नांवाच्या [स]रदारास औरंगजेबानें दाराच्या पाठीवर ठेविलें होतें. बक्कर येथें दारानें [फ]ौजेंची भरती केली आणि युरोपियन लोक सुद्धां नोकरीस ठेविले. [ब]क्करहून निघून दारा कच्छ प्रांतांतून गुजराथेंत आला. त्या वेळीं अहं-[म]दाबाद येथें औरंगजेब व मुराद ह्या दोघांचा सासरा शहानवाजखान [हा] सुभेदारीचें काम पाहत होता. दारा अहंमदाबादस आला, तेव्हां [मु]रादची बायको तेथें होती. तिच्या सांगण्यावरून शहानवाजखानानें [द]ारास आश्रय दिला असें म्हणतात. अहंमदाबादेस दारानें चांगला [ब]ंदोबस्त केला. जशवंतसिंहाशीं संधान बांधून त्यास आपलासा करून [घ]ेतलें. इतक्यांत जयसिंहानें जशवंतसिंहास पत्र पाठवून दाराचा पक्ष [स]ोडण्याबद्दल विनंति केली. तसें न केल्यास औरंगजेब सर्व रजपुतांचा [सं]हार करील अशी त्यानें त्यास दहशत घातली. आपणाला पडता [क]ाळ आला असतां ज्याचे ग्रह जोरावर असतील त्याचा पक्ष स्वीकार-[ण्]यांत आपलें कल्याण आहे, असा बुद्धिवाद सांगून हे रजपूत राजे [त]टस्थ राहिले. जसवंतसिंहाच्या भरंवशावर दारा अहंमदाबाद सोडून [अ]जमिरास आला. पण जशवंतसिंह त्यास मिळाला नाहीं. तिकडून औरंगजेबही फौजेसह अजमिराकडे आला आणि उभयतांमध्यें लढा-ईचें तोंड लागलें. दारा परत गुजराथेंत आला असता, परंतु ते [द]िवस उन्हाळ्याचे असल्यामुळें त्यास येतां येईना. त्याजबरोबर शहा-नवाजखान होता, परंतु तो आंतून औरंगजेबास सामील होता. तो [पु]ढें लवकरच मारला गेला. असा प्रकार चालू असतां उभयतां बंधूंची [ल]ढाई अजमीरच्या दक्षिणेस देवुरा येथें तारीख १२ व १३ मार्च [स]न १६५९ रोजीं झाली. औरंगजेबानें दाराच्या फौजेंत इतकी [फ]ितुरी करून ठेविली होती, कीं दाराचे लोक तोफांचे केवळ

NATIONAL ARCHIVES OF INDIA

वायबार काढीत. जयसिंहानें दारा यास रणभूमीवरून पळून जाण्यास सांगितलें. तेव्हां दारा पळ काढून गुजराथेंत आला. त्या वेळीं त्याची स्थिति अत्यंत शोचनीय झाली होती. अहंमदाबादेस जो इसम आपल्या वतीचा म्हणून दारानें नेमिला होता, तोच औरंगजेबाच्या फितवणीनें दारावर फिरला. त्यानें दारास आश्रय दिला नाहीं. ह्या प्रसंगीं प्रसिद्ध युरोपियन प्रवासी बर्नियर दारास एका धर्मशाळेंत भेटला. त्याबरोबर तो तीन दिवस होता. दाराच्या ह्या वेळच्या कष्टप्रद स्थितीची बर्नियरनें लिहून ठेविलेली हकीकत अत्यंत हृदयद्रावक आहे. दाराच्या बायकामुलांस निजावयास एक लहानशी राहुटी असून तिचे दोर बर्नियरच्या गाडीस बांधिले होते. अहंमदाबादचा सुभेदार आपणास आश्रय देत नाहीं असें पत्र आलें, तेव्हां बायकामुलांनीं रडून आकांत केला; विचारा दारा तर अगदीं बेहोष होऊन गेला. उन्हाळा इतका प्रखर होता, कीं जनावरें पटापट मरत. त्याला या वेळीं इतक्या यातना सोसाव्या लागल्या, कीं मरणसुद्धां याहून बरें असें त्यास वाटलें. एका कोळ्याच्या साह्यानें तो कच्छच्या राजाकडे गेला. त्या राजानें प्रथम त्याचा चांगला सत्कार केला; पण औरंगजेबानें त्याजकडे कारस्थान सुरू केल्यामुळें हा आपला घात करील असें दारास भय पडून, तो त्या राजास सोडून ठठ्ठाबक्करकडे जाण्यास निघाला. परंतु त्या किल्ल्यास बहादूरखान ऊर्फ मीर बाबा वेढा घालून बसला आहे असें पाहून, तो बोलन घांटाजवळच्या जीवनखान नामक पठाण गृहस्थाकडे गेला. रस्त्यांत त्याची आवडती बायको, पर्वीझची मुलगी, मरण पावली. त्या गृहस्थाचा दारानें पूर्वी दोन वेळां प्राण वांचविला होता. जीवनखानानें दाराचें सर्व धन लुटून घेऊन, त्यास बक्कर येथें मीर बाबाकडे पाठविलें. त्या सरदारानें त्यास दिल्लीस औरंगजेबाकडे रवाना केलें. औरंगजेबानें दाराची दिल्लीच्या प्रत्येक रस्त्यांतून धिंड काढिली. त्या वेळीं त्याची ती दुर्दशा पाहून सर्व शहर शोकसागरांत बुडून गेलें. ह्या प्रसंगीं पठाण जीवनखानाच्या ताब्यांत दारा यास औरंगजेबानें दिलें होतें. वरील कृत्यानें लोक आपणावर उठतील अशी औरंगजेबास भीति पडून दाराचें काय करावें ह्याबद्दल कित्येकांचा विचार त्यानें घेतला. जीवनखान व दानिष्मंदखान ह्यांचें म्हणणें त्यास जन्मभर कैदेंत ठेवावें असें होतें.

पण रोशनारा व शाएस्तेखान ह्यांनीं निक्षून सांगितलें, कीं त्यास ठार मारावें. त्याप्रमाणें त्यानें त्यास ठार मारण्याचा निश्चय केला. आणि तारीख ३० ऑगस्ट सन १६५९ रोजीं मारेकऱ्यांकडून औरंगजेबानें दाराचा वध करविला. त्या वेळीं त्याचें कापून आणिलेलें शिर पाहून औरंगजेबास परम संतोष झाला. कित्येकांच्या मतें दारा क्रिस्ती धर्म स्वीकारून मग मरण पावला. तो नेहमीं असें म्हणे, कीं 'महंमदानें माझा घात केला. ईशपुत्र क्रिस्त मला तारील.' बर्नियर म्हणतो, 'दाराचा असा शेवट झालेला ऐकून जिकडे तिकडे लोक मोठ्या दुःखानें विलाप करूं लागले. जणूं काय आपलाच कोणी आप्त गेला, अशा प्रकारें पुरुष, बायका, मुलें सर्व शोकसागरांत बुडून गेलीं.'

दाराच्या मृत्यूनंतर लवकरच त्याचा मुलगा सुलेमान ह्यास काश्मीरच्या राजानें औरंगजेबाच्या स्वाधीन केलें. औरंगजेबानें त्यास एकांतांत कोंडून ठेविलें. अशा लोकांस उघडपणें मिरविल्यानें स्वतःचाच नाश व्हावयाचा हें आतां औरंगजेबास चांगलें कळून चुकलें होतें. म्हणून राजवाड्यांतच त्याची मिरवणूक काढून त्यास ग्वाल्हेरच्या किल्ल्यावर पाठवून दिलें. ग्वाल्हेरचा किल्ला म्हणजे त्या वेळीं अशा राज्यावर हक्क सांगणाऱ्या पुरुषांस अडकवून ठेवण्याचें कारागृह होतें. 'तुला ठार मारणार नाहीं' असें औरंगजेबानें सुलेमान यास वचन दिलें होतें. पण तें न पाळतां सन १६६० त त्यानें त्याचा व त्याच्या भावाचा ग्वाल्हेरच्या किल्ल्यांतच खून करविला. त्या खुनाबरोबरच शहाजहानच्या मुलांत राज्यप्राप्तीच्या अनिवार लोभामुळें सुरू झालेल्या युद्धाचाही शेवट झाला. हें युद्ध सन १६५७ पासून १६६१ पर्यंत चाललें.

औरंगजेबास राज्य प्राप्त झाल्यानें मोगलबादशाहींत नवीन मन्वंतर सुरू झालें. दरबारांत सुनी धर्माची पुनरपि स्थापना झाली. मुसलमानी कायदे सुरू होऊन मुफ्ती नांवाचे धर्माधिकारी सर्व राज्यांत नेमण्यांत आले. हिंदूंचें वजन लयास गेलें, त्यायोगें रजपूत व मराठे यांजशीं बादशहाचें वैर पडून त्यांतच अखेरीस दिल्लीच्या बादशाहीचा अंत झाला. शहाजहान पदच्युत झाल्यावर आठ वर्षें जिवंत होता, तो सन १६६६त मरण पावला. औरंगजेबानें त्यास नेमणूक करून देऊन त्याचा चांगला सन्मान ठेविला होता. ह्या वेळीं राज्यकारभारांत जरी त्याचें अंग नव्हतें, तरी कुटुंबांतील

वृद्ध माणसाप्रमाणें राजवाड्यांत त्याचा अधिकार व दरारा मोठा होता. शहाजहानास औरंगजेबानें आग्र्याच्या किल्ल्यांत बंदोबस्तानें ठेविलें होतें. चोपदारांचा नाईक अकबरखान हा बादशहाच्या पाहऱ्यावर मुख्य होता. जहान-आरा त्याजपाशीं राहून बापाची शुश्रूषा उत्कृष्ट ठेवीत असे. कांहीं काम लागल्यास औरंगजेब बापास पत्र पाठवीत असे. तो बापास प्रत्यक्ष कधींच भेटला नाहीं. औरंगजेबाच्या एका पत्रांत खालील मजकूर आहे. 'प्रजेवर ममता ठेवून तिचा प्रतिपाल करणें हें आपलें कर्तव्यकर्म जो राजा तडीस नेतो, त्याजवरच परमेश्वराची कृपा असते, हें आपणास ठाऊक असेलच. राज्य करणें हें बिकट काम गरीब माणसाच्या हातून निभणारें नाहीं. राज्य करणें म्हणजे लोकांचा प्रतिपाल करणें, मनास वाटेल तसें वागणें किंवा चैन करणें नव्हे.' आपल्या भावांचा नाश केल्याबद्दल हें औरंगजेबानें स्वपक्षाचें समर्थन केलें आहे.

५. **शहाजहानची योग्यता व राज्यव्यवस्था.**—शहाजहानास राज्याची दगदग विशेष नको होती, तरी त्यास सर्व कामांचा अनुभव असून, त्याच्या अंगीं कर्तबगारी होती. तरुणपणीं शौर्य, मुत्सद्दीपणा, राज्यकारभार इत्यादि गोष्टींत त्यानें चांगलें नांव मिळविलें होतें. राज्यावर आल्यावर जरी त्यानें सर्व कारभार मुलांवर व कामदारांवर सोपविला, तरी तसाच प्रसंग आला असतां, स्वतः कोणतेंही काम अंगावर घेऊन तडीस नेण्यास तो असमर्थ नव्हता. परंतु वयाबरोबरच त्याचें मन दुर्बल होत गेलें, आणि सन १६५८ त त्याच्या मुलांनीं राज्यांत दंगा केला तो त्याला दाबून टाकितां आला नाहीं.

मारवाडची राजकुमारी जहांगीरची बायको होती, तिचा मुलगा शहाजहान. राज्यावर येण्यापूर्वीच्या व नंतरच्या त्याच्या आयुःक्रमांत मोठें जमीनअस्मानाचें अंतर आहे. आरंभीं तो खुनशी, खटपटी व केवळ रजपुतांच्या तंत्रानें वागणारा असा होता, पण राज्यपदारूढ झाल्यावर त्याचा निष्ठुर स्वभाव पार नाहींसा झाला. दया, ममता, मनाचा थोरपणा, न्यायप्रियता इत्यादि गुण त्याच्या ठिकाणीं प्रगट झाले. त्याचें ऐश्वर्य, विलास व थाट दुसऱ्या कोणत्याही बादशहास साधलां नाहीं. त्याजवर प्रजा फार संतुष्ट होती.

सर टॉमस रोनें शहाजहानच्या स्वभावाविषयीं थोडीशी माहिती दिली आहे. तो म्हणतो, 'शहाजहानची चर्या नेहमीं स्थिर असे. त्याची गंभीरता कोणत्याही प्रसंगीं ढळत नसे. तसेंच कारणाशिवाय त्यास सहसा कधींही हंसूं येत नसे. त्याच्यापुढें जे लोक जात, त्यांजविषयीं तो आदर किंवा अनादर एकदम व्यक्त करीत नसे. परंतु त्याच्यांत गर्व व इतरांविषयीं तिरस्कारबुद्धि हे गुण पदोपदीं दिसून येत.' हें वर्णन तो पंचवीस वर्षांचा होता तेव्हांचें आहे. तो इतरांविषयीं बेपर्वा, वर्तनांत गर्विष्ठ, स्थिर वृत्तीचा, व शांत स्वभावाचा होता. युद्धकलेंत त्याचें प्रावीण्य विशेष होतें. राज्यकारभारांत तो बराच कुशल होता. पुष्कळ लोक त्याची खुशामत करीत, अनेकांस त्याजबद्दल मत्सर वाटे. परंतु त्याजवर लोकांची प्रीति कधीं फारशी बसली नाहीं. जहांगीरच्या मरणसमयीं गादीविषयीं जे तंटे झाले, त्यांत भाऊ, बाप व नूरजहान ह्या सर्वांशीं त्याला कलह करावे लागले. एकंदरींत त्यानें कधीं लोकांवर जुलूम केला नाहीं. जसजसें वय होत गेलें, तसतशी त्याच्या स्वभावांत ज्यास्त दया उत्पन्न होत गेली. शेवटीं शेवटीं तो आपल्या कामदारांस फार प्रिय झाला होता. त्याचें बोलणें फारसें खुबीचें नसून वादविवादांत बहुशः तो हरत असे.' शहाजहानच्या दरबारचा डामडौल मोठ्या भपक्याचा होता. त्याची कारकीर्द एकंदरींत फार शांततेंत गेली. त्याला विद्येची अभिरुचि नसून विद्वान् लोकांविषयीं त्याच्या मनांत विशेष पूज्यबुद्धि नसे. तो नेहमीं रंगेल असून विलासांत निमग्न असे. नाच, तमाशे, नाटकें यांचा त्यास फार शोक होता. काट्रू नांवाच्या क्रिस्ती गृहस्थानें त्याच्या कार्किर्दीचा सविस्तर इतिहास लिहिला आहे. त्यांत त्यानें असें लिहिलें आहे, कीं जनानखान्याच्या सुखविलासांत गर्क होऊन राहिल्यामुळें, तो आपला तरुणपणचा शौर्याचा बाणा विसरून गेला. कविताश्रवण, संगीत, नृत्य, नाटक इत्यादि विषयांकरितां दररोज त्याचे नेमलेले तास असत, आणि अशा प्रकारच्या करमणुकींत त्याचा सर्व दिवस निघून जाई. जो कोणी विलासाचे व सुखोपभोगाचे नवीन नवीन प्रकार दाखवून देईल, त्याची बादशहाजवळ मोठी चहा होई. घाणेरडे व अश्लील तमाशे त्यास फार आवडत. तो पैशाचा लोभी होता, आणि नानाप्रकारचे खर्च होऊनही त्याचे खजिने नेहमीं भरपूर असत. इतर बाबतींत

शहाजहानची राहणी बापासारखीच होती. दररोज सकाळीं सूर्योपासना करण्याकरितां तो झरोक्याजवळ येई. त्या वेळेस सर्व दरबारी मंडळी त्याचें दर्शन घेई. दुपारीं तो पुनः मर्दानी खेळ पाहण्यास त्या ठिकाणीं येई. सायंकाळीं वाद्यें सुरू झाल्यावर तो जनानखान्यांत परत जाई.

धर्मसंबंधांत शहाजहानचा स्वभाव मुळींच आग्रही नव्हता. आरंभीं त्याचा कल मुसलमानी धर्माकडे विशेष होता. अकबरानें सुरू केलेलें सौरवर्ष त्यानें बदलून चांद्रवर्ष सुरू केलें. आरंभीं हिंदु लोकांस त्यानें छळिलें. परंतु शेवटीं अकबराप्रमाणें त्याच्या कृत्यांत हिंदु आचारविचारांची छटा दिसूं लागली. त्यानें प्राचीन हिंदु राजांप्रमाणें *मयूरासन* नांवाचें सिंहासन तयार करवून तें उपयोगांत आणिलें. नवीन इमारत बांधणें झाल्यास मनुष्याचा बळी देऊन मग त्यांचा पाया घालण्याची हिंदु लोकांची चाल शहाजहाननें स्वीकारिली, आणि कित्येक लोकांस ठार मारून त्यांच्या रक्तानें दिल्ली शहराचा पाया त्यानें शुद्ध केला. अशा अनेक कृत्यांनीं शहाजहानचा हिंदुधर्माकडचा कल वेळोवेळीं दृश्य होत असे. हिंदु आईच्या पोटीं जन्म झाल्यामुळें हिंदुधर्माविषयीं त्यास आदर वाटणें स्वाभाविक आहे. त्याचा मुलगा औरंगजेब हा तुर्क आईच्या पोटीं जन्मला, तो हिंदूंचा द्वेष्टा निघाला.

मोगल बादशाहींत जनानखान्याचें प्रस्थ मोठें होतें. बाबरपासून अकबरपर्यंत जी हकीकत वर आली आहे, तिजवरून त्या घराण्यांतील बाया किती हुशार होत्या आणि रियासतींत त्यांचें वजन केवढें होतें, हें कळून आलेंच असेल. अकबराची रजपूत बायको, जहांगीरची नूरजहान, व शहाजहानची मुम्ताजमहल् ह्यांनीं आपल्या नवऱ्यांस बहुधा आपल्या मुठींत ठेविलें होतें. नूरजहानच्या वेळेपासून हिंदी चालीरीतींचें महत्त्व मागें पडून, रियासतींत अस्सल इराणी बाणा सुरू झाला, त्यायोगें हिंदु-रयतेचीं मनें अस्वस्थ होऊन, त्यांतच शेवटीं रियासतीचा नाश झाला. ह्या कारभारांत शहाजहानच्या मुलींचा बराच भाग आहे.

मोगल रियासतींत जनानखान्याचें महत्त्व विलक्षण असे. शहाजहान हा केवळ जनानखान्याचा बंदा होता असें म्हटलें तरी चालेल. जनानखान्यास महाल अशी संज्ञा होती. गुसलखाना व झरोका यांजमध्यें *जनानखाना* होता. त्यास अनेक चौक व अनेक दालनें होतीं. प्रत्येक चौकापुढें बाग

व कारंजीं होतीं. जनानखान्यांत एकंदर दोनहजार स्त्रिया होत्या. त्यांत वृद्ध प्रतीहारी व बायका यांशिवाय दुसऱ्या कोणाचा प्रवेश होत नसे. बादशहाचा मात्र तेथें यथेच्छ संचार असे. जनानखान्यांत हरहंमेश नानाप्रकारच्या भानगडी व गुप्त बेत चालत. बादशहासभोंवतीं शंभर तातार बायांचा खडा पहारा असे. त्या पहारेकरी बायांवर जी बाई मुख्य असे, तिचा तनखा अमिरासारखा होता. आंत राहणाऱ्या बायकांचे तीन वर्ग असत; राण्या, राजकन्या, आणि वेश्या. प्रत्येक बाईची यथायोग्य नेमणूक पृथक्पणें बांधून दिलेली असे. राण्या व राजकन्या यांचें भोजन मुख्य मुदपाकखान्यांत तयार होई. या स्त्रियांस बेगम अशी संज्ञा असे. वेश्यांना आपला भोजन... आपल्या पगारांतून करावा लागे. सर्वांचे पोशाख बहुतेक सारखेच असत. प्रत्येक बाईजवळ नोकर लोकांचा मोठा परिवार असे. प्रत्येकीजवळ नाचणारणी, गाणारणी वगैरे असत. केव्हां केव्हां सर्व मिळून बादशहापुढें नृत्य, गायन वगैरे करीत. पट्टराणीचा सर्व जनानखान्यावर कडक अंमल असे. जनानखान्याच्या व्यवस्थेकरितां दरबारांतल्याप्रमाणेंच वजीर, खजाननीस वगैरे हुद्यांच्या निरनिराळ्या अधिकारिणी नेमिलेल्या असत. केव्हां केव्हां ह्या बायांचेंच वजन सर्व राज्यांतील कोनाकोपऱ्यांतही दिसून येत असे. राजाच्या वजिराशीं त्यांचा पत्रव्यवहार चाले. जनानखान्यांतलें बादशहाचें मंत्रिमंडळ म्हणून वेगळेंच असे. प्रत्येक सरदार आपल्या वतीच्या एखाद्या बाईचा जनानखान्यांत प्रवेश करवीत असे. त्यायोगें त्याच्या पक्षास पुष्टि येऊन आंतील गुप्त बातम्या कळत. बहुतकरून सरदार लोक आपल्या मुली जनानखान्यांत ठेवीत. त्या मुलींना तरी आपल्या बापाविषयीं सर्व हकीकत बादशहास कळवावी लागे. ही जनानखान्याची व्यवस्था फार दिवस चालत आलेली होती. जनानखान्याचा खर्चही फार मोठा होता. बायामंडळींचे मेळे भरविण्याची चाल पूर्वी होती या गोष्टीचा उल्लेख मागें आलेलाच आहे.

आग्र्याच्या किल्ल्यांत शहाजहानचा सर्व थाट पूर्वींसारखा होता. मिष्टान्नें, गाणें, बजावणें वगैरे सर्व गोष्टी त्यास मिळत होत्या. कित्येक वेळां विद्वान् मुल्ला मंडळी जमवून तो धर्मावर वादविवाद करीत बसे. अनेक भानगडीच्या कामांत व प्रश्नांत औरंगजेब बापाची सल्ला घेत असे.

फक्त त्यास किल्ल्याच्या बाहेर जाण्याची परवानगी नव्हती. मरणसमयं त्याचें वय ७६ वर्षांचें होतें. औरंगजेबानें आपल्या वहिणींचे हाल यत्किंचित् केले नाहींत. जहान्-आरा त्याच्याशीं उघड वैर करीत असतां शहाजहानच्या मृत्यूनंतरही तिचा सर्व इतमाम त्यानें पूर्वीप्रमाणेंच चालू ठेविला. ती स. १६८१ त मरण पावली.

शहाजहानचा प्रेमळ स्वभाव खालील गोष्टीवरून व्यक्त होतो. ता. २६ मार्च स. १६४४ रोजीं रात्रीं आग्र्याच्या किल्ल्यांत जहान्-आरा बापाच्या महालांतून आपल्या जागेंत येत असतां, वाटेंतील मेणबत्तीच्या दिव्यास तिचें झगा लागून तो पेटला. त्या वेळीं बरोबर चार दासी होत्या. जहान्-आरानें कपडे पेटतांच त्या तिच्या अंगावर पडल्या. पण त्यामुळें उलट त्यांचे मात्र कपडे पेटले. ह्या अपघातानें जहान्-आरा सर्वस्वी भाजून गेली. हें पाहून तिचा बाप अगदीं विव्हळ झाला. बायको मरण पावल्यापासून ही वडील मुलगीच त्यास सर्वस्वी जपत असे. तिच्या ह्या दुखण्यांत तो सर्व वेळ तिजजवळ बसून होता. आपल्या हातानें तिच्या जखमा धुऊन मलम वगैरे लावी. तसेंच जरुरीचें काम असल्याशिवाय तिला सोडून जात नसे. दरबारांत सुद्धां फक्त अर्धापाव घटका बसून परत येई. मोठमोठे नामांकित वैद्य त्यानें बोलावून आणिले. दररोज मोठा दानधर्म करून तिचें आरोग्यचिंतन त्यानें सुरू केलें. रोज रात्रीं एक हजारांची थैली तिच्या उशाखालीं ठेवून ती सकाळीं गरिबांस वांटी. तिनें बरें व्हावें म्हणून पुष्कळ कैदी लोकांस त्यानें बंदींतून सोडिलें, आणि लोकांकडील कर्जाची सातलाख बाकी सोडून दिली. मध्यरात्रपर्यंत स्वतः परमेश्वरप्रार्थना करीत तो जागत बसे. हें दुखणें चार महिने चाललें. बहुतेक आशा सुटली होती. तिच्या बरोबर भाजलेल्या दासींपैकीं दोघी तर मृत्युमुखीं पडल्याच. इराणच्या शहाचा एक कुशल हकीम धन्याच्या जाचाला कंटाळून त्याच वेळीं शहाजहानकडे आला असून, त्याच्या औषधोपचारानें बराच गुण पडला. तिला बरी होण्यास सहा महिने लागले. ता. २५ नोव्हेंबर रोजीं तिच्या ह्या सुटकेबद्दल मोठा आनंदोत्सव करण्यांत आला. बापानें मुलीला दहालाखांची संपत्ति बक्षीस दिली. त्याशिवाय लोकांनींही पुष्कळ द्रव्य नजराण्यादाखल दिलें. दोनलाखांची खैरात भिकाऱ्यांस मिळाली. औरंगजेबावर बापाची इतराजी झालेली होती, त

जहान्-आरानें मध्यस्थी करून मोडिली; आणि त्याच्या नेमणुका पुनरपि च केल्या. या सर्व प्रकारांवरून असें दिसतें, कीं एकंदरींत शहाजहानची योग्यता चांगली किंवा वाईट निक्षून सांगतां येण्याजोगी नाहीं; म्हणजे त्याच्यांत अकबराप्रमाणें विशेष चांगुलपणा असा कांहीं नव्हता, तरी वाईट गुणही याच्यांत नव्हते. लोक एकंदरीनें सुखी होते.

शहाजहानची राज्यव्यवस्था.—शहाजहानची कारकीर्द शांततेची झाली हें मागें सांगितलेंच आहे. त्यानें तीस वर्षें राज्य केलें. त्या कारकीर्दीच्या आरंभीं व अखेरीस दोन मोठीं युद्धें झालीं. मधलीं तीस वर्षें विशेष स्मरणीय आहेत. ह्या वेळीं शहाजहानच्या मुख्य वजिरीचें काम दोन गृहस्थांनीं केलें. गादीवर बसल्यापासून शहाजहानचा सासरा आसफ्खान हा त्याचा मुख्य वजीर होता. तो सन १६४० त वारला. तेव्हांपर्यंत त्यानें वजिरीचें काम केलें. नंतर सादुल्लाखान अल्लामी हा वजीर झाला. तो मूळचा हिंदु असून मुसलमान झाला होता. कंदाहार व बल्क् येथील स्वाऱ्यांत सादुल्लाखानानें व औरंगजेबानें विशेष पराक्रम केले. त्यास स. १६५५ त दारानें विष घालून ठार मारिलें. सादुल्लाखानाची कीर्ति फार मोठी होती. त्याच्यासारखे हुशार व प्रामाणिक प्रधान हिंदुस्थानच्या इतिहासांत फारसे झाले नाहींत. औरंगजेबानें सुद्धां त्याची फार तारीफ केली आहे. 'या पुरुषाचा सर्वांनीं कित्ता घ्यावा,' असें औरंगजेबानें लिहिलें आहे. शहाजहानच्या कारकीर्दीत सर्व कामांत हा पुढारी असे. त्याचा राज्यकारभार सुरळीत चालण्यास मुख्यत्वेंकरून हे दोन पुरुष कारण होत. स्वतः बादशहा फारसें काम पाहत नसे, तरी चांगलीं माणसें निवडून त्यांच्या हातीं सर्व अधिकार दिल्यानें देस सुख झालें.

अलीमर्दानखान नांवाचा दुसरा एक हुशार मुत्सद्दी शहाजहानजवळ होता. आसफ्खानाप्रमाणेंच दरबारीं इराणी वळण वाढविण्यांत तो प्रमुख होता. कंदाहारचा किल्ला अकबरानें इराणच्या शहापासून जिंकून घेतला होता, तो जहांगीरच्या कारकीर्दीत इराणच्या शहानें परत घेतला. पुढें शहाजहान तख्तावर आल्यावर अलीमर्दानखान नामक इराणचा सरदार कंदाहारच्या बंदोबस्तास होता. त्याजला पैसे वगैरे भरून शहाजहाननें आपणाकडे वश करून घेतलें, आणि त्याच्या मार्फत पुनरपि

सन १६३७ त कंदाहार किल्ला काबीज केला. पुढच्या वर्षी अली मर्दानखानाची बादशहानें लाहोर येथें भेट घेतली; आणि त्यास मोठ्या मनसब दिली. पुढें कांहीं दिवस अलीमर्दानखान काश्मीरच्या कार भारावर होता; आणि नंतर पंजाबप्रांतही त्याच्याच ताब्यांत देण्यांत आला. सालोसाल शहाजहान पंजाबांत व काश्मिरांत जाई, तेव्हां त्याची सर्व तजवीज अलीमर्दानखान ठेवीत असे. अलीमर्दानखानानें रावी नदीला वर एक लांब फांटा फोडून लाहोरपर्यंत शेतीच्या वगैरे उपयोगासाठीं एक मोठा कालवा आणिला, आणि तसाच दुसरा कालवा दिल्लीस आणिला. मध्यआशिया व इराणकडील कारस्थानांत ह्या खानाचा उपयोग शहाजहानास फारच झाला. तो स. १६५७त मरण पावला. त्यास 'अमीरुल-उमरा' हा किताब होता. त्यास सालाचें उत्पन्न वीसलाख रुपये होतें. त्याच्या मृत्यूनें बादशहास अतोनात दुःख झालें. लाहोर येथें त्याची कबर आहे.

शहाजहान एके ठिकाणीं फार दिवस राहत नसे. थंडीच्या दिवसांत आग्र्यास व उन्हाळ्यांत काश्मिरांत राही. शहाजहानच्या कार्किर्दीच्या बरेवाईटपणाविषयीं पाश्चात्य व एतद्देशीय ग्रंथकारांचा अत्यंत मतभेद आहे, त्याचा उल्लेख मागें केलाच आहे. राजा बहारमल्ल म्हणतो, 'शहाजहानच्या वेळेस जमिनीची सुपीकता फार वाढली. ज्या प्रदेशाचें उत्पन्न अकबराच्या वेळेस तीन लाख होतें, त्याचेंच उत्पन्न शहाजहानच्या अंमलांत द‍ लाख झालें. राज्याचा विस्तार अतोनात असून, फिर्यादींची संख्या इतकी थोडी होती, कीं आठवड्यांतून एक दिवस न्यायाच्या कामा पुरत असे. त्यासाठीं बुधवार नेमिलेला होता; आणि त्या दिवशीं मु फार झालें तर वीस फिर्यादी येत. प्रांतोप्रांतीं न्यायाचीं कोर्टें अ त्यांजवर अपील करण्याचे नियम असत. म्हणून खास बादशहाकडे फ स्वतःच्या कुटुंबांतले तंटे, व धर्मसंबंधीं कलह एवढे येत.' एकंदर माहिते वरून असें कळतें, कीं शहाजहानच्या कार्किर्दीत राज्याची भरभर झाली तशी पूर्वीं कधीं झाली नव्हती. दरबारचें वैभव तर अतोन वाढलें. कलाकौशल्याच्या व इतर कामांत शहाजहाननें मनस्वी ख केला. शहाजहानच्या कार्किर्दीचें वर्णन मुसलमान, क्रिस्ती आणि हिं अशा निरनिराळ्या ग्रंथकारांनीं केलें आहे. जमिनीच्या सान्याची उदा

णि शहाणपणाची पद्धति, न्यायाचा निष्पक्षपात, राज्याच्या हिशेबाची शहा स्वतः करीत असलेली तपासणी, व सर्वांत बादशहाच्या चांगुलनें उत्पन्न झालेलें लोकांचें सौख्य, इत्यादि विषयांची तारीफ करण्यांत हिंदु ग्रंथकारानें मुसलमान व क्रिस्ती ग्रंथकारांसही मागें टाकिलें . टॅव्हर्नियर लिहितो, 'शहाजहान हा राजाप्रमाणें आपल्या रयतेवर ल गाजवीत नाहीं, तर जसा बाप आपल्या मुलांबाळांशी व सर्व शीं वर्ततो, त्याप्रमाणें हा आपल्या प्रजेवर प्रीति करितो. त्याच्या णी खात्याचा बंदोबस्त तारीफ करण्याजोगा आहे. सर्व लोक बहुधा वितपणानें वागतात. इतर मुसलमान राजांप्रमाणें हा आपल्या रयते- खोटे आरोप आणीत नाहीं; अथवा डामडौलानें वागणाऱ्या ल्यांच्या द्रव्यावर डोळाही ठेवीत नाहीं; तेणेंकरून सर्व लोक निर्धास्त त.' खाफीखान लिहितो, 'अकबर हा मोठा योद्धा व कायदे णारा होता, म्हणून तो श्रेष्ठ असेल तर असो; परंतु आपल्या मुलखाच्या महसुलाचा बंदोबस्त करून राज्यांतील प्रत्येक खात्याची व्यवस्था न देण्यांत शहाजहानची बरोबरी करणारा दुसरा राजा आजवर च नाहीं.' दुष्काळांत अन्नगृहें उघडून, तो रयतेस उपाशीं देत नसे. कित्येक हिंदुलोकांस व कवींस बादशहाचा आश्रय . निदान अकबराच्या वेळेपासून सर्व प्रकारच्या लोकांस आश्रय चा प्रघात ह्याही वेळेस चालू राहिला. शहाजहाननें जगन्नाथ पंडित- या संस्कृत कवीस आश्रय दिला; आणि त्यास 'कविराय' ही ी दिली. त्यास दाराशेखोनें आपल्या पदरीं बाळगिलें होतें. तान- ा मुलगा विलास ह्याचा जांवई लालखान म्हणून होता, त्यास समुद' हा किताब बादशहानें दिला होता. जगन्नाथराय व दीरंग- ह्यांचें दरबारांत रुपयांनीं वजन करून, प्रत्येकास साडेचार हजार बक्षीस दिले. जगन्नाथराय स. १६७४त मथुरा येथें मरण पावला. फखान, इरादतखान, महाबतखान, अलीमर्दानखान, शहानवाज- इत्यादि मंडळींनीं दरबारांत इराणी वळणच सर्वत्र वाढविलें. च्या घराण्यांतील अनेक राजपुत्र व इतर पुरुष हिंदुस्थानांत रीत होते. त्यांच्याशीं विवाहसंबंध वगैरे होऊन येथील मुसलमानांत चा अस्सल इराणी बाणा वाढत गेला. इराणांतून व मध्यआशियां-

तून पुष्कळ मोठमोठीं कुटुंबें बायकामुलांसुद्धां इकडे येत. अशांचीं कि चित्रें पारसी इतिहासांतून दिलेलीं आहेत, त्यांजवरून तत्कालीन पेहराव व रीतरिवाजांची बरीच माहिती मिळते.

एकंदरींत शहाजहानसारखा वैभवशाली बादशहा हिंदुस्थान झाला नाहीं. त्याचा परिवार व त्याच्या घराण्यांतील नेमणुकी व त्याच्या देणग्या व त्याच्या दरबारचा सर्व थाट, ह्या गोष्टी पूर्वी बादशहांचे वेळेस जरी पुष्कळ होत्या, तथापि ह्या वेळेस त्यांचा अ कळस झाला. या खर्चामुळें लोकांवर त्याची ज्यास्त सक्ती होत आणि त्याच्या खजिन्यांत पैशाची टंचाई पडत नसे. त्यानें आपलीं मोठमोठीं कामें इतक्या काटकसरीनें केलीं, कीं सर्व लढायांचे व राज्य रभारसंबंधीं इतर खर्च भागवून, तसेंच बहुमोल मयूरासनाचे व त महाल वगैरेंचे अवाढव्य खर्च करून, आणि सर्व फौजेचा पगार वेळ वेळेस देऊनही, त्याच्या खजिन्यांत मरणसमयीं कमींत कमी चोव कोटी रुपये शिल्लक होते. शिवाय सोन्याचांदीचे अपार दागिने व जवा होते ते वेगळेंच. वर लिहिलेली सर्व भरभराट बादशहाच्या राजध शहरांतच होती असें नाहीं. अतिदूरच्या प्रांतांतील शहरांची शोभ त्या वेळच्या प्रवासी लोकांनीं वर्णिली आहे. ज्या प्रांतांत तीं श आहेत, ते प्रांत सुपीक व धान्यानें भरलेले असत असें सांगत सर्व राज्यामध्यें अवघड व डोंगराळ रस्त्यांतून दरवडे व खून असत, ते शहाजहाननें पुष्कळ कमी केले. या बंदोबस्तामुळें शहाजहान कीर्ति फार झाली. शहाजहाननें केलेला बंदोबस्त जरी हल्लींप्रमाणें नव्हे तरी त्या वेळच्या मानानें तो विशेष चांगला होता यांत संशय नाहीं.

शहाजहानच्या राज्याचे बावीस सुभे होते. त्या सर्वांचा आरंभीं सुमारें बावीस कोटी रुपये होता; व तो पुढें छत्तीस कोटी वाढला. जहागीर आणि खालसा असे जमिनीचे दोन प्रकार अ खालसा म्हणजे खास सरकारची. तिचें उत्पन्न कुळांकडून सरक मिळे. जहागिरीची जमीन लोकांस इनाम म्हणून अगर फौजेच्या खर्चाकरितां तोडून दिलेली असे. तोडरमल्लाची महसुलाची पद्धत दक्षिणेत सर्वत्र लागू झाली नव्हती. शहाजहाननें जमिनीची मो संपवून ती पद्धत सर्व दक्षिणदेशास लागू केली. अकबराच्या वेळे

नीच्या महसुलांत विशेष फरक एवढाच झाला होता, की सरकारचें न्न कमी झालेलें पत्करलें, पण तें ज़मा करण्यास सरकारास दगदग खर्च फार पडूं नये. मोगल बादशाहींत पूर्वीच्या मानानें सरकारचा ळ बराच कमी झाला, तरी पण तो गोळा करण्याचा खर्चही कमी यामुळें सरकारचें नुकसान झालें नाहीं. शहाजहानच्या कार्किर्दीत ाहार प्रांत हातचा गेला, तरी अहंमदनगर वगैरे नवीन मुलूख पुष्कळ ाले, आणि झालेलें नुकसान भरून आलें.

ा कार्किर्दीच्या भरभराटीचें वर्णन अतिशयोक्तीचें नाहीं. मोठ- ाली ओसाड पडलेलीं शहरें, धुळीस मिळालेले राजवाडे, बुजून गेलेले ाचे नळ, तसेच जंगलांतील मोठमोठे तलाव व धरणें, राजमार्गा- ल मोडकळीस आलेले पूल, विहिरी, व धर्मशाळा, वगैरे जीं आप- आज प्रत्यक्ष दिसतात, त्यांवरून त्या वेळच्या विलक्षण वैभवाची ली अटकळ होते.

शहाजहानच्या राज्यव्यवस्थेविषयीं ओवेनचा अभिप्राय खालीं लिहिल्या- णें आहे. 'शहाजहानच्या कार्किर्दीत मोगल बादशाहीच्या भरभरा- ा कळस झाला. मोगल बादशाहीच्या जुन्या प्रांतांत शहाजहानच्या स जी शांतता, सुव्यवस्था, व भरभराट वास करीत होती, तशी तेथें कधीं नव्हती. रजपुतान्यांतील मांडलिक राजे बादशहाचे हुकूम ण्यास ह्या वेळच्या इतके पूर्वी कधीं तत्पर नव्हते. दरबारचा थाट, शहाची सत्ता, संपत्ति, व सन्मान ह्यांजमध्यें शहाजहानची बरोबरी कर- ा दुसरा मोगल बादशहा झाला नाहीं. शहाजहानच्या वेळेस मोगल शाहीचा लौकिक सर्व पृथ्वीवर पसरला होता, तसा पूर्वी कधीं नव्हता. स्थानच्या सरहद्दीवरील प्रांत पुनरपि जिंकून घेण्याचा त्यानें आरंभीं न केला. पण अशा दूरच्या प्रांतांचें संरक्षण करण्यास त्रास व खर्च नात होतो, असें पाहून आपल्या हातून व्यवस्था न होण्याजोगे प्रांत खुशाल सोडून दिले. दक्षिणेंत त्याचा अंमल कायमचा बसला. मदनगरचें राज्य जिंकण्याचें वडिलांनीं सुरू केलेलें काम तडीस न विजापूर व गोवळकोंडा येथील राज्यांचें सार्वभौमत्व त्यानें संपा- . इतकें करून तो स्वस्थ बसला नाहीं. जरेनें व आजारानें त्व होईपर्यंत राज्यकारभारांतून त्यानें आपलें लक्ष काढिलें नाहीं.

योग्य कामदाराची नेमणूक करण्यांत शहाजहान बादशहास चांगलेंच आलें. त्याचा वजीर सादुल्लाखान, याजविषयीं प्रत्यक्ष एल्फिन्स्ट असे उद्गार काढिले आहेत, कीं 'हिंदुस्थानामध्यें आजपर्यंत जर एख अत्यंत हुशार व सचोटीचा मुत्सद्दी निपजला असेल, तर तो सादुल्लाख होय.' बादशहानें मुलांस मोठमोठे अधिकार दिल्यामुळें ते जरी अखे त्याच्यावर उठले, तरी ते सर्व पराक्रमी असून राज्याच्या चारही दिश पराक्रम गाजवून पुष्कळ वर्षेपर्यंत परशत्रूंपासून राज्याचा बंदोबस्त करण आपला देह झिजवीत होते.' (India on the Eve of British Conques

६. **शिल्पकलेचा उत्कर्ष, ताजमहाल वगैरे.**—*भारतवर्षाच्या ऐ हासिक आयुर्मर्यादेंत दिल्ली राजधानीचीं नानाविध रूपांतरें झालीं आहे पूर्वींच्या मुसलमानांनीं दिल्लीचे निरनिराळे भाग कसे स्थापिले हें म* सांगितलें आहे. हल्लींचें दिल्ली शहर यमुनेच्या तीरावर शहाजहान बा शहानें बांधिलें आणि त्यास शहाजहानाबाद हें नांव दिलें. हें श बांधण्याचें काम दहा वर्षे चाललें होतें. मुसलमान इतिहासकार श जहानाबाद हेंच नांव वापरितात. ह्या शहराच्या संपत्तीचें व वैभव वर्णन अनेक पौर्वात्य व पाश्चात्य लेखकांनीं केलेलें आहे. तें यमुने पश्चिम तीरावर असून तटाचे भोंवतीं रुंद खंदक आहे. विद्या, व्या राजकारण, नोकरी, चैन, जिज्ञासा इत्यादि अनेक हेतूंनीं प्रेरित हो पृथ्वीच्या दूरदूरच्या भागांतून नानाप्रकारचे लोक दिल्लीस येऊन रा असत. तेथील मुख्य बाजार जो चांदणीचौक त्यांत सर्व देशांत उत्प झालेल्या जिनसांचा सौदा व हिंदुस्थानांतील एकंदर संपत्तीचा विनि चालू असे. तटाच्या बाहेर दूरपर्यंत अनेक मोठमोठे बाग व वाडे अ प्राचीन राजधान्यांचे अवशेष निरनिराळ्या जागीं दिसून येत. जु मशीद, मोती-मशीद, दिवाणी-आम, दिवाणी-खास, घुसलखाना शहाजहानच्या इमारती प्रेक्षणीय आहेत. 'शहाजहानच्या वाड्यासार वाडा सर्व पृथ्वींत नाहीं,' असें शिल्पशास्त्रज्ञ फर्ग्युसन याचें मत अ वाड्याच्या भिंतीवर सुंदर रंगीत चित्रें काढिलेलीं आहेत. वाड्यास वार ६० फूट उंचीचा तट आहे व त्याचा घेर दीड मैल आहे; अ आंतील सर्व भागांत नळाचें पाणी उत्कृष्ट रीतीनें खेळविलेलें

शा ह्या सुंदर ठिकाणीं शहाजहान विलास करी; आणि क्वचित् उन्हाळ्याच्या दिवसांत काश्मिरांत वगैरे जाई. त्या वेळीं स्वारीच्या मुक्कामाचे तंबू वगैरे लावण्याचें काम दोन महिने आगाऊ चालू असे. दरसाल दोन मोठे उत्सव होत. एक राज्यारोहणाचा दिवस व दुसरा बादशहाचा वाढदिवस. त्या वेळीं सुवर्णतुला व इतर सर्व विधी मोठ्या थाटाचे होत. दिल्लीच्या तटाचा घेर ७ मैल असून त्यास ७ मोठालीं प्रवेशद्वारें होतीं.

आग्राशहर म्हणजे मोगलांच्या तार्तार छावणीची हुबेहुब प्रतिमा आहे. मोठ्या उघड्या पटांगणाच्या समोर मध्यभागीं सर्वांस दिसेल अशा प्रकारची बादशहाची बैठक, त्याच्या पाठीमागें कौन्सिल हॉल; त्याच्या पाठीमागें जनानखाना व स्नानगृहें, इत्यादि भाग आहेत. प्रथम शिकंदर लोदीनें आग्रा येथें कधीं कधीं येऊन राहण्याचा प्रघात सुरू केला. त्या वेळीं बियाना प्रांतांत आग्रा हें लहानसें गांव होतें. दिल्लीशहर अस्वच्छ वाटल्यामुळें आग्रा येथें यमुनेच्या पूर्व तीरावर अकबरानें प्रथम वास्तव्य केलें. शिवाय आग्रा हें राज्याच्या मध्य ठिकाणीं असल्यामुळें चहूंकडे देखरेख ठेवण्यास दिल्लीपेक्षां ज्यास्त सोयकर होतें. आग्रा येथून पूर्वेस, उत्तरेस व दक्षिणेस तीन मोठाले रस्ते जात असत. यमुनेच्या पश्चिमकिनाऱ्यावरील जागा मोकळी व ज्यास्त सोयीची वाटल्यामुळें अकबरानें तेथें नवीन इमारती बांधिल्या. तेथील लाल दगडांचा कोट स. १५६६त अकबरानें बांधिला. आग्र्याचें पहिलें नांव अकबराबाद असें होतें. जहांगीर यास आग्र्याची उष्णता दुःसह वाटून तो आपला वेळ बहुधा लाहोर व काश्मीर या ठिकाणीं काढीत असे. शहाजहाननें आग्रा सोडून दिल्लीची नवीन रचना केली. तथापि ताजमहाल बांधून आग्र्याचें नांव त्यानें अजरामर करून ठेविलें आहे. औरंगजेब बहुधा लष्कर घेऊन एकसारखा फिरतीवर असे, म्हणून स्वतंत्र राजधानीची त्यास जरूर पडली नाहीं. मंडेल्स्लोनें (स. १६३८) आग्र्याचें उत्कृष्ट वर्णन दिलें आहे. शहरांत प्रवाश्यांसाठीं ऐशीं धर्मशाळा असून त्या बहुतेक तीन मजली होत्या. बादशहापाशीं अपार संपत्ति असून तिजवर विशेष सक्तीचा पहारा होता. ही संपत्ति निदान तीस कोटी पौंड म्हणजे साडेचार अब्ज रुपये असावी असा मंडेल्स्लोचा अंदाज आहे. आग्र्याची लोकसंख्या ६ लाख होती.

ताजमहाल.—हिंदुस्तान रिव्ह्यूच्या स. १९०५ ऑगस्टच्या अंकांत प्रो. ज़दुनाथ सरकार यांनीं ताजमहालसंबंधीं खालील मजकूर प्रसिद्ध केला आहे.

'स. १६०७ त शहाजहान पंधरा वर्षांचा असतां, जहांगीरनें त्याचा निका अर्जुमंदबानू इच्याशीं ठरविला. पुढें पांच वर्षांनीं म्हणजे स. १६१२ त हें लग्न झालें. शहाजहानपेक्षां मुम्ताज-महल् चौदा महिन्यांनीं लहान होती. ही बाई नवऱ्याच्या सहवासांत एकुणीस वर्षं सुखानें संसार करून, आणि चौदा मुलांस जन्म देऊन, बऱ्हाणपूर येथें मंगळवार ता. ७ जून, स. १६३१ रोजीं प्रसूतीच्या वेदनांनीं मरण पावली. ह्या वेदना तीस तास चालल्या होत्या. तिच्या मृत्यूनें शहाजहान इतका शोकग्रस्त झाला, कीं आठ दिवसांत त्यानें कांहीं एक काम केलें नाहीं; किंवा तो दरबारास आला नाहीं. राज्यभार डोक्यावर नसता तर आपण फकीर झालों असतों असें तो म्हणे. रंगीत वस्त्रें, दाग दागिने व अत्तरें वगैरे विलासाच्या पदार्थांचा त्यानें त्याग केला. राज्यारोहणाच्या वाढदिवशीं व इतर समारंभांचे प्रसंगीं त्यानें वाद्यें वगैरे वाजविण्याची बंदी केली. त्याची दाढी एकदम पांढरी दिसूं लागली. बायकोच्या कबरेजवळ जाऊन राज्य नको, जीव सुद्धां नको, असें म्हणत तो ढळढळां रडे. जनानखान्यांत गेला तर लगेच रडत परत येई. त्यास आणखी दोन बायका होत्या. एक मुज्फर-हुसेनची मुलगी, व दुसरी शहानवाजखानची मुलगी. पहिलीचें लग्न मुम्ताजचे लग्नापूर्वी दोन वर्षें, आणि दुसरीचें मागाहून पांच वर्षांनीं झालें होतें. परंतु हीं लग्नें केवळ राजकीय हेतूंनीं झालीं होतीं, त्यांत प्रीतीचा अंश फारसा नव्हता. मुम्मताज-महलच्या प्रीतीनें त्याचें सर्व अंतःकरण व्यापलेलें होतें. त्यांत दुसऱ्यास जागा नव्हती. कोठेंही प्रवासांत किंवा सुखांत असला, तरी मुम्ताज नेहेमीं त्याच्या बरोबर असावयाची. तीस तो कधींच दूर ठेवीत नसे.

'खुदाबक्ष पुस्तकसंग्रहांतील कासीमअली आफ्रिडी (स. १७७१–१८२७) च्या आत्मचरित्रांत असा मजकूर आहे, कीं शेवटची मुलगी गर्भांत असतां, मुम्ताजमहल्ला तिच्या रडण्याचा आवाज ऐकूं आला. तो ऐकून तिला वाटलें, आपण ह्या बाळंतपणांतून जगत नाहीं हें तिनें बादशहास बोलावून, डोळ्यांत अश्रु आणून, कळकळीनें कळविलें. ती म्हणाली, 'गर्भांतील मुलाचें रडणें आईनें ऐकिलें, म्हणजे आई जगत

नसते असें म्हणतात. म्हणून माझा मृत्यु आतां समीप आला आहे, माझ्या हातून आगळीक झाली असेल, तर क्षमा करा. आजपर्यंत सर्व सुखदुःखांत मी आपली वांटेकरीण होतें; पण आतां आपली संगत सोडून मला एकटीलाच निघून जाणें प्राप्त आहे. आपणाजवळ शेवटच्या मी दोन गोष्टी मागून घेतें. कृपाकरून देतों म्हणा.' बादशहानें होय म्हटल्याबरोबर मुम्ताज बोलली, 'देवानें आपणास पुष्कळ मुलें दिलीं आहेत. आपला नांवलौकिक चालविण्यास तीं पुरे आहेत. तर सावत्र संबंधामुळें घरांत तंटे वाढूं नयेत, म्हणून आतां आपण पुनः लग्न करूं नये. दुसरी विनंति अशी, कीं आपल्या उभयतांच्या प्रीतीचें स्मारक यावचंद्र-दिवाकरौ राहवें, म्हणून अशी एक अलौकिक कबर बांधा कीं जगांत पूर्वी कधीं तशी झाली नाहीं आणि पुढें कधीं होणार नाहीं.' इतकें बोलणें झाल्यावर ती पुढें प्रसूत होऊन लगेच मरण पावली. त्या वेळीं मुलगी झाली तिचें नांव गौहर-आरा. वरील गोष्ट सांगोसांगीची आहे. तींत तथ्य किती आहे हें सांगतां येत नाहीं. मात्र ती आग्र्यास त्या वेळीं सर्वतोमुखीं होती. अब्दुल हकीम लाहोरीच्या पादशहानाम्यांत अथवा खाफीखानाच्या पुस्तकांत त्याबद्दल एक अक्षर नाहीं. पादशहानाम्यांत खालील उतारा आहे:—

'मुम्ताजमहल् इला कळून चुकलें कीं आतां आपण जगत नाहीं, तेव्हां तिनें जहान्-आरास पाठवून बादशहास आपणाकडे बोलाविलें. तो लगेच मोठ्या काळजीनें धांवत आला. तिनें मुलांचा सांभाळ करण्याविषयीं बादशहास विनंति केली आणि आपण परलोकवास पत्करिला. नंतर बऱ्हाणपूरच्या समोर तापीनदीच्या कांठीं एका बागेंत प्रथम तिचें दफन झालें. पण पुढील डिसेंबर ता. १ रोजीं, तिचें शव आग्र्यास नेण्यांत आलें. बरोबर शहाजादा सुजा होता. ता. २९ डिसेंबर रोजीं तो मातुश्रीचें प्रेत घेऊन आग्र्यास पोंचला.'

'आग्र्याचे दक्षिणेस एक जागा पाहून ती मानसिंगाचा नातू राजा जयसिंग याजकडून बादशहानें खरेदी केली; आणि इमारतीच्या कामांत निष्णात असलेल्या अनेक लोकांकडून एका सुंदर इमारतीचे नकाशे मागविले. त्यांपैकीं एक बादशहानें पसंत केला आणि प्रथम त्याचा लाकडी नमुना तयार करविला. नमुन्याप्रमाणें स. १६३१ च्या आरंभीं इमारतीची सुरुवात झाली, ती स. १६४३ च्या जानेवारींत पुरी झाली.

मकामतखान व अब्दुलकरीम हे दोघे त्या कामावर मुख्य देखरेख करीत होते. त्या इमारतीस पन्नास लाख रुपये खर्च झाला. आफ्रिडी म्हणतो, इमारतीचा खर्च ९ कोटी १७ लाख झाला. आणि खालील गृहस्थ निरनिराळीं कामें पाहत होते:—

१ अमानतखान शिराजी (कंदाहारचा). २ आग्र्याचा मास्तर इसा गवंडी. ३ दिल्लीचा मास्तर पिरा सुतार. ४–६ बन्नु हार, झातमल्ल, व जोरावर, दिल्लीचे पाथरवट. ७ इस्मईलखान रूमी, वरील घुमट व त्याची परांची बनविणार. ८ रामलाल काश्मिरी बागवान. त्याच ग्रंथांत एकंदर वीस उत्तमोत्तम दगडांचीं नांवें दिलेलीं असून त्यांचा उपयोग या इमारतीस केला आहे. ता. २८ जानेवारी स. १६४३ रोजीं मुम्ताजमहल्च्या बाराव्या मृत्युदिवशीं बादशहा ताजमहालांत गेला; आणि एक लाख रुपयांचे उत्पन्नाचीं तीस गांवें ताजमहालाच्या खर्चाकडे व सभोंवारच्या सराया, दुकानें, बाग व त्यांत राहणारे साधु यांच्या खर्चासाठीं, लावून दिलीं.'

ताजमहालची इमारत आपल्या अप्रतिम सौंदर्यानें जगांतील सर्व इमारतींत प्रथम पद पावली आहे. ह्या इमारतीचें वर्णन शब्दांनीं करणें एक तर अगदीं अशक्य आहे; आणि दुसरें असें, कीं आजपर्यंत अनेक ग्रंथकारांनीं त्या इमारतीच्या वर्णनावर आपली लेखणी चालविली आहे. ही इमारत आग्र्यापासून दीड कोशावर यमुना नदीच्या पश्चिमतीरावर आहे. ती बांधण्याच्या कामीं वीसहजार मनुष्यें खपत होतीं. हिंदुस्थानांत शिल्पशास्त्र त्या वेळेस किती उत्कृष्ट स्थितींत होतें, याची उत्तम साक्ष ही इमारत देते. तिच्या एकंदर स्वरूपावर जनानी झांक मारते असें मार्मिक शिल्पज्ञ म्हणतात. वेठीचे मजूर पकडून बादशहानें ताजमहालचें काम करविलें, असा एक आरोप बादशहावर केलेला आहे तो खरा दिसत नाहीं. कारण, ज्या जागेवर ताजमहालची इमारत आहे, ती जागा प्रथम जयसिंगाची असून, जयसिंग ती बादशहास फुकट देत होता. परंतु प्रियकर बायकोच्या पवित्र स्मारकास कोणाचेंही फुकट साह्य घ्यावयाचें नाहीं, असा बादशहानें आपला निश्चय व्यक्त करून जयसिंगास पुरेपूर मोल देऊन, जागा विकत घेतली. इतकी कसोशी करणारा बादशहा गरीब लोकांची मजुरी फुकट घेईल हें संभवत नाहीं. शिवाय ताजमहालचा खर्च पन्नास

लाख रुपयेच झाला आहे, तो त्या वेळच्या मानानें कमी नसून बादशहाच्या ऐपतीबाहेर नव्हता.

सिकंदरा येथें अकबराची सुंदर कबर आहे, तें गांवही सिकंदर लोदीनेंच वसविलें. बारदारी म्हणून जी इमारत तेथें आहे, ती सिकंदरनें स. १४९५ त बांधिली. सिकंदरा येथें अकबराचें दफन झालें, त्या ठिकाणीं एक सुंदर व टुमदार कबर जहांगीरनें बांधिली. ह्या इमारतीचें सर्व काम स. १६१३ चे सुमारास पुरें झालें. त्याजवर दररोज तीनहजार मजूर काम करीत होते; आणि त्यास पंधरालक्ष रुपये खर्च झाला असें म्हणतात. त्याच्या प्रवेश दरवाजाची उंची सत्तर फुटांपेक्षां ज्यास्त आहे. मुख्य इमारतीस पांच मजले आहेत. त्यांतील अनेक सुंदर कामांची कल्पना वाचकांस शब्दांनीं देणें शक्य नाहीं. ती प्रत्यक्षच पाहिली पाहिजे. स. १६११ पासून आजपर्यंत हजारों लोकांनीं ह्या इमारतीचें वर्णन केलें आहे. मुसलमानी इमारतींचे दोन प्रकार असून त्यांपैकीं अकबराची ही कबर जुन्या चालीची व आग्र्याचा ताजमहाल नव्या चालीचा समजतात. (ह्या दोन चालींचे भेदाभेद मनमोहन चक्रवर्ती यांनीं 'इंडियन वर्ल्ड' मासिकांत ऑक्टोबर स.१९०५च्या अंकांत स्पष्ट करून सांगितले आहेत.) जुन्या चालींत हिंदु व जैन तऱ्हांचें मिश्रण पुष्कळ आहे. पुढें जहांगीरच्या नंतर हिंदु व जैन तऱ्हांचें मिश्रण कमी होऊन पार्शियन म्हणजे शुद्ध मुसलमानी वळण वाढत गेलें.

नूरजहानचा बाप इतिमाद्-उद्दौला अस्सल इराणी वळणांत वाढलेला असून नूरजहानचें लग्न झाल्यापासून बांधकामांत सुद्धां इराणी वळणाचें माहात्म्य वाढत गेलें. सिकंद्रा येथील अकबराची कबर, इतिमादुद्दौल्याची आग्र्याच्या जवळची कबर व आग्रा येथील शहाजहानचा ताजमहाल ह्या तिहींची अनेक बाबतींत मार्मिक तुलना करून, श्रीयुत चक्रवर्ती ह्यांनीं त्या तिहींच्या बांधणींतले भेद स्पष्ट करून सांगितले आहेत. अकबराच्या कबरेस लाल दगड लावलेला असून, ताजमहालास शुभ्र आरसपान वापरलेला आहे. अकबराच्या कबरेंत जंगी व भव्य स्वरूपाची कल्पना मनांत येते, इतिमाद्-उद्दौल्याच्या कबरेंत थोडासा भव्यपणा व थोडेंसें सौंदर्य आहे; परंतु ताजमहालांत नुसतें सौंदर्य, म्हणजे गायनांतील सप्तसुरांच्या उत्कृष्ट मिश्रणाप्रमाणें, शिल्प-

NATIONAL ARCHIVES OF INDIA

कामाच्या हरएक उपांगांचें उत्कृष्ट मिश्रण आहे. ऐतिहासिक रीत्या अकबराच्या कबरेचें महत्त्व विशेष आहे. त्यांत शिल्पकलेची वाढ व प्रगति दिसून येते. पण ताजमहालांत त्या कलेची सीमा होऊन, पुढील वाढ खुंटलेली दिसते. ह्या विषयाचा ज्यास्त विचार तत्संबंधी विशिष्ट पुस्तकांत सांपडेल.

मयूरसिंहासन.—अकबरापासून बादशहांच्या जव्हेरखान्यांत पुष्कळ रत्नसंचय झाला होता. शहाजहानचे मनांत आलें, कीं हीं रत्नें लोकांचे नजरेस पडण्याची सोय नसली, तर तीं नुसतीं बाळगून त्यांचा उपयोग तरी काय? असें म्हणून त्यानें सर्व रत्नें आपणापुढें आणवून त्यांपैकीं सुमारें ८६ लाख किमतीचीं चांगलीं चांगलीं त्यानें निवडून काढिलीं; आणि १ लक्ष तोळे सोनें (किंमत १४ लाख रुपये) खरेदी करून कसबी सोनार कामावर बसविले; आणि बेबादलखान याच्या देखरेखेखालीं नवीन मयूरासन तयार करविलें. तें काम सात वर्षें चाललें. त्याची लांबी सव्वातीन यार्ड, रुंदी अडीच यार्ड, व उंची पांच यार्ड होती. ह्या सिंहासनांत तीं सर्व रत्नें गोंवून देण्यांत आलीं. त्यास द्वादश कोन व तितकेच खांब होते. वर एक लहानसें झाड करवून प्रत्येक खांबाच्या शिखरावर दोन दोन मोर बसविलेले होते. एवढ्याच वरून त्यास मयूरासन नांव पडलें. तें मयूरावर बसविलेलें नव्हतें. वर जाण्यास तीन रत्नखचित पायऱ्या असून, अकरा बाजू कठडे बसवून बंद केलेल्या होत्या. बारावी बाजू प्रवेशाची असून उघडी होती. आंतल्या बाजूस एका पारशी कवीचीं वीस कवनें कोरविलेलीं होतीं. ह्या सिंहासनांस लागलेल्या साहित्याची किंमत एक कोट रुपये असून, त्याशिवाय मजुरीखर्च काय झाला असेल तो निराळा. ता. १२ मार्च स. १६३५ रोजीं ह्या मयूरसिंहासनावर शहाजहाननें प्रथम आरोहण केलें.

मोगल बादशहाच्या संपत्तीचा अंदाज मॉडर्न रिव्ह्यूमध्यें प्रो० सरकार यांनीं फारशी ग्रंथांच्या आधारें दिलेला आहे. स. १६४८त राज्याचा वसूल सुमारें वीस कोटी असून, त्यांपैकीं सुमारें तीन कोटी बादशहाच्या खासगीसाठीं खर्च होत असे. शहाजहाननें पहिल्या वीस वर्षांत ९॥ कोट रुपये दानधर्म व देणगीमध्यें खर्चिले. तेवढ्या अवधींत २॥ कोट रुपये इमारतींत खर्च झाले, त्याचा तपशील दिलेला आहे. बादशहाचे

जव्हेरखान्यांत ५ कोटींचा ऐवज होता, व सुमारें २ कोटींचें जवाहीर राजपुत्र व इतर मंडळी यांजपाशीं होते. वरील ५ कोटींपैकीं २ कोटी ऐवजाचे दागिने बादशहाचे अंगावर नेहमीं घालण्याचे होते. शहाजहानच्या मंत्र जपण्याच्या दोन माळा होत्या, त्यांची किंमत २० लाख रुपये होती. ही संपत्ति आजच्या मानानें थोडी दिसते. पण त्या वेळच्या मानानें तिची किंमत पुष्कळ होती. एका रुपयास दोन शिलिंग तीन पेन्स इतका भाव त्या वेळीं येई; आणि बाजारांत हल्लीं एक रुपयास जो जिन्नस मिळतो त्यापेक्षां निदान सातपट ज्यास्त त्या वेळीं मिळत असे.

प्रकरण सत्ताविसावें.

मूहिउद्दीन महंमद औरंगजेब.

स. १६५८—१७०७.

१. राज्यारोहण व परिस्थिति. २. मीर जुम्ला (मृ. १६६३).
३. बुंदेले राजांशीं युद्ध. ४. जनानखान्यांतील मसलती.
५. कार्किर्दीतील कांहीं युद्धप्रसंग. ६. हिंदूंचा छळ व रजपुतांशीं युद्ध.
७. दक्षिणची स्वारी व मृत्यु. ८. औरंगजेबाची योग्यता.
९. औरंगजेबाची राज्यव्यवस्था.

१. राज्यारोहण व परिस्थिति.—मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें शहाजहान बादशहाचा तृतीय पुत्र औरंगजेब याची अनिवार महत्त्वाकांक्षा सफल होऊन, जुलै सन १६५८ त, म्हणजे इंग्लंडांत ऑलिव्हर क्रॉम्वेल मरण पावला त्यापूर्वी थोडे दिवस, त्यानें आपल्या नांवाची द्वाही फिरविली. परंतु त्याचा राज्यारोहणविधि तारीख २६ मे सन १६५९ रोजीं झाला. त्या वेळीं बापानें त्यास दिलेलें 'आलमगीर' हें नांव त्यानें धारण केलें. बऱ्याच अंशीं इंग्लंडच्या क्रॉम्वेलचा हा समकालीन असून दोघांच्या चरित्रक्रमांत बरेंच साम्य आहे. क्रॉम्वेल हा क्रिस्ती धर्माच्या प्युरिटन पंथाचा होता. हा पंथाच्या लोकांचें राहणें अगदीं साधें व धर्मवेड जबर असे. धर्माच्या नांवावर

मनांतील महत्त्वाकांक्षा तृप्त केल्याचा दोष इतिहासकारांनीं क्रॉम्वेल यास दिला आहे. औरंगजेबाबद्दलही इतिहासकार तेंच म्हणतात. दोघांनींही मोठ्या गोष्टी करण्याचा आव घातला, पण दोघांचाही शेवट दुःखदायक झाला. धर्मसंस्थापना करण्याच्या भरांत आपण कोणीकडे वाहत चाललों आहों, ह्याचें त्यांस स्मरण राहिलें नाहीं. इंग्लंडांतील प्रसिद्ध विद्वान् ग्रंथकार जॉन्सन यास 'मानवी इच्छांचें वैयर्थ्य' दाखविण्यासाठीं एक उदाहरण पाहिजे होतें. तेव्हां स्वीडन देशचा राजा बारावा चार्लस् ह्याचें चरित्र त्याच्या उपयोगी पडलें. औरंगजेबाचें चरित्र त्यास माहीत असतें, तर तेंही त्याच्या कामास आलें असतें; आणि त्यांतही चमत्कार हा, कीं चार्लस् व औरंगजेब हे एकमेकांचे समकालीन होते. हिंदुस्थानचा बादशहा व स्वीडनचा राजा ह्यांच्या अंगीं साधें वर्तन, अखंड धैर्य, व हट्टी स्वभाव हे गुणावगुण सारखे भरले होते. दोघांचेंही नांव काढिलें असतां त्यांनीं केलेल्या घोर पातकांचें स्मरण झाल्याशिवाय राहत नाहीं. चार्लस्नें परराष्ट्राच्या एका वकिलाला चाकावर आपटून ठार मारिलें, आणि औरंगजेबानें भ्रातृहत्या करून बापास कैदेंत टाकलें, ह्या गोष्टींचें इतिहासास कधीं विस्मरण होणार नाहीं. परंतु औरंगजेबाची परिस्थिति प्रत्येक गोष्टींत चार्लस्पेक्षां अत्यंत विस्तृत असल्यामुळें, त्याच्या कृत्यांचा परिणामही तसाच विस्तृत व भयंकर झाला. अर्थात् चार्लस्च्या इतिहासापासून शिकण्याजोगा अंश विशेष निघत नाहीं. परंतु औरंगजेबाचा अंत म्हणजे मोगल बादशाहीच्या नाशाचा आरंभ होय; आणि तेथपासूनच हिंदुस्थानच्या इतिहासाची दिशा बदलत चालली.

तयमूरलंगच्या घराण्याची हिंदुस्थानांत प्राणप्रतिष्ठा होऊन मोगल बादशाहीचा प्रारंभ झाला. तिचा पहिला पुरुष बाबर हा संपूर्ण वीर्यशाली होता. हुमायून हा भाग्यहीन, वनवास व संकटें यांनीं ग्रस्त झालेला, परंतु सत्त्वशील व साहसी होता. अकबर हा मुत्सद्दी व व्यवस्थापक असून जहांगीर हा बुद्धिमान परंतु आळशी व दारूबाज, आणि शहाजहान भव्य राजमंदिरें बांधून विलास भोगणारा झाला. ह्यापुढें जो पुरुष त्या वंशांत तख्तनशीन झाला, त्यास तज्ज्ञातीय इतिहासकार साधु असें नांव देतात; आणि परजातीय इतिहासकार क्रूर, कठोर व स्वार्थसाधु अशी त्याची निंदा करितात. मोगल बादशहांच्या ठिकाणीं असे फरक होते.

जाण्याचीं कारणें स्पष्ट दिसतात. आरंभीं मोगल लोक हे साहसी व स्वोन्नतिप्रीत्यर्थ झटणारे होते, परंतु त्यांस स्वास्थ्य मिळूं लागल्याबरोबर ते चैनी बनले. बाबर बादशहा दोन दिवसांत घोड्यावर १६० मैल मजल करून गंगानदींतून दोन वेळ पोहून गेला. त्याचाच पांचवा वंशज औरंगजेब तख्तावर असतां दरबारच्या लोकांस मृदु मलमलीचा पोशाख सुद्धां जड वाटे. बादशहाच्या स्वारीबरोबर प्रवासांत असतां, ते लोक पलंगावर निजून नोकर त्यांस पलंगासकट वाहून नेत; आणि मुक्कामावर पोंचल्याबरोबर भोजन त्यांची वाट पाहत तयार असे. धर्माच्या बाबतींत असाच फरक झाला होता, हें येथवर सांगितलेल्या इतिहासावरून व्यक्त झालेंच आहे. सर्व जातींच्या रयतेस समबुद्धीनें वागविणें, ह्या उदात्त तत्त्वावर पूर्वींच्या बादशहांनीं आपल्या राज्याची इमारत सुदृढ केली होती. ह्या तत्त्वाविषयीं एतद्देशीय लोकांनीं दाखविलेला आदर हिंदुस्थानच्या इतिहासांत विशेष स्मरणीय झाला आहे. अकबराच्या पदरीं मोठमोठे हिंदु सरदार प्रसिद्धीस आले. सर्वांस मान्य होण्याजोग्या नवीन धर्माची त्यानें स्थापना केली. असा धर्म स्थापन करण्याकडे पूर्वीं दोनशें वर्षें हिंदु साधुसंतांचे अव्याहत प्रयत्न चालले होते. बंगाल्यांत प्रसिद्ध साधु कबीर मरण पावला असतां त्याच्याबद्दल हिंदु-मुसलमानांचें भांडण लागलें. तेव्हां साधूनें येऊन दर्शन दिलें, आणि कफन उघडून पाहण्यास सांगून आपण अदृश्य झाला. पुढें कफनाखालीं प्रेताऐवजीं त्यांस सुंदर फुलें सांपडलीं. त्यांपैकीं अर्धीं मुसलमानांनीं विधिपूर्वक दफन केलीं, आणि बाकीचीं निम्मीं हिंदूंनीं आपल्या रीतीप्रमाणें दहन केलीं. सारांश, त्या वेळेस धर्मजागृति विशेष झाली होती. अकबराच्या वेळेस पुष्कळ देवस्थानें अशीं होतीं, कीं तेथें हिंदु व मुसलमान दोघेही भजनास एकत्र जात. परंतु अकबराच्या मनांतील हा धर्मभाव सलीम व शहाजहान ह्यांच्या ठिकाणीं जागृत नसल्यामुळें अनाचार सुरू झाला; आणि अकबराच्या उदात्त कल्पना बाजूस राहून, ढोंगी व लुच्चे लोक आपला कार्यभाग साधून घेऊं लागले. ही शोचनीय स्थिति पाहून स्वधर्मनिष्ठ औरंगजेबास चैन पडेना. तेव्हां आजपर्यंत चालत आलेली धर्मभ्रष्टता नाहींशी करून आपला पूर्वींचा मुसलमानी धर्म पूर्ववत् चालू करण्याचा त्यानें निर्धार केला. ह्या कामीं यश येण्याइतकें त्याच्या ठायीं कर्तृत्व व धैर्य

होतें. एके दिवशीं एक सिंह मोकळा सुटला असतां त्याच्या अंगावर धांवत जाऊन त्यास औरंगजेबानें ठार मारिलें होतें. तरुणपणींच दक्षिण-प्रांतावर त्याची नेमणूक झाल्यामुळें तेथील शियापंथी मुसलमानी राज्य व हिंदुधर्मी मराठे यांजवर आपला प्रताप गाजविण्याची त्यास उत्क इच्छा उत्पन्न झाली. परंतु राज्यप्राप्ति होण्यापूर्वी त्यास ही आप इच्छा तडीस नेतां आली नाहीं. आरंभीं कदाचित् त्याच्या मनांत राज्यप्राप्तीची इच्छा नसेल. पण त्याच्या मनांत जी धर्मप्रेरणा होती, ती तडीस नेण्याच्या कामास आपले दोघे वडील भाऊ अयोग्य आहेत असें त्यास वाटल्यामुळें, धर्मवेड व महत्त्वाकांक्षा ह्या दोनही वासना तृप्त करून घेण्याचा त्यानें घाट घातला. हा त्यानें कोणत्या रीतीनें तडीस नेला हें पुढें कळून येणार आहे.

राज्य प्राप्त झाल्यावर पुढील वर्तनामध्यें त्याच्या डोळ्यांपुढें नेहमी दोन तीन उद्देश कायमचे होते. पहिला उद्देश असा, कीं अकबराच्या वेळेपासून बिघडलेली दरबारची नीति सुधारणें; दुसरा, आजपर्यंत मुसलमानी धर्माची जी अवहेलना झाली, ती बंद करून पूर्वीप्रमाणें सुन्नीपंथाची स्थापना करून काफर हिंदु लोकांमध्यें त्याचा होईल तितका प्रसार करणें; आणि तिसरा, दक्षिणदेश जिंकण्याचे प्रयत्न पूर्वापर चालू असतां जें काम आपल्या पूर्वजांच्या हातून तडीस गेलें नाहीं, तें आपण करून दाखविणें. हे उद्देश त्यानें एकसमयावच्छेदेंकरून तडीस नेले असते, परंतु मध्यंतरीं अनेक अडचणी आल्यामुळें ते फ लांबणीवर पडले. इतकेंच नाहीं, तर त्या कामीं त्याचे पुढील सर्व श्र फुकट जाऊन अंतीं त्याचा अत्यंत आशाभंग झाला. अ उद्देशसिद्धीच्या खटपटींत जीं कृत्यें त्याच्या हातून घडलीं, त्यांजवरून त्याच्या चरित्राचे तीन भाग कल्पितां येतात. पहिला भाग सन १६५८ पासून १६६४ पर्यंतचा. ह्या भागांत त्यानें आपल्या सर्व शत्रूंचा पाडाव करून नवीन राज्यपद्धति सुरू केली, ती हकीकत येते. ह्या भागा अखेरीस त्याचें राज्य भरभराटीच्या शिखरास पोंचलें, आणि पुढें त उतरती कळा लागली. दुसरा भाग सन १६६५ पासून १६८१ तचा ह्या वेळीं काश्मीर, दिल्ली, व काबूल इत्यादि ठिकाणीं र त्यानें धर्मप्रसाराचे नानाविध प्रयत्न केले. पण त्यांत त्यास यश

येऊन निराशेनें त्यानें आपला उद्देश सोडून दिला. तिसरा व शेवटचा भाग सन १६८१ पासून १७०७ पर्यंतचा. ह्या भागांत मुख्यतः त्याच्या दक्षिणच्या स्वारीची हकीकत येते. पंचवीस वर्षेपर्यंत दक्षिणेंत स्वतः राहून तो प्रदेश जिंकण्याचे त्यानें होते तितके प्रयत्न केले, पण येथेंही त्याचा मनोरथ विफल झाला. असो. प्रस्तुत औरंगजेबानें तख्तनशीन झाल्याबरोबर कोणकोणते विशेष फेरफार केले ते सांगावयाचे आहेत.

त्याचीं पहिलीं कांहीं वर्षें शांततेंत गेलीं. इराण, बुखारा, आरबस्तान, अबिसिनिया येथील राजांकडून त्याच्या अभिनंदनार्थ मोठ्या थाटानें वकील आले. त्या सर्वांचा उत्तम सत्कार करून औरंगजेबानें त्यांस आपल्या वैभवानें दिपवून सोडिलें.

आरंभींच त्यानें आग्र्याच्या किल्ल्यांतील सर्व संपत्ति शेकडों गाडे भरून दिल्लीस नेली. दिल्लीच्या मुख्य काजीनें, शहाजहान जिवंत असल्यामुळें, औरंगजेबास बादशहा असें कबूल केलें नाहीं, आणि त्याच्या नांवानें खुत्बा वाचिला नाहीं. मक्का येथील मुख्य धर्माध्यक्षानेंही सर्व यात्रेकरूंस असें जाहीर केलें, कीं शहाजहानशिवाय दुसऱ्या हिंदुस्थानच्या बादशहास आपण ओळखीत नाहीं. औरंगजेबानें आपल्या वकिलांबरोबर पुष्कळ पैसे मक्केस पाठविले, पण त्या धर्माध्यक्षानें त्यांचा स्वीकार न करितां तसेच परत पाठविले. तेव्हां दिल्लींतील मुख्य काजीस सर्व मुल्ला-लोकांसमक्ष औरंगजेबानें बडतर्फ केलें. ऑक्टोबर सन १६६० पासून औरंगजेबाच्या नांवानें खुत्बा वाचण्याची सुरुवात झाली. औरंगजेबानें इकडे जीं घोर कृत्यें केलीं, त्यांमुळें त्याजवर सर्वांचा रोष झाला होता; तो कमी करण्यासाठीं सर्व अमीरउमरावांस व हिंदु राजांस दिल्लीस बोलावून त्यानें एक मोठी मेजवानी दिली. तो समारंभ नऊ दिवस चालला होता. ह्या प्रसंगीं हिंदूंस खुष ठेवण्याजोगीं अनेक धर्मकृत्यें त्यानें केलीं. त्यामुळें मुसलमानांच्या मनांत बराच तिरस्कार उत्पन्न झाला; तथापि तो दूर करण्याकरितां त्यानें लगेच एक उलट हुकूम फर्माविले. मद्यप्राशनाची सक्त बंदी केली. जे कोणी मुसलमान मद्यपान करितांना आढळतील, त्यांचे हातपाय तोडण्याचा त्यानें हुकूम दिला. ख्रिस्ती लोकांनीं सुद्धां आपल्या वस्तीबाहेर दारू विकूं नये अगर विकूं नये असें त्यानें फर्माविलें. त्याचप्रमाणें गा

४४-८-११-१०-७९१-२०००

बजावणें त्यानें बंद केलें. जे कोणी शहरांत गायनवादन करीत असतील, त्यांच्या घरांत शिरून त्यांचीं वाद्यें फोडून टाकण्याचा सपाटा चालला. शेंकडों गवईलोक भिकेस लागले. त्याचप्रमाणें नृत्यकला बंद झाल्यामुळें अनेक कलावंतिणी उपाशीं मरूं लागल्या. तेव्हां त्यांनीं लग्नें करावीं असें औरंगजेबानें फर्माविलें. सुनीपंथाचा प्रसार व्हावा म्हणून त्याच्या पदरीं जे शियापंथी इराणी असामदार होते, त्या सर्वांचीं इनामें बंद केलीं; तेव्हां ते निघून काश्मीरकडे गेले. राज्यांत काय चाललें आहे, त्याची आपणास खबर कळावी म्हणून गुप्त बातमीदारांचें खातें त्यानें विशेष वाढविलें. ह्या सर्व गोष्टींनीं असंतोष उत्पन्न झाला. शहाजहाननें औरंगजेबाची चांगली कानउघडणी केली. त्याजबद्दल उलट तो बापास वाईट रीतीनें वागवूं लागला. काबूलचा सुभेदार महाबतखान ह्यानें औरंगजेबाचा पुष्कळ निषेध केला. तो न आवडून महाबतखान कदाचित् इराणच्या शियापंथी शहास मिळेल, ह्या भीतीनें त्याची औरंगजेबानें गुजराथच्या सुभ्यावर बदली केली, आणि बापाची सक्त कैद ढिली केली.

लवकरच सर्व लोकांस कळून आलें, कीं आपला नवीन धनी आजपर्यंत झालेल्या बादशहांसारखा नाहीं; शिपाई, बादशहा व साधु अशा तीन लक्षणांचें तो मिश्रण आहे. त्याचें वर्तन नेहमीं शांत व नम्र असे, अत्यंत विजयोत्साहांत व अत्यंत दुर्धर प्रसंगीं सदैव ईश्वरावर भरंवसा टाकून स्वस्थ बसण्याची त्याची हातोटी विलक्षण होती. तो कधीं उच्च स्थानावर बसत नसे, कीं सोन्याचांदीचीं भांडीं वापरीत नसे. दरबारांतून होणारा धर्मादायाचा खर्च त्यानें दुप्पट वाढविला; आणि गरीब व आजारी लोकांच्या शुश्रूषेकरितां नवीन गृहें स्थापन केलीं. दिवसांतून दोन वेळं तो भरदरबारांत सरकारी कामानिमित्त येऊन बसूं लागला. शुक्रवारीं भजनाचा मेळा काढून त्याबरोबर आपण मशिदींत जाण्याचा त्यानें प्रघात सुरू केला. रमजान महिन्यांत तो दररात्रीं सहापासून नऊ तास कुराण वाचीत बसे. दोन लाखांवर खर्च करून मुसलमानी कायद्यांचें त्यानें एकीकरण करविलें, 'त्यास फत्वा-ए-आलमगीर' असें नांव आहे. अशा प्रकारें ह्या नवीन कार्कीर्दीस सुरुवात झाली.

२ मीर-जुम्ला.—सन १६६१ पर्यंत औरंगजेबाचा सर्व काल बंधूंचा ?र करण्यांत गेला. त्याचा केवळ उजवा हात जो मीर-जुम्ला तो

मुजास आराकानांत घालवून दिल्यावर बंगालप्रांतांत स्वास्थ्य करीत होता. पुढें औरंगजेबानें त्यास बंगालचा सुभेदार नेमिलें. नंतर त्याच्या मनांत दक्षिणेंत जाऊन विजापूर व गोवळकोंडें हीं राज्यें काबीज करण्याचा विचार होता. वृद्धापकाळ झाल्यामुळें आपलीं मुलेंमाणसें स्वतःजवळ असावीं असें वाटून, दिल्लीहून त्यांस पाठवून देण्यास मीर-जुम्ला यानें बादशहास विनंति केली. औरंगजेबाच्या संशयी स्वभावास मीर-जुम्ला याचा कधीं भरंवसा आला नाहीं. हा बलाढ्य सरदार केव्हांना केव्हां तरी आपणावर उठेल अशी त्यास भीति होती. सबब त्याचा मुलगा महंमद अमीरखान यास स्वतःजवळ ठेवून घेऊन बाकीच्या मंडळीस त्यानें मीर-जुम्ला याजकडे पाठवून दिलें; आणि महंमद अमीरखानास मीर-बक्षी म्हणजे स्वारांचा मुख्य सरदार हें काम देऊन स्वतःजवळ ठेविलें. मीर-जुम्ला यास या गोष्टीनें वाईट वाटलें; पण त्यास कांहीं उपाय नव्हता; पुढें मीर-जुम्ला यास औरंगजेबानें आसामप्रांत जिंकण्यास पाठविलें. तें काम त्यानें चांगल्या रीतीनें तडीस नेऊन चीनदेशच्या हद्दीपासून वीस दिवसांच्या मजलेवर तो येऊन पोंचला. आसामची राजधानी घेरगांव त्यानें काबीज केली आणि पुष्कळ संपत्ति मिळविली. औरंगजेबाच्या मनांत चीनदेश जिंकण्याची फार इच्छा होती, ती मीर-जुम्ला यानें तडीस नेली असें त्यास वाटलें. इतक्यांत पर्जन्यकाळ लागल्यामुळें मीर-जुम्ला यास पुढें जातां येईना. आसामच्या राजानें आसपासचा सर्व मुलूख ओस पाडिला; तेव्हां मीर-जुम्लाच्या सैन्यांत धान्याचा फार तोटा पडला. त्यास मागेंही फिरतां येईना. शेवटीं हतवीर्य होऊन मोठ्या संकटानें तो सरहद्दीवरच्या एका किल्ल्यांत परत आला. दुसऱ्या वर्षीं आसामवर पुनः स्वारी करीत असतां तो आमांशाचा आजार होऊन स. १६६३त मरण पावला. मीर-जुम्ला याच्यासारखे शूर, शहाणे, व कारस्थानी पुरुष मोगल बादशाहींत थोडेच निपजले. औरंगजेबास राज्य प्राप्त होण्यास मुख्य कारण तोच झाला. मरणापूर्वीं स्वतःजवळ असलेला कोह्-इ-नूर हिरा त्यानें बादशहास नजर केला असें म्हणतात. मीर-जुम्लाच्या हाताखालील सुरेख फौजेचा नाश झाला म्हणून औरंगजेबाला जरी वाईट वाटलें, तरी मीर-जुम्लासारखा डोईजड सरदार मरण पावल्यामुळें त्याचें चित्त स्वस्थ झालें. त्याचा मुलगा महंमद

अमीरखान यास त्यानें सन्मानानें वागविलें. पश्चात् बंगालच्या सुभेदारीवर शाएस्तेखानाची नेमणूक बादशहानें केली.

३. **बुंदेले राजांशीं युद्ध.**—बुंदेलखंडचा* राजा छत्रसाल याजबरोबर औरंगजेबाचें युद्ध पुष्कळ दिवस चाललें होतें. ह्या बुंदेले राजांची थोडीशी पूर्वपाठिका देणें जरूर आहे. बुंदेलखंडप्रांत हा प्राचीनकाळापासून प्रसिद्ध आहे. यमुनेच्या दक्षिणेस विंध्याद्रीपर्यंत या प्रदेशाचा विस्तार होता, असें प्राचीन लेखांत सांगितलें आहे. त्यांत लहान लहान पुष्कळ संस्थानें होतीं. इसवी सनाच्या आरंभास ह्या प्रदेशावर गुप्त, नाग, व कच्छवाह इत्यादि वंशांचे राजे राज्य करीत होते. पुढें कांहीं दिवस तो प्रांत कनोजच्या रजपूत राजांच्या ताब्यांत् होता. नवव्या शतकाच्या सुमारास चंडेल नांवाचें रजपूत घराणें बुंदेलखंडावर राज्य करीत होतें. त्याची राजधानी महोबा शहर होती. इ. स. ११८३ मध्यें दिल्लीचा राजा पृथ्वीराज चव्हाण ह्यानें परमल नामक चंडेल राजावर स्वारी करून बुंदेलखंडावर आपला अंमल बसविला. पुढें हिंदुस्थानांत मुसलमानांचा अंमल सुरू झाला, तेव्हां बुंदेलखंडांतील काल्पी, कलिंजर, चंदेरी वगैरे मजबूद किल्ले त्यांनीं अनेक वेळा काबीज केले; आणि अनेक वेळां ते त्यांच्या हातांतून गेले. आरंभीं गुलाम सुलतान कुतुबुद्दीन, अल्तमश, नासिरुद्दीन महंमूद, इत्यादि पुरुषांनीं सर्व बुंदेलखंड हळूहळू आपल्या ताब्यांत आणिलें. ह्या प्रांतास बुंदेलखंड हें नांव काशी येथील कोणी एका सूर्यवंशी पंचम नामक राजानें दिलें असें सांगतात. पदभ्रष्ट झाल्यामुळें बुंदेलखंडांत येऊन महोबा येथें त्यानें स्वतंत्र राज्याची स्थापना केली. त्याच्याच वंशांत पुढें रुद्रप्रताप म्हणून एक पराक्रमी पुरुष झाला. त्यानें ओर्छी येथें नवीन शहर वसवून बुंदेल्यांच्या कुलास विशेष महत्त्व आणिलें. रुद्रप्रताप राजास बारा पुत्र झाले, ते सर्व एकापेक्षां एक पराक्रमी निघाले. सांप्रत बुंदेलखंडांत जीं लहान मोटीं राज्यें आहेत, तीं सर्व ह्या द्वादश पुरुषांचाच विस्तार होत. रुद्रप्रतापाचा वडील मुलगा राजा भारतीचंद हा इसवी सन १५७४त मरण पावला आणि त्याचा भाऊ

---

* रा. पारसनीस यांच्या ' बुंदेलखंड प्रकरण ' नामक पुस्तकांतून.

मधुकरसा हा गादीवर अधिष्ठित झाला. त्या वेळेस दिल्लीस अकबर बादशहा राज्य करीत होता. अकबराचा सरदार सय्यद महंमद बडा हा बुंदेलखंडाच्या कारभारावर होता. बुंदेले राजे आपला मुलूख बादशहाच्या ताब्यांतून सोडविण्यासाठीं एकसारखे झटत असल्यामुळें अकबरास त्यांजबरोबर युद्ध करावें लागलें. सन १५७८ सालीं गडमंडळचा सुभेदार सादतखान व दुसरे सरदार यांच्या हाताखालीं सैन्य देऊन अकबरानें ओर्छावर पाठविलें. पुढें उभयतांच्या अनेक चकमकी झडून राजा मधुकरसा अकबरास शरण गेला. बादशहानें त्याजकडे त्याचें राज्य चालू ठेविलें. मधुकरसा सन १५९३ त मरण पावला. नंतर त्याचा मुलगा रामचंद्रसा गादीवर बसला. १६०६ सालीं जहांगीर बादशहानें रामचंद्रसा यास गादीवरून काढून ओर्छाचें राज्य त्याचा धाकटा भाऊ वीरसिंहदेव यास दिलें. परंतु रामचंद्रसा याजवर जहांगीरची पुढें बहाल मर्जी होऊन त्याच्या एका कन्येशीं बादशहानें लग्न केलें. रामचंद्रसा चंदेरी येथें राज्य स्थापन करून सन १६१२ त मृत्यु पावला. वीरसिंहदेव हा आरंभापासूनच शहाजादा सलीम यास मिळून होता, सन १६०२ या वर्षी सलीमनें बापाविरुद्ध बंड केलें, त्यांत त्यास ह्या वीरसिंहदेवाचें साहाय्य होतें वीरसिंहानेंच अबुल्-फज्ल् यास पकडून ठार मारिलें. ह्याच कामगिरीबद्दल बुंदेलखंडचें राज्य जहांगीरनें वीरसिंहास दिलें. वीरसिंहाचा चुलतभाऊ चंपतराय हा महोबा येथें राज्य करीत होता. जहांगीर बादशहा मरण पावला, तेव्हां सर्व बुंदेले राजांनीं एकत्र होऊन दिल्लीपतीचें सार्वभौमत्व झुगारून देण्याची खटपट चालविली. शहाजहाननें बाकीखान नामक सरदार त्यांजवर पाठविला. परंतु चंपतरायानें अद्वितीय पराक्रम करून बादशाही फौजेस परत लाविलें. ह्या प्रसंगीं चंपतरायाचा मुलगा सर्वाहन बाकीखानाशीं लढतांना धारातीर्थी पतन पावला. पुढें शहाजहाननें बुंदेलखंड जिंकण्यास हरप्रयत्न केले, पण ते सिद्धीस गेले नाहींत, तेव्हां ज्यास्तच त्वेष येऊन आग्र्याहून महाबतखान, दक्षिणेंतून खानजहान लोदी, आणि अलाहबादेहून अब्दुल्ला ह्या तिघांस बुंदेलखंडावर स्वारी करण्याचे त्यानें हुकूम पाठविले. परंतु शिवाजीच्या मावळ्यांप्रमाणें बुंदेले रजपुतांनीं डोंगराळ प्रदेशाचा आश्रय करून मोगली फौजेस जर्जर केलें. मी मी म्हणणारे मोठमोठे मुसलमान योद्धे

पतन पावले. शेवटीं शहाजहाननें कंटाळून बुंदेले राजांबरोबर तह केला; वीरसिंहदेवाचा मुलगा पहारसिंह यास ओर्छाचा राजा कबूल केलें; आणि चंपतरायास कुंच परगणा जहागीर देऊन त्यास आपल्या उमरावांत जागा दिली. पहारसिंहाचें व चंपतरायाचें पुढें वांकडें आलें. दारानें पहारसिंहाचा पक्ष घेतला, तेव्हां औरंगजेबानें चंपतरायास आपणाकडे बोलाविलें. सामूगड येथील लढाईंत चंपतरायानें अद्वितीय पराक्रम केला. या उपकाराबद्दल औरंगजेबानें बादशहा झाल्यावर त्यास बारा हजार स्वारांची मनसब देऊन श्रेष्ठ प्रतीच्या उमरावांमध्यें त्याची अग्रस्थानीं योजना केली. परंतु औरंगजेबाच्या कपटी स्वभावास ह्या वीर्यशाली बुंदेले सरदारांचा प्रभाव रुचला नाहीं. लवकरच कांहीं तरी कारण काढून चंपतरायाचा त्यानें अपमान केला आणि त्यास आपल्या जवळून काढून दिलें. ह्या अपमानाचा सूड घेण्याचा विचार करून चंपतराय बुंदेलखंडांत परत आला. तेथें फौजेची जमवाजमव करीत असतां त्याजवर औरंगजेबानें स्वतः स्वारी केली, आणि नानातऱ्हेचा गृहभेद चालविला. चंपतराय स्वतःचा बचाव करीत जिवावर उदार होऊन यवन फौजेशीं लढत होता. सन १६६४त एका जंगलांतून जात असतां त्यास शत्रूंनीं गांठिलें; त्या प्रसंगीं तो महावीर आपला अद्वितीय पराक्रम दाखवून क्षात्रधर्माप्रमाणें धारातीर्थी मरण पावला.

महाराष्ट्राचे मराठे व मध्यहिंदुस्थानचे बुंदेले यांच्या या वेळच्या चरित्रक्रमांत एक प्रकारचें विलक्षण साम्य आहे. दोघेही स्वदेशस्वातंत्र्याकरितां जिवापाड मेहेनत करीत होते. चंपतराय व शहाजी भोसले या पुरुषांतही निकट साम्य दृग्गोचर होतें. एका गोष्टींत तर तें साम्य फारच मनोरम झालें आहे. ज्याप्रमाणें शहाजीच्या पोटीं स्वदेशाचा उद्धार करणारा शिवाजी जन्मला, त्याचप्रमाणें चंपतरायाचा मुलगा छत्रसाल यानें बुंदेले लोकांचें स्वातंत्र्य परत मिळविलें. हा छत्रसाल सन १६५०च्या सुमारास जन्मला. त्याचें लहानपणचें शिक्षण बहुतेक अंशीं शिवाजीसारखेंच होतें. पौराणिक कथा श्रवण करण्याचा त्यास विशेष नाद होता. बाप मरण पावल्यावर स्वदेशाचें स्वातंत्र्य स्थापन करण्यांत देह झिजविण्याचा त्यानें संकल्प केला, आणि तदनुसार तो सैन्य जमवूं लागला. त्याच सुमारास महाराष्ट्रांत शिवाजीनें जे

पराक्रम चालविले होते, त्यांचें वृत्त छत्रसालच्या कर्णीं पडून त्या महाराष्ट्र-वीरास भेटण्याची त्यास उत्कट इच्छा झाली; आणि प्रथम पत्रव्यवहार करून संकेत ठरल्याप्रमाणें अनेक संकटें सोसून राजा छत्रसालानें भीमानदीच्या कांठीं शिवाजीची मोठ्या प्रेमानें भेट घेतली. छत्रसालाचा उत्साह पाहून शिवाजीचें अंतःकरण आनंदानें भरून गेलें; आणि आपल्या मधुर वाणीनें त्यानें त्यास सुंदर उपदेश केला. त्यांत स्वातंत्र्य-प्रेमा कायम ठेवून यवनांचा संहार कसा करावा, याविषयीं शिवाजीनें त्यास परोपरी सांगितलें, आणि आपली तलवार बक्षिस देऊन मोठ्या सन्मानें त्यास मार्गस्थ केलें. ह्या दोघां वीर पुरुषांच्या भेटीचें भुखन-कवीनें सुरस वर्णन केलें आहे.

पुढें बुंदेलखंडचा मुसलमान सुभेदार फिदाईखान यास छत्रसालाचें पारिपत्य करण्याचा हुकूम औरंगजेबानें दिला. आरंभींच बुंदेले लोकांनीं फिदाईखानाचा पराभव करून चांगला विजय मिळविला. तेव्हां छत्र-सालाच्या गुणांची जिकडेतिकडे वाहवा होऊन पूर्वीं जे बुंदेले राजे मोगलांस मिळून होते, तेही त्यास येऊन मिळाले. छत्रसाल बादशाही मुलखांत लूटमार करून डोंगरी किल्ले सर करूं लागला. होतां होतां थोड्याच काळांत छत्रसालाची सत्ता पुष्कळ वाढली. औरंगजेबास हें वर्तमान कळतांच त्यानें बुंदेलखंड सर करण्याची कडेकोट तयारी केली, आणि रण-दुल्लाखान यास फौजेचा अधिपति नेमिलें. गडकोटा येथें उभयतांची निकराची लढाई होऊन रणदुल्लाखान पराभव पावून पळून गेला. तेव्हां बादशहास परमावधीचें दुःख झालें. बुंदेले लोक दिल्लीवर येतात कीं काय, अशी त्यास भीति पडली. पुनः त्यानें तुहव्वरखान नामक शूर व युक्तिवान सरदाराची बुंदेले लोकांवर रवानगी केली. पण त्याचाही पराजय होऊन तो परत गेला. या विजयाच्या योगानें छत्रसालाचें वैभव फारच वाढत चाललें. हळूहळू बुंदेलखंडांतले बहुतेक राजे त्यानें आपल्या ताब्यांत आणिले आणि सर्व बुंदेलखंडावर निष्कंटक सत्ता सुरू केली. आसपासचे मुसलमान सर-दारही त्यास करभार देऊं लागले. पुढें बादशहानें शेख अन्वरखान यास छत्रसालावर पाठविलें. पण त्याचीही इतकी दुर्दशा झाली, कीं छत्रसाल राजास शरण जाऊन सव्वालाख रुपये दंड भरून, त्यास आपली सुटका करून घेणें भाग पडलें. बादशहानें भरदरबारांत अन्वरखानाची निर्भत्सना

करून त्याचे सर्व मानमरातब काढून घेतले; आणि बुंदेले लोकांचें पारिपत्य करणारा एकही इसम आपणापाशीं नाहीं, याबद्दल अत्यंत खेदसूचक भाषण दरबारांत केलें. त्या वेळीं मीर्झा सदरुद्दीन नामक उमराव पुढें झाला; आणि बादशहानें सांगितलेलें काम तडीस नेण्याचें त्यानें पत्करिलें. औरंगजेबानेंही छत्रसालास ताब्यांत आणण्याचे अनेक हितमंत्र व कपटवाद त्यास सांगितले. परंतु अंततः त्याही सरदारास इतरांप्रमाणें अपमान सोसून परत यावें लागलें. त्याचप्रमाणें पुढें आणखी अनेक मुसलमान सरदार पराभव पावून हातटेंकीस आले. शेवटीं औरंगजेबाचा सरदार दिलेरखान यानें छत्रसालाबरोबर दोस्तीचा तह केला. मुसलमानांशीं छत्रसालचें युद्ध चालू असतां छत्रसाल राजाचा गुरु श्रीप्राणनाथप्रभु यानें त्यास वारंवार प्रोत्साहन व आशीर्वचनें देऊन बुंदेल्यांच्या मनांत आवेश उत्पन्न केला. स. १७०७ त औरंगजेब बादशहा मरण पावल्यावर त्याचा पुत्र बहादूरशहा यानें छत्रसालाचें स्वातंत्र्य कबूल करून त्याची अनेक प्रसंगीं मदत घेतली. इकडे छत्रसालानें सर्व बुंदेलखंड काबीज करून व खुद्द दिल्लीदरबारावर आपली छाप बसवून पन्ना येथें स्वतंत्र रीतीनें राज्यकारभार चालू केला. ह्यापुढें छत्रसालाचा मोगलांशीं विशेष संबंध घडला नाहीं. छत्रसालाच्याच मार्फतीनें मराठ्यांचा बुंदेलखंडांत प्रवेश झाला. ती हकीकत मराठ्यांचे भागांत येईल. बुंदेल्यांचा इतिहास बऱ्याच अंशीं मराठ्यांचे इतिहासाशीं मिळता आहे.

४. **जनानखान्यांतील मसलती.**—ह्या कारकिर्दीच्या प्रथम भागांतील एक महत्त्वाचें वर्ष म्हटलें म्हणजे स. १६६२ हें होय. त्या वर्षी औरंगजेबास जबरदस्त दुखणें लागलें, (ता. १२ मे–२४ जून). त्या दुखण्यांत तो शुद्धीवर नव्हता. त्याची बहीण रौशन-आरा हिची त्याजवर सर्वतोपरी देखरेख असे. बाहेर तार्तार बायांचा कडक पहारा असे. ह्या दुखण्याची हकीकत इतकी गुप्त ठेवण्यांत आली, कीं बादशहा मरण पावला अशीच पुष्कळांची समजूत झाली. प्रत्यक्ष त्याच्या बायकांसही बादशहाची भेट घेतां येईनाशी झाली. अलीकडे रौशन-आराचें महत्त्व फार वाढलें होतें. सर्व जनानखाना तिच्या ताब्यांत होता. तिनेंच औरंगजेबास राज्य प्राप्त करून देण्यास विशेष मदत केली असल्यामुळें, औरंगजेब तिचें म्हणणें कधीं मोडीत नसे. औरंगजेब आतां जगत नाहीं

असें तीस वाटल्यावरून, पुढें आपलें महत्त्व कायम राखण्याचा उद्योग तिनें आरंभिला. औरंगजेबाचा वडील मुलगा सुलतान मुअज्जम हा रजपूत राणीच्या पोटचा असून १९ वर्षांचा होता. दुसरा मुलगा अजीमशहा हा मुसलमान राणीच्या पोटचा असून केवळ सहा वर्षांचा अल्पवयस्क होता. या लहान मुलास तख्तावर बसविलें म्हणजे आपली सत्ता कायम राहील असें रौशन-आरा हिला वाटलें. तदनुसार तिनें राज्यांतील सर्व अमीर उमरावांस शेंकडों पत्रें लिहिलीं. औरंगजेबाच्या बोटांत राहणारी आंगठी काढून घेऊन तिनें ती प्रत्येक पत्रावर मोर्तब करी. ह्या बेताची थोडीबहुत कुणकुण इतर बायांच्या कानावर गेली. वडील राणी रजपूत होती, तरी तीच पट्टराणी असून औरंगजेबापाशीं तिचें वजन कांहीं कमी नव्हतें. तिच्यासाठीं हिंदु चालींच्या देवपूजेच्या अनेक गोष्टी औरंगजेब स्वतः करीत असे. तेव्हां नवरा जिवंत आहे कीं नाहीं, ह्याचा पूर्ण तपास करण्याच्या इराद्यानें, तिनें पहारेकरी बायांस पैसे भरून बादशहाच्या खोलींत प्रवेश केला. तेव्हां तो जिवंत आहे, पण आपणास ओळखीत नाहीं असें तीस आढळलें. इतक्यांत राणी आंत आल्याची वार्ता रौशन-आराला लागून ती वाघिणीसारखी चवताळून राणीच्या अंगावर गेली. तिला क्रूरपणानें ताडन करून तिनें बादशहाच्या खोलींतून राणीला हुसकून दिलें. हा अपमान त्या राणीस कसा सहन होणार! तिनें ती हकीकत आपल्या मुलास कळविली. तेव्हां रौशन-आराचे बेत मोडून काढण्याची त्यानें खटपट चालविली. राजा जयसिंह ह्या वेळेस दिल्लींत होता मनांत आलें तर एखादी गोष्ट तडीस नेण्याची शक्ति ह्या बलाढ्य रजपूत राजाच्याच अंगीं होती. त्याजकडे मुअज्जम जाऊन सांगूं लागला, कीं 'औरंगजेब मरण पावला आहे. अशा प्रसंगीं बंधूंचा वध करून राज्य मिळविण्याची माझी इच्छा नाहीं. मी शहाजहानास सुद्धां परत गादीवर आणण्यास तयार आहें.' हें ऐकून जयसिंहानें वरकरणीं त्याचें बोलणें मान्य केलें. 'मी मदत करण्यास तयार आहें, शहाजहानास सोडविणें चांगलें नाहीं,' इत्यादि गोष्टी सांगून औरंगजेबाच्या मृत्यूची खरी वार्ता कळेपर्यंत तो कोणाच्याच पक्षास उघडपणें मिळेना. औरंगजेबाची त्यास मोठी दहशत पडली होती. राजवाड्यांतील नोकरांस पैसे भरून खरें वृत्त समजून

घेण्याचे त्यानें नाना यत्न केले. शेवटीं त्याला असें खास कळलें, कीं औरंगजेब जिवंत आहे. तेव्हां प्रस्तुत प्रसंगीं हालचाल करण्यास तो धजेना. ह्या प्रसंगीं राज्यांत बंडें झालीं नाहींत हेंच मोठें आश्चर्य होय. औरंगजेबाचा धाकच सर्व लोकांस दाबांत ठेवीत होता. शेवटीं त्याची तब्यत हळूहळू सुधरत चालली. तसा प्रथम तो राजा जयसिंह व इतर सरदारांस भेटला; तेव्हां त्यांच्या मनांतील संशयाची निवृत्ति झाली. लौकरच औरंगेबास आपल्या बोटांतील अंगठीची आठवण झाली. बहिणीनें त्यास सांगितलें, कीं ती बोटांतून गळून पडली. ह्या उत्तरानें त्याच्या मनांत जबर संशय उत्पन्न होऊन, योग्य संधि येतांच त्याचा निकाल करण्याचा त्यानें आपल्या मनांत निश्चय केला. कांहीं दिवसांनीं भरदरबारांत येऊन बसण्याइतकी बादशहास शक्ति आली. आपण सर्वांच्या दृष्टीस पडण्याच्या हेतूनें वाटेल त्यानें दरबारास यावें अशी द्वाही त्यानें फिरविली. तेव्हां सर्व शहर त्यास पाहण्यास लोटलें त्या वेळीं सर्वांसमक्ष आपणास जीवदान दिल्याबद्दल ईश्वराचे आभार मानून त्यानें अशी कांहीं धार्मिक वृत्ति धारण केली, कीं त्यायोगें सर्व लोकांचें समाधान झालें. ह्या प्रसंगीं मुसलमानांवरील कित्येक कर त्यानें माफ केले. येणेंकरून त्यानें हिंदूंचीं मनें दुखविलीं. पुढें जो त्यानें त्यांचा छळ आरंभिला, त्याची ही केवळ सुरुवात होय.

हळूहळू आपल्या बहिणीविषयीं औरंगजेबास संशय येऊं लागला. आजपर्यंत रौशन-आरानें आपल्या उद्दामपणानें जनानखान्यांतील बहुतेकांचीं मनें दुखविलीं होतीं. बादशहाच्या मनांतील तिजबद्दचा किंतु त्यांस व्यक्त होतांच, तिच्याबद्दल नानातऱ्हेच्या कागाळ्या बादशहाच्या कानावर जाऊं लागल्या. आपण आजारी पडल्यावर तिनें काय काय खटपटी केल्या, आपली दहशत लोकांस नसती तर सर्व राज्यांत दंगा उसळण्याचा प्रसंग कसा येऊन ठेपला होता, इत्यादि अनुमानें बादशहास सहज काढितां आलीं. रागानें तो अगदीं वेडा होऊन गेला. तरी पण आपल्या मनांतील संशय झांकून तो रौशन-आराविषयीं आपली इतराजी जपून दाखवूं लागला. रजपूत राणीचें वजन त्यानें वाढविलें; आपल्या दुखण्यामध्यें तिनें दाखविलेल्या कळकळीबद्दल तिची प्रशंसा करून तीस नवीन किताब दिले. रौशन-आराला हें न खपून तिनें एका स्वतंत्र

वाड्यांत जाऊन राहण्याची परवानगी मागितली. ' तुझ्याशिवाय माझ्या लहान मुलींचें शिक्षण तडीस जाणार नाहीं, ' अशी थाप देऊन त्यानें तीस दूर जाऊं दिलें नाहीं. औरंगजेबास एकंदर मुलें किती होतीं, तीं एकदां समजलीं म्हणजे पुढील हकीकत समजण्यास अडचण पडणार नाहीं, सबब त्यांची नांवनिशी येथें देतों.

औरंगजेबाचीं बायकामुलें.—पहिली बायको–दिलरास बानू. हिला बेगम अशी संज्ञा होती. ती औरंगाबाद येथें ता. ८ ऑक्टोबर १६५७ रोजीं बाळंतरोगानें मरण पावली. औरंगाबादेस तिची कबर आहे. ती बरीच हट्टी व उद्दाम होती. नवरा तिला भिऊन असे. मुलें—१ झेबुन्निसा, जन्म दौलताबाद, ता. १५ फेब्रुवारी १६३८; मृत्यु, दिल्ली ता. २६ मे, १७०२; अविवाहित. ती हुशार व शिकलेली होती. तिला शिकविण्यास एक विद्वान् बाई ठेविलेली होती. तिनें सर्व कुराण तोंडपाठ म्हणून दाखविलें तेव्हां औरंगजेबाला फार आनंद होऊन, त्यानें तिला तीस हजार मोहोरा बक्षीस दिल्या. तिला आरबी व फारशी भाषा चांगल्या येत होत्या. तिचा पुस्तकसंग्रह फार मोठा होता. औरंगजेबास कवितेची आवड नसल्यामुळें, कवींचा व विद्वानांचा बंद पडलेला आश्रय, तिनें आपल्या पैशांतून चालू ठेविला. २ झीनतुन्निसा ऊर्फ पादशहाबेगम, जन्म औरंगाबाद ता. ५ ऑक्टोबर १६४३, अविवाहित; बापाच्या दक्षिणच्या स्वारींत त्याच्या बरोबर राहून ती त्याची सर्व खासगी व्यवस्था पाहत असे. तिनें दानधर्म पुष्कळ केला. बापानंतर ती पुष्कळ वर्षें जिवंत होती, तेव्हां जुन्या काळची म्हातारी असें तिला म्हणत. ३ झुब्दतुन्निसा, जन्म मुलतान, ता. २ सेप्टेंबर १६५१; लग्न ता. ३० जानेवारी १६७३, दारा शेखोचा मुलगा सिपिर शेखो याजबरोबर; मृत्यु फेब्रुवारी १७०७. ४ महंमद अजम, जन्म बऱ्हाणपूर, ता. २८ जून १६५३, मृत्यु, लढाईत ता. ८ जून १७०७. ५ महंमद अकबर, जन्म औरंगाबाद, ता. ११ सेप्टेंबर १६५७, मृत्यु इराणांत नोव्हेंबर १७०४.

दुसरी बायको.—रहमतुन्निसा ऊर्फ नबाबबाई, काश्मिरांतील रजपूत राजा राजू याची मुलगी. शहाजहाननें तिला तिच्या बापापासून मागून घेतलें. औरंगाबादचा बाईजीपुरा इच्या नांवानें वसलेला आहे. तिचें व नवऱ्याचें पटलें नाहीं. शेवटीं पुष्कळ वर्षें ती नवऱ्या-

पासून दूर राहून १६९१ त दिल्लीस मरण पावली. मुलें, ६ महंमद सुलतान, जन्म मथुरा ता. १९ डिसेंबर १६३९, कैदेंत असतां मृत्यु, डिसेंबर १६७७. ७ महंमद मुअज्जम ऊर्फ शहा आलम, हा बहादूरशहा या नांवानें बादशहा झाला; जन्म बऱ्हाणपूर ता. ४ ऑक्टोबर १६४३; मृत्यु ता. १२ फेब्रुवारी १७१२. ८ बद्रुन्निसा, जन्म ता. १७ नोव्हेंबर १६४७; अविवाहित, मृत्यु ता. ९ एप्रिल १६७०.

तिसरी बायको.—औरंगाबादी महल ही सन १६८८च्या नोव्हेंबरांत विजापूर येथें प्लेगनें वारली. एक मुलगी झाली, ९ मिह्रुन्निसा, जन्म १८ सेप्टेंबर १६६१, लग्न मुरादचा मुलगा इझतबक्ष याजबरोबर, ता. २७ नोव्हेंबर १६७२; मृत्यु जून १७०६.

चौथी बायको.—उदेपुरी ही बादशहाची फार आवडती असून मरणसमयीं शुश्रूषा करीत जवळ होती. हिला मुलगा एक १० कामबक्ष, जन्म दिल्ली ता. २४ फेब्रुवारी १६६७, मृत्यु लढाईत ता. ३ जानेवारी १७०९. ती मद्यप्राशन करी तें सुद्धां बादशहा सहन करीत असे.

मोगल घराण्यांतील जनानखान्यांत राजकन्यांचें माहात्म्य केवढें असे, हें मागील कार्किर्दीवरून कळून आलेंच असेल. त्यांचीं लग्नें होण्यास मारामार पडे. रजपूत राण्यांच्या पोटच्या मुली असत, त्यांचीं रजपूत राजपुत्रांशीं केव्हां केव्हां लग्नें होत;* परंतु इतर मुली योग्य वर न मिळाल्यानें आजन्म अविवाहित राहत. तरी त्यांचें वर्तन नेहमींच पवित्र असे असें नाहीं. शहाजहानच्या दोघी मुलींसंबंधीं अनाचाराची बोलवा जगजाहीर होती. प्रस्तुत जहान्-आरा बापाजवळ आग्र्यास राहत होती, आणि रौशन-आरा दिल्लीस बादशहाच्या जनानखान्याची मुख्य व्य-

---

* बादशहाच्या मुली रजपुतांस देत नसत असें मागें एकवार सांगण्यांत आलें आहे. फादर काटूनें असें लिहिलें आहे, कीं एका रजपूत राणीपासून झालेली शहाजहानची मुलगी जशवंतसिंहास दिली होती. यामुळेंच जशवंतसिंहानें औरंगजेबास साह्य केलें नाहीं. आपल्या मुली काफर हिंदूंस देणें मुसलमानांस आवडत नसल्यामुळें, मुसलमान इतिहासकारांनीं ह्या गोष्टीचा कोठेंही उल्लेख केलेला दिसत नाहीं.

वस्थापक होती. बादशहाची तिजवर गैरमर्जी दिसतांच तिच्या दुराचाराचे प्रकार त्याच्या कानावर गेले. इराणी राणीच्या पोटच्या मुली होत्या, त्यांचीं त्या राणीनें खटपट करून दारा व मुराद यांच्या मुलांशीं लग्नें करून दिलीं. परंतु सर्वांत वडील मुलगी झेबुन्निसा ही फार खटपटी होती. आरंभीं तिचें रौशन-आराशीं सख्य होतें; पण पुढें जनानखान्यांत राहून रौशन-आराचें वजन नाहींसें करण्याची तिनें खटपट चालविली. रौशन-आराचे जे कोणी प्रियकर पुरुष होते, त्यांची तिनें हळूहळू वाट लाविली. शेवटीं रौशन-आराचाही तशाच प्रकारें अंत झाला. कोणी म्हणतात कीं, तिचा अंत विषप्रयोगानें झाला. तेव्हांपासून झेबुन्निसा जनानखान्यांत मुखत्यारीण झाली. तिचें बादशहावर असलेलें वजन सर्व राज्यांत लवकरच लोकांस कळून येऊं लागलें. औरंगजेब चांगला बरा झाला नव्हता. म्हणून काश्मिरास चांगल्या हवेवर जाण्याविषयीं मुलीनें त्याजला टोंचणी लाविली. आपण बादशहाबरोबर स्वारींत राज्यांतील ठिकठिकाणीं जाऊन प्रांतोप्रांतीं आपलें वजन लोकांच्या नजरेस आणावें असा विशेष हेतु होता. वैद्यांचेंही काश्मिरास जाण्यास अनुमोदन मिळालें, शेवटीं बादशहानें आपला रुकार दिला. स्वारीचा दिवस नक्की झाला. जिकडे तिकडे स्वारीची तयारी जारीनें सुरू झाली. परंतु औरंगजेबास चैन पडेना. बाप आग्र्यास आहे, तोंपर्यंत आपण दूर गेल्यास रजपूत व शियापंथी लोक त्यास तख्तावर बसवून आपला घात करतील असें त्याचें मन त्यास खाई. इतबारखान नामक आपल्या विश्वासाच्या सरदारास शहाजहानचे बंदोबस्तासाठीं त्यानें आग्र्यास ठेविलेलें होतें. औरंगजेब आजारी असतां बापाचा बंदोबस्त उत्तम ठेवण्याविषयीं तो इतबारखानास वारंवार पत्रें पाठवीत असे. काश्मिरास जाण्याची तयारी होत असतां, इराणचा सूफी व शियापंथी शहा दुसरा अब्बास याजकडून पत्रें घेऊन वकील आले. शहा अब्बासनें औरंगजेबास लिहिलें, कीं 'शहाजहानची एकदम सुटका करावी, नाहीं तर आम्ही लढाईस येऊं.' तेव्हां दिल्लीस राहवें तर खराब हवेनें मरण येणार, काश्मिरास जावें तर मागें काय होईल याची शाश्वती नाहीं, अशा विवंचनेंत औरंगजेब पडला. पण त्याच्या पाषाणहृदयास युक्ति सुचण्यास विलंब लागणारा नव्हता. बापासच नाहींसें करावें म्हणजे सर्व

न्याय मिटेल, असें त्याच्या मनांत आलें. प्रसंगच तसा आहे म्हणून, असें घोर पातक आचरणें या प्रसंगीं अनुचित नाहीं, अशा समजुतीवर हा विचार त्यानें आपल्या मुलीस कळविला. ह्या राक्षसी कल्पनेनें तिचें अंतःकरण एकदम विदारल्यासारखें झालें. आत्याबाईची लंबे करण्यांत तिनें पुढाकार घेतला होता, तरी आपल्या वयोवृद्ध व निरपराधी आजोबाची अशी अवस्था व्हावी, हा विचार तिच्या मनास टोंचून खाऊं लागला. 'आजोबाविषयीं तुम्ही बेफिकीर राहा,' असें परोपरी तिनें आपल्या बापास सांगितलें, पण औरंगजेबाची खात्री पटेना. इतक्यांत आग्र्यास शहाजहान व इतबारखान ह्यांची भांडाभांडी होऊन इतबारखानास त्या वृद्ध बादशहानें जोड्यानें मारिलें. इतबारखानानें बादशहास पकडण्याचा हुकूम केला, पण शिपायांनीं तो मानिला नाहीं. ही हकीकत समजल्यावर औरंगजेबानें शहाजहानच्या वैद्यामार्फत बापास मारण्याकरितां विष पाठविलें. वैद्य राजघराण्यांतील पुरातनचा नोकर होता, त्याच्यानें हें काम होईना. तेव्हां आपणच तें विष खाऊन तो वैद्य मरून गेला. इकडे औरंगजेब स. १६६३ ता. २३ एप्रिल रोजीं काश्मिरास गेला, तो चार महिन्यांनीं ता. २९ सेप्टेंबरांत परत आला. काश्मीरच्या हवेनें त्याच्या प्रकृतीस उत्तम आराम वाटला. स. १६६६च्या जानेवारी महिन्यांत शहाजहान मरण पावला. तो कसा मरण पावला हें बरोबर समजत नाहीं. पण विषप्रयोग झाला नाहीं असें मानण्यास चांगला आधार आहे. बाप मरण पावल्यामुळें औरंगजेब निर्धास्त झाला एवढी मात्र गोष्ट खरी. औरंगजेबानें बापास ताजमहालांत नेऊन पुरिलें, आणि त्याचें उत्तरकार्य त्याच्या इतमामास शोभेल अशा समारंभानें केलें. इराणचा शहा अब्बास ह्याच्या मनांत औरंगजेबानें बापाचा खून केला असावा असा संशय आला.

जनानखान्यांतील आणखी एक गोष्ट सांगावयाची आहे. तुर्कस्थानांतील एक क्रिस्ती बाई दारापाशीं होती. लहान असतांच एका व्यापाऱ्यानें तीस आणून गुलाम म्हणून दारास विकिलें. ती फार रूपवती असल्यामुळें दाराची तिजवर अत्यंत मर्जी होती, कदाचित् तिच्याच संगतीनें दाराची क्रिस्तीधर्माकडे प्रवृत्ति झाली असेल. दाराचा वध झाला तेव्हां त्याच्या दोन आवडत्या बायकांस औरंगजेबानें आपणाकडे घेतलें.

कुराणांतील नियमाप्रमाणें भावाच्या विधवा स्त्रियांशीं लग्न करणें हें आपलें कर्तव्य आहे, असें त्यानें त्या वेळीं लोकांस कळविलें; परंतु त्यांतील एक बायको रजपूत होती, तिनें विष खाऊन प्राणत्याग केला. दुसरी ही क्रिस्तीबाई. तिचें नांव उदेपुरी. तिनें औरंगजेबास वरिलें; व पुढें ती त्याची अत्यंत आवडती बायको झाली. जनानखान्यांतील बाया नेहमीं बादशहास मोठमोठ्या मेजवान्या देत, त्या प्रसंगीं आपली मेजवानी उत्तम ठरविण्याबद्दल प्रत्येक बाई झटत असे. परंतु उदेपुरीची सर दुसऱ्या कोणास कधीं आली नाहीं. म्हणून दुसऱ्या बायका तिचा हेवा करून तिच्या नाशाची वाट पाहत होत्या. उदेपुरी क्रिस्ती असल्यामुळें तीस मद्यप्राशनाची मोकळीक असे. एकदां बादशहास ती अव्यवस्थित आढळली; पण तिचें रूप पाहून त्याच्या मनांतील क्रोध शांत झाला. त्या दिवसापासून जनानखान्यांत मद्य आणण्याची त्यानें सक्त मनाई केली. एकदां उदेपूरच्या राजाशीं युद्ध चालू असतां रजपुतांनीं उदेपुरीस पळवून नेलें. पण लवकरच तीस त्यांनीं परत दिलें. औरंगजेबाच्या मरणसमयीं दक्षिणचें राज्य कामबक्षास मिळावें म्हणून उदेपुरीनें पुष्कळ खटपट केली.

शिवाजी औरंगजेबाचे भेटीस गेला, ती भेट आग्रा येथें झाली, दिल्लीस झाली नाहीं. स. १६५८ त शहाजहान बादशहा आग्र्याच्या वाड्यांत कैद होऊन, तेथेंच स. १६६६ त वारला. तेवढ्या मुदतींत औरंगजेब आग्र्यास कधीं गेला नाहीं. बाप कांहीं तरी कारस्थान रचून आपणास दगा करील, अशी त्यास नेहमीं भीति वाटत असे. सन १६६६च्या ता. १५ फेब्रुवारीपासून ९ ऑक्टोबरपर्यंत तो आग्र्यास होता. आग्रा येथें तारीख २७ माहे मार्च रोजीं औरंगजेबाचा नववा राज्यारोहण समारंभ झाला, आणि १२ मे रोजीं त्याचा चांद्रमासी पंनासावा वाढदिवस होऊन सुवर्णतुला झाली, त्याचदिवशीं शिवाजी औरंगजेबाच्या भेटीस गेला. हा दरबार 'दिवाणी-आम' मध्यें झाला. शिवाजीनें दुरूनच बादशहास मुजरा केला, नंतर त्यास पंचहजारी मनसबदारांत जागा दाखविली तेव्हां संतापानें तो वेडा झाला. तें पाहून 'त्यास घरीं घेऊन जा,' असें बादशहानें रामसिंहास सुचविलें. त्याप्रमाणें रामसिंह शिवाजीस घेऊन यमुनेच्या कांठीं आपल्या बागेंतील बंगल्यांत गेला. हा बाग ताजमहाल व किल्ला यांच्या दरम्यान होता. शिवाजीबरोबर एकंदर चार पांचशें

माणसांचा जमाव होता. औरंगजेबाची व शिवाजीची एवढीच कायती दृष्टभेट झालेली आहे. प्रत्यक्ष बोलाचालीचा प्रसंगच आला नाहीं. अशा प्रकारची शिवाजीच्या भेटीची हकीकत फारसी ग्रंथांत सांपडते. ता. १९ ऑगस्ट १६६६ रोजीं शिवाजीनें आग्र्यांतून पलायन केलें.

५. **कार्किर्दींतील कांहीं युद्धप्रसंग.**—डाका हें बंगालच्या सुभेदाराचें राजधानीचें शहर होतें. पुढें आराकानच्या किनाऱ्यावर चित्तगांव हें ठिकाण असून तेथील 'माघ' नांवाचे दर्यावर्दी लोक चांचेपणाचा धंदा करून बंगालच्या किनाऱ्यानें मोगलराज्यांत फार दिवसांपासून उच्छेद करीत असत. त्यांसच पोर्तुगीझ वगैरे पाश्चात्य चांचे लोक जाऊन मिळत; आणि त्यांच्या जमावापुढें मोगलसुभेदारांचें कांहीं चालत नसे. अकबराच्या वेळेस बंगाल्यांत मोगल आरमार तयार करण्यांत आलें होतें, त्याची पुढें अव्यवस्था होऊन, शहाजहानच्या वेळेस वरील चांचे लोकांचा उपद्रव अतोनात वाढला. स. १६६४ त शाएस्तेखानाची नेमणूक बंगालच्या सुभ्यावर झाली. त्यानें डच व पोर्तुगीझ लोकांना चांचे लोकांच्या कटांतून फोडून, आपल्या ताब्यांत आणून योग्य मार्गास लाविलें. नंतर अतिशय मेहेनत करून त्यानें स्वतःचें एक मोठें आरमार बांधिलें. त्याकरितां जंगलांतून मोठमोठालीं झाडें तोडून आणविलीं. जहाजें बांधून झाल्यावर त्यांजवर अन्नसामुग्री व दारूगोळा ह्यांची उत्कृष्ट भरती केली. नंतर चित्तगांवपर्यंत रस्ता करून एक फौज पायरस्त्यानें व दुसरी आरमारानें अशा रीतीनें चांचे लोकांवर चाल करून त्यानें चित्तगांवचें ठाणें काबीज केलें आणि त्याचें नांव इस्लामाबाद ठेविलें, (जानेवारी १६६६). मोगलांच्या आरमारांत ह्या वेळीं लहान मोठीं २८८ जाहजें होतीं. शत्रूंचीं १३५ जहाजें मोगलांस मिळालीं. चित्तगांव काबीज केल्याचें वर्तमान ऐकून औरंगजेबास अतिशय आनंद झाला, आणि त्यानें सर्व अधिकाऱ्यांस बक्षिसें व बढत्या देऊन त्यांचा गौरव केला. (Journal of the A. S. Bengal, 1907).

काश्मिराहून परत आल्यावर सर्व राज्य सुरळीत चाललें आहे असें पाहून औरंगजेबास आनंद झाला. एकंदर मोगल बादशाही ह्या वेळेस अत्यंत भरभराटींत होती. तेव्हां अशा समयास इराणच्या शहाच्या धमकावणीकडे नजर देण्यास त्यास स्वस्थता मिळाली. औरंगजेबानें काश्मिरास जातांना

नबाब शाएस्तेखान, : पृ. ७०४.

कलकत्ता, व्हिक्टोरिया मेमोरियल हॉलच्या ट्रस्टींच्या परवानगीनें.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

मोठी फौज बरोबर घेतली होती, तेव्हां त्याचा कदाचित् इराणच्या प्रदेशावर स्वारी करण्याचा विचार असेल असें तेथच्या शहास वाटलें; आणि तदनुसार त्यानें कंदाहारचे आसपास आपली फौज जमविली. तेव्हां शहाकडे वकिलाबरोबर नजराणे पाठवून त्याचें समाधान करण्याचा औरंगजेबानें विचार केला. ह्या वकिलासंबंधानें त्या वेळेस चहूंकडे चळवळ सुरू झाली होती. शहा अब्बासनें या वकिलाचा अपमान केला. त्याचें संभाषण त्यानें ऐकून घेतलें नाहीं. औरंगजेबानें पाठविलेले नजराणे स्वतः न घेतां त्यानें दरबारच्या मंडळींस वांटून टाकिले. औरंगजेबाचा ढोंगीपणा व पितृहत्या यांजविषयीं त्यानें उघडपणें औरंगजेबाची निर्भर्त्सना केली; आणि आपल्या नाण्यांवर ' आलमगीर ' हीं अक्षरें दाखल केल्याबद्दल त्याची थट्टा केली. शेवटच्या भेटीस तर शहाच्या एका नोकरानें वकिलाच्या दाढीस आग लाविली; आणि ' हिंमत असेल तर काबुलावर येऊन युद्ध करा, ' असा निरोप सांगून शहानें वकिलास रजा दिली. वकील परत आला, तेव्हां औरंगजेब फार खट्टू झाला. अगोदरच हातीं सांपडलेला शिवाजी सुटून जाऊन मराठे लोक त्यास भारी झाले होते. त्यांत ही शहानें मानहानि केली. मग काय विचारतां ! औरंगजेब वकिलास बोलला, 'तुम्हीं शहाचा तेथच्या तेथें खून कां नाहीं केला ? ' असें म्हणून त्याच वेळेस वकिलास सर्पदंश करून त्यानें ठार मारविलें. तिकडे शहा अब्बासनें म्हटल्याप्रमाणें केलें. उत्तम फौज बरोबर घेऊन तो लगेच अफगाणिस्तानांत आला. औरंगजेब अंतर्यामीं घाबरला, तरी बाहेरून त्यानें फौजेची तयारी चालविली. इतक्यांत शहा अब्बास एकाएकीं आजारी होऊन मरण पावला. त्यामुळें औरंगजेबावरचें संकट टळलें. परंतु अफगाण लोकांनीं बंडें चालविलीं. मोगलांचा सुभेदार पेशावर येथें राहत असे. शहा अब्बास तिकडे आला, तेव्हां सर्व अफगाण लोक त्यास मिळण्यास तयार झाले होते. शहा अब्बास मरण पावल्यावर सन १६६७ त मीर-जुम्ला याचा मुलगा महंमद अमीरखान यास औरंगजेबानें काबूलचा सुभेदार नेमून अफगाण लोकांचा बंदोबस्त करण्यास पाठविलें. अमीरखान मोठी फौज घेऊन पेशावर सोडून काबुलावर गेला. तेव्हां अफगाण लोक पहाडी प्रदेशांत पळून गेले. त्यांचा पाठलाग अमीर-

४५-९-११--१०-७९१-२०००

खानाच्यानें होईना. त्यानें आपला जनानखाना बरोबर नेला होता. पुढें धान्याचा तोटा पडल्यामुळें तो पेशावरास परत येऊं लागला. इतक्यांत अफगाण लोक खैबरघाटांत त्यास अडविण्यास आले; आणि एका रात्रीं अमीरखानाची सर्व फौज खिंडींत सांपडली असतां, हातांत शस्त्रें घेऊन विलक्षण आरोळ्या ठोकीत अफगाण लोकांनीं त्यांजवर छापा घातला. अमीरखानानें एका साधूस पुढें करून समेट करण्यास सांगितलें; परंतु त्या मदांध रानटी लोकांनीं त्या साधूचाही खून केला. पुढें अमीरखानावर येऊन ते त्याचा खून करणार, इतक्यांत तो हत्तीवरून खालीं आला; आणि अफगाणांस कापीत त्यांचा पोशाख घालून अंधारांतून पळून गेला. त्याच्या बायकोचे अफगाणांनीं तुकडे केले, आणि बहीण, आई व मुलगी यांस पळवून नेलें. ही मुलगी बादशहाचा मुलगा अकबर यास देऊं केली होती. तिची पुढें सुटका झाली, पण तिला बादशहानें पत्करिलें नाहीं. अमीरखानाचा बादशहानें अपमान केला; आणि त्यास परत बोलावून महाबतखानास काबूलच्या सुभ्यावर पाठविलें. महाबतखानास तिकडची पूर्वीपासून माहिती असल्यामुळें तो कांहीं दिवस पेशावर येथें स्वस्थ बसला. अफगाण लोकांनींही कांहीं हालचाल केली नाहीं. सन १६७२ त अफगाणिस्तानांत पुनः बंडावा झाला. शहाजादा सुजा आराकानांत मरण पावला अशी बातमी होती. परंतु सुजा नांवाचा एक तोतया अफगाणिस्तानांत उत्पन्न झाला. त्यानें आपल्या अनेक साहसाच्या गोष्टी लोकांस सांगून त्यांचीं मनें आपणाकडे वळविलीं. थोड्याच वेळांत त्याजपाशीं मोठी फौज जमा झाली. महाबतखानाची खात्री झाली, कीं हा खरोखरीचा सुजा आहे. तेव्हां त्याचा बंदोबस्त करण्याचा प्रयत्न त्यानें केला नाहीं. अखेरीस अफगाण लोकांचा बंडावा सर्व देशभर पसरला. त्यांनीं सुजास आपला राजा असें कबूल केलें. येणेंकरून हिंदुस्थानांतील मोगल सत्ता नाहींशी करून टाकून अफगाण अंमल पुनरपि हिंदुस्थानावर स्थापन करण्याचा त्यांचा विचार होता. ही वार्ता ऐकून औरंगजेबानें दक्षिणची व इतर ठिकाणची सर्व फौज जमवून, तिचें आधिपत्य स्वतः स्वीकारिलें, आणि अफगाणिस्तानावर चालून गेला. त्या वेळीं बसण्यास घोडा व हातांत भाला अशा स्वारीनिशीं तो अगदीं सज्ज गेला. हें युद्ध दोन

वर्षे चाललें. महाबतखानास त्यानें परत पाठविलें. रस्त्यांत तो जुना सरदार मरण पावला, (१६७२). तिकडे अफगाण लोक हटले नाहींत. पहाडी प्रदेशांतलि ह्या अफगाणांच्या अंगीं विलक्षण कुवत आहे, असें आजमितीसही दिसून येतें. इंग्रजांच्या जय्यत तयारीलाही ते हार गेले नाहींत, मग औरंगजेबाच्या मोगल फौजेस त्यांनीं त्राहित्राहि करून सोडिलें, यांत नवल नाहीं. शेवटीं औरंगजेबानें नेहमींचें कपटजाल पसरिलें. कासमखान नांवाच्या सरदारास अफगाणिस्तानांत ठेवून आपण परत आला. कासमखानानें सर्व कर वगैरे माफ करून लोकांस मोकळें सोडिलें, आणि बाह्यतः त्यांशीं अत्यंत स्नेहभाव दाखविला. बिनहत्यारी तो एकटा त्या लोकांत जाऊन मिसळे. परंतु सुजा त्याच्या हातीं लागेना. शेवटीं पेशावर येथें आपल्या वडील मुलाची सुंता करण्याचा मोठा समारंभ कासमखानानें केला. त्या प्रसंगीं सर्व मोठमोठ्या अफगाण सरदारांस त्यानें आपल्या येथें बोलाविलें. सर्व लोक आनंदानें आले. पण सुजा आला नाहीं. एके दिवशीं रात्रीं मेजवानी चालू असतां संकेत ठरल्याप्रमाणें कासमखान फळ कापतांना हात तुटलासें निमित्त करून निघून गेला, तोच इशारा समजून त्या समारंभांत एकदम कापाकापी सुरू झाली. कोणालाही सुटून जाण्यास अवधि मिळाली नाहीं. कासमनें शहरांत सुद्धां रस्तोरस्तीं उत्तम बंदोबस्त ठेविला होता. सुजाचें पुढें काय झालें तें कळलें नाहीं. *काबुलांत जिकडे तिकडे हाहाःकार उडाला. अफगाण लोक निमूटपणें ताब्यांत आले. सर्व कार्किर्दीत त्यांनीं पुनरपि बादशहास त्रास दिला नाहीं. कासमखानावर वरील कपटाबद्दल बादशहानें बाह्यतः इतराजी दाखविली. त्यास परत बोलावून कांहीं दिवस कामावरून काढिलें; परंतु पुनः लवकरच त्यास पहिल्या प्रतीचे मानमरातब दिले. अफगाणांची कत्तल करण्याचें काम बादशहाच्या विचारानें झालें असेल ह्यांत संशय नाहीं. कासमखानास परत बोलाविल्यावर जशवंतसिंहास बादशहानें काबूलचा सुभेदार नेमिलें. तो ह्यापूर्वी गुजराथचा सुभेदार होता. तेथून कदाचित् तो मराठ्यांस सामील होईल, अशा भीतीनें त्याची नेमणूक काबुलास करण्यांत आली.

६. हिंदूंचा छळ व रजपुतांशीं युद्ध, (१६६९–१६८१).— औरंगजेबानें आपली इतिकर्तव्यता इतकीच मानिली होती, कीं पूर्वी

मुसलमानी धर्माचा प्रसार करणारे जे मोठे पुरुष होऊन गेले, त्यांप्रमाणें आपणही आपली कीर्ति गाजवावी, आणि हिंदु धर्माचा पाडाव करून सर्व हिंदुस्थान देश मुसलमानमय करून टाकावा. पूर्वीच्या अफगाण राज्यकर्त्यांनीं असेच प्रयत्न केले, त्यांमुळें कांहीं एक फायदा झाला नाहीं असें पाहून, पुढील मोगल बादशहांनीं पहिला क्रम सोडून दिला, आणि धर्माच्या बाबतींत आपण हात घालावयाचा नाहीं, असा प्रघात चालविला. या पद्धतीनें एकंदर राज्याची भरभराट झाली हें मागील तीन-चार कार्किर्दींच्या इतिहासावरून व्यक्त झालेंच आहे. पण औरंगजेबास आपल्या वाडवडिलांची पद्धति पसंत पडली नाहीं. हातांत अधिकार आल्यापासून हिंदूंचा पाडाव करण्याचा त्याचा मनोदय होता. आरंभाचीं कित्येक वर्षें राज्यांत स्वस्थता करण्यांत गेलीं, आणि वास्तविकपणें इसवी सन १६६६ च्या सुमारास मोगल बादशाहीची सत्ता कळसास पोंचली होती. सर्व शत्रूंचा पाडाव झाला असून राज्यांत जिकडे तिकडे शांतता व भरभराट होती. पुढें सर्व बाजूंनीं आपण निर्भय झालों असें दिसतांच, औरंगजेब आपल्या अंतस्थ हेतूच्या खटपटीस लागला. ह्या कामीं त्यानें जे प्रमाद केले, त्यांच्या योगानें अंतीं अखिल बादशाहीचा लय झाला. औरंगजेबासारखे शहाणे व धोरणी पुरुष थोडेच सांपडतील; पण एखाद्या गोष्टीच्या हव्यास पेटल्यामुळें व मनाचा उदारपणा सोडून दुराग्रह धारण केल्यामुळें त्याची जी फजिती व दुर्दशा झाली, तिच्याशीं तुलना करण्यासारखें दुसरें उदाहरण हिंदुस्थानच्या इतिहासांत नाहीं. त्याचप्रमाणें औरंगजेबाच्या चरित्रासारखा दुःखद शेवट दुसऱ्या कोणाचाही झाला नसेल. औरंबाजेबाचे प्रमाद वरील हकीकतींत वारंवार स्पष्ट होत आहेत. त्यांचें बारकाईनें विवेचन करण्याची आवश्यकता नाहीं.

राज्यपदारूढ झाल्याबरोबर त्यानें कित्येक असंतोष उत्पन्न करणारीं कृत्यें केलीं, तीं मागें सांगण्यांत आलींच आहेत. सौरमानाचें वर्ष अकबरानें सुरू केलें होतें, तें अग्निपूजकांनीं शोधून काढिल्यामुळें अशास्त्र आहे, अशा सबबीवर औरंगजेबानें बंद करून चांद्रमान वर्षाची सुरुवात केली. पुढें दारूचे पिठे, जुवेबाज लोकांचे अड्डे, व मूर्तिपूजेच्या डामडौलाचें ढोंग ह्या गोष्टी बंद करण्याकरितां एक मुल्ला त्यानें नेमिला, आणि अंमलबजावणीकरितां त्याच्या हाताखालीं घोडेस्वारांची मदत दिली.

कवींसाठीं नेमणुका ठरलेल्या असत त्या त्यानें बंद केल्या. स. १६६८च्या सुमारास त्यानें बादशाही तवारीख म्हणजे बादशहाचीं दररोजचीं कृत्यें लिहिण्यासाठीं पगारदार नोकर असत, ते त्यानें काढून टाकिले, आणि अशा प्रकारची तवारीख लिहिण्याचें काम बंद केलें. ह्या तवारिखींत बादशहाचा प्रत्येक शब्द व त्याचें प्रत्येक कृत्य नमूद होत असे. परंतु आपलीं वाईट कृत्यें तींत यावीं हें औरंगजेबास न आवडून त्यानें तवारीख बंद केली असावी. असें करण्याचें कारण त्यानें स्वतः वेगळेंच दिलें आहे. 'मनुष्यांनीं परमेश्वराचीं कृत्यें लिहावीं, माझ्यासारख्या यःकश्चित् माणसाचीं कृत्यें त्यांनीं लिहिणें युक्त नाहीं,' असें तो म्हणे. तवारीख बंद झाल्यामुळें मोगल बादशाहीचा खरा इतिहास बंद पडला. पुढील हकीकत अदमासानें लिहिलेली सांपडते. खाफीखानानें जो उत्कृष्ट इतिहास लिहिला, तो बादशहा मरण पावल्यावर त्यानें बाहेर काढिला. सन १६६९ हें वर्ष हिंदूंच्या छलाचा खरा आरंभ होय. त्या वर्षी त्यास विशेषतः अशी खबर लागली, कीं बनारस व इतर ठिकाणचे ब्राह्मण आपला धर्म मुसलमानांसही शिकवीत आहेत. हिंदूंचा छळ करण्यास हें निमित्त त्यास आयतेंच सांपडलें. लगेच त्यानें बनारस येथील हिंदुधर्माध्यक्षाची नेमणूक बंद करून स. १६६९ च्या एप्रिलांत सर्व राज्यांत असा सक्तीचा हुकूम फर्माविला कीं, हिंदूंच्या पाठशाळा, मठ, देवालयें वगैरे सर्व जमीनदोस्त करावीं. औरंगजेबाची तीनचतुर्थांश प्रजा हिंदु असल्यामुळें वरील हुकूम अमलांत आणणें किती अवघड होतें हें सांगणें नको. काशी येथील विश्वनाथाचें मंदिर सेप्टेंबरांत जमीनदोस्त झालें. तसेंच बुंदेला राजा नरसिंहदेव यानें मथुरा येथें तेहतीस लाख रुपये खर्चून केशवाचें भव्य मंदिर बांधिलें होतें, तें स. १६७० च्या जानेवारींत पाडून त्या ठिकाणीं मशीद बांधिली. शिवाय इतर मोठमोठ्या ठिकाणचीं देवालयें मोडून तेथील मूर्ति आग्र्यास आणिल्या, आणि त्या मशिदींच्या पायऱ्यांखालीं पुरून टाकिल्या. योगी व संन्यासी लोकांस हिंदुस्थानांत थारा राहिला नाहीं. उद्धव बैराग्यास कैदेंत टाकिलें. काठेवाडांतील सोमनाथाचें मंदिर पुनरपि पाडून टाकण्यांत आलें. हिंदूंचे सर्व सण व यात्रा बंद करून त्यांस नोकरींतून बडतर्फ करण्यांत आलें. औरंगजेब लढाईच्या वगैरे उद्योगांत गुंतला असतां, दिल्लीसारख्या

NATIONAL ARCHIVES OF INDIA

राजधानीच्या शहरांतही वर सांगितलेल्या जुलुमामुळें हिंदु लोक वरचेवर दंगे करूं लागले. एकदां एका मंत्रविद्येचें ढोंग करणाऱ्या बाईनें दिल्लींतील लोकांस चिथवून प्रत्यक्ष बादशहासही पदच्युत करण्याची वेळ आणिली होती. परंतु औरंगजेबाचें प्रसंगावधान ज़बर असल्यामुळें तो असल्या प्रसंगीं डगमगत नसे. कुराणांतील वचनें भाल्यांच्या टोंकांस बांधून त्यानें आपल्या लोकांस चेव आणून बंडवाल्यांचा फडशा पाडिला.

अशाच प्रकारचें एक बंड औरंगजेब अफगाण स्वारींतून परत येत असतां घडून आलें. दिल्लीनजीक नार्नोळ शहरच्या आसपास सत्नामी नांवाचे हिंदु गोसावी राहत असत. त्यांचें वर्तन सौम्य होतें, तरी त्यांजला कोणी त्रास दिल्यास तो ते मुकाट्यानें सोसून घेणारे नव्हते. एकदां क्षुल्लक कारणावरून कोतवालाचा व त्यांचा तंटा झाला. त्या वेळीं कोतवालानें सौम्योपचारांची योजना न करितां लष्कर जमविलें. त्यामुळें जबरदस्त रणकंदन माजलें. सत्नामी लोकांनीं फौजदाराचा पराभव करून नार्नोळ शहर हस्तगत केलें, (१६७६). त्यांजवर शस्त्र लागू पडत नाहीं अशी मुसलमानी फौजेची समजूत झाली. तेव्हां औरंगजेबानें मोठें लष्कर जमा करून कडेकोट तयारीनिशीं त्या वैराग्यांवर चाल केली, आणि सर्वांची कत्तल करून टाकिली. तेव्हां बंडाचा उपशम झाला. अशाच प्रकारचीं बंडें इतर ठिकाणींही झालीं. गोकळजाटानें मथुरेस बंड केलें. शीखगुरु तेघबहादरचा छळ झाल्यामुळें त्यानें स. १६७५ त तुरुंगांत जीव दिला.

ह्या गोष्टीच्या योगानें औरंगजेब फारच चिडून गेला आणि हिंदूंचा निःपात करण्याचे सक्तीचे उपाय योजूं लागला. हिंदु लोकांस अत्यंत अपमानकारक गोष्ट म्हटली म्हणजे झिजिया कर द्यावा लागणें ही होय, (पृ० २१ पहा). सर्व परधर्मी लोकांपासून हा कर मुसलमान अधिकारी वसूल करीत असत. परंतु अकबर बादशहानें दूरवर दृष्टि पोंचवून हा कर माफ केला होता. औरंगजेबानें कोत्या धर्मवेडाचे भरीस पडून स. १६७९ च्या ता. २ एप्रिल रोजीं हा कर पुनः सुरू केला. त्या वेळीं सर्व लोकांत हाहाःकार उडून गेला. बादशहाकडे दाद मागण्याकरितां लाखों लोक दिल्लीस राजवाड्यासमोर व रस्तोरस्तीं जमा झाले. एका शुक्रवारीं बादशहा मशिदींत जात असतां, त्यांनीं त्याचा रस्ता

अडविला. तेव्हां त्यांच्या अंगावरून हत्ती नेऊन हजारों लोकांस बादशहानें ठार केलें. हा कर इंग्रज व डच यांजवरही बसविलेला होता. कराची प्रत्यक्ष रक्कम न देतां त्याच्या बदल्यांत हे व्यापारी दरवर्षी कांहीं इराणी घोडे बादशहास नजर देत असत. प्रत्येक ब्राह्मणास दरसाल एक मोहोर ह्या कराबदल द्यावी लागे; आणि गरीब लोकांवर सुमारें साडेतीन रुपये बसविलेले होते. रजपूत राजांपासून सुद्धां हा कर सक्तीनें वसूल करण्याचा औरंगजेबाचा हुकूम सुटला होता. त्याची बजावणी चालू झाली, तेव्हां आजपर्यंत बादशाहीचे केवळ आधारस्तंभ असलेले सर्व रजपूत राजे औरंगजेबावर उठले आणि त्यांजवर शस्त्र धरणें बादशहास भाग पडलें.

औरंगजेबाच्या वेळेस रजपुतान्यांत राज्य करीत असलेले सर्व राजे विशेष पराक्रमी होते. अकबराप्रमाणें औरंगजेब त्यांजबरोबर सख्य ठेविता तर बादशाहीचें कल्याण झालें असतें. उदेपुरास राणा राजसिंह राज्य करीत होता. जिझिया कर बसविण्यांत आला, त्या वेळीं जयपूरचा राजा जयसिंह व मारवाडचा राजा जशवंतसिंह हे मरण पावले असून रजपुतांत राजसिंहच प्रमुखत्वानें वागत होता. औरंगजेबानें पूर्वजांचा कित्ता सोडून सर्व हिंदु लोकांचा छळ चालविला, यांत एकंदर बादशाहीचें नुकसान किती आहे, हें त्याचे नजरेस आणून देण्यासाठीं राणा राजसिंहानें ह्या वेळीं एक पत्र बादशहास लिहिलें,§ (पहा ३४६ पृ०). तें पत्र त्या वेळींचसें काय पण आज मितीस सुद्धां मुत्सद्दी चातुर्याचा व राजकरणकौशल्याचा उत्तम मासला म्हणून नांवाजलें जाण्यास योग्य आहे. ह्या पत्राचा कांहीं उपयोग झाला नाहीं. उलट राण्याबद्दल बादशहाचे मनांत ज्यास्तच द्वेष उत्पन्न झाला. इकडे मारवाडचा राजा जशवंतसिंह काबुलास गेला, तेव्हां त्यानें आपला शूर पुत्र पृथुसिंह यास मारवाडचा कारभार पाहण्यास ठेविलें होतें. रजपुतांचा संहार करण्याच्या इराद्यानें औरंगजेबानें पृथुसिंहास आपल्या दरबारीं बोलाविलें, आणि बाह्यात्कारीं त्याचा उत्तम गौरव केला. परंतु परत जातेवेळीं त्यास विषारी पोषाख घालण्यास देऊन ठार मारिलें. पुत्रशोकानें काबुलास जशवंतसिंहाची कंबर खचली. लवकरच तेथच्या रोगट हवेनें त्याचे

§ हें पत्र राजसिंहाचें नसून शिवाजीचें आहे, असें आतां बाहेर आलें आहे.

आणखी दोन पुत्र मृत्यु पावले. त्यामुळें दुःखग्रस्त होऊन तोही सन १६७८ त ता. १० डिसेंबर रोजीं काबूल येथें मरण पावला. येणेंप्रमाणें जशवंतसिंहाचा सूड घेण्याचे औरंगजेबाचे विचार सफल होत चालले. त्यानें जोधपूरची गादी आपल्या शिफारशीच्या भलत्याच एका इसमास दिली. जशवंतसिंहाची स्त्री आपल्या दोन लहान मुलांस घेऊन परत येत असतां, सिंधु नदीवर बादशहाच्या लोकांनीं तीस अटकाव केला. परंतु तिच्या राठोडांनीं मुसलमानांचा पराभव करून तीस दिल्लीकडे आणिलें. तेथें बादशहानें तीस अटकेंत ठेविलें. दुर्गादास नांवाचा एक शूर सरदार जशवंतसिंहाचे पदरीं होता. त्यानें मोठी शिताफी करून राजाच्या कुटुंबास सोडवून जोधपुरीं रवाना केलें. तेव्हां औरंगजेबानें जशवंतसिंहाच्या फौजेवर हल्ला करून तिचा पराजय केला. जशवंतसिंहाची बायको ही रजपूत राणीच्या पोटीं जन्मलेली शहाजहानची मुलगी होती. तिनें आपला ज्येष्ठ पुत्र अजितसिंह यास जोधपूरचे गादीवर स्थापून दुर्गादास यास सर्व कारभार सोंपविला. राणा राजसिंह यानें अजितसिंहास चांगला आश्रय दिला. येणेंप्रमाणें हे बलाढ्य रजपूत राजे एकचित्त झाले आणि जिझिया कर न देतां मोगलांशीं लढून आपला बचाव करण्याच्या उद्योगास लागले. या कारणास्तव औरंगजेबाच्या कार्कीर्दीत मोठें रजपूत युद्ध सुरू झालें. या युद्धाचा सर्व भार राजसिंहावर होता. आपला धर्म सोडावा, नाहीं तर युद्ध करावें याशिवाय दुसरा मार्ग रजपुतांस उरला नव्हता. रजपुतांची वर्तणूक पाहून औरंगजेब चवताळून गेला आणि त्यानें युद्धाची कडेकोट तयारी केली. औरंगजेब आता सर्व पृथ्वी जिंकितो कीं काय, असा या तयारीनें सर्वांस विस्मय वाटला. त्यानें आपल्या सर्व मुलांस आपापल्या फौजा घेऊन युद्धास बोलाविलें. अरवली पर्वताच्या रांगेंत रजपूत लोक आश्रय घेऊन राहिले होते. औरंगजेबाचा वडील मुलगा शहाआलम दक्षिणेंतून अहंमदाबादच्या रस्त्यानें मेवाडच्या मुलुखांत शिरला. बंगाल्यांतून अजमशहा उदेपूरच्या दक्षिणबाजूस येऊन उतरला. स्वतः औरंगजेब व त्याचा तिसरा मुलगा अकबर हे उत्तरेकडून अजमीरच्या वाटेनें उदेपूरप्रांतांत आले. त्यांस कोणीही अटकाव केला नाहीं. मध्यंतरीं एक दिवस औरंगजेब एका कठीण खिंडींतून चालला असतां,

रजपुतांनीं दोहोंकडच्या दोन वाटा बंद केल्यामुळें त्याजवर आणीबाणीचा प्रसंग आला होता. त्याजजवळ अन्नपाणी सुद्धां नव्हतें. ह्या वेळीं राणा राजसिंहानें पुढें होऊन बादशहास वाट करून दिली, आणि रजपुतांवरील रोष सोडून देण्याबद्दल विनंति केली. परंतु ह्या उदार वर्तनानें औरंगजेब अधिकच चिडला; आणि सर्व गाईंस ठार मारण्याचा हुकूम देऊन आपण परत अजमिरास गेला. त्यानें आपल्या मुलांस उदेपुरावर स्वारी करण्याचा आग्रह केला. परंतु पुढें जाण्याची छाती कोणासच होईना. इकडे रजपूत फौजा गुजराथ, माळवा वगैरे प्रांत उद्ध्वस्त करीत चालल्या होत्या. शिवाय औरंगजेबाच्या मुलांस फितूर करण्याचा त्यांचा प्रयत्न चालू होता. जशवंतसिंहाची राणी व दुर्गादास ह्यांनीं शहाजादा अकबर यास अशी भर दिली, कीं अजमीर येथें बादशहाजवळ अगदींच थोडी फौज असल्यामुळें तेथें जाऊन एकदम त्यास कैद करावें व स्वतःकडे बादशाही पद घ्यावें. असें केल्यास पन्नासहजार रजपूत लोकांचें साह्य देण्याचें त्यास राणीनें वचन दिलें. ह्या बेतानें अकबराच्या तोंडास पाणी सुटून तो रजपूत फौज घेऊन अजमिरावर चाल करून गेला; परंतु हा त्याचा बेत लगेच शहाआलम यास कळला. त्यानें ही सर्व हकीगत बापास लिहून कळविली, आणि 'फौजेसह आपल्या मदतीस येतों,' असें कळविलें. परंतु कपटप्रचुर औरंगजेबाच्या चित्तास कोणाचाच भरंवसा येत नव्हता. त्याला शहाआलमच्या उद्देशाच्याच विशेष वहीम आला. 'तुम्हीं माझ्या हुकुमाशिवाय आपली जागा सोडूं नये,' असें त्यास औरंगजेबानें लिहिलें. परंतु हा हुकूम न मानतां तो शहाजादा त्वरा करून आलाच. इकडे अकबराच्या ज्योतिष्यांकडून ह्या बेताची कची हकीकत औरंजेबास कळली. तेव्हां तो घाबरून फौजेची जमवाजमव करूं लागला. मुहूर्त लांबणीवर टाकण्याविषयीं त्यानें ज्योतिष्यांस विनविलें. ह्यामुळें अकबरापूर्वी तीन तास शहाआलम अजमिरास येऊन पोंचला. तथापि अकबराशीं लढाईच केल्यानें निभाव लागेल असें औरंगजेबास वाटलें नाहीं. तेव्हां त्यानें आपली नेहमींची युक्ति लढविली. त्यानें खालील मजकुराचें पत्र अकबरास लिहिलें, आणि तें दुर्गादास याच्या हातांत पडे असें केलें. 'रजपुतांस फसवून तुम्हीं येथवर आणिलें ही फार चांगली गोष्ट केली. ठरल्या-

प्रमाणें त्यांस तुम्ही आपल्या अग्रभागीं ठेवा, म्हणजे आम्ही पुढून व तुम्ही मागून मिळून त्यांची अशी चंदी उडवून देऊं, कीं एकाही काफर हिंदूनें आज सुटून जाऊं नये.' हें पत्र दुर्गादासाच्या हातांत पडतांच त्याची पांचांवर धारण बसून, अकबरानें आपणास फसविलें, आपणास ही वार्ता थोडी अगोदर कळली म्हणून बरें, असें समजून तो रातोरात आपली फौज घेऊन मारवाडाकडे पळून गेला. दुसऱ्या दिवशीं रजपूत निघून गेलेले पाहून अकबर गर्भगळित झाला. त्याच्या सर्व सरदारांनीं त्यास सोडिलें. एक असामी बादशहाचा खून करण्यास गेला असतां स्वतःच मारला गेला. तेव्हां जीव घेऊन अकबर परत मारवाडांत पळून गेला. तेथें त्यास त्या खोट्या पत्राची हकीकत कळली. त्यास पकडण्या-साठीं शहाआलम आला, परंतु त्याचा रजपुतांनीं चांगला समाचार घेतला. अकबरास शेवटीं महाराष्ट्रांत येऊन संभाजीराजे भोसले याचा आश्रय करावा लागला, (मे १६८१).

चार वर्षें रजपुतांस जिंकण्याचे होते तेवढे प्रयत्न औरंगजेबानें केले, पण त्यांनीं दाद दिली नाहीं. जशवंतसिंहाचा अल्पवयी मुलगा अजित-सिंह यास त्यांनीं जोधपुरास नेऊन गादीवर बसविलें होतें, (जुलै ता. २३ स. १६७९). अकबर फितल्यामुळें तर औरंगजेबाची आतां कांहींच किंमत राहिली नव्हती. तो मराठ्यांकडे गेल्यामुळें मराठ्यांवर चाल करून जाणें औरंगजेबास अपरिहार्य वाटलें. शिवाजीप्रमाणेंच त्यास संभाजीची अतोनात भीति वाटत होती. तेव्हां तह करून रजपूत प्रकरण मिटविण्याची त्यास उत्कंठा लागली. पण आपण होऊन तहाची गोष्ट काढणें लाजिरवाणें असल्यामुळें त्याचा सरदार दिलेरखान याचे मार्फत तें काम त्यानें घडवून आणिलें. रजपुतांस तरी आतां युद्धाचा कंटाळाच आला होता. एकट्या मेवाडांत १७५ मंदिरांचा पाडाव झाला. शेवटीं एकदांचा तह ठरून बादशहानें अपमानकारक अटी कबूल केल्या, (जून सन १६८१). त्या अटी अशाः—(१) औरंगजेबानें घेतलेला रजपुतांचा मुलूख त्यांस परत द्यावा; (२) धर्माच्या बाबतींत हात न घालतां रजपुतांपासून जिझिया कर मागूं नये; (३) जशवंतसिंहाचें राज्य त्याच्या मुलांकडे पूर्ववत् चालवावें; आणि (४) रजपुतांनीं पूर्वसंप्रदायानुरूप बादशहाची नोकरी करावी. ह्याप्रमाणें हें रजपूत युद्ध एकदांचें संपून औरंगजेबाची

सत्ता पुष्कळ खालावली. इतउत्तर ह्या रजपूत राजांनीं मोगलांच्या तर्फेनें लढण्याचें सोडून दिलें.

हिंदुस्थानांत रजपुतांनीं बादशाही फौजेवर विजय मिळविल्याचें हें पहिलें उदाहरण होय. ह्याच वेळेस बुंदेले, रजपूत व दक्षिणचे मराठे बादशहाशीं झगडून स्वतंत्र होत होते; म्हणून परराज्य झुगारून देऊन आपापलीं स्वतंत्र राज्यें स्थापण्याची ही एक लाटच ह्या वेळीं उसळली होती. हिंदुस्थानच्या लोकांत राष्ट्रीयत्वाची व स्वाभिमानाची भावना असती, तर त्यांस एक प्रकारचें संयुक्त स्वराज्य स्थापन करण्यास ह्या वेळीं उत्तम संधि आलेली होती. परंतु अशा प्रकारची सर्व हिंदुस्थानाबद्दल एकदृष्टि व एकविचार कोणाच्याही मनांत उत्पन्न झाला नाहीं. जो तो आपल्यापुरतें, किंवा फार तर आपल्या जातीपुरतें पाही. युरोपांत त्याच वेळीं नवीन जागृति होऊन लोकस्वातंत्र्याचा पगडा राज्यकर्त्यांवर बसत चालला होता, आणि यूरोपची ही माहिती आपल्या लोकांस कळणेंही त्या वेळीं अशक्य नव्हतें. पण हजारों वर्षांपासून जो प्रघात चालत आला, तोच कायम ठेवण्याकडे लोकांची प्रवृत्ति असून, जगांत नवीन घडामोडी चालत आहेत, नवीन फेरफार होत आहेत, बदललेल्या कालाचा उपयोग करून आपणही पुढें गेलें पाहिजे, अशा प्रकारच्या राष्ट्रीयशिक्षणाची दिशाच आम्हीं कधीं स्वीकारिली नाहीं, म्हणून स्वातंत्र्यसंपादनाचे अनेक उत्तमोत्तम प्रसंग वायां गेलेले इतिहासांत आपल्या दृष्टीस पडतात.

७. दक्षिणची स्वारी व मृत्यु, (१६८३–१७०७).—अलाउद्दीन खिलजीच्या वेळेपासून मुसलमान राज्यकर्त्यांनीं दक्षिणदेश जिंकण्यासाठीं केलेले सर्व प्रयत्न कसे विफल झाले, हें मागील इतिहासावरून व्यक्त झालेंच आहे. दक्षिणदेशानें मोगलबादशहांचे पराक्रम कसास लाविले. अकबरानें इतर सर्व प्रांत जिंकिले, पण दक्षिणेंत त्यास हार खावी लागली. पुढें जहांगीर नेभळटच होता, तेव्हां त्याच्या हातून दक्षिणदेश जिंकण्याचें काम तडीस गेलें नाहीं, ह्यांत आश्चर्य नाहीं. शहाजहाननें शिकस्त करून, निजामशाही तेवढी बुडविली. शहाजहान व औरंगजेब दोघेही दक्षिणच्याच उत्कृष्ट शाळेंत आपले पराक्रम शिकले. औरंगजेबाचें आयुष्य तर बहुतेक दक्षिणेंत गेलें. दक्षिणदेश काबीज करणें, हें त्यानें

आपल्या आयुष्याचें इतिकर्तव्य मानिलें; पण तें तडीस न जातां, त्यांत केवळ त्याच्या जिवाचाच नव्हे, तर राज्याचाही अंत झाला. सारांश, चारशें वर्षे मुसलमानांस ह्या कामीं एकसारखी हार खावी लागली ह्याचें मुख्य कारण भूगोलिक परिस्थिति होय, असेंच विचाराअंतीं म्हणावें लागतें. राज्यस्थापन झालें कीं लगेच, किंबहुना राज्य स्थापण्याच्या पूर्वीच, सरहद्द हुडकून काढण्याकडे संस्थापकाचा मुख्य रोख असतो. स्वभावसृष्ट सरहद्द सांपडली, कीं त्याचें काम भागलें. चीनदेशानें प्रचंड भिंत बांधून नवीन सरहद्द उत्पन्न केली. नर्मदानदी व विंध्याद्रिपर्वत ह्यांच्या योगानें हिंदुस्थानचे दोन भाग अगदीं भिन्न झाले आहेत. एक हीच कायमची मर्यादा ठरवावी, अथवा थेट दक्षिणटोंकापर्यंत सर्व प्रदेशांत लष्करी बंदोबस्त करून, त्याची व्यवस्था दिल्लीहून ठेवावी, हे त्या वेळचे दोन मार्ग होते. त्या काळीं दळणवळणाचीं साधनें सुलभ नव्हतीं. डोंगराळ व जंगली मुलखांतून लष्कराच्या सोयीचे रस्ते करून, ते नेहमीं व्यवस्थित ठेवणें दुर्घट होतें. दक्षिणच्या स्वारीची व्यवस्था पाहण्यास जो अधिकारी नेमावयाचा, तोच बहुधा धन्यास न जुमानतां, स्वतंत्र होण्याच्या नादास लागे. अशा कारणास्तव दक्षिणदेश मोगलांस जिंकितां आला नाहीं. पुढें जेव्हां मराठ्यांनीं आपलें राज्य स्थापिलें, तेव्हां त्यांना ह्या भूगोलिक सरहद्दीची नेहमींच मोठी पंचाईत पडत असे. निजामाचा व पेशव्यांचा कायमचा तंटा म्हणजे दोघांचाही सरहद्द हुडकून काढण्याचा प्रयत्न होय, असें म्हटलें पाहिजे. इतिहासांत ह्या भूगोलिक परिस्थितीचें महत्त्व अतोनात असून, विचारवंतांनीं ह्या मुद्याकडे ज्यास्त लक्ष देणें, व अनेक ठळक उदाहरणांनीं आपल्या देशांतील पुष्कळसे ऐतिहासिक प्रसंग स्पष्ट करणें जरूर आहे.

औरंगजेबाचें पूर्वायुष्य दक्षिणेंतच गेलें होतें. दक्षिणेंत राहूनच त्यानें पुढील राज्यप्राप्तीचे बेत केले. शहाजहान आजारी न पडतां औरंगजेबास दक्षिणेंत ज्यास्त दिवस राहतां आलें असतें, तर कदाचित् त्यानें शिवाजीस वर डोकें काढूं दिलें नसतें; पण दिल्लीस गेल्यामुळें आजपर्यंत त्यास दक्षिणदेशाकडे स्वतः लक्ष देण्यास सवड मिळाली नाहीं. तथापि हा देश जिंकण्याचा हेतु त्याच्या दृष्टीसमोरून हालला नव्हता. त्यानें अनेक सरदार दक्षिणदेशांत पाठविले, त्यांचे मराठ्यांशीं

घडलेले व्यवहार पुढें मराठ्यांच्या भागांत यावयाचे आहेत. तसेंच मराठ्यांचा इतिहास पुढें स्वतंत्र रीतीनें यावयाचा असल्यामुळें औरंगजेबाच्या कार्किर्दीचा हा भाग त्या ठिकाणींच विस्तारानें येईल. मराठ्यांशिवाय इतर बाबतींत औरंगजेबानें ज्या गोष्टी केल्या, तेवढ्याच येथें द्यावयाच्या आहेत. उत्तरहिंदुस्थानांत अनेक भानगडी उत्पन्न झाल्यामुळें, आणि दक्षिणेंत शिवाजीसारखा पराक्रमी पुरुष स्वदेशस्वातंत्र्यासाठीं पराकाष्ठेनें झगडत असल्यामुळें, दक्षिणच्या व्यवहारांत स्वतः मन घालण्याचें धाडस बादशहानें केलें नाहीं. परंतु इ. स. १६८० सालीं शिवाजी राजा मरण पावतांच दक्षिणेंतील मुसलमानी, हिंदु वगैरे सर्व राज्यें बुडवून, सिंधुनदीपासून कन्याकुमारीचे टोंकापर्यंत मोगल बादशाही व तिजबरोबरच महंमदी धर्म हीं पसरवून देण्याचा जो प्रचंड उद्देश त्याच्या मनांत घोळत होता, तो तडीस नेण्याचा समय आला असें त्यास वाटलें. शहाजहान ह्यात होता, तोंपर्यंत दिल्ली सोडून त्यास दूर जातां येईना. तो मरण पावल्यावर, अफगाणिस्तानांत व रजपुतान्यांत युद्धें उद्भवल्यामुळें त्याचा वरील उद्देश बरेच दिवस मागें पडला. स्वधर्मप्रसाराचा जो उपक्रम दक्षिणेंत करण्याचा त्याचा विचार होता, तो त्यानें उत्तरहिंदुस्थानांत करून पाहिला, पण तेथें त्यास म्हणण्यासारखें यश आलें नाहीं. इतक्यांत शिवाजी मरण पावल्यामुळें त्याच्या उद्देशास बळकटी आली. पूर्वी कदाचित् त्याचा असाही हेतु असेल, कीं दक्षिणेंतील मराठे व मुसलमान राजे आपआपसांत लढून स्वतःचें सामर्थ्य कमी करीत आहेत, ही आपल्या पथ्याची गोष्ट आहे. ते निर्वीर्य झाले म्हणजे त्यांस जिंकण्यास त्यास पडणार नाहींत. तशांत रजपुतान्यांत युद्ध चालू असतां बादशहाचा मुलगा अकबर दक्षिणेंत पळून येऊन संभाजीचा आश्रय करून राहिला होता, हें दक्षिणेंत स्वारी करण्याचें आणखी एक कारण झालें. सारांश, आपल्या सर्व बादशाही डामडौलानिशीं औरंगजेब अवाढव्य फौज घेऊन स. १६८१ ता. ८ सेप्टेंबर रोजीं अजमिरहून निघाला, तो ता. २२ मे १६८२ रोजीं बऱ्हाणपुरास आला. तेथून नोव्हेंबर १३, स. १६८३ रोजीं तो अहंमदनगरास पोंचला.

औरंगजेबाच्या ह्या प्रचंड स्वारीच्या थाटाचें वर्णन अनेक ग्रंथकारांनीं केलें आहे. बादशाही वैभवाच्या मिरवणुकीनें लोकांस घाबरवून

देण्याचा औरंगजेबाचा विशेष उद्देश असल्यामुळें, ही स्वारी इतिहासांत चिरस्मरणीय झाली आहे. दक्षिणेंतील ज्या लोकांस दिल्लींतील थाटमाट केवळ श्रवणगोचर होता, त्यांचे डोळे ह्या स्वारीचें प्रत्यक्ष वैभव पाहून दिपून गेले असतील ह्यांत संशय नाहीं. जहांगीरच्या स्वारीचें वर्णन मागें केलें आहे. कुदळीपावडीं घेतलेले हजारों लोक सर्वांपुढें रस्ता साफ करीत जात होते. त्यांच्या मागें बादशहाचा प्रचंड तोफखाना व घोडेस्वार चालत. मध्यें असंख्य उंटें, हत्ती व गाडे असून त्यांजवर बादशहाचें जडजवाहीर, खजिना, सरकारी कामाचीं दप्तरें, खाण्याचे व इतर जिन्नस, कपडेलत्ते, पिण्याकरितां गंगाजल व आणखी अनेक प्रकारचें सामान भरलेलें असे. त्याच्यामागें खुद्द बादशहाची स्वारी हत्तीवर, घोड्यावर किंवा पालखींत असून येई. बादशहाच्या मागें व पुढें खासपागेचे स्वार चालत. बादशहाच्या स्वारीपाठीमागें जनानखाना चाले. जनानखान्याबरोबर घोड्यांवर स्वार झालेल्या लढाऊ बायकांचा तांडा व एक हलका तोफखाना चालत असे. सर्वांमागून लढाऊ पायदळ येत असे. छावणीच्या मुक्कामाचें सर्व सामान दुहेरी असून, पुढील मुक्काम तयार झाल्याशिवाय मागचा मुक्काम उठत नसे. बादशहाचा मुक्काम म्हणजे एक प्रतिदिल्लीशहर वसत असे. सर्वांच्या मध्यभागीं बादशहाचे तंबू असून तेथून सर्व भागीं जाण्याकरितां भव्य रस्ते केलेले असत. प्रत्येक रस्त्याच्या नाक्यावर तोफखान्याचा पहारा असे.

औरंगजेबाच्या स्वारीचा भपका जरी लोकांस बाहेरून दिपविणारा होता, तरी त्यांतील शिस्त प्रत्यक्ष युद्धाचे कामीं अत्यंत निरुपयोगी होती. ह्या स्वारीचा परिणाम विफल होण्याचें कारण तरी तींतील अंतस्थ अव्यवस्थाच होय. वास्तविक पाहिलें तर बादशहाचे लोक कमी लढाऊ होते असें नाहीं. अफगाणिस्तान, पंजाब वगैरे प्रांतांतील धिप्पाड, भव्य व मोठमोठीं हत्यारें बाळगणाऱ्या लोकांचाच फौजेंत भरणा विशेष होता. उंच व धिप्पाड घोड्यांवर स्वार झालेले हे लोक बादशहाच्या सैन्याचें केवळ नाकच होते. तसेंच बुंदेले, मेवाडी, वगैरे पहाडी लोकही दक्षिणच्या मावळे लोकांशीं लढण्याकरितां बादशहानें मुद्दाम बरोबर घेतले होते. तोफखाना उत्कृष्ट स्थितींत असून त्याजवर युरोपियन गोलंदाज नेमिलेले होते, आणि प्रत्येक तोफ अगदीं निवडक अशी बाळगलेली

होती. तथापि जहांगीरच्या वेळेपासून मोगल लष्करास बहुतांशीं स्वास्थ्य प्राप्त झाल्यामुळें लढाऊ लोकांचा स्वभाव पुष्कळ नरम पडला होता. आळस, मिजास व डामडौल हे दुर्गुण सर्व लष्करामध्यें अतोनात पसरले असून इतर व्यवस्थाही त्याच योग्यतेची होती. लष्कराचे पोशाख भारी किंमतीचे व अवजड होते; ते चढविण्यास व घोडे वगैरे शृंगारण्यास अतोनात वेळ व श्रम लागत. बादशहाची छावणी केवळ स्वस्थतेच्या वेळच्या ऐषआरामाचें मंदिर असे. प्रत्येक लहानसा शिपाई सुद्धां आपल्या तंबूंत शरीरसुखाची सर्व तजवीज करून ठेवीत असे. छावणींत सर्व प्रतींच्या बायका, कारागीर, दुकानदार, व्यापारी, नोकरचाकर, गवई, नृत्यांगना वगैरे लोकांचा भरणा मुबलक असल्यामुळें, एक मुक्काम उठवून नवीन मुक्काम बसविण्यास अतोनात वेळ लागे; आणि एकाएकीं लढाईचा प्रसंग आला असतां पुढें होण्यास कोणीच तयार नसे. स्वतः औरंगजेब अगदीं साधा व नियमित होता खरा, परंतु लष्करांतील अव्यवस्था मोडण्याचें काम त्याच्यानें झालें नाहीं.

ह्या स्वारींत बादशहाबरोबर एकंदर फौज किती होती ह्याची गणती बरोबर केलेली नाहीं. डॉक्टर कॅरेरी नांवाचा एक इटली देशचा गृहस्थ स. १६९५ चे सुमारास दक्षिणेंत आला होता. त्यानें प्रत्यक्ष पाहिल्यावरून असें लिहून ठेविलें आहे, कीं बादशहाची लढाऊ फौज ६० हजार स्वार व एक लक्ष पायदळ इतकी असून, शिवाय ओझ्याकरितां ५० हजार उंटें व ३ हजार हत्ती होते. परंतु नोकरचाकर, व्यापारी व कारागीर इत्यादि सर्व प्रकारचे लोक धरिले असतां, बादशहाबरोबर एकंदर ५ लाख मनुष्य होतें. शेवटीं त्या प्रवाश्यानें असाही शेरा मारिला आहे, कीं बादशाही फौज ३ लाख स्वार व ४ लाख पायदळ इतकी होती असें म्हणण्यास हरकत नाहीं. छावणीमध्यें एकंदर २५० बाजार असून तिचा विस्तार सुमारें तीस मैलपर्यंत असे. या विधानामध्यें अतिशयोक्तीचा अंश असेल, तरी पण फक्त फौजेचीच संख्या चार लाखांपर्यंत होती असें अनेक इतिहासकारांचें मत आहे. शिवाय जरूरीच्या प्रसंगीं बाजारबुणगे लोकांतून पाहिजे तितके लोक लढाईस बोलावीत. तोफखाना सर्वांपुढें ठेवून लढाईस सुरवात होई. दोनही बाजूंकडून घोडेस्वार आपल्या बाणांचा वर्षाव करीत; आणि

तोफांनीं शत्रूंच्या रांगांमध्यें गोंधळ उडवून दिला, म्हणजे स्वार मोठ्या वेगानें हल्ला करीत, आणि मग कांहीं वेळ हातघाईची लढाई सुरू होई. एकंदर लढाई चालू असतां बादशहास मात्र आपल्या हत्तीवरून खालीं न उतरण्याची खबरदारी ठेवावी लागे. बादशहा दिसेनासा झाला, कीं त्याचे लोक रणांगण सोडून पळून गेले म्हणून समजावें. तथापि ह्या फौजेचा मुख्य दोष म्हटला म्हणजे कूच करण्याचे वेळची अव्यवस्था होय. खालच्या वरच्या लोकांमध्यें हुकमत विभागलेली नसल्यामुळें, प्रत्येक इसम मर्जीस येईल तसें वागे. लाखों मनुष्यांची ही टोळधाड आसपासच्या शेंकडों कोसपर्यंतचा मुलूख तेव्हांच उजाड करी. एकंदर छावणीचा परीघ कधीं पांच, तर कधीं साडेसात मैल असे. ओझ्यांचीं जनावरें मरून त्यांच्या दुर्गंधीनें सर्व हवा भरून जाई. रणांगणीं उभे राहिले असतां हे लोक मरणास भिणारे नव्हते, हा त्यांचा स्वभाव अनेक पाश्चात्य, फ्रेंच व इतर प्रवाश्यांनीं पारखून लिहून ठेविला होता; आणि तीच गोष्ट ध्यानांत धरून त्यांस थोडेंसें लष्करी शिक्षण दिलें असतां ते आपल्या उत्तम उपयोगी पडतील, असा तर्क पुढें मोगल बादशाहीच्या उतरत्या काळांत पाश्चात्यांनीं बांधिला व तो खरा ठरला.

अशा बादशाही फौजेशीं मराठी सैन्याची तुलना केली असतां विलक्षण तफावत दृष्टीस पडते. ते लहान बांध्याचे, चपळ, भूक व तहान सोसण्यास कंटक, आणि केव्हांही शत्रूंवर चालून जाण्यास तयार असत. त्यांचे घोडेही त्यांच्यासारखेच सडपातळ व दऱ्याखोऱ्यांतून चढून जाण्याच्या सोयीचे होते. मराठे स्वारांचा सगळा संसार एवढ्याशा लहान घोड्यावर मावत असे. सरदार लोकांशिवाय इतरांस तंबू नसत. स्वारींत असतां प्रत्येक शिपाई जमिनींत भाला टोंचून, व घोड्याची लगाम हातांत धरून उघड्यावर निजे. यास्तव शत्रूची चाहूल लागतांच तो चटकन स्वार होऊन पळून जात असे. असें असूनही त्यांस सेनानायक योग्य न मिळाल्यामुळें, औरंगजेबास ह्या स्वारींत आरंभीं बरेंच यश मिळालें. तथापि एवढ्या अवाढव्य फौजेची मूठभर मराठ्यांपुढें अंतीं दाद लागली नाहीं, ही गोष्ट ऐतिहासिक रीत्या विशेष स्मरणीय असून तिचा विस्तृत विचार मराठ्यांच्या भागांत येईल.

सन १६८२ त औरंगजेब दक्षिणेंत आला, त्याचे पाय पुनरपि दिल्लीस लागले नाहींत. सुमारें पंचवीस वर्षें त्यानें दक्षिणेंत काढिलीं. आपण आपल्या बापाची जी अवस्था केली, तीच आपले मुलगे माझी करतील, अशी धास्ती औरंगजेबाच्या पोटांत नेहमीं असल्यामुळें, कदाचित् दिल्लीस परत न जाण्याचा त्यानें अगोदरच निश्चय केला असावा. बऱ्हाणपुरास येऊन उतरल्यावरोबर त्यानें सर्व हिंदूंकडून जिझिया कर वसूल करण्याचे सक्त हुकूम सोडिले. लोकांनीं वाटेल तितकी नाखुषी दाखविली, पण तिचा उपयोग न होतां मारहाणीनें हा कर वसूल होऊं लागला. एकट्या बऱ्हाणपुरांत सव्वीस हजार रुपये गोळा झाले असा आधार मिळतो. पुढें त्या बादशहानें असा जाहीरनामा लाविला, कीं कोणींही हिंदूनें परवानगी घेतल्यावांचून पालखींत अगर आरबी घोड्यावर बसूं नये. ह्या कृत्यांनीं लोकांचीं मनें इतकीं खवळलीं, कीं आजपर्यंत मोगल बादशहाविषयीं त्यांच्या मनांत असलेली पूज्यबुद्धि नाहींशी होऊन, ते त्याचा नाश करण्यास उद्युक्त झाले. बऱ्हाणपूर येथें औरंगजेबानें पुढील उद्योगाची सर्व तयारी केली. मराठे लोकांस जिंकून सर्व हिंदुस्थानभर आपला अंमल स्थापावयाचा, हा त्याचा मुख्य उद्देश होता. परंतु त्यास असें वाटलें, कीं विजापूर व गोवाळकोंडा ह्या राज्यांची मराठ्यांस पुष्कळ मदत होते, निदान त्यांच्या वतीनें मोगलांस दहशत दाखविण्याची त्यांस सोय होते, तेव्हां हीं राज्यें नाहीशीं केल्याशिवाय मराठ्यांस जिंकितां यावयाचें नाहीं असा तर्क बांधून, प्रथम त्यानें आपला मोर्चा विजापूर व गोवळकोंडा इकडे फिरविला. परंतु हा समज चुकीचा होता. विजापूर व गोवळकोंडा येथील राज्यें बरींच जुनाट असून त्यांजबद्दल लोकांच्या मनांत चांगली पूज्यबुद्धि होती. शिवाय तीं मुसलमानी असल्यामुळें बादशहा त्यांच्याशीं सलोख्यानें वागता, तर मराठ्यांस जिंकण्याच्या कामांत त्यांनीं त्यास हौसेनें मदत केली असती. निदान मराठ्यांचा निःपात होईपर्यंत त्यानें त्यांजवर शस्त्र धरावयाचें नव्हतें. त्या राज्यांत मोठमोठे बलाढ्य मराठे सरदार नोकरीस होते. तीं राज्यें बुडतांच ते सरदार आपापल्या पथकांनिशीं मराठ्यांस येऊन मिळाले, आणि औरंगजेबाच्या जुलमी वर्तनाबद्दल त्याचा सूड घेण्यास तयार झाले. इतिहासकारांच्या मतें औरंगजेबाची

४६–९–११–१०—७९१—२०००

ही चुकी अक्षम्य आहे. तरी पण बादशहाच्या बाजूची आणखी एक गोष्ट ध्यानांत ठेवण्याजोगी आहे; ती अशी, कीं विजापूर व गोवळकोंडा ह्या राज्यांत शिया पंथाची पुष्कळ प्रवृत्ति होती. औरंगजेबाचा वर्तनक्रम आरंभापासून पाहूं गेलें तर धर्माच्या सबबीवर रचिलेला दिसतो. जिकडे तिकडे एकजात सुनी पंथाचा प्रसार करण्याकरितां तो जिवापाड मेहनत करीत होता. तेव्हां वरील दोन राज्यें जिंकून तेथें स्वधर्माचा प्रसार करण्याची त्याची इच्छा उत्कट होती. शिवाय बहामनी राज्य म्हणजे आरंभापासून दिल्लींतील सार्वभौम बादशहाविरुद्ध बंड करून स्थापन झालेलें असून, त्याच्या शाखा जिंकण्यास अकबराचे वेळेपासून अव्याहत प्रयत्न चालू होते. शहाजहान यास त्यांत थोडेंसें यश आलें. औरंगजेबानें बऱ्हाणपुराहून आपला वडील मुलगा शहाआलम यास मराठ्यांच्या कोकणपट्टींत पाठवून समुद्रकिनारा हस्तगत करण्यास हुकूम दिला; आणि दुसरा पुत्र अजम यास खानदेशांत पाठवून आपण स्वतः औरंगाबादेस आला; तेथून कांहीं दिवसांनीं तो विजापूरच्या मुलखांत शिरला. संभाजीबरोबर आरंभीं लढण्यांत त्याचा हेतु आपला बंडखोर मुलगा अकबर यास पकडण्यापुरताच होता. संभाजीचे व अकबराचे जे अंतस्थ बेत चालले होते, ते सर्व गुप्त हेरांच्या मार्फत औरंगजेबास कळत होते. तेव्हां औरंगजेबानें अकबराच्या गुरूस फकिराचा वेष देऊन मराठ्यांचे छावणींत पाठविलें. औरंगजेबानें पुष्कळ पैसे भरून मराठे सरदारांस फितवावें, आणि मोगल फौजेस त्यांनीं अडथळा न करितां मराठ्यांचे छावणींत येऊं द्यावें; अशा प्रकारें संभाजीस पकडल्यास, अकबरास सर्व गुन्ह्यांची माफी करण्यांत येईल, असा गुप्त बेत त्या गुरूनें अकबरास पढविला. परंतु अकबरानें तो सर्व संभाजीस कळविला; आणि मराठे सरदारांस लांच देण्याचे पैसे बादशहाकडून उपटून, मोगल फौज नजीक येतांच तिची मराठ्यांनीं अशी कत्तल उडवून दिली, कीं एकही मनुष्य जीव घेऊन परत गेला नाहीं. संभाजीजवळ राहिल्यानें आपला निभाव लागत नाहीं आणि आपणास कांहींच फायदा होत नाहीं असें पाहून, मिळालेल्या पैशावर इराणांत पळून जाण्याच्या उद्योगास अकबर लागला. ह्या कृत्यांनीं औरंगजेबाच्या पायांची आग मस्तकास गेली, आणि संभाजी व अकबर हातीं येण्याची त्याची निराशा झाली. तेव्हां पोर्तुगीज

लोकांशीं संधान बांधून त्यांजकरवीं संभाजीस शह द्यावा अशा हेतूनें त्यानें आपला वकील गोव्यास पाठविला. ह्या वेळीं गोवेकरांची विशेष सरशी नव्हती. मोगल बादशहाकडून आपलेकडे वकील आलेला पाहून, गोव्याच्या मुख्य अधिकाऱ्याचें डोकें गर्वानें फिरून गेलें. प्रसिद्ध इतिहासकार मनूची हा त्या वेळीं गोव्यास होता, त्यानें औरंगजेबाच्या पत्राचें भाषांतर करून कारभाऱ्यास दिलें; आणि 'बादशहाच्या शब्दांवर कधींही भरंवसा ठेवूं नये, आपणास मोगलांपेक्षां मराठेच ज्यास्त चांगले, कोंकण ही एक भिंत मध्यें असल्यामुळें मोगलांपासून आपलें सहज संरक्षण होत आहे,' इत्यादि प्रकार समजावून चांगली कानउघाडणी केली. परंतु त्या कारभाऱ्यास तो उपदेश रुचला नाहीं. इकडे अकबराची पांचांवर धारण बसली. आपण पळून जात असतां गोवेकर आपणास पकडून खचित बादशहाचे हवालीं करितात असें त्यास वाटलें. त्यानें कारभाऱ्यास पैका भरून येथें एक जहाज बांधण्याची तजवीज चालविली. त्यांत बसून तो इराणास पळून जाणार होता. जहाज बांधण्यासाठीं सुतारांच्या वगैरे वेषानें पुष्कळ मराठे लोक गोव्यांत येऊन उतरले. मराठ्यांचा हेतु गोवें जिंकून घेण्याचा होता. दररोज ज्यास्त ज्यास्त लोक येऊं लागले. मागाहून संभाजीही स्वतः येण्याच्या तयारींत होता. हा घाट मनूचीच्या लक्षांत येऊन त्यानें वेळींच कारभाऱ्यास सावध केलें. कारभाऱ्यानें अकबराचें गलबत तयार करून वेंगुर्ल्यास पाठविलें, आणि मराठ्यांबरोबर युद्ध सुरू केलें. ह्या युद्धांत मराठ्यांनीं गोवेकरांची चांगली खोड मोडून प्रत्यक्ष गोवें घेण्यापर्यंत पाळी आणिली होती. इकडे औरंगजेबानें मराठ्यांबरोबरचें युद्ध सोडून दिलें, आणि प्रथम विजापुराकडे दृष्टि फिरविली. वडील मुलगा शहाआलम सेप्टेंबर १६८३ पासून मे १६८४ पर्यंत कोंकणांत लढत होता. त्याची पोर्तुगीझ लोकांशीं थोडीशी कटकट झाली. पोर्तुगीझ व मराठे ह्या दोघांसही विश्वासघातानें ताब्यांत आणावें असें त्यास बादशहाचें आंतून सांगणें होतें. पण शहाआलमच्यास ही गोष्ट न रुचून दोघांशींही त्यानें सख्य ठेविलें. औरंगजेब मरण पावल्यावर भावांबरोबर कराव्या लागणाऱ्या युद्धांत ह्या दोघां राष्ट्रांनीं आपणास मदत करावी, असा त्याच्या पोटांतला हेतु होता. म्हणून अकबरास पकडण्यापलीकडे त्याचा दुसरा हेतु नव्हता. ह्या कामीं

शहाआलमनें आपली शिकस्त करून पाहिली; पण इलाज न चालल्या-मुळें त्यास कोंकणपट्टी सोडून यावें लागलें. बादशहानें त्यास विजापूर-कडील संभाजीचा मुलूख घेण्यास पाठविलें. शहाजादा अकबर सन १६८८पर्यंत संभाजीकडे होता. परंतु दिवसेंदिवस संभाजीची स्थिति बिघडत चालली आहे, आतां त्याजकडून आपणास तादृश साहाय्य होण्याची आशा नाहीं असें पाहून, तो संभाजीस सोडून गलबतांत बसून मक्केस गेला, आणि तेथून पुढें इराणांत जाऊन तेथें स. १७०४ ह्या वर्षी मरण पावला. इराणच्या शहानें त्यास खुरासान येथें ठेविलें होतें.

कुत्बशाही व आदिलशाही ह्या राज्यांचे अंत कसे झाले, त्याची हकीकत मागें त्या राज्यांच्या इतिहासांत आली आहे. औरंगजेबानें ता. २७ मे १६८५ रोजीं विजापुरास वेढा घातला. ता. २२ सेप्टेंबर १६८६ रोजीं विजापूरचें राज्य खालसा झालें. इकडे ता. २८ जून १६८५ रोजीं राजपुत्र शहाआलम गोवळकोंड्यावर आला. ता. २१ सेप्टेंबर १६८७ रोजीं गोवळकोंड्याचें राज्य औरंगजेबाचे ताब्यांत आलें. ह्या प्रसंगीं औरंग-जेबानें केलेलें विश्वासघातकी वर्तन तिरस्कारार्ह आहे. ह्या जुन्या मुसल-मानी राज्यांचा शेवट होतांना जे अनेक सूक्ष्म प्रकार घडले, त्यांचें वर्णन करण्याची विशेष जरूर नाहीं. स्वार्थ साधतांना औरंगजेबानें सर्व प्रकारची नीतिमत्ता बाजूस ठेविली इतकें सांगितलें म्हणजे पुरे आहे. मदनपंत ऊर्फ मादण्णा हा कुत्बशाही राखण्याचा प्रयत्न करीत असतां, मत्सरी सेनापतीच्या दुष्ट बेतांत मारला गेला आणि शहा उघडा पडला, तेणेंकरून औरंगजेबाचा त्या राज्यांत सहज शिरकाव झाला. लखनौचे प्रसिद्ध विद्वान् गृहस्थ प्रो० मौलाना शिब्ली ह्यांनीं 'अन्नद्वा' नामक ऊर्दू मासिकांत ह्यासंबंधानें साधकबाधक प्रमाणें देऊन, औरंगजेबाच्या कृतीचें समर्थन केलें आहे.

ह्याच सुमारास इंग्रज लोक व औरंगजेब ह्यांचा बराच मोठा झगडा झाला, त्याचें वर्णन ब्रिटिश रियासत पृ० ४०३ वर आहे.

विजापूर व गोवळकोंडा हीं राज्यें जिंकिल्यावर औरंगजेबानें आपली नजर संभाजीकडे फिरविली. लवकरच तो दुर्वृत्त राजा बादशहाच्या हातांत सांपडला, तेव्हां त्याचा मोठ्या क्रूरतेनें वध झाला, (मार्च ११, स. १६८९). परंतु ह्या गोष्टींनीं औरंगजेबाचा हेतु तडीस गेला नाहीं.

विजापूर व गोवळकोंडा ह्या राज्यांत अनेक मराठे सरदार नोकरीस होते, ते आतां मराठ्यांस येऊन मिळाले. बादशहाच्या छावणींत प्लेगचा उद्भव होऊन पुष्कळ लोक मेले.

' औरंगजेबाच्या नाशाची ही सुरुवात होय; त्याच्या आयुष्याचा अत्यंत दुःखदायक भाग येथें सुरू झाला. मोगल बादशाहीचा विस्तार अतिशय झाल्यामुळें, त्याची व्यवस्था एका ठिकाणाहून व एका पुरुषाच्या हातून होणें शक्य नव्हतें. नवीन जिंकिलेल्या प्रदेशांची व्यवस्था लावणें व मराठ्यांना जिंकणें, हीं दोन कामें एका वेळीं सिद्धीस नेणें फार दुर्घट झालें. तिकडे उत्तरहिंदुस्थानांत बंडावे माजले. बादशहा राजधानीपासून दूर गेल्यामुळें कामदारांवरील दाब नाहींसा होऊन राज्यांत अव्यवस्था सुरू झाली. बादशहाचा आश्रय बंद पडल्यामुळें विद्या व कला यांचा झपाट्यानें न्हास झाला. ज्या बादशाहींत कांहीं तरी सुंदर असें नवीन काम झाल्याशिवाय दिवस जात नसे, त्या ठिकाणीं ह्या पंचवीस वर्षांत एक सुद्धां इमारत उठली नाहीं, कीं एक सुंदर चित्रयुक्त पुस्तक बाहेर आलें नाहीं. बादशहाची सर्व संपत्ति व उत्पन्न निरर्थक युद्धांत खर्च झालें. बंगालचा कारभारी मुर्शीदकुलीखान आपल्या प्रांताचा वसूल नियमानें पाठवी, म्हणून बादशहाचा योगक्षेम कसाबसा तरी चालला.' (Prof. Sarkar in Modern Review).

आपल्या राजाचा बादशहानें क्रूरतेनें वध केला त्यामुळें सर्व मराठे चिडीस जाऊन, त्यांनीं गनिमी काव्याच्या शिताफीच्या युद्धकलेनें बादशहाचा असा कांहीं सूड घेतला, कीं ह्या सतरा वर्षांत स्वदेशस्वातंत्र्यरक्षणार्थ मराठ्यांनीं केलेल्या उद्योगास उपमा देण्याजोगीं उदाहरणें इतिहासांत दुर्मिळ आहेत. प्रथम मोगल फौजेस हूल दाखवून आपल्या अंगावर आणून घ्यावी, क्षणार्धांत मागें फिरून तिची साफ कत्तल उडवावी, अन्नसामुग्री व पैसा बादशाही फौजेंत येत असल्यास, त्याची पाळत राखून तो मध्येंच लुटून फस्त करावा, अशा प्रकारें औरंगजेबासारख्या कसलेल्या व धोरणी पुरुषासही त्यांनीं इतकें हैराण केलें, कीं अखेरीस अत्यंत विपन्नावस्थेच्या यातनांमध्यें त्यास दुःसह असा परलोकवास स्वीकारावा लागला. उत्तरेंत रजपूत लोकांनीं औरंगजेबास दाद दिली नाहीं ही गोष्ट खरी; तथापि ते लढाईस जाण्याच्या आदल्या

दिवशीं बायकामुलांची व इष्टमित्रांची शेवटची भेट घेत, आणि निकरानें समोर येऊन तुटून पडत. परंतु मराठ्यांचा प्रकार वेगळा होता. आपण मरूं ही कल्पनाच त्यांच्या डोक्यांत नव्हती; मग रजपुतांप्रमाणें मुलांबाळांस भेटण्यास ते थोडेच थांबणार ! जिंकूं अशी खात्री वाटल्याशिवाय ते समोर येतच नसत. घोड्यावर एक गोधडीची घडी व अंगावर कांबळी, अशा थाटानें त्यांचे थवे पर्जन्यकाळच्या मेघांप्रमाणें आसपास मागमूस नसतां, मोगलांच्या अवाढव्य फौजेंसभोंवतीं एकदम गोळा होत, आणि क्षणार्धांत त्यांचा फन्ना उडवीत. मुसलमानांचीं अवजड हत्यारें पाहून त्यांस मनापासून हसूं येई. मोगलांच्या पुरवठ्यांतून पुरेसें अन्न लुटण्यास न सांपडल्यास, पाहिजे त्या गांवांत कांदाभाकर मिळण्यास त्यांस अडचण पडत नसे. नदीचें वांकण किंवा डोंगराचा वळसा यांत मोगली फौज सांपडली म्हणजे त्यांस कृतार्थता वाटे. अशा प्रकारें सतरा वर्षें बादशहा लढत होता. अशा विकट प्रसंगीं औरंगजेबाचें वृद्धावस्थेंतील चापल्य, त्याची मेहेनत व प्रत्येक गोष्ट स्वतः करण्याची त्याची हौस, हीं पाहून कोणासही आश्चर्य वाटल्यावांचून राहणार नाहीं. अनेक संकटें सोसून लढाईचें काम तो स्वतः पाहत होता, ही त्याची धन्य होय. अनेक वेळां नद्यांस पूर येऊन त्याचे असंख्य लोक प्राणांस मुकत; अन्नसामुग्री मिळत नसे; मोठमोठे दुष्काळ पडत; पटकीच्या सांथी येत; असें होई तरी त्यानें धैर्य सोडिलें नाहीं. तो सर्व कच्चा कारभार स्वतः पाही. लढाईचे बेत व नकाशे स्वतः करून पाठवीं. उत्तरहिंदुस्थानांतील राज्यव्यवस्थेबद्दल तो हमेश पत्रें लिहून पाठवीत असे. त्याच्या स्वदस्तुरच्या हुकुमाशिवाय काडी सुद्धां हालत नसे. परगण्यांतील लहानशा अंमलदाराची नेमणूक करणें किंवा एखाद्या लहानशा कारकुनाची निवड करणें हीं कामें सुद्धां तो स्वतः करीत असे. आपले कामदार कसा कारभार चालवितात, ह्याचा पूर्ण तपास तो ठेवीत असे. अशा कच्च्या कामांत तो लक्ष ठेवी, तरी राज्यांतील सर्व महत्त्वाच्या मोठमोठ्या कामांवरही त्याची दक्षता विशेष असे. ह्या सर्व गोष्टी पाहिल्या म्हणजे त्याच्या बुद्धिप्रभावाची तारीफ करावी तितकी थोडीच आहे. तथापि त्याचें चित्त कधींही स्वस्थ नसे. आपण आपल्या बापाची व भावांची जी दशा केली, तीच आपले मुलगे व सरदार आपली करतील

अशी त्यास नेहमीं काळजी असे. म्हणून सर्व नेमणुका त्यानें आपल्या स्वतःच्या हातांत ठेविल्या होत्या. तसेंच तो सरदारांच्या वारंवार बदल्या करीत असे. मुलांवर तर त्याची सारखी नजर असे. तसेंच इतर सर्व लोकांवर तो फार प्रीति दाखवी. कोणास दोष देणें झाला तरी त्यास चमत्कारिक शब्दरचनेनें खुष करण्याचा प्रयत्न करी. त्यानें अनेक उपाय केले, तरी त्याच्या अविश्वासी स्वभावामुळें लोकांची त्याजवर प्रीति जडली नाहीं. अखेरीस जिकडे तिकडे फार तंटे माजले. उत्तरेंत रजपूत, शीख व जाठ लोकांनीं बंडें केलीं. पंढरपूरच्या पूर्वेस इस्लामपुरी येथें चार वर्षे काढिल्यावर नस्रतजंग, फिरोजजंग, सुजायतखान, महंमद-मुरादखान, तर्बियतखान, व फत्तुल्लाखान हे त्याचे सरदार आपापसांत कलह करून एकदिलानें कामें करीत नाहींत, सबब त्यांजवर भिस्त न ठेवितां, ता. १९ ऑक्टोबर स. १६९९ रोजीं मराठ्यांचे किल्ले काबीज करण्यास बादशहा स्वतः निघाला. पण ह्या त्याच्या प्रयत्नांत त्यास विशेष सिद्धि मिळाली नाहीं. त्यानें एक किल्ला काबीज करावा, तोंच कांहीं दिवसांनीं मराठ्यांनीं तो परत घ्यावा, असा प्रकार चालला. मराठे लोकही हळू हळू बळावत जाऊन ते एकामागून एक आपले किल्ले परत घेऊं लागले. बादशाही फौज अगदीं थकून गेली. खजिना रिकामा पडून शिपायांस पगार देण्यास बादशहापाशीं कांहींच नाहींसें झालें. आजपर्यंत सर्व शिपायांस फारच नियमानें पगार मिळत असे. परंतु आतां अशा प्रकारें दैन्यावस्थेंत हाल होत होत शेवटीं औरंगजेब वाकिनखेड्याजवळ दिवापूर येथें स. १७०५च्या पावसाळ्यांत जाऊन राहिला. तेथेंच आजारी पडून तो अशक्त झाला. तरी रोजचें काम व आग्रह तो सोडीना. शेवटीं बहादूर-पुरास जाऊन ता. २० जानेवारी १७०६ रोजीं तो अहंमदनगरास परत आला. ह्या वेळीं मराठ्यांच्या तडाक्यांतून त्याची मोठ्या कष्टानें सुटका झाली. ह्याप्रमाणें ज्या अहंमदनगरांतून वीस वर्षांपूर्वीं अवाढव्य सैन्यानिशीं औरंगजेब बाहेर पडला होता, त्याच शहरीं अगदीं हतवीर्य होऊन तो कार्यदक्ष बादशहा मोठ्या कष्टानें परत आला. तेथें त्याची प्रकृति उत्तरोत्तर फारच क्षीण होत चालली. एखाद्या पराक्रमी पुरुषाचा शेवट अत्यंत दुःख-दायक झाला असेल तर तो औरंगजेबाचा होय. आपल्या पन्नास वर्षांच्या कारभारानें आपण सर्व राज्याचा नाश केला, हें पाहून त्यास काय बरें

NATIONAL ARCHIVES OF INDIA

वाटलें असेल! त्याच्या कौटुंबिक संसाराचीही अशीच दुर्दशा होती. लोकांस मरणसमयीं कुटुंबाचीं माणसें जवळ असावींशीं वाटतात. पण औरंगजेबास आपले मुलगे मुळींच जवळ नकोत असें वाटे. चारही मुलांस त्यानें केव्हांना केव्हां कैदेंत ठेविलें होतें. बापासारखीच ते आपली अवस्था करतील! आपले डोळे मिटले कीं, पुनरपि हे एकमेकांच्या मानेस बसून सर्व देशभर धुमाकूळ मांडल्याशिवाय राहणार नाहींत. दुसरी मुलगी वृद्धकुमारिका झीनतुन्निसा व बायको उदेपुरी ह्या दोघी वृद्ध बादशहाच्या बिछान्याजवळ बसून होत्या. 'माझ्या मुलाचा पुढें सांभाळ कोण करणार,' असें म्हणून उदेपुरी सारखी रडत होती. 'बाबांनों, माझ्या पश्चात् भांडूं नका,' म्हणून त्यानें विनवणीचीं पत्रें दोघां मुलांस लिहिलीं. धाकटी मुलगी गौहर-आरा मार्च स. १७०६त वारली. शिवाय दुसऱ्या मुली, पुतणे, नातू, वगैरे अनेक माणसें ह्याच वर्षीं मृत्युमुखीं पडलीं. त्याच्या चौदा भावंडांपैकीं आतां औरंगजेब एकटा जिवंत होता. अहंमदनगरीं आल्यावर आपण आपल्या शेवटल्या मजलेस येऊन पोंचलों असें त्यास वाटलें. तेथून जीं पत्रें त्यानें लिहिलीं आहेत, त्यांवरून त्याच्या शरीरास किती क्लेश होत होते, त्याची इहलोकीं कशी निराशा झाली होती, परलोकची भीति त्यास किती पडली होती, हें एकदांच दृष्टीस पडतें. त्याच्या मुलांनीं मरणसमयीं जवळ येण्याची परवानगी मागितली, तेव्हां तो म्हणाला, कीं 'शहाजहान आजारी असतां जें निमित्त मीं योजिलें होतें, तें हेंच. महत्त्वाकांक्षेच्या धुराइतकी दुसरी कोणतीही हवा रोगकारक व सर्वस्वनाशकारक नाहीं.'

जानेवारी १७०७त त्याची प्रकृति फारच बिघडली. पुढें अंतकाळ समीप येतांच त्यानें आपल्या सर्व मुलांस निर्वाणीचीं पत्रें लिहिलीं. त्यांत खेदसूचक, उपदेशपर व निराशादर्शक पुष्कळ मजकूर आहे. पुढें त्यानें एक मृत्युपत्र लिहून सर्व राज्य आपल्या तिघां मुलांस वांटून दिलें. सर्व आयुष्यभर अत्यंत मोठें ऐश्वर्य भोगलेल्या बादशहास मरणसमयीं ईश्वराची व प्रत्यक्ष पोटच्या मुलांचीही दहशत पडावी, ह्यापेक्षां ज्यास्त दुःखकारक मरण दुसरें कोणतें असणार! अशा हालअपेष्टेंत पृथ्वीवरील एका अतिमोठ्या राज्याचा हा महान् बादशहा औरंगजेब आपल्या वयाच्या ८९ व्या वर्षीं व कार्किर्दीच्या ५० व्या वर्षीं,

सन १७०७, फेब्रुवारी, शुक्रवार तारीख २० रोजीं अहंमदनगर येथें मरण पावला; आणि त्याबरोबरच मोगल बादशाहीचा जुनाट व कोरम झालेला वृक्ष उपटून पडला. त्याच्या कित्येक शाखा कांहीं दिवस धडपड करून जीव धरून होत्या, पण त्याही पुढें लवकरच लयास गेल्या. आपल्या एकंदर आयुःक्रमांत नांव घेण्यासारखें कांहींच सत्कृत्य आपल्या हातून घडलें नाहीं, अशा बुद्धीनेंच कीं काय, औरंगजेबानें आपला अंत्यविधि, डामडौलाचा समारंभ कांहीं न करितां, अत्यंत साधेपणानें करावा अशी आज्ञा केली होती; आणि तत्प्रीत्यर्थ 'स्वहस्तलिखित कुराणाच्या प्रती विकून उत्पन्न झालेल्या रकमेंतून पांच रुपये खर्च करण्याविषयीं त्यानें अंतकाळीं आपली इच्छा दर्शविली होती. तदनुसार तो प्रेतविधि उरकण्यांत येऊन त्याचें शव दौलताबादेनजीक खुलदाबाद येथें शेख-झेनुद्दीन नामक एका प्रसिद्ध साधूच्या कबरेशेजारीं पुरण्यांत आलें. त्यानें आपली कबर अगोदरच बांधून ठेविली होती. स्वतःच्या श्रमानें मिळविलेले आठशेंपांच रुपये त्यानें गरिबांस वांटण्याकरितां ठेविले होते. मरणापूर्वीं एक मृत्युपत्र करून त्यांत त्यानें असें ठरविलें होतें, कीं पूर्व व उत्तर दिशांकडील आपलें राज्य मुअज्जम व अज्जम ह्या दोन मुलांनीं वांटून घ्यावें, व कामबक्ष ह्यानें दक्षिणचें राज्य घ्यावें. परंतु ही व्यवस्था अमलांत आली नाहीं हें पुढें कळून येईलच.

८. **औरंगजेबाची योग्यता.**—लेन्पूल म्हणतो, 'शहाजहाननें कैदेंत पडल्यावर आपली तरवार औरंगजेबाकडे पाठवून दिली. तिच्यावर आलमगीर हा फारशी शब्द कोरलेला होता. तेंच नांव औरंगजेबानें स्वीकारिलें; आणि त्याच नांवानें मुसलमान लोक त्यास ओळखितात. कडकडीत धर्माचरण हेंच औरंगजेब आपलें मुख्य कर्तव्य समजत असे. त्यापुढें संसारसुखाची त्यानें यत्किंचित् परवा केली नाहीं. त्याचीं सर्व कृत्यें धर्मप्रेरित आहेत. गाणेंबजावणें, नाचतमाशे, खाणेंपिणें, कपडालत्ता, अत्तरगुलाब, असले विलास त्यानें कधीं भोगिले नाहींत. मांसमद्यांस त्यानें कधींच स्पर्श केला नाहीं. स. १६६५त महिनाभर एक धूमकेतु उगवला होता, त्या अवकाशांत त्यानें सबंध उपोषण केलें. फक्त थोडें पाणी व भाकरीचा तुकडा खाऊन तो राहिला. तो नेहमीं व्याघ्रांबर टाकून जमिनीवर निजे. प्रत्येकानें स्वतः काम करून आपलें

पोषण करावें, ही इस्लामाची अनुज्ञा पाळण्याकरितां, औरंगजेब स्वतः आपल्या हातानें डोक्याच्या पातळ टोप्या करून विकी. त्याला सर्व कुराण तोंडपाठ येत होतें. ह्या सर्व गोष्टी त्यानें राज्य संभाळण्याकरितां केल्या असें नाहीं. त्यानें आपले सर्व प्रतिस्पर्धी अगोदरच मारून टाकिले होते. तेव्हां धर्माचरण बाजूस ठेवूनही त्याचें राज्य जहांगीर-शहाजहानप्रमाणेंच चैनींत चालण्यांत कोणतीच हरकत नव्हती; इतकेंच नव्हे, तर धर्मशास्त्र बाजूस ठेवून केवळ व्यवहारनीतीकडे दक्षतेनें लक्ष्य दिल्यानेंच अकबराची भरभराट झाली होती. अकबराचा सारासार विचार, जहांगीरची विषयवासना किंवा शहाजहानचा ऐषआराम, ह्यांचा स्वीकार करण्यास औरंगजेबास स्वतःच्या मनाशिवाय दुसरी कांहीं एक आडकाठी नव्हती. हिंदूंना तर असला खडतर धर्मिष्ठ राज्यकर्ता नको होता. औरंगजेब रजपुतांच्या वाटेस गेला नसता, तर आपण होऊन, त्याजवर शस्त्र धरण्याची बुद्धि त्यांना कधींच झाली नसती. औरंगजेबाच्या ठिकाणीं दुसरा कोणी असता, तर असा भलताच खटाटोप करण्याच्या नादास तो पडता ना. बाप व आजा यांसारखी चैन करून दिवस काढणेंच त्यास ज्यास्त पसंत पडलें असतें. परंतु धर्माच्या केवळ मानसिक समाधानाकरितां सर्वस्वाचाही त्याग करण्यास औरंगजेब तयार झाला, ही गोष्ट मोगलांच्या इतिहासांत अगदीं अपूर्व आहे. औरंगजेब निर्बुद्ध नव्हता; आपण करितों काय, आणि त्याचे परिणाम काय होतील, हें समजण्याची त्यास अक्कल होती. गादीवर आला त्या वेळेस तो पोरवयांत नव्हता. त्या वेळीं त्याचें वय चाळीस वर्षांचें असून, त्यानें राज्याच्या हरएक बाबतींत अनुभव मिळविला होता. असें असून, हिंदूंचीं मनें दुखवून त्यांच्या धर्माचा पाडाव करणें, ज्यांच्या पराक्रमावर सगळ्या लष्करची भिस्त अशा शियापंथी प्रबल सरदारांना नाराज करणें, दरबारांतील हरएक आनंद व गंमत नाहींशी करून सर्व दरबारी लोकांना कंटाळा आणणें, ह्या गोष्टी केल्यानें आपलें राज्य उलथून पडेल, हें औरंगजेबास पूर्णपणें समजलें असेल. हें सर्व समजून, त्यानें आपली कर्तव्यमर्यादा ठरविली; आणि अखेरपर्यंत ती ढळूं दिली नाहीं. सन १६५६ त तो दाक्षिणेंतून राज्य मिळविण्यासाठीं निघाला, त्या वेळेस जो उद्देश त्याच्या मनांत होता,

तोच उद्देश अहंमदनगर येथें त्याच्या मरणसमयीं कायम होता. त्यास सारासारविचारास जागाच नव्हती. माझ्या मनानें घेतलें, मी करणार, ह्या आग्रहावर सर्व कांहीं चाललें. त्याचा निश्चय कधीं ढळला नाहीं. त्याच्यासारखे शूर व धीट पुरुष थोडेच निपजले. कसेंही संकट आलें तरी तो आपला निश्चय ढळूं देत नसे. राज्यप्राप्तीच्या वेळेस केलेलीं क्रूर कृत्यें वगळून दिलीं, म्हणजे न्यायाच्या कामांत त्यास इस्लामी कायद्याप्रमाणें दोष लागण्याजोगें यत्किंचित् कृत्य त्याच्या हातून घडलें नाहीं. त्याच्या ह्या न्यायप्रियतेची स्तुति त्याच्या शत्रूंनीं सुद्धां केली आहे. राव किंवा रंक दोनही त्यास अगदीं सारखे असत.'

त्याच्या स्वभावांत अविश्वास मात्र पूर्ण भरला होता. विषप्रयोगाची तर त्यास एकसारखी भीति असे. वैद्यानें गोळी किंवा औषध आणिलें, कीं प्रथम तितकाच भाग स्वत: वैद्य घेऊन दाखवील, तरच बादशहा औषध घेई. त्याच्या बापाच्या वेळेस हाच प्रघात होता. धर्मनिष्ठ मुसलमान त्याची स्तुति करितात, परंतु राज्यांतले इतर सर्व लोक त्यास अगदीं कंटाळून गेले होते.

औरंगजेबाच्या गुणदोषांचें परीक्षण त्याच्या वर सांगितलेल्या कृत्यांवरून सहज होण्याजोगें आहे. मोगलवंशांत ऐतिहासिक दृष्ट्या विवेचनार्ह असा दुसरा पुरुष औरंगजेबानंतर कोणीच झाला नाहीं. तसेंच त्याच्या पुढील पुरुषांत राज्यधोरण म्हणून कांहीं नव्हतें. कुटुंबांतील सर्व प्रतिस्पर्धी मंडळी त्यानें नाहींशी केली, एवढ्यावरच त्यास दोष देण्याचें कारण नाहीं. शहाजहाननें तोच प्रकार केला होता. दक्षिणचीं मुसलमानी राज्यें जिंकण्याबद्दलही त्यास नांवें ठेवण्याचें कारण नाहीं. उलट दक्षिणदेश जिंकण्याचें पिढीजाद काम तडीस नेल्याबद्दल त्याची वाहवा केली पाहिजे. परंतु एवढ्या बलिष्ठ राज्याची सर्व शक्ति औरंगजेबानें हिंदूंचा पाडाव करून मुसलमानी धर्माची अभिवृद्धि करण्यांत खर्चिली हें अत्यंत शोचनीय होय. प्रजाजनांस समबुद्धीनें वागविण्याच्या पद्धतीवर ज्या राज्याचा अकबरानें पाया घातला, तें राज्य औरंगजेबानें जुलमानें व दुराग्रहानें मोडकळीस आणिलें. तो जिवंत असेपर्यंत निरनिराळे भाग कसे तरी एक ठिकाणीं होते, परंतु तो मरण पावतांच ते सर्व विसकळीत झाले आणि बादशहा ह्या नांवांत कांहीं अर्थ राहिला नाहीं.

औरंगजेबाच्या स्वभावाचें आरंभीं वर्णन दिलें आहे, त्यावरून असें दिसून येईल, कीं शहाजहानच्या मुलांतून त्यासच राज्य मिळणें अपरिहार्य होतें. राज्य प्राप्त होतांच त्यानें पूर्वींची परंपरागत पद्धति मोडून, कोणाचें न ऐकतां व कोणासही न विचारतां आपल्या राज्यनौकेचें सुकाणूं अशा रीतीनें चालविलें, कीं मातीच्या घड्याप्रमाणें क्षणमात्रांत फुटून नाहींशी होण्यास ती पात्र झाली. धर्मसंबंधीं दुराग्रहाचे प्रयत्न तडीस नेतांना प्रत्यक्ष राज्य लयास गेलें तरी हरकत नाहीं, असें समजणारा स्पेनदेशाचा राजा दुसरा फिलिप व हा औरंगजेब, ह्यांजमध्यें एक प्रकारचें निकट साम्य दृष्टीस पडतें. *आपल्या सभोंवार काय गोष्टी चालल्या आहेत आणि तत्कालीन लोकांच्या परिस्थितीचा झोंक कोणीकडे आहे, हें समजून घेण्याकडे दोघांनींही सारखेंच दुर्लक्ष केलें.* राज्यांतील हरएक कामाचा खडानखडा तपशील स्वहस्तें तडीस नेण्यांत दोघांनाही कधीं थकवा येत नसे, व कितीही संकटें आलीं, तरी दोघांचाही दम कधींह सुटला नाहीं. तरी दूरदृष्टीचा अभाव व कोतें मन ह्या दोषांचें उत्कृष्ट उदाहरण तेच दोघे पुरुष होत. स्वाभाविक वर्तन, सत्ता, ऐश्वर्य, दुराग्रह, व ह्या सर्वांचा मुकुटमणि अविश्वास व बेइमान, इत्यादि गोष्टींत औरंगजेबाचा समकालीन फ्रान्सचा बलिष्ठ राजा चौदावा लुई ह्याच्याशीं त्याचें साम्य उत्तम जुळतें. चांगले गुण अंगांत असूनही कित्येक अक्षम्य दोषांमुळें दोघांच्याही शत्रूंस चांगलें फावलें. स्वभावांतील दोष एका बाजूस ठेविले, तरीही स्वानुरक्त रजपूत राजांस विनाकारण दुखविणें, निरपराधी व प्रसंगीं स्वतःस साह्य देणारीं विजापूर व गोवळकोंडा येथील स्वधर्मी राज्यें बुडविणें, व मराठ्यांचा निःपात करण्याच्या मृगजलप्रयत्नापायीं सर्व शक्तीचा व्यय करणें, ह्या त्याच्या राज्यकारभारांतील चुका अगदीं अक्षम्य होत, ह्यांत संशय नाहीं. शेवटीं त्यास इतकें दुःख व निराशा प्राप्त झाली, कीं आपल्या पश्चात् राज्याची सुव्यवस्था लावून देण्यास त्यास सुचलें नाहीं. इहलोकचा कष्टप्रद वास केव्हां एकदां संपेल असें त्या भांबावलेल्या बादशहास अखेरीस झालें. सारांश, त्याच्या स्वभावांतील मुख्य व्यंग बेभरंवसा; तें नसतें तर मोगल बादशहांत पहिलें पद मिळविण्यास तो लायक होता. त्याचा पोशाख व वृत्ति अगदीं साधी असे. चष्मा लावल्या-

शिवाय लोकांचे अर्ज स्वतः वाचून त्यांजवर स्वहस्तें तो शेरे करी. कलाकौशल्याच्या कामांत त्यानें विशेष खर्च केला नाहीं. धर्मसंबंधांत तो आग्रही होता तरी धर्मवेडा नव्हता. हिंदु लोकांवर त्यानें नानातऱ्हेचे जुलूम केले हीं गोष्ट खरी; तरी धर्माच्या सबबीवर त्यानें क्रूरपणा केला नाहीं. त्याचें हस्ताक्षर उत्कृष्ट होतें.

'ह्याप्रमाणें शेवटच्या थोर मोगल बादशहाचा अंत झाला. हट्टी, दुराग्रही व संशयी असा असूनही थोरपणा मिळवून देणारे कित्येक गुण त्याच्या अंगीं होते. शिक्षक, सेनापति, वजीर, धर्मशास्त्रज्ञ, असल्या एखाद्या कामास तो फार योग्य होता. परंतु मनुष्यांच्या अंतःकरणावर अंमल करण्याचें जें राजाचें काम त्यास तो मुळींच लायक नव्हता. त्याचें खासगी वर्तन साधें व पवित्र होतें. त्यास उद्योगाची आवड असून, चैन व ऐषआराम नको असे. 'पिकलेल्या केसांचा वृद्ध बादशहा दररोज दरबार भरवून काम करितो. लोकांचे अर्ज घेऊन ते स्वतः वाचतो; आणि स्वहस्तानें त्याजवर शेरे करून, त्याचा निकाल करितो, हा प्रकार पाहून, युरोपियन प्रवाश्यांना धन्यता वाटली.' त्याचीं स्वतःचीं सुमारें दोनहजार पत्रें उपलब्ध आहेत. नियमांची व हुकमांची अंमलबजावणी तो अगदीं कसोशीनें करीत असे. तो म्हणे, 'एक नियम मोडूं दिला, कीं लगेच लोक सर्वच नियम मोडूं लागतात.' तथापि अंमलबजावणी करितांना नियमांच्या खऱ्या इद्गताकडे त्यानें लक्ष पुरविलें नाहीं. प्रत्येक गोष्ट स्वतः करण्याच्या त्याच्या हौसेमुळें त्याचे अंमलदार केवळ यंत्रासारखे बनले. त्यांची स्वतःची हुशारी बाहेर येण्यास अवकाश राहिला नाहीं. त्याचे मुलगे बुद्धिमान होते, तरी बापाच्या संशयी स्वभावानें त्यांच्या अंगची हुशारी व तरतरी पार नाहींशी झाली. त्याचें अंतःकरण कठोर होतें; त्यास दयेचा पाझर फारसा फुटत नसे. शरण आलेल्या शत्रूस उदारपणानें वागविणें, किंवा खासगी व्यवहारांत मनमिळाऊपणानें लोकांत मिसळणें ह्या अकबराच्या गुणांचा औरंगजेबास बिलकुल संपर्क नव्हता. कपटी स्वभावामुळें त्याजवर भक्ति अशी कोणाचीच बसली नाहीं. कितीही चांगला मनुष्य त्याच्याजवळ आला, तरी त्याची चित्तवृत्ति अगदीं गारठून जात असे. ललितकलांस त्यानें हद्दपार केल्यामुळें, आनंदाचा व्यवसाय असा त्यास कांहीं राहिला नाहीं.

लोकांच्या सुखदु:खांची त्यास कधीं पर्वा वाटली नाहीं, म्हणून सगळें जीवन त्यास नीरस झालें. सारांश, आपल्या राज्याच्या नाशाची संपूर्ण तजवीज त्यानें आपल्या पन्नास वर्षांच्या कार्किर्दींत उत्तम प्रकारें करून ठेविली.' (Modern Review).

रजपुतांचा कैवारी कर्नल टॉड व दुसरे कित्येक आंग्ल ग्रंथकार ह्यांनीं औरंगजेबावर नानातऱ्हेचे वाक्प्रहार करून, त्याच्या इतका दुष्ट व अधम राजा सर्व आशियाखंडांत कधींच झाला नाहीं, असें प्रतिपादन केलें आहे. हें प्रतिपादन जमेस धरल्यास पाश्चात्य राज्यकर्त्यांपैकीं बरेच मोठे व प्रसिद्ध राज्यकर्ते औरंगजेबाच्याच कोटींत बसवावे लागतील. औरंगजेबाची राज्यपद्धति ज्यास्त उदार व निष्पक्षपाताची असती, तरी मोगल बादशाहीचा लय होण्याचा समय नजीक आला होता, असें इतिहासज्ञांस कबूल करावें लागेल. शीख, जाठ, मराठे इत्यादि रणशूर लोकांच्या अंगीं जो नवीन जोम अलीकडे येत चालला होता, त्याचा प्रवाह बंद करणें अतिशय शहाण्या राजपुरुषांसही दुर्घट झालें असतें. औरंगजेबाच्या सदोष राजपद्धतीमुळें बादशाहीचा लय थोडाबहुत लवकर झाला, एवढाच काय तो फरक दिसतो. शिवाय पाश्चात्य राष्ट्रांनीं केलेल्या हल्ल्यांचा आघात मोगल बादशाहीस फार दिवस सहन करितां आला नसता. मोगल बादशाहीचा विध्वंस करण्याचें काम वर सांगितलेल्या भिन्नभिन्न जातींच्या लोकांनीं तडीस नेलें नसतें, तरी डच, फ्रेंच, इंग्रज इत्यादि राष्ट्रांशीं मोगलांस झगडा करावा लागलाच असता; आणि अशा पौर्व्य आणि पाश्चात्य राष्ट्रांच्या युद्धांत अंतीं सिद्धि कोणास मिळाली असती, ह्याजबद्दल फारसा संशय घेण्याचें कारण दिसत नाहीं.

९. **औरंगजेबाची राज्यव्यवस्था.**—येथपर्यंतच्या वर्णनावरून औरंगजेबाची राज्यव्यवस्था कोणत्या प्रकारची असली पाहिजे, याची योग्य अटकळ करितां येईल. विधर्मी राजानें एवढ्या अफाट लोकसंख्येच्या देशावर राज्य केल्याचीं उदाहरणें हिंदुस्थानासारखीं फारशीं नाहींत. अशा ठिकाणीं लोकांच्या तंत्रानें वागून राज्यास बळकटी आणणें हें राज्यकर्त्यांचें आद्य कर्तव्य होय. अकबर बादशहानें हें कर्तव्य नेहमीं आपल्या दृष्टीसमोर ठेविलें होतें, म्हणूनच हिंदुस्थानांतील शेंकडों राजेरजवाडे त्याजकरितां जिवास जीव देण्यास सदा तत्पर असत.

औरंगजेबानें आपला राज्यकारभार निराळ्याच तत्त्वावर बांधिला. इराणी, पठाण व रजपूत, असे निरनिराळे लोक नोकरीस ठेवून त्यांच्या आपसांतील वैमनस्याच्या जोरावर एकमेकांस एकमेकांची दहशत बसावी अशी त्यानें योजना केली. फौजेच्या अंतर्व्यवस्थेंत औरंगजेबानें नवीन फेरफार विशेष केले नाहींत. अमीर, मनसबदार वगैरेंच्या नेमणुका व अधिकार अकबराच्या प्रमाणेंच होते. बारा हजार स्वारांची नेमणूक मिळत असलेले पंचवीस तीस अमीर दिल्लीस बादशहापाशीं होते असें बर्नियरचें म्हणणें आहे. प्रत्येक स्वाराचा पगार सुमारें २५ रुपये होता. फौजेंतील अधिकाऱ्यांच्या नेमणुका वंशपरंपरेच्या नव्हत्या. नेमणूकदार मरण पावला, म्हणजे त्याची नेमणूक व जिंदगी सरकारांत जाई. मयतांच्या मुलांस नोकरी देणें न देणें बादशहाच्या मर्जीवर असे. यामुळें लोकांस फारशी स्वतंत्रता मिळत नसे. बर्नियरच्या मतें घोडेस्वारांची संख्या दोनलाख होती. पैकीं चाळीसहजार नेहमीं बादशहासन्निध हजर असत. पायदळाचा मान फारसा नसे. त्यांस बंदूक वापरण्याची भीति वाटत असावीसें दिसतें; कारण प्रत्येकाजवळ बंदूक ठेवण्यास एक लांकडी घोडा असे. त्यावर ठेवून ते आपली बंदूक सोडीत. बंदूक फुटण्याचें व हात भाजून घेण्याचें भय त्यांस विशेष वाटे. नोकरचाकर, दुकानदार वगैरे बाजारबुणग्यांचा मोठा समूह नेहमीं फौजेबरोबर असून, त्यांची संख्याही फौजेंत गणली जात असे. बादशाही फौजेंत लहानसा तोफखानाही असे. एकंदरींत राज्याच्या महसुलाचा बराच मोठा भाग फौजेच्या खर्चाकडे जाई.

राज्याच्या इतर खात्यांची व्यवस्थाही फौजखात्याच्या पद्धतीसारखीच होती. निरनिराळ्या प्रांतांवरील दिवाणी व लष्करी अधिकार एकाच इसमाच्या हातांत असत. त्या इसमाकडे सर्व प्रांताचा स्वतंत्र अधिकार असे. एकंदर प्रांताच्या वसुलाचा पांचवा हिस्सा बादशहाकडे पाठवून बाकीच्या रकमेंत त्यानें आपला, फौजेचा व सर्व खात्याचा खर्च भागवावयाचा असे. एकाच ठिकाणीं राहून, त्यांनीं आपलें वजन फाजील वाढवूं नये, म्हणून बादशहा त्यांच्या वरचेवर बदल्या करी. यामुळें प्रत्येक असामीचें लक्ष आपल्या प्रांतांतून होईल तितका पैसा काढण्याकडे असे; कारण पैसा हातांत असेल तर अडचणीच्या

प्रसंगीं त्यांस चांगली मदत होई. त्यांनीं एखादा अन्याय केल्यास त्याची दाद प्रत्यक्ष बादशहाशिवाय दुसऱ्या कोणाकडे मागतां येत नसे. काजी म्हणून जे न्यायाधीश असत, त्यांजवर प्रांताच्या अधिकाऱ्याचा सर्वस्वी दाबा असे. मधून मधून बादशहाचे तपासणीकामदार येत, ... त्यांचीं तोंडें बंद करणें फारसें अवघड नसे. दिल्ली आग्रा येथें व राजधानीच्या आसपासच्या ठिकाणीं असा अन्याय फारसा लपत नसे; आणि अशा ठिकाणीं बादशहाची न्यायप्रियता इतकी प्रसिद्ध झाली होती, कीं अन्याय करण्याचें धाडस कोणास होतच नसे. औरंगजेब बादशहा लोकांच्या फिर्यादी स्वतः ऐकून घेई. इतकेंच नव्हे, तर खराखरा प्रकार बाहेर काढण्यासाठीं *फिर्यादींना मनसोक्त बोलूं देई व हातवारे करूं देई; आणि त्यांजवर कधींही न चिडतां त्यांचें सर्व म्हणणें शांतपणें ऐकून घेई. आरोपींस कोणी अधिकारी दाबूं लागला, तर तें त्यास खपत नसे.*
परंतु राज्याच्या दूरदूरच्या प्रांतांत अन्यायपरिहार होण्याचें फारसें साधन नव्हतें. अशामुळें व्यापारी व इतर लोकांस सामर्थ्य असलें, तरी कामदारांच्या जवळ अगदीं गरिबीनें वागावें लागे. जेणेंकरून आपली खरी स्थिति बाहेर प्रगट होणार नाहीं, असे वर्तनोपाय ते धारण करीत. अकबराच्या वेळची व्यवस्था अशीच होती; पण अकबराच्या हातून बहुधा योग्य व अनुभवशीर माणसांची निवड होत असल्यामुळें लोकांस जाच होत नसे. औरंगजेब स्वतः जरी पक्षपाती, क्रूर किंवा अन्यायप्रिय नव्हता, तरी त्यानें केलेल्या सर्व नेमणुका सहेतुक असल्यामुळें व त्याच्या अत्यंत अविश्वासी स्वभावामुळें, लोकांस सचोटीनें काम करण्याची उमेद राहत नसे. तथापि औरंगजेबाची पन्नास वर्षांची कारकीर्द एकंदरींत शांततेची गेली असें म्हणण्यास चिंता नाहीं. प्रत्यक्ष बादशहानें सुरू केलेलीं युद्धें सोडिलीं, तर लोकांकडून दुसरे दंगेधोपे झाले नाहींत. बंगालच्या सरहद्दीवर चित्तगांव येथें आराकानचा राजा मोगलांचा पाडाव करण्यास नेहमीं टपलेला असे. मोगलांकडे नाराज होऊन गेलेल्या सर्व लोकांस त्याजकडे आश्रय मिळे. असे लोक चांचेपणाचा धंदा करून बंगालच्या उपसागरांतील मोगलांच्या व्यापारास सर्वकाळ त्रास देत. गंगानदींतून वर येऊन पांचपन्नास कोसपर्यंत लोकांस ते उपद्रव देत. हुगळी येथें असलेले पोर्तुगीज लोक त्यांस साह्य देत असल्या-

मुळेंच, शांतताप्रिय शहाजहान बादशहानें पोर्तुगीझ लोकांचा समूळ उच्छेद केला. चित्तगांवनजीक समुद्रांत संदीप नांवाचें एक बेट आहे, तेथें फ्रा जोन नांवाचा एक पाद्री राजाप्रमाणें अंमल करून वरील चांचे लोकांस सर्व प्रकारची मदत करी. ह्याच चांचे लोकांच्या मदतीनें शहाजादा सुजा यास आराकानांत पळून जातां आलें. शाएस्तखानानें या पोर्तुगीझ चांचे लोकांचा असा विलक्षण बंदोबस्त केला, कीं ते पुनरपि बादशाही मुलखास त्रास देऊं शकले नाहींत. डाक्काच्या खालीं कांहीं मैलांवर त्यांस राहण्यास शाएस्तेखानानें जागा दिली, तीस फिरंगीबाजार हें नांव अद्यापि चालत आहे. बंगालच्या उपसागरांतील चांचे लोकांचा शाएस्तेखानानें केलेला बंदोबस्त इंग्रज व्यापाऱ्यांच्या फार उपयोगी पडला.

औरंगजेबाच्या राजाच्या वसूल किती होता हें बरोबर सांगण्यास अनेक अडचणी आहेत. लोकांवर करांचें ओझें हल्लींच्या इंग्रजी राज्यापेक्षां मोगलांचे वेळीं ज्यास्त होतें, असें हंटरप्रभृति पाश्चात्यांचें म्हणणें आहे. परंतु ह्या प्रश्नाचा विचार ह्या ठिकाणीं करतां येत नाहीं. वसुलाच्या मानानें बादशहाचा खर्चही तसाच असून, औरंगजेबाचे मरणसमयीं खजिन्यांत केवळ तेरा लाख रुपये शिल्लक होते. एकंदर वसुलाच्या खात्यावर बादशहाची सक्त देखरेख होती. कामदारांच्या जुलमी वर्तनाबद्दल त्यांस शिक्षा करून लोकांस संतोष दिल्याचीं अनेक उदाहरणें औरंगजेबाच्या हातून घडलीं असून, निष्पक्षपाती परंतु निष्ठुर न्याय करणारा अशी त्याची कीर्ति आहे.

दाऊदखान पन्नी, शहाबुद्दीनखान ऊर्फ गाजीउद्दीन, व त्याचा पुढें प्रसिद्धीस आलेला मुलगा निजामउल्मुल्क्, आसद्खान व त्याचा मुलगा तक्रीबखान ऊर्फ झुल्फिकारखान, (संभाजी राजे यास संगमेश्वर मुक्कामीं पकडणारा), मीर जाफरखान ऊर्फ मुर्शीद कुलीखान (बंगालचा सुभेदार, ब्राह्मण असून मुसलमान झालेला,) सादतखान (अयोध्येचा वजीर), वगैरे मुसलमान सरदार औरंगजेबाच्या हाताखालीं प्रसिद्धीस आले. ते औरंगजेबाच्या शिस्तींत कसलेले असून त्यांनीं पुढें अनेक उलाढाली केल्या.

४७-१०-११-१०-७६१-२०००

प्रकरण सत्ताविसावें.

मोगलबादशाहीचें अंतरंग-परीक्षण.

स. १५२६-१७०७.

१. बादशहांची दिनचर्या. २. मोगलांचीं नाणीं.
३. फारसी इतिहास व हिंदुलोक. ४. राजघराण्याचें शिक्षण व विद्वत्ता.
५. राजा व प्रजा यांचे एकमेकांवर परिणाम.
(१) पेहराव. (२) युद्धकला. (३) बुद्धिप्रभाव. (४) प्रवास.
(५) शिल्पकला. (६) डांक. (७) दळणवळण. (८) कारागिरी.
६. गादीच्या वारसाविषयीं अनिश्चय. ७. अनियंत्रित सत्तेचीं नियंत्रणें.
८. अधिकारविभागणी. ९. संतमंडळ व तत्कृत ग्रंथसंग्रह.

१. बादशहांची दिनचर्या.—ह्या विषयावर प्रो. जदुनाथ सरकार ह्यांनीं मॉडर्न रिव्ह्यूच्या अंकांत दोन सुंदर लेख लिहिले आहेत, त्यांज-वरून बादशहाच्या कामाची व एकंदर मोगलराज्यव्यवस्थेची बरीच कल्पना मनांत येते. बादशहाच्या वैभवाचीं रसभरित वर्णनें वाचून कोणाची जर अशी समजूत होईल, कीं हे बादशहा केवळ चैनी व ऐषआरामांत लोळत पडणारे होते, तर ती समजूत चुकीची होय. अकबरापासून औरंगजेबापर्यंत चार बादशहांनीं दीडशें वर्षें राज्याचा उपभोग घेऊन, आपल्या राज्याचा दरारा वाढविला, आणि देशांत शांतता व भरभराट नांदूं दिली. हीं कामें चैनी व आळशी लोकांकडून होणें शक्य नाहीं. सर्वांत चैनी पुरुष शहाजहान होय. त्याचा दिनक्रम खालीं दिलेल्या मासल्यावरून समजून येईल.

सूर्योदयापूर्वीं दोन तास म्हणजे सुमारें चार वाजतां उठून व मुख-मार्जनादि आटोपून, शहाजहान बराच वेळ नामस्मरण करी. तो विधि आटोपल्यावर मक्केकडे तोंड करून कुराणाचा पाठ व पुढें वाड्यांतील मशिदींत जाऊन, दिवसाची पहिली प्रार्थना करी. ह्या कृत्यांत सुमारें दोनअडीच तास जात. नंतर पावणेसातांच्या सुमारास लोकांना दर्शन देण्यासाठीं तो झरोक्यांत येऊन बसे. ह्या झरोक्याचें वर्णन मागें

आलेंच आहे. यमुनानदीच्या वर आग्र्याच्या किल्ल्याच्या तटांत बादशहास बसण्यासाठीं सज्जासारखी बाहेर आलेली एक जागा तयार केलेली होती. म्हणजे बादशहा आंत किल्ल्याच्या बंदोबस्तांत राहून बाहेरच्या लोकांस आपलें दर्शन देई. दररोज सकाळीं बादशहाच्या दर्शनासाठीं हजारों लोक खालीं नदीच्या वाळवंटांत जमा होत. सूर्योदयानंतर दोन घटिकांनीं बादशहाची स्वारी ह्या झरोक्यांत येऊन बसे. लोक त्यास खालून वंदन करीत, आणि तो त्याचा स्वीकार करी. कोणास बादशहाकडे कांहीं अर्ज करणें असल्यास तो ह्याच प्रसंगीं रुजू करावयाचा असे. अर्जासाठीं वरून दोरी सोडण्यांत येई. तिला अर्ज बांधिला, म्हणजे तो वर ओढून घेत, आणि बादशहास वाचून दाखवीत; नंतर बादशहा त्याजवर योग्य तो निकाल देई. अर्ध्या तासानें सर्व लोक बाजूस करून, खालील वाळवंटांत हत्तींच्या टकरा चालू होत. हत्तींच्या टकरा फक्त बादशहाच्याच हुकमानें होत; दुसऱ्या कोणास त्या करण्याचा अखत्यार नसे. शहाजहानास ह्या टकरांचा मोठा शोक होता. दररोज पांचचार जोड्यांच्या टकरा होत. आठ वाजण्याचे जरा अगोदर स्वारी दरबारांत येऊन बसे. ह्या दरबारास दिवाणी-आम, म्हणजे सर्व लोकांचा मोठा दरबार असें नांव होतें. अकबर-जहांगीरच्या वेळेस हे दरबार मोठया तंबूंत भरत असत. स. १६२८त शहाजहाननें तंबूच्याच जागीं एक मोठा लांकडी मंडप बांधिला; आणि १६३८त हल्लींचा दगडी दिवाणी-आम त्यानें बांधिला. त्यास चाळीस भव्य खांब असून, तिन बाजू मोकळ्या आहेत. चवथ्या बाजूस भिंतीच्या मध्यभागीं जमिनीपासून बरीच उंच अशी बादशहाच्या सिंहासनाची आरसपानानें बांधिलेली जागा आहे. तेथें येण्याचा रस्ता पाठीमागून जनानखान्याच्या बाजूनें आहे. पुढून वर जाण्यास रस्ता नाहीं. ह्या दरबारांत सर्व लोक अगोदरच आपापल्या जागीं येऊन बसलेले असत. बादशहा मागाहून येई. केव्हां केव्हां राजपुत्र बरोबर येत, ते कधीं त्याजपाशीं बसत, किंवा कधीं खालीं उभे राहत. बादशहाच्या डाव्या उजव्या बाजूंस त्याच्या खास पाहऱ्याचे लोक उभे असत. हा दिवाणखाना २०१ फूट लांब व ६७ फूट रुंद आहे. त्याच्या तीनही बाजूंस चांदीचा कठडा असून प्रत्येकीं एक प्रवेशद्वार होतें. ह्या दालनांत सर्व मंडळींचा प्रवेश

होइनासा झाला, म्हणून चांदीच्या कठड्याबाहेरची जागा तयार करून तिच्या बाहेर दुसरा लांकडी कठडा ठेवण्यांत आला. ह्या कठड्यावर सुंदर नकशीकाम केलेलें होतें. ह्या बाहेरच्या जागेंत हलक्याप्रतीचे नोकर, आंतील दरबारांत बसलेल्या सरदारांचा लवाजमा, पहाऱ्यावरचे लोक, भालदार, चोपदार वगैरे मंडळी उभी असत. हा दरबार सुमारें दोन तास चालें; आणि इतका वेळ सर्व मंडळी उभी असत. बादशहापुढें लोकांनीं बसण्याचा परिपाठ नव्हता. सिंहासनास लागून खालीं वजिराची जागा होती. कठड्यांतील प्रवेशद्वारावर लोकांस ओळखणाऱ्या दक्ष प्रवेशकांचा पहारा असून, योग्य परवाना असल्याशिवाय ते कोणासही आंत सोडीत नसत. नवीन इसम दरबारांत येणें झाल्यास प्रथम तसा परवाना मिळवून, नंतर कोणी तरी जुन्या सरदारानें त्यास आपल्या बरोबर दरबारांत आणावें, असा नियम होता. शिवाजी औरंगजेबाच्या दरबारीं गेला, तेव्हां त्याजबद्दल प्रथम परवाना घेऊन, नंतर रामसिंगानें त्यास आपल्याबरोबर दरबारांत नेलें. लष्करांतले मनसबदार, प्रांतांतील कामदार, नवीन नेमणुका झालेले लोक, इत्यादिकांचे अर्ज वाचणें व त्यांजबद्दलच्या तजविजी करून देणें हीं कामें ह्या मोठ्या दरबारांत चालत. मुख्य बक्षी म्हणून एक अधिकारी असे, तो हीं कामें बादशहास समजावी व हुकूम होई तो ज्याचा त्यास कळवी. प्रत्येक खात्याचे मुख्य अंमलदार दरबारांत हजर असत. ते निरनिराळ्या जागांस नवीन इसमांची शिफारस करीत. त्यांच्या नेमणुका कायम झाल्यास त्यांस ह्या दरबारांत पोशाख मिळून, त्यांची कामावर रवानगी होई. राजपुत्र, प्रांतांतले अधिकारी व सरकारी बातमीदार ह्यांजकडून आलेलीं पत्रें ह्या दरबारांत बादशहास वाचून दाखवीत. पैकीं कांहीं महत्त्वाचीं पत्रें बादशहा स्वतः वाची, व कांहींचा फक्त मतलब त्याच्या कानावर घातला जात असे. नंतर प्रांतांतून न्यायाचीं अपिलें आलीं असतील, त्यांची सुनावणी 'सदर' म्हणून अधिकारी असे, तो करी. तसेंच विद्यार्थी साधु, फकीर इत्यादिकांस दानधर्म किंवा नेमणुका करून देण्याचें काम ह्या दरबारांत चाले. इकडे खास पागेचे घोडे व हत्ती वगैरे जनावरें बादशहाच्या दृष्टीस पडावीं म्हणून त्यांस त्यांच्यासमोरून फरवीत नेण्याचा क्रम चालूच असे. हीं सर्व कामें झाल्यावर सुमारें दोन तासांनीं हा दरबार संपे.

सुमारें दहा वाजण्याच्या थोड्या अगोदर ‘ दिवाणी-खास ’ च्या जागेंत खास सल्लागारांचें मंडळ भरे, तेथें बादशहा जाई. ह्यासच पूर्वी अकबराच्या वर्णनांत ‘ गुसलखाना ’ असें नांव होतें. कारण त्या वेळीं दिवाणी-खासच्या जागेंतच स्नानगृह होतें. दिवाणी-खासमध्यें आल्यावर तेथें खासमंडळींच्या भेटी होत; सल्लामसलत चाले; महत्त्वाचीं पत्रें व जबाब स्वहस्तानें बादशहा लिही. लिपिकांचे जबाब व निकाल बादशहा तोंडी सांगे, त्याप्रमाणें ते लिहून काढिल्यावर बादशहास ते वाचून दाखविण्यांत येत. ह्याप्रमाणें सर्व कागद तयार झाल्यावर जनानखान्यांतील पहाऱ्यांत मुख्य शिक्का असे, तो आणवून सर्व कागदांवर सहीशिक्के होत. नवीन इमारतींचे नकाशे, कारागिरीचीं कामें वगैरे तपासून पाहिल्यावर, बादशहा सांगेल ते फेरफार करून, जवळ वजीर असे, तो त्या त्या प्रकारचे शेरे करून, खर्चाची मंजुरी घेऊन देई. शहाजहान बादशहास शिल्पकामाचा मोठा शोक असल्यामुळें, ह्या कामांत त्याचा पुष्कळच वेळ जाई. येथें सुद्धां कित्येक शिकारीचीं वगैरे जनावरें बादशहास दाखविण्यांत येत.

ह्याप्रमाणें दिवाणी-खासमध्यें सुमारें दोन तास राज्याच्या खास मसलतींचें काम चालल्यावर, ‘ शहाबुर्ज ’ म्हणून वाड्याच्या उंच भागीं एकांत जागा केलेली होती; तेथें अत्यंत गुप्त कारस्थानासाठीं बादशहा जाई. ज्या इसमांस तो वर बोलावी, तेवढेच वर जावयाचे असत. बाकी नोकर वगैरे सुद्धां सर्व खालींच दारापाशीं बसत. गुप्त पत्रव्यवहार व इतर गोष्टींचा खल ह्या ठिकाणीं होत असे. जरुरीप्रमाणें वजीर बरोबर असे. ह्या शहाबुर्जावर बादशहा अर्धापाऊण तास किंवा तसेंच काम असल्यास ज्यास्त वेळ बसत असे.

ह्याप्रमाणें मध्याह्नपावेतों बादशहाचा सर्व वेळ कामांत जाई. नंतर लगेच जनानखान्यांत जाऊन, दुपारची प्रार्थना म्हटल्यावर, भोजन करून, बादशहा तासभर पडून विश्रांति घेई. ह्या विश्रांतीच्या वेळेंत सुद्धां बहुधा जनानखान्यासंबंधींच कामें चालत. गरीब विधवा, मुलें, विद्वान् व आश्रित मंडळींच्या गरीब मुली, इत्यादिकांची तजवीज लावण्यासाठीं त्यांचे अर्ज वाचून, हुकूम देण्यांत येत. सतिउन्निसा म्हणून शहाजहानच्या जनानखान्यावर एक बाई नोकर होती, तिनें प्रकरणें बादशहास समजावण्याचीं असत. जवळ बसून, राणी आपला अभिप्राय त्यांजवर देई. अशा प्रकारें

NATIONAL ARCHIVES OF INDIA

जनानखान्यामार्फत पुष्कळ काम होत असे. तीन वाजतां तिसरे प्रहरची प्रार्थना आटपून, जरूर असेल तर बादशहा पुनरपि दिवाणी-आममध्यें येई. तेथें थोडया वेळांत जरुरीचें काम असेल तें उरकून, स्वारी लगेच दिवाणी-खासमध्यें जाई. तेथें उत्तम प्रकारची रोपनाई केलेली असे. येथील वेळ बहुतेक गायन, वाद्य वगैरे करमणुकींत व आनंदांत जाई. स्वतः शहाजहान चांगला गाणारा असून त्यास गाण्याचा शोक होता. आठ वाजतां पुनरपि जरुरीच्या मुख्य कामासाठीं बादशहा शहाबुर्जावर जाई. तेथें वजीर, बक्षी वगैरे जरूर ते अधिकारी त्याजबरोबर असत. साडेआठ वाजतां बादशहा परत जनानखान्यांत जाई; आणि भोजनानंतर तेथें केव्हां वाचन व केव्हां गायन चालू असे. *बादशहाच्या बिछान्याजवळ पडद्यामागें वाचक मंडळी बसून, झोंप लागेपर्यंत त्यास निरनिराळीं* पुस्तकें वाचून दाखवीत. तयमूरचें चरित्र व बाबरचें आत्मचरित्र हीं शहाजहानचीं आवडतीं पुस्तकें असत. दहा साडेदहा वाजतां बादशहा झोंपीं जाई. तो चारवाजेपर्यंत सुमारें सहा तास निजत असे.

हा सामान्य कार्यक्रम झाला. शुक्रवारीं सुट्टी असून दरबार वगैरे सर्व बंद असत. बुधवारीं नेहेमींचा कार्यक्रम न चालतां तो दिवस फक्त न्यायाच्या अपिलांकरितां नेमिलेला असे. दर बुधवारीं आठ वाजतां बादशहा झरोक्यांतून एकदम दिवाणी-खासमध्यें येई. तेथें न्यायाधीशांशिवाय इतरांस येण्याची परवानगी नसे. निरनिराळ्या ठिकाणांहून आलेले अर्जदार व गुन्हेगार बादशहापुढें उभे करून त्यांजबद्दलचा शेवटचा निकाल देण्यांत येई. केव्हां निकाल होई; केव्हां फेरतपासासाठीं पुनः तीं कामें परत प्रांतांत जात.

दिल्ली, आग्रा वगैरे राजधानींतला हा सामान्य क्रम असे. पण पुष्कळदां स्वारी फिरतीवर असे, तेव्हां हा क्रम बदले. सायंकाळीं बादशहा घोड्यावर किंवा हत्तीवर बसून शहरांत फिरावयास निघे; केव्हां यमुनानदीवर होडींत बसून सहल करी, किंवा शिकारीस जाई. सर्व मोगल बादशहा मोठे चपळ व उद्योगी होते. त्यांस एकाच ठिकाणीं स्वस्थ बसणें व नुसत्या चैनींत वेळ घालविणें मुळींच आवडत नसे. सर्वांत अतिरंगेल म्हटला, तर शहाजहान. त्याचीच वरील रीत जर इतकी उद्योगपूर्ण आहे, तर इतरांबद्दल ज्यास्त काय सांगावें! बादशहा

अलौकिक बुद्धिमान व उद्योगी असल्याशिवाय एवढ्या मोठ्या राज्यांत, विसाव्या शतकांतील साधनांच्या अभावीं, शांतता व बंदोबस्त राहिला नसता हें निर्विवाद आहे.

औरंगजेबाची दिनचर्या बऱ्याच अंशीं वरच्यासारखीच होती. मात्र त्यांतील गाण्याबजावण्याचा व चैनीचा भाग वगळून त्या ठिकाणीं धार्मिक व ईशस्तवनाचा भाग वाढविलेला होता. सकाळीं पांच वाजतां उठून, तो वाड्यांतील मशिदींत जाऊन, ईशचिंतन व प्रार्थना करी. साडेसात वाजतां झरोक्यांत येऊन बसे. नंतर दिवाणी-आम व दिवाणी-खासमधील कामें करून, बारा वाजतां जनानखान्यांत जाई. भोजनोत्तर थोडी विश्रांति झाल्यावर, औरंगजेबाचा पुढचा सर्व वेळ धर्मशास्त्राच्या अध्ययनांत जाई. सायंकाळीं पुनः राज्याचीं कामें चालत. औरंगजेबानें गाणेंबजावणें तर सर्व मना केलेलें होतें; म्हणून ईशस्तवन व राज्याचें काम ह्यांतच त्याचा सर्व वेळ खर्च होई. गुरुवारीं अर्धा दिवस ज्यास्त सुट्टी औरंगजेब देत असे. पण औरंगजेबाची एकंदर कारकीर्द लढण्यांत वा छावणींत खर्च होऊन निरनिराळ्या युद्धांच्या व्यवस्थेंत त्याचा बहुतेक वेळ निघून गेला.

२. मोगलांचीं नाणीं.—मुसलमानांचा मूर्तिपूजेविरुद्ध मोठा कटाक्ष आहे. तसेंच मद्यपानासारख्या अनेक बाबतींत कुराणांत सक्त आज्ञा आहेत. पण अनेक मुसलमान बादशहांनीं कुराणाच्या आज्ञांविरुद्ध आचरण केलेलें आहे. त्यांनीं परधर्मी स्त्रियांशीं लग्नें केलीं; मद्यपानास उघड थारा दिला; अनेक व्यक्तींच्या तसबिरी व पुतळे करून त्यांनीं आपले वाडे व घरें शृंगारिलीं. क्रिस्तीधर्मांतील कथानकांचीं चित्रेंही त्यांनीं आपल्या शृंगारांत घेतलीं. हाच प्रकार त्यांच्या नाण्यांतही घडून आला आहे. अकबराचा तर मुसलमानी धर्मावरील विश्वास उडालाच होता, तेव्हां त्यानें नाण्यांवर नानाप्रकारच्या प्रतिमा घातल्या ह्यांत नवल नाहीं. ससाणा, बदक, तिरंदाज वगैरेंचीं चित्रें त्याच्या नाण्यांवर आढळतात. जहांगीरनें बापावर ताण केली. त्यानें आपला स्वतःचा मुखवटा नाण्यांवर घातला. नाण्यांवर त्याच्या हातांत केव्हां पुस्तक, केव्हां दारूचा पेला वगैरे आहे. कित्येक नाण्यांवर बादशहा हातांत दारूचा प्याला घेऊन मांडी घालून आहे, असें चित्र आहे, आणि दुसऱ्या बाजूस वर सूर्य व खालीं सिंह आहे. कदाचित् हीं

नाणीं व्यापाराच्या देवघेवीकरितां नसून फक्त बक्षीस किंवा नजर देण्याकरितां पाडिलेलीं असतील. बारा राशी खोदलेलीं नाणींही जहांगीरनें पाडिलीं होतीं. हीं राशींचीं नाणीं गोळा करण्याचा पुष्कळांस मोठा छंद होता. तीं जवळ बाळगिलीं असतां ग्रहांची पीडा होत नाहीं, असा पुष्कळांचा समज असे. पण त्यांत बनावट नाण्यांची भेसळ पुष्कळ असल्यामुळें खरीं कोणतीं व खोटीं कोणतीं हें ठरविणें शक्य नाहीं.

जहांगीर बादशहाच्या वेळेपासून 'निसार' नांवाचीं कांहीं नाणीं मोगल बादशहांनीं पाडिलेलीं होतीं. हीं नाणीं ते कित्येक समारंभांत गरिबांस वांटीत असत. अनेक प्रसंगीं लोकांची गर्दी झाली असतां त्यांजमध्यें अशीं नाणीं उधळण्याचा प्रघात होता. कित्येक नाणीं आकारानें फारच मोठीं होतीं. औरंगजेबास पैसे सांठवून ठेवण्याचा मोठा नाद होता, आणि सांठविण्यासाठीं म्हणून मुद्दाम मोठीं अवाढव्य नाणीं तयार करून तीं त्यानें दिल्ली येथील राजवाड्याच्या तळघरांत सांठवून ठेविलीं होतीं. हिंदुस्थानांत कवड्या, बदाम वगैरे अनेक पदार्थ निरनिराळ्या ठिकाणीं नाण्यांच्या ऐवजीं चालत असल्यामुळें, मोगलांच्या वेळेस तांब्याचीं नाणीं फार नव्हतीं. चांदीसोन्याचीं मात्र पुष्कळ होतीं.

ईस्ट इं. कंपनीचीं नाणीं हिंदुस्थानांत राजरोसपणें स. १८३५ त सुरू झालीं, तरी त्यापूर्वी कंपनीचे व्यापारी निरनिराळ्या ठिकाणीं आपलीं नाणीं पाडीत असत. मुंबईबेट इंग्रजांच्या ताब्यांत आल्यावर त्यांनीं स. १६७१ त दुसऱ्या चार्लस् राजाच्या परवानगीनें आपलीं नाणीं पाडण्यास सुरुवात केली. ही गोष्ट औरंगजेबास खपली नाहीं. परंतु हीं फक्त आपल्या मुंबईच्या टापूपुरतींच आहेत असें सांगून, इंग्रजांनीं त्याचें समाधान केलें. पुढें मोगलांच्या नाण्यांसारखीं नाणीं इंग्रज आपल्या टांकसाळींत पाडूं लागले, त्याजबद्दल पुष्कळ तक्रारी झाल्या. इंग्रजांनीं आपलें चांदीसोनें मोगलांच्या टांकसाळींत पाठवून तेथें त्यांचीं नाणीं पाडून घ्यावीं, अशाबद्दल मोगल अधिकाऱ्यांनीं पुष्कळ वेळां इंग्रजांस सांगितलें, पण इंग्रजांनीं आपल्या टांकसाळींत नाणीं पाडण्याचें काम बंद केलें नाहीं. इंग्रज लोक मोगल नाण्यांची हुबेहूब नक्कल करीत असल्यामुळें, इंग्रजांनीं पाडिलेलीं नाणीं कोणतीं व मोगलांचीं कोणतीं हें कळण्यास आज मार्ग नाहीं. मात्र इंग्रजांची नक्कल वजनानें

व किंमतीनें मोगल नाण्यांशीं ततोतंत मिळती असल्यामुळें, इंग्रजांचीं नाणीं सर्व ठिकाणीं निर्वेध चालत. हा घोटाळा बंद करतां येईना. तेव्हां स. १७१७ त फर्रुखसेयर बादशहानें इंग्रजांस मुंबईत मोगलांचीं नाणीं पाडण्याचें उघड फर्मान दिलें. हा नाण्यांचा इतिहास मोगल बादशाहीच्या ऱ्हासाचा चांगला निदर्शक आहे. स १७५९ त इंग्रजांनीं कलकत्यास आपली टांकसाळ घातली. स. १७६५ त इंग्रजांस बंगालची दिवाणी मिळाल्यापासून त्यांचा हा नाण्यांचा उद्योग राजरोस सुरू झाला. तथापि पुढें कांहीं दिवस बंगालचा नवाब व इंग्रज अशा दोघांचीं नाणीं सुरू होतीं. स. १७९३ त इंग्रजांनीं नवाबाचीं व बादशहाचीं नाणीं बंद करून आपला रुपया चालू केला. पण ही व्यवस्था स. १८३५ त कायमची अमलांत आली. (Lane-Poole's Coins).

३. फारशी इतिहास व हिंदु लोक.—इतिहास लिहून ठेवण्याची खरी आवड मुसलमानांसच होती. फारशी भाषेंत अशा ग्रंथांचा भरणा अतिशय मोठा आहे. इजिप्टपासून चीनपर्यंतच्या सर्व देशांत जेवढे म्हणून पराक्रमी राजे व पुरुष झाले, त्या सर्वांचीं चरित्रें उपलब्ध आहेत. मोगल बादशहांच्या अमदानींत तर, अशा ग्रंथांस जणूं काय ऊतच आला होता. ह्यांपैकीं बरेचसे ग्रंथ फारशींत छापलेले आहेत; बहुतेक अजून हस्तलिखित स्थितींत आहेत. फार थोड्यांचीं इंग्रजींत भाषांतरें झालीं आहेत. एल्यटनें कित्येक ग्रंथांचीं इंग्रजींत भाषांतरें करून, त्यांतील वेंचे घेऊन आठ पुस्तकांचा एक मोठा ग्रंथ छापलेला आहे. फेरिस्ताचा इतिहास, अबुल्फज्लचे ग्रंथ, पादशहानामा, आलम्गीरनामा वगैरे दुसरे अनेक ग्रंथ महत्त्वाचे असून, कित्येक पुरुषांचीं आत्मचरित्रें मोठीं मोलवान आहेत. बाबर व जहांगीरचीं आत्मचरित्रें युनिव्हर्सिटींच्या परीक्षांस ठेविलेलीं असतात. अलीकडेस मराठ्यांच्या इतिहासाचे कित्येक अस्सल कागदपत्र प्रसिद्ध होत आहेत; परंतु फारशी इतिहासांच्या तोडीचे मराठ्यांचे इतिहास त्यांत फारसे आढळत नाहींत. निर्विकार-दृष्टीनें बोलावयाचें, म्हणजे इतिहास लिहून ठेवण्याची बुद्धि आम्हां हिंदूंत क्वचित्च दिसून येते. इतिहास म्हणजे ऐहिक पराक्रमाचें व घडामोडींचें चित्र होय. ज्या राष्ट्रास स्वत्वाची व पराक्रमाची घमेंड वाटत नाहीं, त्यास स्वतःचा इतिहास तरी कोठून असणार! मोगल बाद-

शहांच्या वेळेस मुसलमानांचें चरित्र जागृत होतें. दररोजच्या घडामोडी लिहून ठेवण्याकरितां, सरकारांतून पगारदार नोकर ठेविलेले असत. अशा सरकारी लेखांत जरी सर्वच खरा प्रकार दिला जात नसे, तरी एकंदर मोटमोठ्या घडामोडी व तत्संबंधीं सरकारची बाजू समजण्यास त्या लेखांचा अत्यंत उपयोग होतो. दररोज सर्व प्रांतांतून हजारों पत्रें (वाकिया) बादशहास येत, आणि त्यांवर बादशहाचे जबाब जात, व हुकूम सुटत, ते सर्व जमेस धरून सरकारी इतिहास लिहिला जाई. अर्थात् त्यांत बादशहाची बरीचशी स्तुति असून विरुद्ध बाजू गाळलेली असे. अबुल्फ़ज़्ल्चे ग्रंथ जरी असे स्तुतिप्रचुर आहेत, तरी त्याच्या थोर विद्वत्तेची व मार्मिक टीकेची खूण त्यांत जागोजागीं दिसून येते. जहांगीरचें चरित्र अशा बाबतींत विचित्र आहे. जहांगीरनें छपवाछपवी मुळींच केलेली नाहीं. त्याला लाज व भीड वाटतच नसे. म्हणून जसा प्रकार घडला, तसा ह्यानें अक्षरशः नमूद केला आहे. त्याचें आत्मवृत्त त्यानें स्वतः सांगून लेखकांनीं लिहिलेलें दिसतें. पहिल्या १९ वर्षांची हकीकत त्यानें स्वतः तपासलेली आहे; आणि त्या पुढच्या तीन वर्षांची हकीकत इतर लेखकांनीं पुरी केली आहे. शहाजहानचा इतिहासही अशाच प्रकारें संपूर्ण आहे, त्यास शहाजहाननामा, किंवा पादशहानामा असें म्हणतात. औरंगजेबाच्या पहिल्या दहा वर्षांचा इतिहास वरच्याप्रमाणें लिहिला गेला. त्यापुढें त्यानें सरकारी इतिहास लिहिण्याचें काम बंद ठेविलें. औरंगजेब मरण पावल्यावर त्याच्या कार्किर्दीतील ठळक ठळक गोष्टींचें एक पुस्तक लिहिण्यांत आलें. तसेंच खाफीखान हा नेहमीं औरंगजेबाबरोबर होता, आणि त्यानें त्या बादशहाच्या कार्किर्दीचा सुंदर इतिहास लिहिला; पण खाफीखान शिया होता, म्हणून औरंगजेब मरण पावल्यावर, त्यानें आपलें पुस्तक प्रसिद्ध केलें. सारांश, बाबरपासून औरंगजेबपर्यंतच्या दोनशें वर्षांच्या मोगल बादशाहीचा इतिहास संपूर्ण भरवसेलायक, व घडलेल्या गोष्टी प्रत्यक्ष पाहणारांनीं लिहिलेला उपलब्ध आहे. औरंगजेबानें जरी पूर्वीची तवारीख पुढें चालविली नाहीं, तरी त्याचीं स्वतःचीं सुमारें तीनहजार पत्रें उपलब्ध आहेत. राज्यकारभाराच्या कामाचीं व्यवस्थित पत्रें अशीं औरंगजेबानेंच लिहिलीं. त्याच्या पूर्वीचे बादशहा फक्त कारणपरत्वें दुसऱ्या दरबारांस

सलामालकीची वगैरे पत्रें लिहीत. औरंगजेबाच्या प्रत्येक पत्राच्या तीन प्रति उपस्थित आहेत; एक अस्सल पत्र, दुसरी पाठविलेल्या ठिकाणीं ठेवलेली नक्कल, व तिसरी पैवस्तीची नक्कल. ह्यांशिवाय औरंगजेबाच्या कारकिर्दीचे हिंदूंनीं लिहिलेले दोन इतिहास फारशी भाषेंत उपलब्ध आहेत, एक पट्टणचा ईश्वरदास नागर ह्यानें लिहिलेला, व दुसरा भीमसेन ब-हाणपुरी ह्यानें लिहिलेला. औरंगजेबाच्या नंतर बहादूरशहा व महंमदशहा ह्यांनीं तवारिखा चालू ठेविल्या होत्या, परंतु प्रांतिक अंमलदार स्वतंत्र होऊन, नियमितपणें आपले वृत्तान्त पाठविनातसे झाल्यामुळें, त्या तवारिखांचा इतिहासाचे कामीं फारसा उपयोग होत नाहीं. *मोगल बादशहांविषयीं, तपशीलवार माहिती किती विपुल मिळते, हें प्रो० सरकार ह्यांच्या औरंगजेबावरील लेखांनीं चांगलें व्यक्त होतें.* ब्लॉकमन म्हणतो.—'फारशी भाषेंत मुसलमानांचे पुष्कळ इतिहास आहेत, ही गोष्ट खरी. परंतु त्यांत तत्कालीन लोकस्थितीसंबंधानें बहुधा माहिती मिळत नाहीं. जो तपशील आज महत्त्वाचा असा आपणास वाटतो, तो त्या ग्रंथकारांना निरर्थक वाटत असेल. हिंदु लोक इतिहासलेखक नाहींत खरे; तरी प्राचीन पुतळे, लेणीं, स्तंभ इत्यादिकांवरून, व नाट्यादि ग्रंथांवरून प्राचीन हिंदूंची बरीच माहिती मिळते. परंतु मुसलमानांत नाटक किंवा खोदकाम नसल्यामुळें, त्यांच्या वेळच्या समाजस्थितीची माहिती दुष्प्राप्य झाली आहे. विशेषतः मुसलमानी अंमलाखालीं हिंदूंची स्थिति कशी होती, हें कळण्यास साधन नाहीं. मुसलमानांकडून हिंदुलोक जिंकिले गेले, पण जिंकलेल्यांची संख्या अतिशय मोठी असल्यामुळें, तिचा निःपात होऊं शकला नाहीं. मुसलमानांचे कांहीं योद्धे व विद्वान् लोक एवढेच फार तर बाहेरून हिंदुस्थानांत आले. परंतु हरएक प्रकारचें कसब, शेती व नोकरी हिंदूंच्याच हातांत राहिली. वसूल गोळा करण्याचें काम सर्वस्वी हिंदूंकडे होतें. मुसलमानांना मोठमोठ्या जहागिरी देण्यांत आल्या, पण त्या जहागिरींची व्यवस्था हिंदूंशिवाय होणें शक्य नव्हतें. हिंदुस्थानांत बाटलेले मुसलमान बहुधा हिंदूंचेच आचारविचार पाळीत. फिरोज तुघलखनें बाटविलेले लोक शहाजहानच्या वेळेस, हिंदूंच्या सतीप्रमाणें, विधवांस नवऱ्याबरोबर जिवंत पुरीत. जिजिया कर वसूल करण्यास फार मारामार पडे. त्यासाठीं मुसलमानांना दरखेपेस नवीन युक्त्या काढाव्या लागत.

'सारांश, हिंदूंशिवाय मुसलमानांचें पावलोपावलीं अडत असे, तरी त्यांना जबरीनें दिवस काढणें मोठें कठीण काम झालें होतें. अकबराच्या-पूर्वी मोठ्या नोकऱ्या त्यांस मुळींच मिळत नसत. सूर सुलतानांचा दिवाण हिमू एवढा एकच पुरुष अकबराच्यापूर्वी मोठ्या योग्यतेस चढलेला दिसतो. हिंदूंना फारशी भाषा प्रथम अवगत नव्हती, हें आणखी एक त्यांच्या कमीपणाचें कारण होतें. धर्माची उणीव भरून काढण्याजोगी नव्हती, परंतु भाषेची उणीव हिंदूंनीं लवकरच भरून काढिली. परक्याची भाषा उच्चारणें आरंभीं त्यांना पापकर्म वाटे. सरकारी हिशेबाचें वगैरे काम स्थानिक भाषांतच चाले. मात्र दरबारांतून चालणारा पत्रव्यवहार फारशींत करीत. परंतु मुसलमानांचें वास्तव्य हिंदुस्थानांत दोनशें वर्षें झाल्यावर, फारशी भाषेविषयीं हिंदूंचा दुराग्रह नाहींसा होत गेला. ते फारशी भाषा शिकूं लागले. हिंदूंनीं सन १५०० त लिहिलेलीं फारशी पुस्तकें उपलब्ध आहेत. हळूहळू हिंदु लोक, त्या भाषेंत इतके प्रवीण होत गेले, कीं मुसलमानांस ती भाषा शिकविण्यास व त्यांचे अनेक ग्रंथ लिहिण्यास हिंदूंचाच उपयोग होऊं लागला. अकबराच्या आरंभीं सांबर येथील एक राजा फारशी कवि म्हणून नांवाजलेला होता. मनोहर नांवाचा दुसरा एक उत्कृष्ट फारशी कवि झाला, त्यास मीर्झा मनोहर असें म्हणत. तो बाटलेला नव्हता. 'राज्याचे हिशेब फारशी भाषेंत ठेवावे,' हा तोडरमल्लानें काढिलेला हुकूम एकदम अंमलांत आला, ह्यावरून लोकांस तो फेरफार जाचक झाला, असें वाटत नाहीं. आपल्या जातभाईंनीं राज्यकर्त्यांच्या बरोबरीला यावें, भाषेची अडचण असेल, तर ती त्यांनीं मेहेनत करून दूर करावी, राज्यकर्त्यांना आपल्या तंत्रानें वागवावयाचें असल्यास, त्यांची भाषा आपण बिनतक्रार शिकली पाहिजे, हें समजून त्यानें तो हुकूम दिला. हिंदुलोक आपल्या बरोबरीला आले, ही गोष्ट मुसलमानांस आवडली नाहीं. तोडरमल्लाबद्दल त्यांनीं केवढा गहजब केला, हें आपणांस विदित आहेच. चितोडगडावर जेव्हां मानसिंगाची रवानगी झाली, तेव्हां पुष्कळ मुसलमान सरदारांनीं मानसिंगाच्या हाताखालीं नोकरी करण्याचें नाकारिलें. फारशी भाषेंत हिंदुलोक तरबेज झाल्याबरोबर दरबारचा सगळा पत्रव्यवहार त्यांच्या हातीं आला. शहाजहानचा वजीर सादुल्लाखान मरण

पावल्यावर रायरघुनाथ व चंद्रभान हे दोघे पत्रव्यवहाराचें काम पाहूं लागले. त्यांच्या इतका पत्र लिहिण्यांत हुशार दुसरा कोणी नव्हता. हिंदूंनीं फारशीचीं व्याकरणें, कोश व इतर मार्मिक विवेचनें लिहिलीं.

सरकारी नोकरींत हिंदुमुसलमानांचें प्रमाण किती होतें, हें समजण्यास मार्ग नाहीं. सन १५९० त पांचशेंपासून पंचहजारीपर्यंतच्या २५२ मनसबांपैकीं ३१ हिंदूंना मिळाल्या होत्या. पुढें पन्नास वर्षांनीं शहाजहानच्या कार्किर्दींत पांचहजारांवरील बारा मनसबदारांत एकही हिंदु नव्हता. परंतु पांचशेंपासून पांचहजारपर्यंतच्या ६०९ मनसबदारांत ११० हिंदु होते. ह्यावरून फार तर इतकेंच म्हणतां येईल, कीं पुढें पुढें *हिंदूंस मोठया जागा जरी मिळेनाशा झाल्या, तरी खालच्या जागांत त्यांचें प्रमाण वाढलें.* जहांगीरच्या वेळेस सर्व मोठमोठ्या जागा नूरजहानच्या नातेवाइकांनीं पटकाविल्या होत्या. शहाजहानच्या मनसबदारांत जसवंतसिंह, जयसिंह व राणा जगत्सिंह ह्यांचे नंबर अनुक्रमें सतरा, एकोणीस व चोविस असे होते. औरंगजेबाला हिंदूंचा हा भरणा मुळींच आवडला नाहीं. त्यानें सर्व हिंदु नोकरींतून कमी करावे म्हणून हुकूम केला. मात्र तो सर्वस्वी अंमलांत येणें शक्य नव्हतें. बादशहांनीं हिंदु स्त्रियांशीं लग्नें केल्यामुळेंही हिंदूंचें महत्त्व बरेंच वाढलें. जहांगीर, खुस्रू, शहाजहान, बहादूरशहा, कामबक्ष, अजीमुश्शान, दुसरा आलम्गीर ह्यांच्या आया हिंदु होत्या. मुसलमानांच्या मुली मात्र हिंदूंकडे आल्या नाहींत, ह्याचें कारण रजपुतांनीं त्या केल्या नाहींत इतकेंच नव्हे, तर आपल्या मुली हिंदूंना देणें मुसलमानांनाही आवडलें नाहीं.' (Blochmann, Condition of the Hindus under Mogals, Cal.Rev.1871.)

४. राजघराण्याचें शिक्षण व विद्वत्ता.—मोगल बादशहांस विद्याकलांचा मोठा नाद व अभिमान होता हें तर सुप्रसिद्धच आहे. त्यांच्या पदरीं अनेक विद्वान् मौलवी, पंडित, कवि, हकीम, व तत्त्वज्ञानी होऊन गेले, त्यांची हकीकत वर ठिकठिकाणीं आलीच आहे. बाबर बादशहा स्वतः मोठा विद्वान् होता. त्यास आरबी, फारशी, तुर्की व हिंदी ह्या भाषा चांगल्या अवगत होत्या; 'वाकियाती बाबरी' नांवाचें त्याचें आत्मचरित्र व कित्येक कविता सुप्रसिद्ध आहेत. स्वतः लिहिलेली कुराणाची एक प्रत त्यानें मक्केस पाठविली. शिवाय कायदे, साहित्य, इत्यादि विषयांवर

त्याचे ग्रंथ आहेत. बादशहा हुमायून गणित व इतर शास्त्रांत पारंगत होता. त्यास ज्योतिषाचा मोठा नाद असे. फारशी व तुर्की भाषा त्यास चांगल्या येत होत्या. तो कवितेचा भोक्ता असून, अनेक कवींस त्याचा आश्रय होता. हुमायूनचा भाऊ कामरान ह्याची गणना थोर कवींत होत आहे. सर्वांत थोर बादशहा अकबर हा मात्र निरक्षर राहिला हें आश्चर्य आहे. हुमायूननें चार निरनिराळे शिक्षक त्याजकरितां नेमिले. तथापि कांहीं एक न शिकतां, त्याचें बाळपण खेळांत गेलें. तो बहुश्रुत होता, पण अखेरपर्यंत निर्विद्यच राहिला.

जहांगीर शिकलेला जसून मोठा रसिक होता. त्यास तुर्की भाषाही चांगली येत होती. त्याचा आत्मवृत्तान्त, बराचसा तोंडानें सांगून दुसऱ्यांनीं लिहिलेला, व कांहीं त्यानें स्वतः लिहिलेला आहे. शहाजहान शिकलेला होता. कवींस व साधूंस त्याचा मोठा आश्रय असे. कित्येक प्रसंगीं त्याचे हुकूम स्वतः लिहिलेले असत. कामदारांकडून आलेलीं पत्रें व हकीकती तो स्वतः वाची. जवळ वाचक मंडळी ठेवून त्यांजकडून तो अनेक ग्रंथ वाचून ऐकत असे. जहांगीरच्यापेक्षां शहाजहानचें हस्ताक्षर सुंदर होतें. शहाजहानचा मुलगा दारा हा चांगलाच विद्वान् होता. हिंदूंच्या तत्त्वज्ञानाचा त्यानें उत्कृष्ट अभ्यास करून, अकबराप्रमाणेंच, दोन धर्मांची सांगड घालण्यासाठीं त्यानें अनेक ग्रंथ रचिले. त्यानें उपनिषदांचें फारशींत भाषांतर करून साधूंचीं चरित्रें व ग्रंथ लिहिले. दाराशेखोचे कित्येक ग्रंथ पाटणा येथील खुदाबक्ष संग्रहांत पाहण्यास मिळतील.

तथापि सर्वांत विद्वान् पुरुष म्हणजे औरंगजेब होय. स्वधर्माचा त्याचा अभ्यास उत्कृष्ट होता. फतवा-इ-आलमगिरी म्हणून मुसलमानी कायद्याचा उत्तम ग्रंथ औरंगजेबानें लिहिलेला आहे. ह्या कामीं पुष्कळ विद्वान् मौलवी खपत होते. त्यांत मौलाना शेख निजाम हा मुख्य होता. औरंगजेबास कुराण तोंडपाठ येत होतें; आणि त्याचा अर्थ चांगला कळत होता. त्याचें हस्ताक्षर सुंदर होतें. त्यास कवितेची आवड नव्हती. मुसलमानी धर्मशास्त्रांतील त्याची विद्वत्ता अप्रतिम होती, असें मोठमोठ्या विद्वानांनीं म्हटलें आहे. औरंगजेबाचा मुलगा बहादूरशहा हा आरबी व फारशी जाणत असे. शेवटचा बादशहा दुर्दैवी शहाआलम

ह्या विद्वान् व रसिक होता. दुसरा अकबर (१८०६–३७) व शेवटचा बहादूरशहा (१८३७–५७) हे ऊर्दू व फारशी भाषांत कविता करीत. (Journel of the Moslem Institute, March 1907.)

मोगल बादशाहींत जनानखान्याचें प्रस्थ केवढें होतें, ह्याचें वर्णन मागें ठिकठिकाणीं आलेंच आहे. एकंदरींत जनानखान्यांतल्या बहुतेक स्त्रिया कर्तृत्ववान् होत्या. राजपुत्रांचें संगोपन व घरचे सर्व व्यवहार स्त्रियांच्या हातांत असत. बहुतेक स्त्रिया शिकलेल्या व विद्वान् असत. आठ वर्षांचें वय झाल्याबरोबर प्रत्येक राजपुत्रास व राजकन्येस शिकविण्यासाठीं पृथक् शिक्षक ठेविलेले असत. स्त्रीशिक्षक इराणी असत. परंतु पुरुष हिंदु व इराणी दोनही असत. कित्येक स्त्रिया कविता वगैरे करीत व उत्तम लेखक असत. आग्र्याच्या किल्ल्यांत जहान्-आराचा एक मोठा पुस्तकसंग्रह होता. झेबुन्निसा ही कवि म्हणून प्रसिद्ध आहे. मुलींचीं लग्नें चांगलीं प्रौढपणीं होत; आणि विधवांचे पुनर्विवाह होण्यास अडचण नसे. जनाखान्यांतील वृत्तान्त लिहिण्यास स्त्रीलेखक व पुस्तक वाचण्यास स्त्रीवाचक असत. जनानखान्याच्या निरनिराळ्या भागांवर निरनिराळे स्त्रीदरोगे होते.

अकबराच्या वेळेस जनानखान्यांतील स्त्रियांच्या नेमणुका फार थोड्या होत्या. पण शहाजहानऔरंगजेबांच्या वेळेस ह्या नेमणुका पुष्कळ वाढल्या. मुम्ताज-महलची सालाची नेमणूक दहालाख रुपये होती; तिच्या वडील मुलीस प्रत्येकीं सहालाख रुपये होते, पैकीं तीनलाख रोख असून, तीनलाखांची जमीन होती. औरंगजेबानें आपली मुलगी बेगम-साहेब इला बारालाखांची नेमणूक दिली होती. जहांगीरच्या मृत्यूनंतर शहाजहाननें नूरजहानला सालाचें दोनलाख रुपये पेन्शन करून दिलें होतें.

युरोपांत सामाजिक व व्यावहारिक बाबतींत सुधारलेले प्रचार प्रथम फ्रेंच लोकांत सुरू होऊन तेथून ते इतर राष्ट्रांस मिळतात, असा सामान्य सिद्धान्त आहे. फ्रान्सचा हा मान आशियाखंडांत इराणला मिळत असे. मोगल बादशहांच्या वेळची बरीचशी संस्कृति मूळ इराणांतून आली असून तिच्या परिणामांचें वर्णन वर ठिकठिकाणीं आलेंच आहे. बहामनी राज्यांत कारभार करणारा महंमदगवान, व त्यानंतर मीर-जुम्ला या दोघांनीं इराणी वळण दक्षिणेंत बरेंचसें पसरिलें. शिल्पकलामर्मज्ञ

अलीमर्दानखान, हकीम अबुल फत्त इत्यादि विशिष्ट धंद्यांचे गृहस्थही इकडे पुष्कळच आले, आणि हिंदुस्थानच्या कारभारांत त्यांनीं आपलीं नांवें चिरंतन करून ठेविलीं.

हें वजन पुरुषांकडूनच आलें असें नाहीं. कित्येक संस्कृत व विदुषी स्त्रियाही इराणांतून पुष्कळ इकडे आल्या. हमीदाबानू, नूरजहान व इतर स्त्रियांचीं नांवें वर अनेक ठिकाणीं आलींच आहेत. इराणच्या एका विद्वान् घराण्यांतील सति-उन्निसा नांवाची एक स्त्री होती, तिचा भाऊ तालीब-आमली हा उत्कृष्ट कवि व मार्मिक लेखक असून जहांगीर बादशहाचे पदरीं राहत होता. सतिउन्निसाचें लग्न नासीर नांवाच्या एका विद्वान् हकिमाशीं होऊन नवऱ्यापाशीं ती ज्यास्तच हुशार झाली. पण नवरा लवकरच मरण पावल्यामुळें सति-उन्निसानें मुम्ताज-महल्च्या पदरीं नोकरी पत्करिली. तिचें गोड व अदबीचें संभाषण, वैद्यक वगैरे संसारांतील अनेक उपयुक्त विषयांचें तिचें ज्ञान, इत्यादि गुणांनीं मुम्ताज-महल्ला ती इतकी प्रिय झाली, कीं तिच्याच ताब्यांत राज्याचें शिक्कामोर्तब राहत असे. वाटेल तें उत्कृष्ट पुस्तक वाचावें असें तिनेंच; शहाजहानास विद्या शिकविण्याचें काम तिजकडे सोंपविलेलें होतें. मुम्ताजमहल्चें इरएक काम तिच्या मार्फत चालत असे. पुष्कळ गरीब मुलींस व निराश्रित स्त्रियांस राणीपुढें आणून सति-उन्निसा त्यांचा परामर्ष घेववीत असे. मुम्ताज-महल्च्या प्रेताबरोबर ही बाई बऱ्हाणपुराहून आग्यास आली. तेथें राणीचें दफन वगैरे झाल्यावर बादशहाच्या जनानखान्याचें पुढारीपण जहान्-आराकडे आलें. राजघराण्यांतील मुलांमुलींचीं लग्नें जुळविणें, स्त्रियांना मेजवान्या देणें, आप्त-संबंधीं मंडळींचा परामर्ष घेणें वगैरे अनेक बाबती जनानखान्यामार्फत चालत. ह्या कामांत जहान्-आरास सति-उन्निसा मदत करी. राजपुत्रांच्या विवाहप्रसंगीं वधूच्या घरीं नजरनजराणे नेण्याचें व राजपुत्रास येणाऱ्या नजराण्यांची व्यवस्था पाहण्याचें काम तिच्याकडेच होतें. शहाजहाननें तिला सर्व जनानखान्यावर मुख्य नेमिलें होतें. बादशहाच्या खान्यावर तिची देखरेख असे. तिला मूल नव्हतें. तिनें आपल्या भावाच्या दोन मुली पाळून त्यांना जवळची सर्व संपत्ति देऊन टाकिली. ही बाई स. १६७६त मरण पावली. शहाजहाननें तिची कबर ताजमहालचे जवळ पश्चिमबाजूस बांधलेली आहे. (मॉडर्न रि.जून १९०७).

अमीरखान नांवाचा इराणांतील यज्द् येथील एक हुशार व शूर सरदार औरंगजेबाचे वेळेस अफगाणिस्तानच्या कारभारावर होता, (स.१६७७-९८). त्याची बायको साहेबजीबाई ही मुम्ताज-महल्‌ची भाची असून नवऱ्याप्रमाणेंच हुशार होती. नवरा मरण पावल्यावर दोन वर्षेपावेतों तिनें अफगाणिस्तानचा कारभार बिनबोभाट करून तेथें उत्कृष्ट बंदोबस्त ठेविला. तें काम सुटल्यावर तिनें मक्केची यात्रा करून तेथें मोठा दानधर्म करून लौकिक मिळविला.

मोगलबादशाही आणि रोमनबादशाही या दोहोंच्या ऱ्हासांत पुष्कळ साम्य आहे. इतिहासाभिलाषी जनांस मोगलांच्या इतिहासांत अनेक उपयुक्त तत्त्वें सांपडतील. उणीव काय ती गिबनसारख्या इतिहासकाराचीच आहे. ती भरून येईल, तर मोगल बादशाहीचा इतिहासही मोठेपणा पावण्यास योग्य आहे असें दिसून येईल.

५. राजाप्रजांचे एकमेकांवर परिणाम.—हिंदुमुसलमानांच्या कर्तबगारीचा तुलनात्मक विचार अनेक विद्वानांनीं व विचारवंतांनीं ठिकठिकाणीं केला असून, त्याजबद्दल मतभेदही पुष्कळ आहे. तथापि मुसलमानांच्या हिंदुस्थानांतील कर्तबगारीसंबंधानें खालील संक्षिप्त मुद्दे विद्यार्थ्यांनीं ध्यानांत ठेवण्यास हरकत नाहीं. हे मुद्दे केवळ विचार सूचक व अपूर्ण आहेत; विस्तृत विवेचन करूं लागल्यास प्रत्येकावर निराळा ग्रंथ होईल.

(१)पेहराव. मोगलबादशहांचें सामर्थ्य व ऐश्वर्य हीं कितीही मोठीं असलीं, तरी तत्कालीन लेखांवरून एक गोष्ट व्यक्त होते; ती ही, कीं एकाही राज्यकर्त्यानें प्रजेची खरी उन्नति करण्याचा प्रयत्न केला नाहीं. सर्व लेख वाचून हा शोचनीय परिणाम मनावर निःसंशय राहतो. युरोपांत रोमन व इतर राज्यें पूर्वी झालीं, त्यांनीं जसें रयतेच्या उन्नतीकडे व सुखवृद्धीकडे लक्ष दिलें, तसें मोगलबादशहांनीं दिलें नाहीं. रजपूत राजांना त्यांनीं जोरानें दाबून टाकिलें. म्हणजे मोगल अंमदानींत संस्थानिकांची स्थिति जवळजवळ आजच्यासारखीच होती; हल्लींचा दाब अप्रत्यक्ष आहे, त्या वेळचा प्रत्यक्ष होता एवढाच फरक. दोन पक्षांना एकमेकांविरुद्ध लढवून राज्य सुरक्षित ठेवण्याचा प्रघात मोगलांनीं उचलिला होता; आणि परकी अंमलाच्या जोराखालीं येथील लोकांचें सर्व तेज लोपून गेलें. बाकी बाबरच्या

४८-१०-११-१०-७६१-२०००

NATIONAL ARCHIVES OF INDIA

पूर्वीच्या अफगाण राज्यांपेक्षां मोगलांचें राज्य पुष्कळच चांगलें होतें, ह्यांत संशय नाहीं. अफगाणांपेक्षां मोगललोक बुद्धीनें ज्यास्त थोर होते. शिवाय मोगलांच्या राज्यांत वेळेस स्थिरता उत्पन्न झाल्यामुळें, त्यांचे येथील रीतरिवाजांशीं चांगलेंच संमेलन झालें. विशेषतः शहाजहानच्या वेळेपासून रीतरिवाज, पेहराव, भाषा वगैरे बहुतेक हिंदूंच्याच गोष्टी बादशहांनीं व दरबारी मंडळींनीं स्वीकारिल्या. हिंदूंचीं पागोटीं, उर्दू व हिंदी भाषा, हिंदी वंदनाचे प्रकार, इत्यादि सर्व कांहीं त्यांनीं येथील घेतलें. दाराशेखो व शहाजहान ह्यांच्या लग्नसमारंभाचीं त्या वेळचीं चित्रें उपलब्ध आहेत, त्यांवरून त्या वेळच्या पोषाखांची बरीच कल्पना होते. *मंडवळ्या वगैरे चेहऱ्यावर करण्याचे शृंगार मुसलमानांनीं हिंदूंतून घेतले. मध्यआशियांतील बायकांची टोपी-इजार जाऊन त्या ठिकाणीं साडी आली. पुरुषांची टोपी जाऊन हिंदुस्थानी पगडी व पागोटें आलें.* तयमूरलंग व शहाजहान ह्या दोघांचे पोषाख तुलना करून पाहण्यालायक आहेत. मध्यआशियांतला एबा अकबरानें टाकून देऊन हिंदुस्थानांतला जामा घेतला. असें होतां होतां शहाजहानच्या वेळेस तर हिंदु व मुसलमान सरदार केवळ पोषाखांवरून ओळखूं येईनातसे झाले. पडद्याची चाल मुसलमानांपासून हिंदूंनीं घेतली असा सामान्य समज आहे, तो रा. ब. वैद्य (Epic india) ह्यांच्या मतें खरा नाहीं. भारतीय काळीं स्त्रियांस पडदा नव्हता, परंतु इ. स. पू. ३०० च्या सुमारास स्त्रियांनीं उघडपणें पुरुषसमाजांत न येतां अंत:पुरांत राहवें, असा सामान्य प्रघात सुरू झाला होता. बुरखा व पडद्याचें अलीकडचें प्रखर स्वरूप मुसलमानांच्या वेळेस हिंदूंमध्यें शिरलें असावें. दाराशेखोनें तर ‘अल्ला’ हें नांव बदलून ‘प्रभु’ हें देवाचें नांव स्वीकारिलें. दारा राज्यावर आला असता तर कदाचित् हिंदुमुसलमानांचा एक धर्म करण्याचें अकबरानें हातीं घेतलेलें काम त्यानें तडीस नेलें असतें. रजपूत स्त्रियांचा बादशहांचे जनानखान्यांत प्रवेश झाल्यापासून, मोगलांच्या स्त्रियांचे मध्यआशियांतले रीतरिवाज नाहींसे होऊन, हिंदी रिवाज त्यांस लागले, हें त्या वेळच्या तसबिरांवरून व दुसऱ्या अनेक गोष्टींवरून सिद्ध होतें. बाबर-हुमायून हे हिंदुस्थानास परकी होते, तसा प्रकार शहाजहान-औरंगजेबाचा नव्हता. बोलतांना औरंगजेब दारास दादाभाई म्हणून हांक मारी, व मुरादास भाई

मुरादबक्ष म्हणे. शहाजहान उर्दू भाषेंत कवनें करी. सारांश, मोगल लोकांचा स्वभावच दुसऱ्यांचें चांगलें घेऊन, नेहमीं प्रगति करावी अशा प्रकारचा होता. त्याचा परिणाम एकंदरींत हितावहच झाला. इकडे हिंदूंनीं राज्यकर्त्यांचें अनुकरण करण्यास कमी केलें नाहीं. हल्लींप्रमाणेंच त्या वेळींही राज्यकर्त्यांची भाषा शिकून व अन्य तऱ्हेनें त्यांस खुष करून नोकरीच्या वगैरे बाबतींत आपला फायदा करून घेण्याचा प्रयत्न हिंदुलोकांनीं केला. फारशी भाषेंत हिंदूंनीं लिहिलेले अनेक ग्रंथ आहेत. वसुलावर नेमलेले कामदार बहुतेक हिंदु असत, आणि त्यांचा सर्व व्यवहार फारशी भाषेंत चाले. औरंगजेबानें वसुलाचें काम हिंदूंस न देण्याचा प्रयत्न केला, पण तो सिद्धीस गेला नाहीं.

(२) *युद्धकला*. मुसलमानांनीं हिंदुस्थानांत ऊर्जित दशेस आणिली. (क) पूर्वींचे हिंदुराजे सेनांचे 'मालक' होते, पण 'नायक' (Commanders) नव्हते. लाखों लोकांची फौज व्यवस्थितपणें वागवून, व तिजवर हुकमत चालवून काम घेणें, ही गोष्ट मोगल बादशहांनींच केली. खरें युद्धकलानैपुण्य दाखविण्याचे प्रसंग बादशहांसच आले. बहुधा प्रत्येक बाबतींत मोगल लष्कराची व्यवस्था परिपूर्ण होती. (See, Irvine's History of the Mogul Armies). लष्कराच्या सोयीचे रस्तेही सर्व देशभर मोगलांनींच बांधिले. तसेंच (ख) शहरासभोंवतीं मजबूद तटबंदी करून बंदोबस्त करण्याची पद्धत, जरी पूर्वीं येथें ठाऊक असली, तरी ती तत्कालीन सुधारणांनीं परिपूर्ण करण्याचें काम मोगलांनींच केलें. आग्रा, दिल्ली, अहंमदाबाद, सुरत, लाहोर, अलाहबाद इत्यादि वाटेल तितक्या शहरांचीं उदाहरणें ह्यासंबंधीं देतां येतील. (ग) घोडेस्वारांचें माहात्म्य वाढून, पायदळ फौज निकामी ठरली.

(३) शेंकडों वर्षें मुसलमानांचा अंमल हिंदुस्थानावर चालू राहिल्यामुळें, त्यांचा बुद्धिप्रभाव अनेक बाबतींत स्पष्ट दिसून येतो. (क) हिंदु राजेरजवाड्यांनीं आपल्या दरबारांत व राज्यकारभारांत पूर्वींचे प्रघात बदलून, सर्वत्र मुसलमानी प्रघात सुरू केले. (ख) दरबारी मंडळीच्या सणावारांच्या वगैरे पोशाखांत मुसलमानी चाली घुसल्या. सामान्य रयतेनें मात्र हें अनुकरण फारसें केलें नाहीं. (ग) ऊर्दू भाषेचा प्रचार सार्वत्रिक झाला, आणि फारशी व आरबी शब्द, हिंदुस्थानांतील हिंदी,

बंगाली, मराठी वगैरे भाषांत अतोनात शिरले. (घ) लष्करी खेळ, बाज पक्ष्याची व इतर सर्व प्राण्यांची शिकार इत्यादि गोष्टींचें स्वरूप व तत्संबंधाची परिभाषा हीं सर्व बदलून त्यांस मध्यआशियांतील व इराणी वळण लागलें. (ङ) मोगलांची वसुलाची पद्धत व विशेषतः तत्संबंधीं नवीन परिभाषा सर्व हिंदुस्थानभर प्रचारांत आली. (च) गायनकला व हस्तिविज्ञान ह्या दोन बाबतींत मात्र कांहीं एक फरक झाला नाहीं. त्या सर्वथैव मूळच्याच कायम राहिल्या. (छ) पुस्तकांची व इतर आरास, नृत्य, सुगंधि द्रव्यें, इत्यादि ललितप्रकारांत मुसलमानी तऱ्हा शिरली; आणि त्यांत बादशाही दरबारचा कित्ता बाहेर सर्वत्र पसरला. (ज) फारशी कवितेचा स्वीकार हिंदूंनीं बहुधा केला नाहीं. हिंदूंची कविता व तिची रचना व हिंदूंचें तत्त्वशास्त्र व त्यांच्या तशींच राहिलीं. एखाद दुसरी आख्यायिका, दास्तान, किंवा एखादी दुसरी म्हण एवढींच फार तर मुसलमानांतून हिंदु कवितेंत आलीं असतील. (झ) मुसलमानी कायद्याचें एकीकरण होऊन त्यास नवीन चलन मिळालें. हिंदूंनीं आपल्या स्मृति कायम ठेविल्या. (ञ) भोजनाचे व फराळाचे अनेक नवीन पदार्थ मुसलमानांपासून हिंदूंनीं स्वीकारिले. मांसाचे पदार्थ तर पुष्कळच आले. आरबस्तानांत खजूर हेंच लोकांचें मुख्य अन्न होतें; तेथून तें इराणांत आलें, तेव्हां मसाले व इतर रुचिकर कृतींचा भर पडून सूपशास्त्राची भरभराट झाली; आणि हिंदुस्थानांत आल्यावर उभयतांच्या मिश्रणानें पाककला ज्यास्तच वृद्धि पावली. (ट) मुसलमान लोक हिंदूंहून ज्यास्त गुलहौशी व ठाकठिकीचे असून, त्यांची राहणी ज्यास्त ऐषआरामाची व थाटाची असल्यामुळें, व्यसनांत काय, किंवा सत्कर्मांत काय, पुष्कळ नवीन उद्योगधंदे, व नवीन कला अस्तित्वांत आल्या. (ठ) मुसलमान हे मूळचे भटकणारे असल्यामुळें त्यांच्या ठिकाणीं स्वदेशप्रेम वास करीत नव्हतें; तथापि जातीचा किंवा प्रांताचा एकलकोंडेपणा त्यांच्यांत नव्हता. म्हणून स्वतःच्या संपर्कानें व उदारपणानें हिंदुलोकांचा प्रांतिक व जातिविशिष्ट एकलकोंडेपणा त्यांनीं बराच मोडिला. हिंदुलोक दक्षिणेंतून बंगाल्यांत, व बंगाल्यांतून अफगाणिस्तानांत जाऊं येऊं लागले. (ड) मुसलमान साधूंच्या वार्षिकोत्सवप्रसंगीं हिंदुलोक मुसलमानांशीं अतिशय मिसळूं लागले. (ढ) जत्रा,

NATIONAL ARCHIVES OF INDIA

बाजार, स्वारी इत्यादिकांत एकमेकांचें दळणवळण अतिशय वाढलें. (ण) हिंदूंच्या वैद्यशास्त्रास चलन व आश्रय नसल्यामुळें, त्याची वाढ खुंटली; आणि मुसलमान हकीमांची भरभराट झाली; कारण त्यांस दरबारीं आश्रय मिळून हिंदुस्थानबाहेरील देशांशीं त्यांचा व्यवहार घडून त्यांच्या ज्ञानांत भर पडत असे. (त) हिंदुस्थानांतील मुसलमानांनीं हिंदूंच्या चालीरीति, त्यांच्या धर्मसमजुती व लग्नविधि इत्यादि पुष्कळ बाबतींचा स्वीकार केला. बादशहांची सुवर्णतुला वगैरे विधि मूळचे हिंदूंचे आहेत. ज्योतिष, काव्य, नाटक, न्यायशास्त्र, तत्त्वज्ञान, व कृषि ह्या बाबती हिंदूंच्या होत्या तशाच कायम राहिल्या; त्यांत मुसलमानांच्या योगानें फेरफार झाले नाहींत.

(४) *व्यापाराच्या निमित्तानें परदेशाशीं प्रवास* करणारे बहुधा मुसलमानच होते. प्रवासानें त्यांचीं मनें विकास पावत, आणि त्यांच्या ठिकाणीं व्यवहारिक शहाणपण व उपयुक्त संस्कार उत्पन्न होत. ते स्वदेशांतच कोंडून राहणाऱ्या हिंदूंच्या ठिकाणीं सहसा उत्पन्न झाले नाहींत. 'मर्द-इ-जहान्-दीदा' म्हणजे पृथ्वीवर फिरलेला मनुष्य ही मुसलमानांत म्हणच पडून गेली होती.

(५) **शिल्पकला.** विशेषतः मोगलांनींच भरभराटीस आणिली. बादशहांचे राहण्याचे वाडे, बागा, मशिदी व मुकरबे ऊर्फ कबरी, हीं विशिष्ट बांधकामें मोगलांचीं आहेत. पूर्वीचीं हिंदुबांधणीचीं कामें म्हणजे मुख्यतः देवळें होतीं, परंतु सुखोपभोग व ऐषआराम, दरबार, राज्यकारभार इत्यादिकांस उपयोगी पडणारे भव्य वाडे मोगलांचेच आहेत. कमान, व आवाज घुमणारे घुमट हे दोन विशिष्ट प्रकार मुसलमानी बांधणींत नवीन आहेत. वाड्याच्या सभोंवार विस्तृत व शोभिवंत बागा तयार करण्याचा प्रघात मोगलांनीं व विशेषतः इराणी सरदारांनीं स्वदेशांतून येथें आणिला. बागांत कारंजीं, फुलांचे ताटवे, व सहल करण्याच्या सुंदर वाटा हे प्रकार हिंदुस्थानांत इराणांतून आलेले आहेत. बादशाहींतील सर्व मोठमोठ्या सरदारांनीं सुद्धां ठिकठिकाणीं आपले वाडे, व बागा उभारिल्या. आग्रा, दिल्ली, लाहोर, लखनौ वगैरे शहरांवरून ह्या बाबतीची प्रतीति चांगली येते. (शिल्पकलेवर Havel's Indian Art, Modern Review मधील लेख व Archaeological Survey चीं पुस्तकें पांहवीं).

मूर्तिकला व चित्रकला मूळ येथें बौद्धांच्या वेळेस उत्कर्ष पावल्या; आणि बौद्धधर्माबरोबरच त्या चीन, जपान, जावा इत्यादि ठिकाणीं पसरल्या. पुढें अफगाण अंमलांत ह्या कलांचें हिंदुस्थानांतून उच्चाटन झालें. कारण चित्र काढणें किंवा प्रतिमा करणें ह्या गोष्टी मुसलमानी धर्मांत मना असल्यामुळें, आरंभींच्या कडव्या मुसलमान राज्यकर्त्यांनीं ह्या कला येथें चालूं दिल्या नाहींत. पुढें मोगलबादशाही स्थापन झाली. मोगलांस ह्या कलांचा शोक होता. हिंदुस्थानांत येण्यापूर्वीं चीनच्या बाजूनें मोगलांवर बौद्धधर्माचा परिणाम झालेला होता. इस्लामाचें प्रखर पाणी त्यांच्या ठिकाणीं नव्हतें. तेव्हां अकबरानें हिंदुस्थानांत ह्या कलांस पुनरपि आश्रय दिला. त्यानें चीन व इराण ह्या दोनही ठिकाणचे कारागीर आणवून चित्रांनीं व नकशीनें इमारती सुधारण्याचा क्रम सुरू केला. हा प्रघात वाढतां वाढतां शहाजहानच्या वेळेस अतिशय वृद्धि पावला. (पहा, Painting in Ancient and Medieval India, Cal. Rev., July 1903.) मुसलमानांच्या बांधकामाविषयीं मागें ठिकठिकाणीं उल्लेख आलेच आहेत. मशिदी, वाडे, बागा, विहिरी वगैरे लोकोपयोगी कामें करण्याकडे मुसलमान राज्यकर्त्यांची व इतर स्त्रीपुरुषांची विशेष प्रवृत्ति होती. बागा बहुधा सार्वजनिक नसत; सणावारांच्या वगैरे नैमित्तिक प्रसंगीं त्या सर्व लोकांस खुल्या ठेवीत. हिंदु लोकांनीं अशीं कामें केलीं नाहींत. नद्यांचे घांट, धर्मशाळा व मंदिरें हीं मात्र हिंदूंनींच बांधिलेलीं आहेत. मोगलांनीं बांधिलेले रस्ते मजबूद व उत्कृष्ट होते. रस्त्यावर खडी ठोकून कायमचे भक्कम रस्ते करण्याची युक्ति स्काट्लंडांत मॅकॅडमनें (Macadam) स. १७७०-८० च्या वेळेस काढिली. त्यापूर्वीं पुष्कळ दिवस ही गोष्ट हिंदुस्थानांत ठाऊक होती. मुसलमानांच्या लोकोपयोगी कामांत विहिरी व सराया ह्यांचें महत्त्व मोठें आहे. सर्व मोठमोठ्या रस्त्यांवर प्रवाश्यांच्या सोयीसाठीं देशभर सराया बांधिलेल्या होत्या. सराया म्हणजे विस्तृत धर्मशाला. त्यांत ज्याच्या त्याच्या लायकीप्रमाणें व गरजेप्रमाणें सर्वांस उतरण्यास जागा मिळे. सराईच्या सभोंवार मजबूद तट असून, त्याजला कायमचा पहारा असे. आवारांत एक मोठी चांगल्या पाण्याची विहीर असे. चोरांच्या वगैरे भीतीस्तव रात्र झाली म्हणजे सर्व गाडे, जनावरें व सामान तटाचे आंत घेऊन मुख्य दरवाजा बंद करीत. सरकारचे कामदार राज्यांत वारंवार

फिरत आणि त्यांच्या बदल्या होत, त्यांस मुक्कामासाठीं अशा सरायांचा उपयोग फार होत असे. शिवाय डांकवाले, व्यापारी, फिर्यादी व अपिलें करण्यासाठीं प्रवास करणारे लोक, ह्या सर्वांस या सरायांची जरूर अतिशय असे. सर्वांत सराया बांधणारा मोठा पुरुष औरंगजेब झाला. त्याच्यापूर्वी शेरशहा व फिरोजशहा ह्यांनीं तशींच कामें थोडींबहुत केली. कित्येक सराया खासगी लोकांनीं परोपकारार्थ बांधिलेल्या असत. त्यांच्या खर्चासाठीं जमिनी लावून दिलेल्या असत, किंवा बांधणाराचे वंशज आपल्या उत्पन्नांतून रोख रक्कम देत. सरायांत प्रवाश्यांस जागा बहुधा फुकट मिळे; कदाचित् कित्येक ठिकाणीं कांहीं अल्प रक्कम प्रवाश्यांपासून घेत. जैन लोकांनीं सरायांचा व लोकोपयोगी कामांचा हा पूर्वीचा कित्ता अद्यापि चालविला आहे.

(६) सरायांचे ठिकाणींच डांकेच्या घोड्यांचे व उंटांचे टप्पे असत. दोन मैलांवरून शिंग वाजे, तें ऐकिल्याबरोबर नवीन जनावरें तयार करीत. डांक आल्याबरोबर जुन्या जनावरांवरून तीं नवीन जनावरांवर घालून लगेच पुढें चालू करीत. सर्व प्रवासी बहुधा घोड्यावरून प्रवास करीत; पण रजपुताना वगैरे वालुकामय प्रदेशांसाठीं उंट असत. सरकारी डांक फार जलद जात असे. पुरंदरावर शिवाजी जयसिंगाच्या स्वाधीन झाला ही बातमी औरंगजेबास दिल्ली येथें अकराव्या दिवशीं पोंचली. सरकारची डांक नियमित व व्यवस्थित चालू होती. मात्र तिचा उपयोग लोकांस फारसा होत नसे. सरकारी कचेरींत दोनही ठिकाणीं कोणी ओळखीचा मनुष्य असला, तर त्याच्या वशिल्यानें मात्र खासगी पत्रें सरकारी डांकेंतून जात. पण बहुतेक मोठमोठ्या ठिकाणीं व्यापारी मंडळींची खासगी डांकेची तजवीज असे; आणि असे खासगी लोक पुष्कळदां आपली बातमी सांकेतिक खुणांनीं लिहून पाठवीत; म्हणून ती सर्व लोकांस कळत नसे. हल्लीं जशी तारेच्या मजकुराची सांकेतिक परिभाषा किंवा सायफर्स असतात, तशी त्या वेळीं व्यापारी लोकांची सांकेतिक परिभाषा होती. बांबूचीं किंवा पत्र्याचीं नळकांडीं करून त्यांत कागद भरीत आणि तीं घोड्यावर वगैरे पाठवून देत. डांकेच्या चोरीबद्दल अत्यंत कडक शिक्षा होत असे.

(७) हल्लीं दळणवळणाचीं साधनें पुष्कळ आहेत, म्हणून त्या वेळीं तीं मुळींच नव्हतीं असें नाहीं. दरसाल ठरीव वेळेस निरनिराळ्या ठिकाणीं

जत्रा, मेळे, उरूस वगैरे भरत, अशा प्रसंगीं मालाची खरेदीविक्री तर चालेच; पण त्याशिवाय साधु, विद्वान् व इतर लोक ह्यांचीं संमेलनें होऊन अनेक विषयांवर चर्चा व वादविवाद होत. तसेंच अनेक धार्मिक कृत्यें यज्ञयाग व समारंभही होत असत, त्या वेळीं निरनिराळ्या मंडळींच्या भेटी होऊन नवीन परिचय घडत.

(८) कारागिरी.—स. १६०५ पासून १६५७ पर्यंत हिंदुस्थानांतला काल अतिभरभराटीचा गेला. पृथ्वीवरील सर्व कसबें, हुन्नर, विद्या इत्यादिकांचा दरबारांत मोकळेपणीं प्रवेश होऊन, त्यांची उन्नति होत गेली. त्या वेळीं व पुढेंही निरनिराळ्या प्रांतांत व्यापाराचीं व कलाकौशल्याचीं अनेक ठिकाणें होतीं. अहंमदाबाद येथें किनखाबाचें, डाका येथें मलमलीचें, व काश्मीरांत शालीचें, काम उत्कृष्ट होत असे. ह्या कामांस प्रत्यक्ष बादशहांचा व इतर श्रीमान् मंडळीचा आश्रय मोठा मिळत असे. बादशहा स्वतः पगारदार कारागीर ठेवून व सामान देऊन, जो माल तयार होई तो स्वतः घेत. स्वतःच्या वापरास व निरनिराळ्या ठिकाणीं पोशाख पाठविण्यास व नजर देण्यास जसा माल पाहिजे असे, तसा ते मुद्दाम काढवीत. दूरदूरच्या देशांतील राजांस व दरबारास पोशाख पाठवावे लागत. असे कारखाने सरकारीच असल्यामुळें, त्यांतला माल बाहेर बाजारांत फारसा विक्रीस येत नसे. पण सरकारचेच कारागीर फावल्या वेळांत खासगी रीतीनें माल तयार करीत, व पुष्कळदां खासगी मजूर कामास लावीत; आणि अशा रीतीनें तयार झालेला माल बाजारांत येई तेव्हां लोकांस मिळे. एकंदरींत हल्लींच्या सारखी अशा मालाची भरबाजारांत खुल्ली विक्री क्वचित्‌च होई. बादशहांची व श्रीमंतांची जरूर भागून राहिलेला माल बाहेर येई. पूर्वीं हिंदुस्थानांतील रेशीम, कापूस वगैरे कोणताच कच्चा माल बाहेर जात नसे. कच्च्या मालाचे सर्व जिन्नस येथेंच तयार होऊन ते बाहेर जात. त्या योगानें व्यापारास व देशास मोठा फायदा होत असे; आणि त्यावरच देश विशेष सधन होता. कच्चा माल बाहेर न जाण्याचें एक कारण असें होतें, कीं त्या वेळीं आगगाड्या व आगबोटी वगैरे नसल्यानें भारी वजनाचा व मोठ्या आकाराचा माल बाहेर नेण्यास रस्त्याची मजुरी फार पडे. म्हणून थोड्या वजनाचे, लहान आकाराचे व मोलवान जिन्नस तेवढेच येथें तयार होऊन बाहेर

जात. दगडांवर, धातूंवर व लांकडावर नकशीचीं व बाह्य भरावाचीं कामें, कशिद्याचीं कामें, व निरनिराळ्या रंगांच्या मुलाम्यांचीं कामें येथें पुष्कळ तयार होत असत. हिंदुस्थानचे कारागीर उत्तम कसबी म्हणून नांवाजलेले होते. भोज्य पदार्थांची सवंगाई व स्वस्त मजुरी ह्यांमुळें एकंदरींत कारागिरीचे जिन्नस फारसे महाग नसत. हल्लीं कापड स्वस्त असून तें पाहिजे तेथें आपल्या दारावर मिळतें, तसा प्रकार तेव्हां नव्हता. कापड बरेंच महाग असे, आणि तें ठरीव पेठांतून अगोदरपासून मागवून व तयार करवून आणावें लागे. ह्यामुळें डाक्काची, बनारसी, पैठणी, चंदेरी, बऱ्हाणपुरी, वगैरे नांवें कापडास मिळालीं. बादशहांच्या व ऐषआरामी श्रीमंतांच्या गरजा पुष्कळ असल्यामुळें, हरएक प्रकारच्या कारागिरीस उत्कृष्ट आश्रय मिळे, म्हणून कला भरभराटीस आल्या. जगांतील सर्व लोकांची उडी हिंदुस्थानांतील मालावर असे, त्यामुळें प्रत्येक कसब अगदीं पूर्णतेस गेलें ह्यांत नवल नाहीं. बादशाहीच्या भरभराटीचें व ऐश्वर्याचें जें वर्णन वर ठिकठिकाणीं आलें आहे, यावरून एकंदर व्यापारास व कारागिरीस त्या वेळीं केवढें उत्तेजन मिळालें असलें पाहिजे, ह्याची कल्पनाच करावी. नुसतें कागदांचें उदाहरण घेऊं. कागद तयार करण्याचीं कित्येक ठिकाणें ठरलेलीं होतीं. आठव्या व दहाव्या शतकांतील कागद आज आपणास उत्कृष्ट व मजबूद असलेले आढळतात. रासायनिक क्रियेनें कागदास कीड-वाळवीचीसुद्धां बाधा होऊं नये अशी तजवीज करीत. पाटणा येथील खुदाबक्ष ग्रंथसंग्रहासारख्या ठिकाणीं ह्या जुन्या कागदांवरील लेख पाहण्यास मिळतात. एक पुस्तक लिहिण्यास निरनिराळ्या अनेक कसबी मंडळीचें साह्य लागे. पुस्तक आंखणारा निराळा, त्याच्या किनारीवर वेलबुट्टी काढणारा निराळा, नंतर मुख्य लेखक निराळा; मध्यें लाल किंवा इतर रंगांचीं अक्षरें येतात, तीं लिहिणारा निराळा; वेलबुट्टींत अनेक रंग भरणारे, व मधून मधून चित्रें वगैरे येतात तीं तयार करून त्यांचे रंग भरणारे, अशा अनेक असामींच्या हातांतून प्रत्येक पान जाई, तेव्हां एखादा समग्र ग्रंथ तयार होई. अथपासून इतिपर्यंत सर्व अक्षर एकसारखें असून, त्यांत खोडाखोड किंवा अव्यवस्था यत्किंचित् नसे. अलीकडे छापण्याची कला निघाल्यामुळें, हस्तलेखनकलेचा वास्तविक लोपच झाला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

खनिज द्रव्यांची वृद्धि सुद्धां पुष्कळ झाली. लोखंड, सोनें, हिरे, माणकें, कथील, शिसें, गंधक, सोरा, मीठ, हरएक प्रकारचे दगड, इत्यादिकांचा उपयोग व त्यावर होणारा व्यापार फारच मोठा होता. टॅव्हर्नियरच्या पुस्तकांत खनिज द्रव्यांचें पुष्कळ वर्णन आहे.

६. गादीच्या वारसाविषयीं अनिश्चय.—सामान्यतः असें दिसून येतें, कीं मोगल बादशहांचे मुलगे आपल्या बापांवर उठत. बाप जिवंत असतां त्यास मारून अगर पदच्युत करून स्वतः राज्यापहार करण्यास ते सदैव तत्पर असत. बादशहास वृद्धापकाळीं विशेष दुःख पोटच्या मुलांपासून होई. याजविषयीं कित्येक असामी बादशहांस असा दोष देतात, कीं त्यांनीं आपल्या मुलांस मोठमोठे अधिकार दिले, ही त्यांची चूक होय. परंतु ही सर्वस्वी चुक होती असें म्हणतां यावयाचें नाहीं. बहुतेक शहाजादे पराक्रमी व कर्तृत्ववान होते. राज्य भरभराटीस आणण्यांत त्यांचें अंग विशेष होतें. बाबरचे मुलांपासून राज्यास पुष्कळ बळकटी आली होती. खुस्रू व शहाजहान यांसारखे कर्तृत्ववान मुलगे थोडेच निपजतील. औरंगजेबाचे सर्व भाऊ आरंभापासून दूरदूरच्या प्रांतांत शहाणपणानें बंदोबस्त राखीत होते, म्हणूनच शहाजहानची अव्वल कारकीर्द शांततेची व भरभराटीची झाली. तेव्हां मुलांस मोठमोठे अधिकार दिल्याबद्दल बादशहास दोष देणें वाजवी नाहीं. बादशहाच्या मृत्यूनंतर कोणी गादीवर बसावें ह्याविषयीं नियम बांधिलेला नव्हता ही गोष्ट शोचनीय होय. बळी तो कान पिळी असा प्रकार असल्यामुळें, बादशहाच्या मरणप्रसंगीं बंडाळी सुरू होई. अकबरासारख्या शहाण्या पुरुषांनीं ह्याविषयीं कांहीं व्यवस्था बांधून देण्याचें श्रेय घेतलें असतें, तर असे घोटाळे माजले नसते. तथापि तो काळच पुष्कळ अंशीं खटपटीचा होता; आणि अशी धामधूम जगांतील बहुतेक भागांत त्या वेळीं सुरू होती. मोगल घराण्यांतील शहाजाद्यांस जन्मभर कारागृहवास अगर अत्यंत हीन मृत्यु सहन करावा लागला, अशीं उदाहरणें इतरत्रही पुष्कळ आहेत. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर हा प्रकार विशेषच वाढला. शहाजहान व औरंगजेब ह्यांनीं आपल्या राज्यारोहणप्रसंगीं कुटुंबांतील सर्व राजपुत्रांची कत्तल केली. हे प्रकार पाहून 'देवा, राजघराण्यांत जन्म देऊं नको,' असें त्यांस होऊन गेलें असेल. बिचाऱ्यांस सुखानें मरणही नाहीं! बरें प्रत्यक्ष बादशहांची सुद्धां मरणसमयीं तीच दशा. कोणी

मुलगा किंवा आप्त जवळ नाहीं; जिवंत असूनही तो जवळ यावा असें वाटावयाचें नाहीं. काय हें दुर्भाग्य! कुटुंबांत सर्व नातेवाइकांच्या समक्ष मरण येणें ही केवढी भाग्याची गोष्ट, पण ती ह्या बादशाही घराण्यांत साध्य नव्हती. जो बलवान असेल त्यानें राज्य बळकावून आपणास अडथळा करणाऱ्या सर्व भाईबंदांस ठार मारावें असा निर्घृण प्रकार वारंवार घडत असे!

मुसलमानांत संतानाभावामुळें वंशवृद्धि खुंटली असें फारसें झालेलें नाहीं, हें ध्यानांत ठेवण्याजोगें आहे. त्यांचा जनानखाना मोठा असून लग्नाचे नियम हिंदूंच्यासारखे सक्त नसत. त्यांच्यांत स्त्रियांचा पुनर्विवाह होतो; जवळच्या नातेवाइकांचीं एकमेकांशीं लग्नें होतात, आणि एखाद्या बाईवर कोणाची मर्जी बसली, तर लग्न न करितां, तिला तो स्वतःच्या घरीं आणून ठेवण्यास कमी करीत नाहीं. हिंदूंचा प्रघात थोडासा निराळा आहे. राख असली तरी तिला तो स्वतःच्या घरीं बहुधा आणून ठेवणार नाहीं. सारांश, बादशहा मरण पावला म्हणजे पुढें तख्तावर बसण्यास कोणी नाहीं असा प्रसंग सहसा येत नसे. लॉर्ड डलहौझीच्या वेळेस दत्तकाचा प्रश्न महत्त्वाचा होऊन औरस संतति नसल्यामुळें अनेक हिंदु राज्यें खालसा झालीं, तसा प्रकार मुसलमानांच्या संबंधानें घडला नाहीं हें लक्षांत ठेवण्याजोगें आहे.

नेहमीं असें आढळतें, कीं राज्य स्थापन करणारा पुरुष अक्कलवान, व शहाणा असतो. तसा नसला तर त्याच्या हातून कदापि राज्य कमावलें जाणार नाहीं. कोणत्याही देशांत पाहिलें, तरी पहिला पुरुष हुशार असतो, तितके त्याचे पुढील पुरुष नसतात. गज्नवी महंमूदच्या मागून निपजलेले बहुतेक पुरुष दुर्बळ व अक्कलमंद निघाले. शिवाजीराजाप्रमाणें शिवाजीचे वंशज कर्तृत्ववान नव्हते. अशीं आणखी शेंकडों उदाहरणें सांपडतील. परंतु या नियमास मोगलवंश बऱ्याच अंशीं अपवादकारक आहे. बाबर बादशहा फारच हुशार होता. तो ज्यास्त दिवस वांचता, तर सर्वांत त्याचेंच नांव कदाचित् पहिलें आलें असतें. त्याचा मुलगा हुमायून अगदीं टाकाऊ नव्हता, तरी पण शेरशहा सूरसारख्या विशेष कर्तबगारीच्या पुरुषाशीं त्याची गांठ पडल्यामुळें त्याजपुढें हुमायूनचा टिकाव लागला नाहीं. त्यापुढील पुरुष एकसारखे शहाणे व प्रजापालनदक्ष निघाल्यामुळें, मोगल बादशाहीचें नांव अखिल जगाच्या

NATIONAL ARCHIVES OF INDIA

इतिहासांत चिरस्मरणीय झालें आहे. औरंगजेबानें हटवादीपणा धारण करून सर्वस्वाचा नाश करून घेतला. तसें वर्तन केलें नसतें, तर मोगल बादशाहीचा कीर्तिध्वज पुष्कळ काळ फडकत राहिला असता असें पुष्कळांचें मत आहे. अकबराच्या मागून दुसरा अकबरच निपजणें जरी अशक्य होतें, तरी जहांगीर अथवा शहाजहान निपजणें कठीण नव्हतें. अकबराचाच कित्ता औरंगजेबानें व त्याचे वंशजांनीं चालू ठेविला असता, तर आज जशी चीनची स्थिति आहे, तशी कदाचित् हिंदुस्थानची राहती, असा कित्येकांनीं तर्क केला आहे. म्हणजे मोगल बादशाही आजपर्यंत कायम असती, व पाश्चात्य राष्ट्राचा अंमल स्थापला गेला नसता, तरी पाश्चात्य सुधारणेपुढें मोगलांचा टिकाव लागता ना, आणि अंतर्यामीं कोरम झालेल्या जुनाट वृक्षाप्रमाणें मोगल बादशाही लहानशा धक्याबरोबर पडून जाण्यास योग्य झाली असती. ह्या ऐतिहासिक प्रश्नाचें मार्मिक विवेचन तज्ज्ञांनीं करणें अवश्य आहे.

मोगल बादशहा धर्मसंबंधांत हिंदूंवर जुलूम करीत नसत, याचें कारण, रजपुतांशीं लग्नसंबंध झाले हें होय, असें कित्येक ग्रंथकार म्हणतात. रजपूत राण्यांचें वजन आपल्या नवऱ्यांवर विशेष असे. त्यांच्यामुळें बादशहाच्या मनांतील हिंदूंविषयीं द्वेषबुद्धि पुष्कळ कमी झाली. शिवाय मोगललोक अफगाणांसारखे दुराग्रही नव्हते, म्हणून त्यांजपासून रयतेवर धर्माच्या बाबतींत जुलूम झाला नाहीं. अनेक प्रसंगीं हिंदूंचा त्यांनीं बचाव केल्याचीं उदाहरणें आहेत. बाबरानें संग-राण्याविषयीं अत्यंत पूज्यबुद्धि व्यक्त केली आहे. गुजराथच्या बहादूरशहानें स. १६२३ त चितोडगड काबीज केला, तेव्हां संग-राण्याची बायको कर्णावती हिनें हुमायून बादशहास राखी पाठवून त्याचें साह्य मागितलें, तो प्रकार मागें सांगितलाच आहे. ह्या राखीनें केवळ हुमायूनच एकटा चितोडच्या राणीचा भाऊ झाला असें नाहीं, तर त्याचे पुढील वंशज अकबर वगैरे अनुक्रमें चितोडगडच्या राणीचे राखीबंद भाई झाले. हिंदूंचा परमद्वेष्टा औरंगजेब यानेंही राणीस पत्र पाठवून आपलें स्वसृप्रेम फारच उत्कृष्ट रीतीनें दाखविलें आहे. (लोकहितवादीकृत राजस्थानचा इतिहास, पान १३०).

विशिष्ट कारणांनीं हिंदुमुसलमानांचे तंटे व निकराचे झगडे होत, ते सोडून दिले तर हिंदूंच्या धर्माचरणास मुसलमानांकडून फारसा उपद्रव होत नसे. हिंदूंना ते तुच्छ समजत व त्यांची अवहेलना करीत, पण त्यांजवर जुलूम करीत नसत. आरंभीं हिंदूंच्या कित्येक देवळांचा विध्वंस झाला, पण खासगी धर्माचरणास किंवा पूजा-अर्चा करण्यास त्यांजकडून प्रतिबंध झाला नाहीं. पुजारी व उपाध्याय वर्गावर मुसलमानांनीं शस्त्र धरिलें नाहीं. मुसलमानांच्या प्राथमिक शाळा बहुतेक सर्व ठिकाणीं होत्या. तेथें कुराण, स्थलमानाप्रमाणें फारशी आरबी, ऊर्दू वगैरे भाषा, व हिशेबापुरतें गणित इतके विषय शिकवीत. हिंदूंच्या कित्येक शाळा असत, परंतु त्यांस सरकारी आश्रय नसे. श्रीमंत व आस्तिक लोक त्या शाळा स्वखर्चानें चालवीत. अशा खासगी शाळांस सर्व लोक दरसाल यथाशक्ति मदत करीत. निरनिराळ्या ग्रंथांच्या नकला करून ज्ञानाचा फैलाव करण्याची बुद्धि मुसलमानांत होती, तितकी हिंदूंत नव्हती. हिंदुलोक आपलें विशिष्ट ज्ञान बाहेर फोडण्यास बहुधा नाखुष असत. धर्मांत शिरलेले नवीन नवीन वेडेचार सोडून देऊन पूर्वींचा अस्सल आरबी धर्म होता तसा शुद्ध करण्याचे मुसलमानांत अनेक प्रयत्न झाले. ते सर्वच सिद्धीस गेले नाहींत, तरी मुसलमानांस योग्य मार्गाकडे वळविण्यास त्यांचा बराच उपयोग झाला. ह्याच विषयावर मागें प्रकरण ३ कलम ९, प्रकरण ४ कलम ९. व प्रकरण १९ पैकीं कलमें २।३।४।८ यांत आलेलें विवेचन पाहवें.

७. अनियंत्रित सत्तेचीं नियंत्रणें.—मोगल बादशहांची सत्ता सर्वतोपरी अनियंत्रित होती. प्रजेचें जीवित, मालमत्ता, व स्वातंत्र्य ह्यांचें नियमन केवळ त्याच्या मर्जीवर अवलंबून असे. तो राज्यांतील सर्व जमिनीचा अनन्य मालक होय असा सार्वत्रिक समज असून, कोणत्याही प्रकारचे नवीन कर बसविणें व जुने काढून टाकणें हें करण्यास त्यास यथेच्छ मुभा होती. इजारे किंवा मक्ते देऊन देशांतील व्यापार त्यास आपल्या ताब्यांत ठेवितां येई. एका गांवच्या किंवा देशच्या लोकांना ‘आपली वस्ती सोडून दुसऱ्या ठिकाणीं जाऊन राहा,’ असें सांगण्यास त्यास अधिकार पोंचे. राज्याच्या सर्व खात्यांतील नोकऱ्या त्याच्या हातांत असत. रावाचा रंक व रंकाचा राव ही गोष्ट तो क्षण-

मात्रांत करूं शके. दंड, कैद, हालहाल करून ठार मारणें, इत्यादि सर्व प्रकारच्या शिक्षा करण्यास त्यास संपूर्ण अधिकार असे. ह्या प्रचंड राजकीय हक्कांचें अक्राळ विक्राळ स्वरूप लोकांच्या मनावर ठसण्यास त्या वेळची परिस्थिति अनुरूपच होती. अकल्पनीय राज्यविस्तार; दरबारचा देदीप्यमान डामडौल; अगणित सेना व तिची अपरंपार सामुग्री; सेनेवरील मोठमोठे अधिकारी; प्रांतांवरील सुभे, व दरबारांत हजर असणारें प्रधान मंडळ, इत्यादि वरिष्ठ अधिकाऱ्यांनींही बादशहापुढें अत्यंत नम्रता दाखविण्याचा परिपाठ असे. बादशहानें मोठमोठीं भपकेदार नांवें धारण करण्याची पद्धति; आणि निदान औरंगजेबापर्यंतच्या सर्व पुरुषांनीं व्यक्त केलेलें राजनीतिनैपुण्य; इत्यादि अनेक कारणांचा एकत्र मिलाफ झाल्यानें बादशहाच्या अनियंत्रित सत्तेस पुष्टि येत असे. शिवाय मोगलांनीं आपलें राज्य तलवारीच्या जोरावर कमाविलें होतें. पाश्चात्य देशांत मोठमोठे जमीनदार अस्तित्वांत येऊन प्रसंगविशेषीं ते प्रत्यक्ष राजासही धाब्यावर बसवीत. तसे स्वतंत्र पिढीजाद सरदार मोगलांच्या कार्किर्दींत नव्हते. तसेंच सामान्य जनसमूहाच्या ठिकाणीं स्वत्व कायम नसल्यामुळें बादशहावर लोकांचा मुळींच दाब नव्हता. राजानें आपल्या अधिकाराचा दुरुपयोग केल्यास लोकांनीं एकमत करून त्याजला आळा घालण्याची कल्पना ह्या प्राच्य हवेंत रुजलीच नाहीं. कदाचित् त्या कल्पनेचें दुर्मिळ बीज पश्चिमेकडील जमिनींत पडलें, आणि इकडे तें उपलब्धच नसेल. प्राक्कालीन मुसलमानी किंवा हिंदु रियासतींत तसें बीज पोसण्याची सोय नव्हती असें कित्येकांचें मत आहे, म्हणूनच राजा म्हणजे जिंकिलेल्या प्रदेशाच्या बंदोबस्तासाठीं ठेविलेल्या फौजेचा नायक, असा समज इकडे सार्वत्रिक झाला.

वर सांगितल्याप्रमाणें बादशहाची सत्ता अनियंत्रित होती, तरी तिचें नियमन करणारीं बंधनें मुळींच नव्हतीं असें कोणीं समजूं नये. एक तर मोगल बादशहाची परिस्थिति चमत्कारिक होती. विधर्मी लोकांमध्यें तो येऊन पडला होता. हे विधर्मी लोक अगदींच नेभळे व बलहीन नव्हते. पूर्वापार उत्तम लढवय्ये अशी त्यांची ख्याति होती. शिवाय हिंदुस्थानचे बहुतेक मुसलमान अफगाण जातीचे असून ते नेहमीं मोगलांस शिरजोरपणा दाखवीत. मोगलांच्या पूर्वी अफगाणांचाच ह्या देशावर अमल

होता हें ते विसरले नव्हते. हाताखालचे अधिकारी बादशहापुढें नमून असत ही गोष्ट खरी, तरी पण राज्यकारभार व हुकमत व्यवस्थितपणें चालण्यास बादशहा सर्वथैव त्यांजवरच अवलंबून असे. स्वतःच्या लष्करावर त्याची सर्व भिस्त असल्यामुळें, त्याच्या इच्छावर्तनास बराच आळा पडे. तिसरें, सामान्यतः लोकांस आपण आवडतों कीं नाहीं ह्याची चाड बादशहास बाळगावी लागे. लोक आपल्या विरुद्ध गेले, कीं आपलें दैव फिरलें असें त्यास त्या काळीं वाटणें साहजिक होतें. चवथें, एक चमत्कारिक बंधन मोगलांच्या वागणुकीनेंच उत्पन्न झालें होतें. एकीकडे लढत असतां, दुसरीकडे देशांत स्वस्थता करण्याचे बाबरानें केलेले प्रयत्न, अकबराच्या हुशारीनें त्या प्रयत्नांस मिळालेलें कायमचें सुस्वरूप, आणि एकंदरींत मोगलांचा अंमल न्यायाचा व सुखाचा आहे असा सार्वत्रिक झालेला समज, इत्यादि कारणांनीं सर्व प्रकारच्या लोकांमध्यें राजकर्त्यांबद्दल एक विलक्षण अभिमान व आवड उत्पन्न झाली. लोकांच्या ह्या समजास हरताळ लावणारें वर्तन करणें विशेष जोखमाचें होतें. शेवटचें बंधन मोगलांच्या स्वाभाविक गुणांतून उत्पन्न झालें होतें. त्यांची हुशारी, आत्मसंयमन, व उदार वर्तन इत्यादिकांमुळें त्यांच्याबद्दल लोकांत पूज्यबुद्धि उत्पन्न झाली होती. सारांश, बादशहांची सत्ता अनियंत्रित असूनही तिचे दुष्परिणाम लोकांस फारसे सहन करावे लागले नाहींत.

औरंगजेबाच्या अखेरीस बरीच दुर्व्यवस्था झाली, तरी एकंदरीनें मोगलांच्या कारकिर्दींत देशांत बंडावे फारसे नव्हते. सरहद्दीवरील झगडे मात्र सारखे चालू होते. क्वचित् प्रसंगीं बंडखोर लोकांस क्रूर शिक्षा सहन करावी लागे; आणि गुन्हेगारांस तांत्रिक चौकशीनें शिक्षा मिळत. यत्किंचित् संशयावरून मोठमोठ्या कामदारांवरही जुलूम व अन्याय होई. असा प्रकार थोडाबहुत चालू असतांही, 'मोगलांच्या कारभाराचें सामान्य स्वरूप पूर्वींच्या प्राच्य रियासतींप्रमाणें जुलमी नव्हतें; एवढेंच नव्हे, तर अर्वाचीन अगर प्राचीन काळीं पाश्चात्य देशांत निपजलेले मोठमोठे बादशहा, आपणांस समाजसंरक्षक म्हणवून घेणारे मोठमोठे धर्माचार्य, प्रचंड सेनांचे पराक्रमी नायक, अगर जातिविशेषाचे वीर, ह्यांजशीं मोगल बादशहांची तुलना शोभण्यासारखी आहे.' मोगलांच्या राज्यकारभाराचा अंदाज करितांना दुसरी एक गोष्ट अवश्य

ध्यानांत ठेविली पाहिजे, ती अशी, कीं औरंगजेब बादशहा मरण पावला त्या वेळेस, प्रत्यक्ष इंग्लंडांत पूर्वीच्या जुलमी स्टुअर्ट राजांची कारकीर्द फिरून सुरू होण्याची भीति गेली नव्हती. औरंगजेबाच्या वेळेस इंग्लंडांत सुरू असलेले कायदे, विशेष बुद्धि खर्च करून लोकांचा छळ करण्याकरितांच उत्पन्न केले आहेत कीं काय, असे वाटणारे असून, ते त्या कडक स्वभावाच्या औरंगजेब बादशहास सुद्धां दुष्ट व अमानुष वाटले असते, आणि औरंगजेबाच्या मृत्यूनंतर शेंसवाशें वर्षेपर्यंत तसल्या कायद्यांचा डाग इंग्लंडच्या कायदेसंग्रहांतून धुतला गेला नसता. (ओवेन पृष्ठ ४९).

बादशहाचा जुलूम वाढूं न देणाऱ्या कित्येक गोष्टी वर सांगितल्या. त्यांचें थोडेसें ज्यास्त स्पष्टीकरण करणें अवश्य दिसतें. बंडें किंवा खून होण्याची भीति राज्यकर्त्यास असल्यामुळें त्यांची लहर अगदींच विशृं-खल होत नसे. खाणेंपिणें व इतर व्यवहार यांजविषयीं अबुल्-फज्ल्च्या ऐने-अकबरींत इतके सूक्ष्म नियम सांपडतात, कीं त्यांजवरून बादशहावर विषप्रयोग व अन्य घोर प्रसंग येण्याची भीति पावलोपावलीं व्यक्त होते. परंतु असले प्रसंग प्रत्यक्ष घडून आल्याचीं उदाहरणें मोगलांच्या इतिहासांत फारशीं आढळत नाहींत, यावरून बादशहांचें वर्तन जुलमी अगर क्रूर नव्हतें असें मानण्यास जागा आहे. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर असे दुष्ट प्रकार वारंवार घडूं लागले; आणि राज्यकर्त्यांच्या नेभळेपणाचा परिणाम सर्वांसच भोंवला. प्रसिद्ध इतिहासकार ऑर्म् ह्यानें अनेक दुष्ट घातपातांचीं वर्णनें आपल्या पुस्तकांत दिलीं आहेत. विषप्रयोगाशिवाय बादशहास दुसरी भीति एखाद्या अपमान झालेल्या सरदाराची किंवा जातिविशेषाची असे. विधर्मी लोकांस दुखविणें सोपें नव्हतें. अफगाण लोकांच्या अनावर दुष्ट स्वभावास ताब्यांत ठेवण्यासाठीं बादशहास विशेष जपावें लागे. म्हणूनच सर्वांस संतुष्ट राखण्याचा कांहीं तरी मार्ग शोधून काढण्याकडे अकबरानें आपलें बुद्धिकौशल्य खर्चिलें. त्यानें स्थापिलेल्या नवीन धर्मपंथाचा धार्मिक रीत्या विशेष उपयोग नव्हताता, तरी राज्यव्यवस्था कायम राखण्यास त्याचा फारच उपयोग झाला. अकबरानें अत्यंत निष्पक्षपाताची व्यवस्था सुरू केली, म्हणूनच पुढील राज्यकर्त्यांचा अल्प जुलूमही सहन करण्यास लोक तयार नव्हते. एकवार चांगल्याची गोडी लागल्यावर वाइटाचें दुःख विशेष दुःसह वाटतें. अकबर बादशहानें

आपल्या सुव्यवस्थेनें लोकांस सुखाची अभिरुचि लाविली नसती, तर औरंगजेबाचा जुलूम त्यांस दुःसह वाटला नसता, आणि कदाचित् मोगल अंमलाचा अंतही झाला नसता. परंतु जो प्रकार प्रत्यक्ष घडून आला, तो जगताच्या कोणत्याही भागांत व कोणत्याही काळांत तसाच घडला असता. ओवेनचें मत तर असें आहे, कीं औरंगजेबाच्या ज्या जुलमी वर्तनास त्रासून रजपूत लोक त्याचे शत्रु बनले, जाठ लोक चिडून गेले, आणि मराठे लोकांच्या अंगीं नवीन त्वेष उत्पन्न होऊन शिवाजीस स्वतंत्र राज्य स्थापितां आलें, तें जुलमी वर्तन पाश्चात्य देशांतील त्या वेळच्या स्थितीशीं ताडून पाहतां, कांहींच नव्हतें, आणि बादशहाच्या सामर्थ्यानें व बुद्धीनें त्या जुलमाचा प्रतिकार सहज होण्याजोगा होता. तर अकबरानें लावून दिलेली सुखाशाच मोगलांस बाधक झाली. यावरून अकबराचें सद्वर्तन दूषणीय, व औरंगजेबाचें असद्वर्तन स्पृहणीय, असें समजावयाचें नाहीं. सवर्तन कायम ठेवून प्रजेस सतुष्ट राखणें हेंच राज्यकर्त्यांस भूषणावह आहे.

मोगलांच्या राज्यपद्धतीची रचनाच त्यांच्या स्वेच्छाचारावर दाब राखणारी होती. हाताखालच्या अंमलदारांस स्वातंत्र्य धारण करण्यास पाहिजे तितकी सवड असल्यामुळें बादशहास फारच जपून वागावें लागे. प्रधानमंडळाच्या सल्ल्याबाहेर त्यास वर्तन करितां येत नसे. मोठमोठे अधिकार, योग्यता आणि वाकबगारी असलेले, घरंदाज व पिढ्यानुपिढ्या काम केलेले उमराव लोक नेहमीं बादशहाजवळ असत. त्यांची सल्ला घेणें व तदनुसार वागणें बादशहांस अपरिहार्य असे. उमराव, खान किंवा बहादूर इत्यादि किताब व मानमरातब देणें हें जरी सर्वथैव बादशहाच्या मर्जीवर असे, तरी होतां होईपर्यंत असे मानमरातब वंशपरंपरा चालविणेंच बादशहास भाग पडे. अगदींच अयोग्य माणसास मोठेपणा क्वचित् प्राप्त होई. युरोपांतही असाच प्रकार घडून आल्याचें प्रसिद्ध इतिहासकार हॅलम ह्यानें लिहिलें आहे. घरंदाज वंशजांकडे सरदारी चालविल्यानें ते सरदार बादशहाशीं अनुरक्त राहत, आणि तेणेंकरून बादशहाची शक्ति वाढे. या पद्धतीचा उलट दिशेनें शेवटीं वाईट परिणाम होत गेला. तो असा, कीं राज्यांतील सर्वच नोकऱ्या वंशपरंपरेनें चालू झाल्या. युरोपांतही अशीच स्थिति झाली.

४९-११-११-१०—७९१—२०००

एखादा मनुष्य केवळ स्वपराक्रमानें योग्यतेस चढल्यावर तो मेला असतां त्याची नेमणूक वंशपरंपरा न चालवितां ती खालसा करण्याचा मोगलांचा नियम ठरलेला होता. तरी स्वतःच्या फायद्यासाठींच मयत सरदाराच्या मुलांबाळांची तर्तूद करून त्यांजकडून बापाचें काम घेणें सोयीचें असे. देशांतील सर्व जमीन नांवानें बादशहाची असे. मोठमोठीं इनामें व जहागिरी तोडून दिल्यामुळें युरोपांतल्याप्रमाणें इकडेही लहान लहान सरदार व जहागीरदार अस्तित्वांत येऊन त्यांचें साह्य बादशहास मिळूं लागलें. रजपूत सरदारांची स्थिति तर सर्वथैव युरोपांतील मध्यकालीन जमीनदारांच्या स्थितीसारखीच होती. जमीनदारांस नाखुष करणें जसें यूरोपच्या राजांस जड जाई, तद्वतच रजपूत राजांस औरंगजेबानें दुखविल्याबरोबर बादशाहीचा अंत झाला.

तथापि प्रत्यक्ष रीतीनें लोकांचें राज्यकारभारांत अंग नव्हतें. मुकाट्यानें हुकूम ऐकून घ्यावा व स्वस्थ बसावें, ह्यापेक्षां दुसरा मार्ग त्यांस नव्हता. क्वचित् प्रसंगीं अगदीं हलक्या माणसाची सुद्धां बादशहाकडे दाद लागून कामदारांनीं केलेल्या अन्यायाचें निरसन होई. परंतु अशी दाद मागण्याचा रस्ता इतका अवघड व संकटमय होता, कीं त्यामुळें लोकांना अन्यायनिरसनाचें साधन होतें असें म्हणतां येत नाहीं. असें असूनही धर्मस्वातंत्र्य, मालमत्तेचें संरक्षण, व ग्रामसंस्था, इत्यादि विषयांस उद्देशून कित्येक प्रचार लोकांत चालत आले असून, आपण करूं ती पूर्वदिशा, असें करण्याचें मनांत आणिलें, तरी तसल्या प्रचारांस झुगारून देणें बादशहास शक्य नसे. औरंगजेबानें ' गरीब बिचाऱ्या हिंदूं'स मनसोक्त दुखविल्यानें केवढा भयंकर प्रसंग गुदरला, हें मराठ्यांच्या इतिहासावरून कळून येतें.

अकबरासारखा एखादा बादशहा लोकांस पितृस्थानीं वाटला, तरी सामान्यतः मोगल बादशहाचें स्वरूप मोठ्या सेनानायकाप्रमाणें होतें. त्यानें धारण केलेलीं भपकेदार नांवें लष्करी बाण्याचीं द्योतक होतीं. राज्यांत बादशहाच्या लगेच खालचा मनुष्य म्हणजे मुख्य सेनापति होय. सेनानीत्वाच्या लायकीवरच लोकांस प्रांतांच्या सुभेदाऱ्या मिळत. त्यांचें लक्ष बहुतेक लष्कराच्या व्यवस्थेंत गुंतलेलें असे. इंग्लंडचा राजा पहिला वुइल्यम याचे सरदार, क्रॉम्वेलच्या हाताखालचे सेनानायक, व

नेपोलियन बोनापार्टीनें निरनिराळ्या देशांत नेऊन बसविलेले नवीन राजे, या सर्वांशीं मोगल सुभेदारांचें पुष्कळ साम्य आहे. उमराव वगैरे पदव्या क्वचित् प्रसंगीं इतर हुशारीवर जरी मिळत, तरी सन्मान, संपत्ति व सत्ता ह्यांच्या भांडाराची मुख्य किल्ली मिळण्यास लष्करी कसब अंगांत असावें लागे. तो काल धामधुमीचा होता, हल्लींच्या सारखा शांततेचा नव्हता, म्हणून सरकारी नोकरांसच नव्हे, तर इतर सर्व लोकांसही स्वसंरक्षणार्थ बहुधा स्वतःवरच अवलंबून राहवें लागे. रजपूत राजांस मोगल दरबारांत एवढा मान मिळूं लागला, आणि त्यांच्या मुलींचा जनानखान्यांत प्रवेश झाला, याचें इंगित असें आहे, कीं रजपूत लोक *सामान्यतः* उत्तम लढवय्ये होते. तेव्हां वरील योजनेनें बादशहास मदत करणारे भरंवशाचे लोक मिळूं लागले. दरबारची व्यवस्था, बादशहाचे व इतर लोकांचे सामान्य व्यवसाय ह्यांवरूनही लष्करी बाणाच पदोपदीं व्यक्त होणारा होता. दररोज फौजेची झडती व हजिरी घेण्यांत, त्यांच्या सामानसुमानाची देखरेख करण्यांत, व अंमलदारांची योग्यायोग्यता तपासण्यांत, प्रत्यक्ष बादशहाचा पुष्कळ काळ निघून जाई. द्वंद्वयुद्धें, साठमाऱ्या, क्रुद्ध जनावरांच्या टकरा, इत्यादि मनोरंजनाचे व वीर्योत्तेजक प्रकार बादशाही आगडांत एकसारखे सुरू असत. शिकारीचा नाद तर त्यांस अतोनात होता. ऐने-अकबरींत ह्याविषयीं पुष्कळ वर्णन आहे. राज्यकारभाराच्या इतर शाखांचें काम लष्करी पद्धतीवर बांधिलेले असे. न्यायमंदिराचा देखावा हुबेहुब कोर्टमार्शल म्ह० लष्करी न्यायकोर्टासारखा असे. हल्लीं जीं कामें पोलीस लोक करितात, तीं त्या वेळेस लष्करी लोक करीत. इंग्रजांच्या अव्वल कार्कीर्दींचें पोलीस सुद्धां अर्धें लष्करी असे, हें विदितच आहे. राज्याचें अवाढव्य उत्पन्न लष्कराच्या खर्चाकडे खपून जाई. जेव्हां औरंगजेबानें मराठ्यांशीं प्रचंड युद्ध आरंभिलें, तेव्हां अकबरानें बांधून दिलेली खर्चाची पद्धति बिघडली; आणि त्या अपरिसमाप्य युद्धांत पैशाचा चूर होऊन लष्करास पगार वेळेवर मिळेनासा झाला, तेव्हांच मोगलांचा अंत समीप येऊन ठेपला. अबुल्-फज्लनें जमिनीची मापणी केली, तेव्हां प्रत्येक प्रांतानें किती लोक लष्करांत

पाठविले पाहिजेत, हें ठरवून देण्यांत आलें. बहुतेक बादशहा युद्धकला-विशारद होते, हें तर मागें सांगितलेंच आहे.

८. अधिकारविभागणी.—प्रधानमंडळाची व्यवस्थाही अगदीं साधी होती. बादशहाजवळ नेहमीं चार प्रधान असत. ते चार व बादशहा मिळून एक कौन्सिल म्हटलें तरी हरकत नाहीं. पहिला वजीर म्हणजे मुख्य प्रधान; दुसरा, अमीर उल्-उमरा म्हणजे मुख्य सेनापति; तिसरा, दिवाण म्हणजे जमाबंदी कामदार (अकाउंटंट जनरल); आणि चवथा, कोतवाल म्हणजे पोलीस व खासगी मंडळ ह्यांचा मुख्य. पुष्कळ वेळां बादशहा बाहेरच्या सभ्य व वाकबगार लोकांची सल्ला घेई, तथापि वरील चार मुख्यतः जबाबदार असत. प्रांतांतील अधिकाऱ्यांवर शेवटचें अपील बादशहाकडे होई, आणि त्याचा निकाल करण्याकरितां तो दररोज वाड्यांतील न्यायमंदिरांत येऊन बसत असे. त्या वेळच्या मानानें बादशहा हा सर्व मुसलमान प्रजाजनांचा मुख्य खलीफा किंवा धर्माध्यक्ष, म्हणजे युरोपांतील पोपसारखा होता असें म्हणण्यास चिंता नाहीं. ह्या अधिकारामुळेंच अकबरास नवीन धर्म स्थापण्यास अवसान आलें. तथापि बादशहा सुनीपंथी असल्यामुळें शिया लोक त्यास मान देत नसत. राजधानी शहरांत दुसरे न्यायाधीश असत, ते कांहीं प्रसंगीं बादशहास सल्ला देण्यास येत, आणि कांहीं प्रसंगीं काजींच्या मदतीनें स्वतंत्र न्याय करीत. ह्यांशिवाय कमीज्यास्त कामदार नेमणें बादशहाच्या मर्जीवर असे.

एकंदर राज्याचे जे मोठे विभाग केलेले असत, त्यांस 'सुभे' अशी संज्ञा होती. त्यांजवरील अंमलदारास 'सुभेदार' म्हणत. अकबराच्या वेळेस राज्याचे पंधरा सुभे होते. औरंगजेबाच्या वेळेस तीन सुभे वाढले. ह्यांपैकींच कित्येक सुभेदार पुढें स्वतंत्र झाले. राज्य सुव्यवस्थित चाललें होतें, तोंपर्यंत प्रत्येक प्रांताची व्यवस्था सुभेदार जातिनिशीं आपल्या प्रांतांत राहून पाहत असे. परंतु औरंगजेबानंतर राज्याचा ऱ्हासकाल सुरू झाला आणि पूर्वींच्या व्यवस्थेंत कित्येक वाईट फेरफार घुसले. बादशहाचें वजन कमी होऊं लागलें, तेव्हां प्रत्येक सुभेदार आपापसांत वाढलेली स्पर्धा व वैमनस्यें यांचा प्रतिकार करण्यासाठीं राजधानींत बादशहासन्निध राहून नानातऱ्हेच्या खटपटी करूं लागला. असें होऊं लागलें, तेव्हां प्रांताचा कारभार चालविण्यास डेप्युटी अगर दुय्यम नेम-

ण्याची चाल पडली. तसेंच एका इसमाकडे दोन दोन तीन तीनें कामें सांगण्याचा अनिष्ट प्रघातही ह्या वेळेसच सुरू झाला. पुढें प्रसिद्धीस आलेला निजामुल्मुल्क् हा एकाच वेळीं माळवा, गुजराथ व दक्षिण ह्या तीन प्रांतांची सुभेदारी व बादशहाची वजिरी, अशीं नानाविध कामें स्वतःच्या नांवाखालीं चालवीत होता. ह्याचा अर्थ इतकाच, कीं धन्यांत धनीपणा कायम न राहिल्यामुळें, हाताखालचे अंमलदार वाटेल तसे शिरजोर झाले. अयोध्येच्या सुभेदाराकडे बादशहाची वजिरी वंशपरंपरा चालल्याचें त्याच्या वजीर ह्या किताबावरूनच व्यक्त होत आहे.

कर्नल डो लिहितो, कीं 'बादशहाचे हुकूम प्रत्येक प्रांतांत पाठविण्यांत येत; तेथें ते जाहीरपणें सर्वांस वाचून दाखविल्यावर, अंमलबजावणीकरितां न्यायकचेरींत लावून ठेवीत.' परंतु ते पाळले जात असत किंवा नाहीं हें समजण्यास आधार नाहीं. बादशहा वारंवार आपल्या भरंवशाचे तपासणीकामदार प्रांतोप्रांतीं पाठवीत असत. राज्यांत होत असलेले अन्याय व अंदाधुंदी बादशहास कळविणें हें त्यांचें काम असे. आरंभीं अशा कामदारांच्या हातून चांगलीं कामें झालीं असतील. परंतु बर्नियरचें म्हणणें खरें धरिलें, तर औरंगजेबाचे तपासणी कामदार दुर्वृत्त होते असें दिसून येतें.

मोगलांच्या उत्तरकाळांत प्रांतावरील मुख्य अंमलदारास 'नबाब' म्हणण्याचा प्रघात पडला; आणि दोन चार प्रांत मिळून एक इलाखा अगर सुभा समजला जाऊन, त्याजवरील अंमलदारास सुभेदार अशी संज्ञा मिळाली. अर्थात् नबाब म्हणजे हल्लींच्या जिल्ह्याचा मुख्य अंमलदार, व सुभेदार म्हणजे हल्लींच्या इलाख्याचा मुख्य अंमलदार असें समजण्यास हरकत नाहीं. नर्मदेच्या दक्षिणेस मोगलांचे पुष्कळ जिल्हे असून, सर्व प्रांत मिळून एकच सुभा समजला जात असे. ह्याच दक्षिणच्या सुभ्याचें काम पाहत असतां निजामुल्मुल्क् स्वतंत्र झाला; आणि कर्नाटकच्या नबाबास तो आपला अंकित समजूं लागला. प्रत्येक नबाबाच्या हाताखालीं फौजदार म्हणून लष्करी कामदार असत. ते सर्व प्रांतांतील लष्करी खर्चाची व ठाण्यांची देखरेख ठेवून आपल्या हद्दींतील बंडाचा वगैरे मोड करीत. दिवाण म्हणून दुसरे कामदार असत, त्यांचें महत्त्व इंग्रजांच्या भागांत समजणार आहे. सुभेदार, नबाब व फौजदार हे केवळ लष्करी

पेशाचे इसम असल्यामुळें, सर्व प्रकारचें हिशेबी काम पाहण्यासाठीं प्रत्येकाजवळ दिवाण म्हणून एक कामदार असे. हा दिवाण म्हणजे हिशेबी कामदार किंवा अकौंटंट जनरल असें समजण्यास हरकत नाहीं. सुभेदाराजवळ असणाऱ्या दिवाणाचें वजन फार मोठें असे. सुभेदाराच्या हाताखालीं त्यास काम करावयाचें असे व त्याची नेमणूक बादशहाकडून होई. हिशेबी काम बिकट व विशेष अकलेचें असल्यामुळें दिवाणाची जागा प्रायः हिंदूंस देण्याचा प्रघात असे. म्हणून दिवाण हा सुभेदाराच्या वर्तनावर एक प्रकारें दाब ठेवणारा अधिकारी होता. राज्यांतील सर्वच नोकरांच्या नेमणुका खुद्द बादशहाकडून व्हावयाच्या असा नियम होता. कित्येक वेळां कामाच्या वगैरे सोयीसाठीं सुभेदारानें अगर इतर अधिकाऱ्यांनीं आपल्या हाताखालील नोकरांच्या नेमणुका तात्पुरत्या केल्या, तरी त्याजबद्दल कायमपणाचा हुकूम बादशहाकडूनच यावा लागे. असा मूळचा नियम व प्रघात असतांही, पुढील दुर्बळ बादशहांचे कार्किर्दीत प्रांतांवरील अधिकारी एकेक अधिकार बळकावूं लागले; तथापि त्यांनीं नेमिलेल्या इसमाचा कोणी प्रतिस्पर्धी वगैरे असल्यास, तो जाऊन बादशहाकडे कागाळी करी आणि आपल्या दावेदाराची नेमणूक रद्द केल्याचें फर्मान बादशहाकडून घेऊन येई. डुप्लेच्या वेळीं इंग्रज व फ्रेंच यांजमध्यें प्रतिस्पर्धा सुरू झाली, तिचें मूळ बीज, ह्या हळू हळू बंद पडत जाणाऱ्या बादशहांच्या अधिकारांत आहे. एकाला कांहीं कामगिरी मिळाली म्हणजे दुसऱ्यानें ती हाणून पाडण्यासाठीं बादशहाकडे जाऊन खटपट करावी, आणि कैकवेळां खोटींच फर्मानें आणून वाद उपस्थित करावा, असा प्रकार घडूं लागला. अशा प्रकारच्या तंट्यांतच बंगालप्रांताच्या दिवाणीचें काम ईस्ट इंडिया कंपनीस मिळालें.

सुभेदार हा आपल्या ताब्यांतील मुलखापुरते बादशहाचेच सर्व अधिकार वापरीत असे, आणि त्याच्या हाताखालील नबाब सुद्धां ठरलेला वसूल सुभेदारास दिला, म्हणजे आपल्या भागांत प्रायः स्वतंत्रच असे. आरंभीं बादशहाची हुशारी व कडी नजर यांजमुळें वरील व्यवस्थेंत बरेच दिवस घोटाळा झाला नाहीं, तरी हाताखालचे माणसास वरिष्ठाचे हुकूम झुगारून देऊन सहज स्वतंत्र होतां यावें अशा प्रकारचें त्या व्यवस्थेचें स्वरूप होतें. ह्या व्यवस्थेचा परिणाम वाईट होऊं नये,

म्हणून मोगल बादशहा एक युक्ति योजीत असत. वजीर, लष्करी कामदार, उमराव इत्यादिकांस द्यावयाच्या जहागिरी त्यांचा ज्या प्रांतांशीं कांहीं एक संबंध नाहीं अशा प्रांतांत देत; आणि त्यांच्या बदल्याही वरचेवर करीत. अर्थात् जहागीरदार व सुभेदार किंवा नबाब ह्यांचा एकमेकांवर दाब पडावा अशी योजना करण्यांत येई. शिवाय बादशहाला दूरदूरच्या सर्व प्रांतांतील इत्थंभूत बातमी दररोज लिहून पाठविणारे वाकनवीस मुद्दाम सर्वत्र भरपूर ठेविलेले होते. त्यांजकडून आलेलीं पत्रें वाचून जरूर ती व्यवस्था रोजच्यारोज करणें हें बादशहाचें मोठें महत्त्वाचें व निकडीचें काम असे. प्रांतिक कामदारांच्या स्वैर वर्तनाला ह्या पत्रव्यवहाराच्या पद्धतीचा चांगलाच आळा होता. इंग्लंडचा राजा पहिला वुइल्यम ह्यानें आपल्या जहागीरदारांची अशीच योजना केली होती, हें इंग्लंडच्या इतिहासावरून कळून येणार आहे. ऑर्मेचें मत असें आहे, कीं कामदारांमध्यें परस्परांत वैमनस्य असणें हें स्वतःच्या संरक्षणाचें साधन असें बादशहा समजत. हें जरी सर्वथैव खरें नसलें, तरी पुढील नेभळ्या राज्यकर्त्यांच्या हातांतून थोडीथोडी सत्ता निघून जाऊं लागली, तेव्हां ते मुद्दाम परस्परांमध्यें द्वेषभाव वाढवून एकास दुसऱ्यावर उठवीत; पण अशा कृत्यानें त्या भांडणांतच स्वतःचा व आपल्या राज्याचा अंत होणार होता हें त्यांस दुर्दैवानें समजलें नाहीं. शिरजोर कामदारांच्या हातांत बाहुल्यांप्रमाणें खेळणारे ते बादशहा कशा हीन दशेस पोंचले होते हें ह्यावरून चांगलें व्यक्त होतें.

राज्यव्यवस्था सुरळीत होती, तोंपर्यंत सुभेदार व व त्यांच्या हाताखालचे कामदार यांच्या जाग्यांवर लायक माणसाची नेमणूक होत असे. परंतु पुढें पुढें ही व्यवस्था बिघडल्यामुळें लोकांस त्रास झाला असावा यांत संशय नाहीं. दूरदूरचे प्रांत व बादशहाचा मुक्काम ह्यांजमधील अंतर, पत्रव्यवहारास लागणारा विलंब, लांच वगैरे देऊन बादशहाच्या तपासणीकामदारांचीं तोंडें बंद करण्याची युक्ति, नेमणुकींत कायमपणा नसल्यामुळें सद्दी आहे तोंपर्यंत हात मारून घेण्याची कामदारांची हांव, निरर्थक डामडौलास लागणाऱ्या खर्चाची पंचाईत, इत्यादि कारणांमुळें बादशाही कामदार रयतेस आपले त्राते असे न वाटतां, थोडेबहुत यमदूतांसारखे वाटत असत. बादशाहीच्या ऱ्हासकालांत तर लोकांच्या दुःखांस पारा-

चार नाहींसा झाला. बादशाही केवळ नामधारी होऊन ते महत्त्वाकांक्षी व नयशून्य प्रधानांच्या हातांत बाहुल्यांसारखे खेळूं लागले, तेव्हां वरील कारणांचे परिणाम विशेष भयंकर झाले. सुभेदारांच्या नेमणुका करितांना चकचकीत लांच घेण्यांत येऊं लागला, तेव्हां तोच कित्ता त्यांनीं आपल्या प्रांतांत गेल्यावर सव्याज उचलावा यांत नवल काय ? बर्नियर असें सांगतो, कीं औरंगजेबाच्या अव्वल कारकिर्दींत सुद्धां प्रांतांच्या सुभेदाऱ्या इजाऱ्यानें देण्याची वहिवाट होती. परंतु कर्नल डो आणि दुसरे ग्रंथकार यांस हा प्रकार खरा वाटत नाहीं. सुभेदाऱ्या इजाऱ्यानें देण्याची वहिवाट वर्णितांना बर्नियरचा थोडा गैरसमज झाला असावा असें ओवेनचें मत आहे. सुभेदाराचा कित्ता त्याच्या हाताखालील नबाब, फौजदार, जमीनदार, पाळेगार वगैरेंनीं वळविला. अशा प्रसंगीं ग्रामसंस्थांची पद्धत जिकडे तिकडे अव्याहत चालू असल्यामुळें लोकांचें पुष्कळ तारण झालें. रजपुतांच्या राज्यांत मात्र असे घोटाळे विशेष माजले नाहींत. त्यांचे व्यवहार स्वतंत्रपणें व सुरळीत चालत.

वजिरी, सुभेदारी व लष्करी मनसबदारी, ह्या तीन बहुमोल कामांविषयीं सर्वांच्या तोंडांस पाणी सुटत असे. तथापि ह्या तीनही नोकऱ्या बहुधा कायमच्या नसून केवळ बादशहाच्या मर्जीवर अवलंबून असत. परंतु मोगलांच्या वसुलाची पहिली मुख्य बाब जमीनदस्त होय. जमिनींचे मुख्य भाग दोन. पहिला, सरकारी धाऱ्याच्या जमिनी व दुसरा, इनाम किंवा जहागीर दिलेल्या जमिनी. जमीन मापून ठरविलेल्या धाऱ्यास 'कमाल' म्हणजे दर अशी संज्ञा होती. अनावृष्टि वगैरे कारणांनीं जमिनींत उत्पन्न न झाल्यास सूट देण्यांत येत असे. कमाल दरांतून सूट वजा जाऊन बाकी जें सरकार देणें ठरे, त्यास 'तनखा' म्हणत. दुसरी बाब सर्व प्रकारच्या मामूल हक्कांची. मयत जहागीरदारांचीं वतनें त्यांच्या वारसांकडे चालू करितांना सरकारांत भरावयाचे नजराणे, वगैरे बाबतींचा ह्यांत समावेश होतो. तिसरी बाब, इजारे व मक्ते यांची. चवथी बाब व्यापाराच्या जिनसांवरील जकातीची. ह्यास 'सायरदस्त' असें नांव देतां येईल. पांचवी व शेवटची बाब विशेष उत्पन्नाची आहे. कोणीही इसम बादशहाकडे जाऊं लागला, म्हणजे रिकाम्या हातानें येण्याची त्यास मनाई असे. नजराणा म्हणून त्यास कांहीं तरी न्यावें लागेच. अशा

नजराण्यांचें सालिना उत्पन्न लहान नव्हतें. अकबरासारखे सच्छील राज्यकर्ते मात्र आलेला नजराणा कोणत्या तरी रूपानें परत करीत.

७ ह्या पांच बाबींपैकीं मुख्य बाब जमिनीची होय. दर दहा वर्षांनीं जमिनीची पाहणी करून उत्पन्नाचा तिसरा हिस्सा सरकारांत घ्यावयाचा अशी वहिवाट अकबरानें घातली, तिचें वर्णन पूर्वी आलेलें आहे.

८ ह्या काळच्या सामाजिक स्थितीचें वर्णन पुष्कळ यावयास पाहिजे होतें. परंतु तशीं वर्णनें उपलब्ध नाहींत. सर्व प्रकारच्या लोकांत सणावारांचे समारंभ मोठे डामडौलाचे होत असत. बहुतेक घरें व वाडे चौकटीचे असून सुंदर व मजबूद असत. हल्लीं ज्याप्रमाणें सरकारांतून मोठमोठे किताब देण्याची वहिवाट आहे, त्याप्रमाणें त्या वेळींही असून चांगली नोकरी बजाविल्याबद्दल लोकांस भूषणप्रद पदव्या मिळत. कलाकौशल्य व व्यापारउदीम ह्यांची किती भरभराट होती, त्याचें वर्णन ठिकठिकाणीं आलेंच आहे. एकंदरींत मोगल बादशहा प्रजेच्या सुखासाठीं झटणारे होते ह्यांत संशय नाहीं.

९. **संतमंडळ व तत्कृत ग्रंथसंग्रह.**—मुसलमानी रियासतीच्या सहाशें वर्षांच्या काळांत हिंदुस्थानांत नानाप्रकारच्या राजकीय घडामोडी घडून आल्या. त्याचप्रमाणें विद्या, धर्म, समाजस्थिति इत्यादि विषयांमध्यें लोक केवळ निजून नव्हते. ह्या बाबतींतही अव्याहत क्रान्ति चालू होती. त्या क्रान्तीचा प्रवाह कोणत्या प्रकारचा होता, म्हणजे तिचे परिणाम लोकसमुदायावर इष्ट घडत होते कीं अनिष्ट घडत होते, हें ठरविणें मात्र कठीण आहे. ह्याविषयीं खात्रीलायक माहिती उपलब्ध नाहीं. तथापि ह्या दिशेनें श्रम करूं इच्छिणारास अलीकडील नानाविध शोधांचा उपयोग मात्र पुष्कळ होईल यांत संशय नाहीं. आमचा धर्म व आमचा ग्रंथसंग्रह यांची सांगड फार निकट आहे. धर्माच्या बाबतींत हिंदुलोकांत किती पंथ आहेत, याची नुसती कल्पना सुद्धां होणें दुर्घट आहे. त्याची थोडीबहुत कल्पना पाहिजे असेल, तर वुइल्सनचें ' हिंदुलोकांचे धार्मिक पंथ ' हें पुस्तक पाहवें. अनादि कालापासून चालत आलेला धर्म आपण पाळीत आहों, त्यांत आपण फेरफार केला नाहीं व करणारही नाहीं, असा जरी प्रायः लोकांचा समज होता, तरी अखिल सृष्टीच्या चलस्वभावास अनुसरून लोकांचीं धर्ममतें व आचार

एकसारखे बदलत होते. कोणतीही गोष्ट स्थिर राहत नाहीं, तिच्यांत अव्याहत रूपांतरें चाललेलीं असतात. आपण होऊन तिचा ओघ इष्ट दिशेकडे वळविला नाहीं, तर तो कदाचित् अनिष्ट दिशेकडे जाईल, आणि त्याचे अनिष्ट परिणाम आपणास भोगावे लागतील. आपल्या धर्मसमजुतींत अनेक फेरफार आजपर्यंत झाले आहेत. सनातन हिंदुधर्मांतील व्यंगें दाखवून तीं दुरुस्त करण्याचे जसे आज प्रयत्न चालले आहेत, तसेच ते पूर्वींही चालले होते. जातिभेदाचे अनिष्ट परिणाम आजच आपणांस कळूं लागले असें नसून, शेंकडों वर्षांपासून ते मोडून टाकण्याकरितां पूर्वीं अनेक थोर पुरुषांनीं जिवापाड खटपट केली. उपास्य देवतांची संख्या वाढलेली पाहून हळहळणाऱ्या अनेक साधुवर्यांनीं आपापल्यापरी खऱ्या परमेश्वरास ओळखण्याचे भिन्न भिन्न मार्ग प्रतिपादन केले. इकडे म्लेंच्छ लोकांचा ताबा ह्या देशावर बसून महंमदी धर्म हा नवीनच शत्रु हिंदुधर्मास उत्पन्न झाला. परंतु हिंदु व मुसलमान जसजसे एका ठिकाणीं राहूं लागले, तसतसें त्यांचें वैर कमी होऊन त्यांची एकमेकांविषयीं आदरबुद्धि वाढत चालली. दोनही धर्मांत ग्राह्य अंश पुष्कळ आहे असें उभय पक्षांकडील विद्वान् लोकांस वाटूं लागलें, आणि तदनुसार ह्या दोनही धर्मांचें एक रूप करण्याचा जबरदस्त प्रयत्न लोकांत चालू झाला. असे नानाविध प्रयत्न चालू असतां जे थोर पुरुष पुढें आले, त्यांनीं आपापलीं मतें स्थापित करण्यासाठीं अनेक सुंदर व मोलवान ग्रंथ लिहिले. संस्कृत, आरबी, फारशी, व हिंदुस्थानच्या सर्व देशी भाषा यांजमध्यें प्रचंड ग्रंथसंग्रह ह्या काळीं निर्माण झाला. अकबर बादशहानें सर्व धर्मांतील ग्राह्य भाग घेऊन नवीन धर्म स्थापिला हें मागें सांगितलेंच आहे. तो धर्म नवीनच स्थापण्यास त्यास एकाएकीं स्फूर्ति झाली असें नाहीं. धर्मक्रान्ति पाहिजे अशी त्या वेळीं चहूंकडे ओरड चालली होती. तिकडे दुर्लक्ष करणें अकबरास अपरिहार्य होतें. लोकांच्या मागणीस त्यानें अंतःकरणपूर्वक जबाब दिला एवढेंच त्याचें कृत्य. कांचीनगर, जगन्नाथ, द्वारका, काशी वगैरे मोटमोठीं नामांकित विद्यापीठें हिंदुस्थानांतील सर्व भागांत प्राचीन काळापासून अस्तित्वांत होतीं. अशा ठिकाणीं तयार झालेले विद्यार्थी सर्व देशांत फिरत. मोठमोठ्या राजदरबारांत त्या विद्वानांची चहा होई.

येणेंकरून विद्वान् लोकांस पुढें येण्यास व कीर्ति प्राप्त करून घेण्यास त्या वेळीं उत्तम साधनें लोकांच्या हातांत होतीं. हल्लीं मुद्रणकला पुष्कळ फैलावली आहे, तरी ग्रंथप्रसिद्धि व्हावी तशी होत नाहीं. नानाप्रकारचीं प्रसिद्धिपत्रें व वर्तमानपत्रांतील जाहिराती सर्वत्र फडकत असतां, व टपालाची उत्तम सोय उपलब्ध असतां, त्या वेळीं एखादा खरा मोलवान ग्रंथ जितका पुष्कळ व जितका लवकर प्रसिद्ध होई, तितका आज होऊं शकत नाहीं, ही आश्चर्याची गोष्ट आहे. संस्कृत भाषा शिकण्याचे मोठे महत्त्वाचे दोन ग्रंथ म्हटले म्हणजे भट्टोजी दीक्षिताची 'सिद्धान्तकौमुदी,' व अमरसिंहाचा 'अमरकोश' हे होत. ह्या दोन ग्रंथावरून अध्ययन करण्याची पद्धति अद्यापि आहे व पूर्वी तर विशेष होती. अमरसिंह बाराव्या शतकाचे अखेरीस, (पृ० १९८ पहा), व भट्टोजी दीक्षित चवदाव्या शतकांत झाले. मुद्रणकलेच्या साह्याशिवाय व लेखनकलाही फारशी भरभराटींत नसतां, हे दोनही ग्रंथ ग्रंथकर्त्यांच्या ह्यातींतच आसेतुहिमाचलपर्यंत प्रसिद्ध होऊन, अल्प काळांत सर्वतोमुखीं झाले. यावरून त्या वेळीं पंडित लोकांमध्यें अतिशय दळणवळण सुरू होतें. कांचीच्या पंडितानें एखादा नवीन ग्रंथ तयार करून काशीस जावें; तेथच्या विद्वानांस तो पसंत पडला म्हणजे सर्वांनीं त्याचा स्वीकार करावा, आणि लगेच त्याची सर्व देशभर प्रसिद्धी व्हावी, असा त्या वेळचा प्रकार होता. सर्व प्रकारच्या शास्त्रांमध्यें त्या वेळेस ग्रंथ निर्माण होत होते, तरी विशेषतः वेदान्त, भक्ति, उपासना, इत्यादि धर्मविषयक ग्रंथ तर अतिशय झाले. एकाच जातीच्या लोकांनीं विद्यादेवीचें भांडार सांभाळणें समाजविघातक होय, म्हणून सर्वांस ज्ञान प्राप्त करून घेतां यावें, जातिभेद सोडून सर्वांनीं एक चित्तानें परमेश्वरास भजावें, परमेश्वराच्या दृष्टीनें सर्व प्राणी सारखे आहेत, उच्चनीच हा भेद त्याजकडे नाहीं, जेणेंकरून ज्ञानवृद्धि होईल तो प्रकार सर्वांनीं पत्करावा, इत्यादि मतें प्रतिपादन करणारे पुरुष व ग्रंथ दहाव्या शतकापासून निपजूं लागले. त्याच वेळेस एखाद्या सत्ताधीशानें वरील मतांस चांगलें वळण देऊन, सर्वांस प्रिय अशा धर्माची कायम स्थापना केली असती, तर तें काम त्यास दुर्घट नव्हतें. परंतु तो काल अत्यंत धामधुमीचा होता. मोगल बादशहांचें राज्य स्थापन होईपर्यंत कोठेंच स्वस्थता नव्हती.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

अकबर राज्यावर येतांच देशांत स्वास्थ्य होऊं लागलें, आणि स्वभावतःच तो मोकळ्या मनाचा व लोकछंदानुसारी असल्यामुळें सभोंवार चाललेल्या प्रकारांकडे त्यास डोळेझांक करवेना. त्यानें स्थापिलेला पंथ फार दिवस कां टिकला नाहीं हा प्रश्न निराळा, परंतु त्या वेळची लोकविचाराची स्थिति कशा प्रकारची होती, हें त्यावरून चांगलें व्यक्त होतें. अकबराच्या धर्मपंथांत सर्व धर्मांतील चांगल्या मतांचा समावेश झाला होता खरा, परंतु सामान्य अशिक्षित व अविवेकी जनसमूहांची इच्छा नुसत्या उच्च मतांनीं तृप्त होत नाहीं. त्यांची श्रद्धा बसण्यास त्यांत कांहीं तरी चमत्कृतीचा भाग पाहिजे, आणि नवीन घालून दिलेल्या नियमांचें त्यांनीं उल्लंघन केल्यास त्यांस कांहीं तरी शासन पाहिजे. अकबरास अंतकाळीं विपन्नावस्था प्राप्त झाली, त्या योगें स्वतः त्याचें लक्ष त्या नवीन धर्मावरून थोडें बहुत उडालें. त्याच्या पुत्रपौत्रांनीं त्या बाबतींत विशेष विचार केला नाहीं. ह्यामुळें तो धर्मपंथ जेथल्या तेथेंच राहिला. तथापि सर्व लोकांत ऐक्य उत्पन्न करण्याचा एक जबरदस्त प्रयत्न त्या वेळीं झाला ही गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे.

अकबर मरण पावल्यावर विचारी व विद्वान् लोकांचे धर्मसुधारणेचे प्रयत्न बंद पडले नाहींत. ब्रिटिश रियासतीच्या आरंभापर्यंत ते तसेच चालू होते; आणि ब्रिटिश अंमलांतही ते चालूच आहेत. दहाव्या शतकापासून निरनिराळ्या भाषांत ग्रंथवृद्धि होत होती असें सांगितलें, ह्यावरून त्याच्या पूर्वी ती होत नव्हती असें नाहीं. परंतु तत्पूर्व कालाचा विचार करण्याचें प्रयोजन येथें नाहीं. ग्रंथसग्रह निरनिराळ्या भाषांतून होत होता. आरबी व फारशी भाषांस प्रत्यक्ष राज्यकर्त्यांचें भरपूर पाठबळ असल्यामुळें त्यांतील ग्रंथसंग्रह फारच वाढला. संस्कृत भाषा बोलण्यांत नव्हती, तरी तींतील ग्रंथरचना झपाट्यानें चालू होती. आणि त्या शिवाय हिंदी, मागधी, बंगाली, मराठी, कानडी, तेलगू इत्यादि सर्व भाषांत ग्रंथ लिहिण्याचें काम झपाट्यानें चाललें. तें समजण्याकरितां आपल्या धर्मपंथांचें थोडेंसें विवेचन करणें अवश्य आहे. मराठी संतमंडळाचें विवेचन मराठ्यांच्या भागांत येईल. येथें फक्त प्रकरण १९ कलम ६ चेंच अनुसंधान करावयाचें आहे.

आजकाल हिंदु लोकांत जे धर्मपंथ प्रचलित आहेत, त्यांतील मुख्य हे. शंकराचार्यांनीं घालून दिलेला वेदान्त मार्ग अनुसरणारे व सनातन हिंदुधर्म पाळणारे, ह्यांचा भरणा मोठाच आहे. दुसरा वर्ग वैष्णवांचा; तिसरा शैवांचा; चवथा शाक्तांचा; पांचवा नानकशाही किंवा शीख लोकांचा; आणि सहावा जैनांचा. ह्यांशिवाय गाणपत, सौरपत, सत्नामी शून्यवादी इत्यादि अनेक पंथ आहेत, परंतु त्यांच्या अनुयायांचा भरणा फारसा मोठा नाहीं. वरील प्रत्येकांत नानाविध पोटभेद आहेत. ते येथें सांगण्याचें प्रयोजन नाहीं. मोठे पुरुष व त्यांचे ग्रंथ एवढ्यांचाच विचार कर्तव्य आहे.

शंकराचार्य इसवी सनाच्या सातव्या शतकांत झाला असा अंदाज आहे. शंकराचार्यानें धर्मसुधारणेच्या कामीं पुष्कळ खटपट केली. त्यानें स्थापिलेला वेदान्तमार्ग बहुतेक हिंदुस्थानांत सुरू आहे. त्याच्या वेळच्या प्रचलित असलेल्या नानापंथांचें खंडण करून त्यानें आपलें मत स्थापिलें. शंकराचार्यांच्या वेळेस शैव व वैष्णव हे दोनही पंथ भरभराटींत होते. वैष्णवांमध्यें जे पोटभेद आहेत, त्यांत श्रीसंप्रदायी पंथ विशेष महत्त्वाचा आहे. त्याची स्थापना बाराव्या शतकांत रामानुजाचार्यानें केली. ह्या पुरुषाविषयीं अनेक इतिहास प्रसिद्ध आहेत. तो दक्षिणहिंदुस्थानांत राहणारा होता. तत्पंथी लोक त्यास शेषाचा अवतार समजतात. त्याचा काल स. ११५० पासून १२५० चे दरम्यान आहे. त्याचा जन्म पेरंबूर येथें झाला असून कांचीवरं येथें त्यानें अध्ययन केलें. त्याचा पुढील काल कावेरीनदीवर श्रीरंग येथें गेला. त्यानें सर्व हिंदुस्थानभर प्रवास करून शैव पंथाचें खंडण केलें. म्हैसुरांत मैलकोटे किंवा दक्षिण-बद्रिकाश्रम म्हणून देवालय आहे तें त्यानें स्थापिलें. म्हैसूरचा जैनपंथीं राजा वेतालदेव हा त्याचा अनुयायी झाला. रामानुजानें एकंदर ७०० मठ स्थापिले. शिवाय त्यानें स्थापिलेल्या अनेक गाद्या अद्यापि दक्षिणेंत चालू आहेत. ह्या पंथाचें लोकांस दुसऱ्यानें पाहिलेलें अन्न चालत नाहीं, म्हणून ते एकांतात भोजन करितात. त्यांजमध्यें अनेक उपयुक्त ग्रंथ आहेत. प्रत्यक्ष रामानुजानें व्याससूत्रांवर टीका म्हणून श्रीभाष्य, गीताभाष्य, वेदार्थसंग्रह, वेदान्तप्रदीप, वेदान्तसार वगैरे ग्रंथ लिहिले. व्यंकटाचार्य नांवाचा दुसरा एक विद्वान्

पंडित झाला, त्यानें केलेलें स्तोत्रभाष्य, शतदूषिणी, चंडमारुतवैदिका, त्रिशद्ध्यानं व नारदाचा पांचरात्र वगैरे ग्रंथ नामांकित आहेत. पुराणांपैकीं तत्पंथी लोक विष्णुपर सहा पुराणें मानितात. इतर बारा पुराणें ते तामस समजतात. वर सांगितलेले सर्व ग्रंथ संस्कृत आहेत. परंतु मद्रासेकडील देशी भाषांत अनेक ग्रंथ झालेले आहेत. गुरुपर म्हणून एक ग्रंथ असून त्यांत रामानुजाचें चरित्र लिहिलेलें आहे. ह्या पंथाचे लोक उत्तरहिंदुस्थानांत फारसे नाहींत.

चवदाव्या व पंधराव्या शतकाच्या दरम्यान दक्षिणेंत रामानंद म्हणून दुसरा एक विद्वान् साधु पुरुष निघाला. तो रामानुजपंथीच होता, पण शेवटीं त्यानें स्थापिलेला पंथ रामानुजीयांचा एक पोटभेद झाला. रामानंदी हे रामभक्त आहेत. स्वतः रामानंद सर्व हिंदुस्थानभर वैष्णवपंथाचें प्रतिपादन करीत फिरला. काशी येथें पंचगंगा घांटावर रामानंदाचा मठ होता, तो मुसलमानांनीं मोडिला; तथापि त्याच्या अनुयायांचे पुष्कळ मठ तेथें असून एक पंचायतसभा आहे. उत्तरहिंदुस्थानांतील वैष्णवांचे व्यवहार या सभेमार्फत चालतात. रामानंदाच्या अनुयायांस रामावत अशी संज्ञा आहे. रामानंदाचे बारा शिष्य पुढें फार प्रसिद्धीस आले. त्या सर्वांची संतमंडळींत गणना असून त्यांनीं जातिभेद व कित्येक अनाचार मोडून, धर्मांत पवित्रता आणण्याविषयीं फार खटपट केली. ते बारा शिष्य येणेंप्रमाणें—आशानंद, कबीर कोष्टी, रोहिदास चांभार, रजपूत राजा पीपा, सुरसुरानंद, सुखानंद, भवानंद, धन्ना जाठ, सेना न्हावी, महानंद, परमानंद आणि श्र्यानंद. यांमध्यें सर्व जातींच्या मंडळींचीं नांवें आहेत. त्यावरून रामानंदाच्या पंथांत सर्व जातींचा समावेश होत होता असें दिसतें. भक्तमाला नांवाचा हिंदी भाषेंत एक मोठा सर्वमान्य ग्रंथ आहे, त्यांतही असें सांगितलें आहे, कीं रामानंदी पंथांत जातिभेद मानिला जात नाहीं. रामानंदानें आपल्या अनुयायांस 'अवधूत' अशी संज्ञा दिली. याचा अर्थ असा आहे, कीं संसार व समाज यांचे पाश जो तोडितो, त्यास माणसामाणसांत उच्चनीचत्व मानतां यावयाचें नाहीं. सारांश, हिंदूंच्या रूढ आचारांच्या मुळाशींच रामानंदानें जबरदस्त प्रहार केला. शंकराचार्य व रामानुज यांनीं आपले ग्रंथ केवळ संस्कृत भाषेंत लिहिले. ब्राह्मणांशिवाय इतरांस त्यांनीं आपल्या पंथांत घेतलें नाहीं.

परंतु रामानंदानें हा भेदाभेद मोडून टाकिला. त्यानें स्वतः लिहिलेले ग्रंथ प्रसिद्ध नाहींत, तरी त्याच्या अनुयायांनीं सर्व देशी भाषांत ग्रंथ लिहिले असून, पाहिजे त्या जातीच्या माणसास बैरागी, गुरु किंवा महंत होतां येतें. रामानंदाला आणखीही पुष्कळ शिष्य होते, परंतु त्यांनीं निराळे पंथ स्थापिले नाहींत, म्हणून त्यांचीं नांवें पुढें आलीं नाहींत.

वर सांगितलेला पीपा हा गांग्रौणचा राजा असून देवीभक्त होता. संसारत्याग करून तो रामानंदाबरोबर फिरूं लागला; त्याची बायको सीता ही त्याच्यासारखीच साध्वी असून, त्याच्याबरोबरच संन्यास-वृत्ति धारण करून राहत होती. पीपा व इतर भक्त ह्यांच्या लीलांचें सुरस वर्णन भक्तमालेमध्यें आहे. रामानंदानंतर आशानंद हा त्याच्या गादीवर बसून महंत झाला.

भक्तमाला हा ग्रंथ नाभाजीनें लिहिला. नाभाजी हा जातीचा डोंब असून जन्मांध होता. अग्रदास व कील ह्यांच्या प्रसादानें त्यास साधुत्व प्राप्त झालें. अकबराचा सरदार जयपूरचा राजा मानसिंह याच्या वेळेस म्हणजे सतराव्या शतकाच्या आरंभीं तो होता. नाभाजीप्रमाणेंच सुरदास हाही एक मोठा कवि असून जन्मांधच होता. तो रामानंदपंथी असून त्यानें पुष्कळ कवनें केलीं आहेत. भजनाच्या वेळेस सुरदासाचीं पदें लोक मोठ्या आवडीनें गातात. आंधळे भिकारी भिक्षा मागत फिरत असतां सुरदासाचीं पदें गातात, म्हणून अशा भिकाऱ्यांस सुरदासी म्हणण्याचा प्रघात आहे. सुरदासानें एकंदर सव्वालक्ष पदें लिहिलीं. बनारसच्या उत्तरेस शिवपूर येथें त्याची समाधि आहे. तुलसीदास म्हणून दुसरा एक साधु शहाजहान बादशहाच्या वेळेस होऊन गेला. त्याच्या बायकोनें त्याचें मन रामभक्तीकडे वळविलें. तोही मोठा कवि असून देशोदेशीं फिरत असे. जुनें दिल्लीशहर सोडून नवीन शहर वसविण्याविषयीं त्यानें शहाजहान बादशहापाशीं विनंति केली; आणि तदनुसार शहाजहान बादशहानें हल्लींचें दिल्लीशहर नवीन वसविलें असें म्हणतात. नाभाजीबरोबर तुलसीदास हा वृंदावन येथें राहत असे. या ठिकाणीं राहून त्यानें लोकांमध्यें सीतारामाची भक्ति वाढविली. तुलसीदास हा मूळचा सर्वार्य जातीचा ब्राह्मण असून चित्रकूटनजीक हाजीपूरचा राहणारा होता. मोठा झाल्यावर हा कांहीं दिवस बनारसच्या राजाजवळ दिवाण होता. तुलसीदासानें हिंदीभाषेंत प्रचंड ग्रंथ लिहिले आहेत.

तुलसीदासाइतके सर्वमान्य कवि संस्कृत भाषेतही सांपडत नाहींत. एकतीस वर्षांचा असतांना स. १५७५ त त्यानें रामायणाचा तर्जुमा सुरू केला. तुलसीदासाचें रामायण पुष्कळ लोक मोठ्या आवडीनें वाचतात. सप्तशति, रामगुणावलि, सीतावलि, विनयपत्रिका व अनेक पदें आणि इतर कवनें तुलसीदासानें लिहिलेलीं आहेत. त्यानें बांधिलेलें सीतारामाचें देऊळ व मठ अद्यापि बनारस येथें आहेत. तुलसीदास स. १६२४ त मरण पावला. ह्यावरून शहाजहानची व त्याची भेट झाली असल्यास, त्या वेळीं शहाजहान हा बादशहा झालेला नव्हता.

खाकी, मलूकदासी, व दादूपंथी असे वैष्णवांत आणखी पोटभेद आहेत; परंतु ते फारसे प्रसिद्ध नाहींत. आपल्या अंगास व कपड्यांस खाकी रंग लावीत असल्यामुळें त्यांस खाकी हें नांव प्राप्त झालें. हा पंथ कीरु ह्यानें स्थापन केला. मलूकदास हा मोठा साधु होऊन गेला. जगन्नाथ येथें त्याची समाधि आहे. दादूपंथाचा पुरस्कर्ता दादू हा जातीचा पिंजारी असून अहंमदाबादेस जन्मला होता. तो अकबर व जहांगीर ह्यांच्या वेळेस होता. मारवाड व अजमीर इकडे दादूपंथी लोकांचा भरणा बराच आहे. रोहिदास चांभार यास रविदास असेंही म्हणतात. दक्षिणेंतील रोहिदास चांभार प्रसिद्ध आहे, तोच हा असावा. चितोडची राणी 'झाली' ही ह्या रविदासाची शिष्य होती. सेना न्हावी हाही रामानंदाचाच शिष्य. पण ह्यानें पृथक् पथ स्थापिला. बांधवगडचे राजे ह्याच्या शिष्यांपैकीं होते. ह्याजविषयीं फारशी माहिती उपलब्ध नाहीं.

येथवर सांगितलेले वैष्णवपंथ रामोपासक व बहुतेक संन्यासवृत्ति धारण करणारे आहेत. परंतु सुखवस्तु सामान्य लोकांचा विशेष भरणा राधाकृष्णाची पूजा करणारा असून ते वल्लभाचार्यास आपला संस्थापक मानितात. वल्लभाचार्य हा तैलंग ब्राह्मण. हा सोळाव्या शतकाचे आरंभीं होता. मथुरेच्या पूर्वेस तीन कोस यमुनेच्या वामतीरीं गोकुळ म्हणून स्थळ आहे, तेथें हा आरंभीं कांहीं दिवस राहत असे. पुढें लोकांस उपदेश करीत हा सर्व हिंदुस्थानभर फिरला. विजयनगरचा राजा कृष्णदेव ह्याजकडे तो स. १५२० च्या सुमारास होता. त्या ठिकाणीं त्यानें शैव गुरूंना वादांत हरविलें, तेव्हांपासून त्यास लोक आपला आचार्य म्हणूं लागले. पुढें उज्जनी, वृंदावन इत्यादि ठिकाणीं त्यानें

अनेक दिवस घालविले. कृष्णाच्या पूजेची प्रसिद्धी करणारा हा पहिला मोठा पंडित होय. मनुष्याचे सुखविलास परमेश्वरासही आवडतात व ते सर्वांनीं अवश्य करावे, ही गोष्ट मूळ वल्लभाचार्यानें शिकविली. निरनिराळ्या कृष्णलीला व गोपीनृत्य हींही यानेंच सुरू केलीं. या पंथाचे लोक भागवत-पुराण प्रधान मानितात. ह्या पुराणावर 'सुबोधिनी' नांवांची टीका वल्लभाचार्यानें लिहिलेली आहे. शिवाय व्याससूत्रांवरील भाष्य, सिद्धान्त-रहस्य, आणि एकांतरहस्य वगैरे ग्रंथ वल्लभाचार्यांचे आहेत. त्याच्या शिष्य-मंडळींनीं लिहिलेले ग्रंथही अनेक आहेत, जसें व्रजविलास, वार्ता इत्यादि. वल्लभाचार्यांचा मुलगा विठ्ठलनाथ हा त्याचे मागून मोठा उपदेशक झाला. विठ्ठलनाथास पुष्कळ पुत्र असून ते भक्तमंडळांत नांवाजलेले आहेत. ह्या पंथाच्या लोकांचा भरणा गुजराथ व माळवा इत्यादि ठिकाणीं विशेष आहे. जगन्नाथ, द्वारका, काशी, वृंदावन इत्यादि ठिकाणीं ह्यांचे मोठे मेळे भरतात.

मेर्ता येथील राजाची कन्या मीराबाई हिची गणना भक्तमंडळांत आहे. ती उदेपूरच्या राण्यास दिलेली होती. नवऱ्याशीं तिचें न पटल्या-मुळें राणीपद सोडून ती रणछोडरायाची भक्त बनली. तिला भजणारे पुष्कळ लोक असून तिनें केलेलीं पदें लोकांत प्रसिद्ध आहेत. अकबर बादशहा हा आपला प्रसिद्ध गवई तानसेन यास बरोबर घेऊन मीरा-बाईच्या भेटीस गेला होता असें म्हणतात.

वैष्णवांमध्यें मध्वाचार्य म्हणून दुसरा एक मोठा पंडित निपजला. त्याचा जन्म इ. स. ११९९ त झाला. तोही मोठा कृष्णभक्तच होता. त्यानें भगवद्गीतेवर भाष्य लिहिलें. मध्वाचार्यांचा पंथ मोठा आहे. तो आरंभीं शैव असून मागाहून वैष्णव झाला असावा असें वाटतें. शैव आणि वैष्णव यांजमध्यें ऐक्य करण्याची त्यानें खटपट केली. उत्तरहिंदुस्थानां-तील राधाकृष्णाची पूजा करणारे कित्येक वैष्णव निंबादित्य नांवाच्या साधूस भजणारे आहेत.

बंगालप्रांतांतील वैष्णव, इतर भागांतील वैष्णवांपेक्षां बरेच भिन्न आहेत. पंधराव्या शतकाचे अखेरीस नदिया व शांतिपूर येथें अद्वैतानंद व नित्यानंद नांवाचे दोन मोठे विद्वान् ब्राह्मण लोकांस धर्मोपदेश करीत असत. त्यांस चैतन्य नांवाचा तिसरा एक ब्राह्मण

५०-११-११-१०---७६१-२०००

उपदेशक मिळाला. चैतन्याचीं अनेक चरित्रें बंगालप्रांतांत प्रसिद्ध आहेत. तो सोळाव्या शतकांत होता. वल्लभाचार्यांच्या मुलीशीं चैतन्यानें लग्न केलें असें लिहिलेलें आहे. मथुरा, जगन्नाथ व बंगालप्रांत इत्यादि ठिकाणीं कृष्णोपासना शिकवीत तो फिरत असे. तो सन १५२७ त वारला. बंगालचे वैष्णव वर सांगितलेल्या तीन पंडितांस आपले प्रभु समजतात. चैतन्याच्या उपदेशाचा मुख्य विषय भक्ति होय. मुसलमानांस सुद्धां तो आपल्या पंथांत घेत असे. जातिभेद न मानितां सर्व माणसें सारखीं आहेत असें तो शिकवी. वरील पंडितत्रयानें लिहिलेले ग्रंथ उपलब्ध नाहींत, तरी या पंथानें आधारभूत मानिलेले अनेक ग्रंथ संस्कृत व बंगाली भाषांत आहेत. रूप व सनातन असे चैतन्याचे दोन पट्टशिष्य होते. त्यांनीं शेंकडों ग्रंथ लिहिले आहेत. शिवाय चैतन्याच्या शिष्यांत सहा गोसावी म्हणून प्रसिद्ध आहेत, त्यांनींही अनेक ग्रंथ लिहिले. बंगाली ग्रंथसंग्रहांत हे ग्रंथ विशेष महत्त्वाचे आहेत.

चरणदास म्हणून दिल्लीशहरांत दुसऱ्या आलमगीरच्या वेळेस एक विद्वान् वैश्य व्यापारी होता. लोकांस उपदेश करूं लागल्यावरून त्याचाही वैष्णवांत एक निराळाच पंथ झाला आहे. ह्या पंथाचा ग्रंथसंग्रहही मोठा असून प्रत्यक्ष चरणदासानें लिहिलेले कित्येक ग्रंथ आहेत. ह्यांशिवाय वैष्णवांचे आणखी पुष्कळ पंथ आहेत, पण ऐतिहासिकदृष्ट्या त्यांचें महत्त्व विशेष नसल्यामुळें ते येथें देण्याचें कारण नाहीं. आतां शैवांत मोठमोठे पुरुष कोण झाले, तें पाहावयाचें.

शिवाला भजणारे लोक वैष्णवांहून जुने खरे. दक्षिणहिंदुस्थानांत त्यांचा प्रसार पुष्कळ होता. ब्राह्मणांशिवाय इतरांचा शैवपंथांत फारसा प्रवेश झालेला नाहीं. शैवलोक शंकराचार्यांस आपला मूळ उत्पादक समजतात. शंकराचार्यांनें प्रतिपादिलेलीं मतें प्रसिद्ध करणारे त्याचे स्वतःचे ग्रंथ पुष्कळ आहेत. शिवाय आनंदगिरि, माधवाचार्य हेही या पंथाचे ग्रंथकार मोठे झाले. माधवाचार्यांचें वृत्त मागें आलेंच आहे. (पृ. २०७). दत्तात्रेयाची पूजा करणारेही शैवांत गणले जातात. तथापि दत्तात्रेयाची पूजा करणारे वैष्णवही नाहींत असें नाहीं. कानफाटे जोगी किंवा योगी या नांवाचा शैवांचा एक पोटभेद उत्तरहिंदुस्थानांत विशेष प्रसिद्ध आहे. ते गोरखनाथास भजतात. गोरखपूर येथें ह्या साधूंचें देवा-

लय आहे. गोरखनाथ व कबीर हे एका वेळेस म्हणजे पंधराव्या शतकाच्या आरंभीं होते. गोरखनाथ हा मत्स्येंन्द्रनाथाचा मुलगा, व आदिनाथाचा नातू. तो बराच विद्वान् होता. संस्कृतभाषेंत लिहिलेले त्याचे दोन ग्रंथ आहेत; एक गोरक्षशतक व दुसरा गोरक्षकल्प. जंगम म्हणून आणखी एक पंथ आहे, त्याचे ग्रंथ कानडी व तेलगू वगैरे भाषांत पुष्कळ आहेत. लिंगायत हा जंगमांचाच एक भाग होय. हे म्हैसुराकडे पुष्कळ आहेत. व्यासाच्या सूत्रावर नीलकंठाचें भाष्य आहे, तें उत्तरेकडे जंगमलोक आधारभूत मानितात. शैवांमध्यें शाक्त किंवा देवीभक्त म्हणून एक पंथ आहे, त्याची प्रवृत्ति पूर्वी फार होती. धर्माचरणाच्या नांवावर ते पुष्कळ अनन्वित कृत्यें करीत व तसलीं दुष्कृत्यें समर्थन करणारे ग्रंथही त्या वेळेस पुष्कळ झाले. ते तंत्रग्रंथ ह्या नांवानें प्रसिद्ध आहेत. तंत्रग्रंथांनीं लोकांमध्यें अनेक प्रकारचा अनाचार वाढविला. शैवांमध्यें आणखी लहान पोटभेद पुष्कळ आहेत, पण त्यांचें महत्त्व अलीकडे अगदींच कमी होऊं लागलें आहे.

शैव आणि वैष्णव यांच्याशिवाय हिंदुस्थानांत विशेष प्रसिद्धीस आलेला धर्मपंथ शीखांचा होय. त्यांचा संस्थापक गुरु नानक हा स. १४६९त जन्मला. शीखांची हकीकत अन्यत्र द्यावयाची असल्यामुळें येथें पुनरावृत्तीची जरूर नाहीं. हिंदुमुसलमानांचें ऐक्य करून नवीन राष्ट्रीय जोम लोकांत उत्पन्न करणारा मुख्य पंथ हिंदुस्थानांत शीखांचाच होय. शीखांचे ग्रंथही बहुत आहेत, आणि त्यांचा लोकांच्या मनावर निःसंशय मोठा परिणाम झाला. त्या वेळच्या इतर साधूंचे ग्रंथही शीख लोक मानितात.

दुसरा मोठा पंथ जैनांचा होय. जैनांची उत्पत्ति फार प्राचीन आहे. त्यांचा उत्पादक महावीर हा बुद्धाचा समकालीन होता. त्याचें विवेचन करण्याचें हें स्थळ नव्हे. जैनांचा ग्रंथसंग्रह फारच मोठा व तो बहुतेक सर्व भाषांत आहे. त्यांचीं स्वतःचीं पुराणें आहेत; जसें आदिपुराण, उत्तरपुराण, चामुंडरायपुराण, चतुर्विंशतिपुराण, वगैरे. हेमचंद्र नांवाचा एक मोठा जैन ग्रंथकार बाराव्या शतकांत होऊन गेला. दक्षिणेंतील जैन पुराणें नवव्या शतकांत झालीं. कल्पसूत्र नांवाचा ग्रंथ बाराव्या किंवा तेराव्या शतकांत लिहिला असावा. नवव्या व दहाव्या शतकांत

धार येथें मुंज आणि भोज हे राजे राज्य करीत असतां त्यांच्या पदरीं मोठमोठे जैन पंडित होते. अकबराच्या वेळेसही जैन ग्रंथ पुष्कळ होत होते. जिनपतिसूरि, जिनेश्वर, जिनचंद्र वगैरे अलीकडचे मोठे जैन उपदेशक होत. जिनचंद्र अकबराचे वेळेस होता. हर्षसूरि वगैरे कित्येक सत्राव्या शतकांतले आहेत.

ह्यांशिवाय इतर पंथ, साधु व ग्रंथ अनेक आहेत. जहांगीरच्या वेळेस माळव्यांत बाबालाल म्हणून एक क्षत्रिय जन्मला. हा मोठा साधु असून दाराशेखो ह्याचा गुरु होता. ह्या गुरुशिष्यांचे संवादग्रंथ फारशी भाषेंत लिहिलेले आहेत. प्राणनाथ म्हणून दुसरा एक क्षत्रिय साधु औरंगजेबाचे उत्तर कार्किर्दीत होता. त्यानें हिंदुमुसलमानांचें ऐक्य करण्याची खटपट करून नवीन पंथ स्थापिला. बुंदेलखंडचा राजा छत्रसाल ह्याजवर त्याचें विशेष वजन होतें. बीरभान नांवाचा दुसरा एक साधु १६५८चे सुमारास उपदेश करीत होता. औरंगजेबाच्या कार्किर्दीत सत्नामी नांवाच्या बैराग्यांनीं दंगा केला असें सांगितलें आहे, त्या सत्नामी पंथाचा उत्पादक जगजीवनदास म्हणून एक अयोध्याप्रांतांतला क्षत्रिय साधु होता. त्यानें हिंदीभाषेंत बरेच ग्रंथ लिहिले आहेत. शिवनारायणी म्हणून दुसरा एक ग्रंथ आहे, त्याचा उत्पादक शिवनारायण हा महंमदशहाचें वेळेस झाला. त्याचे ग्रंथ पुष्कळच आहेत. नादीरशहानें हिंदुस्थानावर स्वारी केली, त्या वेळचे ते आहेत.

येथवर धर्मप्रवर्तक ग्रंथांचें दिग्दर्शन झालें. यांशिवाय न्याय, व्याकरण, अलंकार, तत्त्वशास्त्र, धर्मशास्त्र वगैरे विषयांवर झालेले ग्रंथ विपुल आहेत. ब्राह्मणेतर संस्कृत ग्रंथकार फारसे आढळत नाहींत. चोहोंकडे राज्यांची उलथापालथ, बंडाळी व रक्तपात ह्यांची सतत आवृत्ति चालू असतां, मध्यें असले थोर थोर ग्रंथकार निपजत होते. सभोंवार चाललेल्या मानगडींची त्यांस दाद नसून, त्यांची परवा न करितां, ग्रंथकारांनीं आपला उद्योग चालू ठेविला, हें नवल आहे. एकंदरींत मुसलमानी रियासतीच्या काळाची लोकस्थिति व वाङ्मय ह्यांचा इतिहास, शोधक व विचारी विद्वानांच्या हातून लिहिला जाईल, तर त्याचा मोठा उपयोग होईल.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

प्रकरण अठ्ठाविसावें.

मोगलबादशाहीवर प्रवाश्यांचे अभिप्राय.

१. पाश्चात्य प्रवासी, रे. टेरी. २. पीट्रो डिला व्हेल.
३. जॉन ऑल्बर्ट ड मंडेल्स्लो. ४. जॉन बॅप्टिस्टा टॅव्हर्नियर.
५. डॉ. जॉन फ्रायर. ६. थिवेनॉट, कॅ. हॅमिल्टन.
७. कार्स्टन नीबर.

१. पाश्चात्य प्रवासी, रे. टेरी.—सामान्य जनसमूहाची स्थिति मोगलांच्या वेळेस कशी होती हें समजण्यास फारसा मार्ग नाहीं. तथापि युरोपीय प्रवाश्यांनीं लिहिलेली बरीच माहिती आहे. मोगलांच्या वेळेस युरोपीय राष्ट्रांतील पुष्कळ लोकांनीं हिंदुस्थानांत प्रवास करून परत गेल्यावर आपलीं प्रवासवृत्तें प्रसिद्ध केलीं. सामान्यतः एतद्देशीय लेखांपेक्षां पाश्चात्यांचें वर्णन तिऱ्हाईत या दृष्टीनें विशेष मार्मिक असतें. पुष्कळ प्रवासी जिज्ञासु व धूर्त होते. हे प्रवासी निरनिराळ्या उद्देशानें हिंदुस्थानांत आले. कित्येकांचीं नांवें मागें आलीं आहेत. रे० टेरी नांवाचा एक प्रॉटेस्टंट इंग्रज पाद्री, डिला व्हेल नांवाचा एक रोमचा सुखवस्तु गृहस्थ, टॅव्हर्नियर नामक एक फ्रेंच जवाहिऱ्या, थिवेनॉट म्हणून एक फ्रेंच गृहस्थ, फ्रायर नांवाचा इंग्रज शस्त्रवैद्य, अलेक्झॉंडर हॅमिल्टन नामक एक जहाजाचा नाखवा, कार्स्टन नीबर नांवाचा एक प्रसिद्ध जर्मन कारागीर इत्यादि प्रवाश्यांचीं वर्णनें उपलब्ध आहेत. हे सर्व निरनिराळ्या वेळीं इकडे आले. निरनिराळ्या हेतूंनीं व दृष्टींनीं त्यांनीं आपलीं वृत्तें लिहिलीं, त्यांनीं हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांत भिन्नकाळीं पर्यटन केलें. ह्यामुळें त्यांचे लेख बरेच महत्त्वाचे व मनोरंजक झाले आहेत. बऱ्याच लेखांच्या हल्लीं इंग्रजींत सुंदर आवृत्त्याही निघाल्या आहेत.

रे० टेरी, हा सर टॉमस रोच्या वकिलातीबरोबर पाद्री असून सन १६१५ पासून १६१८ पर्यंत इकडे होता. हिंदुस्थानामध्यें हरएक-प्रकारचे भोज्य पदार्थ अत्यंत स्वस्त व विपुल आहेत हें पाहून त्या सशक्त भोजनभाऊ भिक्षुकास फारच आश्चर्य वाटलें. तो लिहितो, कीं

हिंदुस्थानांत गहूं, तांदूळ व दुसरीं सर्व प्रकारचीं धान्यें उत्तम प्रकारचीं होऊन तीं फार स्वस्त मिळतात. येथील गव्हांची भाकर विलायतेंतल्या-पेक्षां शुभ्र होते. इकडे लोक लोखंडी तव्यावर ताज्या पोळ्या भाजून खातात, आणि दहीं घुसळून लोणी काढितात, ह्याचा त्यास मोठा चमत्कार वाटला. बहुतेकांच्या घरीं गाई मेंढ्या, बकऱ्या वगैरे दुभतीं जनावरें असून हरीण, ससे वगैरे अनेक जनावरांचें मांस विपुल मिळतें. अशा खाद्य जनावरांस पाळींव अरण्यांत राखण्याचें कारण पडत नाहीं. सर्व देशभर जंगलांतून त्यांची वस्ती विपुल आहे. पाहिजे त्यास शिकार करण्याचें सामर्थ्य व मोकळीक असल्यामुळें ह्या जंगली जनावरांचा शेताभातांस उपद्रव होत नाहीं. तरी विंचू, माशा, मगर, मच्छरें इत्यादिकांचा त्रास फार आहे. सर्व प्रकारच्या खाद्य पक्ष्यांची व मत्स्यांची विपुलता आहे. हे प्राणी विपुल असल्यामुळें व बऱ्याच लोकांत मांसाहार निषिद्ध असल्यामुळें, मांस बहुतेक बिनमोल मिळतें असें म्हणण्यास चिंता नाहीं. पण हिंदुस्थानांतला बहुतेक माल त्यांस रोख चांदी देऊन विकत घ्यावा लागे. देशांत पैसा येण्याचीं अनेक द्वारें सतत वाहत असून, येथील पैसा बाहेर नेणें हा मोठा गुन्हा समजला जात असे. हिंदुस्थानांत व ब्रह्मदेशांत त्या वेळीं ह्या गुन्ह्याबद्दल सक्तीचे कायदे केलेले होते.

टेरीच्या मतें लोकांच्या वाटेस कोणी गेलें नाहीं, तर ते फार सौजन्यानें वागतात. कांहीं दिवसांनीं रे० टेरी सुरतेहून मांडवगडास गेला. त्याबरोबर बादशहास देण्याचे नजराणे असून, वीस एतद्देशीय शिपाई व सहा गाडे एवढा सरंजाम होता. हा प्रवास सुमारें चारशें मैलांचा होता. रात्रीं मंडळींचा मुक्काम रस्त्यावर होई, तेव्हां सभोंवार गाडे लावून मध्यें राहुट्या लावीत. रात्रभर पाळीपाळीनें त्यांस पहारा करावा लागे. विशेष धोक्याचा प्रसंग वाटल्यास शेजारच्या गांवांतून घोडेस्वारांचा पहारा मिळण्याविषयीं त्यांजजवळ परवाना होता. परंतु अडचणीचा प्रसंग आल्याशिवाय त्यांचा प्रवास तडीस गेला. एके ठिकाणीं मात्र गांवचे लोक, नको म्हणून सांगितलें असतां बळजबरीनें पहारा करण्यास आले; आणि दुसऱ्या दिवशीं सकाळीं मजुरी मागूं लागले. ती देत नाहीं म्हटल्यावर तीनशें लोकांनीं मिळून टेरीचे गाडे अडविले. तेव्हां एका इंग्रजानें आपली बंदूक रोंखिली. तिकडे त्या लोकांनींही आपले

धनुष्यबाण सज्ज केले. इतक्यांत असें समजलें, कीं दीड रुपया बक्षीस दिल्यास सर्व लोक खुष होऊन जातील. लगेच त्याप्रमाणें बक्षीस घेऊन लोक चालते झाले.

परंतु मांडवगड व सुरत यांमधील पहाडी प्रदेशांत दरवडेखोरांची वस्ती असल्यामुळें, प्रवासी लोकांस बलुची, पठाण, रजपूत इत्यादि जातींच्या धिप्पाड लोकांचा पहारा बरोबर घ्यावा लागे. हे लोक इतके इमानी असत, कीं ताब्यांतील मालाचें व माणसांचें रक्षण करण्यांत ते स्वतः मरण्यास तयार असत. टेरी असें सांगतो, कीं असा पहारा असला म्हणजे सोनें व जवाहीर घेऊन सुद्धां पाहिजे त्या परकी इंग्रज मनुष्यास सुरतेहून लाहोरासही सहज एकटें जातां आलें असतें; आणि पहारेकऱ्यांस त्यांची ठरीव मजुरी दिली, म्हणजे त्यांनीं सुतळीच्या तोड्यास सुद्धां हात लाविला नसता. हिंदुस्थानांतील नोकरलोकांचें इमान विलक्षण आहे, असें रे० टेरी सांगतो. सामान्यतः त्यांचा पगार सुमारें अडीच रुपये दरमहा असून तो बहुशः दरप्रतिपदेस आगाऊ द्यावा लागे. फौजेंत असंख्य लोक आहेत. तिजवरील अधिकारी युद्धकलेंत निष्णात नाहींत. सेनानायकास युद्धकलेचें ज्ञान नसल्यामुळें फौज लंगडी आहे.

बादशहा आपल्या प्रांतांवरील सुभेदारांस वरचेवर बदलितो, एका ठिकाणीं फार दिवस कोणास राहूं देत नाहीं. कोणींही डोईजड होऊं नये, म्हणून बहुधा दरसाल त्याची बदली करण्यांत येते. बादशहा व सुभेदार यांस मृत्यूची शिक्षा देण्याचा अधिकार आहे. ऋणकोनें कर्जाची फेड न केल्यास जामिनासह त्यास कैदेची शिक्षा होते, किंवा बायकामुलां-सह त्यांस विकण्यांत येतें.

२. पीट्रो डिला व्हेल, (अ) सुरत.—हा इटलींतील गृहस्थ रोमनकॅथोलिक पंथाचा अभिमानी होता. तो इकडे व्यापाराच्या उद्देशानें आला नसून, विद्वान् व चौकस असल्यामुळें इजिप्ट व हिंदुस्थान ह्या देशांतील धर्मांत कांहीं साम्य आहे कीं काय, हें पाहण्याकरितां इकडे आला होता. प्रवासांत त्याची आवडती बायको मरण पावल्या-मुळें त्यास अतोनात दुःख झालें, आणि तिचें शव मसाला भरून त्यानें बरोबर घेतलें होतें. तो सन १६२३ च्या फेब्रुवारी महिन्यांत सुरत येथें येऊन उतरला. त्या वेळीं त्याचें वय ३७ वर्षांचें होतें. डिला

व्हेलबरोबर एक त्याच्या घरांत पाळलेली सुशील मुलगी होती. सुरतचे अधिकारी बंदरावरील उतारूंचें सामान फारच कसोशीनें तपासतात अशी बहुतेक सर्वांची ओरड असे. परंतु वरील मुलीशीं ते अधिकारी फारच सभ्यपणानें वागले. तिला कोणत्याही प्रकारचा उपद्रव त्यांनीं होऊं दिला नाहीं. त्या वेळच्या युरोपीय व्यापाऱ्यांमध्यें एक विलक्षण प्रकार दृष्टीस पडतो. हिंदुस्थानास येणारे बहुतेक इंग्रज व्यापारी अविवाहित असत. ईस्ट इंडिया कंपनीनें असा एक सक्तीचा नियम केला होता, कीं हिंदुस्थानास जाणाऱ्या लोकांनीं आपल्या बायका बरोबर घेऊन जातां नये. डच लोकांच्या संबंधानेंही पूर्वीं असाच नियम होता. परंतु अलीकडेस त्यांनीं जावा बेटांत न्यू बटेव्हिया नांवाची एक वसाहत स्थापिली असून, तेथें सहकुटुंब जाऊन राहणाऱ्यांस पुष्कळ सवलती दिल्या होत्या. म्हणून बहुतेक डच व्यापारी विवाहित असत; आणि ज्यांचीं लग्नें झालेलीं नसत, ते कसें तरी करून बायका मिळविण्याच्या खटपटीस लागलेले असत. युरोपीय स्त्रिया न मिळाल्या, तर आर्मिनियन, सिरियन, अगर हिंदु बायका मिळाल्या, तरी ते त्यांजबरोबर लग्न करीत. मात्र ती मूळची क्रिस्ती नसली, तर तिला क्रिस्तधर्म स्वीकारावा लागे. कित्येकदां असें घडे, कीं डच लोक बाजारांत गुलाम म्हणून विक्रीस आलेल्या मुली विकत घेत, आणि क्रिस्ती करून त्यांजशीं लग्न लावीत व जावा येथें जाऊन राहत.

डिला व्हेल सुरतेस आला, त्या वेळीं तेथील एका श्रीमान डच गृहस्थाकडे तो जाऊन राहिला. डच व इंग्रज ह्यांच्या वखारींचे मुख्य अध्यक्ष मोगल सरदारांप्रमाणेंच मोठ्या थाटानें बाहेर निघत. त्यांजबरोबर निशाणें, वाद्यें व धनुष्यबाण घेतलेल्या शिपायांचा तांडा चालत असे. हा थाट केवळ शोभेकरितां होता. एतद्देशीय नोकरांची मजुरी फार थोडी असे. दरमहा तीन रुपये दिले, म्हणजे चांगल्या कुटुंबांतले नोकर मिळूं शकत. पण गुलाम विकत घेतले म्हणजे तर नोकरांची चंगळ उडे. मासे व तांदूळ विपुल असल्यामुळें त्यांच्या खाण्याचा खर्चही विशेष नसे. डिला व्हेल यास हिंदु लोकांचे आचारविचार पाहण्याची विशेष आवड होती. सुरतेस हिंदु स्त्रियांस सती जाण्याची बंदी असे, तरी सुभेदाराची विशेष परवानगी घेऊन सती जाणें शक्य होतें. सुरत येथें पार्वतीदेवीची पूजा डिला

व्हेलच्या दृष्टीस पडली. त्या देवीचा चेहरा एका झाडावर खोदून तिची लोक पूजा करीत. ती देवी नवसास पावते असा सार्वत्रिक समज होता. जवळच एक लहानसें देऊळ असून तेथील गुरूच्या प्रसादानें वांझ बायकांस मुलें होतात अशी ख्याति होती. सुरत येथें कांहीं दिवस राहून व्हेल खंबायतेस गेला. तेथें एका डच व्यापाऱ्यानें त्याची उत्तम बर्दास्त ठेविली. खंबायत येथें लंगड्या व आजारी जनावरांस व पक्ष्यांस पोसण्याचा आणि त्यांस औषधोपचार करण्याचा एक पांजरापोळ असून त्याचा खर्च हिंदुलोक मोठ्या भक्तीनें चालवीत. तेथें उंदीरही पाळले जात असत. त्याचप्रमाणें बकरेमेंढ्यांचा दवाखाना तेथें असून मुसलमान खाटकांस पैसे देऊन, हिंदुलोक ह्या जनावरांची सुटका करीत. पांजरपोळांत निराश्रित गाईही, ठेविलेल्या होत्या. खंबायत येथील महाजनमंडळीनें बादशहाकडे रकमा भरून गोवध बंद करविला होता. ह्या नियमाविरुद्ध तेथें कोणी मुसलमानानें गोवध केल्यास त्यास मृत्यूची शिक्षा होत असे.

(आ) गोवें.—ता. २४ मार्च स. १६२३ रोजीं व्हेल सुरतेहून निघाला, तो ता. ८ एप्रिल रोजीं गोव्यास पोंचला. गोव्यास पाद्री लोकांचा भरणा विशेष होता. तेथचे एतद्देशीय लोक कृष्णवर्ण असून चिंध्या परिधान केलेले होते. पोर्तुगीझ लोकांची संख्या थोडीच होती. पूर्वी वैभव भोगून अलीकडे डच व इंग्रज यांच्या वैरामुळें ते अगदीं खालावले होते. तरी पण हलक्या नोकऱ्या पतकरण्यास ते राजी नसत; निदान बाह्यतः तरी तसें दाखवीत. रात्रीं निखालस भिक्षा मागत, परंतु दिवसभर त्यांच्या डामडौलांत कमतरता नसे. देश समृद्ध असल्यामुळें त्यांचें कसें बसें तरी चाले. यःकश्चित् नोकर सुद्धां अंगावर रेशमी वस्त्रें घेऊन तलवार लटकावून बाहेर पडत. ह्यासंबंधीं त्यांच्या समजुतींत इतका विक्षिप्तपणा शिरला होता, कीं डिला व्हेलबरोबर स्वतःच्या मुलीसारखी पाळलेली जी बाई होती, तिजला, स्वतःजवळ त्यानें ठेवणें त्यांस अप्रशस्त वाटून, लोकसमाधानार्थ गोव्यास तीस दुसऱ्या एका गृहस्थाच्या घरीं ठेवणें व्हेल यास भाग पडलें. नेहमींच्या व्यवहारांत सुद्धां बायकापुरुषांनीं एकत्र होऊं नये, असे कायदे त्या वेळेस गोव्याच्या पोर्तुगीझ लोकांत केलेले होते. त्यानें आपल्या मृत बायकोचें शव रोम येथें नेऊन मोठ्या समारंभानें पुरिलें, आणि नंतर बरोबर बाळगिलेल्या त्या बाईशींच लग्न

लाविलें. इकडे आलेले पोर्तुगीझ लोक आपला मूळचा क्रिस्तीधर्म पुष्कळ अंशीं विसरून एतद्देशीय लोकांच्या धर्तीवर ते आपले धर्मोत्सव करूं लागले होते, तें व्हेल यास आवडलें नाहीं.

डिला व्हेलनें पुढें निरनिराळ्या हिंदु चालीरीतींचा बराच वृत्तान्त दिला आहे. त्या वेळेची स्थिति समजण्यास तो बराच उपयुक्त आहे. ११ मे रोजीं स्पेनदेशाहून एक पोर्तुगीझ गृहस्थ तुर्कस्तानांतून पायवाटेनें गोव्यास आला. ऑक्टोबरच्या अखेरीस मॅड्रिडशहरीं लिहिलेलीं पत्रें त्यानें बरोबर आणिलीं. हा प्रवास त्यानें फार जलद केला, असें त्यावेळीं म्हणत. गोवें शहरांत जितके उत्सव आणि समारंभ होत, तितके जगांतील दुसरे कोणत्याही शहरांत होत नसतील. याचें कारण तेथें धर्मपंथच पुष्कळ असून, पाद्री लोकांची संख्या जरुरीपेक्षां पुष्कळच ज्यास्त व सधन होती. गोव्याचे क्रिस्ती लोक आळशी व निरुद्योगी असल्यामुळें अशा उत्सवांत कालक्षेप करणें त्यांस आवडे. क्रिस्ती लोकांची नीतिमत्ता किती बिघडली होती, हें दाखविण्यास डिला व्हेलनें एक उदाहरण दिलें आहे. क्रिस्ताच्या मरणाच्या उत्सवांत त्याचें चित्र दाखविण्यांत आलें, तेव्हां जमलेले सर्व बायकापुरुष मोठमोठ्यानें रडूं लागले. बायकांना तर रडण्याचा असा कांहीं विलक्षण आवेश आला होता, कीं त्या आपल्या बरोबरच्या दासींना सुद्धां रडण्यास सांगत. इतकेंही करून दासी न रडल्या, तर त्यांस मोठमोठ्यानें मारीत; तेणेंकरून त्यांचें रडणें दूरवर ऐकूं येई. गोव्याहून डिला व्हेल पुढें कर्नाटकांत गेला.

डिला व्हेल यास हुकेरी येथें पुष्कळ मजा पाहण्यास सांपडली. गौरीपूजेच्या वेळीं कित्येक बायांनीं केलेला टिपऱ्यांचा नाच त्यास मोठा गमतीचा वाटला. कित्येक जंगमलोक एका बहालावर आपणास टांगून घेऊन देहास शासन करून घेत होते. तो देखावा फारच हृदयद्रावक होता. पाठीच्या चामड्यांत दोरी घालून ती बहालाच्या आंकड्यास टांगीत; व खालीं तोंडकरून ते झोके घेत; आणि तोंडानें ईश्वरभजन करीत. एका नाचणाऱ्या बाईनें अगदीं अकल्पनीय कसरत करून दाखविली. व हुकेरी शहरांत एके दिवशीं रात्रीं एक बाई सती गेली. तिचा निश्चय, धैर्य व ऐहिक सुखाच्या क्षणभंगुरत्वाविषयीं तिनें आवेशानें केलेला उप-

देश, इत्यादि तिचे गुण पाहून, डिला व्हेल यास तिची धन्यता वाटली. हुकेरी शहरांत अघोरेश्वराचें मोठें देवालय होतें. देवाची मूर्ति षोडशभुजा होती. त्याच्या पालखीची मिरवणूक एके दिवशीं रात्रीं निघाली, ती डिला व्हेल यास पाहण्यास सांपडली. दुसऱ्या दिवशीं प्रतिपच्चंद्राचा उत्सव झाला. हिंदुलोकांची देवपूजा म्हटली म्हणजे गायन, वादन, नर्तन इत्यादिकांनीं मनुष्याप्रमाणें देवाची शुश्रूषा करणें, असा डिला व्हेलचा ग्रह झाला. प्रार्थना किंवा अध्ययन यांजमध्यें कालक्षेप करितांना फारसे लोक त्यास आढळले नाहींत. साधुवृत्ति धारण करणाऱ्या जंगम साधूंचीही त्यास मोठी गंमत वाटली.

(इ) ओलाझा.—मंगळूरच्या हद्दीवर ओलाझा नामक शहर होतें. तेथें डिला व्हेल गेला. हिंदूंच्या वस्तींत प्रवास करणें त्यास फार कष्टप्रद वाटे. हिंदु लोकांचे आचार त्यास फार विक्षिप्त वाटले. मत्स्य किंवा मांस यांचा आहार तिकडे निषिद्ध मानिला असून, तांदूळ, तूप, दूध वगैरे पदार्थ मिळण्यास सुद्धां प्रयास पडत. डिला व्हेल तेथून मंगळुरास गेला. मंगळूर येथें असतां तो योगिराजास भेटला. योगिराज म्हणून योगी लोकांचा राजा असून त्यास सालिना तीसहजार रुपयांचा प्रदेश तोडून दिलेला होता. हा राजा बहुतेक शेतकऱ्यांच्या धर्तीवर राहत असे. तो वृद्ध व हुशार दिसला, परंतु त्यास विद्येचा गंध नव्हता.

(उ) कालिकोट.—मंगळुराहून डिला व्हेल कालिकोटच्या झामोरीन राजास भेटण्यास गेला. त्या वेळीं पोर्तुगीझ लोकांचा वकील कालिकोट व कोची येथील राजांचा तंटा मिटविण्यास जात होता. राजवाड्यांत राजानें त्याची सत्कारानें भेट घेतली. राजा सुमारें तीस वर्षांचा असून सोन्यामोत्यांनीं मढविलेला होता. शेजारीं बहिणीच्या दोन मुली बसल्या होत्या. त्या बहिणींस राणी हा किताब होता. पण सर्वांचीं अंगें कंबरेशिवाय बाकी अगदीं उघडीं होती. कालिकोट येथें दुसरी विशेष हकीगत घडली नाहीं. गोव्यास परत येऊन डिला व्हेल सन १६२४ च्या मार्च महिन्यांत बसरा व आलेपो ह्या मार्गानें युरोपास निघून गेला. त्या वेळीं इंग्रजांनीं कांहीं मोगलांची जहाजें पकडलीं, त्याजबद्दलचा बादशहानें सूड घेतला, ती हकीकत ब्रिटिश रियासतींत दिलेली आहे.

३. जॉन ऑल्बर्ट ड मंडेल्स्लो.—जॉन आल्बर्ट ड मंडेल्स्लो हा इकडे आला, तेव्हां २४ वर्षांचा होता. हॉल्स्टेनच्या ड्यूकवरून इराणच्या शहाकडे आलेल्या वकिलातीबरोबर तो इराणांत आला, आणि इराणांतून निघून सुरत बंदरीं तो इ स. १६३८च्या एप्रिल महिन्यांत उतरला. तेथील अधिकाऱ्यांनीं त्याचा सर टॉमस रो प्रमाणेच सत्कार केला. सुरत येथील इंग्रज वसाहतीच्या प्रेसिडेंटाच्या घरीं तो राहिला. इंग्रज व शहाजहान यांजमध्यें चांगला स्नेहभाव वसत होता. सेप्टेंबर महिन्यांत सुरतेहून एक काफला निघाला, त्याजबरोबर तो अहंमदाबादेस गेला. बरोबर चार इंग्रज व्यापारी होते. त्याजबरोबर बारा युरोपियन शिपाई व बारा एतद्देशीय शिपाई इतका पहारा होता. इंग्रज व डच व्यापाऱ्यांनीं एतद्देशीय पोशाख केला होता. कारण परकी लोकांस रस्त्यावर भीति विशेष असे. वाटेंत त्यांनीं भडोच व बडोदें येथें मुक्काम केला. अहंमदाबाद येथें आरबखान नांवाचा मोगलांचा सुभेदार होता, त्यास राजा हा किताब असून तो मोठा धनाढ्य होता. त्याची मुलगी शहाजादा सुजा ह्यास दिली होती. त्याच्याजवळ बाराहजार फौज व पन्नास हत्ती होते. मंडेल्स्लोनें दोन वेळ आरबखानाची भेट घेतली. तो आरबखानास फार आवडला. आरबखानाच्या आग्रहास्तव मंडेल्स्लोनें ईकडील चालीचा पोशाख केला. आरबखानानें त्यास मेजवानी दिली. दुसऱ्या भेटीच्या वेळेस आरबखान फार कामांत होता. त्या वेळच्या मोगली सुभेदारांत आरबखान हा शूर व लायक मनुष्य होता. इंग्रज व डच व्यापाऱ्यांच्या देखत त्यानें आठ नाचणारणींस फांशीची शिक्षा दिली. त्यांचा अपराध इतकाच होता, कीं हुकुमाप्रमाणें त्या हजर झाल्या नाहींत. ह्या कडक शिक्षेबद्दल त्या युरोपियन गृहस्थांनीं आश्चर्य प्रदर्शित केलें. त्या वेळीं आरबखान म्हणाला. 'गृहस्थहो, माझा हुकूम जर लोक पाळीनातसे झाले, तर ह्या सुभेदारीचें काम पळभर देखील माझे हातून निभणार नाहीं.' दुसऱ्या एका काफल्याबरोबर मंडेल्स्लो आग्र्यास गेला. रस्त्यांत रजपूत लोकांशीं त्याचे अनेक झगडे झाले. आग्रा-शहरची शोभा पाहून मंडेल्स्लो चकित झाला. बहुतेक देशांचा आग्र्याशीं व्यापार चालत असे. येणाऱ्या व जाणाऱ्या मालावर

दहा टक्के जकात घेण्याची वहिवाट होती. शहरचे रस्ते चांगले रुंद होते. प्रवाश्यांकरितां तीनतीन मजली अशा ऐशीं धर्मशाळा होत्या. प्रत्येक धर्मशाळेंत तळघरें, तबेले वगैरे होते; आणि एक अधिकारी नेमलेला असे, तो प्रवाशांस दाणावैरण व इतर सामान पुरवी. लवकरच मंडेल्स्लोला आग्र्यांतून पळ काढून जावें लागलें. कारण इस्पहान येथें असतांना त्यानें एका मनुष्याशीं कलह करून त्यास ठार मारिलें होतें. त्या मेलेल्या माणसाचा कोणी नातेवाईक त्यास आग्र्यास भेटला, तेव्हां कदाचित् एखाद्या वेळीं गांठून तो आपणास ठार मारील, ह्या भीतीनें मंडेल्स्लो तावडतोब निघून सुरतेस आला. तेथें ईस्ट इंडिया कंपनीनें त्यास योग्य रीतीनें वागविलें. सन १६४०त तो इंग्लंडास गेला, आणि तेथून जर्मनींत कांहीं दिवस लष्करांत नोकरी करून पॅरिस येथें देवीच्या आजारानें मरण पावला. फ्रान्सिस् बर्नियर हा शहाजहान बादशहा दिल्लींत असतां हिंदुस्थानांत आला, त्या वेळीं त्याचें वय तीस वर्षांचें होतें. राजदरबारच्या कामांत मंडेल्स्लोपेक्षां तो ज्यास्त कुशल होता. स.१६५५पासून १६६७पर्यंत १२ वर्षे तो हिंदुस्थानांत होता. आरंभीं युरोपांत अनेक विद्वान् गृहस्थांजवळ राहून अभ्यास केल्यावर तो फ्रान्स देशांतून इजिप्टमध्यें गेला. तेथें कांहीं दिवस राहून तो स. १६५५त सुरतेस उतरला. त्यानें लिहिलेली हकीकत विशेष महत्त्वाची आहे. फज्ल्खान नामक सरदाराची व त्याची ओळख होऊन त्याजपाशीं बर्नियर राहिला. हा फज्ल्खान फार सज्जन गृहस्थ असून औरंगजेबाचा मुख्य वजीर होता. फज्ल्खान यासच दानिष्मंदखान असें दुसरें नांव असावें असें वाटतें. दानिष्मंदखानाच्या आश्रयास बर्नियर दिल्ली येथें राहिला होता, त्याचें दुसरें नांव नेमतखान अली असें असून त्यानें अनेक ग्रंथ केले आहेत. त्याचें भाषण मोठें थट्टेखोर असे. बर्नियरनें फज्ल्खानास यूरोपच्या भाषा शिकविल्या, आणि त्याजकरितां अनेक सुंदर लॅटिन ग्रंथांचीं भाषांतरें केलीं. बर्नियर जाऊं लागला, तेव्हां त्याजकडून फज्ल्खानानें नानातऱ्हेचे सुंदर ग्रंथ युरोपांतून मागवून घेतले. औरंगजेबानें राज्यप्राप्तीकरितां जीं कारस्थानें केलीं, त्यांचें हुबेहुब व चित्तवेधक वर्णन बर्नियरनें केलें आहे. तें वर्णन त्यानें युरोपांत परत गेल्यावर लिहिलें. ह्याशिवाय टॅव्हर्नियर म्हणून एक फ्रेंच जव्हेरी सन १६४० पासून

१६६७ पर्यंत हिंदुस्थानांत फिरत होता. त्यानें मोगल रियासतीचें वर्णन केलें आहे, तेंही पुष्कळ उपयोगाचें आहे.

४. जॉन् बॅप्टिस्टा टॅव्हर्नियर.—हा एक प्रसिद्ध फ्रेंच जव्हेरी असून सन १६४१ पासून १६६८ चे दरम्यान म्हणजे डिला व्हेल गेल्यावर वीस एक वर्षांपासून हिंदुस्थानांत व्यापारोद्देशानें फिरत होता. तो केवळ व्यापारी असल्यामुळें, त्याचें प्रवासवृत्त धंदाउदीम करणारांच्या उपयोगाचें आहे, तितकें इतरांच्या उपयोगी नाहीं. तो युरोपांतून पायरस्त्यानें इराणपर्यंत येऊन पुढें जलमार्गानें हिंदुस्थानास त्यानें अनेक खेपा केल्या. शेवटच्या वेळीं परत जातांना मात्र तो आफ्रिकेस वळसा घालून जलमार्गानें गेला. इस्पहान शहरांतून निघून तो पायरस्त्यानें कंदाहार, काबूल, लाहोरवरून आग्र्यास येई, आणि क्वचित् इराणच्या आखातांतून सुरतेस उतरे. आग्रा व सुरत हीं त्याचीं हिंदुस्थानांत उतरण्याचीं मुख्य ठिकाणें होतीं. सुरतेहून आग्र्यास जाणें झाल्यास तो कधीं बऱ्हाणपूर, इंदूर, ग्वाल्हेरकडून जाई आणि कधीं बडोदा, अहंमदाबादेवरून जाई. बंगाल्यांतही अलाहबाद, बनारस, पाटणा, राजमहाल, डाक्का, हुगळी इत्यादि ठिकाणीं तो खेपा करीत असे. सारांश, इराण, अफगाणिस्तान, व हिंदुस्थानचा बहुतेक भाग ह्यांत तो हिंडला होता. सुरतेहून देवगडच्या वाटेनें गोवळकोंड्यास व तेथून पूर्वेस मच्छलीपट्टण येथें जाऊन, तेथून दक्षिणेंत डच वसाहत पुलिकत, इंग्रजांचें बंदर मद्रास व पोर्तुगीझ लोकांचें बंदर सेंट टामे इत्यादि पाहून, पुनः कर्नाटकांतल्या गंडिकोट्याच्या मजबूद किल्ल्यावरून गोवळकोंड्यास तो गेला. पश्चिमेकडील मलबार व कानडा ह्या भागांची मात्र त्यास विशेष माहिती नव्हती.

हिंदुस्थानांत आगगाडी होण्यापूर्वीं प्रवासाची पद्धति म्हटली, तर दररोज नेमके कोस चालून ठरींव मुक्कामावर जाऊन उतरावयाचें. त्या वेळीं हिंदुस्थानांतला प्रवास जितका सोयीचा व सुखकर होता, तितका फ्रान्स व इटली या देशांत नव्हता, असें टॅव्हर्नियरचें म्हणणें आहे. युरोपांतल्याप्रमाणें येथें घोडीं किंवा गाढवें नसत. येथें बैलगाडींत, पालखींत, किंवा बैलावर बसून लोक प्रवास करीत. शिग्रामास दोन बैल जोडले जात असून त्यांत दोन माणसें बसत. परंतु टॅव्हर्नियरसारख्या सुखवस्तु गृहस्थास एका गाडींत एकटेंच जाणें बरें वाटे. गाडींत जरूरी-

पुरतें सामान राही. टॅव्हर्नियरनें आपली स्वतःची गाडी ठेविली होती. गाडी व दोन बैल मिळून सर्व संचास सहाशें रुपये खर्च आला. रोज सुमारें चाळीस मैल पळत जाऊन, साठ साठ दिवस ते बैल एकसारखा प्रवास करीत. अर्ध्या दिवसाची मजल झाल्यावर तूप व गुळी-साखर ह्यांत गव्हांची कणीक तिंबवून तिचे रोंठ बैलांस खाऊं घालीत. अशी गाडी भाड्यानें केली असतां, दिवसास एक रुपया भाडें पडे. सुरतेहून आग्र्यास किंवा गोवळकोंड्यास जाण्यास चार दिवस लागत, आणि प्रत्येकीं ४०–४५ रुपये भाडें पडे. ज्यांना ज्यास्त खर्च करण्याचें सामर्थ्य असे ते मेण्यांतून जात. मेणा सुंदर दिसत असून मश्रूनें मढविलेला असे. त्यास सहा भोई लागत, आणि एक असामी छत्री धरून बाजूला चाले. ते बहुधा पुष्कळ जलद चालत. दर असामीस दरमहा चार रुपये पगार द्यावा लागे. साठ दिवसांहून ज्यास्त लांबीचा प्रवास असल्यास ते पांच रुपये पगार घेत. आपला मोठेपणा लोकांस दिसावा, म्हणून पंचवीसतीस तिरंदाज बरोबर घ्यावे लागत. कित्येकां-जवळ लहान बंदुकाही असत. केव्हां केव्हां लोक बरोबर निशाण घेऊन फिरत. डच व इंग्रज व्यापारी आपापल्या कंपनीच्या खुणेसाठीं नेहमीं निशाणें बरोबर नेत. तिरंदाज लोक पहाऱ्याच्याही उपयोगी पडत, आणि रात्रीं मुक्कामावर पाळीपाळीनें जागत बसत. हे पहारे-करी आपल्या नोकरींत कधीं कसूर करीत नसत. कारण ज्या ठिकाणाहून ते घेतले जात, तेथील त्यांचा अंमलदार त्यांच्या इमानी-पणाबद्दल जामीन धरला जात असे. अशा रीतीनें त्यानें आपणास जामीन राहवें म्हणून दरएक असामी अंमलदारास दोन रुपये देत असे. मोगलांच्या वेळेस हिंदुस्थानांतील रस्ते फार चांगले होते. रोमन लोकांप्रमाणें मोगलांचेंही रस्ते साफ ठेवण्याकडे विशेष लक्ष असे. शिवाय दूरदूरच्या प्रांतांवर अंमल राखणें, व बंडावे मोडणें ह्या गोष्टी चांगले रस्ते असल्याशिवाय करितां येत नसत. उत्तरेकडील रस्त्यां-इतके थेट दक्षिणेकडील रस्ते चांगले नव्हते. हैदराबादेपासून मच्छली-पट्टणास जाणारा मोठा रस्ता गोवळकोंडा येथील सुलतानांच्या ताब्यांत होता. त्या प्रदेशांत नद्या, तलाव, व पर्वत विशेष असल्यामुळें रस्ता बराच अडचणीचा होता. हैदराबादेहून कन्याकुमारीस जाणारा रस्ता

हिंदुराजांच्या प्रदेशांत होता. तो पुष्कळ वाईट असल्यामुळें बहुतेक माल बैलांच्या पाठीवरून न्यावा लागे. कित्येक ठिकाणीं गाडी चालण्यास अडचणी असल्यामुळें मेण्यांतून जाणें भाग पडे. परंतु तिकडे भोई फार जलद् चालत असल्यामुळें, अगदीं दक्षिणेकडचा प्रवास उत्तरेपेक्षां लवकर व सुखकर होत असे. मुसलमानी प्रदेशांत मांस वगैरे विकत मिळण्याची सोय असे, तशी कित्येक हिंदु प्रदेशांत नसे. कांहीं गांवांत मांसाहार वर्ज्य समजला जात असल्यामुळें, दूध व धान्य यांशिवाय दुसरें कांहीं मिळत नसे. निदान युरोपीय प्रवाश्यांस तरी ही मोठी अडचण वाटे. थंडीच्या दिवसांत लोक बहुतेक प्रवास दिवसाच करीत; पण उन्हाळ्यांत दिवसास उष्णतेमुळें बाहेर पडण्याची सोय नसल्यानें बरीच मजल रात्रीची करावी लागे. चोरांच्या वगैरे भीतिस्तव तटबंदी गांवाचे दरवाजे रात्र पडल्याबरोबर बंद होत; आणि मग आंतल्या लोकांस बाहेर व बाहेरच्यांस आंत जातां येत नसे. कोणत्याही ठिकाणीं चोरी व दरवडा पडल्यास तेथच्या अंमलदारावर सर्व जबाबदारी असल्यामुळें, शहराचे दरवाजे बंद करणें भाग पडे. म्हणून प्रवास करितेवेळीं टॅव्हर्नियर सायंकाळीं खाणें बरोबर घेऊन दिवस बराच असतां बाहेर पडे; आणि मग रात्रीं प्रवास करी. टॅव्हर्नियरच्या सांगण्यांत त्या वेळेस टपालाची व्यवस्था चांगली होती असें दिसतें. त्या व्यवस्थेनें टपाल घोड्यांपेक्षां लवकर जाई. रस्त्यावर दरसहा मैलांवर लहान झोंपड्या बांधिलेल्या असून, त्यांत पायीं पळणारे टपालवाले तयार राहत. मागच्या पळणाऱ्यांनीं टपाल आणून टाकिल्याबरोबर, नवीन लोक तें घेऊन पुढील मुक्कामास पळत जात. अशा प्रकारची बहुतेक राज्यांत टपालाची व्यवस्था होती. ज्या ठिकाणीं रस्ते बांधिलेले नसत, तेथें झाडांच्या खुणांवरून वाटा ध्यानांत ठेवण्याचा प्रचार असे. ज्या प्रदेशांत झाडें नसत, तेथें पांचशें पावलांच्या अंतरावर दगडांची रास करून ती चुन्यानें सारवीत. तेणेंकरून अंधाऱ्या रात्रीं व पावसाळ्याच्या काळोखांत सुद्धां टपालवाल्यांस रस्ता सांपडण्यास अडचण पडत नसे. वर सांगितलेले दगडांचे गडगे दुरुस्त ठेवणें व त्यांस सफेती चढविणें, हें काम त्या त्या गांवच्या लोकांकडे सोंपविलेलें असे. बहुतेक व्यापार बैलांच्या पाठीवरून अगर मोठमोठ्या गाड्यांवरून चाले. घोडे व गाढवें फारशीं नसत. उंटांचा उपयोग

मोठ्या वजनाचें सामान नेण्यास करीत. मालाची नेआण लमाणें करीत. गहूं, तांदूळ, डाळ, मीठ इत्यादि जिनसांनीं भरलेले दहा दहा बारा बारा हजार बैल एकदम निघत, आणि ज्या ठिकाणीं जो माल पिके तेथें त्याचा मोबदला करीत. अरुंद वाट आली म्हणजे असा तांडा चालत असतां, रस्ता खुला होईपर्यंत दोन दोन तीन तीन दिवस प्रवाश्यास मुक्काम करावा लागे. अशा लंमाणवाल्यांस मणेरी असें म्हणत. कित्येक ठिकाणीं त्यांस वणजारी असें म्हणण्याचाही परिपाठ होता. ते नेहमीं तंबूंत राहत; आणि सर्व मुलेंमाणसें बरोबर बाळगीत. गहूं, तांदूळ, डाळ व मीठ हे चार मुख्य जिन्नस नेणाऱ्या चार मुख्य जाति होत्या. प्रत्येक जातींत सुमारें एक लाख माणसें होतीं. दरएक जातीचे लोक एकाच जिनसाची नेआण करीत. प्रत्येकीचा दरएक एक म्होरक्या असून त्याचा रुआब राजासारखा असे. त्याच्या गळ्यांत मोत्यांचा कंठा असे. दोन तांडे एकत्र भेटले म्हणजे प्रथम वाट मिळण्यासाठीं कैकवेळां युद्धप्रसंग झाल्याशिवाय राहत नसे. असे युद्धप्रसंग घडून आल्यानें व्यापारास फार धक्का बसतो असें पाहून, औरंगजेब बादशहानें मीठ व गहूं यांच्या म्होरक्यांस भेटून पुष्कळ बंदोबस्त केला, आणि त्यांस बक्षीस देऊन वाटेस लाविलें. चार जिनसांचे चार तांडे आपल्या कपाळावर निरनिराळीं चिन्हें धारण करीत. लिंगाईत वाण्याप्रमाणें त्यांच्या गळ्यांत एक ल्हानसा डबा असे. आपल्या गुरांवर त्यांची अमर्याद ममता असे. विशेषतः ज्यास मूल नसे, ते तर जनावरांस मुलासारखेच समजत. बायका आपल्या अंगांवर निरनिराळ्या फुलांचे आकार गोंदून घेत. दररोज सकाळीं पुरुष जनावरांवर ओझीं ठेवीत, बायका तंबू वगैरे सामान आटपून घेत, आणि सर्व असामी देवाची पूजा करून बाहेर पडत. प्रत्येक तांड्यांत देव व पुजारी बरोबर असून देवास वाहून नेणारा सुंदर बैलही नेमिलेला होता. गाड्यांचा तांडा असल्यास त्यात शंभर दोनशें गाडे असत. प्रत्येक गाड्यास दहा बारा बैल जोडलेले असून, संरक्षणार्थ चार शिपाई असत, ते गाडे धरून दोनही बाजूंस चालत, आणि गाडा कलंडून पडूं नये म्हणून त्याच्या दोऱ्या धरून ठेवीत.

टॅव्हर्नियरनें आणखी पुष्कळ माहिती आपल्या पुस्तकांत लिहिली आहे. तो स्वतः शिकलेला किंवा विद्वान् नसल्यामुळें, पैसा व व्यापार

५१-१२-११-१०-७६१-२०००

ह्यांबाहेर त्यानें फारसें लिहिलेलें नाहीं. तसेंच त्याचें वर्णन पुष्कळ ठिकाणीं कंटाळवाणें व नीरस झालें आहे. हिंदुस्थानांतील निरनिराळ्या जागीं कोणते जिन्नस कसे उत्पन्न होतात, आणि त्यांची काय योग्यता आहे, इत्यादि व्यापारोपयोगी माहिती त्याच्या पुस्तकांत विपुल आहे. हिंदुस्थानच्या व्यापाराची तत्कालीन स्थिति समजून घेण्याची ज्यांची इच्छा असेल त्यांनीं तें पुस्तक अवश्य वाचावें. हिंदूंची सती, बैरागी, फकीर, हत्ती, वाघ, पशु, पक्षी, देवालयें, तलाव, मशिदी इत्यादि नानाप्रकारच्या विषयवर्णनांनीं त्याचें पुस्तक भरलेलें आहे. परंतु त्यांत टेरीची अक्कल व डिला व्हेलची जिज्ञासा दिसून* येत नाहीं. पुस्तकाचा तर्जुमा इंग्रजींत छापलेला आहे.

५. डॉक्टर जॉन फ्रायर, (एम्. डी. केंब्रिज,)—हा थिवेनॉटच्या नंतर सहासात वर्षांनीं म्हणजे स. १६७३ त हिंदुस्थानांत आला. त्या वेळीं इंग्रज व डच यांचें युद्ध सुरू झाल्यामुळें इंग्रजांचीं दहा जहाजें लढाईचें सामान घेऊन मद्रासेस आलीं. त्या वेळीं त्या युद्धांत कंपनीचा डॉक्टर म्हणून हा हिंदुस्थानांत आला. इंग्लंडांतून ग्रेव्हसेंड येथून जहाजें निघालीं, तीं सहा महिन्यांनीं सन १६७३ च्या जून महिन्यांत सिंहलद्वीपास वळसा घालून मद्रासेस आलीं. मद्रासच्या दक्षिणेस तीस मैलांवर सद्रास येथील किल्ल्यावर डच लोकांचीं निशाणें दिसलीं, आणि मद्रासच्या आजूबाजूस डच लोकांचीं जहाजें फिरत असल्याचें दिसल्यामुळें, डॉ० फ्रायरचीं जहाजें उत्तरेस मच्छलिपट्टणास जाऊन उतरलीं. मच्छलिपट्टण येथें इंग्रजांच्या वखारी होत्या, तरी तें शहर गोवळकोंड्याच्या सुलतानाचे ताब्यांत होतें. त्या वेळीं युरोपांतून जहाजें आलीं, म्हणजे वखारींत मोठा आनंद प्रदर्शित करीत. जहाजांतून तोफांची सरबत्ती होऊन तुताऱ्या वाजत. परंतु वखारींतील लोकांना जबाबतोफा सोडतां येत नसत. कारण परकी व्यापाऱ्यांनीं तोफा बाळगूं नयेत व आपसांत लढूं नये, असा सुलतानाचा कडक हुकूम त्यांस होता. यास्तव त्यांजपाशीं असलेल्या तोफा ते गुप्त ठेवीत. तसाच प्रसंग पडल्याशिवाय त्या उडवीत नसत. विलायतेहून खजिना आला होता, तो सुरक्षितपणें वखारींत येऊन पोंचला. एतद्देशीय लोकांचा काळाकुट्ट वर्ण, डोकीं तासलेलीं असून मध्येंच एक लांब शेंडी, कमरेच्या

लंगोटीशिवाय सर्व उघडें शरीर व कानांतील सोनेरी मुध्या, इत्यादि प्रकार पाहून डॉ० फ्रायर यास मौज वाटली. ही हलक्या मजूर लोकांची गोष्ट झाली. परंतु बंदरावर वरिष्ठ प्रतीचे व सभ्य पोषाख केलेले लोक बरेच असून ते ह्या परदेशस्थ लोकांचीं कामें करण्यास तयार असत. त्यांस इंग्रजी भाषा अवगत होती. मच्छलिपट्टण कृष्णानदीच्या उत्तरकांठावर आहे. दक्षिणकांठाकडील प्रदेश पूर्वी हिंदु राजांच्या ताब्यांत होता. अलीकडे त्या प्रदेशावर गोवळकोंड्याच्या कुत्बूशहानें स्वारी करून तिकडे आपला अम्मल बसविला होता. सुलतानानें मद्रासच्या इंग्रजांवर हल्ला केला, पण सेंट जॉर्ज किल्ल्यावरील तोफांनीं त्यास मागें हटविलें. तेव्हां सुलतानानें चारपांच मैल दक्षिणेस जाऊन पोर्तुगीझ लोकांची वसाहत सेंट टॉमे ही काबीज केली, आणि त्यांच्या सर्व तोफा घेतल्या. तेव्हां पोर्तुगीझ लोक इंग्रजांच्या सेंट जॉर्ज किल्ल्यावर जाऊन राहिले. अशा स्थितींत फ्रेंच लोकांचें एक आरमार कारोमांडल किनाऱ्यावर आलें. सुलतानाशीं लढून फ्रेंचांनीं सेंट टॉमे ठिकाण परत घेतलें. या युद्धांत डच लोकांनीं सुलतानास मदत करण्याची तयारी चालविली. मच्छलिपट्टणास हिंदु व मुसलमान ह्या दोघांचीही वस्ती होती. चीट तयार करण्याचें काम ह्या बंदरीं चांगलें होई. जमिनीवर कापड पसरून लहान लहान मुलें सुद्धां इतक्या जलदी त्याजवर छापा उठवीत, कीं नजर ठरत नसे. कांहीं दिवसांनीं डच लोकांचा फ्रेंचांनीं पराभव केला, तेव्हां डॉ. फ्रायर यास खजिना घेऊन मद्रासेस येतां आलें. ह्या वेळीं मद्रासचा व्यापार जरा खालावला होता. सेंट टॉमे परत घेण्याकरितां सुलतानानें इंग्रज व डच ह्यांची मदत मागितली. तेव्हां मद्रसचा गव्हर्नर लँग्हॉर्न् यास मोठी पंचाईत पडली. कारण युरोपांत त्या वेळेस इंग्रजांचें फ्रेंचांशीं सख्य असून डच लोकांशीं युद्ध सुरू होतें. इकडे फ्रेंचांनींही इंग्रजांची मदत मागितली होती. सुलतानास मदत करावी, तर इंग्लंड व फ्रान्स येथील राजांचा डोव्हर येथें तह झाला होता, त्यास हरताळ लागतो; आणि फ्रेंचांस मदत करावी, तर सुलतानाशीं वांकडें येणार. ह्या भानगडी पुढें यावयाच्या आहेतच. फोर्ट सेंट जॉर्ज किल्ल्यांत त्या वेळेस सुमारें पन्नास घरें होतीं. इंग्रज गोरे लोकांची संख्या सुमारें तीस होती, पोर्तुगीझ लोक सेंट् टॉमे सोडून मद्रासच्या किल्ल्यांत राहिले होते.

त्यांची संख्या तीनहजार होती. किल्ल्याच्या बाहेर 'काळें शहर' वसलेलें होतें. त्यांत सर्व एतद्देशीय लोक राहत. त्यांचें एक देवालय असून त्यांत ते लोक आपला सर्व खजिना ठेवीत. येथें हिंदूंची संख्या मोठी असून मुसलमान फारसे नव्हते. ईस्ट इंडिया कंपनीच्या नोकरींत एकंदर तीसहजार एतद्देशीय लोक असून त्यांजवर कंपनीचा अंमल होता. शहराबाहेर शेतें व बागा विपुल असून स्वतः इंग्रज लोकही पुष्कळ लागवड करीत. किनाऱ्यावर अनेक ठिकाणीं परकीय लोकांची तटबंदी हिंदुस्थानांतील राजांनीं करूं दिली, ह्याचें कारण डॉ. फ्रायर असें सांगतो, कीं त्या राजाजवळ आरमारें बहुधा नसत; म्हणून शत्रु आला असतां बंदरावरील ठिकाणें राखण्यास कठीण पडे, तेव्हां युरोपियन लोक येऊन राहिल्यानें आयतेंच आपलें संरक्षण होईल, आणि त्यांच्याशीं स्नेहानें वागलें असतां, प्रसंगीं त्यांची आपणास मदतच होईल, असें त्या राजांस वाटे. ह्या युरोपियन लोकांची शक्ति विशेष आहे, आणि हेच पुढें आपले धनी होतील हें त्या वेळेस कोणाच्याही ध्यानांत आलें नव्हतें.

सन १६७२ च्या ऑक्टोबर महिन्यांत मद्रास सोडून डा० फ्रायर मुंबईस आला. त्या वेळेस मुंबईबेट पोर्तुगीझ लोकांकडून इंग्रजांचे ताब्यांत आल्यास थोडींच वर्षें झालीं होतीं. तेथील हवा फार खराब असून इंग्रज लोकांस मानवत नसे. शिवाय ते लोक फार अत्याचार करीत. त्यांना आपल्या बायका इकडे आणण्याची परवानगी मिळाली, तथापि त्यांची संतति निःसत्त्व व हीन निपजूं लागली. मुंबईहून डॉ० फ्रायर सुरतेस गेला. औरंगजेबाच्या जुलमी राज्यपद्धतीनें सुरतेच्या व्यवस्थेंत अलीकडे पुष्कळ फरक पडला होता. सुरतेस मुसलमान लोकांचें राहणें थाटाचें असे. हिंदु लोक धनाढ्य असले, तरी डौलानें राहत नसत, कारण त्यांजवर मुसलमान अधिकाऱ्यांचा डोळा असे. फकीर व दुसरे मुसलमान भिक्षेकरी यांचा सुळसुळाट अतोनात होऊन ते वाटेल त्या गृहस्थावर भररस्त्यांत झडप घालीत. 'हे परमेश्वरा, आम्हीं हीनवस्त्र रस्त्यांत हिंडावें, आणि ह्या क्रिस्ती काफरांनीं मोठ्या थाटानें घोड्यावर बसून जावें, असा तुझ्या घरीं अन्याय कां बरें असावा!' असे शब्द ते ओरडत. तथापि ह्या फकिरांपासून श्रीमंत मुसलमानांस विशेष त्रास होत असे. स्वतः औरंगजेब फकीरवृत्तीनें

राहत असल्यामुळें लोकही तसेंच करूं लागले. ईश्वरभक्तीच्या नांवावर ते पाहिजे तीं निंद्य कृत्यें करीत. कोणी म्हणे, आपणांस मशीद बांधावयाची आहे. तीस लागणारा खर्च मिळेपर्यंत तो आपणास झाडावर उलटा टांगी. अशाच कित्येक पैसे उपटण्याच्या गोष्टी दुसरे लोक करीत. गरीब हिंदु लोकांनीं सुद्धां त्यांस धर्म न केला, तर तो गुन्हा होऊन काजीसमोर दंड भरावा लागे, नाहीं तर मुसलमानी धर्म पत्करणें भाग पडे. सावकार किंवा दुकानदार यांजकडे जाऊन हे फकीर त्रागा करूं लागत, आणि तेणेंकरून पैसे उपटीत. प्रत्यक्ष नबाबाचेंही त्यांजपुढें कांहीं चालत नसे. शिवाजीच्या स्वारीविषयीं डॉ० फ्रायरनें कांहीं मजकूर लिहिला आहे. सुरतेच्या खाडींत *मोगलांचीं मोठमोठीं* पुष्कळ जहाजें होतीं. तीं बहुतेक इकडे आलेल्या गरीब इंग्रज मजुरांनीं तयार केलीं होतीं. उत्तम जहाजें सुमारें शंभर होतीं, आणि लहान लहान पुष्कळच होतीं. जहाजें असलीं तरी युरोपियन लोकांचा परवाना व तांडेल बरोबर घेतल्यावांचून त्यांस प्रवास करण्याची छाती नव्हती. पोर्तुगीझ, डच व इंग्रज ह्या तिघांचेही परवाने जवळ असल्यावर त्यांस रस्त्यांत त्या लोकांकडून लूट होण्याची भीति नसे. मोगलांच्या गलबतांवर तोफा असत, परंतु त्या बहुतेक दिखाऊ असत. मक्केस यात्रेकरूंची नेआण करण्याकरितां चार मोठीं जहाजें नेहमीं वावरत होतीं. सुरत बंदर गुजराथच्या सुभेदाराच्या ताब्यांत होतें. मीर जुम्लाचा मुलगा महंमद अमीरखान हा त्या वेळेस गुजराथचा सुभेदार होता. तो अहंमदाबादेस राहत असे. मराठे, रजपूत व कोळी इत्यादिकांचा गुजराथेंत विशेष उपद्रव होता; नाहीं तर, सुरतेच्या बंदरास त्या वेळेस जगाच्या व्यापारांत पहिलें पद मिळालें असतें. औरंगजेब बादशहा मोहोरमचे वेळीं शिया लोकांस ताबूत वगैरे करून हसनहुसेनची मिरवणूक काढूं देत नसे. हिंदूंच्या मूर्तिपूजेसारखे वेडेचार त्यांत आहेत असें तो म्हणे. हिंदु लोकांसही त्यानें विशेष छळिलें. हा छळ त्यांनीं कां सोसला, ह्याचें फ्रायर यास मोठें नवल वाटलें.

सन १७७६ त डॉ० फ्रायर सुरतेहून मुंबईस गेला. तेथून जुन्नरच्या मुसलमान नबाबानें जनानखान्यांतील एका बाईस औषध देण्याकरितां त्यास बोलाविल्यावरून तो जुन्नरास गेला. नबाबानें त्याचें

आतिथ्य उत्तम प्रकारें केलें. सुमुहूर्त मिळेपर्यंत रोग्याची व त्याची गांठच पडली नाहीं. चांगला दिवस आल्यावर नबाबानें डॉ० फ्रायर यास जनानखान्यांत नेलें. तेथें सभोंवार पडदे सोडलेला असा एक पलंग होता. फ्रायरनें पडद्यांतून आपला हात आंत घालून पलंगावरील माणसाची नाडी तपासली. ती चांगल्या माणसाची अशी त्यास दिसली. पाठीमागून त्यास समजलें, कीं वैद्याची परीक्षा पाहण्यासाठीं एका सशक्त मोलकरणीचा हात प्रथम त्यास दाखविण्यांत आला होता. नंतर आजारी बाईचा हात त्यानें पाहिला. तिची त्याची दृष्टभेट झाली नाहीं. फ्रायरनें रक्त काढून त्या बाईचें दुखणें बरें केलें. पुनः दुसरे प्रसंगीं एका बाईस पाहण्यासाठीं डॉ० फ्रायर गेला असतां पडदे सुटून खालीं पडले, तेव्हां सर्व बाया एकदम त्याच्या दृष्टीस पडल्या. पण कोणी पळून गेल्या नाहींत. त्यांनीं आपल्या हातांनीं आपले चेहरे झांकिले, आणि बोटांच्या फटींतून डॉ० फ्रायरकडे त्या पाहूं लागल्या. तेथें फळांच्या साली व शिवणकामाचे तुकडे जिकडे तिकडे पडले होते, त्यावरून त्या बाया घरचीं कामें करीत असाव्यात असें फ्रायरनें ताडिलें. जुन्नरच्या नबाबाशीं फ्रायरची लवकरच चांगली सलगी झाली. त्या वेळच्या स्थितीविषयीं उभयतांचीं पुष्कळ बोलणीं झालीं. त्यानें व्यापारांत लक्ष घातल्यास चांगला फायदा आहे, असें फ्रायरनें त्यास सांगितलें. परंतु नबाबास व्यापाराविषयीं पर्वा वाटली नाहीं. कोणी-कडून तरी मराठ्यांशीं मोगलांचा तह न होतां उभयतांचें युद्ध कायम राहवें, एवढाच नबाबाचा हेतु होता. याचें कारण इतकेंच, कीं जों-पर्यंत युद्ध चालू आहे, तोंपर्यंत वाटेल तितक्या फौजेचा आंकडा कागदावर दाखवून मोठमोठ्या नेमणुका बादशहाच्या तिजोरींतून घेतां येत असत. शिवाजीबरोबर तह झाला असतां फौज कमी होऊन आपली प्राप्ति जाईल अशी सर्वांस भीति असल्यामुळें, औरंग-जेबाच्या सरदारांनीं तह घडवून आणण्याची दिशाच घेतली नाहीं. जुन्नरच्या किल्ल्याचा अधिकारी वेगळा होता. तो मूळचा ब्राह्मण असून मुसलमान झाला होता. औरंगजेबाची त्याजवर मर्जी होती. शिवाजीस त्यानें अनेक वेळां फसविलें. लवकरच डॉ० फ्रायर मुंबईस परत येऊन कारवारास गेला. शिवाजीनें कारवार व आसपासचा प्रदेश

विजापूरकरांपासून काबीज केला असून, कारवारास इंग्रजांच्याही वखारी होत्या. कारवाराहून डा० फ्रायर गोव्यास गेला. पोर्तुगीझ बायका स्वरूपानें सुंदर असून पडद्यांत राहिल्यामुळें त्यास निःसत्त्व दिसत होत्या. त्या उत्तम स्वयंपाक तयार करीत. गोव्यासही मराठे लोक येऊन पोंचले होते. त्यामुळें विशेषतः गाईचें मांस मिळण्याची पोर्तुगीझ लोकांस मोठी पंचाईत पडूं लागली. तसेंच हिरेमाणकें, जळाऊ व इमारतीचीं लांकडें इत्यादि जिनसांचा व्यापार पोर्तुगीझ करीत असत. तोही मराठ्यांच्या येण्यानें बंद पडला. कांहीं दिवसांनीं डॉ० फ्रायर कारवारचे दक्षिणेस गोकर्ण येथें गेला. गोकर्ण हें हिंदुलोकांचें पवित्र स्थान मानिलें असून तेथें दरसाल हजारों यात्रा जात असे. तेथें ब्रह्मवृंद मोठा असून विद्यार्जनासाठीं अनेक विद्यार्थी येऊन राहिले होते. पण बहुतेक लोक विद्यार्जनाऐवजीं ईश्वरभक्तींत निमग्न असलेले दिसले. गोकर्णाहून मुंबईस परत येऊन डॉ० फ्रायर इराणांत गेला, आणि तेथून परत येऊन स. १६८१ त युरोपास चालता झाला. मोगल इतिहासास निराळें वळण लागलें, त्याच सुमारास तो हिंदुस्थान सोडून गेला.

६. थिवेनॉट, हॅमिल्टन वगैरे.—थिवेनॉट् ज्यास्त योग्यतेचा होता. तो कुलीन घराण्यांतला असून पॅरिसच्या विश्वविद्यालयांत त्यास शिक्षण मिळालें होतें. तो जानेआरी स. १६६६ त सुरत येथें उतरला. त्या वेळीं त्याचें वय ३४ वर्षांचें होतें. तो फक्त एक वर्ष हिंदुस्थानांत राहिला. परंतु तेवढ्या वेळांत त्यानें केलेलें सूक्ष्म अवलोकन त्याचा शहाणपणा दाखविल्याशिवाय राहत नाहीं. अहंमदाबाद येथें थिवेनॉटनें एक मशीद पाहिली. पूर्वीं तेथें हिंदु देवालय असून औरंगजेबानें तें मोडिलें आणि त्याची मशीद केली. त्या वेळीं त्या ठिकाणीं बादशहानें पुष्कळ गाई मारवून ती जागा विटाळून पुनः हिंदूंच्या निरुपयोगी करून टाकिली. सभोंवारच्या संगमरवरी भिंतींवर जैन मूर्ति खोदलेल्या होत्या. मुसलमानांस मूर्ति पसंत नसल्यामुळें बादशहानें सर्व मूर्तींचीं नाकें तोडून टाकिलीं. डिला व्हेलनें वर्णिलेलीं पशुपक्ष्यांचीं शुश्रूषागृहें थिवेनॉटनें अहंमदाबादेस पाहिलीं. तो पुनः परत सुरतेस आला. रस्त्यानें गिराशिये लोकांचा उपद्रव होता. तेव्हां चोऱ्यामाऱ्यांचा त्रास होऊं नये म्हणून चारण लोकांस बरोबर घेण्याची वहिवाट होती. भाटांमध्यें चारण

म्हणून एक जात आहे, त्यांस लोक पवित्र समजून त्यांच्या वाटेस कोणी जात नसत. चारणास जो कोणी ठार मारील, त्यास लोक जातिभ्रष्ट समजत. म्हणून प्रवासी लोक आपणांबरोबर चारण जातीचा एक पुरुष व बायको दररोज दोन रुपये देऊन बाळगीत. प्रवाश्यांवर हात टाकण्यास कोणी आला असतां हे चारण त्रागा करून आत्महत्येस प्रवृत्त होत असत, म्हणजे अर्थात् लुच्चे लोकांस आपल्या दुष्कर्मांपासून पराङ्मुख व्हावें लागे. परंतु थिवेनॉटनें चारणांस बरोबर घेतलें नाहीं. चारण लोक स्वतःच लबाडी करूं लागले आहेत, अशी थिवेनॉटची समजूत होती. रस्त्यांत एकदां गिराशिये चोरांनीं त्यास गांठिलें, तेव्हां थोडे पैसे दिल्यावर चोरांची समजूत झाली. दुसऱ्या एका ठिकाणीं एक गिराशिया लोकांचा राजा सर्व प्रवाश्यांपासून अर्धा रुपया कर वसूल करीत असे. तो कर दिला म्हणजे त्याच्या टप्यांत चोरी झाली तर तो माल भरून देई. विशेषतः व्यापाऱ्यांस त्याचा फार उपयोग होई. चोरांनीं नेलेला माल जशाचा तसा तो मालकांस परत देववी. तोच राजा सुरतेहून आग्र्यास जाणाऱ्या लमाणांतील प्रत्येक इसमापासून दहा रुपये कर घेई; व त्याजबद्दल तो सर्व लोकांस मेजवानी देऊन खुष करी; आणि आपली हद्द संपेपर्यंत स्वतःचे स्वार बरोबर देऊन त्यांस पोंचतें करी. खंबायतपासून भडोचपर्यंत सर्व प्रदेशाचा तो मालक असून तेथील लोकांस गिराशिये म्हणत. सुरत येथील मुसलमानांच्या न्यायपद्धतीचें वर्णन थिवेनॉट्नें केलें आहे. इतर ठिकाणांप्रमाणेंच मुफ्ती किंवा मुल्ला आणि काजी ह्यांजकडे इन्साफाचें काम असे. वाकनवीस म्हणून एक कामदार असे, तो शहराची सर्व हालहवाल बादशहास लिहून कळवी. सुरतेस दोन नबाब होते. एकाकडे किल्ल्यांचें संरक्षण असून दुसऱ्याकडे शहराची व्यवस्था होती. दोघांचीं कामें बरोबर वांटलेलीं असत. शहराच्या नबाबाकडे सर्व दिवाणी कज्यांचें काम असे. लोकांना तावडतोब निकाल मिळत असे. बहुतेक काम शपथेवर चाले. हिंदु इसमास 'गाईची शपथ घेऊन खरें सांगतों, खोटें बोलल्यास, गोमांस भक्षण केल्यासारखें होईल,' अशी शपथ घ्यावी लागे. हिंदुलोक सहसा शपथ वाहत नसत. शपथ घेण्यापेक्षां कज्जा बुडालेला बरा असें त्यांस वाटे. फौजदारी गुन्हे कोतवालाकडे जात.

न्यायाधीश, पोलिस, तुरुंगाचा सुपरिंटेंडेंट व शहराचा माजिस्ट्रेट हीं सर्व कामें कोतवालाकडे असत. नबाब किंवा कोतवाल ह्यांस देहान्त-शिक्षेचा अधिकार नसे. तो अधिकार स्वतः बादशहाकडेस असे. खटल्याचा तपास करून त्याची हकीकत बादशहास कळविल्यावर तिकडून हुकूम येईल तशी शिक्षा देण्यांत येई. कोतवाल रात्रीं शहरांत तीन वेळ गस्त घाली; नऊ वाजतां, बारा वाजतां व तीन वाजतां. सर्व नाक्यांवर पहारा असे. रात्रीं रस्त्यावर कोणी इसम सांपडल्यास त्यास एकदम कैद करून फटके वगैरे मारिल्याशिवाय सोडीत नसत. चोऱ्या पकडून देण्याबद्दल कोतवाल जबाबदार असे. शहराबाहेरील आसपासच्या बंदोबस्ताचें काम फौजदाराकडे असे. शिवाजीनें सुरतेस लूट केली, तिची हकीकत थिवेनॉटनें दिली आहे. शिवाजीपाशीं तोफा नसून क्रिस्ती लोकांनीं आपल्या वखारीसभोंवतीं तोफा लाविल्या असल्यामुळें, तो त्यांच्या वाटेस गेला नाहीं, असें थिवेनॉटचें म्हणणें आहे. शिवाजी दिल्लीस गेला, तेव्हांची हकीकत थिवेनॉटनें लिहिली आहे. औरंगजेबाचा शिवाजीस ठार मारण्याचा विचार होता, परंतु रजपूत राजांची बाहेदारी शिवाजीस असल्यामुळें, ते बंड करतील असें वाटल्यावरून, बादशहानें शिवाजीस ठार मारिलें नाहीं. दिल्लीपासून लाहोरच्या रस्त्यावर ठग लोकांचा उपद्रव होता. नायर व पोळिया लोकांची थोडीबहुत हकीकत थिवेनॉटनें दिली आहे.

हॅमिल्टन व ऑर्म्.—कॅ० अलेक्झांडर हॅमिल्टन हा स्कॉट्लंडांत राहणारा असून स. १६८८ पासून १७२३ पर्यंत हिंदुस्थानांत व्यापार करीत होता. ईस्ट इंडिया कंपनीशीं त्याचा संबंध नव्हता. त्या कंपनीस हिंदुस्थानच्या व्यापाराचा संपूर्ण मक्ता देण्यांत आला होता, तो त्यानें मानला नाहीं. सिंधप्रांतांत तो बराच फिरला. हा सरहद्दीवरचा प्रांत असल्यामुळें त्यास दोहोंकडच्या लोकांचा उपद्रव होत असे. या किनाऱ्यावर मोठें बंदर वसलेलें नव्हतें. मुख्य शहर ठठ्ठा असून तें बरेंच आंत होतें. स. १६९९ त एक मोठा काफला ठठ्ठा येथें गेला, त्याजवर आसपासच्या लूटारू लोकांनीं छापा घालून शेकडों व्यापाऱ्यांस निर्दयपणें कापून काढलें, आणि सर्व माल लुटून नेला. पुढें तीन महिन्यांनीं कॅप्टिन हॅमिल्टन मलबारहून सुमारें एकलाख रुपये किंमतीचा माल घेऊन सिंधप्रांतांत

गेला. तो माल विकत घेण्यास पुष्कळ लोक राजी होते. परंतु माल ठठ्ठा येथें सुरक्षित पोंचावा कसा ही पंचाईत होती. ठठ्ठाच्या नवाबापासून स्वार मिळाले असते, पण त्या स्वारांचेंही लुटारू लोकांशीं संधान असे. शेवटीं आपले सर्व खलाशी सशस्त्र बरोबर घेऊन, दुसरा एक काफला ठठ्ठा शहरीं जात होता, त्याजबरोबर हॅमिल्टन निघाला. रस्त्यांत लुटारू लोकांशीं त्याचा झगडा होऊन पुष्कळ जंगली लोक मारले गेले, आणि हॅमिल्टन ठठ्ठा येथें सुरक्षित पोंचला. लुटारू लोकांचा समाचार घेतल्याबद्दल ठठ्ठाच्या लोकांनीं त्याचें उत्तम स्वागत केलें. नवाबानें त्यास नजराणे पाठविले. त्याच्या मालावरील जकात त्यानें माफ केली; आणि मालाच्या विक्रीमध्यें त्यास कांहीं अडचणी आल्यास त्या दूर करण्याचेंही त्यानें वचन दिलें. सिंधप्रांतांतून गुजराथेंत येऊन हॅमिल्टन मलबारांत गेला. रस्त्यावर चांचे-लोकांचा उपद्रव भारी असे. मोगलांचें व इंग्रजांचें वांकडेंच होतें. महाराष्ट्र व कर्नाटक येथील लोक इंग्रजांस मिळून नव्हते.

बंगालप्रांताविषयीं कांहीं माहिती रॉबर्ट ऑर्म् व बर्नियर यांनीं दिली आहे. ऑर्मनें मराठ्यांचा इतिहास लिहिला असून तो सन १७५० च्या सुमारास कांहीं वर्षें बंगालप्रांतांत राहत होता. बंगाल्यांतील जमीन फार सुपीक होती. थोड्या श्रमानें पुष्कळ उत्पन्न देणारा प्रांत बंगाल्याप्रमाणें सर्व पृथ्वींत दुसरा नव्हता. येथें तांदुळाचें पीक मुख्य. त्या वेळीं फुटकळ विक्रींत पैशास शेर (४० तोळे) तांदूळ मिळत. दुसरीं धान्यें, भाज्या, फळफळावळ ह्यांची तर लयलूट होती. उंसाची साखर जिकडे तिकडे होत असे, आणि मांसाहार करणाऱ्यांसाठीं सर्व प्रकारचे भक्ष्य प्राणी, व दूध, मीठ, इत्यादि जिनसांची विलक्षण समृद्धि होती. येथें येऊन व्यापार करणाऱ्या इंग्रजांस तर ही सुबत्ता पाहून पराकाष्ठेचा आनंद होई. रुपयाचीं वीस कोंबडीं विकत मिळत. मेंढरें कोकरें तर्शींच स्वस्त होतीं. येथील स्त्रिया स्वरूपानें सुंदर व स्वभावानें मनामिळाऊ असल्यामुळें, त्या वेळच्या युरोपियन लोकांत एक म्हण पडून गेली होती, तिचा आशय असा होता, कीं बंगाल्यांत येणाऱ्या परकी लोकांस शंभर दरवाजे खुले आहेत, परंतु एकदां आंत आल्यावर बाहेर जाण्यास एक सुद्धां मार्ग नाहीं. तेथची व विशेषतः समुद्रकांठच्या प्रदेशाची हवा परकी लोकांस मानवत नसे. आरंभीं इंग्रज व डच ह्यांचे लोक भडाभड मरूं

लागले. तेव्हांपासून असा नियम करण्यांत आला, कीं हिंदुस्थानांत होणारी व सर्वत्रांस आवडणारी पंच नांवाची दारू व परस्त्रीसंग ह्या गोष्टी सोडून द्याव्यात, आणि पानसुपारीच्या दुकानावर कोणीं जाऊं नये. शिवाय बोर्डो, कॅनेरी व शिराज येथील मद्य घेतलें असतां हवा बाधत नाहीं असें त्या लोकांस कळून आलें; आणि पुढें पुढें लोक कमी मरूं लागले. बंगालप्रांत कालवे व खाड्या ह्यांनीं भरलेला होता. पूर्वीच्या लोकांनीं व्यापाराचे सोयीसाठीं सर्व प्रांतांत मोठमोठे कालवे पुष्कळ श्रम व खर्च करून तयार केले होते. त्यांतील पाणी पिण्यास अतिउत्तम असें लोक मानीत. कालव्यांच्या दोनही बाजूंस गांवें वसलेलीं होतीं. ते लोक कालव्याच्या पाण्यावर सर्व प्रकारचीं पिकें उत्पन्न करीत. ऊंस व रेशमी किडयांचीं झाडें यांचे मोठमोठे मळे असत. सभोंवारच्या कालव्यांमध्यें हे मळे म्हणजे लहान लहान सुंदर बेटेंच वाटत. आराकानचे पोर्तुगीझ लोक किनाऱ्यावरील लोकांस वारंवार लुटीत, म्हणून तेथचीं बेटें ओसाड पडलीं होतीं. अर्थात् वाघ, डुकर, इत्यादि रानटी प्राण्यांचें तें वसतिस्थान झालें होतें. तथापि बंगाल्यांतील निःसत्त्वकारक हवेचा परिणाम लोकांच्या प्रकृतीवर चमत्कारिक झाला, असें ऑर्मचें म्हणणें आहे. हिंदुस्थानांतली हवा एकंदरींत लोकांस निःसत्त्व करणारी आहे; त्यांतून बंगालची तर विशेष. सर्व हिंदुस्थानांत बंगालचे लोक अशक्त काठीचे व दुर्बळ होते. शौर्य, सोशिकपणा, शक्ति इत्यादि गुणांचा त्यांच्या अंगीं अभाव होता. लोकवस्ती दाट असून रेशमी व सुती कापड तयार करण्याचा धंदा इतक्या जारीनें चालू होता, कीं मोगल बादशाहींत बंगाल्यांतल्या इतकें चांगलें विणकाम दुसरे कोठेंही होत नसे.

७. **कार्स्टेन नीबर.**—नीबर नामक एक रोमचा प्रसिद्ध इतिहासकार आहे. त्याचा बाप कार्स्टेन नीबर हिंदुस्थानांत आला होता. तो जर्मनींत हानोवर येथें जन्मला असून, डेन्मार्कचा राजा पांचवा फ्रेड्रिक याच्या नोकरींत इजिप्ट देशास आला. तेथून सन १७६३ त तो मुंबई व सुरत येथें येऊन सन १७६७ त परत गेला. मुंबईबेट मात्र इंग्रजांचे ताब्यांत असून आसपासचा सर्व प्रदेश मराठ्यांचें ताब्यांत होता. मुंबईंत सर्व जिन्नस साष्टी नांवाच्या सुपीक बेटांतून अगर इतर ठिकाणांहून आणावे लागत. साष्टी मराठ्यांच्याच ताब्यांत असून

त्याजवर युरोपियन लोकांचा डोळा होता. मुंबइची हवा हळूहळू निवळत चालली होती, परंतु युरोपांतून येणारे नवीन लोक गोमांस, डुकरांचें मांस, मद्य इत्यादि पदार्थांचें सेवन बेसुमार करीत, आणि एकाएकीं मृत्युमुखीं पडत. युरोपियन कपडे मुंबईतील उष्ण हवेस योग्य नसल्यामुळें त्यांचीं शरीरें भाजून जात. नीबर असें लिहितो, कीं 'एतद्देशीय लोकांस रोगराई बाधत नाहीं व ते पुष्कळ दिवस जगतात, ह्याचें कारण असें, कीं ते लोक अंगासभोंवतीं मोकळी हवा खेळेल असे सैल व पायघोळ कपडे वापरितात, मांसाहार व मद्यपान करीत नाहींत, आणि रात्रीचें भोजन दिवस मावळल्यावर पुष्कळ वेळानें करितात.' युरोपियन आचारविचार हिंदुस्थानास लागू पडत नाहींत, हें त्या वेळच्या लोकांसही कळून चुकलें होतें. मुंबईची लोकवस्ती एकलक्ष चाळीसहजार होती, ती अलीकडच्या वीस वर्षांत फार वाढली होती. ह्यांत युरोपियन लोक फार थोडे होते. सुरतची लोकसंख्या त्या वेळेस तीन लाख होती. सुरत येथें मनुष्यांचे दवाखाने मुळींच नसून निरुपयोगी व निराश्रित जनावरांसाठीं मात्र हिंदूंचे दवाखाने होते, हें पाहून यास मोठें आश्चर्य वाटलें.

अशा प्रकारची पाश्चात्य प्रवाश्यांनीं लिहिलेली माहिती आहे. येथें नुसतें त्रोटक दिग्दर्शन केलें आहे. हिंदुलोकांच्या त्या वेळच्या अंतःस्थितीविषयीं विशेष माहिती उपलब्ध नाहीं, हें शोचनीय होय. हिंदु राज्यनीतीसंबंधीं पाश्चात्त्यांनीं विशेष हकीकत दिलेली नाहीं. कॅप्टिन हॅमिल्टननें आपलें मत दिलें आहे, तें असें. 'स्वराज्यापेक्षां मोगलांच्या अंमलांत राहणें हिंदुलोकांस बरें वाटे, कारण मोगलांनीं लोकांवर करांचें ओझें विशेष लादलें नाहीं; जो कर द्यावयाचा तो अधिकाऱ्यांच्या मर्जीवर अवलंबून नसून ठरीव होता, आणि तो प्रत्येकास आगाऊ माहीत असे. हिंदु राजे मर्जीप्रमाणें लोकांवर कर बसवीत. मनांतील द्रव्यलोभ हेंच लोकांपासून पैसा वसूल करण्याचें प्रमाण. ते क्षुल्लक कारणावरून शेजाऱ्यांशीं भांडण उपस्थित करीत; तेणेंकरून त्यांच्या महत्त्वाकांक्षेचा व मूर्खपणाचा परिणाम सर्व रयतेस भोगावा लागून, देहद्वारा व वित्तद्वारा त्यांस आतोनात नुकसान सोसावें लागे.' एकंदरींत, सामाजिक, व सांपत्तिक हीं जीं इतिहासाचीं दोन मुख्य अंगें, त्यांजबद्दल विश्वसनीय माहिती मिळत नाहीं.

प्रकरण एकुणतिसावें.

मोगलबादशाहीचा ऱ्हास.

स. १७०७—१७४८.

१. बहादूरशहा, (स. १७०७–१२). २. शीखलोकांचा उदय.
३. जहांदरशहा, (स. १७१२). ४. फर्रुखसेयर, (स. १७१३–१९).
५. सय्यदबंधूंचीं कारस्थानें. ६. महंमदशहा, (स. १७१९–४८).
७. चिंकिलीजखान, निजामशाहीचा उदय. ८. नादिरशहाची स्वारी (१७३८–३९).
९. प्रांतिक अंमलदारांचें स्वातंत्र्यधारण.

१. बहादूरशहा, (१७०७–१२).—मोगल बादशाहीचा ऱ्हासकाल म्हणजे अठराव्या शतकाचा इतिहास होय. हिंदुस्थानच्या इतिहासांत हें शतक अनेक कारणांनीं अतिशय महत्त्वाचें आहे. मराठे, शीख, इंग्रज इत्यादिकांचा उदय ह्याच शतकांत झाला. सांपत्तिक व जगाच्या परिस्थितींत मोठमोठ्या घडामोडी ह्याच वेळच्या आहेत. तथापि ह्या ठिकाणीं तपशीलवार विवेचनास जागा नाहीं. फक्त मोगलबादशाहीचा उपसंहार येथें करावयाचा आहे.

औरंगजेबानें मरणापूर्वी मृत्युपत्र करून सर्व राज्य आपल्या तिघां मुलांस वांटून दिलें होतें. परंतु ती व्यवस्था अमलांत न येतां, ते तिघे आपसांत लढूं लागले. वडील मुलगा मुअज्जम हा त्या वेळीं काबूलच्या सुभ्यावर होता. धाकटा कामबक्ष हा विजापूरच्या कारभारावर असून तिसरा अज्मम हा मरणसमयीं बापाजवळ होता, आणि त्याच्याच ताब्यांत सर्व फौज होती. वजनदार सेनापति झुल्फिकारखान याची त्यास मदत होती. बापाचें मृत्युपत्र झुगारून देऊन तो आपणांस सर्व राज्याचा बादशहा म्हणवूं लागला. तसेंच सर्व फौज घेऊन तो दिल्लीकडे निघाला. मुअज्जम यास ही खबर लागतांच तोही काबुलाहून आपल्या भावाचा समाचार घेण्याकरितां दक्षिणेंत कूच करून येऊं लागला. त्याचा वडील मुलगा मोइझ्-उद्दीन हा मुलतानास, व दुसरा मुलगा अजीम-उश्शान् बंगाल्यांत होता. त्यांस त्यानें त्वरेनें आपणास येऊन मिळण्याविषयीं लिहिलें. अज्मशहा दिल्लीकडे येऊन दाखल

होण्यापूर्वीच मोइझ्-उद्दीन व अजीम-उश्शान् हे बापास मिळाले. अजमशहा त्वरा करीत ग्वाल्हेरपर्यंत आला. त्याचा तोफखाना व पायदळ बरोबर येऊं न शकल्यामुळें मागें राहिलें. आपला भाऊ आग्र्याजवळ उतरला आहे, असें ऐकून तो तसाच त्याजवर चालून गेला. मेवाड व मारवाडचे राजे मुअज्जम यास मिळाले. ता. ३१ मे स. १७०७ या दिवशीं उभयतांची गांठ जाजव येथें पडली. लढाई मोठ्या निकराची झाली. अजमशहा इतका लवकर येऊन दाखल होईल असें मुअज्जम यास वाटलें नव्हतें. म्हणून तो शिकारीस गेलेला होता. परंतु त्वरेनें परत येऊन त्यानें लढाईस तोंड दिलें. याप्रमाणें दोनही दळें शिकस्त करून लढत असतां, एकदम जोराचा वारा सुटून दिशा धुंद झाल्या; आणि अजमशहाच्या फौजेच्या डोळ्यांत धुळीचे लोट शिरले. त्यामुळें त्याचें दैव फिरलें. 'क्षणभर कच खाऊन निघून जा, मागें राहिलेली फौज येऊन मिळाल्यावर पुन: लढाई करूं,' इत्यादि गोष्टी झुल्फिकारखानानें अजमशहास सांगितल्या, पण त्या त्या राजपुत्रास रुचल्या नाहींत. तेव्हां झुल्फिकारखान निघून गेला. पुढें अजमशहा तसाच लढत असतां बातमी लागली, कीं त्याचे दोन मुलगे बेदर बख्त व वल्लीजा डाव्या व उजव्या बाजूस लढत होते ते, व दतिया, कोटा येथील राजे आणि दुसरे हाताखालचे मोठमोठे सरदार लढाईंत पडले. अशा स्थितींत निराशेनें त्यानें आपला हत्ती गर्दीत घातला, त्याबरोबर लगेच तो शत्रूंच्या हातून मारला गेला. त्याचा धाकटा मुलगा अली तेहार हा मुअज्जमच्या हातांत जिवंत सांपडला, पण त्यास मुअज्जमनें मोठ्या ममतेनें वागविलें. लढाई संपल्यावर मुअज्जमनें बादशाहीपद धारण केलें, आणि आपणास बहादूरशहा असें म्हणवूं लागला. झुल्फिकारखान, त्याचा बाप आसदखान व अजमशहाचे दुसरे सर्व सरदार त्यास शरण आले. त्यांस बहादूरशहानें क्षमा केली. रजपूत राजांकडे तर मूळपासून बहादूरशहाचा विशेष ओढा होता.

कामबक्ष अजून दक्षिणेंत होता. त्यास बहादूरशहाचें करणें पसंत पडलें नाहीं, तेव्हां बहादूरशहास सवड मिळतांच तो स्वत: त्याजवर चालून आला. ता. १४ फेब्रुवारी, सन १७०८ रोजीं दक्षिणेंत हैदराबादनजीक उभयतांची गांठ पडली. कामबक्ष लढाईंत मारला गेला, तेव्हां अर्थात्

सर्व राज्य बहादूरशहाच्या ताब्यांत आलें. त्या वेळेस इंग्लंडांत ॲन राणी राज्य करीत होती.

बहादूरशहाच्या कारकिर्दीत महत्त्वाच्या गोष्टी दोन घडल्या. एक, संभाजीचा पुत्र शाहू याची सुटका होऊन त्यास मराठयांचें राज्य मिळालें; आणि दुसरी शीख लोकांशीं तंटे. पहिलीची हकीकत मराठयांचे भागांत आली आहे. ह्या वेळीं झुल्फिकारखानाकडे दक्षिणचा कारभार होता. परंतु बादशहा दिल्लीकडे जाऊं लागला, तेव्हां झुल्फिकारखानास त्यानें आपणाबरोबर घेतलें. सबब दाऊदखान पन्नी नामक एका हुशार कामदारास झुल्फिकारखानाचा दुय्यम म्हणून त्यानें दक्षिणेंत नेमिलें, आणि बादशहा दिल्लीकडे निघून गेला. रस्त्यांत रजपूत राजांशीं त्याला भांडावें लागत होतें; परंतु पंजाबाकडे शीख लोकांनीं दंगा केला आहे असें वर्तमान आल्यामुळें, रजपुतांच्या मागण्या कबूल करून त्यांजबरोबर त्यानें सख्य केलें. हें वर्तमान १७०९ त घडलें.

२. शीखलोकांचा उदय.—शीखलोकांचें नांव ह्या कारकिर्दीत प्रथमच आलें आहे. तेव्हां प्रस्तुतच्या त्यांच्या कृत्यांचें वर्णन करण्यापूर्वी त्यांची येथें थोडीशी पूर्वपीठिका देणें जरूर आहे.

मागच्या प्रकरणांत धार्मिक स्थितीविषयीं थोडेसें विवेचन करण्यांत आलें आहे, त्यावरून अलीकडे दोनतीनशें वर्षांत धर्मसुधारणेकडे सर्व लोकांचें लक्ष लागलें होतें, आणि जातिभेद वगैरे समाजविघातक प्रचार मोडून, हिंदुमुसलमानांचें संमेलन करण्याचे प्रयत्न चालू होते, हें कळून आलें असेल. शीखांचा पंथ अशा प्रयत्नांचाच परिणाम होय. त्यांचा संस्थापक बाबा नानक ऊर्फ नानकशहा हा इ. स. १४६९ सालीं देहरा गांवीं जन्मला. हें गांव लाहोरपासून तीस कोसांवर रावी नदीच्या कांठीं आहे. आरंभीं तो हिंदु असून धान्याचा वगैरे व्यापार करीत असे. पुढें तो कबिराचा शिष्य बनला, आणि लोकांस एकेश्वरमताचा उपदेश करूं लागला. त्या वेळेस दिल्लीस बुहलोल लोदी राज्य करीत होता. त्याच्या ताब्यांत पंजाबप्रांतांत लहान लहान हिंदु जमीनदार राजे राज्य करीत होते. त्यांपैकीं एका राजानें नानक यास आपल्या मुलखांत धर्मोपदेश करण्याची परवानगी दिली. तो उपदेश करीत व दैविक चमत्कार दाखवीत सर्व हिंदुस्थानभर फिरला. तसेंच मक्का मदीना, येथेंही तो गेल्याचें सांगतात. धर्माच्या कामांत आग्रह नसावा, कोणीही मनोभावानें केलेली

सेवा ईश्वरास सारखीच आवडते, हा त्याच्या शिकविण्याचा मुख्य मुद्दा होता. ह्या उपदेशाचा विशेष परिणाम पंजाबांतच झाला. त्याच्या अनुयायांस शीख हें नांव मिळालें. 'शीख' हा शब्द संस्कृत 'शिष्य' शब्दाचा अपभ्रंश आहे. नानकाचे 'शिष्य' ते शीख झाले. नानकानें आपल्या शिष्यांचा एक नवीन पंथ काढिला. हा पंथ आचरणारांनीं सर्व माणसांशीं मैत्रीनें वागावें असा कटाक्ष होता. अंगद नांवाचा नानकाचा एक मुख्य शिष्य होता, त्याजकडे त्यानें ह्या नवीन पंथाचें आधिपत्य दिलें. अंगदानंतर अमरदास हा शीखांचा मुख्य झाला. अमरदासानें कजरावळ नामक किल्ला बांधिला. त्याच्या मनांत स्वतंत्र राज्यस्थापना करण्याचें होतें. परंतु राज्यप्राप्तीच्या नादास लागल्यानें धर्म बुडतो असें वाटून पुष्कळांनीं अमरदासास सोडिलें, आणि ते नानकाचा नातू धर्मचंद यास भजूं लागले. या नवीन पोटशाखेस 'उदासी' व 'निर्मल' अशीं नांवें मिळालीं. हिंदुस्थानांतील मोमोठ्या शहरीं शीखपंथाचे उपदेशक प्रसिद्धीस आले, ते ह्या उदासी व निर्मल शाखेंतील असून राजकीय गोष्टींत मन घालीत नाहींत. शीखांच्या धर्मग्रंथास 'आदिग्रंथ' अशी संज्ञा असून तो पंजाबी व हिंदी ह्या भाषांत लिहिलेला आहे. त्यांतील कित्येक भाग स्वत: नानकाचे व कित्येक कबीर, रामनंदन वगैरे गृहस्थांचे आहेत. नानकापासून चवथा गुरु अर्जुनमल्ल म्हणून जहांगीरचे वेळेस झाला. त्यानें हा आदिग्रंथ सर्व एकत्र जमविला. आरंभींचे मोगल बादशहा धर्माचे बाबतींत आग्रही नसल्यामुळें त्यांच्या वेळेस शीखांचें महत्त्व पुष्कळ वाढलें. पंजाबांतील सुपीक दुआबांत ते वस्ती करून राहिले. पांचवा गुरु रामदास याजवर अकबर बादशहाची विशेष मर्जी होती. ह्याच साधूच्या नांवानें पंजाबांतील रामदासपूर नांवाचें शहर प्रसिद्ध आहे. रामदासानें एक मोठा लोकोपयोगी तलाव बांधिला, त्यास अमृतसर असें नांव मिळून, त्याजवरून हल्लींच्या अमृतसर शहराचें नांव पडलें. ह्या शांततेच्या काळांत शीखलोक धनाढ्य झाले. अशा प्रकारें वाढत चाललेलें शीखांचें वजन पुढील आग्रही मुसलमानांस खपेनासें झालें. स. १६६० या वर्षी अर्जुनमल्ल ह्यास त्यांनीं पकडून ठार मारिलें. ह्या कृत्यानें शीखलोक चवताळून गेले. अर्जुनमल्लाचा मुलगा हरगोविंद यास पुढारी करून

ते आपल्या शत्रूंचा सूड घेऊं लागले. परंतु ह्या बंडाकडे त्या वेळच्या मुसलमान अधिकाऱ्यांचें विशेष लक्ष गेलें नाहीं. त्यांस उत्तरेकडील पहाडांत हांकून दिल्यानें बंडाचा तात्पुरता बंदोबस्त झाला. परंतु तेव्हांपासून शीखांनीं आपल्या आचरणांत पुष्कळ फरक केला. नानकानें शिकविलेला शांततेचा बाणा सोडून देऊन ते लढाऊ बनले, आणि आसपासच्या मुलुखांत लुटालूट करून स्वसंरक्षणाच्या तयारीस लागले. तसेंच त्यांच्यांत आपसांतही कलह उत्पन्न होऊन शिवाय मोगल अधिकाऱ्यांनीं त्यांजवर शस्त्र धरिलें. ह्या आपसांतील वैमनस्याचा परिणाम असा झाला, कीं त्यांनीं सन १६७५ त आपला गुरु तेघबहादूर याचा वध केला. तेघबहादूरच्या वधाचे वेळीं औरंगजेबानें शीखांचा बहुतेक नायनाट केला होता.

तेघबहादूरनंतर त्याचा मुलगा गुरुगोविंद हा शीखांचा दहावा गुरु झाला. हा धोरणी व चलाख असून त्याच्या वेळेपासून शीखांच्या पंथांत नवीन मन्वंतर सुरू झालें. लष्करी पद्धतीवर शीखांचें एक नवीन प्रजासत्ताक मंडळच त्यानें स्थापिलें, असें म्हटल्यास चालेल. गुरुगोविंद हा उत्कृष्ट उपदेशक व शूर योद्धा यांचें केवळ मिश्रणच होता. आपल्या लोकांस शिकविण्याकरितां त्यानें नवीन प्रघात घातले. जातिभेद साफ नाहींसा केला. सर्व लोकांस सारखें वागविण्याचे नियम केले. आपल्या अनुयायांस एक नवीन लष्करी पोषाख दिला. शिपाईगिरीची खूण म्हणून प्रत्येकानें आपल्याजवळ लोखंड बाळगावें, अंगावरील केंस न काढतां ते वाढूं द्यावे, असें त्यानें ठरविलें. हिंदूंस खुष ठेवण्याकरितां गोवधाची मनाई करून हिंदूंच्या देवतांस मान देणें व ब्राह्मणांची प्रतिष्ठा राखणें इत्यादि गोष्टी ठरवून दिल्या. सारांश, आजतागाईत शीखांची शौर्याबद्दल ख्याति आहे, तिचा उत्पादक हा गुरुगोविंद होय. विचित्र नाटक म्हणून शीखांमध्यें एक प्रसिद्ध ग्रंथ आहे, त्यांत ह्या पुरुषाच्या कृत्यांचें वर्णन आहे. त्यास 'दशम पादशाहाका ग्रंथ' असेंही म्हणतात. लढाईच्या प्रसंगीं 'वाः गुरुजीका खालसा,' 'वाः गुरुजीकी फत्ते,' अशा शब्दांचा उच्चार करण्याविषयीं गुरुगोविंदानें ताकीद दिली. 'खालसा' शब्दाचा अर्थ एकी असा आहे. म्हणून आपण सर्व लोक एक असून गुरूशीं आपलें संगनमत आहे, असा

५२-१२-११-१०-७९१-२०००

NATIONAL ARCHIVES OF INDIA

वरील शब्दांचा अर्थ होतो. यावरूनच शीख फौजेस 'खालसा फौज' म्हणण्याचा प्रघात पडला. 'गुरुमता' नांवाचें एक शीख सरदारांचें मंडळ गुरुगोविंदानें स्थापिलें. हें मंडळ अमृतसर येथें वेळोवेळीं जमत असे; त्या वेळीं शीखांच्या उन्नतीचे उपाय काय करावे, ह्याचा विचार होई. ह्या मंडळांतील सभासदांची निवडणूक कोणत्या तत्त्वावर होत असे हें बरोबर समजत नाहीं, तरी लष्करी कामांत हाताखालीं चार लोक बाळगून जे लोकनायक म्हणून कांहीं सरदारी गाजवीत, त्यांस या सभेंत बसण्याचा अधिकार असे. इकडील लोकविचारांत लोकनियुक्तत्व दाखल झाल्याचें हें पहिलेंच उदाहरण, असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्याचे धाकटे दोन मुलगे जोरावरसिंग व फत्तेसिंग हे सरहिंद येथें भिंतींत चिनून ठार मारिले गेले. वडील दोन मुलगे लढाईंत पूर्वींच मारले गेले होते. अशा रीतीनें आपल्या वंशाची वाताहत झालेली पाहून गुरुगोविंदच्या आईनें मस्तक पिटून जीव दिला. येणेंप्रमाणें तेघबहादूरच्या संकेतानुसार त्याच्या वंशाचा हृदयद्रावक रीतीनें शेवट झाला. औरंगजेबाच्या लष्कराशीं लढतांना गुरुगोविंद अगदीं टेंकीस आला. अखेरीस मोगल फौजेनें गुरुगोविंदचीं सर्व ठाणीं घेतलीं; आणि नानाप्रकारें छळ करून त्याच्या पक्षाची अगदीं वाताहत करून टाकिली. तो अगदीं तेजहीन व हतवीर्य होऊन रानोमाळ भटकूं लागला आणि शेवटीं दक्षिणेंत नांदेड येथें त्याचा एका शत्रूनें खून केला, (सन १७०८). गुरुगोविंद हाच शिखांचा शेवटचा धर्मोपदेशक होय. त्याच्या नंतरचे पुरुष सेनानायक म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांच्या कृत्यांवरून त्यांस धर्मोपदेशक हें नांव शोभणारें नाहीं. इतउत्तर शीखांचें धर्मस्वरूप पार नाहींसें होऊन केवळ लष्करी स्वरूप वृद्धिंगत झालें. औरंगजेबाचे कार्किर्दींत शीखांचा जो छळ झाला, त्याचा सूड त्यांनीं लौकरच उगविला. बंदा म्हणून कोणी एक क्रूर साहसी व धीट असा बैरागी गुरुगोविंदाचा प्रिय शिष्य होता. त्याच्या हाताखालीं जमाव करून शीख लोक चवताळून मोगलांच्या राज्यांत शिरले. पंजाबांतील मुलूख उद्ध्वस्त करीत ते मोगलांवर चालून आले. मुसलमानांच्या मशिदी मोडिल्या. मुल्ला मंडळींची व स्त्रीपुरुषांची त्यांनीं कत्तल केली. दयामाया वगैरे कांहीं एक मनांत न आणितां, त्यांनीं मनस्वी क्रौर्य करून शहरांचीं शहरें

कापून काढिलीं. मेलेल्यांचीं प्रेतेंही उकरून काढून तीं पशूंस खावयास दिलीं. हा प्रकार मुख्यत्वेंकरून सरहिंद येथें घडला. असें आचरण करीत ते थेट दिल्लीकडे येऊं लागले. ह्या वेळीं जे मुसलमान शीखधर्म पत्करून त्यांच्यांत येऊन मिळाले, त्यांना मात्र त्यांनीं जीवदान दिलें. शेवटीं बाहदूरशहानें त्यांच्यावर स्वारी करून त्यांस पहाडांत हांकून लाविलें, आणि बंदा यास वेढिलें. अनेक संकटें आलीं असतांही शीखांनीं बादशहाच्या फौजेस दाद दिली नाहीं. शेवटीं अन्नसामुग्रीचा तोटा पडून लोक जिवावर उदार होऊन मोगलांच्या वेढ्यांतून पार निघून गेले, आणि किल्ला मोगलांच्या हातीं लागला. तरी शीखांचा बंदोबस्त होण्यापूर्वी बहादूरशहास मृत्यूनें गांठिलें. तो सन १७१२ च्या फेब्रुअरी महिन्यांत लाहोर येथें मरण पावला. त्या वेळीं त्याचें वय ७० वर्षांचें होतें.

बहादूरशहाची कारकीर्द एकंदरीनें शांततेंत गेली. तो दयाळु व विचारी होता. त्याचे भाऊ त्याजविरुद्ध लढून नाहक मरण पावले, तरी त्यांच्या मुलांबाळांस त्यानें ममतेनें वागविलें. तो बुद्धिमान, सारासारविचारी, अनुभविक व मनमिळाऊ असल्यामुळें कोणतेंही काम तडीस नेण्यास तो समर्थ होता. औरंगजेबाचे वेळेस माजलेली अव्यवस्था मोडण्यास तो लायक होता. आणखी कांहीं दिवस वांचता तर त्यानें मोगलांचें वैभव पुनः स्थापिलें असतें. त्याच्यांत हिंमत किंवा साहस विशेष नव्हतें, परंतु तसेंच क्रौर्यही नव्हतें. राज्यप्राप्तीच्या वेळेसच तो वयोवृद्ध असल्यामुळें, राज्यांत विशेष ढवळाढवळ करण्याची त्यास ताकद राहिली नव्हती.

३. जहांदरशहा, (स. १७७२).—बहादूरशहास चार मुलगे होते. मोइझ-उद्दीन, अजीम उश्शान्, खुजिस्ता आखीर आणि रूफी-उल्-कदर. बादशहा मरण पावतांच ह्या मुलांमध्यें तख्ताबद्दल तंटे सुरू झाले. दुसरा मुलगा अजीम-उश्शान् याजवर बापाची विशेष मेहेरबानी होती. बादशाही खजिना व मोर्तब त्याच्याच ताब्यांत असल्यामुळें फौजबंद होऊन त्यानें सर्व सत्ता धारण केली. परंतु इतर तिघां मुलांस झुल्फिकारखानानें फूस देऊन अजीम्-उश्शानशीं लढण्यास लाविलें. त्या युद्धांत अजीम-उश्शानचा मोड झाला, आणि तो झपाट्यानें निघून जाण्याचा प्रयत्न करीत असतां रावीनदींत पडून मेला. पुढें राहिलेल्या तिघां

बंधूंत झगडा लागला. खुजिस्ता आख्तीर हा लढाईंत मारला गेला; आणि मोइझ्-उद्दीन हा जहांदरशहा असें नांव धारण करून बादशहा झाला. दुसऱ्याच दिवशीं राहिलेला धाकटा शहाजादा रूफी-उल्-कदर हा जहांदरशहाशीं लढून मरण पावला. जहांदरशहानें ता. ९ जून स. १७१२ रोजीं दिल्ली शहरांत विजयानंदानें प्रवेश केला.

जहांदरशहा बादशाही सत्ता धारण करण्यास लायक नव्हता. त्याच्याइतका दुर्वृत्त व क्रूर स्वभावाचा बादशहा मोगलांमध्यें झाला नाहीं. त्याच्या भावांचीं व चुलत्यांचीं जीं मुलें हयात होतीं, त्या सर्वांचा त्यानें वध करविला. आसदखान व झुल्फिकारखान यांस मात्र त्यानें मोठ्या योग्यतेस चढविलें. लालकुवर नामक त्याची एक रख होती. तिच्या हलकट नातलगांस बहुमान देऊन त्यानें दरबारच्या सर्व मंडळींचीं मनें दुखविलीं. झुल्फिकारखानाच्या हातांत सर्व सत्ता होती. त्याची गर्विष्ठ व जुलमी वागणूक कोणासही आवडेनाशी झाली. इकडे बादशहाचें छंदानुवर्तन झुल्फिकारखानास आवडेनासें होऊन दोघांमध्यें वितुष्ट पडलें. इतक्यांत बंगालप्रांतांत गडबड झाली. शहाजादा अजीम-उश्शान हा पूर्वीं बंगालचा सुभेदार होता. तो बहादूरशहास येऊन मिळाला, तेव्हां त्यानें आपलीं मुलेंमाणसें बंगाल्यांत राजमहाल येथें ठेविलीं होतीं. फर्रुखसेयर नांवाचा त्यास एक मुलगा असून, तो दूर असल्यामुळें जहांदरशहाच्या तावडींतून सुटला होता. बडासय्यद नांवाचें एक मोठें पिढीजाद घराणें अकबरापासून हिंदुस्थानांत नांदत होतें, त्यांपैकीं सय्यद हुसेनअली व सय्यद अब्दुला हे दोन सरदार त्याच्या पक्षास मिळाले. हे दोघे भाऊ असून हुसेनअली बहारचा व अब्दुल्ला अलाहबादचा सुभेदार होता. त्यांनीं आपल्या फौजा एकत्र केल्या. तेव्हां—बादशहा झुल्फिकारखानास बरोबर घेऊन स्वतः त्यांजवर गेला. ता. २८ डिसेंबर, सन १७१२ रोजीं उभयपक्षांची गांठ आग्र्यानजीक पडली. लढाई होऊन जहांदरशहाचा पराजय झाला, आणि लालकुवरला घेऊन तो पळून गेला. पराभव झालेल्या फौजेची जमवाजमव करून झुल्फिकारखान दिल्लीकडे आला. तेथें जहांदरशहा आसदखानाच्या घरीं जाऊन लपलेला त्यास आढळला. परंतु इतक्या अवधींत दरबारची मंडळी फर्रुखसेयरास जाऊन मिळाली. तेव्हां एकट्यानेंच जहांदरशहास मदत करणें

झुल्फिकारखानास उचित वाटलें नाहीं. ता. १ जानेवारी, सन १७१३ रोजीं फर्रुख्सेयरनें बादशाहीपद धारण केलें. ज्यांनीं ज्यांनीं त्यास मदत केली होती, त्या सर्वांस त्यानें मोठमोठ्या जागा दिल्या. त्यांतच चिंकिलिजखान याची हुशारी पाहून त्यास त्यानें निजामुल्मुल्क् असोफजा असा किताब दिला. नंतर तो समारंभानें दिल्लीस येऊं लागला, तेव्हां आसदखान व झुल्फिकारखान त्यास सामोरे गेले. त्यांचा फर्रुख्सेयरनें चांगला सत्कार केला. परंतु मीर जुम्ला नांवाचा एक हलका मनुष्य वजीर होता, त्यास ते दोघे शत्रुसमान वाटत होते. त्याच्या लोकांनीं झुल्फिकारखान व जहांदरशहा यांस पकडून ठार मारिलें; आणि वृद्ध आसदखानाच्या देखत त्यांचीं प्रेतें हत्तीच्या पायांस बांधून दिल्ली शहरांत मिरविलीं. इतर मंडळीचीही कत्तल झाली. जहांदरशहा मेल्यामुळें कोणास वाईट वाटलें नाहीं, पण झुल्फिकारखानासारखा इभ्रतीचा व लायक मनुष्य नाहींसा झाल्यामुळें सर्व लोक हळहळले.

शीखांशी युद्ध. बादशाहीमध्यें अशी अंदाधुंदी चालल्यामुळें मध्यंतरीं शीख लोकांचें चांगलेंच फावलें. त्यांचा मुख्य नायक बंदा हा लाहोरच्या ईशान्येस शंभर मैलांवर लोहगड नांवाच्या किल्ल्यांत जाऊन राहिला होता, तेथून तो बाहेर आला आणि खालीं मैदानांत येऊन पूर्वींपेक्षांही ज्यास्त त्वेषानें मोगली राज्यांत धुमाकूळ करूं लागला. शेवटीं अब्दुल्समीद नांवाच्या हुशार सरदारास फर्रुख्सेयरनें त्याजवर पाठविलें. ह्या सरदारानें शीखांचा पराभव करून पुष्कळांस जागच्याजागींच ठार मारिलें, आणि बंदासुद्धां ७४० लोकांस पकडून दिल्लीस पाठविलें. त्या लोकांची कत्तल दिल्ली शहरांत सात दिवस सारखी चालू होती. बंदाची तर त्यांनीं विशेष विटंबना केली. इतर सर्व लोकांची कत्तल झाल्यावर त्याला उंची पोषाख घालून व पिंजऱ्यांत कोंडून चवाठ्यावर आणिलें. सभोंवार त्याच्या अनुयायांचीं शिरें भाल्यांवर टोंचून ठेविलीं होतीं. प्रथमतः त्याच्या मुलांस त्यांनीं जाळून मारिलें; आणि शेवटीं तापलेल्या चिमट्यांनीं त्यास विदारून त्यांनीं त्याचा प्राण घेतला. बंदा शेवटपर्यंत मोठ्या धैर्यानें वागला, आणि ईश्वरावर भरंवसा ठेवून सर्व हाल त्यानें शांत वृत्तीनें सहन केले. याशिवाय अनेक तऱ्हांनीं शीख लोकांचा ह्या वेळेस निःपात करण्यांत आला. कित्येक शिखांचें असें मत आहे, कीं

बंदा मुसलमानांच्या हातांत न सापडतां सिंधप्रांतांत गेला, आणि तेथें स्वधर्माचा उपदेश करीत पुष्कळ वर्षें शांततेनें राहिला.

नंतर सुमारें तीस वर्षेपर्यंत शीखांनीं वर डोकें काढिलें नाहीं. नादिरशहानें हिंदुस्थानावर स्वारी केली, ही संधि साधून शीख लोक मुलखांत उपद्रव करूं लागले. लवकरच राज्यस्थापनचें काम त्यांनीं हातीं घेतलें. लाहोरच्या सुभेदारास न जुमानतां ते लोकांकडून वसूल गोळा करूं लागले. काबूलचा सुलतान अहंमदशहा अब्दाली यानें हिंदुस्थानांत उपद्व्याप मांडिला, तो त्यांच्या चांगला पथ्यावर पडला. पुढें अहंमदशहाही मरण पावला; अफगणिस्तानांत अव्यवस्था झाली; आणि मोगल बादशहा सर्वस्वी पराधीन झाला. अशा स्थितींत शीखांनीं पंजाबच्या पूर्वभागांत सतलज व रावी यांजमधील दुआबांत आपलें राज्य स्थापिलें. त्यांच्यामध्यें नवीन स्वराष्ट्राभिमान उत्पन्न झाला. त्या वेळेस शीखांचीं अनेक लहान लहान राज्यें अस्तित्वांत आलीं. त्यांपैकीं कित्येक अद्यापि हयात आहेत. शत्रूंपासून आपला बचाव करण्याकरितां शीख लोकांस एक प्रकारची विशिष्ट व्यवस्था अंमलांत आणावी लागली. त्यांच्या लहान लहान टोळ्या स्थापन झाल्या. आणि प्रत्येक टोळीनें आपली अंतर्व्यवस्था पाहिजे तशी ठेवावी, परंतु प्रसंगीं सर्वांनीं एकमत होऊन लढाईस यावें असा प्रघात पडला. ह्या प्रत्येक टोळीस 'मिसल' अशी संज्ञा असून सर्व सरदारांची सभा भरे तीस 'गुरुमता' असें नांव होतें. शीखांचें प्रजासत्ताक राज्य भरभराटींत होतें, त्या वेळेस अशा मिसली बारा होत्या. परंतु रणजितसिंह नामक जो पराक्रमी शीखराजा पुढें निपजला, त्यानें सतलज नदीच्या पश्चिमेकडील व उत्तरेकडील मिसली नाहींशा केल्या, आणि स्वतःच सर्वांचा राजा झाला. तसेंच सतलज व यमुना यांजमधील मिसलींनीं इंग्रजांचा आश्रय केला, तेणेंकरून त्याही लवकरच मोडून गेल्या. सन १८०५ सालीं शीखांची गुरुमता भरली होती, तीच शेवटची. त्यानंतर पुढें त्यांची सभा भरली नाहीं. इतकी माहिती प्रस्तुत भाग समजण्यास पुरे आहे. शीखांचें माहात्म्य विशेष आहे, आणि त्यांच्या हातून पुढें अवर्णनीय पराक्रम घडले आहेत, त्यांचें वर्णन ब्रिटिश रियासतींत येईल.

४. फर्रुखसेयर, (स. १७१३-१९).—सय्यदांच्या मदतीनेंच फर्रुखसेयर यास सिंहासन प्राप्त झालें होतें. अर्थात् त्याचे उपकार फेडण्याकरितां त्यानें सय्यद अब्दुला यास वजीर नेमून हुसेनअलीस सेनापति केलें. हे सय्यद पराक्रमी व उच्च वर्णाचे असल्यामुळें बादशहास नामशेष करून सर्व अधिकार स्वतःचे हातांत ठेवण्याचा त्यांचा विचार होता. बादशहास हा प्रकार आवडला नाहीं. त्याच्या मर्जीतले म्हणून कांहीं लोक होते. ते सय्यदांच्या विरुद्ध खटपटी करूं लागले. बंगाल्यांतील डाक्का शहरच्या काजीवर बादशहाची मर्जी होती. त्यास त्यानें मीर-जुम्ला असा किताब देऊन स्वतःजवळ ठेविलें. हा मनुष्य सय्यदांविरुद्ध वागण्याची बादशहास भर देऊं लागला.

सन १७१५त कलकत्तेकर इंग्रजांनीं दिल्लीस बादशहाकडे वकील पाठवून बंगालच्या सुभेदाराविरुद्ध पुष्कळ गाऱ्हाणीं नेलीं. त्यांची विशेष दाद लागण्यास एक चमत्कारिक कारण झालें. बादशहास काळपुळी होऊन जबर दुखणें लागलें, व सर्व वैद्यांचे उपाय थकले. अशा वेळीं इंग्रज वकिलांबरोबर हॅमिल्टन नांवाचा एक शस्त्रवैद्य होता. त्याजला औषध देण्याची विनंति करण्यांत आली. तेव्हां शस्त्रप्रयोग करून त्यानें अल्पकाळांत बादशहास चांगलें बरें केलें. ह्या दुखण्यामुळेंच बादशहाचें अजितसिंहाच्या मुलीशीं ठरलेलें लग्न खोळंबून राहिलें होतें, तें बादशहा बरा झाल्यामुळें निर्विघ्नतेनें तडीस गेलें. हॅमिल्टनचे उपकार बादशहास फारच मोठे वाटले. परंतु हॅमिल्टननें स्वतःसाठीं बादशहाकडून कांहींच घेतलें नाहीं. त्यानें अर्ज केला, कीं बंगालच्या सुभेदाराविरुद्ध कंपनीनें ज्या तक्रारी केल्या आहेत, त्या बादशहानें कबूल कराव्या. आपल्या कृत्यांचा परिणाम काय होईल याची बादशहास कांहींच कल्पना नव्हती. त्यानें कंपनीच्या मागण्या कबूल करून तीस व्यापाराची सनद करून दिली, तिचा उल्लेख ब्रिटिश रियासतींत आहे.

रजपूत युद्ध.—औरंगजेब बादशहा मरण पावतांच रजपूत राजे मोगलांचा सूड घेण्याच्या कामास लागले. बहादूरशहास त्यांनीं दाद दिली नाहीं; आणि स्वतःचें सामर्थ्य ओळखून तोही त्यांच्या मागण्या कबूल करून मोकळा झाला. पुढें अंबेर व मारवाड येथील राजे उदेपुरास जाऊन राणा अमरसिंह यास भेटले, त्या वेळेस त्रिवर्गांनीं एक

तहनामा ठरविला, (स. १७१०), तो रजपुतांच्या इतिहासांत महत्त्वाचा आहे. अकबराच्या वेळेपासून मोगलांशीं बेटीव्यवहार करून कित्येक रजपूत राजांनीं आपल्या कुलाचें पावित्र्य नाहींसें केलें होतें, म्हणून तशा घराण्यांशीं उदेपूरच्या घराण्याचा शरीरसंबंध होत नसे. हा निषेधात्मक नियम त्यांनीं ह्या वेळेस मोडून असें ठरविलें, कीं (१) इतःपर कोणींही आपल्या मुली मुसलमानांस देऊं नयेत; (२) आपसांतला बेटीव्यवहार पूर्ववत् चालू करावा; इतकेंच नाहीं, तर (३) उदेपूरच्या मुलीपासून जयपूर व जोधपूर येथें पुरुषसंतति झाली असेल, तर तिचा त्या राज्यांत गादीवर ज्यास्त हक्क आहे असें समजून, इतर मुलींपासून झालेल्या संततीस तेथील राज्य मिळूं नये. सारांश, नष्ट वैभव परत मिळविण्यासाठीं ऐक्य व्हावें, म्हणून रजपूत राजांनीं हा तह मुद्दाम केला, आणि तो पाळण्याच्या शपथा घेतल्या. ह्या तहानें इष्टकार्यसिद्धि न होतां पुष्कळ अनिष्ट परिणाम झाले. हा तह मोडण्याचा पहिलाच प्रसंग फर्रुखसेयरच्या कारकीर्दींत आला. रजपूत राजे स्वतंत्र होऊन मोगलांस करभार देईनातसे झाले, ही गोष्ट दिल्ली दरबारास न रुचून, त्यांचें पारिपत्य करण्याचा विचार चालला. मारवाडचा राजा अजितसिंह राठोड याजवर चालून जाण्याचा हुकूम हुसेन अली यास मिळाला. परंतु हुसेनचाच नाश व्हावा असें बादशहाच्या मनांत असल्यामुळें, त्यानें अजितसिंहास सांगून पाठविलें, कीं ' होतां होईल तों खटपट करून हुसेनचा पाडाव करावा.' दिल्ली दरबारांतील ही दुफळी पाहून अजितसिंहानें हुसेनशींच सल्ला केला; आणि बादशहास शरण जाऊन आपली मुलगी फर्रुख्सेयर यास देऊं केली. पुढें लवकरच हें लग्न दिल्ली येथें मोठ्या थाटानें झालें. हुसेन अली दिल्लीस परत आल्यावर त्यानें बादशहाकडून मीर-जुम्ला यास बहारप्रांताचा सुभेदार नेमून पाठविलें. येणेंप्रमाणें सय्यद तात्पुरते निर्धास्त झाले.

५. सय्यदबंधूंचीं कारस्थानें, (१७१९–२०).—बादशहाचें अजितसिंहाच्या मुलीशीं लग्न झालें, तेव्हांच हुसेनअलीची दक्षिणच्या सुभ्यावर नेमणूक झाली. पूर्वीं दाऊदखान पन्नी हा झुल्फिकारखानाचा दुय्यम म्हणून दक्षिणचा कारभार करीत होता; आणि अलीकडे त्याची गुजराथच्या सुभ्यावर कायम नेमणूक झाली होती. त्यास बादशहानें आंतून लिहून पाठ-

विलें, कीं हुसेनअली दक्षिणेंत दाखल होतांच त्याजबरोबर लढून त्यास मारून टाकावें. तदनुसार हुसेनअली येण्यापूर्वींच दाऊदखान हा 'सुभेदार' अशी पदवी धारण करून ब्ऱ्हाणपूर येथें तयारीनिशीं राहिला. ता. २५ ऑगस्ट, सन १७१५ रोजीं ह्या दोघां सरदारांचीं गांठ पडली. ब्ऱ्हाणपूरनजीक लढाई होऊन दाऊदखानाचा जय होणार, इतक्यांत एक गोळी लागून दाऊदखान पडला, आणि हुसेनअलीस जयप्राप्ति झाली. दाऊदखानाची बायको मूळची हिंदु होती, तिनें नवऱ्याच्या मरणाचें वृत्त ऐकतांच आत्महत्या केली.

पुढें हुसेनअलीकडे दक्षिणचा कारभार आला. त्याचा नाश करण्याकरितां बादशहानें मराठ्यांशीं गुप्त संधान बांधिलें. मराठा सरदार सेनापति त्रिंबकराव दाभाडे खानदेशामध्यें पराक्रम करून राहत होता, त्यास बादशहानें आपणाकडे वश करून घेतलें. परंतु हुसेनअली कमी वस्ताद नव्हता. त्यानें शाहूराजाशीं तह करून मराठ्यांच्या मागण्या कबूल केल्या. ह्याजबद्दल बादशहास विशेष राग आला आणि तो सय्यदांच्या नाशाची उघडपणें खटपट करूं लागला. वजीर अब्दुल्ला यानें आपली फौज वाढविली व हुसेनास त्वरा करून दिल्लीस बोलाविलें. तेव्हां दिल्लींत दोन तट उघड पडले. अब्दुल्ला वजीर हा आळशी असल्यामुळें त्याचें काम करण्यास दुय्यम वजीर नेमिलेले होते. पहिल्यानें इनायत-उल्ला नांवाचा दुय्यम वजीर होता. त्यास काढून टाकिल्यावर रत्नचंद नांवाचा एक हिंदु गृहस्थ तें काम हल्लीं करीत होता. परंतु रत्नचंदाचा कारभार आवडेनासा होऊन बादशहानें त्यासही काढून टाकलें. याच संधीस मीर-जुम्ला हा बंगाल्यांत आपला कारभार सोडून दिल्लीस आला.त्यामुळें बादशहाच्या कपटाविषयीं वजिराच्या मनांत विशेष संशय आला. परंतु सय्यदांचा पाडाव करण्याचें सामर्थ्य बादशहाचे अंगीं नव्हतें. कारण त्यांची समजूत करण्याकरितां बादशहानें मीर-जुम्ला यास मुलतान येथें घालवून दिलें. तथापि बादशहानें आपल्या मसलती सोडून दिल्या नाहींत. तशांत जयपूरचा राजा जयसिंह व दुसरे मानकरी लोक यांची बादशहास मदत होती. जयसिंहाचें व सय्यदांचें वांकडें होतें. दक्षिणचा सुभेदार चिंकिलिजखान याची मुरादाबादच्या हलक्या सुभ्यावर नेमणूक झाली होती, तोही बादशहाचा सूड घेण्यास तयार असून,

बहारचा सुभेदार सरबुलंदखान याजसह तो दिल्लीस आला. त्यांस अब्दुल्लानें आपल्या पक्षाकडे वळविलें. इतक्यांत ता० ३१ डिसेंबर, १७१८ रोजीं हुसेनअलीही दिल्लीस येऊन भावास मिळाला. येतांना त्यानें बाळाजी विश्वनाथ पेशव्याचे हाताखालीं मराठी फौज मदतीस आणिली होती. हुसेन येण्यापूर्वी अब्दुल्लाचा समाचार घ्यावा, म्हणून जयसिंहानें बादशहास पुष्कळ भर दिली, परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं. हुसेन आल्याबरोबर प्रथम त्यानें राजा जयसिंहास बादशहाकडून परत आपल्या देशीं पाठविलें. एका हलक्या काश्मिरी गृहस्थावर अलीकडे बादशहाची मर्जी बसली असून, त्यास त्यानें रुक्नुद्दौला असा किताब दिला होता. त्याच्या तंत्रानें बादशहा चाले. पुढें बादशहास फारसें पाठबळ राहिलें नाहीं, तेव्हां तो सय्यदांच्या मागण्या कबूल करून त्यांस शरण गेला. त्यांनीं वाड्यास वेढा घालून बादशहास आपल्या ताब्यांत ठेविलें. इकडे शहरांत बंडावा झाला. संताजी (कंठाजी ?) कदम ह्याचे हाताखालीं १५०० मराठे स्वार हुसेनच्या फौजेस मिळण्याकरितां शहरांतून चालले असतां, बादशहाच्या फौजेनें गांठून सर्वांचा शिरच्छेद केला. इतक्यांत फर्रुखसेयर यास पदच्युत केलें आहे, असा सय्यदांनीं शहरांत जाहीरनामा लाविला. त्यांनीं एका शहाजाद्यास नवीन किताब देऊन तख्तावर स्थापिलें, (सेप्टेंबर १७१९). दोन महिन्यांनीं फर्रुखसेयर याचे सय्यदांनीं प्रथम डोळे काढून नंतर विष देऊन त्यास ठार मारिलें. ह्या राक्षसी कृत्यानें सर्व दिल्लीशहर हळहळलें. नवीन बादशहा तीन महिन्यांच्या आंतच क्षयरोगानें मरण पावला. दुसरा एक राजपुत्र सिंहासनारूढ झाला, तोही लवकरच मरण पावला. तेव्हां रोशन-अख्तर नांवाचा बहादूरशहाचा एक नातू १८ वर्षांचा होता, त्यास महंमदशहा असा किताब देऊन सय्यदांनीं सिंहासनावर स्थापिलें. महंमदशहा शिकलेला असून त्याची आई हुशार होती. मधील दोन अल्पकालीन शहांचीं नांवें गाळून टाकण्यांत आलीं; आणि महंमदशहाचें आरोहण फर्रुखसेयरनंतर समजावें असें ठरलें. अशा प्रकारें ही राज्यक्रांति समाप्त झाली.

फर्रुखसेयर फार दुर्बल होता. त्याच्या कारकिर्दीत हिंदु व मुसलमान यांचा अहंमदाबादेस मोठा दंगा झाला. तेथचा मुसलमान सुभेदार

दाऊदखान पन्नी ह्यानें हिंदूंचा पक्ष घेतला होता. तसेंच शिया व सुनी ह्यांचेही अनेक दंगे ह्या कार्किर्दीत झाले.

६. **महंमदशहा.**—महंमदशहा गादीवर आला, तरी सय्यदांचें वजन कमी झालें नव्हतें. त्यांचा ताबा एकदम झुगारून देणें अशक्य असल्यामुळें त्यांच्याच तंत्रानें बादशहा चालूं लागला. ह्या कामीं त्यास आईची चांगली मदत होती. आरंभींच मराठ्यांच्या सर्व मागण्या कबूल करून पेशवे बाळाजी विश्वनाथ व त्याची फौज ह्यास त्यानें दिल्लींतून काढून दक्षिणच्या वाटेस लाविलें. त्यांच्या मागण्या कबूल न करण्याइतकी ताकद बादशहांत आतां राहिली नव्हती. बादशाही सहीशिक्यानिशीं जसे हक्क ह्या वेळीं मराठ्यांस पूर्णपणें मिळाले, तसे पूर्वीं कधीं मिळाले नसून, ह्याच जोरावर मराठ्यांचें पाऊल पुढें वाढलें.

या कार्किर्दीची दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे निजामुल्मुल्क यानें स्वातंत्र्य धारण केलें ही होय. सय्यद हुसेनअली त्याचें पारिपत्य करण्याविषयीं अतिशय तत्पर होता. बादशहास मागें एकटा ठेवणें निर्भय नाहीं असें समजून त्यास बरोबर घेऊन हुसेनअलीनें सन १८२० च्या ऑगस्ट महिन्यांत दक्षिणेंत कूच केलें. निघण्यापूर्वीं बादशहाच्या पक्षाकडील मंडळींनीं हुसेनास मारेकरी घालून रस्त्यांत ठार मारण्याचा घाट घातला. तदनुसार मीर हैदर नांवाचा एक तार्तार मनुष्य एका दिवशीं हातांत अर्ज घेऊन हुसेनच्या पालखीजवळ आला; आणि हुसेन अर्ज वाचण्यांत गुंतला असतां त्यास त्यानें भोंसकून ठार केलें. पुढें हुसेनच्या लोकांनीं थोडासा दंगा केला, परंतु बादशहानें प्रसंगावधान राखून स्वतःचा बचाव केला. वजीर अब्दुल्ला यास भावाच्या मरणाचें वृत्त सेप्टेंबर ता० १६ रोजीं दिल्लीस कळलें. त्यानें रूफीउल्-कदर नामक बहादूरशहाच्या एका नातवास सिंहासनावर स्थापिलें, आणि फौजेची जमवाजमव करून तो महंमदशहाशीं लढण्यास आला. उभय पक्षांची बरीच निकराची लढाई होऊन ता० २४ ऑक्टोबर रोजीं अब्दुल्ला जखमी होऊन महंमदशहाच्या हातांत पडला. नंतर बादशहानें विजयानंदानें राजधानींत प्रवेश केला. महंमद अमीनखान नामक बादशहाच्या प्रीतींतील एक सरदार सय्यदांचा पाडाव करण्यांत प्रमुख होता, त्यासच बादशहानें वजिरी दिली.

सय्यदांचा पाडाव झाल्यानें सर्व लोकांस आनंद झाला. निजामुल्मुल्क्, सर्व प्रांतांचे सुभेदार, युरोपियन व्यापारी व इतर मंडळी या सर्वांकडून बादशहास आनंदप्रदर्शक पत्रें आलीं. येणेंप्रमाणें ही राज्यक्रान्ति तडीस जाऊन मोगल बादशाहीचा सुखकर अंमल पुनः सुरू झाला, असें क्षणमात्र बहुतेकांस वाटलें; आणि महंमदशहाची चहूंकडे वाहवा झाली.

७. चिंकिलीजखान, निजामशाहीचा उदय.—उत्तरकालीन मोगलशाहींत निजामुल्मुल्क् हा मोठा कर्ता पुरुष निपजला. तो शहाबुद्दीनखान ऊर्फ गाजी-उद्दीन याचा मुलगा. औरंगजेबानें सन १६८३ त दक्षिणेंत स्वारी केली, तेव्हां शहाबुद्दीनखान हा त्याजपाशीं एका तुराणी मोगलांचे टोळीचा मुख्य होता. खानदेशांतील रामशेज नांवाचा मराठ्यांचा किल्ला घेण्याकरितां बादशहानें त्यास पाठविलें असतां किल्लेदारानें त्याचा चांगलाच समाचार घेतला. पुढें बादशहाचा वडील मुलगा मुअज्जम याच्या मदतीस बादशहानें शहाबुद्दीन यास कोंकणांत पाठविलें असतां, रायगडाजवळ निजामपूर येथें संभाजीच्या एका टोळीचा शहाबुद्दीननें पराभव केल्यावरून, बादशहानें खुष होऊन त्यास गाजी-उद्दीन हा किताब दिला. त्याचा मुलगा कमरुद्दीनखान ह्यासच चिंकिलीजखान अशी औरंगजेबानें पदवी दिली. तो सर्व मोहिमांत हजर असून, त्याच्या शिस्तींत लहानपणापासून चांगला कसलेला होता. विजापूरचें राज्य खालसा झालें, तेव्हां तिकडील प्रदेशाचा कारभार बादशहानें ह्यास सांगितला. फर्रुख्सियर सिंहासनस्थ झाला, त्या वेळेस झुल्फिकारखानाशीं वांकडें असल्यामुळें चिंकिलीजखानानें सय्यदांस मदत केली, त्यावरून त्यास निजामुल्मुल्क व असोफजा हे किताब मिळाले. पुढें दरबारच्या सर्व गोष्टींत त्याचें थोडेंबहुत अंग असे. तथापि लहानपणापासून दक्षिणेंत त्याचा काल गेला असल्यामुळें, तिकडेच आपली महत्त्वाकांक्षा तृप्त करून घेण्याचा मूळपासून त्याचा विचार होता. दाऊदखान पन्नीची गुजराथेंत नेमणूक झाली, त्या वेळेस दक्षिणची सबंध सुभेदारी निजामुल्मुल्क्कडे आली. हा कारभार त्यानें फार हुशारीनें व शहाणपणानें हांकिला, अशी त्याची कीर्ति आहे. मराठ्यांच्या इतिहासाशीं ह्या पुरुषाचा व त्यानें स्थापिलेल्या घराण्याचा अत्यंत निकट संबंध आहे. त्याची हकीकत मराठ्यांचे भागांत येईल. मराठ्यांची सत्ता सार्वभौम करण्याचा विचार पेशव्यांचे

मनांत मूळपासून होता; तद्वत्च मोगलशाहीचा दक्षिणभाग आपणाकडे आणण्याचे भगीरथ प्रयत्न निजामानें केले. ह्यामुळेंच पेशवे व निजाम ह्या घराण्यांचें सतत वैर दृष्टीस पडतें. या वैराचा इतिहास व उत्तरमराठशाहीचा एकंदर इतिहास जवळजवळ समकालीन आहेत. निजाम व मराठे ह्यांच्या राज्यांच्या मध्यें स्वाभाविक हद्द नसल्यामुळें, त्या दोघांमध्यें सहजच कायमचा कलह माजला. शाहू व ताराबाई यांचें युद्ध चालू असतां निजाम ताराबाईस मिळाला. दाऊदखान पन्नीनें पेशव्याशीं सख्य ठेविलें हें त्यास आवडलें नाहीं. मराठ्यांमधील गृहकलह कायम ठेवून आपला बचाव करणें ही निजामाच्या घराण्यानें आपली इतिकर्तव्यता मानिलेली दिसते. प्रत्येक प्रसंगांत ही गोष्ट व्यक्त झाल्याशिवाय राहत नाहीं. निजामाचा अंतस्थ हेतु फर्रुखसेयर यास व्यक्त झाला, व सय्यद हुसेन यास त्यानें दक्षिणच्या सुभ्यावर पाठविलें, तेव्हां निजामास मुरादाबादच्या सुभ्यावर नेमिलें. या योगानें निजामाचे बेत थोडेसे मागें पडले. सय्यदांची व बादशहाची राजधानींत झटापट चालली असतां निजाम दिल्लीस आला. परंतु तेथें सय्यदांचें व त्याचें जुळलें नाहीं, आणि सय्यदांनीं त्याची माळव्याच्या सुभ्यावर नेमणूक केली. त्यानें माळव्याचा बंदोबस्त चांगला केला. परंतु लवकरच त्यानें आपली दृष्टि दक्षिणेकडे वळविली. तिकडे त्याचे साथीदार पुष्कळ होते. कोल्हापूरकर ताराबाईची त्यास मदत होती. मोगलांची फौज तेथें फारशी नव्हती. सय्यदांकडून त्याचा बंदोबस्त होण्याचा विशेष संभव नव्हता. तरी माळव्याच्या उत्तरहद्दीवर निजामाच्या बंदोबस्तासाठीं सय्यदांनीं थोडीशी फौज ठेवून दिलीच. ह्या गोष्टीनें त्यास चीड आली, आणि तो स. १७२० च्या एप्रिल महिन्यांत माळवा सोडून उघडपणें दक्षिणेंत आला. अशीरगडचा किल्ला व बऱ्हाणपूर शहर त्याच्या ताब्यांत सहज गेलें. वऱ्हाडचा सुभेदार घोसखान आपल्या फौजेसह त्यास मिळाला. माळव्यांत जी बादशाही फौज सय्यदांनीं ठेविली होती, तिचा मुख्य दिलावर अलीखान हा निजामाचा पाठलाग करीत आला. बऱ्हाणपूरनजीक उभयतांची लढाई होऊन दिलावरअली पडला; आणि त्याची सामुग्री निजामास मिळाली. आलमअली नांवाचा दुसरा एक मोगल सरदार दक्षिणेंत होता. तो हुसेन सय्यदाचा पुतण्या असून त्याच्या वतीनें दक्षिणचा कारभार पाहत होता.

त्यास दिलावरअलीची पराभव झालेली फौज जाऊन मिळाली; आणि ता लगेच निजामाशीं सामना करण्याकरितां वऱ्हाडांत गेला. निजामाचाही बंदोबस्त विशेष होता. १ उभयतांची गांठ वऱ्हाडांत पैनघाटांत बाळापूर नांवाचें लहान शहर आहे, तेथें पडली, (ऑगस्ट ता. ८, स. १७२०). ह्या लढाईंत आलमअली व मोगलांचे दुसरे शूर सरदार पडले; आणि निजामास जय मिळाला. हीच लढाई निजामाच्या स्वतंत्रतेचा पाया होय, असें म्हणण्यास हरकत नाहीं. मराठ्यांच्या संबंधानेंही ही लढाई महत्त्वाची आहे. सेनापति खंडेराव दाभाडे याच्या हाताखालीं शाहूनें मराठ्यांची फौज आलमअलीच्या मदतीस ठेविली होती; आणि कोल्हापूरकर संभाजीची मदत निजामास होती. ह्याच लढाईंत दमाजी गायकवाडानें पराक्रम केल्यावरून त्याचें घराणें उदयास आलें.

याप्रमाणें निजामानें स्वतंत्र पंथ काढिला, हें वर्तमान दिल्लीस कळतांच सय्यद हुसेनअली बादशहास बरोबर घेऊन जय्यत तयारीनें दक्षिणेंत निघाला. रस्त्यांत त्याचा खून झाला हें मागें आलेंच आहे. हुसेनअली मरण पावल्यावर निजामानें बादशहास संतोषदर्शक पत्रें पाठविलीं. सय्यद अब्दुल्लाचा पाडाव झाल्यावर महंमद अमीनखान स. १७२१ च्या जानेवारींत मरण पावला. तेव्हां बादशहानें निजामास वजीर केलें, आणि अमीन खानाचा मुलगा कमरुद्दीनखान यास मोठ्या योग्यतेस चढविलें. परंतु आपलें दक्षिणचें काम सोडून निजामास एकदम दिल्लीस जातां आलें नाहीं. स. १७८२ च्या आरंभीं तो दिल्लीस दाखल झाला. तेथें बादशहाच्या अंगीं राज्यकारभारास लागणारें कांहींच चातुर्य नाहीं, तो व्यसनाधीन होऊन सर्वकाळ संवगड्यांच्या खुशामतींत दंग असतो, असें पाहून निजामानें त्यास ताळ्यावर आणण्याचा प्रयत्न केला, पण त्याचा उपयोग झाला नाहीं. दरबारच्या लोकांसही निजामाचें महत्त्व सहन झालें नाहीं. हैदर कुलीखान नांवाचा दुसरा एक हुशार सरदार गुजराथच्या सुभ्यावर होता. त्याजबरोबर निजामाची स्पर्धा चालू झाली. ह्या भांडणांत निजाम व हैदर या दोघांचेंही वर्चस्व कमी करण्याचा बादशहानें बेत केला. त्यानें गुजराथचा सुभा निजामास दिला. तेव्हां निजाम लगेच फौजेनिशीं गुजराथेंत गेला, आणि हैदरकुलीचा पराभव करून त्यानें गुजराथप्रांत आपल्या दक्षिणच्या सुभ्यास सोडिला. तसेंच

गुजराथेंत आपला मामा हमीदखान यास ठेवून आपण स्वतः दिल्लीस परत आला. येणेंकरून निजामाची सत्ता अतोनात वाढली. त्याची शिस्त कडक असून राहणी साधी व नियमित होती. परंतु त्या स्वच्छंदी महंमदशहाशीं त्याचें मुळींच पटेनासें झालें, तेव्हां आजाराचें निमित्त करून त्यानें आपल्या कामाचा राजीनामा दिला, आणि कित्येक नवीन पदव्या संपादन करून तो दक्षिणेंत आला, (सन १७२३). तेथें त्याचा पाय रिघूं नये अशी तजवीज दरबारांत चालली. मुबारीझखान नामक एक शूर मोगल सरदार हैदराबाद व कर्नाटक ह्या प्रांतांत काम करीत असून त्याचें व निजामाचें वैर होतें. त्याजला बादशहानें स्वदस्तूरचें पत्र पाठविलें, कीं '*निजाम हा शिरजोर होऊन स्वातंत्र्य धारण करीत आहे, तर त्याजबरोबर लढून त्यास ठार मारून टाकावें; आणि हें सिद्धीस गेल्यास दक्षिणचा कारभार तुमच्याचकडे देण्यांत आला आहे असें समजावें.*' निजामही दक्षिणेंत फार त्वरेनें गेला नाहीं, म्हणून मुबारीझखानास सर्व तजवीज करण्यास सवड सांपडली. सन १७२४ च्या ऑक्टोबर महिन्यांत दौलताबादनजीक सुकरखेडें येथें लढाई होऊन, मुबारीझखान व त्याचे दोन मुलगे मारले गेले. निजामानें मुबारीझखानाचें शिर बादशहाकडे पाठवून उलट असा बहाणा केला, कीं हा बंडखोर मारला गेल्यामुळें राज्याचा एक शत्रु कमी झाला. बादशहाचें कपट त्यास ठाऊक होतेंच. जय प्राप्त झाल्यावर निजाम लगेच गोवळकोंडा व हैदराबाद येथें गेला, तेव्हां दक्षिणचा सर्व भाग त्याच्या स्वाधीन झाला. ह्यापुढें तो बादशहास कधीं काळीं नजराणे वगैरे पाठवीत असे. परंतु एकंदरींत सन १७२४ हें वर्ष निजामशाहीच्या स्वातंत्र्यस्थापनेचें होय, असें म्हणण्यास हरकत नाहीं. इतउत्तर निजामाचे बहुतेक व्यवहार मराठ्यांशीं घडले, त्यांचें वर्णन या भागांत देतां येत नाहीं.

ह्या वेळीं गुजराथ, माळवा व दक्षिण ह्या तीनही प्रांतांचा कारभार निजामाकडेच होता. मुबारीझखान मेल्याचें वर्तमान बादशहास कळलें, तेव्हां त्यानें गुजराथ व माळवा ह्या प्रांतांवर स्वतंत्र कामदार नेमिले. सरबुलंदखान नांवाचा सरदार काबूलच्या सुभ्यावर होता, त्याची गुजराथप्रांतावर नेमणूक झाली; आणि राजा गिरिधर याची माळव्यावर नेमणूक झाली. परंतु निजामाचा मामा हमीदखान हा गुजराथचा कारभार

NATIONAL ARCHIVES OF INDIA

सरबुलंदच्या स्वाधीन करीना. कंठाजी कदम व पिलाजी गायकवाड यांस गुजराथची चौथाई व सरदेशमुखी देण्याचें कबूल करून त्यांची मदत हमीदखानानें घेतली होती. सुजायतखान म्हणून सरबुलंदचा सरदार पुढें आला होता, त्याचा हमीदखानानें मराठ्यांच्या मदतीनें पराभव केला; आणि शेवटीं सरबुलंदखानासही मराठे सरदारांनीं पराजित केलें. पण युद्धांत मराठ्यांचा नाश बहुत झाला. सरबुलंदखानानें मराठ्यांचे गुजराथेवरील हक्क चालू ठेवण्याचें कबूल केलें. तेव्हां हमीदखानास गुजराथ सोडून जावें लागलें, (सन १७२४).

माळवा व गुजराथ हे दोनही प्रांत हातचे गेल्यामुळें निजामाचें बरेंच नुकसान झालें. त्या वेळीं मराठ्यांमध्यें त्याच्याच तोडीचे पुरुष निपजले म्हणून त्यांजपुढें त्याचें नीट चाललें नाहीं. सरबुलंदखानानें मराठ्यांस खंडणी देण्याचें कबूल केलें, तें दिल्लीस पसंत न पडून सन १७३२त त्यास त्या सुभ्यांवरून काढून बादशहानें जोधपूरचा राजा अभयसिंह यास गुजराथचा कारभार सांगितला. ही व्यवस्था दिल्लीदरबारच्या फायद्याची झाली नाहीं. मराठ्यांनीं अभयसिंहाच्या हातून तो प्रांत तेव्हांच हिसकून घेतला. गुजराथप्रांताप्रमाणेंच माळव्यांतही मराठे सरदारांनीं आपलें ठाणें बसविलें. तेथचा अधिकारी राजा गिरिधरदास नागर याची सन १७२९त बाजीरावाशीं लढाई होऊन तींत तो पडला. नंतर त्याचा पुतण्या दयाराम यानें मराठ्यांशीं कांहीं दिवस टक्कर दिली, पण तोही चिमणाजीआपा याजबरोबर लढत असतां मारला गेला, (स० १७३२). नंतर माळव्याचा कारभार बादशहानें महंमदखान बंगष नांवाच्या एका अफगाण सरदारास सांगितला. अलाहबादच्या सुभ्याचें कामही महंमदखानाकडेसच होतें. ह्या दोन प्रांतांच्या दरम्यान बुंदेलाराजा छत्रसाल याचा मुलूख होता. त्याजवर महंमदखानानें स्वारी केली असतां बाजीरावानें छत्रसालास मदत करून महंमदखानाचा पराजय केला. तेव्हां दिल्लीदरबारास मराठ्यांची फारच भास्ती पडली. असा कठीण प्रसंग आला, तेव्हां बादशहानें जयपूरचा राजा सवाई जयसिंह याजकडे माळव्याचें काम सांगितलें. जयसिंह बाजीरावाचा मित्र असून कलहप्रिय नव्हता. तेव्हां बादशहाची परवानगी घेऊन सर्व माळवा प्रांताचा कारभार त्यानें मराठ्यांकडे सोंपविला. त्या वेळे-

NATIONAL ARCHIVES OF INDIA

पासून माळव्यांत शिंदे व होळकर यांची सत्ता स्थापन झाली, (सन १७३४). मराठे एवढ्यानेंच तृप्त झाले नाहींत. त्यांनीं आपला रोंख थेट दिल्लीवर धरिला. वजीर खानडौरान, तसेंच कमरुद्दीनखान व अयोध्येचा सुभेदार सादतखान यांनीं बाजीरावाचें पारिपत्य करण्याचा प्रयत्न केला; पण तो सिद्धीस गेला नाहीं. तेव्हां निजामाच्या मुलुखांत शेंकडा दोन टक्के चौथाई वसूल करण्याची बादशहानें बाजीरावास परवानगी दिली. ह्यांत बादशहाचा उद्देश इतकाच होता, कीं दक्षिणच्या मुलखावर स्वामित्व मिळाल्यानें बाजीरावानें एकदम तिकडे निघून जावें, आणि निजामानें परभारें बाजीरावाशीं वैर आरंभून त्याचा पाडाव करावा. बादशहाचा पहिला उद्देश तडीस गेला नाहीं. बाजीरावास ज्यास्त आशा लागल्यामुळें तो निघून जाईना. निजामानें मात्र त्याजबरोबर टक्कर मारण्याची चांगलीच तयारी केली. स्वतः स्वतंत्र होण्याकरितां दिल्लीदरबारचें वजन कमी करण्याची जशी आरंभीं निजामाची खटपट होती तशी आतां नव्हती. बादशहा अगदींच दुर्बल झाल्यामुळें मराठ्यांनीं त्यास पूर्णपणें ताब्यांत आणून प्रत्यक्ष निजामासही गिळून टाकण्यास ते तयार झाले होते. अशा आणीबाणीच्या प्रसंगीं निजाम व बादशहा यांचा सलोखा होऊन दोघांनींही मराठ्यांच्या बंदोबस्ताची जय्यत तयारी केली. भोपाळनजीक शिरोंज येथें मुसलमानांची व मराठ्यांची निकराची लढाई झाली, (१७३७). मोगलांचा व मराठ्यांचा हा शेवटचा निकराचा झगडा होय. त्यांत निजामाचा पराभव होऊन त्यानें बाजीरावाशीं तह केला, त्यायोगें सर्व माळवा प्रांत आणि नर्मदा व चंबळ यांजमधील मुलूख कायमचा मराठ्यांस मिळाला.

पुढें नादीरशहानें दिल्लीवर स्वारी केली असतां निजाम राजधानींत होता. नादीरशहा स्वदेशीं गेल्यावर निजामाचें वजन फारच वाढलें. लवकरच तो दिल्ली सोडून दक्षिणेंत आला, (१७४१). येतांना त्यानें आपला वडील मुलगा गाजी उद्दीन यास दिल्लींत बादशहासन्निध कांहीं महत्त्वाच्या कामावर ठेविलें. शिवाय वजीर कमरुद्दीनखान याचेंही त्यास विशेष साहाय्य होतें. त्याचा दुसरा मुलगा नासिरजंग यानें बंड करून त्यास बराच त्रास दिला. स. १७४३ त निजामानें कर्नाटकांत स्वारी करून तेथचा बंदोबस्त केला. पुढें ह्या पुरुषाचे हातून विशेष

५३-१४-११-१०--७९१-२०००

महत्त्वाचें कृत्य घडलें नाहीं. स. १७४८ च्या जून महिन्यांत दिल्लीस जात असतां रस्त्यांत बऱ्हाणपूर तेथें हा पराक्रमी पुरुष मरण पावला. त्या वेळीं त्याचें वय १०४ वर्षांचें होतें.

मोगल बादशाहीच्या पडत्या काळांत जे पराक्रमी पुरुष मुसलमानांत प्रसिद्धीस आले, त्यांजमध्यें निजामुल्मुल्कची गणना आहे. प्रस्तुतच्या निजामशाहीचा हा मूळपुरुष होय. ऱ्हास पावणाऱ्या मोगल बादशाहीस टेंका देऊन सांभाळण्याची ताकद त्याच्या इतकी त्या वेळेस दुसऱ्या कोणांत नव्हती. कांहीं काळपर्यंत तें पडतें राज्य सांवरून धरण्यांत त्यानें आपलें सामर्थ्य खर्च केलें. परंतु इतर सर्व गोष्टी त्यास विरुद्ध असल्यामुळें त्याच्या त्या प्रयत्नास यश न येऊन, शेवटीं त्रासून स्वतःचें कल्याण करण्याच्या उद्योगास तो लागला. ह्याच उद्योगाचें फळ सांप्रतची निजामशाहीची गादी होय.

८. **नादिरशहाची स्वारी,** (सन १७३८–३९)—अफगाणिस्तानांत कंदाहारच्या नजीकचे प्रदेशांत खिलजी व हिरातचे आसपास अब्दाली नांवाचे लोक राहत असत. ह्या अफगाण लोकांनीं इराण देशावर स्वाऱ्या केल्या. इराणांत सफवी वंशाचा हुसेनशहा राज्य करीत असतां महंमूद नांवाच्या अफगाण सरदारानें इस्पहान शहर हस्तगत करून हुसेनास कैद केलें आणि इराणचें राज्य बळकाविलें, (१७२२). परंतु हा अफगाण लोकांचा अंमल इराणदेशावर फार दिवस टिकला नाहीं. महंमूद सन १७२४ त मरण पावला; आणि त्याचा मुलगा अश्राफ् इस्पहानच्या तख्तावर अधिष्ठित झाला. ह्याच वेळीं उत्तरेकडून रशिया, पश्चिमेकडून तुर्क व पूर्वेकडून अफगाण हे तिघे इराण देश गिळून टाकण्याच्या बेतांत होते. उत्तरेकडे रशियांत ह्या वेळेस पराक्रमी पीटरराजा राज्य करीत होता. शहाहुसेन अफगाणांच्या हातांत सांपडला, त्या वेळेस त्याचा मुलगा तह्मास्प ईशान्येकडील पहाडी प्रदेशांत जाऊन स्वतंत्रतेनें राहूं लागला होता. त्यानें रशिया व तुर्कस्तान येथील बादशहांच्या मागण्या कबूल करून त्यांच्याशीं सख्य जोडिलें होतें. पण त्याचा विशेष उपयोग झाला नाहीं. पुढें कास्पियन समुद्राच्या कांठावरील काजार नामक तुर्क टोळीच्या एका सरदारानें तह्मास्प यास मदत केली. हाच नादिरकुली होय. हाच पुढें

नादिरशहा म्हणून प्रसिद्धीस आला. नादिरचा बाप मेंढ्यांच्या चामड्यांचे कोट, टोप्या वगैरे करून विकीत असे. लहानपणापासून नादिरचें आयुष्य अनेक प्रकारच्या साहसांत गेलें होतें. सतरा वर्षांचा असतांना तो उझ-बेगांच्या कैदेंत सांपडला. तेथून सुटल्यावर तो लुटालूट करून राहूं लागला. इकडे अफगाणांनीं इराण देश काबीज केला, त्या धामधुमींत कांहीं लोक जवळ बाळगून नादिरनें हिरातचा किल्ला हस्तगत केला; आणि त्याचा चुलता तेथील अंमलदार होता, त्यास त्यानें ठार मारलें. हिरात येथें राहून तो शहा तह्मास्प् यास मदत करूं लागला. प्रथमतः इराणी लोकांस पाठवून त्यांच्या ठिकाणीं त्यानें आवेश उत्पन्न केला; आणि सन १७३० च्या सुमारास अफगाण लोकांचा पराजय करून त्यानें शहा तह्मास्प् यास इस्पहान येथें नेऊन त्याच्या तख्तावर स्थापिलें. त्याच्या राज्यांत स्वस्थता करून, रशियानें कास्पियन समुद्राच्या पुढें येऊं नये असा बंदोबस्त केला. आरब व तुर्क ह्या लोकांचें पाऊल पुढें पुढें येत होतें, तें त्यानें मागें हटविलें. येणेंप्रमाणें अनेक युद्धप्रसंग करून पांच वर्षांच्या आंत इराणचे राज्याची हद्द त्यानें प्राचीन काळीं होती तितकी विस्तृत केली. स. १७३६ त शहा तह्मास्प् यास बाजूस सारून इराणचें राज्य त्यानें स्वतः बळकाविलें, नादिर हा सुनी मताचा असून इराणदेश पूर्वीपासून पक्का शियापंथी होता, इराणचें राज्य स्वीका-रिल्यावर त्यानें थोड्याच दिवसांत बहुतेक लोकांस सुनी पंथ स्वीकारण्यास भाग पाडिलें. स. १७२७ त त्यानें अफगाणिस्तानदेश जिंकून इरा-णास जोडिला, आणि अफगाणांनीं जे अनर्थ केले होते, त्यांचा पुरेपूर सूड उगविला. तथापि पुढें सौम्यवृत्ति धारण करून त्या लोकांचा त्यानें इतका फायदा करून दिला, कीं ते त्याजकरितां जिवास जीव देण्यास तयार झाले. ह्याप्रमाणें नादिरची सत्ता व अंमल हीं फार वाढलीं, आणि त्याच्या राज्याची हद्द मोगल राज्यास भिडली. हिंदुस्थानांत ह्या वेळेस मोठी गडबड चालली आहे हें त्यास कळलें. हिंदुस्थानावर स्वारी केली असतां (१) आपल्या गरीब व शूर शिपायांस आयतें काम मिळून, (२) हिंदुस्थानच्या संपत्तीनें इराणची गरिबी भरून काढितां येईल, आणि (३) हिंदुस्थानांतील अव्यवस्थाही मोडेल, असे हेतु मनांत भरून त्या कृत्यास कांहीं तरी सबब तो शोधूं लागला. ती सबब मिळ-

ण्यासही फारसा वेळ लागला नाहीं. नादिरच्या ताब्यांतील कित्येक अफगाण लोक गज्नीनजीक मोगल राज्यांत जाऊन राहिले होते. त्यांस परत देण्याविषयीं नादिरशहानें दिल्लीच्या बादशहास लिहिलें. ती मागणी कबूल करण्याइतकें बादशहाचें सामर्थ्य नव्हतें; आणि अशी मागणी करण्याइतका नादिरशहास अधिकार आहे असेंही त्यास वाटत नव्हतें. म्हणून दिल्लीहून त्या पत्राचा कांहींच जबाब गेला नाहीं. तेव्हां नादिरशहा एकदम मोगलांच्या मुलुखावर चालून आला; आणि गज्नी, काबूल इत्यादि शहरें काबीज करून, होड्यांच्या पुलावरून सिंधुनदी उतरून अलीकडे आला. मराठ्यांच्या व्यवहारांत बादशहा गुंतला असल्यामुळें, त्यास नादिरशहाकडे लक्ष देण्यास सवड झाली नाहीं. रस्त्यांत नादिरशहास कोठेंच प्रतिबंध झाला नाहीं. पंजाबांतील फौज पराभव पावून परत आली, तेव्हां बादशहा आपलें लष्कर जमवून बाहेर पडला. निजामुल्मुक त्यास मिळाला. अयोध्येचा सुभेदार सादतखान यासही बोलावणें गेलें. कर्नूळ येथें मोगल फौजेचा तळ पडला. ह्या प्रसंगीं रजपूत राजांनीं बादशहास मदत केली नाहीं. सादतखान व निजाम हेही आंतून बादशहाशीं अनुकूल नव्हते. १७३९ च्या फेब्रुवारी महिन्यांत मोगल बादशहा व नादिरशहा ह्यांची खडाजंगीची लढाई होऊन वजीर-खानडौरान मारला गेला, आणि सादतखान कैद झाला. तेव्हां निजामास नादिरशहाकडे बोलणें करण्यास पाठवून मागाहून महंमदशहा स्वतः नादिर-शहाच्या छावणींत जाऊन त्यास भेटला. नंतर ते दोघे बादशहा दिल्लीस राजवाड्यांत येऊन राहिले. नादिरशहानें सर्व शहरांत आपले पहारे बस-विले, आणि नीट बंदोबस्त ठेवण्याबद्दल सक्त ताकिदी दिल्या. दिल्लीच्या लोकांस हें करणें आवडलें नाहीं. दोन दिवस जिकडे तिकडे शांतता होती. तिसऱ्या दिवशीं नादिरशहा मेला अशी खोटीच गप्प शहरांत पसरली; त्याबरोबर दिल्लीचे लोक इराणी लोकांचे खून करीत सुटले. तेव्हां नादिर-शहा संतापून शहरांत फिरण्यास गेला, तेथें इराणी लोकांचीं प्रेतें त्याच्या दृष्टीस पडलीं; आणि फिरत असतां लोकांनीं आपल्या घरांतून त्याजवर गोळ्यांचा वर्षाव सुरू केला. एक गोळी जवळच्या एका उम-रावास लागून तो मरण पावला, तेव्हां अतिशय त्वेष येऊन नादिरशहानें दिल्लींतील सर्व लोकांची कत्तल करण्याविषयीं आपल्या लोकांस हुकूम

सोडिला. त्या वेळीं जे अनर्थ त्या राजधानीवर कोसळले, ते ऐकूनही अंगावर रोमांच उभे राहतात. इराणी लोकांनीं सर्व शहर जाळून लुटून फस्त केलें. प्रेतांचे ढीग व रक्ताचे पाट ह्यांनीं सर्व रस्ते भरून गेले. तीस हजारांहून ज्यास्त माणसें प्राणांस मुकलीं. सर्व संहार होतो असें पाहून, महंमदशहा डोळ्यांत पाणी आणून नादिरशहाकडे गेला, आणि हा प्रकार बंद करण्याविषयीं त्यानें त्यास विनंति केली. 'हिंदुस्थानच्या बादशहाची मागणी विफल जाणार नाहीं,' असें म्हणून कत्तल बंद करण्याचा नादिरशहानें हुकूम दिला. तो एकदम अमलांत आला. पुढें दोन महिनेपर्यंत दिल्ली शहरांत नादिरशहानें लूट करविली. बादशहापासून यःकिश्चित् झोपडीवाल्यापर्यंत ह्या लुटींतून कोणी सुटला नाहीं. सादतखान आरंभापासून त्यास मिळून होता. त्याजकडेही पैशाची मागणी होतांच त्या सरदारानें विष घेऊन प्राणत्याग केला. नादिरशहाच्या हातास किती मत्ता लागली, तें बरोबर सांगतां येत नाहीं. नऊ कोटींपासून तीस कोटी रुपयांपर्यंत निरनिराळ्या ग्रंथकारांनीं निरनिराळा अदमास केला आहे. शिवाय दिल्लींतील मयूरासन व कोह्-इ-नूर हिरा हीं नादिरशहानें इराणास नेलीं. जातांना त्यानें महंमदशहास बादशाही पदावर स्थापिलें, आणि त्यास अनेक प्रकारचा चांगला उपदेश केला. 'बादशहाविरुद्ध बंड कराल, तर मी पुनरपि येऊन तुमचा संहार करीन,' अशी सर्व लोकांस जाहीर दहशत घालून, आणि दिल्लीच्या एका राजकन्येशीं आपल्या मुलाचें लग्न लावून, नादिरशहा इराणांत परत गेला. जातांना सिंधुनदीच्या पश्चिमेकडील सर्व मुलूख त्यानें आपल्या राज्यास सामील केला. पुढें मध्यआशियांतील राज्यें त्यानें जिंकिलीं. हिंदुस्थानांत केलेल्या दुष्ट कृत्यांमुळें नादिरशहाचा स्वभाव फारच निष्ठुर बनला. उत्तरोत्तर तो आपल्या लोकांस इतका छळूं लागला, कीं त्यांच्या मनांतील त्याजवरची भक्ति नाहींशी झाली. प्रत्यक्ष आपल्या पराक्रमी मुलाचे त्यानें डोळे काढिले, (स. १७४३). शियाधर्मी इराणी लोकांस तर कोठेंच थारा राहिला नाहीं. अखेरीस त्याचे आवडते अफगाण लोकही त्यास कंटाळले. असें होतां होतां एका अफगाण सरदाराच्या हातून त्याचा खून झाला, (सन १७४७). नंतर त्या अफगाण लोकांतील अहंमदखान अब्दाली नामक सरदारानें आपल्या

लोकांचा पुढारीपणा स्वीकारून इराणचे ताब्यांतून अफगाणिस्तानचा मुलूख सोडवून कंदाहार येथें आपणास राज्याभिषेक करून घेतला. त्यानें आपलें अब्दाली हें नांव फिरवून दुराणी असें असें नांव धारण केलें. हाच पानिपतावर प्रसिद्धीस आलेला अहंमदशहा अब्दाली होय. नादिरशहा हा फार परक्रमी पुरुष होऊन गेला. त्याचा जन्म हलक्या कुळांतला असून त्यास विद्याही कांहीं येत नव्हती. परंतु नशिबाच्या व अकलेच्या जोरावर अनेक राज्यांची उलथापालथ करण्याचें त्यास सामर्थ्य आलें. ‘ त्याजविषयीं त्याचे लोक गर्व वाहतात, परंतु त्याचें नांव घेतांच ते कांपतात व त्यास शाप देतात. ’

नादिरशहाच्या स्वारीनें मोगलांच्या सत्तेस विलक्षण धक्का बसला. दिल्लीशहरांत आज अनेक शतकें वास करीत असलेली लक्ष्मी क्षणमात्रात नाहींशी झाली. ‘ निद्रा व विश्रांति हीं शहरांतून पळून गेलीं; प्रत्येक घरांत व खोलींत दुःखाचे उसासे ऐकूं येऊं लागले; आणि सर्व उत्तरहिंदुस्थान शोकसागरांत बुडून गेलें. ह्या विपत्तींतून मोगलांनीं आपलें डोकें वर काढिलें नाहीं.

९. प्रांतिक अंमलदारांचें स्वातंत्र्यधारण.—नादिरशहानें सिंधुनदीच्या पश्चिमेकडील मुलूख घेतल्यामुळें, अफगाणिस्तानांतील मोगल सत्ता नष्ट झाली. दक्षिणेंत निजामुल्मुल्क् स्वतंत्र राज्य करूं लागला. महाराष्ट्र, गुजराथ, माळवा, वऱ्हाड इत्यादि अनेक प्रांत मराठ्यांनीं घेतले. रजपूत राजे कायमचे स्वतंत्र झाले. पंजाबप्रांत शीखांनीं घेतला. ह्या हकीगती वर येऊन गेल्याच आहेत. परंतु ह्या कार्किर्दीच्या अखेरीस दुसरे दोन मोठे प्रांत बादशहाच्या ताब्यांतून गेले, ते बंगाल व अयोध्या हे होत. कर्नाटकप्रांतावर निजाम व मराठे आपला हक्क सांगत होते. शिवाय जाठ व रोहिले यांनींही बादशाही मुलुखावर हात मारून घेतला. सारांश, सर्व देशांत एकछत्री अंमल कांहीं दिवस चालून पुनः त्याचे विभाग व्हावयाचे, हा जो क्रम अनेक वेळां मुसलमान रियासतींत दिसून आला, तोच मोगलांच्या अखेरीस खरा ठरून, ज्या स्वतंत्र शाखा ह्या वेळीं अस्तित्वांत आल्या, त्यांच्याशींच पुढें येणाऱ्या इंग्रजांचे बहुतेक झगडे झाले आहेत. म्हणून मोगल बादशाहीची हकीगत संपविण्यापूर्वी ह्या स्वतंत्र शाखांचें थोडेसें वर्णन करणें अवश्य आहे.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

(१) बंगालप्रांत (अ) मुर्शीद् कुलीखान.—मोगल बादशाहीचे तुकडे झाले, त्यांत बंगालप्रांताचा इतिहास अनेक कारणांनीं महत्त्वाचा आहे. हा प्रांत मूळपासून सधन होता. इंग्रज व्यापाऱ्यांस धनप्राप्ति विशेषतः ह्याच प्रांतांत झाली. उत्तरमोगलशाहींत बंगालप्रांताचा इतिहास मुसलमानी भाषेंत विशेष विस्तारानें लिहिलेला आहे. शिवाय हॉल्वेलनें त्या काळची बंगालप्रांताची पुष्कळ माहिती लिहून ठेविली आहे. औरंगजेबाच्या उत्तरकार्किर्दींत बंगालच्या रयतेवर धर्मसंबंधीं जुलूम अतोनात झाला. तेथच्या सुभेदारानें बादशहाचे हुकूम अक्षरशः अमलांत आणिले. पुष्कळांनीं मुसलमानी धर्म घेतला; आणि अनेकांनीं बंडें केलीं. तेव्हां औरंगजेबानें तेथच्या सुभेदारास परत बोलावून आपला नातू अजीमउश्शान यास बंगाल, बहार व ओरिसा या तीन प्रांतांच्या निजामीचें काम दिलें; तसेंच मीरजाफरखान या नांवाचा एक मूळचा हिंदु असून बाटून मुसलमान झालेला गृहस्थ होता, त्यास त्या प्रांतांची दिवाणी दिली. अजीमचा कारभार विशेष ध्यानांत ठेवण्याजोगा झाला नाहीं. तो बहुधा चैनबाजींत निमग्न असे. जाफरखानानें औरंगजेबाची मर्जी अनेक प्रसंगीं संपादिली होती. खर्च कमी करून वसूल वाढविण्याविषयीं त्याची ख्याति होती. पूर्वीं तो वऱ्हाडांतील लहानशा कामावरून हैदराबादचा दिवाण झाला; आणि तेथून त्याची नेमणूक बंगाल्यांत झाली. अजीम व जाफरखान यांचें पटलें नाहीं. जाफरचा गुप्तपणें वध करण्याची अजीमनें तजवीज केली, ती फुकट गेल्यावरून त्यास जाफरखानाची क्षमा मागावी लागली. तरी जाफरनें औरंगजेबाकडे गाऱ्हाणें केलें. तेव्हां बादशहानें अजीम यास कारभारावरून काढून जाफरखानाकडे निजामी व दिवाणी अशीं दोनही कामें दिलीं, (१७०२); आणि त्याच वेळेस मुर्शीदकुलीखान असा त्यास किताब दिला. याच नांवानें तो पुढें प्रसिद्ध झाला. मुर्शीदचा कारभार बंगाल्यांत अनेक कारणांनीं चिरस्मरणीय झाला आहे. त्याचा अंमल अत्यंत करडा होता. सरकारचा वसूल गोळा करण्यांत तो यत्किंचित् दयामाया दाखवीत नसे. मुसलमानी धर्माची वृद्धि करण्याविषयीं त्यानें दीर्घ प्रयत्न केले. सारांश, स्वजातीयांनीं त्याच्या कर्तबगारीची अत्यंत तारीफ केली असून, विजातीय लोकांनीं मात्र त्यास नांवें ठेविलीं आहेत. तरी आपल्या कामांत हुशार व यजमानाच्या

कल्याणाविषयीं दक्ष, अशी त्याची कीर्ति आहे. इंग्रजांचें व त्याचें कधीं पटलें नाहीं. इंग्रज व्यापाऱ्यांनीं हिंदुस्थानच्या व्यापारावर सधन होऊन परत जावें हें त्यास खपलें नाहीं. तो त्यांच्या व्यापारास अतोनात अडथळे आणी. त्यांच्याच त्रासास कंटाळून स. १७१५ त फर्रुखसेयर बादशहाकडे इंग्रज व्यापाऱ्यांनीं कागाळी केली. तेव्हां त्यानें इंग्रजांस पुष्कळ सवलती दिल्या. मुर्शीदकुलीनें आपला सर्व कारभार चोख ठेवून सरकारचें उत्पन्न पुष्कळ वाढविलें. महसुलाचा पैसा तो बादशहाकडे नियमितपणें रवाना करी. यावरून बंगालप्रांतांत त्याच्या कार्किर्दीस स्वतंत्र राज्य झालें असें म्हणतां येत नाहीं. त्यानें प्रांतांतील मुलुखाचे निरनिराळे भाग करून त्यांस चकले असें नांव दिलें. *त्या प्रत्येक भागावर त्यानें वेगवेगळे अंमलदार नेमिले. हीच व्यवस्था कायम राहून त्यानें नेमिलेल्या अंमलदारांकडचीं कामें वंशपरंपरेनें चालू राहिलीं; आणि तेच लोक आपणास जमीनदार राजे असें म्हणवूं लागले,* अद्यापिही हे जमीनदार राजे आपलीं वतनें बंगालप्रांतांत उपभोगीत आहेत. मुर्शीदकुलीखान १७२५ त मरण पावला. मुर्शीदाबाद हें गांव त्यानेंच वसविलें.

(आ) सुजाखान (१७२६–१७३९).—मुर्शीदकुलीस मुलगा नव्हता. फक्त एक मुलगी होती. ती सुजाखान नांवाच्या तुर्क गृहस्थास दिली होती. मुर्शीदच्या हयातींत सुजाखानाकडे ओरिसा प्रांताचा कारभार होता. तो आपल्या बायकोसह कटक येथें राहत असे. परंतु त्याच्याशीं तिचें पटलें नाहीं; आणि ती लवकरच निघून बापाकडे आली. तिच्या पोटीं सर्फराजखान नांवाचा एक मुलगा सुजाखानास झाला होता. तो आपल्या आजाजवळ राही. सुजाशीं मुर्शीदचा द्वेषभाव असून, सर्फराजखानावर त्याची मर्जी होती. आपल्या पाठीमागून आपल्या जागीं सर्फराजखानाची नेमणूक दिल्लीदरबारनें करावी, अशी पुष्कळ खटपट मुर्शीदकुलीनें केली. परंतु ती सिद्धीस जाण्यापूर्वीं तो मरण पावला, आणि त्याची सर्व धनदौलत सर्फराजखानास मिळाली. इकडे सुजाखानानें बंगालचा कारभार मिळविण्याची संपूर्ण तयारी केली, आणि एकाएकीं निघून तो मुर्शीदाबादेस आला. सर्फराजखान स्वतःस कारभार मिळेल अशी क्षणोक्षणीं मार्गप्रतीक्षा करीत बसला होता. नवीन कारभार मिळावयाचा म्हणजे बादशहाकडून झालर लाविलेली

पालखी, मत्स्यचिन्हधारी जरीपटका, इत्यादि सरंजाम येत असतो. तो सरंजाम सुजाखानाकडे आला. तदनुसार सुजाखानानें सुभेदारीपद धारण केलें, आणि त्याचा मुलगा सर्फराजखान त्यास शरण गेला. सुजाखानाजवळ हाजी महंमद व अलिवर्दीखान हे दोघे भाऊ होते. हाजी महंमद हा वडील असून कारस्थानी होता. सुभेदाराची मर्जी संपादन करून त्यानेंच सर्व कारभार चालविला. धाकटा अलिवर्दीखान हा मूळ-पासून शिपाईबाण्याचा असून त्याजकडे सर्व फौजेचा अखत्यार असे.

ह्या दोघां भावांशिवाय सुजाखानास दोन वजनदार हिंदु व्यापाऱ्यांची मदत होती. एक आलमचंद व दुसरा जगत्शेट. आलमचंद यास राय-रायण असा किताब असून त्यास सर्व कामांची चांगली माहिती होती. धन्याची मर्जी संपादून पैसा कसा संपादावा हें त्यास उत्तम अवगत होतें. जगत्शेट हा मुर्शीदाबाद येथील नामांकित व्यापारी असून त्यानें सुजाखानास पैशाचा मुबलक पुरवठा करून, त्यास सुभेदारी मिळवून दिली होती. सुजाखान हा स्वभावानें आळशी व ढिला होता. विशेष तंटेबखेडे न होतां कारभार सुरळीत चालावा, एवढीच त्याची इच्छा होती. मुर्शीदकुलीनें बसविलेले अनेक कर त्यानें माफ केले. परंतु वर सांगितलेल्या चौकडीवर सर्व कामें सोंपवून तो स्वतः चैनबाजींत राहूं लागला. त्यानें बहारप्रांताची व्यवस्था अलिवर्दीखान याजला सांगितली. ह्या सर्व गोष्टी पाहून सर्फराजखानाचें पित्त खवळून गेलें. सुजाखानाचा नाश करण्याविषयीं वर सांगितलेले दोघे मुसलमान कारभारी टपून बसले होते. त्यांनीं आपलीं कामें बाह्यतः चांगलीं करून प्रजाजनांची मर्जी संपादन करून ठेविली. अलिवर्दीखानानें बहारप्रांतांतील डोईजड राजांची पुरी खोड मोडिली. पाटणा व मोंगीर यांचे दरम्यान चकवार नांवाचे शूर हिंदुलोक राहत होते. त्यांच्यांशीं लढून अलिवर्दीखानानें पुष्कळ नवीन कर बसविले. ह्या चकवारांच्या भीतिस्तव किनाऱ्यावर राहणाऱ्या युरोपीय व्यापाऱ्यांना आपल्या बचावाकरितां आरमारें ठेवावीं लागलीं. कारण बरोबर फौजेचा जावता असल्याशिवाय, त्यांचा माल गंगानदींतून वर सुरक्षित जात नसे. अलिवर्दीखानानें अनेक कपटें करून चकवार लोकांचा निःपात केला. मध्यंतरीं पुष्कळदां त्याच्या अफगाण फौजेनें शिरजोरपणा दाखविला असतां, अलिवर्दीखानानें

कपटानें सर्वांचा मोड केला. इकडे दिल्लीदरबारांत लांच वगैरे भरून सुजाखानाच्या विरुद्ध त्याची खटपट चालूच होती शेवटीं सन १७३९ त दिल्लीहून परभारें अलिवर्दीखानाची नेमणूक बहारप्रांतावर स्वतंत्रतेनें झाली. तेव्हां सुजाखान पस्ताव्यांत पडला; आणि सूड घेण्याच्या विचारांत असतां एकाएकीं मरण पावला. हाजी महंमद यानें विषप्रयोग करून त्यास ठार मारिलें असें म्हणतात.

सुजाखान हा संक्रमणकालांतला पुरुष होय. मोगलांची राज्यव्यवस्था ढांसळली असूनही जुन्या प्रघातांच्या जोरावर अद्यापि पुष्कळ व्यवस्था चालू होती. मुर्शीदकुलीप्रमाणें सुजाखान हा जुलमी नव्हता. सर्व पक्षांस खुष ठेवण्याविषयीं तो विशेष जपत असे. कोणीही पाहुणा त्याजकडे आला, तरी त्याची तो उत्तम बर्दास्त ठेवी. एकंदरींत सुजाखानाचे कार्कीर्दीत लोक सुखी होते.

(इ) सर्फराजखान, (१७३९–१७४०).—सुजाखानाचे पश्चात् त्याचा मुलगा सर्फराजखान सुभेदार झाला. तो सर्वांशीं उद्दामपणानें वागे. बापाच्या वेळची चौकडी अधिकारावर ठेवूनही त्यांस त्यानें वाईट रीतीनें वागविलें. जगत्शेटाची त्यानें मानखंडना केली. अर्थात् जिकडे तिकडे सर्फराजविरुद्ध गुप्त बेत चालूं लागले. अलिर्दीखानास सुभेदाराची पदवी देण्याची खटपट सर्व लोक करूं लागले. ह्या प्रसंगीं दिल्लीहून सर्फराजखानास पाठबळ मिळण्याचा संभव नव्हता. नादिरशहाच्या स्वारीपासून दिल्लीदरबारांत कांहींच अर्थ उरला नव्हता. दोघां हिंदु सावकारांच्या सल्ल्यानें सर्फराजखानानें हाजीखान यास दरबारांतून घालवून दिलें; तेव्हां अनायासें तो आपल्या भावास जाऊन मिळाला. तेथें उभयतां बंधूंनीं पुढील कृत्याची सर्व सिद्धता केली; आणि दोघेही सर्व फौजेनिशीं मुर्शिदाबादेवर आले. रस्त्यांत अलिवर्दीखानाची अफगाण फौज पैशाकरितां त्याजवर उठली. ह्या प्रसंगीं उमीचंद (उमेशचंद्र) नांवाचा सावकार अलिवर्दीखानाच्या फार उपयोगीं पडला. पुढें क्लाइव्हशीं ज्याचा व्यवहार घडला, तोच हा उमीचंद होय. त्यानें विलक्षण फसवणुकीनें अफगाण सरदारांची समजूत केली. पुढें लढाई होऊन सर्फराजखान मारला गेला आणि बंगालची सुभेदारी अलीवर्दीखान यास मिळाली, (१७४०). ह्या कामांत मुस्तफाखान नांवाच्या अफगाण

सरदाराचें त्यास साहाय्य होतें. आलमचंदराय यानें आपला यजमान सर्फराजखान याच्याशीं विश्वासघात करून अलिवर्दीखानास साह्य केलें, म्हणून त्या हिंदु सावकाराची सत्यनिष्ठ बायको त्यास इतकें कठोर बोलली, कीं त्यानें हिरकणी खाऊन प्राण दिला. अलिवर्दीखानाची कार्कीर्द ब्रिटिश रियासतींत पाहवी.

(२) अयोध्या.—अयोध्याप्रांत मोगलबादशाहीचा एक मोठा सुभा होता. महंमदशहानें त्या सुभ्याचें काम सादतखान नामक एका हुशार सरदाराकडे दिलें. हा सादतखान मूळचा खुरासान येथील एक व्यापारी असून, दिल्लीच्या दरबारीं प्रसिद्धीस आला होता सय्यदांच्या विरुद्ध महंमदशहास त्यानें मनापासून साह्य केल्यामुळें बादशहाची त्याजवर मर्जी होती. पुढें त्या कार्किर्दीतील अनेक मोहिमांत तो हजर असे. त्यानें आपल्या प्रांताचा कारभार बहुतेक स्वतंत्रपणें केला. नादिरशहाच्या स्वारींत निजामुल्मुल्कचा पाडाव करण्याच्या हेतूनें त्यानें कांहीं कपट केलें, आणि अंतस्थपणें तो नादिरशहास मिळून होता. कोणीकडून स्वतःचे द्रव्यास नादिरशहानें धक्का लावूं नये इतकाच त्याचा उद्देश होता. पण तो तडीस गेला नाहीं. शेवटीं नादिरशहानें त्याचें सगळें द्रव्य हिरावून घेतलें, आणि त्याची अत्यंत मानखंडना केली. तेव्हां त्यानें विषप्राशन करून आत्महत्या केली, (१७३९). त्याचा मुलगा सफ्तरजंग हा बापाचे पश्चात् अयोध्येचा सुभेदार झाला. त्यानें कांहीं दिवस बादशहाच्या वजिरीचें काम केलें. त्यावरून अयोध्येच्या सुभेदारास वजीर ही संज्ञा प्राप्त होऊन तीच पुढें पुष्कळ दिवस चालू राहिली. सफ्तरजंग सन १७५४ त मरण पावला. नंतर त्याचा मुलगा सुजा-उद्दौला अयोध्येचा सुभेदार झाला. सुजा-उद्दौल्याची हकीकत इंग्रजांचे भागांत येईल. हा स्वतंत्र झालेला अयोध्येचा सुभा परत दिल्लीच्या अंमलाखालीं आणण्याबद्दल बादशहांनीं प्रयत्न केले, पण ते सिद्धीस गेले नाहींत.

(३) कर्नाटक.—कर्नाटकप्रांत दक्षिणच्या सुभ्याखालीं मोडत असे. तेथें चंदासाहेब व अन्वरुद्दीन यांजमध्यें तंटा लागून त्यांस अनुक्रमें फ्रेंचांचें व इंग्रजांचें साहाय्य मिळालें, व तेणेंकरून पाश्चात्यांचा दक्षिण-हिंदुस्थानांत प्रवेश झाला, ती हकीकत ब्रिटिश रियासतींत आली आहे.

४. **महंमदशहाचा मृत्यु, (सन १७४८).**—ह्या दुर्दैवी बादशहास स्वस्थपणा कसा तो मुळींच मिळाला नाहीं. नादिरशहाच्या स्वारीनें बादशाहीचीं गात्रें अगदीं बधिर झाल्यासारखीं झालीं. इकडे मराठे लोक सर्व देश पादाक्रान्त करीत चालले होते. जरी अनेक मुसलमान सरदार प्रांतांचा कारभार स्वतंत्रतेनें करूं लागले असें वर सांगितलें आहे, तरी बादशहाची मुख्य सत्ता हिरावून घेणारे त्याचे मोठे शत्रु मराठेच होते. बादशहा हें नांव मात्र त्यांनीं नाहींसें केलें नाहीं. तथापि वस्तुतः हिंदुस्थानच्या कारभारांचीं मुख्य सूत्रें मराठ्यांनीं बरेच दिवस खेळविलीं.

स. १७४८ त अफगाणिस्तानच्या अहंमदशहा अब्दालीनें हिंदुस्थानावर स्वारी केली; त्याजवर बादशहानें वडील शहाजादा अहंमद यास पाठविलें. सरहिंद येथें लढाई होऊन अहंमदनें अफगाणांचा पराभव केला आणि त्यांस स्वदेशीं घालवून दिलें. ह्या स्वारींत वजीर कमरुद्दीनखान, त्याचा मुलगा मीरमनु, व मीरमनूचा मेहुणा गाजीउद्दीन, आणि अयोध्येचा सुभेदार अब्दुल मनसूरखान उर्फ सफ्तरजंग इत्यादि सर्व सरदारांची शहाजाद्यास मदत होती. अशी संघशक्ति पुढें व्यक्त होती, तर बादशाहीचा बराच बचाव झाला असता. मीरमनु याजला पंजाबप्रांताचा कारभार मिळाला, तो त्यानें चांगला चालविला. इकडे दिल्ली शहरीं बादशहा आजारी पडून मरण पावला, (एप्रिल, सन १७४८). हा अत्यंत दुर्दैवी होता. नादीरशहाच्या स्वारीपासून कमरुद्दीनखान हा त्याचा वजीर होता. तो सरहिंदच्या लढाईत मारला गेला.

सन १७४८ हें वर्ष हिंदुस्थानच्या इतिहासांत महत्त्वाचें आहे. ह्याच वर्षी निजामुल्मुल्क् मरण पावला, आणि त्याच्या मुलांत तंटे उत्पन्न होऊन दक्षिणेंत युरोपियन लोकांचा प्रवेश झाला. पुढें थोड्याच दिवसांत शाहू राजा मरण पावला, व मराठ्यांच्या सत्तेस निराळें स्वरूप प्राप्त झालें.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

प्रकरण तिसावें.

अखेर.

स. १७४८–१८०३.

१. अहंमदशहा व रोहिल्यांचें बंड. २. दुसरा आलमगीर व नजीबखान.
३. अहंमदशहा अब्दालीच्या स्वाऱ्या. ४. अलीगौहर ऊर्फ शहाआलम.
५. नजीबखान, जाठ व मराठे. ६. शहाआलमची दिल्लीस स्थापना.
७. महादजी शिंद्याची मदत. ८. गुलामकादरचीं दुष्टकृत्यें.
९. दिल्लीच्या मोगल घराण्याचा पाडाव व शेवट.

१. अहंमदशहा व रोहिल्यांचें बंड.—शहाजादा अहंमद यानें सरहिंद येथें अहंमदशहा अब्दालीचा पराजय केला, तेव्हांच त्यास बापाच्या मृत्यूची वार्ता कळली. लगेच परत येऊन तो तख्तावर बसला. सफ्तरजंग यास त्यानें आपला वजीर नेमिलें. त्याच्या कार्किर्दीचा आरंभ चांगला झाला. पण त्याचें सुदैव फार दिवस टिकलें नाहीं. निजामुल्मुल्कचा वडील मुलगा गाजीउद्दीन हा अमीरउमराव ह्या किताबानें सेनापति झाला. त्याचा धाकटा भाऊ नासिरजंग याजला दक्षिणची सुभेदारी मिळाली. बादशहानें राज्यकारभारांत स्वतः लक्ष घातलें असतें, तर कदाचित् फायदा झाला असता; पण चहूंकडे शत्रु उपस्थित झाले असतां, तो विषयनिमग्न राहिला. दिल्लीच्या आसपास मराठे सरदार धिरट्या घालीतच होते. शिवाय रोहिलखंड व पंजाब ह्या दोन प्रांतांत विशेष गडबड उडाली.

गंगायमुनांच्या पूर्वेस हिमालयाच्या लगत्यास रोहिले नांवाचे सुनीपंथी अफगाण लोक बरेच दिवसांपासून वस्ती करून राहिले होते. बाबर बादशहास हिंदुस्थानच्या स्वारींत त्यांनीं मदत दिली असल्यामुळें, त्यांस त्या बादशहानें वर सांगितलेला मुलूख तोडून दिला, त्यावरून त्यास रोहिलखंड हें नांव प्राप्त झालें. हा मुलूख अयोध्याप्रांताच्या पश्चिमेस आहे. रोहिले लोक विशेष शूर व कडवे होते. त्यांचीं लहान लहान स्वतंत्र राज्यें असून मुख्य शहर बरेली होतें. अयोध्येच्या सुभेदारास त्यांची

NATIONAL ARCHIVES OF INDIA

विशेष भीति वाटत असे. तो स्वतः शियाधर्मी असून रोहिले अफगाण सुनीपंथाचे होते, म्हणून त्यांचें नेहमीं वांकडें होतें. अलीमहंमद नांवाचा रोहिल्यांचा एक पुढारी होता. महंमदशहा राज्य करीत असतां अली-महंमदनें रोहिलखंडांतील मोगल अधिकाऱ्यांस ठार मारून स्वतंत्र राज्य स्थापिलें, (१७४४). महंमदशहाच्या हातून त्याचा प्रतिकार झाला नाहीं. वजीर सफ्तरजंग यानें त्यास बराच त्रास दिला. सन १७४९त अली-महंमद मरण पावला. त्याचा मुलगा लहान होता, म्हणून दुंदीखान व रह्मतखान हे दोघे प्रसिद्ध सरदार त्याचा कारभार पाहूं लागले. रह्मत-खान हा 'हाफिझ् रह्मतखान' या नांवानें प्रसिद्ध आहे. रोहिल्यांचें पारिपत्य करण्याकरितां सफ्तरजंग बादशाही फौज घेऊन गेला, पण त्यांत रोहिल्यांनींच वजिराचा पराजय केला. तेव्हां शिंदे, होळकर व सुरजमल्ल जाठ या तिघांची मदत घेऊन वजिरानें रोहिल्यांचा नाश केला, आणि त्यास थेट उत्तरेकडील पहाडी प्रदेशांत हांकून लाविलें. ह्या मदतीबद्दल वजिरानें मराठ्यांस रोहिलखंडावरील चौथाईचा हक्क व त्यांतील कांहीं मुलूख कायमचा तोडून दिला. मराठे व रोहिले यांचें पुढें सतत वैर जुंपून अनेक रक्तपात झाले, त्याची ही सुरुवात होय.

अहंमदशहा दुराणीनें सन १७४८त पंजाबावर स्वारी केली असतां तींत त्याचा पराजय झाला. तथापि त्याचा कायमचा बंदोबस्त करण्या-पूर्वींच, महंमदशहा मरण पावल्यामुळें त्याचा मुलगा अहंमद यास हातचें काम अर्धेंच टाकून दिल्लीस परत यावें लागलें. अहंमदशहा अब्दालीनें सन १७५१ त पुनः पंजाबावर स्वारी केली, त्या वेळीं वजीर सफ्तरजंग रोहिल्यांशीं लढण्यांत गुंतला होता, तेव्हां बादशहानें लाहोर व मुलतान हे दोन परगणे अब्दालीस देऊन त्यास वाटेस लाविलें. ही गोष्ट वजीर सफ्तरजंग यास आवडली नाहीं.

बादशहाच्या दरबारची स्थिति आतां फार भयंकर झाली होती. सफ्तरजंग वजीर व गाजीउद्दीन ह्या दोघांचें वांकडें आलें, आणि दोघांचा युद्धप्रसंग होण्याचा समय आला. गाजीउद्दीन यास मरा-ठ्यांचें साह्य होतें. परशत्रूंपासून स्वतःचें संरक्षण करण्यास दर-बारास मराठ्यांचा उपयोग विशेष होत असे. तो उपयोग संपल्यावर ते रिकामे थोडेच बसणार! इतक्यांत दक्षिणची सुभेदारी आपल्या

भावापासून आपण मिळवावी, अशा उद्देशानें गाजीउद्दीन मराठ्यांचें साहाय्य घेऊन दक्षिणेंत गेला. तिकडेच पुढें त्याचा खून झाला, (सन १७५१). दक्षिणेंत जातेवेळीं त्यानें आपला सोळा वर्षांचा मुलगा शहाबुद्दीन यास दिल्लींत ठेविलें होतें. त्यासच पुढें गाजीउद्दीन व अस्मद्-उल्-मुल्क् असे किताब मिळाले. इतिहासांत तो दुसरा गाजीउद्दीन या नांवानें प्रसिद्ध आहे. पहिला गाजीउद्दीन दक्षिणेंत गेल्यानें वजीर सफ्तरंज ह्यास पुष्कळ हलकें वाटलें; पण त्याचा मुलगा बापापेक्षांही ज्यास्त कारस्थानी निपजेल हें त्याच्या लक्षांत आलें नाहीं. सफ्तरजंग सर्व सत्ता बळकावितो असें पाहून गाजीउद्दीननें मराठ्यांची मदत घेऊन वजिराशीं युद्ध आरंभिलें. निजामुल्मुल्क् व सादतखान यांजमध्यें अहंमदशहाच्या कार्किर्दींत झालेल्या युद्धाशीं या युद्धांचें बरेंच साम्य आहे. त्यांत सफ्तरजंगचा पराजय झाला. कमूरुद्दीनखानाचा जांवई इंतिज्म् उद् दौला ऊर्फ खानखानान यास बादशहानें आपला वजीर केलें. तेव्हां सफ्तरजंग हा शहाणपणा करून अयोध्याप्रांतांत स्वस्थपणें राहूं लागला. त्यास सुरजमल्ल जाठाचें साह्य होतें. येणेंप्रमाणें दोन पक्ष झाले. अशा प्रसंगीं बादशहानें एक कायमचा निश्चय करून एकाच पक्षाचा अवलंब केला असता तर निभाव लागला असता. पण त्यानें दोघांशींही सख्य दाखविल्यामळें त्याचा घात झाला. आंतून त्यानें जाठास पत्र लिहिलें आणि स्वत: गाजीउद्दीन यास मिळण्याकरितां म्हणून फौज घेऊन तो बाहेर पडला. बादशहाचें पत्र गाजीउद्दीनच्या हातांत पडलें. तेव्हां त्यास बादशहाचें कपट समजून गाजीउद्दीन त्याचा पाठलाग करीत दिल्लीस आला. होळकर व गाजीउद्दीन यांच्या फौजांनीं बादशहास दिल्लींत कोंडिलें. वजीर खानखानान यानें बादशहास सोडिलें, आणि बादशहानें गाजीची समजूत करण्याकरितां दरवाजे उघडून त्यास आंत घेतलें. गाजीनें वाड्यांत मोठा दरबार भरविला. आणि खालील भाषण केलें. 'ह्या बादशहास राज्य करण्याचें चातुर्य नाहीं. त्याच्यानें मराठ्यांचा बंदोबस्त होत नाहीं. मित्रांशीं त्यानें विश्वासघात केला आहे, तर याला पदच्युत करून तयमूरशहाचा दुसरा योग्य वंशज तख्तावर स्थापणें हेंच योग्य आहे.' हा बेत एकदम अमलांतही आला. गाजीउद्दीननें बादशहाचे डोळे काढून त्यास कैदेंत टाकिलें, आणि दुसऱ्या

एका राजपुत्रास आलमगीर असें नांव देऊन सिंहासनावर बसविलें, (जुलै, स.१७५४). त्याच वेळीं खानखानानची वजिरी जाऊन ती गाजी-उद्दीन यास मिळाली. ह्या वेळीं बादशाही अंमलाखालीं विशेष मुलूख राहिला नव्हता. दिल्लीच्या आसपास फारच थोडा प्रदेश उरला होता.

२. दुसरा आलमगीर व नजीबखान.—यास नांव मात्र औरंगजे-बाचें होतें, पण बिचाऱ्याचे हातांत काडीमात्र सत्ता नव्हती. गाजीउद्दी-ननें स्वतःच्या रक्षणाचा चांगला बंदोबस्त केला. अयोध्येचा सुभेदार सफ्तरजंग ह्याच सुमारास मरण पावल्यामुळें त्याचा एक शत्रु कमी झाला. खानखानान यास त्यानें अटकेंत ठेविलें. फौजेंतील लोकांनीं बंडावा केला, त्याजबद्दल कडक शिक्षा करून त्यानें चहूंकडे आपला वचक बसविला. बादशहासही त्याचा ताबा सोसेनासा झाला, यामुळें लवकरच दोघांचें बांकडें आलें.

येथून पुढें बादशाहीच्या इतिहासांत एका रोहिले कुटुंबाचें नांव फारच पुढें आलेलें आहे. त्यांचा मुख्य पुरुष नजीबखान होय. रोहिले पठाणांत दुंदीखान नांवाचा एक बडा सरदार होता, त्याचा नजीबखान हा जांवई. तो ह्या वेळच्या धामधुमींत प्रसिद्धीस आला. नजीबखान यास त्याच्या सासऱ्यानें रोहिलखंडांत थोडासा कारभार दिला. सफ्तरजंग व गाजी-उद्दीन यांचे भांडणांत, केव्हां याचा केव्हां त्याचा पक्ष स्वीकारून, तो प्रसिद्धीस आला. बादशहा अहंमदशहा व वजीर खानखानान यांजबरोबर युद्ध करितांना गाजीउद्दीनच्या हाताखालीं नजीबखान काम करीत होता. त्या धामधुमींत सहारणपूरनजीक कांहीं मुलूख त्यानें बळकाविला. गाजीउद्दीनजवळ राहून तो योग्यतेस चढला असतांही, गाजीचें व आलम-गिरचें पटेनासें झालें, तेव्हां तो बादशहाच्या पक्षास मिळाला, आणि त्या पक्षाच्या मदतीकरितां त्यानें अफगाणिस्तानचा अहंमदशहा अब्दाली यास हिंदुस्थानांत बोलाविलें. अहंमदशहा सन १७५७ त इकडे आला, तेव्हां नजीबखान उघडपणें त्यास जाऊन मिळाला.

३. अहंमदशहा अब्दालीच्या स्वाऱ्या, (तिसरी).—महंमदशहाचा वजीर कमरुद्दीनखान याचा मुलगा मीरमनु पंजाबांत होता. अहंमदशहा अब्दालीस लाहोर व मुलतान हे परगणे मिळाले, त्यांचाही बंदोबस्त त्या अफगाण बादशहानें मीरमनूकडेच सोंपविला होता. हा मीरमनु हुशार

असून सर्वांस त्याचा कारभार विशेष पसंत पडला, आणि त्यानें तिकडे उत्तम लौकिक संपादन केला. सन १७५४ चे अखेरीस मीरमनू घोड्यावरून पडून मरण पावला. तेव्हां अब्दालीनें पंजाबची व्यवस्था मीरमनूच्या विधवेकडे सोंपवून तिच्या अल्पवयस्क मुलास तो कारभार दिला. शिवाय अदिनाबेग नांवाचा दुसरा एक गृहस्थ त्या विधवेस मदतनीस नेमिलेला होता. अशी व्यवस्था सुरू असतां, वजीर गाजी-उद्दीनच्या मनांत पंजाबप्रांत परत घेण्याचें आलें. सन १७५५ त मीर-मनूच्या मुलीशीं लग्न करण्याच्या इराद्यानें तो पंजाबांत गेला. शहाजादा अलीगौहर हा त्याजबरोबर होता. मीरमनूच्या विधवेस व मुलीस छापा घालून त्यानें पकडिलें आणि पंजाबप्रांत परत घेऊन तो ताबडतोब दिल्लीस आला. ह्या कृत्याचा अब्दालीस त्वेष येऊन व नजीबखान रोहिल्यानें भर दिल्यावरून, तो जोरानें चाल करून कांहीं हरकत न होतां एकाएकीं दिल्लीपुढें आला. गाजीउद्दीन ह्यास मराठ्यांची मदत होती. मराठ्यांनीं आपलें ठाणें दिल्लींत कायमचें दिल्यामुळें दिल्लींतील उमराव जळफळत होते. गाजीउद्दीन यास काढल्याशिवाय मराठे हालत नाहींत, असें त्यांस वाटत होतें. त्यामुळें बरीच मंडळी एकदम अहमदशहा अब्दालीस जाऊन मिळाली. हिंदुस्थानचें सार्वभौम पद मिळविण्याची मराठ्यांची फार दिवसांची खटपट सफल होण्याचा योग नजीक आला होता; आणि हरप्रयत्न करून फार दिवस उपभोगिलेलें आपलें वैभव कायम राखावें, म्हणून एकंदर मुसलमान व विशेषतः कडवे अफगाण प्रयत्न करीत होते. ह्या अफगाणांच्या हातांत सत्ता जाणें गाजी-उद्दीन यास फायदेशीर नसल्यामुळें तो मराठ्यांचे बाजूस होता. अयोध्येचा सुभेदार शियाधर्मी असून अफगाणांशीं विशेष अनुरक्त नव्हता, म्हणून त्याचा ओढा बऱ्याच अंशीं मराठ्यांकडे होता. अफगाण अंमल हिंदु-स्थानांत चालू झाल्यास आपला निभाव लागणार नाहीं, हेंही तो जाणून होता. म्हणून होईल तितकें तटस्थ राहून स्वतःचा बचाव करण्याचा त्याचा इरादा होता. सारांश, ह्या अब्दालीच्या स्वाऱ्या म्हणजे हिंदु-स्थानच्या राज्यप्राप्तीबद्दल हिंदु व मुसलमान यांजमध्यें झालेल्या झग-ड्याची केवळ सुरुवात होय. या झगड्याचा निकाल पुढें चार वर्षांनीं पानिपतच्या समरभूमीवर व्हावयाचा होता. अब्दाली येतांच त्याजवर

५४-१५-११-१०—७९१—२०००

चालून जाण्याकरितां गाजीउद्दीननें नजीबखानास पाठविलें. परंतु तो तर उघड रीतीनें जाऊन अब्दालीस मिळाला. तेव्हां मात्र वजीर घाबरून गेला. अब्दालीनें दिल्ली सर करून बादशहास व गाजीस कैद केलें, (सेप्टेंबर ११, सन १७५७). गाजीउद्दीन यास आतां कांहीं उपाय राहिला नव्हता. त्यानें मीरमनूच्या मुलीशीं लग्न केलें होतें, तेव्हां सासूची मर्जी संपादन करून तिच्या मार्फत* त्यानें अब्दालीची माफी मागितली. परंतु विपुल लांच घेतल्याशिवाय अब्दाली गाजीस सोडीना. शेवटीं 'दुआबप्रांत लुटून आपणास भरपूर पैसा आणून देतों,' असें कबूल करून तो सुटला आणि दुआबांत निघून गेला. अब्दालीनें आपला सरदार जहानखान यास जाठांचा मुलूख लुटण्यास पाठविलें, आणि स्वतः दिल्लींत राहून, तेथें लूट व कत्तल करून अनर्थ उडविला. दुआबांतून गाजीनें थोडीबहुत लूट आणिली, परंतु जाठांनीं मात्र अफगाणांची पुरी खोड मोडिली. तसेंच आग्र्याच्या किल्लेदारानेंही अब्दालीस दाद दिली नाहीं. त्याचा सूड घेण्यासाठीं अब्दालीनें पुरातन व धनाढ्य क्षेत्र मथुरा याजवर मोर्चा फिरविला. त्या क्षेत्रावर एकाएकीं छापा घालून, हजारों ब्राह्मण, साधुसंत, तापसी, बैरागी, बायकामुलें, वगैरे जें जें पुढें आलें, त्यांची त्यानें कत्तल केली; लोकांचीं घरें व देवालयें लुटलीं; स्त्रियांची अप्रतिष्ठा केली; गाई मारून त्यांच्या रक्तानें देवांस स्नान घातलें.

दिल्लींतील लोकांच्या यातना तर अनिर्वाच्य आहेत. नादिरशहापेक्षां अब्दालीचे अफगाण ज्यास्त कडवे होते. शिवाय त्याची धनतृष्णा भागविण्याची लोकांची ताकदही सर्व खलास झाली होती. अब्दालीनें दोन महिने दिल्लींत मुक्काम केला; तितक्या अवधींत त्यानें लोकांस केवळ पिळून काढिलें. नंतर तो गंगेच्या कांठीं अनुपशहर येथें आपल्या छावणींत गेला, आणि तेथें त्यानें दिल्लीच्या राज्याची व्यवस्था केली. नजीबखानास त्यानें अमीर-उल्-उमराव नेमिलें. अमीर उल्-उमरावाकडे बाज्याची व फौजेची व्यवस्था असे. गाजी-उद्दीनला त्यानें वजिरी दिली, आणि आपला मुलगा तयमूरशहा यास पंजाबांत ठेवून, स्वतःचें व तयमूरशहाचें लग्न दिल्लीच्या दोन राजकन्यांशीं करून, तो स्वदेशीं गेला.

चवथी स्वारी.—अब्दाली गेल्यानें गाजी-उद्दीन यास आपल्या शत्रूंचा सूड घेण्यास चांगलें फावलें. आपल्या हातानें वाढविलेला नजीब-उद्दौला हा

त्याचा प्रमुख शत्रु होता. गाजीनें मराठ्यांच्या मदतीनें नजीबास त्याच्या अधिकारावरून काढून स्वदेशीं घालवून दिलें; आणि त्याच्या दुसऱ्या साथीदारांस प्रतिबंधांत ठेविलें.शहाजादा अलीगौहर मात्र त्याच्या तावडींतून सुटून पळून गेला.तो प्रथम सिकंद्रा येथें नजीबखानाकडे गेला,आणि तेथून लखनौस जाऊन सुजा-उद्दौल्याच्या मदतीनें त्यानें बंगाल्यांतील इंग्रजांवर आपला मोर्चा फिरविला. इकडे राघोबादादा मराठ्यांची मोठी फौज घेऊन उत्तरहिंदुस्थानांत आला. दिल्लींत त्यानें गाजीचा अंमल बसविला, आणि पंजाबांत जाऊन तयमूरशहास घालवून दिलें. मराठयांचा यशस्वी भगवा झेंडा त्यानें अटक येथें रोंविला, (सन १७५८). तिकडे दुसऱ्या एका मराठयांच्या फौजेनें नजीबखानासही त्याच्या मुलुखांत घालवून दिलें.

या गोष्टी ऐकून अहंमदशाहा अब्दालीचा राग अनावर झाला. हिंदुस्थानांतील मुसलमानांसही आपलें वैभव मराठे हिसकावून घेतात असें वाटून, सर्वांनीं मिळून एकमतानें अब्दालीचें साह्य करण्याचें मनांत आणिलें. नजीबखान व इतर सरदारांनीं अहंमदशहास बोलावणें पाठविलें. तेव्हां पंजाबचा बंदोबस्त चांगला ठेवून तेथेंच अहंमदशहास अडविणें व नजीबखानास कैद करून त्याचे कट फोडणें, या दोन महत्त्वाच्या गोष्टींविषयीं मराठयांनीं अगदीं हयगय केली. त्याचें फळ त्यांस मिळाल्याशिवाय राहिलें नाहीं. सन १७५९ त अहंमदशहा चवथ्यानें इकडे आला. एकामागून एक सर्व मराठयांचीं ठिकाणें त्यानें घेतलीं. तेव्हां गाजी-उद्दीन फारच घाबरला. त्यास काय करावें हें सुचेना. स्वतःचा बचाव करण्याकरितां त्यानें बादशहास एका साधूच्या दर्शनास म्हणून बाहेर काढून ठार मारविलें. पुढें दुसरा राजपुत्र सिंहासनावर स्थापून तो स्थिरस्थावर करणार, इतक्यांत अहंमदशहा येऊन पोंचला. तेव्हां गाजी-ऊद्दीन हा पळून जाठांचे मुलुखांत जाऊन राहिला. तेथून कांहीं दिवसांनीं तो दक्षिणेंत आला. परंतु निजामशाहींत त्यास थारा न मिळतां, तो रानोमाळ गरीब स्थितींत भटकत होता. सन १७९० त सुरत येथें तो इंग्रजांच्या पोलिस शिपायांस सांपडला. तेव्हां गव्हर्नर जनरलनें त्यास लहानशी नेमणूक करून मक्केस पाठविलें. तेथेंच पुढें तो मरण पावला. सय्यदांप्रमाणेंच गाजी-उद्दीनच्या उलाढाली मोठया जबरदस्त होत्या. पानिपतावर मराठयांस यश आलें असतें, तर कदाचित् त्याच्या कारस्थानांचा उपयोग झाला असता.

दुसऱ्या आलमगीरबरोबर मोगल बादशाहीचा अंत झाला, असें म्हणण्यास हरकत नाहीं. पण बंगाल्याकडे पळून गेलेला शहाजादा अलीगौहर ह्यानें शहाआलम असें नांव धारण करून पुष्कळ वर्षे कंठिलीं. त्याचें कष्टमय चरित्र सांगितलें म्हणजे मोगलबादशाहीचा इतिहास संपला.

४. **अलीगौहर ऊर्फ शहाअलम.**—फार दिवस चाललेल्या हिंदुमुसलमानांच्या युद्धाचा पानिपतच्या समरभूमीवर निकाल लागला. मराठ्यांचा संपूर्ण नाश होऊन, त्यांची सार्वभौम राज्यस्थापनेची खटपट व्यर्थ गेली. तथापि मराठ्यांच्या नाशानें मुसलमानांचा मात्र फायदा झाला नाहीं. मुसलमानांच्या शक्तीचाही पानिपतच्या युद्धांत निःपात झाला. अब्दालीनें स्वदेशीं परत जातांना शहाजादा अली गौहर यास निरोप पाठविला, कीं ' दिल्लीस येऊन तुम्हीं आपलें राज्य करावें. ' त्यानें नजीब-उद्दौल्यास अमीर-उल्-उमरावगिरी देऊन सुजा-उद्दौला यास वजिरी दिली; आणि गौहरचा मुलगा मीर्झा जवानबख्त याजकडे दिल्लीचें राज्य सोंपवून अब्दाली परत स्वदेशीं गेला. ह्यापुढें त्यानें हिंदुस्थानच्या कारभारांत ढवळाढवळ केली नाहीं.

शहाजादा अली-गौहर हा अयोध्येचा सुभेदार सुजा-उद्दौला याजकडे गेला असें मागें सांगितलेंच आहे. सुजा हा विशेष धोरणी व कार्यसाधु असल्यामुळें तो ह्या दुर्बल शहाजाद्याच्या नादास लागून स्वतःचें नुकसान करून घेणारा नव्हता. त्यानें त्यास साहाय्य दिलें नाहीं, तेव्हां शहाजादा अलाहबादेस गेला. अलाहबादचा परगणा महंमद कुलीखान नामक सुजाच्या एका नातलगाकडे होता. बंगालप्रांतांत त्या वेळेस इंग्रज व सुभेदार मीरजाफर यांजमध्यें कलह लागला होता. अशा संधीस बंगालप्रांताची सुभेदारी महंमद कुलीस देऊं करून, उभयतांनीं मिळून त्या प्रांतांत प्रवेश केला, (नोव्हेंबर १७५९). बहारप्रांतांत कनोटी गांवीं अली-गौहर यास आपल्या बापाचा खून झाल्याचें वर्तमान कळलें. लगेच ' शहा आलम ' असें नांव धारण करून तो आपणास बादशहा म्हणवूं लागला. सुजा-उद्दौला यास वजिरी देऊन नजीबखानास त्यानें सेनापतीचें काम दिलें. त्या वेळीं त्याचें वय ४० वर्षांचें होतें. तो देखणा व बांधेसूद असून मनाचा थोर व उदार होता. परंतु शौर्य व निश्चयाचें धाडस यापेक्षां दया व सहनशीलता हे गुण

त्याच्या ठिकाणीं विशेष असल्यामुळें अंतीं त्याचा घात झाला. शहाआलमनें बहारप्रांताचा कारभारी रामनारायण याचा पराभव केला, (१७६०). पुढें मुर्शिदाबादेवर जाण्याचा त्यानें दोन वेळां प्रयत्न केला, पण इंग्रज व मीरजाफर यांनीं त्यास पुढें येऊं दिलें नाहीं. चंद्रनगर येथील फ्रेंचांचा मुख्य मि. लॉ यानें बादशहास मदत केली. परंतु बादशहाच्या अनुयायांत एकवाक्यता नसल्यामुळें लॉ याचे प्रयत्नांस यश आलें नाहीं. तो म्हणतो, 'सुजाउद्दौल्यासारखी मंडळी मनापासून ह्या कामीं मला साह्य करतील, तर मी इंग्रजांस घालवून देईन; इतकेंच नाहीं, तर राज्याची सुव्यवस्था लावून देईन.' पाटणाशहर घेण्याचा प्रयत्न करीत असतां दोनदां बादशहाच्या फौजेचा मोड झाला. त्या वेळीं इंग्रजांचा सेनापति कप्टिन नॉक्स हा होता. इकडे महंमद कुलीखान हा अलाहबादेस परत गेला असतां सुजा-उद्दौला यानें त्यास ठार मारून तो प्रांत स्वतःकडे घेतला. स. १७६१ च्या आरंभीं इंग्रजांनीं बादशहाचा आणखी एक वेळ पराभव करून लॉ यास कैद केलें. तेव्हां इंग्रज व बादशहा यांजमध्यें सख्य होऊन तह ठरला. इंग्रजांनीं मीरजाफरास काढून मीरकासीम यास बंगालची सुभेदारी दिली होती. ह्या व दुसऱ्या अनेक कृत्यांस बादशहाची मंजुरी पाहिजे होती, म्हणून पाटणा येथील वखारींत जेवणाच्या मेजांचें एक लहानसें सिंहासन बनवून तेथें इंग्रजांनीं दरबार भरविला; आणि बादशहापासून जरूर ते करार करून घेतले, (सन १७६१). इंग्रजांनीं बादशहास बंगालप्रांताबद्दल २४ लक्ष रुपये खंडणी देण्याचें ठरलें. आपणास दिल्लीस नेऊन पोंचविण्याविषयीं बादशहानें इंग्रजांस निकड लाविली. परंतु त्यांनीं तें काम पत्करिलें नाहीं. इकडे पानिपतावर मराठ्यांचा नाश होऊन गाजीउद्दीनची भीति उरली नाहीं, तेव्हां शहाआलम याची दिल्लीस आणून स्थापना करावी, असे हुकूम अब्दालीनें सुजा-उद्दौला व नजीबखान यांस दिलेले ऐकून शहाजादा इंग्रजांस सोडून सुजाकडे गेला. सुजानें त्यास बनारस, अलाहबाद इत्यादि ठिकाणीं दोन वर्षें नादीं लावून ठेविलें. इतक्यांत मीरकासीम यासही इंग्रजांनीं काढून लाविल्यामुळें तो, व क्रूरपणांत बहादरी मिळविलेला त्याचा युरोपियन नोकर, वॉल्टर रेन्हार्ट ऊर्फ सुमरू, असे दोघे सुजास मिळाले. त्या सर्वांनीं स. १७६४ त बहारप्रांतांतील पाटणावर स्वारी

केली. परंतु बक्सार येथें निकराची लढाई होऊन बादशहाचा पराभव झाला, (ऑक्टोबर १७६४). पुढें इंग्रज व बादशहा यांचा तह ठरला. बादशहानें बंगालप्रांताची दिवाणी इंग्रजांस दिली. इंग्रजांनीं कुरा व अलाहबाद हे अयोध्येच्या वजिराचे परगणे बादशहाकडे परभारें दिले. सुजास ही व्यवस्था न आवडून त्यानें मराठे व रोहिले यांची मदत घेऊन पुनरपि बंगालवर स्वारी केली. परंतु इंग्रजांनीं त्यास दाद दिली नाहीं. इतकेंच नाहीं तर उलट अयोध्येचा मुलूखही ते काबीज करितात कीं काय, अशी सुजास भीति पडली; तेव्हां त्यानें बादशहाबरोबर झालेल्या तहास मुकाट्यानें कबुली दिली, (१७६५). येणेंप्रमाणें इंग्रज कंपनी बादशहाची नोकर बनली, (पहा ब्रि. रि. प्रकरण २३).

या वेळेपासून बादशहा अलाहबाद येथें राहूं लागला. त्यास दिल्लीस नेऊन पोंचविण्याचें धाडस सुजा करीना. ह्या वेळीं मीर्झा नजफ्खान नांवाचा एक सत्यनिष्ठ इराणी सरदार बादशहाजवळ होता, त्याचा बादशहास अखेरपर्यंत चांगला उपयोग झाला. तो पूर्वी महंमद कुलीचा दोस्त असून, इंग्रजांच्या शिफारशीवरून बादशहाजवळ नोकरीस राहिला होता. सालीना एकलाखाची नेमणूक देऊन कुरा प्रांताचा कारभार बादशहानें त्याजला सांगितला होता. सुजानें आपला मुलगा सादत-अली यास बादशहाची वजिरी दिली.

५ नजीबखान जाठ व मराठे.—बादशहा पूर्वेकडे हिंडत असतां, अब्दालीच्या व्यवस्थेप्रमाणें त्याचा मुलगा जवानबख्त व रोहिला नजीब-उद्दौला हे दिल्ली येथें राहून बादशहाची सत्ता कायम करीत होते. पानपतावरील घोर प्रसंगामुळें उत्तरहिंदुस्थानाकडे लक्ष देण्यास मराठ्यांस सवड झाली नाहीं. मराठ्यांचीं दुआबांतील ठाणीं नजीबनें एकामागून एक परत घेतलीं. त्याचप्रमाणें सुरजमल्ल जाठानेंही मराठ्यांचीं ठाणीं उठवून आपला अधिकार वाढविला. सुमरूनें ह्या सुरजमल्लाची नोकरी पत्करिली. आरंभींच नजीबखानास ह्या जाठांवर शस्त्र धरावें लागलें. कांहीं वेळ युद्धप्रसंग चालून नजीबच्या फौजेनें पुष्करनजीक एकाएकीं जाठांवर छापा घातला, आणि सुरजमल्लाचें शीर कापून आपल्या धन्याकडे नेलें. अशा कठीण प्रसंगीं जाठांनीं सुरजमल्लाचा मुलगा जवाहीरसिंह याजला आपला राजा करून, मल्हारराव होळकराशीं

स्वस्थ केलें. परंतु त्याचा उपयोग न होतां जाठांनीं नजीबखानाशीं तह केला. पुढें जवाहीरसिंहानें जयपूरचा राजा माधवसिंह याजवर स्वारी केली. परंतु त्या स्वारींत जवाहीरचा खून झाला; आणि पुढें जाठांचे राज्यांत बराच घोटाळा होऊन, कांहीं दिवसांनीं सुरजमल्लाचा शेवटचा मुलगा रणजितसिंह भरतपूरच्या गादीवर बसला. रणजितसिंहानें जाठांचें राज्य ऊर्जित दशेस आणिलें; आणि जिकडे तिकडे स्वस्थता केली.

स. १७६६त बादशहानें अलाहबादेहून मराठयांकडे बोलणें लाविलें, कीं आपणास दिल्लीस नेऊन तख्तावर बसवावें. बादशहाच्या ह्या कृतीनें इंग्रजांस विशेष धास्ती पडली. मराठयांनीं बादशहाचा पक्ष स्वीकारणें त्यांस अत्यंत हानिकारक वाटलें. पण त्या वेळेस मराठयांनाहीं ती कामगिरी उचलतां येईना. दिल्ली येथें नजीबखानासही पुष्कळ शत्रु उत्पन्न झाले होते, म्हणून त्यानें बादशहाकडे लक्ष दिलें नाहीं. स. १७६७ त शीखांनीं नजीबखानास विशेष त्रास दिला, तेव्हां अफगाणिस्तानच्या अहंमदशहानें त्यास मदत करून, शीखांस परत फिरविलें. ह्या वेळीं सुजाउद्दौल्यास अहंमदशहानें धमकी दिली. परंतु त्या धूर्त वज़िरानें ती जुमानिली नाहीं.

दक्षिणेंतील तंटे मिटल्यावर मराठे सरदार महादजी शिंदे व तुकोजी होळकर यांनीं सन १७६८ त उत्तरहिंदुस्थानांत प्रवेश केला. महादजी व नजीबखान रोहिला यांचें हाडवैर होतें. जाठांकडून खंडणी घेऊन रोहिलखंडांत धुमाकूळ उडवून व दुआबप्रांत हस्तगत करून मराठे सरदार दिल्लीवर आले. नजीबखानास कांहींच आधार उरला नव्हता. काळानेंच त्यास अभय देऊन सन १७७० त स्वतःचे पदरांत घेतलें, म्हणून तो महादजीचे तावडींतून सुटला; नाहीं तर अनेक विश्वासघातकी कृत्यांबद्दल त्या शूर मराठे वीरानें ह्या हिकमती पठाणाचा चांगलाच सूड घेतला असता. तशांत होळकराचें साहाय्य नजीबखानास असल्यामुळें त्याचा बराच बचाव झाला.

मुसलमानांच्या पडत्या काळांतील नजीबखान हा शेवटचा मुत्सद्दी होय. तो शूर, धोरणी, व चलाख होता. मुसलमानशाहीचा अभिमान धरून काफर मराठयांस वर चढूं न देण्याविषयीं त्यानें जबरदस्त खटपट केली. पानिपताचा घोर युद्धप्रसंग मराठयांवर त्याच्यामुळेंच आला.

नजीबसारखा पुरुष त्या वेळीं निपजला नसता तर, किंवा पूर्वी हातीं सांपडला असतां मराठ्यांनीं वेळींच त्याचा बंदोबस्त केला असता तर, दिल्लीस मराठशाहीची स्थापना खचित झाली असती, असें पुष्कळांचें मत आहे. इंग्रजांशीं सख्य ठेवून नजीबखानाच्या धोरणानेंच बादशहा वागता, तर मोगलशाहीचा उद्धार झाला असता, असें इंग्रज ग्रंथकारांचें म्हणणें आहे. नजीबखानाच्या खऱ्या योग्यतेविषयीं मराठी व इंग्रज ग्रंथकार यांजमध्यें मोठा वाद आहे. मराठी ग्रंथकारांनीं त्याजविषयीं एकही चांगला शब्द काढिलेला नाहीं; आणि इंग्रज ग्रंथकारांनीं उलट प्रकार केलेला आहे. इतक्या अत्यंत विरोधाची एकवाक्यता करणें कठीण आहे. तथापि दोनही लेखकांचे हेतु ध्यानांत धरले म्हणजे खरा प्रकार थोडाबहुत स्पष्ट होतो. मोगलशाही तर बुडालीच होती. पुढें राज्य कोणाचें होणार एवढाच प्रश्न होता. मराठ्यांस ह्या कामांत बहुतेक यश आलें होतें. इंग्रज पाठीमागें राहून साधेल तसा लाग साधीत होते. मराठे व इंग्रज ह्या दोघांसही राज्यस्थापनेच्या कर्तबगारीविषयीं आपापली खात्री वाटत होती. तेव्हां दोघांसही एकमेकांबद्दल अत्यंत वैरभाव वाटत होता यांत नवल नाहीं. इंग्रजांस नजीबखान पाहिजे होता व मराठ्यांस तो नको होता. नजीबखान असेल तर मराठे शिरजोर होणार नाहींत असें इंग्रजांस वाटे. हें ध्यानांत घेऊन नजीबखानाची खरी योग्यता ठरविली पाहिजे. एका इंग्रज ग्रंथकारानें नजीबखानाविषयीं खालील अभिप्राय दिला आहे. 'मोठेपणा व सौजन्य हे गुण एका व्यक्तींत वास करितात असें उदाहरण हिंदुस्थानांत फक्त नजीबखानाचें आहे. केवळ स्वतःच्या अंगच्या उत्तम शौर्यानें, प्रामाणिकपणानें व दृढनिश्चयानें तो पन्नास स्वारांच्या अंमलदारापासून प्रस्तुतच्या मोठेपणास चढला. त्याला लिहितां वाचतां वगैरे येत नव्हतें, तरी जगाचा अनुभव व अंगची हुशारी यांमुळें त्यास कांहीं कमी पडलें नाहीं. त्याच्या मनाचें औदार्य व दीलदारपणा यांनीं त्याचें हीन व हलकें कूळ झांकून गेलें होतें. हल्लीं त्याचें वय सुमारें ६० वर्षांचें असून तो दुखण्यानें जर्जर होऊन श्रमानें थकून गेला आहे.' (व्हेरेलस्ट्चें कोर्ट आफ् डायरेक्टरांस पत्र, मार्च २८, सन १७६८). नजीबखानाचे पश्चात् त्याचा मुलगा झबेता-

खान हा बापाचें काम पाहूं लागला, दुंदीखानही याच सुमारास मरण पावला. रोहिल्यांपैकीं हाफीझ् महंमदखान मात्र उरला होता.

६. शहाआलमची दिल्लीस स्थापना.—नजीबखान मरून गेला. त्याचा मुलगा झबेताखान यानें तर नेहमींची खंडणी सुद्धां बादशहास देण्याचें बंद केलें; इतकेंच नाहीं तर दिल्लींतील बेगमांशीं त्यानें कारस्थानें करून जनानखान्याची अमर्यादा केली. सुजाउद्दौला व इंग्रज हे बादशहास दिल्लीस पोंचविनात. तेव्हां नाइलाजास्तव मराठ्यांचें साहाय्य घेणें बादशहास भाग पडलें. मराठे व बादशहा यांचा तह ठरला, त्यांत दहालाख रुपये त्यानें मराठ्यांस द्यावे व मराठ्यांनीं बादशहास दिल्लीस पोंचवावें असें ठरलें. बादशहाचे कुरा व अलाहबाद हे परगणेही मराठ्यांचे मनांत घ्यावयाचे होते असें दिसतें. सन १७७१ च्या आरंभीं वरील कृत्याविषयीं बादशहानें कलत्यास वकील पाठवून इंग्रजांची सल्ला विचारिली. इंग्रजांनीं तर मराठ्यांची मदत स्वीकारणें अत्यंत अविचाराचें आहे, असें होईल तितक्या जोरानें त्यास परत कळविलें. सुजा-उद्दौला यानें मात्र त्यास आपली संमति दिली. मग त्यांत त्याचा काय उद्देश असेल तो असो. बादशहाबरोबर एक लहानशी फौज होती, तिचा मुख्य मेडॉक नांवाचा फ्रेंच गृहस्थ असून एकंदर सैनापत्य मीर्झा नजफ्खान याजकडे होतें. मे महिन्यांत बादशहा अलाहबाद सोडून निघाला. कुराप्रांताचे सरहद्दीपर्यंत इंग्रजांची एक टोळी त्यास पोंचविण्यास आली होती. तिच्या अंमलदारानें बादशहास पुनः बजाविलें, कीं 'मराठ्यांची संगत धरूं नका;' परंतु तो 'डोळे मिटून' पुढें गेला. डिसेंबर महिन्यांत पाटीलबावा महादजीस बरोबर घेऊन बादशहानें दिल्ली शहरांत प्रवेश केला. मोगलांच्या पूर्व वैभवाचा अनुभव घेतलेल्या मंडळींचीं मनें आपला बादशहा परत आलेला पाहून, त्या वेळीं आनंदानें भरून गेलीं. फार वर्षे वनवास भोगिल्यावर शहाआलम यास आपण बादशहा आहों असें एकदांचें वाटलें.

ह्या वेळीं आसपासच्या मंडळींचे कावे भिन्न भिन्न होते. त्यांजमध्यें मुसलमान व मराठे असे दोन तट असून, अहंमदशहा अब्दालीनें इतकी खटपट करून राखिलेली मुसलमानांची सत्ता पुढें चालू ठेवावी, आणि मराठ्यांचें वजन नाहींसें करावें, अशी मुसलमानपक्षाची उत्कट इच्छा होती.

मराठे तर पानिपतच्या आठवणीनें चवताळून आपल्या शत्रूंचा पुरेपूर सूड घेण्यास टपले होते. सुजा-उद्दौला व इंग्रज तटस्थ राहून आप-आपला लाग कसा साधतो हें पाहत होते. इकडे झबेताखान बादशहा-विरुद्ध दांडगाई करीतच होता. तेव्हां बादशहाच्या आगमनानंतर एक महिन्याच्या आंत मराठ्यांनीं त्यास झबेताखानावर शस्त्र धरण्यास लाविलें. ह्या स्वारींत बादशहाच्या पक्षाकडे मीर्झा नजफ्खान होता. हा जातीचा इराणी असून सुजा-उद्दौल्याचा नातलग होता. झबेताखानाचा पराभव होऊन तो पळाला आणि त्याचीं बायकामुलें बादशहाच्या हातांत सांपडलीं. त्या वेळेस झबेताखानाचा मुलगा गुलाम कादर याचें बादशहानें पुरुषत्व नाहींसें केलें असें म्हणतात. रोहिलखंडांतून मिळविलेली सर्वच लूट मराठ्यांनीं घेतली, आणि बादशहास कांहीं दिलें नाहीं, म्हणून त्यास राग आला. झबेताखानापासून दीडलाख दंड घेऊन त्यास मराठ्यांनीं त्याचे प्रांतांत परत पाठविलें. ह्या दंडाची रक्कम झबेताखानास सुजा-उद्दौला यानें कर्ज दिली. सर्व रोहिलखंड ह्या वेळेस मराठ्यांनीं काबीज केलें असतें, पण त्यास मीर्झा-नजफ्खान आड आला. पुढें रोहिले व सुजा-उद्दौला यांजमध्यें अनेक व्यवहार घडून शेवटीं युद्ध सुरू झालें. त्यांत इंग्रजांनीं विनाकारण सुजाचा पक्ष घेतला. ह्या रोहिला युद्धाची हकीकत इंग्रजांचे भागांत वॉरन हेस्टिंग्स्च्या कार्किर्दींत यावयाची आहे.

शिंद्याच्या मनांत बादशहाचा बंदोबस्त चांगला करावयाचा होता. परंतु मध्यंतरीं निराळेंच विघ्न आलें. पुण्यास माधवराव पेशवे मरण पावला व नारायणरावाचा खून झाला, तेव्हां दिल्लीकडील कामें निकडीचीं असतांहीं तीं अर्धवट टाकून, त्यास दक्षिणेंत परत यावें लागलें. तेणेंकरून नजफ्खान व झबेताखान यांच्या स्पर्धेमुळें उत्पन्न झालेलीं कारस्थानें जोरांत येऊन त्यांत बादशहाचा पक्ष दुर्बळ पडत चालला.

मराठे निघून गेल्याबर दिल्लींत निरनिराळ्या पक्षांमध्यें तंटे लागले. झबेताखान व नजफ्खान यांच्या वैरामुळें अनेक भानगडी उपस्थित झाल्या. झबेताखानानें शीखांची मदत घेतली. परंतु बादशहाच्या फौजेनें पानिपत येथें झबेताखनाचा पराभव केला. या लढाईंत बादशाही फौजेचें आधिपत्य मुमरूकडे होतें. त्यास सिर्धाना येथें बादशहानें जहांगीर दिली, (१७७७). सन १७७८ त बादशाहीं

फौजेनें शीखांवर हल्ला केला. त्या फौजेचें आधिपत्य शहाजादा जवानबख्त याजकडे होतें. शहाजादा पराभव पावून परत आला आणि शीखांस उत्तरेकडील मुलूख लुटण्यास सवड मिळाली. ह्या युद्धांत शीखांकडे पुढें प्रसिद्धीस आलेला रणजितसिंह हा लढत होता. परंतु पुढें मीर्झा नजफ्खानानें शीखांचा बराच चांगला बंदोबस्त केला. सन १७७८त सुमरू मरण पावला व सिर्धानाची जहागीर त्याच्या बायकोस मिळाली. ही बाई पुढें पुष्कळ प्रसिद्धीस आली. तिचा जन्म एका आरब गृहस्थापासून वेश्येच्या पोटीं झाला असून, ती बेगम सुमरू म्हणून इतिहासांत प्रसिद्ध आहे. सन १७८२ मध्यें शहाआलमचा साह्यकर्ता मीर्झा नजफ्खान मरण पावला. नजीबखानाचे पश्चात् नजफ्खान हा कर्तृत्ववान् पुरुष होता ह्यांत संशय नाहीं. त्याच्या मरणानें बादशहाची बाजू अगदींच खचली. पुढें अफ्रासियाब्खान म्हणून एक सरदार होता, तो बादशहाचा वजीर झाला. तो फार दिवस टिकला नाहीं. निरनिराळ्या सरदारांमध्यें खासगी तंटे एकसारखे चालू झाले.

७. महादजी शिंद्याची मदत.—सन १७८३त सालबाईचा तह होईपर्यंत मराठे दक्षिणेंत गुंतलेले होते. तो तह झाल्यावर महादजी विजेसारखा चमकत उत्तरहिंदुस्थानांत आला. ह्या वेळीं हिंदुस्थानांत त्यास फार महत्त्व प्राप्त झालें होतें. परंतु महादजीच्या नादीं बादशहानें लागूं नये, असें सांगण्याकरितां कलकत्त्याहून इंग्रजांचे वकील दिल्लीस आले. सन १७१५ त फर्रुखसेयर बादशहास डॉ. हॅमिल्टननें बरा केल्यानंतर दिल्लीस इंग्रजांचे वकील आले असे हेच होत. ते वकील येऊन पोंचण्याच्या अगोदरच मीर्झा शाफी नांवाचा सरदार वजीर झाला होता त्याचा खून झाला. पुढें अफ्रासियाब्खान व महंमद बेग हे दोन सरदार दिल्लींत मुख्य होते. अनेक संकटें आलीं, तेव्हां इंग्रज आपणास मदत करतील तर बरें, असें बादशहास वाटूं लागलें. गव्हर्नर जनरल हेस्टिंग्स्नें बादशहास साहाय्य केलें नाहीं असा त्याजवर पुढें आरोप आणण्यांत आला होता. परंतु महादजी शिंदे नुकताच इंग्रजांचा दोस्त झाला होता, म्हणून बादशहाचा पक्ष गव्हर्नर जनरलनें स्वीकारिला असता, तर महादजीस वैषम्य वाटून तो इंग्रजांचा शत्रु बनता. महादजीचें शत्रुत्व पत्करण्यापेक्षा बादशहाचे नादास न

लागणें बरें, असें हेस्टिंग्स् यास वाटलें तें योग्य होतें. शहाजादा जवानबख्त लखनौस जाऊन हेस्टिंग्स् यास भेटला. पण हेस्टिंग्स्नें महादजी शिंद्याकडे बोट दाखविण्यापलीकडे कांहीं केलें नाहीं. महादजी शिंदे त्वरेनें आम्र्यास आला. तेथें बादशहा त्यास जाऊन भेटला. त्याच संधीस अफ्रासियाब्खान मारला गेला; आणि महादजी शिंदे यास बादशहानें सर्व कारभार दिला. महादजीनें नांवाची वजिरी अयोध्येच्या सुभेदारास देऊन वकील इ मुत्लक पेशव्याच्या नांवानें घेतली; आणि स्वतः आपण पेशव्याच्या वतीनें दिल्लीस राज्याचा कारभार करूं लागला. बादशहाचे परगणे त्याच्या ताब्यांत आले, आणि आम्र्याचा किल्लाही त्यास मिळाला. त्याच संधीस झबेताखान मृत्यु पावला, आणि महादजी शिंदे सर्व उत्तरहिंदुस्थानांत प्रमुख झाला. सर्व मोगल सरदारही त्यास शरण आले. स. १७८४ त उत्तरहिंदुस्थानांत मोठा दुष्काळ पडला, त्यास संवत् वर्ष १८४० वरून 'चाळिसा' असें म्हणतात.

झबेताखानाचा मुलगा गुलाम कादर हा बादशहाच्या हातांत सांपडला होता, हें वर सांगण्यांत आलेंच आहे. त्याची सुटका केव्हां झाली तें कळत नाहीं. पण बाप मरण पावतांच तो आपल्या वतनाचा मालक झाला; आणि त्यानें आपणास 'नजब–उद्दौला हुशारजंग' अशी पदवी घेतली. हिंदुस्थानांतील अफगाण पठाणांमध्यें हा प्रमुख होता. महादजी शिंदे दुआबांत जाऊन बंदोबस्त करीत होता. त्याच्या मनांत बादशाहीची सुव्यवस्था लावावयाची होती. शहाजादा जवानबख्त लखनौस तेथच्या सुभेदाराकडे जाऊन राहिला होता, त्यास परत आणण्याविषयीं शिंद्यानें खटपट केली. ईस्टइंडिया कंपनीचा वकील मेजर प्रायर हा त्या वेळीं लखनौस होता. कंपनीस त्या वेळीं असें वाटत होतें, कीं शहाजादा आपल्या तंत्रानें चालत आहे, तोंपर्यंतच मराठ्यांपासून आपला बचाव होणें शक्य आहे. तो हातचा गेल्यास आपली धडगत होणार नाहीं. जोंपर्यंत शहाजादा मराठ्यांस मिळाला नाहीं, तोंपर्यंत मराठ्यांनीं केलेली व्यवस्था अपुरीच राहणार. असा विचार करून त्या वेळच्या अधिकाऱ्यांनीं आपली एक लहानशी फौज दुआबांत ठेविली; आणि शहाजाद्यास मदत करण्याचें अंगावर घेतलें. हा कावा महादजीस तेव्हांच समजला, आणि स्वसंरक्षणार्थ जेवढे उपाय करतां येण्यासारखे होते

तेवढे त्यानें केले. स. १७८५ त डि बॉयन् नांवाचा फ्रेंच सरदार दरमहा एक हजार रुपये पगार देऊन त्यानें आपल्या नोकरीस ठेविला आणि त्याच्याकडून फौजेचा कंपू तयार करविला. हा डि बॉयन् फ्रान्स देशचा राहणारा असून अनेक संकटें भोगून हिंदुस्थानांत आला होता. कांहीं दिवस तो इंग्रजांच्या नोकरीस असून सन १७८४ त इंग्रजांच्या वकिलांबरोबर तो दिल्लीस आला. तेथें शिंद्याची व त्याची ओळख झाली, आणि त्यानें वर सांगितलेली नोकरी पत्करिली. तो हुशार व शूर होता. सन १७९७ पर्यंत डि बॉयन्नें शिंद्याची नोकरी मोठ्या ईमानतीनें करून सुमारें पन्नास लाख रुपयांचा ऐवज जमविला, आणि प्रकृति नादुरस्त झाल्यामुळें हिंदुस्थान सोडून फ्रान्स देशांत सेव्हॉय् येथें आपल्या जन्मभूमीस जाऊन सुखवस्तु राहिला. तो स. १८३० त मरण पावला.

वर सांगितलेल्या सरदाराशिवाय अप्पाखंडेराव, अंबाजी इंगळे, लखबादादा, राणाखान वगैरे मोठमोठे पराक्रमी पुरुष महादजीपाशीं ह्या वेळेस होते. राज्याची सुव्यवस्था बांधून देण्याकरितां महादजीस अनेक गोष्टी कराव्या लागल्या. स्वतः नवीन फौज त्यानें तयार केली, म्हणून पूर्वीच्या लोकांकडे चालत आलेल्या तैनाती जहागिरी त्यास बंद कराव्या लागल्या. राजा नारायणदास म्हणून बादशहाच्या खासगीकडे एक कामदार होता, त्यास काढून त्याचे जागीं शहा निजामुद्दीन नामक आपल्या खात्रीचा इसम महादजीनें नेमिला. तसेंच गोसावी बेड्याचा मुख्य हिंमतबहाद्दर याजकडे जहागीर चालत होती, तिचा त्यानें हिशेब मागितला. ह्या गोष्टी लोकांस न आवडून लोक आंतून महादजीचा द्वेष करूं लागले. त्या वेळीं रजपूत राजेही महादजीवर उठले, त्यामुळें उभयतांमध्यें घोर संग्राम झाले, त्यांचें वर्णन मराठयांचे हकीगतींत येईल. सन १७८७ च्या मे महिन्यांत लालसोट येथें निकराची लढाई होऊन महादजीचा पराजय झाला. तींत बादशहाकडून महादजीस मदत होती. बादशहाच्या फौजेचे मुख्य महंमद-बेग व इस्मईल-बेग असे दोघे होते. महंमद-बेग त्या लढाईत मारला गेला, तेव्हां पुढें इस्मईल-बेग बादशहाचे फौजेचा मुख्य झाला. महादजीचा पगडा खालीं झालेला पाहतांच इस्मईल बेग रजपुतांस जाऊन मिळाला. महादजीवर ह्या वेळेस मोठ्या निकराचा प्रसंग आला होता, त्यांतून निभावल्यामुळें त्याच्या अंगची

कर्तबगारी सर्वांस कळून आली, इतक्यांत गुलाम कादर रोहिलखंडांतून निघून दिल्लीस आला. तेव्हां राजधानींत मुसलमान मंडळाचें प्राबल्य होऊन महादजीच्या विरुद्ध मोठा कट झाला. ग्वाल्हेरचा किल्ला लखबा-दादाचे ताब्यांत होता. मुसलमानांनीं त्यास वेढा घातला असतां लखबानें मोठ्या शिताफीनें किल्ल्याचें संरक्षण केलें. बादशहानें गुलाम कादर यास मोठा सन्मान देऊन महादजीविरुद्ध लढण्यास भर दिली. रजपुतांनींही बादशहास आपल्या कटांत घेतलें. महादजीविरुद्ध अशी खटपट केल्यानें आपण होऊन आपणावर केवढें संकट आणिलें, हें बादशहाच्या ध्यानांत आलें नाहीं. ह्याच संधीस शहाजादा जवानबख्त अयोध्येच्या सुभेदाराकडून मदत घेऊन दिल्लीस आला, पण तेथें बादशहाशीं त्याचें बनलें नाहीं. त्यानें एक लांबलचक पत्र इंग्लंडचा राजा तिसरा जॉर्ज यास लिहिलें, आणि दास्याच्या हीन स्थितींतून मोगल घराण्याचा उद्धार करण्याविषयीं त्यास विनंति केली. पुढें लवकरच तो शहाजादा इंग्रजांचें छत्राचा स्वीकार करून बनारस येथें गेला, आणि तेथें सन १७८८ च्या मे महिन्यांत मरण पावला; त्या वेळीं त्याचें वय ४० वर्षांचें होतें.

८. गुलामकादरचीं दुष्ट कृत्यें.—गुलाम-कादर व इस्माईल-बेग यांच्याशिवाय हिंमतबहादर गोसावी व बेगम सुमरू हे दोन गृहस्थ बादशहाजवळ होते. पण ह्या दोघांत गुलाम-कादरचा कावा कांहीं विलक्षण होता. दिल्लींत भानगडी चालू असतां उत्तरेकडून शीखांनीं स्वारी केली. त्यांजवर गुलाम-कादर चालून गेला. इकडे इस्माईल-बेग व शिंद्याकडील राणाखान, डि बॉयन् वगैरे सरदारांची आग्र्यानजीक मोठी निकराची लढाई झाली. तींत इस्माईल-बेगचा पराजय होऊन दिल्लींत महादजीचा अंमल पुनरपि चालू झाला. तरी महादजी एकदम दिल्लीस गेला नाहीं. कारण बादशहास ह्या वेळेस इस्माईल-बेगचे सांगण्यावरून रजपुतांनीं फितविलें होतें. त्यास अजमीर देण्याचें ठरवून त्या शहरची सोन्याची किल्ली वकिलांबरोबर त्यांनीं बादशहाकडे पाठविली. तें शहर घेण्याचे इरायानें बादशहा दिल्ली सोडून गेला होता. त्याजबरोबर हिम्मतबहादर, बेगम सुमरू, व इस्माईल-बेग ह्यांच्या फौजा होत्या. इतक्यांत मराठ्यांला जयप्राप्ति झालेली ऐकून बादशहा भीतीनें दिल्लीस परत आला. परंतु ह्या त्याच्या दुटप्पी वर्तनानें महादजीस संशय येऊन

तो मथुरेस तटस्थ राहिला. बादशहाचें दुर्दैव पक्कें ओढवलें होतें म्हणून दिल्लीस जाण्याची महादजीस बुद्धि झाली नाहीं. गुलाम-कादर व इस्मईल बेग हे दिल्लीस पोंचल्यावर त्यांनीं जीं अनन्वित व दुष्ट कृत्यें तेथें केलीं, त्यांच्या स्मरणानें अंगावर कांटा उभा राहतो, आणि गुलाम-कादरसारखे राक्षसी मनुष्य पाहून अंतःकरण थक्क होतें. बादशहा बात्या भित्रा व नामर्द होता. त्याचें वय ७० जवळ होतें. हा जीर्ण व निरुद्योगी बादशहा पदच्युत करून, त्याचे जागीं नवीन बादशहा बसवून, मिळेल तितकी लूट मिळवावी व फौज उभारावी, असा गुलाम-कादरचा बेत असावा हें संभवनीय दिसतें. बाह्यतः तो बादशहास सांगे, कीं मराठ्यांचे जाचांतून मी आपणास सोडविण्याची खटपट करीत आहें. परंतु आंतून त्यानें मलकाझ्मानी वगैरे मसलती बायांशीं बोलणीं चालविलेलीं होतीं. 'आपला मुलगा बेदर-बख्त यास गादीवर बसविल्यास मी तुम्हांस दहालाख रुपये बक्षीस देतें,' असें गुलाम-कादरपाशीं त्या बाईनें कबूल केलें. ह्या हेतूनें शेंकडों क्रूर व दुष्ट पठाण लोक बरोबर घेऊन गुलाम-कादर दिल्लीस गेला. इस्मईल बेग अगोदरच तिकडे गेला होता. पण त्यास गुलामाचे दुष्ट बेत माहीत नव्हते. मराठ्यांची कांहीं फौज दिल्लीचे बंदोबस्तास होती. परंतु महादजी मथुरेस तटस्थ होता. गुलामकादरनें व ईस्मईल बेगनें राजवाड्यावर तोफांचा भडिमार सुरू केला, तेव्हां सहजच शहर त्यांच्या ताब्यांत आलें. वाड्यांत जाऊन त्यांनीं बादशहाची भेट घेतली. बादशहानें गुलामकादरकडे वजिरी कायम केली, आणि त्यानेंही बादशहाचें संरक्षण करण्याची कुराणावर शपथ घेतली. पुढें त्यानें खर्चासाठीं बादशहाजवळ पैसे मागितले, व त्याजपाशीं पुष्कळ पैसे आहेत, ह्या समजुतीवर त्यानें पुढील अनर्थ केला.

तारीख २९ जुलई स. १७८८ रोजीं गुलामकादर हा एकटाच कांहीं बदमाष व दांडगे पठाण बरोबर घेऊन बादशहाकडे गेला आणि खर्चासाठीं बादशहाजवळ रुपये मागूं लागला. आपणापाशीं पैसे नाहींत असें बादशहानें उत्तर दिलें, तेव्हां पिसाळलेल्या कुत्र्याप्रमाणें तो बादशहाचे अंगावर चालून गेला, आणि बादशहानें महादजीस मदतीस बोलाविलें आहे असें एक बनावट पत्र खिशांतून काढून, तें बादशहास

वाचून दाखविलें. त्याच रागाच्या आवेशांत त्यानें बादशहाला त्या प्राचीन व पूज्य तख्तावरून खालीं ओढून लत्ताप्रहार केला; आणि बेदरबख्तास आणून तख्तावर बसविलें. तेव्हां सर्व दरबारांत एकच गोंधळ उडाला. नंतर त्या राक्षसानें त्या पदभ्रष्ट बादशहास व त्याच्या मुलांस शस्त्रहीन करून, सर्व चीजवस्त घेऊन तीन दिवसपर्यंत कारागृहांत कोंडिलें व अन्नपाणी न देण्याविषयीं ताकीद केली. नंतर बेदरबख्ताचे साह्यानें त्यानें सर्व जनानखाना व राजपुत्रांचे महाल लुटून फस्त केले. शहा आलम यास मोतीमहालांत कोंडिलें होतें. त्याच्या समक्ष त्यानें शहाजादे अकबर व शेखो यांस प्रखर उन्हांत उभें करून बेदम मार दिला, आणि जनानखान्यांतील दासींनाही मरमरेपर्यंत मारून आपल्या लोकांकडून त्यांची अमर्यादा करविली. पुढें द्रव्य कोठें तरी पुरलेलें असून तें बादशहा आपणास दाखवित नाहीं, असें म्हणून, त्यानें बादशहास दिवाण-इ-खासांत ओढून आणून चाबकानें मारिलें. तेव्हां बादशहा काकुळतीस येऊन बोलला, ' बाबारे, मजपाशीं द्रव्य मुळींच नाहीं व पुरलेलेंही नाहीं; आतां मला छळूं नको; एकदां माझी आंतडीं तरी फाडून घे. पण या यातनेतून एकदांचा मला सोडीव'. बादशहा बेहोष होऊन पडल्यावर गुलामानें जननखान्यांतल्या खाशा स्त्रियांस आणून त्यांचाही नानाप्रकारें छळ केला. हें चाललें असतां कोंडून ठेविलेल्या माणसांपैकीं लहान लहान कोमल मुलें पाण्यावांचून व्याकूळ होऊन मरण पावलीं, तेव्हां तेथेंच त्यांस गाडण्याचा त्या दुष्टानें हुकूम दिला. पुढें मलकाझमानी व बेदरबख्त यांचाही त्यानें फार अपमान केला आणि पैशासाठीं सर्व राजवाडा पोखरून टाकिला. इस्माईल-बेग शहराबाहेर होता, त्यास ही वाड्यांतील बातमी कळत नव्हती, गुकामानें सुमारें पांच लाख रुपये त्याजकडे पाठवून ज्यास्त भरतीसाठीं शहर लुटावें म्हणून निरोप पाठविला. पुढें एक दिवस त्यानें सर्व राजपुत्रांस आणून आपणापुढें गाण्यास व नाचण्यास लाविलें. शेवटीं थकल्याचें मिष करून, शहाजादा अकबर याचे मांडीवर डोकें ठेवून जवळच तरवार व सुरा ठेवून तो निजला. पुढें जागा झाल्यावर त्या राजपुत्राची निर्भर्त्सना करून गुलाम बोलला, 'मी शस्त्र खालीं ठेवून तुमच्या समक्ष निजलों असतां तुम्हीं माझें शीर उडविलें नाहीं, इतके नामर्द तुम्ही राज्य कसें कराल ?'

एकदां तो तख्तावर हुक्का ओढीत बसला व ठेवा कोठें आहे म्हणून बादशहास विचारल्यावर, त्यानें माहीत नाहीं असें म्हणतांच, गुलामानें तख्तावरून उडी टाकून बादशहास खालीं पाडिलें, आणि त्याचे उरावर बसून 'ठेवा कोठें आहे तो दाखवितोस कीं डोळे काढूं?' म्हणून विचारिलें. बादशहानें डोळ्यांत अश्रु आणून विनविलें, कीं 'माझ्या डोळ्यांनीं आतां थोडेंच सुख पाहवयाचें आहे. परंतु मला कुराण वाचण्यास त्यांचा उपयोग होतो, एवढ्यासाठीं तरी ते कायम ठेव. त्या दुष्टानें तिकडे दुर्लक्ष करून पेषकबजानें त्याचे दोनही डोळे फोडिले, (ता० १० ऑगस्ट). हें अघोर कृत्य पाहून बायकापोरांनीं हाहाःकार केला, आणि मोगलांच्या गतवैभवाचा दर्शक असा तो प्रसिद्ध दिवाणखाना स्त्रियांच्या आक्रोशानें गजबजून गेला. नंतर गुलामानें त्या बादशहास तसाच फरफरां ओढीत नेऊन कारागृहांत टाकिलें, आणि शहाजाद्यांचेही डोळे फोडितों म्हणून उठला. परंतु लाला सीतलदास ह्या हिंदु खजानजीच्या मध्यस्थीनें त्यानें तें कर्म केलें नाहीं. पुढें एक दिवस त्यानें जनानखान्यांतल्या तरुण व सुंदर स्त्रियांस आणून बेदम मारिलें, आणि ज्यांचें नखही परपुरुषांचे दृष्टीस पडलेलें नाहीं, त्यांस विवस्त्र करून आपल्या लोकांकडून त्यांची विटंबना करविली.

अशीं दुष्ट कृत्यें करण्यांत त्याचा कांहींच हेतु राहिला नव्हता. त्याची या वेळीं मनुष्यांत गणना नव्हती. तो केवळ पशु बनला होता. ह्या वेळीं त्याचा जात्यभिमान, धर्माभिमान व मराठ्यांविषयीं द्वेष हीं सर्व नष्ट झालीं होतीं. हीं कृत्यें ऐकून सर्व शहरांत आकांत झाला. नादिरशहा, अहंमदशहा, किंवा तयमूरलंग ह्यानीं प्रजेस लुटिलें व जाळिलें, परंतु बादशाहीचा असा उपमर्द केला नाहीं. मराठे, रजपूत किंवा जाठ ह्या परधर्मी लोकांसही ज्या गादीबद्दल स्वाभाविकपणेंच पुज्य भाव वाटत होता, तिची अशी अवहेलना स्वधर्मी वजिराकडून व्हावी, हा खरोखर कालचक्राचा महिमा समजावयाचा. सारांश, क्रूर कामांत गुलाम कादरइतकें नैपुण्य प्रत्यक्ष बादशहाच्या शत्रूंनींही दाखविलेलें नाहीं. याप्रमाणें मोगल बादशाही अपकर्षाच्या सीमेपलीकडे गेली, आणि बादशहा या शब्दांत कांहीं अर्थ उरला नाहीं. ह्या अघोर कृत्याचें वर्णन करण्याचा हेतु इतकाच, कीं ज्या मोगलांच्या कुलांत अकबर, शहाजहान यांसारखे प्रतापी पुरुष

५५-१७-११-१०--२०००

झाले, त्या कुलाची अवहेलना ह्या वेळीं कशी होत होती, याची चांगली कल्पना वाचकांस व्हावी.

इस्माईलखानास ह्या अघोर कृत्यांची खबर समजतांच त्यालाही तिटकारा आला, आणि त्यानें राणाखानाचे हाताखालील मराठ्यांची फौज घेऊन दिल्लींत प्रवेश केला. ह्या संधीस एके दिवशीं संध्याकाळीं गुलाम कादरनें राजघराण्यांतील माणसांची जळून राख व्हावी व आपणांस पळून जाण्यास सवड सांपडावी, म्हणून किल्ल्यांतील लाल बुरुजांत दारु भरून तिला बत्ती दिली, (ऑक्टोबर ता. १७). त्या बरोबर मोठा भयंकर आवाज होऊन सर्व दिल्ली दणाणून गेली, आणि लोक भयग्रस्त झाले. ह्या संधींत तो एका चोरदारानें बाहेर पडून पळाला. राणाखनानें वाड्यांत प्रवेश केला, आणि आग शांत करून कारागृहांतील लोकांस मुक्त करून सर्वांच्या खाण्यापिण्याची व वस्त्रांची व्यवस्था करून, तो गुलामकादरचा पाठलाग करण्यास निघाला. गुलाम कादर मीरत येथें जाऊन राहिला. मराठ्यांनीं मीरतच्या किल्ल्यास वेढा दिला. एकदिवस रात्रीं तो किल्ल्यांतून पळाला व पापाचा पूर्ण घडा भरल्यामुळें एका शेतांत घोड्यावरून पडला. त्या शेताचा मालक एक कायस्थ ब्राह्मण असून त्याचें घर गुलामानें पूर्वीं एकदां लुटलें होतें. त्या ब्राह्मणानें गुलामास पकडून राणाखानाच्या स्वाधीन केलें. बेदरबख्त वगैरे त्याचे इतर साथीदारही धरले जाऊन, सर्वांस कडक शिक्षा मिळाल्या. राणाखानानें गुलामास मथुरेस नेऊन महादजीचे स्वाधीन केलें. महादजीनें त्यास गाढवावर उलटा बसवून त्यची मथुरेंत धिंड काढिली; मागाहून डोळे काढिले; शिव्या देऊं लागला म्हणून जीभ कापिली. अखेरीस नाक, कान, हात, पाय, वगैरे तोडून त्याचा छिन्नविच्छिन्न गोळा बादशहाचे समाधानासाठीं दिल्लीस पाठविला. परंतु दिल्लीस पोंचण्यापूर्वींच ता. ३ मार्च, सन १७८९ रोजीं त्याचा अंत झाला. येणेंप्रमाणें नजीबखान रोहिल्याच्या घराण्यानें बादशहाचे उपकार फेडिले. गुलामकादरचा वतनी किल्ला घोसगड जमीनदोस्त करण्यांत आला.

गुलामकादरनें दिल्लींत अनर्थ मांडिला असतां, महादजी मथुरेस स्वस्थ कां बसला हें समजत नाहीं. जयप्राप्तीची खात्री वाटल्याशिवाय आपण मुसलमानांशीं टक्कर देण्यास बाहेर पडूं नये असें त्यास वाटलें

असेल; किंवा बादशहानें अनेक वेळां आपणाशीं लबाडी केली, तर कांहीं दिवस आपण तटस्थ राहून त्याच्या साथीदारांची खरी योग्यता त्यास आपोआप समजावी, असा कदाचित् महादजीचा उद्देश असेल. शिवाय गुलाम-कादर प्रत्यक्ष बादशहाशीं असें नीच वर्तन करील अशी त्यास कल्पनाही नव्हती. कांहीं असलें, तरी ह्या वेळीं शिंद्याकडून बादशहाची उपेक्षा झाली यांत संशय नाहीं. बादशहानें शिंद्याची मदत वारंवार मागितली असतां तो स्वस्थ बसला. हीं पत्रें महादजीस पोंचलीं असतील कीं नाहीं याचाही संशयच आहे. मथुरेहून दिल्लीस फौज जाण्यास सात दिवस लागत. शिंद्यानें बेगम सुमरूस बादशहाचे मदतीस जाण्यास सांगितलें. परंतु जी गोष्ट स्वतः महादजी करण्यास धजेना, ती गोष्ट ती बाई आपल्या अंगावर घेईना. तरी रायजी पाटील याच्या हाताखालीं २००० स्वार व एक विश्वासु ब्राह्मण त्यानें दिल्लीस पाठविला होता. परंतु गुलाम-कादरच्या बंदोबस्तापुढें त्यांचा टिकाव लागला नाहीं. स. १७८८ च्या ऑक्टोबर महिन्यामध्यें राणाखान, डि बॉयन् वगैरे सरदार दिल्लीस आले. त्यांनीं वाड्याची आग विझवून बादशहाच्या कुटुंबास बंदींतून मुक्त केलें.

महादजीनें आपली अडचण पाहून पुण्याहून मदत मागितली होती, ती तुकोजी होळकराचे हाताखालीं वेळेवर येऊन दाखल झाली, त्यामुळें दिल्लींत जिकडे तिकडे आनंद झाला. सर्व लोकांस असें वाटलें, कीं आपली सुटका करणारे साह्यकर्ते आले. गुलामकादरची व्यवस्था लागल्यावर, महादजीनें बादशहाची नेमणूक वगैरे बांधून दिली, (सन १७८९). ती दरसाल नऊ लाखांची होती.

ह्या वेळींच मोगलबादशाहीचा खरा अंत झाला असें इंग्रज ग्रंथकार समजतात. तथापि बादशहा व त्याचा वंश ह्यांची गोष्ट समाप्त करणें अवश्य आहे. महादजीनें वकील-इ-मुत्लक हें पद फिरून पेशव्यासाठीं घेऊन आपण पेशव्याच्या वतीनें सर्व व्यवस्था केली. बादशहानें महादजीस 'अलिजा बहादर,' व 'मदार-उल्-महाम्,' ह्या पदव्या दिल्या. इस्मईल-बेगनें त्याची दोस्ती पत्करिली; आणि जहागीर घेऊन तो स्वस्थ बसला. दिल्लींत स्वस्थता झाल्यावर महादजीनें रजपुतांची पुरी खोड मोडिली. त्या उद्योगांत डि बॉयन्नें चांगला पराक्रम केल्यावरून महा-

दजीनें त्या फ्रेंच सरदारास दिल्ली व मथुरा यांजमधील ४० लाखांचा मुलूख जहागीर दिला. तेव्हांपासून डि बॉयन् अलीगड येथें राहूं लागला. या वेळीं फ्रेंचांचें वजनही पुष्कळ वाढलें असून, हिंदुस्थानचे कित्येक राजेरजवाडे इंग्रजांस सोडून फ्रेंचांच्या नादीं लागले होते.

सन १७९२ त इंग्रजांचे ताब्यांतील बंगालप्रांतांतून खंडणी वसूल करण्याबद्दल बादशहानें महादजीस हुकूम दिला, पण महादजी पुण्यास होता व इंग्रजही सहज वळणारे नव्हते, म्हणून हा हुकूम अमलांत आला नाहीं. महादजीनें ठेविलेल्या बादशाही फौजेंत पुष्कळ नामांकित युरोपियन गृहस्थ होते. बेगम सुमरूची कीर्ति मोठी होती. तिनें पुनः एका फ्रेंच गृहस्थाबरोबर लग्न केलें. सारांश, पुढें दहाबारा वर्षे बादशहाची व्यवस्था बरीच सुरळीत चालली. महादजी शिंदे स. १७९३त पुण्यास मरण पावला.

९. दिल्लीचा पाडाव व घराण्याचा शेवट.—महादजीच्या मृत्यूनंतर सन १८०३ पर्यंत बादशहाचे व्यवस्थेंत विशेष फेरफार झाला नाहीं. महादजीनें केलेली व्यवस्था चालू होती, तरी बादशहाची नेमणूक मराठ्यांकडून वेळेवर पोंचत नसे अशी तक्रार होती. सन १८०३ सालीं इंग्रज व मराठे यांचें मोठें निकाराचें युद्ध झालें. त्यांत सेप्टेंबर ता. ११ रोजीं दिल्लीस लढाई होऊन लॉर्ड लेक यास जय मिळाला, आणि शिंद्याची फौज पराभव पावली. ता. १६ सेप्टेंबर रोजीं बादशहानें शहाजादा अकबर यास लॉर्ड लेक याजकडे सामोरा पाठवून, त्यास वाड्यांत आणविलें. रस्त्यांतील गर्दीतून मार्ग करीत लॉर्ड लेक वाड्यांत आला. तेव्हां बादशहा व इतर मंडळी यांस आनंद झाला. पुढें बादशहा व इंग्रज यांजमध्यें जो ठराव झाला, त्यास तह असें नांव दिलेलें नाहीं. कारण इंग्रजांनीं बादशहाचें राज्य काढून घेतल्यामुळें, तो त्यांचा ताबेदार झाला. दिल्ली शहर व आसपास अल्प मुलूख त्यांनीं बादशहाकडे ठेविला. ह्या मुलुखाची व्यवस्था दिल्लीस ठेविलेल्या ब्रिटिश रेसिडेंटानें करावी असें ठरलें. ह्या मुलखाच्या उत्पन्नाशिवाय बादशहाच्या खर्चासाठीं दरमहा ९० हजार रुपयांची नेमणूक इंग्रजांनीं बांधून दिली. म्हणजे पेशव्यांनीं आपणाकडे जो मान घेतला होता, तोच इंग्रजांनीं स्वतःकडे घेतला.

येणेंप्रमाणें प्रतापी मोगलवंशाचें राज्य इंग्रजांचे ताब्यांत गेलें.

स. १८०६ ह्या वर्षी दुर्दैवी शहा आलम मरण पावला. त्या वेळीं त्याचें वय ९२ वर्षांचें होतें. त्याच्या योग्यतेविषयीं ज्यास्त विवेचन करण्याची जरूर नाहीं. संकटें सहन करण्याची त्याची शक्ति विलक्षण होती. प्रसंगीं मनाचा निश्चय करून एकदम धाडस करण्याचा गुण त्याच्या अंगीं पाहिजे होता. तो असता, तर त्याची अपेष्टा झाली नसती. असें धाडस दाखविण्याचे प्रसंग त्याजला थोडे आले नाहींत. परंतु ते सर्व त्याच्या नामर्दपणामुळें फुकट गेले. एक प्रकारचा हलकट-पणा त्याचे अंगीं होता. यामुळें त्याचें वजन कोणावर पडलें नाहीं.

शहा आलमचा मुलगा अकबर याजला इंग्रज सरकाराकडून नेमणूक मिळत होती. तो बादशहा हें नांव धारण करून दिल्लीस राहत असे. तो सन १८३७ ह्या वर्षी मरण पावला; तेव्हां त्याचा पुत्र महंमद बहादूरशहा याजकडे इंग्रज सरकारानें नेमणूक चालविली. इंग्रज सरकाराशीं त्याचे अनेक व्यवहार घडले, ते इंग्रजांच्या भागांत देणें योग्य आहे. महंमद बहादूरशाहा सन १८५७ सालच्या बंडांत सामील झाला, म्हणून इंग्रजांनीं दिल्लीशहर काबीज केलें, बादशहाच्या पुत्रांस व नातवांस ठार मारिलें, आणि बहादूरशहास ब्रम्हदेशांत काळ्या पाण्यावर पाठविलें.

प्रस्तुत काळीं ह्या मोगलवंशाचा दिल्लींत मागमूस नाहीं.

अशा प्रकारें राज्याच्या अवक्रान्ति झालेल्या पाहून कालचक्राच्या गतीची अगाध कल्पना मनांत येते, आणि इतिहासाचा उपयोग कळूं लागतो. म्हणून राजा व प्रजा यांनीं अवक्रान्तीचा मार्ग न पत्करितां, एकमेकाच्या साह्यानें उत्तरोत्तर उत्क्रान्तीप्रत पोंचावें हेंच उभयतांस भूषणावह आहे.

समाप्त.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

NATIONAL ARCHIVES OF INDIA

राजघराण्यांच्या वंशावळी.

(१). गज्नवी वंश. (पृ. ५८).

- १ सुलतान महंमूद (स. ९९९)
  - २ महंमद (१०३०)
    - ४ अहंमद (१०४१)
  - ३ मस्-ऊद (१०३०)
    - ५ मौदूद (१०४१)
      - ६ मस्-ऊद दुसरा (१०४९)
    - ७ अबुल् हसन (१०४९)
    - ९ फर्रुखजाद (१०५२).
    - १० इब्राहीम (१०५८)
      - ११ मस्-ऊद तिसरा (१०९८)
        - १२ अर्स्लान (१११५)
        - १३ बहराम (१११८)
          - १४ खुस्रू (११५२)
            - १५ खुस्रू मलीक (११६०-८२)

(२). घोरचे अफगाण सुलतान. (पृ. ७७).

- ....
  - कुत्ब्-उद्दीन. (गज्नीचा सुलतान बहरामचा जांवई).
  - सैफ्-उद्दीन.
    - २ ग्यास्-उद्दीन (११५७).
      - ४ महंमूद (१२०६).
    - ३ शहाबुद्दीन ऊर्फ महंमद. (१२०२-०६)
  - १ अला-उद्दीन 'जहान् सोझ्.'

NATIONAL ARCHIVES OF INDIA

(३). गुलाम वंश. (पृ. ९७).

- १ कुत्ब्-उद्दीन (स. १२०६)
  - २ आरम (१२१०)
  - ३ शम्सुद्दीन अल्तमश, जांवई (१२१२)
    - ४ रुक्नू-उद्दीन, फिरोजशाहा.
      - ७ अला-उद्दीन मस्-ऊद (१२४२)
    - ५ रझिया. (१२३६).
    - ६ मोइझ्-उद्दीन बह्राम (१२३९).
    - ८ नासिरुद्दीन महंमूद (१२४६)

९ बल्बन, (वरच्याचा वजीर) (१२६६)

- महंमद
  - कैखुस्रु.
- बोगराखान.
  - १० कैकुबाद (१२८६-१२८८).

---

(४). खिलजी वंश. (पृ. ११७).

- मलीक.
  - १ जलालुद्दीन फिरोज (१२८९).
    - अर्कलीखान.
    - रुक्नुद्दीन ऊ. इब्राहीम.
  - शहाबुद्दीन मस्-ऊद.
    - २ अला-उद्दीन (१२९६)
      - खिजरखान.
      - उमरखान.
      - ३ मुबारिक (१३१६-१३२०)
    - आल्मसूबेग.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

(५). तुघ्लख घराणें. (पृ. १९०).

१. ग्यासुद्दीन (१३२१)

- २. आलफ्खान ऊर्फ महंमद (जोना) (१३२६)
  - महंमूद
- सीपा सालर रजब.
  - ३ फिरोज (१३५१).
    - ६ महंमद (१३८९)
      - ८ महंमूद (१३९२-१४१२)
      - ७ हुमायून (१३९४)
    - फत्तेखान.
      - ४ ग्यासुद्दीन (१३८८)
      - नसत (१३९४)
    - जाफर.
      - ५ अबूबक्र (१३८८)

(६). सय्यद वंश. (पृ.१८९).

१ खिजरखान (१४१६)

२ मुबारिक (१४२१)

३ महंमद (१४३५)

४ अला-उद्दीन (१४४५-५०)

(७). लोदी वंश. (पृ. १९३)

१ बुह्लोल लोदी (१४५०).

२ शिकंदर लोदी (१४८८)

३ इब्राहीम लोदी (१५१७-२६).

(९). वाघेल वंश. (पृ.१९९).

धोलक्याचा राजा लवणप्रसाद.

वीरधवल (अन्हिलपट्टणचा राजा).

वीसलदेव.

अर्जुनदेव.

लवणराज.

सारंगदेव.

राजा कर्ण (पत्नी कमलादेवी).

देवलदेवी.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

(८). अन्हिलपट्टणच्या चालुक्यराजांचा वंश. (पृ. १९९).

- १ मूळराज, संस्थापक, (९४२)
  - २ चामुंड (९९७)
    - वल्लभराज.
    - दुर्लभराज.
    - नागराज.
      - ३ भीमदेव (१०२६)
        - राणी उदयामती.
          - ४ कर्णराज (१०७२)
            - ५ सिद्धराज जयसिंह (१०९४)
          - मूळराज
        - राणी बकुलादेवी.
          - क्षेमराज.
            - देवप्रसाद.
              - त्रिभुवनपाल.
                - महीपाल.
                  - ७ अजयपाल (नैकीदेवी, ११७४)
                    - ८ बालमूळराज (११७६–७८).
                  - ९ भीमदेव भोळा, (११७९–१२१५)
                - कीर्तिपाल.
                - ६ कुमारपाल (११४३)
                - प्रेमलदेवी.
                - देवलदेवी.

(१३). वऱ्हाडची इमादशाही. (पृ. २४४).

- फत्तेउल्ला इमादशाहा (१४८४)
  - अला-उद्दीन इमादशाहा (१४८४)
    - दर्या इमादशाहा (१५२७)
      - बुऱ्हाण इमादशाहा (१५७२).

NATIONAL ARCHIVES OF INDIA

(१०). गुजराथचे सुलतान. (पृ. २०४).

१ मुजफ्फरशाहा (१३९६)
- तातारखान.
  - २ अहंमदशाहा (१४११)
    - ३ महंमदशाहा (१४४३)
      - ४ कुत्ब-शाहा (१४५१)
    - ५ दाऊदखान (१४५८)
      - ७ खलील ऊर्फ दुसरा मुजफ्फरशाहा (१५११)
        - ९ बहादूरशाहा (१५२६).
          - १० दुसरा महंमूदशाहा (१५३६)
          - ११ दुसरा अहंमदशाहा (१५५४)
          - १२ मुजफ्फरशाहा (१५६१-७२)
        - ८ शिकंदरशाहा (१५२६)
    - ६ महमूद बेगडा (१४५८)

---

(२०). माळव्याचे सुलतान (पृष्ठ २२३).

घोरी घराणें.

१ दिलावरखान घोरी (१३८७)
- २ हुशंगशाहा (१४०५)
  - ३ गझ्नीखान (१४३२)

माळव्याचें खिलजी घराणें.

१ महंमूदशाहा खिलजी (१४३५)
- २ ग्यासुद्दीन (१४६९)
  - ३ नसीरुद्दीन (१५००)
    - ४ महंमूदशाहा (१५१२)

NATIONAL ARCHIVES OF INDIA

(११). महाराष्ट्रांतील बहामनी सुलतान (पृ. २१६).

- १ अला-उद्दीन हुसेन गंगू बहामनी (१३४७)
  - ४ दाऊदशाहा (१३७८)
    - ८ फिरोजशाहा (१३९७)
    - महंमद संजर.
    - ९ अहंमदशाहा (१४२२)
      - महंमद.
      - १० अला-उद्दीन (दुसरा) (१४३५)
        - ११ हुमायूनशाहा (१४५७)
          - अहंमद.
          - १२ निजामशाहा (१४६१)
          - १३ महंमदशाहा (दुसरा) (१४६३)
            - १४ महंमूदशाहा (दुसरा) (१४८२)
              - १७ वलीउल्ला (१५२१)
              - १५ अहंमदशाहा (दुसरा) (१५१८)
                - १८ कलीमुल्ला (१५२१-२६).
              - १६ अला-उद्दीन (तिसरा) (१५२०)
        - हसन.
      - महंमूद.
      - दाऊद.
      - कन्या.
  - २ महंमदशाहा (१३५८)
    - ३ मुजाहिदशाहा (१३७५)
    - रूपवर आघा.
  - ५ महंमूदशाहा (१३७८)
    - ६ ग्यासुद्दीन (१३९७)
    - ७ शम्सुद्दीन (१३९७)

NATIONAL ARCHIVES OF INDIA

(१२). बेदरची बेरीदशाही (पृ. २४३).

कासीम बेरीद (१४९२)

|

अमीर बेरीद (१५०४)

|

अली बेरीद (१५४९)

|

इब्राहीम बेरीदशहा (१५६२) कासीम बेरीद (दुसरा) (१५६९)

|

मीर्झा अलीबेरीद (दुसरा) (१५७२).

(१४). अहंमदनगरची निजामशाही (पृ. २४५).

१ अहंमद निजामशहा (१४८९)

|

२ बुऱ्हाण (१५०८)

|

शहाताहीर ११ मूर्तुजा निजामशहा (दुसरा) (१६००) ३ हुसेन. (१५५३) अबुल कादर

९ अहंमद (१५९४) १२ हुसेन (१६२६–३३)

सुलताना चांदबिबी. (लग्न स. १५६४त विजापूरच्या अलीआदीलशहाबरोबर.) शहा कासीम. ४ मूर्तुजा (१५६५) ७ बुऱ्हाण (दुसरा) (१५९१)

५ मीरन हुसेन (१५८६)

८ इब्राहीम (१५९४) ६ इस्माईल (१५८८)

|

१० बहादूर (१५९४)

१३ शहाजीनें बसविलेला शेवटचा पुरुष (१६३३–३७)

NATIONAL ARCHIVES OF INDIA

(१५). विजापूरची आदिलशाही (पृ. २६१).

१ यूसुफ् आदिल्शाहा (१४८९)

२ इस्मईल आदिलशाहा (१५१०)

मल्लू. — ३ इब्राहीम (१५३४)

शहा तहमास्प्. — ४ अली आदिलशाहा (१५५७)

५ इब्राहीम (दुसरा) (१५८०)

६ महंमद् आदिलशाहा (१६२६)

७ अली आदिलशाहा (दुसरा) (१६५६)

८ सिकंदर अली आदिलशाहा (१६७२-८६).

(१६). गोवळकोंड्याची कुत्बशाही (पृ. २८१).

१ सुलतान कुली कुत्ब्-उल्मुल्क् (१५१२)

हैदरखान. — कुत्बुद्दीन. — २ जमशीद (१५४३) — अब्दुल करीम. — दौलतखान. — ४ इब्राहीम (१५५०)

३ सुभानकुली कुत्ब्शाहा (१५५०)

५ महंमद कुली (१५८०) — मीर्झा अहंमद अमीर.

६ अब्दुल्ला हुसेन (१६११)

७ अबू हसन (जांवई) (१६५८-८७).

NATIONAL ARCHIVES OF INDIA

(१७). विजयनगरचे राजवंश (पृ. २९९).

संगम.

- **हरिहर** (पहिला) (१३३६)
- **कंप**
  - **संगम**
- **बुक्क** (१३४४) ल. गौरांबिका.
  - **हरिहर** (दुसरा) ल. मल्लांबिका (१३७९)
    - **बुक्क** (दुसरा) (१३९९)
    - **देवराय** (पहिला) (१४०६)
      - **वीरविजय**, ल. नारायणांबिका. (१४१२)
        - **देवराय** (दुसरा) (१४१९)
          - **मल्लिकार्जुन** (१४४९)
            - **राजशेखर** (१४७८)
            - **विरूपाक्ष** (दुसरा) (१४८३)
          - **विरूपाक्ष** (पहिला) (१४६५)
        - **प्रतापदेवराय.**
- **मारप**
- **मुद्दप**

नरसिंहराय (विरूपाक्षाचा सरदार) (१४९०)

- **वीरनरसिंह** (१५०५)
- **कृष्णदेव** (१५०९)
- **रंग.**
  - **सदाशिवराय** (१५४२-६७)
- **अच्युतराय** (१५३०)

- **रामराय** (कृष्णदेवाचा जांवई व प्रधान) (मृ. १५६५)
- **तिरुमल** (१५६७) चंद्रगिरीस स्वतंत्र.
- **व्यंकटाद्रि** (मृ. १५६५)

NATIONAL ARCHIVES OF INDIA

(१८). काश्मीरचे सुलतान (पृ. ३१६).

१. शहामीर ऊर्फ शम्सुद्दीन (१३२६)

जमशीद | २ शेरअली ऊर्फ अला-उद्दीन (१३४९) | ३ शहाबुद्दीन (१३६३) | ४ हिंदाल ऊर्फ कुत्बू-उद्दीन (१३८६)

५ शिकंदर बुत्शिकन (१३९६)

६ अमीरखान ऊर्फ अलीशहा (१४१६) | ७ झैनू-उल्-अबिद्दीन (१४२२)

८ हाजीखान ऊर्फ हैदर (१४४२) | ....

९ हसन (१४७३) | १० फत्तेखान (१४९६)

महंमद (१४८६-१४९६ व १५०७-१५३५).

---

(२३). मुलतानचें लंगा घराणें (पृ. ३३२).

१ रायसिन्हा ऊर्फ कुत्बुद्दीन (१४४५)

२ हुसेनशहा लंगा (१४६९)

३ महंमूदशहा लंगा (१५०२)

४ हुसेनशहा लंगा दुसरा (१५२४)

NATIONAL ARCHIVES OF INDIA

(१९). बंगालचे स्वतंत्र सुलतान (पृ. ३२०).

१ कद्रखान (१३४१)
२ मलीक अली मुबारिक (१३४४)
३ हाजी इलियास ऊर्फ शम्सुद्दीन पूरबी (१३४६)
|
४ शिकंदर पूरबी (१३५७)
|
५ ग्यासुद्दीन पूरबी (१३६७)
|
६ सुलतान उस्-सुलातीन (१३७४) ७ शम्सुद्दीन दुसरा (१३८३)
........................(१३८३-८६)
८ हिंदु राजा कंस (१३८६)
|
९ जितमल्ल ऊर्फ जलालुद्दीन (१३९२)
|
१० अहंमद (१४०९)
११ नासिरशाहा (१४२७)
१२ बूर्बक (१४२९)
१३ यूसुफ् (१४४५)
१४ फिरोज पूरबी (१४६१)
१५ अला-उद्दीन पूरबी (१४९६)
|
१६ नशीब (१५२३-३९)

(२४). सिंधचें जाम घराणें (पृ. ३३२).

१ जाम आफ्रा (१३३६)	६ जाम निजामुद्दीन (१३९१)
२ जाम चोभान (१३३९)	७ जाम अली शेर (१३९३)
३ जाम बनी (१३५३)	८ जाम फत्तेखान (१४०९)
४ जाम तिमाजी (१३६७)	९ जाम तुघ्लख (१४२३)
५ जाम सलातीन (१३८०)	जाम फिरोज (१५२०)

NATIONAL ARCHIVES OF INDIA

(२१). खानदेशचे सुलतान (पृ. १२७).

१ मलीक राजा फरुकी (१३७०)

२ मलीक नसीर फरुकी (१३९९)

३ मीरन आदिलखान फरुकी (१४३७) हसन

४ मीरन मुबारिकखान फरुकी (१४४१) ७ आदिलशाहा (१५१०)

५ आदिलखान फरुकी दुसरा (१४५७) ६ दाऊदखान फरुकी (१५०३) ८ मीरन महंमदशाहा (१५२०)

मीरन बहादूरखान (१६०१)

(२२). जोनपूरचें शर्की घराणें (पृष्ठ २३०).

१ सुलतान-उस्-शर्की (१३९४)

२ मुबारिकशाहा शर्की (१३९९)

३ इब्राहीमशाहा शर्की (१४०१)

४ महंमूदशाहा शर्की (१४४०)

५ महंमदशाहा शर्की (१४५७) ६ हुसेनशाहा शर्की (१४५७–७६).

NATIONAL ARCHIVES OF INDIA

(२९). मेवाडच्या राण्यांचा वंश (पृ. २३४).

(अयोध्येचा सूर्यवंशी राजा रामचंद्र याजपासून ह्या घराण्याची उत्पत्ति समजतात.)

कनकसेन (स.१४४, राजा रामचंद्रापासून त्रेसष्टावा पुरुष).

बाप्पु रावळ(स.७१३,रामचंद्रापासून ऐशींवा पुरुष, चितोड काबीज ७२८)

सुरजमल्ल. समरसिंह (११५०, लग्न पृथ्वीराज चव्हाणची बहीण पृथा).
(बाप्पुरावळपासून अठरावा पुरुष)

भरत.

कल्याणराय. कुंभकर्ण. नेपाळवंश. कर्ण स. ११९३
परागंदा. डोंगरपूरचा वंश.

रहूप (१२०१, रावळ, घेलोट हीं नांवें सोडून, राणा, व शिसोदे हीं नांवें रहूपनें घेतलीं).

उर्सिंह. लक्ष्मणसिंह (१२७५) (चुलता भीमसिंह क. पद्मिनी)

हमीर (१३०३) अजयसिंह.

खेतसिंह (१३६५) सुजनसिंह (सातारकर भोसल्यांचा पूर्वज).

राणा लक्ष्मणसिंह (१३७३)

चंद्र. मुकुलजी (१३९८)

कुंभ (१४१९) बायको मीराबाई.

उदयसिंह (१४६९)

NATIONAL ARCHIVES OF INDIA

- रायमल्ल (१४७४)
  - संगराणा (१५०९)
    - रत्नसिंह (१५३०).
    - विक्रमाजित (१५३५).
    - उदयसिंह (१५४१).
      - राणा प्रतापसिंह (१५७२).
        - अमरसिंह (१५९७)
          - कर्णसिंह (१६२१)
            - जगत्सिंह (१६२८)
              - राजसिंह (१६५४)
                - जयसिंह (१६८१)
                  - अमरसिंह दुसरा (१७००)
                    - संग्रामसिंह (१७१६)
                      - जगत्सिंह दुसरा (१७३४)
                        - प्रतापसिंह दुसरा (१७५२)
                          - राजसिंह दुसरा (१७५५)
                        - *अरिसिंह (१७६२)
          - भीमसिंह.
  - पृथ्वीराय
    - बनबीर (१५३५) नागपूरकर भोसल्यांचा पूर्वज.
  - जयमल्ल.

- *अरिसिंह (१७६२)
  - हमीरसिंह दुसरा (१७७२)
  - भीमसिंह (१७७८)
    - जवानसिंह (१८२९)
      - स्वरूपसिंह (१८४२)
        - शंभुसिंह दत्तक (१८६१)
          - सज्जनसिंह (१८७४)
            - फत्तेसिंह (१८८४--प्रस्तुत हयात)
      - सरदारसिंह दत्तक (१८३८)

(२६). अंबर किंवा जयपूर येथील कच्छवाह वंश. (पृ. २५१).

रामाचा मुलगा कुश याजपासून.
|
नळ.
|
धवलराय
(नळापासून चवतिसावा पुरुष)
|
कौंकल (१०३७)
|
हंनूनजी.
|
आनुर्बवजी.
|
पंजून, पांचवा पुरुष
ल. पृथ्वीराज चव्हाणाची बहीण.
|
पृथ्वीराज.
(अकरावा पुरुष).
(उजवीकडे चालू).

पृथ्वीराज.
|— भीम.
|— बहारमल्ल.
  |— ....
  | |— जगत्सिंह.
  | | |
  | | ......
  | |— मानसिंह.
  | |
  | भावसिंह (१६१५)
  |— भगवानदास.
  | |— मानसिंह दत्तक १५८९
  | |— मुलगी. ल. जहांगीरशीं
  |— मुलगी. (लग्न अकबराशीं)

......
|
जयसिंह पहिला (१६२१) मीर्झा राजा.
|— रामसिंह पहिला (१६६८)
|— कीरतसिंह

भावसिंह (१६१५)
|
महासिंह (दुर्बळ)
|
सवाई जयसिंह दुसरा (१६९९)
|— ईश्वरसिंह (१७४३)
| |— पृथुसिंह (१७६१)
| |— प्रतापसिंह (१७७८)
| |
| जगत्सिंह (१७९९)
| |
| जयसिंह तिसरा (१८१८)
| |
| रामसिंह दुसरा (१८३५)
| |
| माधवसिंह (१८८१–प्रस्तुत हयात).
|— माधवसिंह

NATIONAL ARCHIVES OF INDIA

(२७). मारवाडचा राठोड वंश. (पृ. ३१७).

कनौजचा राजा जयचंद
|
....
|
राव शिवजी (११९१)
|
राव अश्वत्थामा औत्थान
|
राव दुहार
|
राव रायपाळ
|
राव विरमदेव
|
चांद मृ. १४४२ (मंदोर शहर जिंकिलें).
|
रणमल्ल
|
जोधसिंह.
|
सुरजमल्ल (१४८९)
- चतुर्सिंह.

|
गंग पहिला.
|
गंग दुसरा (१५१६)
|
मालदेव (१५३२)
- जोधाबाई.
- उदयसिंह | १५७३
  - (दर्ग) राजा सूरसिंह* १६०६

सूरसिंह,* (१६०६)
|
गजसिंह (१६२०)
- अमरसिंह.
- यशवंतसिंह पहिला १६३८
  - अजितसिंह १६७८
    - अभयसिंह (१७२१)
      - रामसिंह (१७५२)
    - बख्तसिंह (१७५०)
      - विजयसिंह (१७७२)
        - शेरसिंह.
          - मानसिंह (१८०३)
            - चतुर्सिंह.
            - तख्तसिंह (१८४३)
              - यशवंतसिंह (१८७३)
                - सरदारसिंह (१८९५, प्रस्तुत हयात).
              - प्रतापसिंह. (ईडरचा राजा).
        - भीमसिंह (१७९२)
          - धोकळसिंह.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

(२८). मोगलवंश (पृ. ४०९).

(बायकामुलांची विस्तृत यादी प्रत्येक कार्किर्दीत दिली आहे.)

- तयमूर लंग (१३३५)
  - जहांगीर.
  - उमरशेख.
  - मीरन (मृ. १४१०)
    - सुलतान खलील
    - सुलतान महंमद
      - अबूसईद मीर्झा (१४५२)
        - अहंमद
        - महंमद
        - शहारुख्
        - उलूघबेग
        - उमरशेख (मृ. १४९३)
          - १ बाबर (१५२६)
            - २ हुमायून (१५३०)
              - ३ अकबर (१५५६)
                - ४ सलीम ऊर्फ जहांगीर (१६०५)
                  - खुस्रू
                  - ५ खुर्रम्, शहाजहान (१६२७)
                    - दारा
                    - सुजा
                    - ६ औरंगजेब (१६५८)
                    - मुराद
                  - पर्वीझ्
                  - शहर्यार
                - दानियाल
                - मुरार
              - हकीम
              - इब्राहीम
            - कामरान
            - हिंदाल
            - अस्करी
          - जहांगीर
          - नासीर
        - आणखी चार
  - शहारुख.

NATIONAL ARCHIVES OF INDIA

६ औरंगजेब

महंमद ७ मुअज्जम बहादूरशाहा (१७०८) अज्जम अकबर कामबक्ष

अजीमुश्शान ८ जहांदरशाहा (१७१२) खुजिस्ता अख्तार

९ फर्रुखसेयर (१७१३) १२ दुसरा आलमगीर (१७५४)

१० महंमदशाहा (१७१९)

१३ शाहाअलम (१७६१)

११ अहंमदशाहा (१७४८)

१४ महंमद अकबर (१८०६)

बेदरबख्त

१५ बहादूरशाहा (१८३७-५७).

NATIONAL ARCHIVES OF INDIA

सूची.

अनुक्रमणिका विस्तृत असल्यामुळें विषयांची सूची निराळी न देतां, फक्त भूगोलिक स्थलांची व पुरुषांच्या नांवाची सूची पुढें दिली आहे.

भूगोलिक स्थळें.

अ.

अजमीर ६३,८९,९३
अटक ४८८.
अनागोंदी १५८,२९३
अन्हिलवाडा ९४,१३१,२०१ पाटण.
अनारकली ४९४
अमूदर्या नदी ६१
अमृतसर ८१६
अयोध्या ८४३
अरोडशहर ५१
अर्कोट १३५
अशीरगडचा किल्ला ४९४
अहंमदनगर २३९,२५०,४९२
अहंमदाबाद २२८,४८४,४८५,६६५
अंदिजान ४१०
अनंतापूर ३११
अंबर ३५२,५०१
अंबाला ४७१

आ.

आक्शी ४१४
आग्रा १९१,४०३,४१९,४२६–२७, ४५१, ४६५, ४७२, ४७८, ४८४, ५४३, ५७१, ६०९, ६४२, ६४४, ६५३, ६५६, ६६८, ६७१, ६७४, ६७९,६८०,६८९,७०१,७०३.
आन्ध्र १३५

इ.

इजिप्ट २०,३०,१०४,४६२
इराण ११, २०, २१, ६१, ७०, ७७, १५७
इलिचपूर १२२
इस्तंबूल ११

उ.

उज्जनी १०२,३२३
उदेपूर १२९,४९४
उमरकोट ४५९

ओ.

ओर्च्छा ४९६,६४३,६९२

औ.

औरंगाबाद खडकी पहा ६४९

क.

कच्छ ४८६
कंदाहार१२८ ४३३,४६०,४९१,६७४
कंबलु (हल्लींचें पेकिन) ५३
कनोज ६३,८९,९०,९३,४८९
कर्नाळ ९१
कर्नूळ ३११
कलबुर्गा २२२
कलिंग १३५
कलिंजर ६३ किल्ला ९४, ९७, ४८३, ४८३,६१९

NATIONAL ARCHIVES OF INDIA

कांगरा नगरकोट पहा ४०२
कांची नगर १३५
काजवा (लढाई) ६६२
कान्स्टांटिनोपल २४,४२,४३,४६१
काबूल १२८,४८८
कामरूप आसाम पहा
काल्पी ९४,९७
कालिकोट ७९५
काशी ९३,९७,७०९
काश्मीर ३१३, ४८८
कुरा १२०
कुरुक्षेत्र १०१
कैरो २८,३३
कोर्डोव्हा २८,३३
कोहिक नदी ४१४

ख.

खडकी, औरंगाबाद पहा ६४९
खंबायत ४४५,४८४
खानबलीक (पेकिन) ५३
खिवा ५३
खुरासान ९७
खेळणा किल्ला २३३

ग.

गज्नी ६१,६२,९४,९६,१०१,१०५, १२८,४१५
गडकोट ६९५
गडमंडळ ६९३
ग्वाल्हेर ९४,९७,३२३
गोगरानदी ४२५,४८६
गोरखपूर ७८६
गोवळकोंडा २५२,२८२ (हिऱ्याच्या खाणी ६४६,६४८
गोवा ८०७
गौड ९९,३१०,४८४,३२२,४४८
गौहटी १००

घ.

घेरगांव ६९१

च.

चंदेरी ४२०,४२५
चंद्रगिरि ३०६
चांपानेर ४४५,४८४
चित्तगांव ७०४
चितोड ९३,१२९,४२०,४४४,४४५, ४५३,४८३,५२१.
चुनारगड ४४३, ४५६, ४५७, ४८४

ज.

जगन्नाथ ९९
जयपूर १३२,३५२,४८२,५३०,५५७
जरुसलेम २०,२४,३०,४१
जाजव (लढाई) ८१४
जालनापूर (शहापूर पहा)
जालंदर ४७२,४७४
जुनागड ४८६,४९०
जुन्नर २५४,८०५
जोधपूर ९४,३६१,३७७,४५९,४८२, ५३०,६५३
जोनपूर १७०, ३३०, ४०२, ४२५, ४४३,४४९

ट.

टूर्स २७.

ठ.

ठठ्ठा ४९१,६६६

ड.

डमास्कस २४
डाका ७०४

NATIONAL ARCHIVES OF INDIA

त.

तक्षशिला ३९२
तालनेर ३२७
तालिकोट २९९,३००,३०४
तार्श्कंद ४१४
तोडा ४८६
तिबेट ९९
तिरहूत १५१
तुघ्लखाबाद १५१
तुंगभद्रा २९३
तैलंगण १३५

द.

दर्यापूर ४८७
दाभोळ २९१
दिल्ली ६३, ९०,९४, ९५, ९७, १०१, १०५, ११८, १३२, १५१-१५२, १५५,१६४, १७७, १८७, १९३, ४०१,४२०, ४२१, ४६५, ४७२, ४७४, ४८५, ६२५, ६६१, ६७८ (शहाजहानाबाद), ६८८, ६८९, ८३३,८३६, ८५०, ८५७, ८६२, ८६७,८६९
दिवापूर ७२७
दीपलपूर ११२
दीव ४४५
देवगड } दौलताबाद पहा.
देवगिरि } दौलताबाद पहा.
देवरा ६६५
देवल बंदर ५९
दोहद ६४१
दौलताबाद १२१,१५५,२५६,२५८
द्वारसमुद्र १३६

ध.

धरमतपूर ६५३
धार ३२४
धोलपूर ४२५

न.

नगरकोट (कांग्रा, भीमनगर) ६७,८०
नदिया ९९
नरवार १०५
नागोर ४७६
नार्नोळ ७१०
नारायणगांव ९२
निशापूर ९७

प.

पन्ना ६९६
परिंडा २५४
पाटण (अन्हिलवाडा पहा) ४८४,४८६
पाटणा ३२०,४५५,४८७
पानिपत-पहिली लढाई १९३, ४१७, दुसरी ४७३, तिसरी ८५२
पांड्य १३५
पुणें २५८
पेनकोंडा ३०६
पेशावर ६४,४४६

फ.

फरघानाप्रांत ६१
फिरोजकोह ९५२
फिरोजाबाद १६४
फत्तेपूर (शिक्री पहा) ५२१

ब.

बंकापूर २७१, २९६
बक्कर किल्ला ५८, ४६६,६६६
बक्सार ४४९

बॅक्ट्रिया ३९२
बगदाद, २७,२८,३३,३४
बंगालप्रांत ९८,१६३,४८६,४८७.
बडोर्दें ४८४,७९६
बदकशान् ४१७,४६२४७२
बदाऊन १८९
बनारस काशी पहा.
बऱ्हाणपूर ४९३
बल्क ६३४
बहादरपूर ७२७.
बहारप्रांत ४२५,४८७
बागलाण ६४३
बाल्कन द्वीपकल्प ४३
बास्फोरस २४.
बाळापूर ८३०
बिकानेर ४८३
बियाना ४४४, ४५५,४५७.
बुखारा ५१,६१,६२
बुंदेलखंड ९४,१०५,४४३,६९२
बेदरकिल्ला २२८,२६३,६५९
ब्रह्मपुत्रा ९९,१००.

भ.

भडोच ४८४,४८५
भागीरथी ४२५
भाट्यांचें राज्य ६५
भिलसा ४२०
भीमनगर नगरकोट पहा.

म.

मक्का ९,१०,११
मच्छलिपट्टण ८०३
मच्छीवाडा ४७६
मथुरा ३९२
मदीना ९,१०,१२
मंदेसोर ४४५
मद्रास ८०३
मलबार १३५,१४८
महोबा ६९२
मानकोट ४६१,४७१
मांडवगड ३२४,४४५,६५३
मिथिलादेश १५१
मिसर ११
मीरत ४७२
मुद्गल २९८
मुंबई ८०४
मुलतान ५८,१००,३३२
मेवाड १३१,३३६,४२०,४२१,४८२
मेडते ४८२
मोगलपुरा(दिल्लीचा भाग) ११९,१२८
मोंगीर ४८९

य.

यमुना नदी ११३

र.

रतनभोर १३२, ४५३, ४८३
राजमहाल ४४८
रामेश्वर १२६
रायचूर दुआब ३६३,३९८
रायसीन ४५१
रूमशाम ८,११
रोठसगड ४४८,४४९,४५१
रोहटक ४६४,५३२

ल.

लखनौती (गौड पहा)
लाहोर १०१,४६४

व.

वरंगळ ११३,१३५,२९४
वऱ्हाड २५३

विजयनगर उत्पत्ति २९४ नाश ३०५.
१६३,२९२,३६६,३७०
विजापूर २५१
विशाळगड २३३

श.

शहाजहानाबाद दिल्ली पहा ६७८
शहापूर ४९३
शिक्री (फत्तेपूर) ४२०, ४२२, ५११,
५२७५,४५,५८०
शिरोंज ८३३
शिवालीक ४७१

स.

संबळ ४४२,४५५,४८४
समरकंद ४१०
सरहिंद ४६४,४६७,८१९ कत्तल
सातारा २५०
सामूगड ६९४
सारसा ४८४.
साष्टी ८११
सिकंदरा ५००
सिंध५८,९५,१००,१०९,४९०,४९१
सियालकोट ४१७
सुपें २५३
सुरत ४८५,४८६
सोनारगांव १०९, ४५३
सोमनाथ ६९
सोलापूरचा किल्ला २५०
स्थानेश्वर ८०,९२
स्पेन २६

ह.

हंसी ८०
हिसार ४१०
हिरात ४१०,४१५
हुकेरी ७९४
हुगळी ६३३,६४३

NATIONAL ARCHIVES OF INDIA

प्रसिद्ध पुरुष.

अ.

अकबर—जन्म ४६९ विद्याभ्यास व बाळपण ४७० सरदारांचे बखेडे ४७४, ४८१ त्यानें जिंकलेले प्रदेश ४८१ जोधपूर व रजपूत राज्यें ४८२ गुजराथ ४८४ बंगाल ४८६ काबूल, काश्मीर ४८८ सिंध ४९० कंदाहार ४९१ महाराष्ट्र ४९२ मृत्यु ४९८ बायकामुलें ५०२ नवीन धर्मस्थापना ५०२–५२० वादविवाद करण्याची चाल ५०८ धर्मसमजुतींत फरक, धर्मस्थापनेची सुरवात ५१२ सुधारणा ५१४ नवरोजचा समारंभ ५१५. शरीर, स्वभाव व करामत ५२० शारीरिक खेळांची आवड व पोलोचा नाद ५२२ दरबारचा वामडौल ५२३ देहान्तशिक्षा ५२४ दररोजचा दरबार ५२४ तोफा बंदुका ओतण्याचा कारखाना ५२४ आहार ५२४ मांसाहाराविषयीं मत ५२५ त्याचा नवीन धर्म आणि नवीन शकाची सुरवात ५२५, त्याचे दुर्गुण ५२५ क्रूर वर्तन ५२६ राज्यकारभाराचें धोरण ५२७ जनानखान्यासंबंधीं धूर्तता ५२९ हिंदु देवतांची पूजा ५३० एकछत्री अंमल ५३० जमाबंदीची व्यवस्था ५३१ जिझिया कराची बंदी ५३२, ५४१ वसूल गोळा करणारे ५३१ त्याचे अमीर, मनसबदार आणि अहदी ५३५ अवांतर सुधारणा ५३८ सुभेदार ५३८ न्याय ५३९ सिज्दा ५३९ झरोका ५४० खुशालखाना ५४० छावणीचा देखावा ५४१ गुलामगिरीबंद ५४१ नीतिसुधारणा ५४१ तवारीख ५४२ अर्जदारांची घंटा ५४२ चित्रकलेंतील मार्मिकता ५४२ आग्रा शिक्रीची बांधकामें ५४३ फत्तेपूर शिक्रीची मशीद ५४४ हुमायूनची कबर ५४४ इबादतखाना ५४५ हिंदूंची नीतिमत्ता ५४८ अशोकाशीं तुलना ५४८ नवरत्न दरबार ५५८–५७०

अकबर-औरंगजेबाचा पुत्र ६९९, ७१२

अकबर २रा, शहाआलमचा पुत्र, ८६९

अंगद ८१६

अग्रदास ७८३

अच्युतराय-विजयनगरचा राजा २९७

अजयपाळ सोळंखी १९७

अजितसिंह जोधपूरचा ५०१

अजीजकोका ४८४, ४८५, ५५७, ५७०

अजीमखान ६२९

अजीमशहा ६९७, ७१२

अझमखान ५७०

अथेनेसियस निकितन, प्रवासी २४३

अद्वैतानंद ७८५

अनंगपाळ दिल्लीचा ९०

अनंगपाळ (आनंदपाळ) ६५, ६६

अनंतवर्मा चोलगंग ४०१, ४०२

अप्पया दीक्षित ३९९

अंबरराय २३३

NATIONAL ARCHIVES OF INDIA

अबुल् फज्ल् ४८९,४९३, सलीमचें वैर व खून ४९४ ४९६,५०५ धर्मस्थापनेस मदत ५०६,५२०, ५२८, ५३२, ५४०, ५४३, ५४८ ५५१,५५२,५५३ जन्मवृत्त ५५५-५६०, ग्रंथ ५६१
अबुलफत्त हकीम ७५२
अबुल् मुज्फर यूसुफ आदिलशाहा २६१
अबूबकर् १४,१९,१७३
अबूसईद मीर्झा ४०९
अब्दुल्लाखान ४७४
अब्दुल्ला मीर्झा ४२९
अब्दुल्ला मोगल ५०१
अब्दुल्ला सय्यद ८१६
अब्बास २ रा ७०१,७०५
अब्दुर्रह्मान् जामी ४३१
अब्दुल्लतीफ मीर्झा ४२९
अब्दुल् हुसेन कुत्बशहा २८९,२९१
अभयसिंग ८३२
अमरदास ८१६
अमरसिंह, जैनपंडित ८९,१९८
अमरसिंह-जोधपूरचा राजा ६३०
अमरसिंह रावळ ९०
अमीरखान-यज्दचा, व साहेबजी ७५३
अमीर खुस्रू कवि ४५,११३,५५८
अमीर बेरीद २४४
अमीर सय्यद बेरेका १८४
अर्जुनदेव वाघेला २००
अर्जुनमल्ल ८१६
अरुणराज ऊर्फ आनाक वाघेला २००
अल्पतगीन ६१,६२
अलाउद्दीन इमादशहा २४५
अलाउद्दीन काश्मीरचा ३१८
अलाउद्दीन खिलजी ११९, दक्षिणेंत प्रथम प्रवेश १२०, राज्यारोहण १२२, पराक्रम १२५, चितोडची स्वारी १२९, मृत्यु व राज्य-व्यवस्था १३७ करामत व योग्यता १४०-१४६
अलाउद्दीन घोरी ८१-८३
अलाउद्दीन लोदी ४१७,४४४
अलाउद्दीनशहा ऊर्फ हसन गंगू २२० स्वातंत्र्यधारण २२१,२१२
अलाउद्दीनशहा बहामनी २४०
अलाउद्दीनशहा, बेदरचा बादशहा २२९
अलाउद्दीन सय्यद १८८ अंत १८९
अलाद्दीन मस्ऊद १०४
अलीआदिलशहा २ रा २७५ २७७ सीदीजौहरचें बंड २७६
अलीगौहर, शहाअलम ८५२-८५४, ८५४ इंग्रजांशीं तह, मराठ्यांचा आश्रय ८५५ दिल्लीस स्थापना ८५७ अखेर ८६८, ८६९
अली-बेरीद २४४
अलीमर्दाखान ६३३,६७३,६७४७६२
अलीवर्दीखान ८४१
अलीशहा-काश्मीरचा ३१८
अल्तमश ९७,१००,१०३,६९२
अल्महदी खलीफा ३१
अशोक ५४८,५४९
अस्करी मीर्झा ४२५,४४२
अहंमद निजामशहा २४५
अहंमद मीर्झा ४१०, ४२९
अहंमदशहा अब्दाली, ८२२, ८३७, ८३८,८४४,८५०
अहंमदशहा गुजराथचा २०५,२०६

NATIONAL ARCHIVES OF INDIA

सूची.

अहमदशहा दिल्लीचा बादशहा ८४५
अहमदशहा २ रा २१३
अहमदशहा बहामनी १४०
अहमदशहा वली २२७
अहमदशहा सूर ४५६
अहमद, सामानी सुलतान ६१

आ.

आक्वेव्हिया-पाद्री ५१९
आटावेग ४१
आटोमन तुर्क ४२
आदमखान ५७०,४७७,४७८
आदिलखान ४५३
आदिग्रंथ ८१६
आंध्रराजे १३६
आब्बासी खलीफा २७
आब्बास सारवानी ४५४
आरबखान-अहमदाबादचा सुभे.७९६
आरामबानू ५०२
ऑर्म्, रॉबर्ट ८१०
ऑलिव्हर क्रॉम्वेल ६८५
आलमगीर ६८५,७२९
आलमगीर २ रा ८४८,८५१
आलम्अली ८२९
आलफ्खान १३१,१३३,१३९,४०१
आल्बुकर्क २६२
आल्बेरूनी प्रवासी ३९५,३९८
आशानंद ७८२
आसदखान,बहामनी सर. २६६,४०५
आसफ्खान-अकबराचा कामदार ५३१
आसफ्खान नूरजहानचा भाऊ ५८३,
५९८,६००,६०८,६५८,६७२

इ.

इक्बनी कुरानी ८९
इतबारखान ७०१
इनिमादुद्दौला (ग्यासबेग पहा).
इब्नबतूता-प्रवासी १५२,१६०
इब्राहीम कुत्बशहा १८३-२८७
इब्राहीम आदिलशहा १ ला २६४-६७
इब्राहीमखान लोदी १९१ पानिपतची
लढाई व मृत्यु १९३,४१७-१९
इब्राहीम आदिलशहा २रा २६८-२७१
इब्राहीमखान सूर ४५६
इसान दौलत बेगम-बाबरची स्त्री ४१०
इस्पहानी-कवि ५५७
इस्माईल आदिलशहा २६२-२६४

उ.

उस्कायखान ४३१
उदयसिंग १२९
उदेपुरी ७००,७२८
उमरखान शहाजादा ४६
उमरशेख मीर्झा ४०९
उमीचंद ८४२
उलुघबेग ४०४,४१०,४१५,४२९
उस्ताद अलीकुली बाबरचा काम.४२३
उस्मान खलीफा ३१

ऊ.

ऊझबेग ४१४,६३४

ए.

एलिझाबेथ ५४६,५५०, ५५१, ५८७
एल्डोज् ९७,१०१

ऐ.

ऐनुल्मुल्क १४७.
ऐने-अकबरी ५५१,५६०,५६४,५६९
ऐबक-कुत्बुद्दीन पहा.

ओ.

ओक्ताइखान ५२,५३

औ.

औरंगजेब–जन्म व बालपण ६४१-४६, मध्य-आशियांत स्वारी ६३३-३५, मीरजुम्लाशीं स्नेह ६४७, राज्यपदाकरितां युद्ध ६४९–६६७, सज्यारोहण ६६०, परिस्थिति ६८५, उद्देश ६८८, बुंदेले युद्ध ६९२, आजार ६९६, बायकामुळें ६९९, युद्धें ७०४, हिंदूंचा छळ, रजपूतयुद्धें ७०७-७१४, दक्षिणची स्वारी व मृत्यु ७१५, योग्यता ७२९, राज्यव्यवस्था ७३४, शिस्तींत तयार झालेले सरदार ७३७, मोगल व मराठी फौज तुलना ७२०
औरंगाबादी महल ७००

क.

कंदाहारमहल्–शहाजहानची स्त्री ६३५
कनिष्क ३९३
कबीर ५०५,६८७,७८२,७८७
कमरुद्दीनखान ८३०
कमलादेवी १३२,२०१
कयमाष ९०
कर्णराय १३१
कर्णराज चालुक्य १९६
कर्णवाघेला २००
कर्माणी कांवे १८५
कल्पसूत्र ७८७
कल्याणमल्ल ४८३
कल्हण ३९९
कानफाटे गोसावी पंथ ७८६
कामबक्ष ६४४, ७००, ७२९, ८१३ मृ. ८१४
कामरान-बाबरचा मुलगा ४४२,४४९, ४५०,४६१ मृत्यु ४६३
कासमखान-अफगाणिस्तानचा ७०७
कासिमखान–आग्रा बांधणारा ५४४
कासीम बेरीद २४३
कील ७८३
कुत्बुद्दीन ऐबक ९४,९७,१००
कुत्बुद्दीन सूर ८१
कुत्बशहा गुजराथचा २०७
कुत्लकनिगारखानं-बाबरची आई ४१०
कुव्लाईखान १८०
कुमारपाल ४०३
कुमारपाल सोळंखी ११७
कुली कुत्बशहा २८२
कुंभ-मालदेवाचा सरदार ४५२
कुंभराणा-मीराबाईचा पति २०७
कृष्णदेवराय-विजयनगरचा २९७,७८४
कृष्णनाईक वरंगूळचा १५८
कृष्णाकुमारी ३५१
कैकुबाद ११३,११४,११८
क्लोव्हिगो-स्पेनचा वकील १८०
क्षेमेंद्र ३९९
क्षेमेश्वर पंडित ६३०

ख.

खानखानान ५७०-७६-७८,८५-८६
खानजहान लोदी ६२७,६२८,६९३
खाफीखान ५५४,६७५,७०९.
खिजरखान सय्यद १७९,१८६.
खुर्रम् (शैहाजहान पहा)
खुस्रू सरदार १४७,१४८,१४९,३८६
खुस्रू–जहांगीरचा मुलगा ५७३,५७४, ५७७,५८१,५८६.

ग.

गंगू ब्राह्मण दिल्लीचा २९५,३१४
गंगेश ३९९
गजसिंह जोधपूरचा राजा ६३०
गाजीउद्दीन-वजीर८४९-५०शेवट८५१
गिबन १७४,३७०,४३८
गुरु गोविंदसिंग ८१७,८१८
गुलबदन ४६६,४९७,५५१
गुलामकादर ८६०,८६२, दिल्लींतील अनन्वित कृत्यें ८६३,८६६
गोरखनाथ ७८७
गोवर्धन ३९९
ग्लॅड्विन् ५६१
ग्यासबेग-नूरजहानचा बाप५८०-८३, ६३७
ग्यासुद्दीन तुघ्लख १२८, १४६,१४९, १५०,१५१,२०३

च.

चरणदास ७८६
चंगीजखान ३८,४७,५०,५२, ५३, १०५,१७५,४०४,८५२
चंदभाट ८९, त्याचा रासा ग्रंथ ९६
चंपकराय ६४३
चंपतराय ६५४,६९३
चंद्रगुप्त ३९२
चालुक्यवंश १९५
चामुंडराय ९०-९२
चामुंडराय चालुक्य १९५
चार्लस् १२ वा ६८६
चांदबिबी २५१-५५,२६९,४९२-९३
चैतन्य ७८५
चोलराजे १३६

छ.

छत्रसाल ६४३,६९४

ज.

जगजीवनदास ७८८
जगत्सिंह उदेपूरचा राजा ६३०,६३४
जगन्नाथ दीक्षित ३३९
जगन्नाथ पंडितराय ६७५
जमशीद कुत्बशहा २८३
जमालखान ४४६
जयचंद ८९,९०,९२
जयपाळ ६२,६३,६४,६५
जयमल्ल ४८३,५२१,५६३
जयसिंह ६०१,६३०,६६२,६९७
जलालखान लोदी १९२,४४३
जलालुद्दीन खिलजी ११८ सात्त्विक-वृत्ति ११९,१२०,१२३,१२४
जलालुद्दीन फिरोज मलीक ११४,११८
जशवंतसिंह ३५९,६३०,६५३,६६३, ६६५,७०७, ७११, मृ० ७१२
जहानआरा ६३७,६३९,६७२,७००
जहांगीर-२५७,२७१ दुर्वर्तन ४९४-५०१, ५३५, जन्म ५४४, ५५९, राज्यारोहण व बारा फर्मानें ५७१, बायकामुळें ५७३, रजपुतांशीं युद्ध व कारकीर्द ५७७, काश्मीरची स्वारी व मृत्यु ६०७, योग्यता ६०९, जीवनक्रम ६१५, धर्म ६१९, राज्यव्यवस्था ६२१, स्वारीचा थाट ६२३
जहांगीर मीर्झा ४१३
जहांदरशहा ८१९
जाफरखान, हुसेनगंगू पहा.
जिजीअनागा ५७०

जीवनखान ६६६
जैन परमार ८९
जैनपंथ ७८७
जोगेंद्रसिंह ५६३
जोधाबाई ५०१,५७३
जौहर ४६७, ५५१

झ.

झगताईखान ५२,१७५,४०९
झबेताखान ८५७,८५८
झामोरीन १३५
झाली–चितोडची राणी ७८४
झीनतुन्निसा पादशहाबेगम ६९९,७२८
झुब्द–तुन्निसा ६३९
झुल्फिकारखान ८१५,८१९-२०-२१
झेबुन्निसा ६९९
झैन् उल अबिद्दीन ३१८
झैनखान कोका ४८९,५७०

ट.

टॅव्हार्नियर् प्रवासी ६४६, ६७५,७९७, ७९८,८०१,८०२
टायकोब्राही ४०४
टेनिसन् ५४९
टेरी-रेव्हरेंड् ७८८

ड.

डॉ. कॅरेरी-इटॅलियन प्रवासी ७१९
डी. बॉयन ८६१

त.

तयमूरलंग ३८, ४३, ४५, पूर्ववृत्तांत १७४, दिल्लीकाबीज १७८, स्वदेशीं गमन १७८, अवतार समाप्ति व योग्यता १७९, नांवाची उत्पत्ति १८०, दरबार १८२, लष्करी शिस्त १८५;४०४,५२७, ५४९.
तयमूरशहा ११२
तानसेन ५६६,५६७
तार्तारखान ४४४
तुघ्रलखान १०६
तुघ्रलबेग ४०
तुलसीदास कवि ७८३
तुलुईखान ५२,५३
तुहव्वरखान ६९५
तेघबहादूर-शीखगुरु ७१०,८१७,८१८
तेजपाल राजा वाघेला २००
तेमुजीन–चंगीझखान पहा.
तोडरमल २५६,४८५, ४८७, ४९०, ५३१–३५, ५५४,५६४,७४८

थ.

थिवेनॉट् ८०७,८०९

द.

दाऊदखान पन्नी ८१५
दाऊदशहा बहामनी २२४
दानियाल ४९३, लग्न ४९४,५०१, ५३५,चीं मुलें ५०२,६२८
दानिष्मंदखान(फज्लखान)६६६,७९७
दामाजीपंत २३४
दामोदर मित्र ३९९
दाराशेखो, शहाजादा ५७५, ५८३, ६३५,६४९–६६७,६९४
दाहिरराजा ५८, ५९
दिलरासबानू–औरंग०स्त्री ६४३,६९९
दिलावर अली ८२९
दिलावरखान घोरी (माळवा) ३२४
दिलावर घोरी २२४
दिलेरखान २७८, ३५९, ६९६, ७१४
दुर्गादास ७१२
देवराय–विजयनगरचा राजा २९६

देवराय २ रा २९६
देवलदेवी १३१, २०१
दौलतखानलोदी १८७-९३,४१७-१८

ध.

धन्ना जाठ ७८२

न.

नजीबखान रोहिला ८४८, ८४९, ८५१,८५४,८५६
नझर महंमदखान ६३५
नरपति १३४,१३६
नरसिंह बुंदेला ७०९
नरसिंहराय—कर्नाटकचा राजा २३४
नरसिंह—विजयनगरचा राजा २९७
नशीरखान—खानदेशचा सुलतान२२९
नसरतजंग ७२७
नादिरशहा३७,८२९,८३३,८३४-३८
नानक ३६६,३९२,५०५,७८७,८१५
नाभाजी डोंब ७८३
नासिरुद्दीन कुबाचा ९७,१००,१०१
नासिरुद्दीन महंमूद १०४
नासीर हकीम ७५२
निजाम उल्मुल्क्—मलीक हसन बहिरी २३३,२३८,२३९
निजामुद्दीन ११४, ११८
नित्यानंद ७८५
नीबर कार्स्टेन ८११
नुरुद्दीन कवि ५६६
नुसरतखान १७४
नुसरतखान—अल्लाउद्दीन सरदार २०१
नुसरतखान वजीर १३१
न्यूनिझ—पोर्तुगीझ गृहस्थ २९८
नूरजहान ५००, ५७३, ५७९—८५, ५९८,६०९

प.

पंचम—सूर्यवंशी ६९२
पद्मिनी १३०
परमानंद ७८२
पर्वीझ ५०२,५७३,५७५,५७८,५९१
पहारसिंह ६९४
पालराजे (बंगाल) ३२०
पीछाजान अनागा ५७०
पीट्रो—डिलाव्हेल् ७९१
पीपा—रजपूतराजा ७८२
पीरमहंमदखान ४७८
पीरमहंमद जहांगीर १७६
पुष्यमित्र राजा ३९२
पृथुसिंह—जसवंतसिंगाचा पुत्र ७११
पृथ्वीराजचव्हाण ८९,९०,११८,६९२
प्रतापसिंह ३४०—३४४
प्राणमल्ल ४५२
प्राणनाथसाधु ७८८

फ

फज्ल् (अबुल् फज्ल् पहा)
फत्त—हकीम ५६६
फत्तुल्लाखान ७२७
फत्तेउल्ला इमादशहा २४४
फत्तेखान-मलिकंबरचा पुत्र २५८
फरीदखान ४४६
फर्रुख्सेयर ५०१,८२०,८२३, ८२६,
फादर काट्रू ५७३,६६९
फिदाईखान ६९५
फिरोजजंग ७२७
फिरोजशहा बहामनी २२५
फिरोज तुघ्लख् रजपूत कन्येचा मुलगा १६३, बंगालच्या स्वाऱ्या १६३, जनहिताचीं कामें १६५,स्वतःचें मत

१६६, गुलामांचा संग्रह १७२ त्यांची हिंदुधर्मावर वक्रदृष्टि १६८, ७४७
फिर्दौसी ५२३
फेरिस्ता २५५, २५६, २६९
फैजी (सूफीपंथी कवि) ५०६
फैजी ४८९, ४९३, ५०५ पुस्तकालय ५४३ जन्म. ५५५-६०, ५६३, ५६७
फ्रा जोन पाद्री ७३७
फ्रायर डा. जॉन ८०२-८०७

ब.

बख्त्यार खिलजी ९९, १००
बदाऊनी ५०१, ५१२, ५३४, ५५२, ५६६, ५६७, ५६८
बद्रुन्निसा ७००
बराणी इतिहासकार १४०-१४५, १६०
बर्टन सर रिचर्ड-प्रवासी ३४
बर्नियर-फ्रेंच प्रवासी ४४१, ५५२, ६६६ ७३५, ७९७, ८१०
बल्बन १०५, १०६, ११३, त्याचा उपदेश ११०, ११२, १३४
बल्लाळदेव १५८
बल्लाळवंश १३५
बहादूरखान ५७०
बहादूरशहा गुजराथचा २११, हुमायूनची स्वारी २११, ४४३, ६४४
बहादूरशहा ७००, ८१३, मुलें ८१९
बहादूरशहा २ रा ८६९
बहारमल्लराजा ३४३, ३५३, ४८२, ६७४
बहूराम सुलतान ८१-८५
बहूरामखान ४५७, ४७०, ४७४, ४७७, ५२७, ५४०, ५५३, ५५४, ५५५, ५५६, ५६८, ५७०
बहूराम मोईजुद्दीन १०४
बाजबहादूर ४७८
बातू ५२, ५३
बाबर-दिल्ली काबीज १९३, ४०९ जन्म ४१०, अभ्यास ४११, नशीबाचे खेळ ४१२, पानिपतची लढाई ४१७ शिक्रीलढाई ४२०, मृत्यु ४२६, योग्यता ४२८, आत्मचरित्र ४३७
बाबालाल ७८८
बायजीद आटोमन सुलतान १७९
बायझीद, तुर्कस्थानचा बादशहा २०९
बार्बोझा, प्रवासी ३७०
बायसंघर मीर्झा ४२९
बिल्हण ३९९
बीबी दौलतशहा-अकबराची स्त्री ५०१
बीरबल मूळनांव महेशदास ४८९-९०, ४५५४, ५६४, ५६५
बीव्हरिज् ५१६, ५२३, ५३२, ५५१, ५५५
बुक्क-विजयनगरचा राजा २९५
बुक्क २ रा २९६
बुक्कराय १५८
बुद्धिचंद ५६५
बुऱ्हाण उल्मुल्क बाबी २१३
बुऱ्हाण निजामशहा २ रा २५०
बुऱ्हाण निजामशहा २४६
बुहलोल लोदी १८८, ४४६
बोग्राखान १०७
ब्रूनो ५४७
ब्लेझ पॅस्कल ५४७

भ.

भगवानदास ४८४-८८-९०-५०१-६२
भट्टोजी दीक्षित ३९९
भवानंद ७८२

भारतीचंद ६९२
भीमदेव ८९,९४
भीमदेव चालुक्य १९६
भीमदेव भोळा १९८
भीमराज ओच्छ्याचा राजा २३४
भीससिंग १३०
भूखनकवि ६५५
भूषणभाट ८९

म.

मक्‌बुल्‌खान–वजीर १६४,१६९
मखदुम्‌-उल्मुल्क ५५३,५५६,५५८
मंडेल्स्लो-जॉन-ऑल्बर्ट्‌ ड ६७९,७९६
मदनपंत उर्फ मादण्णा ७२४
मधुकरसा ६९३
मध्वाचार्य ७८५
मनसूर ६२
मनूची–इतिहासकार ५५२,७२३
मम्मट ३९९
मराठे ८५४
मलिकंबर २५५,२५८,६२८
मलीक उत्–तुजार २२९,२३०
मलीक काफूर १३२, १३३, १३५, १३६,१४६,२०१,३८६
मलीक–खिलजी सरदार ११८
मलीक सैफुद्दीन घोरी–२२३,२२५
मल्लू इकबाल्‌खान १७३,१८६
मसऊद सुलतान ७७
महंमद अमीनखान ८३०
महंमद अमीरखान ६९१,७०१
महंमद आदिलशहा २७१,२७५
महंमद कासीम ५८, ६०, १२८.
महंमद कासीमखान ४८९
महंमदकुली कुत्बशहा २८७
महंमदखान १८६
महंमदखानशम्सुद्दीनअकबरवजीर४७८
महंमद गवान वजीर २३१ योग्यता २३६,४०५,७५१
महंमद घोरी,स्वाऱ्या ८४,९०,९४,९५
महंमद जमान मीर्झा २११, ४४४
महंमद तुघ्लख १५३,१५६, वंडें व मृत्यु १५७, मनुष्यांची पारध१५८ कनोजची कत्तल१५८,योग्यता१५९
महंमद पैगंबर ८, ९, ११, लष्करी बाणा ११, धर्मस्थापना ११, मूर्तिभंग ११, मृत्यु ११, बायका १२, धर्म १२
महंमद-फिरोज तुघ्लखचा मुलगा१७३
महंमद-मीर्झा ४२९
महंमद मुअज्जम, (बहादूरशहा पहा).
महंमद मुरादखान ७२७
महंमदशहा ८२७–८४४
महंमदशहा आदिली ४८०
महंमदशहा–गुजराथचा २०७
महंमदशहा २ रा बहामनी २३२
महंमदशहा बहामनी २२२
महंमदशहा लोहानी ४४६
महंमदशहासूरआदिली ४५६.७१-७२
महंमद हकीम मीर्झा ४७२
महंमद हुसेन मीर्झा ४८५
महंमूद-गजनवी ४०,६२, स्वाऱ्या ६४ ६९, सोमनाथ ६८-७२ योग्यता ७३,७७
महंमूद तुघ्लख १८७,२०३
महंमूद नासिरुद्दीन १०४
महंमूद बल्बनचा मुलगा १०६, ११०
महंमूद बेगडा २०७ स्वभाव २०९

महंमूदशहा २ रा गुजराथचा १२२
महंमूदशहा बहामनी २२४,२३८,२३९
महंमूद लोदी ४४३
महंमूदशहा सुलतान १७३
महादजी शिंदे ८५७,८५९,८६७
महादी (धर्मोपदेशक) ५५६
महानंद ७८२
महाबतखान १७३,३४४,६९३,७०६
महाम अनागा ५५३,५७०
महावीर ७८७
महामबेगम हुमायूनचीआई ४२८,४४२
माधवाचार्य-विद्यारण्य २९४,३०७४०५
मानसिंग (राजा) ४८४,४८७,४८८,
५०१,५५४,५६२,५७३
मार्को पोलो ५३,४०७
मालदेव ४५२,४५९
मालवदेव १३१
मिहरुन्निसा ७००
मीर अब्दुल्लतीफ ५२२
मीरजुम्ला २८८,२८९,६४६,६९०,
७५१
मीरन हुसेन व इस्माईल निजामशहा
२७१,२७५
मीरबाबा ६६१,६६६
मीरमन्नु ८४८
मीराबाई ७८५
मीर्झा अब्दुर्रह्‌मान ५५५
मीर्झाखान ४८६
मीर्झा रुस्तम ६४३
मीर्झा हकीम ४८७
मुआविआ खलीफा १५,
मुजाहीदशहा बहामनी २२४
मुज्फरखान-जमाबंदी कामदार ५३१
मुज्फरशहा-गुजराथचा सुलतान २०५
४८४-८६,४९१, आत्महत्या ४८६
मुज्फरशहा २ रा २१०
मुज्फरशहा ३ रा २१३
मुज्फर हुसेन मीर्झा ६३५,६४३
मुन्यिमखान ४७९,५७०
मुबारिकखिलजी १४६-८७-८८,२०३
मुम्ताजमहल् उर्फ अर्जुमंदबानू ६३१,
६३५, ६३६, मुलें ६३७, ६४१,
स्मारक ताजमहाल ६८०, ६८२
मुराद-अकबराचा मुलगा,२५०,४८६
५०१,५३५,५५८
मुरादबक्ष ६३४
मुरादमीर्झा ७६१
मुराररराव-कुत्बशाहीचा दिवाण २८६
मुर्शीदकुलीखान ७२५,८३९
मुल्लादोप्याजा ५६३-५६४
मूर्तुजा निजामशहा २४८
मूळराज चावडा १९५
मेदिनीराय ४१५
मैमुद्दीन चिस्ती ५४४
मोगल घराण्याचा शेवट ८६८-८६९
मोगलबादशाहीचे तुकडे ८३८
मौदूद सुलतान ७९

य.

यशोधर्म ३९३
याकूब ३१
यूनसखान ४१०-४२८
यूसुफ् आदिलखान २३३,२३६

र.

रंगराय ऊर्फ तिम्मा (तिमराज) २९९
रघुनाथराय ७४९
रझिया सुलताना १०३,४६१

रणदुल्लाखान ६३०,६९५
रहमतुन्निसा ऊर्फ नबाबबाई ६९९
राजशेखर ३९९
राजसिंग ३९५
राजसिंह-राणा ७११
राजूबुखारी-शेख १९२
राजेंद्रसिंह ४०१
रामचंद्र वाघेला ५६६
रामचंद्रसा ६९३
रामदेवरावजाधव १२१ २२,१३१,३२
रामसिंह ६५४,७०३
रामानुजाचार्य ७८१
रुक्नखान १३२
रुक्नुद्दीन १०३,१०६
रुद्रप्रताप ६९२
रौशन-आरा ६९६

ल.

लक्ष्मणसिंग १३०
लक्ष्मणसेन, पालवंशी राजा ९९
लखुजी जाधव २५२
लवणराजा वाघेला २००
लुई १४ वा ५५१,५७१
लूथर ५०५,५४७,५५६
लोदीघराणें १८९, समाप्ति १९३

व.

वल्लभाचार्य ७८४
वस्तुपालराजा वाघेला २००
वाघेलवंश १९९
वॉरन् हेस्टिंग्स् ५६१
वासुदेव ३९३
विक्रमाजित ४७३
विक्रमादित्य तुवरवंशीय ९०
विक्लिफ् ५५६
विद्याधर ३५५
विद्यारण्य, माधवाचार्य पहा, ४०५
विनायकदेव २२२,
वीरकर्णराय १३३
वीरधवल राजा वाघेला २००
वीरनरसिंह-विजयनगरचा राजा २९७
वीरविजय-विजयनगरचा राजा २९६
वीरसिंह ४९६
वीरसिंहदेव- फज्लचा खून६९३,६२७
वीसलदेव चव्हाण-अजमीरचा राजा १९६ वीसनगरची स्थापना १९६
वुइल्सन् ५३२
वुल्यम फिंच ५४५
व्यंकटाचार्य ७८१
व्यंकोजी भोसले ११५

श.

शंकरदेव १२२,१३३
शंकरराय-खेळण्याचा राजा २३०
शंकराचार्य ७८१
शमसुद्दीन-काश्मीरचा ३१७ पुत्र ३१८
शयबान ५३
शयबानीखान ४१४-४२९
शरीफउद्दीन हुसेन मीर्झा ४८२
शरीफुद्दीन १७४
शहा-आब्बास ६५९,६६०
शहाआलम-अलीगौहर पहा.
शहाजहान-जन्म५७३-७४,५७८-८६, राज्यपदाचा झगडा ५९७-६०७, कारकीर्द ६२५, बायकामुळें ६३५-६४१ आजार व मुलांचा झगडा ६४९, योग्यता ६६८, जनानखाना ६७१, प्रेमळस्वभाव ६७२, वजीर ६७३, शिल्पकला ६७८, दिल्ली

६७८, आग्रा ६७९, ताजमहाल ६८०, मयूरासन ६८४, दिनचर्या ७३८–७४३.
शहाजादा सुजा–तोतया ७०६
शहाजादी खानम् ५०१
शहाजीभोसले२५८,२६०,६२८,६९४
शहानवाजखान ५४३,६४३
शहाबुद्दीनखान गाजीउद्दीन ८२८, ८३३,८४४,८४७
शहाबुद्दीन घोरी ९१–९६,१२८,३९२
शहामनसूर ५३१
शहामुनीर आलम ५५५
शहारुख–मीर्झा १८६
शाएस्तेखान ६३३,६५८,६९७,७०४
शाक्त ७८७
शान्दीरखान १२९
शिलादित्य २११
शिवाजी २५९,२६०, २७४, २७५,– ६९४,७०३
शिवाजीपंत मुत्सद्दी २५७.
शीख ८५८
शुक्रनिसा खानम् ५०१,५०२
शेख अन्वरखान ६९६
शेख जमाल ४११
शेख झैनुद्दीन ७२९
शेख मुबारिक् १३४, ५०५, ५०६, ५५५–६२,५६७
शेखसादी ११३
शेरअली उर्फ अलाउद्दीन ३१८
शेरशहा ४४३ जन्म ४४६,४५१– ४५४,५३१,५३३,२३३,५३४
श्रीहर्ष ३९३, योग्यता ३९३,३९९

स.

संगराणा ३३६-३४८-४२० पळ ४२४
संजर सुलतान ४१
सती उन्निसा ७५२
सदाशिवराय २९७
सफ्तरजंग ८४३ ८४७
सबक्तगीन ६२,६४
समुद्रगुप्त ३९३,
संयुक्ता ९०
सय्यदघराणें १८६
सय्यद महंमद बडा १९३
सरबुलंदखान ८२६,८३२
सर टॉमस रो ५७३,५७६,५९०,५९१ ५९२,६६९
सर्जाखान २७७
सर्फराजखान ८४०,८४२
सलीम चिस्तीशेख ५४४,५४५,५५७
सलीम, जहांगीर पहा
सलीम शहासूर ४५४
सादतखान–वजीर ८३६ ८४३
सादुल्लाखान ६३४,६४२,६७३
साबाजी आनंदराव २५७
सामानीवंश ६०
सायमन साधूचें चरित्र ५४७
सारंगखान १७४,१७६
सारंगदेव वाघेला २००
सिकंदर आदिलशहा २७७,२७८
सिकंदर लोदी १९०,५०३
सिकंदरशहा सूर ४५७
सीझर् बॉर्जिया ५४६
सिद्धराज ४०३
सिद्धराज जयसिंह चालुक्य १९६
सीदी जौहर २७६

सीदी मौला (दरवेशी) ११९
सुखानंद ७८२
सुजा ६३८,६४९,६६२–६५
सुजाउद्दौला ८५३
सुजाखान ८४०–८४२
सुजायतखान ७२७
सुबोधनी ७८५
सुरजमल्ल ८४६–८५४
सुरदासकवि ७८३
सुरसुरानंद ७८२
सुरूरउल्मुल्क १८८
सुलतान मीर्झा ४८४
सुलेमान–दाराचा मुलगा ६५०
सुलेमान मीर्झा ४७२
सूफीशहातह्मास्प ४६१
सेनराजे ३२०
सेना न्हावी ७८२
सैफुद्दीन घोरी ८१
सेल्जुक सुलतान मलीक ११६
सेल्जुक तुर्क ४०
सोमदेव कवि ३९९
सोमेश्वर ८९,९३
सेंट बार्थो लोमो ५४६
सेंट लुई ५५२

ह.

हनुमान् ३९९
हंबीरदेव १३२
हॅमिल्टन ८०९,८१०,८२३
हमीदा, लग्न ४५९, मृत्यु ४९८
हमीर १३१
हमीरहाडा ९२
हरदत्त ३६५
हरपाळदेव १३८,१४७
हरिहर–विजयनगरचा राजा २९४
हरिहर दुसरा २९६
हलायुध ३९९
हविष्क ३९३
हसन, हुसेन १५ त्यांची बहीण झैनाब १५मुलगे अलीउमर १५,कत्तल१६
हसन निजामी ९८
हसन व हुसेन–अकबराचे पुत्र ५०१
हॉकिन्स् कॅप्टिन ५७३
हाफीजकवि १८५,५२३
हिंदाल–बाबरचा मुलगा ४२८,४४२, ४४४,४४९–४५९,मृत्यु४६१-६३
हिमू ४५६,४५३,४७१–७३
हिलाली कवि ४२९
हुमाम हकीम ५६६
हुमायून–तुघ्लख ऊर्फ सिकंदर ११३
हुमायून–दरबारविभाग ५२९, परत आला ४२७, दळणें ४२७–४१ संकटें ४४३ वनवास ४५८ मृत्यु ४६४
हुशंगघोरी २२४
हुसेन निजामशहा २४७
हेमचंद्र १९७,७८७
हेमाद्रि ३९९

चुकांची दुरुस्ती.

एवढ्या मोठ्या पुस्तकांत अनेक प्रकारच्या चुका राहणें अपरिहार्य आहे. कित्येक चुका छापतांना खिळे पडून गेल्यामुळें झालेल्या आहेत. तथापि खालील दोन तीन गोष्टी वाचकांनी अगोदर दुरुस्त करून घ्याव्या.

पृष्ठ ३० ओळ ८ 'ह्या देशावर' चे बदलीं 'इजिप्त देशावर' पाहिजे.

पृष्ठ ८० दुसऱ्या पॅरेग्राफच्या आरंभीं 'इब्राहीमचा मुलगा महमुद-अली' हे शब्द पाहिजेत.

पृष्ठ ९१ ओळ खालून २-री पानपतची पहिली लढाई, नाहीं. पानपतची लढाई पहिली पृ० १९३, दुसरी पृ० ४७३, व तिसरी पृ० ८५२ वर आहे.

00146653

NATIONAL ARCHIVES OF INDIA

NATIONAL ARCHIVES OF INDIA

NATIONAL ARCHIVES OF INDIA

Digitized with financial assistance from

NSDL
Technology, Trust & Reach

on 16 November, 2018

NATIONAL ARCHIVES OF INDIA